# सूची


| सूरह क्रमांक | सूरहचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | फ़ातिहा | १ |
| २. | बक़रा | ७ |
| ३. | आले इमरान | १७७ |
| ४. | निसा | २५६ |
| ५. | मायदा | ३६२ |
| ६. | अनआम | ४५२ |
| ७ | अअराफ़ | ५४४ |
| ८. | अनफ़ाल | ६३९ |
| ९. | तौबा | ६८५ |

# चित्रे आणि नक़ाशे


| शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| मस्जिदे हरामचा नकाशा | ७५ |
| मस्जिदे हराम | ७७ |
| हज्जची स्थाने | १०९ |
| सई सफ़ा आणि मर्वाच्या दरम्यान | ८१ |
| अरफ़ात | १०५ |
| मस्जिद नमिरा-अरफ़ात | १०८ |
| हज्जची स्थाने | १०९ |
| मिना हज्ज प्रसंगी | ११९ |
| काबा गृह | २१७ |
| उहदच्या लढाईचा नकाशा | २२८ |
| उहद पहाड | २२९ |
| वारसा मधील हिस्सेदारांचा तक्ता | २७२ |
| बनी इस्राईलची वन भ्रमंती | ३८९ |
| खजूरांचे गुच्छे | ५०३ |
| नूह जन समूहाचे निवास स्थान | ५७२ |
| लूत जन-समूह व शुऐब जन-समूह यांची निवास -स्थाने | ५७८ |
| समूदचे भग्नायशेष | ५७९ |
| ऐला जे सब्तवाल्यांचे निवास स्थान होते | ६१७ |
| बद्रचा मार्ग मदीना, मक्का व सीरिया (शाम) पासून | ६४७ |
| बद्र युद्धाचा नकाशा | ६५० |
| बद्रचे रणक्षेत्र | ६५६ |
| मदीने पासून तबूक | ६८७ |
| अरब-क़बीले | ६९० |
| ग़ारे सौर | ७२३ |
| अनुक्रमणिका | ७७० |

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

बिस्मिल्लाह हिर्रहमा निर्रहीम

(परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने)

# प्रकाशकाचे निवेदन

जनाब शम्स पीरज़ादा यांच्या उर्दू मधील ''दअ्वतुल क़ुरआन'' या क़ुरआनावरील भाष्यांच्या पहिल्या भागाचे मराठी भाषांतर इ. स. १९७७ मध्ये आम्ही प्रथम प्रसिद्ध केले. त्यानंतर एका पाठो पाठ दुसरे भाग ही प्रकाशित झाले आणि आता क़ुरआनाच्या संपूर्ण तीस भागांचा मराठी भाषेत अनुवाद भाष्यासह तीन खंडात प्रस्तुत केले जात आहे.

मराठी महाराष्ट्राची प्रांत-भाषा आहे, ज्यात पवित्र क़ुरआनाच्या अशा अनुवादाची आवश्यकता होती, जी लोक आज बोलतात व समजतात. त्याच बरोबर अशा भाष्याची ही गरज होती जे सर्वांना आकलनीय ठरावे आणि क़ुरआनाच्या मूलभूत आवाहनास स्पष्टीकरणासह प्रस्तुत करण्या खेरीज आयतींचा आशय अधिक चांगल्या प्रकारे प्रस्तुत करीत असेल. अल्लाहचा मोठा अनुग्रह आहे की आमची दीर्घकालीन मनोकामना पूर्ण झाली आणि त्याने ही पात्रता प्रदान केली की मराठी जाणणाऱ्या मुस्लिम व मुस्लिमेतर बांधवांच्या सेवेत हे परिपूर्ण भाष्य सादर करू शकावे.

या गोष्टीचा आम्हला आनंद वाटतो की आमच्या देश-बांधवांमध्ये क़ुरआनास समजून घेण्याची प्रबळ इच्छा निर्माण झाली आणि ते इच्छितात की इस्लाम धर्माची ओळख करून घेण्याकरीता त्याच्या मूलभूत ग्रंथाचे अध्ययन करावे. आम्हाला वाटते, त्यांची ही अभिलाषा दुरूस्त आहे व सर्वतोपरि कदर करण्याजोगी आहे. इस्लामला चांगल्या प्रकारे समजून घेण्या करीता आवश्यक आहे की सर्व प्रथम क़ुरआनाचा अभ्यास केला जावा आणि आम्हाला खात्री आहे की जो मनुष्य देखील अगदी मोकळया मनाने क़ुरआनाचा अभ्यास करील, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यावर मार्गदर्शनाचे द्वार खुले करील.

क़ुरआनाचा अभ्यास करणाऱ्यांनी ही गोष्ट ही विचाराधीन राखावी की हा ग्रंथ एखाद्या माणसाने लिहिलेला ग्रंथ नव्हे, किंबहुना सर्व विश्वांचा पालनकर्ता अल्लाहची वाणी होय जी त्याचे पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अवतरली. आणि हा ग्रंथ जाति-समूहाच्या कसल्याही भेदाविना समस्त मानवांकरीता आहे, आणि एखाद्या कालखंडा करीता विशेषत्वाने नाही, किंबहुना कियामती पावेतो अर्थात या जगाच्या अंता पावेतो प्रत्येक स्थळ काळा करीता अल्लाहचा अंतिम संदेश आहे.

आम्ही मूळ अरबी व त्यांचे मराठी भाषांतर एका बाजूस व त्यावरील खुलासेवजा टीपा दूसऱ्या बाजूस अशी पद्धत अनुसरली आहे. टीपांचा मजकूर अधिक झाल्यास तो पुढील पानावर घेतला आहे. पण मूळ अरबी व त्याचे मराठी भाषांतर मात्र डाव्या बाजूसच घेतले असल्याने मध्यंतरी एखादे पान कोरे राहीलेले आहे. वाचकांना सवलत व्हावी म्हणून ही पद्धत अंगिकारली आहे.

अल्लाह आमची ही अल्पशी सेवा कबूल करो ही त्याच्याजवळ नम्र प्रार्थना.

२, डिसेंबर १९९५
मो. सिद्दीक कुरैशी
सेक्रेटरी
इदारा दअवतुल क़ुरआन मुंबई ४००००३

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

परम कृपाळू व परम दयाळू अल्लाहच्या नावाने

# प्रस्तावना

सृष्टीच्या मालकाकडून क़ुरआन हा एक पवित्र, महान आणि क्रांतीकारक संदेश मानवतेच्या नावे पाठविण्यात आला आहे. निष्काळजीपणाने झोपलेल्या माणूसकीला जागृत करणे, व तिच्या मनांत या सृष्टीच्या मालकाविषयी यथायोग्य ज्ञान निर्माण करणे व तिला अशा मार्गाकडे वळविणे जो ईश्वराकडे माणसाला आणून सोडतो. हा त्याचा प्रमुख उद्देश आहे. हा संदेश फक्त मुस्लिमांसाठी मर्यादित नाही. उलट संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी आहे, मग त्या जनसमूहाचा धर्म व देश कोणता का असेना, त्यांची भाषा अरबी वा इतर कोणतीही का असेना, मग ते या देशांत रहात असोत किवा इतर कोणत्याही देशांत वास्तव्य करीत असत.

या संदेशाची खरी निकड अशी आहे की पवित्र क़ुरआनचे भाषांतर विभिन्न भाषेत झाले पाहिजे. आणि प्रचंड प्रमाणावर त्याचा प्रसार केला पाहिजे. फक्त काही लोकांप्रयत त्याचा संदेश पोचविणे है पुरे नव्हे उलट अशी योजना आयोजित करण्यात आली पाहिजे की आमच्या भोवती वावरणाऱ्या कोटयावधी लोकांप्रयत तो संदेश पोचविणे शक्य होईल.

इस्लामी मिशनचा उत्कृष्ट प्रसार करण्याचे एकमेव व प्रभावी साधन पवित्र क़ुरआनच होय. खुद क़ुरआनाने त्याच्या या विशेष गुणांकडे खालील शब्दांत संकेत केलेला आहे :-

فَذَكِّرۡ بِالۡقُرۡاٰنِ مَنۡ يَّخَافُ وَعِيۡدِ

''मी दिलेल्या तंबीला लोकांनी भीत रहावे म्हणून क़ुरआनाच्या साधनाने लोकांना समज द्या.'' (सूरह काफ)

इस्लामी मिशनचा प्रसार करण्याच्या बाबतीत इतर साधनांना दुय्यम दर्जाचे स्थान आहे. प्रत्येक मिशनरी अभ्यासक्रमांत व प्रत्येक प्रकारच्या इस्लामी वाड्मयांत क़ुरआन हाच इस्लामी शिक्षणाचा केंद्रबिंदू असावा आणि या दिशेने प्रयत्रांच्या बाबतीत लोकांच्या मातृभाषेत ज्यांना उद्देशून क़ुरआनाचा संदेश उतरलेला आहे, क़ुरआनाच्या भाषांतराला प्राधान्य दिले पाहिजे. हल्ली इस्लामी समाजांत व्यक्तिवाद विभिन्न सांप्रदायात समाजाची विभागणी, व एका विशेष गटासाठी पुर्वग्रहाची प्रथा हे प्रकार फारच वाढलेले आहेत. या दुर्गुणांना मुळासकट उखडून काढण्यासाठी आजच्या काळाची तीव्र गरज हीच की आजच्या माणसाची सद्विवेक बुद्धी जागृत केली पाहिजे. पंथांत आपसांत व्यक्तिश इस्लामी नात्याची दृढभावना निर्माण केली पाहिजे. ही भावना इतकी तीव्र व दृढमूल पाहिजे की त्यांना क़ुरआनाचा संदेश सहज समजू शकेल आणि सत्य व असत्य मधील फरक त्यांच्या सहज ध्यानी येईल.

हे दोन उद्देश साध्य करण्यासाठी म्हणजे एकीकडे अमुस्लिमांपर्यंत क़ुरआनाचा संदेश पोचविणे आणि दूसरीकडे मुस्लिमांत शिक्षण, शिकवणूक, प्रसार, सुधारणांच्या क्षेत्रांत क़ुरआनावर लक्ष केंद्रित करणे, तसेच त्यांचे संबंध क़ुरआनाबरोबर बौद्धिक रितीने जोडण्यासाठी व मुस्लिमांत सुधारणा करण्यासाठी क़ुरआनाचे स्पष्टीकरण अशा पद्धतीने केले पाहिजे की वाचकाला सहजगत्या या पवित्र ग्रंथाचा संदेश व त्याचा अर्थ समजू शकेल. एकेश्वरवाद, मरणोत्तर जीवन आणि प्रेषितत्वाचा युक्तिवाद उत्तमरीतीने स्पष्ट झाला पाहिजे. आधुनिक काळाच्या मार्गभ्रष्ट करणाऱ्या विचारांच्या पार्श्वभूमीवर क़ुरआनाच्या शिकवणुकीचा मार्ग प्रकाशमय झाला पाहिजे. क़ुरआनाच्या शिक्षणाविषयी निर्माण झालेले ग़ैरसमज दूर झाले पाहिजेत. क़ुरआनातील आयतीचा आपसांतील संबंध व त्यांची रचना इतकी सपष्ट झाली पाहिजे की वाचकाला ज्ञान व बुद्धिमत्तेच्या खजिन्याची किल्ली सहज सापडू शकेल.

प्रशिक्षणाचे पैलू शुद्धाचरण व चारित्र्याकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे. इस्लामी कायदे आणि आदेशाचे महत्व स्पष्ट झाले पाहिजे. आणि जीवनाच्या समस्यांविषयी क़ुरआनाचे मार्गदर्शन स्पष्टीरीतीने प्रतिपादिले पाहिजे. आधुनिक काळाच्या माणसाला क़ुरआनाच्या जवळ आणण्यासाठी वर नमूद केलेल्या बाबींची तरतूद जरूरीची आहे, तसेच क़ुर्आनाची एक विशेष आवाहन शैली (Approach) ही आहे, जी संबोधिताला व्यक्तिश: ईश्वर आणि आखिरतच्या संबंधाने आपल्या जबाबदारीची जाणीव करुन देते आणि त्याला या गोष्टीस प्रवृत्त करते की त्याने सर्व प्रथम आपली श्रद्धा व आचरण दुरूस्त करून ध्यावे आणि अल्लाहचा परमाणिक दास बनावे.

अर्थात् ही मूलभूत व अतंर्भूत गुणवैशिष्टये निर्मान होण्यावरच या जबाबदारीची पूर्तता अवलंबून आहे जी बाहय आणि सामूहिक स्वरूपाशी संबंधित आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे कुरआनाचे खरे लक्ष माणसाचा आत्मा होय, बाहय व्यवस्था नव्हे, यास्तव क़ुरआन माणसासमोर सर्वप्रथम त्या गोष्टी ठेवतो,

ज्या त्याच्या मन मस्तिष्कात क्रान्ती घडवून आणतात आणि त्यानंतरच तो अशा योग्यतेचा होतो की बाहय जगात क्रान्ती घडवून आणेल. परंतु सध्याच्या काळात इस्लामी आवाहनास प्रस्तुत करण्याची एक वेगळीच पद्धत अवलंबिली जात आहे, ज्यात इस्लामी व्यवस्थेने तत्वज्ञान सांगितले जाते आणि खरा जोर या व्यवस्थेला प्रस्थापित करण्यावर दिला जातो, परिणामत: संबोधित आपल्या सर्वप्रथम जबाबदारीची जाणीव योग्य रित्या करू शकत नाही आणि ना धर्माचे मूल स्वरूप ओळखणारा बनतो, किंबहुना त्याची सर्व दृष्टी केवळ बाहय क्रान्तीवरच एकत्रित होऊन राहते, या परिस्थितीत सुधारणा होण्याकरीता आवश्यक आहे की प्रसंगानुरोधाने क़ुरआनाच्या आवाहनात्मक शैलीस स्पष्ट केले जावे. तसेच क़ुरआनाची व्याख्या व स्पष्टीकरण करतांना अशा प्रकारची परिभाषा वापरण्या पासून सावधगिरी बाळगावी जी क़ुरआनाची वैशिष्टयपूर्णता व त्याच्या मूल स्त्रोतास प्रभावित करणारी असावी. उर्दू भाषेत क़ुरआनाची अनेक भाष्ये (तफ़सीर) उपलब्ध आहेत. तरीही विभिन्न कारणांवरून संक्षिप्त परंतु अर्थपूर्ण स्पष्टीकरणाची तीव्र गरज भासते उदाहरणार्थ विभागीय भाषेत क़ुरआनाचे भाषांतर व टीकात्मक स्पष्टीकरण या साठीच आवश्यक आहे. म्हणजे एकीकडे मुस्लिमांचे समाधान होईल व दूसरीकडे अमुस्लिमांनाही त्याचा लाभ घेता येईल. हेच उद्देश्य डोळयांसमोर ठेऊन क़ुरआनाचे आवश्यक स्पष्टीकरण केले पाहिजे. याशिवाय हे स्पष्टीकरण संक्षिप्त परंतु सर्वग्राही असावे. नाहीतर लांबलचक स्पष्टीकरणमुळे त्याच्या लाभावर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे व अशा प्रकारांच्या स्पष्टीकरणाला जास्तीतजास्त लोकांपर्यत पोचविणेही कठिण होईल व त्याच्या प्रसारावरही वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जर स्पष्टीकरण फारच संक्षिप्त असेल तर अशा परिस्थितीत काही महत्वपूर्ण मुद्दे स्पष्ट करता येणार नाहीत आणि अमुस्लिमांसाठी याची उपयुक्तता फार कमी होईल. या सर्व कारणांवरून आणि हेच ध्येय डोळयासमोर ठेवून प्रस्तुत पुस्तक ''तफ़सीर दअवतुल क़ुरआन'' तयार केली गेली आहे. व तीन खंडात हे स्पष्टीकरण (भाष्य) सादर करण्यात आले आहे.

क़ुरआनाच्या स्पष्टीकरणाच्या टीपां विषयी काही मुद्दे स्पष्ट करणे जरूरीचे आहे. लेखकाने मूळ अरबीतून सरळ उर्दू भाषेत अनुवाद केला अणि त्याचवेळी अशी दक्षता बाळगली की वाक्‌प्रचारानुसार भाषांतर झाले पाहिजे. परन्तु मुक्त भाषांतर करता कामा नये. कारण मुक्त भाषांतरांत दैवी शब्दांचे भाषांतर करताना जी दक्षता हवी असते ती कधी कधी बाळगता येत नाही. आणि ईशवाणीच्या भाषांतराच्या बाबतीत तर अत्यंत काळजीपूर्वक भाषंतर केले पाहिजे. या शिवाय मुक्त भाषांतरांत शब्दांच्या अचूक भाषांतराकडे विशेष लक्ष दिले जात नाही. मुक्त भाषांतर तसे दिसायला तर फारच सुंदर आणि आकर्षक वाटते परंतु भाषांतराच्या बाबतीत केवळ भावार्थच महत्त्वाचा आहे मुळीच नाही. उलट भाषांतर आणि भावार्थाचे रूपांतर यामधील फरक लक्षांत घेतला पाहिजे शाब्दिक भाषांतरानेही हा उद्देश साध्य करणे शक्य नाही कारण त्यामुळे वाक्यांचा मुळ अर्थच गमवण्याची पाळी येते आणि त्याचा अर्थ समजणेही मोठे अवघड होते.

आमच्या मते वर नमूद केलेल्या दोन्ही पद्धती मधला मार्ग म्हणजे वाक्‌प्रचारानुसार भाषांतर जास्त योग्य व उचित असा आहे आणि पुन्हा हे सत्यही अमान्य करता येत नही की क़ुरआनातील शब्द इतके अर्थपूर्ण आहेत, त्याची भाषाशैली इतकी प्रभावी व आकर्षक आहे, त्याची शब्दयोजना अर्थाच्या दृष्टीने इतकी गुंतलेली आहे, त्याची वयवस्था इतकी उद्देशपुर्ण आहे आणि त्याचे आदेश इतके महत्त्वपूर्ण आहेत की क़ुरआनाचा इतर कोणत्याही भाषेत तंतोतंत भाषांतर करणे अगदी अशक्य आहे.

म्हणून आमच्या सर्व प्रयत्नांचा सारांश हाच की आम्ही तंतोतंत भाषांतर करू शकत नाही. केवळ भाषांतराची निकटता साध्य करण्याचा प्रयत्न करू शकतो. आधुनिक माणसाचे शंकानिरसन व समाधान व्हावे म्हणून स्पष्टीकरणाच्या टीपा तयार करतांना, हल्लीच्या आधुनिक मनांत निर्माण होणाऱ्या समस्या व क़ुरआनी मिशन आणि इस्लामी शिक्षणाच्या संबंधांत उद्‌भवणारे प्रश्न आम्ही डोळयासमोर ठेवलेले आहेत. परन्तु आम्ही क़ुरआनाला एका विशेष रंगात सादर न करण्याची काळजी ही घेतली आहे. मग तो सूफी वाद असो किवा राजकीय वाद, त्याचबरोबर एका विशेष सिद्धांताचे समर्थन करण्याचे साधन बनविलेले नाहीं. इस्लामी समाजाने स्वीकारलेल्लया धार्मिक श्रद्धे विरूद्ध कोणताही अर्थ लावता येईल अशा पद्धतीने आम्ही कुरआनाच्या शास्त्रसंबधित शब्द प्रयोगांचे भाष्य केले नाही. त्याच प्रमाणे अल्लाहची नावे आणि गुणांविषयी आम्ही पुर्वजांची तीच पद्धत स्वीकारलेली आहे जी इमाम मालिक यांनी दर्शविली आहे. इमाम मालिक यांना अर्श (ईश सिंहासन) वरील अल्लाहच्या अस्तित्वाविषयी प्रश्न विचारण्यात आला होता तेव्हा त्यांनी खालील शब्दांत प्रश्नाचे उत्तर दिले :-

''अल्लाहचे अस्तित्व ईश सिहांसना (अर्श) वह आहे ही गोष्ट माहित आहे. पण त्याचे स्वरूप माहित नाहि आणि तिच्या विषयी प्रश्न विचारणे ही एक आक्षेपार्ह नवीन गोष्ट (बिदअत) ठरेल.''

क़ुरआनाचे स्पष्टीकरण करतांना पैग़ंबरवचनांचा विशेष लाभ घेण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणून आम्ही स्पष्टीकरणाविषयी

लिहिलेल्या टीपा पैगंबर वचनाच्या (सुन्नाह) प्रकाशांत लिहिल्या आहेत. आणि संबंधित पैग़ंबरवचन ही गरज भासल्यास नमूद केलेले आहे. परन्तु आम्ही (रिवायत) कथनांच्या बाबतीत उदारता दर्शविलेली नाहीं कारण इतर साधनांद्वारे पुष्कळ कथनांचा अधिकृतपणा आमच्या मते शंकास्पद आहे. आणि काही कथनांची तर क़ुरआनाच्या निवेदनांशी एकवाक्यताही आढळत नाही.

इस्लामी क़ायदाशास्त्र (फ़िका) च्या बाबतीत आम्ही कोणत्याही एका विशेष (मसलक) पद्धतीचे अनुकरण केले नाही. याउलट जा गोष्ट युक्तिवादाच्या दृष्टीने क़ुरआन आणि सुन्नाहच्या जास्त निकट अशी आढळून आली. तिला स्वीकारण्यात आले. क़ुरआन आणि पैगंबरवचनांनुसार आढळलेल्या मुद्यांना आम्ही मान्य केले. एका विशेष फ़िका नुसार किंवा एका विशेष विचारसरणीनुसार क़ुरआनाचे भाषांतर करणे ही इतकी मोठी चूक आहे की त्यामुळे इस्लामी सनाजांत फाटाफट निर्माण झाली.

दअवतुल कुरआनाच्या स्पष्टीकरणाच्या टीपा लिहून तयार करतांना आम्ही प्रख्यात व अधिकृत आरबी तफ़सीर (भाष्ये) तसेच प्रख्यात उर्दू व इंग्रजी भाष्यांचाही लाभ घेतला आहे. येथे स्पष्ट रीतीने हे सांगणे ज़रूरीचे आहे की आम्ही कोणत्याही एका विशेष भाष्यावर अवलंबून राहिलो नाही उलट या बाबतीत संशोधनाची पद्धत अवलंबिली आहे. या शिवाय आमच्यातर्फे आम्ही अशा टिपण्यांची भर घातलेली आहे ज्या अमुस्लिमांसाठी उपयुक्त ठरतील उदाहरणार्थ आत्म्याच्या पुनर्जन्मांची कल्पना, सर्वधर्म समान आहेत हा सिद्धान्त, अहिंसा, अवतार, देवी देवतांच्या काल्पनिक कथा, मुर्तीपूजा, अनेकश्वरवाद वगै़रे क़ुरआनाच्या निवेदनाचा अधिकृतपणा अधिक स्पष्ट व्हावा म्हणून जेथे गरज भासली तेथे बायबलचे उतारे नमूद केले आहेत. त्याचप्रमाणे आम्ही आधुनिक कल्पना व विचारांवर ज्यांनी आजच्या पिढीच्या मनांवर वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे भरपूर टीका केली आहे. उदाहरणार्थ कुटूंब नियोजन, व्यापारी व्याज, स्त्री आणि पुरूष यांच्या समान दर्जाची कल्पना, धर्म अणि सोडचिठ्ठी विषयी पाश्चिमात्यांचा दृष्टीकोन, आणि धर्माला राजकरण व समाजिक जीवनापासून अलिप्त ठेवण्याची भूमिका बग़ैर त्याचप्रमाणे मुसलमानां मध्ये पसरलेल्या मार्ग भ्रष्टतेचे ही खंडन केले गेले आहे. उदाहरणार्थ क़बरी ची पूजा, बिदअत, व्यक्तिपूजा, कथन भक्ति, भ्रमपूजा आणि तत्सम अवडंबर पूर्ण बाबी वग़ैरे.

महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा मराठी असून ही भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे म्हणून इदारा दअवतुल क़ुरआन या संस्थेने क़ुरआनाच्या मराठी भाषांतराला प्रकाशित करण्याच्या कार्यक्रमाला प्राधान्य दिले आहे.

ईश्वरापाशी आमची अशी प्रार्थना आहे की हे कार्य पार पाडण्यासाठी त्याने आम्हाला साहय करावे, पवित्र क़ुरआनाच्या अर्थाला समजण्याची क्षमता व ज्ञान प्रदान करावे व आमच्या चूका माफ़ करून आमच्या सेवेचा स्वीकार करावा.

**शम्स पीरज़ादा**
इदारा दअवतुल क़ुरआन
५९, मुहम्मद अली रोड,
मुंबई - ४०००३
४, डिसेंबर १९९५

# कुरआनाचा अभ्यास करणाऱ्यांनो !

कुरआन या भूतलावर असा एकमेव ग्रंथ आहे, जो आपल्या विषय, हेतु, क्रमबध्दता, वाक्यरचना आणि निवेदन शैलीच्या दृष्टीने मानवलिखित ग्रंथाहून अगदी भिन्न व वैशिष्टयपूर्ण आहे. यातील शब्द न शब्द (word to word) सकल सृष्टीच्या शासकाची वाणी आहे, जी त्याचे पैग़म्बर हज़रत मुहम्मद सल्लाल्लाहु अलैहि वसल्लम यांच्यावर तेवीस वर्षाच्या कालावधीत (हि. स. ६१० ते ६३२) मक्का आणि मदीना या ठिकाणी अवतरली.

अर्थात या दिव्य ग्रंथापासून मार्गदर्शन प्राप्त करण्याकरीता या गोष्टीची आवश्यकता आहे की माणसाने विशुद्ध व निकोप मनाने याचा अभ्यास करावा आणि सत्य-स्वीकृति करीता आपल्या मन-मस्तिष्काची कवाडे खुली राखावीत, पक्षपात, मानसिक संकोच (Mental Reservations) आणि पूर्वग्रह दुषित मनोवृत्ति (Prejudiced Mind) हे असे अडसर आहेत जे क़ुरआन अध्ययन व आकलनाच्या मार्गात उभे राहतात.

या ग्रंथाला मानवी ग्रंथाच्या पातळीवर ठेवणे आणि यात अतंर्भूत असलेल्या बाबींचे माणसाने स्वत:च तयार केलेल्या नियम व परिमाणांनी मूल्यांकन करणे, ही अशी मूलभूत चुक आहे, जी माणसाला चुकीच्या मार्गवर नेऊन सोड़ते. हा ग्रंथ अशा अद्वितीय हस्ती (अस्तित्वा) ची वाणी आहे जी बुद्धि कौशल्य युक्त आहे आणि महणूनच यातील प्रत्येक आयत (पवित्र वचन) अशयपूर्ण व यातील प्रत्येक बाब बुद्धिकौशल्य पूर्ण आहे, मग जरी याचे भाष्य लिहिणाऱ्याला किंवा याचा अभ्यास करणाऱ्यला यथोचित आकलन न झाल्याने बुद्धि कौशल्य पूर्णत: स्पष्ट उमजले नसेल.

जेथपावेतो आयतीच्या संदर्भाचा संबंध आहे. तर ज्याप्रमाणे असंख्य तारे आकाशात इतस्तत: विखुरलेले आहेत. परंतु ते आपल्या आकाशगंगेच्या व्यवस्थेशी जुळलेले आहेत, तद्वतच क़ुरआनच्या आयती (वचने) आपापल्या सूरती (अध्याया) च्या व्यवस्थेशी निगडीत आहेत आणि प्रसंगी हा संबंध इतका सूक्ष्म असतो की अधिक चिंतनानेच तो ध्यानी येतो. तसेच हे ही खरे की किती तरी आयतीच्य दरम्यान संदर्भावस्था, ती परिस्थिती असते ज्यात त्या आयतीचे अवतरण होते. तेव्हा यांच्यात ज्ञान विषयक संदर्भ बांधण्याऐवजी त्यांची पृष्ठभूमी जाणून घेतली पाहीजे, जी यांना जोडण्यास कारक ठरली.

राहीले मजकूरांचे पुन्हा पुन्हा उल्लेखिले जाणे तर याला मेघ-गर्जनेची उपमा देता येईल. जिची अत्याधिकता आपल्या सोबत पाऊस आणते? वास्तविक पाहता, क़ुर्आन अशा प्रकारचा एखादा ज्ञान विषयक ग्रंथ नाही, ज्या प्रकारची ज्ञान विषयक पुस्तक मनुष्य संपादित करतो आणि ज्यास शिर्षक-सूची कायम करून प्रत्येक शिर्षकावर वेगवेगळी चर्चा केली जाते, किंबहुना तो आवाहानात्मक, शिकवण विषयक, जीवनात मार्गदर्शन ही करतो. या खेरीज तो ज्ञान व बुध्दि कौशल्याचे मोती ही विखुरतो; यास्तव जर यात एकाच पाठाची वारंवार पुनरावृत्ति झाली आहे तर हे माणसाचे वैचारीक कर्मविषयक प्रशिक्षण लक्षात घेत आहे. वस्तुत: क़ुरआनचे उद्दिष्टच चारीत्रय घडण आणि गुणांनी युक्त माणसे घडविणे आहे. तेव्हा एकाच गोष्टीला अनेकविध रंगानी मांडणे बुद्धि कौशल्य युक्त व अलंकार पूर्ण भाषेचे अप्रतिम वैशिष्टयच होय. यास्तव याला केवळ पुनरावृत्ति समजणे संकुचित आकलना खेरीज आणखी काही नाही. ही गोष्ट ही स्पष्ट असावी की ईश-वाणीची हीच शैली पूर्वीच्या अवतरीत ग्रंथमध्ये ही राहीली आहे. आणि महणूनच जबूर मध्ये तौहीद (एकेश्वरवाद) आणि अल्लाहच्या प्रशंसेचा मजकूर वारंवार वर्णन करण्यात आला आहे. यावरून असे दिसून येते की माणसाच्या मार्गदर्शना करीता जेव्हा जेव्हा ईश-वाणी अवतरली लय एकाच प्रकारची राहीली.

# १. सूरह फातिहा

ही सूरह (अध्याय) पैगंबरी जीवनाच्या सुरवातीच्या काळात मक्का शहरी अवतीर्ण झाली. यामध्ये सात आयती आहेत. या सूरतीचे स्वरुप पवित्र कुरआनच्या प्रस्तावनेचे आहे. आणि याच कारणाने हिचे नावं 'सूरह फ़ातिहा' म्हणजे प्रारंभिक सूरत असे आहे. या सूरतीचे वैशिष्टय हे आहे की अत्यंत संक्षिप्त असूनही हिच्यामध्ये साऱ्या कुरआनचा आशय समाविष्ट आहे. आणि म्हणून या सूरतीला 'उम्मुल कुरआन' असे म्हटले गेले आहे. पवित्र कुरआनच्या आवाहनाचे मूलभूत मुद्दे (१) तौहीद-एकेश्वरवाद (२) आखिरत-या जगाचा शेवट होऊन अस्तित्वात येणारे मरणोतर जीवन व (३) रिसालत - पैगंबरांची नियुक्ति, यांचा या सूरतीमध्ये अत्यंत खुबीदारपणे समावेश करण्यात आलेल्या आहे. या सूरती मध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या दयाळूपणा, पालनकर्तृत्व व ईशत्व या गुणांचा उल्लेख आहे. जे तौहीदचे समर्थन करतात. निर्णयाच्या दिवसाचा स्वामी असणे ही गोष्ट तौहीद व आखिरत या दोन्हींचे समर्थन करते. 'इनामप्राप्त लोकांचा मार्ग' पैगंबर नियुक्ति क्रमाचे समर्थन करतो.

या सूरतीच्या अर्थावर मनन केल्याने सत्य व वास्तव्याचे असंख्य पैलू प्रकट होतात. व असे वाटू लागते की सागरला कुंभात बंद करुन ठेविले गेले आहे.

ही सूरत प्रार्थनेच्या शैलीमध्ये आहे. आणि प्रार्थनाही अशी की जी एका सत्वशील व्यक्तिच्या विवेकाचा आवाज व त्याच्या अंत:करणा पासून निघालेले स्तुति-गान होय. जणू काय, या सूरतीमध्ये परमेश्वराने माणसाला ही शिकवण दिलेली आहे की त्याने या शद्बांत त्याच्या दरबारी प्रार्थना करावी. बोलांचा ढंगही अत्यंत छान आहे. परंतु ज्यांना ढंगाचा गंध नसतो ते आक्षेप घेतात की, जर हे अल्लाहचे बोल आहेत तर 'मी अल्लाहच्या नावाने सूरू करतो' से म्हणण्याचा अर्थ काय? येथे अलंकारिक शैली अत्यंत स्पष्ट आहे. बोलांच्या ढंगावरुन हे उघड होते की, विश्वांचा निर्माता आपल्या भक्तांना ही शिकवण देत आहे की, त्यानी त्याची स्तुति व गुणगान या दरबारी या प्रारंभासह व या शब्दांत करावे आणि या बोलांसह त्याच्या दरबारी याचना करावी. या प्रकारे भक्तांना केवळ आज्ञाधारक पणाचीच शिकवण दिली नाही तर त्यांना आज्ञाधारकपणाचे शिष्टाचारही शिकविले गेले आहेत.

परमेश्वराने यापूर्वी यहुदी व ख्रिश्च्न लोकांना इस्लामचा राजमार्ग दाखविला होता. हेतू हा की, त्यांनी स्वत: त्याप्रमाणे आचरण करावे व इतराना त्या प्रमाणे वागण्याचे आवाहन करावे. परंतु त्यानी चुकारपणा व दुराचरण केले. ते स्वत: हि सत्यमार्गापासून वंचित झाले व इतरांनाहि त्यांनी अंधारात भटकण्यास मोकळीक दिली. ही प्रार्थना या अंधारातून बाहेर आणण्यासाठी ईशचरणी केलेली याचना आहे. आणि या प्रार्थनेच्या फलस्वरुप जगाला कुरआनचा प्रकाश लाभला आहे.

दास परमेश्वराजवळ मार्गदर्शनासाठी प्रार्थना करीत आहे आणि परमेश्वर त्याच्या प्रार्थनेचा स्वीकार करून संपूर्ण कुरआन त्याच्या समोर ठेवित आहे व सांगत आहे, दासा !ज्याची तुला तळमळ लागून राहीली आहे. ज्याचा तुला शोध आहे, तो उपदेशांचा मार्ग हा आणि फक्त हाच आहे. चल,उठ, माझे नांव घे आणि या मार्गावर चालू लाग.

**सूरह फ़ातिहा आणि नमाज़**

नमाज़च्या प्रत्येक रकअतीत सूरह फ़ातिहा अनिवार्यत: पढली जाते. ही सर्वश्रेष्ठ अल्लाहशी प्रार्थना आहे आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह दासा कडे लक्ष केंद्रित करुन प्रत्येक आयतीचे उत्तर फर्मावितो. हदीस कुदसी मधील उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो 'मी नमाज़ला आपल्या व दासाच्या दरम्यान निम्मे निम्मे विभागले आहे आणि माझ्या दासा करिता तेच काही आहे जे त्याने इच्छिले. यास्तव दास जेव्हा **'अलहम्दु लिल्लाहि रब्बिल आलमीन'** म्हणतो तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो, माझ्या दासाने माझी प्रशंसा केली, जेव्हा दास **'अर्रहमानिर्रहीम'** म्हणतो तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो माझ्या दासाने माझी स्तुती केली. जेव्हा दास **'मालिकि यौमिद्दीन'** म्हणतो तेव्हा अल्लाह फर्मावितो, माझ्या दासाने माझे थोरत्व वर्णन केले. जेव्हा दास **''इय्याका नअबुदु व इय्याका नस्तअीन''** म्हणतो तेव्हा अल्लाह फर्मावितो, हे माझ्या व माझ्या दासाच्या दरम्यान समाईक आहे आणि माझ्या दासा करिता ते काही आहे जे त्याने मागितले आणि जेव्हा दास **''इह्दिनस सिरातल मुस्तक़ीम सिरातल्लज़ीना अनअम्ता अलैहिम ग़ैरिल मगदुबि अलैहिम वलद्दाल्लीन''** म्हणतो तेव्हा अल्लाह फर्मावितो हे माझ्या दासा करिता आहे आणि माझ्या दासा करिता ते काही आहे जे त्याने माझ्या कडून मागितले. (मुस्लिम, नसाई)

# १. सूरह फातिहा

سُوۡرَةُ الفَاتِحَة

अनुवाद

आयते - ७

परम दयाळू (रहमान) व परम कृपाळू (रहीम) अल्लाहच्या नांवाने. [१]

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

१. स्तुति व कृतज्ञता [२] अल्लाह [३] साठीच जो साऱ्या विश्वांचा रब.[४] (पालनकर्ता) आहे.

اَلۡحَمۡدُ لِلّٰهِ رَبِّ الۡعٰلَمِيۡنَ (١)

२. रहमान व रहीम [५] आहे.

الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ (٢)

३. निर्णयाच्या (शेवटच्या) दिवसाचा [६] स्वामी आहे.

مٰلِكِ يَوۡمِ الدِّيۡنِ (٣)

४. आम्ही तुझीच इबादत [७] (उपासना ) करतो व तुझ्याच मदतीची याचना [८] करतो.

اِيَّاكَ نَعۡبُدُ وَاِيَّاكَ نَسۡتَعِيۡنُ (٤)

५. आम्हांला सरळ मार्ग दाखव [९]

اِهۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِيۡمَ (٥)

६. त्या लोकांचा मार्ग, ज्यांना तू तुझ्या इनामाने [१०] उपकृत केलेस

صِرَاطَ الَّذِيۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَيۡهِمۡ (٦)

७. ज्यांच्यावर तुझा कोप [११] झाला नाही; व जे मार्गभ्रष्ट [१२] झाले नाहीत.

غَيۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَيۡهِمۡ وَلَا الضَّآلِّيۡنَ (٧)

१. **'बिस्मिल्लाह् हिर्रहमानिर रहीम'** ही पवित्र कुरआनची सुरवातीची आयत (महावाक्य) आहे आणि 'सूरह तौबा' ख़ेरीज प्रत्येक सुरतीची सुरवात याच आयतीने होते. जणू हिचे स्वरूप प्रस्तावनेसारखे आहे, हे थोडेसे सर्वकष, अर्थपूर्ण व अत्यंत शूभ शब्द आहेत. यामध्ये ईश्वराची मंगल नांवे व त्याच्या दयाळूपणा या गुणाचा उल्लेख आहे. या प्रारंभिक बोलांचेच मनन केल्यास ईश्वराच्या खऱ्या परिचयाचे दरवाजे खुलू लागतात आणि माणसाला ईश्वराची खरी ओळख होणे हा त्याच्याच दयाळूपणाचा अविष्कार आहे.

कोणत्याही चांगल्या कामाची सुरवात करणया साठी याहून अधिक योग्य व चांगल्या शब्दांची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. याच कारणामुळे प्रत्येक चांगल्या कार्याची सुरवात, इतकेच नव्हे तर, खाण्यापिण्याची सुरवात देखील याच शब्दांनी (बिस्मिल्लाह् अल्लाह च्या नावाने) करणे हे इस्लामी संस्कृतीचे प्रतिक आहे.

इस्लामचे पैगंबर हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्यावर ईश्वराची कृपादृष्टी असो) यांच्यावरील संदेशाची (पवित्र क़ुरआन) सुरवात اِقْرَأْ بِسْمِ رَبِّكَ الَّذِىْ خَلَقَ

**''इक़्रा बिस्मि रब्बिकल्लजि ख़लक़''** ''ज्याने निर्माण केले त्या पालनकर्त्याचे नांव घेऊन वाच''या शब्दांनी झालेली आहे. यानंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने **''बिस्मिल्लाह''** ही आयत उतरवून माणसाचे मार्गदर्शन केले की त्याने आदेशाचे पालन या शब्दांत करावे.

हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबतीत बायबल (जुना करार) मध्यें ही भविष्यावाणी करण्यात आलेली आहे की, आपण अल्लाहची वाणी अल्लाहचे नांव घेऊन सादर कराल –

''मी त्यांच्यासाठी त्यांच्या भाऊबंदातून तुझ्या (मूसा) सारखा ऐक संदेष्टा उभा करीन, त्याच्या मुखांत मी आपली वचने घालीन आणि त्यांना ज्या आज्ञा मी देईन त्या सगळ्या तो त्यांना निवेदन करील. तो माझ्या नांवाने बोलेल ती वचने जो कोणी ऐकावयाचा नाही त्याला मी जाब विचारीन.''

(पवित्र शास्त्र-इस्तिस्ना-१८ : १८, १९)

या आयतीचे स्वरुप प्रार्थनेचे आहे.दास ईश्वरी ग्रंथाची सुरवात करताना सर्वश्रेष्ठ अल्लाहची प्रार्थना करतो. की, या ग्रंथाचे अध्ययन तुझ्याच अनुग्रहावर अवलंबून आहे. तुझे साहाय्य लाभले तरच तुझ्या उपदेशाचा मार्ग माझ्या करीता प्रकाशमान होईल आणि सत्य व वास्तव्याच्या या अथांग सागरामधून ज्ञान व अंतर्दृष्टीचे मोती मी वेचूं शकेन.

'बिस्मिल्लाह मधील 'बे' हे कुरआनचे पहिले अक्षर आहे. आणि अरबी व्याकरणानुसार हे 'मदत प्राप्ती-साठी' आहे. जणूकाय, पवित्र कुरआनचे हे पहिले अक्षरच ''वाचक हा एक नम्रसेवक असून त्याला अल्लाहच्या मदतीची प्रत्येक क्षणी आवश्यकता आहे.''हा वाचकाचा दर्जा स्पष्ट करते. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या शिकवणीचा मार्ग त्याच लोकांवर उघड करतो. जे ईश्वरी ग्रंथाचे अध्ययन 'ईश्वर' बनून नव्हे तर स्वत:ला ईश्वराचे आज्ञाधारक दास जाणून सत्यशोधक व उपदेशाचे याचक बनून करतात.

२. मूळात ''हम्द'' हा शब्द वापरण्यात आला आहे. याचे (१) स्तुती व प्रशंसा आणि (२) कृतज्ञता व धन्यवाद असे दोन्ही अर्थ होतात स्तुती अल्लाहसाठीच आहे याचा अर्थ असा की, अल्लाह सर्वगुणसंपन्न व नैपुण्यानी नटलेला आहे तो दोष, दौर्बल्यापासून पवित्र व मुक्त आहे. इतकेच नव्हेतर त्याच्या ठायी सौदर्यच सौदर्य व श्रेष्ठत्व आहे. व तो कल्याण समृद्धिचा झरा आहे. त्याची हो वैशिष्ट्ये व नैपुण्ये वैयक्तिक व चिरस्थायी आहेत. आणि तो सर्व सद्‌गुणामध्यें अेकमेव व एकटा आहे. आणि म्हणून तो एकटाच प्रशंसेस पात्र आहे व त्याचेच गुणगान झाले पाहिजे. त्याच्या शिवाय इतर कोणामध्येंही स्वयंभू गुण नाहीत. आणि म्हणून या विश्वात अेकापेक्षा अधिक ईश्वरांच्या कल्पनेस मूळा-पासून कसलाही आधार नाही आणि जेव्हां ही वस्तु:स्थिति आहे तेव्हा अल्लाह शिवाय दुसऱ्या कोणालाहि ईश्वर समजून त्याचे गुणगान करण्याचा व त्याची माला जपण्याचा प्रश्नच कोठे उद्‌भवतो? आणि कृतज्ञता अल्लाहसाठीच आहे. याचा अर्थ असा की, माणसाला ज्या असंख्य देणग्यांनी उपकृत केले गेले आहे त्या सर्व, ईश्वराचीच बक्षिसे व इनाम आहेत. उदाहरणार्थ, जीवनासारखी थोर देणागी; खाण्यापिण्याची उच्च अभिरूचि व त्यानुसार उपजिविकेचे साहित्य, नयनांना शीतलता देणारी संतति, बुद्धि, जाण व ज्ञान यांचे ऐश्वर्य आणि इतर बाह्य व आंतरिक देणग्या या सर्व त्याच्याच दिलेल्या आहेत. आणि म्हणून आमच्या कृतज्ञतेचा हक्कदार फक्त तो एकटाच आहे. या त्याच्याच देणग्या आहेत हे मान्य केले पाहिजे आणि त्याचेच कृतज्ञ व आभारी बनून राहिले पाहिजे. कृतज्ञतेची ही भावना इस्लामी जीवन व्यवस्थेचा पाया आहे. आणि याच आधारावर विश्वनिर्मात्याबरोबरचे माणसाचे योग्य संबंध प्रस्थापित होतात. जणूकाय ही मार्गदर्शनाची गुरूकिल्ली आहे. आणि म्हणूनच पवित्र कुरआन माणसाचे बौद्धीक व वैचारिक प्रशिक्षण या पद्धतीने करीते की, माणसामध्ये कृतज्ञतेची भावना जागृत होऊन तो अल्लाहचा आसक्त व्हावा.

३. अल्लाह त्या अस्तित्वाचे नांव आहे जो सर्व विश्वांचा निर्माता आहे. हे नांव सदैव त्याच्यासाठी खास आहे अरबी मध्ये याचा अर्थ, 'वास्तव उपास्य' सच्चाईश' असा आहे. दुसऱ्या भाषांमध्ये त्याला योग्य प्रतिशब्द मिळणे कठीण आहे. उर्दूमध्ये

'खुदा' आणि इंग्रजीमध्यें God हे शब्द सामन्यता विश्वाच्या निर्मात्यासाठी वापरले जातात. परंतु God हा शब्द देवी, देवता बद्दलही वापरला जातो. याचे स्त्रीलिंग Goddess असे होते व याचा अर्थ 'देवी' असा होतो. मराठीमध्ये 'ईश्वर' व 'परमेश्वर' हे शब्द सर्वश्रेष्ठ ईश Supreme Being या अर्थी वापरले जातात. परंतु या 'शिव व विष्णू' यांच्या पदव्या पण आहेत 'ईश्वर' हा शब्द 'ईश' व वर या दोन शब्दांनी बनलेला आहे. 'ईश' चा अर्थ स्वामी व अधिपति असा आहे. आणि 'वर' चा अर्थ श्रेष्ठ असा आहे. यानुसार 'ईश्वर' याचा अर्थ श्रेष्ठ स्वामी, श्रेष्ठ अधिपति असा होतो परंतु याचे स्त्रीलिंग 'ईश्वरी' असे होते, जे देवीबद्दल वापरले जाते. याचप्रमाणे परमेश्वर हा शब्द 'परम' व ईश्वर' या दोन शब्दांनी बनलेला आहे. 'परम' याचा अर्थ महान असा आहे. म्हणजे परमेश्वर याचा अर्थ महान ईश्वर असा होतो. 'ईश्वर' व परमेश्वर या दोन्ही शब्दाचा वापर विश्वनिर्मात्याबद्दल केला जातो. परंतु हे दोन्ही शब्द त्याच्याबद्दल खास नाहीत. आणि देवी, देवता साठीही त्याचा वापर, गुण वा पदवीदर्शक म्हणून केला जातो. याच्याप्रमाणे भागवान हे नांवही अल्लाहसाठी खास नाही. इतकेच नव्हे तर याचाही वापर देवाबद्दल, गुण वा पदवीदर्शक म्हणून केला जातो. उदाहरणार्थ, भगवान 'वासूदेव' याचप्रमाणे विष्णू व शिव यांनाही भगवान म्हणून संबोधिले जातो.

आणि म्हणून ही नामे कुरआनच्या ''अल्लाह'' या नामाबद्दल, जे विश्वनिर्मात्याबद्दल अगदी खास आहे. व सर्व प्रकारच्या सदेहापासून पवित्र आहे, योग्य ठरत नाहीत. यास्तव पवित्र कुरआनमध्ये, जेथे जेथे 'अल्लाह, हे नांव आलेले आहे तेथे तेथे, आम्ही मराठी अनुवादात देखील ''अल्लाह'' या शब्दाचा वापर करणे उचित समजले.

पवित्र कुरआन मध्ये ''अल्लाह'' हे नांव २६९७ वेळा आलेले आहे यावरुन अनुमान होऊ शकतो की या नावाचा परिचय, किती तपशील व खुलाशासह पवित्र कुरआनमध्ये करुन देण्यात आलेला आहे.

४. 'रब' चा अर्थ पालनपोषण करणारा, स्वामी व अधिपति असा आहे अल्लाह विश्वाचा रब आहे. याचा अर्थ असा की तो फक्त विश्वाचा निर्माता व पालनकर्ताच नव्हे तर त्याचा स्वामी व अधिपतिदेखील आहे. सर्व अधिकार त्याच्याच हाती आहेत व विश्वाची सर्व व्यवस्था तो एकटा पहात आहे. सारी निर्मिती, सारे विश्व त्याच्यासमोर नम्र आहे. आणि सर्व त्याचे अधिकारशून्य व असहाय दास आहेत. खरा सत्ताधीश व शासक तोच आहे. कारण स्वामी व अधिपती होण्याचा अर्थच हा आहे. त्याचे हे अधिपत्य या जगापर्यंतच मर्यादित नाही.परंतु तारांगणापुढे आणखीन जे जग आहे तेथेही त्याचे आधिपत्य स्पष्ट आहे. माणूस व पशू. जिन व ईष-दूत (फिरिस्ता) इहलोक (दुनिया) परलोक (आखिरत), सर्वांचा पालनकर्ता व स्वामी तोच आहे.

येथे ही गोष्टही विचारणीय आहे की, رَبُّ الْعَالَمِيْنَ ''रब्बुल आलमीन'' फर्माविले गेले आहे. رَبُّ الْمُسْلِمِيْنَ ''रब्बुल मुस्लिमीन'' मुसलमानांचाच पालनकर्ता नव्हे तर साऱ्या विश्वाचा पालनकर्ता याचा अर्थच असा की, अल्लाह कोणत्याही एका गटाचा, एका वर्गाचा वा एका जातीचा पालनकर्ता नाही. कसलाही भेदभाव न बाळगता, तो साऱ्या मानवजातीचा पालनकर्ता आहे.

५. ''रहमान''व ''रहीम'' हे दोन्ही शब्द 'रहमत,(दयाळूपणा) पासून बनलेले आहेत. व तो अल्लाहचा गुण आहे. 'रहमान, अतिशयोक्तीचा अलंकार आहे. याचा अर्थ अत्यंत दयाळू, कृपाळू यामध्ये कृपाळूपणाचा आवेग प्रभावित आहे आणि मानवाची निर्मिती, त्याच्या कोपाचा परिणाम म्हणून नव्हे तर त्याच्या दयाळूपणाच्या आवेगाच्या फलस्वरुप झालेला आहे या गोष्टीकडे हा इशारा आहे आणि त्याचा हा दयाळूपणा अत्यंत विशाल व सर्वव्यापी आहे. मानवाचा कोणताही गट, विशिष्ट ज़ात व विशिष्ट राष्ट्रच नव्हे तर सारी मानवता यापासून लाभ उठवित आहे. इतकेच नव्हे तर सारी निर्मिती व साऱ्या विश्वावर त्याच्या दयाळूपणाचा प्रभाव पडलेला आहे. सर्वव्यापी दयाळूपणाच्या या अर्थानुसार हे नांव रहमान-अल्लाहसाठी खास झाले आहे. आणि 'रहमान, या नांवाने फक्त त्यालाच पुकारले जाते. संबोधिले जाते.

'रहीम' विशेषनाम आहे. आणि ते हा पैलू स्पष्ट करते की त्याचा दयाळूपणा कायमचा व निरंतर आहे. मानवाची फक्त निर्मितीच त्याच्या दयाळूपणाच्या आवेगाच्या फलस्वरुप झालेली नाही तर तो मानववर आपल्या दयाळूपणाचा वर्षाव सत्त करीत आहे. या गोष्टीकडे हा इशारा आहे. आणि जे लोक त्याच्या मार्गावर आचरण करतील, त्यांना तो आपल्या दयाळूपणाने कायमचे उपकृत करील.

स्पष्ट असावे की 'रहीम' व 'राम, समानार्थी समजणे बरोबर नाही. कारण रहीम हा एकट्या अशा अल्लाहचा विशेष गुण आहे. तर राम हे एका धर्माच्या नेत्याचे नांव आहे.

६. म्हणजे कियामतीचा दिवस. या दिवशी अल्लाह न्यायालय भरवील व सर्व होऊन गेलेल्या माणसांना यासाठी पुन्हा जिवंत करील की त्यांनी त्याच्या दरबारी हजर होऊन आपापल्या जीवनकार्याचा हिशोब सादर करावा व आपल्या चांगल्या वा वाईट आचरणा नुसार इनाम व शिक्षा मिळवावी.

न्याय व समता हे अल्लाहचे गुण आहेत. आणि त्यांची निकड ही आहे की त्याच्या सेवकांच्या दरम्यान न्याय करण्यात

यावा. त्याच्या एकनिष्ट सेवकांना बक्षीसाने उपकृत करण्यात यावे व बंडखोरांना कडक शासन करण्यात यावे.

इनाम व शासनाची ही कल्पना, पुनर्जन्माच्या कल्पनेहून अत्यंत भिन्न आहे. पुनर्जन्माची कल्पना हा एक फेरा आहे. न त्याची सुरवात आहे न शेवट,या श्रध्दे नुसार हे जग म्हणजे शिक्षागृह आहे. ही श्रध्दा माणसाला पुन्हा जिवंत करणे, विश्वाच्या शासकाकडून न्यायालय भरविले जाणे, माणसांच्या अचारांची नोंद सादर करणे आणि अल्लाहकडून कायमचे इनाम वा शासन लाभणे या वस्तुस्थितीपासून अगदी मुक्त आहे.

न्यायाची कल्पना माणसाच्या स्वभावात आहे. याच कारणामुळे माणूस न्यायालये प्रस्थापित करतो, आणि म्हणून विश्वाच्या शासकाकडून एके दिवशी सर्वांना गोळा करुन न्यायालय भरविले जाणे ही गोष्ट अवाजवी नाही. तर तो बुध्दिला अगदी पटणारी व स्वभावाशी अत्यंत मेळ खाणारी व त्याची उघड निकड आहे.

पवित्र कुरआन मध्ये जागोजागी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या पालकत्वाचा गुण आणि न्याय व शासनाचा गुण यानी 'अखिरतचे'- मरणोत्तर जीवन-समर्थन केले गेले आहे. याचा खुलासा असा की, सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाच्या पालनपोषणाची व पालकत्वाची जी व्यवस्था केली आहे, ती ज़ेव्हा माणूस आपल्या उघड्या डोळ्यांनी पहात आहे. तेव्हा पालकत्वाची ही निकड स्पष्ट दिसून येते की, इनाम व शासनाचा एक दिवस झाला पाहिजे. कारण सदाचारी लोकांना त्याच्या सदाचाराचे भरपूर फळ आणि दुराचारी लोकांना त्यांच्या कर्माची योग्य शिक्षा मिळाली पाहिजे. कुरआन म्हणत आहे की, ज्या ईश्वराने तुमच्यासाठी जमीनीची बिछाईत केली, आकाशाला सुरक्षित आच्छादन बनविले तुम्हाला आकाशाचा लाभ व्हावा म्हणून सूर्य चंद्राला, प्रकाशमान केले; तुमच्या सौदर्य अभिरुचीसाठी तेजस्वी तारामंडळ सजविले; वाऱ्याला तुमच्या सेवेसाठीला विले; पावसाद्वारे पाण्याची आश्चर्यजनक व्यवस्था केली; निरनिराळ्या प्रकारची फळे, फुले व मेवे निर्माण केले; वनस्पति व अन्नधान्य निर्माण करुन तुमच्या उपजीविकेचे सामान तयार केले; जनावरांना तुमच्या अधीन करण्यात आले; पोशाक व सजावटीसाठी पेहरावाची व्यवस्था केली; थोडक्यात, ईश्वराने या विश्मंडळाला सजवून तुमच्यावर आपल्या देणग्यांचा वर्षाव केला, काय त्या ईश्वराबद्दल तुमची अशी कल्पना आहे की, त्याने हा सर्व कारखाना निव्वळ एक खेळ म्हणून बनविला आणि त्यामागे त्याचा कसलाही उद्देश नाही? आणि काय, या देणग्या-बाबतीत तुमच्यावर काही जबाबदारी पडत नाही, ज्याची तुम्हाला विचारणा होईल? वस्तुस्थिती ही आहे की; इनाम व शासनाचा तोच इन्कार करतो, जो मनोविकारांना बळी पडलेला असतो, कारण विकारांचा प्रभाव त्याला या गोष्टीसाठी तयार करीत नाही की त्याने जबाबदारीचे जीवन जगावे या उलट हा प्रभाव, असे जीवन त्याच्या दृष्टीने स्वीकारणीय बनवितो, ज्या मध्ये कोणासमोर जाब देण्याची कल्पना नाही; ज्यामध्ये त्याचेवर कसलाही भार नाही व त्याचे स्वातंत्र्य मर्यादित नाही. कुरआन सांगत आहे की प्रत्येक माणूस जबाबदार आहे. आणि त्याला त्याच्या आचरणाबद्दल अवश्य विचारणा केली जाईल. व निर्णयाचा एक दिवस ठरविलण्यात आलेला आहे. ज्याने आपल्या जबाबदाऱ्य पार पाडल्या असतील तो यशस्वी होईल आणि ज्याने त्यांच्याकडे कानाडोळा केला असेल तो अपयशी होईल.

जाबाबदारीची ही जाणीव व मरणोत्तर जीवनाबद्दलची खात्री, माणसाला ईश्वर व त्याच्या सेवकांचे हक्क अदा करण्यास प्रवृत करतात. आणि त्याच्या परिणाम स्वरुप माणूस जबाबदारीचे जीवन जगू लागतो. जणू मरणोत्तर जीवनावरील श्रद्धेचे फळ या जगातच स्पष्ट होऊ लागते. फक्त माणसानें याचा जाणीवर्पूक व वस्तुस्थिती समजून स्वीकार केला पाहिजे.

७. इबादत हा शब्द 'अब्द' पासून बनलेला आहे. अब्दचा आर्थ गुलाम, दास सेवक आणि इबादतचा अर्थ गुलामी, दास्य याच्या शाब्दिक अर्थात ''इताअत'' (-ताबेदारी) चा ही समावेश होतो. ومعنى العبادة فى اللغة الطاعة مع الخضوع आत्यंतिक नम्रता व शालीनता आणि दीनता व लीनता याचा आविष्कार हा 'इबादताचा' आत्मा आहे. प्रार्थना व तिची वेगवेगळी रुपे, उदाहरणार्थ 'कियाम' (नमाज़ साठी उभे रहाणे) 'रुकू' (नमाजमध्ये गुडघ्यावर हात ठेवून झुकणे) 'सजदा'(नमाज मध्ये नतमस्तक होणे) 'नमाज़' (प्रार्थना) 'तवाफ' (प्रदक्षिणा) 'दुवा' (याचना) ईश्वराला शरण जाणे; गाऱ्हाणे व इच्छापूर्तीसाठी आळविणे; नामस्मरण व जप; गुनगान व नामाचा जप करणे- या सर्वांचा समावेश 'इबादत' मध्ये होतो.

पवित्र कुरआनमध्ये 'इबादत' हा शब्द व्यापक अर्थाने वापरला गेला आहे. पूजा, प्रार्थना, उपासना; दास्य गुलामी; आणि अनिर्बंध व बिनर्शत ताबेदारी हे सर्व अर्थ त्यामध्ये समाविष्ट आहेत. परंतु पूजा, प्रार्थना हा त्याचा प्रथम व मूळ अर्थ असल्याने प्रसंगानुरूप याचा वापर फक्त त्याच अर्थी केला जातो. येथे या शब्दाचा व्यापक अर्थच अभिप्रेत आहे.

'इबादत' (भक्ति, आज्ञापालन) अल्लाहसाठी खास आहे. कारण भक्ति व आज्ञापालनाला योग्य फक्त तोच आहे. एका अल्लाह् खेरीज इतर कोणाचीही मग तो-दगड असो वा झाड. सूर्य असो वा तारे; मानव असो वा दानव (जिन);पैगंबर असो वा ईशदुत-भक्ति योग्य व उचित नाही. (अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह कहफ टीप क्र. ३५)

८. खरा सहाय्यक अल्लाहच आहे. म्हणून फक्त त्याचेकडूनच

मदतीची याचना केली पाहिजे. मग ती मदत आज्ञापालनासाठी असो वा इतर कोणत्याही बाबतीत असो. याचप्रकारे एखाद्या संत, पैगंबर देवदूत वा देवीदेवतेला मदतीसाठी पुकारणेही निषिद्ध ठरविण्यात आलेले आहे.

येथे आज्ञाधारक विशेषत:आज्ञापालनाच्या बाबतीत अल्लाहच्या सह्याची याचना करीत आहे. कारण त्याच्या अनुग्रहाशिवाय माणसाला त्याच्या आज्ञापालनाचे भाग्य लाभत नाही.

९. सरळ मार्ग म्हणजे सरळ अल्लाहपर्यंत पोंहचविणारा मार्ग या मार्गानुसार आचरण करून माणूस आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोंहचतो. आणि हाच मार्ग खऱ्या उन्नतीचा व कल्याणाचा जामीन आहे. आणि अल्लाहची खुषी प्राप्त करण्याचे ते एकमेव साधन आहे. हा मार्ग इस्लामचा व निव्वळ इस्लामचा आहे ज्याप्रमाणे दोन बिंदुना जोडणारी फक्त एकच सरळ रेषा असते त्याचप्रमाणे अल्लाहपर्यंत पोहचण्याचा एकमेव मार्ग म्हणजे हाच इस्लामचा सरळ मार्ग आहे याने आपोआप, सर्व मार्ग अल्लाह पर्यंत पोहचतात आणि म्हणून माणूस कोणत्याही मार्गाने गेला तरी तो अल्लाहपर्यंत पोंहचू शकेल, या बहकविणाऱ्या दृष्टीकोनाचे खंडन होते. ही सहिष्णुतेची चुकीची कल्पना आहे. आणि पवित्र कुरआन माणसाला सहिष्णुतेच्या या धोकादायक कल्पनेप्रमाणें वागण्याची मोकळीक देत नाही.

इस्लाम म्हणजे राजमार्ग असे स्पष्टीकरण करण्यामध्ये ''दीन'' (-इस्लामी जीवन-पद्धतीची) ची वास्तव कल्पनाही सामाविलेली आहे. इस्लाम म्हणजे ''धार्मिक रितीरिवाजाची गोळाबेरीज'' नव्हे तर ती एक जीवन पद्धती way of life आहे. ज्यानुसार चालून व आचरणाची शिकस्त करूनच माणूस यशस्वी होऊ शकतो.

१०. म्हणजे आम्ही खऱ्या इनामाचे याचक आहोत. आणि तुझ्या दरबारी हीच विनंती घेऊन हजर झालो आहोत. आमचेवर तुझ्या उपदेशाचा व शरीअतचा (धर्म-शास्त्र) मार्ग मोकळा कर आणि तुझ्या कृपेने व प्रसन्नते ने आम्हाला उपकृत कर. सर्वश्रेष्ठ अल्लाह ने आपल्या खऱ्या इनामानें, पैगंबर; सत्यनिष्ठ व अत्यंत विश्वासू आज्ञा धारक; त्याच्या मार्गात कामास आलेले हुतात्मे; सदाचारी व चारित्र्यवान लोकांना भुषविले आहे. ही प्रार्थना म्हणजे या इनामप्राप्त लोकांच्या मार्गावर चालविण्याबद्दलची याचना आहे. येथूनच पैगंबर योजनेवर श्रद्धा धारण करण्याची आवश्यकता समोर उभी रहाते अल्लाहच्या मार्गाला जाण्याचे माणसाजवळ कोणते साधन आहे? माणूस स्वत: त्याचा मार्ग, त्याच्या आज्ञापालनाच्या पद्धति जाणू शकत नाही. त्याचप्रमाणे ईश्वराची आवड व नावड याची तो खात्री देऊं शकत नाही.या गोष्टी सर्वश्रेष्ठ अल्लाहने दाखविल्यानेंच माहित होतात आणि याच उद्देशानें, सर्वश्रेष्ठ अल्लाहने निरनिराळ्या भाषांमध्ये व निरनिराळ्या देशांमध्यें पैगंबर पाठविले.

११. अल्लाहचा कोप त्या लोकांवर झाला ज्यानी मनापासून अल्लाहच्या (दीन) जीवन पद्धतीचा व त्याच्या धर्मशास्त्राचा स्वीकार केला नाहीं. परंतु फक्त रूढी दाखल त्यांनी त्यांचा स्वीकार केला व विकारांच्या अधीन होऊन त्यांनी धर्मशास्त्राच्या नियमाविरुद्ध वर्तन केले. व बंडखोर वृत्ति धारण केली. याचे उदाहरण म्हणजे यहुदी लोक होत.

१२. मार्गभ्रष्ट ते लोक झाले, ज्यांना अल्लाहच्या (दीन) जीवनपद्धतीचा लाभ झाला,परंतु धर्मशास्त्रात सांगितलेल्या गोष्टींचा अर्थ,शास्त्रात नसलेल्या प्रथा व रीवाज (बिदअत),संसार त्याग, निरर्थक वादविवाद यांच्या जाळ्यात फसून ते सरळमार्गापासून फार दूर निघून गेले. याचे उदाहरण म्हणजे ख्रिश्चन लोक होत.

इथे यहुदी व ख्रिश्चनांच्या मार्गभ्रष्टते कडे इशारा केला गेला आहे कारण सिराते मुस्तकीम (सत्य धर्मा) ला प्राप्त केल्या नंतर त्यास हरवून बसण्यांची ही जिवंत व उघड उदाहरणे होत. व याद्वारे मुस्लिम समुदायास सावध करण्याचा हेतु आहे की त्यांनीह्या मार्गभ्रष्ट समुदायां सारखे वर्तन अंगिकारु नये, राहिलेत अनेकेश्वरवादी काफ़ीर व नास्तिक तर ते अव्वल दर्जाचे मार्गभ्रष्ट आहेत व त्यांची मार्गभ्रष्टता सर्वांनाच विदीत आहे.

# २.सूरह अल-बक़रा

# २. अल-बक़रा

**नांवः** या सूरतीचे नांव ''अल-बक़रा'' आहे. ही पवित्र कुरआनची सर्वात मोठी सूरत आहे. हिच्यामध्ये २८६ आयती आहेत. पवित्र कुरआनच्या सुरतींमध्ये अत्यंत व्यापक विषयांची चर्चा आहे. आणि म्हणून शीर्षकाऐवजी सूरतीमधील एखादा विशिष्ट शब्द किंवा सुरवातीच्या अक्षरांच्या औचित्यानुसार त्यांची नांवे निवडली गेली आहेत. ही नांवे प्रतिकात्मक आहेत. या सूरतीमध्ये एके ठिकाणी गाईचा उल्लेख आहे. आणि म्हणून या सूरतीचे नांव ''अल बक़रा''(गाय) ठेविले गेले आहे. सूरतीची ही नावे हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सर्वश्रेष्ठ ईश्वराच्या मार्गदर्शनाखाली निवडली आहेत.

**अवतरणकालः** ही सूरत मदनी आहे. हिचा अधिकांश भाग हिजरत नंतरच्या पहिल्या दोन वर्षात मदीना शहरी उतरला. परंतु काही आयती नंतर उतरलेल्या आहेत. उदाः व्याजाला प्रतिबंध करण्यासंबंधीच्या आयती मदीना कालाच्या शेवटी शेवटी उतरलेल्या आहेत. परंतु विषयाच्या औचित्यानुसार या सूरतीमध्ये त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. स्पष्ट व्हावे की कुरआनच्या आयतीची मांडणीदेखील ईश्वराच्याच आज्ञेनुसार झालेली आहे.

**पार्श्वभूमिः** हिजरत नंतर (मक्का शहरापासून मदीना शहरी झालेले स्थलांतर) यहुदी लोकांशी संबंध आला होता. त्यांच्या वस्त्या मदीना शहराच्या आसपास होत्या. हे लोक तौहीद (एकेश्वरवाद), रिसालत (पैगंबर नियुक्तिक्रम),व अखिरत (मरणोत्तर जीवन) या तत्वांना मानीत होते. आणि मूलतः त्यांच्या धर्म इस्लामच होता. परंतु शेकडो वर्षांच्या अवनतीने त्यांना मूळ धर्मापासून फार दूर हटविले होते. आणि म्हणून त्यांच्या श्रद्धेमध्ये पुष्कळशा गैरइस्लामी गोष्टीची भेसळ झाली होती आणि त्यांच्या प्रत्याक्ष जीवनांत पुष्कळशा चाली रिती व रिवाज रुढ झाले होते जे मूळ धर्मात नव्हते आणि ज्यांच्या समर्थनार्थ त्यांच्या 'तौरात' या ग्रंथामध्ये काही पूरावा नव्हता. या सूरतीमध्ये यहुदी लोकांना मूळ धर्माचे म्हणजे इस्लामचे आवाहन करण्यात आलेले आहे.

**मध्यवर्ती विषयः** या सूरतीचा मध्यवर्ती विषय 'शिकवण व मार्गदर्शन' आहे. यामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे की ज्याप्रमाणे ईश्वर यापूर्वी लोकांच्या शिकवण व मार्गदर्शनासाठी पैगंबरांद्वारे ग्रंथ पाठवित अला आहे त्याचप्रमाणे त्याने हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याना कुरआन बरोबर पाठविले आहे आणि म्हणून कुरआन आणि हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचेवर ईमान आणा. नाहीपेक्षां अल्लाहला मानण्यात काही अर्थ राहात नाही आणि जीवन ईश्वरमय होऊ शकत नाही.

**ग्रंथ-मांडणीः** ग्रंथ मांडणीच्या दृष्टीने. सूरतीचा सूरवातीचा भाग-आयत नं १ ते २० प्रस्तावनेदाखल आहे. यामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे की या मार्गदर्शनाचा स्वीकार कोणत्या प्रकारचे लोक करतील व कोणत्या प्रकारचे लोक याचा स्वीकार करणार नाहीत.

आयत नं २१ ते २९ मध्ये सर्व लोकांना संबोधून त्यांना पालनकर्त्याच्या ताबेदारीचे आवाहन करण्यात आलेले आहे की, जे लोक ईश्वराच्या शिकवणीपासून तोंड फिरवतात, त्यांचे प्रत्यक्ष जीवन कसे चुकीचे होऊन बसते व शेवट किती वाईट होईल. याउलट जे लोक ईश्वराच्या शिकवणीचा अंगिकार करतात त्यांचे प्रत्येक्ष जीवन कसे सुधारते आणि त्यांचा शेवट किती मनोहर होईल.

आयत नं ३० ते ३९ मध्ये आदम-सर्वात पहिला माणूस-यांचे प्रतिनिधीत्व आणि सैतानाचा विरोध याची हकीकत निवेदन केली गेली आहे. यानें मानवी इतिहासातील सर्वप्रथमचे प्रकरण स्पष्ट होऊन समोर येते. आणि मूलभूत प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळते. उदा. मानव जातीची सुरवात कशी झाली? या जगामध्ये माणसाचे स्थान काय आहे? त्याच्या निर्मीतीमागे काही योजना आहे किंवा नाही? आणि असेल तर ती कोणती? मानवाचे यश कशावर अवलंबून आहे? या हकीकतीवरुन ही गोष्ट स्पष्ट होते की, सर्वप्रथम माणसाला- हजरत आदम यांना जो शिकवण दिली गेली होती ती इस्लामच होती. आणि हीच मानवजातीची मूळ, खरी जीवन व्यवस्था (दीन) आहे. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाह मानवाचे मार्गदर्शन त्याच्या निर्मितीच्या सुरवातीपासूनच करीत आहे. आणि मानव जातीचा शुभारंभ इस्लामच्या शिकवणीनेच झाला आहे.

आयत नं ४० ते १२३ मध्ये बनी इसराईल लोकांना संबोधून त्यांना या शिकवणग्रंथावर आणि तो आणणाऱ्या पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे वर ईमान आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आणि हे सिद्ध केले गेले आहे की, या शिकवण ग्रंथाचे अवतरण आणि यांचे (पैगंबर हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आगमन या गोष्टी ठीक ठीक त्यांच्या आपल्या तौरात वगैरे

ग्रंथांत नमूद असलेल्या भविष्यवाणीप्रमाणे आहेत.

बनी इसराईल या अहंकारात मग्न होते कीं, प्रेषितत्व त्यांच्या घराण्यातच राहणार आहे. आणि एका अशा पैगंबरावर ईमान आणणे, जो या घराण्याबाहेरचा आहे व जो अडाणी अरबांमध्ये जन्मला आहे, अपमानास्पद समजत होते. त्यांना सांगितले गेले आहे की, ईश्वराच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करण्याच्या बाबतीत कोणत्याही पूर्वग्रहाची आडकाठी असूं नये. तसे झाले तर,माणूस स्वत:ला किती जरी धार्मिक समजत असला तरी, ईश्वरी मार्गादर्शनापासून पूर्णपणे वंचित होतो. याबरोबरच बनी इसराईल यांच्या वचन भंगाच्या इतिहासाचेही वर्णन केले गेले आहे आणि दाखविले गेले आहे की, त्यांच्या मध्ये कोणती अपराधी मनोवृत्ती बळावत चालली आहे आणि कशाप्रकारे ते बौद्धिक, वैचारिक, नैतिक व औपचारीक अवनतिमध्ये जखडून पडले आहेत. याचे खरे कारण हे आहे की, त्यांनी प्रत्यक्षात ईश्वरी शिकवणीची अवज्ञा केली.

बनी इसराईलांच्या धार्मिकतेचा परामर्ष घेताना, जीवन-व्यवस्थेच्या (दीन) या हकीकतीचे स्पष्ट शब्दात निवेदन केले गेले आहे की, नजात (मुक्ति), ईमान व सदाचरणावर अवलंबून आहे. एखाद्या वंशाशी अगर धार्मिक गटाशी संबंधित असण्यावर अवलंबून नाही.

आयत नं१२४ ते १६७ मध्ये हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या काबा-गृहाच्या जे एकेश्वरवादाचे केंद्रस्थान आहे निर्मितीचा व्रृत्तांत नमूद आहे. या संदर्भात हे स्पष्ट केले गेले आहे की, हजरत इब्राहीम,जे बनी इसराईल व बनी इस्माईल या दोन्ही घराण्यांचे पितामह आहेत,व ज्यांना यहुदी,ईसाई मक्केचे अनेकेश्वरवादी व मुसलमान हे सर्व आपला पुढारी मानतात ते निव्वळ ईश्वरी शिकवणीचे अनुयायी होते. आणि त्यांचा धर्म (दीन) इस्लाम होता. यहुदी, ईसाई अगर इतर कोणताही धर्म नव्हता. याच इस्लामचे आवाहन करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने एक समतोल समाज (उम्मते वस्त) निर्माण केला आहे. ज्याचे पवित्र स्थान मस्जिदे हराम हे आहे. या स्थानाला (किबलयाला) मक्केच्या अनेकेश्वरवादी लोकांच्या ताब्यातून सोडविण्यासाठी ईमान आणलेल्यानां जिहाद (शर्थीचे प्रयत्न,युद्ध) करावा लागेल. आणि प्राणांचे व दौलतीचे बलीदान करावे लागेल. या बरोबरच हे पण स्पष्ट करण्यात आले आहे की, खानेकाबा (काबागृह) च्या निर्मितीच्या वेळी हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी जी प्रार्थना केली होती, त्याचे फलस्वरुप हज़रत मुम्मद पैगंबर (सल्लल्लाहु आलैहि वसल्लम) यांचे आगमन आहे. आणि त्यांचे आवाहन विरोध होत असला तरी यशस्वी होईल आणि इस्लामी जीवन-व्यवस्था प्रभावशाली होऊन राहील.

आयत नं १६८ ते २४२ मध्ये शरीयत-धर्मशास्त्राचे आदेश व कायदेकानून निवेदीले आहेत; ज्यांचा संबंध माणसाच्या वैयक्तिक जीवनाप्रमाणे त्यांच्या सामाजिक जीवनाबरोबरही आहे. त्याच प्रमाणे हे आदेश धार्मिकही आहेत. नैतिकही आहेत. सामाजिकही आहेत. व सामुदायिकही आहेत. हे मार्गदर्शन आहे, जे इस्लामने जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत केले आहे. प्रसंगानुरुप मूलभूत तत्वेही स्पष्ट केली गेली आहेत; कारण की यांच्यामुळेच माणूस शिकवणीच्या मार्गावर कायम राहू शकतो.

आयत नं. २४३ ते २८३ मध्ये शिकवणीचे केंद्रस्थान अशा काबाग्रृहाला अनेकेश्वरवाद्यांच्या ताब्यातून स्वतंत्र करण्यासाठी जिहाद करण्याचे व या कामी सढळहाताने खर्च करण्याचे प्रोत्साहनही दिले गेले आहे. याबरोबरच सढळ हाताने खर्च करण्याऱ्या प्रव्रृत्तीस मारक असलेल्या व्याजाची वर्ज्यताही निवेदन केली गेली आहे. याशिवाय व्यवसाय-व्यवहाराची सूधारणा करण्यासाठी शिकवण दिली गेली आहे.

आयत नं २८४ ते २८६ हा सूरतीचा शेवट आहे. यामध्ये त्या लोकांच्या ईमान आणण्याचा उल्लेख आहे. जे कोणत्याही प्रकारच्या पूर्वग्रहाने पछाडले गेले नव्हते.एखाद्या पैगंबरांला मानणे व एखाद्या पैगंबराला न मानणे अशी त्यांची वृत्ती नव्हती. ते सत्यप्रिय होते. आणि म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना शिकवणीचा मार्ग मोकळा करून दिला. आणि त्यांच्या मुखातून ही प्रार्थना निघाली जी त्यांच्या जबाबदारीच्या जाणीवेचे प्रतिनिधित्व करीत आहे:-

**पठणा संबंधी प्रोत्साहन:** हदीस वचना नुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्मावेिले-

**لا تجعلوا بيوتكم مقابر ان الشيطان ينفرمن البيت الذى تقرءُ فيه سورة البقرة (مسلم)**

''आपल्या घरांना कब्रस्तान बनवू नका. सैतान त्या घरातून पळ काढतो. ज्यात सूरह बकरा चे पठण केले जाते.'' (मुस्लिम)

हे अशासाठी की सूरह बकरा मध्ये सैतानाच्या कारस्थानांना अनावरित केले गेले आहे आणि त्यात कौटुंबिक जीवनासंबंधीचे आदेशहि निवेदिले गेले आहेत तसेच ईमान व उपदेशाचा मार्ग देखील चांगल्या प्रकारे स्पष्ट केला गेला आहे. यास्तव ज्या घरात या सूरतीस अर्थासह पढण्या-पढविण्याचा इतमाम राखला जाईल. त्या घरात सैतानाला उत्पात व उपद्रव माजविण्यात यश लाभू शकणार नाही.

# २. सूरह बक़रा

سُورَةُ البَقَرَة

अनुवाद

आयती - २८६

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नांवाने.

بِسْمِ اللهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अलिफ, लाम, मीम [१]

الٓمّٓ ①

२. हा ईश-ग्रंथ [२] आहे. यांत मुळीच शंका नाही.
हे मार्गदर्शन [३] आहे अशा लोकांसाठी जे अल्लाहचे
भय बाळगतात.[४]

ذٰلِكَ الْكِتٰبُ لَا رَيْبَ ۛ فِيْهِ ۛ هُدًى لِّلْمُتَّقِيْنَ ②

३. जे अपरोक्षावर [५] ईमान [६] ठेवितात; नमाज़ [७]
क़ायम करतात आणि आम्ही जी निर्वाह सामुग्री
त्यांना दिली आहे त्यामधून खर्च करतात.[८]

الَّذِيْنَ يُؤْمِنُوْنَ بِالْغَيْبِ وَ يُقِيْمُوْنَ الصَّلٰوةَ وَمِمَّا
رَزَقْنٰهُمْ يُنْفِقُوْنَ ③

४. (हे पैगंबर !) जो ग्रंथ तुमच्यावर उतरविला
गेला आहे आणि जे ग्रंथ तुमच्यापूर्वी उतरविले
गेले होते त्या सर्वांवर ते ईमान ठेवितात [९]आणि
आखिरतची [१०] हेच लोक खात्री बाळगतात.

وَالَّذِيْنَ يُؤْمِنُوْنَ بِمَآ اُنْزِلَ اِلَيْكَ وَمَآ اُنْزِلَ مِنْ قَبْلِكَ
وَبِالْاٰخِرَةِ هُمْ يُوْقِنُوْنَ ④

५. हेच [११]लोक आपल्या पालनकर्त्याकडून सन्मार्गा
वर आहेत आणि याच लोकांना सफलता [१२]
प्राप्त होणार आहे.

اُولٰٓئِكَ عَلٰى هُدًى مِّنْ رَّبِّهِمْ
وَاُولٰٓئِكَ هُمُ الْمُفْلِحُوْنَ ⑤

६. ज्या लोकांनी इन्कार[१३] (कुफ्र) केला, तुम्ही
त्यांना खबरदार[१४] करा किंवा न करा त्यांच्या
दृष्टीने सारखे आहे, ते ईमान ठेवणार नाहीत.

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا سَوَآءٌ عَلَيْهِمْ ءَاَنْذَرْتَهُمْ اَمْ لَمْ تُنْذِرْهُمْ
لَا يُؤْمِنُوْنَ ⑥

७. अल्लाहने त्यांच्या मनांवर व त्यांच्या कानांवर
मोहर [१५] लावली आहे आणि त्यांच्या डोळ्यांवर
पडदा आहे. ते घोर शिक्षेस पात्र आहेत.[१६]

خَتَمَ اللهُ عَلٰى قُلُوْبِهِمْ وَعَلٰى سَمْعِهِمْ ۗ وَعَلٰٓى اَبْصَارِهِمْ
غِشَاوَةٌ ۙ وَّلَهُمْ عَذَابٌ عَظِيْمٌ ⑦

८. आणि लोकांमध्यें असेही लोक आहेत [१७] जे
सांगतात कीं आम्ही अल्लाहवर आणि शेवटच्या
दिवसावर ईमान ठेविले आहे. परंतु वस्तुतः ते
मोमिन (ईमान ठेवणारे) नाहीत.

وَمِنَ النَّاسِ مَنْ يَّقُوْلُ اٰمَنَّا بِاللهِ
وَبِالْيَوْمِ الْاٰخِرِ وَمَا هُمْ بِمُؤْمِنِيْنَ ⑧

१. ही व अशा प्रकारची दुसरी अक्षरे निर्रानराळया सूरतींच्या सुरवातीस आलेली आहेत. या अक्षरांना मुकत्तआत अक्षरे म्हणतात या अक्षरांना वेगवेगळे करून वाचले जाते. २९सूरतींची सुरवात अशा अक्षरांनी झाली आहे. ही अक्षरे सूरतीच्या विशिष्ट विषयाकडे इशारा करतात. या सूरतीच्या विषयांवर विचार केल्याने हे स्पष्ट होते की,'अलिफ' चा इशारा अल्लाह व त्याच्या आयतींकडे आहे. 'लाम'चा इशारा لاإلهإلاالله ''ला इलाहा इल्लल्लाह'' (अल्लाहशिवाय कोणी ईश नाही) कडे आणि 'मीम' चा इशारा तीन गोष्टीकडे आहे. एक अल्लाह, मालिक (शासक व मालिक) (स्वामी) आहे याकडे; दुसरा, मलाइका म्हणजे फिरिस्त्यांच्याकडे, ज्यांच्या द्वारे पवित्र कुरआन हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु आलैहि वसल्लम) यांच्यावर उतरविले गेले आणि तिसरा, मोमिनीन (श्रद्धावान) व मुत्तकीन (सदाचारी, अल्लाहचे भय बाळगून वागणारे) यांच्याकडे, ज्यांच्यासाठी हे पवित्र कुरआन मार्गदर्शन व खुशखबर बनवून उतरविले गेले आहे. हे विषय या सूरतीमध्ये विशेष पद्धतीने निवेदन केले गेले आहेत. उदाहरणार्थ, आयतुल कुसा' ही २५५ वी आयत, जी या सुरतीची अत्यंत महत्वाची व श्रेष्ठ अशी आयत आहे,'अलिफ' व 'लाम' या दोन अक्षरांचा स्पष्ट खुलासा करते. ही आयत اللهلاإلهإلاهو ''अल्लाहु ला इलाहाइल्ला हुआ'' ने सुरू होते. जणूं 'अलिफ' अल्लाह च्या एकते चे निशाण आहे आणि 'लाम' म्हणजे त्याचा नकाराथी पैलू. म्हणजे अनेकश्वरवाद हे असत्य आहे याची खूण. याशिवाय या अक्षरांचा सूरतीच्या दुसऱ्या विषयांशीही निकटचा संबंध आहे, उदा. या सूरतीच्या नं. २४३, २४६ व २५८ या आयती ''الٓمٓ'' 'आलम' ने सुरू होतात. यामध्ये तीन निरनिराळया घटना निवेदन केल्या गेल्या आहेत. पहिली घटना, एका गटाच्या मरणाची व जीवनाची; दुसरी 'तालूत' ची आणि तिसरी हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी बादशाहच्या दरबारात एकेश्वरवादाचे आवाहन केल्याची.

कुरआन च्या या पद्धतीचे उदाहरण ''जबूर'' मध्ये ही आढळून येते जबूरच्या ११९.व्या अध्यायात हिब्रू अक्षरांचा सर्रास वापर करण्यात आला आहे. उदा. जबूरच्या ११९ व्या (अध्यायाच्या) १३७ व्या आयतीत.

''ص'' **स्वाद** (हिब्रू उच्चार सादे) ''परमेश्वरा तू सत्यनिष्ठ आहेस'' स्पष्ट आहे की या आयतीमध्ये ''स्वाद'' ''ص'' सादिक (सत्यनिष्ठ) कडे इशारा करीत आहे.

याचप्रमाणे त्याच अध्यायाच्या ११९: १२१ व्या आयतीत आहे ।

''ع'' **अैन** (हिब्रू उच्चार अैन) ''मी न्यायनिवाडा केला आहे'' या आयतीमधील ''अैन'' अदल (न्याय) कडे इशारा करीत आहे.

या आयतीत ''ع''चा इशारा अदल ''न्यायनिवाडा कडे होत आहे, तसेच ज़बूर आयत नं. ११९: ७३ मध्ये आहे ''ى'' **ये** (हिब्रू उच्चार योद) ''तुझ्या हातानी मला बनविले व घडविले'' ।

या आयतीमधील 'ये' ''ى'' हे अक्षर 'यद' (हात) कडे इशारा करीत आहे.

आणि म्हणून कुरआन ज्या लोकांमध्ये उतरले त्यांना यामध्यें कसलीही रहस्यमय गोष्ट भासली नाही. तसे असते तर त्यांनी विचारणा केली असती की या अक्षरांचा अर्थ काय? त्याचप्रमाणे जोपर्यंत नामाबरोबर किंवा क्रियापदाबरोबर वापरली जात नाहीत तोपर्यंत एकट्या अक्षरांचा काही अर्थ होत नाहीं. आणि म्हणून अनुमान आहे कीं, ही अक्षरें प्रतिकात्मक किवा इशारेवजा वापरण्यात आलेली आहेत. ज्या कालामध्यें कुरआन उतरले गेले. त्याचे संरक्षण पाठांतरावर अवलंबून होते. आणि स्पष्ट आहे कीं, सूरतींचे पाठांतर करण्यामध्ये विशिष्ट विषयाकडील निर्देशानें व सूरतीच्या प्रतिकात्मक नांवांनी फार सहाय्य होते. यामुळे सुरतीना ओळखणे व स्मरणात ठेवणे सोपे जाते. आणि म्हणून पवित्र कुरआन मध्ये ही शैली वापरली गेली आहे. आणि म्हणून या अक्षरांना अगम्य समजणे बरोबर नाही. कारण पवित्र क़ुर्आन हा शिकवण ग्रंथ आहे आणि अरबी भाषेंत उतरलेला आहे. यामध्ये अर्थांचा खोलपणा जरूर आहे. परंतु अगम्य अगर रहस्यमय असे काही नाही.

(अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह यूनुस टीप.१)

२. एखाद्या ग्रंथाला ईशग्रंथ होण्यासाठी आवश्यक आहे की, त्या ग्रंथाने स्वत: ईश्वराकडून उतरलेला ग्रंथ असल्याबद्दलचा दावा केला पाहिजे व त्या ग्रंथातील विषयांनी या दाव्याचे समर्थन झाले पाहिजे. पवित्र कुरआन स्वत: ईश्वरीग्रंथ असल्याचा दावा करत आहे. व त्याचे विषयही हा ग्रंथ म्हणजे विश्वाच्या पालनकर्त्या अल्लाहची वाणी आहे अशी स्पष्ट साक्ष देत आहेत. पवित्र कुरआन हा ईश्वरी ग्रंथ असण्याबाबतीत थोड्यादेखील शंकेस जागा नाही. याला हजरत मुहम्मद पैगंबरा (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) चे लिखाण ठरविणे कोणत्याही प्रकारे योग्य नाही. कारण ते अशिक्षित होते. आणि पवित्र क़ुरआन सारखा अलौकिक व म्हान ग्रंथ, ज्यामध्ये मानवी जीवनाचे संपूर्ण मार्गदर्शन करण्यात आलेले आहे – रचणे एक अशिक्षिताच्या आवाक्याचे काम होऊच शकत नाही. याशिवाय पवित्र कुरआनचे हे आव्हान आहे की, असा ग्रंथ. सारे मानव मिळूनही तयार करू शकत नाहीत. आणि पवित्र कुरआनच्या या आव्हानाचे उत्तर आजपर्यंत दिले गेलेले नाही.पवित्र कुरआनच्या अवतरण कालातील, सुंदर उत्कृष्ट व अलंकारिक भाषाशैली लाभलेले लेखक व कवि, याचे उत्तर देण्यास असमर्थ ठरले. व त्यानंतरच्या

कालांतही कोणी या दाव्याला खोटा सिद्ध करू शकलेले नाही.

३. पवित्र कुरआन मार्गदर्शन आहे याचा अर्थ हा ग्रंथ ईश्वरापर्यंत पोंहोचण्याचा मार्ग दाखवितो असा आहे. जीवनाच्या असंख्य गुंतागुंतीच्या मार्गमध्ये हा ग्रंथ,सरळ मार्गाकडे मार्गदर्शन करतो. श्रद्धा व विचार नीति व व्यवहार आणि स्वभाव व आचरण याबद्दलचा योग्य दृष्टिकोन पुढे ठेवतो. आणि याच्या प्रकाशात माणूस सत्यमार्गाचा अवलंब करून इच्छित उद्दिष्ट गांठु शकतो. फक्त त्यानें मोकळ्या मनाने या ग्रंथाचे अध्ययन करावयास हवे व सर्वप्रकारच्या पूर्वग्रहांना सोडून देऊन सत्याचा स्वीकार करण्याची त्याची त्यारी हवी.

४.पवित्र कुरआन नें दुसऱ्या ठिकाणी आपल्या "هُدًى لِّلنَّاسِ" (२-१८५) सच्या लोकांसाठी मार्गदर्शन होण्याबद्दलचे स्पष्टीकरण केले आहे हे निव्वळ मार्गदर्शन आहे व त्याचे मार्गदर्शन सार्वजनिक आहे परंतु ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशापासून तेंच लोक फायदा उठवूं शकतात जे आपले डोळे उघडे ठेवितात. त्याचप्रमाणे पवित्र कुरआनच्या प्रकाशा पासून सुद्धा तेंच लोक लाभ उठवूं शकतात. ज्यांच्या मनात आपल्या निर्मात्याचे श्रेष्ठत्व व त्याच्या कोपाची भीति वस्त असते. या स्वभाविक गुणाला येथे 'तक्वा-' (संयम, विवेक, भय) या शब्दानें स्पष्ट केले गेले आहे. या गुणामुळे माणूस चांगल्या व वाईटामधील फरक जाणतो व तो भलाईचा  याचक बनतो. हा तक्वा-विवेक माणसाच्या रक्तात आहे. ज्या लोकांनी हा स्वाभाविक चांगुलपणा गमावला आहे, जे आपल्या निर्मात्याशी कसलाही संबंध ठेवूं इच्छित नाहीत, ज्यांची जबाबदारीचे व संयमी जीवन जगण्याची इच्छा नाही, असे लोक पवित्र कुरआनपासून काही लाभ उठवूं शकत नाहींत. तक्वा संयम हागुण. जो स्वाभाविक चांगुलपणाचा दर्जा बाळगतो. पवित्र कुरआनचे मार्गदर्शन पत्करण्यासाठी आवश्यक आहे. पुढे जे गुण निवेदन केले गेले आहेत ते या संयमाच्या फलस्वरूप आणि पवित्र कुरआनच्या मार्गदर्शनाचा स्वीकार केल्यामुळे प्राप्त झालेले आहेत.

५. गैब (अपरोक्ष) म्हणजे अशी सत्ये जी मानवी इंद्रियापासून लपलेली आहेत. उदाहरणार्थ, ईश्वर, ईशदूत, ईश्वरी आदेश, जन्नत (स्वर्ग) दोज़ख़ (नरक) वगैरे. अपरोक्षावर इमान ठेवण्याचा अर्थ हा की, ते फक्त इंद्रियगम्य गोष्टींचे गूलाम नसतात तर त्या सत्यांनाही स्वीकारतात जी त्याच्या पहाण्यात व अनुभवास येत नाहींत; परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ज्यांची खबर देत असतात आणि मानवो स्वभाव व सुबुद्धी ज्यांच्या सत्यतेची सांक्ष देत असतात. हे अंधानुकरण मुळीच नव्हे. याउलट, यामुळें सुबुद्धीची झेप उंचावते व माणसाचा आत्मिक उत्कर्ष होतो. राहीले ते लोक जे स्वत:ला इंद्रियगम्य गोष्टीच्या वर्तुळांत अडकवून घेतात व वास्तविक गोष्टींना स्वीकारण्यास फक्त यामुळे तयार नसतात की त्या त्यांच्या पहाण्यात येत नाहीत. व त्यांची त्यांना अनुभूती नसते; असे लोक उच्च विचारसरणीच्या स्वाभाविक गुणाला पारखे होतात. आणि मग ते न ईश्वराला ओळखू शकतात न स्वत:ला आणि या दुर्भाग्याच्या फलस्वरूप ते जीवनाचे ध्येय व उद्देशाबद्दल निरर्थक बडबड करीत असतात.

६. ''ईमान'' ठेविणे याचा अर्थ दृढविश्वासाने मान्य करणे जी व्यक्ति सर्वश्रेष्ठ अल्लाह, त्याच्या निशाण्यावर व आदेशावर ईमान ठेविल, स्वत:ला सर्वस्वी ईश्वराच्या स्वाधीन करील व त्याच्या निर्णयावर प्रसन्न व समाधानी राहील ती 'मोमिन' होय.

स्पष्ट असो की ईमानाची प्रतिज्ञा मुखाने करणे आवश्यक आहे आणि इस्लामचा पहिला आधारस्तंभ हा आहे की. माणसाने श्रद्धा-वचनाचा (कलिम-ए-शहादत) वाचेने उच्चार करावा. म्हणजे त्याने वाचेने ही प्रतिज्ञा करावी की अल्लाह शिवाय दुसराकोणी उपास्य नाही व हजरत मुहम्मद त्याचे पैगंबर आहेत.

७. 'नमाज़ क़ायम करणे' ही शब्द योजना 'नमाज़ पढणे' या शब्दयोजनेपेक्षा अधिक व्यापक आहे. नमाज़ क़ायम करणे म्हणजे अल्लाह बद्दल निर्भेळ प्रीति, नम्रता व लीनता बाळगून नमाज़ पढणे, अल्लाहने घालून दिलेल्या पद्धतीनुसार नमाज़ पढणे, उदाहरणार्थ 'कियाम' (नमाज़ मध्ये उभे राहणे) 'रुकू' (नमाज़मध्ये गुडघ्यावर हात ठेवून खाली वांकणे) व 'सज्दा' (नमाज़मध्ये नतमस्तक होणे) करणे वगैरे, जमाअती बरोबर नमाज़ पढणे (इतर लोकांच्या समुदायाबरोबर रांगेत उभे राहून), नमाज़च्या रांगा सरळ ठेवणे, नमाज़च्या वेळांबद्दल जागरुक राहून वेळेवर नमाज़ पढणे, व नमाजच्या सर्व कृति चांगल्या प्रकारे करणे, असे सर्व अर्थ अभिप्रेत आहेत.

८. 'खर्च करणे' म्हणजे अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी खर्च करणे होय. यामध्ये 'ज़कात' (दान) व सदक़ात (खैरात) चे सर्व प्रकार सामील आहेत. धनदौलत ही सर्व अल्लाहची देणगी आहे या वस्तु:स्थितीचा दासाने केलेला स्वीकार व त्याबद्दल त्याने परमेश्वराबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता दर्शविण्याचा मार्ग म्हणजे अल्लाहच्या मार्गात खर्च करणे होय.

नमाज़ कायम करणे व अल्लाहच्या मार्गात खर्च करणे ही मूलभूत सत्कर्मे आहेत व तो सर्व सदाचारांचे उगम स्थान आहेत.

९. म्हणजे हे लोक कोणत्याही प्रकारच्या सांघिक, जातिय वा  वांशिक पूर्वग्रहापासून दूर आहेत. ते ईश्वराने उतरविलेल्या ग्रंथांमध्ये, एखाद्या ग्रंथास मानावयाचे व एखाद्या ग्रंयास मानावयाचे नाही असा कसलाही भेदभाव व पक्षपात करीत नाहीत. ते ईश्वराच्या ग्रंथांना सत्य जाणून त्यांचा स्वीकार करतात. मग एखादा ग्रंथ त्यांच्या जमातीच्या पैगंबरांवर उतरलेला असो वा दुसऱ्या जमातीच्या पैगंबरावर उतरलेला असो. त्यांना मुख्यत:

या गोष्टीचे आकर्षण असते की तो ग्रंथ निव्वळ ईश्वराचा ग्रंथ असावा याउलट जे लोक ईश्वरी मार्गदर्शन मानणारे नसतात किंवा फक्त आपल्या जमातीच्या पैगंबरांवर उतरलेल्या ग्रंथाला ईश्वरी ग्रंथ मानतात व इतर ईश्वरी ग्रंथाचा इन्कार करतात त्या लोकांना पवित्र कुरआनच्या मार्गदर्शनाचा दरवाजा खुला नाही. यहुदी लोक हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांचेवर उतरविण्यात आलेल्या ''जूना करार'' ला मानत होते. परंतु हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांचेवर उतरविण्यात आलेल्या ''नवा करार'' हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचेवर उतरविण्यात आलेल्या ''कुरआन'' या दोन्ही ग्रंथाना मानत नव्हते. याचप्रमाणे ख़िरश्चन लोक ''जुना करार'' व नवा करार'' यांना ईश्वरी ग्रंथ मानत होते. परंतु ते पवित्र कुरआनला ईश्वरी ग्रंथ मानीत नव्हते.

पवित्र कुरआनने आपल्या अनुयायांना ज्या श्रद्धेची शिकवण दिली ती ही की त्यांनी सर्वप्रकारच्या पूर्वग्रहा पासून मुक्त होऊन ''जुना करार''''नवा करार''''क़ुरआन'' व इतर सर्व ईश्वरी ग्रथांवर श्रद्धा ठेवावी.

१०.'आखिरत' हा शब्द या जगाच्या तुलनेत त्या जगाबद्दल बोलला जातो जेथे माणूस जीवंत उठविला गेल्यावर आपल्या आचरणाबद्दल इनाम वा शिक्षा पासून निरंतरचे (कायमचे) जीवन जगेल. जगाच्या सध्याच्या व्यवस्थेचा एके दिवशी शेवट होईल. त्यानंतर परमेश्वर एक दुसरे जग निर्माण करील व साऱ्या मानव जातीला पुन्हा जीवंत करून एकत्र करील व त्यांच्या आचरणाचा निवाडा करील. सदाचारी लोकांना जन्नत (स्वर्ग) व दुराचारी लोकांना दोज़ख़ (नरक) मध्ये दाखल करील. आखिरतची ही श्रद्धा आणि इनाम व शासनाची ही कल्पना पुनर्जन्माच्या श्रद्धेपेक्षा बिलकुल भिन्न असून तिचा पुर्णपणे इन्कार करते.

'आखिरतची हेच लोक खात्री बाळगतात' याचा इषारा या गोष्टीकडे आहे की, आखिरतबद्दल खात्री बाळगतो असे सांगणारे तर पुष्कळ लोक आढळतील. परंतु वस्तुतः आखिरतबद्दल खात्री बाळगणारे ते संयमी (मुत्तकी) लोक आहेत ज्यांचे स्वभाव विशेष वर वर्णन केले गेले आहेत.

११. सरळ मार्गावर असल्याचा दावा करणारे तर पुष्कळ लोक होऊ शकतात.जो माणूस ज्या धार्मिक गटबाजीशी संलग्न आहे तो आपण सरळ मार्गावर असल्याचा तोरा मिरविणारच. परंतु वास्तविकपणे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सरळ मार्गावर फक्त तेच लोक आहेत जे वर नमूद केलेल्या स्वभाव गुणांनी संपन्न आहेत. आणि सफलता त्यांनाच लाभणार आहे.

१२. ऐहिक संपन्नता हे खरे यश नव्हे. अखिरत मधील यश हे खरे यश आहे. आणि वास्तविकपणे तेच लोक यशस्वी आहेत जे परमेश्वराच्या निवाड्यात यश्स्वी ठरतील. कुरआनच्या दृष्टीने यशाची खरी कसोटी हीच आहे आणि यालाच दृष्टीसमोर ठेवून आचार विचाराचा मार्ग निश्चित केला पाहिजे.

१३. 'कुफ्र'चा अर्थ नाकारणे असा आहे. पवित्र क़ुरआनानुसार ज्या गोष्टीवर ईमान आणणे आवश्यक आहे, सर्व साधारणपणें, त्या गोष्टीचा इन्कार 'कुफ्र ने अभिप्रेत होतो. या आयतीमध्ये प्रमुख्यानें ते लोक अभिप्रेत आहेत ज्यांनी पवित्र कुरआनला ईश्वरी ग्रंथ मानण्यास नकार दिला.

१४. खबरदार करणे म्हणजे कुफ्रच्या परिणामाबद्दल इशारा देणे. ज्या प्रमाणे एक डॉक्टर अपथ्य व उपचाराबद्दल हलगर्जीपणा यामुळे होणाऱ्या दुष्परिणामा बद्दल इशारा देतो त्याचप्रमाणे एक पैगंबर इन्कार व अवज्ञेच्या दुष्परिणामाबद्दल इशारा देत असतो विष जीव घेते हे सर्वांना माहित आहे परंतु कुफ्र (इन्कार) व अवज्ञेचा परिणाम सर्वनाश आहे या गोष्टीची लोकांना कल्पना नाही आणि म्हणूनच पैगंबरांच्या आवाहनात खबरदार करण्याचा पैलू प्रमुख असतो.

१५. येथे त्या लोकांचे वर्णन आहे ज्यांच्यावर पवित्र कुरआनची वास्तविकता चांगल्याप्रकारे स्पष्ट झाली होती. परंतु निव्वळ हटवादीपणाने त्यांनी पवित्र कुरआनला ईश्वरी ग्रंथ मानण्यास नकार दिला होता. आणि मग आपल्या नकारावर ते इतके अडून बसले व सत्याच्या विरोधात त्यांनी इतका पुढाकार घेतला की सत्याची स्वीकार करण्याची पात्रताच त्यांच्यामध्ये उरली नाही. या वस्तु:स्थितीला मनांवर व कानांवर मोहरलावण्याची उपमा दिली गेली आहे. ही मोहर प्रत्यक्षात नसून ती लाक्षणिक आहे.

याचा अर्थ असा कीं, या लोकांनी श्रद्धा न आणण्याचे कारण हे नव्हे. कीं सत्य त्यांच्यावर स्पष्ट झाले नाही. परंतु याचे कारण हे कीं, सत्याचा इन्कार करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीचा हा परिणाम आहे. ते ईश्वरी कायद्याच्या पकडीत आले आहेत व सत्य गोष्ट एकण्याची, समजण्याची व पहाण्याची त्यांची पात्रता बिलकूल हिरावून घेतली गेली आहे.

यावरुन ही वस्तु:स्थिती स्पष्ट होते की,माणसा मध्ये सत्याचा शिरकाव त्या स्थितीत होतो जेव्हा माणूस आपले मन, कान व डोळे उघडे ठेवितो

१६. माणसानें आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेचे उलंघन करावे यापेक्षा अधिक मोठा गुन्हा कोणता होऊ शकतो? गुन्ह्याचे स्वरुप जितके भयंकर तितकीच त्याची शिक्षा कडक या भयंकर गुणह्यामुळे तो कडक शिक्षेसच पात्र होतो बक्षिसास नव्हे.

१७. पहिला गट ज्याचा उल्लेख आयतींच्या सुरवातीला केला गेला आहे, तो खऱ्या इमान आणणाऱ्यांचा आहे. दुसरा

गट ज्याचा उल्लेख ६व्या व ७व्या आयतीमध्ये केला गेला आहे तो इन्कार करणाऱ्यांचा आहे. आणि तिसरा गट, ज्याची वैशिष्ट्ये आयत नं. ८ ते २० मध्ये वर्णन केली गेली आहेत, अशा लोकांचा आहे जे इमान ठेवण्याचा दावा तर करतात परंतु ते आपल्या इमाना बाबतींत सच्चे नसतात. याचा इशारा यहुदी लोकांच्या त्या गटाकडे आहे ज्यानें ढोंगीपणा अवलंबिला होता.

यावरून ही गोष्ट चांगल्या प्रकारे स्पष्ट होते की अल्लाह जवळ तेच इमान विश्वासनीय आहे जे शुद्ध व निर्मळ आहे. म्हणजे माणसाने निर्मळ मनाने अल्लाह व आखिरतचा स्वीकार करणे आणि त्याचे ग्रंथ व त्याचे प्रेषित यापैकी कोणाचाही इन्कार न करणे. इमान ठेवल्याचा फक्त तोंडी दावा करणे आणि धार्मिकतेचा आव आणणे या गोष्टींना अल्लाह जवळ काही महत्व नाही.

**जेव्हां त्यांना सांगितले जाते की, ज़मीनीवर बिघाड निर्माण करू नका तेव्हां ते म्हणतात की आम्ही तर सुधारणा करणारे आहोत. खबरदार ! वस्तुतः हेच लोक बिघाड निर्माण करणारे आहोत.परंतु याची त्यांना जाणीव नाहीं. आणि जेव्हां त्यांना सांगितले जाते की ज्याप्रमाणें दुसऱ्या लोकांनी ईमान आणले आहे त्याप्रमाणे तुम्हींही ईमान आणाः तर ते म्हणतात की काय आम्ही मुर्ख लोकांचे प्रमाणे ईमान आणावयाचे? खबरदार ! वस्तुतः हेच लोक मुर्ख आहेत. परंतु यांना समज नाहीं.** (अल-क़ुरआन)

९. ते अल्लाह व ईमान ठेवणाऱ्या बरोबर धोके बाजी करीत आहेत वस्तुत: ते स्वत:लाच धोका देत आहेत परंतु याची त्यांना जाणीव नाही.

يُخٰدِعُوْنَ اللّٰهَ وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا ۚ وَمَا يَخْدَعُوْنَ اِلَّآ اَنْفُسَهُمْ
وَمَا يَشْعُرُوْنَ ۝٩

१०. त्यांच्या मनात एक रोग [१८] आहे, जो अल्लाहने आणखीन जास्त वाढविला. आणि जे खोटे ते बोलत आहेत त्याबद्दल त्यांना दु:खदायक शिक्षा मिळणार आहे.

فِيْ قُلُوْبِهِمْ مَّرَضٌ ۙ فَزَادَهُمُ اللّٰهُ مَرَضًا ۚ وَلَهُمْ عَذَابٌ
اَلِيْمٌ ۢ بِمَا كَانُوْا يَكْذِبُوْنَ ۝١٠

११. जेव्हां त्यांना सांगितले जाते की, ज़मीनीवर बिघाड [१९] निर्माण करू नका तेव्हां ते म्हणतात की आम्ही तर सुधारणा करणारे आहोत.

وَاِذَا قِيْلَ لَهُمْ لَا تُفْسِدُوْا فِي الْاَرْضِ ۙ قَالُوْٓا اِنَّمَا نَحْنُ
مُصْلِحُوْنَ ۝١١

१२. खबरदार ! वस्तुतः हेच लोक बिघाड निर्माण करणारे आहोत.परंतु याची त्यांना जाणीव नाहीं.

اَلَآ اِنَّهُمْ هُمُ الْمُفْسِدُوْنَ وَلٰكِنْ لَّا يَشْعُرُوْنَ ۝١٢

१३. आणि जेव्हां त्यांना सांगितले जाते की ज्याप्रमाणें दुसऱ्या लोकांनी [२०] ईमान आणले आहे त्याप्रमाणे तुम्हींही ईमान आणा: तर ते म्हणतात की काय आम्ही मुर्ख लोकांचे प्रमाणे ईमान आणावयाचे? खबरदार !वस्तुतः हेच लोक [२१] मुर्ख आहेत. परंतु यांना समज नाहीं .

وَاِذَا قِيْلَ لَهُمْ اٰمِنُوْا كَمَآ اٰمَنَ النَّاسُ قَالُوْٓا اَنُؤْمِنُ كَمَآ
اٰمَنَ السُّفَهَآءُ ۭ اَلَآ اِنَّهُمْ هُمُ السُّفَهَآءُ وَلٰكِنْ
لَّا يَعْلَمُوْنَ ۝١٣

१४. जेव्हां हे लोक ईमान आणलेल्या लोकांना भेटतात तेव्हां म्हणतात की आम्ही ईमान आणले आहे. आणि जेव्हां एकांतात आपल्या मार्गभ्रष्ट (शैतान) [२२] साथीदाराबरोबर असतात तेव्हा म्हणतात की, आम्ही तर तुमच्या बरोबरच आहोत. त्या लोकांबरोबर फक्त थट्टा करीत आहोत.

وَاِذَا لَقُوا الَّذِيْنَ اٰمَنُوْا قَالُوْٓا اٰمَنَّا ښ وَاِذَا خَلَوْا اِلٰى
شَيٰطِيْنِهِمْ ۙ قَالُوْٓا اِنَّا مَعَكُمْ ۙ اِنَّمَا نَحْنُ مُسْتَهْزِءُوْنَ ۝١٤

१५. अल्लाह त्यांच्याबरोबर थट्टा करीत आहे. व त्यांना बंडखोरी करण्यास अवसर देत आहे. आणि ते आंधळ्याप्रमाणें भटकत फिरत आहेत.

اَللّٰهُ يَسْتَهْزِئُ بِهِمْ وَيَمُدُّهُمْ فِيْ طُغْيَانِهِمْ يَعْمَهُوْنَ ۝١٥

१६. हेच ते लोक आहेत ज्यांनी मार्गदर्शना ऐवजी मार्गभ्रष्टता खरेदी केली. परंतु त्यांचा हा व्यवहार फायदेशिर झाला नाही. आणि ते मार्गदर्शन लाभणारे बनू शकले नाहींत.

اُولٰۗىِٕكَ الَّذِيْنَ اشْتَرَوُا الضَّلٰلَةَ بِالْهُدٰى ۠
فَمَا رَبِحَتْ تِّجَارَتُهُمْ وَمَا كَانُوْا مُهْتَدِيْنَ ۝١٦

१८. ईमानाच्या बाबतीत अप्रामाणिक असणे हा रोग. हा रोग अल्लाहने वाढविला याचा अर्थ असा की, अल्लाहने अशी परिस्थिती निर्माण केली की हे लोक सत्याप्रमाणे आचरण करण्यात कुचराई करु लागले त्यांच्याकडून गुन्हे घडूं लागले. आणि त्यांचा ढोंगीपणा वाढू लागला.

१९. कुरआनच्या आवाहनाला विरोध याला ज़मिनीवर बिघाड'ची उपमा दिली गेली आहे. यांचे कारण असे की, ज़मिनीवरील सुधारणा, ज़मिनीवर तिच्या सच्च्या निर्माण कर्त्या स्वामीची आज्ञा व कायदे अमलांत येण्यावर अवलंबून असते. या अंमलबजावणीमुळेच ज़मिनींवर शांतता व न्यायव्यवस्था प्रस्थापित होऊं शकते. चांगल्या व शुभ गोष्टी उदयास येतात आणि म्हणूनच, विश्वाच्या पालनकर्त्याचे आज्ञापालन व त्याच्या गुलामगिरीचे आवाहन आणि त्या आधारावर सांस्कृतिक व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील असणे म्हणजेच खऱ्या अर्थी सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे होय. आणि याविरुद्ध जे काही केले जाईल ते जमिनीवर विघाड व गोंधळ निर्माण करणे होय. सुधारणा व बिघाडच्या या वस्तु:स्थितीशी आपरिचित असल्यामुळेच बहुतेक लोक सुधारणेला बिघाड व बिघाडाला सुधारणा समजू लागतात.

२०. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु आलैहि वसल्लम) यांच्या सहकाऱ्यांनी जसे ईमान आणले तसे ईमान आणा. नि:स्वार्थी ईमान. ज्याच्या परिणामस्वरूप माणूस अल्लाहचा सच्चा व एकनिष्ठ सेवक बनतो. अल्लाहच्या मार्गात (सरळ मार्गावर आचरण करीत असताना) येणाऱ्या अडचणींना सहन करतो व धोक्यांना तोंड देतो. स्वार्थी लोकांच्या दृष्टीने हा वेडाचार व मुर्खता आहे. त्यांच्या दृष्टीने शहाणपण हे आहे की माणसाने भौतिक फायद्याला प्राधान्य देऊन अल्लाह व त्याच्या जीवनपद्धती बरोबर फक्त रिवाज म्हणून संबंध ठेवावा.

२१. एकीकडे परमेश्वर व त्याची शिकवण मान्य असल्याचा दावाही करणे व दुसरीकडे त्यांच्या बरोबरच्या नि:स्वार्थी संबंधांना वेडेपणा ठरविणें हा मुर्खपणा नव्हे तर काय?

२२. येथे शैतान याचा अर्थ दुष्टप्रवृत्तीचे पुढारी व नेते असा आहे.

१७. त्यांचे उदाहरण असे आहे की, एका व्यक्तिने अग्नि प्रज्वलित [२३] केला आणि त्यामुळे जेव्हां परिसर प्रकाशमय झाला तेव्हां अल्लाहने त्याची दृष्टी हिरावून घेतली, व त्यांना अशा अंधःकारात सोडून दिले, जेथ त्यांना काही दिसू शकत नाही.

مَثَلُهُمْ كَمَثَلِ الَّذِي اسْتَوْقَدَ نَارًا ۚ
فَلَمَّا أَضَاءَتْ مَا حَوْلَهُ ذَهَبَ اللَّهُ بِنُورِهِمْ وَتَرَكَهُمْ
فِي ظُلُمَاتٍ لَا يُبْصِرُونَ ﴿١٧﴾

१८. ते बहिरे, मुके आणि आंधळे आहेत. आता ते परतणार नाहीत. [२४]

صُمٌّ بُكْمٌ عُمْيٌ فَهُمْ لَا يَرْجِعُونَ ﴿١٨﴾

१९. किंवा त्याचे उदाहरण असे समजा की आकाशातून जोराची वृष्टी होत आहे. त्याबरोबरच अंधःकार विजांचा कडकडाट व प्रकाश पण आहे. हे लोक विजांच्या कडकडाटामुळे मरणाला भिऊन आपल्या कानात बोटे ठोसीत आहेत. परंतु अल्लाहनें या कृतघ्न लोकांना आपल्या कचाट्यात घेतलेले आहे.

أَوْ كَصَيِّبٍ مِنَ السَّمَاءِ فِيهِ ظُلُمَاتٌ وَرَعْدٌ وَبَرْقٌ ۚ يَجْعَلُونَ
أَصَابِعَهُمْ فِي آذَانِهِمْ مِنَ الصَّوَاعِقِ حَذَرَ الْمَوْتِ ۚ وَاللَّهُ مُحِيطٌ
بِالْكَافِرِينَ ﴿١٩﴾

२०. लवकरच वीज त्यांची दृष्टी खेचून नेईल. जेव्हां जेव्हां वीज चमकते तेव्हां ते चालू लागतात. आणि जेव्हां अंधःकार पसरतो तेव्हां ते स्तब्ध उभे राहतात. [२५] जर अल्लाहने इच्छिले असते तर त्यांची श्रवण शक्ति व दृष्टी संपूर्णपणे नाहीशी केली असती. [२६] निःसंशय अल्लाह सर्वशक्तिमान आहे.

يَكَادُ الْبَرْقُ يَخْطَفُ أَبْصَارَهُمْ ۖ كُلَّمَا أَضَاءَ لَهُمْ مَشَوْا فِيهِ
وَإِذَا أَظْلَمَ عَلَيْهِمْ قَامُوا ۚ وَلَوْ شَاءَ اللَّهُ لَذَهَبَ بِسَمْعِهِمْ
وَأَبْصَارِهِمْ ۚ إِنَّ اللَّهَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٢٠﴾

२१. लोकहो ! इबादत [२७] (भक्ति व आज्ञापालन) करा आपल्या पालन कर्त्याची (रब) ज्याने तुम्हांला व तुमच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांना निर्माण केले. [२८] असे (आचरण) करुन तुम्ही (दोज़खच्या आगीपासून) स्वतःचा बचाव करू शकाल.

يَا أَيُّهَا النَّاسُ اعْبُدُوا رَبَّكُمُ الَّذِي خَلَقَكُمْ وَالَّذِينَ مِنْ
قَبْلِكُمْ لَعَلَّكُمْ تَتَّقُونَ ﴿٢١﴾

२२. त्यानेंच तुमच्यासाठी ज़मीनीला बिछाईत व आकाशाला छत बनविले. वरून पाऊस पाडला. व त्यापासून फळें (व अन्नधान्य) निर्माण करून तुमच्या उपजीविकेचे सामान तयार केले. आणि पाहा ! हे माहित असताना, तुम्ही इतरांना अल्लाहच्या बरोबरीचा ठरवूं [२९] नका.

الَّذِي جَعَلَ لَكُمُ الْأَرْضَ فِرَاشًا وَالسَّمَاءَ بِنَاءً وَأَنْزَلَ مِنَ السَّمَاءِ
مَاءً فَأَخْرَجَ بِهِ مِنَ الثَّمَرَاتِ رِزْقًا لَكُمْ ۖ فَلَا تَجْعَلُوا لِلَّهِ أَنْدَادًا
وَأَنْتُمْ تَعْلَمُونَ ﴿٢٢﴾

२३. अग्नि प्रज्वलित केला म्हणजे पवित्र क़ुरआनचा प्रकाश पसरविला. या उपमेचा अर्थ असा की,जेव्हा परमेश्वराच्या सेवकाने (पैगंबरानी) पवित्र क़ुरआनची शिकवण पसरविली तेव्हां ज्यांना दृष्टी (समज) होती त्यांना सत्यमार्ग स्पष्ट झाला. परंतु जे बुद्धिहीन होते ते यापासून वंचित राहीले.

दृष्टी हिरावून घेणे म्हणजे पहाण्याची शक्तिच नाहीशी करणे याचा अर्थ असा की जेव्हा हे लोक सत्याचे अभिलाषी राहीले नाहीत तेव्हा परमेश्र्वरानें त्यांची सत्याचा स्वीकार करण्याची पात्रताच नाहीशी केली. व त्यामुळे ते लोक पवित्र क़ुरआनपासून काही लाभ उठवू शकले नाहीत.

२४. सत्य ऐकण्याची, बोलण्याची व पहाण्याची पात्रताच त्यांच्याजवळ उरली नाही. आणि म्हणून पवित्र क़ुरआनने प्रकाशमय केलेल्या सन्मार्गाचा त्यांना काही लाभ होईल अशी अपेक्षाही केली जाऊ शकत नाही. हे उदाहरण त्या ढोंगी लोकांचे आहे जे अंत:करणापासून ईमान आणण्याच्या विरुद्ध होते आणि फक्त हेतुपुर्वक स्वत:ला मुसलमान म्हणवून घेत असत.

२५. हे दुसरे उदाहरण त्या ढोंगी लोकांचे आहे जे संशयाने पछाडलेले होते आणि त्याग करावा लागणाऱ्या धार्मिक पद्धतीस ते मानीत नसत. या उदाहरणात, वृष्टी (पाऊस) म्हणजे ईश्वरी आदेश (वही) जो वरुन उतरत होता. तो ईश्वरी आदेश मानवजातीसाठी पूर्णपणें हितकारक व कल्याणदायक आहे. वीजेचा कडकडाट म्हणजे पवित्र क़ुरआनने दिलेली ताकीद व इशारे आणि अंध:कार म्हणजे सन्मार्गातील अडचणी व संकटे. वीज चमकली की चालू लागतात व अंधार पसरला की थांबतात यावरुन त्यांची व्याकुळता व बेचैनी स्पष्ट होते. पवित्र क़ुरआनचा प्रकाश त्यांची दृष्टी दिपवून टाकीत होता. आणि काय करावे व काय करूं नये या विवंचनेत ते होते.

वीज जर पडली तर कानात बोटे ठोसून घेतल्याने कसा काय बचाव होणार? हल्ला करणाऱ्या वाघाला पाहून डोळे बंद करून घेण्यासारखे हे आहे. उघड आहे की डोळे मिटवून घेतल्याने वाघाचा हल्ला काही थांबत नाही. हीच परिस्थिती त्या ढोंगी लोकांची होती जे क़ुरआनची ताकीद व इशारे ऐकू इच्छित नव्हते.

२६. ढोंगी लोकांच्या या दुसऱ्या गटाच्या लोकांची श्रवणशक्ति व दृष्टी ईश्वरानें संपूर्णपणे नाहीशी केलेली नाही. आणि म्हणून हे लोक पहिल्या गटातील लोकांप्रमाणे सत्याचा स्वीकार करण्याच्या पात्रतेपासून वंचित राहिलेले नाहीत.

२७. हे पवित्र क़ुरआनाचे साऱ्या मानवांना उद्देशून करण्यात आलेले मूलभूत आवाहन आहे. या आवाहनाचा अर्थ असा की, तुम्ही तुमच्या पालनकर्त्या ईश्वराची, जो तुम्हा सर्वांचा निर्माता, स्वामी व पालनकर्ता आहे ''इबादत'' करा. भक्ति त्याचीच करा व आज्ञापालनही त्याचेच करा. आणि ही भक्ति व आज्ञापालन त्याच पद्धतीने केले पाहिजे जी पद्धत पवित्र क़ुरआनने घालून दिलेली आहे. जे लोक अल्लाहच्या इबादतीचे समर्थक तर आहेत,परंतु इबादतीत काल्पनिक ईश्वरांना सहभागी करतात त्यांची इबादत खऱ्या अर्थानें अल्लाहची इबादत नव्हेच. जे लोक खरोखरच अल्लाहची इबादत करू इच्छितात त्यांच्यासाठी एकमेव मार्ग हा आहे की त्यांनी एका अल्लाहचीच इबादत करावी. व ती पण पवित्र क़ुरआनने घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणे करावी.

२८. इशारा त्या गोष्टीकडे आहे की, ज्या लोकांनी आपल्या वाडवडिलांना व होऊन गेलेल्या मान्यवर व्यक्तींना ईश्वराच्या कार्यात सहभागी ठरवून ठेविले आहे त्या सर्वांचा निर्माता सर्वश्रेष्ठ अल्लाहच आहे आणि म्हणून त्या बिचाऱ्यांना निर्मात्याबरोबर आणून उभे करणे व त्यांची मूर्ति बनवून पुजाअर्चा करणे बरोबर नाहीं पूजा अर्चेचा खरा अधिकारी फक्त अल्लाहच आहे. जो होऊन गेलेल्या वाडवडिल व मान्यावर व्यक्तिसकट सर्वांचा निर्माता आहे.

२९. अरब लोक हे मान्य करीत होते की, ही सारी कामे अल्लाहचीच आहेत. परंतु असे असतादेखील, ते अल्लाहचे सहभागी पण आहेत असे मानीत असत. आणि म्हणून त्यांना सांगितले गेले कीं, जेव्हा तुम्हीं हे मान्य करता कीं, निर्माण व पालनपोषणाची सर्व कामे अल्लाहचीच आहेत तर मग इतरांना अल्लाहचे सहभागी का ठरविता? त्यांचा तर या कामामध्ये कसलाही संबंध नाही. हे तौहीदचे (एकेश्वरवादाचे ) आवाहन आहे, ज्याचे मुद्दे संक्षिप्तपणे येथे नमूद केले गेले आहेत.

२३. आणि जर तुम्हांला आम्ही आमच्या दासावर उतरविलेल्या या ग्रंथाबद्दल संशय आहे तर तुम्हीं या ग्रंथातील सूरती (अध्याय) सारखी एखादी सूरत तयार करून आणा. आणि अल्लाहशिवाय जे कोणी तुमचे पाठीराखे आहेत त्या सर्वांना बोलावून घ्या. जर तुम्हीं प्रमाणिक असाल [३०] (तर हे करून दाखवा)।

وَإِنْ كُنْتُمْ فِي رَيْبٍ مِمَّا نَزَّلْنَا عَلَىٰ عَبْدِنَا فَأْتُوا بِسُورَةٍ مِنْ
مِثْلِهِ وَادْعُوا شُهَدَاءَكُمْ مِنْ دُونِ اللَّهِ إِنْ كُنْتُمْ
صَادِقِينَ ﴿٢٣﴾

२४. परंतु तुम्ही जर असे करू शकला नाहीं आणि तुम्हीं असे कदापिही करूं शकणार नाहीं तर त्या आगीचे भय बाळगा जिचे इंधन माणूस व दगड [३१] आहेत, जी इन्कार करणाऱ्यासाठी तयार केली गेली आहे.

فَإِنْ لَمْ تَفْعَلُوا وَلَنْ تَفْعَلُوا فَاتَّقُوا النَّارَ الَّتِي وَقُودُهَا
النَّاسُ وَالْحِجَارَةُ ۖ أُعِدَّتْ لِلْكَافِرِينَ ﴿٢٤﴾

२५. आणि (हे पैगंबरा) ज्या लोकांनी ईमान आणले व चांगले आचरण केले त्यांना हा शुभसंदेश द्या कीं, त्यांच्यासाठी अशा बागा [३२] असतील ज्यांच्या खालून जलप्रवाह वाहत असतील. जेव्हां जेव्हां त्या बागांमधील फळें त्यांना खाण्यास देण्यात येतील तेव्हां ते म्हणतील किं ही तीच फळें आहेत जी आम्हाला यापूर्वी (जगात) मिळाली होती.आणि त्या सारखीच त्यांना दिली जातील.[३३]याशिवाय या बागांमध्ये त्यांच्यासाठी पवित्र पत्न्या असतील आणि त्यामध्ये ते सदैव राहतील.

وَبَشِّرِ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ أَنَّ لَهُمْ جَنَّاتٍ تَجْرِي مِنْ
تَحْتِهَا الْأَنْهَارُ ۖ كُلَّمَا رُزِقُوا مِنْهَا مِنْ ثَمَرَةٍ رِزْقًا ۙ قَالُوا هَٰذَا
الَّذِي رُزِقْنَا مِنْ قَبْلُ ۖ وَأُتُوا بِهِ مُتَشَابِهًا ۖ وَلَهُمْ فِيهَا أَزْوَاجٌ
مُطَهَّرَةٌ ۖ وَهُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿٢٥﴾

२६. अल्लाह कोणतेही उदाहरण देण्यास संकोच बाळगत नाहीं. मग ते उदाहरण डांसाचे असो वा त्याहूनही क्षुल्लक गोष्टीचे असो.[३४] ज्या लोकांनी ईमान आणले आहे ते जाणतात की हे सत्य आहे; ते त्यांच्या पालनकर्त्याकडून आलेले आहे. आणि जे इन्कार करणारे आहेत ते म्हणतात किं या उदाहरणानें अल्लाहचा आशय काय आहे?अल्लाह यानें पुष्कळांना मार्गभ्रष्ट करतो व पुष्कळांचे मार्गदर्शन करतो. आणि मार्गभ्रष्ट त्यांनाच करतो जे दुराचारी (फासिक) असतात.[३५]

إِنَّ اللَّهَ لَا يَسْتَحْيِي أَنْ يَضْرِبَ مَثَلًا مَا بَعُوضَةً فَمَا فَوْقَهَا ۚ فَأَمَّا
الَّذِينَ آمَنُوا فَيَعْلَمُونَ أَنَّهُ الْحَقُّ مِنْ رَبِّهِمْ ۖ وَأَمَّا الَّذِينَ
كَفَرُوا فَيَقُولُونَ مَاذَا أَرَادَ اللَّهُ بِهَٰذَا مَثَلًا ۘ
يُضِلُّ بِهِ كَثِيرًا وَيَهْدِي بِهِ كَثِيرًا ۚ وَمَا يُضِلُّ بِهِ إِلَّا
الْفَاسِقِينَ ﴿٢٦﴾

२७. जे लोक अल्लाह बरोबर दृढपणे वचनबद्ध झाल्यानंतर वचनभंग करतात; ज्या संबंधाना [३६] प्रस्थापित करण्याची अल्लाहने आज्ञा दिलेली आहे त्यांना तोडतात व ज़मिनीवर उत्पात माजवितात तेच लोक हानि पावणार आहेत.

الَّذِينَ يَنْقُضُونَ عَهْدَ اللَّهِ مِنْ بَعْدِ مِيثَاقِهِ وَيَقْطَعُونَ
مَا أَمَرَ اللَّهُ بِهِ أَنْ يُوصَلَ وَيُفْسِدُونَ فِي الْأَرْضِ ۚ أُولَٰئِكَ
هُمُ الْخَاسِرُونَ ﴿٢٧﴾

३०. पवित्र क़ुरआन अल्लाहकडून उत्तरविले गेले आहे याबाबतीत जर तुम्हांला संशय असेल व हे हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे लिखाण आहे असा जर तुमचा विचार असेल तर तुम्हीं या सूरती सारखी एखादी सूरत लिहून आणा क़ुरआनच्या या आव्हानाचे उत्तर न त्या काळातील विरोधकांनी दिले न त्यानंतरच्या काळातील. कुरआनचे हे श्रेष्ठत्व निरनिराळ्या पैलूंनी आहे. अतिश्रेष्ठ दर्जाची ओघवती, ओजस्वी व अलंकारीक भाषा शैली; शब्दांची योग्य निवड; माळेमध्ये गुंफलेल्या मोत्याप्रमाणें सहज सुंदर वाक्यरचना; अंत:करणाला भिडणाऱ्या गोष्टी; स्वभाविक आविष्काराबरोबर पूर्ण एकरूपता; अंत:प्रेरणेची हाक; आत्म्याच्या शुद्धिकरणाचा अजोड उपाय; नीतिमत्ता व सौजन्य यांना परमोच्चबिंदुपर्यंत पोंहचविणारी शिकवण; मानवी जीवनासाठी परीपूर्ण जीवन-व्यवस्था; जीवन समस्यांचे अतियोग्य निराकरण; जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये मार्गदर्शनाची तरतुद; विश्वाची रहस्यें व नैसर्गिक घटनांचा उलगडा ; विश्वाच्या निर्मात्याची खरी ओळख व त्याच्या मर्जीचे ज्ञान वगैरे पवित्र कुरआनच्या श्रेष्ठत्वाचे असे पैलू आहेत जे पवित्र कुरआन हा ईश्वरी ग्रंथ असल्याची साक्ष देतात. अशी वैशिष्ट्ये असलेला ग्रंथ सादर करण्यास माणूस असमर्थ आहे. आणि सर्व मानव मिळून देखील त्याच्या तोडीचा ग्रंथ सादर करू शकत नाहीत. या आयतीद्वारे पवित्र क़ुरआन व हजरत मुहम्मद सल्लल्लाहु आलैहि वसल्लम यांच्या पैगंबरीवर ईमान आणण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

३१.ज्यांची पूजा केली जात असे, ते दगड अभिप्रेत आहेत. इन्कार करणारे व अल्लाह बरोबर इतरांना सहभागी ठरविणारे लोक आणि पूजाअर्चा करण्यात आलेले दगड ही दोजखची खाद्य आहेत. यामुळे त्यांची पूजा करणाऱ्यांना हे कळून येईल कीं, ज्यांची ते पूजा करीत असत व ज्यांना ते नैवेद्य चढवीत असत, त्यांची काय दुर्दशा झाली आणि ते कशाप्रकारे त्यांना घातक ठरले.

३२. जन्नत मधील बागा ज्या ईमान आणलेल्यांना अखिरतमध्यें लाभतील.

३३. जन्नत मधील फळें दिसावयास व आकारानें जगातील फळांसारखीच असतील परंतु चवीला मात्र ती त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने उत्कृष्ठ असतील.

३४. सत्य गोष्टीना उदाहरणांनी स्पष्ट केले तर त्या सहजरित्या समजतात. उपमा व उदाहरण ही बुद्धियुक्त वचनाची वैशिष्ट्ये आहेत. क़ुरआननें मूर्तींची असहायता चा वर्णन करताना माशीचे उदाहरण देऊन स्पष्ट केले कि एखाद्या माशीने त्यांच्यापासून एखादी वस्तु हिरावून घेतली तरी त्या तिचे काही नुकसान करु शकत नाहीत. मुश्रिक (अनेकेश्वरवादी) लोक अशा उदाहरणांचा आधार घेऊन कुरआनवर आक्षेप घेत असत. त्याचे उत्तर येथे दिले आहे.

३५. फासिक (दुराचारी) म्हणजे अवज्ञाकारी अवज्ञेच्याही निरनिराळ्या श्रेणी आहेत. येथे हा शब्द त्या मोठमोठ्या अवज्ञांबद्दल वापरला गेला आहे, ज्यांचा ईमान बरोबर मेळ बसत नाही.

३६. रक्ताच्या संबंधाना तोडणे अभिप्रेत आहे. जी व्यक्ति या संबंधाना तोडते तो जणू समाजाच्या मूळावर घाव घालते. आणि म्हणून या वृत्याला मोठा गुन्हा व अनाचार माजविणे समजले आहे.

२८. तुम्ही अल्लाहचा इन्कार [३७] कसा करता? तुम्ही निर्जीव होता तेव्हां त्याने तुम्हांला जीवन दिले; नंतर तोच तुम्हाला मरण देईल आणि त्यानंतर तुम्हाला जीवंत [३८] करील व त्याच्याकडे तुम्हांला परतविले जाणार आहे.

كَيْفَ تَكْفُرُوْنَ بِاللّٰهِ وَكُنْتُمْ اَمْوَاتًا فَاَحْيَاكُمْ ثُمَّ
يُمِيْتُكُمْ ثُمَّ يُحْيِيْكُمْ ثُمَّ اِلَيْهِ تُرْجَعُوْنَ ﴿٢٨﴾

२९. तोच तर आहे ज्यानें तुमच्यासाठी जमीनीवर जे काही आहे ते सर्व निर्माण केले; नंतर त्याने आकाशाकडे रोख केला व सात आकाश [३९] सारखे निर्माण केले आणि तो सर्वज्ञ आहे.

هُوَ الَّذِيْ خَلَقَ لَكُمْ مَّا فِي الْاَرْضِ جَمِيْعًا ثُمَّ اسْتَوٰى اِلَى
السَّمَآءِ فَسَوّٰىهُنَّ سَبْعَ سَمٰوٰتٍ وَهُوَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿٢٩﴾

३०. आणि स्मरण करा जेव्हां तुमच्या पालनकर्त्याने फिरीश्त्याना [४०] सांगितले होते की. ''मी जमीनीवर एक खलीफ़ा [४१] (सत्ताधारी) निर्माण करणार आहे.''त्यांनी विनविले की, काय तू जमीनीवर अशी निर्मिती करणार आहेस जी तिच्यामध्ये बिघाड निर्माण करील व रक्तपात करील? [४२] आम्हीं तर तुझ्या स्तुतिबरोबर तुझ्या नावाचा जप आणि तुझे पावित्र्यगान तर करीत आहोंतच.' (ईश्वरानें) फर्माविले ''मी जे जाणतो ते तुम्ही जाणत नाही.'' [४३]

وَاِذْ قَالَ رَبُّكَ لِلْمَلٰٓئِكَةِ اِنِّيْ جَاعِلٌ فِي الْاَرْضِ خَلِيْفَةً قَالُوْٓا
اَتَجْعَلُ فِيْهَا مَنْ يُّفْسِدُ فِيْهَا وَيَسْفِكُ الدِّمَآءَ وَنَحْنُ نُسَبِّحُ
بِحَمْدِكَ وَنُقَدِّسُ لَكَ قَالَ اِنِّيْٓ اَعْلَمُ مَا لَا تَعْلَمُوْنَ ﴿٣٠﴾

३१. आणि त्याने आदमला सर्व नांवे [४४] शिकविली. नंतर त्यांना फिरिश्त्यासमोर आणून विचारणा केली ''जर तुम्हीं खरे असाल तर यांची नांवे सांगा.''[४५]

وَعَلَّمَ اٰدَمَ الْاَسْمَآءَ كُلَّهَا ثُمَّ عَرَضَهُمْ
عَلَى الْمَلٰٓئِكَةِ فَقَالَ اَنْۢبِـُٔوْنِيْ بِاَسْمَآءِ هٰٓؤُلَآءِ اِنْ كُنْتُمْ
صٰدِقِيْنَ ﴿٣١﴾

३२. त्यांनी उत्तर दिले. ''तू पवित्र आहेस. जे ज्ञान तूने आम्हांस दिलेस त्याच्याशिवाय कसलेही ज्ञान आम्हांला नाही. निःसंशय तूंच खरा ज्ञानी व बुद्धिमान आहेस.'

قَالُوْا سُبْحٰنَكَ لَا عِلْمَ لَنَآ اِلَّا مَا عَلَّمْتَنَا اِنَّكَ اَنْتَ الْعَلِيْمُ
الْحَكِيْمُ ﴿٣٢﴾

३३. फर्माविले. ''आदम ! यांना त्याची नांवे सांग'' ज़ेव्हां आदमने त्यांना त्यांची नांवे सांगितली, [४६] तेव्हा फर्माविले '' काय मी तुम्हाला सांगितले नव्हते कीं आकाशातील व जमीनीवरील रहस्यांना मीच जाणतो आणि जे काही तुम्हीं उघड करता त्यालाही मी जाणतो आणि जे काही तुम्ही लपवीत आहात तेहि मला ज्ञात आहे.''

قَالَ يٰٓاٰدَمُ اَنْۢبِئْهُمْ بِاَسْمَآئِهِمْ فَلَمَّآ اَنْۢبَاَهُمْ بِاَسْمَآئِهِمْ قَالَ
اَلَمْ اَقُلْ لَّكُمْ اِنِّيْٓ اَعْلَمُ غَيْبَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَاَعْلَمُ
مَا تُبْدُوْنَ وَمَا كُنْتُمْ تَكْتُمُوْنَ ﴿٣٣﴾

३७. अल्लाहचा इन्कार म्हणजे अल्लाहची वैशिष्टें उदाहरणार्थ तो एकमेव आहे, सर्वाधिकारी, न्यायी आहे, सर्वज्ञ आहे, सर्वगामी आहे व सर्वशक्तिमान आहे वगैरेंना नाकारणे व त्याविरुद्ध वर्तन करणे. पवित्र कुरआनचे सांगणे आहे की, अल्लाहला मानावयाचे असेल तर त्याच्या सर्व गुणविशेषासह माना. नाहीपेक्षा त्याला मानण्याचा दावा करण्यात काही अर्थ नाहीं.

३८. जीवन, मृत्यू व पुन्हां जीवंत करणे हे एखाद्या देवी-देवता चे काम नव्हे. सर्व गोष्टी अल्लाहच्या अधिकारातील आहेत. असे असतांना तुम्हीं कृतघ्न का बनता? या आयतीमध्ये आखिरतवर ईमान आणण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

३९. ईश्वराचे ईशत्व नजरेस पडणाऱ्या तारामंडळापर्यंत मर्यादित नाही. त्याहीपलीकडे आणखी जे काही आहे त्या सर्वांवर त्याचा अधिकार आहे. यावरुन विश्वाचे भव्यत्व व व्यापकता आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याची कल्पना येऊ शकेल.

४०. 'मलाईका' हा शब्द वापरण्यात आलेला आहे. हे 'मलक' चे अनेकवचन आहे. याचा अर्थ 'शंदेश पोहचविणारा' (संदेश वाहक) असा होतो. उर्दू मध्ये त्याला 'फिरिश्ता' इंग्रजीमध्ये "Angel" म्हणतात. मराठीमध्यें यासाठीं खास शब्द नाहीं. आम्हीं 'फिरिश्ता' हा शब्दच भाषांतरांत वापरला आहे व काही ठिकाणी 'अल्लाहचे दूत' असेही त्याचे भाषांतर केले आहे. फिरिश्ते ही इंद्रियज्ञान व बुद्धि असलेली अल्लाहची निर्मिती आहे. अत्यंत सतप्रवृत्त व श्रेष्ठ गुण बाळगणारी निर्मिती. हे विश्वामध्ये अल्लाहच्या आज्ञांची अंमलबजावणी करतात. ते त्याच्या हुकूमांची अवज्ञा करीत नाहीत. त्यांना जो हुकूम दिला जातो त्याचे ते पालन करतात. ते अल्लाहकडून त्याच्या प्रेषितांकडे वही (आदेश) आणतात. मानवी आचरणांची नोंद ठेवतात. त्याचप्रमाणे ईश्वराच्या परवानगीने प्राण खेचण्याचे कामही करतात.

४१. येथे "खलिफा" हा शब्द सत्ताधारी या अर्थाने वापरण्यात आलेला आहे. माणसाला जमीनीवर सत्ताधारी नेमणे याचा अर्थ असा की, त्याला सत्ता अधिकार सोपवून, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याची परिक्षा घेईल. माणूस, हे अधिकार आपल्या पालनकर्त्याच्या इच्छेप्रमाणे वापरतो की मनमानेल तसे वागून स्वत: "ईश्वर" बनतो याची परिक्षा घेतली जाईल. या आयतीमध्ये माणसाचे या जगातील स्थान काय आहे या मूलभूत प्रश्नाचे उत्तर दिले गेले आहे. या प्रश्नाच्या योग्य उत्तरावरच त्याच्या वागणूकीचे औचित्य व त्याचा चांगला शेवट अवलंबून आहे. या अति महत्वाच्या प्रश्नाचा शांतपणे विचार व त्याच्या योग्य उत्तराचा शोध घेण्या एवजी लोक स्वत:ला अगदी स्वतंत्र व निरंकूश समजतात. कोणी आपणाला हे अधिकार दिलेले नाहीत व त्या अधिकारांच्या वापरात ते कोणाच्या इच्छेच्या अधीन नाहीत आणि याबाबतीत कोणासमोर जाब देण्याची जबाबदारी त्यांचेवर नाहीं असे ते समजतात. या विचारसरणीचा परिणाम हा होतो कीं माणूस आपली सत्ताधारी विषयीची भूमिका विसरतो. स्वत:ला सर्वसमर्थ समजून 'ईश्वर' बनतो आणि त्याच्या या चुकीच्या निर्णयामुळें जमिनीवर दुराचार माजतो. कारण की जमिनीवरील शांतता व सुव्यवस्था जमिनीवर अल्लाहच्या अज्ञा व त्याचे कायदे अमंलात आल्यातरच टिकून राहते. माणसाच्या इच्छेप्रमाणे जगाचा कारभार झाल्यास बिघाड, अत्याचार व दडपशाही याशिवाय काही वेगळे घडणार नाही.

४२. फिरिश्त्यांना अशी शंका आली कीं,माणसाला त्याची परिक्षा घेण्यासाठी जे अधिकार दिले जात आहेत, त्यांचा योग्य वापर करणे सोपे नाही हे अधिकार हाती आल्यावर माणूस बहकू शकतो. आणि त्यांचा मनमानेल तसा वापरही करूं शकतो. ज्यांचा स्वभाविक परिणाम दुराचार व रक्तपात आहे.

४३. फिरिश्त्यांच्या मनांत जी शंका निर्माण झाली होती तिच्या निराकरणा दाखल परमेश्वरानें हे फर्माविले. याचा अर्थ असाकी, माणसाला सत्ताधारी बनविन्यामध्ये अल्लाह समोर जी योजना आहे तिचे तुम्हांला पूर्णज्ञान नाहीं. तुमच्यासमोर या योजनेचे फक्त काही पैलू आहेत चित्राची एक बाजू तुमच्यासमोर आहे. चित्राची दुसरी बाजू जी या योजनेचा खरा गाभा आहे, ती तुमच्यासमोर नाहीं. ही बाजू जेव्हां तुमच्यासमोर येईल तेव्हां तुम्हाला जाणीव होईल की, माणसाला सत्ताधारी बनविण्यामध्ये किती मोठे शहाणपण सामाविलेले आहे.

४४. आदमच्या संतानाची नांवे खास करुन त्या लोकांची नांवे, जे जगात त्यांना मिळणाऱ्या अधिकारांचा योग्य वापर करुन सत्ताधारकाचे कार्य उत्कृष्ठपणे करतील. जणू आदमला पहिल्यापासूनच त्यांच्या संतानाशी परिचित करण्यात आले. आणि विशेषकरून त्यांच्यासमोर हा चांगला पैलू आणला गेला की, तुमच्या संतानामध्ये या त्या विभूति असतील ज्या जमिनीवर विधायक सुधारणांचे व रचनांचे बहुमोल कार्य करतील. आणि आपल्या थोर कर्तबगारीच्या आधारावर जमिनीवरील आल्हाददायक व प्रफुल्लित फुले ठरतील. उक्ति-क्रमावरून हे स्पष्ट होते की हजरत आदम याच्या प्रतिष्ठित व्यक्तिमत्वास त्यांच्या निर्मिती आधी फिरिश्त्यां समोर ठेवले गेले किंवा त्याचा आत्मा सादर केला गेला होता. तात्पर्य फिरिश्त्यां समोर प्रस्तुत केले गेले होते. या साठी की त्यांना

एकाच वेळी दोन्ही गोष्टीचे आकलन व्हावे. एक म्हणजे त्यांच्या कयास संबंधीची चूक की मनुष्य जमिनीवर बिघाड निर्माण करणारीच कामे करील व दुसरी, ईश्वरीय योजनेचा हा चांगला पैलू की आदम-संतती मध्ये काही अशी व्यक्तिमत्वे निर्माण होतील की चांगल्या प्रकारे विधायक कार्ये पार पाडतील, व मानवतेचे मौक्तीक निखळून समोर येईल. अर्थात हेच लोक ईश्वराच्या कृपेस पात्र असतील व यांनाच जन्नत मध्ये वसविले जाईल.

भाष्यकारांच्या एका गटा ने नावा चा अर्थ वस्तुची नावे असा घेतला असला तरी व्याकरणी स्पष्टीकरणाच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. इब्ने जरीर तबरी यांनी आपल्या भाष्यात याबाबत तसा इशारा केला आहे. कारण यात 'हम' व 'हाउलाइ' ची सर्वनामे प्रयोजिली गेली आहेत ती वस्तुच्या ऐवजी आत्मा असलेल्या करिता योग्य आहेत. दुसरे हे की या स्पष्टीकरणाचा अंगिकार केल्याने हा प्रश्न उपस्थित होतो की फिरिश्त्यांच्या बुध्दि मध्ये जी दुष्करता उद्भवली होती, तिचे निरसन या गोष्टीने कसे होईल की हजरत आदम यांना सर्व वस्तूंची नावे शिकवली गेली स्पष्टत: त्यांची शंका याच स्थितीत दूर होऊ शकत होती जेव्हा त्यांच्या समोर आदम निर्मिताच्या परिणामी घडून येणाऱ्या उच्च श्रेणीच्या व्यक्तित्वांचे काही नमुने सादर केले जावेत म्हणून आम्ही ''अस्मा'' चा अर्थ व्यक्तिमत्वाची नावे असा घेतला आहे.

अल्लामा इब्ने जरीर तबरी यांनी आपल्या भाष्यात, भाष्याकारांचे एक कथन या गोष्टीच्या समर्थनार्थ उल्लेखिले आहे की 'अस्मा' शी अभिप्रेत आदम संततीची नावे होत व या कथनास प्राधान्य दिले आहे. (पहा तफसीर तबरी खंड-१ पृष्ठ १७१ )

४५. माणूस अधिकार प्राप्त झाल्यावर दुराचारावर दुराचार माजवील ही तुमची शंका जर खरी असेल तर जरा या लोकांची नांवे व गुण तर सांगा? काय या विभूतीही जमिनीवर दुराचार माजविणार आहेत?

४६. आदमने, सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रदान केलेलया ज्ञानाच्या जोरावर सांगितले की, माझ्या संतानामध्ये हे हे लोक होतील. ते परमेश्वराचे प्रामाणिक व निष्ठावंत दास राहतील. आणि शांतता व न्याय यांची प्रस्थापना करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करतील माणसाला सत्ताधारी बनविण्यामागील हा विधायक पैलू फिरिश्त्यांच्या ध्यानीमनी हि नव्हता. परमेश्वराने परिक्षा घेऊन आदमच्याच तोंडाने त्यांच्यावर हा पैलू स्पष्ट केला या घटनेने काही महत्त्वाच्या गोष्टींवर प्रकाश पडतो.

(१) माणसाची निर्मिती श्रेष्ठतम ध्येयप्रित्यर्थ झालेली आहे. मंगल-अमंगलच्या (चांगुलपणा व दृष्टता) या समरांगणामधून अशा व्यक्तिंची निवड करावयाची आहे ज्या उच्च गुणांनी संपन्न असतील.

(२) लोकांमधून या रत्नांना निवडून सर्वश्रष्ठ परमेश्वर त्यांना आपल्या अगणित कृपा प्रसादाने (निआमत) व दयाळूपणाने विभूषित करू इच्छित आहे. आणि आखिरतमध्ये अशा लोकांचे कायमचे स्थान जन्नत राहील.

(३) ईश्वरी योजनेचे फक्त काही पैलू जर नजरेसमोर ठेविले तर माणूस चूकीचे मत बनवील. परंतु ईश्वरांची संपूर्ण योजना जर नजरेसमोर असेल जिचे ज्ञान ईश्वराने दिल्यानेंच होऊ शकते-तर योजनेचा खरा हेतु व त्यामागील सुज्ञता स्पष्ट होईल.

(४) जे लोक मानव निर्मिती संबंधीची ईश्वराची योजना समजावून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत ते जगातील माणसाचे स्थान व त्याच्या जीवनाचा उद्देश याबद्दल चुकीच्या कल्पना करतात.

(५) अल्लाह सर्वज्ञ व बुद्धिमान आहे. त्याचे कोणतेही काम शहाणपणाला सोडून (चातुर्यविरहीत) नाही. एखादे कृत्य शहाणपणाला सोडून आहे असे भासले तरी त्याला आक्षेपार्ह ठरविण्या ऐवजी ती आपल्या ज्ञानाची कमतरता समजली पाहिजे.

(६) 'फिरिश्त्ये' जे ईश्वराच्या जवळचे दास आहेत त्यांच्याकडूनही समजण्यात चूक झाली. यावरून हे स्पष्ट होते की, त्यांच्यामध्ये देखील ईश्वरी गुण नाहीत. सर्वप्रकारे पवित्र व दोषविरहित फक्त परमेश्वरच आहे.

(७) जमिनीवर सुव्यवस्था व सुराज्य, तिच्यामध्ये सुधारणा व चांगुलपणा आणि न्याय व शांतता यांची प्रस्थापना या गोष्टी, माणसाने त्याला लाभलेले अधिकार ही परमेश्वराची अमानत आहे व त्यांचा वापर ईश्वराच्या शिकवण व इच्छेनुरूप व्हावयास पाहिजे या माणसाच्या निष्ठेवर अवलंबून आहेत.

**आणि स्मरण करा जेव्हां आम्ही फिरिश्त्यांना (देवदूत) सांगितले.''आदमला सज्दा (प्रणाम) करा.'' तर त्यांनी सज्दा केला. परंतु इबलीसने (सज्दा) केला नाही. त्यानें नकार दिला व गर्व केला. आणि काफिरां (इन्कार करणाऱ्या) पैकी झाला. आम्ही सांगितले.'आदम ! तू आणि तुझी पत्नी दोघेजण जन्नतमध्ये राहा आणि यामधून जे हवे ते मोकळेपणाने खा. परंतु ह्या झाडाजवळ जाऊ नका. अन्यथा तुमची गणना अत्याचारी लोकांमध्ये होईल.** *(अल-क़ुरआन)*

३४. आणि स्मरण करा जेव्हां आम्ही फिरिश्त्यांना (देवदूत) सांगितले.''आदमला सज्दा [४७] (प्रणाम) करा.'' तर त्यांनी सज्दा केला. परंतु इबलीसने [४८] (सज्दा) केला नाही. त्यानें नकार दिला व गर्व केला. आणि काफिरां (इन्कार करणाऱ्या) पैकी झाला.[४९]

وَإِذْ قُلْنَا لِلْمَلَٰٓئِكَةِ ٱسْجُدُوا۟ لِءَادَمَ فَسَجَدُوٓا۟ إِلَّآ إِبْلِيسَ أَبَىٰ
وَٱسْتَكْبَرَ وَكَانَ مِنَ ٱلْكَٰفِرِينَ ﴿٣٤﴾

३५. आम्ही सांगितले.'आदम ! तू आणि तुझी पत्नी दोघेजण जन्नतमध्ये [५०] राहा आणि यामधून जे हवे ते मोकळेपणाने खा. परंतु ह्या झाडाजवळ [५१] जाऊ नका. अन्यथा तुमची गणना अत्याचारी लोकांमध्ये होईल.

وَقُلْنَا يَٰٓـَٔادَمُ ٱسْكُنْ أَنتَ وَزَوْجُكَ ٱلْجَنَّةَ وَكُلَا مِنْهَا
رَغَدًا حَيْثُ شِئْتُمَا وَلَا تَقْرَبَا هَٰذِهِ ٱلشَّجَرَةَ فَتَكُونَا
مِنَ ٱلظَّٰلِمِينَ ﴿٣٥﴾

३६. परंतु सैतानाने त्यांना चुकविले [५२] आणि ज्या ऐष आरामात ते राहत होते त्यामधून त्यांना बाहेर काढलेच. आम्ही फर्माविले. 'तुम्ही' सर्व येथून उतरा. तुम्ही एकदुसऱ्याचे शत्रू आहांत. [५३] आणि तुम्हांला ऐका ठराविक मुदतीपर्यंत जमिनीवर राहवयाचे आहे व तेथेच उदरनिर्वाह करावयाचा आहे.

فَأَزَلَّهُمَا ٱلشَّيْطَٰنُ عَنْهَا فَأَخْرَجَهُمَا مِمَّا كَانَا فِيهِ ۖ وَقُلْنَا
ٱهْبِطُوا۟ بَعْضُكُمْ لِبَعْضٍ عَدُوٌّ ۖ وَلَكُمْ فِى ٱلْأَرْضِ مُسْتَقَرٌّ
وَمَتَٰعٌ إِلَىٰ حِينٍ ﴿٣٦﴾

३७. यानंतर आदमने आपल्या पालन कर्त्याकडून (तौबा- पश्यातापयुक्त क्षमायाचना) काही बोल शिकले. तेव्हां त्यानें त्याची क्षमायाचना मान्य केली.[५४] निःसंशय तोच क्षमायाचना कबूल करणारा व दया करणारा आहे.

فَتَلَقَّىٰٓ ءَادَمُ مِن رَّبِّهِۦ كَلِمَٰتٍ فَتَابَ عَلَيْهِ ۚ إِنَّهُۥ هُوَ ٱلتَّوَّابُ
ٱلرَّحِيمُ ﴿٣٧﴾

३८. आणि फर्माविले, 'तुम्हीं सर्व येथून उतरा. [५५] नंतर माझ्याकडून जी शिकवण [५६] (मार्गदर्शन) तुमच्याकडे येईल, त्या माझ्या शिकवणीचा जे लोक अंगिकार करतील त्यांना कसलेही भय नाही व ते दुःखी होणार नाहीत.' [५७]

قُلْنَا ٱهْبِطُوا۟ مِنْهَا جَمِيعًا ۖ فَإِمَّا يَأْتِيَنَّكُم مِّنِّى هُدًى فَمَن تَبِعَ
هُدَاىَ فَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿٣٨﴾

३९. परंतु जे लोक कुफ्र करतील आणि आमच्या आयतींना खोटे ठरवतील [५८] ते अग्निवासी आहेत व तेथेच (आगीमध्ये) ते सदैव राहतील.

وَٱلَّذِينَ كَفَرُوا۟ وَكَذَّبُوا۟ بِـَٔايَٰتِنَآ أُو۟لَٰٓئِكَ أَصْحَٰبُ ٱلنَّارِ ۖ هُمْ
فِيهَا خَٰلِدُونَ ﴿٣٩﴾

४७. आदमला सज्दा करण्याची आज्ञा त्याच्या आदसर्थ होती. तेजापासून बनविण्यात आलेल्या या निर्मितीला (फिरिश्त्यांना) मातीपासून बनविण्यात आलेल्या या निर्मितीसमोर (माणसासमोर) झुकण्याची जी आज्ञा देण्यात आली, तिचे ते पालन करतात किंवा नाही याची ती परिक्षा होती. फिरिश्त्यांनी ईश्वराच्या आज्ञेचे पालन केले व ते परिक्षेत यशस्वी झाली.

हा सजदा वस्तुत: या गोष्टीची स्वीकृति होती की सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या परिपूर्ण सामर्थ्याने एका नवीन निर्मितीस अस्तित्वात आणले आहे. जी आपल्या अंगी जमिनीवर सत्ता चालविण्याची सर्वोत्कृष्ट पात्रता बाळगते. यास्तव या सजद्याचे स्वरुप इबादत च्या सजद्याहून अगदी भिन्न होते परंतु यात आदम यांच्या महानतेचा पैलू प्रकट होता म्हणून आपल्या मोठेपणाच्या घमेंडीत रममाण असलेला इबलीस (सैतान) या आदेशाची पूर्तता करण्यास तयार होऊ शकला नाही.

या सजद्यात जर शिर्क चा किंचितहि लवलेश असता तर इब्लीस ला हुज्जत करण्याची संधी मिळाली असती की मी आदम ची उपासना कशा प्रकारे करावी परंतु इब्लीस ने असे काहीही म्हटले नाही तथापि सजदा न करण्याचे कारण हे सांगितले की आदमला मातीपासून तयार केले गेले आहे व मला अगीपासून, म्हणजे हज़रत आदम च्या तुलनेत आपले श्रेष्ठत्व जाहीर केले अर्थात त्याचे हे म्हणणे या गोष्टीचे प्रमाण होय की हजरत आदम यांना केले गेलेला सजदा आदरार्थी होता. इबादत (उपासना) म्हणून नव्हे.

स्पष्ट असो की हा एक विशेष आदेश होता जो फिरिश्त्यांना व इब्लीसला दिला गेला अन्यथा इस्लामने आपल्या शरीअत पूर्ततेत अल्लाह खेरीज इतरांना सजदा करणे हराम ठरविले आहे मग तो सजदा 'मान वंदना' म्हणून का असेना. या द्वारे या वस्तुस्थिती वरही प्रकाश पडतो की सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत आदम यांना फरिश्त्यांचा सजदा लाभलेला बनवून माणसाला मोठा दर्जा प्रदान केला आहे. असे असताना माणसाने दगड वीटा व इतर प्राणीमात्रां समोर झुकणे हे त्याच्या स्थानाला शोभत नाही.

४८.इबलीस हे सैतानाचे नांव आहे. तो 'जिन्न' पैकी होता. ईश्वराने फिरिश्त्याबरोबर इबलीसलाही आदमसमोर झुकण्याची आज्ञा केली होती. परंतु त्याने आज्ञा पालन केले नाही.

४९. सर्व करून ईश्वराच्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यास नकार देणे म्हणजे कुफ्र (नास्तिकता) आहे हे यावरून स्पष्ट होते. सैतानाकडून हाच अपराध घडला होता सैतान परमेश्वराचे अस्तित्व नाकारीत नव्हता.

५०. ही जन्नत तात्पुरती होती. आदम व हव्वा (आदमची पत्नी) यांची परिक्षा घेण्यासाठी त्यांना त्यामध्ये ठेवण्यात आले होते. व त्यांना या गोष्टीची जाणीवही करून द्यावयाची होती की त्यांच्या दर्ज्यानुरूप त्यांचे स्थान जन्नतच आहे. परंतु जर ते सैतानाच्या बहकविण्यात सांपडतील तर ते स्थान गमावून बसतील.

५१. हे झाड कशाचे होते. त्याचे वैशिष्ट काय होते याचा खुलासा क़ुरआनात नाही. तसेच पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) प्रमाणभूत वचनामध्येहि (हदीस) याचे स्पष्टीकरण नाही. आणि म्हणून याच्या तपशिलाबद्दल चर्चा करणे निरर्थक आहे. या झाडाजवळ जाण्यास प्रतिबंध करण्यामध्ये आदम व हव्वा यांची परिक्षा घेण्याचा हेतु होता. सैतानाच्या प्रलोभानामुळे ते ईश्वराची आज्ञा कितपत पाळतात हे पहावयाचे होते. या परिक्षेसाठी कोणत्याही वृक्षाची निवड पुरेशी होती.

५२. क़ुरआनने स्पष्टीकरण केले आहे की, ही चूक आदम व हव्वा दोघांचेकडून झाली होती. आणि ती सैतानाच्या बहकाव्यामुळे झाली होती. म्हणून आदमला हव्वाने बहकाविले असे समजणे योग्य नाही.

५३. म्हणजे माणसाचा शत्रू सैतान व सैतानाचा शत्रू माणूस.

५४. आदमला आपल्या चुकीची जाणीव झाली. तेव्हां त्यांना पश्चाताप व्यक्त करण्यासाठी व क्षमा-याचनेसाठी काय करावे, काय बोलावे हे समजले नाही. परमेश्वराने त्यांच्यावर दया केली व पश्चाताप व्यक्त करावयाला व क्षमायाचना करावयाच्या उचित बोलाचे ज्ञान त्यांना करून दिले. सैतान आपल्या अवज्ञेवर दृढ राहीला. उलट आदमला आपल्या अवज्ञेबद्दल पश्चाताप झाला. जेव्हां दास एखादा गुन्हा करतो आणि मग लज्जित होऊन तो परमेश्वराची क्षमायाचना करून त्याच्याकडे परततो. तेव्हा परमेश्वर त्याच्या अपराधाकडे दुर्लक्ष करून त्याची क्षमायाचना मान्य करतो.

५५. जमीनीवर उतरविणे हे शिक्षेदाखल नव्हते. कारण हजरत आदम (अलाहिस्सलाम) यांची क्षमा याचना परमेश्वराने मान्य केली होती. यावरून माणूस जन्मजात गुन्हेगार आहे या विचारसरणीचे खंडन होते. हजरत आदम यांना ज्याअर्थी जमीनीच्या खिलाफती साठी निर्माण केले गेले होते म्हणून त्यांना जमीनीवर उतरविले गेले.

५६. आदमच्या चुकीने मानवी स्वभावातील कमकुवतपणा स्पष्ट झाली. यावरून माणूस ईश्वराच्या शिकवणीचा गरजू आहे हे सिद्ध होते.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या या शिकवण मार्गदर्शनासाठी, पैगंबर नियुक्ति योजनेला (प्रेषितत्व) साधन बनविले. तो एका, एका व्यक्तीला प्रत्यक्षपणे मार्गदर्शन करीत नाही. परंतु नबी व रसूल (प्रेषित-पैगंबर) यांची निवड करून त्यांच्यावर आपला आदेश (वही) उतरवितो. आणि हे नबी व रसूल सामान्य

माणसा पर्यंत त्यांचा संदेश पोहचवितात.

माणसाला या जमीनीवर (जगात) पाठवून ईश्वर त्याची परिक्षा घेऊ इच्छितो. ईश्वराची शिकवण अंगिकारून जमीनीवर त्याला दिलेल्या अधिकारांना कोण त्याच्या मर्जीनुसार वापरतो आणि त्याची शिकवण अमान्य करून मनमानेल त्याप्रमाणे वागून कोण स्वत:ला खोट्या ईश्वरपदावर बसवितो याची परिक्षा.

५७. म्हणजे ते होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल दु:खी असणार नाहीत. तसेच पुढे घडणाऱ्या गोष्टीबद्दल ही त्यांना कसलाही धोका उदभवणार नाही. याने अभिप्रेत 'जन्नत' आहे. तेथे कसल्याही प्रकारचे दु:ख व धोका असणार नाही.

५८. 'आयात' हा शब्द वापरण्यात आलेला आहे. हे 'आयत' चे अनेकवचन आहे. याचा अर्थ चिन्हे. खूणा, प्रतीके असा आहे. याने अभिप्रेत अल्लाहचे एकमेवत्व व पालनपोषण कर्तृत्वाच्या त्या खूणा आहेत ज्या क्षितिजावर, जमीनिवर व जीवनामध्ये अस्तित्वात आहेत. तसेच हा शब्द पैगंबरांना दिल्या गेलेल्या चमत्कार शक्ति बद्दलही वापरण्यात आलेला आहे. याशिवाय पवित्र कुरआनच्या आयती (महावाक्ये) बद्दलही हा शब्द वापरण्यात येतो पुरावा व युक्तिवादाचा दर्जा ठेवितात.

**सहनशीलता आणि नमाज़चे सहाय्य घ्या. निःसंशय हे कठीण आहे. परंतु जे लोक नम्रता धारण करतात, त्यांना हे कठीण नाही. (आणि) जे जाणतात की त्यांना आपल्या पालनकर्त्याला भेटावयाचे आहे व त्याच्याच कडे परत जावयाचे आहे.** *(अल-क़ुरआन)*

**४०.** बनी इसराईलानो ![५९] स्मरण करा माझ्या त्या कृपेची [६०] जी मी तुमच्यावर केली आणि तुम्ही माझ्याबरोबर केलेली प्रतिज्ञा [६१] पुरी करा. मी तुमच्याबरोबर केलेली प्रतिज्ञा पुरी करीन. आणि माझेच भय बाळगा. [६२]

يٰبَنِىْٓ اِسْرَآءِيْلَ اذْكُرُوْا نِعْمَتِيَ الَّتِيْٓ اَنْعَمْتُ عَلَيْكُمْ وَاَوْفُوْا
بِعَهْدِيْٓ اُوْفِ بِعَهْدِكُمْ ۚ وَاِيَّايَ فَارْهَبُوْنِ ﴿٤٠﴾

**४१.** आणि जो ग्रंथ मी उतरविला आहे त्यावर ईमान आणा. तुमच्याजवळ असलेल्या ग्रंथाचे हा ग्रंथ समर्थन [६३] करतो. म्हणून तुम्ही सर्व प्रथम इन्कार करणारे बनू नका. आणि माझ्या आयतीना क्षुल्लक किमतीस [६४] विकू नका. आणि माझ्या कोपापासून स्वत:चा बचाव करा.

وَاٰمِنُوْا بِمَآ اَنْزَلْتُ مُصَدِّقًا لِّمَا مَعَكُمْ وَلَا تَكُوْنُوْٓا اَوَّلَ
كَافِرٍۢ بِهٖ ۖ وَلَا تَشْتَرُوْا بِاٰيٰتِيْ ثَمَنًا قَلِيْلًا ۖ وَّاِيَّايَ فَاتَّقُوْنِ ﴿٤١﴾

**४२.** सत्याबरोबर असत्याची भेसळ करु नका. आणि जाणून बुजून सत्य लपवूं नका.

وَلَا تَلْبِسُوا الْحَقَّ بِالْبَاطِلِ وَتَكْتُمُوا الْحَقَّ وَاَنْتُمْ تَعْلَمُوْنَ ﴿٤٢﴾

**४३.** नमाज़ [६५] क़ायम करा. ज़कात द्या. आणि रुकूअ करणाऱ्या बरोबर रुकूअ करा.[६६]

وَاَقِيْمُوا الصَّلٰوةَ وَاٰتُوا الزَّكٰوةَ وَارْكَعُوْا مَعَ الرّٰكِعِيْنَ ﴿٤٣﴾

**४४.** काय तुम्ही लोकांना तर सदाचाराची (नेकी) आज्ञा देता आणि स्वत:ला विसरुन जाता? तुम्ही तर ईश्वरी ग्रंथाचे पठण करता ! मग काय तुम्हाला एवढे देखील समजत नाही ?

اَتَاْمُرُوْنَ النَّاسَ بِالْبِرِّ وَتَنْسَوْنَ اَنْفُسَكُمْ وَاَنْتُمْ تَتْلُوْنَ
الْكِتٰبَ ۗ اَفَلَا تَعْقِلُوْنَ ﴿٤٤﴾

**४५.** सहनशीलता आणि नमाज़चे सहाय्य घ्या. नि:संशय हे कठीण आहे. परंतु जे लोक नम्रता [६७] धारण करतात, त्यांना हे कठीण नाहीं.

وَاسْتَعِيْنُوْا بِالصَّبْرِ وَالصَّلٰوةِ ۗ وَاِنَّهَا لَكَبِيْرَةٌ اِلَّا عَلَى الْخٰشِعِيْنَ ﴿٤٥﴾

**४६.** (आणि) जे जाणतात की त्यांना आपल्या पालनकर्त्याला भेटावयाचे आहे व त्याच्याच कडे परत जावयाचे आहे.

الَّذِيْنَ يَظُنُّوْنَ اَنَّهُمْ مُّلٰقُوْا رَبِّهِمْ وَاَنَّهُمْ اِلَيْهِ رٰجِعُوْنَ ﴿٤٦﴾

**४७.** बनी इसराईलानो ! स्मरण करा [६८] माझ्या त्या कृपेचे (नेअमत) जिन मी तुम्हांला संपन्न केले होते. आणि त्या गोष्टीचे की मी तुम्हाला जगातील समाजांवर श्रेष्ठता [६९] प्रदान केली होती.

يٰبَنِىْٓ اِسْرَآءِيْلَ اذْكُرُوْا نِعْمَتِيَ الَّتِيْٓ اَنْعَمْتُ عَلَيْكُمْ وَاَنِّيْ
فَضَّلْتُكُمْ عَلَى الْعٰلَمِيْنَ ﴿٤٧﴾

५९. 'इसराईल' ही हज़रत याक़ूब (अलैहिस्सलाम) यांची पदवी आहे. ते पैगंबर होते. व हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचे नातू होते. त्यांच्या वंशाला 'बनी इसराईल' म्हणतात. हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) हे एक श्रेष्ठ लोक नेते व अत्यंत प्रतिष्ठित पैगंबर आहेत. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या परिवारामध्ये पैगंबर नियुक्तिचा क्रम चालविला. हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांना दोन पुत्र होते. हजरत ईस्माईल व हजरत इसहाक. हज़रत इस्माईल यांच्या वंशाला 'बनी इस्माईल' म्हणतात. मक्केचे अरब लोक 'बनी इस्माईल' च्या शाखेचेच होते. आणि याच शाखेच्या कुरेश घराण्यात हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे जन्मास आले.

दुसरी शाखा हज़रत इसहाक यांचे पुत्र हज़रत याकूब (ईसराईल) यांच्या पासून चालली. आणि यांना 'बनी इसराईल' असे म्हणतात. यांची मूळ जन्मभूमि पॅलेस्टाईन होती. 'बनी इसराईल' मध्ये हजरत मूसा, हजरत दाऊद, हजरत सुलेमान आणि हजरत ईसा सारखे अत्यंत प्रतिष्ठित पैगंबर जन्मास आले.

बनी इसराईलांना हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा वारसा म्हणून जी जीवन पद्धती (दीन) मिळाली होती ती इस्लामच होती हजरत मूसा (अलैहिस्सलाम) ज्यांच्यावर 'जुना करार' (तौरात) उतरविण्यात आलेला होता. त्यांनीही इस्लामचाच प्रचार व प्रसार केला होता. परंतु त्यानंतर बनी इसराईलच्या लोकांनी त्यामध्ये फेरफार करून त्याला यहुदी धर्माचे स्वरूप दिले. म्हणून नंतर या लोकांना यहुदी म्हणून संबोधिले जाते. परंतु त्यांचा मूळ धर्म इस्लामच होता येथे पवित्र क़ुरआन त्यांना खऱ्या वस्तु:स्थितीची आठवण करून देत आहे आणि त्यांच्या गुन्ह्यांची यादी निवेदन करीत आहे. कारण हे की त्यांनी सावध होऊन मूळ धर्माकडे म्हणजे इस्लामकडे परत फिरावे आणि क़ुरआणच्या आवाहनाचा जे इस्लामचे वास्तव आवाहन आहे स्वीकार करावा.

६०. 'निअमत' (ईशकृपा) ने अभिप्रेत ते बक्षिस आहे जे अल्लाहकडून बनी इसराईलांना पैगंबरांचे नेतृत्व व ठेवांच्या (इस्लामची शिकवण) स्वरूपात दिले गेले होते. हेतु हा होता की त्यांनी लोकांसमोर इस्लामचे ध्वजवाहक बनून राहावे.

६१. अल्लाह बरोबर केलेली प्रतिज्ञा म्हणजे शरीअत.(इस्लामी धर्मशास्त्र); जी वसतुत: अल्लाह व त्याच्या दासामधील एक करार आहे. परंतु येथे विशेषकरून त्या प्रतिज्ञेकडे इशारा आहे जी हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्या कारकीर्दीतच हज़रत मुहम्मद (सल्लल्लहु अलैहि वसल्लम) यांच्यासंबंधी बनी इसराईल कडून घेण्यात आलेली होती. या प्रतिज्ञेचा उल्लेख ''तौरात'' जुना करार) मध्ये पूढील प्रमाणे आहे.

''मी त्यांच्यासाठी त्यांच्या भाऊबंदातून तुझ्या (मूसा) सारखा एक संदेष्टा उभा करीन. त्याच्या मुखांत मी आपली वचने घालेन आणि त्यांना ज्या आज्ञा मी देईन त्या सगळ्या तो त्यांना निवेदन करील. तो माझ्या नावाने बोलेल ती वचने जो कोणी ऐकावयाचा नाही त्याला मी जाब विचारीन.''

(पवित्र शास्त्र अनुवाद इस्तिस्ना १८: १८: १९) या प्रतिज्ञेची आठवण करून देऊन क़ुरआन त्यांचेकडून हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ईमान आणण्याची मागणी करीत आहे.

६२. या गोष्टीकडे इशारा आहे की, हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पैगंबर म्हणून मान्यता देताना व त्यांच्यावर ईमान आणताना कोणाच्याही भयाची आडकाठी असू नये. सर्व हितांचा विचार व शंकासंशय बाजूस ठेवून अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची व त्याच्या प्रतापाची कल्पना प्रभावशाली असली पाहिजे.

६३. तौरात व इंजील (जूना करार व नवा करार) हे अल्लाहकडून उतरविण्यात आलेले ग्रंथ आहेत. याला पवित्र क़ुरआन दुजोरा देतो. पवित्र क़ुरआन मूळ तौरात व इंजील यांना खोटे ठरवित नाही. तर मागाहून लोकांनी मूळ ग्रंथामध्ये जे फेरफार केले त्या फेरफारांना तो खोटे ठरवितो.

येथे खास इशारा या गोष्टीकडे आहे की तौरातमध्ये हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पैगंबर म्हणून पाठविण्याबद्दल जी भाकिते नमूद आहेत त्यांना पवित्र क़ुरआन खऱ्या सिद्ध करीत आहेत कारण की, त्या भविष्यवाणीनूसार, क़ुरआन व त्याचे पैगंबराचा उदय या घटना सत्य असल्याचा त्या स्पष्ट पुरावा आहेत. आणि म्हणून सर्वांचे अगोदर तुम्हावर त्यांचे वर इमान आणावयास हवे.

६४. सांसरीक फायदे व हीतासाठी अल्लाहच्या आज्ञांचा बळी देऊ नका. सांसारीक फायदा कितीही मोठा असला तरी अखिरत च्या तुलनेने तो अत्यंत क्षुल्लक आहे. आणि म्हणून जो माणूस सांसारीक फायद्याला अल्लाहच्या आज्ञेवर प्राधान्य देतो, तो एका अतिश्रेष्ठ गोष्टीच्या मोबदल्यात अत्यंत क्षुल्लक गोष्टीचा स्वीकार करतो.

६५. नमाज़ आणि ज़कात ही इस्लामची अत्यंत महत्वाची तत्वे आहेत. यांचा बनी इसराईलच्या धर्मशास्त्रातही समावेश होता. परंतु प्रत्यक्षात त्यांनी या दोन्ही तत्वांना सोडून दिले होते.

६६. रूकुअचा अर्थ झुकणे असा आहे. नमाज़ मध्ये रूकुअ म्हणजे गुडघ्यावर हात ठेवून झुकण्याची विशिष्ट पद्धत. रूकुअ करणाऱ्या बरोबर रूकुअ करा याचा इशारा जमाअतीबरोबर नमाज़ (सांघिक नमाज़) पढा. याकडे आहे. मसजिदीमध्ये

जमातीबरोबर नमाज़ अदा करताना, श्रीमंत व गरीब आणि खास व सामान्य, सर्व लोक एकत्र येऊन खांद्यास खंदा लावून सरळ रांगेत उभे राहतात. याने आज्ञाधारकपणाला एक विशेष वैभव प्राप्त होते. मसजिदीचे सौंदर्य वाढते. याशिवाय मानवी समानता व बंधुभावाची भावना निर्माण होते. यहुदी लोकांनी व विशेषत: त्यांच्यातील श्रीमंत वर्गाने मसजिदीमध्ये जाणे आपल्या प्रतिष्ठेविरुद्ध समजुन जमाआतीबरोबर नमाज़ अदा करण्याचे सोडून दिले होते. म्हणून येथे त्यांना उद्देशून खास करून ही आज्ञा देण्यात आली की रूकु करणाऱ्यां बरोबर रूकुअ करा.

६७. म्हणजे अल्लाहसमोर उभे राहण्याचे भय ज्यांच्या मनात नाही त्याला नमाज़चे पालन करणे कठीण होते परंतु ज्या लोकांचा अल्लाहसमोर हजर होण्याच्या कल्पनेने थरकाप होतो त्यांच्यासाठी नमाजपेक्षा अधिक आवडती दुसरी कोणतीही गोष्ट नाही.

आयती द्वारे सयंम (सहन-शक्ती) आणि नमाज़ च्या माध्यमाने ईश-मदत प्राप्त करण्याची ताकीद केली गेली आहे ही मदत अल्लाहला ने दिलेल्या आज्ञापालनाचे वचन पूर्ण करण्यासाठी प्राप्त करावयाची आहे. अर्थात अल्लाहशी आज्ञापालनाचा जो वायदा तुम्ही केला आहे तो पूर्ण करण्यासाठी व आज्ञाधारकतेचे जीवन व्यतीत करण्यासाठी ज्या सुप्त शक्तिची गरज आहे ती संयम आणि नमाज़ द्वारे प्राप्त होऊ शकते. 'सब्र' चा अर्थ स्वत:ला वाईट इच्छा-अभिलाषां पासून रोखणे. जोपर्यंत मनुष्य आपल्या इच्छा अभिलाषांवर नियंत्रण ठेवत नाही तो पर्यंत आज्ञापालन व दास्यत्व जीवन व्यतीत करु शकत नाही. कारण अल्लाहच्या आज्ञापालनाच्या मार्गात पावलोपावली इच्छा आकांक्षा अडसर बनतात. दुसरी गोष्ट जिचा इतमाम राखणे आवश्यक आहे. ती म्हणजे नमाज़ होय. कारण नमाज़ ईश्वराशी दासाचे नाते दृढ करते. जीवांचे उत्कृष्ट संगोपन करते आणि आत्म्याचा विकास करते. अशा प्रकारे नमाज़ द्वारे जे सामर्थ्य लाभते, ते आज्ञापालन व जीवन मार्गात मदतनीस ठरते.

६८. या ठिकाणी बनी इसराईलांच्या इतिहासतील प्रसिद्ध घटनांकडे इशारा करण्यात आलेला आहे. यांची त्यांना चांगल्या प्रकारे माहिती होती. यावरून हे स्पष्ट करण्याचा उद्देश आहे की, ऐकीकडे सर्वश्रेष्ठ अल्लाहन या समाजावर केलेले ते थोर उपकार आहेत आणि दुसरीकडे या समाजाची ती दुष्कृत्ये आहेत ज्यांच्या परिणामस्वरूप ते ईश्वरी कोपास पात्र ठरले.

६९. सर्वश्रेष्ठ अल्लाहने बनी इसराईलना ग्रंथ व शिकवण यांनी भूषवून जगातील सर्व समाजांचे मार्गदर्शन करण्याचा अधिकार दिला होता. हेतू हा की त्यांनी जगाच्या लोकांसमोर सत्यधर्माचे आवाहन करावे.

**हे सर्व घडले असतादेखील आम्ही तुम्हाला क्षमा केली कारण की तुम्ही कृतज्ञ राहावे. स्मरण करा त्यावेळेचे जेव्हा आम्ही मूसाला ग्रंथ व विवेक (फुरकान) प्रदान केला. कारण की तुम्ही शिकवण अंगिकारावी.** *(अल-कुरआन)*

४८. आणि त्या दिवसाचे भय बाळगा जेव्हा कोणीही कोणाच्याही किंचितही उपयोगी पडणार नाही. न कोणाबद्दल कोणाचीही शिफारस मान्य केली जाईल. न कोणाकडून मोबदला घेतला जाईल आणि न त्यांची मदत केली जाईल.

وَاتَّقُوْا يَوْمًا لَّا تَجْزِيْ نَفْسٌ عَنْ نَّفْسٍ شَيْـًٔا وَّلَا يُقْبَلُ
مِنْهَا شَفَاعَةٌ وَّلَا يُؤْخَذُ مِنْهَا عَدْلٌ وَّلَا هُمْ يُنْصَرُوْنَ ﴿٤٨﴾

४९. स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा आम्ही फिरऔनच्या लोकांपासून तुमची मुक्तता केली. त्यांनी तुम्हाला मोठ्या संकटात पाडलेले होते. तुमच्या पूत्रांना ते ठार करीत असत व तुमच्या स्त्रीयांना ते जीवंत राहू देत असत. ही तुमच्या पालनकर्त्याकडून तुमची मोठी परिक्षा होती.

وَاِذْ نَجَّيْنٰكُمْ مِّنْ اٰلِ فِرْعَوْنَ يَسُوْمُوْنَكُمْ سُوْٓءَ الْعَذَابِ
يُذَبِّحُوْنَ اَبْنَآءَكُمْ وَيَسْتَحْيُوْنَ نِسَآءَكُمْ وَفِيْ ذٰلِكُمْ بَلَآءٌ مِّنْ
رَّبِّكُمْ عَظِيْمٌ ﴿٤٩﴾

५०. स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा समुद्राला चिरुन (विभागून) त्यामधून आम्ही तुम्हाला जावूं दिले व फिरऔनच्या लोकांना बुडविले. आणि तुम्ही पहातच राहीला.

وَاِذْ فَرَقْنَا بِكُمُ الْبَحْرَ فَاَنْجَيْنٰكُمْ وَاَغْرَقْنَآ اٰلَ فِرْعَوْنَ
وَاَنْتُمْ تَنْظُرُوْنَ ﴿٥٠﴾

५१. स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा आम्ही मूसा बरोबर चाळीस रात्रींचा करार [७०] केला तेव्हा तुम्ही मूसाच्या गैरहजरीत वासराला [७१] देवता बनविले व फार मोठा गुन्हा करून बसलात.

وَاِذْ وٰعَدْنَا مُوْسٰٓى اَرْبَعِيْنَ لَيْلَةً ثُمَّ اتَّخَذْتُمُ الْعِجْلَ
مِنْ بَعْدِهٖ وَاَنْتُمْ ظٰلِمُوْنَ ﴿٥١﴾

५२. हे सर्व घडले असतादेखील आम्ही तुम्हाला क्षमा केली कारण की तुम्ही कृतज्ञ राहावे.

ثُمَّ عَفَوْنَا عَنْكُمْ مِّنْ بَعْدِ ذٰلِكَ لَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿٥٢﴾

५३. स्मरण करा त्यावेळेचे जेव्हा आम्ही मूसाला ग्रंथ व विवेक [७२] (फुरकान) प्रदान केला. कारण की तुम्ही शिकवण अंगिकारावी.

وَاِذْ اٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ وَالْفُرْقَانَ لَعَلَّكُمْ تَهْتَدُوْنَ ﴿٥٣﴾

५४. स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा मूसाने आपल्या समाजाला सांगितले की,माझ्या समाजातील लोकांनो ! तुम्ही वासराला देवता बनवून स्वत:वर अत्याचार केलेला आहे.म्हणून आपल्या निर्मात्यासमोर पश्चाताप व्यक्त करा.आणि तुमच्यामधील अपराधी लोकांना ठार करा.[७३]हे तुमच्या निर्मात्याजवळ तुमच्या हिताच्या दृष्टीनें अधिक योग्य [७४] आहे. नंतर त्यानें तुमचा पश्चाताप (तौबा)मान्य केला.नि:संशय तोच पश्श्चाताप मान्य करणारा व दया करणारा आहे.

وَاِذْ قَالَ مُوْسٰى لِقَوْمِهٖ يٰقَوْمِ اِنَّكُمْ ظَلَمْتُمْ اَنْفُسَكُمْ
بِاتِّخَاذِكُمُ الْعِجْلَ فَتُوْبُوْٓا اِلٰى بَارِئِكُمْ فَاقْتُلُوْٓا اَنْفُسَكُمْ
ذٰلِكُمْ خَيْرٌ لَّكُمْ عِنْدَ بَارِئِكُمْ فَتَابَ عَلَيْكُمْ اِنَّهٗ
هُوَ التَّوَّابُ الرَّحِيْمُ ﴿٥٤﴾

७०. सीना वाळवंटात सर्वश्रेष्ठ परमेश्वराने, हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांना तूर पर्वतावर चाळीस रात्र दिवसासाठी, त्यांना धर्मशास्त्राच्या आज्ञा सांगण्यासाठी बोलावून घेतले होते.

७१. ईजिप्तमध्ये गाईच्या पूजेची प्रथा होती. आणि म्हणून हा रोग बनी इसराईलमध्येही पसरला होता. वासराच्या पूजेचा वृतांत तौरातमध्ये नमूद आहे.

''त्याने तो त्यांच्या हातून घेऊन त्यांचे एक वासरु ओतून त्यास कोरणीनें कोरले. तेव्हा ते म्हणू लागले की, हे इस्राइला, ज्या देवांनी तुला मिसर देशातून आणिले आहे तेच हे तुझे देव.''

(जुना करार 'निर्गम' ३२:४)

७२. फुरकान हा तौरातचा गुण आहे. म्हणजे या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे होते की तो सत्य व असत्य यामधील फरक स्पष्ट करीत असे. आणि त्याआधारे ईमान आणलेले लोक व्यवहारांत व गुंतागुंतीच्या प्रश्नांत चांगले काय व वाईट काय हे ठरवित असत.

७३. वासराच्या पूजेबद्दल त्यांना मिळालेली ही शिक्षा होती. जे लोक, इतरांना ईश्वराबरोबर सहभागी बनविण्यामध्ये (शिर्क) सामील नव्हते त्यांना आज्ञा देण्यात आली की ज्या लोकांनी वासराची पूजा करून धर्मत्याग केला त्यांना आपल्या हातांनी ठार करा. तौरात मध्ये नमूद आहे की,

''मूसाच्या सांगण्याप्रमाणे लेवी वंशाच्या लोकांनी केले आणि त्यादिवशी जवळजवळ तीन हज़ार लोक (मृत्युमुखी) पडले.'' (जुनाकरार- निर्गम ३२: २८)

यावरून स्पष्ट होते की इस्लाममध्ये शिर्क हा मोठा भयंकर गुन्हा आहे. म्हणून इस्लाममध्ये याची शिक्षाही फार कडक आहे.

७४. म्हणजे ही अद्दल घडविणारी शिक्षा समाजाला ऐकेश्वरवादावर (तौहीद) कायम ठेवण्यासाठी आवश्यक आहे. नाही पेक्षा शिर्कबद्दल कोमल धोरण अंगिकारील्यास सारा समाज निष्ठा व आचरण यांच्या बिघाडात सापडेल.

५५. स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा तुम्ही म्हणाला की, मूसा ! जोपर्यंत आम्ही अल्लाहला उघडउघड पाहू शकणार नाही तोपर्यंत आम्ही तुमचे म्हणणे मान्य करणार नाहीं. तेव्हा वीजेच्या कडकडाटाने तुम्हांला घेरुन घेतले आणि तुम्ही पांहातच राहिला.[७५]

وَإِذْ قُلْتُمْ يٰمُوسٰى لَنْ نُّؤْمِنَ لَكَ حَتّٰى نَرَى اللّٰهَ جَهْرَةً فَأَخَذَتْكُمُ الصّٰعِقَةُ وَأَنْتُمْ تَنْظُرُوْنَ ﴿٥٥﴾

५६. मग आम्ही तुम्हांला (मृत्यूनंतर ) पुन्हा जीवंत केले कारण की तुम्ही कृतज्ञ व्हावे.

ثُمَّ بَعَثْنٰكُمْ مِّنْۢ بَعْدِ مَوْتِكُمْ لَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿٥٦﴾

५७. आम्हीं तुमच्यावर ढगांची छाया पसरविली आणि तुमच्यावर ''मन व सलवा''[७६] उतरविली. खा त्या शुद्ध वस्तू ज्या आम्ही तुम्हाला दिलेल्या आहेत. परंतु त्यांनी जे काही केले तो आमच्यावर अत्याचार नव्हता तर ते स्वत: वरच अत्याचार करीत राहीले.

وَظَلَّلْنَا عَلَيْكُمُ الْغَمَامَ وَأَنْزَلْنَا عَلَيْكُمُ الْمَنَّ وَالسَّلْوٰى ۭ كُلُوْا مِنْ طَيِّبٰتِ مَا رَزَقْنٰكُمْ ۭ وَمَا ظَلَمُوْنَا وَلٰكِنْ كَانُوْٓا أَنْفُسَهُمْ يَظْلِمُوْنَ ﴿٥٧﴾

५८. आणि स्मरण करा त्यावेळेचे जेव्हा आम्ही सागिंतले होते की, या वस्तीमध्ये [७७] प्रवेश करा आणि इच्छा होईल तेथून मनमुरादपणे खा आणि दरवाज्यांतून [७८] नतमस्तक होऊन प्रवेश करा आणि 'हित्ततून'[७९] (माझ्या पालनकर्त्या ! मला माझ्या अपराधांची क्षमा कर) म्हणा. आम्ही तुम्हांला तुमच्या अपराधांची क्षमा करुं आणि चांगल्याप्रकारे आमच्या आज्ञेचे पालन करणाऱ्यांना अधिक कृपेने संपन्न करु.

وَإِذْ قُلْنَا ادْخُلُوْا هٰذِهِ الْقَرْيَةَ فَكُلُوْا مِنْهَا حَيْثُ شِئْتُمْ رَغَدًا وَّادْخُلُوا الْبَابَ سُجَّدًا وَّقُوْلُوْا حِطَّةٌ نَّغْفِرْ لَكُمْ خَطٰيٰكُمْ ۭ وَسَنَزِيْدُ الْمُحْسِنِيْنَ ﴿٥٨﴾

५९. परंतु जी गोष्ट सांगितली होती तिला अत्याचारी लोकांनी दुसऱ्या गोष्टीनें बदलले. शेवटी आम्हीं अत्याचार करणाऱ्यांवर त्यांच्या आज्ञाभंगाबद्दल आकाशातून आपत्ति उतरविली.

فَبَدَّلَ الَّذِيْنَ ظَلَمُوْا قَوْلًا غَيْرَ الَّذِيْ قِيْلَ لَهُمْ فَأَنْزَلْنَا عَلَى الَّذِيْنَ ظَلَمُوْا رِجْزًا مِّنَ السَّمَآءِ بِمَا كَانُوْا يَفْسُقُوْنَ ﴿٥٩﴾

६०. स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा मूसाने आपल्या समाजासाठी पाणी मिळावे म्हणून प्रार्थना [८०] केली. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले ''तुझी लाठी खडकावर मार''यामुळे बारा [८१]झरे वाहू लागले. आणि प्रत्येक परिवाराने आपापल्या झऱ्याची माहिती करून घेतली.अल्लाहने दिलेल्या आहारामधून खा व प्या.आणि जमीनीवर अत्याचार माजवित फिरु नका.

وَإِذِ اسْتَسْقٰى مُوْسٰى لِقَوْمِهٖ فَقُلْنَا اضْرِبْ بِّعَصَاكَ الْحَجَرَ فَانْفَجَرَتْ مِنْهُ اثْنَتَا عَشْرَةَ عَيْنًا ۭ قَدْ عَلِمَ كُلُّ أُنَاسٍ مَّشْرَبَهُمْ ۭ كُلُوْا وَاشْرَبُوْا مِنْ رِّزْقِ اللّٰهِ وَلَا تَعْثَوْا فِي الْأَرْضِ مُفْسِدِيْنَ ﴿٦٠﴾

७५. परमेश्वर हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांचेबरोबर संभाषण करतो व त्यांना आपले आदेश देतो या गोष्टीबद्दल त्यांना विश्वास वाटत नव्हता. ते म्हणत असत की जोपर्यंत आम्ही, अल्लाहला तुमच्याबरोबर संभाषण करीत असताना पाहणार नाही तोपर्यंत तुमचे काही ऐकणार नाही. ही नकारासाठी फक्त सबब होती. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या अस्तित्वाच्या स्पष्ट खूणा ज्या हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्याकडून प्रकट करविण्यात आलेल्या होत्या त्या त्यांनी पाहिलेल्या होत्या. आणि म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या या मागणीवर त्यांना ही शिक्षा दिली तौरातच्या निवेदनानुसार हे सत्तर लोक होते ज्यांना हजरत मूसा (अलैहिस्सलाम) तूर पर्वतावर आपल्या बरोबर घेऊन गेले होते.

७६. इजिप्तमधून निघाल्यानंतर बनी इसराईलांनी ' सीना' वाळवंटात मुक्काम केला होता. तेथे त्यांना उन्हापासून वाचविण्यासाठी परमेश्वराने ढगांची व उपासमारी पासून वाचविण्यासाठी 'मन व सलवा' ची व्यवस्था केली होती. 'मन' ही डिंकाच्या जातीची एक वस्तु होती जो दंवाप्रमाणे जमीनिवर टपकून जमत असे. ही धण्यासारखी गोठ दाण्याच्या स्वरुपात असे. बनी इसराईल हे दाणे जमा करीत असत. व त्यांचा उपयोग भाकरीसारखा केला जात असे. 'सलवा' लावा पक्षासारखे पक्षी होते. त्यांच्या झुंडीच्या झुंडी सायंकाळच्या वेळेस येत असत.आणि इसराईल लोक त्यांची सहजपणें शिकार करीत असते.तौरातमध्ये नमूद आहे –

''परमेश्वर मूसाला म्हणाला, इसराईल लोकांची कुरकुर मी ऐकली आहे. त्यांना सांगा की संध्याकाळी तुम्ही मांस खाल आणि सकाळी पोटभर भाकरी खाल, म्हणजे मी तुमचा ईश्वर परमेश्वर आहे हे तुम्ही जाणाल.

संध्याकाळी असे झाले की लावे येऊन सर्व छावणीभर पसरले आणि सकाळी छावणीच्या सभोवती दंव पडले.''

(जुना करार निर्गम १७- ११ ते १३)

या वस्तु एवढ्या विपुल प्रमाणात उपलब्ध होत की संपूर्ण जन समूह त्यावरच आपला निर्वाह करीत असे.

७७. वस्तीने बहुधा पॅलेस्टाईनमधील शहर 'यरीहा' अभिप्रेत असावे. हे शहर सर्वप्रथम इसराईल लोकांच्या ताब्यात आले.

७८. दरवाज्याने अभिप्रेत शहराचे मुख्यद्वार आहे. शहर जिंकल्यावर त्यामध्ये उन्मत्तपणे प्रवेश करुं नका. तर नम्रतेने ईश्वरासमोर नतमस्तक होऊन व आपल्या अपराधांची क्षमायाचना करीत प्रवेश करा.

संधिसाधू लोक जेव्हा एखादा देश पदाक्रांत करतात तेव्हा ते गर्विष्ठ बनतात. (गर्वाने त्यांचे डोके वर होते) आणि ते जमीनीवर अत्याचार व अतिरेक करीत असतात. याउलट इस्लामची शिकवण ही आहे की जेव्हा एखाद्या देशात जेते म्हणून प्रवेश कराल तेव्हा अत्याचारी गर्विष्ठांचा मार्ग कदापिही अनुसरू नका. तर ईश्वरासमोर विनम्र होऊन शालीतेने आपल्या अपराधांच्या कबुलीचा मार्ग अनुसरा अंत: करणाची ही धारणा तुम्हांला सर्व प्रकारच्या अत्याचारापासून दूर ठेवील.

७९. 'हित्ततून' असे म्हण्याचा अर्थ हा की ' ईश्वराजवळ आपल्या अपराधांची क्षमायाचना करीत प्रवेश करा.

८०. तौरात वरून माहित होते की, ही प्रार्थना. 'सीना' वाळवंटा मध्ये केली गेली होती. आणि खडकावर लाठी मारल्यावर पाण्याचे झरे निघाले होते.

(पहा. जुना करार- गणना २०. ११)

८१. बनी इसराईलचे बारा परिवार होते. आणि ईश्वरान झरे देखील बारा निर्माण केले. अशा प्रकारे प्रत्येक परिवाराने आपापला झरा निश्चित केला आणि पाण्याच्या; प्रश्नावर तंटा होण्याची शंका राहीली नाही वाळवंटामध्ये पाण्याची ही व्यवस्था म्हणजे सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा मोठा उपकार होता.

६१. आणि स्मरण करा जेव्हा तुम्ही म्हणाला होता ''हे मूसा ! आम्ही एकाच प्रकारच्या अन्नावर कदापिही धीर धरु शकणार नाही. आपल्या पालनकर्त्याजवळ तुम्ही प्रार्थना करा की तो आमच्यासाठी, पालेभाज्या काकडी, लसून, मसूर आणि कांदे वगैरे वस्तु ज्या जमीनीमध्ये उगतात त्या उतपन्न करो.''मूसा म्हणाले. ''काय तुम्ही उत्कृष्ट वसतुंच्या ऐवजी निकृष्ट [८२] वस्तु प्राप्त करु इच्छिता ? कोणत्याही शहरात जा म्हणजे तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्हांला वस्तु मिळतील.'' आणि त्यांचेवर अवहेलना व दुर्दशा लादण्यात आली. आणि ते अल्लाहच्या कोपास पात्र झाले. हे यासाठी झाले की ते लोक अल्लाहच्या वचनांचा (आयतींचा) इन्कार करु लागले होते आणि पैगंबरांची निष्कारण हत्या करीत होते. [८३] हा परिणाम होता त्यांच्या आज्ञाभांगाचा आणि त्यांच्या मर्यादोल्लंघनाचा. [८४]

وَإِذْ قُلْتُمْ يَٰمُوسَىٰ لَن نَّصْبِرَ عَلَىٰ طَعَامٍ وَٰحِدٍ فَٱدْعُ لَنَا
رَبَّكَ يُخْرِجْ لَنَا مِمَّا تُنۢبِتُ ٱلْأَرْضُ مِنۢ بَقْلِهَا وَقِثَّآئِهَا
وَفُومِهَا وَعَدَسِهَا وَبَصَلِهَا ۖ قَالَ أَتَسْتَبْدِلُونَ ٱلَّذِى
هُوَ أَدْنَىٰ بِٱلَّذِى هُوَ خَيْرٌ ۚ ٱهْبِطُوا۟ مِصْرًا فَإِنَّ لَكُم مَّا
سَأَلْتُمْ ۗ وَضُرِبَتْ عَلَيْهِمُ ٱلذِّلَّةُ وَٱلْمَسْكَنَةُ وَبَآءُو بِغَضَبٍ
مِّنَ ٱللَّهِ ۗ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ كَانُوا۟ يَكْفُرُونَ بِـَٔايَٰتِ ٱللَّهِ
وَيَقْتُلُونَ ٱلنَّبِيِّـۧنَ بِغَيْرِ ٱلْحَقِّ ۗ ذَٰلِكَ بِمَا عَصَوا۟
وَّكَانُوا۟ يَعْتَدُونَ ﴿٦١﴾

६२. निःसंशय ज्या लोकांनी ईमान आणले [८५] आणि जे लोक यहुदी झाले आणि ईसाई व साबी [८६] ज्या कोणी अल्लाह आणि शेवटच्या दिवसावर ईमान आणले आणि चांगले आचरण केले तर अशा लोकांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्याजवळ आहे . न त्यांच्यासाठी भय आहे न ते दुःखी होतील. [८७]

إِنَّ ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ وَٱلَّذِينَ هَادُوا۟ وَٱلنَّصَٰرَىٰ وَٱلصَّٰبِـِٔينَ
مَنْ ءَامَنَ بِٱللَّهِ وَٱلْيَوْمِ ٱلْءَاخِرِ وَعَمِلَ صَٰلِحًا فَلَهُمْ أَجْرُهُمْ
عِندَ رَبِّهِمْ وَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿٦٢﴾

६३. आणि स्मरण करा जेव्हा आम्ही तुमच्यापासून पक्के वचन [८८] घेतले होते. आणि तूर पर्वताला तुमच्यावर उचलून धरले होते. (आणि ताकीद केली होती की) जो ग्रंथ आम्ही तुम्हाला दिला आहे त्याला दृढपणे धरून रहा; जे आदेश त्यामध्ये आहेत त्याचे स्मरण ठेवा म्हणजे अल्लाहच्या कोपापासून सुरक्षित रहाल.

وَإِذْ أَخَذْنَا مِيثَٰقَكُمْ وَرَفَعْنَا فَوْقَكُمُ ٱلطُّورَ خُذُوا۟ مَآ
ءَاتَيْنَٰكُم بِقُوَّةٍ وَٱذْكُرُوا۟ مَا فِيهِ لَعَلَّكُمْ تَتَّقُونَ ﴿٦٣﴾

६४. या करारानंतर तुम्ही आपल्या वचनापासून फिरलात. आणि जर तुमच्यावर अल्लाहची कृपा व त्याची दया झाली नसती तर तुम्ही नष्ट झाला असता.

ثُمَّ تَوَلَّيْتُم مِّنۢ بَعْدِ ذَٰلِكَ ۖ فَلَوْلَا فَضْلُ ٱللَّهِ عَلَيْكُمْ
وَرَحْمَتُهُۥ لَكُنتُم مِّنَ ٱلْخَٰسِرِينَ ﴿٦٤﴾

८२. अर्थ असा कीं, ज्या उच्च ध्येयासाठी तुम्हाला वाळवंटात मुक्काम करावा लागत आहे त्याच्या तुलनेत तुम्हाला खाण्यापिण्याच्या या वस्तु काय इतक्या अधिक आवडतात की थोड्या दिवसासाठीहि तुम्ही त्यांच्याशिवाय राहू शकत नाही? आणि ''मन व सलवा'' सारखे अन्न तुम्हाला अशा स्थितीत मिळत आहे की, तुम्ही फिरओन च्या गुलामगिरीतून आणि 'शिर्क व कुफ्र' च्या अवहेलनेतून अगदी मुक्त आहांत मान व स्वातंत्र्यासह जे साधे सुधे अन्न मिळते ते अधिक चांगले की, गुलामगिरीची अवहेलना आणि कुफ्र व शिर्कशी निगडीत असलेले निरनिराळ्या प्रकारचे अन्न अधिक चांगले हे ठरविणे ही तुमच्या योग्यतेची गोष्ट आहे.

८३. जे पैगंबर यहुदी लोकांचेकडून मारले गेले त्यांच्यामध्ये हजरत ज़करीया (अलैहिस्सलाम) व हज़रत याह्या सारख्या प्रतिष्ठित व मान्यवर पैगंबरांचा समावेश होता. हज़रत याह्या (अलैहिस्सलाम) यांना यहुदींचा बादशाह हीरोदोसच्या आज्ञेवरुन ठार मारण्यात आले आणि त्यांचे शीर एका तबकात ठेवून बादशाहने ते आपल्या प्रेयसीला भेट म्हणून दिले! आणि हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांनाही सूळावर चढविण्याचा कट रचण्यात आला. परंतु सर्वश्रेष्ठ परमेश्वानें त्यांना त्यांच्या कचाट्यातून वाचविले.

८४. अर्थ असा की, ईश्वरी आज्ञेची पर्वा न करता मोठ्या धिटाईनें तिच्याविरुद्ध वर्तन केले.

८५. अभिप्रेत मुसलमान समाज आहे.

८६. 'साबी' ज्या लोकांना ईश्वराचा ग्रंथ लाभलेला होता त्यांपैकी एक समाज. हे लोक ''जबूर'' ला मानीत असत. आता हा समाज अस्तित्वात नाही.

८७. ज्या संदर्भात ही आयत आली आहे त्यावरून तिचा उद्देश अगदी स्पष्ट होतो. येथे यहुदी लोकांचा हा गैरसमज दूर करण्याचा हेतु आहे की, आपण पैगंबरांच्या परिवाराशी संबंधीत असल्याने कोणत्याहि जाबापासून मुक्त (नजात) आहोत. पवित्र क़ुरआन त्याचे पूर्णपणे खंडन करीत आहे. आणि हे स्पष्ट करीत आहे की, अल्लाहजवळ मुक्तता (नजात) एखाद्या परिवाराशी, गटाशी वा वर्गाशी संबंधीत असण्यावर अवलंबून नाही. तर ती सद्‌गुणावर अवलंबून आहे. जो माणूस ईमान व चांगले आचरण हे सद्‌गुण बाळगीत असेल त्याची अखिरतमध्ये मुक्तता (नजात) होईल. ज्या माणसाजवळ हे सद्‌गुण नसतील तो शेवटच्या मुक्ततेपासून वंचित राहील. मग तो मुसलमान समाजातील कां होईना.

येथे ईमान व चांगले आचरण यांची तपशिल देणे अभिप्रेत नाही. कारण ही तपशिल पवित्र क़ुरआनने इतरत्र स्पष्ट केला आहे. त्यावरून हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आल्यानंतर, आपण ईश्वराचे प्रेषित आहोत या वस्तु: स्थितीवर आणि जो ग्रंथ त्यांनी आणला त्यावर ईमान आणल्याशिवाय दुसरे कोणतेही ईमान अल्लाह जवळ विश्वसनीय नाही. याच प्रकारे हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शरीअतीचे अनुसरण सदाचरणाच्या अर्थात सामाविलेले आहे, आणि म्हणून या आयतीचा असा उलटा अर्थ करण्यास कसलीही जागा नाही की पवित्र क़ुरआनची मागणी फक्त ही आहे की, 'आपापल्या धर्मावर कायम राहून ईश्वर आणि शेवटच्या दिवसाला (आखिरत) माना व चांगले आचरण करा! या आयतीचा असा अर्थ काढणे म्हणजे पवित्र क़ुरआन मध्ये फेरफार करणे होय. कारण की, या सुरतीचा मुख्य विषय पवित्र क़ुरआन हा ईश्वरी ग्रंथ आहे आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे ईश्वराचे पैगंबर आहेत यांवर ईमान आणण्याचे आवाहन करणे हा आहे. याच्याशिवाय सारी धार्मिकता निरर्थक आहे. पवित्र कुरआनने इतर ठिकाणी ही गोष्ट अधिक स्पष्टपणे विशद केली आहे की, अल्लाहजवळ धर्म फक्त इस्लाम आहे.

اِنَّ الدِّينَ عِنْدَ اللهِ الْاِسْلَامُ۔ (آل عمران:١٩)

'' अल्लाहजवळ श्रेष्ठ जीवन व्यवस्था (दीन) फक्त इस्लाम आहे.'' (आले इमरान-१९)

وَمَنْ يَّبْتَغِ غَيْرَ الْاِسْلَامِ دِيْناً فَلَنْ يُّقْبَلَ مِنْهُ وَهُوَ
فِى الْاٰخِرَةِ مِنَ الْخَاسِرِيْنَ۔ (آل عمران:٨٥)

''जो माणूस इस्लाम खेरीज इतर कोणत्याही धर्माचा इच्छुक असेल तर त्याचा कधीही स्वीकार केला जाणार नाही. आणि आखिरत मध्ये तो तोटयात राहील.'' (आले इमरान-८५)

८८. तौरातचे पालन करण्याचे वचन बनि इसराईल कडून तूर पर्वताच्या पायथ्याशी घेण्यात आले होते. आणि त्यावेळी एका भयंकर भूकंपाने साऱ्या पर्वताला हादरवून ठेविले होते. जणूकाय तो पर्वत त्यांच्यावर कोसळू इच्छित आहे. हे अल्लाहच्या श्रेष्ठ सामर्थ्याचे निदर्शन होते हे यासाठी की बनी इसराईलना या गोष्टीची जाणीव असावी की ज्या शक्तीबरोबर ते करार करीत आहेत ती किती जबरदस्त सामर्थ्यवान आहे आणि या कराराचा भंग झाल्यास तिचा कोप भडकू शकतो.

६५. आणि त्या लोकांची गोष्ट तर तुम्हाला माहितच आहे जे ''सब्त'' [८९] च्या बाबतीत अतिरेकाचे अपराधी [९०] झाले होते. आम्ही त्याना म्हटले की 'तुम्ही तुच्छ वानर व्हा.'

وَلَقَدْ عَلِمْتُمُ الَّذِيْنَ اعْتَدَوْا مِنْكُمْ فِي السَّبْتِ فَقُلْنَا لَهُمْ
كُوْنُوْا قِرَدَةً خٰسِـِٕيْنَ ﴿٦٥﴾

६६. अशा प्रकारे आम्ही त्या कालातील लोकांचेसाठी आणि त्यानंतर येणाऱ्या लोकांचेसाठी, याला धडा शिकविण्याचा नमुना बनविले आणि ईश्वरांचे भय बाळगणाऱ्यासाठी उपदेश.

فَجَعَلْنٰهَا نَكَالًا لِّمَا بَيْنَ يَدَيْهَا وَمَا خَلْفَهَا وَمَوْعِظَةً
لِّلْمُتَّقِيْنَ ﴿٦٦﴾

६७. आणि आठवा जेव्हां मूसानी आपल्या लोकांना सांगितले की, ''अल्लाह तुम्हाला एक गाय बळी देण्याचा आदेश देत आहे'' तर म्हणू लागले की 'काय तुम्ही आमच्या बरोबर थट्टा करीत आहांत? मूसानी सांगितले की ''अडाण्या सारखे होण्या पासून मी अल्लाहची शरणागती मागतो.''

وَاِذْ قَالَ مُوْسٰى لِقَوْمِهٖٓ اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُكُمْ اَنْ تَذْبَحُوْا بَقَرَةً ۭ
قَالُوْٓا اَتَتَّخِذُنَا هُزُوًا ۭ قَالَ اَعُوْذُ بِاللّٰهِ اَنْ اَكُوْنَ مِنَ
الْجٰهِلِيْنَ ﴿٦٧﴾

६८. ते म्हणाले की, आपल्या पालनकर्त्याजवळ प्रार्थना करा की, गाय कोणत्या प्रकारची असावी हे त्याने आम्हाला स्पष्टपणे सांगावे. मूसानी सांगितले की, तो फर्मावितो की, गाय म्हतारी नसावी. तसेच ते लहान वासरुहि नसावे. मध्यम वयाची असावी. आणि जी आज्ञा केली जात आहे तिची अमल बजावणी करा.

قَالُوا ادْعُ لَنَا رَبَّكَ يُبَيِّنْ لَّنَا مَا هِيَ ۭ قَالَ اِنَّهٗ يَقُوْلُ
اِنَّهَا بَقَرَةٌ لَّا فَارِضٌ وَّلَا بِكْرٌ ۭ عَوَانٌۢ بَيْنَ ذٰلِكَ ۭ
فَافْعَلُوْا مَا تُؤْمَرُوْنَ ﴿٦٨﴾

६९. म्हणू लागले. आपल्या पालनकर्त्या जवळ प्रार्थना करा की तिचा रंग कसा असावा? हे त्याने स्पष्ट करावे. मूसानी सांगितले की तो फर्मावित आहे की गाय पिवळ्या रंगाची असावी. अशा सुंदर रंगाची की पाहणाऱ्यानी खुष व्हावे.

قَالُوا ادْعُ لَنَا رَبَّكَ يُبَيِّنْ لَّنَا مَا لَوْنُهَا ۭ قَالَ اِنَّهٗ يَقُوْلُ
اِنَّهَا بَقَرَةٌ صَفْرَاۗءُ ۙ فَاقِعٌ لَّوْنُهَا تَسُرُّ النّٰظِرِيْنَ ﴿٦٩﴾

७०. म्हणाले. आपल्या पालनकर्त्याजवळ प्रार्थना करा की, त्याने स्पष्ट करावे की ती कशी असावी हे अधिक स्पष्ट करावे. गाईच्या निवडीत आम्हाला संशय निर्माण झाला आहे आणि ईश्वर इच्छिल तर आम्ही तिला शोधून काढू.

قَالُوا ادْعُ لَنَا رَبَّكَ يُبَيِّنْ لَّنَا مَا هِيَ ۙ اِنَّ الْبَقَرَ تَشٰبَهَ عَلَيْنَا ۭ
وَاِنَّآ اِنْ شَاۗءَ اللّٰهُ لَمُهْتَدُوْنَ ﴿٧٠﴾

८९. सब्त म्हणजे शनिवार. हा दिवस बनी ईसराईलासाठी प्रार्थना-दिवस म्हणून निश्चित केला गेला होता. या दिवशी शिकार वगैरे करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला होता. परंतु या लोकांनी निरनिराळ्या सबबीवर स्वत:ला पुष्कळशा बंधनातून मुक्त करून घेतले होते.

९०. बनी इसराईल शरीअतीच्या (धर्मशास्त्र) आदेशाचे पालन करण्याबाबतीत कशी टाळाटाळ करीत असत आणि पळ काढण्याचे मार्ग कसे शोधीत असत याचे हे उदाहरण आहे.

७१. मूसा म्हणाले. तो फर्मावित आहे की, अशी गाय असावी की जिच्यापासून काही काम घेतलेले नसावे.न जमिन नांगरणीचे काम;न शेतीला पाणी पुरविण्याचे काम. ती अत्यंत निरोगी व व्यंगरहीत असावी.[११] म्हणू लागले. आता तुम्ही स्पष्ट वर्णन [१२] आणले. नंतर त्यांनी तिचा बळी दिला. ते बळी देऊ इच्छितात असे वाटत नव्हते.

قَالَ إِنَّهُ يَقُولُ إِنَّهَا بَقَرَةٌ لَّا ذَلُولٌ تُثِيرُ الْأَرْضَ وَلَا تَسْقِي
الْحَرْثَ مُسَلَّمَةٌ لَّا شِيَةَ فِيهَا ۚ قَالُوا الْآنَ جِئْتَ بِالْحَقِّ ۚ
فَذَبَحُوهَا وَمَا كَادُوا يَفْعَلُونَ ﴿٧١﴾

७२. आणि आठवा जेव्हा तुम्ही एका माणसाची हत्या केली होती. नंतर त्याबाबतीत एक दुसऱ्यावर आरोप करीत होता. आणि अल्लाह इच्छित होता की जे काही तुम्ही लपवित होता ते उघड करावे,

وَإِذْ قَتَلْتُمْ نَفْسًا فَادَّارَأْتُمْ فِيهَا ۖ وَاللَّهُ مُخْرِجٌ مَّا كُنتُمْ
تَكْتُمُونَ ﴿٧٢﴾

७३. आणि म्हणून आम्ही सांगितले की, याला (मृतदेहाला) गाईच्या एका भागाने मारा.[१३] या प्रकारे अल्लाह मेलेल्यांना जीवंत करतो आणि तुम्हांला आपल्या खूणा दाखवितो. कारण की तुम्ही बुद्धिने काम घ्यावे.[१४]

فَقُلْنَا اضْرِبُوهُ بِبَعْضِهَا ۚ كَذَٰلِكَ يُحْيِي اللَّهُ الْمَوْتَىٰ وَيُرِيكُمْ
آيَاتِهِ لَعَلَّكُمْ تَعْقِلُونَ ﴿٧٣﴾

७४. या खुणा पाहिल्यानंतर देखील तुमची मने कठोर झाली. दगडासारखी कठीण किंबहुना त्यापेक्षाही अधिक कठीण. कारण की काही दगड असेही असतात की ज्यामधून झरे उगम पावतात आणि काही भंग पावतात व त्यामधून पाणी वाहू लागते. [१५] आणि काही दगड असेही असतात की अल्लाहच्या भयाने कोसळून पडतात. आणि अल्लाह तुमच्या वागणूकीबाबतीत अनभिज्ञ नाही.

ثُمَّ قَسَتْ قُلُوبُكُم مِّن بَعْدِ ذَٰلِكَ فَهِيَ كَالْحِجَارَةِ
أَوْ أَشَدُّ قَسْوَةً ۚ وَإِنَّ مِنَ الْحِجَارَةِ لَمَا يَتَفَجَّرُ مِنْهُ الْأَنْهَارُ ۚ وَإِنَّ
مِنْهَا لَمَا يَشَّقَّقُ فَيَخْرُجُ مِنْهُ الْمَاءُ ۚ وَإِنَّ مِنْهَا لَمَا يَهْبِطُ
مِنْ خَشْيَةِ اللَّهِ ۗ وَمَا اللَّهُ بِغَافِلٍ عَمَّا تَعْمَلُونَ ﴿٧٤﴾

७५. काय तुम्ही लोक या लोकांबद्दल ही अपेक्षा बाळगता की हे लोक तुमचे म्हणणे मान्य करतील? यांच्यापैकी एक गट तर अल्लाहची वचने ऐकत आला आहे आणि त्यांना समजून घेतल्यानंतर जाणून बुजून त्यामध्ये फेरफार [१६] करीत आला आहे .

أَفَتَطْمَعُونَ أَن يُؤْمِنُوا لَكُمْ وَقَدْ كَانَ فَرِيقٌ مِّنْهُمْ
يَسْمَعُونَ كَلَامَ اللَّهِ ثُمَّ يُحَرِّفُونَهُ مِن بَعْدِ مَا عَقَلُوهُ
وَهُمْ يَعْلَمُونَ ﴿٧٥﴾

९१. सर्वश्रेष्ठ अल्लाहने एक गाय कापण्याचा हुकूम दिला होता. त्यांनी कोणतीही गाय कापली असती तर पुरेसे होते. परंतु त्यांनी प्रश्नावर प्रश्न विचारून धर्मशास्त्राच्या व्यापकतेला आपल्यासाठी संकुचित करून घेतले.

९२. अशा वैशिष्ट्यांनी युक्त अशी गाय त्या कालात पूजेसाठी खास राखून ठेविली जात असे आणि म्हणून निर्देश करून अशाच प्रकारची गाय कापण्याची आज्ञा दिली गेली. हेतु हा की बनी इसराईलाना ईजिप्तमध्ये राहून गोपूजेचा जो रोग जडला होता त्यापासून त्यांची सुटका व्हावी. व त्यांनी आपल्या आचरणाने हे स्पष्ट करावे की एका अल्लाह शिवाय ते कोणासही प्रार्थनेचा हक्कदार समजत नाहीत.

आजच्या तौरात मध्ये गाईला कापण्याचा मूळ आदेश नमूद आहे. फक्त तपशिल नाही.

''परमेश्वर मूसा व हारून यांना म्हणाला. परमेश्वराने दिलेल्या नियमशास्त्राचा विधि हा. इस्त्राईल लोकांना सांग की, निर्दोष व अव्यंग आणि जिच्यावर अद्याप जूं ठेविले नाही अशी एक पिवळ्या रंगाची कालवड माझ्याकडे घेऊन या. ती अेलाजार याजकाकडे द्यावी. त्याने तिला छावणीबाहेर न्यावे व एकाने तिला त्यांच्यासमोर वधावे.''

(जूना करार गणना १९: १ ते ३)

९३. हा कस्सामाच्या ऐका घटनेकडे इशारा आहे. एका ठार करण्यात आलेल्या व्यक्तिचे प्रेत पटांगणांत आढळून आले होते. आणि ठार करणाऱ्यांचा पत्ता लागत नव्हता. लोक एकदुसऱ्यावर दोषारोप करीत होते. या बाबतीत धर्मशास्त्रानुसार हे ठरविण्यात आले की आसपासच्या लोकांकडून शपथेवर जबाब घेण्यात यावेत की त्यांनी हत्या केलेली नाही व हत्या होताना पाहिलेले नाही. शपथेवर घेण्यात आलेल्या जबाबांना खरेखोटे ठरविण्यासाठी गाईला बळी देण्याची आज्ञा झाली. शपथेवर जबाब देण्याऱ्या लोकांनी तिच्या रक्ताने आपले हात धुवावेत. बनी इसराईलाना गाय कापण्याची जी आज्ञा दिली गेली होती ती याच वेळेची गोष्ट आहे. गाईला बळी देण्यामागे गोपूजेच्या विचार सरणीत सुधारणा घडवून आणणे हा एक उद्देश होता. त्याच प्रमाणे कस्सामाची पध्दत प्रचालित करणे हा दुसरा महत्वाचा हेतु होता.

९४. ज्या गाईला बळी देण्यात आले होते. तिच्या एका भागाने ठार करण्यात आलेल्या व्यक्तिच्या मृतदेहावर आघात करण्याची आज्ञा झाली. याप्रकारे परमेशवराने त्या मृतदेहात जीव घातला. आणि त्या व्यक्तिने आपल्या मारेकऱ्याचे नांव सांगितले. हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या खास खूणांचा अविष्कार होता. याबरोबरच ही गोष्ट पण स्पष्ट झाली की गाईला कापल्यामुळे कोणतीही आपत्ती आली नाही. तर याउलट तिला बळी देणे फायदेशीरच ठरले.

९५. दगड हे कठीण असले तरी त्यांच्यामध्ये देखील ही क्षमता असते की त्यांच्यामधून पाण्याचे प्रवाह निघू शकतात. परंतु माणसाचे मनात जर ईश्वराचे भय नसेल तर ते इतके कठोर होतात की त्यामधून मायेचे सर्व पाझर नाहीसे होतात. आणि मग कोणताही उपदेश त्यांच्यावर परिणामकारक ठरत नाही. आणि म्हणून जे लोक अल्लाहच्या कोपाची पर्वा न करता सतत गुन्हे करीत असतात, त्यांची सुधारणा करणे कोणासही शक्य नसते.

९६. ग्रंथधारकांनी ईश्वराच्या ग्रंथामध्ये जे फेरफार केले त्याचे निरनिराळे प्रकार होते. एक प्रकार असा होता की ते ग्रंथामध्ये बदल (कमी जास्त) करीत असत.उदा. त्यानी परमेश्वरावर हा खोटा आरोप केला की ईश्वराने सहा दिवस विश्व निर्माण केल्यानंतर सातव्या दिवसी विश्रांती घेतली. (निर्गम ३१: १७) याप्रकारे हजरत हारून यांच्यावर हा आरोप केला की त्यांनी वासरू बनविले होते. (जुना करार- निर्गम ३२-४)

दुसरा प्रकार असा होता की ते ग्रंथाचा मनमानेल त्याप्रमाणे विपर्यास करीत असत. आणि तिसरा प्रकार असा होता की ते शब्दांना बदलत असत. उदा. मरवा हे मक्का शहरातील टेकडीचे नांव आहे. त्याला त्यांनी मोरा वा मुरया बनविले होते हेतु हा की त्या टेकडीला ओळखले जाऊ नये व मक्का शहराची प्रतिष्ठा सिद्ध होऊ नये. आणि चौथा प्रकार असा होता की ते शब्दांचे भाषांतर संदर्भाला सोडून व ग्रंथाच्या आशयाच्या अगदी उलट करीत असत.

आजच्या तौरात, इंजिल वगैरे मध्ये अशा प्रकारचे फेरफार करण्यात आलेले आहेत. आणि हे ग्रंथ आपल्या मूळ स्वरूपात आज अस्तित्वात नाहीत. त्यांनी आपल्या भाष्याला, इतिहासाला आणि कालपनिक गोष्टींना ईश्वरी ग्रंथामध्ये मिसळून त्यांना ईश्वराचा शब्द म्हणून सादर केले.

७६. जेव्हा ईमान आणलेल्या लोकांना भेटतात तेव्हा म्हणतात की आम्ही ईमान आणले आहे. आणि जेव्हां आपसात एकमेकांना भेटतात तेव्हा म्हणतात की काय तुम्ही त्यांना त्या गोष्टी दाखविता ज्या अल्लाहने तुमच्यावर उघड केल्या आहेत? काय ते तुमच्या पालनकर्त्या जवळ पुरावा [९७] म्हणून या गोष्टी सादर करणार नाहीत? काय तुम्हाला कळत नाही.

وَاِذَا لَقُوا الَّذِيْنَ اٰمَنُوْا قَالُوْٓا اٰمَنَّا ۚۖ وَاِذَا خَلَا بَعْضُهُمْ
اِلٰى بَعْضٍ قَالُوْٓا اَتُحَدِّثُوْنَهُمْ بِمَا فَتَحَ اللّٰهُ عَلَيْكُمْ
لِيُحَاۗجُّوْكُمْ بِهٖ عِنْدَ رَبِّكُمْ ۭ اَفَلَا تَعْقِلُوْنَ ۝٧٦

७७. काय त्याना हे माहीत नाही की अल्लाह त्या गोष्टी जाणतो ज्या ते लपवित आहेत आणि त्या गोष्टीही जाणतो ज्या ते उघड करीत आहेत.

اَوَلَا يَعْلَمُوْنَ اَنَّ اللّٰهَ يَعْلَمُ مَا يُسِرُّوْنَ وَمَا يُعْلِنُوْنَ ۝٧٧

७८. आणि त्यांच्यामध्ये अशिक्षित [९८] लोकही आहेत ज्यांना ईश्वरी ग्रंथाचे ज्ञान नाही. परंतु अभिलाषा [९९] बाळगून आहेत आणि फक्त अनुमानाच्या गोष्टी बोलत आहेत.

وَمِنْهُمْ اُمِّيُّوْنَ لَا يَعْلَمُوْنَ الْكِتٰبَ اِلَّآ اَمَانِىَّ وَاِنْ
هُمْ اِلَّا يَظُنُّوْنَ ۝٧٨

७९. सर्वनाश आहे त्या लोकांकरीता जे आपल्या हातून ग्रंथ [१००] लिहितात आणि मग म्हणतात की, हे अल्लाहकडून आहे. हेतू हा की अशा प्रकारे थोडे पैसे कमवावेत [१०१] आणि त्यांच्या हातचे हे लिखाणच [१०२] त्यांच्या सर्वनाशास कारण आहे. आणि त्यांची ही कमाई देखील त्यांच्या नाशास कारण आहे.

فَوَيْلٌ لِّلَّذِيْنَ يَكْتُبُوْنَ الْكِتٰبَ بِاَيْدِيْهِمْ ۤ ثُمَّ يَقُوْلُوْنَ
ھٰذَا مِنْ عِنْدِ اللّٰهِ لِيَشْتَرُوْا بِهٖ ثَمَنًا قَلِيْلًا ۭ فَوَيْلٌ لَّھُمْ مِّمَّا
كَتَبَتْ اَيْدِيْهِمْ وَوَيْلٌ لَّھُمْ مِّمَّا يَكْسِبُوْنَ ۝٧٩

८०. ते म्हणतात की (दोजखची) आग आम्हाला स्पर्श देखील करणार नाही. फारच झाले तर मोजक्या काही थोड्या दिवसासाठी [१०३] आगीची शिक्षा मिळेल. त्यांना विचारा काय तुम्ही अल्लाहकडून काही वचन घेतले आहे की तो आपल्या वचनाविरुद्ध वागणार नाही? किंवा काय तुम्ही अल्लाहसंबंधी अशी गोष्ट म्हणता जिचे तुम्हाला ज्ञान नाही.

وَقَالُوْا لَنْ تَمَسَّنَا النَّارُ اِلَّآ اَيَّامًا مَّعْدُوْدَةً ۭ قُلْ اَتَّخَذْتُمْ
عِنْدَ اللّٰهِ عَهْدًا فَلَنْ يُّخْلِفَ اللّٰهُ عَهْدَهٗٓ اَمْ تَقُوْلُوْنَ عَلَى
اللّٰهِ مَا لَا تَعْلَمُوْنَ ۝٨٠

८१. का नाही ? ज्याने दुराचार कमविला आणि ज्याच्या अपराधांनी त्याला वेढून घेतले असेच लोक दोजखवासी आहेत.ते तेथे कायमचे राहातील.

بَلٰى مَنْ كَسَبَ سَيِّئَةً وَّاَحَاطَتْ بِهٖ خَطِيْۗـــــَٔــتُهٗ فَاُولٰۗىِٕكَ
اَصْحٰبُ النَّارِ ۚ ھُمْ فِيْهَا خٰلِدُوْنَ ۝٨١

९७. यहुदी लोक आपसांत सांगत असत की जी भविष्यवाणी हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) पैगंबरासंबंधी तौरात मध्ये आहे तिला मुसलमानांचे समोर सांगत जाऊ नका. कारण की मग मुसलमान ईश्वरासमोर हजर होण्याच्या दिवशी तिला तुमच्याविरुद्ध पुरावा म्हणून सादर करतील.

९८. अभिप्रेत ग्रंथधारकांमधील ते सामान्य लोक आहेत जे धर्माचे आदेश व शिकवण या संबंधी अनभिज्ञ होते.

९९. माणूस जेव्हा बंधनविरहीत जीवन जगू इच्छितो, तेव्हा त्याला धर्मशास्त्राची बंधने असह्य वाटतात. आणि म्हणून तो ईश्वरी ग्रंथाचा मनमानेल तसा विपर्यास करून आपल्या निष्क्रियतेला बरोबर सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतो. निर्ढावले लोक अशा प्रकारचे चुकीचे अर्थ प्रस्तुत करून सामान्य लोकांना बहकाविण्याचे साहित्य तयार करून ठेवितात. आणि सामान्य लोक, त्यांच्या जाळ्यात फसून धर्माला खेळणे बनवितात. आणि समजूं लागतात की धर्मबरोबर आदराचे प्रकटीकरण आणि या ना त्या थोर पुरुषाचा आश्रय या गोष्टी मुक्तीसाठी (नजात) पुरेशा आहेत. आपले जीवन कितीही गुन्ह्यांनी बरबटलेले कां असेना त्या त्या थोर पुरुषाच्या वशिल्यामुळे आपल्याला जन्नत जरूर लाभेल. परंतु पवित्र कुरआनने अशा प्रकारच्या दांभिक धार्मिकतेचे मूळच कापले आहे. आणि मुक्तीच्या बाबतीत खोट्या आकांक्षा व चूकीच्या समजूतीना काही जागाच राहू दिलेली नाही.

१००. अभिप्रेत ग्रंथधारकांचे पंडीत आहेत.

१०१. त्याच्या या धर्मविक्रयाचा हेतू अैहिक लाभ मिळविणे हा होता. आणि म्हणून सर्वश्रेष्ठ परमेश्वराने स्पष्ट केले की, धर्मांचा विक्रय करून साध्य होणारा मोठ्यात मोठा अैहीक लाभही आपल्या परिणामाच्या दृष्टीने अत्यंत क्षुल्लकच आहे.

१०२. ईश्वराच्या ग्रंथामध्ये मन घडत गोष्टींचा समावेश करणे, किंवा धार्मिक पुस्तक स्वत: रचून ते ईश्वराकडून उतरलेला ग्रंथ आहे असे भासविणे ही भयंकर अशी मार्गभ्रष्टता आहे. याला निरनिराळ्या धर्माचे लोक बळी पडले आहेत. पवित्र कुरआन सांगत आहे की, जी गोष्ट खरोखर ईश्वराकडून आलेली नाही तिचा ईश्वराशी संबंध जोडणे ही अत्यंत हीन दर्जाची मार्गभ्रष्टता आहे. आणि जे लोक अशी फसवेगिरी करतात ते अत्यंत दुष्ट आहेत. त्यांना याचे भयंकर परिणाम भोगावे लागणार आहेत. स्पष्ट आहे की धर्माच्या नांवावर खोट्या गोष्टी चालविणे आणि लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकणे हा साधा गुन्हा नव्हे. आणि म्हणून याला शिक्षा पण कडकच झाली पाहिजे.

१०३. यहुदी लोकांचा हा समज होता की त्यांचा समाज ईश्वराने निवडलेला असल्याने, त्यांचे आचरण कसेही असले तरी त्यांना आगीत घातले जाणार नाही आणि यदाकदाचित घातले गेले तरीही काही थोडया दिवसांची शिक्षा भोगल्यानंतर त्यांना पुन्हा जन्नतमध्ये प्रवेश दिला जाईल या चूकीच्या समजूतीनें त्यांना धार्मिक निकडीबद्दल बेपर्वा केले होते. आणि त्यांच्या मध्ये निष्क्रियता (दुराचरण) निर्माण झाली होती धर्माबद्दल ही भयंकर अशी चुकीची कल्पना होती. यहुदी लोक तिच्या आहारी गेले होते. आणि दु:खाची गोष्ट ही की, मुसलमान देखील अशा प्रकारच्या चुकीच्या कल्पनांना बळी पडलेले आहेत.

❖❖❖❖❖❖

८२. आणि ज्या लोकानी ईमान आणले व ज्यानी चांगले आचरण केले ते जन्नतवासी आहेत. तेथे ते कायमचे राहातील.

وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ اُولٰٓئِكَ اَصْحٰبُ
الْجَنَّةِ ۚ هُمْ فِيْهَا خٰلِدُوْنَ ﴿٨٢﴾

८३. आठवा जेव्हा आम्ही बनी इसराईल यांचेकडून पक्के वचन घेतले की,तुम्ही अल्लाहशिवाय दुसऱ्या कोणाचीही भक्ति (इबादत) करू नका; आई, वडील,[१०४] नातलग, अनाथ आणि गोरगरीब यांचेशी चांगले वर्तन ठेवा. लोकांच्या बरोबर चांगले बोला. [१०५] नमाज़ क़ायम करा. ज़कात द्या. परंतु थोड्या लोकाखेरीज तुम्ही सर्वजण या पासून (वचनापासून) फिरलात. आणि तोंड फिरविणे हा तुमचा स्वभावच आहे.

وَاِذْ اَخَذْنَا مِيْثَاقَ بَنِىْٓ اِسْرَآءِيْلَ لَا تَعْبُدُوْنَ اِلَّا
اللّٰهَ وَبِالْوَالِدَيْنِ اِحْسَانًا وَّذِى الْقُرْبٰى وَالْيَتٰمٰى
وَالْمَسٰكِيْنِ وَقُوْلُوْا لِلنَّاسِ حُسْنًا وَّاَقِيْمُوا
الصَّلٰوةَ وَاٰتُوا الزَّكٰوةَ ؕ ثُمَّ تَوَلَّيْتُمْ اِلَّا قَلِيْلًا
مِّنْكُمْ وَاَنْتُمْ مُّعْرِضُوْنَ ﴿٨٣﴾

८४. आणि आठवा जेव्हा आम्ही तुमच्यापासून पक्के वचन घेतले की आपापसात रक्तपात करणार नाही. आणि एकमेकांना त्यांच्या निवासस्थानामधून काढणार नाही. नंतर तुम्ही याची प्रतिज्ञा पण केली आणि तुम्ही यावर साक्षीदार आहात.

وَاِذْ اَخَذْنَا مِيْثَاقَكُمْ لَا تَسْفِكُوْنَ دِمَآءَكُمْ وَلَا تُخْرِجُوْنَ
اَنْفُسَكُمْ مِّنْ دِيَارِكُمْ ثُمَّ اَقْرَرْتُمْ وَاَنْتُمْ تَشْهَدُوْنَ ﴿٨٤﴾

८५. पण आता हे तुम्हींच लोक आहात की आपल्याच लोकांची हत्या करीत आहात. आणि आपल्या पैकीच एका गटाला त्याच्या निवास स्थानामाधून बाहेर काढीत आहात. आणि अत्याचार व जबरदस्तीने त्यांच्या शत्रूंची मदत करीत आहात.आणि जेव्हा ते कैदी बनून येतात तेव्हा त्यांना द्रव्य (फिदिया) देऊन सोडविता.[१०६] त्यांना घराबाहेर हाकलून देणेच मुळात निषिद्ध होते.काय तुम्ही [१०७] ईश्वरी ग्रंथाच्या एका भागावर ईमान ठेविता आणि दुसऱ्या भागाला नाकारता ? आणि म्हणून तुमच्यापैकी ज्या लोकांनी असे केले त्यांचे या जगातील जीवन अपमानाचे राहील आणि शेवटच्या (क़ियामत) दिवशा अति भयंकर शिक्षेकडे त्यांना ढकलेले जाईल. याशिवाय दुसरी कोणती शिक्षा यांना योग्य आहे ? तुम्ही जे काही करीत आहात त्याबद्दल अल्लाह अनभिज्ञ नाही.

ثُمَّ اَنْتُمْ هٰٓؤُلَآءِ تَقْتُلُوْنَ اَنْفُسَكُمْ وَتُخْرِجُوْنَ فَرِيْقًا مِّنْكُمْ
مِّنْ دِيَارِهِمْ ۡ تَظٰهَرُوْنَ عَلَيْهِمْ بِالْاِثْمِ وَالْعُدْوَانِ ؕ وَاِنْ
يَّاْتُوْكُمْ اُسٰرٰى تُفٰدُوْهُمْ وَهُوَ مُحَرَّمٌ عَلَيْكُمْ اِخْرَاجُهُمْ ؕ
اَفَتُؤْمِنُوْنَ بِبَعْضِ الْكِتٰبِ وَتَكْفُرُوْنَ بِبَعْضٍ ۚ فَمَا جَزَآءُ
مَنْ يَّفْعَلُ ذٰلِكَ مِنْكُمْ اِلَّا خِزْىٌ فِى الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۚ وَيَوْمَ
الْقِيٰمَةِ يُرَدُّوْنَ اِلٰٓى اَشَدِّ الْعَذَابِ ؕ وَمَا اللّٰهُ بِغَافِلٍ عَمَّا
تَعْمَلُوْنَ ﴿٨٥﴾

१०४. माणसावर अल्लाहनंतर सर्वात जास्त हक्क त्याच्या आईवडीलांचा आहे. परंतु हा हक्क त्यांचेशी चांगले वर्तन करण्याचा आहे. त्यांची भक्ति व उपासना करण्याचा नव्हे. आणि जेव्हा परमेश्वर आईवडीलांची भक्ति व उपासना करण्याची परवानगी देत नाही. तर इतरांची भक्ति व उपासना करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. इतरांच्या हक्काचा क्रम तर आईवडीलांचे हक्कानंतर येतो.

१०५. हा आदेश सर्वांना उद्देशून आहे. याचा अर्थ असा की, माणसाने प्रत्येका बरोबर चांगले बोलावे व चांगले वर्तन करावे. पवित्र क़ुरआनची मुसलमानांना ही शिकवण नाही की त्यांनी फक्त मुसलमानांबरोबरच चांगली वर्तणूक मर्यादित ठेववावी. त्याची शिकवण ही आहे की कोणत्याही समाजाच्या, पंथाच्या व धर्माच्या माणसाशी बोलताना मुसलमानांनी चांगले बोलावे, चांगले वागावे. मन दुखविणाच्या क्लेषदायक गोष्टीपासून दूर राहावे सर्वाबरोबर मनमोकळेपणाने व चांगल्या प्रकारे वागावे.

१०६. यहुदी लोक आपल्याच बांधवांविरुद्ध शत्रूशी संगनमत करुन त्यांना हद्दपार करवीत असत. आणि जेव्हा हे लोक शत्रूंच्या ताब्यात जात तेव्हा आपले राष्ट्रप्रेम जाहीर करण्यासाठी, त्यांना नुकसान भरपाई दाखल पैसे देऊन त्यांची सुटका करुन आणीत. आणि वर सांगत असत की ही तौरातची आज्ञा आहे. या आयतीमध्ये यहुदी लोकांच्या या दुट्टपीपणाकडे इशारा करण्यात आलेला आहे. वस्तुत: ज्याप्रमाणे तौरातमध्ये शत्रूच्या ताब्यांत सांपडलेल्या आपल्या बांधवांना नुकसान भरपाई देऊन सोडवून आणण्याची आज्ञा आहे; त्याचप्रमाणे आपल्या बांधवांना हाकलून देण्याबद्दल प्रतिबंधही करण्यात आलेला आहे. मग तौरातची एक आज्ञा पाळावयाची व दुसऱ्या आज्ञेविरुद्ध आचरण करावयाचे याचा अर्थ काय?

१०७. याचा अर्थ असा की, ईश्वरी ग्रंथामधील जी गोष्ट आपल्या इच्छे प्रमाणे असेल ती मानावयाची व जी गोष्ट इच्छेविरुद्ध असेल तिची अवज्ञा करावयाची. अशा प्रकारची धार्मिकता सर्वश्रेष्ठ ईश्वराला मान्य नाही. जे लोक ही नीति अवलंबितात त्यांची या जगातही अवहेलना होते व अखिरित मध्ये ते अत्यंत कडक अशा शिक्षेस पात्र ठरतात. ईश ग्रंथाचे केवळ पठण करणे व त्याविषयी श्रध्दा व्यक्त करणे पुरेसे नाही, किंबहुना ते आचरणात आणणे आवश्यक आहे आणि त्याच्या आदेशां मध्ये कसल्याही प्रकारचा फेरबद्दल ईमाना विरुध्द आहे. यावरुन उघड आहे की जे लोक व्यक्तिगत जीवनाशी संबंधित धार्मिक बाबींना कबूल करतात व सामूहीक जीवनाशी संबंधित बाबींना रद्द करतात त्यांची धर्म विषयक कल्पना किती विकृत आहे व त्यांचा अपराध किती घोर आहे!

८६. हे ते लोक आहेत ज्यांनी आखिरत ऐवजी इहलौकिक जीवनाचा सौदा केला [१०८] म्हणून त्यांच्या शिक्षेत काही कमी होणार नाही. व त्यांची मदत पण केली जाणार नाही.

اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ اشْتَرَوُا الْحَيٰوةَ الدُّنْيَا بِالْاٰخِرَةِ ۫
فَلَا يُخَفَّفُ عَنْهُمُ الْعَذَابُ وَلَا هُمْ يُنْصَرُوْنَ ﴿۸۶﴾

८७. आम्ही मूसाला ग्रंथ दिला आणि त्यानंतर सतत पैगंबरांना पाठविले. आणि मरीयमचा पुत्र ईसा यांना स्पष्ट खूणा [१०९] देऊन पाठविले आणि पवित्र आत्म्याने [११०] (रूहुल कुदुस) त्यांची मदत केली. मग तुमची ही काय पद्धत आहे की जेव्हा एखादा पैगंबर तुमच्या इच्छेविरुद्ध एखादी गोष्ट घेऊन आला तर तुम्ही गर्वच केला. काहीना तुम्ही खोटे ठरविले आणि काहीची तुम्ही हत्या केली.

وَلَقَدْ اٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ وَقَفَّيْنَا مِنْۢ بَعْدِهٖ بِالرُّسُلِ ۫
وَاٰتَيْنَا عِيْسَى ابْنَ مَرْيَمَ الْبَيِّنٰتِ وَاَيَّدْنٰهُ بِرُوْحِ الْقُدُسِ ؕ
اَفَكُلَّمَا جَآءَكُمْ رَسُوْلٌۢ بِمَا لَا تَهْوٰٓى اَنْفُسُكُمُ اسْتَكْبَرْتُمْ ۚ
فَفَرِيْقًا كَذَّبْتُمْ وَفَرِيْقًا تَقْتُلُوْنَ ﴿۸۷﴾

८८. ते म्हणतात, आमची अंत:करणे बंद आहेत. असे नाही. तर अल्लाहने त्यांच्या नकारामुळे (कुफ़्र) त्यांचा धि:क्कार केला आहे. आणि म्हणून ते कमीच ईमान आणतात.

وَقَالُوْا قُلُوْبُنَا غُلْفٌ ؕ بَلْ لَّعَنَهُمُ اللّٰهُ بِكُفْرِهِمْ
فَقَلِيْلًا مَّا يُؤْمِنُوْنَ ﴿۸۸﴾

८९. आणि जेव्हा अल्लाहकडून त्यांचेकडे एक ग्रंथ आला, जो त्यांच्याजवळ पहिल्यापासून असलेल्या ग्रंथाचे समर्थन करीत होता. आणि ते पहिल्यापासून इन्कार करणाऱ्याविरुद्ध (काफिर) विजय प्राप्तीबद्दल प्रार्थना करीत असत. परंतु जेव्हा ती वस्तु त्यांच्याजवळ आली आणि जिला त्यांनी ओळखले देखील तेव्हा त्यांनी तिचा इन्कार केला. [१११]अल्लाहचा धि:क्कार असो अशा इन्कार करणाऱ्यांवर.

وَلَمَّا جَآءَهُمْ كِتٰبٌ مِّنْ عِنْدِ اللّٰهِ مُصَدِّقٌ لِّمَا مَعَهُمْ ۙ
وَكَانُوْا مِنْ قَبْلُ يَسْتَفْتِحُوْنَ عَلَى الَّذِيْنَ كَفَرُوْا ۚ فَلَمَّا
جَآءَهُمْ مَّا عَرَفُوْا كَفَرُوْا بِهٖ ۫ فَلَعْنَةُ اللّٰهِ عَلَى الْكٰفِرِيْنَ ﴿۸۹﴾

९०. किती वाईट आहे ती गोष्ट जिच्या मोबदल्यांत त्यांनी आपल्या प्राणांना विकून टाकले. ते अल्लाहकडून उतरलेल्या शिकवणूकीचा फक्त या दुराग्रहाने इन्कार करतात की अल्लाहने आपल्या कृपेने ज्या दासाला [११२] इच्छिले त्याला संपन्न केले. आणि म्हणून ते प्रकोपावर प्रकोपास पात्र ठरले. आणि इन्कार करणाऱ्यासाठी अत्यंत अपमानास्पद शिक्षा आहे.

بِئْسَمَا اشْتَرَوْا بِهٖٓ اَنْفُسَهُمْ اَنْ يَّكْفُرُوْا بِمَآ اَنْزَلَ اللّٰهُ بَغْيًا
اَنْ يُّنَزِّلَ اللّٰهُ مِنْ فَضْلِهٖ عَلٰى مَنْ يَّشَآءُ مِنْ عِبَادِهٖ ۚ
فَبَآءُوْ بِغَضَبٍ عَلٰى غَضَبٍ ؕ وَلِلْكٰفِرِيْنَ عَذَابٌ
مُّهِيْنٌ ﴿۹۰﴾

१०८. म्हणजे आखिरतच्या जीवनापेक्षा या जगातील जीवनाला प्रधान्य दिले.

१०९ अभिप्रेत ते चमत्कार आहेत जे इतके स्पष्ट होते की ते ईश्वराकडून घडविण्यात आले याबद्दल कसल्याही शंकेस जागा नव्हती. आणि ते चमत्कार हजरत ईसा (अलैहिस्सलाम) हे ईश्वराचे प्रेषित आहेत याचा मोठा पुरावा होते.

११०. यहुदी लोकांनी हजरत ईसा अलैहिस्सलाम यांच्यावर हा आरोप केला होता की ते सैतानाच्या मदतीनें चमत्कार घडवून आणतात. त्याचे खंडन करून पवित्र कुरआन सांगत आहे की हजरत ईसा अलैहिस्सलाम यांना सैतानाचे नव्हे तर पवित्र आत्माचे म्हणजे जिब्रईल (देवदूत) यांचे साहाय्य ईश्वराकडून लाभलेले होते.

१११. यहुदी लोकांच्या ईश्वरी ग्रंथामध्ये शेवटच्या पैगंबरासंबंधी भविष्यवाणी होत्या. आणि म्हणून ते शेवटच्या पैगंबरांच्या आगमनाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहात होते. त्यांचा समज होता की त्याच्या आगमनानंतर त्यांना त्याच्या शत्रूविरूध्द विजय प्राप्त होईल. या विजयाबद्दल ते प्रार्थना करीत असत परंतु जेव्हा हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आगमन झाले आणि यहुदी लोकांनी येणार होते ते पैगंबर हेच आहेत हे ओळखले देखील. परंतु निव्वळ हटधर्मीपणा व मत्सर यांच्या आहारी जाऊन त्यांनी हजरत मुहम्मद सल्लल्लाहु आलैहि वसल्लम पैगंबरांना मानण्यास नकार दिला.

११२. यहुदी लोकांचा या गोष्टीवर राग होता की,अल्लाहने शेवटच्या पैगंबराला बनी इस्माईल या वशांमधून कां निर्माण केले, बनी इसराईलमधून कां निर्माण केले नाही? जणूकाय ईश्वराला या शहाण्यांबरोबर सल्लामसलत करून एखाद्याची पैगंबरपदावर नियुक्ती करावयास हवी होती.

९१. जेव्हा त्यांना सांगितले जाते की अल्लाहने जे काही उतरविले आहे त्यावर ईमान आणा तर म्हणतात की आम्ही त्यावर ईमान आणलेले आहे जे आमच्यावर उतरलेले आहे. त्याच्याशिवाय जे काही उतरले आहे त्याचा ते इन्कार करीत आहेत. वस्तुतः ते सत्य आहे आणि जे काही त्यांच्याजवळ आहे त्याचे ते समर्थन [११३] करीत आहे. त्यांना विचारा. की जर तुम्ही ईमान आणणारे आहांत तर तुम्ही अल्लाहच्या पैगंबरांना यापूर्वी कां ठार मारीत होता. [११४]

وَإِذَا قِيلَ لَهُمْ آمِنُوا بِمَا أَنْزَلَ اللَّهُ قَالُوا نُؤْمِنُ
بِمَا أُنْزِلَ عَلَيْنَا وَيَكْفُرُونَ بِمَا وَرَاءَهُ وَهُوَ الْحَقُّ
مُصَدِّقًا لِمَا مَعَهُمْ ۗ قُلْ فَلِمَ تَقْتُلُونَ
أَنْبِيَاءَ اللَّهِ مِنْ قَبْلُ إِنْ كُنْتُمْ مُؤْمِنِينَ ﴿٩١﴾

९२. तुमच्याजवळ मूसा उघड उघड खूणा घेऊन आले होते. तरीपण तुम्ही त्यांच्यापश्चात वासराला उपास्य बनविले. आणि तुम्ही अत्याचार करणारे झालात.

وَلَقَدْ جَاءَكُمْ مُوسَىٰ بِالْبَيِّنَاتِ ثُمَّ اتَّخَذْتُمُ الْعِجْلَ
مِنْ بَعْدِهِ وَأَنْتُمْ ظَالِمُونَ ﴿٩٢﴾

९३. आणि आठवा जेव्हा आम्ही तूर पर्वताला तुमच्यावर उचलून धरून तुमच्यापासून दृढ वचन घेतले होते आणि आज्ञा केली होती की जे काही आम्ही तुम्हाला दिलेले आहे त्याला बळकटपणे धरा आणि ऐका. ते म्हणाले आम्ही ऐकले आणि अवज्ञा केली.आणि त्यांच्या नकारामुळे वासराची उपासना त्यांच्या मनात रुजली. त्यांना सांगा जर तुम्ही ईमान बाळगणारे आहांत तर तुमचे ईमान तुम्हाला कसल्या वाईट कृत्याची आज्ञा देत आहे?

وَإِذْ أَخَذْنَا مِيثَاقَكُمْ وَرَفَعْنَا فَوْقَكُمُ الطُّورَ
خُذُوا مَا آتَيْنَاكُمْ بِقُوَّةٍ وَاسْمَعُوا ۖ قَالُوا سَمِعْنَا
وَعَصَيْنَا وَأُشْرِبُوا فِي قُلُوبِهِمُ الْعِجْلَ بِكُفْرِهِمْ ۚ
قُلْ بِئْسَمَا يَأْمُرُكُمْ بِهِ إِيمَانُكُمْ إِنْ كُنْتُمْ مُؤْمِنِينَ ﴿٩٣﴾

९४. त्यांना सांगा जर आखिरतचे ठिकाण सर्व लोकांना वगळून फक्त तुमच्याचसाठी खास आहे, व जर तुम्ही तुमच्या या दाव्यात खरे आहांत तर मग मरणाची इच्छा करा.

قُلْ إِنْ كَانَتْ لَكُمُ الدَّارُ الْآخِرَةُ عِنْدَ اللَّهِ خَالِصَةً مِنْ
دُونِ النَّاسِ فَتَمَنَّوُا الْمَوْتَ إِنْ كُنْتُمْ صَادِقِينَ ﴿٩٤﴾

९५. परंतु त्यांनी जे काही पुढे पाठविले आहे त्यामुळे ते कदापिही त्याची इच्छा करणार नाहीत. आणि अल्लाह अत्याचारी लोकानां चांगले ओळखून आहे.

وَلَنْ يَتَمَنَّوْهُ أَبَدًا بِمَا قَدَّمَتْ أَيْدِيهِمْ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ
بِالظَّالِمِينَ ﴿٩٥﴾

९६. जीवना विषयी ते सर्वाधिक लोभी असलेले तुम्हाला आढळून येतील,किंबहुना अनेकेश्वरवाद्याहूनहि अधिक त्यांच्यातला प्रत्येक जण ही इच्छा बाळगतो की हजार वर्षाचे आयुष्य लाभावे, वस्तुतः दिर्घायुष्य त्यांना ईश-शिक्षेपासून वाचाविणार नाही आणि जे काही हे करीत आहेत, अल्लाह ते पहात आहे.[११५]

وَلَتَجِدَنَّهُمْ أَحْرَصَ النَّاسِ عَلَىٰ حَيَاةٍ
وَمِنَ الَّذِينَ أَشْرَكُوا ۚ يَوَدُّ أَحَدُهُمْ لَوْ يُعَمَّرُ أَلْفَ سَنَةٍ
وَمَا هُوَ بِمُزَحْزِحِهِ مِنَ الْعَذَابِ أَنْ يُعَمَّرَ ۗ وَاللَّهُ
بَصِيرٌ بِمَا يَعْمَلُونَ ﴿٩٦﴾

११३. यहुदी आपला धार्मिक ग्रंथ तौरात यावर ईमान ठेवणे पुरेसे समजत असत. पवित्र क़ुरआनचे अवतरण ठीक ठीक तौरातमधील भविष्यवाणी प्रमाणे झालेले आहे आणि म्हणून पवित्र क़ुरआनला खोटे ठरविणे तौरातला खोटे ठरविण्यासारखे आहे.

११४. म्हणजे त्यांचा तौरातवर ईमान ठेवण्याचा दावा खोटा होता. जर खरोखर ते तौरातवर ईमान ठेवित होते तर त्यांनी कधीही पैगंबरांची हत्या केली नसती.

११५. अखिरतचा इन्कार करणारे तर जगात अधिकाधिक जगण्यास अधाशी असतात कारण त्यांच्या मते हे सुखविलास पुन्हा लाभणार नाही. परंतु अखिरतला मानण्याचा दावा करणारे यहुदी याहून अधिक जगण्याचे लोभी होते कारण जन्नतला आपल्या साठी खास समजूनहि ते आपल्या दुष्कृत्यांमुळे मनात ही भिती बाळगत की कदाचित ईश्वर दरबारी शिक्षा तर होणार नाही.

खरी गोष्ट अशी की जे लोक जगाला कसोटी स्थान न समजता हिंडण्या-फिरण्याचे स्थान समजतात ते अधिकाधिक जगातील मौज लुटू इच्छितात.म्हणून आपले आयुष्य अधिकाधिक दीर्घ असावे अशी ते इच्छा बाळगतात. वस्तुत: माणसाने खरी काळजी या गोष्टीची करावी की आयुष्याचा जो काही अवधि त्याला लाभेल. तो या कसोटीत यश संपादण्यासाठी काय करीत आहे. आणि ही वस्तुस्थिती नेहमी डोळया समोर ठेवली पाहिजे की जगात तो जी भूमिका पार पाडत आहे तीचे अल्लाह निरीक्षण करीत आहे. आणि जेव्हा अल्लाह सर्व काही पहात आहे तर तो आचरणाचा मोबदला का म्हणून देणार नाही?

९७. सांगा, जो जिब्रईलचा शत्रू आहे त्याला हे माहित असावयास पाहिजे की जिब्रईलने [११६] अल्लाहच्या परवानगीने हे क़ुरआन (हे पैगंबरा !) तुमच्या अंत:करणावर उतरविले आहे, त्या भविष्यवाणी प्रमाणे जी पहिल्या पासून अस्तित्वात आहेत आणि ईमान आणणाऱ्या साठी सदुपदेश व शुभसंदेश आहे.

قُلْ مَنْ كَانَ عَدُوًّا لِّجِبْرِيْلَ فَاِنَّهٗ نَزَّلَهٗ عَلٰى قَلْبِكَ
بِاِذْنِ اللّٰهِ مُصَدِّقًا لِّمَا بَيْنَ يَدَيْهِ وَهُدًى وَّبُشْرٰى
لِلْمُؤْمِنِيْنَ ﴿٩٧﴾

९८. जे अल्लाह, त्याचे दूत (फरिश्ते), त्याचे पैगंबर आणि जिब्रईल व मिकाईल[११७] यांचे शत्रू आहेत, तर अल्लाह अशा इन्कार करणाऱ्यांचा शत्रू आहे.

مَنْ كَانَ عَدُوًّا لِّلّٰهِ وَمَلٰٓئِكَتِهٖ وَرُسُلِهٖ وَجِبْرِيْلَ
وَمِيْكٰىلَ فَاِنَّ اللّٰهَ عَدُوٌّ لِّلْكٰفِرِيْنَ ﴿٩٨﴾

९९. आम्ही तुमच्यावर अत्यंत सुबोध अशी महावाक्यें (आयती) उतरविली आहेत. आणि त्यांचा इन्कार तेच लोक करतात जे दुराचारी [११८] आहेत.

وَلَقَدْ اَنْزَلْنَآ اِلَيْكَ اٰيٰتٍۢ بَيِّنٰتٍ ۚ وَمَا يَكْفُرُ بِهَآ اِلَّا
الْفٰسِقُوْنَ ﴿٩٩﴾

१००. काय त्यांची ही वर्तणूक राहिली नाही की जेव्हा जेव्हा त्यांनी करार केला तेव्हा तेव्हा त्यांच्यापैकी एका गटाने त्याला अवश्य फेटाळून लावले. इतकेच नव्हे तर त्यांच्या पैकी बहुतेक लोक ईमानच ठेवित नाहीत.

اَوَكُلَّمَا عٰهَدُوْا عَهْدًا نَّبَذَهٗ فَرِيْقٌ مِّنْهُمْ ۭ بَلْ اَكْثَرُهُمْ
لَا يُؤْمِنُوْنَ ﴿١٠٠﴾

१०१. आणि जेव्हा या ग्रंथाचे सत्य समर्थन करीत त्यांच्या अल्लाहचा एक पैगंबर त्यांच्याकडे आले जे त्यांच्या जवळ पहिल्यापासून हजर होते तेव्हां या ग्रंथाधारकापैकी एका गटाने तर अल्लाहच्या ग्रंथाला अशाप्रकारे पाठीमागे ढकलले की जणू काय ते काही जाणतच नाहीत.

وَلَمَّا جَآءَهُمْ رَسُوْلٌ مِّنْ عِنْدِ اللّٰهِ مُصَدِّقٌ لِّمَا مَعَهُمْ
نَبَذَ فَرِيْقٌ مِّنَ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ ۙ كِتٰبَ اللّٰهِ وَرَآءَ
ظُهُوْرِهِمْ كَاَنَّهُمْ لَا يَعْلَمُوْنَ ﴿١٠١﴾

११६. यहुदी हेकेखोरपणा व मत्सराच्या आहारी जाऊन हजरत जिब्रईल यांना आपला शत्रू समजत असत. त्यांचा हजरत जिब्रईल यांचेवर यासाठी राग होता की, ते हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडे ईश्‍वराचा संदेश घेऊनयेत असत. त्यांच्यामते हा संदेश त्यांच्या जाती पैकी कोणा एका व्यक्तिकडे आला पाहिजे होता. त्यांचा हा समज अव्वल दर्जाचा मुर्खपणा होता. कारण हजरत जिब्रईल हे ईशदूत होते आणि ईश्वराच्याच आज्ञेनुसार हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडे संदेश आणीत होते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे पैगंबरपदा साठी बनी इस्माईल मधून हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची निवड ईश्वराकडून होती आणि म्हणून हज़रत जिब्रईल यांच्याशी शत्रूत्व म्हणजे ईश्वराशी शत्रूत्व हे उघड आहे. ज्यांचे ईश्वराशी शत्रूत्व आहे त्यांना ईश्वर आपले मित्र कसे बनवील?

११७. मिकाईल हे एका सामर्थ्यवान ईशदूताचे (फिरिश्त्याचे) नांव आहे.

११८. पवित्र कुरआनच्या आयती, तो ईश्वरी ग्रंथ आहे आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु आलैही वसल्लम) हे त्याचे पैगंबर आहेत याचा बिनतोड पुरावा आहे. आणि म्हणून त्यांचा इन्कार फक्त तोच माणूस करु शकतो जो ईश्वराच्या आज्ञा पाळीत नाही आणि आपल्या वचनांचा भंग करणारा असतो.

१ ० २. आणि त्या गोष्टींच्या मागे लागलात, ज्यांचा संबंध सुलैमान यांच्या शासनाशी जोडून, सैतान त्या पठन व पाठन करीत असत.[११९] सुलैमाननी तर कधीच ''कुफ्र''(इन्कार) केला नाही. सैतानांनी ''कुफ्र''(इन्कार) केला. ते लोकांना जादू शिकवीत असत.[१२०] आणि बाबिलमध्ये हारूत व मारुत या दोन फिरिश्त्यांवर (जादू) उतरविली गेली नव्हती आम्ही तर परिक्षा घेण्यासाठी आहोत म्हणून तुम्ही 'कुफ्र' करू नका असा इशारा जोपर्यंत ते लोकांना देत नसत तोपर्यंत ते ती गोष्ट कोणाला शिकवीत नसत. तरीही हे लोक त्यांच्यापासून ती विद्या शिकत असत ज्यामुळे पति पत्नी मध्ये ताटातूट निर्माण केली जात असे.[१२१] यद्दपि याद्वारे, अल्लाहच्या आज्ञेशिवाय, ते कोणाचेही कसलेही नुकसान करु शकत नव्हते. तरीपण ते अशी गोष्ट शिकत असत जी त्यांच्यासाठी फायद्याची नव्हे तर नुकसानकारक होती. आणि त्यांना माहित होते की, ज्यांने तिला विकत घेतले त्याला आखिरतमध्ये काही लाभ नाही. किती वाईट आहे ती गोष्ट जिच्या मोबदल्यांत त्यांनी आपल्या प्राणांना विकून टाकले. जर त्यांनी हे जाणले असते तर किती बरे झाले असते !

وَاتَّبَعُوْا مَا تَتْلُوا الشَّيٰطِيْنُ عَلٰى مُلْكِ سُلَيْمٰنَ ۚ
وَمَا كَفَرَ سُلَيْمٰنُ وَلٰكِنَّ الشَّيٰطِيْنَ كَفَرُوْا يُعَلِّمُوْنَ
النَّاسَ السِّحْرَ ۗ وَمَآ اُنْزِلَ عَلَى الْمَلَكَيْنِ بِبَابِلَ
هَارُوْتَ وَمَارُوْتَ ۭ وَمَا يُعَلِّمٰنِ مِنْ اَحَدٍ حَتّٰى يَقُوْلَآ اِنَّمَا
نَحْنُ فِتْنَةٌ فَلَا تَكْفُرْ ۭ فَيَتَعَلَّمُوْنَ مِنْهُمَا مَا يُفَرِّقُوْنَ
بِهٖ بَيْنَ الْمَرْءِ وَزَوْجِهٖ ۭ وَمَا هُمْ بِضَاۗرِّيْنَ بِهٖ مِنْ
اَحَدٍ اِلَّا بِاِذْنِ اللّٰهِ ۭ وَيَتَعَلَّمُوْنَ مَا يَضُرُّھُمْ
وَلَا يَنْفَعُھُمْ ۭ وَلَقَدْ عَلِمُوْا لَمَنِ اشْتَرٰىهُ مَا لَهٗ
فِي الْاٰخِرَةِ مِنْ خَلَاقٍ ڜ وَلَبِئْسَ مَا شَرَوْا بِهٖٓ
اَنْفُسَهُمْ ۭ لَوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ ١٠٢

१ ० ३. जर त्यांनी ईमान आणले असते आणि अल्लाहचे भय बाळगून आचरण केले असते तर अल्लाहजवळ त्यांना याचा जो मोबदला मिळाला असता तो किती चांगला होता. जर त्यांनी हे जाणले असते तर किती बरे झाले असते !

وَلَوْ اَنَّهُمْ اٰمَنُوْا وَاتَّقَوْا لَمَثُوْبَةٌ مِّنْ عِنْدِ اللّٰهِ خَيْرٌ ۭ
لَوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ ١٠٣

१ ० ४. हे ईमान आणलेल्या लोकानो ! तुम्ही 'राइना' [१२२] म्हणत जावू नका. तर ''उन्जुर्ना '' म्हणत जा. आणि लक्ष देऊन एकत जा. आणि राहिले इन्कार करणाऱ्या (काफिरां) साठी तर त्यांच्या साठी दु:खदायक शिक्षा (अजाब) आहे.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَا تَقُوْلُوْا رَاعِنَا وَقُوْلُوا انْظُرْنَا
وَاسْمَعُوْا ۭ وَلِلْكٰفِرِيْنَ عَذَابٌ اَلِيْمٌ ١٠٤

१ १ ९. या ठिकाणी सैतानांशी अभिप्रेत ते विध्नसंतोषी लोक होत जे करणी कवटाळ जादू टोणे टोटके, तावीज गंडे या द्वारे लोकांना कटकटीत टाकतात व त्यांना सत्यप्रिय बनू देत नाही. या नंतर अल्लाहच्या ग्रंथात काही स्वारस्य राहते. ना सत्य उद्दिष्टात.

यहुदीमध्ये जेव्हा नैतिक पतन झाले तेव्हा त्यांनी ईश ग्रंथाकडे पाठ फिरवली व जादूच्या नादी लागले.यास्तव बाबिलच्या बंधन काळात त्यांच्या ह्याच करतूती राहील्यात आणि नंतरच्या काळात त्यांचा एक न एक समूह या काळ्या जादू टोण्यात गर्क राहीला. येथपावेतो की जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पाठविले गेले जे अगदी त्यांच्या भाकीतानुसार होते.जे तौरात मध्ये निवेदिले गेले होते,पण त्यांनी त्यांची किंचित पर्वा केली नाही आणि ईश ग्रंथाला दृष्टीआड करून जादू सारख्या गोष्टी मागे लागले जी श्रध्दा व आचरणात बिघाड करणारी गोष्ट होती. त्यांना जादू ची आवड अशासाठी होती की ते वास्तवतेच्या दुनियेत नव्हे तर जादूच्या दुनियेत राहू इच्छित होते.

ज्या लोकांनी जादूला धंदा बनविले होते ते लोकांना हे सांगून बहकावित की हजरत सुलैमान यांनी जे अद्वितीय राज्य कायम केले होते व ज्यात त्यांनी जिन्नांना हि काबूत ठेवले होते ते त्यांना जादू मुळेच प्राप्त झाले होते. काही लोकांनी ‘अला मुल्के सुलैमान’ चा अर्थ ‘शुलैमानच्या कारकिर्दीत, असा केला आहे. परंतु हे अर्थ ना शब्दकोशानुसार उचित आहे ना प्रसंगानुरुप शब्दकोशात ‘मुल्क’ चा अर्थ राज्य असा आहे. कारकीर्द नव्हे आणि शब्द ‘अला’ इथे निर्देश करण्याचा अर्थाने वापरला गेला आहे अगदी त्याच प्रकारे जसे **‘‘यफतरुन अलल्लाहिल कजिब’’** ‘‘अल्लाहकडे खोट्या गोष्टीचा निर्देश करतात’’ इथे ‘अला’ निर्देश करण्याच्या अर्थाने वापरला गेला आहे. (पहा-तफसीर राजी) आणि हजरत सुलेमान यांनी तर जिन्नांना काबूत ठेवले होते व त्यांचे राज्य एक पैगंबराने कायम केलेले राज्य होते ज्यात उपद्रव प्रिय लोकांना हे स्वातंत्र्य कोठून मिळू शकत होते की त्यांनी लोकांत जादूचा प्रसार करुन त्यांना मार्गभ्रष्ट करावे.

१ २ ०. हजरत सुलैमान पैगंबर होते. त्यांचा काळ इसवी सना पूर्वी दहावे शतक हा होता. त्यांचे साम्राज्य मोठे भव्य होते. हवा,पक्षी व जिन्नांना त्यांच्या नियंत्रणात दिले गेले होते अर्थात हे राज्य त्यांना अल्लाहच्या विशेष कृपेने लाभले होते आणि त्यांनी जी अतिभव्य कार्ये पार पाडली ती निव्वळ धार्मिक उदिष्टां साठी होती. या स्वच्छ शुध्द उदिष्टांसाठी त्यांनी सादनेहि स्वच्छ शुद्ध अंगिकारलीत. परंतु त्यांना जे असामान्य सामर्थ्य लाभले होते त्याचे स्पष्टीकरण नंतरच्या काळात उपद्रव प्रिय लोकांनी असे करायला सुरवात केली की हे सर्व काही त्यांना जादू व अमलीयात द्वारे लाभले होते. अशा प्रकारे लोकांना सत्यापासून विचलीत करण्यास व त्यांना भ्रम व खुराफ़ातीत टाकण्यासाठी ‘नकशे सुलेमानी’ सारखी बिदअत (धर्मात नवीन शिरकाव झालेली गोष्ट) निर्माण केली गेली जी नंतर यहुदींच्या प्राभावान्वये मुसलमानांच्या एका गटातहि प्रचलीत झाली. आणि काही भ्रम-पूजक तर जिन्नांना काबूत करण्याचे स्वप्न हि पाहत असतात. कुरआन या गोष्टीवर सक्त अंकुश ठेवतो. कारण सर्वश्रेष्ठ अल्लाह आपला ग्रंथ मार्गदर्शन प्राप्ती साठी व आचरण करण्यासाठी अवतरीत करतो. त्याला पाठीमागे टाकून काळ्या जादू टोण्याच्या मागे लागणे अशाच लोकांचे काम होय ज्यांना ना ईश्वराशी काही संबंध आहे ना आखिरत शी.

स्पष्ट असावे की क़ुरआन जादू ला कुफ्र ठरविते आणि यहुदी लोक हज़रत सुलैमान वर ते जादूगार असण्याचा जो आरोप ठेवतात, त्याचे जोरदार खंडन करते व त्यांना कुफ्र पासून मुक्त ठरविते.

१ २ १. हारुत मारुत दोन फरिश्त्यांची नावे आहेत ज्यांना बाबिलमध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहने मनुष्य स्वरुपात लोकांच्या कसोटी साठी पाठविले होते. हा त्याच प्रकारचा मामला होय जसा लूत जनसमूहा कडे फरिश्ते सुंदर मुलांच्या रुपाने त्यांच्या कसोटी साठी पाठविले गेले होते. (पहा सूरह हिज्र टीप. ६२)

परंतु ही गोष्ट उचित नव्हे की या फरिशत्यांवर जादू सारखी एखादी गोष्ट अवतरीत केली गेली होती यहुदी लोकांनी जादूला योग्य ठरविण्या साठी तिचा संबंध हजरत सुलैमान शी जोडला होता. आणि हारुत व मारुत फरिश्त्यांशी देखील. परंतु क़ुरआन ने या दोन्ही गोष्टीचे खंडन केले.

एके काळी बाबील मध्ये जादू टोण्याचे मोठे स्तोम होते आणि हे स्तोम नाहीसे करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने दोन फरिश्त्यांना मनुष्य स्वरुपात या जन समूहा कडे पाठविले होते आणि त्यांनाही कामगिरी सोपवली की त्यांनी लोकांना जादूची हकीगत व तिच्या विनाशकारीते विषयी सांगावे, या साठी की लोकांनी परावृत्त व्हावे, परंतु जेव्हा त्यांनी जादूची वास्तविकता स्पष्ट करायला सुरवात केली तेव्हा ज्यांच्या बुद्धित वक्रता होती ते या पासून उलट लाभ घेऊ लागले. म्हणजे जादूगारीय पद्धतींचा अवलंब करुन पती-पत्नीच्या दरम्यान फूट पाडण्याचे काम करु लागले. उघड आहे अशा कामां मध्ये त्याच लोकांना गोडी असू शकते जे विकृत मनोवृत्तीचे. निकृष्ट विचारसरणीचे असावेत. असे लोकांमध्ये हे धैर्य कोठून असणार की अल्लाहच्या ग्रंथास बाळगणारे व्हावे? हारुत व मारुत फरिश्ते होते आणि फरिश्त्यां बाबत हे माहीत आहे की ते अतिशय स्वच्छ शुद्ध व अल्लाहचे आज्ञाधारक असतात, तेव्हा जे निरर्थक किस्से त्यांच्या संबंधाने काही कथनांमध्ये आहेत. ते कदापि विश्वासाई नाहीत कारण या गोष्टी फरिश्त्यांच्या गुणवैशिष्टयां विरुध्द आहेत.

खेदाची बाब अशी की या बिनबुडाच्या कथनांनी ज्यात जुहराचा निरर्थक किस्सा निवेदिला गेला आहे भाष्यात स्थान मिळविले!

१२२. हा यहुदींच्या खोडसळ कृत्यांचा उल्लेख आहे जे क़ुरआन व हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरुध्द ते करीत होते. काही मुनाफीक (दांभिक) यहुदी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बैठकीत आपल्या दांभिकीय उद्देश्यां साठी सहभागी होत व जेव्हा एखाद्या गोष्टी कडे लक्ष वेधण्याची गरज भासे तेव्हा ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून 'राइना' म्हणत. ज्याचा अर्थ 'आमचा मुलाहीजा राखा' इंग्रजीत आपण I beg your pardon म्हणतो त्या प्रमाणे. परंतु ते या शब्दाला थोडे ओढून ताणून उच्चारीत ज्यामुळे हा शब्द 'राईना' असा होत असे ज्याचा अर्थ 'आमचा गुराखी'' असा आहे. त्यांच्या या खोडसाळ पणास लक्षात घेता मुसलमानांना ही ताकीद केली गेली की त्यांनी हा शब्दप्रयोग करु नये किबहुना ''उन्जुरना'' म्हणावे. ज्याचा अर्थ 'आमच्या कडे लक्ष द्या' यात उपरोधाला कसलाहि वाव नव्हता. यावरुन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बैठकीतील प्रामणिक व दांभिक लोकांच्या दरम्यान फरक निर्माण झाला.

**नमाज़ कायम करा. आणि ज़कात द्या. जो सदाचारही तुम्ही आपल्या मरणोत्तर जीवनासाठी कराल तो तुम्हांला अल्लाहजवळ असलेला आढळून येईल. जे काही तुम्ही करीत आहात ते सर्व अल्लाहच्या नज़रेत आहे.** *(अल-क़ुरआन)*

१०५. ज्या लोकांनी इन्कार केला, मग ते अहले किताब (ग्रंथधारक) असोत वा अनेकेश्वरवादी, ते इच्छित नाहीत की तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर कोणतीही मंगलगोष्ट उतरावी. परंतु अल्लाह ज्याला इच्छितो त्याला आपल्या कृपेसाठी निवडतो. अल्लाह महान कृपानिधी आहे.

مَا يَوَدُّ الَّذِيْنَ كَفَرُوْا مِنْ اَهْلِ الْكِتٰبِ وَلَا الْمُشْرِكِيْنَ
اَنْ يُّنَزَّلَ عَلَيْكُمْ مِّنْ خَيْرٍ مِّنْ رَّبِّكُمْ ؕ وَاللّٰهُ يَخْتَصُّ
بِرَحْمَتِهٖ مَنْ يَّشَآءُ ؕ وَاللّٰهُ ذُو الْفَضْلِ الْعَظِيْمِ ﴿١٠٥﴾

१०६. आम्ही ज्या आयतीला रद्द करतो किंवा जिचे विस्मरण घडवून आणतो तेव्हां तिच्यापेक्षा चांगली वा तिच्यासारखी दुसरी आयत घेऊन येतो. [१२३] काय तुम्हांला माहीत नाही की अल्लाहचे प्रत्येक गोष्टीवर प्रभुत्व आहे ?

مَا نَنْسَخْ مِنْ اٰيَةٍ اَوْ نُنْسِهَا نَاْتِ بِخَيْرٍ مِّنْهَآ اَوْ مِثْلِهَا ؕ اَلَمْ
تَعْلَمْ اَنَّ اللّٰهَ عَلٰى كُلِّ شَیْءٍ قَدِيْرٌ ﴿١٠٦﴾

१०७. काय तुम्ही जाणत नाही की जमीन व आकाशांचे शासन अल्लाहसाठीच आहे, आणि त्याच्याशिवाय तुमचा न कोणी मित्र आहे न मदतनीस ?

اَلَمْ تَعْلَمْ اَنَّ اللّٰهَ لَهٗ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ
وَمَا لَكُمْ مِّنْ دُوْنِ اللّٰهِ مِنْ وَّلِيٍّ وَّلَا نَصِيْرٍ ﴿١٠٧﴾

१०८. काय तुम्ही आपल्या पैगंबरांना अशा प्रकारचे प्रश्न विचारुं इच्छिता जशा प्रकारचे प्रश्न [१२४] यापूर्वी मूसाना विचारण्यात आले होते? आणि जो माणूस ईमानाला कुफ्र (इन्कार) ने बदलतो तो सरळ मार्गापासून भटकला.

اَمْ تُرِيْدُوْنَ اَنْ تَسْـَٔلُوْا رَسُوْلَكُمْ كَمَا سُئِلَ مُوْسٰى
مِنْ قَبْلُ ؕ وَمَنْ يَّتَبَدَّلِ الْكُفْرَ بِالْاِيْمَانِ فَقَدْ ضَلَّ
سَوَآءَ السَّبِيْلِ ﴿١٠٨﴾

१०९. पुष्कळसे ग्रंथधारक हे इच्छितात की, तुम्ही ईमान आणल्यानंतर पुन्हा तुम्हाला कुफ्र (इन्कार) कडे परत घेऊन जावे. सत्य त्यांच्यावर चांगल्याप्रकारे उघड झाले असता देखील निव्वळ मत्सरानें प्रेरीत होऊन (ते असे इच्छितात). अल्लाह आपला निर्णय जाहीर करीपर्यंत तुम्ही सहनशीलतेने व क्षमाशील वृतीने वागा. खात्री बाळगा, अल्लाहचे प्रत्येक गोष्टीवर प्रभुत्व आहे.

وَدَّ كَثِيْرٌ مِّنْ اَهْلِ الْكِتٰبِ لَوْ يَرُدُّوْنَكُمْ مِّنْ بَعْدِ
اِيْمَانِكُمْ كُفَّارًا ۚۖ حَسَدًا مِّنْ عِنْدِ اَنْفُسِهِمْ مِّنْ بَعْدِ
مَا تَبَيَّنَ لَهُمُ الْحَقُّ ۚ فَاعْفُوْا وَاصْفَحُوْا حَتّٰى يَاْتِيَ
اللّٰهُ بِاَمْرِهٖ ؕ اِنَّ اللّٰهَ عَلٰى كُلِّ شَیْءٍ قَدِيْرٌ ﴿١٠٩﴾

११०. नमाज़ कायम करा. आणि ज़कात द्या. जो सदाचारही तुम्ही आपल्या मरणोत्तर जीवनासाठी कराल तो तुम्हांला अल्लाहजवळ असलेला आढळून येईल. जे काही तुम्ही करीत आहात ते सर्व अल्लाहच्या नजरेत आहे.

وَاَقِيْمُوا الصَّلٰوةَ وَاٰتُوا الزَّكٰوةَ ؕ وَمَا تُقَدِّمُوْا
لِاَنْفُسِكُمْ مِّنْ خَيْرٍ تَجِدُوْهُ عِنْدَ اللّٰهِ ؕ اِنَّ اللّٰهَ بِمَا تَعْمَلُوْنَ
بَصِيْرٌ ﴿١١٠﴾

१२३. हे यहुदींच्या या आक्षेपास उत्तर आहे की जेव्हा कुरआन 'तौरात' ला अल्लाहचा ग्रंथ असल्याचे मान्य करते तेव्हा त्याच्या आदेशांना रद्द करण्याचा अर्थ काय? काय ईश्वर आपल्या शरीयतीस बदलतो? कुरआन ने याचे हे उत्तर दिले की तौरातचा जो कायदा रद्द केला जात आहे किंवा ज्याला यहुदी विसरले आहेत. त्या जागी त्याहून चांगला असा कायदा आणला जात आहे. अशा प्रकारे अल्लाह आपल्या शरीअत संदर्भात तुम्हाला उन्नती कडे घेऊन जात आहे.

दुसरे असे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने बनी इसराईलला जी शरीयत प्रदान केली होती त्यासह अल्लाहला कोणत्याही गोष्टीने बांधून ठेवले नव्हते की त्याने आपल्या एक शरीयतच्या जागी दुसरी शरीयत अवतरीत न करावी. तो सर्व सृष्टीचा सत्ताधिकारी आहे व वाटेल तेव्हा एका नियमाच्या जागी दुसरा नियम देऊ शकतो. तुम्हाला या बाबत आक्षेप घेण्याचा काही हि अधिकार नाही. कारण तो तुमचा स्वामी आहे व तुम्ही त्याचे दास आहात.

स्पष्ट असावे की ही गोष्ट शरीयत संबंधी आहे आणि वस्तुस्थिती अशी की जगात वेगवेगळ्या काळात व विभिन्न देशात जे पैगंबर अल्लाह तर्फे आलेत त्यांच्या शरीयतीच्या दरम्यान फरक राहीला आहे. परंतु मूल धर्म सर्वांचा एकच आहे अर्थात इस्लाम यास्तव एकेश्वरवाद प्रेषित्व व आखिरत विषयी वेगवेगळ्या प्रेषितांच्या शिकवणीत काहीच फरक नाही. या मूलभूत गोष्टी व सत्य संदर्भात सर्वांची एकमताने हीच शिकवण होती, जी क़ुरआन प्रस्तुत करीत आहे. नादान लोक शरीयतीच्या फरकास धर्माचा फरक समजून हा विचार करु लागतात की अल्लाह तर्फे वेगवेगळे धर्म अवतरले होते, म्हणून ज्या धर्माचा हि मनुष्य स्वीकार करील, अल्लाह त्याच्याशी राजी होईल. परंतु वस्तुस्थिती अशी की अल्लाह तर्फे आदम पासून अंतिम मनुष्या पर्यंत, किंबहुना क़ियामती पावेतो पक्त एकच धर्म इस्लाम अवतरीत होत गेला मात्र शरीयती (धर्म-संहिता) परिस्थिती व काळानुसार वेगवेगळी पाठवली जात राहीली. आणि आता हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) यांना अंतिम पैगंबर बनवून पाठविले गेले. त्यांना जी शरीअत प्रदान केली गेली ती अंतिम होय; व कियामती पावेतो आहे.

स्पष्ट असावे की मागील शरीयती मध्ये आणि ह्या अंतिम शरीअतीत किती तरी आदेश समाईक आहेत, तरी सुद्धा मागील शरीअतीचे काही आदेश जे विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट हेतु लक्षात घेता दिले गेले होते. रद्द केले गेले आहेत. उदाहरणार्थ यहुदीना सब्त (शनीवार) साजरा करण्याचा आदेश दिला गेला होता परंतु आता त्या जागी नमाज़े जुमा 'अदा करण्याचा आदेश दिला गेला आहे. जो अधिक श्रेष्ठत्व बाळगणारा आहे. तसेच प्रथम बैतुल मक्दीस ला किब्ला ठरविले गेले होते, परंतु आता मसजिदे हराम (काबा) ला किब्ला ठरविले गेले आहे. जी सर्वाधिक श्रेष्ठ मसजिद आहे. यास्तव आता अनुसरणास आवश्यक अशी शरीअत तीच होय जी पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रदान केली. ही शरीअत परिपूर्ण आहे अणि शरीअत - क्रमाची अंतिम आवृत्ति होय. अर्थात मुक्ति हयाच शरीअतीच्या पालना वर अवलंबून आहे.

१२४. या प्रश्नांचे स्वरुप आक्षेपांचे होते.

وَقَالُوا لَنْ يَدْخُلَ الْجَنَّةَ إِلَّا مَنْ كَانَ هُودًا
أَوْ نَصَارَىٰ ۗ تِلْكَ أَمَانِيُّهُمْ ۗ قُلْ هَاتُوا بُرْهَانَكُمْ إِنْ كُنْتُمْ
صَادِقِينَ ﴿١١١﴾

१११. ते म्हणतात की, जे यहुदी आहेत वा ईसाई आहेत त्यांना सोडून इतर कोणीही जन्नत (स्वर्ग) मध्ये दाखल होणार नाहीत. ही निव्वळ त्यांची अभिलाषा आहे.[१२५] म्हणा, जर तुम्ही खरे असाल तर याचा पुरावा सादर करा.

بَلَىٰ مَنْ أَسْلَمَ وَجْهَهُ لِلَّهِ وَهُوَ مُحْسِنٌ فَلَهُ أَجْرُهُ عِنْدَ
رَبِّهِ وَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿١١٢﴾

११२. का नाही ? जो कोणी स्वत:ला अल्लाहच्या स्वाधीन करील व सदाचाराचा मार्ग स्वीकारील, त्याच्यासाठी त्याच्या पालनकर्त्याजवळ त्याचा मोबदला (फळ) आहे आणि अशा लोकाना कसल्याही प्रकारचे भय राहणार नाही, व ते दु:खी ही होणार नाहीत. [१२६]

وَقَالَتِ الْيَهُودُ لَيْسَتِ النَّصَارَىٰ عَلَىٰ شَيْءٍ وَقَالَتِ النَّصَارَىٰ
لَيْسَتِ الْيَهُودُ عَلَىٰ شَيْءٍ وَهُمْ يَتْلُونَ الْكِتَابَ ۗ كَذَٰلِكَ قَالَ
الَّذِينَ لَا يَعْلَمُونَ مِثْلَ قَوْلِهِمْ ۚ فَاللَّهُ يَحْكُمُ بَيْنَهُمْ يَوْمَ
الْقِيَامَةِ فِيمَا كَانُوا فِيهِ يَخْتَلِفُونَ ﴿١١٣﴾

११३. यहुदी म्हणतात. ईसाई काहीच नाहीत आणि ईसाई म्हणतात यहुदी काहीच नाहीत. आणि हे दोघेही ग्रंथाचे पठण करीत असतात ! अशाच प्रकारची गोष्ट ते लोक देखील म्हणतात ज्याना (ग्रंथाचे)ज्ञान नाहीं.[१२७]तर मग अल्लाह कियामतीच्या दिवशी त्यांच्या मतभेदाबद्दलचा निर्णय जाहीर करील.[१२८]

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنْ مَنَعَ مَسَاجِدَ اللَّهِ أَنْ يُذْكَرَ فِيهَا اسْمُهُ
وَسَعَىٰ فِي خَرَابِهَا ۚ أُولَٰئِكَ مَا كَانَ لَهُمْ أَنْ يَدْخُلُوهَا
إِلَّا خَائِفِينَ ۚ لَهُمْ فِي الدُّنْيَا خِزْيٌ وَلَهُمْ فِي الْآخِرَةِ عَذَابٌ
عَظِيمٌ ﴿١١٤﴾

११४. आणि त्याहून अधिक अत्याचारी कोण असू शकेल जो अल्लाहच्या मसजिदीमध्ये त्याच्या नामाचे स्मरण करण्यास प्रतिबंध करतो ?[१२९] आणि त्यांना ओसाड पाडण्यासाठी धडपडतो ? अशा लोकांचे त्यामध्ये प्रवेश करणेच योग्य नाही. भय बाळगून त्यानी प्रवेश केला तर हरकत नाही. त्यांच्यासाठी या जगातही अवहेलना आहे. आणि अखिरत मध्ये देखील भयंकर शिक्षा आहे. [१३०]

وَلِلَّهِ الْمَشْرِقُ وَالْمَغْرِبُ ۚ فَأَيْنَمَا تُوَلُّوا فَثَمَّ وَجْهُ اللَّهِ ۚ إِنَّ
اللَّهَ وَاسِعٌ عَلِيمٌ ﴿١١٥﴾

११५. आणि अल्लाहसाठीच पूर्व व पश्चिम आहेत. [१३१] ज्या दिशेकडे तुम्ही वळाल त्या दिशेकडे अल्लाहचा रोख आहे.[१३२] अल्लाह सर्वव्यापी [१३३] आणि सर्वज्ञानी होय.

وَقَالُوا اتَّخَذَ اللَّهُ وَلَدًا ۗ سُبْحَانَهُ ۖ بَلْ لَهُ مَا فِي السَّمَاوَاتِ
وَالْأَرْضِ ۖ كُلٌّ لَهُ قَانِتُونَ ﴿١١٦﴾

११६. हे म्हणतात की अल्लाहने पुत्र बनविला आहे. अल्लाह अशा गोष्टींपासून पवित्र आहे. इतकेच नव्हे तर आकाशामधील आणि जमीनीतील सर्वकाही त्याच्याच मालकीचे आहे. सर्वकाही त्याच्या आज्ञेत आहे.[१३४]

१२५. म्हणजे या त्यांच्या मनघडत गोष्टी आहेत. अल्लाहने असे कोठेही फर्माविलेले नाही की जो यहुदी अगर ईसाई असेल त्याच्यासाठी जन्नत आहे आणि दुसऱ्यांचेसाठी नाही. धार्मिक गटबाजीच्या या गोष्टी लोकांनी आपणाहून रचलेल्या आहेत. आणि त्यांचा अल्लाहशी संबंध जोडून जीवन पद्धतीच्या सत्यतेवर पडदा टाकला आहे व तिला लोकांच्या नजरेत शंकास्पद बनवून सोडले आहे.

१२६. म्हणजे नजात (मुक्ती) प्राप्त करण्यासाठी आणि जन्नतमध्ये दाखल होण्यास पात्र ठरण्यासाठी आवश्यक आहे की माणसाने स्वत:ला पूर्णपणे ईश्वराच्या स्वाधीन केले पाहीजे. हाच अर्थ मुस्लिम होण्याचा आहे. दुसरे हे की, धर्मशास्त्राच्या आदेशाचे पालन निष्ठेने व प्रामाणिकपणे करावे. ही एक मूलभूत गोष्ट आहे आणि सर्व पैगंबरांची शिकवण एकमताने हीच होती.

१२७. अभिप्रेत अरबस्तानचे अनेकेश्वरवादी आहेत, ज्यांच्याजवळ ग्रंथ नव्हता व जे अशिक्षित होते.

१२८. एका धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्माच्या अनुयायांना तत्वहीन म्हणत असत. यामुळे धर्माच्या अनुयायांमध्ये मोठा वाद निर्माण झाला होता. पवित्र क़ुरआन सांगत आहे की जेथे पुराव्याने एखादी गोष्ट सत्य सिद्ध करण्याचा प्रश्न आहे तेथे पवित्र कुरआनने आपली गोष्ट उत्कृष्टपणे सिद्ध केलेली आहे. आता जर कोणती उणीव शिल्लक रहात असेल तर ती ही की अल्लाह ने न्यायालय भरवून या वादाचा सडेतोड निर्णय घ्यावा. आणि माणसाने स्वत:च्या डोळ्यांनी पहावे की हे सत्य आहे आणि जे याच्या विरुद्ध आहे ते खोटे आहे. पवित्र क़ुरआन सांगत आहे की, या सडेतोड निर्णयासाठी अल्लाहने कियामतीचा दिवस निश्चित केलेला आहे. त्या दिवशी माणसाला सत्य काय आहे व खोटे काय आहे हे समजून येईल एवढेच नव्हेतर प्रत्येकाची परिणतिहि समोर दिसेल.

१२९. यहुदी लोकांनी आपसातील वैमनस्याच्या आधारावर मस्जिदी नष्ट करण्याचे उद्दिष्ट बनविले होते व त्याप्रमाणे त्यांनी मस्जिदी वैराण करून टाकल्या. त्या घटनेकडे येथे इशारा केला गेला आहे. त्याचप्रमाणे, मक्केच्या कफ़िरांनी मस्जिदे हराम (काबा मस्जिद) मध्ये प्रार्थना करण्यास मुसलमानांना प्रतिबंध केला होता. त्याच्या या अत्याचाराकडेही येथे इशारा करण्यात आला आहे. याबरोबर मस्जिदीचे पवित्र्य व प्रतिष्ठा पण स्पष्ट करण्यात आलेली आहे. मस्जिदी या अल्लाहचे घर आहेत आणि म्हणून त्यामध्ये प्रवेश करण्याचा दंगेखोराना व दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना हक्क नाही. विध्वसाच्या हेतुने नव्हे तर परमेश्वराचे भय बाळगून मस्जिदीत प्रवेश करावा.

१३०. जे लोक अल्लाहच्या प्रार्थनास्थानांचा आदर करीत नाहीत. व त्यांना ओसाड पाडण्याचा प्रयत्न करीत असतात किंवा भांडणतंट्यांनी व विध्वंसक कृत्यांनी त्यांना नष्ट करतात वा त्यांचा अनादर करतात त्यांना पवित्र क़ुरआन या जगात अवहेलना व आखिरत मध्ये भयंकर शिक्षेची धमकी एकवीत आहे. यावरून हे स्पष्ट होते की, जे लोक ईश्वराच्या प्रार्थना स्थानांचा आदर करीत नाहीत ते स्वत: आदरास पात्र नाहीत. त्यांच्या नशिबी अवहेलना व अपमानाचे जीणे आहे. इस्लामशी शत्रूत्व वा मुसलमानाशी शत्रूत्व या आधारावर जो कोणी अशी निद्य हरकत करतो, तो वास्तविकपणे आपल्या स्वत:च्या अवहेलनेची व नाशाची तयारी करीत असतो. विध्वंसकांना याची जाणीव असती तर!

१३१. यहुदी व ईसाई या दोघांचा 'किब्ला'(ज्या स्थानाकडे वळून प्रार्थना करीत होते ते स्थान) ''बैतुलमुकद्दस'' (जेरुसलेमची मस्जिद) होता. ही मस्जिद पॅलेस्टाईन मध्ये आहे.यांच्या पूर्वेकडील भागात हज़रत मरीयमने 'ऐतिकाफ' (ईश्वराच्या प्रार्थनेसाठी ध्यानस्थ बसणे) केला होता. म्हणून ईसाई लोकांनी पूर्वेकडील बाजूला 'किब्ला' म्हणून निवडले आणि बहुतेक करुन यांच्या विरोधात यहुदी लोकानी पश्चिम बाज़ुला 'क़िब्ला' बनविला. या आयतीमध्यें याच पूर्व-पश्चिम वादाकडे इशारा आहे.

१३२. अल्लाह कोणत्याही दिशेला अगर स्थानामध्ये बंदिस्त नाही. तो तर प्रत्येक जागी व प्रत्येक दिशेला आहे. नमाज़साठी एखादी दिशा निश्चित करण्याचा अर्थ हा नव्हे की, परमेश्वर फक्त त्या दिशेलाच आहे. दिशा तर धार्मिक हिताला समोर ठेवून निश्चित केली जाते आणि म्हणून ईश्वराने यापूर्वी एका खास दिशेकडे वळून नमाज़ अदा करण्याचा हुकूम दिला होता आणि आता त्यानें दुसऱ्या दिशेकडे वळून नमाज अदा करण्याची आज्ञा दिली आहे तर यामध्ये वादविवाद करण्याचा काही प्रश्न नाही. मुख्य गोष्ट दिशा नव्हे तर ईश्वराची आज्ञा ही आहे.

१३३. म्हणजे त्याचे ईश्वरत्व ही विशाल आहे आणि त्याची दृष्टी ही विशाल आहे. त्याला स्वत:वरुन अंदाज करून एखाद्या संकुचित क्षेत्रात मर्यादीत समजणे किंवा संकुचित दृष्टीचा समजणे मूर्खपणाशिवाय दुसरे काही नाही.

१३४. ज़मिन व आकाशावरील सर्व वस्तू ईश्वराच्या मालकीच्या आहेत. ईश्वराच्या दास्यातून व त्याच्या भक्तिपासून स्वतंत्र असण्याची कोणाचीही योग्यता नाही सर्वजण त्यांच्या आज्ञेच्या आधीन आहेत.आणि म्हणून कोण त्याची मुले मुली कसे होऊ शकतात?तो या शिर्क (अनेकेश्वरवाद) पासून पवित्र आहे. उच्च व श्रेष्ठ आहे.

بَدِيْعُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ وَاِذَا قَضٰٓى اَمْرًا فَاِنَّمَا يَقُوْلُ لَهٗ كُنْ فَيَكُوْنُ ﴿١١٧﴾

११७. तो आकाशाचा व पृथ्वीचा निर्माता आहे. आणि तो जेव्हा एखाद्या गोष्टीचा निर्णय घेतो तेव्हा तो फक्त त्यासाठी आज्ञा देतो की, हो. आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.

وَقَالَ الَّذِيْنَ لَا يَعْلَمُوْنَ لَوْلَا يُكَلِّمُنَا اللّٰهُ اَوْ تَاْتِيْنَآ اٰيَةٌ ۭ كَذٰلِكَ قَالَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ مِّثْلَ قَوْلِهِمْ ۭ تَشَابَهَتْ قُلُوْبُهُمْ ۭ قَدْ بَيَّنَّا الْاٰيٰتِ لِقَوْمٍ يُّوْقِنُوْنَ ﴿١١٨﴾

११८. ज्या लोकांना ज्ञान नसते ते म्हणतात की, अल्लाह आमच्याशी बोलत कां नाही ?अगर ऐखादी निशाणी आमच्याजवळ कां येत नाही ?[१३५] याचप्रकारे, त्यांच्यापूर्वीचे लोकदेखील एशाच गोष्टी बोलत असत. त्या सर्वांची मने (बुद्धि) एकसारखीच आहेत. विश्वास ठेविणाऱ्यासाठी आम्ही निशाण्या चांगल्याप्रकारे स्पष्ट केल्या आहेत.

اِنَّآ اَرْسَلْنٰكَ بِالْحَقِّ بَشِيْرًا وَّنَذِيْرًا ۙ وَّلَا تُسْـَٔـلُ عَنْ اَصْحٰبِ الْجَحِيْمِ ﴿١١٩﴾

११९. (हे पैगंबरा !) आम्ही तुम्हाला सत्याबरोबर खुशखबर देणारा आणि सावध करणारा बनवून पाठविले आहे. आणि तुमच्याकडून दोजखवाशी लोकांबद्दल विचारणा केली जाणार नाही [१३६]

وَلَنْ تَرْضٰى عَنْكَ الْيَهُوْدُ وَلَا النَّصٰرٰى حَتّٰى تَتَّبِعَ مِلَّتَهُمْ ۭ قُلْ اِنَّ هُدَى اللّٰهِ هُوَ الْهُدٰى ۭ وَلَىِٕنِ اتَّبَعْتَ اَهْوَاۗءَهُمْ بَعْدَ الَّذِيْ جَاۗءَكَ مِنَ الْعِلْمِ ۙ مَا لَكَ مِنَ اللّٰهِ مِنْ وَّلِيٍّ وَّلَا نَصِيْرٍ ﴿١٢٠﴾

१२०. जोपर्यंत तुम्ही त्यांच्याच पद्धतीने वागणार नाही, तोपर्यंत न यहुदी तुमच्याशी खुष होतील न ईसाई. त्यांना सांगा अल्लाहचे मार्गदर्शन हेच खरे मार्गदर्शन आहे आणि तुम्ही तुमच्याजवळ आलेल्या या ज्ञानानंतर देखील त्यांच्या इच्छेनुसार आचरण केले तर तुमच्या साठी अल्लाहच्या पकडीपासून वाचविणारा न कोणी मित्र असेल न कोणी मदतनीस.

اَلَّذِيْنَ اٰتَيْنٰهُمُ الْكِتٰبَ يَتْلُوْنَهٗ حَقَّ تِلَاوَتِهٖ ۭ اُولٰۗىِٕكَ يُؤْمِنُوْنَ بِهٖ ۭ وَمَنْ يَّكْفُرْ بِهٖ فَاُولٰۗىِٕكَ هُمُ الْخٰسِرُوْنَ ﴿١٢١﴾

१२१. ज्या लोकांना आम्ही ग्रंथ प्रदान केला आहे, ते लोक त्याचे अशा प्रकारे पठण करतात की जसे पठण करण्याचा त्याचा हक्क आहे. असे लोक यावर (पवित्र कुरआनावर) ईमान आणतात. [१३७] आणि जे लोक याचा इन्कार करतील तेच तोट्यात राहतील.

يٰبَنِىْٓ اِسْرَاۗءِيْلَ اذْكُرُوْا نِعْمَتِىَ الَّتِىْٓ اَنْعَمْتُ عَلَيْكُمْ وَاَنِّىْ فَضَّلْتُكُمْ عَلَي الْعٰلَمِيْنَ ﴿١٢٢﴾

१२२. हे बनी ईस्त्राईलानो ! आठवण करा माझ्या त्या कृपाप्रसादाची ज्याने मी तुम्हंला उपकृत केले आणि हे की मी तुम्हाला जगाच्या समाजांमध्ये प्राधान्य दिले होते.

१३५. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हा होता की, ईश्वराने प्रत्यक्ष त्यांच्याबरोबर बोलावे; किंवा त्यांना असा एखादा चमत्कार दाखवावा की त्यांची हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे त्याचे पैगंबर आहेत याबद्दल खात्री व्हावी. याला हे उत्तर दिले गेले आहे की, ही मागणी काही नवी नव्हे. यापूर्वीचे मार्गभ्रष्ट समाज देखील अशाच प्रकारची मागणी करीत असत. दैवी चमत्काराची गोष्ट सोडून, राहीली पैगंबर असल्याबद्दल पुरावा सादर करणाऱ्या, निशाण्या दाखविण्याची गोष्ट, तर अशा निशाण्या अस्तित्वात आहेतच. आणि सर्वांत मोठी निशाणी पवित्र क़ुरआन ही आहे. हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे अल्लाहचे पैगंबर आहेत याचा स्पष्ट पुरावा. परंतु ज्या लोकांनी स्वीकार न करण्याचा निर्णय घेतला आहे, मग ते कोणतीही निशाणी पाहोत, कधीही स्वीकार करणार नाहीत.

१३६. पैगंबरांची जबाबदारी ईश्वराचा संदेश पोहचविणे. ईमान आणणाऱ्यांना खुशखबरी ऐकविणे आणि इन्कार करणाऱ्यांना दुष्परिणामाबद्दल सावध करणे ही आहे. या उपरान्त जे लोक जहन्नमचा मार्ग अंगिकारातील त्यांच्या आचरणाची कसलीहि जबाबदारी पैगंबरावर राहणार नाही आणि ना त्याना या बाबत जाब द्यावा लागेल.

१३७. अभिप्रेत ग्रंथधारकांमधील सदाचारी लोक आहेत जे निष्ठेने ''तौरात'' व ''इंजील'' चे पठण करतात आणि त्यामधील भविष्यावाणी प्रमाणे पवित्र कुरआन आहे हे पाहून त्यावर ईमान आणतात. आयती वरुन हे हि स्पष्ट झाले की अल्लाहच्या ग्रंथास पढण्याचा हक्क असा की त्याचे अनुसरण केले जावे.

१२३. आणि त्या दिवसाचे भय बाळगा ज्या दिवशी कोणताही जीव दुसऱ्या कोणत्याही जीवाची काही मदत करू शकणार नाही; न कोणापासून नुकसान भरपाई घेतली जाईल; न कोणाला कोणाच्या शिफारसीने फायदा पोहचू शकेल आणि त्यांची कसलीही मदत केली जाणार नाही.

وَاتَّقُوا يَوْمًا لَّا تَجْزِي نَفْسٌ عَن نَّفْسٍ شَيْئًا وَلَا يُقْبَلُ مِنْهَا
عَدْلٌ وَلَا تَنفَعُهَا شَفَاعَةٌ وَلَا هُمْ يُنصَرُونَ ﴿١٢٣﴾

१२४. आणि आठवा जेव्हा इब्राहीमना त्यांच्या पालनकर्त्याने काहीबाबतीत अजमाविले आणि त्यांनी त्या पूर्ण करून दाखविल्या.[१३८] अल्लाहने फर्माविले. मी तुम्हांला लोकांचा पुढारी (इमाम) बनविणार आहे. इब्राहीमनी विनविले की आणि माझ्या संततीमधून? आज्ञा झाली. माझे हे वचन [१३९] त्या लोकांशी संबंधित नाही जे अत्याचारी असतील.[१४०]

وَإِذِ ابْتَلَىٰ إِبْرَاهِيمَ رَبُّهُ بِكَلِمَاتٍ فَأَتَمَّهُنَّ ۖ قَالَ إِنِّي جَاعِلُكَ
لِلنَّاسِ إِمَامًا ۖ قَالَ وَمِن ذُرِّيَّتِي ۖ قَالَ لَا يَنَالُ عَهْدِي
الظَّالِمِينَ ﴿١٢٤﴾

१२५. आणि आठवा जेव्हा आम्ही या गृहाला [१४१] लोकांच्यासाठी मध्यवर्ति स्थान व शांततेची जागा बनविले. आणि आज्ञा केली की, इब्राहीमच्या स्थानाला नमाज़ची जागा बनवा. आणि इब्राहीम व ईस्माईलना ताकीद केली होती की, माझ्या या गृहाला 'तवाफ' [१४२](प्रदक्षिणा) करणाऱ्यांसाठी,'ऐतिकाफ'[१४३] करणाऱ्यांसाठी (ध्यानस्थ बसणाऱ्यांसाठी) आणि 'रुकूअ' 'सज्दा' [१४४] करणाऱ्यांसाठी पवित्र राखा. [१४५]

وَإِذْ جَعَلْنَا الْبَيْتَ مَثَابَةً لِّلنَّاسِ وَأَمْنًا وَاتَّخِذُوا مِن مَّقَامِ إِبْرَاهِيمَ
مُصَلًّى ۖ وَعَهِدْنَا إِلَىٰ إِبْرَاهِيمَ وَإِسْمَاعِيلَ أَن طَهِّرَا بَيْتِيَ لِلطَّائِفِينَ
وَالْعَاكِفِينَ وَالرُّكَّعِ السُّجُودِ ﴿١٢٥﴾

१२६. आणि जेव्हा इब्राहीमनी प्रार्थना केली की, हे माझ्या पालनकर्त्या ! या शहराला शांततेचे शहर बनव. आणि यामधील रहीवाशापैकी जे अल्लाह व आखिरतवर ईमान आणतील त्यांना फळांचा आहार [१४६] दे. फर्माविले जे इन्कार (कुफ्र) करतील त्यांनाही मी काही दिवस उपजीविकेच्या सामुग्रीचा लाभ उठविण्याची संधि देईन. नंतर त्यांना दोजखच्या शिक्षेकडे फरफटत नेईन आणि ते फार वाईट स्थान आहे.

وَإِذْ قَالَ إِبْرَاهِيمُ رَبِّ اجْعَلْ هَٰذَا بَلَدًا آمِنًا وَارْزُقْ
أَهْلَهُ مِنَ الثَّمَرَاتِ مَنْ آمَنَ مِنْهُم بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ ۖ قَالَ وَمَن
كَفَرَ فَأُمَتِّعُهُ قَلِيلًا ثُمَّ أَضْطَرُّهُ إِلَىٰ عَذَابِ النَّارِ ۖ وَبِئْسَ الْمَصِيرُ ﴿١٢٦﴾

१३८. सर्वश्रेष्ठ अल्लाहने हज़रत इब्राहीम यांना असे काही आदेश दिले ज्यामध्ये त्यांच्या संकल्पाची व दृढविश्वासाची परीक्षा होती. आणि हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम). यांनी त्या आदेशांचे योग्य प्रकारे पालन केले. उदा. त्यांनी अनेकेश्वरवादी वातावरणांत मूर्तिपूजेविरुद्ध आवाज उठविला. आणि या अपराधासाठी जेव्हा त्यांना आगीत टाकण्यात आले, तेव्हा त्यांनी त्यामध्ये निर्भयपणे उडी घेतली. धर्मासाठी- इस्लामसाठी-त्यांनी घरादाराचा आणि देशाचा त्याग केला. सर्वश्रेष्ठ अल्लाह् कडून इशारा मिळताच आपल्या लाडक्या पूत्राचा बळी देण्यास ते तयार झाले. या आणि अशा प्रकारच्या दुसऱ्या महान कार्यामुळे व त्यागामुळे ते एक अत्यंत थोर पुरुष बनले.

१३९. या वचनानुसार सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचे दोघा पूत्रापासून हज़रत इसहाक (अलैहिस्सलाम) व हज़रत इस्माईल (अलैहिस्सलाम) श्रेष्ठ अशी दोन घराणी निर्माण केलो. बनी इसराईल व बनी इस्माईल या दोघांचे श्रेष्ठ पूर्वज हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) हेच होत त्यांना यहुदी, ईसाई आणि मुसलमान हे सर्व आपला धार्मिक पुढारी मानतात. आणि आजही जगाचे बहुसंख्य लोक त्यांना आपला पुढारी मानतात.

१४०. अत्याचारी म्हणजे नास्तिकता व नकाराच्या आहारी जाऊन स्वत:वर अत्याचार केलेले अत्याचारी लोक.

१४१. गृह म्हणजे काबागृह. तौहीद (अेकेश्वरवाद) चे मध्यवर्ती केंद्रस्थान व्हावे म्हणून हे मक्का शहरी निर्मिले गेले. हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) व हज़रत इस्माईल (अलैहिस्सलाम) यांनी सुमारे पांच हज़ार वर्षापूर्वी ईश्वराच्या आज्ञेनें याची निर्मिती केली. आणि यासाठी मक्का शहराच्या भूमिची निवडही ईश्वरानेच केली होती. हेच ते घर आहे ज्याच्यासाठी हज्जची सुरवात झाली. आणि हजरत ईब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या कालापासून हज्जचा हा क्रम सुरू आहे. आणि मुसलमान या काबागृहाकडे तोंड करून नमाज़ अदा करीत असतात.

१४२.'तवाफ' म्हणजे खाने-काबा (काबागृह) भोवती प्रदक्षिणा घालणे. ही एक प्रकारची नमाज़ आहे. आणि याने ईशप्रेमाच्या भावना जागृत होतात.आणि दास (माणूस) भक्ति व आज्ञापालनाच्या भावनेने तल्लीन होऊन जातो. स्पष्ट असो फक्त खानेकाबाच्या तवाफचीच परवानगी आहे.याशिवाय दुसऱ्या कोणत्याही स्थानाच्या-मग ती मस्जिद का असेना-तवाफाला परवानगी नाही.

१४३.'एतिकाफ' म्हणजे मस्जिदीमध्ये प्रार्थनेच्या, उपासनेच्या हेतूने निवास करणे. याची योग्य पद्धत हदीस (पैगंबर वचन ) मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

१४४. 'रुकूअ' व 'सज्दा' ही प्रार्थनेची अत्यंत महत्वाची अंगे आहेत. प्रार्थनेच्या या अंगाचा हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या धर्मशास्त्रामध्ये समावेश होता.

१४५. पवित्र राखणे म्हणजे केवळ बाह्य मलिनते पासून स्वच्छ ठेवणे नव्हे. तर विशेषकरून नास्तिकता व मूर्तिपूजेच्या मलिनतेपासून स्वच्छ ठेवणे होय.

१४६. फळे म्हणजे फक्त फळफळावळच नव्हे. तर यामध्ये अन्नधान्याचाही समावेश होतो. ही प्रार्थना हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम).यांनी यासाठी केली होती. की, मक्केचा प्रदेश हा बिगरशेती विभाग होता शेळ्या व गुरे पाळणे आणि शिकार करणे याशिवाय उपजीविकेचे दुसरे साधन त्याकाळी नव्हते. हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांची ही प्रार्थना मान्य झाली आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने या वाळवंटांत राहणाऱ्यांना फळांचा आहार उपलब्ध करून दिला. हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या प्रार्थनेला लाभलेल्या यशाची प्रचिती आजही येते. मक्का शहरा मध्ये निरनिराळ्या फळांची विपुलता आढळून येते.

१२७. आणि जेव्हा इब्राहीम व इस्माईल हे अल्लाहच्या गृहाच्या भिंती उभारीत होते आणि प्रार्थना करीत होते की, हे आमच्या पालनकर्त्या आमच्याकडून या सेवेचा स्वीकार कर. तूं चांगला एकणारा व चांगला जाणणारा आहेस.

وَإِذْ يَرْفَعُ إِبْرٰهٖمُ الْقَوَاعِدَ مِنَ الْبَيْتِ وَإِسْمٰعِيْلُ ۖ رَبَّنَا تَقَبَّلْ مِنَّا ۖ إِنَّكَ أَنْتَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ﴿١٢٧﴾

१२८. हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हा उभयताना तुझे मुस्लिम (आज्ञाधारक)[१४७] बनव. आणि आमच्या वंशापासून एक असा समाज (उम्मत) निर्माण कर जो तुझा मुस्लिम [१४८] (आज्ञाधारक) असेल. आणि आम्हाला तुझ्या भक्तिचे मार्ग (मनासिक) दाखव. आणि आमची क्षमायाचना (तौबा) कबूल कर. नि:संशय तूच क्षमाशील व दयाशील आहेस.

رَبَّنَا وَاجْعَلْنَا مُسْلِمَيْنِ لَكَ وَمِنْ ذُرِّيَّتِنَآ أُمَّةً مُّسْلِمَةً لَّكَ ۖ وَأَرِنَا مَنَاسِكَنَا وَتُبْ عَلَيْنَا ۚ إِنَّكَ أَنْتَ التَّوَّابُ الرَّحِيْمُ ﴿١٢٨﴾

१२९. हे आमच्या पालनकर्त्या ! त्यांच्यामध्ये त्यांच्या-मधूनच एक असा पैग़ंबर निर्माण कर जो त्याना तुझे आदेश (आयती) ऐकवील आणि त्याना ग्रंथाची व बुद्धिमतेची शिकवण देईल व त्याना शुद्ध करील [१४९] नि:संशय तू प्रभावशाली व बुद्धिमान आहेस. [१५०]

رَبَّنَا وَابْعَثْ فِيْهِمْ رَسُوْلًا مِّنْهُمْ يَتْلُوْا عَلَيْهِمْ اٰيٰتِكَ وَيُعَلِّمُهُمُ الْكِتٰبَ وَالْحِكْمَةَ وَيُزَكِّيْهِمْ ۖ إِنَّكَ أَنْتَ الْعَزِيْزُ الْحَكِيْمُ ﴿١٢٩﴾

१३०. आणि इब्राहीमच्या मार्गापासून त्या माणसाशिवाय दुसरा कोण तोंड फिरवील, ज्यानें स्वतला मूर्खपणाने [१५१] जखडून घेतले आहे ? आम्ही त्यांची या जगातही निवड केली होती आणि आखिरतमध्येही ते सदाचारी लोकांच्या समुदायात असतील.

وَمَنْ يَّرْغَبُ عَنْ مِّلَّةِ إِبْرٰهٖمَ إِلَّا مَنْ سَفِهَ نَفْسَهٗ ۖ وَلَقَدِ اصْطَفَيْنٰهُ فِي الدُّنْيَا ۖ وَإِنَّهٗ فِي الْاٰخِرَةِ لَمِنَ الصّٰلِحِيْنَ ﴿١٣٠﴾

१३१. जेव्हा त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना सांगितले की मुस्लिम हो. तेव्हा त्यांनी सांगितले की मी विश्वाच्या पालनकर्त्याचा मुस्लिम (आज्ञाधारक) [१५२] झालो आहे.

إِذْ قَالَ لَهٗ رَبُّهٗٓ أَسْلِمْ ۙ قَالَ أَسْلَمْتُ لِرَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿١٣١﴾

१३२. आणि इब्राहीमनी याच मार्गावर आचरण करण्याचा उपदेश जातांना आपल्या मुलांना केला होता. आणि हाच अखेरचा उपदेश याकूबनी आपल्या मुलांना केला होता. हे माझ्या मुलानों ! अल्लाहने तुमच्यासाठी हाच दीन (इस्लाम धर्म, इस्लामी जीवन पद्धति) [१५३] निवडला आहे. आणि म्हणून मरेपर्यंत तुम्ही मुस्लिमच रहा. [१५४]

وَوَصّٰى بِهَآ إِبْرٰهٖمُ بَنِيْهِ وَيَعْقُوْبُ ۖ يٰبَنِيَّ إِنَّ اللّٰهَ اصْطَفٰى لَكُمُ الدِّيْنَ فَلَا تَمُوْتُنَّ إِلَّا وَأَنْتُمْ مُّسْلِمُوْنَ ﴿١٣٢﴾

१४७. मुस्लिम म्हणजे अल्लाहचा पूर्णपणे आज्ञधारी, एकनिष्ठ आज्ञाधारक. हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) व हज़रत इस्माईल (अलैहिस्सलाम) मुस्लिम होते. तरीहि त्यांनी प्रार्थना केली की, ईश्वरा! आम्हाला तुझे मुस्लिम बनव. यावरून या गोष्टीवर प्रकाश पडतो की, ते आज्ञाधारीपणा व ताबेदारीच्या उच्च व श्रेष्ठ स्थानाला पोहचूं ईच्छित होते. या महान ऐतिहासिक प्रसंगाचे वेळी त्यांच्या या प्रार्थनेने ही गोष्ट स्पष्ट होते की, त्यांची जीवन पद्धती (दीन) इस्लाम होती. यहुदीमत, ईसाईमत अगर दुसरा कोणताही धर्म त्यांच्या धर्म नव्हता.

१४८. त्यांच्या या प्रार्थनेचा स्वीकार झाला. परिणामस्वरूप बनी इस्माईलच्या घराण्यात हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जन्मास आले. आणि त्यांच्या अनुयायानी आज्ञाधारक (मुसलमान) समाजाची भूमिका अंगिकारीली.

१४९. येथे पैगंबरांची चार कर्तव्ये नमूद आहेत. एक अल्लाहच्या आयती ऐकविणे. म्हणजे पवित्र कुरआनच्या आयती. ज्या अल्लाहच्या निशाण्या व प्रमाण आहेत. त्या ऐकविणे यास्तव की, ईश्वराचा संदेश सप्रमाण लोकांपर्यंत पोंहचावा आणि त्यांनी यावर विचार करून अल्लाहच्या ग्रंथावर ईमान आणावे. दुसरे ग्रंथाची शिकवण देणे ग्रंथ म्हणजे पवित्र कुरआन आणि याप्रसंगी विशेषेकरून शरियतचे-धर्मशास्त्र,चे-आदेश अभिप्रेत आहेत. जे लोक ईमान आणतात त्यांना हे पैगंबर अल्लाहचे आदेश, कायदे नियम यांची शिकवण देतात कारण लोकांनी अल्लाहच्या शरीयतीनुसार जीवन जगावे. तिसरे. बुद्धीमतेची शिकवण बुद्धीमत्ता म्हणजे शहाणपणाच्या गोष्टी. अदेश व नियमांचे सार, त्यांचा आत्मा त्यांचा फायदेशिरपण, व त्यांचे उद्दीष्ट यांचे योग्य ज्ञान पैगंबर आपल्या अनुयायांना देतात. चौथे तज़किया म्हणजे शुद्ध, पवित्र करणे. हा या साऱ्या गोष्टींचा उद्देश आहे. तज़किया म्हणजे शुद्ध करणे, विकसित करणे पैगंबर माणसाच्या श्रद्धा, नीति, आचार व त्यांच्या अंतरंगाला व बह्यारुपाला स्वर्थापासून शुद्ध करतात. आणि त्यांच्या निति व आचाराला विकसित करुन श्रेष्ठत्वाप्रत पोहचवितात.

१५०. अल्लाह प्रभावशाली व बुद्धिमान आहे. येथे या गोष्टीकडे इशारा आहे की,सर्वश्रेष्ठ अल्लाह विश्वाची व्यवस्था पूर्ण प्रभावाने, सामर्थ्याने व अधिकाराने पहात आहे. तो प्राभावशाली आहे याचा अर्थ हा नव्हे की, तो अंदाधुंद पद्धतीने वाटेल ते करीत आहे. तो तर बुद्धिमान आहे. आणि म्हणून त्यांचे कोणतेही कार्य ज्ञानाशिवाय, दासांच्या हिताला समोर ठेवल्याशिवाय ध्येयाशिवाय होत नसते.

१५१. ज्या व्यक्तिला सर्वश्रेष्ठ अल्लाहने मानवांच्या पुढारीपणासाठी निवडले, त्याच्या मार्गापासून तोंड फिरविणे मूर्खपणा नव्हे तर दुसरे काय आहे?

१५२. इस्लामचा अर्थ संपूर्णशरणागती, स्वाधीनता हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा दीन-धर्म इस्लाम होता. तें ऐका अल्लाहलाच ईश्वर मानीत होते आणि त्यांनी स्वत:ला पूर्णपणे ईश्वराच्या स्वाधीन केले होते. आणि त्याच्या आज्ञा पालनाचा मार्ग अवलंबिला होता त्यांचा यहुदीमत, ईसाईमत अगर दुसऱ्या कोणत्याही धर्माशी संबंध नव्हता. यहुदीमत व ईसाईमत तर त्यांच्या कालांत अस्तित्वातच नव्हते. हे धर्म तर त्यांच्यानंतर निर्माण झाले. वस्तुस्थिती ही आहे की हे इस्लामचेच बिघडलेले प्रकार आहेत जे हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) व हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या नंतर त्यांच्या अनुयायांनी मूळधर्मात-इस्लाममध्ये-फेरफार करून निर्माण केले.

१५३. ''अद्दीन'' ने अभिप्रेत खराधर्म म्हणजे इस्लाम आहे. तो सुरवातीपासून अल्लाहचा धर्म राहीला आहे. याच धर्मावर-जीवन पद्धतीवर कायम राहण्याची व त्यानुसार जगण्याची व मरण्याची अंतिम ताकीद हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) व हज़रत याकूब (अलैहिस्सलाम) यांनी आपल्या मुलांना केली होती. परंतु नंतर बनी इसराईल लोकांनी इस्लामच्या जीवन पद्धतीत फेरवार केले. तिला बिघडवून यहुदीमत व ईसाईमत या नांवानी धर्म स्थापन केले.

१५४. मूस्लिम तो आहे जो अल्लाहला एकमेव ईश, खरा स्वामी, अधिपति व शासक मानतो व स्वत:ला पूर्णपणे त्याच्या स्वाधीन करतो. ईश्वराकडून उतरविण्यात आलेल्या शिकवण व मार्गदर्शनानुसार जीवन जगतो.

मरेपर्यंत मुस्लिम रहाण्याचा अर्थ असा की, सुरवातीपासून शेवटपर्यंत इस्लामवरच कायम राहणे, या मार्गात ज्या अडचणी व संकटे येतील त्यांचा निर्धाराने व हिंमतीने प्रतिकार करणे, कोणत्याही प्रसंगी इस्लामची दोरी हातातून न सोडणे.

१३३. काय तुम्ही त्यावेळी हजर होता जेव्हा याकूब यांच्या मृत्यूची वेळ आली? त्यांनी आपल्या मुलांना विचारले. माझ्यानंतर तुम्ही कोणाची इबादत (भक्ती) कराल? त्यांनी उत्तर दिले. आम्ही आपले उपास्य आणि आपले वाडवडील इब्राहीम, इस्माईल व इसहाक यांचे उपास्य, जो एकच आहे त्याचीच इबादत (भक्ति) करु. आणि आम्ही त्याचेच (आज्ञाधारी) मुस्लिम आहोत.

أَمْ كُنتُمْ شُهَدَآءَ إِذْ حَضَرَ يَعْقُوبَ ٱلْمَوْتُ إِذْ قَالَ
لِبَنِيهِ مَا تَعْبُدُونَ مِنۢ بَعْدِى ۖ قَالُوا۟ نَعْبُدُ إِلَٰهَكَ وَإِلَٰهَ
ءَابَآئِكَ إِبْرَٰهِۦمَ وَإِسْمَٰعِيلَ وَإِسْحَٰقَ إِلَٰهًا وَٰحِدًا
وَنَحْنُ لَهُۥ مُسْلِمُونَ ﴿١٣٣﴾

१३४. हा एक समूह होता जो होऊन गेला. जे काही त्याने कमाविले ते त्यांच्याच साठी आहे. आणि जे काही तुम्ही कमाविले ते तुमच्यासाठी आहे. आणि ते जे काही करून गेले आहेत त्याच्याबद्दल तुम्हांला विचारले जाणार नाही. [१५५]

تِلْكَ أُمَّةٌ قَدْ خَلَتْ ۖ لَهَا مَا كَسَبَتْ وَلَكُم مَّا كَسَبْتُمْ ۖ
وَلَا تُسْـَٔلُونَ عَمَّا كَانُوا۟ يَعْمَلُونَ ﴿١٣٤﴾

१३५. ते म्हणतात यहुदी अगर ईसाई व्हाल तर मार्गदर्शन लाभेल. सांगा तर इब्राहीमचा मार्ग (अम्ही अनुसरला आहे); जो एकाग्रतेने अल्लाहचा होऊन राहीला होता. आणि तो अनेकेश्वरवाद्यापैकी नव्हता.

وَقَالُوا۟ كُونُوا۟ هُودًا أَوْ نَصَٰرَىٰ تَهْتَدُوا۟ ۗ قُلْ بَلْ مِلَّةَ إِبْرَٰهِۦمَ
حَنِيفًا ۖ وَمَا كَانَ مِنَ ٱلْمُشْرِكِينَ ﴿١٣٥﴾

१३६. म्हणा आम्ही ईमान आणले अल्लाहवर आणि त्या शिकवणीवर जी आमच्याकडे उतरविली गेली आहे.आणि जी इब्राहीम, इस्माईल, इसहाक़, याकूब आणि याकूबची संततीकडे उतरविली गेली होती. आणि जी मूसा व ईसा आणि सर्व पैगंबरांना त्यांच्या पालनकर्त्याकडून मिळाली होती. आम्ही त्यांच्यामधील कोणामधेही भेदभाव [१५६] करीत नाही. आणि आम्ही अल्लाहचेच मुस्लिम (आज्ञाधारी) आहोत.

قُولُوٓا۟ ءَامَنَّا بِٱللَّهِ وَمَآ أُنزِلَ إِلَيْنَا وَمَآ أُنزِلَ إِلَىٰٓ إِبْرَٰهِۦمَ
وَإِسْمَٰعِيلَ وَإِسْحَٰقَ وَيَعْقُوبَ وَٱلْأَسْبَاطِ وَمَآ أُوتِىَ
مُوسَىٰ وَعِيسَىٰ وَمَآ أُوتِىَ ٱلنَّبِيُّونَ مِن رَّبِّهِمْ لَا نُفَرِّقُ
بَيْنَ أَحَدٍ مِّنْهُمْ وَنَحْنُ لَهُۥ مُسْلِمُونَ ﴿١٣٦﴾

१३७. मग जर ते याप्रमाणे ईमान आणतील ज्याप्रमाणे तुम्ही ईमान आणले आहे तर त्यांना शिकवणीचा लाभ मिळेल. आणि जर ते तोंड फिरवतील तर मग (जाणा की) ते विरोधात आहेत. आणि त्यांच्या विरोधात अल्लाह तुमच्यासाठी पुरेसा आहे. तो सर्वकाही एकणारा व जाणणारा आहे.

فَإِنْ ءَامَنُوا۟ بِمِثْلِ مَآ ءَامَنتُم بِهِۦ فَقَدِ ٱهْتَدَوا۟ ۖ وَّإِن تَوَلَّوْا۟
فَإِنَّمَا هُمْ فِى شِقَاقٍ ۖ فَسَيَكْفِيكَهُمُ ٱللَّهُ ۚ وَهُوَ ٱلسَّمِيعُ
ٱلْعَلِيمُ ﴿١٣٧﴾

१५५. अर्थात् तुमच्या त्या थोर पूर्वजाबद्दलच्या निष्ठेचा उच्चार आणि त्यांच्या कार्याबद्दलचा अभिमान तुमच्या स्वत:च्या नजात (मुक्ति-सुटका) साठी पुरेसा नाही. त्यांचा सदाचार त्यांच्या उपयोगी पडेल आणि तुमच्या दुराचाराचा परिणाम तुम्हाला भोगावा लागेल. त्यांच्या कार्याबद्दल तुम्हाला विचारणा होणार नाही. तर तुम्हाला तुमच्या आचरणाचा जाब द्यावा लागेल. आणि म्हणून कोणी अशी कल्पना करु नये की तो आपल्या पूर्वजांच्याबद्दल निष्ठा व्यक्त करुन सुटका पावेल.

१५६. पवित्र कुरआनच्या दृष्टीने एखाद्या पैगंबराना मानणे आणि एखाद्या पैगंबरांना न मानणे उघडउघड कुफ्र (नास्तिकता) आहे. सर्व पैगंबरांना खरे मानणे व कोणाचाही इन्कार न करणे हेच ईमान विश्वसनीय आहे.

१३८. (म्हणा) आम्ही अल्लाहचा रंग पत्करला आहे [१५७] आणि अल्लाहच्या रंगापेक्षा अधिक चांगला रंग कोणाचा असेल ? आणि आम्ही तर त्याचीच भक्ति व गुलामी करणारे आहोत.

صِبْغَةَ اللّٰهِ ۚ وَمَنْ اَحْسَنُ مِنَ اللّٰهِ صِبْغَةً ۡ وَّنَحْنُ لَهٗ عٰبِدُوْنَ ﴿۱۳۸﴾

१३९. म्हणा काय तुम्ही अल्लाहच्या बाबतीत आमच्याबरोबर वाद घालीत आहांत ? तो तर आमचाही पालनकर्ता आहे आणि तुमचाही पालनकर्ता आहे. आमच्यासाठी आमचे कर्म आहेत आणी तुमच्यासाठी तुमचे कर्म आहेत आणि आम्ही तर फक्त त्याचेच साठी आहोत.

قُلْ اَتُحَآجُّوْنَنَا فِى اللّٰهِ وَهُوَ رَبُّنَا وَرَبُّكُمْ ۚ وَلَنَآ اَعْمَالُنَا وَلَكُمْ اَعْمَالُكُمْ ۚ وَنَحْنُ لَهٗ مُخْلِصُوْنَ ﴿۱۳۹﴾

१४०. काय मग तुमचे असे म्हणणे आहे की इब्राहीम इस्माईल, इसहाक याकूब व याकूबची संतती हे सर्व यहुदी वा ईसाई होते ? [१५८] सांगा तुम्ही अधिक जाणता की अल्लाह? आणि त्या माणसापेक्षा अधिक अत्याचारी कोण असू शकेल ज्याच्याजवळ अल्लाहकडून आलेले काही प्रमाण असेल आणि त्याला तो लपवितो ? [१५९] तुम्ही जे काही करीत आहात त्याबाबतीत अल्लाह बेसावध नाही.

اَمْ تَقُوْلُوْنَ اِنَّ اِبْرٰهٖمَ وَاِسْمٰعِيْلَ وَاِسْحٰقَ وَيَعْقُوْبَ وَالْاَسْبَاطَ كَانُوْا هُوْدًا اَوْ نَصٰرٰى ۗ قُلْ ءَاَنْتُمْ اَعْلَمُ اَمِ اللّٰهُ ۗ وَمَنْ اَظْلَمُ مِمَّنْ كَتَمَ شَهَادَةً عِنْدَهٗ مِنَ اللّٰهِ ۗ وَمَا اللّٰهُ بِغَافِلٍ عَمَّا تَعْمَلُوْنَ ﴿۱۴۰﴾

१४१. हा ऐक समूह होता. [१६०] जो होऊन गेला. त्या लोकांनी जे काही कमाविले [१६१] ते त्यांच्यासाठी आहे आणि तुम्ही जे काही कमाविले ते तुमच्यासाठी आहे. त्यांच्या कर्माबद्दल तुम्हाला विचारले जाणार नाही.

تِلْكَ اُمَّةٌ قَدْ خَلَتْ ۚ لَهَا مَا كَسَبَتْ وَلَكُمْ مَّا كَسَبْتُمْ ۚ وَلَا تُسْـَٔلُوْنَ عَمَّا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿۱۴۱﴾

१४२. मूर्ख लोक अवश्य म्हणतील की या लोकांना (मुसलमानांना) ज्या किब्ल्याकडे [१६२] ते पूर्वी तोंड करीत असत त्यापासून कोणत्या गोष्टीने वळविले ?[१६३] त्यांना सांगा पूर्व व पश्चिम या अल्लाहच्याच आहेत. तो त्याला इच्छितो त्याला सरळमार्ग दाखवितो. [१६४]

سَيَقُوْلُ السُّفَهَآءُ مِنَ النَّاسِ مَا وَلّٰىهُمْ عَنْ قِبْلَتِهِمُ الَّتِىْ كَانُوْا عَلَيْهَا ۗ قُلْ لِّلّٰهِ الْمَشْرِقُ وَالْمَغْرِبُ ۗ يَهْدِىْ مَنْ يَّشَآءُ اِلٰى صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿۱۴۲﴾

१५७. यामधे यहुदी व ईसाई यांच्या 'बाप्तिस्मा' पद्धतीवर आक्षेप आहे की ही निव्वळ ऐक रुढी व निरर्थक गोष्ट आहे. खरा रंग तर ईशभक्तिचा रंग आहे.तो ईश्वरी जीवन पद्धतीचा स्वीकार केल्याने आणि त्यांच्या सर्व पैगंबरांवर ईमान आणल्याने लाभतो.

१५८. यहुदीमत हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्या नंतर पुष्कळ कालाने अस्तित्वात आले. आणि ईसाईमतही हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्यानंतर स्थापन्न झाले. प्रश्न असा निर्माण होतो की,या पंथबाजी पूर्वी शिकवण व मार्गदर्शनाचे स्वरूप काय होते? पवित्र कुरआनचे उत्तर हे आहे की, तो मार्गदर्शनच शिकवणीचा मार्ग इस्लाम आहे; जो प्रत्येक पैगंबरांचा दीन (धर्म) होता आणि ज्यापासून प्रत्येक कालातील लोक शिकवण प्राप्त करीत होते. आणि क़ुरआन त्याचेच आवाहन सादर करीत आहे.

१५९. ''तौरात'' मधे हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) आणि त्यांच्या संततीचा धर्म कोणता होता याचा पुरावा उपलब्ध आहे. काय ते यहुदी होते की ईसाई होते? की इस्लामचे निष्ठावान अनुयायी? जे लोक ईश ग्रंथामधील या स्पष्ट पुराव्याला लपवितात त्यांच्यापेक्षा अधिक अत्याचारी कोण असू शकेल?

यावरुन ही गोष्ट स्पष्ट होते की, ईशग्रंथामधील पुराव्याला लपविणे हे मोठे अत्याचाराचे कृत्य आहे. सत्याला लपविले गेल्याने लोक खोट्याला खरे समजून कुमार्गाला लागतात आणि म्हणून ईशग्रंथांच्या पाठिराख्यांची ही महान जबाबदारी आहे की त्यांनी सत्याला स्पष्ट करुन लोकांच्या समोर ठेवावे. आज ही जबाबदारी मुसलमान समाजावर आहे त्यांनी पवित्र कुरआनच्या पुराव्याला साक्षीला न लपविता स्पष्ट करावे. म्हणजे लोकांचेवर ईश्वराचा युक्तिवाद स्पष्ट होईल व ते आपल्या जबाबदारीतून मुक्त होतील.

१६०. हा चर्चेचा खुलासा आहे. याला चांगल्याप्रकारे मनावर बिबविण्यासाठी आयत नं. १३४ नंतर पुन्हा याची पुनरुक्ति केली आहे.

१६१. प्रत्येक कृत्याला चांगला अगर वाईट परिणाम असतो. तो कियामतीच्या दिवशी स्पष्ट होईल. हा परिणाम म्हणजे प्रत्येक व्यक्तिची कमाई आहे. आणि म्हणनूच येथे आचरणाला कस्ब म्हणजे कमाई म्हटले गेले आहे.

१६२. ''किब्ला'' त्या घराला अगर त्या स्थानाला म्हणतात ज्याकडे तोंड करून नमाज़ अदा केली जाते. इस्लामने पुष्कळशा कारणामुळे नमाज़साठी 'किब्ला' आवश्यक ठरविला आहे. उदा. अल्लाहची भक्ति अल्लाहने दाखवून दिलेल्या पद्धतीने व्हावी; नमाज़मध्ये शिस्त व पद्धतशिरपणा निर्माण व्हावा; सामुदायिकपणे नमाज़ अदा केली जावी; ईमान आणलेल्या लोकांमध्ये एकी निर्माण व्हावी आणि किब्ला त्यांच्या ध्यानाचे केंद्र व लक्ष्य (Goal) ठरावे.

१६३. हज़रत मूहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) 'हिजरत' नंतर मदीना मध्ये सोळा सतरा महिन्यापर्यंत बैतुल मुकद्दस (jerusalem) कडे तोंड करून नमाज़ अदा करीत असत. त्यानंतर मस्जिदे हराम (मक्का) कडे तोंड करून नमाज़ अदा करण्याची आज्ञा झाली. किब्ल्यामध्ये बदल करण्याची जी आज्ञा झाली त्यावरील यहुदी लोकांच्या अपेक्षित आक्षेपांचे येथे उत्तर दिले जात आहे. यहुदी लोक या बदलावर यासाठी आक्षेप घेत होते की त्यांचा क़िब्ला बैतुल मुकद्दस होता.

१६४. हे ग्रंथ लाभलेल्या लोकांच्या आक्षेपाचे उत्तर आहे. अल्लाहला पूर्व अगर पश्चिमेबद्दल विशेष ओढ नाही. कारण सर्व दिशा त्याच्याच आहेत परंतु ज्या गृहाला (मस्जिदीला) निवडून तो त्याला किब्ला ठरविल त्यालाच किब्ला बनविणे योग्य व श्रेयस्कर आहे. आणि त्याच्या आज्ञेचे पालन करूनच तुम्हाला मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो.

यावरून स्पष्ट झाले की जे लोक धार्मिक पूर्वग्रहामुळे आपले तोंड पवित्र मक्का शहराकडे करण्यास आणि काबागृहास किब्ला मानण्यास तयार नाहीत त्यांना अल्लाहच्या मार्गदर्शनाचे मार्ग उघड होऊ शकत नाहीत. कारण ही ''धर्मपूजा'' आहे सत्यभक्ति नव्हे.

ग्रंथाचा लाभ झालेल्या पैकी प्रामाणिक लोकांच्या दृष्टीने खरे महत्व दिशेला नसून अल्लाहच्या आज्ञेला असते. अल्लाहने पूर्वी बैतुल मुकद्दसला किब्ला ठरविले होते आणि आता काबाला किब्ला बनविण्याची आज्ञा केली तर त्या लोकांना नव्या आज्ञेचा स्वीकार करण्यात काही अडचण भासत नाही. आणि म्हणूनच पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) च्या अनुयायीना किब्ला बदलाच्या आज्ञेचा स्वीकार करण्यामधे थोडा देखील संकोच झाला नाही. आणि ईमान आणलेल्या लोकांमधील एका जमाअतीला ऐन नमाज़ अदा करीत असलेल्या अवस्थेत याची माहिती मिळाली तर तिने त्याच अवस्थेत आपले तोंड मस्जिदे हराम (नव्या किब्ल्या) कडे वळविले. मदीना शहराच्या ज्या मस्जिदीत ही घटना घडली तिला मस्जिदुल किब्लतैन (दोन किब्ल्याची मस्जिद) म्हणतात. जी आजही त्याच नांवाने अस्तित्वात आहे.

स्पष्ट असो की यहुदी व ईसाई लोकांचा किब्ला बैतुल मुकद्दस होता. नंतर यहुदी लोकांनी पश्चिमेला आणि ईसाई लोकांनी पूर्वेला आपला किब्ला बनविला. परंतु इस्लामने पूर्वेला अगर पश्चिमेला किब्ला न ठरवित मस्जिदे हरामला क़िब्ला ठरविला. मग ती मस्जिद कोणत्याही दिशेला का येईना.

१४३. आणि अशाप्रकारे[१६५]आम्ही तुम्हांला मध्यममार्गी समाज (उम्मते वस्त) बनविला,[१६६] कारण तुम्ही लोकांच्यावर साक्षीदार रहावे आणि पैगंबर हे तुमच्यावर साक्षीदार राहतील.[१६७] तुम्ही ज्या किब्ल्याकडे तोंड करून होता त्याला तर आम्ही फक्त हे पाहण्यासाठी निश्चित केले होते की कोण पैगंबरांचे अनुकरण करतो व कोण त्याच्याकडे पाठ फिरवितो.[१६८] निःसंशय हे कठीण काम आहे. परंतु त्या लोकांच्यासाठी कठीण नाही ज्यांना अल्लाहने आपल्या मार्गदर्शनाने उपकृत केलेले आहे.[१६९] अल्लाह तुमच्या ईमानाला वाया घालविणार नाही.[१७०] अल्लाह तर लोकांच्या बाबतीत मोठा ममताळू व कृपाळू आहे.[१७१]

وَكَذٰلِكَ جَعَلْنٰكُمْ اُمَّةً وَّسَطًا لِّتَكُوْنُوْا شُهَدَآءَ عَلَى النَّاسِ وَيَكُوْنَ
الرَّسُوْلُ عَلَيْكُمْ شَهِيْدًا ۭ وَمَا جَعَلْنَا الْقِبْلَةَ الَّتِىْ كُنْتَ عَلَيْهَآ
اِلَّا لِنَعْلَمَ مَنْ يَّتَّبِعُ الرَّسُوْلَ مِمَّنْ يَّنْقَلِبُ عَلٰي عَقِبَيْهِ ۭ
وَاِنْ كَانَتْ لَكَبِيْرَةً اِلَّا عَلَي الَّذِيْنَ هَدَى اللّٰهُ ۭ وَمَا كَانَ اللّٰهُ
لِيُضِيْعَ اِيْمَانَكُمْ ۭ اِنَّ اللّٰهَ بِالنَّاسِ لَرَءُوْفٌ رَّحِيْمٌ ١٤٣

१४४. (पैगंबर !) तुमचे तोंड वारंवार आकाशा कडे उठत आहे. हे आम्ही पाहत आलो आहे.[१७२] म्हणून आम्ही, तुम्हांला त्याच किब्ल्याकडे वळवितो जो तुम्हांला पसंत आहे. आता तुम्ही तुमचे तोंड मस्जिदे हराम [१७३] (काबा) कडे वळवा. आणि (मुसलमानानों) तुम्ही कोठेही असा आपले तोंड त्याकडेच करीत जा. ज्या लोकांना ग्रंथ दिला गेला होता, ते चांगल्या प्रकारे जाणतात की हा (आदेश) खरा आहे व त्यांच्या पालनकर्त्याकडूनच आलेला आहे.[१७४] हे जे काही करीत आहेत त्यापासून अल्लाह गाफील नाही.

قَدْ نَرٰى تَقَلُّبَ وَجْهِكَ فِي السَّمَاۗءِ ۚ فَلَنُوَلِّيَنَّكَ قِبْلَةً تَرْضٰىھَا ۠ فَوَلِّ
وَجْهَكَ شَطْرَ الْمَسْجِدِ الْحَرَامِ ۭ وَحَيْثُ مَا كُنْتُمْ فَوَلُّوْا وُجُوْھَكُمْ
شَطْرَهٗ ۭ وَاِنَّ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ لَيَعْلَمُوْنَ اَنَّهُ الْحَقُّ مِنْ رَّبِّهِمْ ۭ
وَمَا اللّٰهُ بِغَافِلٍ عَمَّا يَعْمَلُوْنَ ١٤٤

१४५. आणि जरी तुम्ही ग्रंथधारकासमोर सर्वप्रकारच्या निशाण्या सादर केल्या तरीही ते तुमच्या किब्ल्याचे अनुसरण करणार नाहीत आणि तुम्ही ही त्यांच्या किब्ल्याचे अनुसरण करणार नाही. तसेच त्यांचा एक पक्ष दुसऱ्या किब्ल्याचेही अनुसरण करणार नाही. [१७५] आणि जर तुम्ही या ज्ञानानंतर [१७६] जे तुमच्या कडे आलेले आहे त्यांच्या इच्छेचे अनुसरण केले तर खात्रीने तुमची गणना अत्याचारी लोकांत होईल.

وَلَىِٕنْ اَتَيْتَ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ بِكُلِّ اٰيَةٍ مَّا تَبِعُوْا قِبْلَتَكَ ۚ
وَمَآ اَنْتَ بِتَابِعٍ قِبْلَتَهُمْ ۚ وَمَا بَعْضُهُمْ بِتَابِعٍ قِبْلَةَ بَعْضٍ ۭ
وَلَىِٕنِ اتَّبَعْتَ اَھْوَاۗءَھُمْ مِّنْۢ بَعْدِ مَا جَاۗءَكَ مِنَ الْعِلْمِ ۙ اِنَّكَ
اِذًا لَّمِنَ الظّٰلِمِيْنَ ١٤٥

१६५. म्हणजे ज्याप्रमाणे किब्ल्याच्या बाबतीत आम्ही तुमचे मार्गदर्शन केले आणि तुम्हाला हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या किब्ल्याचा लाभ करून दिला त्याचप्रमाणे हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या प्रार्थनेचा स्वीकार करून तुम्हाला समतोल समाज-मध्यममार्गी समाज (Justly balanced Nation) बनविले. हेतु हा की तुम्ही इस्लामच्या जीवनव्यवस्थेचे साक्षीदार बनावे.

१६६.''उम्मते वस्त'' याचा अर्थ समतोल वर्तन करणारा समाज. आणि आपल्या स्वभावगुणामुळें उत्कृष्ठ समाज या संज्ञेस पात्र ठरणारा समाज मुसलमान समाजाला ''उम्मते वस्त'' ही पदवी यासाठी दिली गेली की तो दीन (जीवन व्यवस्था) च्या मूळमार्गावर कायम आहे आणि अशा जीवन व्यवस्थेचा षाईक आहे जी समतोलावर आधारलेली आहे. आणि या स्वभाव विशेषामुळे तो सर्व समाजामध्ये उत्कृष्ठ समाज या संज्ञेस पात्र आहे.

वस्तुत: ही बनी इसराईल या समाजाची नेतेपदावरून उचलबांगडी केल्याची आणि मुसलमान समाजाला नेतेपद बहाल केल्याची घोषणा आहे. मूसलमान समाज ज्याचा किब्ला हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा किब्ला आहे आणि जो इस्लामच्या राजमार्गावर वाटचाल करीत आहे.

१६७. हे 'उम्मते वस्त'च्या अधिकारपदाच्या कर्तव्यांचे निवेदन आहे. यापूर्वी परमेश्वराने बनी इसराईलची मार्ग दर्शनाच्या अधिकारपदावर नियुक्ती केली होती. परंतु त्यांनी धर्मशास्त्रात फेरबद्दल करून आणि जीवन पद्धती पासून दूर जाणारा मार्ग अवलंबून समतोल मार्ग गमावला. आणि म्हणून परमेश्वराने समतोल मार्गावर कायम राहील. धर्मशास्त्राचे पालन करील आणि जगाच्या लोकांसमोर सत्यधर्माची ग्वाही देईल असा समाज निर्माण करावा ही मानव जातीची सर्वात मोठी अशी निकड होती.

अल्लाहचे शेवटचे पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मुसलमान समाजापर्यंत अल्लाहची जीवन-पद्धती तिच्या परिपूर्ण स्वरुपात पोहचविली. आता ही जबाबदारी मुसलमान समाजाची आहे की त्याने प्रत्येक कालात प्रत्येक देशात आणि प्रत्येक भाषेत लोकांच्या समोर अल्लाहच्या दीन (जीवन पद्धती) ची ग्वाही द्यावी.

कयामतीच्या दिवशी जेव्हा अल्लाहच्या न्यायालयात लोक हजर होतील तेव्हां पैगंबर ग्वाही देतील की त्यांनी अल्लाहच्या दीन (जीवन पद्धतीला) तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरबदल न करता मुसलमान समाजापर्यंत पोहचविले. आणि मुसलमान समाजाला ही साक्ष घ्यावी लागेल की त्यांनी या जीवनपद्धतीला अल्लाहच्या दासांपर्यंत योग्य रीतीने पोहचविले किंवा नाहीं.

१६८. म्हणजे बैतुल मुकद्दसकडे तोंड करून नमाज़ अदा करण्याची जी परवानगी तुम्हाला दिली गेली होती ती तात्पुरती होती. आणि तिचा उद्देश कोण लोक पैगंबरांचे सच्चे अनुयायी आहेत आणि कोण पूर्वीच्या प्रथांचे पूजक आहेत ही परीक्षा घेणे हा होता. उघड असो की पैगंबरांचे वास्तव्य जोपर्यंत मक्का शहरी होते तोपर्यंत ते अशाप्रकारे नमाज़ अदा करीत असत की काबागृह त्यांच्यासमोर असे. परंतु मदीना शहरी प्रयाण केल्यानंतर सुरवातीच्या १६/१७ महिन्यापर्यंत बैतुल मुकद्दसकडे तोंड करून नमाज़ अदा करीत असत. हा क्रम मस्जिदे हरामकडे तोंड करून नमाज़ अदा करण्याची आज्ञा होईपर्यंत चालू होता. बैतुल मुकद्दस मदीना शहराच्या उत्तरेला आणि काबागृह दक्षिणेला आहे.

१६९. किब्ल्यामध्ये बदलाचा हा प्रश्न म्हणजे कठीण परीक्षा होती. बैतुल मुकद्दस किब्ला असेपर्यंत अरब लोकांची परीक्षा होत राहिली. कारण हा त्यांच्या राष्ट्रभक्तिवर प्रहार होता. आणि जेव्हा मस्जिदे हरामला किब्ला बनविण्याची आज्ञा झाली तेव्हा बनी इसराईल यांच्या कसोटीचा प्रसंग निर्माण झाला. कारण हा त्यांच्या वंशभक्ति व पूर्वज भक्तिवर प्रहार होता. अशा प्रकारे पैगंबरांच्या बरोबर फक्त ते लोक राहीले जे अल्लाहचे खरे भक्त होते. स्पष्ट आहे की धार्मिक रीतिरिवाजाना सोडून देणे सोपी गोष्ट नव्हे. परंतु ज्या लोकांच्यामध्ये अल्लाह बद्दल आणि त्याच्या पैगंबराबद्दल निष्काम प्रीति असते. त्या लोकांना अल्लाहच्या कृपेने मार्गदर्शनाचा लाभ होतो.

१७०. या परिक्षेचा हेतु लोकांचे ईमान नाहीसे करणे हा नाही. दीन (जीवन पद्धती ) च्या खऱ्या व खोट्या अनुयायामध्ये भेदभाव करणे हा आहे. त्याचप्रमाणे जो आपल्या ईमानामध्ये सच्चा आहे त्याच्या सुप्त पात्रतेला जागृत करणे आणि त्याच्या ईमानाला अधिक दृढ करण्याची संधी देणे हा आहे. या दृष्टीने ही परीक्षा अल्लाहच्या कनवाळूपणा व दयाळूपणा या गुणांचा अविष्कार आहे.

१७१. ''रऊफ'' आणि ''रहीम'' हे दोन गुण निवेदन केले गेले आहेत. रऊफमध्ये वाईटाचे निवारण प्रभावी आहे तर रहीम मध्ये चांगल्याचे संवर्धन हा या गोष्टीकडे इशारा आहे की अल्लाह आपल्या दासांना या परीक्षेद्वारे दुर्बलतेपासून मुक्त आणि चांगल्या गुणांनी विभूषित करू इच्छितो.

१७२. मदीनाला हिजरत (प्रयाण) केल्यानंतर हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जरी बैतुल मुकद्दसकडे तोंड करून नमाज़ अदा करीत असत तरी ते इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या किब्ल्याबद्दलच्या ईश्वरी आज्ञेची प्रतीक्षा करीत होते. आणि म्हणून त्यांची नजर वारंवार आकाशाकडे वळत असे अल्लाहचे फिरिश्ते हजरत जिब्राईल किब्लाबदलाची आज्ञा घेऊन

केव्हां उतरतात याची ते वाट पहात होते.

१७३. मस्जिदे हराम म्हणजे मक्का शहरातील ती मस्जिद जिच्या मध्यभागी काबागृह (खानअे काबा) आहे. काबा गृहाची निर्मिती हजरत इबराहीम (अलैहिस्सलाम) यांनी जवळजवळ चार हजार वर्षापूर्वी केली होती. मस्जिदे हराम हजरतह मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या कालात लहान होती. नंतर तिला विस्तीर्ण केले जाऊ लागले. आणि आता तिचा विस्तार इतका वाढलेला आहे की पांच लाख लोक नमाज़ अदा करू शकतात. तरीपण ती हज्जच्या कालात अपुरी पडते. या मस्जिदीमध्ये खानअे काबाकडे तोंड करून नमाज़ अदा केली जाते.

१७४. यहुदी लोक चांगल्या प्रकारे जाणत असत का बैतुल्लाह (अल्लाहचे घर) हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा किब्ला आहे. आणि ते तौरातमधील या भविष्यवाणीशीही चांगल्या प्रकारे परिचित होते की शेवटचे पैगंबर, हज़रत इस्माईल (अलैहिस्सलाम) यांच्या घराण्यामधील असतील आणि या पैगंबरांमार्फत एक मुस्लिम समाज निर्माण केला जाईल. त्याचप्रमाणे ते या वस्तुस्थितीशी ही परिचित होते की बनी इस्माईल यांचे मध्यवर्ति ठिकाण व किब्ला खानअेकाबा होता. परंतु ते निव्वळ मत्सर व दुषित पूर्वग्रहामुळे या गोष्टीना लपवित असत उघड असो की सर्वप्रथम खानअे काबाची निर्मिती झाली आणि बैतुल मुकद्दस मध्ये हैकले सुलैमानीची निर्मिती त्यानंतर कित्येक शतकानंतर हज़रत सुलैमान (अलैहिस्सलाम) यानी केली होती.

१७५.यहुदी व ईसाई लोकांच्याकडे इशारा आहे. त्यांचे आपसात किब्ल्याच्या बाबतीत कधीही मतैक्य नव्हते.यहुदी लोकांनी पश्चिमेला किब्ला बनविला आहे तर ईसाई लोकांनी पूर्वेला आणि दोघेही मुलत:बैतुल मुकद्दस हा किब्ला आहे हे मान्य करतात. आणि म्हणून त्यांच्या पासून काय अपेक्षा केली जाऊ शकते की ते मस्जिदे हरामला किब्ला म्हणून मान्याता देतील ?

१७६. मूळ अरबीमध्ये ''अल् इल्म''हा शब्द आलेला आहे. येथे त्याचा अर्थ वास्तव ज्ञान, खरेखुरे ज्ञान असा होतो. हे ज्ञान 'वही' द्वारे प्राप्त होते. या आयतीमध्ये सावध केले गेले आहे की क़ुरआनच्या शिकवणीला सोडून इच्छांचे अनुकरण करणे-मग ते कोणत्याही बाबतीत असो, परंपरा व रुढीच्या स्वरुपात असो वा नव्या प्रथांच्या स्वरुपात-मोठ्या अत्याचाराचे कृत्य आहे.




# मस्जिदे हरामचा नक़्शा

**१४६.** ज्यांना आम्ही ग्रंथ दिला आहे ते याला अशा प्रकारे जाणतात ज्याप्रमाणे ते आपल्या पुत्रांना जाणतात.[१७७] तथापि त्यांच्यापैकी एक गट जाणून बुजून सत्याला लपवित आहे.

الَّذِينَ آتَيْنَاهُمُ الْكِتَابَ يَعْرِفُونَهُ كَمَا يَعْرِفُونَ أَبْنَاءَهُمْ ۖ وَإِنَّ
فَرِيقًا مِّنْهُمْ لَيَكْتُمُونَ الْحَقَّ وَهُمْ يَعْلَمُونَ ﴿١٤٦﴾

**१४७.** हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्यांकडून आलेले म्हणून तुम्ही केव्हांही संशय घेणाऱ्यांपैकी होऊ नका. [१७८]

الْحَقُّ مِن رَّبِّكَ ۖ فَلَا تَكُونَنَّ مِنَ الْمُمْتَرِينَ ﴿١٤٧﴾

**१४८.** प्रत्येकासाठी एक दिशा आहे, ज्याकडे तो वळतो तर तुम्ही चांगल्या कार्यात पुढाकार घ्या. तुम्ही जेथे कोठेंही असा अल्लाह तुम्हां सर्वांना एकत्र करील. खात्री बाळगा प्रत्येक गोष्टीवर अल्लाहची सत्ता चालते.

وَلِكُلٍّ وِجْهَةٌ هُوَ مُوَلِّيهَا ۖ فَاسْتَبِقُوا الْخَيْرَاتِ ۚ أَيْنَ مَا تَكُونُوا
يَأْتِ بِكُمُ اللَّهُ جَمِيعًا ۚ إِنَّ اللَّهَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿١٤٨﴾

**१४९.** आणि कोणत्याही स्थानापासून तुम्ही निघाला [१७९]तरी आपले तोंड मस्जिदे हराम कडे करा. नि:संशय हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्याकडून आलेले. आणि तुम्ही जे काही करीत आहात त्यापासून अल्लाह गाफील नाहीं.[१८०]

وَمِنْ حَيْثُ خَرَجْتَ فَوَلِّ وَجْهَكَ شَطْرَ الْمَسْجِدِ الْحَرَامِ ۖ وَإِنَّهُ
لَلْحَقُّ مِن رَّبِّكَ ۗ وَمَا اللَّهُ بِغَافِلٍ عَمَّا تَعْمَلُونَ ﴿١٤٩﴾

**१५०.** आणि तुम्ही कोणत्याही स्थानापासून निघाला तरी आपले तोंड मस्जिदे हराम कडेच करा. आणि जेथे तुम्ही असाल तेथे तुम्ही आपले तोंड याच्याकडे करा म्हणजे लोकांना तुमच्या विरुद्ध पुरावा, सादर करण्याची संधी राहणार नाही. परंतु त्यांच्यापैकी जे अत्याचारी आहेत त्यांचे भय बाळगू नका तर माझे भय बाळगा. आणि यासाठी की मी तुमच्यावर माझी 'नेअमत' (देणगी) पूर्ण करावी आणि यासाठी की तुम्हाला मार्ग लाभावा.[१८१]

وَمِنْ حَيْثُ خَرَجْتَ فَوَلِّ وَجْهَكَ شَطْرَ الْمَسْجِدِ الْحَرَامِ ۚ وَحَيْثُ
مَا كُنتُمْ فَوَلُّوا وُجُوهَكُمْ شَطْرَهُ لِئَلَّا يَكُونَ لِلنَّاسِ عَلَيْكُمْ حُجَّةٌ
إِلَّا الَّذِينَ ظَلَمُوا مِنْهُمْ فَلَا تَخْشَوْهُمْ وَاخْشَوْنِي وَلِأُتِمَّ
نِعْمَتِي عَلَيْكُمْ وَلَعَلَّكُمْ تَهْتَدُونَ ﴿١٥٠﴾

**१५१.** आणि म्हणून आम्ही तुमच्यामध्ये तुमच्यापैका एक पैगंबर पाठविला, जो तुम्हाला आमच्या आयती (आदेश) ऐकवित आहे तुम्हाला शुद्ध करीत आहे. आणि तुम्हाला ग्रंथाची व बुद्धिमत्तेची शिकवण देत आहे. आणि तुम्हाला त्या गोष्टींचे शिक्षण देत आहे. ज्या तुम्ही जाणत नव्हता.

كَمَا أَرْسَلْنَا فِيكُمْ رَسُولًا مِّنكُمْ يَتْلُو عَلَيْكُمْ آيَاتِنَا
وَيُزَكِّيكُمْ وَيُعَلِّمُكُمُ الْكِتَابَ وَالْحِكْمَةَ وَيُعَلِّمُكُم مَّا
لَمْ تَكُونُوا تَعْلَمُونَ ﴿١٥١﴾

१७७. हा अरबी वाक् प्रचार आहे. याचा अर्थ असा की, कसलीही शंका वा संशय न बाळगता चांगल्याप्रकारे जाणतात की शेवटच्या पैगंबरांनी खानअे काबाला किब्ला ठरविणे अत्यंत योग्य आहे व सत्यावर आघारलेले आहे.

१७८.जाहीरपणे संबोधन हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) यांना आहे.परंतु तंबीचा रोख सामान्य लोकांकडे आहे.

१७९. येथे स्पष्ट केले गेले आहे की किब्ल्याचे पालन फक्त निवास स्थानी आवश्यक आहे असे नाही. प्रवासात देखील त्याचे पालन आवश्यक आहे. प्रवासात किब्ल्याची दिशा ठरविणे कठीण असते. परंतु किब्ल्याच्या महत्त्वामुळे ही ताकीद केली गेली आहे की प्रवासात देखील नमाज़ अदा करताना आपले तोंड मस्जिदे हरामकडेच करा. हेतू हा की या समाजाचा प्रत्येक अवस्थेत आपल्या उद्धिष्टांशी संबंध असावा.

मक्का शहर Long 39 °-50 'E आणि Lat 21°-26' N वर आहे. किब्ला मुंबई शहराच्या पश्चिम दिशेला अंश (10 ° N) उत्तरेस येतो.

क़ुरआनच्या शिकवणीनुसार प्रवासात देखील किब्ल्याची दिशा जाणून घेणे व त्याचे पालन करणे शक्यतों आवश्यक आहे. परंतु रेल्वे विमान वगैरे मध्ये किब्ल्याकडे तोंड करून नमाज अदा करणे शक्य नसेल तर ज्या दिशेकडे तोंड करणे शक्य आहे त्या दिशेकडे तोंड करून नमाज़ अदा केली जाऊं शकते.

१८०. इशारा या गोष्टीकडे आहे की जर तुम्ही किब्ल्याचे पालन करण्यामध्ये बेपर्वाई केली तर त्याबद्धल तुमची पकड होईल.

१८१. ही आज्ञा वर आलेली आहे. येथे तिची पुनरुक्ती निव्वळ द्विरुक्तिसाठी नाही तर ताकीदीसाठी आहे. त्याचप्रमाणे तिचे फायदे पण निवेदन करणे अभिप्रेत आहे. एक हिकमत तर ही आहे की लोकांना तुमच्या विरुद्ध पुरावा सादर करण्याची संधि मिळणार नाही. यहुदी लोकांना हे म्हणण्याची संधि न मिळो की जर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) शेवटचे पैगंबर आहेत तर तौरात मधील भविष्यवाणीप्रमाणे त्यांचा किब्ला इब्राहीम यांचा किब्ला (खानअे काबा) का नाहीं? तुम्ही प्रत्येक ठिकाणी खानअे काबाला (काबा गृह) किब्ला बनवून हे सिद्ध करून दाखवा की तुमचा कायमचा किब्ला खानअे काबाच आहे; जो तंतोतंत तौरातच्या भविष्यवाणीप्रमाणे आहे. दुसरी हिकमत ' ईश्वरी देणगीची पूर्तता हि निवेदन केली गेली आहे. म्हणजे दीनची-जीवनपद्धतीची-परिपूर्ती; आणि जागतिक समाजांच्या पुढारीपणाची देणगी. तिसरी हिकमत, मार्गप्राप्ती. म्हणजे हा किब्ला एकेश्वरवादाचे केंद्रस्थान या नात्याने मार्गदर्शनाचा मनोरा आहे. आणि म्हणून याला नेहमी उद्दिष्ट Goal मानून नजरेसमोर ठेविले पाहिजे.



मस्जिदे हराम

१५२. म्हणून तुम्ही माझे स्मरण ठेवा.मी तुमचे स्मरण ठेवीन.[१८२] आणि माझ्याशी कृतज्ञ राहा. कृतघ्न बनू नका.

فَاذْكُرُوْنِيْٓ اَذْكُرْكُمْ وَاشْكُرُوْا لِيْ وَلَا تَكْفُرُوْنِ ﴿١٥٢﴾

१५३. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! सहनशीलतेचे व नमाज़चे साहाय्य घ्या. निःसंशय अल्लाह [१८३] सहनशील लोकां बरोबर आहे.[१८४]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا اسْتَعِيْنُوْا بِالصَّبْرِ وَالصَّلٰوةِ ۭ اِنَّ اللّٰهَ مَعَ
الصّٰبِرِيْنَ ﴿١٥٣﴾

१५४. आणि जे लोक अल्लाहच्या मार्गात मारले जातील त्यांना मृत म्हणू नका. ते जिवंत आहेत. पण तुम्हाला त्याची जाणीव होत नाही. [१८५]

وَلَا تَقُوْلُوْا لِمَنْ يُّقْتَلُ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ اَمْوَاتٌ ۭ بَلْ اَحْيَاۗءٌ وَّلٰكِنْ
لَّا تَشْعُرُوْنَ ﴿١٥٤﴾

१५५. आम्ही तुम्हाला काही प्रमाणांत भयभीत करून तुमची उपासमार करून तुमच्या धनाचे, प्राणांचे फळफळावळाचे (पीकांचे) नुकसान [१८६] करून अवश्य आजमावून पाहू आणि सहनशील लोकांना खुशखबर द्या.

وَلَنَبْلُوَنَّكُمْ بِشَيْءٍ مِّنَ الْخَوْفِ وَالْجُوْعِ وَنَقْصٍ مِّنَ الْاَمْوَالِ
وَالْاَنْفُسِ وَالثَّمَرٰتِ ۭ وَبَشِّرِ الصّٰبِرِيْنَ ﴿١٥٥﴾

१५६. त्यांची अवस्था अशी आहे की त्यांच्यावर जेव्हा एखादी आपत्ती येते तेव्हा ते म्हणतात. ''आम्ही अल्लाहसाठीच आहोत आणि आम्हाला अल्लाहकडेच परत जावयाचे आहे.''[१८७]

الَّذِيْنَ اِذَآ اَصَابَتْهُمْ مُّصِيْبَةٌ ۙ قَالُوْٓا اِنَّا لِلّٰهِ وَاِنَّآ اِلَيْهِ
رٰجِعُوْنَ ﴿١٥٦﴾

१५७. हेच ते लोक आहेत, ज्यांच्यावर त्यांच्या पालनकर्त्याची मेहरबानी व कृपा राहील. आणि हेच लोक योग्य मार्गावर असतील.

اُولٰۗىِٕكَ عَلَيْهِمْ صَلَوٰتٌ مِّنْ رَّبِّهِمْ وَرَحْمَةٌ ۣ وَاُولٰۗىِٕكَ هُمُ الْمُهْتَدُوْنَ ﴿١٥٧﴾

१५८. निःसंशय [१८८] ''सफा''''मरवा''[८९] अल्लाहच्या निशाण्या (ईशस्मारका) पैकी आहेत.[१९०] आणि म्हणून जो कोणी बैतुल्लाहचा (अल्लाहच्या घराचा) 'हज्ज' क़रील अगर'उमरा'[१९१] करील त्याने जर त्यांना प्रदक्षिणा घातली तर त्यामध्ये कसलाही गुन्हा नाही.आणि जो कोणी प्रसन्न चित्ताने सदाचार करील, तर अल्लाह गुणग्राहक व जाणणारा आहे.

اِنَّ الصَّفَا وَالْمَرْوَةَ مِنْ شَعَاۗىِٕرِ اللّٰهِ ۚ فَمَنْ حَجَّ الْبَيْتَ اَوِ اعْتَمَرَ
فَلَا جُنَاحَ عَلَيْهِ اَنْ يَّطَّوَّفَ بِهِمَا ۭ
وَمَنْ تَطَوَّعَ خَيْرًا ۙ فَاِنَّ اللّٰهَ شَاكِرٌ عَلِيْمٌ ﴿١٥٨﴾

१५९. जे लोक आम्ही उतराविलेल्या उघड उघड निशाण्यांना [१९२] आणि मार्गदर्शनाला-त्यांना आम्ही ग्रंथामध्ये लोकांच्यासाठी निवेदन करून ठेवलेले असता देखील-लपवितात. खात्री बाळगा अल्लाह अशा लोकांची निर्भर्त्सना (लअनत) करीत आहे [१९३] आणि सर्व निर्भर्त्सना करणारे पण त्यांची निर्भर्त्सना करतात,

اِنَّ الَّذِيْنَ يَكْتُمُوْنَ مَآ اَنْزَلْنَا مِنَ الْبَيِّنٰتِ وَالْهُدٰى مِنْۢ بَعْدِ
مَا بَيَّنّٰهُ لِلنَّاسِ فِي الْكِتٰبِ ۙ اُولٰۗىِٕكَ يَلْعَنُهُمُ اللّٰهُ
وَيَلْعَنُهُمُ اللّٰعِنُوْنَ ﴿١٥٩﴾

१८२. ईश्वराचे स्मरण ठेविण्याच्या अर्थात शरीअतीचे (धर्मशास्त्राचे) पालन करण्याचा अर्थ सामील आहे.आणि अल्लाहचा हा वायदा की ''मी तुमचे स्मरण ठेविन.'' याचा अर्थ हा आहे की जी आश्वासने मी तुम्हाला दिली आहेत ती मी पुरी करीन.

१८३. मुस्लिम समाजाची (उम्मते मुस्लिमाची नेतेपदी नियुक्ती केल्यानंतर नेतेपदाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी व संकट यांचा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपायांचा निर्देश केला जात आहे. नमाज़ व सहनशीलतेचे साहाय्य घ्या. नमाज़ ईश्वरनिष्ठा दृढ करण्याचा अत्यंत परिणामकारक असा मार्ग आहे. आणी ईश्वरनिष्ठा दृढ झाली की सत्याच्या मार्गात येणाऱ्या अडचणी आपोआप सोप्या होतात. येथे ज्या प्रकारे 'नमाज़' चा उल्लेख झाला आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की नमाज़मध्ये ईश्वराचे स्मरण व त्याचे आभार प्रदर्शन या दोन्ही गोष्टी एकवटलेल्या आहेत. आणि सत्यमार्गामध्ये निर्धार व खंबीरपणा प्राप्त करण्याचे नमाज़ हे एक साधन आहे.

१८४. सहनशील लोकांचा म्हणजे धर्माच्या कार्यात दृढनिश्चयी असणाऱ्या व संकटाच्या व अडचणीच्या वेळी हिम्मत दाखविणाऱ्या लोकाचा साहाय्यक सर्वश्रेष्ठ अल्लाह असतो. ही काही साधारण गोष्ट नव्हे. कारण ज्याला विश्वाच्या चालकाचे साहाय्य व पाठिंबा प्राप्त होतो त्याचे जगातील मोठ्यातील मोठी शक्ती देखील काही नुकसान करु शकत नाही. स्पष्ट असो की 'सब्र' (सहनशक्ती) चा उल्लेख क़ुरआनमध्ये सत्तरापेक्षा अधिक वेळा आलेला आहे. यावरूनही याच्या आवश्यकतेचा व महत्वाचा अंदाज केला जाऊ शकतो.

१८५. जे लोक अल्लाहच्या मार्गात मारले जातात. उघडपणे असे वाटते की त्यांच्या जीवनाचा शेवट झाला. परंतु क़ुरआन ही वस्तु:स्थिती मनावर बिंबवू इच्छिते की, अशा लोकांच्या बाबतीत खऱ्या जीवनाची सुरवात तर त्यांच्या मृत्यूनंतर होते. कारण त्यांचे आत्मे ''आलमे बरज़ख़'' मध्ये अति उच्चस्थानी विराजमान झालेले असतात. त्यांना तेथे अशा देणग्यांनी भुषविले जाते ज्याची कल्पनाही या जगात केली जाऊ शकत नाही. आणि प्रसन्न व समाधानी जीवनाचा त्यांना लाभ होतो. त्याच्या तुलनेत जगातील या जीवनाचे काही मोल राहत नाही.

मतितार्थ असा की क़ुरआनच्या दृष्टीने मरण माणसाचा शेवट होण्याचे नांव नव्हे. तर फक्त आत्म्याचे भौतिक पिंजऱ्यातून म्हणजे देहातून उड्डाण करण्याचे नांव आहे. प्रत्येक माणसाचा आत्मा ''आलमे बरजख'' मध्ये जे एक आध्यात्मिक विश्व आहे- कियामती पर्यंत (जगाच्या शेवटापर्यंत) सुरक्षित असतो. मग माणूस ईश्वराला मानणारा असो वा नसो. फरक एवढाच की ईश्वराच्या आज्ञाधारकाचा (मोमिनचा) आत्मा सुखासमाधानात आणि कृपाछत्राखाली असतो तर ईश्वराला न मानणाऱ्या माणसाचा आत्मा संकटांनी व आपत्तीनी घेरलेला असतो. जेव्हा जगाचा शेवट होईल तेव्हा देहांना पुन्हा निर्माण केले जाईल.व प्रत्येक माणसाचा आत्मा त्याच्या देहाबराबर जोडली जाईल. अशा प्रकारे प्रत्येक व्यक्ति अल्लाहच्या दरबारी आपापल्या देहासह हजर होईल आणि तेथे आपल्या श्रद्धा व आचारानुसार शिक्षा वा बक्षिसास पात्र ठरेल याला ''आलमे आखिरत'' म्हणतात. म्हणजे हे विश्य व शेवटचे विश्व या मधील विश्व ''आलमे बरजख.''

१८६. म्हणजे सत्याच्या अनुयायांच्या काफिल्याला विरोधाच्या वादळातून अवश्य वाटचाल करावी लागेल. आणि निरनिराळ्या संकटांना व नुकसानीला सहन करावे लागेल. खऱ्या व खोट्यामधील फरक उघडकीस यावा, सत्याच्या अनुयायांचे गुण प्रकट व्हावेत आणि ते ईश्वराच्या कृपेस व बक्षिसास पात्र ठरावेत म्हणून ही परिक्षा ईश्वरी नियमानुसार अटळ आहे.

''खौफ'' (भय) ने भयाच्या व धोक्याच्या त्या अवस्थेकडे इशारा आहे जी शत्रूच्या हल्ल्या वगैरेने निर्माण होते. ''फाका'' (उपासमार) ने आर्थिक अडचणीकडे इशारा आहे. प्राणाच्या व धानाच्या कमतरतेचा इशारा जिहादकडे आहे. जिहादमध्ये प्राणांची कुरबानी द्यावी लागते, त्याचप्रमाणे धनाची देखील कुरबानी द्यावी लागते. फळांची कमतराताचा इशारा पिकपाण्याच्या नुकसानीकडे आहे.

१८७. प्रत्येक संकटाच्या प्रसंगी ईमानघारकाच्या तोंडातून हे स्फूर्तीदायक वचन निघते. यावरून त्याची ईश्वराकडील सोपवणूक, ईश्वरावरील भरंवसा व भिस्त आणि आत्मबलिदानाची तयारी यांचा आविष्कार घडतो. याच जोषामुळे माणसामध्ये सत्याच्या मार्गात आडव्या येणाऱ्या पहाडाशी देखील टक्कर घेण्याची तयारी निर्माण होते.

१८८. किब्ला संबंधीची चर्चा चालू होती. मध्यंतरी किब्ला बदलाच्या परिणामस्वरूप उद्‌भवणाऱ्या संकटांचा उल्लेख झाला. आता पुन्हा किब्ल्यासंबंधी अधिक माहिती दिली जात आहे.

१८९. सफा आणि मरवा ही दोन टेकड्यांची नांवे आहेत. या टेकड्या मक्का शहरामध्ये काबागृहाच्या जवळ आहेत. या दोन टेकड्यांच्या दरम्यान हज्ज व उमराच्या वेळी सात वेळा दौड केली जाते. याला ''सई'' म्हणतात.

मरवा ही ती सुप्रसिद्ध टेकडी आहे. जेथे हज़रत इस्माईल (अलैहिस्सलाम) यांच्या कुरबानीची घटना घडली होती.

मरवाचा उल्लेख तौरात (जूना करार) मध्ये आहे. परंतु यहुदी लोकांनी त्यामध्ये फेरफार करुन 'मरवा'ला 'मौरा' क़रून टाकले व हे ठिकाण मक्केच्या ऐवजी पॅलेस्टाईनमध्ये असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. हेतु हा की या निशाण्या ज्याद्वारे हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा किब्ला आणि हज़रत

मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे ईश्वराचे शेवटचे पैगंबर असल्याबद्दलचा पुरावा मिळतो, अज्ञातच राहाव्यात. प्रचलित असलेल्या तौरातमधील फेरफारीत मजकूर असा:-

''अब्राम त्या देशातून शखमेच्या ठिकाणी मोरे येथील एलोन झाडापाशी गेला. त्या काळी त्या देशात कनानी लोक राहात होते. परमेश्वर अब्रामास दर्शन देऊन म्हणाला, हा देश मी तुझ्या संतानाला देणार; परमेश्वाने त्याला दर्शन दिले म्हणून त्याने तेथे परमेश्वराची एक वेदी बांधिली. मग तो तेथून निघाला आणि बेथेलच्या पूर्वेकडे डोंगर होता तेथे जाऊन त्याने डेरा दिला; याच्या पश्चिमेस बेथेल होते व पूर्वेस आय होते; तेथे त्याने परमेश्वराची वेदी बांधिली आणि परमेश्वराच्या नांवाने प्रार्थना केली.''

(पवित्रशास्त्र. उत्पति १२: ६-८)

१९०. ग्रंथात 'शआइर' हा शब्द वापरण्यात आलेला आहे. याने अभिप्रेत शरीअतीच्या त्या खूणा (Symbols) आहेत, ज्या ईश्वरभक्तिची प्रतिके व चिन्हे म्हणून निश्चित करण्यात आलेल्या आहेत. या चिन्हांचा आदर करणे आवश्यक आहे. परंतु आदराची जी पद्धत शरीअतीने घालून दिलेली आहे, त्याच पद्धीने त्यांचा आदर केला गेला पाहिजे. स्वत:हून नवीन पद्धत अंगिकारण्याचा आम्हाला कसलाही अधिकार नाही. असे झाल्यास 'शिर्क' (अनेकश्वरवाद) व 'बिदअत' (अनिष्ट अशा नव्या प्रथा) चे दरवाजे मोकळे होतील.

येथे ही गोष्ट चांगल्या प्रकारे जाणून घ्यावयास हवी की क़ुरआनमध्ये ईश्वराच्या चिन्हांचा-निशाण्यांचा - फक्त आदर करण्याची आज्ञा दिली गेली आहे. त्यांची पूजा करण्याची कधीही आज्ञा दिली गेलेली नाही. इस्लाममध्ये पूजा फक्त अल्लाहचीच होऊ शकते. आणि म्हणून अल्लाहच्या निशाण्याबद्दल कसलाही गैरसमज होता कामा नये. अज्ञानाच्या (जाहिलियतच्या) कालात सफा व मरवा वर दोन मूर्त्या ठेवण्यात आलेल्या होत्या. ईश्वराने ''सफ़ा' व मरवा' या अल्लाहच्या निशाण्यापैकी आहेत'' असे सांगून त्यांना मूर्त्यापासून पवित्र ठेविले पाहिजे याकडे लक्ष वेघले आहे. कारण त्या निव्वळ ईश्वरभक्तिची प्रतिके म्हणूनच उठून दिसल्या पाहिजेत.

१९१. 'उम्रा' काबा-गृहाच्या जियारतीला (दर्शनाला) म्हणतात. जो माणूस उम्रा करू इच्छितो त्याला हरमच्या हद्दीमध्ये प्रवेश करण्यापूर्वी ऐहराम (न शिवलेले वस्त्र) बांधावा लागतो. उम्रामध्ये काबागृहाची प्रदक्षिणा आणि 'सफ़ा' व 'मरवा' यांच्या दरम्यान दौड (सई) केली जाते. ही दौड सात वेळा करावयाची असते. उम्रा कोणत्याही वेळी केला जाऊ शकतो. परंतु हज्ज, हज्जच्या कालातच अदा होऊ शकते. हज्जमध्ये अरफ़ातला जाणे आवश्यक असते. जे लोक हज्ज यात्रेस जातात ते सर्वसाधारणपणे प्रथम उम्रा करतात आणि मग हज्ज करतात.

१९२. इशारा खासकरून त्या निशाण्याकडे आहे. ज्या ईश्वराने हज़रत इब्राहीम यांचा किब्ला आणि शेवटचे पैगंबर यांच्या संबंधी निवेदन केल्या आहेत. परंतु यहुदी लोकांनी त्या लपविण्याचे प्रयत्न केले. वर तळटीप नं.१८९ मध्ये त्याचे एक उदाहरण आहे त्यांनी 'मरवा' हे नांव बदलून त्याला 'मोरा' क़रून टाकले.

१९३. तौरातमध्ये आहे की,''उलटपक्षी, तू आपला देव परमेश्वर ह्याची वाणी ऐकली नाही. आणि त्याच्या ज्या सर्व आज्ञा व विधि पाळायला मी आज तुला सांगत आहे त्या तू काळजीपूर्वक पाळल्या नाहीत, तर पुढील सर्व शाप तुझ्यामागे येऊन तुला गाठतील''

(पवित्रशास्त्र. अनुवाद २८: १५)

## सई सफा आणि मर्वाच्या दरम्यान



१६०. तथापि, ज्या लोकांनी पश्चाताप व्यक्त केला व (आपल्या वर्तनात) सुधारणा केली व स्पष्टपणे निवेदन केले, त्यांच्या पश्चातापाचा मी स्वीकार करीन. मी मोठा पश्चाताप स्वीकारणारा व दया करणारा आहे.

إِلَّا الَّذِينَ تَابُوا وَأَصْلَحُوا وَبَيَّنُوا فَأُولَٰئِكَ أَتُوبُ
عَلَيْهِمْ ۚ وَأَنَا التَّوَّابُ الرَّحِيمُ ﴿١٦٠﴾

१६१. निःसंशय ज्या लोकांनी इन्कार (कुफ्र) केला आणि इन्कार करीत राहिलेल्या अवस्थेतच मरण पावले, त्यांच्यावर अल्लाह फिरीश्ते आणि साऱ्या लोकांची निर्भत्सना (लअनत) आहे.

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا وَمَاتُوا وَهُمْ كُفَّارٌ أُولَٰئِكَ عَلَيْهِمْ
لَعْنَةُ اللَّهِ وَالْمَلَائِكَةِ وَالنَّاسِ أَجْمَعِينَ ﴿١٦١﴾

१६२. ते सदैव याच अवस्थेत राहतील. त्यांची शिक्षा न सौम्य करण्यात येईल न त्यांना अवसर दिला जाईल.

خَالِدِينَ فِيهَا ۖ لَا يُخَفَّفُ عَنْهُمُ الْعَذَابُ وَلَا هُمْ يُنْظَرُونَ ﴿١٦٢﴾

१६३. आणि तुमचा [११४] ईश एकच ईश आहे. त्या रहमान (परम दयाळू) व रहिमच्या [११५] (परम कृपाळू ) शिवाय दुसरा कोणी ईश नाहीं.

وَإِلَٰهُكُمْ إِلَٰهٌ وَاحِدٌ ۖ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ الرَّحْمَٰنُ الرَّحِيمُ ﴿١٦٣﴾

१६४. निःसंशय आकाशांच्या व ज़मिनीच्या निर्मितीमध्ये [११६] रात्र व दिवसाच्या एक दुसऱ्याच्या पाठोपाठ येण्यामध्ये त्या जहाजांमध्ये जी समुद्रात लोकांना फायदा पोहचविणारे सामान घेऊन वाहतूक करीत असतात, त्या पाण्यामध्ये ज्याचा अल्लाहने वरून वर्षाव केला व ज्याद्वारें मृतवत झालेल्या जमीनीला पुन्हा जीवन दिले [११७] आणि त्यामध्ये प्रत्येक प्रकारचे सजीव प्राणी पसरविले, आणि वाऱ्यांच्या भ्रमाणामध्ये व त्या ढगांमध्ये जे आकाश व जमिनीच्या दरम्यान सेवानिमग्न आहेत [११८] त्या लोकांसाठी निशाण्या [११९] आहेत जे समंजस आहेत.

إِنَّ فِي خَلْقِ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَاخْتِلَافِ اللَّيْلِ وَالنَّهَارِ
وَالْفُلْكِ الَّتِي تَجْرِي فِي الْبَحْرِ بِمَا يَنْفَعُ النَّاسَ وَمَا أَنْزَلَ اللَّهُ
مِنَ السَّمَاءِ مِنْ مَاءٍ فَأَحْيَا بِهِ الْأَرْضَ بَعْدَ مَوْتِهَا
وَبَثَّ فِيهَا مِنْ كُلِّ دَابَّةٍ وَتَصْرِيفِ الرِّيَاحِ وَالسَّحَابِ
الْمُسَخَّرِ بَيْنَ السَّمَاءِ وَالْأَرْضِ لَآيَاتٍ لِقَوْمٍ يَعْقِلُونَ ﴿١٦٤﴾

१६५. परंतु लोकांमध्ये असेही काही आहेत जे इतरांना अल्लाहच्या बरोबरीचे ठरवितात.आणि त्यांच्यावर असे प्रेम करतात जसे प्रेम अल्लाहवर केले पाहिजे.पण ईमान आणलेले लोक अल्लाहशीच सर्वात अधिक प्रेम ठेवतात[१२०]आणि जर हे अत्याचारी लोक त्या प्रसंगाला आज पाहू शकले असते जो (प्रसंग) ईश्वरी कोप ते नंतर पाहणार आहेत, तर त्यांना चांगल्या प्रकारे माहीत झाले असते की सर्व सामर्थ्य अल्लाहच्याच हाती आहे आणि अल्लाह सक्त सजा देणारा आहे.

وَمِنَ النَّاسِ مَنْ يَتَّخِذُ مِنْ دُونِ اللَّهِ أَنْدَادًا يُحِبُّونَهُمْ كَحُبِّ
اللَّهِ ۖ وَالَّذِينَ آمَنُوا أَشَدُّ حُبًّا لِلَّهِ ۗ وَلَوْ يَرَى الَّذِينَ ظَلَمُوا إِذْ
يَرَوْنَ الْعَذَابَ أَنَّ الْقُوَّةَ لِلَّهِ
جَمِيعًا وَأَنَّ اللَّهَ شَدِيدُ الْعَذَابِ ﴿١٦٥﴾

१९४. या आयतीपासून नवीन निवेदनक्रम सुरू होत आहे. यामध्ये शरीअतीच्या आज्ञा दिल्या गेल्या आहेत विशेषत: पवित्र कुरआनच्या अवतरणकालीन परिस्थितीत ज्या बाबतीत ईश्वरी आज्ञांची आवश्यकता भासत होती त्या बाबीसंबंधीच्या आज्ञा दिल्या गेल्या आहेत. याची सुरवात एकेश्वरवादाच्या- तौहीदच्या- निवेदनाने होत आहे.

१९५. माणूस अनेकेश्वरादाला बळी पडतो. त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे त्याची ईश्वराबद्दलची चुकीची कल्पना की ईश्वराने माणसाला निर्माण केल्यानंतर त्याच्याशी कसलाही संबंध राखला नाही. येथे 'इलाह'च्या बरोबर 'रहमान' व 'रहीम' या गुणांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. याने या कल्पनेचे खंडन होते. आणि हे स्पष्ट होते की ईश्वर माणसाच्या बाबतीत फार मेहरबान आहे. प्रत्येक क्षणी त्याच्यावर त्याची कृपा होत असते. आणि या मार्गदर्शक ग्रंथाचे (पवित्र कुरआनचे) अवतरण ही सुद्धा त्याची कृपाच कृपा आहे.

१९६. आकाश व जमीनीची निर्मिती त्यांच्या निर्माणकर्त्याच्या थोर सामर्थ्याची त्याच्या अजोड कला कौशल्याची, त्याच प्रमाणे त्याच्या आश्चर्यकारक बुद्धीमत्तेची साक्ष देत आहेत. त्यांच्यापासून होणाऱ्या फायद्यामुळे त्याच्या कृपागुणांचा व धोरणीपणाचा परिचय घडतो. आणि ही खात्री होते की हा कारखाना विनाकारण निर्माण केला गेलेला नाही. या पाठीमागे एक उदात्त ध्येय आहे. आणि या ध्येयाच्या प्रकटीकरणासाठी कियामतीच्या दिवस निश्चित केला गेलेला आहे.

१९७. पावसाचे पाणी ज्याचा आकाशातून वर्षाव होतो व ज्यामुळे जमिनीला जीवन लाभते, हा या गोष्टीचा पुरावा आहे की आकाश व जमीनीमध्ये पूर्ण मेळ आहे. मग लोक जमीनीचा देव वेगळा व आकाशाचा देव वेगळा अशी कल्पना कशी करतात? जर एक ईश्वराच्या ऐवजी अनेक देव असते तर आकाश व जमीनीच्या व्यवस्थेत आज जी संपूर्ण एकेवाक्याता आढळून येते ती कशी दिसून आली असती?

१९८. म्हणजे परमेश्वराने त्यांना आपले आज्ञाधारक बनवून माणसाची सेवा करण्यासाठी त्यांची नियुक्ती केली आहे.

१९९. एखाद्या गोष्टीची निशाणी ही तिचा पुरावा असते. आणि म्हणून या गोष्टी निशाण्या आहेत याचा अर्थ असा की या गोष्टी अल्लाहचे अस्तित्व, त्याचे एकमेवत्व, आणि त्याच्या कृपा गुणांचा पुरावा आहेत.

२००. एकेश्वरादाचा- तौहीदचा-हा उघड उघड पुरावा असताना देखील असेसुद्धा लोक आहेत जे बुद्धिचा वापर करीत नाहीत आणि ईश्वराच्या ईशत्वामध्ये इतरांना सहभागी करतात आणि त्यांच्याशी अशा प्रकारे प्रेम करू लागतात. जशा प्रकारच्या प्रेमाचा हक्कदार फक्त ईश्वरच आहे. निर्माता अल्लाहच आहे. फक्त तोच एकटा शासक व ईश आहे. अशा स्थितीत त्याच्याइतके वा त्याच्यापेक्षा अधिक प्रेम इतरावर कसे काय केले जाऊ शकते? आवश्यक आहे की प्रत्येक प्रेम अल्लाहच्या प्रेमाच्या अधीन असावे. हाच ईमानचा आत्मा व एकेश्वरवादाची निकड आहे.

१६६. त्यावेळी ते (नेते व पुढारी) ज्यांचे अनुकरण केले गेले होते आपल्या अनुयायांशी आपला कसलाही संबंध नसल्याची घोषणा करतील, [२०१] आणि शिक्षा पाहतील, आणि त्यांचे परस्पर संबंध तुटतील.

إِذْ تَبَرَّأَ الَّذِينَ اتُّبِعُوا مِنَ الَّذِينَ اتَّبَعُوا وَرَأَوُا الْعَذَابَ
وَتَقَطَّعَتْ بِهِمُ الْأَسْبَابُ ﴿١٦٦﴾

१६७. आणि त्यांचे अनुयायी म्हणतील. अरेरे ! (जगामध्ये जाण्याची) पुन्हां एक संधी आम्हांला दिली गेली असती तर आम्हीहि त्यांच्याशी आमचा संबंध नसल्याची घोषणा केली असती, ज्याप्रमाणे त्यांनी आज केली आहे. अशाप्रकारे अल्लाह त्यांना त्यांचे आचार निराशाजनक बनवून दाखवील आणि ते जहन्नमच्या आगीमधून कधीही बाहेर निघू शकणार नाहीत.

وَقَالَ الَّذِينَ اتَّبَعُوا لَوْ أَنَّ لَنَا كَرَّةً فَنَتَبَرَّأَ مِنْهُمْ كَمَا تَبَرَّءُوا
مِنَّا ۗ كَذَٰلِكَ يُرِيهِمُ اللَّهُ أَعْمَالَهُمْ حَسَرَاتٍ عَلَيْهِمْ ۖ
وَمَا هُمْ بِخَارِجِينَ مِنَ النَّارِ ﴿١٦٧﴾

१६८. लोकहो ![२०२] जमिनीमध्ये ज्या 'हलाल' (शास्त्रसंमत) व शुद्ध [२०३] वस्तु आहेत त्या खा. आणि सैतानाच्या पावलावर पाऊल टाकू नका. [२०४] खरोखरच तो तुमचा उघड उघड शत्रू आहे.

يَا أَيُّهَا النَّاسُ كُلُوا مِمَّا فِي الْأَرْضِ حَلَالًا طَيِّبًا وَلَا تَتَّبِعُوا
خُطُوَاتِ الشَّيْطَانِ ۚ إِنَّهُ لَكُمْ عَدُوٌّ مُبِينٌ ﴿١٦٨﴾

१६९. तो तर तुम्हांला वाईटाची व निर्लज्जपणाचीच आज्ञा करील. आणि ज्यांचे तुम्हाला ज्ञान नाहीं अशा गोष्टी अल्लाहशी जोडण्याची तो आज्ञा करील. [२०५]

إِنَّمَا يَأْمُرُكُمْ بِالسُّوءِ وَالْفَحْشَاءِ وَأَنْ تَقُولُوا عَلَى اللَّهِ
مَا لَا تَعْلَمُونَ ﴿١٦٩﴾

१७०. आणि त्यांना जेव्हां सांगितले जाते की अल्लाहकडून उतरलेल्या आदेशांचे अनुकरण करा तर म्हणतात की आम्ही त्याच पद्धतीचे अनुकरण करूं ज्याप्रमाणे आमचे वाडवडील करीत होते. काय त्या परिस्थितीतही हे त्यांचे अनुकरण करतील जेव्हां त्यांचे वाडवडील न बुद्धीने वागत होते न त्यांना मार्गदर्शन लाभले होते.

وَإِذَا قِيلَ لَهُمُ اتَّبِعُوا مَا أَنْزَلَ اللَّهُ
قَالُوا بَلْ نَتَّبِعُ مَا أَلْفَيْنَا عَلَيْهِ آبَاءَنَا ۗ أَوَلَوْ كَانَ آبَاؤُهُمْ
لَا يَعْقِلُونَ شَيْئًا وَلَا يَهْتَدُونَ ﴿١٧٠﴾

१७१. आणि या इन्कार करणाऱ्यांचे उदाहरण असे आहे की, एखादा माणूस जेव्हां जनावराना हांक मारतो तेव्हा ती ओरड व आवाजाशिवय काही ऐकत नाहीत.[२०७] हे बहिरे, मुके आणि आंधळे आहेत.आणि म्हणून काही समजूं शकत नाहीत.

وَمَثَلُ الَّذِينَ كَفَرُوا كَمَثَلِ الَّذِي يَنْعِقُ بِمَا لَا يَسْمَعُ إِلَّا
دُعَاءً وَنِدَاءً ۚ صُمٌّ بُكْمٌ عُمْيٌ فَهُمْ لَا يَعْقِلُونَ ﴿١٧١﴾

२०१. ज्यांच्यावर आज हे लोक अति प्रेम करीत आहेत ते कियामतीच्या दिवशी आपला या लोकांशी संबंध नसल्याची घोषणा करतील. येथे खासकरून दिशाभूल करणारे सरदार व पुढारी अभिप्रेत आहेत, ज्यांच्यावर अनेकश्वरवादी फार प्रेम करीत असत आणि ईश्वरावरील प्रेमाच्या तुलनेत त्यांच्यावरील प्रेमाला अग्रहवक देत असत.

२०२. येथून शरीअतीच्या अज्ञा व नियम यांचे निवेदन सुरू होत आहे.

२०३. 'तय्यिब' म्हणजे शुद्ध चांगले, विहित. इस्लामने ज्या गोष्टींना हलाल (शास्त्रसंमत व विहित) व जाइज (योग्य, उचित) ठरविले आहे त्या निश्चितच शुद्ध स्वच्छ व चांगल्या आहेत. म्हणजे त्या बाह्य व आंतरिक, दोन्ही दृष्टीने घाणीपासून स्वच्छ आहेत आणि त्या खाल्ल्याने माणसाच्या नीतिमत्तेवर वाईट परिणाम होत नाहीं.

२०४. म्हणजे आपल्या इच्छा (वासना) किंवा अनेकेश्वरवादी भ्रम यांच्या आधारावर कोणत्याही गोष्टीला हराम ठरवूं नका. ज्या लोकांनी शरीअतीच्या सनदेशिवाय कितीतरी गोष्टीना हराम ठरविले आहे. त्यांना हा मार्ग सैतानाने दाखविला आहे. उदा. परवानगी दिलेल्या जनावरांचा जबीहा (शस्त्रसंमत पद्धतीने जनावरास कापणे) ईश्वराने हलाल ठरविला आहे. परंतु अहिंसेच्या तंत्वप्रणालीनुसार मांसाहाराला पूर्णपणे हराम ठरविले म्हणजे ईश्वराच्या उचित, अनुचित, ठरविण्याच्या अधिकारात हस्तक्षेप करणे होय. आणि हे सैतानाचे स्पष्ट अनुकरण व हा उघडउघड अनेकेश्वरवाद आहे.

२०५. म्हणजे कोणत्याही सनदेशिवाय एखादी गोष्ट ईश्वराशी जोडणे. उदा. कोणत्याही प्रकारचा पुरावा नसतांना असे महणणे की ईश्वरानें अमक्या अमक्या गोष्टी हराम ठरविल्या आहेत.

२०६. विहित (परवानगी दिलेल्या हलाल) व निषिद्ध (मनाई केलेल्या हराम) च्या बाबतीत ईश्वरी ग्रंथाला प्रमाण मानले पाहिजे. वाडवडिलांचे अनुकरणावर व सनद नसलेल्या कथनावर भरवंसा ठेवू नये. पूर्वजांचे अंधानुकरण करणे वा जुन्या संसकृतीच्या नांवावर जुन्या चाकोरीतून जाणे ही काही योग्य गोष्ट नव्हे. माणसाने समजून उमजून वागले पाहिजे आणि ईश्वराच्या मार्गदर्शनाचा स्वीकार केला पाहिजे.

या आयती वरून ही मूलभूत शिकवण स्पष्ट होते की एखादी गोष्ट वाडवडीलापासून चालत आलेली आहे किंवा एखाद्या कथनास संस्कृतीचे स्वरुप प्राप्त झालेले आहे हा ती गोष्ट योग्य असल्याचा पुरावा होऊ शकत नाहीं. आणि म्हणून अशा गोष्टींचे अंध:नुकरण करण्या ऐवजी शोधक दृष्टीचा अवलंब केला पाहिजे की ज्या गोष्टींना धार्मिक स्वरूप दिले गेले आहे त्यांना ईश्वराच्या शरीयतीमध्ये काही सनद आहे किंवा कसे?

२०७. हे त्या लोकांचे उदाहरण आहे जे बुद्धी व अंतर्दृष्टीचा वापर न करता निव्वळ वाडवडीलांचे अंधानुकरण करीत आहेत. त्यांचे उदाहरण मेंढराच्या कळपासारखे आहे. जी काही विचार करू शकत नाहीत, काही समजू शकत नाहीत. ती मेंडपाळाचा आवाज तर ऐकततात, परंतु त्यापुढे काही समजू शकत नाहीत. हीच स्थिती या लोकांची आहे. हे आवाहकाचा आवाज तर ऐकतात. पण तो काय म्हणत आहे हे समजू शकत नाहीत.

१७२. हे ईमान आणलेल्या लोकानो ! ज्या शुद्ध वस्तु आम्ही तुम्हाला प्रदान केलेल्या आहेत त्या खा आणि अल्लाहचे आभार माना जर तुम्ही त्याची गुलामी करीत असाल तर. [२०८]

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ كُلُوا۟ مِن طَيِّبَٰتِ مَا رَزَقْنَٰكُمْ
وَٱشْكُرُوا۟ لِلَّهِ إِن كُنتُمْ إِيَّاهُ تَعْبُدُونَ ﴿١٧٢﴾

१७३. त्याने तुमच्यासाठी फक्त [२०९] मेलेले [२१०] (जनावरांचे मांस), रक्त,[२११] डुकरांचे मांस [२१२] आणि ते ज्याच्यावर अल्लाहशिवाय दुसऱ्याचे नांव घेतले असेल [२१३] 'हराम' (निषिद्ध) ठरविले आहे. परंतु ज्याचा नाइलाज झाला असेल, ज्याला याची इच्छा नसेल आणि जो मर्यादेचे उल्लघन करणारा नसेल (त्याने जर जीव वांचविण्यासाठी यापैकी थोडेसे खाल्ले) तर त्याचा कसलाही गुन्हा नाही [२१४] नि:संशय अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

إِنَّمَا حَرَّمَ عَلَيْكُمُ ٱلْمَيْتَةَ وَٱلدَّمَ وَلَحْمَ ٱلْخِنزِيرِ وَمَآ أُهِلَّ بِهِۦ
لِغَيْرِ ٱللَّهِ ۖ فَمَنِ ٱضْطُرَّ غَيْرَ بَاغٍ وَلَا عَادٍ فَلَآ إِثْمَ عَلَيْهِ ۚ إِنَّ ٱللَّهَ
غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٧٣﴾

१७४. नि:संशय जे लोक या गोष्टींना लपवितात ज्या अल्लाहने आपल्या ग्रंथात उतरविल्या आहेत [२१५] आणि त्यांच्या मोबदल्यात क्षुल्लक किंमत स्वीकारतात ते आपले पोट आगीने भरीत आहेत. [२१६] अल्लाह 'क़ियामती'च्या (शेवटच्या निर्णयाच्या) दिवशी न त्यांच्याबरोबर बोलेल न त्यांना शुचिर्भूत [२१७] करील. त्यांच्यासाठी दु:खदायक शिक्षा आहे.

إِنَّ ٱلَّذِينَ يَكْتُمُونَ مَآ أَنزَلَ ٱللَّهُ مِنَ ٱلْكِتَٰبِ وَيَشْتَرُونَ
بِهِۦ ثَمَنًا قَلِيلًا ۙ أُو۟لَٰٓئِكَ مَا يَأْكُلُونَ فِى بُطُونِهِمْ إِلَّا ٱلنَّارَ
وَلَا يُكَلِّمُهُمُ ٱللَّهُ يَوْمَ ٱلْقِيَٰمَةِ وَلَا يُزَكِّيهِمْ وَلَهُمْ
عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١٧٤﴾

१७५. हेच लोक आहेत ज्यांनी मार्गदर्शना ऐवजी मार्गभ्रष्टता आणि क्षमेऐवजी शिक्षा खरेदी केली. पहा ! जहन्नमच्या आगी (मध्ये जळण्या) साठी हे किती मोठे साहस दाखवित आहोत ! [२१८]

أُو۟لَٰٓئِكَ ٱلَّذِينَ ٱشْتَرَوُا۟ ٱلضَّلَٰلَةَ بِٱلْهُدَىٰ
وَٱلْعَذَابَ بِٱلْمَغْفِرَةِ ۚ فَمَآ أَصْبَرَهُمْ عَلَى ٱلنَّارِ ﴿١٧٥﴾

१७६. हे यासाठी की अल्लाहने ग्रंथ सत्यासह उतरविला. परंतु ज्या लोकांनी ग्रंथामध्ये मतभेद केला त्यांनी आपल्या विरोधात मोठी मजल मारीत गेले. [२१९]

ذَٰلِكَ بِأَنَّ ٱللَّهَ نَزَّلَ ٱلْكِتَٰبَ بِٱلْحَقِّ ۗ وَإِنَّ ٱلَّذِينَ
ٱخْتَلَفُوا۟ فِى ٱلْكِتَٰبِ لَفِى شِقَاقٍ بَعِيدٍ ﴿١٧٦﴾

२०८ ईमान धारकांना संबोधून सांगितले जात आहे की लोकांनी खाण्यापिण्याच्या बाबतीत जर स्वत:वर अयोग्य प्रतिबंध लादून घेतल असतील आणि जर ते भ्रमामध्येच गुरफटून राहू इच्छित असतील तर तुम्ही त्यांना त्यांच्या स्थितीवर सोडून द्या. आणि ज्या चांगल्या वस्तू अल्लाहने तुम्हाला प्रदान केलेल्या आहेत त्या कसलाही किंतु न बाळगता खा.

यावरून स्पष्ट होते की, लोकांनी जर मांसाहारापासून दूर राहणे धार्मिक प्रतिष्ठेचे ठरविले असेल तर हा त्यांचा निव्वळ भ्रम आहे. आणि अशा प्रकारच्या बंधनांना नाहीसे करणे ही ईश्वर भक्तिची स्पष्ट निकड आहे.

अल्लाहच्या पैगंबरांनी हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) फर्माविले आहे:-

من صلّٰی صلوٰتنا و استقبل قبلتنا و اکل ذبیحتنا فذالک المسلم۔

''ज्याने आमच्या प्रमाणे नमाज़ अदा केली, आमच्या किब्ल्याकडे तोंड वळविले आणि आमच्या जबीहाला खाल्ले तो मुसलमान आहे.''

म्हणजे मुसलमान होण्यासाठी हे आवश्यक आहे की, माणसाने खाण्यापिण्याच्या बाबतीत सर्व भ्रामक समजूतीना, पाद्री, पंडीत व जोगी वगैरेनी लादलेल्या शरीयती विरोधी प्रतिबंधाना नाहीसे करावे आणि निव्वळ अल्लाहच्या आज्ञांचा अनुयायी बनावे.

२०९. सूरह माइदा च्या पहिल्या आयतीमध्ये स्पष्ट केले गेले आहे की ''तुमच्यासाठी चारा खाणारी चतुष्पाद जनावरे हलाल केली गेली आहेत.'' आणि म्हणून जी जनावरे चारा खात नाहीत उदा. हिंस्र पशू वगैरे बद्दलची मनाई स्पष्ट आहे. या आयतीमध्ये फक्त अमक्या, अमक्या गोष्टी हराम केल गेल्या आहेत असे जे फर्माविले गेले आहे याचा अर्थ इस्लाममध्ये या चार गोष्टीखेरीज इतर कोणतीही गोष्ट हराम नाही असा होत नाही. परंतु ही आज्ञा हज़रत इब्राहीम (अलेहिस्सलाम.) यांच्या समाजाला मान्य करणाऱ्या लोकांना दृष्टीसमोर ठेवून दिली जात आहे. ज्या गोष्टीबद्दल त्या हलाल आहेत किंवा हराम असा वाद निर्माण झाला होता त्याबद्दल वस्तु:स्थिती अशी आहे की परमेश्वराने फक्त या चार गोष्टी हराम ठरविल्या आहेत; त्यामध्ये जी वाढ लोकांनी केली आहे त्याचे स्वरूप धर्मामध्यें वाढ करण्यासारखे आहे हे स्पष्ट केले गेले.

२१०. मुर्दार चा अर्थ ते पशू वा पक्षी आहेत ज्यांना धार्मिक (इस्लामी) पद्धतीने कापले गेले नाही तर जे नैसर्गिकपणे मेले. याला मनाई करण्यामागील धोरण अगदी स्पष्ट आहे. जे जनावर नैसर्गिकपणे मरते त्याचे मांस रक्त शरीरात राहात असलेने गलीच्छ व घाण होते आणि सुशील मन मुर्दारच्या मांसाचा तिटकारा करते. या खेरीज मुर्दारचे मांस अपायकारक ठरण्याचाही संभव असतो. एखाद्या रोगामुळे ते मेले असण्याचीही शक्यता आहे. तौरातमध्येही मुर्दारला हराम ठरविण्यात आलेले आहे.

''आपोआप मेलेले काहीही तुम्ही खावूं नये''

(जूना करार. अनुवाद १४: २१)

२११. रक्ताच्या मनाई मागील तारतम्य दृष्टी स्पष्ट आहे. रक्त अशुद्ध व घाणेरडे असते. सुशील मन याचा तिटकारा करते. आणि रक्त पिणे ही हिंस्र पशूंचे वैशिष्ट्य आहे. माणसासारख्या सन्माननीय निर्मितीच्या प्रतिष्ठेशी ते विसंगत आहे. यामुळे माणसामध्ये हिंसकवृत्ती निर्माण होऊ शकते. आणि त्याच्यामध्ये नैतिक बिघाडा बरोबर इतर बिघाड होण्यचीही शक्यता आहे.

अज्ञान कालीन लोक उंट प्राण्यांच्या शरीरात एखादी धारदार वस्तू भोसकत असत आणि जे रक्त निघे ते पित असत.याने जनावरालाही फार त्रास होत असे. अल्लाहने रक्ताला हराम ठरवून जनावरांवर कृपाच केलेली आहे. तौरातमध्ये देखील रक्ताला हराम ठरविण्यात आले आहे.

''त्याचे रक्त मात्र सेवन करू नये. पाण्याप्रमाणे ते जमीनीवर टाकून द्यावे.''

(जूना करार अनुवाद १२ : १६)

२१२. डुक्कर हे घाणेरडे जनावर आहे. त्यांचे आवडते अन्न म्हणजे घाण, विष्ठा व गलीच्छ केरकचरा. चांगल्या स्वभाव प्रकृतीला याची किळस वाटते. याशिवाय त्याचे मांसही अपायकारक आहे.

''आधुनिक वैद्यशास्त्राच्या दृष्टीने याचे सेवन प्रत्येक प्रदेशात आणि विशेषत: उष्ण प्रदेशात अत्यंत हानिकारक आहे. शास्त्रीय प्रयोगानी हे सिद्ध केलेले आहे की डुक्कराच्या मांसाच्या सेवनाने विशिष्ट प्रकारचे किडे निर्माण होतात, जे अति प्राणघातक असतात. आणि पुढे आणखी कोणकोणंती रहस्ये उघडकीस येतील हे माहित नाही. संशोधक असेही सांगतात की डुक्कराच्या मांसाच्या नित्य सेवनाने लज्जा कमी होते. स्वभिमान कमी होतो.''

(इस्लाम मध्ये हलाल व हराम पृष्ठ ६३ अल्लामा यूसुफ करज़ावी)

तौरात मध्येही डुक्कराला हराम ठरविले गेले आहे.

''डुक्कराचा खूर दुभंगलेला आहे, पण तो रवंथ करीत नाही. म्हणून तो अशुद्ध समजावा. त्याचे मांस तुम्ही खावू नये आणि त्यांच्या शवांना शिवूं नये.''

(जुना करार. अनुवाद १४:८)

२१३. म्हणजे ज्या जनावराला अल्लाहशिवाय इतर कोणाच्या नांवावर कापले गेले असेल, मग ती मूर्ति असो, जिन्न असो,

फिरिश्ता असो वा एखादा थोर माणूस. अनेकेश्वरवाद हा सर्वात मोठा बौद्धिक व आंतरिक गलिच्छपणा आहे. आणि गैरूल्लाहच्या (अल्लाहशिवाय इतरांच्या) नांवावर जो जबीहा केला गेला असेल त्याच्या मनाईचे कारण त्याचा आंतरिक गीलच्छपणा होय.

''मूर्तिपूजक आपल्या जबीहावर 'लात','उज्जा' वगैरे मूर्तिची नावे घेत असत. ही गैरूल्लाहसाठी समर्थन व जवळीक होती. याला निषिद्ध ठरविण्याचे कारण धार्मिक आहे. आणि याचा उद्देश एकेश्वरवादाचे संरक्षण करणे श्रद्धांचे पावित्र्य टिकविणे आणि अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेच्या निदर्शनाच्या विरोध करणे हा आहे.

परमेश्वराने माणसाची निर्मिती केली. जमिनीच्या सर्व वस्तू त्याच्या ताब्यांत दिल्या. आणि जनावरांनाही त्याच्या अधीन केले. इतकेच नव्हे तर माणसाच्या फायद्यासाठी त्यांचे प्राण घेणे देखील फक्त जबीहा करताना अल्लाहचे नांव घेण्याच्या अटीवर वैद्य ठरविले. जणू अल्लाहचे नांव घेणे म्हणजे ही गोष्ट जाहीर करणे होय की एका सजीव प्राण्याला जबीहा करण्याचे काम तो अल्लाहच्याच परवानगीने करीत आहे. परंतु जर तो जबीहा करताना गैरूल्लाहचे (अल्लाहशिवाय इतराचे) नांव घेईल तर तो प्रत्यक्षपणे स्वत:हून ती परवानगी निरर्थक ठरवीत आहे आणि म्हणून तो या जबीहाच्या उपभोगापासून वंचित ठेवण्यास पात्र आहे.''

(इस्लाम मध्ये) हलाल व हराम पृष्ठ ६४. अल्लामा यूसुफ करझावी)

२१४. म्हणजे एखादी व्यक्ति खरोखरच लाचार असेल. भूक व आजारामुळे तिचे प्राण संकटात असेल तर फक्त जीव वाचविण्यासाठी ती व्यक्ति हराम वस्तुही खाऊ शकते. तथापि हराम वस्तु खाण्याची तिची इच्छा नसावी आणि जितके अत्यावश्यक आहे तितकेच खावे. अशा परिस्थितीत हा गुन्हा मानला जाणार नाही.

२१५. इशारा ग्रंथधारकांकडे आहे. ज्याप्रमाणे अनेकेश्वरवादी (मुश्रिक) लोकांनी काही वस्तू हराम ठरवून टाकल्या होत्या. त्याचप्रमाणे ग्रंथधारकही हरामला हलाल व हलालला हराम ठरवित आहेत. आणि तौरातच्या आज्ञांना लपवित आहोत.

स्पष्ट असो की ग्रंथधारकांना मुख्यत: त्याच गोष्टी हराम ठरविण्यात आल्या होत्या ज्या हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम.) यांच्या समाजावर हराम होत्या. नंतर यहुदी लोकांच्यावर त्यांच्या बंडखोरीमुळे काहीं वस्तू हराम केल्या गेल्या होत्या. आणि त्यांना सांगितले गेले होते की, जेव्हा शेवटचे पैगंबर येतील तेव्हा ते ही बंदी उठवितील. व तुमच्यासाठी सर्व स्वच्छ व शुद्ध वस्तू हलाल ठरवितील. परंतु यहुदी लोकांनी तौरात मधील या गोष्टींना लपविले.

२१६. हा इशारा त्या यहुदी धर्मगुरूंच्याकडे आहे जे ईश्वराच्या ग्रंथाचे ज्ञान अवगत असताना देखील धर्म शास्त्राच्या आज्ञावर पडदा टाकीत होते. आणि आपल्या वर्तणूकीने गैरसमज व अनावश्यक बंदीचे समर्थन करीत असत. हे लोक निव्वळ आपला स्वार्थ साधण्यासाठी सत्याला लपवित आहेत. परंतु वस्तु:स्थिती ही आहे की धर्माच्या विक्रीच्या बदल्यात जो स्वार्थ हे साधत आहेत तो अग्नि आहे व त्याने हे आपले पोट भरीत आहेत.

२१७. इशारा त्या धार्मिक पुढाऱ्यांच्याकडे आहे जे लोकांच्या धार्मिक भावनेची पिळवणूक करून देखील स्वत:ला मोठे सन्माननीय, प्रतिष्ठित व आदरणीय ठरवित असत. त्यांच्या त्या खोट्या दाव्याचे खंडण करण्यासाठी फर्माविले जात आहे की कियामतीच्या दिवशी जेव्हा सत्याच्या कसोटीवर त्यांना पारखले जाईल तेव्हा ते कदापिही सन्माननीय व प्रतिष्ठीत ठरणार नाहीत.

२१८. म्हणजे हे लोक ज्या धिटाईने ज्ञानावर अज्ञानाला प्राधान्य देत आहेत. ती खरोखरच आश्चर्यजनक आहे. कारण की यावरून अंदाज होतो की ते आगीमध्ये जळण्यास अगदी तयार आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या धाडसाला अवश्य दाद दिली पाहिजे.!

२१९. ग्रंथधारकांनी अल्लाहच्या दीन (जीवन-व्यवस्था) मध्ये निरनिराळे मतभेद निर्माण करून ठेविले होते. यामुळे लोकांना हे जाणून घेणे अत्यंत अवघड झाले होते की हलाल काय आहे व हराम काय आहे. अल्लाहने कुरआनला सत्यासह म्हणजे त्या मतभेदाबाबतीत निर्णायक वचन बनवून उतरविले. कारण अल्लाहची शरीअत (धर्मशास्त्र) आपल्या खऱ्या व संपूर्ण स्वरूपात लोकांच्या समोर यावी. यानंतर देखील जे लोक मतभेद करीत आहेत ते निव्वळ विरोधासाठी असे करीत आहेत.

**सदाचार हा नव्हे की तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे अगर पश्चिमेकडे करावे सदाचार तर त्या लोकांचा आहे जे अल्लाह, शेवटचा दिवस, फिरिश्ते ईश ग्रंथ आणि पैगंबर यांच्यावर ईमान आणतात आणि आपली संपति अल्लाहच्या प्रेमापोटी, नातलगांवर, अनाथांवर दीनदुबळ्यांवर वाटसरुंवर आणि हात पसरविणाऱ्यांवर त्याचप्रमाणे माना सोडविण्यासाठीं (गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी) खर्च करतात. नमाज कायम करतात, ज़कात देतात, वचन दिल्यास ते पाळतात आणि टंचाईत व संकटामध्ये आणि युद्धाच्या समयीं धैर्यानें वागतात. हेच ते लोक आहेत जे प्रामाणिक आहेत आणि हेच लोक वस्तुतः अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.** *(अल-क़ुरआन)*

**१७७.** सदाचार[२२०] हा नव्हे की तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे अगर पश्चिमेकडे करावे सदाचार तर त्या लोकांचा आहे जे अल्लाह, शेवटचा दिवस, फिरिश्ते [२२१] ईश ग्रंथ आणि पैगंबर यांच्यावर ईमान आणतात [२२२] आणि आपली संपति अल्लाहच्या प्रेमापोटी, नातलगांवर, अनाथांवर दीनदुबळ्यांवर वाटसरुंवर आणि हात पसरविणाऱ्यांवर [२२३] त्याचप्रमाणे माना सोडविण्यासाठीं [२२४] (गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी) खर्च करतात. नमाज़ कायम करतात, ज़कात [२२५] देतात, वचन दिल्यास ते पाळतात आणि टंचाईत व संकटामध्ये आणि युद्धाच्या समयीं धैर्यानिं वागतात.[२२६] हेच ते लोक आहेत जे प्रामाणिक आहेत आणि हेच लोक वस्तुत: अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.

لَيْسَ الْبِرَّ اَنْ تُوَلُّوْا وُجُوْهَكُمْ قِبَلَ الْمَشْرِقِ وَ الْمَغْرِبِ
وَلٰكِنَّ الْبِرَّ مَنْ اٰمَنَ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ وَالْمَلٰٓئِكَةِ وَالْكِتٰبِ
وَالنَّبِيّٖنَ ۚ وَاٰتَى الْمَالَ عَلٰى حُبِّهٖ ذَوِي الْقُرْبٰى وَالْيَتٰمٰى
وَالْمَسٰكِيْنَ وَابْنَ السَّبِيْلِ ۙ وَالسَّآئِلِيْنَ وَفِي الرِّقَابِ ۚ
وَاَقَامَ الصَّلٰوةَ وَاٰتَى الزَّكٰوةَ ۚ وَالْمُوْفُوْنَ بِعَهْدِهِمْ اِذَا
عٰهَدُوْا ۚ وَالصّٰبِرِيْنَ فِي الْبَاْسَآءِ وَ الضَّرَّآءِ وَحِيْنَ
الْبَاْسِ ۗ اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ صَدَقُوْا ۗ وَاُولٰٓئِكَ هُمُ الْمُتَّقُوْنَ ﴿١٧٧﴾

**१७८.** हे ईमान आणलेल्या लोकानो ! ठार करण्यात आलेल्याबद्दल ‘किसास’ [२२७] (खूनाचा बदला घेण्याबाबतीत समानता) तुमच्यावर आवश्यक ठरविण्यात आलेला आहे. स्वतंत्र माणसाच्या बदल्यांत स्वतंत्र माणूस गुलामच्या बदल्यात गुलाम, स्त्रीच्या बदल्यात स्त्री. [२२८] अलबत खूनी माणसाबरोबर त्याच्या भाऊ [२२९] काही समझोता करण्यास तयार होईल तर योग्य पद्धत स्वीकारली जावी आणि चांगल्या प्रकारे खूनाबद्दल भरपाई [२३०] (Blood Money) केली जावी. ही तुमच्या पालनकर्त्याकडून सवलत व त्याची कृपा आहे. यांनतर देखील जो अतिरेक करील त्याच्यासाठी दु:खदायक शिक्षा आहे.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا كُتِبَ عَلَيْكُمُ الْقِصَاصُ فِي الْقَتْلٰى ۗ اَلْحُرُّ
بِالْحُرِّ وَالْعَبْدُ بِالْعَبْدِ وَالْاُنْثٰى بِالْاُنْثٰى ۗ فَمَنْ عُفِيَ لَهٗ مِنْ اَخِيْهِ
شَيْءٌ فَاتِّبَاعٌ ۢبِالْمَعْرُوْفِ وَاَدَآءٌ اِلَيْهِ بِاِحْسَانٍ ۗ ذٰلِكَ تَخْفِيْفٌ مِّنْ
رَّبِّكُمْ وَرَحْمَةٌ ۗ فَمَنِ اعْتَدٰى بَعْدَ ذٰلِكَ فَلَهٗ عَذَابٌ اَلِيْمٌ ﴿١٧٨﴾

**१७९.** आणि समंजस लोकांनो ! तुमच्यासाठी ‘किसास’ मध्ये जीवन [२३१] आहे. (आणि म्हणून तो आवश्यक ठरविण्यात आला आहे) कारण तुम्ही (अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादेचे उल्लंघन करण्यापासून) वाचावे.

وَلَكُمْ فِي الْقِصَاصِ حَيٰوةٌ يّٰٓاُولِي الْاَلْبَابِ
لَعَلَّكُمْ تَتَّقُوْنَ ﴿١٧٩﴾

२२०. हा यहुदी व ईसाई लोकांच्या बाह्य अवड बरोबर आक्षेप आहे. ते दीनचा अस्सल आत्मा गमावून बसले होते. त्यानी शरीअतीला काही रीतरिवाज व दिखाव्याच्या गोष्टींचा संग्रह बनवून ठेविले होते. आणि म्हणून पूर्वेकडे अगर पश्चिमेकडे तोंड करणे हीच खरी धार्मिकता असे समजून बसले होते. कुरआन येथे दीनचे सत्यस्वरूप प्रकट करीत आहे. सचोटीने एकमेव ईश्वराची भक्ति व आज्ञापालन आणि ती नीति व आचरण, ज्यानें धैर्याचा आविष्कार घडतो, या दीनमध्ये खरे महत्व असलेल्या गोष्टी आहेत. त्यावर हुकूम आचरण केल्याशिवाय माणसाला दीनच्या सत्यस्वरूपाचा लाभ होऊ शकत नाही. दीनच्या बाबतीत दिखाऊपणाच्या प्रवृत्तीस अल्लाहजवळ काही महत्व नाहीं आणि अल्लाहवर खरी निष्ठा व त्याच्या शरीअतीचे प्रामाणिकपणे अनुकरण करण्याची भावना नसेल तर ईश्वरभक्तिचा दावा पण अगदी निरर्थक आहे.

मुळात ''बिर्र''हा शब्द वापरला गेला आहे. याचा मूळ अर्थ हक्क अदा करणे असा आहे. आणि याच्या विस्तृत अर्थात ईश्वर व त्याचे दास यांचे हक्क अदा करणे व त्यच्याबरोबर सर्व प्रकारचा सदाचार व चांगुलपणा यांचा समावेश होतो.

२२१. सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या पैगंबरांचेवर ''वही'' (आदेश) फिरिश्त्याद्वारे पाठवित असतो. फिरिश्ते अत्यंत स्वच्छ व पवित्र अशी परमेश्वराची निर्मिती आहे. ते वहीची अमानत त्यामध्ये काहीसुद्धा फरक न करता पैगंबरापर्यंत पोहचवितात. हे कार्य अल्लाहच्या देखरेखीखाली पार पडते.आणि म्हणून यामध्ये त्यांच्याकडून कसल्याही प्रकारची भूलचूक होण्याची शक्यता नाही.आणि सैतान त्यांच्या या कार्यात व्यत्यय आणू शकत नाही फिरिश्ते हे ''वही'' पोंहचविण्याचे अत्यंत विश्वसनीय साधन आहे आणि म्हणून त्यांच्यावर ईमान आणणे आवश्यक आहे.

२२२. ईमानानें अभिप्रेत येथे खरे ईमान आहे. कारण खऱ्या ईमानाद्वारेच माणूस अल्लाहचा निष्ठावंत दास सिद्ध होऊ शकतो.

२२३. ते लोक जे मदतीसाठी हात पसरतात.

२२४. अभिप्रेत गुलामांच्या माना आहेत. त्यांना गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त करणे हा फार मोठा सदाचार आहे. यावरून स्पष्ट आहे की इस्लामच्या दृष्टीने स्वतंत्र व्यक्तिला गुलाम बनविणे हा सदाचार नव्हे. तर जे लोक गुलामगिरीच्या शुखलांमध्ये जखडलेले आहेत. त्यांना स्वतंत्र करणे हा सदाचार आहे. यामध्ये काही अपवाद इस्लामने केला असेल तर तो फक्त युद्धाच्या मर्यादेपर्यत.

इस्लाम गुलामगिरीच्या प्रथेचा शेवट करू इच्छित होता आणि हे चांगलेच झाले की आता ही प्रथा शिल्लक राहीलेली नाही. अशा परिस्थितीत, निरपराध कैद्याना गुलामा सारखे समजले जाऊ शकते आणि अशा लोकांच्या सुटकेसाठी दंड वगैरे दिला जाऊ शकतो. कारण हा मान मोकळी करण्यासारखाच सदाचार आहे.

२२५. 'इन्फाक' आणि 'ज़कात' दोन्हींचा उल्लेख एकाच आयतीमध्ये झालेला आहे. 'ज़कात' देण्याची जबाबदारी आपल्यावर येते किंवा नाही याचा विचार न करता दीन दुबळे वगैरेच्यांवर माणसाने 'इन्फाक' (खर्च) करीत राहीले पाहिजे. आणि ज़कातीस पात्र असतांना देखील, ती देऊनही खर्चाचा हा उपक्रम चालूंच राहावा. असे प्रोत्साहन येथे दिले जात आहे. एका मुसलमानाकडून इस्लाम मागणी करीत असलेली जकात ही कमीतकमी अशी मागणी आहे. याशिवाय त्याला नादार, गरजू अशा लोकांच्यावर खर्च करीत राहिले पाहिजे. आणि या औदार्याशिवाय माणूस सदाचाराचे स्थान प्राप्त करू शकत नाही.

२२६. येथे सहनशीलतेचे तीन प्रसंग निवेदन केले गेले आहेत. एके दैन्यावस्था ज्याने उपासमार अभिप्रेत आहे; दुसरा अडचणीमध्ये, ज्याने आजारीपण व शारिरीक वेदना अभिप्रेत आहेत आणि तिसरा, युद्धाच्या समयी. हे तीन प्रसंग माणसाच्या निर्धाराच्या आणि त्याच्या आचरण पद्धतीच्या परिक्षेच्या दृष्टीने फार महत्वाचे आहेत. जो माणूस या प्रसंगी सत्यावर टिकून राहील तो नि:संशय सदाचाराच्या उच्च स्थानावर आरुढ होइल.

२२७.'किसास' चा अर्थ हा आहे की गुन्हेगाराबरोबर तोच व्यवहार केला जावा जो त्याने स्वत: केला आहे. खूनी माणसाचे बाबतीत किसासचा मूळ नियम प्राणाच्या बदल्यात प्राण असा आहे परंतु परमेश्वरानें यामध्येही सवलत ठेविली आहे की मृतव्यक्तिचे वारस जर इच्छितील तर प्राणाच्या बदल्यात नुकसान भरपाई सुद्धा घेऊ शकतात.

किसासची आज्ञा सर्व इस्लामी समाजाला संबोधून केली गेली आहे. आणि म्हणून खूनी इसमाला शिक्षा देण्याची जबाबदारी इस्लामी समाजावर येते. तथापि शासन समाजाचे प्रतिनिधित्व करीत असते. म्हणून या कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी शासनावर आहे. या अंमलबावणीचे स्वरूप हे राहील की शासन मयत व्यक्तिच्या वारसांना हा अधिकार देईल की त्यांनी खूनी माणसाला ठार मारण्याची शिक्षा दिली जावी की त्याच्याकडून त्यांना नुकसान भरपाई देवावी हे ठरवावे.

मृत माणसाच्या वारसांना किसास चा जो अधिकार दिला गेला आहे तो अत्यंत चातुर्याचा आहे. यामुळे त्यांच्या अंत:करणाच्या जखमा भरून येऊ शकतात. त्याचप्रमाणे रक्ताबदलच्या नुकसान भरपाईने त्यांची मोठी मदत होऊ शकते. पैगंबरांनी रक्तबद्दलची नुकसान भरपाई शंभर उंट ठरविली होती. ज्याची किमंत आजच्या हिशोबाने तीन लाख रुपयाहून अधिक होते.

२२८. किसास मध्ये संपूर्ण समानतेचा विचार झाला

पहिजे. खूनी इसम जर स्वतंत्र असेल वा गुलाम असेल किंवा स्त्री असेल तर त्यालाच ठार केले जाईल. आणि अज्ञान कालातील ती पद्धत अवलंबिली जाणार नाहीं जी अरब लोकांमध्ये प्रचलित होती. अरब लोक, मृत इसम प्रतिष्ठित घराण्याशी संबंधित असेल तर त्याचे वारस आपल्या एका माणसाच्या बदल्यात खूनी इसमाच्या घराण्यातील कित्येक माणसाचे बळी घेत. खूनी इसम गुलाम असेल तर स्वतंत्र व्यक्तिला ठार करीत असत खूनी स्त्री असेल तर तिच्या कुटुंबियामधील एखाद्या पुरूषाला ठार करीत असत. इस्लामने या विषमतेचा शेवट केला. यहुदी लोकांनी सुद्धा प्रतिष्ठित व गरीब, इसराईली व बिगर इसराईली असा भेद भाव कायम केला होता. त्याला पण इस्लामने रद्द ठरविले. इस्लामने समानतेचा हा सर्वव्यापी नियम सादर केला कीं रंग, वंश व जातपात या आधारवर किसास च्या बाबतीत भेदभाव केला जाऊं नये. ज्याचा खून झालेला आहे (वधित) त्याच्या बदल्यात फक्त खूनी इसमास मरणाची शिक्षा दिली जाऊ शकते. एखाद्या मुसलमानाने एखाद्या गैरमुस्लिम जिम्मीचा खून केला असेल तर त्याच्या दरम्यान सुद्धा भेदभाव केला जात नाही. गैरमुस्लिम जिम्मीच्या बदल्यात त्या मुसलमान खूनी इसमास ठार केले जाईल. अरबी भाषेतील अधिककृत तफसीर (कुरआन वरील भाष्य) ''अहकामुल कुरआन'' मध्ये अल्लामा जस्सास लिहितातः-

''ही आयत या गोष्टीचा पुरावा आहे की गुलामाच्या बदल्यात स्वतंत्र व्यक्तिला, (जो खूनी आहे) जिम्मीच्या (A non-Muslim citizen of Islamic state ) बदल्यात मुसलमान (खूनी)ला आणि स्त्रीच्या बदल्यात पुरूषाला (खूनी) ला ठार केले जाईल.'' (भाग १ पान १५६)

''आणि निवेदन केल्याप्रमाणें आयतीचा उघड अर्थच हा आहे की जिम्मीच्या बदल्यात मुसलमानाला ठार करणे वाजबी आहे. कारण आयत मुसलमान व जिम्मीमध्ये भेदभाव करीत नाही.'' (पान १६३)

अल्लामा जस्सास यानी आपल्या तफसीरमध्ये अब्दुल रहमान बिन सुलेमानी यांची रिवायत (निवेदन) नकल केलेली आहे की, पैगंबरानी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) जिम्मीच्या बदल्यात मुसलमानाचा किसास घेतला. याचप्रमाणे हजरत अली रज़ियल्लाहु अन्ह यांचे वचन नमूद केले आहे की 'आमचे रक्त त्यांच्या रक्ताप्रमाणेच आहे आणि आमच्या रक्ताचा मोबदला (Blood Money) त्यांच्या रक्ताच्या मोबदल्या समान आहे.''(पान १६४, १६५)

२२९. बंधू म्हणजे मानव-बंधू ही सुंदर निवेदनशैली आहे. यामध्यें सौम्यपणाचा अंगिकार व्हावा म्हणून मानवतेच्या भावनांना आवाहन केले गेले आहे.

२३०. म्हणजे ठार मारण्यात आलेल्याचे वारस, खूनी इसमाबरोबर सौम्य व्यवहार करण्यास व रक्त-मूल्य (Blood Money) घेण्यास तयार असतील तर खूनी इसमाचे हे कर्तव्य आहे की त्याने रक्त-मूल्य चांगल्या प्रकारे द्यावे व याबाबतीत मनाचा मोठेपणा दाखवावा.

२३१. जर कोणी एखाद्यास विनाकारण ठार मारतो तर जणू तो मानवतेस ठार मारतो. आणि म्हणून समाजाची ही जबाबदारी आहे की त्याने 'किसास' (खूनाचा बदला खून) चा अवलंब करून मानवी जीवन रक्षणाची व्यवस्था करावी. जर अनुचित सौम्यता अंगिकारून 'किसास'च्या नियमाला निलंबित केले गेले तर गुन्हेगारांना प्रोत्साहन मिळेल. समाजाला शांतता व सुरक्षितपणा लाभणार नाही.

आजच्या काळातहि खूनी इसमाला मृत्यूची शिक्षा देणे योग्य आहे किंवा नाही या विषयावर चर्चा होत आहे. आणि काही देशांनी या शिक्षेला रद्द हि केले आहे. परंतु हे उघड आहे की, जर ही शिक्षा रद्द केली गेली तर गुन्हेगारांना अधिक प्रोत्साहन मिळेल आणि गुन्ह्यांमध्ये वाढच होईल. आणि म्हणून जोपर्यंत गुन्हेगारांना दहशत बसेल अशा शिक्षा दिल्या जात नाहीत. तोपर्यत समाजा मध्ये शांतता व स्थैर्य नांदणार नाही. सुरक्षिततेचे व चांगुलपणाचे वातावरण निर्माण होणार नाही. समाजाचे आरोग्य टिकविण्यासाठी त्याच्या एखाद्या भागाचे ऑपरेशन करावे लागले तर ती अत्यंत आवश्यक अशी निकड समजली गेली पाहिजे.

**तुमच्या करीता अनिवार्य करण्यांत आले आहे की जेव्हां तुमच्यापैकी एखाद्याची मरणाची वेळ येईल व तो आपल्यामागे काही संपत्ति सोडीत असेल तर त्यांने आईबाप आणि जवळच्या नातलगांसाठी योग्य पद्धतीनें मृत्यूपत्र करावे. हा अल्लाहचे भय बाळगणाऱ्या लोकांवर त्याचा अधिकार आहे.** *(अल-कुरआन)*

१८०. तुमच्या करीता अनिवार्य करण्यात आले आहे की जेव्हां तुमच्यापैकी एखाद्याची मरणाची वेळ येईल व तो आपल्यामागे काही संपत्ति सोडीत असेल तर त्यांने आईबाप आणि जवळच्या नातलगांसाठी योग्य पद्धतीनें [२३२] मृत्यूपत्र [२३३] करावे. हा अल्लाहचे भय वाळगणाऱ्या लोकांवर त्याचा अधिकार आहे.

كُتِبَ عَلَيْكُمْ إِذَا حَضَرَ أَحَدَكُمُ الْمَوْتُ إِن تَرَكَ خَيْرًا ۖ الْوَصِيَّةُ
لِلْوَالِدَيْنِ وَالْأَقْرَبِينَ بِالْمَعْرُوفِ ۖ حَقًّا عَلَى الْمُتَّقِينَ ﴿١٨٠﴾

१८१. मग जे लोक मृत्यूपत्र ऐकल्यानंतर ते बदलतील तर तो बदलणाऱ्यांचाच गुन्हा आहे. निःसंशय अल्लाह सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे.

فَمَن بَدَّلَهُ بَعْدَمَا سَمِعَهُ فَإِنَّمَا إِثْمُهُ عَلَى الَّذِينَ
يُبَدِّلُونَهُ ۚ إِنَّ اللَّهَ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿١٨١﴾

१८२. परंतु ज्याला मृत्यूपत्र करणाऱ्याबद्दल पक्षपात वा गुन्ह्याची (हक्क हिरावून घेतल्याची) शंका असेल त्यानें जर आपसात तडजोड घडवून आणली तर त्यामध्ये काही गुन्हा नाही. [२३४] निःसंशय अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

فَمَنْ خَافَ مِن مُّوصٍ جَنَفًا أَوْ إِثْمًا فَأَصْلَحَ بَيْنَهُمْ
فَلَا إِثْمَ عَلَيْهِ ۚ إِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٨٢﴾

१८३. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! तुमच्यावर रोज़ [२३५] फर्ज़ (अनिवार्य कर्तव्य) केले गेले आहेत, ज्याप्रमाणे तुमच्या पूर्वीच्या लोकांच्यावर फर्ज़ केले गेले होते.[२३६] कारण की तुम्ही संयमी (मुत्तकी) [२३७] बनावे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا كُتِبَ عَلَيْكُمُ الصِّيَامُ كَمَا كُتِبَ
عَلَى الَّذِينَ مِن قَبْلِكُمْ لَعَلَّكُمْ تَتَّقُونَ ﴿١٨٣﴾

१८४. हिशेबाचे काही दिवस आहेत. [२३८] आणि जो कोणी आजारी असेल किंवा प्रवासात असेल [२३९] त्याने इतर दिवसात ही संख्या पुरी करावी. आणि ज्या लोकांना रोज़ा करण्यात अडचण असेल त्यांनी त्याच्या बदल्यात एका गरीबास जेवण द्यावे. [२४०] मग जो कोणी आपल्या खुशीने अधिक चांगुलपणा करील तर ते त्याच्यासाठी अधिक चांगले आहे. [२४१] परंतु तुम्ही रोजा करणे हेच तुमच्यासाठी अधिक चांगले आहे, [२४२] जर तुम्ही समजाल तर.

أَيَّامًا مَّعْدُودَاتٍ ۚ فَمَن كَانَ مِنكُم مَّرِيضًا أَوْ عَلَىٰ سَفَرٍ
فَعِدَّةٌ مِّنْ أَيَّامٍ أُخَرَ ۚ وَعَلَى الَّذِينَ يُطِيقُونَهُ فِدْيَةٌ
طَعَامُ مِسْكِينٍ ۖ فَمَن تَطَوَّعَ خَيْرًا
فَهُوَ خَيْرٌ لَّهُ ۚ وَأَن تَصُومُوا
خَيْرٌ لَّكُمْ ۖ إِن كُنتُمْ تَعْلَمُونَ ﴿١٨٤﴾

२३२. मूळ ग्रंथात 'मअरूफ' हा शब्द वापरला गेला आहे. याचा शब्दार्थ, चांगल्या प्रकारे अवगत असलेली गोष्ट वा पद्धत असा आहे. म्हणजे अशी पद्धत जी न्यायावर आधारित असते. जिला विवेकबुद्धी योग्य ठरविते व जे समाजाच्या प्रतिष्ठित वर्गात प्रचलित असते. इस्लामने कायद्याच्या पुष्कळशा भागाला व तपशीलाला ''मअरूफ'' (सन्माननीय पद्धत) वर सोडून दिले आहे. आणि म्हणून ''मअरूफ'' अशा सर्व बाबतीत विश्वसनीय आहे ज्यांच्या संबंधी शरीअतने (इस्लामी धर्मशास्त्र) विशिष्ट नियम केलेला नाहीं.

२३३. 'वसीयत' (मृत्यू पत्र Will) करणे त्या अवस्थेत अनिवार्य कर्तव्य ठरविले गेले आहे जेव्हां माणसाला आपला मृत्यू जवळ आला आहे असे दिसूं लागते व तो आपल्यामागे संपत्ती सोडीत असतो. मृत्यूपत्राबद्दलची ही आज्ञा वारसाबद्दलचे आदेश उतरण्यापूर्वी दिली गेली होती. यानंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने ''सूरे निसा'' मध्ये वारसा हक्काने मिळणारी मालमत्ता वगैरे (Inheritence) संबंधी सविस्तर आदेश निवेदन केले आणि त्यांना आपल्याकडून करण्यात आलेली वसीय्यत (व्यवस्था) असे संबोधिले. सूरे निसाच्या ११ व्या आयतीत निवेदन केले गेले आहे कीं: يوصيكم الله في اولادكم۔

''अल्लाह तुमच्या संततीच्या बाबतींत तुम्हाला वसीय्यत करीत आहे.''

आणि म्हणून अल्लाहच्या वसीय्यतीनंतर (वारसा हक्काबद्दलचे आदेश), वसीय्यतीच्या या आज्ञेचे क्षेत्र, जी आज्ञा विवेचनाधीन आयतीमध्ये दिली गेली आहे. मर्यादित झाले आहे. ज्यांनाचा हिस्सा सर्वश्रेष्ठ अल्लाहने ठरविला आहे त्या वारसांच्या बाबतीत वसीय्यत (मृत्यूपत्र) करण्याचा प्रश्नच शिल्लक राहात नाहीं. पैगंबरांच्या हदीसमध्ये (सुवचन) नमूद आहे की,

اِنَّ اللّٰہَ قَدْ اَعْطٰی کُلَّ ذِیْ حَقٍّ حَقَّهٗ فَلَا وَصِیَّةَ لِوَارِثٍ۔

''सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रत्येक हक्कदाराला त्याचा हक्क दिला आहे. म्हणून वारसांच्या संबंधी मृत्यूपत्र करणे योग्य (शास्त्रानुकूल) नाही.'' (इब्ने कसीर भा.१ पा. २११) तथापि त्या जवळच्या नातलगांसंबंधी, ज्यांना वारसा हक्क मिळत नाही व जे गरजू पण असतात. मृत्यूपत्र करणे आवश्यक आहे. उदा. अनाथ नातवासंबंधी (मुलाचा मुलगा) मृत्यूपत्र करणे; त्याचप्रमाणें जर एखाद्याचे आईबाप मुसलमान नसतील आणि म्हणून ते वारस होऊ शकत नाहीत तर त्यांच्या संबंधी मृत्यूपत्र करणे. स्पष्ट असो की इस्लाममध्ये संपत्तीच्या फक्त १/३ भागापर्यंतच मृत्युपत्र करणे योग्य आहे.

२३४. यापूर्वीच्या आयतीमध्ये वसीय्यतीमध्ये फेरफार करण्याची सक्त मनाई केली गेली आहे. या आयतीमध्ये स्पष्ट केले गेले आहे की, जेव्हा मृत्यूपत्र (Testator) करणाऱ्याबद्दल त्याने पक्षपात केला आहे अगर मृत्यूपत्र गुन्हा आणि एखाद्याचा हक्क हिरावून घेणावर आधारित आहे असे दिसून आल्यास फेरफाराबद्दलची ही मनाई अशा बाबतीत लागू नाही. अशा परिस्थितीत शक्य असल्यास मृत्यूपत्र करणाऱ्यास समजाविले जावे व ते शक्य नसल्यास आपसात तडजोड केली जाऊ शकते.

स्पष्ट असो की, मृत्यूपत्र जर अशा एखाद्या गोष्टीसंबंधी असेल जी मूलत: गुन्ह्याची गोष्ट असेल उदा. इस्लामविरोधी विचाराच्या प्रचारासाठीं तरतूद केली गेली असेल तर असे मृत्यूपत्र अंमलात येणार नाही. अल्लामा करतबी फरमावितात या संबंधा कसलाही मतभेद नाही. की जर कोणी एखाद्या अशा गोष्टीची वसीयत केली असेळ जी अनुचित आहे उदाहरणची दारू, डोकार, इत्तर कोणती गुन्हा ची वस्तु आसली तर तीच्यात फेरफार करणे उचित आहे.(फत्हुलक़दीर शोकानी ख.१ पृ. १७८) इस्लामच्या या तत्वाचा समावेश प्रचलित ''मुसलमान कायदा'' मध्ये काही अशी आहे.

( INVALID TO BENIFIT AN OBJECT OPPOSED TO ISLAM AS A RELIGION) (Tayabji on Muslim Law p. 759)

२३५. धर्मशास्त्राच्या (शरीअतीच्या ) परिभाषेप्रमाणे पहाटेच्या सुरवातीपासून सूर्य भावळेपर्यंत खाणेपिणे व समागम थांबविणे म्हणजे रोज़ा (सौम) करणे होय. रोज़ा हे एखादे ब्रत नव्हे की ज्यामध्ये फळफळावळ खाण्याची वा रस पिण्याची परवानगी असते. रोज़ा ही एक अशी उपासना आहे ज्यामध्ये खाण्यापिण्या पासून संपूर्ण अलिप्तता आवश्यक आहे. पाण्याचा एखादा घोट जरी घश्यामध्ये घेतला तरी रोज़ा शिल्लक राहत नाहीं. इतकेच नव्हे तर इस्लाममध्ये रोज़ा त्याचाच विश्वसनीय आहे जो मोमिन (श्रद्धाधारक) आहे, आणि निव्वळ अल्लाहसाठी रोज़ा करतो. जर एखादा माणूस ईमान आणल्याशिवाय रोज़ा करील तर तो विश्वसनीय नाही. याचप्रमाणे भूकहरताळालाही रोज़ा म्हणता येणार नाही.

रोज़ाची ही आज्ञा हिजरी सन दोन मध्ये झाली. रोज़ा प्रत्येक स्त्री पुरूषावर 'फ़र्ज़' आहे आणि इस्लामच्या पांच आधारस्तंभापैकी एक आहे.

२३६.म्हणजे रोज़ा पूर्वीच्या समाजांवर देखील फ़र्ज़ करण्यात आलेला होता. रोज़ा ही एक अशी उपासना पद्धत आहे जी ईश्वरी धर्मशास्त्रांचा एक महत्वाचा भाग बनलेली आहे. पूर्वीच्या ग्रंथामध्यें याचा उल्लेख आढळतो, जरी हे ग्रंथ आणि रोज़ाचे आदेश आपल्या मूळ स्वरूपात अस्तित्वात नाहीत. हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) जेव्हां 'तूर' पर्वतावर अल्लाहच्या भेटीसाठी

गेले तेव्हा त्यांनी चाळीस दिवसाच्या पूर्ण कालावधीत रोजे केले. तौरात मध्ये नमूद आहे.

''मूसा तेथे परमेश्वराबरोबर चाळीस दिवस रात्री होता. तेवढ्या अवधीत त्याने भाकर खाल्ली नाही आणि तो पाणीही प्याला नाही.''

(पवित्र शासात्र. निर्गम ३४:२८)

रोज़ाची हकीकत यशया प्रेषिताच्या ग्रंथामध्ये या प्रमाणे नमूद आहे.

''पाहा तुमच्या उपासाचा परिणाम तर असा होतो की तुम्ही त्यावेळी कटकटी करीता व दुष्टपणे ठोसा ठोसी करिता; तुमचा शुद्ध अर्ध्वलोकी ऐकू जावा याकरिता तुमचे हल्लीचे उपवास आहेत असे नाही. 'मला पसंत पडणारा असा हा उपवास आहे काय?'' (पवित्र शास्त्र. यशया ५८ : ४५)

आणि हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांनी रोज़ामध्ये निर्मलपणा व भावभक्ति असण्यावर जोर दिला आहे.

''तुमही जेव्हां उपास करीता तेव्हा ढोंग्यासारखे म्लान होऊ नका; कारण आपण उपास करीत आहो असे लोकांना दिसावे म्हणून ते आपले तोंड विरूप करीतात. मी तुम्हाला खचित सांगतो की ते आपले प्रतिफल भरून पावले आहेत.''

(पवित्र शास्त्र. मत्तय ६: १६)

२३७. हा आहे रोज़ाचा असल उद्देश, शरीअतीचा पाया 'तक्वा' म्हणजे ईश-भय व दुष्कर्मा पासून अलीप्तता हा आहे आणि भावना व वासना वर नियंत्रण ठेवल्याने निर्माण होतो आणि भावना व वासनांचे नियंत्रण करण्याचे प्रशिक्षण रोज़ाद्वारे घडते.

माणसाचे फक्त भौतिक अस्तित्वच नाही तर त्यांचे आध्यात्मिक अस्तित्वही आहे. आणि त्यांच्या आध्यात्मिक बलासाठी व उत्कर्षासाठी रोज़ा हे उत्तम साधन आहे. रोज़ानें माणसावरील वासनांचा व कामातुरतेचा पगडा कमजोर होतो. आणि त्याच्यामध्ये इंद्रियनिग्रहाचा गुण निर्माण होतो. आणि त्याची निर्धारशक्ति बळकट होते. माणसाची खरी शक्ति म्हणजे त्याचे अंत:करण व मन आहे. रोज़ा मनाचे शुद्धिकरण करतो. आणि माणसाला अल्लाहचा आज्ञाधारक बनवून त्याला जीवनाचे युद्ध लढण्यास तयार करतो. इस्लाममध्ये रोज़ा म्हणजे निव्वळ भुकेने व तहानने व्याकूळ राहण्याचे नाव नव्हे तर अल्लाहच्या मर्यादाचे रक्षण आणि ताबेदारी व आज्ञाधारकतेची जाणीव निर्माण करण्या ची उपाय योजना आहे.

२३८. म्हणजे रोज़ाचा भार तुमच्यावर जास्त दिवसा साठी टाकण्यात आलेला नाहीं वर्षभरात फक्त काही दिवस त्यासाठी निश्चित केलेले आहेत. नंतरच्या आयतीमध्ये रमज़ानचे रोज़े फर्ज़ असल्याबद्दलचे स्पष्टीकरण आहे. यावरून काही दिवस म्हणजे रमज़ानाचा महिना हे स्पष्ट होते.

२३९. प्रवासाच्या बाबतीत अंतर मर्यादा क़ुरआन व हदीस मध्ये निश्चित केली गेली नाही. आणि म्हणून जितका प्रवास केल्यानंतर माणसाला प्रवासाचा शीण येतो, प्रवासी असल्याची जाणीव तीव्रपणे होऊ लागते तेव्हा माणूस रोजा सोडू शकतो. आजारीपणात व प्रवासाच्या अवस्थेत रोज़ा करणे वा न करणे एच्छिक ठरविण्यात आले आहे. तरीपण आजार बळावण्याची शक्यता असेल तर रोजा करू नये.

२४०. अभिप्रेत वृद्ध, सतत आजारी असणारे व अत्यंत अशक्त असे लोक आहेत ज्यांनी रोजा केला की त्यांच्या त्रासात भर पडते आणि पुढें क़ज़ा रोज़े (वेळेवर न केलेले रोज़े) करण्याचा ज्यांना भरवसा नाहीं. अशा लाचार लोकांच्यासाठी ही सवलत आहे. त्यानी एका रोजाच्या बदल्यात एका दिनदुबळ्यास जेवू घालावे. जेवण प्रमाणाच्या दृष्टीनें माणूस एका दिवसात जितके खातो तितके असावे.

२४१. म्हणजे एखाद्याने एका रोज़ाच्या बदल्यात एकापेक्षा अधिक दीनदुबळ्यांना जेवण दिले तर ते अधिक चांगले आहे.

२४२. शक्यतों रोज़ा करणेच अधिक चांगले फिदियाच्या सवलतीचा लाभ फक्त अत्यंत नाईलाज असतानाच घेण्यात यावा.

**रमज़ानाचा महिना ज्यामध्ये क़ुरआन उतरविले गेले; जे लोकांच्यासाठी मार्गदर्शन आहे; आणि अश शिकवणीवर आधारिलेले आहे, जी मार्गदर्शनाचा मार्ग स्पष्ट करणारी आणि सत्य व असत्य यामधील फरक उघड करून दाखविणारी आहे. आणि म्हणून तुमच्यापैकी ज्या कोणास या महिन्याचा लाभ होईल त्याने या महिन्याचे रोज़े करावे. आणि जो आजारी असेल वा प्रवासात असेल, त्याने इतर दिवसात संख्या पुरी करावी.** *(अल-क़ुरआन)*

१८५. रमज़ानाचा महिना [२४३] ज्यामध्ये कुरआन उतरविले गेले; जे लोकांच्यासाठी मार्गदर्शन आहे; [२४४] आणि अशा शिकवणीवर आधारिलेले आहे, जी मार्गदर्शनाचा मार्ग स्पष्ट करणारी आणि सत्य व असत्य यामधील फरक उघड करून दाखविणारी आहे. आणि म्हणून तुमच्यापैकी ज्या कोणास या महिन्याचा लाभ होईल त्याने या महिन्याचे रोज़े करावे. आणि जो आजारी असेल वा प्रवासात असेल, त्याने इतर दिवसात संख्या पुरी करावी. अल्लाह तुमच्यासाठी सुलभता इच्छितो, सक्ति करुं इच्छित नाहीं.[२४५] आणि यासाठी की तुम्ही (रोज़ांची) संख्या पूर्ण करावी आणि त्याची महानता [२४६] वर्णन करावी या गोष्टीवर की त्याने तुम्हाला मार्गदर्शनाने उपकृत केले.आणि यासाठी की तुम्ही त्याचे कृतज्ञ व्हावे.

شَهْرُ رَمَضَانَ الَّذِيٓ اُنْزِلَ فِيْهِ الْقُرْاٰنُ هُدًى لِّلنَّاسِ
وَبَيِّنٰتٍ مِّنَ الْهُدٰى وَالْفُرْقَانِ ۚ فَمَنْ شَهِدَ مِنْكُمُ الشَّهْرَ
فَلْيَصُمْهُ ۗ وَمَنْ كَانَ مَرِيْضًا اَوْ عَلٰى سَفَرٍ فَعِدَّةٌ مِّنْ اَيَّامٍ اُخَرَ ۗ
يُرِيْدُ اللّٰهُ بِكُمُ الْيُسْرَ وَلَا يُرِيْدُ بِكُمُ الْعُسْرَ ۡ وَلِتُكْمِلُوا الْعِدَّةَ
وَلِتُكَبِّرُوا اللّٰهَ عَلٰى مَا هَدٰىكُمْ وَلَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿١٨٥﴾

१८६. आणि जेव्हां माझे दास माझ्या बाबतीत तुम्हाला विचारतील तर (त्यांना सांगा) मी त्यांच्या जवळ आहे.[२४७] धावा करणारा जेव्हा माझा धावा करतो तेव्हां मी त्या धाव्याचे उत्तर देतो.[२४८] आणि म्हणून त्यांनी माझ्या आवाहनाचा तत्परतेने स्वीकार करावा आणि माझ्यावर ईमान आणावे म्हणजे सरळमार्ग लाभेल.

وَاِذَا سَاَلَكَ عِبَادِيْ عَنِّيْ فَاِنِّيْ قَرِيْبٌ ۭ اُجِيْبُ دَعْوَةَ
الدَّاعِ اِذَا دَعَانِ فَلْيَسْتَجِيْبُوْا لِيْ وَلْيُؤْمِنُوْا بِيْ لَعَلَّهُمْ
يَرْشُدُوْنَ ﴿١٨٦﴾

१८७. तुम्हाला रोज़ांच्या रात्री आपल्या पत्नीजवळ जाण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्या तुमच्यासाठी पोशाख आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी पोषाख आहात.[२४९] अल्लाहला ज्ञान झाले की तुम्ही स्वत:शी बेईमानी करीत होता. आणि म्हणून त्याने तुमच्यावर कृपा केली आणि तुम्हाला माफ केले. आता तुम्ही त्यांच्याशी मिलाफ करा.[२५०]आणि अल्लाहने तुमच्यासाठीं जे ठरवून ठेविले आहे त्याची आकांक्षा करा [२५१] आणि खा, प्या, येथपर्यंत की पहाटेची पांढरी रेखा (रात्रीच्या) काळ्या रेखेपासून ठळकपणे वेगळी दृष्टीस पडेल,[२५२] नंतर रात्र होईपर्यंत रोज़ा पुरा करा. आणि जेव्हा तुम्ही मसजिदीमध्ये 'एतिकाफ' [२५३]मध्ये असाल तेव्हां त्यांच्याशी समागम करुं नका. या अल्लाहने निश्चित केलेल्या मर्यादा आहेत,त्यांच्या जवळपास फटकू नका.[२५४] अशाप्रकारे अल्लाह आपले आदेश लोकांच्यासाठी स्पष्ट करीत आहे. कारण की त्यांनी आज्ञाभंगास भिऊन वागावे.

اُحِلَّ لَكُمْ لَيْلَةَ الصِّيَامِ الرَّفَثُ اِلٰى نِسَاۗىِٕكُمْ ۭ هُنَّ
لِبَاسٌ لَّكُمْ وَاَنْتُمْ لِبَاسٌ لَّهُنَّ ۭ عَلِمَ اللّٰهُ اَنَّكُمْ كُنْتُمْ
تَخْتَانُوْنَ اَنْفُسَكُمْ فَتَابَ عَلَيْكُمْ وَعَفَا عَنْكُمْ ۚ فَالْئٰنَ
بَاشِرُوْهُنَّ وَابْتَغُوْا مَا كَتَبَ اللّٰهُ لَكُمْ ۠ وَكُلُوْا وَاشْرَبُوْا حَتّٰى
يَتَبَيَّنَ لَكُمُ الْخَيْطُ الْاَبْيَضُ مِنَ الْخَيْطِ الْاَسْوَدِ مِنَ الْفَجْرِ ۠
ثُمَّ اَتِمُّوا الصِّيَامَ اِلَى الَّيْلِ ۚ وَلَا تُبَاشِرُوْهُنَّ وَاَنْتُمْ
عٰكِفُوْنَ ۙ فِي الْمَسٰجِدِ ۭ تِلْكَ حُدُوْدُ اللّٰهِ فَلَا تَقْرَبُوْهَا ۭ
كَذٰلِكَ يُبَيِّنُ اللّٰهُ اٰيٰتِهٖ لِلنَّاسِ لَعَلَّهُمْ يَتَّقُوْنَ ﴿١٨٧﴾

२४३. महिना म्हणजे चांद्रमास, जो इस्लाममध्ये अधिकृत आहे. रमज़ान हा चांद्रवर्षाचा (Lunar Year) नववा महिना आहे.

२४४. रमज़ान महिन्यामध्ये क़ुरआन उतरण्यास सुरवात झाली. पहिली वही (First Verses) जी गारे हिरा (हिरा नामी गुहा) मध्यें आली ती रमज़ान महिन्याचा एका रात्री उतरली होती. क़ुरआन ही सर्वात मोठी नेअमत (देणगी) आहे. कारण तो साऱ्या मानवजातीसाठी उतरविणेत आलेला आहे. या अत्यंत श्रेष्ठ देणगीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे आवश्यक होते की या महिन्याला रोज़ासाठी खास करण्यात यावे. म्हणजे दास आपल्या मनोविकारापासून मुक्त होऊन आपल्या पालनकर्त्याच्या जास्तीतजास्त जवळ होऊं शकेल. आणि आपल्या आचरणानें तो हे सिद्ध करु शकेल की परमेश्वर आणि त्याच्या आज्ञेपेक्षा कोणतीही इतर गोष्ट त्याला अधिक प्रिय नाही. रमजानचा महिना जणू तक्वाच्या विकासाचा मोसमच आहे.

२४५. इस्लाम मानवी स्वभावाशी सुसंगत आणि समतोलावर आधारीत असल्याने तो फार सोपा असा दीन आहे. यामध्ये आत्मा शुद्धी आणि व्यक्तिची सुधारणा व तिचे प्रशिक्षण यांची पुरेपूर व्यवस्था ठेविली गेली आहे. परंतु तपस्येच्या आणि इंद्रियदमनाच्या त्या पद्धतींपासून अलिप्तता पाळली गेली आहे ज्यांचा ब्रह्मचर्यावर निष्ठा ठेविणारे सन्यासी व सूफी लोक पुरस्कार करतात आणि ज्या सामान्य माणसाच्या आवाक्या बाहेरच्या आहेत.

२४६. म्हणजे अल्लाहच्या श्रेष्ठत्वाचा स्वीकार करा. यांची जाणीव रोज़ाच्या कालावधीत देखील असावयास हवी आणि रोज़े संपल्यावर ईदूल फित्रच्या प्रसंगी देखील. आणि म्हणून ईदूल फित्रच्या नमाज़मध्ये जादा तक्बीर (अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे ही घोषणा) ची जी तरतूद आहे ती या शिकवणीवर हुकूम आहे.

२४७. म्हणजे दास जरी अल्लाहला पाहू शकत नसले तरी त्यांनी असा विचार करू नये की तो त्याच्यापासून दूर आहे. सत्य हे आहे की तो आपल्या प्रत्येक दासाच्या इतक्या जवळ आहे की दास जेव्हा इच्छिल तेव्हा त्याचा धावा करू शकतो आणि अल्लाह त्याचा धावा ऐकून घेतो. व त्यावर निर्णयही देतो अल्लाहपर्यंत आपले मागणे पोहचविण्यासाठी कोणत्याही हवाल्याची वशिल्याची आणि शिफारशीची आवश्यकता नाही. प्रत्येक दास, कोणत्याही वेळी कोणत्याही जागी आपले मागणे त्याच्यापर्यंत प्रत्यक्षपणे पोंहचवूं शकतो. आणि म्हणून गरजा पुऱ्या करण्यासाठी आणि याचनेच्या पूर्तीसाठी कोणत्याही देवदेवता अगर थोर लोक यांचा धावा करून त्यांचा हवाला व वशिला शोधण्याची किंवा मूर्तीचा आश्रय घेण्याची आवश्यकता नाहीं. इतकेच नव्हे तर अल्लाहचा-ज्याच्या शिवाय कोणी 'इलाह' (ईश) नाहीं प्रत्यक्षपणे धावा केला पाहिजे आणि आपल्या सर्व मागण्या त्याच्यासमोरच सादर केल्या पाहिजेत.

२४८. उतर देतो याने अभिप्रेत हे आहे की अल्लाह प्रार्थनेचा (दुआचा) स्वीकार करतो. दास जेव्हां आपल्या पालनकर्त्याजवळ एखादी वस्तू मागतो. आणि अशा पद्धतीने मागतो ज्या पद्धतीने मागितले पाहिजे, तेव्हां त्याला ती वस्तू अवश्य दिली जाते. परंतु हे आवश्यक नाही की ती वस्तू त्याचवेळी व त्याच स्वरूपात दिली जावी. अल्लाह आपल्या दासाच्या हिताला चांगल्यापकारे जाणतो आणि म्हणून जर त्याला मागितलेली वस्तू तत्काळ मिळाली नाही तर ती पुढील वेळेसाठी वा आखिरत साठी (या जीवनानंतरच्या जीवनासाठी) राखून ठेविली जाते. आणि एका स्वरूपात नाहीं तर दुसऱ्या स्वरूपात ती त्याला मिळते.

रोजाबद्दलचे निवेदन सुरू होते. मध्यंतरी प्रार्थनेचा उल्लेख झाला. हा या गोष्टीकडे इशारा आहे की रोज़ादार रोज़ाच्या अवस्थेत अल्लाहच्या निकट असतो आणि याच्या प्रार्थनेला मान्यता मिळते. आणि त्याच कारणासाठी हदीस (पैगंबरांचे वचन). मध्ये इफ्तारच्या वेळेच्या प्रार्थनेला ''स्वीकारली जाणारी प्रार्थना'' असे संबोधिले गेले आहे.

२४९. पतिपत्नीचे अत्यंत जवळचे नाते आहे. दोघांच्या संबंधाना पोशाखाची उपमा अत्यंत सार्थ आहे. पोशाखाने शरीर झाकले जाते त्याचप्रमाणे पति पत्नी एकदुसऱ्याचे समाधान करून शारीरिक भावना साठी आवरणाचे काम करतात आणि त्या उघड्या नागड्या होऊं देत नाहींत. पोशाख हा माणसासाठी अलंकार आहे. याचप्रमाणे पति हा पत्नीचा अलंकार आहे आणि पत्नी ही पतीची अलंकार आहे. आणि दोघांमध्ये मेळ नसेल तर माणसाच्या जीवनात शोभा, सभ्यता व शिष्टाचार येणार नाही. पोशाख हवामानाच्या अनिष्ट परिणामापासून माणसाला सुरक्षित ठेवितो याचप्रमाणे पतिपत्नी एक दुसऱ्याच्या नीतिला शैतानाच्या हल्ल्यापासून वाचवित असतात.

या कारणासाठी व फायद्यासाठी वैवाहिक संबंध इस्लाममध्ये मान्यवर आहेत. याउलट स्त्रीशिवाय जीवन घालविणे व ब्रह्मचारी बनणे अप्रतिष्ठित व निषिद्ध आहे.

२५०. रोज़ाच्या सुरवातीच्या आदेशामध्ये हे स्पष्टीकरण नव्हते की रोज़ाच्या रात्रीमध्ये पत्न्यांशी समागमाची परवानगी आहे किंवा नाही. ग्रंथधारकांचे जवळ समागमावर प्रतिबंध होता. म्हणून हा प्रश्न मुसलमानांचे जवळ संदिग्ध होता. आणि काही लोक याला अनिश्चित समजून रात्री समागम करीत असत. हा स्वत:बरोबर एकप्रकारचा अप्रामाणिकपणा होता. कारण शरीअतीच्या दृष्टीने हे आवश्यक आहे की संदिग्ध गोष्टींच्या बाबतीत संयम पाळला जावा. परंतु अल्लाहने याबाबतीत क्षमा केली आणि

स्पष्टपणे परवानगी दिली की रोजांच्या रात्री तुम्हीं तुमच्या पत्न्यांशी समागम करु शकता.

२५१. म्हणजे संततीचे इच्छुक बना. हा वैवाहिक जीवनाचा अत्यंत महत्वाचा उद्देश आहे. यावरून क़ुरआनची मनीषा चांगल्याप्रकारे स्पष्ट होते की संतती ही अपेक्षित व मान्यवर गोष्ट आहे. आणि अल्लाहची मनीषा ही आहे की मानवजात वाढवी. आणि म्हणून जे लोक मानवजातीला घटविण्यासाठी संतती प्रतिबंधाची मोहीम चालवितात त्यांचे हे कार्य अल्लाहच्या मनीषे विरुद्ध आहे. स्त्रीची बिघडलेली प्रकृती वगैरे नाईलाजाच्या आधारावर लोकांच्यासाठी काही गर्भप्रतिबंधक पद्धतीचा स्वीकार करण्याची इस्लाम मध्ये खात्रीने सवलत आहे. परंतु नसबंदी सारख्या पद्धतीचा स्वीकार करण्याचे उत्तेजन देणे किंवा मुलांची संख्या मर्यादित करण्याच्या मागे लागणे आणि त्यासाठी ''आता नाही कधी नाही.'' अशा घोषणा ठरवून देणे ही त्याच लोकांची कामे आहेत जे न निसर्गाच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करता न ईश्वरी उपदेशाचा. ते तर आपल्या ''साइन्टिफिक'' मार्गभ्रष्टतेवर संतुष्ट असतात.

२५२. ग्रंथधारकांजवळ (यहुदी व ईसाई जवळ) रोजाच्या रात्री झोपून उठल्यावर खाण्यापिण्याची परवानगी नव्हती. परंतु इस्लामने याची परवानगी दिली. इतकेच नव्हे तर ''सहरी'' क़रण्याची ताकीद दिली.

२५३. 'अेअतिकाफ' याचा अर्थ हा आहे की, माणसाने सर्व कामापासून मुक्त होऊन अल्लाहच्या स्मरण व भक्तिसाठी एकाग्र होणे. अेअतिकाफ करण्यासाठी हे आवश्यक आहे की त्याने रमज़ानचे शेवटचे दहा दिवस मस्जिदीमध्ये घालवावेत. या मुदतीत पतिपत्नीचे संबंध ठेवण्याची परवानगी नाहीं.

२५४. म्हणजे जेथून गुन्हां, अवज्ञा व कायदेभंग यांची मर्यादा सुरू होते त्या मर्यादेजवळ जाणे देखील माणसासाठीं धोकादायक आहे. कारण की त्यांचे पाऊल चूकून मर्यादेबाहेर पडण्याची शक्यता आहे. आणि म्हणून गुन्ह्याच्या सरहद्दीपासून माणसाने दूरच राहावे.

**आणि तुम्ही आपसात एक दुसऱ्याची मालमत्ता अयोग्य मार्गाने खावूं नका. आणि ती शासकांना या गरजेपोटी देवूं नका. की जाणून बुजून दुसऱ्यांच्या मालाचा काही भाग, त्यांचा हक्क हिरावून घेऊन तुम्हांला खावयाची संधि मिळावी.** *(अल-क़ुरआन)*

**१८८.** आणि तुम्ही आपसात एक दुसऱ्याची मालमत्ता अयोग्य मार्गाने खावूं नका.[२५५] आणि ती शासकांना या गरजेपोटी देवूं नका.[२५६] की जाणून बुजून [२५७] दुसऱ्यांच्या मालाचा काही भाग, त्यांचा हक्क हिरावून घेऊन तुम्हांला खावयाची संधि मिळावी.

وَلَا تَأْكُلُوٓا أَمْوَالَكُم بَيْنَكُم بِالْبَاطِلِ وَتُدْلُوا بِهَآ
إِلَى الْحُكَّامِ لِتَأْكُلُوا فَرِيقًا مِّنْ أَمْوَالِ النَّاسِ
بِالْإِثْمِ وَأَنتُمْ تَعْلَمُونَ ﴿١٨٨﴾

**१८९.** ते तुम्हांला नवीन चांद्राच्या बाबतीत [२५८] विचारीत आहेत. सांगा की लोकांना तारखा निश्चित करण्यासाठी आणि (खास करुन) हज्जच्या तारखांची निश्चिती करण्यासाठी हे साधन आहे. आणि हा काही सदाचार नव्हे की घरामध्ये मागल्या बाजूने प्रवेश करावा. सदाचार तर हा आहे की माणसाने संयमाचा अंगिकार करावा [२५९] घरामध्ये तुम्ही त्यांच्या (दर्शनी) दारामधून प्रवेश करावा आणि अल्लाहचे भय बाळगून असा म्हणजे तुम्ही सफल व्हाल.

يَسْـَٔلُونَكَ عَنِ الْأَهِلَّةِ ۖ قُلْ هِيَ مَوَاقِيتُ لِلنَّاسِ
وَالْحَجِّ ۗ وَلَيْسَ الْبِرُّ بِأَن تَأْتُوا الْبُيُوتَ مِن
ظُهُورِهَا وَلَٰكِنَّ الْبِرَّ مَنِ اتَّقَىٰ ۗ وَأْتُوا الْبُيُوتَ
مِنْ أَبْوَابِهَا ۚ وَاتَّقُوا اللَّهَ لَعَلَّكُمْ تُفْلِحُونَ ﴿١٨٩﴾

**१९०.** आणि अल्लाहच्या मार्गात त्या लोकांबरोबर लढा, जे तुमच्याशी लढतात.[२६०] परंतु अतिरेक करूं नका. [२६१] अल्लाह अतिरेक करणाऱ्यांना पसंत करीत नाहीं.

وَقَاتِلُوا فِي سَبِيلِ اللَّهِ الَّذِينَ
يُقَاتِلُونَكُمْ وَلَا تَعْتَدُوٓا ۚ إِنَّ اللَّهَ لَا يُحِبُّ
الْمُعْتَدِينَ ﴿١٩٠﴾

**१९१.** आणि ते जेथे आढळून येथील तेथे त्यांना ठार करा [२६२] आणि त्यांना तेथून हाकलून लावा जेथून त्यांनी तुम्हाला हाकलले आहे. कारण की उपद्रव [२६३] वधापेक्षा अधिक (हानिकारक) आहे. आणि मस्जिदे हराम (काबागृहाची मस्जिद) च्या जवळपास [२६४] त्यांच्याशी लढू नका, जोपर्यंत ते तेथे तुमच्याशी लढणार नाहीत. होय. जर ते तुमच्याशी लढतील तर त्यांना ठार करा. कारण अशा इन्कार करणाऱ्यांची (काफिरांची) हीच शिक्षा आहे.

وَاقْتُلُوهُمْ حَيْثُ ثَقِفْتُمُوهُمْ وَأَخْرِجُوهُم مِّنْ حَيْثُ
أَخْرَجُوكُمْ ۚ وَالْفِتْنَةُ أَشَدُّ مِنَ الْقَتْلِ ۚ وَلَا تُقَاتِلُوهُمْ
عِندَ الْمَسْجِدِ الْحَرَامِ حَتَّىٰ يُقَاتِلُوكُمْ فِيهِ ۖ فَإِن
قَاتَلُوكُمْ فَاقْتُلُوهُمْ ۗ كَذَٰلِكَ جَزَآءُ الْكَافِرِينَ ﴿١٩١﴾

**१९२.** मग जर ते परत [२६५] फिरतील तर अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

فَإِنِ انتَهَوْا فَإِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٩٢﴾

२५५. रोज़ाच्या आदेशानंतर, अनुचित मार्गाने धन गिळंकृत करू नका ही शिकवण रोजाचे सार उघड करीत आहे. रोज़ा जाइज़ व नजाइज़ (शरीअतीचे दृष्टीने उचित व अनुचित) मध्ये तारतम्य करण्यास शिकवितो आणि अल्लाहच्या मर्यादांचे पालन करण्याची शिकवण देतो. म्हणून लोकांचे धन अनुचित मार्गाने गिळंकृत करणे हे अशा माणसाचे काम होऊच शकत नाही ज्याचेवर रोज़ाचा हा परिणाम झाला आहे. हलाल अन्न खावून रोज़ा तर मर्यादित दिवसासाठी आहे. परंतु हराम अन्नापासून रोज़ा तर पुरे आयुष्यभर करावयाचा आहे.

२५६. म्हणजे दुसऱ्याचे धन गिळंकृत करण्यासाठी किंवा दुसऱ्याच्या वस्तूवर बेकायदेशीर कबज़ा करण्यासाठी लाचलुचपतीला साधन बनवू नका. लोकांचे हक्क हिरावून घेण्याचे लाच हे सर्वात मोठे साधन आहे. कायद्याचे संरक्षण करणाऱ्यांना याची चटक लागली तर हक्काची शाश्वती शिल्लक राहात नाहीं. त्यांना पैशाच्या जोरावर कोणीही खरेदी करू शकतो. आणि म्हणून ज्या समाजात लाचलुचपत बोकाळते त्या समाजाचे शासक अप्रामाणिक होतात. आणि लोकांना त्याचे न्याय हक्कही लाच दिल्याशिवाय मिळू शकत नाहीत. इस्लामने लाच घेणे व देणे या दोन्ही गोष्टी हराम ठरविलेल्या आहेत. लाचलूचपतीचे संपूर्ण उच्चाटण करण्यासाठी शासक वर्गला नजराणा, भेटी वगैरे देणे आणि त्यांनी त्यांचा स्वीकार करणे या दोन्ही गोष्टींना प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

२५७. म्हणजे तुम्ही चांगल्या प्रकारे जाणता की लाच ही एक वाईट गोष्ट आहे. लाच म्हणजे दुसऱ्याचे हक्क हिरावून घेणे आहे. आणि ते एक गुन्ह्याचे कृत्य आहे. बुद्धीही त्याला गुन्हा समजते आणि दीन व शरीअत सुद्धा त्याला गुन्हा ठरवितात. आणि म्हणून हा गुन्हा आहे ही एक उघड वस्तु:स्थिती आहे. अशा उघड वाईटापासून तुम्हांला अवश्य वाचले पाहिजे.

२५८. हा प्रश्न चांद्राच्या प्रत्येक महिन्यास नवीन चंद्राच्या स्वरूपात आकाशात दिसण्यासंबंधी होता. परंतु यांचे स्वरूप शास्त्रीय अगर खगोल शास्त्रीय प्रश्नाचे नव्हते. नवीन चंद्रदर्शनाच्या बाबतीत ज्या अंधश्रद्धा (Superstitions) दृढ होत्या त्यांच्या पार्श्वभूमीवर या मागील धोरण काय आहे हे जाणून घेणे हा उद्देश होता. प्रश्नाच्या उत्तराने धार्मिक व भौतिक दोन्ही दृष्टीने त्या मागील धोरण स्पष्ट करण्यात आले. भौतिक धोरण हे की ते तारीख ठरविण्याचे एक साधन आहे. आकाशावर नवीन चंद्र (New Moon) दिसणे हे या गोष्टीचे स्पष्ट प्रतीक आहे की नवीन महिना सुरु झाला आहे. चांद्रवर्षाचा (Lunar Year) आधार याच नैसर्गिक पंचांगावर (Natural Calender)आहे. आणि धार्मिक धोरण हे की हज्जच्या तारखांची निश्‍चिती चांद्रमासावरच अवलंबून आहे. त्याचप्रमाणे इतर सर्व धार्मिक गोष्टीमध्ये चांद्रमासावरच विश्वास केला जातो.

२५९. हज्जची प्रथा हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्यापासून चालत आलेली आहे. आणि म्हणून लोक अज्ञान कालातही हज्ज करीत होते. परंतु हज्जाचा मुख्य उद्देश नाहीसा झालेला होता. आणि त्याला रितीरिवाज व अनिष्ट प्रथा यांची भेसळ बनविण्यात आले होते. या संबंधातील एक अनिष्ट प्रथा ही होती की हज्जचा पेहराव केल्यानंतर एखाद्याला आपल्या घरामध्ये प्रवेश करण्याची जेव्हा आवश्यकता भासे किंवा जेव्हां तो हज्ज करून परत येत असे तेव्हा तो घराच्या पिछाडीच्या भितीवरून उडी मारून घरात प्रवेश करीत असे. हा त्यांचा निव्वळ संशयीपणा होता. आणि म्हणून पवित्र क़ुरआनने या संशयीपणाला व अनिष्ट प्रथेला रद्द करण्याचा हुकूम दिला. आणि उपदेश केला की घरामध्ये प्रवेशद्वारामधूनच प्रवेश करीत जा. इतकेच नव्हे तर हे पण स्पष्ट केले की शकुन व रितीरिवाजाच्या मार्गने सदाचार प्राप्त होत नसतो; तर सदाचार खऱ्या ईश्वर-भयाने आणि ईश्वराच्या मर्यादांचे पालन करून प्राप्त केला जातो. आणि यायेच नांव 'तक्वा' (संयमविवेक) आहे.

२६०. या आयतीमध्ये ईमान धारकांना आपल्या संरक्षणासाठी युद्ध करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्याची पार्श्वभूमि समजावून घेणे आवश्यक आहे. मक्केचे अनेकेश्वरवादी श्रद्धेचे स्वातंत्र्य, विवेकाचे स्वातंत्र्य आणि प्रचाराचे स्वातंत्र्य यांचे समर्थक नव्हते. तेथे टोळीची पद्धत (Tribal system) रुढ होती. आणि टोळीच्या कोणत्याही व्यक्तीला आपल्या टोळीच्या धर्माला (जो अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेचा धर्म होता) सोडण्याची आणि इस्लाम मध्ये प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. जे लोक ही बंधने तोडून इस्लाममध्ये प्रवेश करीत होते त्यांच्यावर जुलूम व अत्याचाराचा रोख होता. आणि त्यांना सांगितले जात होते की त्यांनी या अनेकेश्वरवादी धर्मामध्ये परत यावे, जो त्या टोळीचा (समूहाचा) धर्म आहे. त्यांना आपले घरदार सोडण्यास व आपल्या आवडत्या देशामधून (मक्का) निघून जाण्यास भाग पाडले गेले. आणि जेव्हा त्यांनी प्रयाण करुन मदीने मध्ये आश्रय घेतला तेव्हां त्यांच्याविरुद्ध अत्याचारी कृत्ये करण्यास सुरवात केली. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अल्लाहने ईमान आणलेल्यांना परवानगी दिली की त्यांनी आपल्या शत्रूच्या तलवारीचे उत्तर तलवारीने ध्यावे. किताल (युद्ध) ची ही पहिली आज्ञा आहे जी ईमान आणलेल्यांना ते मदीनेमध्ये संघटीत झाल्यानंतर देण्यात आली. यानंतरच रमज़ान सन २ हिजरीमध्ये बदरच्या लढाईची घटना घडली.

२६१. युद्धाच्या वेळी देखील मर्यादेत राहण्याचा व अतिरेक न करण्याचा उपदेश आहे. ''हदीस'' मध्ये स्त्रिया, मुले व वृद्ध लोक जे युद्धात भाग घेत नाहीत त्यांना ठार मारण्यास मनाई

करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे प्रेतांची विटंबना करण्यास व युद्धात क्रुर पद्धत अवलंबिण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

२६२.वरील आयतीत स्पष्ट असल्याप्रमाणे येथ त्या लोकांना ठार मारण्याची आज्ञा दिली आहे जे लोक मुसलमानांच्या बरोबर लढत होते. यांचा हा अर्थ काढणे योग्य नाहीं की मुसलमांनाना जेथे कोणी काफिर (अल्लाहचा इन्कार करणारा) आढळून येईल तेथे त्यांनी त्याला ठार मारावे. मग तो जगातील कोणत्याही भागातील असो, युद्धाची परिस्थिती असो वा शांततेची.

२६३. येथे 'फित्ना' ने अभिप्रेत अत्याचार व जबरदस्तीच्या मार्गाने लोकांना सत्यधर्मापासून परावृत करण्याचे प्रयत्न करणे व सत्यमार्गात आडकाठी आणणे हा आहे. या युक्तिवादाच्या आधारावर (विरोधकांच्या या कृत्यामुळें) ठार मारणे उचित ठरविण्यात आले. अर्थ असा की ठार मारणे हे एक कठोर कृत्य आहे. आणि मग 'हरम' (मक्केच्या सभोवारचा प्रदेश) च्या हद्दीत व पवित्र महिन्या मध्ये तर या कठोरतेत अधिक वाढ होते. परंतु यापेक्षाहि अधिक कठोर कृत्य ते आहे की अल्लाहच्या दासांवर यासाठी अत्याचार करणे की त्यांनी अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेचा त्याग करून एकेश्वरवादाचा स्वीकार केला आहे. आणि ते लोक अल्लाहच्या मार्गदर्शनाचे आवाहन (शिकवणीचा प्रचार व प्रसार) करून समाजाची सुधारणा करू इच्छितात. आयतीचा उद्देश हा आहे की जेव्हां लोकांचा एखादा समूह (Fascism) फॅसीझम अवलंब करतो व लोकांना सत्याच्या स्वीकारापासून रोखमतो आणि अल्लाहच्या शिकवणीच्या आवाहनाच्या मार्गात आडकाठी बनून राहतो तेव्हा त्या समूहाविरुद्ध सामर्थ्याचा वापर अगदी उचित आहे.

२६४. मस्जिदे हराम (काबा गृह) च्या आस,पासच्या भागाला (हराम) म्हणतात. त्याची प्रतिष्ठा राखण्याबद्दल खास आदेश आहेत. याच्या प्रतिष्ठेचा हा दर्जा हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या कालापासून चालत आलेला आहे. अज्ञान कालांत (जाहिलिय्यतच्या कालांत) देखील या भागाला प्रतिष्ठित मानले जात होते. आणि या भागात लढाई करण्यास प्रतिबंध होता. आणि म्हणून हा प्रशन निर्माण झाला होता की जर मक्केचे अनेकेश्वरवादी 'हरम'च्या क्षेत्रात लढाई सुरु करतील तर काय केले जावे? याचे उत्तर हे दिले गेले की मुसलमानांनी 'हरम' च्या क्षेत्रात स्वत:हून लढाई सुरुं करु नये. आणि जर कुफ्फार (इन्कार करणारे) लढाई सुरु करतील तर मुसलमानांनी त्यांना समर्थपणे प्रतिकार करून निरुत्तर करावे.कारण की अशा परिस्थितीत ते कोणत्याही प्रकारच्या सवलतीस पात्र राहत नाहीत.

२६५. येथे परत फिरण्याशी अभिप्रेत फक्त विरोधी कारवायापासून परावृत्त होणे इतकेच नसून अनेकेश्वरवाद व नास्तिकतेपासूनही परावृत होणे आहे.

# अरफात



१९३. आणि त्यांच्याशी लढा[२६६] येथपावेतो की उपद्रव शिल्लक राहू नये आणि 'दीन' अल्लाहचाच व्हावा [२६७] आणि जर ते परावृत्त होतील तर अत्याचारी लोकांशिवाय इतर कोणा विरुद्ध आक्रमण योग्य नाहीं.[२६८]

وَقٰتِلُوْهُمْ حَتّٰى لَا تَكُوْنَ فِتْنَةٌ وَّيَكُوْنَ الدِّيْنُ
لِلّٰهِ ۗ فَاِنِ انْتَهَوْا فَلَا عُدْوَانَ اِلَّا عَلَى الظّٰلِمِيْنَ ﴿١٩٣﴾

१९४. पवित्र महिन्यामध्ये [२६९] युद्धाला मनाई या स्थितीत आहे जेव्हां तेसुद्धां पवित्र महिन्यामधील मनाईचे पालन करतील.[२७०] आणि मनाईच्या बाबतीत समान विचार केला जाईल.[२७१] म्हणून जो तुमच्यावर जलूम करील त्यांच्या जुलूमाचे उत्तर तुम्ही हि त्या समानच द्या. आणि अल्लाहचे भय बाळगा.आणि हे समजून असा की अल्लाह त्यांच लोकांचे बरोबर आहे जे त्याचे भय बाळगतात.

اَلشَّهْرُ الْحَرَامُ بِالشَّهْرِ الْحَرَامِ وَالْحُرُمٰتُ قِصَاصٌ ۗ فَمَنِ
اعْتَدٰى عَلَيْكُمْ فَاعْتَدُوْا عَلَيْهِ بِمِثْلِ مَا اعْتَدٰى عَلَيْكُمْ ۖ
وَاتَّقُوا اللّٰهَ وَاعْلَمُوْٓا اَنَّ اللّٰهَ مَعَ الْمُتَّقِيْنَ ﴿١٩٤﴾

१९५. अल्लाहच्या मार्गांत खर्च करा [२७२] आणि आपल्या हातून आपला नाश ओढवून धऊं नका. [२७३] आणि हे कार्य (खर्च) चांगल्या प्रकारे करा. कारण चांगल्या प्रकारे कार्य करणाऱ्यांना अल्लाह पसंत करतो.

وَاَنْفِقُوْا فِىْ سَبِيْلِ اللّٰهِ وَلَا تُلْقُوْا بِاَيْدِيْكُمْ اِلَى التَّهْلُكَةِ ۛ
وَاَحْسِنُوْا ۛ اِنَّ اللّٰهَ يُحِبُّ الْمُحْسِنِيْنَ ﴿١٩٥﴾

१९६. 'हज्ज' व 'उमरा'[२७४] अल्लाहसाठी पूर्ण करा. [२७५] आणि जर तुम्ही वेढले जाल तर कुरबानी साठी जे जनावर मिळेल ते सादर करा [२७६] आणि तोपर्यंत आपल्या डोक्याचे मुंडन करू नका जोपर्यंत कुरबानीचे जनावर आपल्या ठिकाणी पोंहचत नाहीं [२७७] तथापि तुमच्यापैकी कोणी आजारी असेल. किंवा कोणाच्या डोक्यास काहीं त्रास असेल तर त्याने रोजा,दान वा कुरबानीच्या स्वरुपात बदल द्यावा.[२७८]मग जेव्हां तुम्हांला शांतता लाभेल तेव्हां जो कोणी 'हज्ज'(च्या काला) पर्यंत 'उमरा' चा लाभ घेईल त्याने शक्य असेल ती कुरबानी करावी [२७९]आणि ज्यांला कुरबानीसाठी काही मिळाले नाही त्यांने 'हज्ज'च्या काळात तीन दिवसाचे रोजे करावेत आणि परतल्यावर सात दिवसाचे करावेत.हे पूर्ण दहा दिवसाचे (रोजे) झाले.[२८०] ही आज्ञा त्या व्यक्तिसाठी आहे ज्याचे कुटुंबीय मस्जिदे हरामच्या जवळपास राहात नाहीत.[२८१] आणि अल्लाहचे भय बाळगून असा [२८२] आणि लक्षांत ठेवा की अल्लाह सक्त शिक्षा देणारा आहे.

وَاَتِمُّوا الْحَجَّ وَالْعُمْرَةَ لِلّٰهِ ۗ فَاِنْ اُحْصِرْتُمْ فَمَا اسْتَيْسَرَ
مِنَ الْهَدْىِ ۚ وَلَا تَحْلِقُوْا رُءُوْسَكُمْ حَتّٰى يَبْلُغَ الْهَدْىُ مَحِلَّهٗ ۗ
فَمَنْ كَانَ مِنْكُمْ مَّرِيْضًا اَوْ بِهٖٓ اَذًى مِّنْ رَّاْسِهٖ فَفِدْيَةٌ
مِّنْ صِيَامٍ اَوْ صَدَقَةٍ اَوْ نُسُكٍ ۚ فَاِذَآ اَمِنْتُمْ ۗ فَمَنْ تَمَتَّعَ
بِالْعُمْرَةِ اِلَى الْحَجِّ فَمَا اسْتَيْسَرَ مِنَ الْهَدْىِ ۚ فَمَنْ لَّمْ يَجِدْ
فَصِيَامُ ثَلٰثَةِ اَيَّامٍ فِى الْحَجِّ وَسَبْعَةٍ اِذَا رَجَعْتُمْ ۗ تِلْكَ عَشَرَةٌ
كَامِلَةٌ ۗ ذٰلِكَ لِمَنْ لَّمْ يَكُنْ اَهْلُهٗ حَاضِرِى الْمَسْجِدِ الْحَرَامِ ۗ
وَاتَّقُوا اللّٰهَ وَاعْلَمُوْٓا اَنَّ اللّٰهَ شَدِيْدُ الْعِقَابِ ﴿١٩٦﴾

२६६. येथे मुसलमान आणि मक्केचे इन्कार करणारे लोक यांच्यामध्ये जी तेढ होती ती चांगल्याप्रकारे समजावून घेतली पाहिजे. पवित्र क़ुरआनचा दावा हा होता की 'खानअे-काबा (काबागृह) ज्याची बांधणी हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी एकेश्वरवादाच्या (तौहीद) केंद्राच्या स्वरूपात केली होती त्याच्या देखरेखीचे खरे हक्कदार ईमान आणणारे लोक आहेत; अनेकेश्वरवादी लोक नव्हेत ज्यांनी त्याच्यामध्ये मूर्त्या बसविल्या होत्या. हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या प्रार्थनेचा स्वीकार करुन सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्या पैगंबराना निर्माण करण्याचा वायदा केलेला होता त्याची पूर्तता हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या उदयाने झाली होती. या पैगंबरांच्या द्वारे या घराच्या मूळ उद्देशाची पुनर्स्थापना करावयाची आहे. आणि म्हणून हे आवश्यक आहे या घराला काफिर (नास्तिक) व मुश्रिक (अनेकेश्वरवादी) लोकांच्या ताब्यांतून मुक्त करून आणि कुफ्र (नास्तिकता) व शिर्क (अनेकेश्वरवादाच्या) मलिनतेपासून स्वच्छ करून मुसलमान समाजाच्या ताब्यात दिले जावे. कारण ते इस्लामचे केंद्रस्थान आणि ईमान आणलेल्यांचा 'किब्ला' आहे. हा वस्तुत: हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा मूळ उद्देश होता आणि या उद्देशाच्या पूर्ततेच्या मार्गात जर कोणती शक्ति आडवी आली तर तिला मार्गातून दूर करण्यासाठी सामर्थ्याचा वापर करणे अगदी आवश्यक होते.

२६७. ही लढाई त्या वेळेपर्यंत चालू राहिली पाहिजे जोपर्यंत 'हरम'च्या पवित्र भूमितून अनाचाराची स्थिति संपत नाही-आणि सत्यधर्माचा प्रभाव पडत नाहीं. कारण की अल्लाहच्या घराचे स्वरूप एकेश्वरवादाच्या (तौहीद) केंद्राचे आहे. आणि म्हणून या पवित्र भूमिवर दुसऱ्या कोणत्याही धर्मासाठी स्थान नाही.

२६८. जर हे परावृत होऊन इस्लामचा स्वीकार करतील तर मग त्यांच्या मागील अपराधांबद्दल त्यांच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येणार नाही. परंतु फक्त त्यांच्या विरुद्ध कारवाई केली जाईल जे आपल्या अत्याचारी मार्गावर कायम राहतील.

२६९. ज़िल्काद, ज़िलहज, मुहर्रम व रजब या महिन्याला 'हराम' म्हणजे पवित्र माहिने असे संबोधिले जाते. यापैकी पहिले तीन महिने 'हज्ज' साठी खास समजले जातात आणि शेवटचा महिना-रजब-'उमरा' साठी. या चार महिन्यात लढाई करण्यास मनाई होती. कारण 'हरम'च्या यात्रेकरुना शांततेच्या वातावरणात 'बैतुल्लाह'चा प्रवास करणे व आपल्या घरी सुखरूप परत जाणे शक्य व्हावे. हा नियम हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या कालापासून चालत आलेला होता. आणि तो अरब लोकांमध्ये सर्वमान्य होता.

२७०. जेव्हा इन्कार करणारे, पवित्र महिन्यांच्या प्रतिष्ठेचा विचार करीत नाहीत आणि त्यांच्या तलवारी या महिन्यामध्ये देखील म्यानातून बाहेर येतात तर तुम्हालाही हा अधिकार आहे की, तुम्ही त्यांनाही शांतता व सन्मानाच्या हक्कापासून वंचित करा.

२७१. म्हणजे ज्या गोष्टीच्या पावित्र्याच्या हक्कापासून ते तुम्हाला वंचित ठेवतील, तुम्ही सुद्धा यांच्या बदल्यात त्यांना त्यांच्या पावित्र्याच्या हक्कापासून वंचित करू शकता. तथापि अल्लाहचे भय बाळगा. स्वत:हून पुढाकार घेऊं नका आणि तुमची कोणतीही कृती आवश्यकतेपेक्षा अधिक नसावी.

२७२. येथे अल्लाहच्या मार्गात खर्च करणे याचा अर्थ दीने इस्लामला प्रभावी बनविण्यासाठी आणि अल्लाहचा कलिमा (त्याचा बोल) बुलंद करण्यासाठी खर्च करणे हा आहे.

२७३. जे लोक इस्लामला प्रभावी बनविण्यासाठी खर्च करण्यास कुचराई करतात ते स्वत:ला विनाशाकडे नेतात. कारण की खरे जीवन अल्लाहच्या मार्गात तनाचा व धनाचा त्याग करण्यात आहे. त्यांना वाचवून ठेवण्यात नाही. 'आपल्या हातून आपला नाश ओढावून घेऊ नका या शिकवणीने आत्महत्या निषिद्ध आहे हे पण संदर्भाने स्पष्ट होते, मग त्यासाठी कोणतीही पद्धत अवलंबिली जावो.

२७४. ''उमरा'' म्हणजे ठरविक विधीसह काबा-गृहाचे दर्शन घेणे. एहराम परिधान करुन काबा-गृहाची प्रदक्षिणा घालणे; सफा व मरवा या दोन टेकड्यांच्या दरम्यान दौड करणे आणि शेवटी केस मुंडन करणे वा कातरणे. या 'उमरा'च्या महत्वाच्या विधी आहेत. 'उमरा' केव्हांही करता येतो. पण हज्ज साठी ठराविक तारखा निश्चित केल्या गेल्या आहेत. या शिवाय हज्जच्या वेळी मक्केहून अरफातलाही जावे लागते. पण 'उमरा' मक्के मध्येच अदा केला जातो.

२७५. 'हज्ज' व 'उमरा' अज्ञानकालातही केली जात असत. परंतु ती निव्वळ अल्लाहसाठीच केली जात नसत. ते लोक यामध्ये आपल्या खोट्या देवतांनाही सामील करीत असत. त्या देवतांच्या मूर्ति काबा-गृहात आणि 'सफा' वगैरे ठिकाणी बसविलेल्या होत्या. ते त्यांची पूजा करीत असत. त्यांना नवस करीत, नैवद्य दाखवित असत. त्यांच्यासाठी जनावराचा बळी देत असत. आणि म्हणून अल्लाहने ईमान आणलेल्यांना उपदेश केला की जेव्हा तुम्ही हज्ज व उमरा कराल तेव्हा फक्त अल्लाहसाठीच करा. आणि त्यांना सर्व प्रकारच्या अनेकेश्वरवादा पासून व अनिष्ट रितीरिवाजा पासून शुद्ध ठेवा.

या उपदेशाची एक बाजू ही पण आहे की हज्जला निव्वळ व्यापाराचे साधन बनवूं नये, जसे अज्ञान कालात याला व्यापारी मेळाव्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. हज्ज व उमरा करताना ढोंग

व दिखावटीचा लवलेशाही असता कामा नये. या विधीना अल्लाहची भक्ति व आज्ञापालन समजून व त्याच्या कृपेला उद्दिष्ट ठरवून पार पाडले जावे.

२७६. म्हणजे जर तुम्ही हज्ज वा उमरा साठी निघाल आणि मार्गात शत्रूने तुम्हाला वेढले तर ऊंट, गाय, बकरे यापैकी जे जनावर तुम्हाला मिळेल त्याची कुरबानी द्या हिजरी सन ६ मध्ये जेव्हां पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि त्यांचे (सहाबी) यानी उमरा करण्याचा इरादा केला तेव्हा मक्केच्या अनेकेश्वरवाद्यानी हुदेबिया च्या स्थानावर जेथून हरमचे क्षेत्र सुरू होते, आपल्याला व आपल्या साथींना रोखले. पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) येथेच कुर्बानी देऊन 'एहराम' सोडला.

२७७. 'एहराम' परिधान केलेला असताना कुरबानी देण्यापूर्वी मुंडन करण्यास व केस कातरण्यास प्रतिबंध आहे. आणि कुरबानी दिल्यानंतर मुंडन करणे वा केस कातरणे आवश्यक आहे.

कुरबानी ठिकाणी पोहचण्याचा अर्थ कुरबानीचा विधी पूर्ण होणे असा आहे. म्हणजे कुरबानीचा विधी पूर्ण झाल्यावरच हजामत करावी.

वेढले गेलेल्या अवस्थेत माणूस जेथे वेढला जातो तेथे त्याने कुरबानी करावी. आणि सामान्य परिस्थितीत काबा-गृहाजवळ (मिना मध्ये) कुरबानी करावी.

२७८. जर एखाद्या माणसाला आजारीपणामुळे वा त्रासामुळे कुरबानीपूर्वी आपल्या डोक्याचे मुंडन करावे लागले तर त्याने 'कफ्फारा' (प्रायश्चित-भरपाई) द्यावा. 'कफ्फारा'चे स्पष्टीकरण पैगंबरानी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) असे केले आहे की तीन दिवसाचे रोजे करावेत अगर सहा दीनदुबळ्यांना जेवण घालावे. किंवा कमीतकमी एका बकऱ्याची कुरबानी द्यावी.

२७९. ही सवलत त्या लोकांच्यासाठी आहे जे 'हरम'च्या क्षेत्राबाहेर राहतात व एकाच प्रवासात 'हज्ज' 'उमरा' क़रु इच्छितात. याला ''तमत्तुअ'' म्हणतात याची पद्धत अशी आहे की माणसाने प्रथम 'उमरा' करुन 'एहराम' शोडावा मग हज्जच्या तारखामध्ये 'एहराम' परिधान करुन 'हज्ज' करावा. ''तमत्तुअ''च्या प्रसंगी कुरबानी आवश्यक आहे. परंतु कुरबानी करणे अशक्य झाल्यास दहा दिवसाचे रोजे करावेत. तीन दिवसांचे रोजे हज्जच्या कालात आणि सात दिवसाचे रोजे 'हज्ज' हून परत आल्यानंतर.

२८०. कुरबानीच्या बदल्यात फक्त तीन रोजे नाहीत तर पूर्ण दहा रोजे आहेत. दहाला पूर्ण म्हणण्यात बहुत करून या गोष्टीकडे इशारा आहे की दहा हा आकडा गणनेच्या दृष्टीने पूर्ण आहे. हिशोबमध्ये दहाचे वैशिष्ट्य उघडच आहे. आणि दसमान पद्धतीचा आधारही दहा अगर दहाव्या भागावरच आहे.

२८१. म्हणजे 'हरम'च्या क्षेत्रात राहणाऱ्यांसाठी 'तमत्तुअ' ची सवलत नाही. ते हज्जच्या महिन्यात फक्त हज्ज करु शकतात, ज्याला 'इफराद' म्हणतात.

२८२. इशारा या गोष्टीकडे आहे की या आदेशांचा मूळ उद्देश 'तक़्वा' आहे. जर तुम्ही 'तक़्वा' केला नाही, संयम पाळला नाही आणि फक्त रिवाज म्हणून 'हज्ज' केला तर असा 'हज्ज' निर्जीव आहे.

## मस्जिद नमिरा-अरफात



# हज्जची स्थानें


ताइफ़ कडे
अरफ़ात
जबलुर्रहमा:
मस्जिद नमेरा
मुज़दलिफ़ा
मज़बह ( Slaughter House )
मशअरे-हराम
मस्जिदअल्-ख़ैफ़
मिना
जमरात
(शैतान)
सफ़ा
मरवह
मस्जिदे-हराम
मक्का

१९७. हज्जचे काही ठराविक महिने आहेत.[२८३] जो कोणी त्या मुदतीत हज्जचा निर्धार करील त्याने हज्जच्या कालात न विषयसुखाची गोष्ट करावी, न दुष्कृत्ये करावीत न भांडणतंटा.[२८४] आणि जे सत्कृत्य तुम्ही कराल ते अल्लाहला ज्ञातच राहील. आणि प्रवासाची उत्तम सामुग्री बरोबर घ्या. प्रवासाची सामुग्री तर अल्लाहचे भय आहे.[२८५] आणि बुद्धिमंतानो माझे भय बाळगा.

اَلْحَجُّ اَشْهُرٌ مَّعْلُوْمٰتٌ ۚ فَمَنْ فَرَضَ فِيْهِنَّ الْحَجَّ فَلَا رَفَثَ
وَلَا فُسُوْقَ وَلَا جِدَالَ فِي الْحَجِّ ۗ وَمَا تَفْعَلُوْا مِنْ خَيْرٍ
يَّعْلَمْهُ اللّٰهُ ۗ وَتَزَوَّدُوْا فَاِنَّ خَيْرَ الزَّادِ التَّقْوٰى ۚ
وَاتَّقُوْنِ يٰۤاُولِي الْاَلْبَابِ ﴿١٩٧﴾

१९८. या गोष्टीमध्ये कसलाही गुन्हा नाही की तुम्ही आपल्या पालनकर्त्याच्या कृपेचा शोध करावा.[२८६] आणि जेव्हा अरफात [२८७] वरून परत फिराल तेव्हा 'मशअरे हराम' [२८८] (मुजदलिफा,) जवळ अल्लाहचे स्मरण करा आणि अशा प्रकारे स्मरण करा की ज्याप्रमाणे अल्लाहने तुम्हाला शिकवण दिली आहे. [२८९] निःसंशय यापूर्वी तुम्ही लोक भटकलेले होता.

لَيْسَ عَلَيْكُمْ جُنَاحٌ اَنْ تَبْتَغُوْا فَضْلًا مِّنْ رَّبِّكُمْ ۗ
فَاِذَاۤ اَفَضْتُمْ مِّنْ عَرَفٰتٍ فَاذْكُرُوا اللّٰهَ عِنْدَ
الْمَشْعَرِ الْحَرَامِ ۪ وَاذْكُرُوْهُ كَمَا هَدٰىكُمْ ۚ وَاِنْ
كُنْتُمْ مِّنْ قَبْلِهٖ لَمِنَ الضَّآلِّيْنَ ﴿١٩٨﴾

१९९. आणि तुमहींही त्याच स्थानापासून परत फिरा जेथून सर्व लोक परत फिरतात. [२९०] आणि अल्लाहची क्षमायाचना करा. निःसंशय अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

ثُمَّ اَفِيْضُوْا مِنْ حَيْثُ اَفَاضَ النَّاسُ وَاسْتَغْفِرُوا
اللّٰهَ ۗ اِنَّ اللّٰهَ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿١٩٩﴾

२००. मग जेव्हां तुम्ही हज्जचे विधि पार पाडाल तेव्हां अल्लाहचे स्मरण करा, ज्याप्रमाणे तुम्ही आपल्या वाडवडीलांचे स्मरण करीत होता. इतकेच नव्हे तर त्याहून अधिक.[२९१] लोकांमध्ये असेही आहेत ज्यांची प्रार्थना ही असते की, हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हाला या जगातच सर्वकाही दे.[२९२] अशांचा आखिरत मध्ये कसलाही हिस्सा नाही.

فَاِذَا قَضَيْتُمْ مَّنَاسِكَكُمْ فَاذْكُرُوا اللّٰهَ
كَذِكْرِكُمْ اٰبَآءَكُمْ اَوْ اَشَدَّ ذِكْرًا ۗ فَمِنَ النَّاسِ
مَنْ يَّقُوْلُ رَبَّنَاۤ اٰتِنَا فِي الدُّنْيَا وَمَا
لَهٗ فِي الْاٰخِرَةِ مِنْ خَلَاقٍ ﴿٢٠٠﴾

२०१. आणि काही असे आहेत, ज्यांची प्रार्थना ही असते की, हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हांला या जगात, जे चांगले आहे ते दे आख़िरतमध्येही आम्हांला चांगल्याचा लाभ होऊ दे आणि आगीच्या यातनापासून आम्हांला वाचव.[२९३]

وَمِنْهُمْ مَّنْ يَّقُوْلُ رَبَّنَاۤ اٰتِنَا فِي الدُّنْيَا حَسَنَةً
وَّفِي الْاٰخِرَةِ حَسَنَةً وَّقِنَا عَذَابَ النَّارِ ﴿٢٠١﴾

२८३. 'हज्ज' चे महिने शव्वाल, जिलकाद व जिलहज्ज म्हणजे चांद्रवर्षाचा दहावा, अकरावा व बारावा महिना. जिलहज्जच्या ९ तारखेस 'अरफात'च्या मैदानावर एकत्रित येणे आवश्यक आहे. याला ''वुकुफे अरफात'' म्हणतात. आणि हा हज्जचा अत्यंत महत्वाचा विधी (रुकन) आहे. हज्जचा 'एहराम' हज्जच्या महिन्यातच परिधान केला जाऊ शकतो.

२८४. जेव्हा माणूस 'हज्ज'च्या एहराम परिधान करतो तेव्हा त्याच्यावर ठराविक बंधने येतात. उदा. वैषयिक आचार विचारापासून दूर राहणे. म्हणजे निव्वळ पत्नी बरोबर संभोगावरच प्रतिबंध आहे असे नव्हे तर वैषयिक प्रवृत्तीस चालना देणारी कोणतीही गोष्ट करण्यास, त्याचप्रमाणे अशलील बोलण्यासही सक्त मनाई आहे. अशलील व बीभत्स अशा सर्व गोष्टी यातर मूलत: नाजाइज़ (अवैध) आहेतच आहेत. परंतु 'एहराम' परिधान केलेला असताना त्यांचा अपराध फार मोठा आहे. त्याचप्रमाणे भांडणतंट्टा ही एक वाईट गोष्ट आहे. परंतु एहराम परिधान केला असतांना त्याचा वाईटपणा भयंकर होतो.

या गोष्टींची मनाई निवेदन करुन ही जाणीव करुन द्यावयाचा उद्देश हा आहे की 'हज्ज' हा एखादा मेळावा नव्हे की लोकांनी मनोरंजन व व्यापारासाठी एकत्रित यावे. ती एखादी 'धार्मिक यात्रा पण नव्हे कीं जिच्यामध्ये निर्जीव रुढींचा अवलंब करुन माणसाची पापे धुतली जातात. याउलट हे अल्लाहच्या दरबारी हजर होणे आहे. म्हणून एहराम परिधान केला असताना वारंवार जे ''लब्बैक'' म्हटले जाते याचा अर्थ हाच कीं ''परमेश्वरा ! मी तुझ्या सेवेशी हजर आहे.''आणि म्हणून या हजेरीसाठी गुन्ह्यापासून वाचण्याचे असाधारण प्रयत्न करावयास हवेत. त्याचप्रमाणें एका विशिष्ट अवस्थेत असल्याची जाणीव पण आवश्यक आहे म्हणजे या हजेरीचा खोल ठसा मनावर व बुद्धीवर उमटला जाऊं शकेल. आणि माणूस जेव्हां अल्लाहच्या दरबारातून परत येईल तेव्हां तो आत्मशुद्धीच्या देणगीनें समृद्ध झालेला असेल. आणि आपल्याबरोबर त्याने अध्यात्मिक संपत्ती आणलेली असेल.

२८५. अज्ञान कालात हज्जसाठी शिदोरी बरोबर घेणे श्रेष्ठ दर्जाच्या धर्मनिष्ठेविरुद्ध समजले जात असे. या आयतीमध्ये त्यांच्या या समजूतीचे खंडन केले गेले. आणि सांगितले गेले की फकीरीचे प्रदर्शन करणे ही काही चांगली गोष्ट नव्हे. चांगली गोष्ट ही आहे की माणसाने. हात पसरण्यापासून वाचावे आणि ईश्वराचे भय बाळगून निग्रही वागणूक ठेवावी.

'अत्युत्तम शिदोरी संयम (अल्लाहचे भय) आहे'चा इशारा या कडेही आहे की आखिरतच्या प्रवासासाठी संयम (तक्वा) ही उत्तम शिदोरी आहे.

२८६. दास जेव्हा अल्लाहच्या मर्यादेच्या आत राहून उपजीविकेसाठी प्रयत्न करतो तेव्हा वास्तविकपणे तो आपल्या पालनकर्त्याच्या कृपेच्या शोधात असतो. आणि म्हणून हज्जच्या प्रवासामध्ये व्यापारी लाभ उठविण्यास म्हणून हज्जच्या प्रवासामध्ये व्यापारी लाभ उठविण्यात कसलाही दोष नाही. जर माणूस संयम पाळण्याची खबरदारी घेत असेल, ज्याची शिकवण वर आलेली आहे. आणि जो हज्ज चा मूळ उद्देश आहे, तर मग दुय्यमरित्या आर्थिक लाभ उठविण्यापासून या इबादतीमध्ये कसलाही बिघाड निर्माण होणार नाही.

२८७. 'अरफात' हे एका मैदानाचे नांव आहे. जे मक्का शहराच्या पूर्वेस बारा मैलावर आहे. आणि 'ताइफ'च्या रस्त्यावर येते. या मैदानामध्ये जिलहज्जच्या ९ तारखेस थांबणे हा हज्ज चा अति महत्वाचा विधी आहे. यामध्ये एक टेकडी आहे, जिला 'जबलूर रहमत' म्हणतात. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यानी या टेकडीच्या पायथ्याशी प्रार्थना केली होती.

२८८. म्हणजे 'मुजदलिफा' मध्ये, जे अरफात व मिनाच्या दरम्यान आहे. अरफात मधून जेव्हां परत फिरतात तेव्हां 'मुजदलिफा' मध्ये रात्री मुक्काम केला जातो.

२८९. 'मुजदलिफा' मध्ये 'मग़रिब' व 'इशा'च्या नमाज़ी एकत्र अदा केल्याजातात. पहाटेची वेळ झाल्यावर 'फज्र'ची नमाज़ अदा केली जाते. अल्लाहचे स्मरण करण्यामध्ये या नमाज़ी पण सामील आहेत. आणि ''लब्बैक'' व 'तस्बीह' शुद्धा.

२९०. कुरेश स्वत:ला काबा-गृहाचे मुजावर समजत असत. या आधारावर त्यांनी आपल्यासाठी हा विशेष दर्जा कायम केला होता की हज्ज च्या प्रसंगी अरफात ला जाणे त्यांच्यासाठी आवश्यक नाही. म्हणून ते मुजदलिफा पर्यंत जाऊन तेथनूच परत फिरत असत. क़ुरआनने या विशेष दर्जाला रद्द करून सर्वांना एका पातळीवर आणले आणि आज्ञा केली की ज्याप्रमाणे दुसरे लोक अरफातला जातात त्याचप्रमाणे कुरेशच्या लोकांनो तुम्ही पण अरफात जा व तेथून परत फिरा.

उघड असो की हज्ज चे हे विधी, ज्यामध्ये अरफातची हजेरी पण सामील आहे. हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या कालापासून प्रचलित होते. परंतु अज्ञान कालातील लोकांनी त्यामध्ये काही मर्यादेपर्यंत फेरबदल केले होते. क़ुरआनने त्यांना पुन्हा हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या मूळ पद्धतीप्रमाणे कायम केले आणि सर्व प्रकारच्या चुकीच्या भेदभावाना सामाप्त केले.

२९१. अज्ञान कालात मिना मधील वास्तव्यामध्ये शेर-शायरीच्या बैठकी भरत असत. आणि शाहीर व वक्ते आपापल्या टोळ्यांची व पूर्वजांची कर्तबगीरी अभिमानाने वर्णन करीत असत. क़ुरआनने या निरर्थक गोष्टींना सोडून देण्याची आणि

ईश्‍वराचे अधिकाधिक स्मरण करण्याची आज्ञा केली.

२९२. इशारा त्या लोकांच्याकडे आहे ज्यांच्यावर ऐहिक जीवनाचा प्रभाव असतो. जेव्हा त्यांना हज्जची संधि मिळते तेव्हा तेथेही ते फक्त ऐहिक जीवनात संपन्नता लाभावी म्हणून प्रार्थना करतात. आणि अखिरतला अगदी विसरून जातात. त्यांना अखिरतमधील मुक्तिबद्दल काहीच चिंता नसते. ही विचारसरणी 'हज्ज' सारख्या थोर इबादतीला सुध्दा ऐहिक लाभ प्राप्त करण्याचे साधन बनविते. आणि परिणामस्वरूप माणूस हज्जच्या थोर लाभापासून वंचित होऊन रिक्त हातांनी परत येतो.

२९३. हा इशारा त्या लोकांच्याकडे आहे. ज्यांचा ऐहिक जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन असमतोल नाही. जे या जीवनातील व आखिरतमधील चांगल्याचे याचक आसतात. या जीवनातील एखादी गोष्ट एखाद्याच्या बाबतीत तेव्हांच लाभदायक होते जेव्हां ती आख़िरतच्या यशाचे साधन बनूं शकते. आणि म्हणून ईमान आणलेल्यांची याचना ही असते कीं, ''आम्हला ती गोष्ट दे जी आमच्या बाबतीत खरोखरच लाभदायक व चांगली आहे.'' इतकेच नव्हे तर ईमान आणलेले लोक जहन्नमच्या शिक्षेपासून ईश्वराचे संरक्षण मागत असतात. माणसाला खरी चिंता आख़िरतच्या मुक्तिचीच असावयास हवी.

**काही लोक असे आहेत ज्यांच्या गोष्टी तुम्हांला या ऐहिक जीवनांत मोठ्या आकर्षक वाटतात. आणि आपल्या नीयतीबद्दल (सदिच्छा) ते अल्लाहला साक्षीदार बनवितात. परंतु वास्तविक ते कट्टर विरोधक असतात.** *(अल-क़ुरआन)*

२०२. हेच लोक आहेत ज्यांना त्यांच्या सत्कृत्यांमुळे (कमाई मुळे)हिस्सा मिळेल आणि अल्लाह तत्परतेने हिशेब पुरा करणारा आहे.

أُولٰٓئِكَ لَهُمْ نَصِيْبٌ مِّمَّا كَسَبُوْا ۭ وَاللّٰهُ سَرِيْعُ
الْحِسَابِ ﴿٢٠٢﴾

२०३. आणि निश्चित केलेल्या दिवसात [२९४] अल्लाहचे स्मरण करा. मग जो कोणी दोन दिवसात घाई करील, (व निघून जाईल) त्याचा कसलाही गुन्हा नाही आणि जो (निघावयास) विलंब लाविल, त्याचाही गुन्हा नाही.[२९५] हे त्यांच्यासाठी आहे जो संयमाचा स्वीकार करतो. अल्लाहचे भय बाळगून असा आणि चांगल्याप्रकारे लक्षात ठेवा की त्याच्याच दरबारी तुम्हांला एकत्र यावयाचे आहे.[२९६]

وَاذْكُرُوا اللّٰهَ فِيْٓ اَيَّامٍ مَّعْدُوْدٰتٍ ۭ فَمَنْ تَعَجَّلَ
فِيْ يَوْمَيْنِ فَلَآ اِثْمَ عَلَيْهِ ۚ وَمَنْ تَاَخَّرَ فَلَآ
اِثْمَ عَلَيْهِ ۙ لِمَنِ اتَّقٰى ۭ وَاتَّقُوا اللّٰهَ وَاعْلَمُوْٓا
اَنَّكُمْ اِلَيْهِ تُحْشَرُوْنَ ﴿٢٠٣﴾

२०४. काही लोक असे आहेत ज्यांच्या गोष्टी तुम्हांला या ऐहिक जीवनांत मोठ्या आकर्षक वाटतात. आणि आपल्या नीयतीबद्दल (सदिच्छा) ते अल्लाहला साक्षीदार बनवितात. परंतु वास्तविक ते कट्टर विरोधक असतात. [२९७]

وَمِنَ النَّاسِ مَنْ يُّعْجِبُكَ قَوْلُهٗ فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا وَيُشْهِدُ
اللّٰهَ عَلٰي مَا فِيْ قَلْبِهٖ ۙ وَھُوَ اَلَدُّ الْخِصَامِ ﴿٢٠٤﴾

२०५. आणि जेव्हां ते परत फिरतात तेव्हां जमीनीवर त्यांची सर्व धांवपळ अनाचार माजविण्यासाठी, शेतीचा व वंशाचा नाश करण्यासाठी, होत असते. [२९८] परंतु अल्लाह अनाचाराला कदापिही पसंत करीत नाहीं.

وَاِذَا تَوَلّٰى سَعٰى فِي الْاَرْضِ لِيُفْسِدَ فِيْهَا وَيُهْلِكَ
الْحَرْثَ وَالنَّسْلَ ۭ وَاللّٰهُ لَا يُحِبُّ الْفَسَادَ ﴿٢٠٥﴾

२०६. आणि जेव्हा त्यांना सांगितले जाते की अल्लाहचे भय बाळगा तर अहंकार त्यांना गुन्ह्यास प्रवृत्त करतो. अशा लोकांच्यासाठी जहन्नम पुरेशी आहे. ते अत्यंत वाईट असे वसतिस्थान आहे.

وَاِذَا قِيْلَ لَهُ اتَّقِ اللّٰهَ اَخَذَتْهُ الْعِزَّةُ بِالْاِثْمِ
فَحَسْبُهٗ جَهَنَّمُ ۭ وَلَبِئْسَ الْمِهَادُ ﴿٢٠٦﴾

२०७. आणि लोकांमध्ये असेही आहेत जे अल्लाहची प्रसन्नता संपादन करण्यासाठी आपले जीवन वेचतात.[२९९] आणि अल्लाह आपल्या दासांवर फार मेहरबान आहे.

وَمِنَ النَّاسِ مَنْ يَّشْرِيْ نَفْسَهُ ابْتِغَاۗءَ مَرْضَاتِ
اللّٰهِ ۭ وَاللّٰهُ رَءُوْفٌۢ بِالْعِبَادِ ﴿٢٠٧﴾

२०८. ईमान आणलेल्या लोकांनो ! इस्लामचा पूर्णपणे अंगिकार करा.[३००]आणि शैतानाच्या मार्गाचे अनुकरण करू नका.[३०१] तो तुमचा उघड शत्रू आहे.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا ادْخُلُوْا فِي السِّلْمِ
كَاۗفَّةً ۠ وَلَا تَتَّبِعُوْا خُطُوٰتِ الشَّيْطٰنِ ۭ اِنَّهٗ
لَكُمْ عَدُوٌّ مُّبِيْنٌ ﴿٢٠٨﴾

२९४. अभिप्रेत ''मिना'' मधील वास्तव्याचा काल. याला ''अय्यामे तशरीक़'' म्हणतात. म्हणजे जिलहज्जच्या११,१२ व १३ ह्या तारखा. ''मिना'' मक्कापासून तीन चार मैलाच्या अंतरावर आहे. येथे १० जिलहज्जला सैतानाला खडे मारले जातात व क़ुरबानी दिली जाते. ''अय्यामे तशरीक़'' सुद्धा मिनामध्येच घालविले जातात. आणि रोज़ सैतानाला खडे मारले जातात. खडे मारताना अल्लाह चे स्मरण केले जाते व शैतानाचा धिक्कार केला जातो.

२९५. म्हणजे १२ जिलहज्जला खडे मारल्यानंतर परत फिरण्यास अगर १३ ज़िलहज्जपर्यंत मिनामध्ये वास्तव्य करण्यास परवानगी आहे. वास्तव केले तर १३ तारखेसही खडे मारावे लागतील.

२९६. इशारा या गोष्टीकडे आहे की हज्जचे हे अधिवेशन अन्तिम निवाड्याच्या दिवसाच्या (हश्र) त्या अधिवेशनाची आठवण करून देते, जेथे साऱ्या लोकांना अल्लाहच्या समोर एकत्रित केले जाईल.

२९७. इशारा स्वार्थी लोकांच्या कडे आहे जे वाचावीर असतात. अणि आपल्या दुर्बलतेवर पडदा टाकण्यासाठी गोड गोड बोलत असतात. ऐहिक जीवनाच्या प्रश्नांबद्धल जेव्हा ते विचार व्यक्त करतात तेवहां त्यांच्या गोष्टी मंत्रमुग्ध करणाऱ्या असतात. आणि ते ईश्वराला साक्ष ठेवून सांगत असतात की ते या गोष्टी वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे तर लोकांच्या भल्यासाठीं सांगत आहे. आणि ते इस्लामचे शत्रु मुळीच नाहीत. वस्तु:स्थिती ही असते की, त्यांच्या मनात इस्लामच्या विरुद्ध तीव्र द्वेष व मत्सर पुरेपूर भरलेला असतो. आणि ते सत्यांचे कट्टर वैरी अस्तात.

२९८. म्हणजे तुमच्यासमोर तर ते मोठ्या मनोवेधक गोष्टी करतात. परंतु जेव्हा तुमच्यापासून निघून जातात तेव्हां त्यांची सारी धावपळ जमीनीवर अनाचार माजविण्यासाठी होत असते. आणि म्हणून जमीनीवर सुधारणा आणि तिच्यावर शांततेची व न्यायची स्थापना या गोष्टी अल्लाहचे दास्य व आज्ञापालनावरच अवलंबून असल्या तरी, ते अल्लाहकडे बोलाविणाऱ्या आवाहनाला विरोध करू लागतात.

क़ुरआनाच्या या निवेदनाचे समर्थन मोठमोठ्या लढाया व जागतिक युद्धांमुळे जगाचा जो विध्वंस झाला त्यावरून होते. अल्लाहच्या शिकवणीपासून तोंड फिरविणाऱ्या लोकांच्या हाती जेव्हा अधिकार येतो तेव्हां ते जगाच्या धूळधाणीची व्यवस्था करीत असतात; जरी ते आपल्या प्रत्येक हालचालीच्या प्रसंगी त्या योग्य असल्याबद्दल मनोहर विचारसरणी सादर करीत असतात.

२९९. वर स्वार्थी लोकांचा उल्लेख झाला होता. त्याच्या बरोबरच हा त्या खऱ्या ईमानधारकांचा उल्लेख आहे, ज्यांनी जीवनाचे ध्येय अल्लाहची कृपा संपादन करणे हे बनवीले आहे. आणि त्यासाठी आपल्या सर्वस्वाचा ते त्याग करीत असतात.

३००. येथे मुसलमानांना उपदेश केला जात आहे की जर तुम्ही प्रामाणिक ईश्वर भक्त बनू इच्छित असाल तर संपूर्ण ताबेदारी व आज्ञापालनाचा मार्ग अनुसरा आणि कसलाही अपवाद व कुचराई न करता सारे जीवन इस्लामच्या स्वाधीन करा.

'दीन'च्या फक्त त्या बाबींचा अंगिकार करणे ज्या स्वत:च्या स्वार्थाच्या आड येत नाहीत ही स्वार्थी व ढोंगी लोकांची पद्धत आहे. प्रामाणिक ईशभक्त तर संपूर्ण ताबेदारी व निष्ठापूर्ण आज्ञापालनाची पद्धत अंगिकातात. आणि सर्व प्रश्नांत व व्यवहारांत ते स्वत:ला इस्लामच्या अधीन समजतात. आणि म्हणून मानावयाचे असेल तर संपूर्ण इस्लामला माना आणि त्याचे प्रामणिकपणे अनुसरण करा. इस्लामच्या काही गोष्टी मानण्याने व काही गोष्टीचा इन्कार करण्याने न तुमची गणना इस्लामच्या निष्ठावान दासांमध्ये होऊ शकते न या आचरण पद्धतीने जगामध्ये शांतता व न्यायी व्यवस्था प्रस्थापित होऊ शकते. उलट अशा वागण्याने जगामध्ये अंदाधुंदी व अनाचार माजेल.

३०१. म्हणजे जे लोक एकाच वेळी इस्लाम व नास्तिकते बरोबर संबंध ठेवितात आणि ज्यांनी आपल्या जीवनाची दोन्हीकडे विभागणी केली आहे ते शैतानाचे अनुकरण करीत आहेत.

२०९. या स्पष्ट शिकवणी आल्यानंतर देखील जर तुम्ही ढळाल तर लक्षांत ठेवा अल्लाह सामर्थ्यवान व बुद्धिमान आहे. [३०२]

فَإِنْ زَلَلْتُمْ مِّنْ بَعْدِ مَا جَاءَتْكُمُ الْبَيِّنٰتُ
فَاعْلَمُوْٓا أَنَّ اللّٰهَ عَزِيْزٌ حَكِيْمٌ ٢٠٩

२१०. काय हे लोक या गोष्टीची प्रतीक्षा करीत आहेत की अल्लाहने फिरिश्त्यांना बरोबर घेऊन ढगांच्या छत्राखाली त्यांच्यासमोर यावे आणि निर्णयच करुन टाकावा ?[३०३] सरतेशेवटी सारे प्रश्न तर अल्लाहच्या समोरच सादर केले जातील.

هَلْ يَنْظُرُوْنَ إِلَّآ أَنْ يَّأْتِيَهُمُ اللّٰهُ
فِيْ ظُلَلٍ مِّنَ الْغَمَامِ وَالْمَلٰٓئِكَةُ وَقُضِيَ
الْأَمْرُ ۚ وَإِلَى اللّٰهِ تُرْجَعُ الْأُمُوْرُ ٢١٠

२११. बनी इसराईलना विचारा, आम्ही त्यांना किती उघड निशाण्या दिल्या.[३०४] आणि जो कोणी अल्लाहच्या कृपेचा[३०५](देणगीचा)लाभ झाल्यानंतर तिला बदलतो तर नि:संशय अल्लाह सक्त शिक्षा देणारा आहे.

سَلْ بَنِيْٓ إِسْرَآءِيْلَ كَمْ اٰتَيْنٰهُمْ مِّنْ اٰيَةٍۢ بَيِّنَةٍ ۗ
وَمَنْ يُّبَدِّلْ نِعْمَةَ اللّٰهِ مِنْ بَعْدِ مَا جَاءَتْهُ
فَإِنَّ اللّٰهَ شَدِيْدُ الْعِقَابِ ٢١١

२१२. ज्या लोकांनी इन्कार (कुफ्र) केला त्यांच्यासाठी या जगातील जीवन अत्यंत मनोहर बनविले गेले आहे.[३०६] ते ईमान आणलेल्याची थट्टा करीत आहेत.तथापि ज्या लोकांनी अल्लाहचे भय बाळगिले आहे ते क़ियामतीच्या दिवशी त्यांच्यावर (काफिरांवर) वर्चस्व मिळवितील. आणि अल्लाह इच्छिल त्याला अगणित [३०७] देणग्या (रिज़्क़) देतो.

زُيِّنَ لِلَّذِيْنَ كَفَرُوا الْحَيٰوةُ الدُّنْيَا وَيَسْخَرُوْنَ مِنَ الَّذِيْنَ
اٰمَنُوْا ۘ وَالَّذِيْنَ اتَّقَوْا فَوْقَهُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ ۗ وَاللّٰهُ يَرْزُقُ
مَنْ يَّشَآءُ بِغَيْرِ حِسَابٍ ٢١٢

२१३. लोकांचा एकच समाज होता. [३०८] (परंतु जेव्हा त्यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाला) तेव्हा अल्लाहने पैगंबरांना पाठविले जे खुशखबर एकविणारे व सावध करणारे होते आणि त्यांच्याबरोबर सत्य असा ग्रंथ उतरविला कारण की ज्या बाबतीत लोक मतभेद करीत होते. त्यांच्या निर्णय करावा. आणि या बाबतीत मतभेद त्या लोकांनी केला ज्यांना ग्रंथ दिला गेला होता. आणि हा मतभेद त्यांनी स्पष्ट शिकवण आल्यानंतर निव्वळ आपसातील हट्टापायी केला. तेव्हा अल्लाहने आपल्या कृपेने ईमान आणलेल्याचे या सत्याच्या बाबतीत मार्गदर्शन केले,ज्या बाबतीत लोकांनी मतभेद केला होता.अल्लाह ज्याला इच्छितो त्याला सरळमार्ग दाखवितो.[३०९]

كَانَ النَّاسُ أُمَّةً وَّاحِدَةً ۫ فَبَعَثَ اللّٰهُ النَّبِيّٖنَ
مُبَشِّرِيْنَ وَمُنْذِرِيْنَ ۪ وَأَنْزَلَ مَعَهُمُ الْكِتٰبَ بِالْحَقِّ
لِيَحْكُمَ بَيْنَ النَّاسِ فِيْمَا اخْتَلَفُوْا فِيْهِ ۗ وَمَا
اخْتَلَفَ فِيْهِ إِلَّا الَّذِيْنَ أُوْتُوْهُ مِنْۢ بَعْدِ مَا جَاءَتْهُمُ
الْبَيِّنٰتُ بَغْيًۢا بَيْنَهُمْ ۚ فَهَدَى اللّٰهُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا لِمَا اخْتَلَفُوْا
فِيْهِ مِنَ الْحَقِّ بِإِذْنِهٖ ۗ وَاللّٰهُ يَهْدِيْ مَنْ يَّشَآءُ إِلٰى صِرَاطٍ
مُّسْتَقِيْمٍ ٢١٣

३०२. म्हणजे त्या उघड उपदेशानंतर सुद्धा जर तुम्ही धार्मिकतेच्या आवरणाखाली स्वार्थी आचरण पद्धती निवडली किंवा इन्कार करणाऱ्याबरोबर हातमिळवणी करीत राहिलात तर लक्षात ठेवा की अल्लाहच्या पकडीतून तुम्ही कदापीही वाचू शकणार नाही, कारण अल्लाह सामर्थ्यवान आहे. त्याने आपली जीवन-पद्धती (दीन) यासाठी पाठविलेली नाही की लोकांनी तिला खेळ व करमणूक बनवावी, परंतु ती यासाठी पाठविली आहे की तिच्यानुसार आचरण करणाऱ्या व तिच्यापासून दूर राहणाऱ्या लोकांमध्ये परिणामाच्या दृष्टीने फरक करण्यात यावा. अल्लाह बुद्धिमान आहे आणि म्हणून असा फरक करणे आवश्यक आहे.

३०३. म्हणजे जर त्या उघड आदेशानंतर सुद्धा जर लोक इस्लामच्या राजमार्गावर कायम राहणार नाहीत व शैतानाच्या मागेच भटकत राहतील तर असे समजू नका की ते आता आणखी एखाद्या पुराव्याची प्रतीक्षा करीत आहेत. परंतु ते तर याची प्रतीक्षा करीत आहेत की अल्लाह व त्याच्या फिरिश्त्यांनी त्यांच्यासमोर यावे. पण ती वेळ तर निर्णयाची वेळ असेल. ईमान तर तेच विश्वसनीय आहे जे अल्लाहच्या निशाण्या पाहून, एकून व समजून आणले जाते. सर्वश्रेष्ठ अल्लाह इच्छितो की मणसाने आपल्या बुद्धीने वागावे आणि पुराव्याचा आधारावर सत्याचा स्वीकार करावा. परंतु जे लोक वास्तविक गोष्टींना (Realities) प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहून मानू इच्छितात त्यांनी क़ियामतीची (शेवटच्या दिवसाची) प्रतिक्षा करावी परंतु ती वेळ निर्णयाची असेल, परीक्षेची नव्हे.

३०४. बनी इसराईलना ज्या खूणा दाखविल्या गेल्या त्यांचा उल्लेख यापूर्वी आलेला आहे उदाहरणार्थ समुद्राला दुभंगून त्यांच्यासाठी रस्ता बनविला गेला, त्यांच्यासाठी वाळवंटामध्ये बारा झरे सुरू केले गेले, वाळवंटामध्ये त्यांच्यासाठी 'मन-व सलवा' च्या द्वारे उपजीविकेचे साहित्य बनविले गेले वगैरे. या उघड खूणा पाहून देखील त्यांनी अल्लाहच्या देणगीची कदर केली नाही.

बनी इसराईलच्या इतिहासाचा हवाला येथे या संदर्भात आहे की, ज्या संधीसाधू लोकांच्या वागणूकीवर येथे टीका केली जात आहे ते लोक बनी इसराईल जमातीशी संबंधित होते.

३०५. येथे 'निअमत' (देणगी) ने इशारा अल्लाहची शिकवण व मार्गदर्शन आणि शरीअत यांच्यकडे आहे. आणि याला बदलणे याचा अर्थ त्याची कदर न करणे आणि त्याच्या बदल्यात मार्गभ्रष्टता अंगिकारणे असा आहे.

३०६. म्हणजे जेव्हा हे लोक त्या वास्तविक गोष्टीना मानावयास तयार झाले नाहीत ज्याना क़ुरआन उघड करीत आहे आणि त्यांनी भौतिक जगावरच आपले लक्ष केंद्रीत केले आहे. तेव्हा ते याच्या मोहकतेची शिकार झाले. आणि आता त्यांना या जगाचे इतके आकर्षण झाले आहे की आखिरतचा विचार करण्यासे देखील ते तयार नाहीत. इतकेच नव्हे तर, जे लोक अखिरतला आपले उद्दिष्ट बनवितात त्याना हे लोक संकुचित नजरेचे समजून त्यांचा उपहास करीत असतात.

३०७. 'अगणित' म्हणजे अपेक्षा व अंदाजापेक्षा इतके अधिक की माणूस त्याची कल्पना देखील करू शकत नाही. अभिप्रेत अखिरतच्या अमर्याद व असीम देणग्या आहेत.

३०८. येथे त्या अति महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर दिले गेले आहे, जो प्रश्न धर्मामधील मतभेद पाहून माणसाच्या मनात निर्माण होतो. म्हणजे जेव्हा मानव जातीची सुरवात झाली तेव्हा तिचा धर्म कोणता होता? आणि काय माणसाने आपल्या इतिहासाची सुरवातच गटबाजीने केली होती की ही गटबाजी नंतरची निर्मिती आहे? क़ुरआन या प्रश्नाचे हे उत्तर देत आहे की मानवजात सुरवातीस एकच समाज होता. म्हणजे एकाच विचारावर व ऐकाच मुद्यावर सर्वांचे एकमत व युती होती तो विचार म्हणजे एकेश्वरवाद ज्याचे नांव इस्लाम आहे.मानवजातीने एकेश्वरवादाच्या प्रकाशातच आपले डोळे उघडले होते. आणि मानवजातीचा काफिला इस्लामच्या राजमार्गावरच वाटचाल करीत होता. आणि म्हणून मानवी इतिहासाचे पहिले प्रकरण अत्यंत सुंदर असे प्रकरण आहे.

क़ुरआनच्या या निवेदनाचे समर्थन अलीकडील शोधावरुनही होते की अत्यंत पुरातन कालात देखील मानवजातीचा धर्म एकेश्वरवाद हाच होता. अनेकेश्वरवाद नव्हे.

मौलाना अब्दुल माजिद दर्याबादी यानी आपल्या क़ुरआन वरील भाष्यांत सर चार्लस मार्स्टन या प्रसिद्ध पुराणवस्तू संशोधक यांच्या ''पुराणवस्तू संशोधनाच्या पुराव्यावरून सुरवातीच्या जातींचा मूळधर्म एकेश्वरवाद किंवा त्याच्याशी अगदी जुळणारा असा धर्म होता. हे सिद्ध होते'' या मताचा उल्लेख केला आहे.

" The evidence of Anthropology, says a leading archaeologist of the day, sir Charles Marston, will be cited in those columns to prove that the original religion of the early races was actually Monotheism or something very like it" The Bible is true p. 25 (commentary on Holy Quran by Moulana Abdul Majid Daryabadi Vol. I. P. 33A).

३०९. या आयतीमध्ये जी वस्तु:स्थिती उघड करण्यात आली आहे ती ही आहे की, मानवजात सुरवातीस एकाच विचारावर एकत्रित होती. तो विचार म्हणजे अल्लाहचा दीन

(इस्लाम) सर्वश्रेष्ठ अल्लाहने पहिल्या मानवाला-जो साऱ्या मानवाचा बाप आहे व ज्याचे नांव आदम आहे-आपल्या शिकवणीने उपकृत केले होते. त्याचा वंश एका मुदतीपर्यंत या शिकवणीवर म्हणजे सत्यधर्मावर क़ायम राहिला व त्याचा एक समाज होता. नंतरच्या लोकांनी मूळ धर्मा बद्दल मतभेद करून नवीन नवीन मार्ग काढले. आणि मानव जातीचा काफिला जो सत्यमार्गावर वाटचाल करीत होता त्याने तो मार्ग सोडून दिला. व तो निनिराळ्या गटात विभागला गेला. प्रत्येक गटाने एका विशिष्ट धर्माचा स्वीकार केला या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी अल्लाह आपल्या पैगंबरांना मानवाच्या निरनिराळ्या गटांकडे पाठवित राहिला. त्या पैगंबरांनी लोकांना सत्यधर्माकडे येण्याचे आवाहन केले. अल्लाहच्या शिकवणीपासून दूर जाण्याने व अंदाधुंदी व गोंधळ पसरविण्याने होणाऱ्या वाईट परिणामाबद्दल लोकांना इशारा दिला. आणि जे लोक पैगंबरांच्या आवाहनाचा स्वीकार करून मूळ इस्लाम धर्मावर क़ायम राहतील त्यांना त्यांच्या कल्याणाची व भल्याची खुशखबर दिली. या पैगंबरांनी, जे निरनिराळ्या देशांमध्ये व समाजामध्ये आले, कोणत्याही नव्या धर्माची स्थापना केली नव्हती. त्यांनी इस्लामचा प्रचार व प्रसार केला. आणि या सत्यधर्माच्या आधारावरच लोकांना पुन्हा ऐकत्रित करण्याचे व त्यांचा समाज बनविण्याचे प्रयत्न केले. त्यांच्याबरोबर जे ग्रंथ उतरविले गेले होते ते एकाच ग्रंथाचे(-ईशग्रंथाचे-) भाग होते. त्यामध्ये निरनिराळ्या धर्मांची नव्हे तर एकाच धर्माची शिकवण होती. त्या ग्रंथांनी लोकांच्या सर्व धार्मिक मतभेदांचा निर्णय करून सत्याला नव्याने प्रकाशमान केले होते. परंतु ज्या समाजाकडे हे सत्य आले त्यांनी नंतर निव्वळ आपसातील वैमनस्य, दुषित पूर्वग्रह, अहंकार आणि परस्पर अवज्ञा व अत्याचार, या कारणांमुळे या सत्याच्या बाबतीत मतभेद केले. अशा प्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून वारंवार सत्याच्या स्पष्टीकरणानंतर देखील लोक त्याबाबतीत मतभेद करीतच राहिले. शेवटी सर्वश्रेष्ठ अल्लाहने क़ुरआन उतरवून लोकांच्यावर सत्य उघड केले आणि त्या सत्याला आपल्या मूळ स्वरूपात कियामतीपर्यंत सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था पण केली. यानंतर कसलेही कारण नाही की लोकांनी निरनिराळ्या धर्मांच्या जाळ्यात अडकून रहावे. आणि सत्यधर्माच्या बाबतीत मतभेद करावे. परंतु सत्याच्या स्वीकाराची इच्छा त्याच लोकांना होते जे कोणत्याही प्रकारच्या पूर्वग्रहाला बळी पडलेले नसतात आणि ज्यांच्यामध्ये सत्याच्या स्वीकाराची तत्परता असते.

# मिना हज्ज प्रसंगी



२१४. काय तुम्हीं अशी समजूत करून घेतली आहे की तुम्हांला जन्नतमध्ये प्रवेश मिळेल? यद्यपि तुमच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले त्यासारख्या परिस्थितीशी तुमचा अजून संबंध आलेला नाहीं. त्यांना संकटांचा व आपत्तीचा सामना करावा लागला. त्यांचा असा थरकाप उडाला की पैगंबर व त्यांचे ईमानधारक साथी अल्लाहचे सहाय्य कधी येते. असा धावा करूं लागले. खात्री बाळगा. अल्लाहची मदत समीप आहे.[३१०]

أَمْ حَسِبْتُمْ أَنْ تَدْخُلُوا الْجَنَّةَ وَلَمَّا يَأْتِكُمْ مَثَلُ الَّذِينَ
خَلَوْا مِنْ قَبْلِكُمْ ۖ مَسَّتْهُمُ الْبَأْسَاءُ وَالضَّرَّاءُ
وَزُلْزِلُوا حَتَّىٰ يَقُولَ الرَّسُولُ وَالَّذِينَ آمَنُوا
مَعَهُ مَتَىٰ نَصْرُ اللَّهِ ۗ أَلَا إِنَّ نَصْرَ اللَّهِ قَرِيبٌ ﴿٢١٤﴾

२१५. ते तुम्हांला विचारतात की काय खर्च करावा? सांगा जो काही खर्च तुम्ही कराल तो आईबाप, नातलग, अनाथ असहाय व वाटसरू लोकांच्यासाठी आहे. आणि जो परोपकार तुम्ही कराल तो अल्लाहला चांगल्या प्रकारे अवगत आहे.

يَسْأَلُونَكَ مَاذَا يُنْفِقُونَ ۖ قُلْ مَا أَنْفَقْتُمْ مِنْ خَيْرٍ
فَلِلْوَالِدَيْنِ وَالْأَقْرَبِينَ وَالْيَتَامَىٰ وَالْمَسَاكِينِ وَابْنِ
السَّبِيلِ ۗ وَمَا تَفْعَلُوا مِنْ خَيْرٍ فَإِنَّ اللَّهَ بِهِ عَلِيمٌ ﴿٢١٥﴾

२१६. तुम्हांला युध्दाचा हुकूम देण्यात आला आहे. आणि ती तुमच्यासाठी एक अप्रिय गोष्ट आहे. एखादी गोष्ट तुम्हांला अप्रिय असली तरी ती तुमच्यासाठी अधिक चांगली असूं शकेल यात आश्चर्य नाहीं. आणि हे ही आश्चर्यकारक नाहीं की एखादी गोष्ट तुम्हांला प्रिय असेल पण ती तुमच्यासाठी वाईट असेल.[३११] अल्लाह जाणतो, तुम्ही जाणत नाही. [३१२]

كُتِبَ عَلَيْكُمُ الْقِتَالُ وَهُوَ كُرْهٌ لَكُمْ ۖ وَعَسَىٰ أَنْ تَكْرَهُوا شَيْئًا
وَهُوَ خَيْرٌ لَكُمْ ۖ وَعَسَىٰ أَنْ تُحِبُّوا شَيْئًا وَهُوَ شَرٌّ لَكُمْ ۗ وَاللَّهُ
يَعْلَمُ وَأَنْتُمْ لَا تَعْلَمُونَ ﴿٢١٦﴾

२१७. ते तुम्हांला पवित्र महिन्यांमध्ये युध्द करण्यासंबंधी विचारतात. यामध्ये युद्ध करणे ही फार गंभीर गोष्ट आहे. परंतु अल्लाहच्या मार्गापासून रोखणे, त्याचा इन्कार करणे मस्जिदे हरामपासून रोखणे आणि तेथील रहिवाशांना तेथून काढून टाकणे या गोष्टी अल्लाहजवळ त्या पेक्षा हि अधिक मोठ्या गुन्ह्याच्या आहेत. आणि उपद्रव [३१३] (लोकांना इस्लाम पासून जबरदस्तीने रोखणे ) वधापेक्षा अधिक गंभीर आहे. आणि ते तुमच्याशी लढतच राहतील येथपावेतो की जर त्यांना शक्य झाले तर ते तुम्हांला तुमच्या दीन (इस्लाम) पासून परावृत करतील.[३१४] आणि तुमच्यापैकी जो कोणी दीनपासून परावृत होईल आणि इन्कार करीत असलेल्या अवस्थेत (काफिर म्हणून) मरण पावले तर अशा लोकांचे आचरण या जगात व आखिरतमध्यें निरर्थक ठरेल. ते दोज़खी (आगीचे रहिवासी) आहेत आणि नेहमी तेथेच राहतील.

يَسْأَلُونَكَ عَنِ الشَّهْرِ الْحَرَامِ قِتَالٍ فِيهِ ۖ قُلْ قِتَالٌ فِيهِ
كَبِيرٌ ۖ وَصَدٌّ عَنْ سَبِيلِ اللَّهِ وَكُفْرٌ بِهِ وَالْمَسْجِدِ الْحَرَامِ
وَإِخْرَاجُ أَهْلِهِ مِنْهُ أَكْبَرُ عِنْدَ اللَّهِ ۚ وَالْفِتْنَةُ أَكْبَرُ مِنَ
الْقَتْلِ ۗ وَلَا يَزَالُونَ يُقَاتِلُونَكُمْ حَتَّىٰ يَرُدُّوكُمْ عَنْ
دِينِكُمْ إِنِ اسْتَطَاعُوا ۚ وَمَنْ يَرْتَدِدْ مِنْكُمْ عَنْ دِينِهِ
فَيَمُتْ وَهُوَ كَافِرٌ فَأُولَٰئِكَ حَبِطَتْ أَعْمَالُهُمْ فِي
الدُّنْيَا وَالْآخِرَةِ ۖ وَأُولَٰئِكَ أَصْحَابُ النَّارِ ۖ هُمْ فِيهَا
خَالِدُونَ ﴿٢١٧﴾

३१०. यामध्ये त्या लोकांच्या समाधानाचे साहित्य आहे जे सत्याचा स्वीकार करतात आणि या मार्गात ज्यांना विरोध, अडचणी व संकटे सोसावी लागतात. त्यांच्यासमोर सत्य व असत्याच्या संघर्षाचा हा इतिहास सादर केला जात आहे की त्यांच्यापूर्वी ज्या लोकांनी या मार्गावर पाऊल ठेविले. अल्लाहच्या बंडखोर दासांबरोबर सक्त सामना करावा लागला. आणि आपले प्राण धोक्यात घालून सत्याचा ध्वज पुढें न्यावा लागला.पूर्वीच्या समाजांना सत्याच्या मार्गात कोणती संकटे सोसावी लागली याची कल्पना पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) त्या हदीसवरून होईल ज्यामध्ये त्यांनी फर्माविले.

قد كانَ مَنْ قبلكم يؤخَذُ الرجلُ فَيُحفرُلَهُ فى الارضِ فَيُجعلُ فِيها ثم يُؤتىٰ بالمنشارِ فيوضعُ علىٰ راسهٖ فَيُجعَلُ نِصْفَيْنِ وَ يُمْشط بِامْشَاطِ الحديدِ مَادُوْنَ لَحْمِهٖ وَعظمِهٖ مَايَصُدُّهٗ ذَالِكَ عَنْ دِيْنِهٖ۔ (البخاری)

“जे लोक तुमच्यापूर्वी होऊन गेले त्याना अशा घटनांना तोंड द्यावे लागले की माणसाला पकडून जमिनीमध्ये खड्डा खणला जात असे व त्याला त्यामध्ये उभे करण्यात येत असे. आणि त्याच्या डोक्यावर करवत ठेवून ती अशाप्रकारे चालविली जात असे की त्याचे दोन तुकडे होत असत. लोखांडाचे खिळे अशाप्रकारे माणसाच्या शरीरात ठोकले जात की ते मांसामधून पार जाऊन हाडांमध्ये रूतत असत. हा अत्याचार तो सहन करीत असे पण आपल्या ‘दीन (इस्लाम’) पासून मागे हटत नसे.”(बुखारी)

३११. हे एक मूलभूत सत्य आहे जे येथे निवेदन केले गेले आहे. माणसाचा व्यवहार विचित्रच आहे ज्या गोष्टी त्याच्या मनाला मोहवितात त्या बहुतकरून त्याला अधोगतीकडे नेणाऱ्या आहेत. ज्या गोष्टी त्याला उच्च करणाऱ्या आहेत त्या त्याला अप्रिय वाटतात. आणि म्हणून चांगल्या व वाईटाचा प्रश्न माणसावर सोडला गेला तर तो बहुतेक चुकीचे निर्णय घेईल. तो अशा कित्येक गोष्टींना चुकीच्या ठरवील ज्या त्याला अप्रिय आहेत. परंतु वस्तुत:त्या त्याचा नैतिक उत्कर्ष व मानवजातीचे श्रेष्ठत्व घडविणारी साधने आहेत. आणि तो अशा गोष्टींना पसंत करील ज्या त्याच्यासाठी सोप्या आहेत व मनाला मोहविणाऱ्या आहेत. परंतु वस्तुत:त्या त्याच्या नैतिक अधोगती व पराभवास कारणीभुत ठरतात. आणि म्हणून जीवनाच्या समस्याबाबत मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्यावर घेतली आहे.

लढाई आपल्या बाध्यांगाच्या दृष्टीने अत्यंत भयंकर गोष्ट आहे.परंतु काही वेळा उच्च उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी आणि मानवजातीस विनाशापासून वाचविण्यासाठी लढाई करणे अटळ होते.

या आयतीमध्ये ज्या लढाईला कर्तव्य ठरविण्यात आलेले आहे ती अल्लाहच्या मार्गात केली जाणारी लढाई आहे.जी परिस्थितीच्या दृष्टीने अनिवार्य असते.ज्याप्रमाणे खानअे-काबाला अनेकेश्वरवाद्यांच्या ताब्यांतून सोडविण्यासाठी, दीने इस्लामला प्रभावी करण्यासाठी आणि ईमान आणलेल्यांच्या संरक्षणार्थ लढाई करणे मदीनेच्या मुसलमानांना अनिवार्य झाले होते.

३१२. म्हणजे माणूस चुकीचे मत बनवू शकतो. व ठोकर खाऊ शकतो. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाला उघड व गुप्त अशा सर्व गोष्टींचे ज्ञान आहे. आणि म्हणून त्याचे मार्गदर्शन खरे मार्गदर्शन आहे आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या चुकीची शक्यता नाही.

३१३. याचे स्पष्टीकरण टीप न. २६३ मध्ये आले आहे.

३१४. यावरून संकटाच्या स्वरूपाचा अंदाज होऊ शकतो. ज्यामध्ये त्यावेळी ईमान आणलेले लोक सापडले होते. त्यांचा दीन (धर्म) व त्यांची श्रद्धा मोठ्या संकटात होती. आणि म्हणून त्या आधारावर युद्ध करण्याची परवानगी देण्यात आली होती.

**२१८. अलबत: ज्या लोकांनी ईमान आणले व ज्यांनी हिजरत [३१५] (आपले घरदार सोडले) केली आणि अल्लाहच्या मार्गात जिहाद केला ते अल्लाहच्या कृपेचे उमेदवार आहेत आणि अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.**

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَالَّذِينَ هَاجَرُوا وَجَاهَدُوا فِي سَبِيلِ
اللَّهِ أُولَٰئِكَ يَرْجُونَ رَحْمَتَ اللَّهِ ۚ وَاللَّهُ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٢١٨﴾

**२१९. ते तुम्हांला दारू[३१६] व जुगाराबद्दल [३१७] विचारीत आहेत. सांगा या मोठ्या गुन्ह्याच्या गोष्टी आहेत. आणि लोकांच्यासाठी काही फायदा पण आहे परंतु त्यांचा गुन्हा त्यांच्या फायद्यापेक्षा अधिक मोठा आहे.[३१८] आणि ते विचारतात काय खर्च करावा? सांगा आवश्यकतेपेक्षा जे अधिक आहे.[३१९] अशाप्रकारे अल्लाह आपल्या आज्ञा स्पष्ट करतो, कारण की तुम्ही विचार करावा.**

يَسْأَلُونَكَ عَنِ الْخَمْرِ وَالْمَيْسِرِ ۖ قُلْ فِيهِمَا إِثْمٌ كَبِيرٌ
وَمَنَافِعُ لِلنَّاسِ وَإِثْمُهُمَا أَكْبَرُ مِنْ نَفْعِهِمَا ۗ
وَيَسْأَلُونَكَ مَاذَا يُنْفِقُونَ قُلِ الْعَفْوَ ۗ كَذَٰلِكَ
يُبَيِّنُ اللَّهُ لَكُمُ الْآيَاتِ لَعَلَّكُمْ تَتَفَكَّرُونَ ﴿٢١٩﴾

**२२०. हे जग व आखिरत-दोन्हीच्या व्यवहारात. [३२०] आणि ते तुम्हांला अनाथांच्या (यतीम) बाबतीत विचारतात. सांगा, ज्यामध्ये त्यांचे चांगले होईल तेच अधिक योग्य आहे. आणि जर तुम्ही त्यांना आपल्याबरोबर ठेवाल तर ते तुमचे बंधूच आहेत. अल्लाह जाणतो की कोण बिघाड इच्छितो व कोण भलाई इच्छितो.[३२१] जर अल्लाहने इच्छिले असते तर त्याने तुम्हांला अडचणीत टाकले असते. नि:संशय तो सामर्थ्यवान व बुद्धिमान आहे.[३२२]**

فِي الدُّنْيَا وَالْآخِرَةِ ۗ وَيَسْأَلُونَكَ عَنِ الْيَتَامَىٰ ۖ قُلْ إِصْلَاحٌ
لَهُمْ خَيْرٌ ۖ وَإِنْ تُخَالِطُوهُمْ فَإِخْوَانُكُمْ ۚ وَاللَّهُ يَعْلَمُ الْمُفْسِدَ
مِنَ الْمُصْلِحِ ۚ وَلَوْ شَاءَ اللَّهُ لَأَعْنَتَكُمْ ۚ إِنَّ اللَّهَ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٢٢٠﴾

**२२१. आणि 'मुश्रिक'(अनेकेश्वरवादी) स्त्रियांबरोबर विवाह करूं नका,[३२३] जोपर्यंत त्या ईमान आणीत नाहीत. एक ईमानधारक लौंडी (दासी) एका 'मुश्रिक' स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, जरी ती तुम्हांला चांगली वाटत असेल. आणि 'मुश्रिक' पुरुषांबरोबर आपल्या स्त्रियांचा विवाह करूं नका.[३२४] जोपर्यंत ते ईमान आणीत नाहीत. एक ईमानधारक गुलाम (दास) एका 'मुश्रिका' पेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. जरी तो तुम्हांला चांगला वाटत असेल. हे लोक आगीकडे बोलावितात आणि अल्लाह आपल्या आज्ञेने जन्नत व क्षमेकडे बोलावीत आहे. आणि आपले आदेश लोकांचे साठी स्पष्ट करून निवेदन करीत आहे, कारण त्यापासून त्यांनी बोध घ्यावा.**

وَلَا تَنْكِحُوا الْمُشْرِكَاتِ حَتَّىٰ يُؤْمِنَّ ۚ وَلَأَمَةٌ مُؤْمِنَةٌ خَيْرٌ مِنْ
مُشْرِكَةٍ وَلَوْ أَعْجَبَتْكُمْ ۗ وَلَا تُنْكِحُوا الْمُشْرِكِينَ حَتَّىٰ يُؤْمِنُوا ۚ
وَلَعَبْدٌ مُؤْمِنٌ خَيْرٌ مِنْ مُشْرِكٍ وَلَوْ أَعْجَبَكُمْ ۗ أُولَٰئِكَ
يَدْعُونَ إِلَى النَّارِ ۖ وَاللَّهُ يَدْعُو إِلَى الْجَنَّةِ وَالْمَغْفِرَةِ
بِإِذْنِهِ ۖ وَيُبَيِّنُ آيَاتِهِ لِلنَّاسِ لَعَلَّهُمْ يَتَذَكَّرُونَ ﴿٢٢١﴾

३१५. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यानी मदीनेला प्रयाण केल्यानंतर त्यांच्या मदतीसाठी आणि दीन व ईमान यांच्या संरक्षणासाठी मक्केहून प्रयाण करण्याची आज्ञा दिली गेली होती. या आयतीमध्ये त्या गोष्टीकडे इशारा आहे.

३१६. दारू हे एक मादक पेय आहे, ज्याने नशा निर्माण होते. त्याचे वाईट परिणाम बुद्धि व शरीर दोन्हीवर होतात. आणि दारू माणसाच्या आध्यात्मिक व नैतिक जीवनासाठी धोकादायक आहे. इतकेच नव्हे तर कुटुंब समाज व राष्ट्र या सर्वांसाठी ती भयंकर हनिकारक आहे.

दारूमुळे तात्पुरता काही फायदाही पोहंचतो. उदा.ती उत्तेजक असल्यामुळे माणसाला आपल्या कार्यशक्तीमध्ये वाढ झाली असे वाटू लागते. आणि एखादे काम तडीस नेणे त्याला सोपे होते. परंतु ती नैतिक दृष्टीने अत्यंत नुकसानकारक आहे, इतकेच नव्हे तर वैद्यकीयदृष्ट्या सुद्धा ती आरोग्यास घातक आहे. आम्ही खाली इन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन एन्ड एथिकसमधून काही उतारे देत आहोत. त्यावरून दारूचे दुष्परिणाम चांगल्या प्रकारे स्पष्ट होतील.व अंदाज होईल की इस्लामने दारूला हराम ठरवून माणसाला कोणकोणत्या वाईटापासून वाचविण्याचा प्रयत्न केला आहे.

" EXTRACTS FROM ENCYCLOPEDIA OF RELIGION AND ETHICS VOL.I ALCOHOL

When enough alcohol is taken to produce intoxication, judgment, self control, perception and the other higher faculties are affected first with greater facility in thought and speech, there is a certain disregard of the environment, a quiet person may become lively and witty unwanted confidence are given and there may be assertiveness and quarrelsomeness. Singing, shouting and other noisy demonstration indicated the free play of the emotions.... Such persons may suffer from an insane or alcoholic heredity.... An automatic dream state in which complicated, it may be criminal, actions are performed quite unconsciously, is some times induced by acute alcoholism. (p. 300)

Self respect become impaired and by selfishness, neglect of wife, children and other dependents loosening of self control and want of truthfulness, the moral deterioration is signalized. (p.300)

- It is estimated that in this country (U. K.) alcohol account for 100,000 to 120,000 deaths per annum (p. 301)

- Alcohol is a poison for protoplasm.

- Large number of psychometric experiments under conditions of the greatest accuracy prove that alcohol in small dietetic doses exercises a distinctly paralyzing effect on the working of the brain. (p. 299).

- The amount of work is increased and more easily performed but after a brief period extending almost to 20 or 30 minutes there comes a prolonged reaction, so that the total effect is distinctly disadvantageous. p. 299)

- On the whole experiment show that alcohol does not strengthen the heart but rather the reverse. (p. 300)

- There is universal testimony as to the close relationship between excessive drinking and breaches of the moral law and the laws of the state. This is a direct consequence of the higher faculties, intellectual and moral, and the resulting free play given to the lower inclinations. Alcohol cannot only be a direct cause of crime, but it acts powerfully along with other conditions such as hereditary nervous weakness or instability of the brain (p. 301)

३१७. जुगार नैतिक व आर्थिक उपायांच्या आधारावर हराम ठरविण्यात आलेला आहे. त्यापासून होणारे अपाय थोडक्यात खालीलप्रमाणे:-

(१) जुगार माणसाला भाग्य व योगायोग आणि खोट्या आशेवर भरंवसा करण्यास शिकवितो. प्रत्यक्ष प्रयत्न आणि

त्या साधनांवर भरवसा करण्यास तो शिकवित नाही ज्यांना अल्लाहने निर्माण केले आहे व ज्यांचा अंगिकार करण्याची अल्लाहने अज्ञा केली आहे. माणसाने परिणामांना साधनांच्या द्वारे प्राप्त करावे अशी इस्लामची इच्छा आहे.

(२) जुगार म्हणजे लोकांच्या धनाचा अयोग्य मार्गाने अपहार आहे.

(३) यामुळे जुगार खेळणाऱ्यांच्या दरम्यान द्वेष व शत्रुत्व निर्माण होते. हरलेली व्यक्ती जरी वरवर शांतता धारण करीत असली तरी त्या शांततेच्या पोटात क्रोध व राग उसळत असतो.

(४) जुगाराचा नाद व्यक्तीसाठीच नव्हे तर समाजासाठी ही भयंकर धोकादायक आहे. जुगारी माणूस आपल्या स्वत:च्या व आपल्या कुटुंबियांच्या जबाबदारी बद्दल बेपर्वा बनतो. अशा लोकांच्या बाबतीत ही गोष्ट अशक्य नाही कि ते आपला धर्म आपली अब्रू व देशालासुद्धा आपल्या स्वार्थासाठी विकतील.

(५) क़ुरआनने दारू व जुगार यांच्याबाबतीत एकच आज्ञा करून आपल्या सत्यनिष्ठेचा पुरावा दिला आहे की या दोन्ही गोष्टी व्यक्ति, कुटुंब देश व नीति या सर्वांसाठी सारख्याच अपायकारक आहेत. जुगारीचा व्यवहार बहुतेक करून दारूबाजासारखाच असतो. आणि एकाचे अस्तित्व दुसऱ्याशिवाय क्वचितच आढळून येते.(अल्लामा युसूफ करजावी यांच्या 'इस्लाममध्ये हलाल व हराम' या ग्रंथामधील पान ३८४ वरील उताऱ्याचा खुलासा.)

जुगाराच्या अपायासंबंधी इन्सायक्लोपीडिया ऑफ रेलिजन ॲण्ड एथिक्समधील काही उतारे-

## EXTRACTS FROM THE ENCYCLOPAEDIA OF RELIGION AND ETHICS VOL.6 GAMBLING

"On the Aryan races gambling has a special hold, A famous hymn of the Rigveda (x 34) vividly sets forth the woe of the ruined gambler, and the length to which gambling was carried in India is well illustrated by the episode of Nala and Dam-yanti in the Mahabharata (iii 59-61) where the Prince loses all that he has.... Sanskrit Literature abounds in allusions to the evil of play" (P. 164).

"The vicious tendency of gambling has never been called in question. Lord Beaconsfield spoke of it as a vast engine of national demoralisation" (P. 166).

"The economic aspect needs no discussion. Gambling adds nothing to the wealth to the community". (P. 166).

"Though it is in society that the temptation comes, gambling itself is anti-social. It is as Herbert Spencer says, a kind of action by which pleasure is obtained at the cost of the pain to another. The happiness of the winner implies the misery of the loser. This kind of action, therefore is essentially anti-social, it scars the sympathies cultivates a hard egoism, and so produces a general deterioration of character, it is a habit intrinsically savage ......... in an atmosphere of brotherhood no form of gambling could exist" (P. 166).

"There are only three ways in which property can be legitimately acquired ---- by gift, by labour and exchange. Gambling stands outside all of these.

"Its motive is, however carefully disguised, covetousness. It is an attempt to get property without paying the price for it. It is a violation of the law of equivalents. It is a kind of robbery by mutual agreement; but it is still robbery, just as duelling which is murder by mutual agreement is still treated as murder. It is begotten of covetousness, it leads to idleness – it is moreover an appeal to chance – it concentrates attention upon luck, and thereby withdraws attention from worthier objects of life."

३१८ अज्ञान कालात लोक दारू पिऊन जुगार खेळत असत. आणि प्रथा ही होती की अशा प्रसंगी ऊंट मारीत असत. आणि जो जिंकत असे तो त्याचे मांस गोरगरीबांना वाटत असे. या आधारावर दारू व जुगाराला उदारतेची प्रेरणा देणाऱ्या गोष्टी समजल्या जात असत. लोकसेवेच्या या अंगाच्या पार्श्वभूमीवर लोकांच्या मनात हा प्रश्न निर्माण झाला की, क़ुरआन जर

औदार्यावर (खर्च करण्यावर) जोर देत आहे तर मग दारू व जुगाराच्या या कायद्याच्या बाबतीत त्याची आज्ञा काय आहे? क़ुरआनने याचे उत्तर हे दिले की, दारू व जुगारामध्ये फायद्याच्या काही गोष्टी अवश्य आहेत. परंतु त्यांचे नैतिक नुकसान त्यांच्या फायद्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे.आणि म्हणून शरीअतीने या दोन्ही गोष्टींनां हराम ठरविले आहे.

यावरून ही मूलभूत वस्तुस्थिती स्पष्ट होते की ज्या गोष्टींना शरीअतीने हराम ठरविले आहे त्यांची निषिद्धता या आधारावर नाही की त्यांच्यामध्ये कसलाही भौतिक फायदा किंवा लोकसेवेचा काही ही भाग नाही.परंतु या गोष्टी या आधारावर हराम ठरविण्यात आलेल्या आहेत की त्यापासून होणारे नैतिक नुकसान त्यांच्या त्या फायद्यापेक्षा अधिक आहे. आणि म्हणून ज्या गोष्टी सकृतदर्शनी लोकांच्यासाठी फायद्याच्या भासतात, परंतु ज्या नैतिक दृष्टीने अधिक अपायकारक असतात, अशा गोष्टीपासून दूर राहिलेच पाहिजे. या मूलभूत वस्तु:स्थितीचे आकलन न झाल्याने लोक चांगल्या उद्दिष्टासाठी अवैध (नाजायज़) मार्गांचा अवलंब करण्यामध्ये कसलाही दोष जाणत नाहीत. उदाहरणार्थ शैक्षणिक मदतीसाठी नाचगाण्याच्या बैठकी भरविणे किंवा आपद्ग्रस्तांच्या मतदतीसाठी सिने तारकांचे प्रदर्शन वा सिनेमाचे कार्यक्रम करणे हे फायदेशीर व लोकसेवेचे कार्य समजले जाते. त्यांच्या मध्ये तर गुन्ह्यांच्या वाढीची आणि नीतिमत्तेला बिघडविण्याची पुरेपूर सामुग्री असते. आणि हे नुकसान त्यांच्या फायद्यापेक्षा कितीतरी अधिक असते. आणि म्हणून इस्लाम चांगल्या उद्दिष्टासाठी सुद्धा वाईट मार्गाचा अवलंब करण्याची परवानगी देत नाही.

३१९. हा खर्च करण्याचा संबंध जिहादशी आहे. काही वेळा असे प्रसंग येतात की दीन व मिल्लत (धर्म व संप्रदाय) च्या संरक्षणासाठी माणसाला आपल्या सर्वस्वाचा त्याग करावा लागतो त्यावेळी खानअे काबाला अनेकेश्वरवाद्यांच्या ताब्यातून मुक्त करणे अत्यंत कठीण झाले होते. या पवित्रतम जिहादमध्ये असाधारण त्यागाची आवश्यकता होती. म्हणून आज्ञा दिली गेली की आपल्या अनिवार्य आवश्यकतेवर खर्च केल्यानंतर जे काही शिल्लक राहील ते सर्व अल्लाहच्या मार्गात क़ुरबान करा (द्या.)

३२०. म्हणजे हे जग व आखिरत या दोन्हींच्या फायद्यांचा व कल्याणाचा विचार करा. आणि समतोल वृत्तीचे बना. सामान्यपणे लोक या टोकावर असतात अगर त्या टोकावर दारू व जुगारालाही वैध (उचित) ठरवित किंवा वैध गोष्टीनाही निषिद्ध ठरवून दीनला वैराग्याचे स्वरूप देत. क़ुरआन माणसाच्या विचारांचे प्रशिक्षण अशाप्रकारे करते की त्यामध्ये समतोल निर्माण व्हावा. आणि माणसाने हे जग व आखिरत या दोन्हीच्या कल्याणाला चांगल्या प्रकारे समजावे.

३२१. अनाथांच्या मालमत्तेच्या रक्षणाच्या संबंधात क़ुरआनने जे आदेश दिले आहेत ते फार कडक आहेत. या पार्श्वभूमिवर लोक या मर्यादिपर्यंत सावधगिरी बाळगू लागले की ज्या घरात एखादे अनाथ मूल असे त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था अगदी स्वतंत्र केली जात असे. इतकेच नव्हे तर अनाथाच्या अन्नामधून काही शिल्लक राहिले तर ते खात नसत. भीती ही असे की हे कृत्य अनाथाच्या मालमत्तेच्या अपहारा मध्ये मोडेल. या सावधगिरीच्या अतिरेकामुळे लोक बेचैन झाले होते. आणि हा प्रश्न निर्माण झाला होता की जर अनाथांच्या धनाचा आपल्या धनामध्ये समावेश करून खाण्यापिण्याची एकत्रित व्यवस्था केली गेली तर काय ते वैध आहे? या प्रश्नाचे उत्तर या आयतीमध्ये दिले गेले आहे की जी पद्धत अनाथांच्या चांगल्यासाठी अवलंबिणे योग्य आहे तिच पद्धत अवलंबिली जावी. जर त्यांना आपल्याबरोबर सामील करून घेणे त्यांच्या दृष्टीने फायदेशीर आहे तर तशी पद्धत अंगिकारीली जावी. याबरोबरच ही ताकीद पण दिली गेली आहे की, अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो की कोण या परवानगीचा गैरफायदा घेऊन अनाथांच्या धनाचे अपहरण करू इच्छितात आणि कोण खरोखर त्याचे संरक्षण करू इच्छितात. आणि म्हणून अल्लाहचे भय बाळगा.

३२२. म्हणून त्याचा हा आदेशही बुद्धिमतेवर व तुमच्या फायद्यावर आधारित आहे.

३२३. अनाथांच्या हक्काच्या रक्षणाची एक पद्धत ही पण आहे की त्यांच्या मातांशी विवाह केला जावा. क़ुरआनने या पद्धतीला महत्वाची ठरवून तिची परवानगी दिली. परंतु ही अट घालण्यात आली की त्या मुसलमान असाव्यात. अनेकेश्वरवादी स्त्रियांशी विवाह करण्याची इस्लाम मध्ये परवानगी नाही. कारण वैवाहिक संबंधाचे परिणाम दूरगामी असतात. पत्नीच्या अनेकेश्वरवादी श्रद्धा व आचरण यांचा परिणाम पती, संतती आणि साऱ्या कुटुंबावर होतो. पत्नी घरात मूर्ति ठेविल तर मुलांचे मुर्तिपूजेपासून दूर राहणे कठीण आहे. कारण मुले आईला मूर्तिपूजा करीत असताना पाहतील तर स्वत:ही पूजा करू लागतील.

याचप्रकारे एका मुसलमान स्त्रीचा अनेकेश्वरवादी पुरुषाबरोबरचा विवाह त्या स्त्रीच्या दृष्टीने भयंकर आपत्तीजनक आहे. क़ुरआनने अशा विवाहला हराम ठरविण्याचे कारण ही स्पष्ट केले आहे की हे लोक आगीकडे बोलवितात. आणि म्हणून ईमान आणलेल्यांनी अशा संबंधापासून दूर राहिले पाहिजे.

या आज्ञेमध्ये मूर्तिपूजक अनेकेश्वरवादी, नास्तिक व पाखंडी या सर्वांचा समावेश आहे. ग्रंथधारक (अहले किताब) स्त्रीयांच्या बरोबर विवाह करण्याची परवानगी यापासून मुक्त आहे. याबद्दलचे निवेदन पुढे सूरे मायदाच्या ५व्या आयतीमध्ये आलेले आहे.

क़ुरआनच्या या मूलभूत आज्ञेनंतर आंतरधार्मिक (Inter Religious ) विवाहना मुसलमानामध्ये रिवाज देण्यास मुळीच स्थान नाही. आणि राजकीय उद्देशासाठी हरामला हलाल ठरविले जाऊ शकत नाही.

३२४. तौरात मध्येही अनेकेश्वरवादी लोकांशी विवाह न करण्याची आज्ञा आहे. यावरून स्पष्ट होते की ही गोष्ट हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्या शरीअतीमध्ये हराम होती.

''त्यांच्याशी सोयरीक करू नको; आपली मुलगी त्यांच्या मुलाला देऊ नकोच व त्याची मुलगी आपल्या मुलाला करू नको; कारण ते लोक तुझ्या मुलाला माझ्यापासून बहकवितील आणि अन्य देवांची सेवा करावयाला लावितील; त्यामुळे तुमच्यावर परमेशवराचा कोप भडकेल व तो तात्काळ तुमचा नाश करील.''

(पवित्र शास्त्र. अनुवाद ७-३,४.)

**अल्लाहला आपल्या अशा शपथांचे निशाण बनवू नका की तुम्ही सदाचार करणार नाही. ईश्वराचे भय बाळगणार नाही व लोकांच्या सुधारणेचे, काम करणार नाही. अल्लाह सर्व काही ऐकणारा व सर्व काही जाणणारा आहे.** *(अल-क़ुरआन)*

وَيَسْـَٔلُونَكَ عَنِ الْمَحِيضِ ۖ قُلْ هُوَ أَذًى فَاعْتَزِلُوا النِّسَاءَ فِي
الْمَحِيضِ ۖ وَلَا تَقْرَبُوهُنَّ حَتَّىٰ يَطْهُرْنَ ۖ فَإِذَا تَطَهَّرْنَ فَأْتُوهُنَّ
مِنْ حَيْثُ أَمَرَكُمُ اللَّهُ ۚ إِنَّ اللَّهَ يُحِبُّ التَّوَّابِينَ وَيُحِبُّ
الْمُتَطَهِّرِينَ ﴿٢٢٢﴾

२२२. ते तुम्हाला विटाळाबद्दल विचारतात. सांगा तो अस्वच्छ आहे. आणि म्हणून विटाळाच्या काळात स्त्रियांपासून दूर रहा.[३२५] आणि त्यांच्याशी जवळीक करु नका जोपर्यंत त्या स्वच्छ होत नाहीत. मग जेव्हा त्या चांगल्या प्रकारे स्वच्छ होतील तेव्हा त्यांच्याजवळ जावा.[३२६] अशा प्रकारे जशी अल्लाहने तुम्हाला आज्ञा दिली आहे .[३२७] अल्लाह तौबा (पश्चाताप) करणाऱ्यांना पसंत करतो आणि अशा लोकांना पसंत करतो जे फार स्वच्छ शुद्धता अंगिकारतात.

نِسَاؤُكُمْ حَرْثٌ لَكُمْ فَأْتُوا حَرْثَكُمْ أَنَّىٰ شِئْتُمْ ۖ وَقَدِّمُوا
لِأَنْفُسِكُمْ ۚ وَاتَّقُوا اللَّهَ وَاعْلَمُوا أَنَّكُمْ مُلَاقُوهُ ۗ وَبَشِّرِ
الْمُؤْمِنِينَ ﴿٢٢٣﴾

२२३. तुमच्या स्त्रियां तुमच्यासाठी शेतीसमान आहेत. तेव्हा आपल्या शेतामध्ये आपल्या इच्छेप्रमाणे या.[३२८]आणि आपल्या भवितव्याची तरतूद करा.[३२९] याबरोबरच अल्लाहचे भय बाळगून असा.चांगल्या प्रकारे लक्षात ठेवा की एकेदिवशी तुम्हांला त्याला भेटावयाचे आहे.आणि (हे पैगंबरा !) ईमान आणलेल्याना शुभसंदेश द्या.

وَلَا تَجْعَلُوا اللَّهَ عُرْضَةً لِأَيْمَانِكُمْ أَنْ تَبَرُّوا وَتَتَّقُوا
وَتُصْلِحُوا بَيْنَ النَّاسِ ۗ وَاللَّهُ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿٢٢٤﴾

२२४. अल्लाहला आपल्या अशा शपथांचे निशाण बनवू नका की तुम्ही सदाचार करणार नाही. ईश्वराचे भय बाळगणार नाही व लोकांच्या सुधारणेचे, काम करणार नाही. [३३०] अल्लाह सर्व काही ऐकणारा व सर्व काही जाणणारा [३३१] आहे.

لَا يُؤَاخِذُكُمُ اللَّهُ بِاللَّغْوِ فِي أَيْمَانِكُمْ وَلَٰكِنْ يُؤَاخِذُكُمْ
بِمَا كَسَبَتْ قُلُوبُكُمْ ۗ وَاللَّهُ غَفُورٌ حَلِيمٌ ﴿٢٢٥﴾

२२५. अल्लाह तुमच्या निरर्थक शपथाबद्दल तुम्हाला जाब विचारणार नाही. परंतु त्या शपथाबद्दल तो तुम्हाला अवश्य जाब विचारील ज्या शपथा तुम्ही समजून उमजून घेतल्या आहेत.[३३२] आणि अल्लाह मोठा क्षमा करणारा व मोठा सहनशील आहे.

لِلَّذِينَ يُؤْلُونَ مِنْ نِسَائِهِمْ تَرَبُّصُ أَرْبَعَةِ أَشْهُرٍ ۖ فَإِنْ
فَاءُوا فَإِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٢٢٦﴾

२२६. ज्या लोकांनी आपल्या पत्नीशी संबंध न ठेवण्याची शपथ घेतली आहे त्यांच्यासाठी चार महिन्याची अवधि आहे. [३३३] जर त्यांनी परत स्वीकार केला तर अल्लाह क्षमा करणारा व दया करणारा आहे.

३२५. मासिक पाळीच्या मुदतीत स्त्रीयांपासून दूर राहण्याची जी आज्ञा दिली गेली आहे तिचा अर्थ स्त्रीयांना अस्पृश्य समजून वेगळे ठेवणे हा नाही. तर याचा अर्थ हा आहे की फक्त त्यांच्याशी संभोगापासून दूर राहवे. ही गोष्ट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हदीसवरून स्पष्ट होते.

ग्रंथधारकांच्या जवळ विटाळशी स्त्रीयांना स्पर्श करणेही माणसाला अशुद्ध, अस्वच्छ बनवित असे. (पवित्र शास्त्र, लेवीय १५- १९, २०)

इस्लामने या निष्ठूर आदेशांना रद्द करून फक्त संभोगाच्या मर्यादेपर्यंत दूर राहण्याची आज्ञा दिली; जी योग्यही आहे व वैद्यकीय दृष्ट्या आवश्यक ही आहे.

३२६. जेव्हा विटाळ संपतो तेव्हा संभोगाची मनाई राहत नाही. परंतु स्त्री स्नान करून चांगल्याप्रकारे स्वच्छ झाल्यानंतर तिच्याशी जवळीक करणे अधिक चांगले.

३२७. येथे अज्ञा म्हणजे स्वभाविक आज्ञा, जी माणसाच्या स्वभावातच अंतर्भूत करण्यात आलेली आहे. यावरून ही मूलभूत वस्तु:स्थिती स्पष्ट होते की स्वाभाविक आदेश (अल्लाहच्या आदेशामध्ये शद्बांनी त्यांची आज्ञा दिली गेली असो वा नसो) म्हणजे ईश्वरी आदेश. उदाहरणार्थ पायांनी चालणे ही स्वाभाविक अज्ञा आहे. परंतु एखादी व्यक्ति जर हातांनी अगर डोळ्याने चालू इच्छिल तर हे स्वभाविक आदेश विरूद्ध आहे. त्याच प्रमाणे संभोगाची पद्धत प्रत्येक व्यक्ति स्वभावत:च जाणते. परंतु जर एखादी व्यक्ति समागमाची अस्वाभाविक पद्धत अवलंबिल तर ती व्यक्ति फक्त अल्लाहच्या आदेशाविरूद्ध वर्तन करते. इतकेच नव्हे तर स्वत:ला पशूपेक्षाही अधिक वाईट सिद्ध करते. कारण पशुदेखील निसर्गाविरूद्ध पद्धत अवलंबित नाहीत.

३२८. स्त्रीला शेतीची उपमा या आधारावर दिली गेली आहे की माणूस आपल्या शेतामध्ये ज्याप्रकारे इच्छिल त्याप्रकारे जाण्यास स्वतंत्र असतो. परंतु शेतामध्ये त्याचे जाणे बी पेरण्यासाठी वा पिक प्राप्त करण्यासाठी असते. पत्नीचा प्रश्नही असाच आहे. शरीअत ने त्याला या बाबतीत स्वातंत्र्य दिले आहे संभोगाची पद्धत तो योग्य समजेल ती त्याने अंगिकारावी. परंतु उद्देश संतती प्राप्त करणे हा असावा शरीअत ने संभोगाच्या पद्धतीसंबंधी फक्त या गोष्टीची मनाई केली आहे की निसर्गाविरूद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात येऊ नये. ज्याचा खुलासा वरील टीपेमध्ये आलेला आहे.

३२९. म्हणजे ज्याप्रमाणे माणूस शेतीद्वारे आपल्या अर्थिक भवितव्याची व्यवस्था करतो त्याचप्रमाणे आपल्या स्त्रीयांबरोबर संभोगाच्या द्वारे मानवजातीच्या भवितव्याची तरतूद करा. आणि आपल्या संततीचे योग्य प्रशिक्षण करून आपल्या आखिरतच्या भांडवलामध्ये वाढ करा.

यावरून ही गोष्ट चांगल्या प्रकारे स्पष्ट होते की क़ुरआनचा उद्देश मानवजातीची वृद्धि हा आहे. आणि म्हणून यांवर कसलाही प्रतिबंध लावणे क़ुरआनच्या उद्देश विरूद्ध होईल.

३३०. म्हणजे अल्लाहच्या पवित्र नावाचा चुकीच्या कामासाठी वापर करूं नका सदाचार संयम आणि मानवजातीच्या सुधारणेच्या कार्याविरूद्ध शपथा खाणे इस्लाममध्ये वैध नाही. आणि जर एखादी व्यक्ति अशी शपथ घेईल तर तिला ती मोडली पाहिजे. आणि तिचा 'कफ़्फ़ारा' (प्रायश्चित-भरपाई) दिला पाहिजे.

पुढे ''ईला'' (पत्नी बरोबर संबंध न ठेवण्याची शपथ घेण्या) संबंधीच्या आज्ञेचे निवेदन होत आहे. म्हणून त्यापूर्वी अल्लाहचे नांव घेऊन शपथ घेण्याचे महत्व स्पष्ट केले गेले आहे.आणि चुकीच्या कामासाठी त्याच्या नावाचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

३३१. इशारा त्याकडे आहे की जर तुम्ही अल्लाहच्या थोर नांवाचा चुकीच्या कामासाठी वापर केला तर हे विसरू नका की अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.

३३२. म्हणजे ज्या शपथ विचार केल्याशिवाय केवळ सवयीने घेतल्या गेल्या असतील त्यांच्या बाबतीत जाब विचारला जाणार नाही परंतु ज्या शपथा गंभीरपणे घेतल्या जातात, त्यामध्ये जर अल्लाहच्या नावाला चुकीच्या मार्गाने वापरले गेले असेल तर अशा शपथाबद्दल अवश्य जाब विचारला जाईल.

३३३. या आयतीमध्ये ''ईला''ची आज्ञा दिली गेली आहे. ''ईला'' ही शरीअतीची परिभाषा आहे. तिचा अर्थ वैवाहिक संबंध न ठेवण्याची शपथ घेणे असा आहे. ही पद्धत अज्ञान कालात रूढ होती. त्यामुळे पत्नी निराधार होऊन राहत असे. इस्लामने यामध्ये सुधारणा केली ''ईला'' करणाऱ्यासाठी चार महिन्याची मुदत ठरविली. या मुदतीमध्ये एकतर त्याने संबंध पूर्ववत करावेत. नाही पेक्षा तलाक द्यावा. जर या चार महिन्याच्या मुदतीत पतीने संबंध पूर्ववत केले नाहीत तर मुदत समाप्त झाल्या बरोबर एक तलाक आपोआप होईल आणि ती तलाक (बाइन) न बदलता येणारी, (Irrevocable) असेल. म्हणजे इद्दतच्या मुदतीत पुनर्मिलनाचा (रूजूअ करण्याचा) अधिकार राहणार नाही. तरीपण पतीपत्नी दोघांची इच्छा असेल तर ते पुन्हा विवाह करू शकतात

२२७. आणि जर ते ‘तलाक’चा निर्णय घेतील तर (त्यांनी चांगल्या प्रकारे जाणावे की) अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.[३३४]

وَإِنْ عَزَمُوا الطَّلَاقَ فَإِنَّ اللَّهَ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿٢٢٧﴾

२२८. ‘‘तलाक’’ देण्यात आलेल्या स्त्रीयांनी तीन मासिक पाळ्या होईपर्यंत स्वत:ला (दुसरा विवाह करण्यापासून) रोखावे. [३३५] त्या जर अल्लाहवर आणि शेवटच्या दिवसावर ईमान ठेवित असतील तर त्यांच्यासाठी हे उचित नाही की अल्लाहने त्यांच्या गर्भाशयात जे काही निर्माण केले असेल त्याला त्यांनी लपवावे. आणि या मुदतीत त्यांचे पति-जर ते संबंध चांगले ठेवू इच्छित असतील तर –त्यांना परत घेण्याचे अधिक हक्कदार आहेत. आणि चांगल्या पद्धतीनुसार, स्त्रीयांनाही तशाच प्रकारचे हक्क [३३६] आहेत जशा प्रकारचे हक्क त्यांच्यावर (पुरुषांचे) आहेत.परंतु पुरषांना त्यांच्यावर एक दर्जा [३३७] प्राप्त आहे .आणि अल्लाह सामार्थ्यवान व बुद्धीवान आहे. [३३८]

وَالْمُطَلَّقَاتُ يَتَرَبَّصْنَ بِأَنْفُسِهِنَّ ثَلَاثَةَ قُرُوءٍ ۚ وَلَا يَحِلُّ
لَهُنَّ أَنْ يَكْتُمْنَ مَا خَلَقَ اللَّهُ فِي أَرْحَامِهِنَّ إِنْ كُنَّ
يُؤْمِنَّ بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ ۚ وَبُعُولَتُهُنَّ أَحَقُّ بِرَدِّهِنَّ
فِي ذَٰلِكَ إِنْ أَرَادُوا إِصْلَاحًا ۚ وَلَهُنَّ مِثْلُ الَّذِي
عَلَيْهِنَّ بِالْمَعْرُوفِ ۚ وَلِلرِّجَالِ عَلَيْهِنَّ دَرَجَةٌ ۗ
وَاللَّهُ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٢٢٨﴾

२२९. ‘‘तलाक़’’[३३९]दोनवेळा [३४०] आहे. नंतर चांगल्या पद्धतीने स्त्रीला रोखले जावे [३४१] किंवा उदारतेने तिला निरोप द्यावा. [३४२] आणि तुमच्यासाठी हे उचित नाही की जे काही तुम्ही त्यांना दिलेले आहे, त्यामधून काही परत घ्यावे, [३४३] फक्त जर दोघांना ही शंका असेल कीं अल्लाहच्या मर्यादांचे ते पालन करू शकणार नाहीत. मग जर तुम्हांला ही शंका असेल की ते दोघे अल्लाहच्या मर्यादाचे पालन करु शकणार नाहीत, तर याबाबतीत त्यांचा काही गुन्हा नाहीं जर स्त्री फिदया (मोबदला) देऊन आपली सुटका (खुलाअ) करून घेईल. [३४४] या अल्लाहच्या मर्यादा आहेत. त्यांचे उल्लंघन करू नका. जे अल्लाहच्या मर्यादांचे उल्लंघन करतात तेच अत्याचारी [३४५] आहेत.

الطَّلَاقُ مَرَّتَانِ ۖ فَإِمْسَاكٌ بِمَعْرُوفٍ أَوْ تَسْرِيحٌ
بِإِحْسَانٍ ۗ وَلَا يَحِلُّ لَكُمْ أَنْ تَأْخُذُوا مِمَّا
آتَيْتُمُوهُنَّ شَيْئًا إِلَّا أَنْ يَخَافَا أَلَّا يُقِيمَا حُدُودَ اللَّهِ ۖ
فَإِنْ خِفْتُمْ أَلَّا يُقِيمَا حُدُودَ اللَّهِ فَلَا جُنَاحَ عَلَيْهِمَا
فِيمَا افْتَدَتْ بِهِ ۗ تِلْكَ حُدُودُ اللَّهِ فَلَا تَعْتَدُوهَا ۚ
وَمَنْ يَتَعَدَّ حُدُودَ اللَّهِ فَأُولَٰئِكَ هُمُ الظَّالِمُونَ ﴿٢٢٩﴾

३३४. येथे तंबी दिली जात आहे याचा अर्थ हा की जर तुम्ही पत्नीला अयोग्य गोष्टीवरून सोडले आहे तर लक्षात ठेवा की अल्लाह यापासून अनभिज्ञ नाही.

३३५. हा विलंब म्हणजे दुसऱ्या विवाहापासून थांबणे याला शरीअतीच्या परिभाषेत ''इद्दत'' म्हणतात. इद्दतची ही आज्ञा अनेक फायद्यावर आधारित आहे. उदाहरणार्थ गर्भाशयाची स्वच्छता म्हणजे संततीच्या बाबतीत संशयास जागा राहणार नाही; पतीच्या हक्काचा विचार आणि वैवाहिक संबंधाचा आदर वगैरे. तलाक दिलेल्या स्त्रीच्या इद्दतची मुदत तीन मासिक पाळ्या ठरविली गेली आहे. ज्याचा एक महत्वाचा हेतू हा आहे की पतीला आपल्या निर्णयाचा फेर विचार करण्याची संधी मिळावी. जर त्याने पहिला वा दुसरा तलाक दिला असेल आणि इद्दत च्या मुदतीत तो रूजू (संबंध पुन्हा प्रस्थापित) करू इच्छिल तर तो तसे करू शकतो. तथापि त्याची सुधारणा धडवून आणण्याची इच्छा असेल व स्त्रीचा छळ करण्याचा त्याचा हेतू नसेल तरच त्याने पुन्हा संबंध प्रस्थापित करावेत. नाहीपेक्षा हा त्या हक्काचा अत्याचारी वापर ठरेल.

३३६. म्हणजे पुरूषांनी हे समजू नये की त्यांनाच फक्त हक्क आहेत आणि स्त्रीयांना त्यांच्यावर कसलेही हक्क नाहीत. परंतु ज्याप्रमाणे पतीला पत्नीवर हक्क आहेत त्याचप्रमाणे पत्नीलाही पतीवर हक्क आहेत. हे हक्क उभयतांच्या स्वभावावाच्या दृष्टीने अगदी समतोल आहेत. आणि त्यांचे पालन करण्यावरच वैवाहिक जीवनाचे सुखसमाधान अवलंबून आहे.

३३७.हा दर्जा न्यायी व जबाबदारी (कव्वाम) असण्यासंबंधीचा आहे. इस्लामने कुटुंबाचा व्यवस्थापक पुरूषाला बनविले आहे. कारण स्वभाविकरित्या तोच या पदाला योग्य आहे. स्त्री नव्हे समानतेचा पाश्चिमात्य दृष्टिकोन वेगळा आहे. त्या नुसार स्त्री व पुरूष दोंघामध्ये पूर्ण समानता असली पाहिजे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या दृष्टीने ही गोष्ट आवश्यक आहे. परंतु बुद्धी व निसर्गाच्या दृष्टीने हे आवश्यक नाही. जेव्हा नैसर्गिकदृष्ट्या दोघांच्या शरीरिक ठेवण व स्वभाविक क्षमता यामध्ये फरक आहे तेव्हा त्यांच्या आवश्यकता हि भिन्न असतील. या आधारावर पुरूषाला एका श्रेणीने वर्चस्व प्राप्त होणे निसर्ग व बुद्धीशी अगदी सुसंगत आहे. या अपवादासह इस्लाम स्त्रीयांच्या हक्काना न केवळ मानतो तर त्याने शरीअतीचे आदेश व नियम यांच्याद्वारे त्यांच्या रक्षणाची पूर्ण व्यवस्था केलेली आहे. इस्लामचे कौटुंबिक कायदे याच आधारावर करण्यात आलेले आहेत. आणि म्हणून या आधाराला नाहीसे केले तर इस्लामची सारी कौटुंबिक व्यवस्थाच विस्कळीत होईल.

३३८. तो सामर्थ्यवान आहे. आणि म्हणून त्याच्या आदेशांना विरोध करण्याचे भय बाळगा. नाहीपेक्षा त्याच्या कोपापासून तुम्ही वाचणार नाही. आणि तो बुद्धिमान आहे. त्याचे सर्व आदेश दूरदृष्टीचे, बुद्धिमत्तेवरच व फायद्यावर आधारित आहेत. आणि म्हणून त्याच्या आदेशांना चुकीचे व आपल्या विचारांना योग्य समजणे वेडेपणाशिवाय दुसरे काही नाही.

३३९. 'तलाक़' ही शरीअतीची एक परिभाषा आहे. याचा अर्थ 'पत्नीला विवाह बंधनातून मुक्त करणे' असा आहे. इस्लामने वैवाहिक संबंधाना दृढ व टिकाऊ बनविण्यासाठी अत्यंत स्पष्ट आदेश दिले आहेत. परंतु काहीवेळा हे संबंध क़ायम राहणे बिघाडास कारणीभूत होते. म्हणून तलाकची परवानगी देण्यात आली आहे. कारण पतीपत्नीला असह्य व कटु जीवन जगावे लागू नये. इस्लामने आपल्या कौटुंबिक कायद्यात तलाकची जरी सवलत ठेविली असली तरी तिला एक अत्यंत अप्रिय अशी गोष्ट ठरविले आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लमनी फर्माविले आहे की :-

ابغض الحلال إلى الله الطلاق۔ (ابوداؤد)

''अल्लाहजवळ हलाल गोष्टीमध्ये सर्वात अधिक अप्रिय गोष्ट तलाक ही आहे.'' (अबू दाऊद)

शरीअतीची ही इच्छा आहे की अत्यंत अनिवार्य परिस्थितीतच तलाक देण्याच्या या हक्काचा वापर करण्यात यावा.

शरीअतीने तलाकची जी योग्य पद्धत ठरविली आहे तिला समजावून घेणे आवश्यक आहे. याबाबतीत काही आदेश पुढे येत आहेत.

हे ही स्पष्ट असावे की इस्लामने जेथे पुरूषाला तलाक़चा अधिकार दिला आहे तेथे स्त्रीलाही पुरूषापासून सुटका करून घेण्यासाठी काही पद्धती ठरविल्या आहेत. त्यापैकी एक पद्धत खुलाअ ची आहे. त्याबद्दलची आज्ञा याच आयतीमध्ये आलेली आहे.

तलाक चा हा हुकूम हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्या शरीअतीमध्ये पण होता. परंतु ग्रंथधारकांनी यामध्ये मोठा असमतोल अवलंबिला. यहुदी लोकांनी त्याला फार सोपे बनविले आणि ईसाई लोकांनी फार कठीण. प्रचलित तौरात मध्ये आहे.

''एखाद्या पुरूषाने एखाद्या स्त्रीशी लग्न केल्यानंतर त्याला तिची वागणूक अनुचित वाटल्यामुळें ती त्याला आवडेनाशी झाली, तर त्याने सूटपत्र लिहून तिच्या हाती द्यावे आणि तिला घराबाहेर काढावे. त्याच्या घरून बाहेर निघल्यावर तिने जाऊन पाहिजे तर दुसरा नवरा करावा.''

(पवित्रशास्त्र अनुवाद २४:१२)

यहुदी लोकांच्या जवळ हा नियम ही होता की तलाक दिल्यानंतर पती तिला पुन्हा पत्नी म्हणून स्वीकारू शकत नव्हता. दुसरीकडे प्रचलित इंजील मध्ये आहे की.

"म्हणून देवाने जे जोडले आहे ते मनुष्याने तोडूं नये. नंतर घरात त्याच्या शिष्यांनी पुन्हा त्याच गोष्टीविषयी त्याला विचारले. तेव्हा तो त्यांना म्हणाला, जो कोणी आपल्या बायकोला टाकतो व दुसरे लग्न करितो तो तिच्याविरूद्ध व्यभिचार करितो. आणि जर तिने आपल्या नवऱ्याला सोडले व दुसरे लग्न केले तर तीही व्यभिचार करिते."(पवित्र शास्त्र मार्क १०: ९ ते १२)

या आधारावर ईसाई लोकांनी तलाकला अगदी हराम ठरविले आणि फक्त त्या बाबतीत परवानगी दिली जेव्हां पत्नी व्यभिचारी असेल. परंतु जर वस्तु:निष्ठ दृष्टीकोन अवलंबिला गेला तर व्यभिचाराशिवाय इतर कारणे देखील तलाकसाठी योग्य असतात.

इन्साय्क्लोपीडिया ऑफ रेलिजन एण्ड एथिकस मधील उतारा आम्ही खाली देत आहोत :-

"Although it is evident that adultery affects the marriage relation more closely than any other offence, yet it may fairly be said that there are other things which may make married life so intolerable, and the perfect ideal union so impossible that if divorce or separation be allowed at all, the grounds for such separation ought not in reason to be confined to the one offence of adultery.... there are offences which make life so intolerable that, there can be no restoration of affection, that, where the tie of affection has been absolutely destroyed the real vinculum has been ruptured and that therefore, such offences may rightly be put in the same category as conjugal infidelity in the strict sense of the word. (Encyclopedia of religion and Ethics Vol. VIII p. 438)

इस्लामचा दृष्टीकोन दोन आत्यंतिक टोकामध्ये समतोल निर्माण करण्याचा आहे. आणि म्हणून एकीकडे तलाकला नापसंत ठरविण्यात आले असून दुसरीकडे तलाकच्या अधिकाराचा वापर करण्यासंबंधी अटी व मर्यादा पण ठरविण्यात आलेल्या आहेत.

३४०. तलाक दोनवेळा आहे. याचा अर्थ हा की मागे घेण्यात येणाऱ्या तलाकची (रजई तलाकची Revocable divorce) संधी दोन वेळा आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे तलाक इस्लाममध्ये एकाच झटक्यात विवाह संबंधला रद्द करणारी गोष्ट नव्हे. आपल्या निर्णयावर फेरविचार करण्याची माणसाला दोनवेळा संधी देण्यात आली आहे. तो न फक्त पहिला तलाक दिल्यानंतर संबंध पुन्हा प्रस्थापित करू शकतो तर दुसरा तलाक दिल्यानंतर देखील संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याची त्याला संधी मिळते. पण जर त्याने तिसऱ्या खेपेस तलाक देण्याचा निर्णय घेतला आणि तलाक दिला तर मग पुन्हा संबंध प्रस्थापित करण्याची संधी राहत नाही. याबद्दची आज्ञा पुढे येत आहे.

अज्ञान (जाहिलिय्यतच्या) कालात पुरूष वारंवार तलाक देत असे. व पुन्हा संबंध प्रस्थापित करीत असे. यामुळे स्त्रीचे जीवन असह्य होत असे. कुरआनने या अत्याचाराचे निवारण केले आणि मागे घेण्यात येणाऱ्या तलाकाला दोन पर्यंत मर्यादित केले. जर एखाद्याने आपल्या आयुष्यात तिसऱ्या वेळेला त्या स्त्रीला तलाक दिला तर मग तिच्याशी पुन्हा संबंध प्रस्थापित करण्याचा त्याला हक्क राहत नाही.

इस्लाम मध्ये तलाक देण्याची योग्य पद्धत ही आहे की, स्त्री जेव्हा स्वच्छ (तुहरच्या) अवस्थेत असेल व या अवस्थेत तिच्याशी संभोग केलेला नसेल तेव्हा एक तलाक दिला जावा. यानंतर स्त्रीला इद्दत पुरी करावी लागेल. ( ही मुद्दत तीन मासिक पाळ्या होईपर्यंत अगर स्त्री गर्भवती असेल तर ती प्रसूत होईपर्यंत आहे.) या कालात पतीला पुन्हा संबंध प्रस्थापित करण्याचा अधिकार राहील. परन्तु जर पती पुन्हा संबंध प्रस्थापित करूं इच्छित नसेल तर त्याने इद्दतची मुद्दत पूर्ण होऊ द्यावी. ती पूर्ण झाल्यावर पत्नी विवाहबंधनातून मुक्त होईल. परंतु दोघांच्यासाठी परस्पर अनुमतीने पुन्हा विवाह करण्याची संधी राहील. 'नरूजूअ' अगर पुन्हा विवाह केल्यानंतर पतीने दुसऱ्या खेपेस तलाक दिला तर त्याला इद्दतच्या कालात रूजूअ करण्यास किंवा इद्दतची मुद्दत संपल्यानंतर परस्पर अनुमतीने विवाह करण्याची संधी राहील. परंतु दोनवेळा रूजूअ वा विवाह केल्यानंतर तिसऱ्या वेळेस पतीने तलाक दिला तर हा तलाक, "तलाके मुग़ल्लज"(Absolute divorce) शेवटचा, न बादलता येणारा तलाक-होईल. यानंतर न'रूजूअ'चा अधिकार राहील न परस्पर अनुमतीने पुन्हा विवाह केला जाऊ शकेल. येथपावेतो की ती स्त्री दुसऱ्या पुरूषाबरोबर विवाह न करील आणि तो पती तिला आपल्या मर्जीने तलाक न देईल.

सूरे "तलाक" मध्ये (जी सूरह नंतर उतरली आहे) ही आज्ञा स्पष्टीकरणासह आलेली आहे की तलाक इद्दत साठी दिली जावी.

اِذَا طَلَّقْتُمُ النِّسَآءَ فَطَلِّقُوْهُنَّ لِعِدَّتِهِنَّ۔ (الطلاق۔۱)

"जेव्हा तुम्ही स्त्रियांना तलाक द्याल तेव्हा तुम्ही त्यांच्या इद्दतीसाठी तलाक द्या." (सूर तलाक १)

यावरून क़ुरआनचा हेतू चांगल्या प्रकारे स्पष्ट होतो की कोणताही तलाक इद्दतच्या मध्यंतराशिवाय असू नये. दुसऱ्या शब्दात, दोन वेळाचे तलाक इद्दतच्या दोन मध्यंतरासह आवश्यक आहेत.

राहिली एका वेळेस तीन तलाक देण्याची पद्धत तर ही पद्धत शरीअतीनुसार नाही. इतकेच नव्हे तर ती शरीअतीविरुद्ध व पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) शिकवणी (सुन्नती) विरुद्ध आहे. लोक शरीअतीच्या आदेशा बद्दल अज्ञानी असल्यामुळे किंवा राग व भावनांच्या आहारी जाऊन तलाक, तलाक, तलाक किंवा तीन तलाक असे शब्द एकाच बैठकीत उच्चारतात. अशा तलाकला तीन तलाक (Absolute divorce) म्हणता येणार नाही. न हा क़ुरआनाचा उद्देश आहे, न ही वाजवी व न्यायाची गोष्ट आहे. म्हणून योग्य गोष्ट ही आहे की एका वेळी दिलेल्या तीन तलाकाचा एक रजई तलाक (one revocable divorce) समजण्यात यावे. म्हणजे पुरुषाला आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याचा व रूजूअ करण्याचा पूर्ण अवसर लाभेल, ज्याला क़ुरआनने आपल्या तलाकाच्या कायद्यांत एक महत्तवाचा नियम म्हणून सामील केले आहे.

३४१. म्हणजे दोन तलाकांच्या मर्यादेपर्यंत पति इच्छिल तर इद्दतच्या मुद्दतीत 'रूजूअ' क्ररू शकतो. परंतु अशाप्रकारे पुन्हा संबंध प्रस्थापित करणे स्त्रीला चांगली व सौजन्यपूर्व वागणूक (पत्नीच्या नात्याने) देण्याच्या उद्देशाने झाले पाहिजे. स्त्रीचा छळ करण्यासाठी अगर तिला सताविण्यासाठी असे केले जाऊ नये.

३४२. जर निरोप द्यावयाचा असेल तर चांगल्या प्रकारे निरोप द्या. ज्या पत्नीबरोबर प्रेमाचे संबंध होते आणि जी अर्धांगी पण होती तिला काही देऊन चांगल्या पद्धतीने निरोप देणे हे पुरुषाच्या प्रतिष्ठेस साजेसे आहे.

३४३. तलाकच्या बाबतीत पुरुषाने महरची रक्कम परत मागू नये त्याचप्रमाणे त्याने स्त्रीला ज्या भेटी व बक्षिसे दिली असतील त्यापण त्याने परत मागू नयेत. पुरुष स्वत:हून स्त्रीला सोडत असेल तर दिलेल्या वस्तू परत मागणे योग्य नाही. आणि महर हा तर स्त्रीचा हक्क आहे. आणि म्हणून तो परत घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि ''खुलाअ''ची पद्धत याहून वेगळी आहे. त्याबद्दलचे निवेदन यानंतर लगेच आलेले आहे.

३४४. वैवाहिक संबंधाना कायम ठेविण्यासाठी ज्या मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे, त्यांचे पालन जर पति व पत्नी करू शकत नसतील तर पत्नी फिदिया (भरपाई) म्हणून पतीला काही देऊन किंवा महर परत करून सुटकारा प्राप्त करू शकते याला ''खुलाअ'' म्हणतात.

'जर तुम्हांला शंका असेल' चे संबोधन मुस्लिम समाजाला उद्देशून केले गेले आहे. आणि मुस्लिम समाज आपली ही जबाबदारी न्यायालयामार्फत पुरी करू शकतो. स्त्री जर 'खुलाअ' इच्छिल आणि पुरुष त्यासाठी तयार नसेल तर स्त्रीला हा अधिकार आहे की तिने हा प्रश्न इस्लामी न्यायालयात न्यावा. आणि न्यायालयाने दोघांचे जमत नाही याबद्दल खात्री करून घेतल्यानंतर 'खुलाअ' शंबंधी निर्णय करावा आणि परिस्थितीनुसार फिदियाची रक्कम ठरवावी.

यावरून स्पष्ट आहे की इस्लामने जेथे पुरुषाला तलाकचा अधिकार दिला आहे तेथे स्त्रीलासुद्धा 'खुलाअ' चा हक्क दिला आहे. हा या गोष्टीचा पुरावा आहे की इस्लामचे कौटुंबिक कायदे श्रेष्ठ दर्जाच्या मध्यम मार्गावर आणि समतोलावर आधारलेले आहेत.

'खुलाअ' झाल्यास विवाहाचा भंग (फस्ख) होईल किंवा न बदलता येणारा एक तलाक (बाइन) होईल. म्हणजे पतीला रूजूअचा हक्क राहणार नाही. तथापि पती पत्नी दोघे इच्छितील तर पुन्हा विवाह करू शकतात.

३४५. ही ताकीद आहे. त्या लोकांच्यासाठी जे अल्लाहचे आदेश व नियमांची पर्वा करीत नाहीत आणि त्यांचा भंग करतात. यावरून अंदाज केला जाऊं शकतो की इस्लामच्या कौटूंबिक कायद्यात दुरूस्ती अगर फेरफार करण्याचा प्रयत्न करणे क़ुरआनच्या दृष्टीने किती भयंकर गुन्हा आहे.

२३०. नंतर जर त्याने (तिसऱ्यावेळी) 'तलाक़' दिला [३४६] तर मग ही स्त्री त्याच्यासाठी हलाल (शास्त्रसंमत) राहत नाही, जोपर्यंत ती दुसऱ्या पतिशी निकाह (विवाह) करीत नाही.[३४७] नंतर जर त्यानेही (दुसऱ्या पतिने) तलाक दिला तर, त्या दोघांनी (ती स्त्री व तिचा पहिला पति) पुन्हां एकत्र येण्यास (पुनर्विवाह करण्यास) कसलाही गुन्हा नाहीं, जर त्यांना खात्री वाटत असेल की अल्लाहच्या मर्यादांचे ते पालन करु शकतील. या अल्लाहच्या मर्यादा आहेत, ज्या तो ज्ञान बाळगणाऱ्यासाठी निवेदन करतो.

فَإِنْ طَلَّقَهَا فَلَا تَحِلُّ لَهُ مِنْ بَعْدُ حَتَّىٰ تَنْكِحَ
زَوْجًا غَيْرَهُ ۗ فَإِنْ طَلَّقَهَا فَلَا جُنَاحَ عَلَيْهِمَا أَنْ
يَتَرَاجَعَا إِنْ ظَنَّا أَنْ يُقِيمَا حُدُودَ اللَّهِ ۗ وَتِلْكَ
حُدُودُ اللَّهِ يُبَيِّنُهَا لِقَوْمٍ يَعْلَمُونَ ﴿٢٣٠﴾

२३१. आणि जेव्हा तुम्ही स्त्रीयांना तलाक द्याल व त्यांची इद्दतची मुद्दत पुरी व्हावयास येईल [३४८] तर त्यांना चांगल्या पद्धतीने रोखा अगर चांगल्या पद्धतीने निरोप द्या. त्यांचा छळ करण्याच्या इराद्याने त्याना रोखून ठेवू नका, की हा अत्याचार होईल.[३४९]आणि जो असे करील तो आपल्यावरच अत्याचार करील. अल्लाहच्या आयतींची थट्टा करु नका अल्लाहच्या उपकाराचे आणि या गोष्टीचे स्मरण ठेवा की त्याने तुमच्यावर ग्रंथ व चातुर्य उतरविले ज्याद्वारे तो तुम्हांला उपदेश करीत आहे. आणि अल्लाहचे भय बाळगा आणि लक्षात ठेवा की अल्लाह सर्वकाही जाणणारा आहे. [३५०]

وَإِذَا طَلَّقْتُمُ النِّسَاءَ فَبَلَغْنَ أَجَلَهُنَّ
فَأَمْسِكُوهُنَّ بِمَعْرُوفٍ أَوْ سَرِّحُوهُنَّ بِمَعْرُوفٍ ۚ
وَلَا تُمْسِكُوهُنَّ ضِرَارًا لِتَعْتَدُوا ۚ وَمَنْ يَفْعَلْ
ذَٰلِكَ فَقَدْ ظَلَمَ نَفْسَهُ ۚ وَلَا تَتَّخِذُوا آيَاتِ اللَّهِ
هُزُوًا ۚ وَاذْكُرُوا نِعْمَتَ اللَّهِ عَلَيْكُمْ وَمَا أَنْزَلَ
عَلَيْكُمْ مِنَ الْكِتَابِ وَالْحِكْمَةِ يَعِظُكُمْ بِهِ ۚ وَاتَّقُوا
اللَّهَ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمٌ ﴿٢٣١﴾

२३२. आणि जेव्हा तुम्ही स्त्रीयांना तलाक द्याल व त्या आपली इद्दतची मुद्दत पुरी करतील तर मग त्यांना आपल्या पतीबरोबर विवाह करण्यास प्रतिबंध करू नका, जेव्हा ते चांगल्या पद्धतीनें एकदुसऱ्याच्या अनुमतीने व्यवहार ठरवितील.[३५१] हा उपदेश तुमच्या पैकी त्या लोकांना केला जात आहे जे अल्लाह व शेवटच्या दिवसावर ईमान बाळगतात. ही तुमच्यासाठी अधिक शुद्ध व सभ्य पद्धत आहे.[३५२] अल्लाह जाणतो. तुम्ही जाणत नाही. [३५३]

وَإِذَا طَلَّقْتُمُ النِّسَاءَ فَبَلَغْنَ أَجَلَهُنَّ
فَلَا تَعْضُلُوهُنَّ أَنْ يَنْكِحْنَ أَزْوَاجَهُنَّ إِذَا تَرَاضَوْا
بَيْنَهُمْ بِالْمَعْرُوفِ ۗ
ذَٰلِكَ يُوعَظُ بِهِ مَنْ كَانَ مِنْكُمْ يُؤْمِنُ بِاللَّهِ
وَالْيَوْمِ الْآخِرِ ۗ ذَٰلِكُمْ أَزْكَىٰ لَكُمْ وَأَطْهَرُ ۗ وَاللَّهُ
يَعْلَمُ وَأَنْتُمْ لَا تَعْلَمُونَ ﴿٢٣٢﴾

३४६. अभिप्रेत तिसऱ्या खेपेचा तलाक आहे. वर आले आहे की पति आपल्या आयुष्यात दोन वेळा तलाक देऊन इद्दतची मुद्दत पूरी होण्यापूर्वी रूजूअ करू शकतो. येथे तिसऱ्या खेपेस दिल्या जाणाऱ्या तलाकबद्धलची आज्ञा निवेदन केली जात आहे.

३४७. म्हणजे जर पतीने तिसऱ्या वेळी तलाक दिला तर मग ती स्त्री तोपर्यंत त्या पतीसाठी वैध (हलाल) राहत नाही जोपर्यंत ती दुसऱ्या पुरुषाबरोबर विवाह करीत नाही आणि तिचा दुसरा पति तिला तलाक देत नाही दुसऱ्या पतीने तलाक दिला किंवा त्याचे निधन झाले तर ती आपल्या पहिल्या पतीशी पुन्हा विवाह करूं शकते. या आज्ञेमागील हेतू हा आहे. की लोकांनी तलाकला खेळ बनवून स्त्रीचा छळ करू नये. त्यांनी पूर्ण विचारांती तलाकचा निर्णय घ्यावा. ही आज्ञा तिसऱ्या खेपेस म्हणजे तिसऱ्या प्रसंगी दिल्या जाणाऱ्या तलाक संबंधी आहे. एका वेळेला तलाक़, तलाक़, तलाक़ अगर तीन तलाक़ (ज्याचा तपशील टीप न.३४०मध्ये आला आहे) असे शब्द उच्चारून दिल्या जाणाऱ्या तलाकबद्दल नाही. स्पष्ट असो की तिसऱ्या खेपेस तलाक दिल्यानंतर पुन्हा त्या स्त्रीबरोबर विवाह करण्यासाठी जी अट ठरविली गेली आहे त्याचा अर्थ हा नव्हे की पहिल्या पतीने त्या स्त्रीचा तलाक देण्याचा अटीवर, निमित्तमात्र दुसऱ्या पुरुषाबोबर विवाह लावून द्यावा. तीन वेळा तलाक दिलेल्या स्त्रीला पुन्हा वैध (हलाल) करण्याचा या पद्धतीचा हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी धिक्कार केलेला आहे. क़ुरआनच्या या आज्ञेचा उद्देश हा आहे की, जर ती स्त्री आपल्या इच्छेने दुसऱ्या पुरुषाबरोबर शिष्टसंमत (मारूफ) असा विवाह करते-ज्या विवाहमध्ये तलाकची अट नाही- आणि अशा विवाहानंतर जर तिचा दुसरा पती तिला तलाक देईल, तर मग ती स्त्री आपल्या पहिल्या पतीशी पुन्हा विवाह करू शकते.

तिसऱ्या खेपेस दिल्या जाणाऱ्या तलाकला 'तलाके मुगल्लज़ा बाअिना,(Irrevocable and Absolute divorce) न बदलता येणारा व पूर्ण तलाक म्हणतात.

३४८. म्हणजे इद्दतची मुद्दत संपण्यापूर्वी रूजूअ करू शकता.

३४९. येथे अल्लाहच्या आयती म्हणजे त्याचे आदेश व कायदे.

३५०. माणसाच्या मनात परमेशवराचे जितके भय असेल आणि तो सर्वज्ञ (His Omniscience)असण्याबद्दल जितकी खात्री असेल तितका तो अल्लाहच्या अवज्ञेपासून वाचू शकेल.

३५१. म्हणजे जेव्हा तलाक देण्यात आलेल्या स्त्रीया आपली इद्दतची मुद्दत पुरी करतील तेव्हा त्या चांगल्या पद्धतीने आपल्या आवडीप्रमाणे विवाह करण्यास स्वतंत्र आहेत. जर तलाक मिळालेली स्त्री आपल्या पहिल्या पतीशी पुन्हा विवाह करू इच्छिल तर त्या स्त्रीच्या नातलगानी त्यामध्ये आडकाठी आणू नये. आणि जर ती स्त्री दुसऱ्या पुरुषाबरोबर विवाह करू इच्छित असेल तर तिच्या पहिल्या पतीने असा प्रयत्न करू नये की जिला त्याने सोडले आहे. तिच्याबरोबर दुसरा कोणीही विवाह करू नये.

या आयतीने विवाहच्या बाबतीत शरीअतचा हा नियम स्पष्ट होतो की तलाक मिळालेल्या स्त्रीला आपल्या विवाहच्या बाबतीत पालकाच्या (वली) परवानगीची आवश्यकता नाही. परंतु ती आपल्या मर्जीनुसार चांगल्या पद्धतीने जेथे इच्छिल तेथे विवाह करू शकते.

३५२. बाह्य व आंतरिक शुद्धता त्या पद्धतीत आहे की तलाक दिलेल्या स्त्रीला तिच्या मर्जीप्रमाणे विवाह करू द्यावा. जर निरर्थक रितीरिवाजामुळे दुसऱ्या विवाहामध्ये आडकाठी निर्माण केली गेली तर स्त्री वाईट मार्गाला लागण्याची आणि तिच्याकडून अनैतिक कृत्ये घडण्यांचा संभव आहे.

३५३. म्हणजे तुमचे ज्ञान अत्यंत मर्यादित आहे. जीवनाच्या खऱ्या हिताचे ज्ञान तुम्हाला नव्हे तर अल्लाहला आहे. म्हणून तो तुम्हाला जे आदेश देत आहे त्याप्रमाणे आचरण करा.

माणसाचे ज्ञान इतके सर्वव्यापी आणि त्याची दृष्टी इतकी विशाल नसते की तो मानवी जीवनाचे खरे हित जाणू शकेल. म्हणून मानवाने स्वत: बनविलेले कौटुंबिक कायदे (Family Laws) त्यांच्यासाठी फायदेशीर ठरत नाहीत. याउलट क़ुरआनचे कौटुंबिक कायदे सर्वज्ञ व बुद्धिमान अशा अल्लाहकडून आहेत. आणि म्हणून जीवनाचे खरे हित त्यामध्ये सामाविले आहे.आणि त्यांचे फायदेशीर होणे संशय विरहित आहे.

२३३. आणि मातांनी आपल्या मुलांना पूर्ण दोन वर्षे दूध पाजविले पाहिजे.[३५४] ही आज्ञा त्या व्यक्तिसाठी आहे जी पूर्ण मुदतीपर्यंत दूध पाजवू इच्छिते.[३५५] आणि ज्याचे मूल असेल त्याला चांगल्या पद्धतीने त्यांना (स्त्रीयांना) जेवणखावण व कपडालत्ता द्यावा लगेल.[३५६] कोणावरही त्याच्या शक्तिबाहेर बोझा घालूं नये. न कोणत्याही आईला तिच्या मुलामुळें त्रास दिला जावा न बापाला त्याच्या मुलाबद्दल. आणि अशाच प्रकारची जबाबदारी वारसावरही आहे.[३५७]परंतु जर उभयता एक-दुसऱ्याच्या अनुमतिने व सल्ल्याने दूध सोडवू इच्छितील तर त्यांचेवर काही गुन्हा नाही. आणि जर तुम्ही आपल्या मुलांना दुसऱ्या कोणाकडून दूध पाजवूं इच्छित असाल तर त्यामध्येही कसला गुन्हा नाही. अट ही की तुम्ही जे काही देण्याचे ठरविले आहेत ते चांगल्या पध्दतीने द्या.अल्लाहचे भय बाळगा आणि लक्षात ठेवा की जे काही तुम्ही करीत आहात अल्लाह पाहत आहे.

وَالْوَالِدَاتُ يُرْضِعْنَ أَوْلَادَهُنَّ حَوْلَيْنِ كَامِلَيْنِ لِمَنْ أَرَادَ أَنْ
يُتِمَّ الرَّضَاعَةَ ۚ وَعَلَى الْمَوْلُودِ لَهُ رِزْقُهُنَّ وَكِسْوَتُهُنَّ بِالْمَعْرُوفِ ۚ
لَا تُكَلَّفُ نَفْسٌ إِلَّا وُسْعَهَا ۚ لَا تُضَارَّ وَالِدَةٌ بِوَلَدِهَا وَلَا مَوْلُودٌ
لَهُ بِوَلَدِهِ ۚ وَعَلَى الْوَارِثِ مِثْلُ ذَٰلِكَ ۗ فَإِنْ أَرَادَا فِصَالًا عَنْ
تَرَاضٍ مِنْهُمَا وَتَشَاوُرٍ فَلَا جُنَاحَ عَلَيْهِمَا ۗ وَإِنْ أَرَدْتُمْ أَنْ
تَسْتَرْضِعُوا أَوْلَادَكُمْ فَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ إِذَا سَلَّمْتُمْ مَا آتَيْتُمْ
بِالْمَعْرُوفِ ۗ وَاتَّقُوا اللَّهَ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ بِمَا تَعْمَلُونَ بَصِيرٌ ﴿٢٣٣﴾

२३४. आणि तुमच्यापैकी जे लोक निधन पावतील आणि आपल्यामागे पत्न्या सोडतील तर त्या पत्न्यांनी स्वत:ला चार महिने दहा दिवसापर्यंत रोखून धरावे.[३५८] (पुनार्विवाह करू नये) नंतर जेव्हा त्या आपल्या 'इद्दतीची' मुद्दत पुरी करतील व चांगल्या पद्धतीने आपल्या बाबतीत जे काही करतील त्याचा तुमच्यावर काही गुन्हा नाही. आणि जे काही तुम्ही करता त्याची अल्लाहला खबर आहे.

وَالَّذِينَ يُتَوَفَّوْنَ مِنْكُمْ وَيَذَرُونَ أَزْوَاجًا يَتَرَبَّصْنَ بِأَنْفُسِهِنَّ
أَرْبَعَةَ أَشْهُرٍ وَعَشْرًا ۖ فَإِذَا بَلَغْنَ أَجَلَهُنَّ فَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ
فِيمَا فَعَلْنَ فِي أَنْفُسِهِنَّ بِالْمَعْرُوفِ ۗ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ خَبِيرٌ ﴿٢٣٤﴾

२३५. आणि या बाबतीत तुमच्यावर काही गुन्हा नाही. की त्या स्त्रीयांना तुम्ही विवाहचा संदेश इशाऱ्याने द्या अगर आपल्या मनात लपवून ठेवा. अल्लाहला माहित आहे की तुम्ही त्यांचे स्मरण करालच. परंतु त्यांचेशी (विवाहाचा) गुप्तपणे करारमदार करूं नका. हो, चांगल्या पद्धतीने एखादी गोष्ट सांगू शकता. आणि विवाहकराराचा निर्णय तोपर्यंत करू नका जोपर्यंत इद्दतची मुद्दत पुरी होत नाही.[३५९] लक्षात ठेवा, अल्लाह तुमच्या मनाची अवस्था जाणतो. आणि म्हणून त्याचे भय बाळगा. आणि हेही लक्षात ठेवा की अल्लाह माफ करणारा व सहनशील आहे .[३६०]

وَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ فِيمَا عَرَّضْتُمْ بِهِ مِنْ خِطْبَةِ النِّسَاءِ أَوْ أَكْنَنْتُمْ
فِي أَنْفُسِكُمْ ۚ عَلِمَ اللَّهُ أَنَّكُمْ سَتَذْكُرُونَهُنَّ وَلَٰكِنْ لَا تُوَاعِدُوهُنَّ
سِرًّا إِلَّا أَنْ تَقُولُوا قَوْلًا مَعْرُوفًا ۚ وَلَا تَعْزِمُوا عُقْدَةَ النِّكَاحِ
حَتَّىٰ يَبْلُغَ الْكِتَابُ أَجَلَهُ ۚ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ يَعْلَمُ مَا فِي
أَنْفُسِكُمْ فَاحْذَرُوهُ ۚ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ غَفُورٌ حَلِيمٌ ﴿٢٣٥﴾

३५४. या आयतीमध्ये ‘रजाअत’ (मुलांना दूध पाजविणे) चे आदेश निवेदन केले गेले आहेत. तलाक दिला असताना जर स्त्रीजवळ दूध पिणारे मूल असेल तर एक मोठा प्रश्न निर्माण होतो. त्या कालांत पावडर दूध वगेरेची सवलत प्राप्त नव्हती. आणि मुलांच्या अन्नाचा आधार आई अगर दाईचे दूध हाच होता. आणि मुलासाठी आईचे दूध स्वाभाविक व उत्तम असे अन्न आहे. आणि म्हणून तलाकच्या अवस्थेत मुलाचे हक्क हिरावले जाऊ नयेत याची शिकवण या आयतीमध्ये दिली गेली आहे.

३५५. ‘रजाअत’ ची मुद्दत दोन वर्षे आहे. म्हणून तलाक दिलेल्या स्त्रीवर ही जबाबदारी आहे की तिने, मुलाचा बाप आपल्या मुलाला पूर्ण मुदतीसाठी दूध पाजवू इच्छित असेल तर मुलाला पूर्ण दोन वर्षे दूध पाजवावे.

३५६. म्हणजे ‘रजाअत’ च्या मुदतीमध्ये मुलाच्या बापावर तलाक दिलेल्या स्त्रीच्या खाण्यापिण्याची व कपडालत्त्याची जबाबदारी आहे. ही जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडली जावी. म्हणजे मुलाच्या बापाच्या योग्यता व परिस्थितीनुसार ज्याला योग्य व न्याय्य समजले जाईल त्या पद्धतीने ही व्यवस्था करण्यात यावी.

३५७. जर मुलाच्या बापाचे निधन झाले असेल तर ही जबाबदारी त्याच्या वारसावर आहे.

३५८. पतीचे निधन झाल्यास इद्दतची मुद्दत चार महिने दहा दिवस आहे आणि स्त्री जर गर्भवती असेल तर प्रसूती होईपर्यंत ही मुद्दत राहिल.(पाहा सूर तलाक आयत ४)

तलाक दिलेल्या स्त्रीच्या तुलनेने विधवा स्त्रीच्या इद्दतची मुद्दत अधिक ठरविण्यामध्ये पती बद्दलचे दु:ख व शोक वगैरे कारणे आहेत. पत्नीला पतीच्या निधनाने जे दु:ख होते त्याचा विचार करून तिला लागलीच पतीचे घर सोडण्यास भाग पाडण्यात येऊ नये. आणि या मुदतीत तिच्याबरोबर सहानुभूतीने वागणूक ठेवावी. इद्दतची मुद्दत पूर्ण झाल्यानंतर निर्णय घेऊ शकते. याबाबतीत शरीअतीविरोधी रिवाज आड येऊ नयेत. त्याचप्रमाणे जर ती पुन्हा विवाह करू इच्छित असेल तर तिला टोमणे मारून रोखले जाऊ नये.

काही समाजामध्ये विधवा विवाहाला वाईट समजले जात असे. आणि काही समाजात तर पतीबरोबर सती जाण्यासाठी स्त्रीने स्वत:ला जाळून घेणे पसंत केले जात असे. परंतु इस्लामने या रीतीरिवाजांच्या विरूद्ध विधवेला इद्दतचा काल संपल्यानंतर आपल्या मर्जीप्रमाणे दुसरा विवाह करण्याचे स्वातंत्र्य दिले आणि त्याला पसंत ठरविले.

३५९. इद्दतच्या मुद्दतीत ना विवाह करणे योग्य आहे ना विवाहाचे स्पष्टपणे बोलणे करणे.

३६०. लहानसहान गोष्टींवर तो तुमची पकड करीत नाही. तुमची निय्यत (हेतू) चांगली असेल तर आशा बाळगा की तो तुमचे अपराध माफ करील.

२३६. जर तुम्ही स्त्रीयांना हात लावण्यापूर्वी किंवा त्यांचा 'महर' ठरविण्यापूर्वी त्यांना 'तलाक़' दिला तर तुमचा काही गुन्हा नाही. तरीपण त्यांना काही द्या. संपन्न व्यक्तीने आपल्या शकतीनुसार व गरीब व्यक्तीने आपल्या शक्तिनुसार चांगल्या पद्धतीने द्यावे.[३६१] सदाचारी लोकांवर हा हक्क आहे. [३६२]

لَا جُنَاحَ عَلَيْكُمْ إِنْ طَلَّقْتُمُ النِّسَآءَ مَا لَمْ تَمَسُّوهُنَّ أَوْ
تَفْرِضُوا لَهُنَّ فَرِيضَةً ۚ وَمَتِّعُوهُنَّ عَلَى الْمُوسِعِ قَدَرُهُ وَ
عَلَى الْمُقْتِرِ قَدَرُهُ ۚ مَتَاعًا بِالْمَعْرُوفِ ۖ حَقًّا عَلَى الْمُحْسِنِينَ ﴿٢٣٦﴾

२३७. आणि जर तुम्ही हात लावण्यापूर्वी 'तलाक दिला असेल, पण 'महर' ठरविला असेल तर तुम्हाला ठरविलल्या 'महरचा' निम्मा हिस्सा द्यावा लागले [३६३] तथापि जर स्त्रीने सवलत दिली किंवा ज्याच्या हाती विवाहबंधन [३६४] आहे त्या पुरुषाने सवलत दिली (तर हरकत नाही.) आणि हे की तुम्ही सवलत दिली तर ते संयमाच्या (तक्वाच्या) निकटतर आहे. एकदुसऱ्यावर उपकार करण्यास विसरू नका.[३६५] तुम्ही जे काही करीत आहात ते अल्लाह पाहत आहे.

وَإِنْ طَلَّقْتُمُوهُنَّ مِنْ قَبْلِ أَنْ تَمَسُّوهُنَّ وَقَدْ فَرَضْتُمْ
لَهُنَّ فَرِيضَةً فَنِصْفُ مَا فَرَضْتُمْ إِلَّا أَنْ يَعْفُونَ أَوْ يَعْفُوَا
الَّذِي بِيَدِهِ عُقْدَةُ النِّكَاحِ ۚ وَأَنْ تَعْفُوا أَقْرَبُ لِلتَّقْوَىٰ ۚ وَ
لَا تَنْسَوُا الْفَضْلَ بَيْنَكُمْ ۚ إِنَّ اللَّهَ بِمَا تَعْمَلُونَ بَصِيرٌ ﴿٢٣٧﴾

२३८. नमाज़ीचे [३६६] संरक्षण करा.[३६७] विशेषत: 'सलाते वुस्ता'[३६८] (दरम्यानची नमाज़) चे, अल्लाहच्या समोर उभे राहा, विनम्रतेने व भक्तिभावाने. [३६९]

حَافِظُوا عَلَى الصَّلَوَاتِ وَالصَّلَاةِ الْوُسْطَىٰ وَقُومُوا لِلَّهِ
قَانِتِينَ ﴿٢٣٨﴾

२३९. जर तुम्ही भयग्रस्त असाल तर, पायी असा वा स्वार असा, ज्याप्रकारे शक्य होईल त्याप्रकारे नमाज़ अदा करा.[३७०] मग जेव्हां शांतता लाभेल तेव्हा अल्लाहचे अशा पद्धतीने स्मरण करा [३७१] जी पद्धत त्याने तुम्हांला शिकविली आहे [३७२] व जी तुम्हांला माहित नव्हती.

فَإِنْ خِفْتُمْ فَرِجَالًا أَوْ رُكْبَانًا ۖ فَإِذَا أَمِنْتُمْ فَاذْكُرُوا اللَّهَ كَمَا
عَلَّمَكُمْ مَا لَمْ تَكُونُوا تَعْلَمُونَ ﴿٢٣٩﴾

२४०. तुमच्यापैकी [३७३] जे लोक निधन पावतील आणि आपल्या मागे पत्न्या सोडतील, त्यांनी आपल्या पत्न्यांच्या हक्कामध्ये मृत्यूपत्र करावे की एका वर्षपर्यंत त्यांना उदरनिर्वाहाची सामुग्री दिली जावी व त्यांना घराबाहेर काढू नये. मग जर त्या स्वत: निघून जातील व चांगल्या पद्धतीने आपल्याबाबतीत जे काही करतील त्याचा तुमच्यावर काही गुन्हा नाही. [३७४] आणि अल्लाह प्रभावशाली व बुद्धीमान आहे. [३७५]

وَالَّذِينَ يُتَوَفَّوْنَ مِنْكُمْ وَيَذَرُونَ أَزْوَاجًا وَصِيَّةً
لِأَزْوَاجِهِمْ مَتَاعًا إِلَى الْحَوْلِ غَيْرَ إِخْرَاجٍ ۚ فَإِنْ خَرَجْنَ
فَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ فِي مَا فَعَلْنَ فِي أَنْفُسِهِنَّ مِنْ مَعْرُوفٍ ۗ
وَاللَّهُ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٢٤٠﴾

३६१. म्हणजे एखाद्या व्यक्तीने विवाह केला, परंतु पत्नीबरोबर शरिरीक संबंध प्रस्थापित करण्यापूर्वी तिला तलाक दिला आणि त्या स्त्रीचा महरही ठरविला गेला नव्हता तर अशा परिस्थितीत पतीने आपल्या ऐपतीप्रमाणे चांगल्या पद्धतीने त्या स्त्रीला काही देऊन तिला निरोप द्यावा. कारण विवाहसंबंध तुटल्याने स्त्रीचे नुकसान होतेच. त्याची भरपाई करणे कठीण आहे. तरीपण भेटीदाखल काही दिल्याने त्याचे नैतिक व मानसिक दृष्ट्या चांगलेच परिणाम होतील.

३६२. म्हणजे चांगली वागणूक ठेवू इच्छित असाल तर या जबाबदारीला कर्तव्य समजून पार पाडा.

३६३. म्हणजे एखाद्याने शरीरिक संबंध प्रस्थापित करण्यापूर्वी तलाक दिला, परंतु महर ठरविला गेला असेल, अशा परिस्थितीत ठरविलेल्या महरचा निम्मा भाग अदा करावा लागेल. स्त्रीने सौम्यपणा स्वीकारून तो कमी केला अगर पतीने सौम्यपणा अंगिकारून तो पुरा दिला तर काही हरकत नाही. आणि कुरआनने पुरुषाला प्रोत्साहन दिले आहे की त्याने आपल्या दर्जाचा विचार करून या बाबतीत औदार्य दाखवावे.

३६४.मूळ अरबी (Text) चे शब्द ''अल्लज़ी बियदिही उक़्दतुन्निकाह'' اَلَّذِیۡ بِیَدِهٖ عُقۡدَةُ النِّکَاحِ ''परुष ज्याच्या हाती विवाह बंधन आहे''हे शब्द या गोष्टीचा पुरावा सादर करतात की विवाहाची गाठ सोडणे पुरुषाच्या हाती आहे. शरीअतीने हा अधिकार पुरुषाला दिला आहे. आणि म्हणून हा अधिकार पुरुषाच्या हातून काढून घेऊन तो न्यायालयाला देण्याबदलची प्रवृत्ती चुकीची व शरीअतविरोधी आहे.

३६५. म्हणजे सामाजिक जीवनात प्रसन्नतेचे वातावरण फक्त कायदेशीर कर्तव्ये पार पाडल्याने नव्हे तर औदार्याची वागणूक ठेविल्याने निर्माण होते.

३६६. शरीअतीचे आदेश व नियम यांच्या निवेदनाचा जो क्रम आयत न.१६८ पासून सुरू होता, तो येथे समाप्त होत आहे. म्हणून त्याच्या समाप्तीवर नमाज़चे रक्षण (वेळेवर न चुकता नमाज़ अदा करणे) करण्याची ताकीद दिली गेली आहे. यावरून स्पष्ट झाले की शरीअतीची प्रस्थापना नमाज़च्या प्रस्थापनेवर अवलंबून आहे.जी व्यक्ती नमाज़चे योग्य पालन करते तिच्यामध्ये ईश्वरनिष्ठ जबाबदारीचे जीवन जगण्याची भावना वृद्धिंगत होत जाते. आणि ईश्वरी आदेशाप्रमाणे आचरण करण्याचा मार्ग तिच्यासाठी सुलभ होतो. परंतु जी व्यक्ती नमाज़चे योग्यप्रकारे पालन करीत नाही तिच्यासाठी तो मार्ग कठीण होतो. कारण की त्या मार्गावर चालण्यासाठी जी जाणीव व भावना अपेक्षित असते ती त्या व्यक्तीमध्ये आढळून येत नाही.

३६७. नमाजची सुरक्षिततता याचा अर्थ हा आहे की नियमितपणे वेळेवर नमाज अदा करणे आणि कोणत्याही नमाजचा नाश (चुकू नये अगर रद्द ठरु नये) न होईल याबद्दल दक्ष असणे. इतकेच नव्हे तर, कठीण आणि धोका दायक परिस्थितीतही नमाज अदा करणे.

३६८. मूळात ''वस्सलातिल वुस्त'' हे शब्द वापरले गेले आहेत, ज्याचा अर्थ 'मधली नमाज़' असा आहे. याने अभिप्रेत असरची नमाज़ (दिवसाच्या चौथ्या प्रहरामध्ये अदा केली जाणारी नमाज़) आहे. खंदकाच्या लढाईच्या प्रसंगी पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) फर्माविले.

شَغَلُوْنَا عَنِ الصَّلٰوةِ الْوُسْطٰى صَلَاةِ الْعَصْرِ

''त्यानी आम्हाला इतके कार्यमग्न ठेविले की आमची सलाते वुस्त:, (असरची नमाज़) चुकली'' (मुस्लिम)

आणि 'तिरमिज़ी' मध्ये अब्दुल्लाह बिन मसऊद निवेदन करतात, की पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) फर्माविले.

صَلٰوةِ الْوُسْطٰى صَلٰوةِ الْعَصْرِ

''मधली नमाज़ म्हणजे असरची नमाज़''
(तिरमिजी नमाज़चे प्रकरण)

इस्लामने दिवसातून पांचवेळा नमाज़ अदा करणे कर्तव्य ठरविले आहे. याची सुरवात 'फज्र' (पहाटे) च्या नमाज़ने होते आणि शेवट 'इशा' (रात्री) च्या नमाज़ने होती.या दृष्टीने असरची नमाज़च मधली नमाज़ या संज्ञेस पात्र होते. असरची वेळ दिवसाच्या शेवटच्या भागात येते. या वेळी माणूस सामान्यपणे कामकाजात अधिक गुंतलेला असतो.या कार्यबाहुल्यातून वेळ काढून असरची नमाज़ अदा करणे एक कठीण काम आहे.याबद्दल जर विशेष दक्षता बाळगली गेली नाही तर नमाज़ची वेळ टळून जाण्याचा व ती अदा न होण्याची शक्यता असते. आणि म्हणून या नमाज़बद्दल विशेष दक्षता बाळगण्याची ताकीद केली गेली आहे.

३६९. हा नमाज़च्या आंतरिक गुणांच्याकडे इशारा आहे. म्हणजे ज्याप्रमाणे नमाज़च्या बाह्य शिष्टाचार व वेळांचे पालन करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे नमाज़च्या आंतरिक शिष्टाचाराच्या पालनाबद्दलही दक्ष असावयास हवे. नमाज़चे वास्तविक सार अल्लाह समोर नम्रता,शालीनता आणि त्याची याचना व प्रार्थना हे आहे. म्हणून जेव्हा नमाज़साठी उभे राहाल तेव्हा तुमच्या अंगी हीच अवस्था व तल्लीनता असावी व त्याच्याकडे तुमचे ध्यान असावे.

३७०. म्हणजे जर शत्रूने धोकादायक परिस्थिती निर्माण केलेली असेल आणि तुम्ही स्वार असा अगर पायी असा ज्या

स्थितीत असाल त्या स्थितीत नमाज़ अदा करा. जर किब्ल्याकडे तोंड करता येत नसेल तर ज्या दिशेकडे तोंड असेल त्या दिशेकडे ठेवून; आणि जर 'सजदा' करता येत नसेल तर जितके शिर नमविता येईल तितके नमवून, कोणत्याही परिस्थितीत वेळेवर नमाज़ अदा करणे आवश्यक आहे. आणि संकटाच्या परिस्थितीत नमाज़चे रक्षण हेच आहे की ज्याप्रकारे शक्य होईल त्याप्रकारे नमाज़ अदा करावी. ऐन युद्धामध्ये सैनिकांना नमाज़ अदा करण्याची ताकीद या गोष्टीचे अनुमान करण्यासाठी पुरेशी आहे की इस्लामची लढाईची कल्पना किती शुचिर्भूत आहे आणि इस्लाम धर्मयोद्धयांचे किती उच्च प्रशिक्षण करू इच्छित आहे.

या ताकीदपूर्ण हुकुमाने हे स्पष्ट होते की, जेव्हा युध्द प्रसंगी नमाज़ कज़ा (टाळली) जाऊ शकत नाही, याखेरीज की इशाऱ्याने हि नमाज़ पढण्याची संधी लाभत नसेल, तर त्याहून कमी दर्जाच्या सबबी उदा. प्रवास वगैरेत नमाज़ टाळण्याचा वाव कसा असू शकतो? वेळेवर नमाज़ पढणे अत्यावश्यक आहे व याच हेतुने शरीअतने मोकळीक व सुविधा दिली आहे अन्यथा नमाज़ टाळणे योग्य असते. तर या सवडी दिल्या गेल्या नसत्या.

३७१. येथे नमाज़ला अल्लाहचे स्मरण म्हणून संबोधिले गेले आहे. यावरून ही वस्तुस्थिती स्पष्ट होते की, नमाज़ पूर्णपणे अल्लाहचे स्मरण आहे.

३७२. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने दाखवून दिलेल्या पद्धतीप्रमाणे नमाज़ अदा करा. अल्लाहने नमाज़ची पद्धत पवित्र क़ुरआनच्या आणि आपल्या पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) शिकवणीच्या (सुन्नत) सहाय्याने दाखवून दिली आहे. क़ुरआनमध्ये नमाज संबंधी मूलभूत आदेश दिले गेले आहेत. आणि त्यांचा तपाशील व खुलासा हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सुन्नतमध्ये आहे. आणि म्हणून पैगंबरांनी फर्माविले.

صَلُّو كَمَارَأَيتَمُوُنِى اُصَلِّىُ۔ (مشكوٰة)

''अशा प्रकारे नमाज़ अदा करा ज्या प्रकारे तुम्ही मला नमाज़ अदा करताना पाहाता.''(मिश्कात)

यावरून स्पष्ट झाले की पैगंबरांची शिकवण ही अल्लाहचीच शिकवण आहे आणि क़ुरआनबरोबर सुन्नतचा संबंध अभेद्य आहे. व दोन्ही परस्परावर अवलंबित व एकदुसऱ्यास पुरक आहेत.

३७३. निवेदनक्रम नमाज़वर समाप्त झाला होता. यानंतर दोन आयतीमध्ये पुरवणीदाखल विधवा आणि तलाक दिलेल्या स्त्रियासंबंधी सर्वसाधरण शिकवण निवेदन केली गेली, जो खुलाशादाखल नंतर उतरली होती.

३७४. आयत न. २३४ मध्ये विधवा स्त्रीयांच्या इद्दती बद्दलचे निवेदन आले आहे. त्याच्यासंबंधी अधिक खुलाशादाखल ही शिकवण उतरली की पुरुषांनी आपल्या मृत्यूसमयी आपल्या पत्न्यासाठी,त्यांच्या एका वर्षाच्या अन्नवस्त्राची तरतूद व आपल्या घरामध्ये राहण्याची व्यवस्था, आपल्या मृत्यूपत्रात करावी. म्हणजे त्यांच्या मरणानंतर तात्काळ स्त्रीयांचेसमोर आपल्या अन्नवस्त्राची वराहण्याची व्यवस्था करण्याचे संकट उभे राहू नये. या व्यवस्थेनंतर, इद्दतची मुद्दत संपल्यावर जर स्त्रीया आपल्या मर्जीने नवऱ्याचे घर सोडून देतील तर त्यांना आपल्या राहण्याचा आणि दुसरा विवाह वगैरे संबंधी चांगल्या पद्धतीने निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आणि अशा परिस्थितीत मृताच्या वारसांनी त्यांना नवऱ्याच्या घरीच राहण्यास भाग पाडू नये.

**काय तुम्ही त्या लोकांच्या स्थितीवर विचार केला नाही, जे हजारोंच्या संख्येत असतादेखील मृत्यूच्या भयाने आपल्या घरांमधून निघून गेले ? अल्लाहने त्यांना फर्माविले मरा. मग त्याने त्यांना जिवंत केले. निःसंशय अल्लाह लोकांच्यावर फार मेहरबान आहे. परंतु बहुसंख्य लोक कृतज्ञता व्यक्त करीत नाहीत.** *(अल-क़ुरआन)*

२४१. आणि 'तलाक' देण्यात आलेल्या स्त्रीयांनाही चांगल्या पद्धतीने काही दिले पाहिजे [३७६] हा अल्लाहचे भय बाळगणाऱ्या लोकांवर हक्क [३७७] आहे.

وَلِلْمُطَلَّقٰتِ مَتَاعٌۢ بِالْمَعْرُوْفِ ۭ حَقًّا عَلَي الْمُتَّقِيْنَ ٢٤١

२४२. अशाप्रकारे अल्लाह आपल्या आज्ञा स्पष्ट करीत आहे कारण की तुम्ही समजावे.

كَذٰلِكَ يُبَيِّنُ اللّٰهُ لَكُمْ اٰيٰتِهٖ لَعَلَّكُمْ تَعْقِلُوْنَ ٢٤٢

२४३. काय [३७८] तुम्ही त्या लोकांच्या स्थितीवर विचार केला नाही, जे हजारोंच्या संख्येत असतादेखील मृत्यूच्या भयाने आपल्या घरांमधून निघून गेले ? अल्लाहने त्यांना फर्माविले मरा. मग त्याने त्यांना जिवंत [३७९] केले. नि:संशय अल्लाह लोकांच्यावर फार मेहरबान आहे. परंतु बहुसंख्य लोक कृतज्ञता व्यक्त करीत नाहीत.

اَلَمْ تَرَ اِلَى الَّذِيْنَ خَرَجُوْا مِنْ دِيَارِھِمْ وَھُمْ اُلُوْفٌ حَذَرَ الْمَوْتِ
فَقَالَ لَهُمُ اللّٰهُ مُوْتُوْا ۣ ثُمَّ اَحْيَاھُمْ ۭ اِنَّ اللّٰهَ لَذُوْ فَضْلٍ عَلَي
النَّاسِ وَلٰكِنَّ اَكْثَرَ النَّاسِ لَا يَشْكُرُوْنَ ٢٤٣

२४४. आणि अल्लाहच्या मार्गात युद्ध करा. आणि हे लक्षात ठेवा की अल्लाह सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे. [३८०]

وَقَاتِلُوْا فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ وَاعْلَمُوْٓا اَنَّ اللّٰهَ سَمِيْعٌ عَلِيْمٌ ٢٤٤

२४५. आणि कोण आहे जो अल्लाहला चांगले कर्ज़ देईल की जे अल्लाह त्याला कितीतरी पटीने वाढवून परत करील ? [३८१] अल्लाह टंचाईही देतो आणि विपुलताही [३८२] आणि त्याच्याचकडे तुम्हाला परत पाठविले जाईल.[३८३]

مَنْ ذَا الَّذِيْ يُقْرِضُ اللّٰهَ قَرْضًا حَسَنًا فَيُضٰعِفَهٗ لَهٗٓ اَضْعَافًا
كَثِيْرَةً ۭ وَاللّٰهُ يَقْبِضُ وَيَبْصُۜطُ ۠ وَاِلَيْهِ تُرْجَعُوْنَ ٢٤٥

२४६. काय तुम्ही बनी इसराईलांच्या सरदारांच्या त्या घटनेवर [३८४] विचार नाही केला जी हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) नंतर घडली ?[३८५] त्यांनी आपल्या पैगंबरांना [३८६] (नबीना) सांगितले की आमच्यासाठी एक बादशाह नियुक्त करा की आम्ही अल्लाहच्या मार्गात युद्ध करू[३८७]ते म्हणाले, असे होऊ नये की तुम्हांला युद्ध करण्याचा हुकूम दिला जाईल आणि मग तुम्हीं युद्ध करणार नाही. सांगू लागले. आम्ही अल्लाहच्या मार्गात की लढणार नाही, जेवहा आम्हांला आमच्या घरा मधून काढून टाकण्यात आले आहे आणि मुलाबाळापासून दूर केले गेले आहे ? पण जेव्हा त्यांना युद्धाचा हुकूम दिला गेला तेव्हा अत्यंत थोडे लोक सोडून इतर सर्वजण पालटले आणि अल्लाह अत्याचारी लोकांना चांगल्याप्रकारे जाणतो.

اَلَمْ تَرَ اِلَى الْمَلَاِ مِنْۢ بَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ مِنْۢ بَعْدِ مُوْسٰى ۘ اِذْ
قَالُوْا لِنَبِىٍّ لَّهُمُ ابْعَثْ لَنَا مَلِكًا نُّقَاتِلْ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ ۭ قَالَ
هَلْ عَسَيْتُمْ اِنْ كُتِبَ عَلَيْكُمُ الْقِتَالُ اَلَّا تُقَاتِلُوْا ۭ قَالُوْا
وَمَا لَنَآ اَلَّا نُقَاتِلَ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ وَقَدْ اُخْرِجْنَا مِنْ
دِيَارِنَا وَاَبْنَاۗىِٕنَا ۭ فَلَمَّا كُتِبَ عَلَيْهِمُ الْقِتَالُ تَوَلَّوْا اِلَّا قَلِيْلًا
مِّنْهُمْ ۭ وَاللّٰهُ عَلِيْمٌۢ بِالظّٰلِمِيْنَ ٢٤٦

३७५. अल्लाह प्रभावशाली आहे आणि म्हणून शरीअतीचे आदेश देण्याचा त्यालाच अधिकार आहे. आणि तो बुद्धिमान आहे म्हणून त्याचे आदेश बुद्धिनिष्ठ व हितावह आहेत.

३७६. मूळ ग्रंथात 'मताअ' हा शब्दप्रयोग झाला आहे. याचा अर्थ 'लाभदायक गोष्ट असा आहे. हा अर्थ निर्वाह ला हि लागू पडतो. ज्याप्रमाणे वर आयत क्र. २४० मध्ये लागू पडला आहे. (म्हणजे अशा लोकांना जे मरणासन्न झाले आहेत, ही अज्ञा दिली गेली आहे की त्यांनी आपल्या पत्नीच्या हक्कात असे मृत्युपत्र करावे की त्यांना एक वर्षापावेतो 'मताअ'(निर्वाह खर्च) दिला जावा आणि तलाक प्रसंगी दिल्या जाणाऱ्या निरोपाच्या नजराण्यावर त्याला 'मताअे-तलाक' म्हटले जाते. आयत क्र. २३६ मध्ये (त्यांना निर्वाह-खर्च द्या/लाभ पोहचवा) शी अभिप्रेत निरोपाचा नजराणाच होय.

आता प्रश्न हा उद्‌भवतो की भाष्यांतर्गत आयतीत मतआ शी अभिप्रेत काय आहे? या संदर्भात इमाम राज़ी यांनी आपल्या भाष्यात दोन्ही कथनांचा उल्लेख केला आहे आणि निर्वाहच्या अर्थास प्राधान्य दिले आहे (पहा - अत्तफसीरुल-कबीर खंड ६ पृष्ठ १६१ तथापि निर्वाह अर्थ घेण्याच्या स्थितीत इद्दती पर्यंतचा निर्वाहच अभिप्रेत घेतला जाऊ शकतो कारण सूरह तलाक मध्ये तलाक़ दिल्या गेलेल्या स्त्रीयांवर त्यांचा इद्दत-अवधि पूर्ण होईपर्यंत खर्च करण्याचा आदेश दिला गेला आहे. यास्तव ज्या भाष्याकारांनी मताअचा अर्थ निर्वाह असा घेतला आहे. त्यानी ही गोष्ट इद्दत पर्यंतच्या निर्वाहास ग्राह्य धरुनच म्हटली आहे. अन्यथा कोणत्याहि भाष्यकाराने असे म्हटले नाही की या आयतीच्या अनुषंगाने परित्यक्त स्त्री करीता दुसऱ्या विवाहापर्यंत वा आयुष्यभर निर्वाह बंधनकारक आहे.

सर्व सामान्यात: भाष्यकरांनी या आयतीत मताअचा अर्थ निरोपाच्या वेळी दिला जणारा नजराणा हा घेतला आहे. आणि हीच गोष्ट उचित वाटते कारण पवित्र क़ुरआनात इतर ठिकाणीहि ही आज्ञा दिली गेली आहे की तलाक-स्थितीत स्त्रियांना कोणता न कोणता लाभ पोहचवा व त्यांना भल्या रीतीने निरोप द्या. निरोपाच्या वेळी दिला जाणारा हा नजराणा स्त्रीच्या दृष्टीने सांत्वन कारक व तिच्या जखमेवर मलम लावण्यासारखे आहे जी तलाक द्वारे तिला पोहचली.

हा 'मताअ' प्रत्येक परित्यक्ते करीता बनधनकारक आहे कारण आयतीत सर्वसामान्यात: तलाक दिल्या गेलेल्या स्त्रीयांना मताअ देण्याचा आदेश दिला गेला आहे. तसेच ही आज्ञा तलाक चे आदेश वर्णिल्यानंतर शेवटी दिली गेली आहे. जी समारोपीय स्वरुपाची आज्ञा होय. यास्तव हा आदेश प्रत्येक प्रकारच्या परित्याक्ता स्त्रीयांना लागू पडतो आणि ज्या तंबीसह ही आज्ञा दिली गेली आहे त्यावरुन तिचे समर्थनहि होते. भाष्यकारांचे प्रमुख इब्ने जरीर तबरी लिहीतात की

'माझ्या मते या समस्येबाबत अधिक योग्य कथन अशा व्यक्तिचे आहे जी प्रत्येक प्रकारच्या परित्यक्ता स्त्रीयांकरीता मताअ देणे मान्य करते कारण...... सर्वश्रेष्ठ अल्लाहने हा हक्क प्रत्येक परित्येक्ते करीता निर्धारीत केला आहे आणि त्यांच्यापैकी कोणत्याहि प्रकारच्या परित्यक्तेस खास ठरविले नाही.'

(जामेऊल् बयान-खंड ६ पृष्ठ-३३१)

राहीले 'मताअ' चे प्रमाण तर पवित्र क़ुरआनाने एखादे निश्चित प्रमाण ठरवून दिलेले नाही, किंबहुना भल्या रीतीने देण्याचा आदेश दिला आहे ज्याचा अर्थ असा की पुरुषाने आपल्या योग्यतेनुसार असा नजराणा द्यावा, जो यथायोग्य व दयाळू निती व्यक्त करणारा असावा. भूतकाळात जर परुष आपल्या घटस्फोटीत स्त्रीला सेवेकरिता गुलाम उपलब्ध करुन देत राहिला तर. आजच्या काळात जेव्हा परित्यक्तेच्या निर्वाह-खर्चाची समस्या, काळाची एक गंभिर व महत्त्वपूर्ण समस्या बनली आहे. एखादी अशी वस्तू भेट म्हणून देणे जी परित्यक्ते करीता उत्पन्नाचे साधन ठरावे किंवा इद्दत नंतर पुरुषाचे स्वखुशीने परित्येकच्या निर्वाहाची व्यवस्था करणे एक उत्तम गोष्ट ठरेल.

३७७. हे शब्द स्पष्टपणे बंधनकारकतेस प्रमाणित करतात. अर्थात प्रत्येक प्रकारच्या परित्यक्तेस मताअ (निरोपाचा नजराणा) देणे, आपल्या मनात अल्लाहचे भय बाळगणाऱ्या प्रत्येक माणसा करीता बंधकारक आहे. हा ताकीदपूर्ण आदेश आहे म्हणून ज्या फ़ुकहा (धर्मशास्त्रवेत्यां) यास केवळ पुनीत या अर्थाने घेतात तर त्यांच्याशी सहमत होता येणार नाही आणि जेथपावेतो विविध भाष्यांचा संबंध आहे, सर्वात प्राचीन भाष्य इब्ने जरीर तबरी (वफात ३१० हिजरी) यांचे आहे. प्रत्येक परित्यक्तेस मताअ- तलाक (निरोपाच्या वेळी दिला जाणारा नज़राणा) बंधनकारक आहे या गोष्टीस ते मान्य करतात (पहा-जामेऊल बयान फी तफसीरुल् क़ुरआन खंड -२ पृष्ठ ३३१)

अत्यंत खेदाची बाब अशी की या ताकीदपूर्ण आदेशास मुसलमान अशा प्रकारे विसरले आहेत की जणू पत्नींना आपल्या पासून विभक्त करण्या करीता 'तलाक' ह्या शब्दाचा उच्चार करणे पुरेसे आहे, व त्यांना ज्या अत्यावश्यकतेसह निरोप देण्याची नैतिक व शरीयत संबंधीची जबाबदारी आपल्याला लागू पडत नाही असे ते समजतात. या चुकीच्या विचार सरणीने अनेक सामाजिक समस्यांना जन्म दिला आहे.

क़ुरआनच्या आदेशाकडे त्यांनी मनः पूर्वक लक्ष दिले असते तर फार बरे झाले असते.

३७८. येथून पुन्हा निवेदनाचा क्रम 'जिहाद' व 'इनफ़ाक' कडे वळत आहे,ज्याची सुरवात खानअे काबाला अनेकेश्वरवाद्यांच्या ताब्यातून मुक्त करण्यासंबंधी झाली होती.मध्यंतरी ते प्रश्न निवेदन केले गेले जे त्यावेळच्या परिस्थितीमूळें निर्माण झाले होते.

जिहादसंबंधी येथे बनी इसराईल च्या इतिहासातील एका घटनेचा उल्लेख करून धडा शिकविला गेला आहे.

३७९. येथे बनी इसराईल समाजाच्या इतिहासातील एका घटनेकडे इशारा केला गेला आहे; ज्याचा उल्लेख प्रचलित तौरातमध्ये-१ शमुवेल-आहे. समुईल (Samuel) पैगंबराच्या कालात, (इसवी सनापूर्वी ११ व्या शतकात) बनी इसराईल समाजाची धार्मिक, नैतिक आणि राजकीय परिस्थिती फार विघडलेली होती. चोहींकडून त्यांना घेरलेले होते. आणि त्यांचा प्रतिकार करण्याची हिंमत त्या समाजात नव्हती. पॅलेस्टीनी लोकांनी त्यांना भयग्रस्त करून ठेविले होते. आणि त्यांच्याकडून त्यांनी (पॅलेस्टीनी लोकांनी) ती पेटीही हिसकावून नेली होती जिला ते पवित्र समजत असत. आणि बनी इसराईल समाजाने आपली कित्येक शहरे खाली करून पळ काढला होता. ही नैतिक अधोगती वीस वर्षापर्यंत होत राहिली. परंतु समुईल (शमुवेल) पैगंबरांच्या सुधारक प्रयत्नांमुळे त्यांच्यामध्ये धार्मिक, नैतिक व राजकीय जागृती निर्माण झाली आणि आपल्या ज्या शहराना खाली करून त्यानी पळ काढला होता, ती परत घेण्यास ते समर्थ झाले. तौरात मधील खालील उताऱ्याचे अवलोकन व्हावे.

''मग पलिष्टी लढले आणि इसराईल लोक पराभव पावून सगळे आपआपल्या डेऱ्याकडे पळून गेले; त्यांची एवढी मोठी कत्तल झाली की इसराईलचे तीस हजार पायदळ कामास आले. परमेश्वराच्या कराराचा कोश हस्तगत झाला''

(पवित्रशास्त्र. १ शमुवेल ४: १०,११)

''तेव्हा शमुवेलाने अवघ्या इसराईल लोकांस सांगितले, तुम्ही मनापूर्वक परमेश्वराकडे वळला आहा तर तुमच्यातील अन्य देव व अष्टारोथ यास दूर करा आणि परमेश्वराकडे आपले चित्त लावून केवळ त्याचीच उपासना करा, म्हणजे तो तुम्हाला पलिष्ट्यांच्या हातातून सोडवील. मग इसराईल लोक बआल देव अष्टारोथ यास दूर करून केवळ परमेश्वराची उपासना करू लागले.'' (१ शमुवेल ७:३,४)

या प्रकारे पलिष्टी पराजित झाल्यावर ते पुन्हा इसराईलच्या मुलुखात आले नाहीत; आणि शमुवेलच्या सगळ्या हयातीत परमेश्वराचा हात पलिष्ट्यांवर होता. अेक्रोनापासून गथपर्यंत जी नगरे पलिष्ट्यांनी इसराईलपासून घेतली होती ती पुन्हा त्यांच्या ताब्यात आली.''(१ शमुवेल ७:१३, १४)

आयतीमध्ये बनी इसराईल यांच्या याच उत्कर्ष व अवनतीकडे इशारा आहे असे दिसते. त्यांच्या धार्मिक, नैतिक व राजकीय अधोगतीस 'मरण' आणि त्यांच्या निर्धार, हिमत व शूरवृत्तीने ईश्वरनिष्ठ जीवन जगण्यास 'जीवन' असे संबोधले गेले आहे. या घटनेचा येथे उल्लेख करण्याचा हेतू ईमान आणलेल्या लोकांना जिहाद करण्यास प्रवृत्त करणे हा आहे. बनी इसराईलची घटना पॅलेस्टाइनच्या पवित्र भूमिसंबंधी होती. आणि येथे ईमान आणलेल्यांना ज्या लढाईसाठी प्रवृत्त केले जात आहे तिचा संबंध मक्केच्या पवित्र भूमीशी आहे.त्याचप्रमाणे मुसलमानांना ही जाणीव करून दिली जात आहे की जर ते मरणाचे भय बाळगतील तर ते त्यांचे धार्मिक, नैतिक व राजकीय मरण होईल आणि जर ते मरणाबद्दल बेपर्वा होऊन जिहाद करतील तर जीवनाच्या खऱ्या दौलतीचा त्यांना लाभ होईल. आणि त्यांना मानमरातब व प्रतिष्ठा लाभेल.

३८०. म्हणून तो तुमचे गाऱ्हाणे ऐकेल आणि तुमची मदत करील. इतकेच नव्हे तर तुमच्या त्यागाचा तुम्हाला पूरेपूर मोबदला पण देईल

३८१. अल्लाहच्या मार्गात जे धन खर्च केले जाईल त्याला अल्लाहला दिलेले कर्ज अशी उपमा दिलेली आहे. ही अलंकारयुक्त अशी निवेदन शैली आहे. येथे हे स्पष्ट करण्याचा हेतू आहे की तुम्ही जे काही अल्लाहच्या मार्गात खर्च कराल ते अल्लाहजवळ सुरक्षित राहील. आणि मोबदल्याच्या दिवशी (निर्णयाच्या शेवटच्या दिवशी) तो याला कितीतरी पटीने वाढवून ते तुम्हाला परत करील आणि म्हणून हा व्यवहार तोट्याचा नसून भरपूर फायद्याचा आहे.

'क़र्जे हसन' म्हणजे असे कर्ज जे सरळपणाने आणि औदार्याने निव्वळ अल्लाहची कृपा संपादन करण्यासाठी दिले जाते. आणि आपल्या आवडत्या व चांगल्या (हलाल) कमाईमधून दिले जाते.

३८२. म्हणजे उपजीविकेमध्ये कमतरता व विपुलता निर्माण करणे अल्लाहच्याच अधिकारात आहे म्हणून कमरतेच्या भयाने अल्लाहच्या मार्गात खर्च न करणे ही पद्धत योग्य नाही.

३८३. म्हणून खरी चिंता आखिरतची असावयास हवी; जेथे सर्वांना जाब द्यावा लागणार आहे.

३८४. येथे बनी इसराईलच्या इतिहासातील दुसऱ्या एका घटनेचे निवेदन केले जात आहे. याचा हेतू मुसलमानाना त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनासंबंधी अत्यंत महत्वाची शिकवण देणे हा आहे.

३८५. म्हणजे इसवी सनापूर्वी जवळजवळ अकराशे वर्षे.

३८६. अभिप्रेत प्रेषित समुइल (शमुवेल) आहेत, जे पॅलेस्टाइनच्या डोंगराळ भागात 'एफ्राइम' मध्ये राहत होते. त्यांचा काल इ. स. पूर्वी ११ शे हा आहे.

३८७. त्या वेळी बनी इसराईलची पुष्कळशी शहरे त्यांच्या शत्रूंच्या ताब्यात होती. आणि म्हणून लढाईच्या मार्गाने आपली शहरे परत मिळविण्याची त्यांची इच्छा होती त्यावेळी समुवेल प्रेषित फार म्हातारे झाले होते. म्हणून त्यांनी त्यांना अशी विनंती केली की त्यांनी एक असा बादशहा नियुक्त करावा. ज्यांच्या देखरेखीखाली लढाई करता येईल.

२४७. त्यांच्या पैगंबरानी त्यांना सांगितले की अल्लाहने तुमच्यासाठी [३८८] 'तालूत'ला बादशाह [३८९] नियुक्त केला आहे. म्हणाले त्याला आमच्यावर बादशाहीचा काय हक्क? त्याच्यापेक्षा बादशाहीचे अधिक हक्कदार तर अम्ही आहोत. आणि त्याच्याजवळ धनदौलतीची विपुलतासुद्धा नाही.पैगंबरानी सांगितले की अल्लाहने तुमच्यावर शासन करण्यासाठी त्याला निवडले आहे.आणि त्याला भरपूर ज्ञान व शारीरिक पात्रता प्रदान केली आहे.[३९०] अल्लाह ज्याला इच्छिल त्याला अधिकार (राज्य) देईल. अल्लाह सर्वव्यापी व सर्वज्ञ आहे.[३९१]

وَقَالَ لَهُمْ نَبِيُّهُمْ اِنَّ اللّٰهَ قَدْ بَعَثَ لَكُمْ طَالُوْتَ مَلِكًا ؕ
قَالُوْٓا اَنّٰى يَكُوْنُ لَهُ الْمُلْكُ عَلَيْنَا وَنَحْنُ اَحَقُّ بِالْمُلْكِ
مِنْهُ وَلَمْ يُؤْتَ سَعَةً مِّنَ الْمَالِ ؕ قَالَ اِنَّ اللّٰهَ اصْطَفٰىهُ
عَلَيْكُمْ وَزَادَهٗ بَسْطَةً فِى الْعِلْمِ وَالْجِسْمِ ؕ
وَاللّٰهُ يُؤْتِىْ مُلْكَهٗ مَنْ يَّشَآءُ ؕ وَاللّٰهُ وَاسِعٌ عَلِيْمٌ ﴿۲۴۷﴾

२४८. आणि त्यांच्या पैगंबराने त्यांना सांगितले की तालूतला बादशाह नियुक्त केले गेले आहे याची खूण ही आहे की तुमच्याजवळ ती पेटी येईल जिच्यामध्ये तुमच्या पालनकर्त्याकडून समाधानाचे सामान आणि मूसा यांच्या व हारुन यांच्या कुटुंबियांनी सोडलेली स्मरणचिन्हे असतील. या पेटीला फिरिश्त्यांनी उचलून धरलेले असेल. [३९२] तुमच्यासाठी ही मोठी खूण आहे. जर तुम्ही मोमिण (ईमान बाळगणारे) असाल.

وَقَالَ لَهُمْ نَبِيُّهُمْ اِنَّ اٰيَةَ مُلْكِهٖٓ اَنْ يَّاْتِيَكُمُ التَّابُوْتُ فِيْهِ
سَكِيْنَةٌ مِّنْ رَّبِّكُمْ وَبَقِيَّةٌ مِّمَّا تَرَكَ اٰلُ مُوْسٰى وَاٰلُ هٰرُوْنَ
تَحْمِلُهُ الْمَلٰٓئِكَةُ ؕ اِنَّ فِىْ ذٰلِكَ لَاٰيَةً لَّكُمْ اِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِيْنَ ﴿۲۴۸﴾

२४९. मग जेव्हा तालूत सैन्याला घेऊन निघाला [३९३] तेव्हा त्याने सांगितले की अल्लाह एका नदीच्या [३९४] द्वारे तुमची परीक्षा घेणार आहे. जो कोणी तिचे पाणी पीईल तो माझा साथीदार नव्हे आणि जो ते चाखणार नाही तोच माझा साथीदार आहे. तथापि एखाद्याने आपल्या हाताने ओजळभर पाणी घेतल्यास हरकत नाही. परंतु थोडे लोक सोडून, इतर सर्वजण त्यामधून पाणी प्याले.[३९५] नंतर तालूत व त्याचे ईमानधारक साथीदार नदी पार करून गेले. तेव्हा हे (पाणी प्यालेले लोक) म्हणू लागले. की आज आमच्याकडे जालूत [३९६] व त्याच्या सैन्याचा सामना करण्याची शक्ति नाही.[३९७] परंतु ज्या लोकांना ही जाणीव होती की त्यांना अल्लाहला भेटावयाचे आहे, त्यांनी सांगितले की, कितीतरी लहानसहान गट अल्लाहच्या कृपेने मोठमोठ्या गटांवर विजयी झाले आहेत.आणि अल्लाह धैर्यवान लोकांच्या बरोबर आहे.[३९८]

فَلَمَّا فَصَلَ طَالُوْتُ بِالْجُنُوْدِ ۙ قَالَ اِنَّ اللّٰهَ مُبْتَلِيْكُمْ بِنَهَرٍ ۚ
فَمَنْ شَرِبَ مِنْهُ فَلَيْسَ مِنِّىْ ۚ وَمَنْ لَّمْ يَطْعَمْهُ فَاِنَّهٗ مِنِّىْٓ اِلَّا مَنِ
اغْتَرَفَ غُرْفَةًۢ بِيَدِهٖ ۚ فَشَرِبُوْا مِنْهُ اِلَّا قَلِيْلًا مِّنْهُمْ ؕ فَلَمَّا جَاوَزَهٗ
هُوَ وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا مَعَهٗ ۙ قَالُوْا لَا طَاقَةَ لَنَا الْيَوْمَ بِجَالُوْتَ وَجُنُوْدِهٖ ؕ
قَالَ الَّذِيْنَ يَظُنُّوْنَ اَنَّهُمْ مُّلٰقُوا اللّٰهِ ۙ كَمْ مِّنْ فِئَةٍ قَلِيْلَةٍ
غَلَبَتْ فِئَةً كَثِيْرَةًۢ بِاِذْنِ اللّٰهِ ؕ وَاللّٰهُ مَعَ الصّٰبِرِيْنَ ﴿۲۴۹﴾

३८८. बायबलमध्ये तालूतचे नांव (Saul)''शौल'' असे आले आहे. तो बनी इसराईलच्या एका लहानशा कबील्याचा (कबीला बिन यमीनचा) तीस वर्षाचा तरुण होता. आणि इतका धिप्पाड व उंचा उंच होता की लोक त्याच्या खांद्याला लागत.

३८९. मूळात ''मलिक'' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ अधिकार बाळगणारा असा आहे. येथे अभिप्रेत अनियंत्रित हुकूमशहा (Absolute Monarch) (नव्हे तर अशी अधिकारसंपन्न व्यक्ति जी अल्लाहच्या सार्व भौमत्वाचा स्वीकार करून शरीअतीच्या मर्यादेमध्ये राहून आपल्या अधिकाराचा वापर करते. तालूतना अल्लाहने बादशाह नियुक्त केले होते. ज्याची घोषणा अल्लाहचे पैगंबर हज़रत समुईलनी केली होती. त्यांना बादशाह नियुक्त करण्याचा खरा उद्देश हा होता की त्यांच्या नेतृत्वाखाली बनी इसराईल लोकांनी जिहाद (धर्मयुद्ध) करावा आणि आपला तो प्रदेश परत घ्यावा ज्यांच्यावर अमालेका ने कब्जा केलेला होता. यावरून उघड होते की तालूतची नियुक्ती निव्वळ राज्यकारभार करण्यासाठी नव्हे तर धार्मिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी होती. आणि म्हणून याला ''हुकूमशाही'' समान लेखणे योग्य नाही.

३९०. बनी इसराईलना तालूतच्या राजा म्हणून झालेल्या नियुक्तिवर यासाठी आक्षेप होता की त्यांचा संबंध अशा एका लहान कबील्याशी (टोळी) होता, जो प्रभावी नव्हता व श्रीमंतही नव्हता. त्याचे उत्तर समुईल पैगंबरांनी हे दिले की ही अल्लाहची निवड आहे. तो नेतृत्वासाठी श्रीमंती व प्रभावाचा नव्हे तर ज्ञान व आचरणाचा विचार करतो. आणि त्यादृष्टीने तालूत अत्यंत योग्य अशी व्यक्ति आहे.

त्यावेळी लढाई तोंडावर आलेली होती. आणि म्हणून अशा व्यक्तिची आवश्यकता होती जी सैन्यांचे नेतृत्व करू शकेल व उत्कृष्ट अशा युद्धपद्धतीचा अवलंब करू शकेल. तालूतने अधिकार हाती घेतल्यानंतर जे विजय प्राप्त झाले त्यावरून हे सिद्ध झाले की त्यांची नियुक्ती अत्यंत योग्य होती.

३९१. म्हणजे तुमची दृष्टी संकुचित व तुमचे ज्ञान मर्यादित आहे. परंतु अल्लाहची दृष्टी विशाल व त्याचे ज्ञान अमर्याद आहे. म्हणून त्यच्या निर्णयाला तुमच्या निर्णयावरून कयास करू नका.

३९२. या पेटीचे नांव बायबलमध्ये ''ईश्वराची पेटी'' असे आले आहे. या पेटीला बनी इसराईल लोकांच्या दृष्टीने फार महत्व होते. कारण तिच्यामध्ये हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) व हज़रत हारून (अलैहिस्सलाम)यांची स्मारक-चिन्हे, उदाहरणार्थ त्या पाट्या होत्या ज्यांच्यावर दहा आज्ञा (Ten Commandments) कोरलेले होते; तौरातची मूळ पत्र आणि मूसा (अलैहिस्सलाम) यांची लाठी यासारख्या वस्तू होत्या. या वस्तू म्हणजे सत्याच्या विजयाची प्रतिके होती. आणि म्हणून ती पाहून मनोधैर्य वाढत असे. पॅलेस्टनी लोकांनी एका लढाईच्या वेळी बनी इसराईल कडून ही पेटी हस्तगत केली होती. त्यामुळे त्यांचे मनोधैर्य खचले होते. हज़रत समुईलनी तालूतला अल्लाहने नियुक्त केले आहे. या गोष्टीची खूण म्हणून हे सांगितले होते की त्याच्या कारकीर्दीत ती पेटी परत आणली जाईल. ही भविष्यवाणी खरी झाली आणि घटना ही घडली की ज्या लोकांनी ही पेटी हस्तगत करून नेली होती त्यांच्या प्रदेशात साथी पसरल्या. त्यांनी यामुळे आणि बहुतकरून लढाईच्या संकटापासून वाचण्यासाठी पेटी परत करणेच अधिक योग्य समजले. त्यांनी दोन गायींच्या एका गाडीवर पेटी ठेवून गाडीवानशिवाय ती गाडी बनी इसराईल यांच्या प्रदेशाकडे हाकली. यांची उल्लेख बायबलमध्ये खालीलप्रमाणे आहे.

''त्याप्रमाणे त्या लोकांनी केले; त्यांनी दोन दुभत्या गाई घेऊन गाडीस जुपल्या आणि त्यांची वासरे घरी कोंडून ठेविली. त्या गाडीवर परमेश्वराचा कोश आणि सोन्याचे उंदीर व ग्रंथीच्या प्रतिमा आत असलेला करंडा ठेविले. त्या गाईनी थेट बेथ-शेमेशचा रस्ता धरिला; रस्त्याने त्या हंबरत गेल्या. उजवी-डावीकडे गेल्या, वाळल्या नाहीत; पलिष्ट्यांचे सरदार त्यांच्यामागे बेथ -शेमेशच्या सीमेपर्यंत गेले. याप्रसंगी बेथ-शेमेशचे लोक खोऱ्यात गव्हाची कापणी करीत होते; त्यांनी वर नजर करून पाहिले तो त्यांच्या दृष्टीस कोश पडला; तो पाहून त्यास आनंद झाला.''

(१ शमुवेल ६:१० ते १३)

गाडीवान नसताना गायीचे बनी इसराईलच्या प्रदेशात ठीकठीक पोहचणे फिरिश्त्यांच्या मार्गदर्शनाशिवय शक्य नव्हते. आणि म्हणून (फिरिश्त्यांनी तिला उचलून घेतलेले असेल) असे म्हटले गेले आहे.

३९३. सामना पॅलेस्टीनी अनेकेश्वरवाद्यांशी होता ज्यांनी बनी इसराईलच्या प्रदेशावर बळजबरीने कबजा केला होता.

३९४. बहुधा जार्डन नदी अभिप्रेत आहे.

३९५. ही आज्ञा, सैन्याची शिस्त व नैतिक संयम यांची परीक्षा घेण्यासाठी देण्यात आली होती. या परीक्षेत संपूर्ण यशासाठी ही अट होती की नदीचे पाणी चाखले देखील जाऊ नये. तरीपण चुळभर पाणी माफीस पात्र समजले गेले होते. या परीक्षेत फार थोडे लोक यशस्वी झाले.

३९६. जालूत हा एक पॅलेस्टीनी पहिलवान होता. तो

सुदृढ असून लढाईत निपुण होता. तो पॅलेस्टीनी सैन्याचा मुख्य सेनापती होता. बायबल मध्ये त्याचे नांव गल्याथ (Goliath)असे आले आहे.

३९७. हे त्या लोकांचे उद्‌गार आहेत जे पोटभर पाणी प्याले आणि परिक्षेत अयशस्वी झाले.

३९८. म्हणजे निर्धाराने व धैर्याने वागा यामुळे अल्लाहचे सहाय्य लाभेल. आणि लढाईमधील यश अल्लाहच्या सहाय्यावर व मदतीवर व अवलंबून आहे. विपुलतेवर व कमतरतेवर नाही. इतिहास, लहान संख्येच्या लोकांनी मोठ्या संख्येच्या लोकांवर विजय प्राप्त केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**आणि जेव्हा ते जालूत व त्याच्या सैन्याशी सामना करण्यासाठी आले तेव्हा त्यांनी प्रार्थना केली की हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हांला सहनशक्ती दे. आमचे पाय दृढपणे टिकव आणि इन्कार करणाऱ्या (काफिर) लोकांवर आम्हांला विजयी कर. (अल-क़ुरआन)**

२५०. आणि जेव्हा ते जालूत व त्याच्या सैन्याशी सामना करण्यासाठी आले तेव्हा त्यांनी प्रार्थना केली की हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हांला सहनशक्ती दे. आमचे पाय दृढपणे टिकव आणि इन्कार करणाऱ्या (काफिर) लोकांवर आम्हांला विजयी कर.

وَلَمَّا بَرَزُوا لِجَالُوتَ وَجُنُودِهٖ قَالُوا رَبَّنَآ أَفْرِغْ عَلَيْنَا صَبْرًا
وَّثَبِّتْ أَقْدَامَنَا وَانْصُرْنَا عَلَى الْقَوْمِ الْكٰفِرِيْنَ ﴿٢٥٠﴾

२५१. शेवटी अल्लाहच्या आज्ञेने, त्यांनी त्यांचा पराभव केला आणि दाऊदनी [३९९] जालूतला ठार केले. आणि अल्लाहने त्यांना (दाऊदना) राज्यपदाने व चातुर्याने उपकृत केले.आणि ज्या ज्या वस्तुंचे इच्छिले त्याचे ज्ञान त्यांना दिले.[४००]अल्लाह जर एका गटाचा दुसऱ्या गटाकडून पाडाव करीत राहीला नसता तर जमीन अनाचाराने भरली असती. परंतु अल्लाह जगाच्या लोकांवर फार मेहरबान आहे.[४०१]

فَهَزَمُوْهُمْ بِإِذْنِ اللّٰهِ ۙ وَقَتَلَ دَاوٗدُ جَالُوْتَ وَاٰتٰىهُ اللّٰهُ الْمُلْكَ
وَالْحِكْمَةَ وَعَلَّمَهٗ مِمَّا يَشَآءُ ۗ وَلَوْلَا دَفْعُ اللّٰهِ النَّاسَ
بَعْضَهُمْ بِبَعْضٍ لَّفَسَدَتِ الْأَرْضُ وَلٰكِنَّ اللّٰهَ
ذُوْ فَضْلٍ عَلَى الْعٰلَمِيْنَ ﴿٢٥١﴾

२५२. (हे मुहम्मद !) या अल्लाहच्या आयती आहेत, ज्या आम्ही तुम्हांला ठीक ठीक एकवित आहोत. आणि निःसंशय तुम्हीं पैगंबरांपैकी आहात. [४०२]

تِلْكَ اٰيٰتُ اللّٰهِ نَتْلُوْهَا عَلَيْكَ بِالْحَقِّ ۗ وَإِنَّكَ لَمِنَ
الْمُرْسَلِيْنَ ﴿٢٥٢﴾

२५३. हे पैगंबर आहेत,[४०३] ज्यांना आम्ही एकदुसऱ्यावर प्राधान्य दिले.[४०४] त्यांच्यापैकी कोणी असा होता ज्याच्याबरोबर स्वतः अल्लाहने संभाषण केले. आणि काहींचे दर्जे वाढविले आणि आम्ही मरीयमचा पुत्र ईसा यांना उघड निशाण्या प्रदान केल्या आणि पवित्र आत्म्याद्वारे [४०५] त्यांची मदत केली. अल्लाह ने इच्छिले असते तर जे लोक या पैगंबराचेनंतर झाले ते या उघड निशाण्या आल्यानंतर आपसात लढले नसते. परंतु त्यांनी मतभेद केला. मग कोणी ईमान आणले व कोणी इन्कार केला. जर अल्लाह इच्छितो तर हे शक्य नव्हते की ते आपसात लढले असते. परंतु अल्लाह जे इच्छितो ते करतो. [४०६]

تِلْكَ الرُّسُلُ فَضَّلْنَا بَعْضَهُمْ عَلٰى بَعْضٍ ۘ مِنْهُمْ
مَّنْ كَلَّمَ اللّٰهُ وَرَفَعَ بَعْضَهُمْ دَرَجٰتٍ ۗ وَاٰتَيْنَا عِيْسَى ابْنَ
مَرْيَمَ الْبَيِّنٰتِ وَأَيَّدْنٰهُ بِرُوْحِ الْقُدُسِ ۗ وَلَوْ شَآءَ اللّٰهُ مَا اقْتَتَلَ
الَّذِيْنَ مِنْ بَعْدِهِمْ مِّنْ بَعْدِ مَا جَآءَتْهُمُ الْبَيِّنٰتُ وَلٰكِنِ اخْتَلَفُوْا
فَمِنْهُمْ مَّنْ اٰمَنَ وَمِنْهُمْ مَّنْ كَفَرَ ۗ وَلَوْ شَآءَ اللّٰهُ مَا اقْتَتَلُوْا ۗ
وَلٰكِنَّ اللّٰهَ يَفْعَلُ مَا يُرِيْدُ ﴿٢٥٣﴾

२५४. हे ईमान आणलेल्या लोकांनो !जे काही आम्ही तुम्हाला प्रदान केले आहे त्यामधून खर्च करा. तो दिवस येण्यापूर्वी ज्या दिवशी न खरेदीविक्री होईल, न मैत्री कामास येईल आणि न शिफारस चालेल.[४०७] आणि इन्कार (कुफ्र) करणारेच खरे अत्याचारी आहेत.

يٰٓأَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا أَنْفِقُوْا مِمَّا رَزَقْنٰكُمْ مِّنْ قَبْلِ أَنْ
يَّأْتِيَ يَوْمٌ لَّا بَيْعٌ فِيْهِ وَلَا خُلَّةٌ وَّلَا شَفَاعَةٌ ۗ وَالْكٰفِرُوْنَ
هُمُ الظّٰلِمُوْنَ ﴿٢٥٤﴾

३९९. दाऊद, ज्यांना अल्लाहने नंतर प्रेषित व बादशाह बनविले, त्यावेळी तरुण होते. त्यांनी जालूतच्या आव्हानाचा स्वीकार केला. आणि असा हल्ला केला की तो ठार झाला. त्याच्या वधानंतर पॅलेस्टीनी सैन्यात खळबळ माजली व त्यांचा मोठा पराभव झाला बायबलमध्ये आहे की :-

'' तेव्हा दावीद त्या पलिष्ट्यास म्हणाला, तू तलवार, भाला व बरची घेऊन मजवर चढून आला आहेस; पण इसराईली सैन्यांच्या देवाला तूं तुच्छ लेखिले आहेस ; त्या सेनाधीश परमेश्वराच्या नामाने मी तुझ्याकडे आलो आहे. आज परमेश्वर तुला माझ्या हाती देईल; मी तुझा वध करीन व तुझे शिर धडापासून वेगळे करीन. मी आज पलिष्टी सैनिकांची प्रेते आकाशातील पक्षांस व वनपशूंस देईन. तेव्हा इसराईलामध्ये देव आहे असे अखिल पृथ्वीस विदित होईल. आणि या सगळ्या समुदायास कळून येईल की परमेश्वर तरवारीने व भाल्याने विजयी होतो असे नाही; कारण हे युद्ध परमेश्वराचे आहे. तो तुम्हांस आमच्या हाती देईल. मग तो पलिष्टी उठून दाविदाशी सामना करावयास जवळ आला, तेव्हा दाविद त्या पलिष्ट्याशी सामना करावयास सैन्य होते त्या दिशेकडे त्वरेने धावला. दाविदाने आपल्या बटव्यंत हात घालून त्यातून एक गोटा घेऊन गोफणीत घातला, आणि ती गरगर फिरवून पलिष्ट्याच्या मस्तकावर असा मारिला की तो त्याच्या कपाळात घुसून तो जमिनीवर पालथा पडला. याप्रकारे दाविदाने गोफणगुंडा घेऊन त्या पलिष्ट्यावर सरशी केली आणि त्याचा वध केला; दाविदाच्या हाती तलवार नव्हती. दाविदाने धावत जाऊन त्या पलिष्ट्याच्या छातीवर पाय दिला व त्याचीच तलवार म्यानातून काढून त्याला ठार करून त्याचे शिर छेदिले. आपला महावीर गत झाला हे पाहून पलिष्टी पळून गेले.''(१ शमुवेल १७:४५ ते ५१)

दाऊद यांच्या जीवनाचा आरंभ त्यांच्या याच कर्तबगारीने होतो.

४००. अभिप्रेत त्या देणग्या आहेत ज्या हज़रत दाऊदना दिल्या गेल्या होत्या. अल्लाहने त्यांना राज्यही दिले आणि बुद्धीही दिली. शासकाजवळ जर बुद्धी नसेल तर शासन चंगैझी बनते आणि शासकाजवळ विवेकबुद्धी असली की ते शासन न्यायी बनते. आणि अल्लाहच्या कायद्याना व नियमाना लागू करून खिलाफतीचा दर्जा पण प्राप्त केला जाऊ शकतो. हज़रत दाऊद यांचे शासन इस्लामी खिलाफत होती.

४०१. म्हणजे अल्लाहचा हा कायदा आहे की जेव्हा एखादा गट सत्ता प्राप्त झाल्यानंतर मर्यादेबाहेर जाऊ लागतो तेव्हा त्याचा जोर तोडण्यासाठी अल्लाह दुसऱ्या एखाद्या गटास उभे करतो. यावरून लढाईची आवश्यकता स्पष्ट होते. जर लढाई करणे वैध ठरविले गेले नसते तर जमीनीवर उपद्रव व गोंधळ माजला असता. यावरून धर्माच्या संन्यासी व वैरागी कल्पनेचे, ज्यामध्ये लढाईला धार्मिकतेविरूद्ध समजले जाते. खंडन होते. पैगंबर व सदाचारी लोक जे युद्ध करतात ते अल्लाहच्या कलम्याचा (वचनाचा) आवाज बुलंद करण्यासाठी आणि न्याय व समतेची प्रस्थापना करण्यासाठी आणि वाईटाचे व बिघाडाचे निवारण करण्यासाठी करतात. आणि म्हणून ते मानवजातीसाठी फायदेशीर व शुभदायक असते.

४०२. इशारा त्या गोष्टीकडे आहे की बनी इसराईलनी तालूतच्या महत्वाच्या ऐतिहासिक घटनेला निरर्थक बनवून ठेविल होते-बायबलच्या अभ्यासावरून अनुमान होते की त्यांनी समुईलच्या ग्रंथाला खऱ्याखोट्या गोष्टींचा संग्रह बनवून ठेविले होते–परंतु अल्लाहने त्यांच्या त्या घटनेला योग्य प्रकारे निवेदन केले. त्याने ईमानवर्धक व बुद्धिप्रधान गोष्टी समोर आल्या. जी घटना जाणण्याचा कोणताही मार्ग उपलब्ध नाही अशा दीढ हजार वर्षापूर्वीच्या घटनेला इतक्या अचूकपणे व सत्यतेने निवेदन करणे हा हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे अल्लाहचे पैगंबर आहेत या वस्तु:स्थितीचा उघडउघड असा पुरावा होता.

हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे, पैगंबरांपैकी आहेत. आणि याचा अर्थ अल्लाहने पाठविलेला व संदेशवाहक (Prophet, Messenger)असा आहे. त्यच्यामध्ये न ईशत्वाचा गुण असतो, जी तो ईश्वराच्या अवतार असतो. क़ुरआन पैगंबरची जी कल्पना देतो ती या खोट्या लोकभ्रमापासून अगदी शुध्द आहे.

४०३. पैगंबरांच्या संपूर्ण समूहाकडे इशारा आहे, ज्याचा उल्लेख या पूर्वीच्या आयतीमध्ये आला आहे.

४०४. म्हणजे अल्लाहने प्रत्येक पैगंबरांना कोणत्या ना कोणत्या पैलूने श्रेष्ठत्व प्रदान केलेले आहे. उदा. हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांचेशी संभाषण करून त्यांना गौरविले व हज़रत ईसा यांना उघड उघड चमत्कार प्रदान केले. अशाच प्रकारे दुसऱ्या पैगंबरांना हि विशेष दर्जे व अधिकार पदे दिली. आणि म्हणून एखाद्या पैगंबरांच्या श्रेष्ठतेचा स्वीकार करणे आणि एखाद्या पैगंबरांच्या श्रेष्ठतेचा इन्कार करणे योग्य नाही. परंतु या पैगंबरांच्या अनुयायांनी धार्मिक व वर्गीय पक्षपाताच्या आहारी जाऊन विलक्षण वर्तन अंगिकारिले.

ते आपापल्या पैगंबरांच्या बाबतीत प्रत्येक प्रकारच्या श्रेष्ठतेचे समर्थक होते. परंतु इतर पैगंबरांच्या श्रेष्ठतेचा स्वीकार करण्यास तयार नसत. परिणाम हा झाला की, ते दुसऱ्या पैगंबरांकडून काहीही लाभ उठवू शकले नाहीत. त्यांनी जर पक्षपाती वृत्ती धारण केली नसती तर त्यांना कोणताही

भेदभाव न करता सर्व पैगंबरांना मानणे काही कठीण नव्हते. आणि त्यांनी असे केले असते तर अल्लाहकडून त्याच्या शेवटच्या पैगंबरांवर पवित्र कुरआनच्या स्वरूपात जे मार्गदर्शन उतरले त्यापासून त्यांना लाभ उठविता आला असता. पवित्र कुरआनची ही शिकवण किती वस्तुस्थिती निष्ठ आहे की, निरनिराळ्या पैगंबरांची जी जी वैशिष्ट्ये होती त्या सर्वांना मान्य केले जावे व त्यांच्या मध्ये भेदभाव न करता या ईश्वरी मार्गदर्शनाचा स्वीकार केला जावा जे सर्वांच्या शिकवणीमध्ये समान होते.

४०५. 'रुहुल कुदुस' म्हणजे फिरिशत्यांचे प्रमुख हज़रत जिब्रईल (अलैहिस्सलाम) होत. त्यांच्या करवी सर्वश्रेष्ठ अल्लाहने हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांचे समर्थन व सहाय्य केले होते. परंतु ख्रिश्चन लोकांनी त्यांना देवता बनवून आपल्या मनघडत अशा 'त्रिदेव' या श्रद्धेत सामील केले.

४०६. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या पद्धतीकडे इशारा आहे की त्याने मार्गदर्शनाच्या बाबतीत सक्तीची पद्धत अवलंबिली नाही. जर त्याने आपल्या दासांवर सक्ती करण्याचे ठरविले असते तर कोणी ही नकाराच्या मार्गाचे अनुसरण करू शकला नसता. परंतु त्याने आपल्या दासांना विचाराचे व निवडीचे स्वातंत्र्य दिले. त्यांनी आपल्या इच्छेप्रमाणे नकाराचा मार्ग अनुसरावा व ईमान आणावे व आपापल्या आचरणाचा परिणाम भोगावा. दासांच्यावर सक्ती केली जाऊ नये ही ईश्वरीय इच्छा, आणि जर ते धर्माच्या नावावर एकमेकाच्या जिवावर उठत असतील तर त्यांना तसे करण्याचे प्राप्त झालेले स्वातंत्र्य, यामध्ये मोठे औचित्य व चातुर्य आहे. कारण अल्लाहचे कोणतेही काम औचित्य व चातुर्यापासून मुक्त असत नाही.

स्पष्ट असो की, निवेदन काबागृहाला अनेकेश्वरवाद्यांच्या हातून सोडविण्या बाबात 'जिहाद' व 'इन्फाक' (दान) संबंधी होत आले आहे. या संदर्भात येथे ही गोष्ट स्पष्ट केली जात आहे की, ग्रंथधारकांनी ईमानधारकांच्या विरूद्ध जी मोहिम सुरू केली आहे त्याचे कारण वस्तुत: त्यांचा हा आंधळा पूर्वग्रह आहे, की आपल्या समूहातील पैगंबरांच्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही पैगंबरांना मानू नये. अगर त्यांच्या श्रेष्ठत्वाचा स्वीकार करू नये आज देखील जगातील निरनिराळे समाज पूर्वग्रहाच्या या रोगाने पीडित आहेत. आणि हे समाज हज़रत मुहम्मद (सल्ल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पैगंबर मानण्यास व त्यांचे श्रेष्ठत्व स्वीकारण्यास फक्त या आधारावर तयार होत नाहीत की ते एका दुसऱ्या देशात व एका दुसऱ्या समाजात जन्मले होते. सूर्याचा प्रकाश एखाद्या देशापर्यंत वा समुदायापर्यंत मर्यादित होऊन राहत नाही. तर त्याचा लाभ साऱ्या जगाला व साऱ्या जातींना होत असतो.असे असताना ते ईश्वरी मार्गदर्शन भौगोलिक व जातीय कक्षेत मर्यादित असावे असे का इच्छितात?

४०७. अल्लाहच्या दरबारी आपली शिफारस करतील म्हणून लोकांनी ज्या खोट्या आधारांवर श्रद्धा बाळगली आहे. आणि जे त्यांना मुक्तिचा परवाना मिळवून देतील या श्रद्धेने ज्यांच्या मैत्रीबद्दल लोक प्रौढी मिरवीत आहेत. त्या श्रद्धेतील फोलपणा स्पष्ट करणे आणि ईश्वराजवळ उपयोगी पडणारी गोष्ट म्हणजे त्याच्या कार्यात केला जाणारा धनाचा व प्राणाचा त्याग हे सत्य मनावर बिंबविणे येथे अभिप्रेत आहे.

**अल्लाह ज्याच्याशिवाय कोणी ईश नाही, अमर अविनाशी व शाश्स्वत आहे. त्याने सर्वांना सांभाळलेले आहे न त्याला डुलकी लागते न झोप. आकाशांमध्ये व जमिनीमध्ये जे काही आहे ते सर्व त्याचेच आहे. कोण आहे, जो त्याच्या हुजूर त्याच्या परवानगीशिवाय शिफारस करू शकेल? तो जाणतो जे काही त्यांच्यासमोर आहे व जे काही त्याच्यामागे आहे. आणि त्याच्या ज्ञानापैकी तो इच्छिल गोष्ट सोडून इतर कोणत्याही गोष्टीचे त्यांना आकलन होत नाही. त्याच्या कुर्सीने (सत्तेच्या सिंहासनाने) सर्व आकाशांना व पृथ्वीला व्यापिले आहे. आणि त्यांचे सरंक्षण करणे त्याच्यासाठी जरासुद्धा अवघड नाही. आणि तो सर्वोच्च व महान आहे.** *(अल-क़ुरआन)*

२५५. अल्लाह [४०८] ज्याच्याशिवाय कोणी ईश नाही, अमर[४०९]अविनाशी व शाश्वत आहे. त्याने सर्वांना सांभाळलेले आहे [४१०] न त्याला डुलकी लागते न झोप.[४११]आकाशांमध्ये व जमिनीमध्ये जे काही आहे ते सर्व त्याचेच आहे. कोण आहे, जो त्याच्या हुजूर त्याच्या परवानगीशिवाय शिफारस करू शकेल?[४१२] तो जाणतो जे काही त्यांच्यासमोर आहे व जे काही त्याच्यामागे आहे. आणि त्याच्या ज्ञानापैकी तो इच्छिल गोष्ट सोडून इतर कोणत्याही गोष्टीचे त्यांना आकलन होत नाही.[४१३]त्याच्या कुर्सीने [४१४] (सत्तेच्या सिंहासनाने) सर्व आकाशांना व पृथ्वीला व्यापिले आहे. आणि त्यांचे सरंक्षण करणे त्याच्यासाठी जरासुद्धा अवघड नाहीं. [४१५] आणि तो सर्वोच्च [४१६] व महान आहे.

اَللّٰهُ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۚ اَلْحَیُّ الْقَیُّوْمُ ۚ
لَا تَاْخُذُهٗ سِنَةٌ وَّلَا نَوْمٌ ؕ لَهٗ مَا فِی السَّمٰوٰتِ وَمَا فِی الْاَرْضِ ؕ
مَنْ ذَا الَّذِیْ یَشْفَعُ عِنْدَهٗۤ اِلَّا بِاِذْنِهٖ ؕ یَعْلَمُ مَا بَیْنَ اَیْدِیْهِمْ
وَمَا خَلْفَهُمْ ۚ وَلَا یُحِیْطُوْنَ بِشَیْءٍ مِّنْ عِلْمِهٖۤ اِلَّا بِمَا شَآءَ ۚ
وَسِعَ كُرْسِیُّهُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ ۚ وَلَا یَـُٔوْدُهٗ حِفْظُهُمَا ۚ وَهُوَ
الْعَلِیُّ الْعَظِیْمُ ﴿۲۵۵﴾

२५६. दीन (धर्म) च्या बाबतीत कसलीही सक्ती (जबरदस्ती) नाही.[४१७] मार्गदर्शन मार्ग भ्रष्टतेपासून अगदी स्पष्ट होऊन समोर आलेले आहे. आता ज्याने ''तागूत'' (बंडखोर, विद्रोही)[४१८] चा इन्कार केला आणि अल्लाहवर ईमान आणले त्याने असा मजबूत आधार पकडला जो कधी तुटणार नाही. आणि अल्लाह सर्वकाही एकणारा व जाणणारा आहे.

لَاۤ اِكْرَاهَ فِی الدِّیْنِ ۙ۫ قَدْ تَّبَیَّنَ الرُّشْدُ مِنَ الْغَیِّ ۚ فَمَنْ یَّكْفُرْ
بِالطَّاغُوْتِ وَیُؤْمِنْ بِاللّٰهِ فَقَدِ اسْتَمْسَكَ بِالْعُرْوَةِ
الْوُثْقٰی ۗ لَا انْفِصَامَ لَهَا ؕ وَاللّٰهُ سَمِیْعٌ عَلِیْمٌ ﴿۲۵۶﴾

२५७. अल्लाह ईमान आणलेल्या लोकांचा सहाय्यक आहे. तो त्यांना अंधारातून काढून प्रकाशात [४१९] आणतो. आणि ज्या लोकांनी कुफ्र (इन्कार) केला त्यांचे सहाय्यक ''तागूत'' (विद्रोही) आहेत. ते त्यांना प्रकाशापासून हटवून अंधःकाराकडे नेतात. हे लोक आगीमध्ये जाणारे आहेत, जेथे ते सदैव राहतील.

اَللّٰهُ وَلِیُّ الَّذِیْنَ اٰمَنُوْا ۙ یُخْرِجُهُمْ مِّنَ الظُّلُمٰتِ اِلَی النُّوْرِ ؕ۬
وَالَّذِیْنَ كَفَرُوْۤا اَوْلِیٰٓـُٔهُمُ الطَّاغُوْتُ ۙ یُخْرِجُوْنَهُمْ مِّنَ النُّوْرِ
اِلَی الظُّلُمٰتِ ؕ اُولٰٓىِٕكَ اَصْحٰبُ النَّارِ ۚ هُمْ فِیْهَا خٰلِدُوْنَ ﴿۲۵۷﴾

२५८. काय [४२०]तुम्ही त्या माणसाला [४२१]पाहिले नाहीं ज्याने इब्राहीम यांच्याबरोबर त्यांच्या पालनकर्त्याच्या बाबतीत यास्तव भांडण केले की अल्लाह ने त्याला सत्ता प्रदान केली होती [४२२]? जेव्हा इब्राहीमनी त्याला सांगितले की माझा 'रब' (पालनकर्ता) तर तो आहे जो जीवन देतो आणि मरण देतो.त्याने उत्तर दिले, मी पण जगवितो व मारतो.इब्राहीम म्हणाले ठीक. अल्लाह सूर्याला पूर्वेला उगवितो.तू त्याला पश्चिमेला उगवून दाखव.[४२३] हे एकून तो इन्कार करणारा-काफिर-थक्क झाला. आणि अल्लाह अशा अत्याचारी लोकांना सुबुद्धी देत नाहीं.[४२४]

اَلَمْ تَرَ اِلَی الَّذِیْ حَآجَّ اِبْرٰهٖمَ فِیْ رَبِّهٖۤ اَنْ اٰتٰىهُ اللّٰهُ
الْمُلْكَ ۘ اِذْ قَالَ اِبْرٰهٖمُ رَبِّیَ الَّذِیْ یُحْیٖ وَیُمِیْتُ ۙ قَالَ اَنَا
اُحْیٖ وَاُمِیْتُ ؕ قَالَ اِبْرٰهٖمُ فَاِنَّ اللّٰهَ یَاْتِیْ بِالشَّمْسِ مِنَ
الْمَشْرِقِ فَاْتِ بِهَا مِنَ الْمَغْرِبِ
فَبُهِتَ الَّذِیْ كَفَرَ ؕ وَاللّٰهُ لَا یَهْدِی الْقَوْمَ الظّٰلِمِیْنَ ﴿۲۵۸﴾

४०८. या आयतीला हदीस मध्ये 'आयतुल कुर्सी' म्हणून संबोधिले गेले आहे व तिला पवित्र क़ुरआनची एक महान आयत म्हणून गौरविले गेले आहे. लोकांनी श्रद्धा व आचरणामध्ये खऱ्या ईशभक्तिचा अंगिकार करावा म्हणून या आयतीमध्ये अत्यंत व्यापकरित्या व अत्यंत परिणामकारक पद्धतीने सर्वश्रेष्ठ अल्लाहची आणि एकेश्वरवादाची वास्तविकता स्पष्ट करून अनेकेश्वरवादाचे व विशेषत: शिफ़ारसीच्या चुकीच्या कल्पनेचे खंडन करण्यात आले आहे.

४०९. अनेकेश्वरवादी देवतांच्याबद्दल ही श्रद्धा बाळगतात की त्या एक विशिष्ट प्रकारची दारु (Nectar) किंवा एक विशिष्ट प्रकारचे पेय-'सोमा'–पिऊन जिवंत राहतात परंतु अल्लाह अमर व अविनाशी आहे. व त्याला जिवंत राहण्यासाठी अशा कोणत्याही गोष्टीची आवश्यकता नाही.

४१०. मूळात 'अल क़य्यूम' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ ते अस्तित्व जे स्वयंभू आहे व ज्याच्यावर दुसऱ्यांचे कायम जिवंत राहणे अवलंबून आहे. अल्लाह फक्त स्वसामर्थ्यावर क़ायम आहे आणि साऱ्या विश्वाचा भार त्याने एकट्याने पेललेला आहे.

४११. सर्वश्रेष्ठ अल्लाह सदैव जागृत आहे. झोप व डूलकीची अवस्था ही तर अल्लाहने निर्माण केलेली आहे. तिचा प्रभाव त्याच्या निर्मितीवर पडतो. निर्मात्यावर तिचा प्रभाव पडण्याचा प्रश्नच कोठे उद्भवतो?

४१२. ''काही व्यक्तिंना ईश्वराजवळ असे स्थान प्राप्त झालेले आहे की ते एखाद्याच्या बाबतीत ईश्वराजवळ शिफ़ारस करू शकतात व ईश्वराला त्यांची शिफ़ारस मान्य करावी लागते.'' या 'विमोचना' (शफ़ाअत) बद्दलच्या चुकीच्या कल्पनेचे हे खंडन आहे. ईश्वराजवळ कोणाचेही हे स्थान नाही की, त्याच्या परवानगीशिवाय कोणी तोंड उघडू शकेल. शिफ़ारस मान्य करुन घेणे तर दूरची गोष्ट तथापि हा अपवाद म्हणून की अल्लाह आपल्या खास दासांपैकी ज्याला इच्छिल त्याला-ज्याच्या बाबतीत इच्छिल त्याच्याबद्दल-विमोचनाबद्दल शिफ़ारस करण्याची परवानगी देईल. हा एक बहुमान आहे जो अल्लाह आपल्या दासांपैकी ज्यांना इच्छिल त्यांना देईल. तरीपण ही गोष्ट उघड आहे की इन्कार करणाऱ्यांच्या (काफ़िरांच्या) बाबतीत कोणीही शिफ़ारस करू शकणार नाही. कारण अल्लाहने त्यांच्या बाबतीत अशी शक्यताच ठेविलेली नाही.

४१३. अल्लाह सर्वज्ञ आहे. त्याच्या ज्ञानाला कसलीही मर्यादा नाही. परंतु दासांना फक्त त्या मर्यादेपर्यंत ज्ञान आहे, ज्या मर्यादेपर्यंत त्याने दिलेले आहे.

४१४. मूळात 'कुर्सी हा शब्द आहे. ज्याचा अर्थ बसण्याची वस्तू, सिंहासन वगैरे होतो. राजाची कुर्सी (सिंहसन) त्याच्या अधिकाराचे प्रतीक असते. म्हणून हा शब्द 'अधिकारपद' या अर्थीही वापरला जातो. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सिंहासनाचे स्वरूप आम्हाला माहीत नाही. कारण ते आमच्यापासून अदृश्य असलेल्या सत्यांपैकी आहे. तरी पण याचा सुरुवातीचा अर्थ अगदी स्पष्ट आहे की, अल्लाहची सत्ता आकाशांवर व जमिनीवर पूर्णपणे प्रभावी आहे. सृष्टीचा कोणताही भाग असा नाही की जो त्याच्या अधिकाराच्या कक्षेबाहेर आहे.

४१५. सृष्टीची देखरेख, तिचे संरक्षण व तिची व्यवस्था त्याच्यासाठी अवघड नाही. याबाबतीत त्याला कोणाच्याही मदतीची गरज नाही. या वस्तुस्थितीने त्या कल्पनेचे खंडन होते की, ईश्वराने आपले कार्य निरनिराळ्या देवतांमध्ये विभागले आहे. कोणी वारा वाहवतो, कोणी पाऊस पाडतो, कोणी जमिनीची व्यवस्था पाहत आहे तर कोणी आकाशाची, कोणी उपजिविकेच्या सामुग्रीची व्यवस्था करीत आहे,तर कोणी मृत्युची. आणि कोणी धनाची देवी आहे तर कोणी रोगांची!

४१६. ज्या निकृष्ट गोष्टी त्याच्याशी जोडल्या जातात व त्याच्या बाबतीत ज्या क्षुद्र कल्पना कायम केल्या जातात त्यांच्या तुलनेत त्यांची शान त्याचे वैभव अत्यंत उच्च व श्रेष्ठ आहे.

४१७. यावरून हे अत्यंत स्पष्ट आहे की, इस्लाम या गोष्टीची परवानगी देत नाही की, एखाद्यास इस्लामचा स्वीकार करण्यास भाग पाडले जावे. या उलट इस्लाम श्रद्धा व विवेकाचे पूर्ण स्वातंत्र्य देतो. कारण धर्माचा खरा उद्देश ईश्वराची प्रसन्नता संपादन करणे हा आहे. आणि याचे हक्कदार फक्त तेच लोक होऊ शकतात जे खरोखर याला आपले ठरवितात. जबरदस्ती व सक्तीने हे उद्दिष्ट फोल ठरते. कारण सक्तिने एखाद्याकडून धार्मिक विधीची पूर्तता करून घेतली जाऊ शकते. परंतु त्याच्या इराद्याना बदलणे व त्याच्या मनात ईश्वराची प्रसन्नता प्राप्त होण्यासाठी शुद्ध भावना निर्माण करणे कोणासही शक्य नाही. आणि म्हणून नाराजीने एखाद्याने इस्लामचा स्वीकार केला तर त्यात काही अर्थ नाही यास्तव पवित्र क़ुरआनात दुसऱ्या स्थानी फर्माविले गेले आहे की :-

وَلَوْ شَاءَ رَبُّكَ لَاٰمَنَ مَنْ فِى الْاَرْضِ كُلُّهُمْ جَمِيْعًا اَفَاَنْتَ تُكْرِهُ النَّاسَ حَتّٰى يَكُوْنُوْا مُؤْمِنِيْنَ۔ (يونس۔٩٩)

''जर तुमच्या पालन कर्त्याने इच्छिले असते तर भूपृष्ठावर जितके लोक आहेत, सर्वानीच ईमान बाळगले असते.मग काय लोकांना तुम्ही मोमीन होण्यासाठी विवश कराल?'' (युनुस-९९) ही वस्तुस्थिती असल्याने इस्लाम ज्या गोष्टीवर भर देतो ती ही की,सत्य अगदी स्पष्टपणे समोर यावे या दृष्टीने प्रचाराची

योग्य व वाजवी पद्धत अनुसरली जावी.यानंतरही कोणी इन्काराचा मार्ग अवलंबिला तर त्याला त्याच्या दशेवर सोडले जावे.

राहिली जिहादची गोष्ट तो तर मूलत:जमिनीवरून उपद्रव व गोंधळाच्या स्थितीला समाप्त करणे आणि इस्लामी व्यवस्थेला क़ायम करण्यासाठी अमलांत आला आहे. आणि इस्लामच्या व्यवस्थेत या गोष्टीचा पूर्ण समावेश आहे की, दुसऱ्या धर्माचे लोक त्याच्या राजकीय व्यवस्थेखाली राहू शकतात. राहीलेत अरबचे अनेकेश्वरवादी आणि ते लोक जे धर्मापासून परत फिरतील तर त्यांना ठार करण्याचा आदेश शिक्षा म्हणून आहे.

४१८. मूळात طاغوت 'तागूत' हा शब्द वापरला गेला आहे याचा अर्थ मर्यादेपासून दूर जाणे आणि इन्काराचा (कुफ्रचा) गाजावाजा करणे (लिसानुल अरब भाग १५ पान ७) याने अभिप्रेत तो प्रत्येक दास आहे जो ईश्वरी आज्ञापालनाच्या मर्यादे बाहेर जातो व बंडखोर बनतो. यामध्ये सैतानचाही समावेश होतो व अवज्ञाकारी आणि बंडखोर माणसांचाही आणि खास करून त्या नेत्यांचा व शासकांचा जे अल्लाहच्या विधिनियमा ऐवजी आपले कायदेकानून चालवितात अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप-११६,१२८,१२९ तसेच सूरह अलमायदा टीप-१८०

४१९. 'नूर' ने अभिप्रेत सुबुद्धीचा प्रकाश. ज्याचा प्रभाव ईमानधारकाचे मन, बुद्धी, नीती व आचरणावर पडतो 'जुलमात' ने अभिप्रेत मार्गभ्रष्टतेचा अंधार ज्याचा प्रभाव इन्कार करणाऱ्याचे मन, बुद्धी, नीती व आचरणावर पडतो. 'नूर' एकवचनी आहे तर 'जुलुमात' अनेकवचनी याचा त्या वस्तुस्थितीकडे इशारा आहे की, ईश्वरी मार्गदर्शनाचा मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे इस्लाम आणि मार्गभ्रष्टतेचे मार्ग व प्रकार विविध आणि निरनिराळे आहेत.

४२०. मार्गदर्शन व मार्गभ्रष्टता यांच्या संबंधी जी मूलभूत गोष्ट वर निवेदन झाली आहे ती मनावर बिबविण्यासाठी तीन घटना उदाहरणा दाखल नमुद केल्या जात आहेत. यापैकी पहिल्या घटनेने हे स्पष्ट होते की, कोणत्या प्रकारच्या लोकांना सत्य उघड झाल्यानंतर देखील मार्गभ्रष्टतेपासून दूर होणे शक्य होत नाही. आणि नंतरच्या दोन घटनावरून स्पष्ट होते की, ज्यांनी अल्लाहचा आश्रय घेतला होता, त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने कशा प्रकारे विश्वास व समाधान प्राप्त करून दिले आणि अदृश्य अशा वास्तव्याचेही प्रत्यक्ष दर्शन घडविले.

४२१. अभिप्रेत 'नमरूद' आहे जो इराकचा बादशाह व हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा समकालीन होता.

४२२. पुरातन काही राजा-महाराजांना देवतांचे अवतार समजले जात होते नमरूदचा समाज ताऱ्यांचा पूजक होता. आणि सूर्याला सर्वात मोठया देवतेचा मान होता. आणि म्हणून नमरूदबद्दल ही श्रद्धा असावी की, तो सूर्यदेवतेचा अवतार आहे. अशा स्थितीत तो इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचे खरा 'रब' (पालनकर्ता स्वामी) फक्त अल्लाच आहे हे आवाहन कसे सहन करील? आणि म्हणून त्याने हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांना बोलावून त्यांच्याशी वादविवाद केला. तो म्हणाला की, तुम्ही हे कोणत्या 'रब' चे (पालनकर्त्याचे) आवाहन करीत आहात. 'रब' (पालनकर्ता) तर मी आहे. सत्ता माझ्या हाती आहे. म्हणजे त्यांच्या दृष्टीने त्याच्या हाती सत्ता असणे याचा अर्थ तो अमुक अमुक देवतेचा अवतार आहे. आणि या आधारावर उपासनेचे सर्व विधी त्याच्यासाठी झाले पाहिजेत. पण ही सत्ता त्याला अल्लाहने दिलेली होती आणि अल्लाह ज्याला सत्ता देतो त्याची परिक्षा घेत असतो की सत्तेची देण मिळाल्यानंतर तो अल्लाहचा कृतज्ञ आज्ञाधारक बनतो की, अहंकारी बनून अल्लाहच्या दासावर आपल्या सर्वेश्वराची छाप बसविण्याचा प्रयत्न करतो.

४२३. हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांचा हा युक्तिवाद अत्यंत स्पष्ट व जोरदार होता की, जीवन व मृत्यु अल्लाहच्याच अखत्यारात आहे. आणि म्हणून तोच या गोष्टीचा हक्कदार आहे की त्याला 'रब' (पालनकर्ता स्वामी, ईश) मानले जावे. परंतु यावर नमरूदने हे वेडागळ उत्तर दिले की जीवन मृत्यु तर माझ्या अखत्यारात सुद्धा आहे. मी ज्याला इच्छिन त्याला ठार करीन व ज्याला इच्छिन त्याला माफ करीन. नमरूदच्या या उत्तरात काही तथ्य नव्हते. निव्वळ पोकळ बडबड होती कारण तो हे जाणून होता की तो स्वत: आपल्या मृत्युलाहि टाळू शकत नाही आणि म्हणून त्यावर वाद न घालता हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी दुसरा बिनतोड मुद्दा असा मांडला की नमरूदला त्याचे काही उत्तर देता आले नाहीं. ते म्हणाले माझा पालनकर्ता सूर्याला पूर्वेकडून उगवितो. तू त्याला पश्चिमेकडून उगवून दाखव. या युक्तिवादामध्ये हा उपहासही गर्भित होता की सूर्य देवता नाही, ज्याचा अवतार असल्याचा दावा नमरूद करीत होता, तर सूर्य अल्लाहच्या आज्ञेत आहे व अल्लाहच्या नियमा प्रमाणे उगवत व मावळत असतो.

४२४. उपदेशाचा मार्ग उघड झाल्यानंतर देखील त्याचा लाभ त्या लोकांना होत नाही जे अल्लाहची कृपा प्राप्त झाल्यानंतर त्याचे कृतज्ञ बनत नाहीत. उलट घमेंडखोर बनतात. आज्ञाधारक बनून राहण्याऐवजी स्वत:ला ईश्वरत्वाचे स्थान असल्याचे समजत असतात.

**आणि (ती घटनाही उल्लेखनीय आहे) जेव्हा इब्राहीम म्हणाले, ''माझ्या पालनकर्त्या ! मला दाखव तू मृतांना कसे जिवंत करणार?'' फर्माविले. काय तू ईमान ठेवित नाहीस? त्यांनी विनविले. ईमान तर ठेवितो. परंतु मनाचे समाधान व्हावे अशी इच्छा आहे फर्माविले. तू चार पक्षी घे. आणि त्यांना तुझा लळा लाव. मग त्यांचा एकेक भाग एकाएका टेकडीवर ठेव आणि त्यांना साद घाल. ते तुझ्याकडे धावत येतील. चांगल्या प्रकारे जाण की अल्लाह मोठा प्रभावशाली व बुद्धिवान आहे.** *(अल-क़ुरआन)*

أَوْ كَالَّذِي مَرَّ عَلَىٰ قَرْيَةٍ وَهِيَ خَاوِيَةٌ عَلَىٰ عُرُوشِهَا
قَالَ أَنَّىٰ يُحْيِي هَٰذِهِ اللَّهُ بَعْدَ مَوْتِهَا ۖ فَأَمَاتَهُ اللَّهُ
مِائَةَ عَامٍ ثُمَّ بَعَثَهُ ۖ قَالَ كَمْ لَبِثْتَ ۖ قَالَ لَبِثْتُ يَوْمًا
أَوْ بَعْضَ يَوْمٍ ۖ قَالَ بَل لَّبِثْتَ مِائَةَ عَامٍ فَانظُرْ إِلَىٰ
طَعَامِكَ وَشَرَابِكَ لَمْ يَتَسَنَّهْ ۖ وَانظُرْ إِلَىٰ حِمَارِكَ
وَلِنَجْعَلَكَ آيَةً لِّلنَّاسِ ۖ وَانظُرْ إِلَى الْعِظَامِ
كَيْفَ نُنشِزُهَا ثُمَّ نَكْسُوهَا لَحْمًا ۚ فَلَمَّا تَبَيَّنَ لَهُ
قَالَ أَعْلَمُ أَنَّ اللَّهَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٢٥٩﴾

२५९. किंवा मग त्या माणसाचे उदाहरण (विचार करण्यासारखे ) आहे ज्याचे एका अशा वस्तीवरून जाणे झाले जी आपल्या छतांवर कोलमडून पडली होती.[४२५] तो म्हणाला. अल्लाह या वस्तीला ती मरून पडलेली असताना कशाप्रकारे जिवंत करील? [४२६] यावर अल्लाहने त्या माणसाचा मृत्यु घडविला. आणि शंभर वर्षे त्याला त्याच अवस्थेत ठेविले. नंतर त्याला जिवंत केले.[४२७] आणि विचारले. या अवस्थेत किती काल राहिलास? त्याने उत्तर दिले एक दिवस अगर एका दिवसाचा काही भाग. फर्माविले. नाही. या अवस्थेत तू शंभर वर्षे काढलीस.[४२८] आता आपल्या खाण्यापिण्याच्या वस्तूंकडे पहा की त्यामध्ये थोडा देखील फरक पडलेला नाही. आणि आपल्या गाढवाकडेही पहा. (त्याची हाडे देखील जुनी झाली असतांना आम्ही त्याला पुन्हा कसे जिवंत करतो) आणि हे यासाठी की आम्ही तुला लोकांसाठी एक निशाणी बनवू इच्छितो [४२९] आणि हाडांच्याकडे पाहा की कशा प्रकारे आम्ही त्यांचा सांगाडा उभा करतो व मग त्याच्यावर मास चढवितो.[४३०] अशा प्रकारे जेव्हा वस्तुः स्थिती त्याच्यासमोर अगदी स्पष्ट झाली तेव्हा तो आवेशाने म्हणाला, मी खात्री बाळगतो की प्रत्येक वस्तू अल्लाहच्या सामर्थ्याधीन आहे.

وَإِذْ قَالَ إِبْرَاهِيمُ رَبِّ أَرِنِي كَيْفَ تُحْيِي الْمَوْتَىٰ ۖ قَالَ أَوَلَمْ
تُؤْمِن ۖ قَالَ بَلَىٰ وَلَٰكِن لِّيَطْمَئِنَّ قَلْبِي ۖ قَالَ فَخُذْ أَرْبَعَةً
مِّنَ الطَّيْرِ فَصُرْهُنَّ إِلَيْكَ ثُمَّ اجْعَلْ عَلَىٰ كُلِّ جَبَلٍ مِّنْهُنَّ
جُزْءًا ثُمَّ ادْعُهُنَّ يَأْتِينَكَ سَعْيًا ۚ
وَاعْلَمْ أَنَّ اللَّهَ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٢٦٠﴾

२६०. आणि (ती घटनाही उल्लेखनीय आहे) जेव्हा इब्राहीम म्हणाले, ''माझ्या पालनकर्त्या ! मला दाखव तू मृतांना कसे जिवंत करणार?'' फर्माविले. काय तू ईमान ठेवित नाहीस? त्यांनी विनविले. ईमान तर ठेवितो. परंतु मनाचे समाधान व्हावे अशी इच्छा आहे फर्माविले. तू चार पक्षी घे. आणि त्यांना तुझा लळा लाव. मग त्यांचा एकेक भाग एकाएका टेकडीवर ठेव आणि त्यांना साद घाल. ते तुझ्याकडे धावत येतील. [४३१] चांगल्या प्रकारे जाण की अल्लाह मोठा प्रभावशाली व बुद्धिवान आहे. [४३२]

४२५. 'वस्ती'शी अभिप्रेत बहुधा (Jerusalem) जेरूसलेम आहे, ज्याचा इ. सनापूर्वी ५८६ साली बुख़्त नस्सर (Nebuchadnezzer) च्या हातून विध्वस झाला होता.

४२६. हा प्रश्न नकार म्हणून नव्हे तर आशचर्य प्रकट करण्यासाठी होता.

४२७. मृत्यु नंतरच्या जीवनाचे हे दर्शन ज्या व्यक्तिला घडविण्यात आले ती व्यक्ति अवश्य अल्लाहचा एखादा पैगंबर असावी. कारण फक्त पैगंबरांनाच परलोकाची सहल घडविली जाते. बहुतकरून ही घटना पैगंबर हिजकील (यहेज्केल) याच्या बाबतीत घडली असावी. कारण बायबल मधील यहेज्केल प्रकरणात या घटनेशी मिळत्या जुळत्या एका घटनेचा उल्लेख आहे. (पवित्र शास्त्र. जुना करार यहेज्केल ३७:१ते १४ )

४२८. ही घटना त्या वस्तुस्थितीचे प्रकटीकरण आहे की कयामतीच्या दिवशी जेव्हा माणूस आपल्या कबरी मधून उठेल तेव्हा मध्यंतराच्या अवस्थे मध्ये आलमे बरज़ख (माणसाच्या मृत्युनंतर क़िकयामतीच्या दिवसापर्यंतचा काल) जो काल त्याने घालविला त्याची जाणीव त्याला नसेल. उलट त्याला असे वाटेल की नुकताच तो झोपला होता व आता जागा झाला आहे.

४२९. निशाणी त्या गोष्टीची की अल्लाह मृतांना जिवंत करण्यास समर्थ आहे. आणि निशाणी त्या गोष्टीची की तो ओसाड वस्तीची पुन्हा भरभराट करु शकतो. आणि बनी इसराईल लोकांची लाजविणरया गुलामगिरीतून सुटका करुन त्यांना नवजीवन प्राप्त करुन देऊं शकतो.

४३०. स्पष्ट झाले की जर अल्लाह इच्छिल तर तो कोणत्याही वस्तूला ती सडून गळून गेल्यानंतर देखील जिवंत करु शकतो. आणि जर इच्छिल तर तो एखाद्या वस्तूस निसर्ग नियमाच्या परिणामा पासून मुक्त ठेवू शकतो. की ती वस्तू सडूच नये.

४३१. म्हणजे, चार पक्षी घेऊन प्रथम त्यांना तुमचा लळा लावा. नंतर त्यांचे तुकडे तुकडे करुन त्यांचे भाग संभोवतालच्या पहाडावर ठेवा. नंतर त्यांना बोलवा. ते जिवंत होऊन तुमच्याकडे धावत येतील. अशा प्रकारे हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांना मृत्यूनंतरच्या जीवनाचे प्रत्यक्ष दर्शन घडविण्यात आले.

पक्षांना स्वत:चा लळा लावण्याची सूचना यासाठी करण्यात आली की हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) याची खात्री पटावी की तेच पक्षी पुन्हा जिवंत झाले आहेत, ज्यांचे त्यांनी तुकडे तुकडे करुन ते पहाडावर विस्कटले होते. अशाप्रकारे स्पष्ट झाले की कियामतीच्या दिवशी निर्मात्याच्या हाकेसरशी मृत प्रत्येक दिशेकडून त्याच्याकडे धावत येतील.

परिचित पक्षांचे पुन्हा जिवंत झाल्यावर आपल्या धन्याच्या आवाजाला ओळखणे या गोष्टीकडे इशारा करीत आहे की माणसांना जेव्हा पुन्हा जिवंत केले जाईल तेव्हा त्याची या जगातील जीवनाची आठवण ताजी होईल.

४३२. येथे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या त्या दोन गुण विशेषांचा उल्लेख त्या वस्तु:स्थितीकडे इशारा करीत आहे की माणसाचे पुन्हा उठविले जाणे सत्य आहे,. कारण की अल्लाह त्याबाबतीत समर्थ आहे. त्याचप्रमाणे तसे करणे ही त्याच्या बुद्धिमत्तेची निकड आहे.

२६१. जे लोक [४३३] आपले धन अल्लाहच्या मार्गात [४३४] खर्च करतात त्यांच्या खर्चाचे उदाहरण त्या दाण्या सारखे आहे ज्याच्यापासून सात कणसे निघतात व प्रत्येक कणसात शंभर दाणे असतात. [४३५] अशाप्रकारे अल्लाह ज्याला इच्छितो त्याला समृद्धी प्रदान करतो. अल्लाह मोठा उदार [४३६] व ज्ञानी आहे.[४३७]

مَثَلُ الَّذِينَ يُنفِقُونَ أَمْوَالَهُمْ فِي سَبِيلِ اللَّهِ كَمَثَلِ
حَبَّةٍ أَنبَتَتْ سَبْعَ سَنَابِلَ فِي كُلِّ سُنبُلَةٍ مِّائَةُ حَبَّةٍ
وَاللَّهُ يُضَاعِفُ لِمَن يَشَاءُ وَاللَّهُ وَاسِعٌ عَلِيمٌ ﴿٢٦١﴾

२६२. जे लोक आपले धन अल्लाहच्या मार्गात खर्च करतात आणि त्यानंतर न उपकाराची भाषा बोलतात,न मन दुखवितात त्यांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्या जवळ आहे.[४३८] आणि न त्यांना कोणत्याही गोष्टीचे भय राहील न ते दुखीः होतील.

الَّذِينَ يُنفِقُونَ أَمْوَالَهُمْ فِي سَبِيلِ اللَّهِ ثُمَّ لَا يُتْبِعُونَ
مَا أَنفَقُوا مَنًّا وَلَا أَذًى لَّهُمْ أَجْرُهُمْ عِندَ رَبِّهِمْ
وَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿٢٦٢﴾

२६३. चांगले बोलणे आणि क्षमाशीलतेने वागणे त्या दाना (सदका) पेक्षा श्रेष्ठ आहे ज्यामुळे मन दुखविले जाते. [४३९] अल्लाह ''गनी'' (स्वसंपन्न व निःस्पृह) व सहनशील आहे.[४४०]

قَوْلٌ مَّعْرُوفٌ وَمَغْفِرَةٌ خَيْرٌ مِّن صَدَقَةٍ يَتْبَعُهَا أَذًى
وَاللَّهُ غَنِيٌّ حَلِيمٌ ﴿٢٦٣﴾

२६४. ईमान आणलेल्या लोकांनो ! उपकाराची भाषा बोलून व मने दुखवून आपल्या दानाला (सदकात) त्या माणसाप्रमाणे वाया घालवूं नका जो आपले धन लोकांना दाखविण्यासाठी खर्च करतो आणि अल्लाह व शेवटच्या दिवसावर ईमान ठेवित नाही. त्याचे उदाहरण असे आहे की एका खडक ज्यावर काही माती (जमलेली) होती. यावर जेव्हा जोराचा पाऊस पडला तेव्हां तो खडक खडकच राहीला.[४४१] अशा लोकांची कमाई त्यांच्या काहीच उपयोगी पडणार नाही. आणि अल्लाह काफिर लोकांना (इन्कार करणाऱ्याना) सरळमार्ग दाखवित नाही.[४४२]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تُبْطِلُوا صَدَقَاتِكُم بِالْمَنِّ وَالْأَذَىٰ
كَالَّذِي يُنفِقُ مَالَهُ رِئَاءَ النَّاسِ وَلَا يُؤْمِنُ بِاللَّهِ
وَالْيَوْمِ الْآخِرِ فَمَثَلُهُ كَمَثَلِ صَفْوَانٍ عَلَيْهِ تُرَابٌ فَأَصَابَهُ
وَابِلٌ فَتَرَكَهُ صَلْدًا لَّا يَقْدِرُونَ عَلَىٰ شَيْءٍ مِّمَّا كَسَبُوا وَاللَّهُ
لَا يَهْدِي الْقَوْمَ الْكَافِرِينَ ﴿٢٦٤﴾

२६५. आणि जे लोक आपले धन अल्लाहची प्रसन्नता लाभावी म्हणून पूर्ण समाधानी वृत्तीने खर्च करतात त्यांचे उदाहरण त्या बागे प्रमाणे आहे जी उंचावर आहे. तिच्यावर पाऊस पडला तर दुप्पट फळे येतात आणि पाऊस पडला नाही तरी हलक्या सरीही पुरेशा होतात. तुम्ही जे काही करीत आहात ते अल्लाह पाहात आहे.

وَمَثَلُ الَّذِينَ يُنفِقُونَ أَمْوَالَهُمُ ابْتِغَاءَ مَرْضَاتِ اللَّهِ
وَتَثْبِيتًا مِّنْ أَنفُسِهِمْ كَمَثَلِ جَنَّةٍ بِرَبْوَةٍ أَصَابَهَا وَابِلٌ
فَآتَتْ أُكُلَهَا ضِعْفَيْنِ فَإِن لَّمْ يُصِبْهَا وَابِلٌ فَطَلٌّ وَاللَّهُ
بِمَا تَعْمَلُونَ بَصِيرٌ ﴿٢٦٥﴾

४३३. येथून निवेदनाची दिशा पुन्हा पहिल्या क्रमाकडे वळविली गेली आहे.

४३४. ''फ़ी सबिलिल्लाह'' (अल्लाहच्या मार्गात) ने अभिप्रेत तो खर्च आहे ज्याचा उद्देश अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे हा आहे, आणि जो अल्लाहच्या शिकवणीनुसार केला जातो.

४३५. हे अल्लाहच्या मार्गात खर्च केलेल्या धनाबद्दल मिळणाऱ्या मोबदला व फलामध्ये होणाऱ्या वाढीचे उदाहरण आहे. ज्याप्रमाणे एका दाण्यापासून सात कणसे निघतात व प्रत्येक कणसात शंभर दाणे असतात त्याच प्रमाणे सत्कृत्याचे फल सातशे पटीपर्यंत मिळेल. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या दरबारी त्याच्या मार्गात खर्च केलेल्या धनदौलतीची फक्त संख्या पाहिली जात नाही तर हेही पाहिले जाते की कोणी कोणत्या भावनेने व कोणत्या परिस्थितीत अल्लाहच्या मार्गात खर्च केला. ज्या व्यक्तिने मन:पूर्वक व गाढ श्रद्धेच्या भावनेने विकट परिस्थितीत अल्लाहच्या मार्गात खर्च केला असेल ती व्यक्ति त्या व्यक्तिपेक्षा फलाची अधिक हक्कदार असेल, ज्याने सुस्थितीत असतांना कोत्या मनाने खर्च केला असेल.

४३६. म्हणजे अल्लाह अत्यंत व्यापक साधने व अमर्याद खजिन्याचा मालक आहे. आणि मोबदला देण्या बाबतीत अत्यंत उदार आहे.

४३७. अल्लाह सर्वज्ञ आहे. जे सत्कृत्य तुम्ही कराल ते त्याला ज्ञात असेल आणि तो त्याचे फल तुम्हाला निश्चित देईल.

४३८. संकुचित मनाचे लोक जेव्हा एखाद्यावर खर्च करतात तेव्हा इच्छितात की ती व्यक्ति सदोदित त्यांच्या उपकाराखाली नमूद असावी. आणि जेव्हा त्यांना याबाबतीत यश लाभत नाही तेव्हा ते टोमणे मारुन व उपहास करुन त्या व्यक्तिला अपमानित करण्याचा प्रयत्न करीत असतात. फर्माविले ज्या मोबदल्याचा वायदा केला जात आहे तो अशा लोकांच्या बाबतीत नाही तर तो त्या लोकांच्यासाठी आहे, ज्यांचे चारित्र्य अशा दोषांपासून स्वच्छ आहे आणि जे शुद्ध मनाने खर्च करतात.

४३९. श्रीमंत लोक सामान्यत: गरीबांना तिरस्काराच्या नजरेने पाहातात.आणि मागणाऱ्यांना झिडकारितात. पवित्र क़ुरआन निव्वळ खर्च करण्याचे प्रोत्साहन देत नाही तर सधन लोकांची नैतिक व बौद्धिक सुधारणा देखील करु इच्छिते. आणि म्हणून पवित्र कुरआनने अशा प्रकारचे दोष दूर करण्याकडे विशेष लक्ष पुरविले आहे आणि या गोष्टीची ताकीद केली आहे की मागणाऱ्याने जरी अयोग्य पद्धत अंगिकारीली तरी सहनशीलतेने व क्षमाशीलतेने वागावे.

४४०. अल्लाह जसा श्रीमंत आहे तसाच तो सहनशीलही आहे. म्हणून दासांमध्ये दुर्बलता व कमतरता असतांना देखील तो त्यांना आपल्या कृपेचा लाभ धडवित असतो. या गुण विशेषापासून दासांनी हा धडा घेतला पाहिजे की जर अल्लाहने त्यांना श्रीमंत बनविले आहे तर त्यांनी सहनशील बनावे आणि जरी गरीबांची व मागणाऱ्यांची वागणूक अप्रिय असली तरी त्यांना त्यांच्या बरोबर सहनशीलतेने व क्षमावृत्तीने वागावे.

४४१. हे अशा माणसाचे उदाहरण आहे, जो ज्यावर मातीचा थर जमा झालेला आहे अशा टणक व चिकण्या खडकावर शेती करतो. जेव्हा जोराचा पाऊस होतो तेव्हा पिका बरोबर सारी मातीही वाहून जाते आणि खडकच खडक राहून जातो. (Land slip) याच्या परिणाम स्वरुप ज्या प्रमाणे शेतकऱ्याची सर्व मेहनत वाया जाते त्याच प्रमाणे जे लोक स्वत:च्या नांव लौकिकासाठी दान करतात, ते आपल्या दानाला वाया घालवितात. ज्या दानाचा आधार सरळपणा व ईश-निष्ठा हा नसेल ज्याच्या पाठीमागे ईश्वराच्या दासांबद्दल खऱ्या सहानुभूतिची भावना नसेल, अशा दांना बद्दल आखिरत मध्ये कसल्याही प्रकारचा मोबदला व फळ मिळणार नाही.

४४२. म्हणजे जे लोक धन दौलतीची देणगी प्राप्त झाल्यानंतर देखील अल्लाहचे कृतज्ञ राहत नाहीत, त्यांना सरळपणा व ईशनिष्ठेने खर्च करण्याची बुद्धीच लाभत नाही. आणि कोणते हि सत्कृत्य ते चांगुलपणाच्या भावनेने करु शकत नाहीत.

२६६. एखाद्याची खजुराची व द्राक्षाची एक बाग असावी; जिच्या खालून जलप्रवाह वाहत असावेत आणि तिच्यामध्ये त्याच्यासाठी सर्व प्रकारची फळे असावीत;[४४३] तो वृद्धावस्थेस पोहचलेला असावा आणि त्याची मुळे अद्याप दुबळी असावीत अशा स्थितीत त्या बागेवर प्रखर आगीची वावटळ [४४४] येऊन ती जळून खाक व्हावी हे तुमच्या पैकी कोणी पसंत करील काय? अशाप्रकारे अल्लाह तुमच्यासाठी आयती स्पष्ट करीत आहे यासाठी की तुम्ही विचार चिंतन करावा .[४४५]

أَيَوَدُّ أَحَدُكُمْ أَن تَكُونَ لَهُ جَنَّةٌ مِّن نَّخِيلٍ وَأَعْنَابٍ
تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ لَهُ فِيهَا مِن كُلِّ الثَّمَرَاتِ
وَأَصَابَهُ الْكِبَرُ وَلَهُ ذُرِّيَّةٌ ضُعَفَاءُ فَأَصَابَهَا
إِعْصَارٌ فِيهِ نَارٌ فَاحْتَرَقَتْ كَذَٰلِكَ يُبَيِّنُ اللَّهُ
لَكُمُ الْآيَاتِ لَعَلَّكُمْ تَتَفَكَّرُونَ ٢٦٦

२६७. हे ईमान आणलेल्या लोकांनो आपल्या कमाई मधून चांगल्या व शुद्ध वस्तु [४४६] खर्च करा आणि त्या वस्तुं मधून खर्च करा ज्या जमिनीतून आम्ही तुमच्यासाठी उत्पन्न केल्या आहेत. [४४७] आणि वाईट व अशुद्ध वस्तु खर्च करण्याचा कदापिही इरादा करू नका. कारण जर त्याच वस्तु तुम्हाला दिल्या गेल्या तर तुम्ही त्या कधी घेणार नाही. परंतु तुम्ही कानाडोळा केला तर मात्र निराळे. आणि चांगल्या प्रकारे जाणा की अल्लाह ''गनी'',सर्वसमर्थ व स्तुतिस पात्र आहे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا أَنفِقُوا مِن طَيِّبَاتِ مَا كَسَبْتُمْ وَمِمَّا
أَخْرَجْنَا لَكُم مِّنَ الْأَرْضِ وَلَا تَيَمَّمُوا الْخَبِيثَ مِنْهُ
تُنفِقُونَ وَلَسْتُم بِآخِذِيهِ إِلَّا أَن تُغْمِضُوا
فِيهِ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ غَنِيٌّ حَمِيدٌ ٢٦٧

२६८. शैतान तुम्हाला दारिद्र्याचे भय दाखवितो आणि निर्लज्जपणाची कामे करावयास उत्तेजन देतो [४४८] परंतु अल्लाह आपल्याकडून क्षमेचे व कृपेचे आश्वासन देतो. अल्लाह मोठा उदार व मोठा ज्ञानी आहे.

الشَّيْطَانُ يَعِدُكُمُ الْفَقْرَ وَيَأْمُرُكُم بِالْفَحْشَاءِ وَاللَّهُ
يَعِدُكُم مَّغْفِرَةً مِّنْهُ وَفَضْلًا وَاللَّهُ وَاسِعٌ عَلِيمٌ ٢٦٨

२६९. तो ज्याला इच्छितो त्याला बुद्धिचातुर्यने अलंकृत करतो [४४९] आणि ज्याला बुद्धिचातुर्य लाभले त्यालाच मोठी दौलत लाभली. परंतु उपदेशाचा स्वीकार तेच लोक करतात जे समजदार आहेत.

يُؤْتِي الْحِكْمَةَ مَن يَشَاءُ وَمَن يُؤْتَ الْحِكْمَةَ فَقَدْ
أُوتِيَ خَيْرًا كَثِيرًا وَمَا يَذَّكَّرُ إِلَّا أُولُو الْأَلْبَابِ ٢٦٩

२७०. तुम्ही जो काही खर्च केलेला असेल आणि जो नवस (नजर) [४५०] देखील केलेला असेल त्याचे अल्लाहला ज्ञान आहे. आणि अत्याचारी लोकांचा [४५१] कोणी सहाय्यक असणार नाही.

وَمَا أَنفَقْتُم مِّن نَّفَقَةٍ أَوْ نَذَرْتُم مِّن نَّذْرٍ
فَإِنَّ اللَّهَ يَعْلَمُهُ وَمَا لِلظَّالِمِينَ مِنْ أَنصَارٍ ٢٧٠

४४३. अरबांच्या जवळ खजुरीच्या झाडांना (Date Palm Trees) खास महत्व होते त्यांच्या फळाचा ते अन्न म्हणून उपयोग करीत असत आणि त्यांची गणना धन प्राप्तीच्या महत्त्वाच्या साधनांत होत असे. अरब आपल्या बागांच्या संभोंवती खजुरीची झाडे लावत. याचा उद्देश बागांचे वादळापासून व उष्णतेपासून संरक्षण करणे हा अहे. बागांमध्ये द्राक्षांची व काही भागात पिंकांची लागवड करीत असत.

४४४. आगीच्या वावटळीने अभिप्रेत गरम वाऱ्याची झळ व उष्ण दाह यांची वावटळ ज्याने बागा जळून खाक होत.

४४५. या उदाहरणाने जी गोष्ट मनावर बिबविणे अभिप्रेत आहे ती ही की, काय तुम्ही ही गोष्ट पसंत कराल की आपले येथील जीवन संपन्न केल्यानंतर जेव्हा तुम्ही येथून निरोप घ्याल व आखिरतच्या जीवनात प्रवेश कराल तेव्हा एका घोर आपत्तीशी तुम्हाला सामना करावा लागेल आणि तुम्हाला हे माहित व्हावे की तुम्ही जे काही केले ते सर्व व्यर्थ झाले व तुम्हाला आता कसलीही संधी नाही की तुम्ही पुन्हा प्रथमपासून काही करु शकाल, किंवा कोणापासून काही मदत मिळवू शकाल. जर या आपत्तीशी सामना होऊ नये अशी तुमची इच्छा असेल तर या जगातील जीवनाला सर्व काही समजण्याचा दृष्टिकोन सोडून द्या व ईश्वराच्या प्रसन्नतेला आपले उद्दिष्ट वनवून ईश्वराच्या मार्गात खर्च करा.

४४६. सर्वश्रेष्ठ अल्लाह तेच दान (सदका) कबूल करतो जे आपल्या शुद्ध व हलाल (धर्माने उचित ठरविलेल्या) कमाईमधून केले गेले असेल. अशुद्ध व हराम (धर्माने निषिद्द ठरविलेल्या) कमाईमधून जे दान केले जाईल ते अल्लाह जवळ कदापिही स्वीकारर्ह नाही. उदाहरणार्थ, व्याज, जुगार; दारु, व इतर हराम वस्तूंची विक्री, निर्लज्जपणाची कामे व त्यांची प्रसिद्धी, त्याचाप्रमाणे चोरी, अफरातफर वगैरे मार्गांनी माणूस जी हराम कमाई करतो त्यामधून कितीही मोठ्या रकमेचा त्याने एखाद्या चांगल्या कार्यात विनियोग केला तरी त्याचे हे कृत्य अल्लाहजवळ कदापिही स्वीकारार्ह नाही. उलट ते तिरस्करणीय आहे.

४४७. खर्च करण्याची ही शिकवण जरी ज़कात व अैच्छिक दान (नफिल सदकात) या दोहोंच्या बाबतीत आहे. तरीपण जमिनीवरील पिकाने मुख्यत्वे इशारा पिकाच्या ज़कातीकडे आणि आपल्या कमाईने व्यपारी माल वगैरेच्या ज़कातीकडे आहे.

४४८. म्हणजे सैतान, तुम्ही चांगल्या कामात खर्च करावा असे इच्छित नाही. आणि म्हणून तो तुमच्या मनात दारिद्र्याचे भय निर्माण करतो आणि दुराचरणाच्या व ऐषआरामच्या गोष्टीमध्ये पैसे उडविण्यास प्रवृत्त करतो. आजकाल दुराचाराचे नवे प्रकार- उदा. नग्न चित्रांची नियतकालिके, अश्लील कादंबऱ्या, लज्जास्पद गाणी, नाचरंगाच्या मैफिली, निर्लज्जपणास प्रोत्साहन देणारी पुस्तके व नीतीमत्तेला नष्ट करणारे चित्रपट माणसाला अविचाराने खर्च करण्यास भाग पाडतात व त्याला त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यापासून व सत्कार्यांत खर्च करण्यापासून परावृत्त करीत असतात.

४४९. मूळात 'हिकमत' हा शब्द वापरला गेला आहे. याने अभिप्रेत बुद्धिमत्ता, विवेक, अंतर्दृष्टी व चातुर्य आहे. जगातील खरी संपत्ती धन नव्हे तर ती बुद्धिमत्ता आहे जी माणसामध्ये दूरदर्शीपणा निर्माण करते. आणि त्या कार्यांकडे त्याचे मार्गदर्शन करते ज्यामध्ये माणसाचे वास्तविक हित सामाविलेले असते. ही बुद्धिमत्ता सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या कृपेवर अवलंबून आहे. आणि अल्लाह ज्याला इच्छितो त्याला या देणगीने अलंकृत करतो. परंतु अल्लाहची ही इच्छा देखील बुद्धिमत्ता व सारासार विचारापासून मुक्त नसते. तो त्या लोकांवर हिकमतीच्या दौलतीचा वर्षाव करतो जे ऐहिक जीवनाला सर्व काही समजण्या ऐवजी व ऐषआरामाचा मार्ग अवलंबिण्या ऐवजी अल्लाहच्या प्रसन्नतेला आपले उद्दिष्ट ठरवून त्यासाठी पडेल तो त्याग व त्याच्या मार्गात बेसुमार खर्च करीत असतात.

४५०. मूळात نَذْر 'नज़र' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ नवस मागणे हा आहे. म्हणजे माणूस ही प्रतिज्ञा करतो की माझी जर अमुक अमुक इच्छा पुरी झाली तर मी ही ही भक्ति करीन किंवा इतके दान करीन. इस्लाम मध्ये फक्त अल्लाह जवळ नवस करणे उचित आहे. अल्लाह शिवाय इतरांच्या नांवाने नवस करणे निषिद्ध आहे. व तसे करणे हे अनेकेश्वरवादाचे कृत्य आहे. कारण नवस हा सुद्धा इबादत व भक्तिचाच एक प्रकार आहे; जो कृपा प्राप्तीसाठी व आभार प्रदर्शनार्थ माणूस करतो. आणि जेव्हा वस्तुस्थिती ही आहे की माणसाला जे काही लाभते ते देणारा अल्लाहच आहे. तर मग त्याने दिलेली देणगी प्राप्त झाल्यावर अल्लाह शिवाय इतरांचे आभार प्रदर्शनाचा अर्थ काय?

इस्लामने नवस मागण्यास प्रोत्साहन दिलेले नाही. परंतु जर एखाद्याने नवस केला व त्याची इच्छा पुरी झाली तर त्याने नवस पुरा करणे आवश्यक आहे. कारण ही अल्लाह. बरोबर केलेली प्रतिज्ञा आहे. ती पुरी करण्यामध्ये आळस करणे ही फार मोठी नैतिक दुर्बलता आहे.

४५१. येथे 'अत्याचारी' ने अभिप्रेत ते लोक आहेत जे या जीवनातील धनदौलतीला सर्व काही समजतात. व अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यास टाळाटाळ करतात किंवा खर्च केला तरी तो स्वत:च्या नांव लौकिकासाठी करतात.

२७१. तुम्ही तुमचे दान जरी उघडपणे दिले तरी ते चांगले आहे. परंतु जर तुम्ही गुप्तपणे गरजूंना द्याल तर ते तुमच्यासाठी अधिक चांगले आहे. [४५२] अल्लाह तुमच्या कितीतरी दोषांना दूर करील आणि अल्लाहला तुमच्या आचरणाची खबर आहे.

إِن تُبْدُوا الصَّدَقَاتِ فَنِعِمَّا هِيَ ۖ وَإِن تُخْفُوهَا
وَتُؤْتُوهَا الْفُقَرَاءَ فَهُوَ خَيْرٌ لَّكُمْ ۚ وَيُكَفِّرُ عَنكُم
مِّن سَيِّئَاتِكُمْ ۗ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ خَبِيرٌ ﴿٢٧١﴾

२७२. त्यांना सरळमार्गावर आणण्याची जबाबदारी तुमच्यावर नाही.[४५३] तर अल्लाह ज्याला इच्छितो त्याला सरळमार्गावर आणतो. आणि तुम्ही जे धन खर्च कराल त्याचा फायदा तुम्हाला मिळेल. आणि अल्लाहची प्रसन्नता लाभावी म्हणूनच तुम्ही खर्च करता तर जे धन तुम्ही खर्च कराल त्याचा पुरेपूर मोबदला तुम्हांला दिला जाईल.आणि तुमचा हक्क मुळीच हिरावून घेतला जाणार नाही.

لَّيْسَ عَلَيْكَ هُدَاهُمْ وَلَٰكِنَّ اللَّهَ يَهْدِي مَن يَشَاءُ ۗ
وَمَا تُنفِقُوا مِنْ خَيْرٍ فَلِأَنفُسِكُمْ ۚ وَمَا تُنفِقُونَ إِلَّا
ابْتِغَاءَ وَجْهِ اللَّهِ ۚ وَمَا تُنفِقُوا مِنْ خَيْرٍ يُوَفَّ إِلَيْكُمْ
وَأَنتُمْ لَا تُظْلَمُونَ ﴿٢٧٢﴾

२७३. मदतीस खरे पात्र ते गरज वंत आहे जे अल्लाहच्या मार्गात असे घेरले गेले आहेत की जमिनीवर धडपड करु शकत नाहीत.[४५४] अपरिचित माणूस त्यांचा स्वाभिमान पाहून ते सूस्थितीत आहेत असे समजतो.तुम्ही त्यांना त्यांच्या चेहऱ्यावरून ओळखू शकता. ते लोकांच्या मागे लागून मागत फिरत नाहीत.आणि जे धनही तुम्ही खर्च कराल ते नि:संशय अल्लाहला ज्ञात राहील.

لِلْفُقَرَاءِ الَّذِينَ أُحْصِرُوا فِي سَبِيلِ اللَّهِ
لَا يَسْتَطِيعُونَ ضَرْبًا فِي الْأَرْضِ يَحْسَبُهُمُ الْجَاهِلُ
أَغْنِيَاءَ مِنَ التَّعَفُّفِ تَعْرِفُهُم بِسِيمَاهُمْ لَا يَسْأَلُونَ
النَّاسَ إِلْحَافًا ۗ وَمَا تُنفِقُوا مِنْ خَيْرٍ فَإِنَّ اللَّهَ
بِهِ عَلِيمٌ ﴿٢٧٣﴾

२७४. जे लोक आपले धन रात्रदिवस उघडपणे व गुप्तपणे खर्च करीत असतात त्यांचा मोबदला त्यांच्या पालन कर्त्याजवळ आहे. त्यांना कसल्या प्रकारचे ना भय राहील ना दु:ख.

الَّذِينَ يُنفِقُونَ أَمْوَالَهُم بِاللَّيْلِ وَالنَّهَارِ سِرًّا
وَعَلَانِيَةً فَلَهُمْ أَجْرُهُمْ عِندَ رَبِّهِمْ وَلَا خَوْفٌ
عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿٢٧٤﴾

२७५. जे लोक [४५५] व्याज खातात [४५६] ते त्या माणसा प्रमाणे उठतील [४५७] ज्याला शैतानाने (झपटून) स्पर्श करुन वेडा बनविला आहे.[४५८] हे यासाठी की ते म्हणत आहेत, व्यापार ही व्याजासारखीच गोष्ट आहे.[४५९] यद्यपि अल्लाहने व्यापाराला हलाल (विहित) व व्याजाला हराम [४६०] (निषिद्ध) केलेले आहे.आता ज्या माणसाला त्याच्या पालनकर्त्याकडून हा उपदेश पोहचेल आणि तो परावृत होईल तर जे काही त्याने पूर्वी घेतले ते त्याचे झाले आणि त्याचा प्रश्न अल्लाहच्या स्वाधीन आहे. आणि जो कोणी याची पुनरुवती करील, असे लोक दोज़ख मध्ये जाणारे आहेत, जेथे ते सदैव राहतील. [४६१]

الَّذِينَ يَأْكُلُونَ الرِّبَا لَا يَقُومُونَ إِلَّا كَمَا يَقُومُ الَّذِي
يَتَخَبَّطُهُ الشَّيْطَانُ مِنَ الْمَسِّ ۚ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَالُوا إِنَّمَا الْبَيْعُ
مِثْلُ الرِّبَا ۗ وَأَحَلَّ اللَّهُ الْبَيْعَ وَحَرَّمَ الرِّبَا ۚ فَمَن جَاءَهُ
مَوْعِظَةٌ مِّن رَّبِّهِ فَانتَهَىٰ فَلَهُ مَا سَلَفَ وَأَمْرُهُ إِلَى اللَّهِ ۖ
وَمَنْ عَادَ فَأُولَٰئِكَ أَصْحَابُ النَّارِ ۖ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿٢٧٥﴾

४५२. दान (सदक़ा) व दानधर्म (खैरात) काही वेळा उघडपणे करणे फायदेशीर असते. उदा. दुसऱ्यांना असा खर्च करण्यास उत्तेजन देणे आणि एखाद्या सामूहिक उद्दिष्टासाठी प्रेरणा निर्माण करणे वगैरेसाठी असा उघडपणे दानधर्म करणे फायदेशिर ठरते. परंतु अशा प्रकारची आवश्यकता नसेल तर गुप्तपणे दान करणे अधिक चांगले. कारण या प्रकारे माणूस ढोंगीपणापासून वाचू शकतो. आणि गरजूंचा स्वभिमानही दुखावला जात नाही. हज़रत मुहम्मद पैगंबरांची (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हदीस (वचन) आहे की क़यामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह अशा माणसाला आपल्या कृपा छत्राखाली जागा देईल,ज्याने गुप्तपणे अशाप्रकारे दान दिलेले असेल की त्याच्या उजव्या हाताने काय दिले ते त्याच्या डाव्या हाताला माहित नसेल.

४५३. इशारा त्या गोष्टीकडे आहे की गरजवंताची मदत केली जावी; मग तो मुस्लिम असो वा गैरमुस्लिम. एखाद्यास सुबुद्धि देण्याची जबाबदारी तुमच्यावर नाही. आणि म्हणून या सबबीवर की त्याने मार्गादर्शनाचा स्वीकार केलेला नाही, एखाद्या गैरमुस्लिम गरजूला साह्य करण्यास दिरंगाई करु नका. अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करुन घेण्यासाठी ज्या गरजवंत माणसाचीही तुम्ही मदत कराल सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हाला याचा पुरा पुरा मोबदला देईल.

४५४. म्हणजे ते दीन (धर्माची) ची सेवा करण्यामध्ये इतके मग्न झालेले असतात की स्वत:च्या उपजीविकेच्या प्राप्तीसाठी परिश्रम करण्यास त्यांना वेळ नसतो. आणि स्वाभिमानामुळे ते आपली परिस्थिती उघड करीत नाहीत. त्यांना त्यांच्या चेहऱ्यावरुन ओळखले जाऊ शकते की ते खरोखर गरजू आहेत. अशा प्रकारचे गरजवंत मदतीस व साह्यास खरे पात्र आहेत. याचे उदाहरण त्याकाली 'सुफ्फा'चे लोक होते. जे इस्लामचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी दुसऱ्यांना त्याची शिकवण देण्यासाठी आणि अल्लाहच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी परिचय करण्यामध्ये पूर्णपणे मग्न होते व आपल्या गरजांना पुऱ्या करण्यासाठी लगणाऱ्या उपजीविकेच्या साधनापासून वंचित होते.

४५५. सत्कार्यी खर्च करण्यावर जोर दिल्यावर आता व्याजाबद्दलची मनाई निवेदन केली जात आहे. व्याज हे दान व दानधर्माच्या अगदी उलट आहे. दान व दानधर्माने माणसामध्ये सहानुभूति, उदारपणा, त्याग, दयाळूवृत्ती ईशप्रेम या भावना वाढीस लागतात. परंतु व्याज माणसामध्ये स्वार्थ, कृपणता, निष्ठूरपणा, लोभीवृत्ती यासारखे दुर्गुण निर्माण करते. आणि म्हणून पवित्र क़ुरआन ने जशी सत्कार्यी खर्च करण्याची शिकवण दिली आहे तशी व्याज घेण्यापासून अलिप्त राहण्याची ताकीद केलेली आहे.

४५६. मूळात الرِّبٰوا ''अर-रिबा'' हा शब्द वापरला गेला आहे, ज्याचा शाब्दिक अर्थ वाढ आहे. याने अभिप्रेत ती वाढ आहे जी एखाद्या कर्जावर मुदत देण्याच्या बदल्यात वसूल केली जाते, ज्याला आपण 'व्याज बट्टा' म्हणतो. व्याज ही विक्रीहून अगदी भिन्न गोष्ट आहे. आणि इस्लामने याला पूर्णपणे हराम ठरविले आहे. आणि म्हणून सावकारी व्याज असो वा बँकेचे व्याज, एखाद्या गरीबाकडून घेतलेले असो वा श्रीमंताकडून आणि कर्ज व्यापार उदिमासाठी दिलेले असो वा सार्वजनिक हिताच्या ऐखाद्या योजनेला अंमलात आणण्यासाठी दिलेले असो, व्याज व्याजच आहे व त्याच्या मनाईच्या बाबतीत कसलाही फरक होत नाही.

स्पष्ट असो की, व्याजाबद्दलची ही मनाई पूर्वी उतरलेल्या ग्रंथांमध्ये देखील आहे. तौरात मध्ये आहे की,

''तुझ्याजवळ राहणाऱ्या माझ्या लोकांपैकी कोणा कंगालाला तू पैसे उसने दिले, तर तू त्याच्याशी सावकाराप्रमाणे वागू नको. व त्याच्यापासून व्याज घेऊं नको.'' (पवित्र शास्त्र निर्गम २२:२५)

''आपल्या बांधवांशी व्याज बट्ट्याचा व्यवहार करु नको. पैशावर व्याज, अन्नधान्यावर वाढ किंवा इतर कोणत्याही पदार्थावर वाढी दिढी करु नको.''

(पवित्र शास्त्र. अनुवाद २३:१९)

जबूर मध्ये आहे की,

''जो आपला पैसा व्याजावर देत नाही आणि निरपराधी लोकांच्या विरुद्ध लाच घेत नाही, असे वागणारा कधी संकटात सापडत नाही.'' (जबूर १५:५)

''वाढी दिढी करीत नाही. व्याज घेत नाही..... तो सच्चा आहे.'' ''वाढी दिढी करीत नाही. व्याज घेत नाही....''

(यहेज्केल १८:८, १७)

तथापि बनी इसराईल लोकांनी तौरात मधील मूळ आज्ञेत फेरफार करुन परकीयापासून व्याज घेणे उचित ठरविले होते.

''वाटल्यास परदेशीयाशी वाढी दिढीचा व्यवहार कर, पण आपल्या बांधवांशी करु नको.'' (अनुवाद २३:२०)

त्याच्या याच कृत्यावर पवित्र क़ुरआनने हरकत घेतली आहे.

قَالُوْا لَيْسَ عَلَيْنَا فِى الْاُمِّيّٖنَ سَبِيْلٌ

'' ते म्हणतात की अशिक्षित लोकांशी केलेल्या व्यवहारा बद्दल आम्हाला जाब विचारला जाणार नाही.''

(पवित्र क़ुरआन. आले इमरान ७५)

पवित्र क़ुरआनची शिकवण ही आहे की कोणाबरोबरही दुर्व्यवहार उचित नाही; मग तो मुस्लिम असो वा गैर मुस्लिम आणि व्याज घेणे हा सर्वांत मोठा दुर्व्यवहार आहे. आणि म्हणून काफिरांचे (इन्कार करणाऱ्यांचे) धन सुद्धा व्याजाच्या मार्गाने

गिळंकृत करण्यास उचित ठरविणारे कसलेही प्रमाण नाही.

जे लोक चालू काळातील अर्थशास्त्र व अर्थव्यवस्थेने प्रभावित आहेत ते पवित्र क़ुरआन मधील ''रिबा'' चे स्पष्टीकरण असे करतात की याने अभिप्रेत फक्त ते व्याज आहे जे गरीबांना व गरजूना त्यांच्या प्राथमिक गरजांच्या पूर्ततेसाठी दिल्या जाणाऱ्या रकमेवर घेतले जाते. राहिली व्यापारी कर्जावरील व्याजाची गोष्ट. याचे चलन न पुरातन काली होते, न पवित्र क़ुरआनने याला प्रतिबंध केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती ही आहे की या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. व्यापारी, व्यावासायिक कर्जाचा रिवाज पुरातन कालापासून चालत आलेला आहे. उदा. पुरातन बाबिलोन मध्ये हम्मुराबी च्या कालात याचा रिवाज होता. (पहा. इनसायक्लोपिडीया ऑफ रिलीजन अँड ऐथिक्स खंड १२ पान ५५५)

राहिली पवित्र क़ुरआन मधील यांच्या प्रतिबंधाची गोष्ट. पवित्र करआनने साकल्याने 'रिबा'(व्याज) ला हराम ठरविले आहे; त्यामध्ये सर्व प्रकारच्या व्याजाचा समावेश होतो. मग ते व्याज गरीब व गरजूंकडून घेतलेले असो वा मोठ मोठ्या व्यापाऱ्यांकडून त्याचा दर कमी असो वा जबरदस्त आणि ते Interest च्या व्यख्येत बसत असोवा वा usury च्या.

४५७. उठण्याने अभिप्रेत कियामतीच्या दिवशी उठणे आहे.

४५८. सैतानाच्या बिलगण्याने अभिप्रत सैतानाचा तो प्रभाव आहे जो व्याज खाणाऱ्याच्या मनावर व बुद्धीवर पडतो. आणि परिणाम स्वरुप त्याच्यावर जबरदस्तीचे भूत अशा प्रकारे बसते की त्याची स्थिती वेड्यासारखी होते. तो धन जमा करण्याच्या काळजीने वेडा होऊन जातो. आणि त्या गोष्टीची त्याला जाणीव देखील होत नाही, की तो व्याजाच्या मार्गाने गरीबांचे रक्त शोषून घेत आहे. व निती व सहानुभूतिच्या भावनांना पायदळी तुडवित आहे. इतकेच नव्हे तर समाजाच्या आर्थिक व्यवस्थेवर आपल्या या कृत्याने विध्वंसकारी प्रभाव पाडीत आहे. जे लोक धनाच्या या वेडाने पछाडलेले आहेत, ते जेव्हा क़यामतीच्या दिवशी उठतील तेव्हा जे रक्त ते शोषित होते ते त्यांच्या बुद्धीला बिघडवून टाकील आणि ते या जगात व्याज, चक्र वाढ व्याज चे जे चक्र चालवीत होते ते त्या जगांत त्यांच्या नुकसानीस कारण बनलेले असेल. आणि त्यांची स्थिती भ्रमिष्टासारखी व वेड्यासारखी होईल.

४५९. व्याजाला विक्री समजणारे आणि त्याच्या मनाईवर आक्षेप घेणारे चालू काळातील अर्थशास्त्रज्ञच आहेत असे नव्हे तर असे शहाणे लोक क़ुरआन उतरण्याच्या वेळीही अस्तित्वात होते. यद्यपि दोहोंचे प्रकार एक दुसऱ्याहून अगदी भिन्न आणि त्यांच्यामध्ये उघड व स्पष्ट फरक आहे. आणि हेच कारण आहे की व्याजाला समाजावरील एक शाप ठरविणारे पुरातन काळीही होते आणि आजही आहेत. ॲरिस्टॉटलने व्याजाचा मोठा धिक्कार करून म्हटले होते की, "Mony dose not breed"

(Ency. of Social Sciences Vol. VIII P. 131)

म्हणजे पैसा पैशाला जन्म देत नाही.

आणि चालू काळातील समाजवादी व्याजाला गरीब व मजूर वर्गावरील अन्याय व अत्याचार समजतात.

" By Interest then the Socialist claims the rich are made richer and the poor poorer the stability of the social organism is disturbed- the evil that Melanchthon had feared"

(Ency. of R.E Vol. 12 P.554.)

" समाजवाद्याचे म्हणणे आहे की'' व्याज श्रीमंताला अधिक श्रीमंत व गरीबाला अधिक गरीब बनविते. आणि त्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेच्या स्थैर्यावर होतो. हा तो दोष आहे ज्याचे मेलमकशॉनला भय वाटत होते''

Usury has come to mean exorbitant interest but the legitimacy of interest is still debated. The early attacks on usury were motivated by the church's sympathy with the oppressed poor. the latest attack finds its strength in the plea that interest is an unjust tax on the labouring classes." (Do. p. 554)

''usury चा अर्थ जबरदस्त व्याज. परंतु व्याजाचा उचितपणा हा आजही वादाचा विषय बनलेला आहे. पूर्वी यावरील आक्षेपाचे कारण अत्याचार पीडित गरीबांच्या बद्दल चर्चेची सहानुभूति हे होते. आणि आता ताजा आक्षेप या आधारावर घेतला जात आहे की व्याज Interest हा मजूर वर्गावरील एक अन्यायी कर आहे.''

" Interest is the unpaid wage of the labourer." (Do. P. 554)

''व्याज ही मजूरांना अदा न केलेली मजूरी आहे.''

४६०. व्याजाला निषिद्ध ठरविण्याची कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे:-

Interest is the primary meaning is the payment for the use of money.(Ency. of S.S. Vol. VIII P. 131)

१) व्याज हा कर्जाऊ दिलेल्या रकमेच्या वापरावर कर्जदाराकडून

वसूल केला जाणारा नफा आहे.

यावरून हे अगदी उघड आहे की व्याजाचा व्यावहार हा विक्रीचा वा व्यापाराचा Trade प्रकार नव्हे. कारण यामध्ये न एखादी वस्तू खरेदी केली जाते ना विक्री केली जाते. तर भांडवल फक्त वापरासाठी दिले जाते. हे भाडेही नव्हे. कारण जी वस्तू भाड्यावर दिली जाते ती मूलत: कायम राहते आणि वापरा नंतर तीच वस्तू मूळ स्वरूपात मालकाला परत केली जाते. परंतु व्याजाच्या देवीघेवीत कर्जदार भांडवल खर्च करून टाकतो. आणि जेव्हा कर्ज परत करतो तेव्हां भांडवल धनकोला मूळ स्वरुपात परत करीत नाही. तर दुसरी रक्कम परत करतो आणि म्हणून याला भाडे म्हणणेही बरोबर नाही. यावरून व्याजाच्या व्यवहाराची ही वास्तविकता उघड होते की तो सर्वसामान्य अर्थाने न देवीघेवीचा व्यवहार आहे, न भाड्याचा. तर मग फायदा कशाबद्दल घेतला जातो? यावरूनच त्याचे अनिष्ट होणे उघड होते.

२) व्यापारामध्ये नफ्याचीही शक्यता असते व नुकसानीचीही. माणसाला यामध्ये धोका पत्करावा लागतो. परंतु व्याज घेणाऱ्याला कसलाही धोका पत्करावा लागत नाही. कारण मूळ रकमेबरोबर फायद्याची प्राप्ती त्याच्यासाठी खात्रीशीर असते.

३) व्यापारामध्ये माणसाला आपल्या बुद्धीचा वापर व परिश्रम करावे लागतात. परंतु व्याजाच्या व्यवहारात त्याला काही केल्याशिवाय ठराविक व खात्रीशीर फायदा प्राप्त होतो. आणि म्हणून माणूस कष्ट करावयाचे सोडून व्याजावर रुपये देण्याच्या सोप्या मार्गाचा अवलंब करतो. ही स्थिती नैतिक व आर्थिक दोन्ही दृष्ट्या चुकीची व नुकसानकारक आहे.

याशिवाय ही एक वस्तुस्थिती आहे की व्याज खाणाऱ्याच्या बाबतीत कर्जदाराचे मत चांगले असत नाही. तो व्याजाला आपल्यावर केला जाणारा अत्याचार समजतो. हे त्या गोष्टीचे प्रतिक आहे की मानवी स्वभाव व्याजाचा तिरस्कार करतो. आणि त्याला वाईट समजतो. पण एका व्यापाऱ्याच्या बाबतीत जो वाजवी नफा घेऊन माल विकतो त्याच्याबद्दल गरीबातल्या गरीब माणसाचे देखील असे मत असत नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे व्याज, गरीबांचे रक्त शोषून घेणे आणि भांडवलदार वर्गाने गरीब वर्गाकडून अयोग्य फायदा घेण्याचे नाव आहे. व्यापाराच्या वाढीसाठी व्याजावर जे कर्ज घेतले जाते त्याचा भार अनिवार्यपणे गरीबांवरच पडतो. कारण व्यापारी अगर कारखान दार मालाची किंमत ठरवितांना तो जे व्याज देतो ते विचारात घेऊनच किंमत ठरवितो. उघड आहे की व्याजामुळे त्याला मालाची किंमत अधिकच ठेवावी लागते. आणि या अधिक किंमतीचा भार प्रामुख्याने गरीब वर्गावरच पडतो.

४६१. व्याज खाणाऱ्यासाठी आगीच्या कायमच्या शिक्षेची घोषणा या गोष्टीकडे इशारा करते की व्याजाबद्दलची निषिद्धता इतर गुन्ह्यांच्या तुलनेने अधिक तीव्र आहे. आणि इतक्या उघड धमकीनंतर सुद्धा जे लोक अल्लाहच्या या आज्ञेचे पालन करण्यास तयार होत नाहीत व व्याज घेण्याचा आग्रहच धरतात, त्यांची ही वागणूक त्यांच्या अवज्ञाकारी व बंडखोर वृत्तीचा स्पष्ट पुरावा आहे. कारण त्यांची ही वागणूक ईमानाबरोबर कसलाही मेळ खात नाही.

२७६. अल्लाह व्याजाला नेस्तनाबूद करतो व दानाचे (सदकात) संवर्धन करीत असतो.[४६२] आणि अल्लाह कोणाही कृतघ्न व हक्क हिरावून घेण्याऱ्या अत्याचाऱ्याला पसंत करीत नाहीं.[४६३]

يَمْحَقُ اللّٰهُ الرِّبٰوا وَيُرْبِي الصَّدَقٰتِ ۗ وَاللّٰهُ لَا يُحِبُّ كُلَّ
كَفَّارٍ اَثِيْمٍ ﴿٢٧٦﴾

२७७. निःसंशय ज्या लोकांनी ईमान आणले व चांगले कार्य केले आणि नमाज़ क़ायम केली व ज़कात दिली त्यांचा मोबदला त्यांच्या पालन कर्त्याजवळ आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची काळजी राहणार नाही व ते दुःखीही होणार नाहीत.

اِنَّ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ وَاَقَامُوا الصَّلٰوةَ
وَاٰتَوُا الزَّكٰوةَ لَهُمْ اَجْرُهُمْ عِنْدَ رَبِّهِمْ ۚ وَلَا خَوْفٌ
عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُوْنَ ﴿٢٧٧﴾

२७८. ईमान आणलेल्या लोकांनो ! अल्लाहचे भय बाळगा व जे व्याज शिल्लक राहीले आहे ते सोडून द्या, जर तुम्ही खरोखर मोमिन असाल (तर असे करा).

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا اتَّقُوا اللّٰهَ وَذَرُوْا مَا بَقِيَ مِنَ الرِّبٰوٓا
اِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِيْنَ ﴿٢٧٨﴾

२७९. जर तुम्ही असे केले नाही तर खबरदार व्हा की अल्लाह व त्याच्या पैगंबराकडून लढ्याची घोषणा आहे.[४६४] आणि जर ''तौबा'' (पश्चाताप) कराल तर तुम्हाला तुमचे मूळ मुद्दल घ्यावयाचा हक्क आहे. तुम्ही कोणावर अत्याचार करु नका. तुमच्यावरही कोणी अत्याचार करु नये.

فَاِنْ لَّمْ تَفْعَلُوْا فَاْذَنُوْا بِحَرْبٍ
مِّنَ اللّٰهِ وَرَسُوْلِهٖ ۚ وَاِنْ تُبْتُمْ فَلَكُمْ رُءُوْسُ اَمْوَالِكُمْ ۚ
لَا تَظْلِمُوْنَ وَلَا تُظْلَمُوْنَ ﴿٢٧٩﴾

२८०. कर्जदार जर अडचणीत असेल तर त्याला सुस्थिती प्राप्त होईपर्यंत सवलत द्या.[४६५] आणि जर त्याला माफ केले तर ते-जर तुम्ही समजाल तर-तुमच्यासाठी चांगले आहे.

وَاِنْ كَانَ ذُوْ عُسْرَةٍ فَنَظِرَةٌ اِلٰى مَيْسَرَةٍ ۗ وَاَنْ تَصَدَّقُوْا
خَيْرٌ لَّكُمْ اِنْ كُنْتُمْ تَعْلَمُوْنَ ﴿٢٨٠﴾

२८१. त्या दिवसाचे भय बाळगा जेव्हा तुम्हाला अल्लाहकडे परत आणले जाईल. मग, प्रत्येक व्यक्तिला त्याच्या कमाईचा पूरा पूरा बदला दिला जाईल. आणि कोणावरही अन्याय होणार नाही.

وَاتَّقُوْا يَوْمًا تُرْجَعُوْنَ فِيْهِ اِلَى اللّٰهِ ۗ ثُمَّ تُوَفّٰى كُلُّ نَفْسٍ
مَّا كَسَبَتْ وَهُمْ لَا يُظْلَمُوْنَ ﴿٢٨١﴾ ع

४६२. वरवर व्याजाने भांडवल वाढते व दान दिल्याने ते कमी होते असे दिसते. परंतु वास्तविक पणे भांडवल व्याजाने कमी होते व दानाने वाढत असते. ही वाढघट वस्तुत: शेवटच्या परिणामाच्या दृष्टीने आहे. आणि म्हणून कयामतीच्या दिवशी व्याज खाणाऱ्याला हे दिसून येईल की जगामध्ये व्याजाच्या साह्याने ज्या भांडवलाला तो वाढवित होता व बँकेमध्ये जे लाखो रुपये तो जमा करीत होता, त्याची आखिरतच्या बँकेतील शिल्लक शून्य असेल आणि त्याला दु:ख व पश्चातापाशिवाय काही लाभणार नाही.

याउलट जे लोक बिगर व्याजाने कर्ज देत होते ते आपल्या चांगल्या आचरणाचा मोबदला अवश्य मिळवतील. विशेषत: ते लोक जे आपले धन अल्लाहच्या मार्गात खर्च करीत असत त्यांना त्यांचे सर्व भांडवल आखिरतच्या बँकेत सुरक्षित असल्याचे आढळून येईल. त्यांनी जो खर्च केला होता तोच नव्हे तर त्याच्या कितीतरी पटीने अधिक त्यांना मिळेल. ही तर झाली आखिरतमधील परिणामाची गोष्ट. राहिली या जीवनातील गोष्ट. या जगामध्ये व्याज चांगुलपणाला व भरभराटीला मिढविते आणि समाजाच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम घडवून आणते. या उलट दानाने चांगुलपणाही वाढीस लागतो व समाजाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचे चांगले परिणाम होत असतात.

४६३. व्याज खाणारा कृतघ्न आहे. कारण तो सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याला दिलेल्या दौलतीचा अल्लाहच्या मर्जी विरुद्ध वापर करतो. आणि तो हक्क हिरावून घेणाराही आहे कारण लोकांच्या हक्काच्या बाबतीत तो जुलूम जबरदस्ती करीत असतो.

४६४. मदीना येथील वास्तव्याच्या शेवटच्या कालात उतरलेल्या या आयतीद्वारे व्याजावर कायदेशीर बंधन घालण्यात आले. आणि व्याज खाणाऱ्यांना निर्वाणीचा हुकूम देऊन इशारा देण्यात आला की इस्लामी जीवन व्यवस्थेत व्याजाचा व्यवहार करणाऱ्याची स्थिती बंडखोरा सारखी व उपद्रवी लोकांसारखी आहे. आणि शासन व्याज घेण्यपासून परावृत्त न होणाऱ्या लोकांना मृत्यूची शिक्षाही देऊ शकते.

इस्लामी व्यवस्थेमध्ये व्याजाच्या व्यवहाराला कसलेही स्थान नाही. या उलट भांडवलशाही व्यवस्थेत व्याजाला पाठीच्या कण्यासारखे महत्त्वाचे स्थान आहे. आणि म्हणून इस्लामी व्यवस्था भांडवलशाही व्यवस्थेपेक्षा अधिक प्रतिष्ठित आहे.

व्याजाची निषिद्धता व त्याबद्दलची कायदेशीर मनाई हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या शेवटच्या हज्जच्या प्रसंगी अत्यंत कडक शब्दात स्पष्ट केली आहे.

وَرِبَا الْجَاهِلِيَّةِ مَوْضوع وَاَوَّلُ رِباً اَضَعُ رِبَانَا رِبَا
عباسِ بن عبدِالمطلب فِاِنَّهٗ مَوضُوعٌ كُلُّهٗ۔

"अज्ञान कालातील व्याज रद्द केले गेले आहे. सर्व प्रथम मी माझ्या कुटुंबियातील अब्बास इब्ने अब्दुल मुत्तलिब यांचे व्याज पूर्णपणे रद्द करीत आहे." (मुस्लिम किताबुल हज्ज)

४६५. पूर्वीच्या कालांत एखादा कर्जदार आपले कर्ज फेडण्यास समर्थ नसला तर त्याला आपले स्वातंत्र्य सुद्धा गमवावे लागत असे. कर्ज फेडले गेले नाही तर त्याला व त्याच्या मुलाबाळांना गुलाम बनविले जात असे. परंतु पवित्र कुरआनने अशा कडक शिक्षांना रद्द केले व आज्ञा केली की "कर्जदार जर अडचणीत असेल तर त्याला सुस्थिती प्राप्त होईपर्यंत सवलत द्या" या आज्ञेनुसार जे लोक कर्ज अदा करण्यास असमर्थ आहेत त्यांना संधि देणे आवश्यक आहे. त्यांना गुलाम बनविले जाऊ नये आणि त्याच प्रमाणे त्यांच्या जीवनावश्यक वस्सु उदाहरणार्थ राहते घर, उपयोगातील भांडीकुंडी व वापरातील कपडेलत्ते वगैरे जप्त केली जाऊ नयेत.

२८२. ईमान आणलेल्या लोकांनो ! जेव्हा तुम्ही ठराविक मुदतीसाठी कर्जाचा व्यवहार कराल [४६६] तर तो लिहून ठेवा.[४६७] आणि एखाद्या लिहिणाऱ्याने तुमच्या मधील व्यवहार न्यायाने लिहावा. लिहिणाऱ्याने, ज्या अर्थी अल्लाहने त्याला शिकविले आहे (दस्तऐवज) लिहिण्यास नकार देऊं नये. तर त्याने लिहावे.[४६८] आणि हा दस्तऐवज ज्याच्या वर जबाबदारी येते [४६९] (कर्जदार) त्याने लिहावा. आणि त्याने अल्लाहचे भय बाळगावे, जो त्याचा पालनकर्ता आहे. आणि त्यामध्ये काही कमी (फरक) करु नये. परंतु ज्याच्यावर जबाबदारी येते तो जर नादान अगर दुर्बल असेल वा मजकूर सांगू शकत नसेल तर त्याच्या कारभाऱ्याने पालकाने न्यायाने दस्तऐवज लिहिवावा. आणि त्याच्यावर आपल्या पुरुषमंडळी पैकी दोघांची साक्ष घालावी.[४७०] जर दोन पुरुष नसतील तर एक पुरुष व दोन स्त्रीया असाव्यात. हे साक्षीदार अशा लोकांमधून असावेत ज्यांना तुम्ही (साक्षीसाठी) पसंत करता.[४७१] दोन स्त्रीया यासाठी की जर एक चूकली तर दुसरी तिला आठवण करून देईल.[४७२]आणि जेव्हा साक्षीदाराना बोलाविण्यात येईल तेव्हा त्यांनी नकार देऊ नये. कर्जाचा व्यवहार लहान असो वा मोठा मुदत ठरवून तो लिहिण्या बाबत आळस करु नका. ही पद्धत अल्लाहजवळ अगदी न्यायसंगत आहे, साक्षीला अधिक निर्दोष ठेवणारी आहे. आणि या दृष्टीने अतियोग्य आहे की तुमच्या मनात संशय राहू नये. आणि व्यवहार जर हात उधारीचा असेल तर त्याला न लिहीले तरी चालेल. आणि खरेदी विक्रीचा व्यवहार कराल तेव्हां साक्षीदार ठेवित जा.लिहिणाऱ्याला व साक्षीदाराला त्रास देऊ नये. असे कराल तर ती मोठी अवज्ञा होईल. आणि अल्लाहचे भय बाळगा.[४७३] अल्लाह तुम्हाला शिक्षण देत आहे. आणि अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْۤا اِذَا تَدَايَنْتُمْ بِدَيْنٍ اِلٰۤى اَجَلٍ مُّسَمًّى
فَاكْتُبُوْهُ ؕ وَلْيَكْتُبْ بَّيْنَكُمْ كَاتِبٌۢ بِالْعَدْلِ ۪ وَلَا يَاْبَ كَاتِبٌ اَنْ
يَّكْتُبَ كَمَا عَلَّمَهُ اللّٰهُ فَلْيَكْتُبْ ۚ وَلْيُمْلِلِ الَّذِىْ عَلَيْهِ الْحَقُّ
وَلْيَتَّقِ اللّٰهَ رَبَّهٗ وَلَا يَبْخَسْ مِنْهُ شَيْـًٔا ؕ فَاِنْ كَانَ الَّذِىْ عَلَيْهِ
الْحَقُّ سَفِيْهًا اَوْ ضَعِيْفًا اَوْ لَا يَسْتَطِيْعُ اَنْ يُّمِلَّ هُوَ فَلْيُمْلِلْ
وَلِيُّهٗ بِالْعَدْلِ ؕ وَاسْتَشْهِدُوْا شَهِيْدَيْنِ مِنْ رِّجَالِكُمْ ۚ فَاِنْ
لَّمْ يَكُوْنَا رَجُلَيْنِ فَرَجُلٌ وَّامْرَاَتٰنِ مِمَّنْ تَرْضَوْنَ مِنَ
الشُّهَدَآءِ اَنْ تَضِلَّ اِحْدٰٮهُمَا فَتُذَكِّرَ اِحْدٰٮهُمَا الْاُخْرٰى ؕ
وَلَا يَاْبَ الشُّهَدَآءُ اِذَا مَا دُعُوْا ؕ وَلَا تَسْـَٔـمُوْۤا اَنْ تَكْتُبُوْهُ
صَغِيْرًا اَوْ كَبِيْرًا اِلٰۤى اَجَلِهٖ ؕ ذٰلِكُمْ اَقْسَطُ عِنْدَ اللّٰهِ وَاَقْوَمُ
لِلشَّهَادَةِ وَاَدْنٰۤى اَلَّا تَرْتَابُوْۤا اِلَّاۤ اَنْ تَكُوْنَ تِجَارَةً حَاضِرَةً
تُدِيْرُوْنَهَا بَيْنَكُمْ فَلَيْسَ عَلَيْكُمْ جُنَاحٌ اَلَّا
تَكْتُبُوْهَا ؕ وَاَشْهِدُوْۤا اِذَا تَبَايَعْتُمْ ۪ وَلَا يُضَآرَّ كَاتِبٌ
وَّلَا شَهِيْدٌ ؕ وَاِنْ تَفْعَلُوْا فَاِنَّهٗ فُسُوْقٌۢ بِكُمْ ؕ
وَاتَّقُوا اللّٰهَ ؕ وَيُعَلِّمُكُمُ اللّٰهُ ؕ وَاللّٰهُ بِكُلِّ شَىْءٍ عَلِيْمٌ ﴿۲۸۲﴾

४६६. या आयतीमध्ये व्यवहाराच्या सरळपणाबद्दल शिकवण देण्यात आलेली आहे. कारण व्यवहाराचा माणसाच्या चारित्र्यावर खोल परिणाम होत असतो. चारित्र्याची शुद्धता अपेक्षित असेल तर व्यावसायिक व देवीघेवीच्या व्यवहारात जबाबदारीने व सावधगिरीने वागले पाहिजे. याबाबतीत जी शिकवण दिली गेली आहे, त्यावर जर योग्य प्रकारे आचरण केले गेले तर व्यवसायिक कटकटी व भांडणेतंटे उद्‌भवणार नाही.

४६७. म्हणजे कर्जाचा दस्तऐवज लिहिला जावा व याबाबतीत दिरंगाई करू नये.

४६८. लिहिण्याची पात्रता ही सर्वश्रेष्ठ अल्लाहची देणगी आहे. या देणगीची निकड ही आहे की माणसाने आवश्यकता भासल्यास लोकांच्या उपयोगी पडावे. या शिकवणीची आवश्यकता व महत्तव जाणण्यासाठी त्या काळच्या परिस्थितीला समजले पाहिजे. त्या काळी लिहिता वाचता येणाऱ्यांची संख्या अगदीच कमी होती.इतकेच नव्हे तर ज्या समाजात पवित्र कुरआन उतरले तो समाज अशिक्षित (उम्मी) म्हणून ओळखला जात होता.

आयतीतील विषयाने या गोष्टीवरही प्रकाश पडतो की पवित्र क़ुरआन ने लिहण्यावाचण्याच्या शिक्षणाला महत्त्वाचे व आवश्यक ठरविले व त्याला अल्लाहच्या देणगीची उपमा दिली.

४६९. म्हणजे क़र्ज़ घेणारा.

४७०. म्हणजे क़र्ज़ाच्या दस्तऐवजावर दोन मुसलमान पुरुषांच्या साक्षी असावयास हव्यात. स्पष्ट असो की ही शिकवण मुसलमानांना दिली जात आहे.

४७१. म्हणजे अशा पुरुषांना व स्त्रीयांना साक्षीदार बनविले जावे जे नीति व आचरणाच्या दृष्टीने विश्वासपात्र व पसंत असतील.

४७२. एका पुरुषाच्याऐवजी दोन स्त्रीयांची साक्ष आवश्यक ठरविण्यामध्ये स्त्रीयाबद्दल अनादर व्यक्त करण्याचा हेतु नाही. याचे कारण पवित्र क़ुरआनच्या निवेदनानुसार हे आहे की साक्षीच्या बाबतीत स्त्रीयांकडून चूक होण्याची शक्यता अधिक, असते आणि वस्तुस्थिती ही आहे की स्त्रीयांचा व्यापारी व व्यावसायिक जगाशी संबंध कमी येतो व घरच्या प्रश्नाशी त्यांचा संबंध अधिक असतो. आणि म्हणून व्यवसायिक व्यवहारामधील खाचाखोचा त्या कमीच जाणतात. यामूळे त्या संदेहात पडण्याची शक्यता अधिक असते. याशिवाय स्त्रियामधील भावनाची प्रबळता त्यांच्या व्यवहारज्ञानावर प्रभाव पाडीत असते. आधूनिक मानसशास्त्रज्ञाकडूनही याचे समर्थन होते. यासंबंधी मौलाना अब्दुल माजिद दर्याबादी यांनी पवित्र क़ुरआनवरील आपल्या इंग्रजी भाष्यात मानसशास्त्रांच्या पुस्तकांतील उतारे दिलेले आहेत. त्यापैकी काही खालील प्रकारे.

" In women deception is almost physiological"

(Havelock Ellis Man and Woman p. 196)

''स्त्रीयांचे संदेह ग्रस्त होणे जवळ जवळ मानसिक बाब होय.''

"We are again and again forced to admit that a woman is not in a position to judge objectively. Without being influenced by her emotion." (Baver, op, cit. I. P. 289)

स्त्रीयांच्या या मानसशास्त्रामुळे इस्लामने आपल्या साक्षीच्या नियमात ही सावधगिरीची पद्धत अवलंबिली आहे की जर दोन पुरुष मिळत नसतील तर एक पुरुष व दोन स्त्रीयांना साक्षीदार बनविले जावे. कारण एक स्त्री त्यावहाराचे स्वरुप चांगल्या प्रकारे जाणू शकली नसेल वा घडलेल्या घटनेला योग्य प्रकारे निवेदन करू शकत नसेल तर दुसरी स्त्री तिला सावध करील.

४७३. अल्लाहचे भय व्यावसायिक व न्यायालयीन व्यवहारात सुद्धा बाळगले पाहिजे.

२८३. आणि तुम्ही प्रवासात असाल व लिहिणारा मिळत नसेल तर गहाण [४७४] ठेवून व्यवहार करु शकता. आणि जर तुमच्या पैकी एखाद्या माणसाने दुसऱ्यावर विश्वास ठेविला असेल तर ज्याच्याजवळ अमानत ठेविली गेली आहे त्याने ती अमानत ज्याची त्यास परत करावी आणि अल्लाहचे जो त्याचा पालनकर्ता आहे, भय बाळगावे. आणि साक्षीला लपवू नका. जो माणूस साक्षीला लपवितो तो वास्तविकपणे आपले मन गुन्ह्याने बरबटतो. आणि तुम्ही जे काही करता त्याला अल्लाह चांगल्याप्रकारे जाणतो.

وَاِنْ كُنْتُمْ عَلٰى سَفَرٍ وَّلَمْ تَجِدُوْا كَاتِبًا فَرِهٰنٌ مَّقْبُوْضَةٌ ؕ فَاِنْ
اَمِنَ بَعْضُكُمْ بَعْضًا فَلْيُؤَدِّ الَّذِى اؤْتُمِنَ اَمَانَتَهٗ وَلْيَتَّقِ اللّٰهَ
رَبَّهٗ ؕ وَلَا تَكْتُمُوا الشَّهَادَةَ ؕ وَمَنْ يَّكْتُمْهَا فَاِنَّهٗۤ اٰثِمٌ قَلْبُهٗ ؕ
وَاللّٰهُ بِمَا تَعْمَلُوْنَ عَلِيْمٌ ع ﴿٢٨٣﴾

२८४. जे काही आकाशांमध्ये आहे [४७५] आणि जे काही जमिनीमध्ये आहे ते सर्व अल्लाहचेच आहे. [४७६] तुम्ही तुमच्या मनातील गोष्टी उघड करा अगर लपवा, अल्लाह त्याचा जाब तुमच्याकडून घेईल.[४७७] मग ज्याला इच्छिल त्याला क्षमा करील व ज्याला इच्छिल त्याला शिक्षा करील. अल्लाह सर्व बाबतीत समर्थ आहे.[४७८]

لِلّٰهِ مَا فِى السَّمٰوٰتِ وَمَا فِى الْاَرْضِ ؕ وَاِنْ تُبْدُوْا مَا فِىْۤ
اَنْفُسِكُمْ اَوْ تُخْفُوْهُ يُحَاسِبْكُمْ بِهِ اللّٰهُ ؕ فَيَغْفِرُ لِمَنْ
يَّشَآءُ وَيُعَذِّبُ مَنْ يَّشَآءُ ؕ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ شَىْءٍ قَدِيْرٌ ﴿٢٨٤﴾

२८५. पैगंबराने ईमान आणले त्या गोष्टीवर जी त्यांच्या पालन कर्त्याकडून त्याच्यावर उतरलेली आहे. आणि मोमिन लोकांनी सुद्धा [४७९] (ईमान आणले आहे).या सर्वांनी ईमान आणले अल्लाहवर, त्याच्या फिरिशत्यांवर, त्याच्या ग्रंथांवर आणि त्याच्या पैगंबरावर. आम्ही त्याच्या पैगंबरापैकी कोणाच्याही बाबतीत भेदभाव करीत नाही. [४८०] आणि म्हणतात की आम्ही एकले [४८१] व आज्ञापालन केले. हे आमच्या पालनकर्त्या ! आम्ही तुझ्या क्षमेचे याचक आहोत आणि तुझ्याचकडे आम्हाला परत फिरावयाचे आहे.

اٰمَنَ الرَّسُوْلُ بِمَاۤ اُنْزِلَ اِلَيْهِ مِنْ رَّبِّهٖ
وَالْمُؤْمِنُوْنَ ؕ كُلٌّ اٰمَنَ بِاللّٰهِ وَمَلٰٓئِكَتِهٖ وَكُتُبِهٖ وَرُسُلِهٖ قف
لَا نُفَرِّقُ بَيْنَ اَحَدٍ مِّنْ رُّسُلِهٖ قف وَقَالُوْا سَمِعْنَا وَاَطَعْنَا
غُفْرَانَكَ رَبَّنَا وَاِلَيْكَ الْمَصِيْرُ ﴿٢٨٥﴾

४७४. गहण त्या वस्तुला म्हणतात जी कर्ज़ाच्या हमीपोटी धनकोच्या ताब्यात दिली जाते. ही गहण ठेविलेली वस्तु धनकोच्या ताब्यातील ठेव असते. तिच्यापासून कसल्याही प्रकारचा फायदा घेणे त्याच्यासाठी उचित नाही. उदा. जर घर गहाण ठेविले गेले असेल तर त्याचे भाडे खाण्याचा अधिकार त्याला पोहचत नाही. गहाणाचा व्यवहार फक्त प्रवासाशी निगडीत नाही. प्रवासाचा उल्लेख यासाठी करण्यात आला आहे की सर्वसाधारणपणे प्रवासात असताना त्याची गरज पडते. परंतु नैतिकदृष्ट्या ही गोष्ट पसंत केली जात नाही की योग्य कारणाखेरीज एखाद्याची गरजेची वस्तु ठेवून घेउन त्याला कर्ज दिले जावे. परंतु जर एखादा माणूस गहाण ठेवून कर्ज देत असेल तर असे करणे मुक्कामी असो वा प्रवासात असो, दोन्ही बाबतीत उचित आहे फक्त अट ही आहे की कर्ज़ावर व्याज घेतले जाऊ नये व त्याच्यापासून त्याने कसलाही फायदा घेऊं नये. कारण कर्ज देऊन जो फायदा घेतला जाईल ते व्याजच होईल.

४७५. या शेवटच्या तीन आयतींचे स्वरुप निवेदनाच्या समाप्तीचे आहे आणि 'मेअराज'च्या प्रसंगी उतरली होती.

४७६.'' जे काही आकाशामध्ये आहे व जे काही जमिनीमध्ये आहे''ही या व्यापक व विशाल विश्वाबद्दलची (Universe) पवित्र क़ुरआनची निवेदन शैली आहे.आणि अल्लाह साठी सर्वकाही आहे याचा अर्थ हा आहे की एक वा हजारो जग असोत जेथे, जे जे काही आहे, ती सर्व अल्लाहचीच मालमत्ता आहे. सर्व गोष्टी त्याच्याच अधिकारात आहेत. सर्वांवर त्याचीच सत्ता चालते. आणि सर्वांचा रक्षणकर्ता तोच आहे. ही आहे या विश्वाची वास्तविक हकीकत आणि हा आहे शुद्ध अेकेश्वरवाद (तौहीद) जो इस्लामच्या निष्ठेचा व श्रद्धेचा पाया आहे.

४७७. मनातील विचारांबद्दल व हेतूबद्दलही विचारणा केली जाईल.

४७८. याचा अर्थ असा नव्हे की सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ बक्षिस वा शिक्षेचा व्यवहार न्यायाच्या व सारासार विचाराच्या आधारावर होणार नाही. याचा अर्थ असा आहे की बक्षिस व शिक्षेच्या संबंधात अशी कोणतीही शक्ती नाही जी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या इच्छेमध्ये दखल देऊ शकेल. तो सर्वस्वी स्वतंत्र आहे आणि त्याला शिक्षा देण्याचा वा माफी देण्याचा पुरेपुर अधिकार आहे.

४७९. सूरह सुरवातीचा प्रारंभ या गोष्टीने झाला होता की अल्लाहच्या शिकवणीचा स्वीकार करणारे व त्यच्यावर ईमान आणणारे कोण लोक असतील. येथे निवेदन समाप्तीच्या संदर्भात स्पष्ट केले जात आहे की पैगंबरांना असे सोबती मिळालेले आहेत ज्यांना ईमानची दौलत लाभलेली आहे. ते कोणत्याही प्रकारच्या पूर्वग्रहाने पछाडलेले नव्हते म्हणून त्यांना ईमानच्या देणगीचा लाभ झाला. अशा प्रकारे पैगंबरांच्या मार्गदर्शनात जो समाज तयार झाला त्याला ईश्वराचा खरा परिचय घडून आला आणि त्या समाजाला अल्लाहच्या धर्मशास्त्राचा रक्षक व इस्लामी व्यवस्थेचा ध्वजवाहक बनविण्यात आले.

४८०. हे ईमान धारण करणाऱ्यांचे वचन आहे. जणू सारा समाज एकमुखाने ही घोषणा करीत आहे की आम्ही दुसऱ्या समाजांप्रमाणे अल्लाहच्या शिकवणीच्या बाबतीत राष्ट्रीय, वर्गीय वा वांशिक पूर्वग्रह बाळगित नाही, की एखाद्या पैगंबरांना मानावे व एखाद्यांचा इन्कार करावा या उलट आम्ही कोणताही भेदभाव न करता सर्व पैगंबरांना मानतो; मग त्यांचा संबंध कोणत्याही राष्ट्राशी, समाजाशी वा वंशाशी असो.

४८१. येथे एकणे याचा अर्थ मान्य करणे व स्वीकार करणे असा आहे.

لَا يُكَلِّفُ اللّٰهُ نَفْسًا اِلَّا وُسْعَهَا ۭ لَهَا مَا كَسَبَتْ وَعَلَيْهَا مَا
اكْتَسَبَتْ ۭ رَبَّنَا لَا تُؤَاخِذْنَآ اِنْ نَّسِيْنَآ اَوْ اَخْطَاْنَا ۚ رَبَّنَا
وَلَا تَحْمِلْ عَلَيْنَآ اِصْرًا كَمَا حَمَلْتَهٗ عَلَي الَّذِيْنَ مِنْ
قَبْلِنَا ۚ رَبَّنَا وَلَا تُحَمِّلْنَا مَا لَا طَاقَةَ لَنَا بِهٖ ۚ وَاعْفُ عَنَّا ۪
وَاغْفِرْ لَنَا ۪ وَارْحَمْنَا ۪ اَنْتَ مَوْلٰىنَا فَانْصُرْنَا عَلَي الْقَوْمِ
الْكٰفِرِيْنَ ۲۸۶

**२८६. अल्लाह कोणत्याही जीवावर त्याच्या शक्ती पेक्षा अधिक जबाबदारीचा भार घालीत नाही.[४८२] त्याने जो सदाचार कमविला तो त्याच्याच साठी आहे. आणि जो दुराचार गोळा केला त्यांचे परिणाम त्यालाच भोगावे लागणार आहेत.[४८३] हे आमच्या पालनकर्त्या ![४८४] आमच्या कडून चूक भूल झाली तर त्यावर आमची पकड करु नकोस.[४८५] हे आमच्या पालनकर्त्या !आमच्यावर असा भार टाकूं नकोस जसा आमच्या पूर्वीच्या लोकांवर तूं टाकला होतास.[४८६] हे आमच्या पालनकर्त्या ![४८७] आमच्यावर असा भार टाकू नकोस जो पेलण्याची आमच्यामध्ये शक्ती नाही.[४८८] आमच्या दोषांकडे कानाडोळा कर.[४८९] आम्हाला क्षमा कर [४९०] आणि आमच्यावर कृपा कर. तूं आमचा मौला (सहायक) आहेस.[४९१] आम्हाला काफिरांवर (इन्कार करणाऱ्यावर) वर्चस्व दे.[४९२]**

४८२. हे सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून त्या सर्वकष कायद्याचे प्रकटीकरण आहे की धर्मशास्त्राची (शरीअत ची) जबाबदारी ही एक महान जबाबदारी आहे. तरीपण प्रत्येक व्यक्ति तिच्या शक्ति नुसार जबाबदार आहे. एखादी व्यक्ति जर खरोखर निरुपायामुळे एखाद्या आज्ञेचे पूर्णपणे पालन करु शकत नसेल तर जितके पालन करणे तिला शक्य आहे त्याबद्दलच तो जबाबदार राहील. या नियमाचा धर्मशास्त्राच्या आदेशामध्ये विचार केला गेला आहे. आणि निरुपायाच्या परिस्थितीत सवलत दिली गेली आहे. उदा. जर एखादा माणूस उभे राहून नमाज़ अदा करु शकत नसेल तर त्याला बसून नमाज़ अदा करण्याची सवलत दिली गेली आहे. त्याच प्रमाणे 'वुज़ू' (नमाज़पूर्वी हातपाय तोंड धुवून स्वच्छ होणे) साठी पाणी मिळत नसेल वा पाण्याचा वापर करणे नुकसानकारक असेल तर 'तयम्मुम' (वुज़ूसाठी पाण्याऐवजी मातीचा वापर करणे) करण्याची सवलत दिली गेली आहे. त्याचप्रमाणे इस्लामच्या सामुहिक आदेशावर ज्या मर्यादिपर्यंत आचरण करणे शक्य आहे त्या मर्यादेपर्यतच माणसाला त्याबद्दल जबाबदार धरले जाईल. आणि जे काम त्याच्या आवाक्या बाहेर आहे त्याबद्दल त्याला विचारणा केली जाणार नाही.

४८३. म्हणजे प्रत्येक व्यक्ति स्वत:च्या कृत्यास जबाबदार आहे. आणि कयामतीच्या दिवशी त्याचा अनिर्वाय परिणाम त्याच्यासमोर येणार आहे. त्या दिवशी प्रत्येकाला तेच लाभेल जे त्याने या जगात पेरले होते. प्रत्येक आचरणाचा मग ते चांगले असो वा वाईट,एक अनिवार्य परिणाम व प्रभाव असतो. आणि अल्लाहचा आचरणाचा बदला देणारा कायदा अत्यंत नि:स्पृह व कमाल दर्जाचा न्याय वर आधारीत आहे. आणि म्हणून हे शक्य नाही की एकाने दुराचार करावा व तो दुसऱ्याच्या माथ्यावर थोपला जावा. आणि त्याचप्रमाणे हे पण शक्य नाही की एखाद्या ने सदाचार करावा व त्याची नोद मात्र ब च्या हिशेबी जमा व्हावी. आचरणाचा बदला ही एखादी दुसऱ्याच्या नांवे बदलता येणारी Transferable गोष्ट नव्हे. ज्या कार्यात माणसाचा इरादा व त्याचे प्रयत्न यांचा संबंध नाही त्याबद्दल त्याला बक्षिस वा शिक्षा का मिळावी? बक्षिस व शिक्षा या बाबतीत पवित्र क़ुरआन ने स्पष्ट केलेल्या नियमाचे स्वरुप एका सर्वकष कायद्याचे आहे. याने ख्रिश्चन लोकांच्या ''पापाचे प्रायश्चित''या निष्ठेचे खंडन होते. त्याचप्रमाणे मुसलमान समाजात प्रचलित असलेल्या फलाबद्दलच्या (सवाब) चुकीच्या रुढीचेहि खंडन होते.

४८४. सुरतीची समाप्ती प्रार्थनेने होत आहे. ही सामूहिक प्रार्थना आहे जी मुसलमान समाजाच्या (उम्मतच्या) मुखाने अदा होत आहे. या प्रार्थनेचा एक एक शब्द इस्लामी जीवन व्यवस्थेच्या महान जबाबदारीची जाणीव स्पष्ट करीत आहे.

४८५. ईमान धारकांच्या या प्रार्थनेचा सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वीकार केलेला आहे. पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हदीस मध्ये आहे की

**رفع عن امتی الخطاء والنسیان وما استکرھو علیه**

(ابن ماجہ۔ کتاب الطلاق)

''माझ्या समाजाची (उम्मतीची भूलचूक विस्मरण त्याचप्रमाणे त्यांना सक्तीने जे काम करावयास भाग पाडले जाते त्याबद्दल त्यांना माफी आहे.''(अभिप्रेत तो गुन्हा व भूलचूक होय ज्यात बेपर्वा वृत्तीचा लवलेश हि नसावा) (इब्ने माजा- किताबुत्तलाक)

असे असताना देखील माफीबद्दल प्रार्थना करीत राहणे यासाठी आवश्यक आहे की याने आपल्या दोषाची जाणीव व अल्लाहसमोर आपली दीनता व नम्रता प्रकट होते. आणि ही गोष्ट एका कृतज्ञ दासासाठी आवश्यक आहे.

४८६. इशारा त्या भाराकडे (जबाबदारी कडे) आहे जो ज्यु लोकांच्यावर टाकला गेला होता. त्यांच्या बंडखोरीमुळे त्यांना ''सब्त'' (शनिवार) पाळण्या सारखे कडक आदेश दिले गेले होते. हज़रत मुहम्मद पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) अनुयायांची प्रार्थना ही होती की ''आमच्या शरीयतीला अवघड करु नकोस आणि आमच्यावर अशा जबाबदाऱ्या टाकू नकोस ज्या पार पाडणे आमच्यासाठी कठीण आहे.''

ईमानधारकांची ही प्रार्थनाही मान्य करण्यात आली. आणि हजरत मुहम्मद पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) समाजाला जी शरीयत दिली गेली ती अवघड आदेशा पासून मुक्त आहे. आणि तिचे वैशिष्ट्य हेच आहे की ती अत्यंत सोपी व सवलत देणारी शरीअत आहे हज़रत मुहम्मद पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) फर्माविले आहे की

**بعثت بالحنیفیة السمحة** (احمد ج۵ ص ۲۶۶)

'' मला अशी शरीअत (दीन) देऊन पाठविण्यात आले आहे जी सरळ व सोपी आहे.''

प्रार्थनेचा स्वीकार झाला असताना देखील ती ईमान धारकांच्या तोंडी चालू राहणे त्या कालाची आठवण ताजी करुन देते जेव्हा शरीयत उतरत होती आणि या समाजावर तिच्या बरहुकूम आचरण करुन तिचा प्रचार व प्रसार करण्याची जबाबदारी टाकली जात होती; आणि त्याच प्रमाणे या शब्दांद्वारे हा समाज, आपण अल्लाहच्या कृपेस अधिक पात्र व्हावे म्हणून अल्लाहसमोर आपली दुर्बळता व कमजोरी प्रकट करीत आहे.

४८७. प्रार्थने मधील ''हे आमच्या पालनकर्त्या !'' या शब्दांची पुनरावृत्ती प्रार्थना करणाऱ्याचे आपल्या पालन कर्त्याबद्दलचे

आत्यंतिक प्रेम व घनिष्ट (जवळीक) दर्शविते. प्रार्थनेच्या या शैली मध्ये प्रार्थनेच्या शिष्टाचाराच्या शिक्षणाचाही समावेश आहे.

४८८. म्हणजे शरीयतीच्या जबाबदाऱ्या पुऱ्या करण्यासाठी आम्हाला अशा कसोट्यामधून जावे लागू नये, ज्या मध्ये आम्ही पुरे उतरु शकणार नाही. आणि आम्हांला अशा संकटाशी सामना करावा लागू नये जी आमच्या सहनशक्ती बाहेर आहेत.

४८९. म्हणजे इस्लामच्या जबाबदाऱ्यांचे पालन करणे आणि शरीयतीच्या आदेशानुसार आचरण करण्यामध्ये आमच्याकडून ज्या उणिवा राहून जातील त्याबद्दल आम्हाला माफ कर.

४९०. वा आमची सुटका (मग़्फिरत) कर मग़्फिरतचा अर्थ झाकणे असा आहे. अभिप्रेत अपराधांना (पातकांना) झाक असा आहे.

४९१. मौला म्हणजे सहायक व मदतगार समाज (उम्मत) जाणू अपली ही जाणीव व्यक्त करीत आहे की शिकवणीच्या मर्गावर क़ायम राहणे आणि विराधाच्या वादळातून सुरक्षितपणे पार पडणे तुझ्या साह्या व मदतीखेरीज शक्य नाही.

४९२. ही इस्लामच्या शत्रूंच्या मुकाबल्यात साह्य व यश मिळण्याबद्दलची प्रार्थना आहे. शरीयतीच्या आदेशांना तपशीलवार निवेदन केल्यानंतर आणि त्यावर आचरण करण्याची शिकवण दिल्यानंतर समाजाच्या तोंडून इस्लामच्या शत्रूंच्या मुकाबल्यात साह्याची व विजयाची प्रार्थना या गोष्टीची मागणी करीत आहे की या समाजाला शरीयतीनुसार जीवन जगण्याचे स्वातंत्र्य असावयास हवे. आणि सार्वजनिक जीवनात शरीयतीची पद्धत क़ायम करण्यासाठी त्याला सामर्थ्यही लाभले पाहिजे. त्याचप्रमाणे या मार्गात इस्लामच्या विरोधकांकडून जे अडथळे उभे केले जातील त्यांना दूर करण्यासाठी व शरीयतीच्या कायदेकानूंची अंमलबजावणी करण्याचा मार्ग सुकर होण्यासाठी सत्तेची व प्रभावाची आवश्यकता आहे.

# ३. सूरह
# आले इमरान

# ३. सूरह आले इमरान

**नाव:** या सूरतीच्या आयत नं. ३३ मध्ये ''आले इमरान'' (इमरानचे कुटुंब) चा उल्लेख आला आहे. हज़रत मरियम यांच्या वडिलांचे नांव इमरान होते. आणि हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) हे त्यांचे नातू होते. यावरून निशाणीदाखल या सूरतीचे नांव ''आले इमरान'' ठेविले गेले आहे.

**अवतरण काल:** ही सूरह 'मदनी' म्हणजे हज़रत मुहम्मद पैगंबरांनी मक्केहून मदीना शहरी प्रयाण केल्यानंतर उतरली. आणि मजकूरावरून अनुमान निघते की उहदच्या लढाईनंतर (हिजरी सन ३) ती उतरली.

**मध्यवर्ति विषय:** या सूरतीचा मध्यवर्ति विषयसुद्धा मार्गदर्शन हाच आहे. आणि या आधारावर या सूरतीचा मागील सूरतीशी घनिष्ट संबंध आहे. इतकेच नव्हे तर ती मागील सूरतीची पुरवणी आहे. मार्गदर्शक प्रकाश या नात्याने सूरे बक़राला सूर्याची उपमा दिली तर सूरे आले इमरानला चंद्राची उपमा द्यावी लागेल. हज़रत मुहम्मद पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ''दोन अत्यंत तेजस्वी सूरती'' म्हणून संबोधिले आहे. सूरे बक़रामध्ये यहुदी लोकांना संबोधन केले गेले आहे तर सूर आले इमरानमध्ये ईसाई लोकांना. मागील सूरतीमध्ये ''कोपास पात्र झालेल्यांचे'' स्पष्टीकरण केले गेले आहे तर या सूरतीमध्ये ''मार्ग भ्रष्ट झालेल्यांचे'' स्पष्टीकरण करण्यात आले आहे. अशा प्रकारे मागील सूरतीमध्ये मार्गदर्शनाच्या ज्या गोष्टी संक्षिप्त पणे निवेदन केल्या गेल्या होत्या त्या या सूरतीमध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. आणि अत्यंत स्पष्टपणे हे जाहीर करण्यात आले आहे. की वस्तुत: ईश्वराच्या मार्गदर्शनावर आधारित असा एकमेव धर्म फक्त इस्लामच आहे. आणि म्हणून कोणी इस्लामखेरीज दुसऱ्या कोणत्याही धर्माचा अंगिकार केला तर अल्लाहजवळ तो मान्य केला जाणार नाही. आणि असे लोक आखिरतमध्ये अगदी दुर्दशाग्रस्त असतील. अशा प्रकारे ही वस्तु:स्थिति सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट झाली की अल्लाहचे मार्गदर्शन प्राप्त करण्याचा एकमेव मार्ग इस्लाम हाच आहे. निरनिराळे धर्म नव्हते. आणि या जीवनानंतरच्या जीवनाची सफलता इस्लामचा अंगिकार केल्याशिवाय शक्य नाही.

**ग्रंथ मांडणी:-**आयत नं. १ ते ९ चे स्वरूप प्रस्तावनेसारखे आहे. यामध्ये एकेश्वरवादाला मूलभूत सत्य म्हणून सादर करून हे स्पष्ट करण्यात आले आहे की पवित्र क़ुरआन हे अल्लाहचे फरमान (अज्ञापत्र) आहे. आणि या आधारावर ''धार्मिक वादांच्या'' बाबतीत त्याचा दर्जा निर्णायक वचनाचा आहे.

आयत नं १० ते ३२ मध्ये ग्रंथधारक व ग्रंथ धारण न करणारे अशा सर्वांना सावधान करण्यात आले आहे की जर त्यांनी या क़ुरआनच्या मार्गदर्शनाचा ज्याचे नांव इस्लाम आहे स्वीकार केला नाही तर त्याचा अर्थ अल्लाहबरोबर नकार (कुफ्र) असा होईल व त्याची शिक्षा निरंतरची जहन्नम आहे. आणि ज्या 'धर्मनिष्ठेचे' व 'धार्मिकतेचे' आवरण त्यांनी घेतले आहे त्याची वास्तविकता क़यामतीच्या दिवशी स्पष्ट होऊन ते तेथे अगदी अनावृत झालेले असतील.

आयत नं. ३३ ते ६३ मध्ये हज़रत मरियम (अलैहिस्सलाम) आणि हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या संबंधीच्या घटना व सत्य गोष्टी निवेदन केल्या गेल्या आहेत. ज्या ईसाई लोकांनी आपल्या धर्मात समाविष्ट केलेल्या खोट्या श्रद्धांचे खंडण करतात. या संदर्भात हज़रत ज़करिया (अलैहिस्सलाम) व हज़रत याह्या (अलैहिस्सलाम) यांचा उल्लेख आलेला आहे.

आयत नं. ६४ ते १०१ मध्ये ग्रंथधारक व विशेषत: ईसाई लोकांच्या मार्गभ्रष्टतेवर आणि त्यांच्या नैतिक व धार्मिक अधोगतीवर प्रहार करुन ईमानधारकांना त्यांच्या पासून अलिप्त राहण्यांची शिकवण दिली गेली आहे.

आयत नं. १०२ ते १२० मध्ये ईमानधारकांना संबोधन करून त्यांना इस्लामवर स्थिर राहण्याची अल्लाच्या ग्रंथाला दृढपणे धरून राहण्याची व त्याला आपल्या सामुदायिक जीवनाचा आधार बनविण्याची शिकवण दिली गेली आहे. त्याचप्रमाणे त्यांना आपल्यामधून इस्लामचे आवाहन व सुधारणेच्या कार्याला स्वत:ला वाहून घेतलेला असा एक पक्ष उभारण्यास सांगाण्यात आले आहे; ज्याचे कार्य इस्लामी समाजाला प्रत्येक प्रकारच्या भ्रष्टाचारापासून व उपद्रवापासून वाचविणे व अल्लाहचा संदेश अल्लाहच्या दासांप्रत पोहंचविणे हे असेल. त्याचबरोबर ग्रंथधारकांच्या उपद्रवापासून सावध राहण्याची त्यांना ताकीद दिली गेली आहे.

आयत नं. १२१ ते १८९ मध्ये उहदच्या लढाईच्या

वेळेची परिस्थिती व घटनांवर समालोचन करण्यात आले आहे. आणि त्या दोषांकडे व उणीवांकडे निर्देश करण्यात आलेला आहे ज्या त्यावेळी दिसून आल्यात.

आयत नं. १९० ते २०० चे स्वरूप निवेदनाच्या समारोपाचे आहे यामध्ये स्पष्ट केले गेले आहे की ईमान ही एखादी अंधश्रद्धा नव्हे. उलट ती बुद्धीची व स्वाभाविक अशी हाक आहे. या हाकेला माणूस जेव्हा प्रतिसाद देतो तेव्हांच त्याचा संबंध खऱ्या अर्थी त्याच्या पालनकर्त्याशी जोडला जातो. आणि आपोआप त्याच्या मनापासून ही प्रार्थना निघते की त्याच्या शेवट चांगला होवो. याप्रसंगी त्यांचा पालनकर्ता त्याला उत्तम शेवटाची खुशखबर ऐकवितो व खात्री देतो की त्याने सत्यमार्गात जो त्याग केलेला आहे त्याचा भरपूर मोबदला त्याला दिला जाईल. शेवटी सत्यमार्गात लढणाऱ्या ईमानधारकांना प्रोत्साहन दिले गेले आहे आणि त्यांना सत्य व असत्य यांच्या लढाईमध्ये स्थिर राहण्याची शिकवण दिली गेली आहे.

# ३. सूरह आले इमरान

سُوْرَةُ اٰلِ عِمْرٰنَ

अनुवाद आयती : २००

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नांवाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ

१. अलिफ लाम मीम.[१]

الٓمّٓ ﴿١﴾

२. अल्लाह ज्याच्याशिवाय कोणी ईश [२] (उपास्य) नाही तो चैतन्यशील, अजरामर व शाश्वत आहे व त्याने सर्वांना सांभाळलेले आहे.[३]

اللّٰهُ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ الْحَیُّ الْقَیُّوْمُ ﴿٢﴾

३. त्याने तुमच्यावर सत्यग्रंथ उतरविला,[४] जो पूर्वीच्या ग्रंथांचे समर्थन करीत आहे. आणि त्याने 'तौरात' [५] व 'इंजील'[६] उतरविली होती.

نَزَّلَ عَلَیْكَ الْكِتٰبَ بِالْحَقِّ مُصَدِّقًا لِّمَا بَیْنَ یَدَیْهِ
وَاَنْزَلَ التَّوْرٰىةَ وَالْاِنْجِیْلَ ﴿٣﴾

४. यापूर्वी लोकांच्या मार्गदर्शना साठी. आणि त्याने 'फ़ुरक़ान' [७] (सत्य असत्य मधील पारख करणारी कसोटी) उतरविले. खात्री बाळगा, जे लोक अल्लाहच्या आयतींचा (वचनांचा) इन्कार करतील त्यांना कडक शिक्षा मिळेल. अल्लाह प्रभावशाली व (गुन्हा करणाऱ्यांना ) शिक्षा देणारा आहे.[८]

مِنْ قَبْلُ هُدًی لِّلنَّاسِ
وَاَنْزَلَ الْفُرْقَانَ اِنَّ الَّذِیْنَ كَفَرُوْا بِاٰیٰتِ اللّٰهِ لَهُمْ عَذَابٌ
شَدِیْدٌ وَاللّٰهُ عَزِیْزٌ ذُو انْتِقَامٍ ﴿٤﴾

५. अल्लाहपासून कोणतीही गोष्ट लपलेली नाही. ना जामिनीमध्ये आणि ना आकाशा मध्ये.[९]

اِنَّ اللّٰهَ لَا یَخْفٰی عَلَیْهِ شَیْءٌ فِی الْاَرْضِ وَلَا فِی السَّمَآءِ ﴿٥﴾

६. तोच आहे जो, ज्याप्रमाणे इच्छितो त्याप्रमाणे गर्भाशयामध्ये तुमचा तोंडावळा तयार करतो. [१०] या प्रभावशाली आणि बुद्धिमाना शिवाय कोणी ईश नाही.

هُوَ الَّذِیْ یُصَوِّرُكُمْ فِی الْاَرْحَامِ كَیْفَ یَشَآءُ لَآ اِلٰهَ اِلَّا
هُوَ الْعَزِیْزُ الْحَكِیْمُ ﴿٦﴾

१. ही वेगवेगळी अक्षरे आहेत. यांच्या बद्दलचा खुलासा सूरे बरकाच्या सुरवातीस करण्यात आला आहे. तेथे आम्ही 'जबूर' (Psalms) च्या हवाल्याने हे स्पष्ट केले आहे की ही अक्षरे सुरतीच्या विशिष्ट विषयांकडे किंवा विशिष्ट शब्दांकडे इशारा करतात. या सुरतीच्या विषयांवरुन स्पष्ट होते की ही अक्षरे या विषयांशी खास निगडित आहेत. थोडक्यात सांगावयाचे तर आम्ही असे म्हणू की 'अलिफ' चा इशारा ''अल्लाह'' क़डे आहे, ज्याचे योग्य ज्ञान या सुरतीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. शिवाय त्याचा इशारा ''अल्लाहच्या आयती'' कडे देखील आहे; ज्याचा या सुरतीमध्ये विपुल प्रमाणात उल्लेख आलेला आहे. आणि विशेषकरुन आयत नं. ७ मध्ये ''अल्लाहच्या आयती'' चे दोन प्रकार सांगितले आहेत. ''मोहकमात'' व ''मुतशाबिहात.''

याच प्रकारे 'लाम' चा इशारा لَاإِلٰهَ إِلَّااللهُ ''लाइलाहा इल्लल्लाह्'' (अल्लाहच्या शिवाय कोणी ईश नाहीं) कडे आहे; ज्याला अत्यंत वैभवशाली पद्धतीने सादर केले गेले आहे. (आयत नं. २-६-१८)

'मीम' शंबंधी सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की ते अक्षरदेखील या सुरतीचा महत्तवाचा घटक आहे. कारण यामध्ये अल्लाहच्या तो ''मलिकुल मुल्क''(राज्यसत्ताधिश) आहे या गुणविशेषाला अत्यंत परिणामकारक रित्या सादर करण्यात आलेले आहे. (आयत नं.२६) याशिवाय यामध्ये 'मलाइका ' चा उल्लेख अनेक ठिकाणी आलेला आहे. आणि 'तौहीद' (ऐकेश्वरवाद) च्या संबंधी त्यांची साक्ष पण सादर करण्यात आली आहे. (आयत नं. १८). याशिवाय ''मोमिनीन व मुत्तकीन'' (श्रद्धावान व संयमी लोकांना) यशाची खुषखबर ऐकविण्यात आलेली आहे.

जणूं या अक्षरांचा दर्जा ध्येयाप्रत मार्गदर्शन करणाऱ्या मार्गाच्या चिन्हांसारखा आहे.

२. अल्लाह देवामध्ये सर्वात थोर म्हणजे महादेव वा (Chief God) असे फर्माविले गेलेले नाही. याउलट अल्लाहशिवाय कोणी ईश नाही म्हणजे त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही देवाचे मूळात अस्तित्वच नाही असे फर्माविले गेले आहे. आणि म्हणून अल्लाहशिवाय ज्यांनाही देव म्हणून पुकारले जाते ते सर्व काल्पनिक देव आहेत. वस्तुत: त्यांच्या पैकी कोणामध्येही ईशत्वाचा गुण नाही.

३. पाहा सूरे बकरा टीप नं. ४०९ व ४१० येथे त्या गोष्टीकडे इशारा आहे की اَلْقَيُّوْمُ शाश्वतता हा अल्लाहचाच गुणविशेष आहे. आणि म्हणून तोच भक्ति व आज्ञापालनस पात्र आहे. जे लोक हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) वा इतर कोणाचे ईशत्व मान्य करतात त्यांनी हे दाखवावे की काय या व्यक्ती देखील शाश्वततेचा गुणविशेष आपल्यामध्ये बाळगतात? आणि जर नाही, आणि वस्तु:स्थिती ही आहे की असे कदापिही नाही, तर मग त्यांना ईश मानणे कसे योग्य होईल?

४. نَزَّلَ 'नज़्ज़ला' (उतरविले) मध्ये शब्दासह उतरविण्याच्या अर्थाचा (Exact Verbal Revelation) समावेश होतो. म्हणजे या शंकेला काही आधार नाही की अल्लाहच्या संदेशाला (वही ला) हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी शब्दांकित केले असेल. असे नाही. पवित्र क़ुरआनाचा शब्दन्‌शब्द व सारा मजकूर (Text)अल्लाहकडूनच उतरविला गेला आहे. त्याचे शब्द व त्यांची रचना यामध्ये कोणाचाही इतकेच नव्हे तर, पैगंबरांचाही काही संबंध नाही.

५.'तौरात' हा हिब्रु भाषेचा शब्द असून त्याचा अर्थ कायदा असा आहे. अल्लाहकडून हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्यावर उतरविण्यात आलेल्या ग्रंथाचे हे नांव होते. पवित्र क़ुरआन त्याचेच समर्थन करतो. परंतु याने तौरात म्हणजे प्रचलित असलेले बायबल (Old Testament) आहे व त्या मधील साऱ्या मजकूराचे पवित्र क़ुरआन समर्थन करतो असा गैरसमज होऊ नये. प्रचलित बायबल धार्मिक ग्रंथ म्हणून मानले जात असेल व त्यामध्ये मूळ तौरातचे काही भाग अवश्य असले तरी त्यामध्ये ऐतिहासिक घटना, चरित्र धर्मपंडिताचे खुलासे व स्पष्टीकरण धर्मशास्त्रज्ञांची मते यांची अशी सरमिसळ आहे की या सऱ्या संग्रहाला ईश्वरी ग्रंथ मानले जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे या संग्रहामधून मूळ तौरातचे भाग अंतर्दृष्टीचे साध्य लाभल्यावाचून कोणी वेगळे करु शकत नाही. प्रचलित बायबल सुद्धा हा दावा करीत नाही की आहे त्या स्वरुपात तो साराचे सारा ईश्वराकडून उतरलेला ग्रंथ आहे. इतकेच नव्हे तर त्यातील मजकूर या गोष्टीचा स्पष्ट पुरावा देतो की हे मिश्रण लोकानीच तयार केलेले आहे. मूळ ग्रांथामध्ये लोकांनी फेरफार केला हेही बायबल मान्य करते. बायबलच्या ''यिर्मया'' या पुस्तकात नमूद आहे की

''......तुम्ही तर जिवंत देवाची सेनाधीश परमेश्वर आमचा देव याची वचने विपरीत केली आहेत.''(यिर्मया २३-२६)

प्रचलित बायबलसंबंधी त्यावरील एका भाष्यकराची ही कबुली पाहा की या संग्रहाचे संकलन बनी इसराईल हे बॉबिलोनियाहून परत आल्यानंतर केले गेले.

Peake's commentary on the Bible या ग्रंथात The Authority of the Bible या मथळ्याखाली लिहिले गेले आहे की

" It was after the return of Israel from the Babylonian exile that the collection of the Books of the Law into the present

corpus was made " (page 2)

६. 'इंजील' त्या ग्रंथाचे नांव आहे जो सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्यावर उतरविला होता. पवित्र कुरआन त्याचेच समर्थन करतो. बायबलच्या प्रचलित 'नवा करार' मध्ये मूळ इंजील चे काही भाग जरुर आहेत, जे कुरआनशी सुसंगत आहेत. परंतु हा संग्रह सुद्धा आपल्या आजच्या स्वरुपात ईश्वरी ग्रंथाच्या दर्जास पात्र नाही, कारण यामध्येही ईश्वरी ग्रंथाच्या विखुरलेल्या भागांबरोबरच ऐतिहासिक घटना, ऐकीव गोष्ट, खुलासे व स्पष्टीकरण वगैरेची सरमिसळ झालेली आहे.

लूक कृत 'शुभवर्तमान' मध्ये सुरवातीसच हा खुलासा नमूद आहे की याच्या संग्राहकाने घटनांचा स्वत:च संग्रह केला आहे.

''प्रस्तावना- ज्या गोष्टी संबंधाने आपल्यामध्ये पूर्ण खातरी झाली आहे. त्या गोष्टी आरंभापासून प्रत्यक्ष पाहणारे लोक व वचनाचे सेवक ह्यांनी आम्हांस, सांगून ठेविलेला वृत्तांत लिहून काढण्याचे काम पुष्कळांनी हाती घेतले आहे; ह्यास्तव, थियफील महाराज, मलाही वाटले की, सर्व गोष्टींचा मुळापासून नीट शोध केल्यामुळे मी त्या आपल्याला अनुक्रमाने लिहाव्या; ह्यासाठी की, ज्या वचनांचे शिक्षण आपल्याला देण्यात आले आहे त्यांचा निश्चितपणा आपल्या लक्षात यावा.''

(लूक कृत शुभवर्तमान १:१ते ४)

आणि बायबल वरील एका भाष्यकाराने त्याबद्दलची कबुली अशी दिली आहे की

" The motive and method of the writing of a gospel are described in the prologue of the Gospel of Luke : without any claim to inspiration, the writer set out to get the best previous attempts which had been made. The narrative was not designed to be sacred scripture. It was a record of the events; wherein the sacred scriptures were fulfilled."

(Peake's commentary on the Bible. page 4)

७. ''फ़ुर्क़ान'' हे पवित्र क़ुरआनचे वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ सत्य व असत्य यामध्ये फरक करणारा ग्रंथ येथे या वैशिष्ट्याचा उल्लेख करण्याचा हेतू हे स्पष्ट करण्याचा आहे की तौरात व इंजील मध्ये जेव्हा ग्रंथधारकांनी फेरफार केला व लोकांना सत्य व असत्य यामध्ये फरक करणे कठीण झाले तेव्हा अल्लाहने लोकांना शिकवणीचा सरळ मार्ग स्पष्ट व्हावा म्हणून पवित्र क़ुरआन कसोटी बनवून उतरविले.

८. क़ुरआनच्या स्वरुपात अल्लाहकडून स्पष्ट शिकवण आल्यानंतर देखील जे लोक धार्मिक विरोधाच्या वादात अडकून राहतील आणि या शिकवणीचा स्वीकार करणार नाहीत त्यांना अल्लाह सक्त शिक्षा देईल.

९. इशारा त्या गोष्टीकडे आहे की लोकांनी अल्लाहच्या ग्रंथामध्ये फेरफार करण्याचे धाडस केले आणि अल्लाहच्या नांवावर जे निरनिराळे धर्म त्यानी निर्माण केले, त्याला पाहून कोणी अशी कल्पना करुं नये की या साऱ्या गोष्टी अल्लाहपासून लपलेल्या आहेत किंवा त्याच्याकडे सारी अंधेर नगरी आहे. असे नाही. याउलट तो लोकांच्या हालचालीना चांगल्या प्रकारे जाणतो. परंतु या जगात माणसाची परिक्षा घेणे हा त्याचा हेतु आहे. आणि म्हणून माणसाला येथे आचरणाची मोकळीक दिली जाते. आणि निर्णय क़यामतीच्या दिवसापर्यंत राखून ठेविला जातो.

१०. मातेच्या गर्भाशयात अर्भकाची निर्मिती अल्लाहच करतो. एखादी देवी देवता हे कार्य करीत नाही. अनेकेश्वरवादी धर्मामध्ये ही कल्पना आढळून येते की एक विशिष्ट देवी (Tvashtri) अर्भकाचा तोंडावळा घडविते. ही आयत अशा कल्पना खोट्या व चुकीच्या आहेत हे स्पष्ट करते. निवेदनाच्या शैलीवरुन या आयतीचा इशारा या गोष्टीकडे आहे की हज़रत मसीह (अलैहिस्सलाम) ची निर्मिती हज़रत मरियम यांच्या गर्भाशयात झाली होती, तर मग ते ईश्वर कसे काय होऊ शकतात?

**हे पण त्याच वाटेवर आहेत ज्या वाटेवर फिरऔनचे लोक व त्यांचे पूर्वज होते. त्यांनी आमच्या आयतीचा इन्कार केला. तेव्हा अल्लाहने त्यांना त्यांच्या गुन्ह्यापायी पकडले. आल्लाह सक्त सजा देणारा आहे. (अल–क़ुरआन)**

७. तोच तर आहे ज्याने तुमच्यावर ग्रंथ उतरविला, ज्यामध्ये सुस्पष्ट (मुहकम) आयती [११] (महावाक्ये) आहेत की ज्या ग्रंथाच्या मुलभूत आधार आहेत. [१२] आणि दुसऱ्या अशा आहेत ज्या तत्सदृश (मुतशाबिह) [१३] आहेत. मग ज्यांच्या मनात वाकडेपणा आहे ते तत्सदृश आयतींच्या मागे लागतात [१४] ते एवढ्यासाठी की गोंधळ माजवावा व त्यांचा मूळ आशयाचा शोध घ्यावा. यद्दपि त्यांचा मूळ आशय अल्लाहशिवाय कोणी जाणत नाही. आणि ज्यांचे ज्ञान परिपक्व आहे ते म्हणतात, '' आम्ही त्यांच्यावर ईमान आणतो. हे सर्व आमच्या पालनकर्त्याकडूनच आलेले आहे.'' आणि बुद्धिमान लोकच आठवण करुन दिल्यावर त्यापासून लाभ उठवितात.

هُوَ الَّذِيْٓ اَنْزَلَ عَلَيْكَ الْكِتٰبَ مِنْهُ اٰيٰتٌ مُّحْكَمٰتٌ
هُنَّ اُمُّ الْكِتٰبِ وَاُخَرُ مُتَشٰبِهٰتٌ ۭ فَاَمَّا الَّذِيْنَ فِيْ قُلُوْبِهِمْ
زَيْغٌ فَيَتَّبِعُوْنَ مَا تَشَابَهَ مِنْهُ ابْتِغَاۗءَ الْفِتْنَةِ
وَابْتِغَاۗءَ تَاْوِيْلِهٖ ڤ وَمَا يَعْلَمُ تَاْوِيْلَهٗٓ اِلَّا اللّٰهُ ڤ وَالرّٰسِخُوْنَ
فِي الْعِلْمِ يَقُوْلُوْنَ اٰمَنَّا بِهٖ ۙ كُلٌّ مِّنْ عِنْدِ رَبِّنَا ۚ وَمَا يَذَّكَّرُ
اِلَّآ اُولُوا الْاَلْبَابِ ۝ ٧

८. हे आमच्या पालनकर्त्या ! तू आम्हाला मार्गदर्शन केले आहेस. आता तू त्यानंतर आमच्या मनामध्ये वाकडेपणा निर्माण करुं नकोस आणि आम्हाला आपल्या कृपेने समृद्ध कर. खरोखर तू मोठा उदार आहेस. [१५]

رَبَّنَا لَا تُزِغْ قُلُوْبَنَا بَعْدَ اِذْ هَدَيْتَنَا وَهَبْ لَنَا مِنْ لَّدُنْكَ
رَحْمَةً ۚ اِنَّكَ اَنْتَ الْوَهَّابُ ۝ ٨

९. हे आमच्या पालनकर्त्या ! तू अवश्य साऱ्या लोकांना एके दिवशी एकत्र जमा करणार आहेस, ज्या दिवसाच्या येण्याबद्दल कसलीही शंका नाही. नि:संशय अल्लाह वचनभंग करीत नाही.

رَبَّنَآ اِنَّكَ جَامِعُ النَّاسِ لِيَوْمٍ لَّا رَيْبَ فِيْهِ ۭ اِنَّ اللّٰهَ لَا يُخْلِفُ
الْمِيْعَادَ ۝ ٩

१०. ज्या लोकांनी इन्कार (कुफ्र)[१६] केला ना त्यांचे धन अल्लाह जवळ त्यांच्या उपयोगी पडेल ना त्यांची मुलेबाळे. [१७] हेच लोक आगीचे (जहन्नमचे) इंधन बनतील.

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا لَنْ تُغْنِيَ عَنْهُمْ اَمْوَالُهُمْ وَلَآ اَوْلَادُهُمْ
مِّنَ اللّٰهِ شَيْـــًٔا ۭ وَاُولٰۗىِٕكَ هُمْ وَقُوْدُ النَّارِ ۝ ١٠

११. हे पण त्याच वाटेवर आहेत ज्या वाटेवर फिरऔनचे लोक व त्यांचे पूर्वज होते. त्यांनी आमच्या आयतींचा इन्कार केला. तेव्हा अल्लाहने त्यांना त्यांच्या गुन्ह्यापायी पकडले. आल्लाह सक्त सजा देणारा आहे.

كَدَاْبِ اٰلِ فِرْعَوْنَ ۙ وَالَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ ۭ كَذَّبُوْا بِاٰيٰتِنَا ۚ
فَاَخَذَهُمُ اللّٰهُ بِذُنُوْبِهِمْ ۭ وَاللّٰهُ شَدِيْدُ الْعِقَابِ ۝ ١١

११. 'मुहकम' म्हणजे परिपक्व, दृढ, स्थिर. 'मुहकमात' म्हणजे पवित्र क़ुरआनच्या त्या आयती ज्यांचा अर्थ व उद्देश अगदी स्पष्ट व उघड आहे. उदा. त्या आयती ज्या मध्ये इस्लामचे आवाहन, त्याची शिकवण, त्याच्या आज्ञा व नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या उपासनेचे प्रकार, उपदेश आणि अशा प्रकाच्या दुसऱ्या गोष्टींचा समावेश आहे.

१२. 'मुहकमात' चा दर्जा ग्रंथाच्या मूलाधारा सारखा आहे. म्हणजे त्या आयती ग्रंथाचा मूळ आधार व उगमस्थान आहेत. आणि म्हणून पवित्र क़ुरआनच्या एखाद्या आयतीचा स्पष्ट अशा आयतीच्या विरोधी अर्थ करणे बरोबर होणार नाही. उलट जेथे अर्थाबद्दल संशय येईल तेथे 'मुहकमात' ची म्हणजे स्पष्ट अशा आयतीची मदत घेतली पाहिजे.

१३. 'मुतशाबिह' म्हणजे समान, मिळती जुळती तत्सदृश. 'मुतशाबिहात' ने त्या आयती अभिप्रेत आहेत ज्यामध्ये वास्तव गोष्टी उपमा व दृष्टांताच्या आधारे निवेदन केल्या गेल्या आहेत. त्या वास्तव गोष्टी ज्या माणसाच्या निरीक्षण शक्ती व अनुभूतीच्या आटोक्या बाहेर आहेत. ज्या इंद्रियगम्य नाहीत. उदा. अल्लाहचे सिंहासनारुढ होणे परलोकांसंबंधीची सत्ये, आचरणाची तुला करणे, जन्नतमधील देणग्या, दोज़खच्या शिक्षा, आखिरतचा अहवाल वगैरे. या गोष्टी निवेदन करण्यासाठी मूळ वास्तव गोष्टीशी मिळत्या जुळत्या असणाऱ्या इंद्रियगम्य गोष्टीबद्दल जे शब्द व जी वाक्यरचना मानवी भाषेत वापरली जाते तसे शब्द व तशी वाक्यरचना वापरली गेली आहे. याद्वारे माणसाला पारलौकिक सत्यांचे ज्ञान, मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या मर्यादेपर्यंत होते. यापुढे जाऊन माणूस जर मूळ सत्य काय आहे हे जाणण्याचा अट्टाहास धरील तर त्याचे मूळ सत्याप्रत पोहचणे तर दूरच राहील, उलट तो शाब्दिक व लाक्षणिक वादात अडकून पडेल.

**अल्फ़ाज़ के पेचों में उलझते नहीं दाना**
**ग़व्वास को मतलब है सदफ़ से कि गुहर से**

१४. 'मुतशाबिहात' तत्सदृश आयतींच्या मागे पडण्याचे एक उदाहरण हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या निर्मितीची गोष्ट त्यांचा जन्म असाधारणपणे बापाशिवाय झालेला होता. आणि म्हणून त्याना كَلِمَةٍ مِّنْهُ 'अल्लाह कडील वचन' म्हणून संबोधिले गेले. म्हणजे ते अल्लाहच्या एका आदेशाचा दर्जा बाळगतात. कारण त्यांची निर्मिती अल्लाहच्या 'हो' या आदेशाने झाली होती. परंतु ईसाई लोकांनी या बाबतीत तर्ककुतर्क केले व ते हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या ईशत्वाला मानू लागले. अशाप्रकारे ते स्वत: तर मार्गभ्रष्ट झालेच. पण दुसऱ्यांसाठीही त्यांनी उपद्रवाचे साहित्य तयार करुन ठेविले. दु:खाची गोष्ट ही की पवित्र क़ुरआनची स्पष्ट शिकवण असतांना देखील मुसलमानामधील काही गटांनी मागील कालात ईश्वरी गुण विशेष वगैरे संबंधी अनावश्यक व हानिकारक वाद सुरु केला. परिणाम स्वरुप ''इलमे कलाम'' अस्तित्वात आले आणि इस्लामच्या साध्यासरळ श्रद्धा देखील गूढ बनविल्या गेल्या.

१५. परिपक्व ज्ञान बाळगणाऱ्याच्या तोंडून निघालेली ही प्रार्थना आहे; जी त्यांच्या ईमानासंबंधीच्या भावना स्पष्ट करते. ते मुतशाबिहात आयतींच्या चुकीच्या स्पष्टीकरणाच्या गोंधळापासून वाचण्याची काळजी घेतात आणि जीवन व्यवस्थेमध्ये गोंधळ माजविणाऱ्यापासून सावध असतात. आणि आपल्या ईमानच्या सुरक्षितेसाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ प्रार्थना करीत असतात.

१६. पवित्र क़ुरआनला अल्लाहचा ग्रंथ मानण्याचा नकार देणारे लोक अभिप्रेत आहेत.

१७. संपत्ती व संतती चा उल्लेख या संबंधात झाला आहे. की काही वेळा त्यांच्याबद्दलचे प्रेम सत्याच्या स्वीकाराच्या मार्गातील आडकाठी बनते.

१२. ज्या लोकांनी इन्कार केला आहे, त्यांना सांगा की लवकरच तुम्ही पराभूत व्हाल आणि जहन्नमकडे हाकले जाल. आणि ते अत्यंत वाईट ठिकाण आहे.

قُلْ لِّلَّذِيْنَ كَفَرُوْا سَتُغْلَبُوْنَ وَتُحْشَرُوْنَ اِلٰى جَهَنَّمَ ۭ
وَبِئْسَ الْمِهَادُ ﴿١٢﴾

१३. ज्या दोन गटामध्ये चकमक झाली त्यामध्ये तुमच्यासाठी मोठी निशाणी आहे. एक गट अल्लाहच्या मार्गात लढत होता आणि दुसरा अल्लाहचा इन्कार करणारा होता. हे त्यांना आपल्या डोळ्यांनी आपल्यापेक्षा दुप्पट संख्येत पाहात होते. आणि अल्लाह आपल्या मदतीने ज्याला इच्छितो त्याला पाठबळ देत असतो. या (घटने) मध्ये त्या लोकांसाठी मोठा धडा आहे, जे आपले डोळे उघड ठेवितात.[१८]

قَدْ كَانَ لَكُمْ اٰيَةٌ فِيْ فِئَتَيْنِ الْتَقَتَا ۭ
فِئَةٌ تُقَاتِلُ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ وَاُخْرٰى كَافِرَةٌ يَّرَوْنَهُمْ مِّثْلَيْهِمْ
رَاْيَ الْعَيْنِ ۭ وَاللّٰهُ يُؤَيِّدُ بِنَصْرِهٖ مَنْ يَّشَاۗءُ ۭ اِنَّ فِيْ ذٰلِكَ
لَعِبْرَةً لِّاُولِي الْاَبْصَارِ ﴿١٣﴾

१४. लोकांसाठी मन आकर्षित करणाऱ्या गोष्टी-स्त्री, पुत्र, सोन्या चांदीचे ढीग, उत्तम घोडे, गुरेढोरे आणि शेती-अत्यंत मनोहर बनविल्या गेल्या आहेत. ही सर्व लौकिक जीवनाची सामुग्री आहे. आणि याहून अधिक उत्तम ठिकाण तर अल्लाह जवळ आहे. [१९]

زُيِّنَ لِلنَّاسِ حُبُّ الشَّهَوٰتِ مِنَ النِّسَاۗءِ وَالْبَنِيْنَ
وَالْقَنَاطِيْرِ الْمُقَنْطَرَةِ مِنَ الذَّهَبِ وَالْفِضَّةِ وَالْخَيْلِ
الْمُسَوَّمَةِ وَالْاَنْعَامِ وَالْحَرْثِ ۭ ذٰلِكَ مَتَاعُ الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۚ
وَاللّٰهُ عِنْدَهٗ حُسْنُ الْمَاٰبِ ﴿١٤﴾

१५. म्हणा. काय मी तुम्हांला सांगू की त्यापेक्षा अधिक चांगली गोष्ट कोणती आहे? जे लोक अल्लाहचे भय (तक्वा)[२०] बाळगून संयम पाळतील त्यांच्यासाठी त्यांच्या पालनकर्त्या जवळ बागा आहेत, ज्यांच्या खालून जलप्रवाह वाहत असतील. ते तेथे सदैव राहातील आणि त्यांच्यासाठी विशुद्ध पत्न्या असतील आणि अल्लाहची प्रसन्नता [२१] त्यांना लाभेल. अल्लाह आपल्या दासांवर देखरेख ठेवितो. [२२]

قُلْ اَؤُنَبِّئُكُمْ بِخَيْرٍ مِّنْ ذٰلِكُمْ ۭ لِلَّذِيْنَ اتَّقَوْا عِنْدَ رَبِّهِمْ
جَنّٰتٌ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَا وَاَزْوَاجٌ
مُّطَهَّرَةٌ وَّرِضْوَانٌ مِّنَ اللّٰهِ ۭ وَاللّٰهُ بَصِيْرٌۢ بِالْعِبَادِ ﴿١٥﴾

१६. हे ते लोक आहेत जे म्हणतात,''हे आमच्या पालनकर्त्या !आम्ही ईमान आणले म्हणून तू आमची पातके माफ कर आणि आम्हाला (जहन्नमच्या) आगीपासून वाचव.''

اَلَّذِيْنَ يَقُوْلُوْنَ رَبَّنَآ اِنَّنَآ اٰمَنَّا فَاغْفِرْ لَنَا ذُنُوْبَنَا وَقِنَا
عَذَابَ النَّارِ ﴿١٦﴾

१७. हे लोक सहनशील आहेत, सत्यनिष्ठ आहेत, परकाष्ठेचे आज्ञा धारक आहेत, खर्च करणारे आहेत.आणि रात्रीच्या शेवटच्या प्रहरी [२३] आपल्या पातकांबद्दल क्षमायाचना करीत असतात.[२४]

اَلصّٰبِرِيْنَ وَالصّٰدِقِيْنَ وَالْقٰنِتِيْنَ وَالْمُنْفِقِيْنَ
وَالْمُسْتَغْفِرِيْنَ بِالْاَسْحَارِ ﴿١٧﴾

१८. हिजरी सन २ मध्ये ईमानधारक व अनेकेश्वरवादी यांच्यामध्ये बद्र येथे झालेल्या लढाई मधील घटनेकडे हा इशारा आहे. क़ुरआन धारकांनी हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) यांच्या नेतृत्वाखाली केलेली ही पहिली लढाई आहे. या लढाईमध्ये काफिरांची (इन्कार करणाऱ्यांची) संख्या हजाराच्या जवळपास होती. आणि ईमानधारकांची संख्या केवळ तीनशेतेरा होती. परंतु जेव्हा लढाईला तोंड लागले तेव्हा काफिरांना मुसलमान दुप्पट संख्येने दिसू लागले व त्यामुळे त्यांच्यामध्ये घबराट पसरली. याचे कारण हे की सर्वश्रेष्ठ अल्लाहचे साह्य व समर्थन ईमानधारकांना लाभले होते. परिणाम हा झाला की ईमानधारकांची संख्या थोडी होती तरी ते विजयी झाले व काफिरांची संख्या मोठी असतांना सुद्धा त्यांना पराभूत व्हावे लागले. येथे या घटनेचा हवाला देण्याचा उद्देश ईमानधारकांच्या उज्ज्वल भविष्याचे ओझरते दर्शन घडविणे हा आहे. कारण सत्य व असत्याच्या या संघर्षात अल्लाहचे साह्य व समर्थन क़ुरआनधारकांना लाभले आहे.

१९. ज्या गोष्टींचा या आयतीमध्ये उल्लेख आलेला आहे त्या माणसाला स्वभावत: प्रिय आहेत. आणि म्हणून त्यांच्याबद्दलची ओढ आक्षेपार्ह नाही. परंतु माणूस जेव्हा त्यांच्याअधीन इतका होतो की त्यांच्या बरोबरचा संबंध समतोल बिघडवून टाकतो आणि माणूस त्या गोष्टींना परिक्षेची साधने समजण्याऐवजी जेव्हा त्यांना जीवनाचे उद्दिष्ट समजूं लागतो तेव्हा त्या गोष्टी माणसाला वाईट परिणामाकडे नेतात. आयतीचा उद्देश माणसाला अशा असमतोलापासून वाचविणे हा आहे. ज्या संदर्भात ही गोष्ट फर्माविली गेली आहे त्यावरुन हा इशाराही निघतो की क़ुरआनचे आवाहनाचा स्वीकार करण्यापासून लोकांना जी गोष्ट प्रतिबंध करीत आहे ती त्यांचे भौतिक सामुग्रीवर मोहित होणे ही आहे. कारण क़ुरआनचे आवाहन भौतिक सामुग्रीवर मोहित होणे आणि बेजबाबदारीचे व ऐषआरामाचे जीवन जगणे या गोष्टींना पूर्णपणे चुकीच्या ठरविते. त्याच्या दृष्टीने भौतिक साधनसामुग्री ही अल्पकालीन जीवनाचे सामान आहे; जे त्याची परिक्षा घेण्यासाठी माणसाला दिले गेले आहे. आणि म्हणूनच त्यामध्ये ओढ ठेविली गेली आहे. राहिले कायमचे व चिरकालीन सुखसमाधान. माणसाला, जर त्याने त्यासाठी स्वत:ला पात्र बनविले असेल तर, ते आख़िरतच्या जीवनामध्ये लाभेल.

२०. 'तक्वा' हा एक व्यापक शब्द आहे. येथे त्याचा हा पैलू अगदी स्पष्ट होत आहे की मनाला रिझविणाऱ्या गोष्टींच्या बाबतीत योग्य व समतोल पद्धत अंगिकारणे आणि आखिरतच्या अनुग्रहाला जीवनाचे उद्दिष्ट बनविणे म्हणजे 'तक्वा'.

२१. अल्लाहची प्रसन्नता ही सर्व देणग्यामध्ये सर्वश्रेष्ठ अशी देणगी आहे. अल्लाह जेव्हा आपल्या दासावर प्रसन्न होईल तेव्हा असे कोणते भाग्य आहे जे त्याला लाभणार नाही?

जन्नतमध्ये माणसाला केवळ बाह्य व शारीरिक ऐषआरामच लाभणार नाही, तर त्याला अल्लाहची प्रसन्नता लाभून आत्मिक समाधान पण लाभेल.

२२.अल्लाहचे आपल्या दासांच्या स्थितीवर लक्ष आहे.जो योग्य आचरण पद्धत स्वीकारतो त्याच्यासाठी काळजीचे काही एक कारण नाही. त्याला अल्लाहची प्रसन्नता अवश्य लाभेल.

२३. रात्रीच्या शेवटच्या प्रहराची वेळ ही अल्लाहची स्तुति व त्याचे स्मरण करण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि क्षमायाचनेच्या स्वीकारासाठी सर्वात अधिक योग्य अशी वेळ आहे. यावेळी, जेव्हा जग झोपलेले असते व मन आराम करु इच्छिते तेव्हा उठून अल्लाहसमोर क्षमा याचना करणे हे एक विरोचित असे आचरण आहे. जे ढोंगीपणापासून मुक्त आहे.

२४. हे गुणविशेष माणसाला थोर व श्रेष्ठ बनवितात. ज्या लोकांमध्ये हे गुणविशेष असतात ते भौतिक धनदौलत व ऐहिक जीवनाच्या सजावटीवर लुब्ध होत नाहीत. त्यांनी आखिरतच्या सफलतेला आपल्या जीवनाचे उद्दिष्ट बनविलेले असते.

१८. अल्लाहने या गोष्टीची ग्वाही दिली आहे की त्याच्याशिवाय कोणी ईश नाही आणि फिरिशते व ज्ञान बाळगणारे लोकसुद्धा ग्वाही देतात की न्याय नीतिने योजना व व्यवस्था करणाऱ्या त्या अस्तित्वाशिवाय कोणी ईश (उपास्य) नाही. तो प्रभाव शालीही आहे व चातुर्याचा धनी ही.[२५]

شَهِدَ اللّٰهُ اَنَّهٗ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۙ وَالْمَلٰٓئِكَةُ وَاُولُوا الْعِلْمِ
قَآئِمًا بِالْقِسْطِ ؕ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ الْعَزِيْزُ الْحَكِيْمُ ﴿١٨﴾

१९. अल्लाहजवळ खरा 'दीन' [२६] (धर्म) फक्त इस्लामच आहे. आणि ग्रंथधारकांनी जो मतभेद केला तो ज्ञान [२७] (मार्गदर्शन) आल्यानंतर केवळ आपसातील शत्रुत्वामुळे केला. आणि जो कोणी अल्लाहच्या आदेशांचा इन्कार करील तर (त्याला समजावयास हवे की) अल्लाह फार लवकर हिशेब चुकता करणार आहे. [२८]

اِنَّ الدِّيْنَ عِنْدَ اللّٰهِ الْاِسْلَامُ ۟ وَمَا اخْتَلَفَ الَّذِيْنَ
اُوْتُوا الْكِتٰبَ اِلَّا مِنْ بَعْدِ مَا جَآءَهُمُ الْعِلْمُ بَغْيًا
بَيْنَهُمْ ؕ وَمَنْ يَّكْفُرْ بِاٰيٰتِ اللّٰهِ فَاِنَّ اللّٰهَ سَرِيْعُ
الْحِسَابِ ﴿١٩﴾

२०. यानंतर देखील जर हे लोक तुमच्याशी भांडतील तर त्यांना सांगा की मी व माझ्या अनुयायांनी तर स्वत:ला अल्लाहच्या स्वाधीन केले आणि ग्रंथधारक व उम्मी[२९](अशिक्षित अरब) ना विचारा की काय त्यांनी सुद्धा इस्लामचा स्वीकार केला आहे ? जर त्यांनी देखील इस्लामचा स्वीकार केला तर त्यांना सरळ मार्ग लाभला आणि जर त्यांनी तोंड फिरविले तर तुमच्यावर फक्त संदेश पोहचविण्याची जबाबदारी आहे. अल्लाह आपल्या दासांच्या स्थितीवर लक्ष ठेवितो.

فَاِنْ حَآجُّوْكَ فَقُلْ اَسْلَمْتُ وَجْهِىَ لِلّٰهِ وَمَنِ اتَّبَعَنِ ؕ
وَقُلْ لِّلَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ وَالْاُمِّيّٖنَ ءَاَسْلَمْتُمْ ؕ فَاِنْ
اَسْلَمُوْا فَقَدِ اهْتَدَوْا ۚ وَاِنْ تَوَلَّوْا فَاِنَّمَا عَلَيْكَ الْبَلٰغُ ؕ
وَاللّٰهُ بَصِيْرٌ ۢ بِالْعِبَادِ ﴿٢٠﴾

२१. जे लोक अल्लाहच्या मार्गदर्शनाचा इन्कार करतात आणि त्यांच्या पैगंबरांना निष्कारण ठार मारतात [३०] आणि त्या लोकांना ठार मारतात जे न्यायनीतीचे आवाहन करतात त्यांना (हे पैगंबरा) दु:खदायक शिक्षेची खुशखबर एकवा.

اِنَّ الَّذِيْنَ يَكْفُرُوْنَ بِاٰيٰتِ اللّٰهِ وَيَقْتُلُوْنَ النَّبِيّٖنَ
بِغَيْرِ حَقٍّ ۙ وَّيَقْتُلُوْنَ الَّذِيْنَ يَاْمُرُوْنَ بِالْقِسْطِ مِنَ
النَّاسِ ۙ فَبَشِّرْهُمْ بِعَذَابٍ اَلِيْمٍ ﴿٢١﴾

२२. हेच लोक आहेत ज्यांची कृत्यें या जगात व अखिरत दोहोंमध्यें व्यर्थ गेली. [३१] आणि त्यांचा कोणी सहायक असणार नाही.

اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ حَبِطَتْ اَعْمَالُهُمْ فِى الدُّنْيَا
وَالْاٰخِرَةِ ؗ وَمَا لَهُمْ مِّنْ نّٰصِرِيْنَ ﴿٢٢﴾

२५. या आयतीमध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या एकत्वा बद्दल आणि आपल्या न्यायनीतिसह योजना व व्यवस्था करण्या संबंधी आपली, आपल्या फिरिशत्यांची व ज्ञानी लोकांची साक्ष दिलेली आहे.

अल्लाहच्या साक्षीचा आविष्कार तर विश्वातील प्रत्येक वस्तुकडून होत आहे.अल्लाहच्या एकत्वाचे समर्थन न करणारी अशी कोणतीही वस्तु या विश्वात नाही. आणि जो समतोल या विश्वाच्या व्यवस्थेमध्ये आढळून येतो त्यावरुन याचा निर्माता न्याय व नीतीच्या गुणविशेषांनी परिपूर्ण आहे याची प्रचिती येते.

एकेश्वरवाद ही माणसाच्या अंतर्मनाची पुकार आहे. ही सुद्धा अल्लाहचीच साक्ष आहे जी माणसाच्या अंत:करणामध्ये ठेविली गेली आहे.अल्लाहच्या साक्षीचा अविष्कार 'वही' शंदेशाच्या रुपाने ही झालेला आहे. पवित्र क़ुरआना याचा स्पष्ट पुरावा आहे.

फिरिश्त्यांची साक्ष वस्तु:स्थितीचा आविष्कार आहे. फिरिश्ते अल्लाहच्या आदेशांची विश्वता अंमलबजावणी करतात आणि पैगंबरांचेवर 'वही' पण घेऊन येतात. आणि म्हणून त्यांची साक्ष वस्तु:स्थितीचा आविष्कार आहे. अनेकेश्वरवादी त्यांना ईशत्वामध्ये भागीदार ठरवितात. परंतु स्वत: फिरिश्ते सर्व प्रकारच्या अनेकेश्वरवादाचे (शिर्क) खंडन करतात आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह हाच एकमेव ईश असल्याची ग्वाही देतात. ते जेव्हा जेव्हा पैगंबरांचेवर अवतीर्ण झाले तेव्हा तेव्हा ते अल्लाहकडून एकेश्वर वादाचाच संदेश देत आले आहेत.

ज्ञानी लोकांच्या साक्षीने अभिप्रेत त्या लोकांची साक्ष आहे जे ईश्वर व विश्वासंबंधी वास्तव ज्ञान बाळगतात. हे ज्ञान माणसाला पैगंबरांच्या द्वारे लाभलेले आहे. आणि ज्ञानी लोकांचा वस्तु:स्थितीला जाणणारा हा वर्ग प्रत्येक कालात एकेश्वरवादाचीच साक्ष देत आला आहे.

**के है जात वाहिद ईबादतके लाइक**
**जबां और दिल की शहादतके लाइक**

आणि ही साक्ष त्याने मोठ मोठे त्याग करुन कायम केलेली आहे. निवेदन शैलीने ज्ञानी लोकांच्या थोरपणाचा पैलूही स्पष्ट होत आहे. कारण ज्ञानी लोकांचा उल्लेख फिरिशत्यांच्या बरोबर करण्यात आला आहे.

२६. मूळामध्ये اَلدِّيۡنَ 'अद्दीन' हा शब्द वापरला गेला आहे. याने अभिप्रेत खरा व सत्य दीन. म्हणजे तो धर्म जो खरोखर अल्लाहकडून उतरविला गेला आहे.

२७. ज्ञानाने अभिप्रेत सत्याचे ज्ञान, विशेषकरुन दीन (धर्मा) च्या मूलभूत गोष्टीचे ज्ञान. ज्यानंतर कसल्याही विवादाला जागा राहत नाही.

२८. अर्थ हा आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाच्या शिकवण व मार्गदर्शना साठी जो दीन (धर्म) उतरविला आहे तो इस्लाम आहे. हाच अल्लाहचा धर्म आहे. आणि सर्व पैगंबरांवर तो याच धर्माला उतरवित आला आहे. त्याने कधी कोणत्याही देशात आणि कोणत्याही कालात आपल्या कोणत्याही पैगंबरांवर इस्लामाशिवाय दुसरा कोणताही धर्म उतरविलेला नाही. परंतु निरनिराळ्या पैगंबरांच्या समाजांनी या वास्तव धर्मासंबंधी वाद करुन निरनिराळे धर्म स्थापन केले. यहुदी धर्म व ख्रिश्चन धर्म अशाचप्रकारे अस्तित्वात आलेले आहेत. त्या समाजांनी त्यांना सत्यधर्माचे ज्ञान नव्हते म्हणून असे केले नाही. उलट सत्य स्पष्ट झाल्यानंतर देखील त्यांनी निव्वळ स्वार्थ आपसातील वैर आणि नवीन वाईट प्रथा पाडण्याच्या मनोवृत्ती मुळे असे केले. परंतु अल्लाह न्यायनीतीला कायम करणार आहे. म्हणून त्याने इस्लामला पुन्हा नव्याने उतरविले. हेतु हा की लोकांच्यावर सत्यमार्ग स्पष्ट व्हावा. आणि यानंतर देखील त्यांनी नकाराचीच पद्धत अंगिकारली व अल्लाहच्या त्या स्पष्ट आयतींचा स्वीकार केला नाही तर अल्लाह अगदी लवकर त्यांचा हिशेब पुरा करील.

२९. 'उम्मी' चा शाब्दिक अर्थ लिहिणे वाचणे न जाणणारी व्यक्ती. परंतु हा शब्द बनी इस्माईल यांच्या संबंधी टोपणनांव म्हणून वापरला गेला आहे. कारण त्यांच्या जवळ ना अल्लाहचा ग्रंथ होता ना औपचारिक शिक्षणाची पद्धत रुढ होती. याउलट बनी इस्राईल ग्रंथधारक होते. आणि त्यांच्यामध्ये शिक्षणाची पद्धत रुढ होती.

३०. अन्यायी हत्या आणि तीही एखाद्या पैगंबरांची ही गोष्ट गुन्ह्याचा गंभीरपणा स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. पैगंबरांच्या हत्येचा उल्लेख बायबलमध्येही आहे.

''पण त्यांनी आज्ञाभंग करुन तुजाविरुद्ध बंड केले; तुझे धर्मशास्त्र त्यांनी पाठीमागे फेकून दिले; तुजकडे त्यांनी पुन्हा वळावे असे ज्या तुझ्या संदेष्ट्यांनी निक्षून सांगितले त्यास त्यांनी जिवे मारिले. आणि तुला संतप्त केले'' (नहेम्या ९:२६)

''यरुशलेमे, यरुशलेमे, संदेष्ट्यां घात करणाऱ्ये व तुझ्याकडे पाठविलेल्यास धोंडमार करणाऱ्ये !...'' (मत्तय २३:३७)

३१. जे लोक धार्मिकतेच्या बुरख्याखाली अल्लाहच्या शिकवणीचा स्वीकार करण्यास नकार देतात, पैगंबरांच्या हत्येसारख्या गुन्ह्यामध्ये सहभागी होतात आणि सुधारणेचा प्रयत्न करणाऱ्या व न्यायाचे व सत्याचे आवाहन करणाऱ्या सदाचारी लोकांचा छळ करतात-अशा लोकांच्या धार्मिकतेला अल्लाहजवळ काही स्थान नाही. आणि त्यांचे सर्व प्रयत्न व त्यांचे सारे धार्मिक आचरण व्यर्थ जाणार आहे.आखिरतमधील निरर्थकता तर स्पष्ट आहे. राहिली या जगातील निरर्थकता. पवित्र क़ुरआन व ते आणणारे पैगंबर यांच्या विरोधकांची काय दशा झाली ते जगाने पाहिले आहेच.

२३. तुम्ही त्या लोकांच्या अवस्थेवर विचार केला नाही, ज्यांना ईश ग्रंथाचा एक भाग दिला गेला.[३२] त्यांना जेव्हा अल्लाहच्या ग्रंथाकडे[३३] आवाहन करण्यात येते की त्याद्वारें त्यांच्या दरम्यान निर्णय व्हावा[३४] तेव्हां त्यांच्यापैकी एक गट तोंड फिरवितो. आणि अवज्ञा करणे हा तर त्या लोकांचा परिपाठच आहे.[३५]

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ أُوتُوا نَصِيبًا مِّنَ الْكِتَٰبِ
يُدْعَوْنَ إِلَىٰ كِتَٰبِ اللَّهِ لِيَحْكُمَ بَيْنَهُمْ ثُمَّ يَتَوَلَّىٰ فَرِيقٌ
مِّنْهُمْ وَهُم مُّعْرِضُونَ ٢٣

२४. हे यासाठी की ते म्हणतात, दोजखची आग आम्हाला स्पर्श करणारा नाही. इतकेच की काही दिवसासाठी शिक्षा होईल. त्यांच्या या मनघडत गोष्टींनी त्यांच्या 'दीन' (धर्म) संबंधी त्याना भ्रमात टाकले आहे.[३६]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَالُوا لَن تَمَسَّنَا النَّارُ إِلَّا أَيَّامًا مَّعْدُودَٰتٍ وَغَرَّهُمْ
فِي دِينِهِم مَّا كَانُوا يَفْتَرُونَ ٢٤

२५. परंतु त्या दिवशी त्यांची काय दशा होईल जेव्हा आम्ही सर्वांना एकत्र जमा करु आणि ज्याच्या (शेवटच्या दिवसाच्या) येण्याबद्दल कसलीही शंका नाहीं. त्या दिवशी प्रत्येकाला त्याच्या कमाईचा पुरा पुरा मोबदला दिला जाईल. कोणावरही अत्याचार होणार नाही.

فَكَيْفَ إِذَا جَمَعْنَٰهُمْ لِيَوْمٍ لَّا رَيْبَ فِيهِ وَوُفِّيَتْ كُلُّ نَفْسٍ
مَّا كَسَبَتْ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ٢٥

२६. म्हणा. हे अल्लाह ! राज्यसत्ताधिशा ![३७] तू ज्याला इच्छितोस त्याला राज्यसत्ता देतोस आणि ज्याच्याकडून इच्छितोस त्याचेकडून ती हिरावून घेतोस. ज्याला इच्छितोस त्याला प्रतिष्ठा देतोस. आणि ज्याला इच्छितोस त्याला अपमानित करतोस. चांगूलपणा तुझ्याच हाती आहे.[३८] नि:संशय तू सर्वसमर्थ आहेस.

قُلِ اللَّهُمَّ مَٰلِكَ الْمُلْكِ تُؤْتِي الْمُلْكَ مَن تَشَاءُ وَتَنزِعُ الْمُلْكَ
مِمَّن تَشَاءُ وَتُعِزُّ مَن تَشَاءُ وَتُذِلُّ مَن تَشَاءُ بِيَدِكَ الْخَيْرُ
إِنَّكَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ٢٦

२७. तू रात्रीला दिवसामध्ये दाखल करतोस आणि दिवसाला रात्रीमध्ये.[३९] आणि सजीवाला मृतातून काढतोस आणि मृताला सजीवामधून.[४०] आणि तू ज्याला इच्छितोस त्याला बेसुमार बक्षीसांनी गौरवितोस.

تُولِجُ اللَّيْلَ فِي النَّهَارِ وَتُولِجُ النَّهَارَ فِي اللَّيْلِ وَتُخْرِجُ الْحَيَّ
مِنَ الْمَيِّتِ وَتُخْرِجُ الْمَيِّتَ مِنَ الْحَيِّ وَتَرْزُقُ مَن تَشَاءُ
بِغَيْرِ حِسَابٍ ٢٧

३२. ग्रंथांच्या एका भागाने अभिप्रेत तौरात, इंजील वगैरे अवतीर्ण पुस्तके आहेत.

३३. अल्लाहचा ग्रंथ म्हणजे पवित्र क़ुरआन, तौरात वगैरे धार्मिक पुस्तके आणि पवित्र क़ुरआन यांचे नाते ग्रंथाचे भाग व संपूर्ण ग्रंथ सारखे आहे.

३४. निर्णय त्या वादांचा जे ग्रंथधारकांनी अल्लाहच्या धर्मासंबंधी उत्पन्न केले आहेत.

३५. म्हणजे सत्यापासून तोंड फिरविणे ही नवीन गोष्ट नव्हे. हे तर त्यांच्या समाजाचे वैशिष्ट्य आहे, ज्याचा पुरावा त्यांच्या इतिहासात आढळून येतो.

३६. हा यहूदी लोकांच्या मनघडत गोष्टीकडे इशारा आहे. ते ईशग्रंथाला शासकाचा दर्जा देण्यास यास्तव तयार नाहीत की आखिरतच्या शिक्षेबद्दल ते बेफिकीर आहेत. आणि अखिरतच्या बदल्यासंबंधी त्यांना योग्य कल्पना नाही. आचरणाच्या फळासंबंधी मागील ग्रंथांमध्ये जी कल्पना होती, तीच म्हणजे माणसाचे जसे आचरण राहील तसे त्याला फळ मिळेल, पवित्र क़ुरआन सादर करते. परंतु धर्मामध्ये हस्तक्षेप करुन त्यांनी आपले समाधान करुन घेतले होते की त्यांचा संबंध एका खास धार्मिक समाजाशी असल्याने आखिरतमध्ये त्यांची विचारणा होणार नाही या समाधानामुळे ते आपली धार्मिक जबाबदारी पार पाडण्याबाबतीत निष्क्रिय बनले होते.

या आरशात चालू काळातील मुसलमान सुद्धा आपले प्रतिबिंब पाहू शकतात. त्यांच्यापैकी एक मोठा वर्ग या धोक्यात आहे की आखिरतच्या नजात (मुक्ती) साठी जन्मजात मुसलमान असणे पुरेसे आहे. नजात बद्दलच्या या चुकीच्या कल्पनेने त्यांना खऱ्या ईमाना व सदाचरणाबद्दल बेपर्वा केले आहे. आणि चुकीचे रुढीरिवाज व दुराचरणामध्ये ते इतके मग्न झाले आहेत की त्याबाबतीत पवित्र क़ुरआनला निर्णायक दर्जा देण्यास प्रत्यक्षरित्या तयार नाहीत.

३७. ही आहे सत्तेसंबंधीची वस्तु:स्थिती जिला येथे प्रार्थनेच्या स्वरुपात सादर केले गेले आहे. सर्व प्रकारचे अधिकार आणि सर्व प्रकारच्या शासकीय सत्तेचा स्वामी एकटा अल्लाह आहे. यामध्ये त्याचा कोणी सहभागी नाही. जगामध्ये ज्या कोणाला सत्ता लाभते ती त्यानेच दिल्यामुळे लाभते आणि एखाद्याच्या सत्तेचा शेवट होतो तो त्यानेच सत्ता हिरावून घेतल्याने होतो. तो आपल्या धोरणानुसार व्यक्तिना व गटांना सत्ता प्रदान करीत असतो वा सत्तेपासून वंचित करीत असतो. आणि म्हणून ज्याच्याजवळ सत्तेचे भांडार आहेत आणि ज्याच्या हाती मानसन्मान व प्रतिष्ठा आहे त्यालाच सर्वोच्य शासक मानले पाहिजे आणि त्याच्याशीच आपल्या आशा आकांक्षा निगडीत केल्या पाहिजेत.

अल्लाह जगाचा स्वामी आहे आणि म्हणून माणसाने प्रत्येक प्रकारच्या ऐहिक सत्तेला मग ती राजेशाहीच्या स्वरुपात असो, लोकशाहीच्या स्वरुपात असो वा इतर कोणत्याही स्वरुपात असो, अल्लाहची अमानत समजून त्याने दाखवून दिलेल्या पद्धतीने तिचा वापर केला पाहिजे सत्तेसंबंधीचा पवित्र क़ुरआनचा हा दृष्टीकोन जसे राजपूजेचे (King worship) खंडन करतो त्याच प्रमाणे राजाच्या ईश्वरदत्त हक्काचे (Divine Right) व लोकशाही मधील ईश्वराशी आपला काही संबंध नसून आपली सत्ता स्र्वभौम आहे या दाव्याचेही खंडन करतो.

३८. याचा एक अर्थ हा आहे की चांगुलपणा फक्त अल्लाहचे हाती आहे. आणि दुसरा अर्थ हा आहे की अल्लाहचे हाती चांगुलपणाच चांगुलपणा आहे व तो समृद्धी व भरभराटीचा झरा आहे.

३९. म्हणजे दिवस व रात्रीची निरंतरता व त्यांच्या वेळेमध्ये होणारी वाढ घट हे अल्लाहचेच कार्य आहे. आणि त्यामध्ये दुसऱ्या कोणाचा थोडादेखील संबंध नाही. या वस्तु:स्थितीने रात्र व दिवस यांना निरनिराळ्या देवता (Night Deity or Day Deity)मानणाऱ्या अनेकेश्वरवादी श्रद्धेचे खंडन होते.

४०. उदा. माणसाला निर्जीव वस्तु (माती) पासून निर्माण केले व हा माणूस मेल्यानंतर माती (निर्जीव वस्तु) होतो. अशाप्रकारे तो निर्जीव वस्तु मधून सजीव प्राणीमात्र निर्माण करतो आणि सजीव शरीरांपासून निर्जीव वस्तु बाहेर काढीत असतो.

२८. ईमान आणलेल्यानी मोमिनांच्या (मुसलमानांच्या) एवजी काफिरांना (इन्कार करणाऱ्यांना) आपला मित्र बनवू नये.[४१] आणि जो असे करील त्याचा अल्लाहशी काही संबंध नाहीं. तथापि तुम्ही काही धरेक्याच्या भयाने त्यांच्यापासून वाचण्यासाठी एखाद्या युक्तिचा अवलंब करा.[४२] परंतु अल्लाह तुम्हांला आपले भय दाखवितो.आणि त्याच्याचकडे तुम्हाला परत जावयाचे आहे.

لَا يَتَّخِذِ الْمُؤْمِنُونَ الْكٰفِرِينَ اَوْلِيَآءَ
مِنْ دُونِ الْمُؤْمِنِينَ ۚ وَمَنْ يَّفْعَلْ ذٰلِكَ فَلَيْسَ مِنَ
اللّٰهِ فِي شَيْءٍ اِلَّآ اَنْ تَتَّقُوْا مِنْهُمْ تُقٰىةً ۗ وَيُحَذِّرُكُمُ اللّٰهُ
نَفْسَهٗ ۗ وَاِلَى اللّٰهِ الْمَصِيْرُ ﴿٢٨﴾

२९. म्हणा. जे काही तुमच्या मनामध्ये आहे त्याला लपवा वा उघड करा.आल्लाह ते जाणतच आहे. आणि तो जाणतो जे काही आकाशांमध्ये आहे व जे काही जमीनीमध्ये आहे. आणि अल्लाहचे प्रत्येक गोष्टीवर प्रभुत्व आहे.

قُلْ اِنْ تُخْفُوْا مَا فِيْ صُدُوْرِكُمْ اَوْ تُبْدُوْهُ يَعْلَمْهُ اللّٰهُ ۗ
وَيَعْلَمُ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ۗ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ
شَيْءٍ قَدِيْرٌ ﴿٢٩﴾

३०. ज्या दिवशी प्रत्येक माणूस आपल्या चांगल्या व वाईट कर्मांना आपल्या समोर प्रत्यक्ष पाहील, त्यावेळी तो ही मनोकामना करील की त्यांच्या व त्या दिवसाच्या दरम्यान प्रदीर्घ मुदत आड येती तर बरे झाले असते.अल्लाह तुम्हाला आपले भय दाखवितो आणि अल्लाह आपल्या दासांच्या बाबतीत मोठा ममताळू आहे.[४३]

يَوْمَ تَجِدُ كُلُّ نَفْسٍ مَّا عَمِلَتْ مِنْ خَيْرٍ مُّحْضَرًا ۖۚ وَّمَا عَمِلَتْ مِنْ
سُوْٓءٍ ۚ تَوَدُّ لَوْ اَنَّ بَيْنَهَا وَبَيْنَهٗٓ اَمَدًاۢ بَعِيْدًا ۗ وَيُحَذِّرُكُمُ اللّٰهُ
نَفْسَهٗ ۗ وَاللّٰهُ رَءُوْفٌۢ بِالْعِبَادِ ﴿٣٠﴾

३१. म्हणा. जर तुम्ही अल्लाहबद्दल प्रेम बाळगता तर माझे अनुकरण करा,[४४] अल्लाह तुमच्यावर प्रेम करील आणि तुमची पापे माफ करील. अल्लाह मोठा क्षमाशील व कृपाळू आहे.

قُلْ اِنْ كُنْتُمْ تُحِبُّوْنَ اللّٰهَ فَاتَّبِعُوْنِيْ يُحْبِبْكُمُ اللّٰهُ وَيَغْفِرْ لَكُمْ
ذُنُوْبَكُمْ ۗ وَاللّٰهُ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿٣١﴾

३२. म्हणा. आज्ञापालन करा अल्लाह आणि पैगंबरांचे. जर ते मानत नाहीत तर जाणा की अल्लाह इन्कार करणाऱ्यांवर प्रेम करीत नाही.

قُلْ اَطِيْعُوا اللّٰهَ وَالرَّسُوْلَ ۚ فَاِنْ تَوَلَّوْا فَاِنَّ اللّٰهَ
لَا يُحِبُّ الْكٰفِرِيْنَ ﴿٣٢﴾

३३. अल्लाहने आदम,[४५] नूह, इब्राहीमची संतती व इमरानची संतती [४६] यांना जगातील साऱ्या लोकांवर प्राधान्य देऊन निवडले होते.

اِنَّ اللّٰهَ اصْطَفٰٓى اٰدَمَ وَنُوْحًا وَّاٰلَ اِبْرٰهِيْمَ وَاٰلَ عِمْرٰنَ عَلَى
الْعٰلَمِيْنَ ﴿٣٣﴾

३४. हे सर्व एक दुसऱ्याच्या वंशापासून होते आणि अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.[४७]

ذُرِّيَّةًۢ بَعْضُهَا مِنْۢ بَعْضٍ ۗ وَاللّٰهُ سَمِيْعٌ عَلِيْمٌ ﴿٣٤﴾

४१. ईमानाचे नाते सर्व नात्यापेक्षा श्रेष्ठ आहे. आणि म्हणून ईमानधारकांनी ईश्वराचे शत्रुंना आपले मित्र बनवू नये त्यांनी मैत्री त्याच लोकांशी करावी जे अल्लाहशी मैत्री बाळगतात. स्पष्ट असो की या उपदेशाचा हेतू सामान्य मानवी संबंधाना अमान्य करणे हा नाही. त्याचप्रमाणे मुसलमानांचे विरुद्ध लढाईत न गुंतलेल्या काफिरांचे (ईश्वराचा इन्कार करणाऱ्यांचे) मानवी हक्क अदा करण्यास व त्यांच्याबरोबर न्यायनीतीचा व्यवहार करण्यास यामुळे प्रतिबंध होत नाही. या गोष्टी पवित्र क़ुरआन मध्ये इतरत्र स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. उदा. खालील आयती وَقُوْلُوا لِلنَّاسِ حُسْناً۔(البقرة:٨٣) ''लोकांच्या बरोबर चांगले बोला'' (सूरे बकरा-८३)

وَلَا يَجْرِمَنَّكُمْ شَنَاٰنُ قَوْمٍ عَلٰى اَلَّا تَعْدِلُوْا اِعْدِلُوْا

هُوَ اَقْرَبُ لِلتَّقْوٰى۔(مائدہ۔٨)

''एखाद्या गटाचे शत्रुत्व तुम्हाला त्याच्याबरोबर अन्यायाने वागण्यास प्रवृत्त न करो. न्यायाने वागा. ही गोष्ट संयमाला अधिक धरुन आहे.''(सूरे मायदा-८)

وَصَاحِبْهُمَا فِى الدُّنْيَا مَعْرُوْفًا۔(لقمان۔١٥)

''(आई बाप अनेकेश्वरवादी असले तरी) ऐहिक जीवनात त्यांच्याबरोबर चांगले वर्तन कर.'' (सूरे लूकमान -१५)

وَالْجَارِ ذِى الْقُرْبٰى وَالْجَارِ الْجُنُبِ وَالصَّاحِبِ

بِالْجَنْبِ وَابْنِ السَّبِيْلِ۔(نساء۔٣٦)

''आणि नातलग शेजारी, अपरिचित शेजारी, बैठकीतील दोस्त आणि वाटसरु यांच्याबरोबर चांगले वर्तन करा.'' (सूरे निसा - ३६)

لَا يَنْهٰكُمُ اللّٰهُ عَنِ الَّذِيْنَ لَمْ يُقَاتِلُوْكُمْ فِى الدِّيْنِ وَلَمْ يُخْرِجُوْكُمْ

مِنْ دِيَارِكُمْ اَنْ تَبَرُّوْهُمْ وَتُقْسِطُوْا اِلَيْهِمْ۔(الممتحنہ۔٨)

''अल्लाह तुम्हाला त्या लोकांच्या बरोबर चांगले वर्तन करण्यास व न्यायाची वागणूक ठेविण्यास प्रतिबंध करीत नाही ज्यांनी तुमच्या बरोबर धर्मासंबंधी लढाई केलेली नाही. आणि ज्यांनी तुम्हाला तुमच्या घरामधून हाकलून दिलेले नाही.'' (सूरे मुम्तहेना-८)

४२. ईमानधारक जर नास्तिक लोकांच्या वेढ्यामध्ये अडकतील व त्यांनी आपल्या सुरक्षतेसाठी एखादी पद्धत अवलंबिली जी सकृतदर्शनी नास्तिकांबरोबर मैत्री प्रकट करणारी असेल तर त्याला काही हरकत नाही. परंतु ताकीद केली गेली आहे की अशा परिस्थितीत सुद्धा अल्लाहचे भय बाळगले पाहिजे आणि स्वत:ला वाचविण्यासाठी असे कोणतेही काम करु नये जे स्वधर्माला व मुस्लिम समाजासाठी नुकसानकारक असेल वा जुलूम जबरदस्तीवर आधारलेले असेल. उदा. रहस्ये शत्रूला सांगणे, इस्लाम व मुसलमानांचे विरुद्ध कट करणे, अन्यायाने हत्या व रक्तपात करणे वगैरे.

४३. ममते मध्ये नुकसानी पासून वाचविण्याचा पैलू प्रभावी आहे. अल्लाह ममताळू आहे. आणि म्हणून त्याने आपल्या दासांना आगीच्या शिक्षेकडे घेऊन जाणाऱ्या गोष्टींपासून सावध केले आहे; कारण ते या अत्यंत वाईट शिक्षे पासून वाचावेत.

४४. ही आयत स्पष्ट करते की अल्लाहच्या प्रेमाचा तोंडी दावा नजात (मुक्ती) साठी पुरेसा नाही. तर त्याच्या बद्दलच्या प्रेमाचा पुरावा आपल्या आचरणाने दिला पाहिजे. त्याची पद्धत ही आहे की त्याचे पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे अनुकरण केले जावे. या आयती द्वारे सर्व धर्माच्या लोकांना व साऱ्या मानवाना शेवटच्या पैगंबरांचे अनुयायित्व पत्करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे आणि स्पष्टपणे जाहीर करण्यात आले आहे की याशिवाय अल्लाहबरोबर प्रेमाचा संबंध कायम होऊं शकत नाही.

या आयतीमध्ये त्या मुसलमानासाठी ही उपदेश आहे जे अल्लाहच्या प्रेमाची प्रौढी मिरवितात आणि प्रत्यक्षांत पैगंबरांच्या अनुकरणापासून पळ काढतात.

४५. येथून जो विषय सुरू होत आहे तो आयत नं. ६३ पर्यंत चालतो. हजरत ईसा यांचे व्यक्तिमत्त्वाला सत्य स्वरुपात निवेदन करणे आणि ईसाई लोकांनी त्यांचेबद्दल ईशत्वाची जी निष्ठा अंगिकारिली आहे ती एकदम चुकीची व अगदी खोटी आहे हे येथे प्रामुख्याने सांगितले गेले आहे. प्रस्तावनेदाखल ह. आदम, हजरत नूह. हजरत इब्राहिम यांचे कुटूंब व इमरान यांचे कुटुंब यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ही सर्व माणसे होती. त्यांच्यापैकी कोणी ईश्वर अगर ईश्वराचा पुत्र नव्हता. हज़रत ईसा हे पण त्या निवडक दासापैकी अल्लाहचे एक निवडक दास होते.मग त्यांना ईश्वराचा दर्जा देण्याचा अर्थ काय?

४६. इमरान बिन मातान हजरत मरयम यांच्या वडिलांचे नांव होते. हे हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांचे आजा है हजरत दाऊद यांच्या वंशापैकी होते. याने येथे हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की हजरत मरयम आणि हजरत ईसा हे अत्यंत नांवाजलेल्या व कुलीन घराण्यामधील आहेत. ही दोन्ही माणसेच आहेत. त्यांना अल्लाहने आपल्या निवडीने भूषविले होते. आणि म्हणून ज्याप्रमाणे त्यांच्या पावित्र्याबद्दल शंका घेणे योग्य नाही त्याचाप्रमाणे त्यांना ईश्वराचा दर्जा देणे पण योग्य नाही.

४७. हा त्या गोष्टीकडे इशारा आहे की जर तुम्ही एखादी अनुचित गोष्ट त्या निवडक व्यक्तीच्या माथी मारता तर चांगल्या प्रकारे जाणा की अल्लाह त्या गोष्टींना ऐकत आहे व तो तुमच्या खोटेपणालाही जाणतो.

३५. आणि (ती घटना ही उल्लेखनीय आहे की) जेव्हा इमरानच्या पत्नीने प्रार्थना केली, हे माझ्या पालनकर्त्या ! मी या मुलाला जे माझ्या पोटात आहे तुला अर्पण (नजर) करीत आहे की ते तुझ्या उपासने (इबादत) साठी खास राहील.[४८] त्याचा तू माझ्याकडून स्वीकार कर. निःसंशय तू ऐकणारा व जाणणारा आहेस.

إِذْ قَالَتِ امْرَأَتُ عِمْرَانَ رَبِّ إِنِّي نَذَرْتُ لَكَ مَا فِي بَطْنِي
مُحَرَّرًا فَتَقَبَّلْ مِنِّي ۖ إِنَّكَ أَنتَ السَّمِيعُ الْعَلِيمُ ﴿٣٥﴾

३६. मग जेव्हा तिला मुलगी झाली तेव्हा ती म्हणू लागली. माझ्या पालनकर्त्या ! माझ्या पोटी तर मुलगी जन्मास आली - आणि तिने कोणास जन्म दिला ते अल्लाहला चांगल्याप्रकारे माहित होते [४९] आणि मुलगा तर मुलगीसारखा होत नाही.[५०] आणि मी तिचे नांव मरियम ठेविले आहे आणि मी तिला व तिच्या संततीला धुत्कारल्या गेलेल्या सैताना पासून तुझ्या रक्षणाखाली देत आहे.

فَلَمَّا وَضَعَتْهَا قَالَتْ رَبِّ إِنِّي وَضَعْتُهَا أُنثَىٰ وَاللَّهُ أَعْلَمُ
بِمَا وَضَعَتْ وَلَيْسَ الذَّكَرُ كَالْأُنثَىٰ ۖ وَإِنِّي سَمَّيْتُهَا مَرْيَمَ
وَإِنِّي أُعِيذُهَا بِكَ وَذُرِّيَّتَهَا مِنَ الشَّيْطَانِ الرَّجِيمِ ﴿٣٦﴾

३७. तेव्हा तिच्या पालनकर्त्याने तिचा चांगल्याप्रकारे स्वीकार करुन तिला गौरविले. उत्तमप्रकारे तिचे पालनपोषण केले. आणि ज़करिया याना तिचा पालक बनविले [५१]जेव्हा जेव्हा ज़करिया तिच्याजवळ तिच्या मेहराबमध्ये [५२] (प्रार्थनेच्या खोलीत) जात तेव्हा तिच्याजवळ खाण्याचे पदार्थ पाहत. त्यानी विचारले. हे मरियम ! हे तुझ्याजवळ कोठून येते? तिने उत्तर दिले. हे अल्लाहकडून आहे.[५३] अल्लाह ज्याला इच्छितो त्याला अमर्याद देतो.

فَتَقَبَّلَهَا رَبُّهَا بِقَبُولٍ حَسَنٍ وَأَنبَتَهَا نَبَاتًا حَسَنًا وَكَفَّلَهَا
زَكَرِيَّا ۖ كُلَّمَا دَخَلَ عَلَيْهَا زَكَرِيَّا الْمِحْرَابَ وَجَدَ عِندَهَا
رِزْقًا ۖ قَالَ يَا مَرْيَمُ أَنَّىٰ لَكِ هَٰذَا ۖ قَالَتْ هُوَ مِنْ عِندِ اللَّهِ ۖ
إِنَّ اللَّهَ يَرْزُقُ مَن يَشَاءُ بِغَيْرِ حِسَابٍ ﴿٣٧﴾

३८. याप्रसंगी [५४] ज़करियानी आपल्या पालनकर्त्याला आळविले व विनवणी केली. हे माझ्या पालनकर्त्या मला खास तुझ्याजवळून चांगल्या संततीचा लाभ होऊ दे. निःसंशय तू विनवणी ऐकणारा आहेस.

هُنَالِكَ دَعَا زَكَرِيَّا رَبَّهُ ۖ قَالَ رَبِّ هَبْ لِي مِن لَّدُنكَ ذُرِّيَّةً
طَيِّبَةً ۖ إِنَّكَ سَمِيعُ الدُّعَاءِ ﴿٣٨﴾

३९. फिरिशत्यांनी (ईश दुतांनी) त्याला पुकारले जेव्हा तो मेहराबमध्ये (प्रार्थना कक्षात) उभा राहून नमाज़ पढत होता. अल्लाह तुला याह्याची [५५] खुशखबर देत आहे. तो अल्लाहच्या एका वचनाचे [५६] समर्थन करणारा,[५७] प्रमुख [५८] व अत्यंत आत्मानिग्रह करणारा होईल आणि सदाचारी लोकांपैकी पैगंबर असेल.

فَنَادَتْهُ الْمَلَائِكَةُ وَهُوَ قَائِمٌ يُصَلِّي فِي الْمِحْرَابِ
أَنَّ اللَّهَ يُبَشِّرُكَ بِيَحْيَىٰ مُصَدِّقًا بِكَلِمَةٍ مِّنَ اللَّهِ وَسَيِّدًا
وَحَصُورًا وَنَبِيًّا مِّنَ الصَّالِحِينَ ﴿٣٩﴾

४८. इमरान यांच्या पत्नी (हन्ना) जेव्हा गरोदर होत्या तेव्हा इमरान यांचे निधन झाले. हन्ना ने हा नवस केला की जो मुलगा जन्मास येईल तो अल्लाहासाठी अपर्ण राहील. म्हणजे त्याच्या भक्ती (इबादत) साठी अपर्ण राहील. आणि बनी इसराईल यांच्यामध्ये त्याची पद्धत ही होती की हैकलला लागून असलेल्या खोलीत (मेहराब) ध्यानमग्न व्हावे.

४९. हज़रत मरयम यांच्या आईच्या निवेदनाला थांबवून ही गोष्ट सर्वश्रेष्ठ अल्लाहने फर्माविली आहे. याचा अर्थ हा की अल्लाहला याचे चांगल्या प्रकारे ज्ञान होते की कशी रूबाबदार मुलगी जन्मास आली आहे. आणि इमरानच्या घरी श्रेष्ठ व्यक्तीने जन्म घेतला आहे.

५०. हन्नाला आपल्याला मुलगा होईल अशी आशा होती. परंतु जेव्हा मुलगी जन्मास आली तेव्हा त्यांना काळजी वाटू लागली की त्यांनी जो नवस केला होता त्यासाठी मुलगी कशी काय योग्य होईल? तरी पण जर अल्लाहने तिचा स्वीकार केला तर त्याचे फार उपकार होतील.

हज़रत हन्ना ''आणि मुलगा मुलगी सारखा तर होत नाही'' असे बोलल्या आणि मुलगी जन्मास आली असताना देखील त्या असे बोलल्या नाहीत की ''आणि मुलगी मुलग्यासारखी होत नाही '' आणि हे अशासाठी की त्यामुळे कृतघ्नतेचा पैलू निघाला असता, जो प्रार्थनेच्या शिष्टाचाराविरोधी आहे. आणि म्हणून त्यानी अल्लाहने दिलेल्या देणगीचा पूर्ण आदर करीत फक्त आपली चिंता व्यक्त केली.

५१. हजरत मरयम अनाथ होत्या. आणि त्यांना नंतर ध्यानमग्न ही व्हावयाचे होते. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता. अल्लाहने हज़रत ज़करिया (अलैहिस्सलाम) जे पैगंबर आहेत आणि जे हज़रत मरयमच्या मावशीचे पती होते. त्यांना त्यांचा पालक बनविले.

५२. ''मेहराब'' अभिप्रेत ती खोली आहे ज्यामध्ये हज़रत मरयम ध्यानमग्न होत्या. बैतुल मुकद्दस (जेरूसलेम मधील पवित्र मस्जिद) मध्ये अशा प्रकारच्या खोल्या भक्तांसाठी बनलेल्या होत्या.

५३. हजरत मरयम या अल्लाहच्या खास अशा भक्त होत्या. त्यांच्या उदरनिर्वाहाची अल्लाहने असाधारण व्यवस्था केली होती. आणि उदरनिर्वाहाची असाधारण अशी व्यवस्था करणे सर्व श्रेष्ठ अल्लाहच्या कदापिही सामर्थ्याबाहेर नाही.

५४. हज़रत ज़करिया हे हज़रत मरयमचे पालक होते. व म्हणून ते देखरेखीसाठी त्यांच्याजवळ जात असत. लहान वयातील हज़रत मरयम यांच्या भक्ति व आज्ञा व आज्ञाधारकतेने व त्यांच्या सदाचरणाने ते फार प्रभावित झालेले होते. आणि अल्लाह ज्या असाधारण पद्धतीने त्यांना अन्नपाणी पोहचवित होता ते पाहून त्यांच्या मनातही सदाचरणी संततीची इच्छा निर्माण झाली.

५५. बायबलमध्ये याह्या यांचे नांव योहान (John)असे आहे. त्यांचा जन्म हज़रत ईसा यांच्या जन्मा पूर्वी सहा महिने झाला होता.

५६. كَلِمَةٍ مِّنَ اللهِ 'कलिमतिम मिनल्लाह' अल्लाहचे एक वचन (A word from Allah) ने अभिप्रेत हज़रत ईसा (अलैहिस्सलाम ) हे आहेत. त्यांचा जन्म बापाशिवाय अल्लाहचे ''कुन كُنْ '' हो या वचनाने झाला होता. म्हणून त्यांना 'अल्लाहचे एक वचन' या पदवीने भूषविले गेले. एक वचन याने ही गोष्ट पण स्पष्ट होते की अल्लाहच्या अगणित वचनापैकी हज़रत ईसा हे अेक वचन आहेत. आणि ज्याप्रकारे अगणित निर्मिती अल्लाहच्या 'हो' या वचनाने आस्तित्वात आली आहे त्याचप्रमाणे हज़रत ईसा हे पण प्रकट झालेले आहेत. याने ईसाई लोकांच्या हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) बद्दलच्या ईशत्वाच्या श्रद्धेचेही खंडन होते.

५७. हज़रत याह्या यांनी हजरत ईसा यांचे समर्थन केल्याबद्दलचा उल्लेख इंजील मध्येही नमूद आहे.

''योहान ने त्याच्याबद्दल साक्ष दिली आणि ओरडून म्हणाला हा तोच आहे ज्याचा मी उल्लेख केला की माझ्यामागून जो येत आहे व तो माझ्यापेक्षा समर्थ आहे''(योहान १: १५)

५८. म्हणजे हजरत याह्या (अलैहिस्सलाम) यांच्यामध्ये पुढारी पण चे व नेतृत्वाचे तेज असेल. ते सन्यासी होणार नाहीत तर मार्गदर्शक व नेते होतील.

४०. तो म्हणाला. हे माझ्या पालनकर्त्या ! माझ्या येथे पुत्र कसा जन्मेल, जेव्हा मी वृद्ध झालो आहे व माझी पत्नी वांझ आहे ?[५९] फर्माविले. याचप्रकारे अल्लाह जे इच्छितो ते करतो.[६०]

قَالَ رَبِّ أَنَّىٰ يَكُونُ لِي غُلَٰمٌ وَقَدْ بَلَغَنِيَ ٱلْكِبَرُ وَٱمْرَأَتِي
عَاقِرٌ قَالَ كَذَٰلِكَ ٱللَّهُ يَفْعَلُ مَا يَشَآءُ ﴿٤٠﴾

४१. विनविले की माझ्या पालनकर्त्या ! माझ्यासाठी एखादी निशाणी निश्चित कर. फर्माविले तुझ्यासाठी निशाणी ही आहे की तीन दिवस लोकांबरोबर इशाऱ्याशिवाय बोलू शकणार नाहीस. आणि आपल्या पालनकर्त्याचे सारखे स्मरण कर आणि सकाळ संध्याकाळ त्यांच्या पवित्रतेचा जप करीत राहा. [६१]

قَالَ رَبِّ ٱجْعَل لِّيٓ ءَايَةً قَالَ ءَايَتُكَ أَلَّا تُكَلِّمَ ٱلنَّاسَ
ثَلَٰثَةَ أَيَّامٍ إِلَّا رَمْزًا وَٱذْكُر رَّبَّكَ كَثِيرًا وَسَبِّحْ
بِٱلْعَشِيِّ وَٱلْإِبْكَٰرِ ﴿٤١﴾

४२. आणि जेव्हा फिरिश्ते म्हणाले. हे मरियम ! अल्लाहने तुला निवडले तुला पावित्र्य दिले आणि साऱ्या जगातील स्त्रीयांवर प्राधान्य देऊन तुझी निवड केली.[६२]

وَإِذْ قَالَتِ ٱلْمَلَٰٓئِكَةُ يَٰمَرْيَمُ إِنَّ ٱللَّهَ ٱصْطَفَىٰكِ
وَطَهَّرَكِ وَٱصْطَفَىٰكِ عَلَىٰ نِسَآءِ ٱلْعَٰلَمِينَ ﴿٤٢﴾

४३. हे मरियम ! आपल्या पालनकर्त्याचे निष्ठेने आज्ञापालन कर. सज्दा करीत जा आणि रुकूअ करणाऱ्या बरोबर रुकूअ करीत जा.[६३]

يَٰمَرْيَمُ ٱقْنُتِى لِرَبِّكِ وَٱسْجُدِى وَٱرْكَعِى مَعَ ٱلرَّٰكِعِينَ ﴿٤٣﴾

४४. या अदृश्यातील वार्ता आहेत, ज्या आम्ही वही द्वारे (प्रकटी करणाद्वारे) तुम्हाला कळवित आहोत.[६४] नाहीपेक्षा तुम्ही त्यावेळी त्यांच्या जवळ हजर नव्हता जेव्हा ते मरियमचा पालक कोण असावा हे ठरविण्यासाठी आपापल्या लेखण्या फेकत होते. [६५] आणि तुम्ही त्यावेळीही त्यांच्याजवळ हजर नव्हता जेव्हा ते आपसात भांडत होते.

ذَٰلِكَ مِنْ أَنۢبَآءِ ٱلْغَيْبِ نُوحِيهِ إِلَيْكَ وَمَا كُنتَ لَدَيْهِمْ
إِذْ يُلْقُونَ أَقْلَٰمَهُمْ أَيُّهُمْ يَكْفُلُ مَرْيَمَ وَمَا كُنتَ
لَدَيْهِمْ إِذْ يَخْتَصِمُونَ ﴿٤٤﴾

४५. आणि जेव्हा फिरिश्ते म्हणाले. हे मरियम ! अल्लाह तुला आपल्याकडून एका वचनाची खुशखबर देत आहे. त्याचे नांव मरियमचा पुत्र मसीह ईसा असेल. [६६] तो हे जग व आखिरत दोहोमध्ये प्रतिष्ठित होईल [६७] आणि अल्लाहच्या निकटवर्तीयांपैकी असेल.

إِذْ قَالَتِ ٱلْمَلَٰٓئِكَةُ يَٰمَرْيَمُ إِنَّ ٱللَّهَ يُبَشِّرُكِ بِكَلِمَةٍ مِّنْهُ ٱسْمُهُ
ٱلْمَسِيحُ عِيسَى ٱبْنُ مَرْيَمَ وَجِيهًا فِى ٱلدُّنْيَا
وَٱلْءَاخِرَةِ وَمِنَ ٱلْمُقَرَّبِينَ ﴿٤٥﴾

५९. हा प्रश्न नकाराच्या स्वरुपाचा नव्हता. तर त्याचे स्वरुप काय असेल याचे स्पष्टीकरण मागितले गेले.

६०. तुम्ही वृद्ध आहात व तुमची पत्नी वांझ आहे तरी सुद्धा तुम्हाला पुत्र लाभेल कारण महत्त्वाची गोष्ट अल्लाहचे वचन ही आहे. तो जेव्हा एखाद्या गोष्टीचा इरादा करतो तेव्हा कोणत्याही गोष्टी त्या आड येऊ शकत नाही. कारण सर्व गोष्टींवर त्याचीच सत्ता चालते.

हज़रत याह्या (अलैहिस्सलाम) यांच्या जन्माची ही घटना हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या जन्माच्या घटनेच्या प्रस्तावनेदाखल निवेदन केली गेली आहे. यावरून हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे. की हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांचा जन्म बापाशिवाय झाला होता, तर हजरत याह्या (अलैहिस्सलाम) यांचा जन्म त्यांचे वडील अत्यंत वृद्ध व त्यांची आई वांझ असता देखील झालेला होता. जर या असाधारण घटनेने हजरत याह्या (अलैहिस्सलाम) यांना ईशत्वाचा दर्जा मिळाला नाही तर हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांना त्यांच्या असाधारण जन्माच्या आधारावर का म्हणून ईशत्वाचा दर्जा द्यावा? वस्तु:स्थिती ही आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या परिपूर्ण सामर्थ्याच्या आविष्कारासाठी साधनांच्या बाबतीत फरक करीत असतो. आणि असाधरण व अस्वाभाविक घटना प्रत्यक्षात घडवित असतो. याने ऐकेश्वरवादाचा विचार दृढ़ होतो. परंतु बहकलेले लोक यालासुद्धा अनेकेश्वरवादाचे साधन बनवितात.

६१. म्हणजे, तीन दिवस व तीन रात्र बोलू शकणार नाहीस. तथापि तू अल्लाहचे स्मरण व त्याचे नामाचा जप करू शकशील. लोकांच्याबरोबर बोलण्यासाठी तोंड न उघडणे आणि अल्लाहच्या स्मरणासाठी व त्याच्या नामाच्या जपासाठी तोंडाचे उघडणे ही एकेश्वरवादाची स्पष्ट अशी निशाणी होती. एखादी असाधारण घटना घडणार आहे याची खूण होती. याला मुकेपणाची उपमा दिली जाऊ शकत नाही. कारण मुकेपणामध्ये वाचा उघडत नाही. येथे हज़रत ज़करिया (अलैहिस्सलाम) यांची वाचा ईशस्मरण व ईशस्तवनासाठी उघडत होती.

६२. अल्लाहने आपल्या श्रेष्ठ निशाणीच्या आविष्कारासाठी हज़रत मरयम यांना निवडलेले होते. आणि या निवडीमध्ये त्यांना जगातील साऱ्या स्त्रियांमध्ये प्राधान्य दिले होते. हा मोठा सन्मान आहे जो हज़रत मरयम यांना लाभला.

६३. जमाअती समवेत नमाज़ कडे इशारा आहे. हज़रत मरयम हैकल मध्ये ध्यानमग्न होत्या. म्हणून त्यांना जमाअती समवेतच्या नमाज़चे भाग्य प्राप्त करण्याचाही उपदेश केला गेला.

६४. संबोधन पैगंबरांना केले गेले आहे. आणि ज्या घटना निवेदिल्या गेल्या त्याबाबत फर्माविले गेले की या अदृश्याच्या वार्ता आहेत. कारण जेव्हा त्या घडल्या त्यावेळी हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे तेथे हजर नव्हते आणि या घटना तपशीलासह तौरात व इंजील मध्ये नमूद नाहीत. अशा परिस्थितीत या घटना वास्तवरुपाने व सचोटीने निवेदन करणे ही गोष्ट तुम्ही अल्लाहचे पैगंबर आहात या वस्तुस्थितीचा पुरावा आहे.

६५. समान हक्क असताना समझोता घडवून आणण्यासाठी ''कुरआ अंदाजी'' (चिठ्या टाकून निर्णय घेणे) शास्त्रसंमत आहे. त्या कालात याची पद्धत अशी होती की आपापल्या लेखण्या नदीत फेकल्या जात असत. आणि ज्याची लेखणी नदीच्या प्रवाहाच्या उलट परत येत असे त्याच्या बाजूने निर्णय केला जात असे.

६६. मसीह हे. हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांचे उपनांव आहे. आणि ईसा बिन मरयम हा खुलासा हजरत ईसा हे बापाशिवाय जन्मास आले होते या वस्तु:स्थितीचा पुरावा आहे. आणि म्हणून त्यांच्या नांवासमवेत त्यांच्या आईचे नांव लावले गेले. या उलट सर्वमान्य पद्धत ही आहे की संततीच्या नावासमवेत बापाचे नांव लावले जाते. पवित्र कुरआन मध्ये ज्या ज्या पैगंबरांची नावे आली आहेत त्यांच्या नांवासमवेत त्यांच्या वडिलांची नांवे निवेदन केली गेलेली नाहीत. परंतु हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या नांवासमवेत मात्र मरयमचा पुत्र असा खुलासा केला गेलेला आहे. यावरून हजरत ईसा (अलैहिस्सलाम) हे बापाशिवाय जन्मास आले ही गोष्ट जशी होते त्याच प्रमाणे ते ईश्वराचे पुत्र नाहीत ही गोष्ट पण स्पष्ट होते. नांवाचा क्रम ही गोष्ट स्पष्ट करतो की ते हज़रत मरयमचे पुत्र होते. ईश्वराचे नव्हे.

६७. हज़रत मसीह (अलैहिस्सलाम) जरी बापाशिवाय जन्मास आले तरी त्यांच्या इज्जतीवर कसलाही कलंक येणार नाही. ते या जगामध्ये व आखिरतमध्ये प्रतिष्ठित व सन्माननीय असतील.

४६. तो पाळण्यात असताना देखील लोकांशी बोलेल [६८] व उतार वयात सुद्धा. [६९] आणि सदाचारी लोकांपैकी असेल.[७०]

وَيُكَلِّمُ النَّاسَ فِي الْمَهْدِ وَكَهْلًا وَّمِنَ الصّٰلِحِيْنَ ﴿٤٦﴾

४७. म्हणाली हे माझ्या पालनकर्त्या ! मला पुत्र कसा होईल जेव्हा मला कोणा पुरुषाने हात देखील लावलेला नाही ? फर्माविले. अशाच प्रकारे अल्लाह जे इच्छितो ते निर्माण करतो. तो जेव्हां एखादे काम करण्याचा निर्णय घेतो तेव्हा फर्मावितो की हो आणि ते होऊन जाते.

قَالَتْ رَبِّ اَنّٰى يَكُوْنُ لِيْ وَلَدٌ وَّلَمْ يَمْسَسْنِيْ بَشَرٌ ۭ قَالَ
كَذٰلِكِ اللّٰهُ يَخْلُقُ مَا يَشَاۗءُ ۭ اِذَا قَضٰٓى اَمْرًا فَاِنَّمَا يَقُوْلُ
لَهٗ كُنْ فَيَكُوْنُ ﴿٤٧﴾

४८. आणि अल्लाह त्याला ग्रंथाची व बुद्धीमत्तेची [७१] शिकवण देईल आणि त्याला 'तौरात' व 'इंजील' शिकवील.

وَيُعَلِّمُهُ الْكِتٰبَ وَالْحِكْمَةَ وَالتَّوْرٰىةَ وَالْاِنْجِيْلَ ﴿٤٨﴾

४९. आणि त्याला बनी इसराईल कडे पैगंबर बनवून पाठविल [७२] (आणि तो त्यांच्याकडे जाऊन सांगेल) की मी तुमच्याकडे तुमच्या पालनकर्त्याकडून निशाणी घेऊन आलो आहे. मी तुमच्यासमोर मातीपासून पक्षासारखा आकार बनवितो व त्यामध्ये फुंक मारतो तेव्हा तो अल्लाहच्या आज्ञेने खरोखर पक्षी बनतो. मी अल्लाहच्या आज्ञेने जन्मजात आंधळ्या व कोड असलेल्याला बरे करतो आणि मृतांला जिवंत करतो. आणि मी तुम्हाला तुम्ही जे काही खाता व तुम्ही जे काही आपल्या घरामध्ये सांठा करुन ठेविता ते सांगतो जर तुम्ही ईमान बाळगित असाल तर तुमच्यासाठी यामध्ये मोठी निशाणी आहे.[७३]

وَرَسُوْلًا اِلٰى بَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ ڏ اَنِّىْ قَدْ جِئْتُكُمْ بِاٰيَةٍ مِّنْ رَّبِّكُمْ ۙ
اَنِّىْٓ اَخْلُقُ لَكُمْ مِّنَ الطِّيْنِ كَهَيْـــَٔةِ الطَّيْرِ فَاَنْفُخُ فِيْهِ
فَيَكُوْنُ طَيْرًۢا بِاِذْنِ اللّٰهِ ۚ وَاُبْرِئُ الْاَكْمَهَ وَالْاَبْرَصَ
وَاُحْىِ الْمَوْتٰى بِاِذْنِ اللّٰهِ ۚ وَاُنَبِّئُكُمْ بِمَا تَاْكُلُوْنَ
وَمَا تَدَّخِرُوْنَ ۙ فِيْ بُيُوْتِكُمْ ۭ اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيَةً لَّكُمْ
اِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِيْنَ ﴿٤٩﴾

५०. आणि तौरातचा जो भाग माझ्यासमोर अस्तित्वात आहे त्याचे समर्थन करणारा बनून मी आलो आहे. [७४] आणि काही गोष्टी तुमच्यासाठी वैध (हलाल) ठरवित आहे ज्या तुमच्यासाठी निषिद्ध (हराम) केल्या गेल्या होत्या.[७५] आणि मी तुमच्याकडे तुमच्या पालनकर्त्याकडून निशाणी घेऊन आलो आहे. म्हणून अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.

وَمُصَدِّقًا لِّمَا بَيْنَ يَدَيَّ مِنَ التَّوْرٰىةِ وَلِاُحِلَّ لَكُمْ بَعْضَ
الَّذِيْ حُرِّمَ عَلَيْكُمْ وَجِئْتُكُمْ بِاٰيَةٍ مِّنْ رَّبِّكُمْ ۣ فَاتَّقُوا
اللّٰهَ وَاَطِيْعُوْنِ ﴿٥٠﴾

६८. हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांचे पाळण्यामधील बोलणे हा सर्वश्रेष्ठ अल्लाहकडील एका श्रेष्ठ निशाणीचा आविष्कार होता. हज़रत मरयम यांचे पावित्र्य व हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांचे प्रतिष्ठितत्व व त्यांना असाधारण गुणविशेष लाभलेले आहेत हे यावरून स्पष्ट व्हावे हा हेतु होता.

६९. उतारवयात संभाषण करण्याचा उल्लेख यासाठी करण्यात आला की हज़रत मरयम यांना ही खुषख़बर होवो की मुलगा दिर्घायुषी आहे.

७०. म्हणजे ही सर्व श्रेष्ठता असतांना देखील तो ईश्वर होणार नाही उलट तो ईश्वराच्या सदाचारी दासापैकी असेल.

७१. ग्रंथाने विशेषकरून धर्मशास्त्र व (हिकमत) बुद्धिमतेने धर्माचे सार अभिप्रेत आहे. धर्मशास्त्र हे तौरातचे वैशिष्ट्य आहे आणि बुद्धिमत्ता हे इंजीलचे. हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) हे हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्या धर्मशास्त्राचे अनुयायी होते. ते नवीन धर्मशास्त्र घेऊन आलेले नव्हते. तथापि त्यांनी धर्माच्या साराला मोठ्या परिणामकारकरित्या स्पष्ट केले. बनी इसराईल लोकांनी त्याला रुढीरिवाजाचे कडबोळे बनवून ठेविले होते.

७२. बनी इसराईलासाठी पैगंबर बनवून पाठविण्यात अर्थ हा नव्हे की त्यांचे आवाहन गैर बनी इसराईलासाठी नव्हते. कारण पैगंबरांचे आवाहन वंश, राष्ट्र व जात वगैरेच्या आधारावर माणसा माणसामध्ये भेदभाव करीत नाही. तरीपण त्यावेळेच्या विशिष्ट परिस्थितीमुळे त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. आणि विशेष करून बनी इसराईल मधील वाढत्या बिघाडामुळे त्यांच्या विरुद्धचा युक्तिवाद ही पुरा करावा हा त्यामागील उद्देश होता आणि म्हणून त्यांचे आवाहन मुख्यत: बनी इसराईलना उद्देशून होते.

७३. हे चमत्कार होते. जे अल्लाहने हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांना ते पैगंबर आहेत याच्या निशाणीदाखल प्रदान केले होते. चमत्कार ही एक असाधारण व अस्वाभाविक अशी घटना असते, जी अल्लाह आपल्या पैगंबरांच्या हातून घडवून आणीत असतो. उद्देश हा असतो, की असाधारण अशा घटनेने लोक आश्चर्यचकीत व्हावेत आणि तिला त्यांनी पैगंबर हे अल्लाहकडून नियुक्त केले गेल्याची खूण समजावी. पैगंबर स्वत:हून चमत्कार करुन दाखवीत नाहीत तर अल्लाहच्या परवानगीने व त्याच्या सामर्थ्यने चमत्कार घडवून आणले जातात. व ते अल्लाहकडून असल्याचे स्पष्ट केले जाते.

७४. हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) हे नवा धर्म घेऊन आले नव्हते, तर ते इस्लामच घेऊन आले होते. त्यांनी तौरातला रद्द केले नाही. उलट त्यांनी त्याचे समर्थन केले व त्याला कायम केले. इंजीलमध्ये त्यांचे निवेदन आहे की,

''नियमशास्त्र किंवा संदेष्ट्यांचे ग्रंथ रद्द करावयास मी अलो आहे असे समजू नका. मी रद्द करावयास नव्हे तर पूर्ण करावयास आलो आहे.''(मत्तय ५: १७)

७५. अभिप्रेत त्या गोष्टींना शास्त्रसंमत ठरविणे आहे, ज्यांना यहुदी पंडितांनी धर्मामध्ये ढवळाढवळ करून निषिद्ध ठरविले होते व जे बनी इसराईलच्या मानेतील जोखड बनले होते. तौरातच्या मूळ धर्मशास्त्रामध्ये यहुदी पंडितांनी जी वाढ केली होती, त्यावर हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांनी नि:संकोचपणे कात्री चालविली आणि याबाबतीत यहुदी पंडितांनी त्यांच्यावर जेव्हा अधार्मिकतेचा आरोप केला तेव्हा त्यांनी त्याची बिलकूल पर्वा केली नाही. उलट त्यांच्या दांभिकतेचा पडदा फाडला.

**५१.** नि:संशय अल्लाह माझा हि पालनकर्ता आहे आणि तुमचाही पालनकर्ता आहे. यासाठी त्याचीच इबादत (भक्ति व आज्ञापालन) करा. हाच सरळ मार्ग आहे. [७६]

إِنَّ اللَّهَ رَبِّي وَرَبُّكُمْ فَاعْبُدُوهُ ۗ هَٰذَا صِرَاطٌ مُسْتَقِيمٌ ﴿٥١﴾

**५२.** नंतर ईसा नी जेव्हा त्यांच्याकडून इन्कार (कुफ्र) होत आहे हे जाणले तेव्हा ते म्हणाले. कोण आहे अल्लाहच्या मार्गात माझा सहाय्यक? शिष्यांनी (हवारी) [७७] उत्तर दिले. आम्ही आहोत अल्लाहचे सहायक.[७८] आम्ही अल्लाहवर ईमान आणले आणि तुम्ही साक्ष असा की आम्ही मुस्लिम आहोत.[७९]

فَلَمَّا أَحَسَّ عِيسَىٰ مِنْهُمُ الْكُفْرَ قَالَ مَنْ أَنْصَارِي إِلَى اللَّهِ ۖ
قَالَ الْحَوَارِيُّونَ نَحْنُ أَنْصَارُ اللَّهِ آمَنَّا بِاللَّهِ وَاشْهَدْ
بِأَنَّا مُسْلِمُونَ ﴿٥٢﴾

**५३.** हे आमच्या पालनकर्त्या ! जे मार्गदर्शन तू उतरविले आहेस, त्यावर आम्ही ईमान आणले आणि पैगंबराचे अनुयायीत्व पत्करले. आमची नांवे साक्ष देणाऱ्यांमध्ये लिहून घे.[८०]

رَبَّنَا آمَنَّا بِمَا أَنْزَلْتَ وَاتَّبَعْنَا الرَّسُولَ فَاكْتُبْنَا
مَعَ الشَّاهِدِينَ ﴿٥٣﴾

**५४.** आणि त्यांनी (बनी इसराईलनी ईसा विरुद्ध) कट केला. तेव्हा अल्लाहने त्याची तोड केली. आणि अल्लाह उत्तम तोड करणारा आहे. [८१]

وَمَكَرُوا وَمَكَرَ اللَّهُ ۖ وَاللَّهُ خَيْرُ الْمَاكِرِينَ ﴿٥٤﴾

**५५.** जेव्हा अल्लाहने सांगितले. हे ईसा ! मी तुला ताब्यात घेणार (तुझी वेळ समाप्त करणार) आहे आणि माझ्याकडे उठविणार आहे. [८२] आणि ज्या लोकांनी इन्कार (कुफ्र) केला आहे त्यांच्यापासून मी तुला शुद्ध करणार आहे; [८३] तसेच तुझे अनुकरण करणाऱ्यांना तुझा इन्कार करणाऱ्यांवर कियामतीपर्यंत वर्चस्व प्राप्त करुन देणार आहे.[८४] मग तुम्हा सर्वांना माझ्याकडे परत फिरावयाचे आहे. त्यावेळी मी तुमच्या दरम्यान त्या गोष्टींचा निर्णय करीन ज्यांच्यासंबंधी तुम्ही विवाद करीत आहात.

إِذْ قَالَ اللَّهُ يَا عِيسَىٰ إِنِّي مُتَوَفِّيكَ وَرَافِعُكَ إِلَيَّ
وَمُطَهِّرُكَ مِنَ الَّذِينَ كَفَرُوا وَجَاعِلُ الَّذِينَ اتَّبَعُوكَ
فَوْقَ الَّذِينَ كَفَرُوا إِلَىٰ يَوْمِ الْقِيَامَةِ ۖ ثُمَّ إِلَيَّ مَرْجِعُكُمْ
فَأَحْكُمُ بَيْنَكُمْ فِيمَا كُنْتُمْ فِيهِ تَخْتَلِفُونَ ﴿٥٥﴾

**५६.** ज्या लोकांनी इन्कार (कुफ्र) केला त्यांना या जगात व आखिरत मध्ये कडक शिक्षा देईन. आणि त्यांचा कोणी सहायक असणार नाही.

فَأَمَّا الَّذِينَ كَفَرُوا فَأُعَذِّبُهُمْ عَذَابًا شَدِيدًا فِي
الدُّنْيَا وَالْآخِرَةِ وَمَا لَهُمْ مِنْ نَاصِرِينَ ﴿٥٦﴾

७६. प्रचलित इंजिलमध्ये हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्याशी ही गोष्ट जोडली गेली आहे की, ते ईश्वराला 'माझा बाप आणि तुमचा बाप म्हणत असत. परंतु पवित्र क़ुरआन याचे खंडन करीत आहे. आणि सांगत आहे की, त्यांनी अल्लाहला 'माझा पालनकर्ता आणि तुमचा पालनकर्ता (रब) असे म्हटले होते आणि स्पष्ट शब्दात फक्त अल्लाहची इबादत करण्याची आज्ञा दिली होती. ईश्वराप्रत पोहोचण्याचा सरळ मार्ग म्हणजे अल्लाहचे अज्ञापालन हाच होय, असे सांगितले होते. यावरून स्पष्ट आहे की प्रचलित इंजिलमध्ये ईश्वरासाठी बाप व मसिहसाठी मुलगा हे जे शब्द आढळून येतात. ते मूळ इंजिलमधील शब्दांचे  चुकीचे भाषांतर आहे व स्पष्ट असा फेरफार आहे. हे सर्व हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या ईशत्वा संबंधीची श्रद्धा शाबित करण्यासाठी केले गेले आहे. असे फेरफार असताना देखील प्रचलित इंजिलवरून ही गोष्ट सिद्ध होते की, हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) अल्लाहलाच आपला व सर्वांचा ईश्वर मानीत होते. उदाहरणार्थ, बायबलमध्ये आहे की.

'माझा देव व तुमचा देव याच्याकडे मी वर जातो.'

(योहान २०- १७)

''परमेश्वर तुझा देव. ह्याला नमन कर व केवळ त्याचीच उपासना कर.''(मत्तय ४-१०)

७७. हवारीने अभिप्रेत हज़रत  ईसा (अलैहिस्सलाम) यांचे प्रामाणिक साथी व मदतनीस आहेत प्रचलित इंजिलमध्ये त्यांच्यासाठी शिष्य हा शब्द वापरला गेला आहे. कारण त्यांना रात्र दिवस हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांचे प्रशिक्षण लाभले होते.

७८. अल्लाहच्या सहाय्याने अभिप्रेत ईश्वरी धर्माचे व पैगंबरांचे समर्थन व सहाय्य.

७९. येथे ही गोष्ट विचार करण्यासाठी आहे की हज़रत ईसा यांच्या हवारीनी आपल्याला मुस्लिम म्हटले. ईसाई म्हटले नाही. कारण त्यांचा धर्मही इस्लामच होता. ख्रिश्चन नव्हता.

८०. साक्ष या गोष्टीची की, आम्ही हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांना पैगंबर मानले आणि इस्लामचाच धर्म म्हणून अंगिकार केला.

८१. त्या काळी देशावर रोमन  लोकांची सत्ता होती. यहुदी पंडितांनी हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्यावर हा आरोप लावला की ते रोमन बादशहाला कर देण्यास प्रतिबंध करतात आणि स्वत: ईसराईल लोकांचा बादशाह बनू इच्छितात. अशा प्रकारे त्यावेळच्या राज्यसत्तेला त्यांच्याविरुद्ध भडकाविण्याचा प्रयत्न केला गेला आणि त्यांच्या अटकेची पार्श्वभूमी तयार केली गेली. त्याच्याविरोधात सर्वश्रेष्ठ अल्लाहने जी गुप्त उपाययोजना केली याचा उल्लेख पुढील आयतीत येत आहे.

८२. मुळामध्ये  مُتَوَفِّيْكَ 'मुतवफ्फीका' हा शब्द वापरला गेला आहे. हा शब्द تَوَفّٰى 'तवफ्फा' पासून बनलेला आहे. 'तवफ्फा' चा मूळ अर्थ पूरेपुर घेणे असा आहे. मरण या अर्थी हा शब्द वापरला जातो परंतु त्याचा अपरिहार्य अर्थ मरण असा होत नाही. पवित्र क़ुरआन मध्ये हा शब्द ज्याप्रकारे वापरण्यात आला आहे त्यावरुन त्याच्या अर्थाचे स्पष्टीकरण होते. उदाहरण

وَهُوَ الَّذِىْ يَتَوَفّٰكُمْ بِالَّيْلِ وَيَعْلَمُ مَا جَرَحْتُمْ بِالنَّهَارِ - (الانعام-٦٠)

''तोच आहे, जो तुम्हाला रात्री आपल्या ताब्यात घेतो आणि दिवसभरात तुम्ही जी कमाई केली ती तो जाणतो' (सूरे अनआम-६०)

या आयतीमध्ये झोपेच्या अवस्थेसाठी 'तवफ्फा' हा शब्द वापरला गेला आहे.

حَتّٰى اِذَا جَآءَ اَحَدَكُمُ الْمَوْتُ تَوَفَّتْهُ رُسُلُنَا ط (الانعام-٦١)

''येथ पावेतो की जेव्हा तुमच्यापैकी कोणास मृत्यू येतो तेव्हा आमचे फिरिशते त्याला ताब्यात घेतात''(सूरे अनआम ६१)

या आयतीमध्ये 'तवफ्फा' फिरिशते करतात असे म्हटले गेले आहे. येथे मृत्यू अभिप्रेत नाही. कारण मृत्यू घडविणे हे अल्लाहचे कार्य आहे आणि ताब्यात घेणे हे फिरिश्त्यांचे काम आहे.

فَاَمْسِكُوْهُنَّ فِى الْبُيُوْتِ حَتّٰى يَتَوَفّٰهُنَّ الْمَوْتُ - (النساء-١٥)

''त्यांना घरामध्ये अडकवून ठेवा येथपर्यंत की त्यांना मृत्यू येईल'' (सूरे अन-निसा १५)

या आयतीमध्ये ''तवफ्फा'चा कर्ता मृत्यू आहे. स्पष्ट आहे की कर्ता व क्रियापद दोन्ही सारखे नसतात. आणि म्हणून ''तवफ्फा'' हा शब्द मृत्यू या अर्थी वापरला गेला नाही तर देहासह ताब्यात घेण्याअर्थी वापरला गेला आहे. आणि आयतीची पार्श्वभूमि संबंधित आयती व पैगंबरांची वचने व सर्व अनुमाने या गोष्टीचे समर्थन करतात की हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने जीवंत आकाशावर उचलून घेतले आणि शत्रूंच्या कटापासून त्यांना सुरक्षित ठेविले.

८३. म्हणजे इन्कार करणाऱ्यांच्या घाणेरड्या वातावरणातून काढून फिरिशत्यांच्या अध्यात्मिक वातावरणात दाखल करीन.

८४. आणि हे एक ऐतिहासिक सत्य आहे की एका समुदायाच्या रुपाने ईसाई लोक यहुदी लोकांच्यावर नेहमी प्रभावी राहिले.

५७. आणि ज्या लोकांनी ईमान आणले व चांगले आचरण केले त्यांना तो त्याचा पुरा पुरा मोबदला देईल.अल्लाह अत्याचारी लोकांना कदापिही पसंत करीत नाही.

وَأَمَّا الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ فَيُوَفِّيهِمْ
أُجُورَهُمْ ۗ وَاللَّهُ لَا يُحِبُّ الظَّالِمِينَ ﴿٥٧﴾

५८. ही (आमची) महावाक्ये आणि ज्ञानाने समृद्ध असा उपदेश आहे, जो आम्ही तुम्हाला ऐकवित आहोत.[८५]

ذَٰلِكَ نَتْلُوهُ عَلَيْكَ مِنَ الْآيَاتِ وَالذِّكْرِ الْحَكِيمِ ﴿٥٨﴾

५९. ईसाचे उदाहरण अल्लाहजवळ आदम सारखे आहे की त्याला मातीपासून बनविले आणि फर्माविले. हो आणि तो झाला. [८६]

إِنَّ مَثَلَ عِيسَىٰ عِندَ اللَّهِ كَمَثَلِ آدَمَ ۖ خَلَقَهُ
مِن تُرَابٍ ثُمَّ قَالَ لَهُ كُن فَيَكُونُ ﴿٥٩﴾

६०. हेच सत्य आहे तुमच्या पालनकर्त्याकडून म्हणून तुम्ही संशय करणाऱ्यापैकी होऊ नका.

الْحَقُّ مِن رَّبِّكَ فَلَا تَكُن مِّنَ الْمُمْتَرِينَ ﴿٦٠﴾

६१. हे ज्ञान आल्यानंतर जे कोणी या बाबतीत तुमच्याशी वाद करतील तर त्यांना सांगा.या, आम्ही आमच्या मुलांना बोलावितो, तुम्ही तुमच्या मुलांना बोलवा.आम्ही आमच्या स्त्रीयांना बोलवितो, तुम्ही तुमच्या स्त्रीयांना बोलवा. आम्ही स्वत:देखील येतो, तुम्ही स्वत:देखील या. नंतर आम्ही सर्वजण मिळून प्रार्थना करु की अल्लाहचा शाप असो खोटे बोलणाऱ्यावर. [८७]

فَمَنْ حَاجَّكَ فِيهِ مِن بَعْدِ مَا جَاءَكَ مِنَ الْعِلْمِ فَقُلْ
تَعَالَوْا نَدْعُ أَبْنَاءَنَا وَأَبْنَاءَكُمْ
وَنِسَاءَنَا وَنِسَاءَكُمْ وَأَنفُسَنَا وَأَنفُسَكُمْ ثُمَّ نَبْتَهِلْ
فَنَجْعَل لَّعْنَتَ اللَّهِ عَلَى الْكَاذِبِينَ ﴿٦١﴾

६२. नि:संशय या सत्य घटना आहेत. आणि वस्तुत: अल्लाह शिवाय कोणी उपास्य नाही. आणि अल्लाहच प्रभावशाली व बुद्धिमान आहे.

إِنَّ هَٰذَا لَهُوَ الْقَصَصُ الْحَقُّ ۚ وَمَا مِنْ إِلَٰهٍ إِلَّا اللَّهُ ۚ
وَإِنَّ اللَّهَ لَهُوَ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٦٢﴾

६३. नंतर जर हे लोक विन्मुख होतील तर अल्लाह बिघाड करणाऱ्यांना चांगल्या प्रकारे जाणतो.[८८]

فَإِن تَوَلَّوْا فَإِنَّ اللَّهَ عَلِيمٌ بِالْمُفْسِدِينَ ﴿٦٣﴾

६४. म्हणा. हे ग्रंथधारकानो ! एका अशा गोष्टीकडे या जी आमच्या व तुमच्या मध्ये समान आहे. [८९] ती ही की आम्ही अल्लाहशिवाय कोणाचीही 'इबादत' (भक्ति) करू नये. ना त्याच्याबरोबर कोणास भागीदार ठरवावे ना आमच्या पैकी कोणी अल्लाहशिवाय दुसऱ्यास आपला रब (स्वामी) बनवावे.[९०] जर ते यापासून परावृत होतील तर त्यांना सांगा. साक्षी असा आम्ही तर मुस्लिम (आज्ञाधारक) आहोत.

قُلْ يَا أَهْلَ الْكِتَابِ تَعَالَوْا إِلَىٰ كَلِمَةٍ سَوَاءٍ بَيْنَنَا وَبَيْنَكُمْ
أَلَّا نَعْبُدَ إِلَّا اللَّهَ وَلَا نُشْرِكَ بِهِ شَيْئًا وَلَا يَتَّخِذَ بَعْضُنَا
بَعْضًا أَرْبَابًا مِّن دُونِ اللَّهِ ۚ فَإِن تَوَلَّوْا فَقُولُوا
اشْهَدُوا بِأَنَّا مُسْلِمُونَ ﴿٦٤﴾

८५. म्हणजे हे कथानिवेदन नव्हे. आणि ईसाई लोकांच्या प्रमाणे केलेली रंगसफेती नव्हे. ही तर वस्तु:स्थिती आहे. जिला आयतींच्या स्वरुपात निवेदन केले गेले आहे. या गोष्टी उपदेश व बुद्धिमत्तेने परिपूर्ण आहेत.

८६. ही एक सर्वमान्य वस्तुस्थिती आहे की हज़रत आदम (अलैहिस्सलाम) यांचा जन्म आईबापाशिवाय झाला होता. परंतु असे असता देखील ते ईश्वर नाहीत आणि त्यांच्या ईशत्वाचे कोणी समर्थन पण करीत नाही तर मग हज़रत ईसा (अलैहिस्सलाम) हे बापाशिवाय जन्मास आले या आधारावर ते ईश्वर कसे होऊ शकतात?

८७. या सर्व युक्तीवादानंतर अल्लाहकडून ईसाई लोकांना आव्हान दिले गेले की जर या खुलाशा नंतर देखील ते हज़रत मसीह च्या बाबतीत आपल्या मताला योग्य व हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मताला चुकीचे समजतील तर त्यांनी ईश्वरी कोपाबद्दल प्रार्थना करण्यास तयार व्हावे. परंतु त्यांनी हे आव्हान स्वीकारण्याचे धाडस केले नाही.

निवेदनांच्या वरुन कळून येते की नझरान (यमन) च्या ईसाई लोकांचे एक शिष्टमंडळ पैगंबरांच्याकडे आलेले होते. त्यावेळी पैगंबरांनी त्याला 'जो खोट्या मार्गावर आहे त्याच्यावर परमेश्वराचा कोप होवो' अशी प्रार्थना करण्याचे आवाहन केले होते. परंतु त्या शिष्टमंडळाने त्याचा स्वीकार करण्याचे धाडस दाखविले नाही. आणि हे न करता, फक्त समझोता करुन ते परत गेले. यावरुन स्पष्ट झाले की त्यांना त्यांच्या मताबद्दल खात्री नव्हती. या उलट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या मुलाबाळांहस अशाप्रकारे ईश्वराची प्रार्थना करण्यास तयार झालेले होते. यावरुन त्यांना आपल्या मताच्या प्रामाणिकपणाबद्दल व सत्येबद्दल पूर्ण खात्री होती हे स्पष्ट होते.

८८. हे समयोचित निवेदन याचा पुरावा आहे की, जे लोक अल्लाहला एकमेव ईश्वर मानण्यास नकार देतात आणि जे अनेकेश्वरवादावर कायम आहेत ते उपद्रवी आहेत. कारण अनेकेश्वरवाद न्याय व नीतीच्या व्यवस्थेला नष्ट करतो.

८९. म्हणजे अेकेश्वरवाद हा ग्रंथधारक व मुसलमान यांच्या दरम्यान समान असा मुद्दा आहे. परंतु ग्रंथधारकांनी अल्लाहच्या आदेशांचे चुकीचे स्पष्टीकरण करुन अनेकेश्वरवाद व अनिष्ट प्रथा यांचा आपल्या धर्मामध्ये समावेश केला होता. परिणाम हा झाला की एका ईश्वराबरोबर तीन ईश्वरांची तरतूद केली गेली. असे फेरफार केले गेले असता देखील प्रचलित तौरात व इंजील मध्ये मूलत: एकेश्वरवादाचीच शिकवण आढळून येते. उदा तौरात मध्ये आहे :-

''माझ्या खेरीज तुला वेगळे देव नसावेत. आपल्यासाठी कोरीव मूर्ति करु नको. वर आकाशांतील, खाली पृथ्वीवरील व पृथ्वी खालच्या जलातील कशाचीही प्रतिमा करु नको. त्यांच्या पाया पडू नको किंवा त्यांची सेवा करु नको. कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे......'' (अनुवाद ५: ७ ते ९ )

आणि इंजील मध्ये आहे की,''परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर व त्याचीच सेवा कर'' (लूक ४:८)

''येशूने उत्तर दिले, पहिली ही की, 'हे इस्त्राअला, एक. आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे.'' (मार्क १२: २९)

९०. अल्लाहशिवाय कोणा दुसऱ्यास रब (स्वामी) बनविण्याचा अर्थ फक्त एखाद्यास रब (स्वामी) च्या नांवाने संबोधणे इतकाच नव्हे. धर्मशास्त्राच्या (शरीअतच्या) आधाराशिवाय एखाद्याने ठरविलेल्या हलालला हलाल व त्याने ठरविलेल्या हरामाला हराम मान्य करणे म्हणजे त्याला रब (स्वामी) समजणे होय. कारण हलाल-हराम ठरविण्याचा अधिकार फक्त अल्लाहला आहे. आणि त्याच्या या अधिकारात कोणास सामील करणे याचा अर्थ उघडपणे अनेकेश्वरवादी बनणे असा होतो. अनेकेश्वरवाद (शिर्क) मिटविण्यास व लोकांना त्यांच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी इस्लामची जीवन-पद्धती अवंतरली आहे धर्माला मानणाऱ्या लोकांची ही मार्ग भ्रष्टता झालेली आहे की ते आपल्या उलेमा, धर्मशास्त्रज्ञ, संन्यासी वैरागी, सुफी, दरवेश, पंडित जोगी यांना ईश्वरी धर्मशास्त्रमध्ये हस्तक्षेप करण्याचा व हलाल हराम (वैध अवैध) ठरविण्याचा अधिकार देत आलेले आहेत. इस्लाम या आचरणाला अनेकेश्वरवाद व दुसऱ्यास रब (शिर्क) (स्वामी) मानण्यासमान ठरवितो. काही ग्रंथधारकांच्या या आक्षेपावर की आम्ही तर आमच्या सन्यासी वैरागी लोकांना रब (स्वामी) मानीत नाही हजरत पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) फर्माविले की काय तुम्ही त्यांनी ज्या गोष्टींना हराम व त्यानी ज्या गोष्टीना हलाल ठरविले आहे त्या गोष्टींना हलाल मानीत नाही काय ? त्यांनी त्यावर आपण असे करतो हे मान्य केले, हज़रत पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) फर्माविले याचाच अर्थ त्यांना रब (स्वामी) मानणे असा होतो. यावरून हे स्पष्ट झाले की हराम हलाल (वैध अवैध) ठरविण्याचा एखाद्याचा अधिकार मान्य करणे म्हणजे त्याला रब (स्वामी) मानणे होय. मग माणूस रूढअर्थी त्याची पूजा अर्चा करीत नसेना का.

६५. हे ग्रंथधारकानो ! तुम्ही इब्राहीमच्या संबंधी का वाद घालता? यद्यापि तौरात व इंजील ही तर त्यांच्यानंतर उतरविली गेली. काय तुम्ही इतकी गोष्ट ही समजत नाही?[११]

يَا أَهْلَ الْكِتَابِ لِمَ تُحَاجُّونَ فِي إِبْرَاهِيمَ وَمَا أُنْزِلَتِ التَّوْرَاةُ
وَالْإِنْجِيلُ إِلَّا مِنْ بَعْدِهِ ۚ أَفَلَا تَعْقِلُونَ ٦٥

६६. पाहा ज्या गोष्टींचे तुम्हाला ज्ञान होते त्याबद्दल तुम्ही चर्चा केली आहेच.आता तुम्ही अशा गोष्टींबद्दल का चर्चा करीत आहात ज्यांचे तुम्हाला ज्ञान नाही. अल्लाह जाणतो. तुम्ही जाणत नाही.

هَا أَنْتُمْ هَٰؤُلَاءِ حَاجَجْتُمْ فِيمَا لَكُمْ بِهِ
عِلْمٌ فَلِمَ تُحَاجُّونَ فِيمَا لَيْسَ لَكُمْ بِهِ عِلْمٌ ۚ
وَاللَّهُ يَعْلَمُ وَأَنْتُمْ لَا تَعْلَمُونَ ٦٦

६७. इब्राहीम हे ना यहुदी होते ना ख्रिचन. ते तर सरळमार्गी मुस्लिम होते. आणि ते कधीही मुश्रिक (अनेकेश्ववादी) लोकांपैकी नव्हते.

مَا كَانَ إِبْرَاهِيمُ يَهُودِيًّا وَلَا نَصْرَانِيًّا وَلَٰكِنْ كَانَ
حَنِيفًا مُسْلِمًا وَمَا كَانَ مِنَ الْمُشْرِكِينَ ٦٧

६८. इब्राहीम यांच्या बरोबर संबंध जोडण्यास सर्वात अधिक हक्कदार ते लोक आहेत ज्यांनी त्यांचे अनुकरण केले आणि हे पैगंबर व ईमानधारक आहेत.आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह ईमान आणलेल्यांचा मित्र आहे.

إِنَّ أَوْلَى النَّاسِ بِإِبْرَاهِيمَ لَلَّذِينَ اتَّبَعُوهُ وَهَٰذَا
النَّبِيُّ وَالَّذِينَ آمَنُوا ۗ وَاللَّهُ وَلِيُّ الْمُؤْمِنِينَ ٦٨

६९. ग्रंथधारकांपैकी एक गट हे इच्छितो की तुम्हाला मार्गभ्रष्ट करण्यात यशस्वी व्हावे. यद्दपि हे लोक स्वत:लाच मार्गभ्रष्ट करीत आहेत. परंतु त्यांना याची जाणीव नाही.

وَدَّتْ طَائِفَةٌ مِنْ أَهْلِ الْكِتَابِ لَوْ يُضِلُّونَكُمْ
وَمَا يُضِلُّونَ إِلَّا أَنْفُسَهُمْ وَمَا يَشْعُرُونَ ٦٩

७०. हे ग्रंथधारकांनो ! अल्लाहच्या आयतींचा कां इन्कार करीत आहात, जेव्हा तुम्ही स्वत:त्यावर साक्ष आहात ?

يَا أَهْلَ الْكِتَابِ لِمَ تَكْفُرُونَ بِآيَاتِ اللَّهِ وَأَنْتُمْ
تَشْهَدُونَ ٧٠

७१. हे ग्रंथधारकांनो ! सत्याची असत्याबरोबर का भेसळ करीत आहात ? आणि जाणून बुजून सत्याला का लपवित आहात ?

يَا أَهْلَ الْكِتَابِ لِمَ تَلْبِسُونَ الْحَقَّ بِالْبَاطِلِ وَتَكْتُمُونَ الْحَقَّ
وَأَنْتُمْ تَعْلَمُونَ ٧١

७२. ग्रंथधारकांपैकी एक गट म्हणतो की ईमानधारकांवर जे काही उतरले आहे त्यावर सकाळी ईमान आणा व संध्याकाळी त्याचा इन्कार करा म्हणजे ते सुद्धा पालटतील.[१२]

وَقَالَتْ طَائِفَةٌ مِنْ أَهْلِ الْكِتَابِ آمِنُوا بِالَّذِي أُنْزِلَ عَلَى الَّذِينَ
آمَنُوا وَجْهَ النَّهَارِ وَاكْفُرُوا آخِرَهُ لَعَلَّهُمْ يَرْجِعُونَ ٧٢

९१. हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) हे बनी इसराईल व बनी इस्माईल दोहोंचे पितामह आहेत. यहुदी, ईसाई व मक्केचे अनेकेश्वरवादी हे सर्व त्यांना आपले धार्मिक नेते मानीत असत आणि आपल्या धर्माचा संबंध त्यांच्याशीच जोडीत असत. त्यांचा दावा असा होता की मूळ इब्राहीमी धर्म हा आमचा धर्म आहे. आणि पवित्र क़ुरआन ज्या धर्माचे आवाहन करीत आहे तो नवा धर्म आहे. त्यांच्या या दाव्याचे व आक्षेपाचे खंडन करुन पवित्र क़ुरआन सांगत आहे की यहुदी धर्म व ईसाई धर्म हज़रत ईब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या शेकडो वर्षानंतरची गोष्ट आहे. तर मग हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) हे यहुदी अगर ईसाई कसे काय होऊ शकतात? स्पष्ट आहे की ही उघड उघड अज्ञानाची गोष्ट आहे. याच प्रकारे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांचा धर्म हा पण हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या कालानंतर शोधून काढलेला धर्म होता हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) हे कधीही अनेकेश्वरवादी नव्हते. ते तर सच्चे एकेश्वरवादी व मुस्लिम होते.

९२. यहुदी लोकांच्या एका गटाचा हा कट होता की इस्लाममध्ये दाखल व्हावे व त्यामधून बाहेर पडून त्याविरुद्ध प्रचार सुरु करावा. म्हणजे लोकांचा इस्लामवरील विश्वास उडेल.

७३. (आणि ते म्हणतात) आपल्या धर्माच्या लोकांशिवाय दुसऱ्या कोणाची गोष्ट मानुं नका- म्हणा. खरे मार्गदर्शन तर अल्लाहचे मार्गदर्शन आहे [९३] असे होऊ नये की जे तुम्हाला दिले गेले आहे तेच दुसऱ्या कोणाला मिळावे किंवा त्यांनी तुमच्या विरुद्ध तुमच्या पालनकर्त्या समोर युक्तिवाद करावा. [९४] त्यांना सांगा , देणगी तर अल्लाहच्या हाती आहे. तो ज्याला इच्छितो त्याला आपल्या देणगीने गौरवितो. [९५] अल्लाह उदार व सर्वज्ञ आहे. [९६]

وَلَا تُؤْمِنُوٓا إِلَّا لِمَن تَبِعَ دِينَكُمْ قُلْ إِنَّ الْهُدَىٰ هُدَى اللَّهِ
أَن يُؤْتَىٰٓ أَحَدٌ مِّثْلَ مَآ أُوتِيتُمْ أَوْ يُحَآجُّوكُمْ عِندَ
رَبِّكُمْ قُلْ إِنَّ الْفَضْلَ بِيَدِ اللَّهِ يُؤْتِيهِ مَن يَشَآءُ
وَاللَّهُ وَاسِعٌ عَلِيمٌ ﴿٧٣﴾

७४. तो ज्याला इच्छितो त्याला आपल्या कृपेसाठी निवडतो. आणि अल्लाह मोठा दाता आहे.

يَخْتَصُّ بِرَحْمَتِهِۦ مَن يَشَآءُ وَاللَّهُ ذُو الْفَضْلِ
الْعَظِيمِ ﴿٧٤﴾

७५. ग्रंथधारकांमध्ये असे लोकही आहेत की जरी तुम्ही त्यांच्या जवळ धनाचा एखादा ढीगही ठेव म्हणून ठेविला तरी ते तो तुम्हाला परत करतील. आणि त्यांच्यामध्ये असेही लोक आहेत की तुम्ही त्यांच्याजवळ एखादा दीनार (सोन्याचे नाणे) जरी ठेविला तरी तो सुद्धा तुम्ही जोपर्यंत हात धूवून त्यांच्या पाठीस लागत नाही तोपर्यंत परत करीत नाहीत. कारण ते म्हणतात की उम्मी [९७] (निरक्षर) लोकांच्या बाबतीत आमच्यावर कसलेही बंधन नाही.[९८] हे लोक जाणूनबुजून खोटे रचून त्याचा संबंध अल्लाहशी जोडतात.

وَمِنْ أَهْلِ الْكِتَٰبِ مَنْ إِن تَأْمَنْهُ بِقِنطَارٍ يُؤَدِّهِۦٓ إِلَيْكَ
وَمِنْهُم مَّنْ إِن تَأْمَنْهُ بِدِينَارٍ لَّا يُؤَدِّهِۦٓ إِلَيْكَ
إِلَّا مَا دُمْتَ عَلَيْهِ قَآئِمًا ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَالُوا لَيْسَ
عَلَيْنَا فِى الْأُمِّيِّۦنَ سَبِيلٌ وَيَقُولُونَ عَلَى اللَّهِ الْكَذِبَ
وَهُمْ يَعْلَمُونَ ﴿٧٥﴾

७६. तथापि ते लोक त्याच्या बरोबर केलेली प्रतिज्ञा पुरी करतील आणि अल्लाहचे भय बाळगून संयम पाळतील तर असे संयमी लोक अल्लाहला आवडतात.

بَلَىٰ مَنْ أَوْفَىٰ بِعَهْدِهِۦ وَاتَّقَىٰ فَإِنَّ اللَّهَ يُحِبُّ الْمُتَّقِينَ ﴿٧٦﴾

७७. जे लोक अल्लाहच्या प्रतीज्ञेला व आपल्या शपथांना थोड्या किंमतीस विकतात,[९९]अशा लोकांसाठी आखिरत मध्ये काही वाटा नाही. अल्लाह कियामतीच्या दिवशी न त्यांच्याबरोबर बोलेल, न त्यांच्या कडे पाहील [१००] आणि न त्यांना शुद्ध करील. त्यांच्यासाठी तर दुःखदायक शिक्षा आहे.

إِنَّ الَّذِينَ يَشْتَرُونَ بِعَهْدِ اللَّهِ وَأَيْمَٰنِهِمْ ثَمَنًا قَلِيلًا
أُولَٰٓئِكَ لَا خَلَٰقَ لَهُمْ فِى الْءَاخِرَةِ وَلَا يُكَلِّمُهُمُ اللَّهُ وَلَا يَنظُرُ
إِلَيْهِمْ يَوْمَ الْقِيَٰمَةِ وَلَا يُزَكِّيهِمْ وَلَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٧٧﴾

९३. हे उपवाक्य आहे ज्याद्वारे अल्लाहने यहुदी लोकांच्या म्हणण्याचे खंडन केलेले आहे. याचा अर्थ असा की यहुदी धार्मिकतेबद्दल बोलतात. परंतु ही मार्गदर्शनाची पद्धत नव्हे. मार्गदर्शनाची योग्य पद्धत ही की जेथे अल्लाहचे मार्गदर्शन उपलब्ध आहे त्याचा स्वीकार करण्यासाठी माणसाने तयार झाले पाहिजे. आणि सत्य हे आहे की अल्लाहचे मार्गदर्शन पवित्र क़ुरआनच्या स्वरुपात हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या वर अवतीर्ण झालेले आहे. त्याचा फक्त त्यावर आपल्या धर्माचा शिक्का नाही आणि आपल्या धर्मगटाच्या लोकांनी तत्याचा स्वीकार केलेला नाही म्हणून त्याचा स्वीकार न करणे म्हणजे स्वत:ला प्रकाशापासून वंचित करणे होय. असे करणाऱ्याच्या वाट्याला फक्त 'धार्मिकता'च येते. अल्लाहच्या मार्गदर्शनाचा त्याला लाभ होत नाही.

९४. हे यहुदी लोकांचे वचन आहे. ते आपसात म्हणत असत की या पैगंबराचे म्हणणे मानू नका. तसे केल्यास त्यांच्या पैगंबरीचा स्वीकार करावा लागेल आणि मग बनी इसराईल लोकांमध्येच पैगंबर होत आले आहेत हे त्यांचे वैशिष्ट्य नाहीसे होईल. आणि हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पैगंबरीला मान्य न करता त्यांच्या पैगंबरांच्या त्या गोष्टीचे ज्या त्यांच्या पैगंबरीचा पुरावा आहेत-समर्थन केल्यास क़ियामतीच्या दिवशी मुसलमानांना तुमच्याविरुद्ध युक्तिवाद करण्याची संधी लाभेल. (पाहा. सूरे बकरा. टीप. नं.९७)

९५. म्हणजे प्रेषितत्व ही अल्लाहची कृपा आहे. आणि तो ज्याला इच्छितो त्याला आपल्या कृपेने भूषवितो.

९६. म्हणजे अल्लाह न संकुचित वृत्तीचा आहे न त्याचे ज्ञान मर्यादित आहे. आणि म्हेणून त्याच्याकडून प्रेषितत्व बहाल करण्याबाबतीत चुकीचा निर्णय होत नाही.

९७. उम्मी ने अभिप्रेत बनी इस्माईल लोक आहेत.

९८. यहुदी लोकांचे हे वचन त्यांच्या मनोवृत्तीचे निदर्शक आहे. त्यांनी अपहार व व्याज घेणे वगैरेच्या मनाईला आपल्या जातीसाठी मर्यादित केले होते. इतर जातींच्या बरोबर गैरव्यवहार करणे त्यांच्याजवळ अगदी उचित होत. त्यांच्या धर्मपंडितांनी मनघडत निवाडे तौरातमध्ये सामील केलेले होते. परिणाम स्वरूप त्यांच्यामध्ये असा जातीय अहंकार निर्माण झाला होता की नीतिमत्तेच्या व व्यवहाराच्या क्षेत्रात देखील ते स्वत:मध्ये व इतरांमध्ये फरक करू लागले होते. आणि त्या मनघडत निवाड्यांच्या आधारावर इतर जातींच्या संपत्तीचे अपहरण करण्यामध्ये त्यांना काही गैर वाटत नव्हते. बायबलमध्ये आहे.

''वाटल्यास परदेशीयांशी वाढीदिढीचा व्यवहार कर. पण आपल्या बांधवांशी करू नको.''(अनुवाद २३.२०)

पवित्र क़ुरआन या मनोवृत्तीवर कडक आक्षेप घेत आहे आणि गैरव्यवहाराला कोणाच्याही बाबतीत योग्य ठरवित. नाही. मग गैरव्यवहार करणारी व्यक्ति मुस्लिम असो वा गैरमुस्लिम. मोमिन असो वा काफिर स्वसमाजातील असो वा दुसऱ्या समाजातील मुसलमानांचे मध्येही असे लोक दुर्मिळ नाहीत जे गैरमुस्लिमांच्या बाबतीत चुकीच्या निवाड्यांचा (फतव्यांचा) आधार घेऊन व्याजासारख्या गोष्टीला विहित (जाइज़) ठरवितात. परंतु पवित्र क़ुरआनची ही आयत अशा प्रकारच्या निवाड्यांना (फतव्यांना) रद्द ठरविण्यास पुरेसी आहे.

९९. अल्लाहच्या प्रतिज्ञेने अभिप्रेत अल्लाहची भक्ती व आज्ञापालन करण्याद्दलची प्रतिज्ञा आणि शपथांनी अभिप्रेत विशेषेकरून त्या शपथा ज्या लोकांकडून प्रतिज्ञा करताना घेतल्या जातात.

आणि थोड्या किंमतीवर विकण्याने अभिप्रेत आखिरतच्या चिरंतन फ़ायद्याच्या मुकाबल्यात क्षुल्लक अशा ऐहिक फायद्यांना प्राधान्य देणे.

१००. म्हणजे त्यांच्यावर कृपादृष्टी करणार नाही.

७८. आणि त्यांच्यामध्ये काही लोक असे आहेत जे आपल्या जिभेला अशा प्रकारे वळवून ग्रंथाचे पठण करतात की तुम्हाला वाटते की ते ग्रंथातील मजकूरच वाचतात. तथापि तो ग्रंथाचा मजकूर असत नाही.[१०१] आणि ते म्हणतात की हे अल्लाह कडून आहे. तथापि ते अल्लाहकडून नसते. ते जाणून बुजून खोटी गोष्ट अल्लाहशी जोडतात.

وَاِنَّ مِنۡهُمۡ لَفَرِيۡقًا يَّلۡوٗنَ اَلۡسِنَتَهُمۡ بِالۡكِتٰبِ لِتَحۡسَبُوۡهُ
مِنَ الۡكِتٰبِ وَمَا هُوَ مِنَ الۡكِتٰبِ ۚ وَيَقُوۡلُوۡنَ هُوَ مِنۡ عِنۡدِ
اللّٰهِ وَمَا هُوَ مِنۡ عِنۡدِ اللّٰهِ ۚ وَيَقُوۡلُوۡنَ عَلَى اللّٰهِ الۡكَذِبَ
وَهُمۡ يَعۡلَمُوۡنَ ﴿۷۸﴾

७९. कोणाही माणसाचे हे काम नव्हे की, अल्लाहने त्याला ग्रंथ, आज्ञा व प्रेषित पद प्रदान केल्यानंतर त्याने लोकांना सांगावे की अल्लाहच्या ऐवजी माझे भक्त बना.[१०२] या उलट तो तर हेच म्हणेल की सच्चे 'रब्बानी' (ईश भक्त) बना, जशी अल्लाहच्या ग्रंथाची निकड आहे, ज्याची तुम्ही दुसऱ्यांना शिकवण देता आणि ज्याचे पठण तुम्ही स्वत:ही करता.

مَا كَانَ لِبَشَرٍ اَنۡ يُّؤۡتِيَهُ اللّٰهُ الۡكِتٰبَ وَالۡحُكۡمَ وَالنُّبُوَّةَ
ثُمَّ يَقُوۡلَ لِلنَّاسِ كُوۡنُوۡا عِبَادًا لِّىۡ مِنۡ دُوۡنِ اللّٰهِ وَلٰكِنۡ
كُوۡنُوۡا رَبّٰنِيّٖنَ بِمَا كُنۡتُمۡ تُعَلِّمُوۡنَ الۡكِتٰبَ وَبِمَا كُنۡتُمۡ
تَدۡرُسُوۡنَ ۙ ﴿۷۹﴾

८०. तो तुम्हाला कदापिही ही आज्ञा देणार नाही की फिरिशत्यांना (ईश दुतांना) आणि पैगंबरांना तुम्ही आपला 'रब' (ईश) माना. तुम्ही मुस्लिम (आज्ञाधारक) असताना काय तो तुम्हाला कुफ्र (विद्रोह) करण्याची अज्ञा देईल?

وَلَا يَاۡمُرَكُمۡ اَنۡ تَتَّخِذُوا الۡمَلٰٓئِكَةَ وَالنَّبِيّٖنَ
اَرۡبَابًا ؕ اَيَاۡمُرُكُمۡ بِالۡكُفۡرِ بَعۡدَ اِذۡ اَنۡتُمۡ مُّسۡلِمُوۡنَ ﴿۸۰﴾

८१. आठवण करा जेव्हा अल्लाहने (तुमच्याकडून) पैगंबरांच्या संबंधी प्रतिज्ञा घेतली. होती की मी तुम्हांला ग्रंथ व बुद्धी देऊन गौरविले आहे. यानंतर जेव्हा कोणी पैगंबर (रसूल) या ग्रंथाचे, जो तुमच्याजवळ पहिल्यापासून आहे, समर्थन करीत तुमच्याकडे येईल तेव्हा तुम्ही त्याच्यावर अवश्य ईमान आणाल आणि त्याची जरुर मदत कराल [१०३] विचारले काय तुम्ही हे मान्य करता? आणि काय माझ्या कडून टाकण्यात येणाऱ्या या मोठ्या जबाबदारीचा स्वीकार करता? त्यांनी सांगितले. आम्ही हे मान्य केले. फर्माविले तर मग साक्ष असा. मी पण तुमच्याबरोबर साक्ष आहे.

وَاِذۡ اَخَذَ اللّٰهُ مِيۡثَاقَ النَّبِيّٖنَ لَمَاۤ اٰتَيۡتُكُمۡ مِّنۡ كِتٰبٍ
وَّحِكۡمَةٍ ثُمَّ جَآءَكُمۡ رَسُوۡلٌ مُّصَدِّقٌ لِّمَا مَعَكُمۡ
لَتُؤۡمِنُنَّ بِهٖ وَلَتَنۡصُرُنَّهٗ ؕ قَالَ ءَاَقۡرَرۡتُمۡ وَاَخَذۡتُمۡ
عَلٰى ذٰلِكُمۡ اِصۡرِىۡ ؕ قَالُوۡۤا اَقۡرَرۡنَا ؕ قَالَ فَاشۡهَدُوۡا
وَاَنَا مَعَكُمۡ مِّنَ الشّٰهِدِيۡنَ ﴿۸۱﴾

१०१. इशारा आहे यहुदी लोकांच्या त्या कृत्याकडे जे ते सत्याला लपविण्यासाठी अल्लाहच्या ग्रंथातील काही शब्दांचा अशा प्रकारे उच्चार करीत असत की त्यांचा अर्थच बदलत असे.

याचे उदाहरण पवित्र कुरआनला मानणाऱ्या लोकांमध्येही आहे. अनिष्ट प्रथा पाडणारे काही लोक जे हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे मानव आहेत हे मानीत नाहीत ते.

قُلْ اِنَّمَا اَنَا بَشَرٌ مِّثْلُكُمْ

''कुल इन्नमा अना बशरुम मिस्लुकुम.'' (म्हण मी तुमच्या सारखाच माणूस आहे) या आतीला

قُلْ اِنَّ مَا اَنَا بَشَرٌ مِّثْلُكُمْ

''कुल इन्ना मा अना बशरुम मिस्लुकुम'' (म्हण नि:संशय मी तुमच्यासारखा माणूस नाही.) असे वाचतात. म्हणजे 'इन्नमा' या शब्दाला तोडून اِنَّ 'इन्ना' व مَا 'मा' असे वेगवेगळे वाचतात, ज्याचा अर्थ उलटा होतो.

१०२. याने त्या सर्व अनेकेश्वरवादी श्रद्धांचे खंडन होते ज्या धर्माला मानणाऱ्या लोकांनी आपापल्या धर्मग्रंथामध्ये सामील करुन त्यांचा संबंध पैगंबरांच्याकडे जोडला आहे. पवित्र क़ुरआन सांगत आहे की कोणत्याही पैगंबरांची ही शिकवण होऊच शकत नाही. ते अल्लाहशिवाय इतर कोणाची इबादत (भक्ती) करण्याची आज्ञा देत नाहीत. अशी शिकवण जर एखाद्या धार्मिक ग्रंथात आढळली तर ती कदापिही कोणत्याही पैगंबरांची शिकवण नव्हे तर मागाहून त्यामध्ये घुसडविण्यात आलेली मनघडत गोष्ट आहे; जिचा संबंध ईश्वर व पैगंबरांच्याकडे जोडला गेला आहे. ही सत्य पारखण्याची कसोटी आहे. जिच्या आधारे पैगंबरांशी जोडल्या गेलेल्या शिकवणीला पारखले पाहिजे.

१०३. निवेदन शैलीचा विचार केल्यास असे आढळून येते की ही प्रतिज्ञा बनी इसराईल कडून हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पैगंबरी बद्दल घेतली गेली होती. तौरात व इंजील मध्ये हज़रत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या प्रेषित्वासंबंधी स्पष्ट अशा भविष्यवाणी नमूद होत्या. त्याकडे पवित्र क़ुरआनने ठिकठिकाणी इशारे केले आहेत. आणि प्रचलित बायबलमध्ये सुद्धा, त्यामध्ये फेरफाराचे दोष असता देखील या भविष्यवाणीचे अवशेष आढळून येतात.

८२. यानंतर जे लोक (या प्रतिज्ञेपासून) परत फिरतील तेच आज्ञाभंग करणारे आहेत. [१०४]

فَمَنْ تَوَلّٰى بَعْدَ ذٰلِكَ فَاُولٰٓئِكَ هُمُ الْفٰسِقُوْنَ ﴿۸۲﴾

८३. काय हे अल्लाहच्या 'दीन' (धर्मा) ऐवजी दुसऱ्या एखाद्या धर्माचे इच्छुक आहेत ?[१०५] यद्यपि आकांशातील व जमिनीवरील सारी निर्मिती इच्छेने वा अनिच्छेने त्याची आज्ञाधारक आहे. [१०६] आणि सर्वांना त्याच्याच कडे परतविले जाईल.[१०७]

اَفَغَيْرَ دِيْنِ اللّٰهِ يَبْغُوْنَ وَلَهٗٓ اَسْلَمَ مَنْ فِي السَّمٰوٰتِ
وَالْاَرْضِ طَوْعًا وَّكَرْهًا وَّاِلَيْهِ يُرْجَعُوْنَ ﴿۸۳﴾

८४. म्हणा. आम्ही ईमान आणले अल्लाहवर आणि त्यावर जे आमच्यावर उतरविले गेले आहे. आणि जे इब्राहीम, इस्माईल, इसहाक़, याक़ूब व याकूब यांच्या संततीवर उतरविले गेले होते. त्याच प्रमाणे आमचे ईमान त्यावरही आहे जे मूसा, ईसा व दुसऱ्या पैगंबरांना त्यांच्या पालनकर्त्याकडून दिले गेले होते. आम्ही त्यांच्यामध्ये भेदभाव करीत नाही. आणि आम्ही त्याचेच आज्ञाधारक (मुस्लिम) आहोत.

قُلْ اٰمَنَّا بِاللّٰهِ وَمَآ اُنْزِلَ عَلَيْنَا وَمَآ اُنْزِلَ عَلٰٓى اِبْرٰهِيْمَ
وَاِسْمٰعِيْلَ وَاِسْحٰقَ وَيَعْقُوْبَ وَالْاَسْبَاطِ وَمَآ اُوْتِيَ مُوْسٰى
وَعِيْسٰى وَالنَّبِيُّوْنَ مِنْ رَّبِّهِمْ لَا نُفَرِّقُ بَيْنَ اَحَدٍ مِّنْهُمْ
وَنَحْنُ لَهٗ مُسْلِمُوْنَ ﴿۸۴﴾

८५. आणि जो कोणी इस्लाम खेरीज दुसऱ्या कोणत्याही धर्माचा इच्छुक असेल तर तो त्याच्याकडून कधीही स्वीकारला जाणार नाही. आणि आखिरत मध्ये त्याचे मनोरथ विफल होतील. [१०८]

وَمَنْ يَّبْتَغِ غَيْرَ الْاِسْلَامِ دِيْنًا فَلَنْ يُّقْبَلَ مِنْهُ ۚ
وَهُوَ فِي الْاٰخِرَةِ مِنَ الْخٰسِرِيْنَ ﴿۸۵﴾

८६. अल्लाह त्या लोकांचे मार्गदर्शन कसे करील, ज्यांनी ईमान आणल्यानंतर इन्कार केला. [१०९] यद्यपि त्यांनी या गोष्टीची ग्वाही दिली होती की पैगंबर सत्य आहेत आणि त्यांच्याजवळ स्पष्ट निशाण्याही आहेत. अल्लाह अत्याचारी लोकांचे मार्गदर्शन करीत नसतो. [११०]

كَيْفَ يَهْدِي اللّٰهُ قَوْمًا كَفَرُوْا بَعْدَ اِيْمَانِهِمْ وَشَهِدُوْٓا
اَنَّ الرَّسُوْلَ حَقٌّ وَّجَآءَهُمُ الْبَيِّنٰتُ ۭ وَاللّٰهُ لَا يَهْدِي
الْقَوْمَ الظّٰلِمِيْنَ ﴿۸۶﴾

८७. अशा लोकांचा मोबदला हा आहे की अल्लाह, फिरिश्ते आणि सारे लोक त्यांची निर्भर्त्सना करतील.

اُولٰٓئِكَ جَزَاۗؤُهُمْ اَنَّ عَلَيْهِمْ لَعْنَةَ اللّٰهِ وَالْمَلٰۗئِكَةِ
وَالنَّاسِ اَجْمَعِيْنَ ﴿۸۷﴾

८८. ते याच निरभर्त्सित अवस्थेत सदैव राहतील. ना त्यांच्या शिक्षेमध्ये कमी होईल आणि ना त्यांना अवधी मिळेल.

خٰلِدِيْنَ فِيْهَا ۚ لَا يُخَفَّفُ عَنْهُمُ الْعَذَابُ وَلَا هُمْ يُنْظَرُوْنَ ﴿۸۸﴾

१०४. हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषित्वा संबंधी दृढ प्रतिज्ञा घेतली गेली होती. असे असतांदेखील जे लोक या प्रतिज्ञेपासून परावृत्त होतील त्यांचा हा धीटपणा ते अवज्ञाकारी आहेत याचा स्पष्ट असा पुरावा आहे. त्यांनी जरी धार्मिकतेचा व आज्ञाधारकपणाचा मुखवटा धारण केला असला आणि लोकांच्या दृष्टीने त्यांची गणना 'धार्मिक' लोकांत होत असली तरी ते अवज्ञाकारीच होत.

१०५. या आयतीमध्ये इस्लामला अल्लाहचा 'दीन'म्हणून संबोधिले गेले आहे. यावरुन ही गोष्ट चांगल्याप्रकारे स्पष्ट होते की, जगामध्ये आज जे पुष्कळसे धर्म आढळून येतात आणि त्याचप्रमाणे पूर्वी जे धर्म आढळून येत असत, ते सर्व जरी अल्लाहशीच जोडले जातात तरी वस्तुत:फक्त इस्लामच असा एक धर्म आहे जो सार्थपणे अल्लाहचा धर्म म्हणून संबोधण्यास पात्र आहे.

१०६. इस्लाम हा एकमेव सत्यधर्म आहे याचा हा पुरावा आहे. माणसा सकट सारी निर्मिती अपरिहार्यपणे अल्लाह समोर नतमस्तक होते, इतकेच नव्हे तर इन्कार करणारे देखील प्राकृतिक दृष्ट्या अल्लाहच्या कायद्यासमोर झुकण्यास विवश आहेत. कट्टरातील कट्टर इन्कार करणारा देखील पायानेच चालतो, डोळ्यानेच पाहतो, नाकानेच श्वासोच्छवास करतो. हे सर्व अल्लाहने बनविलेले नियम आहेत. याविरुद्ध वर्तन करणे कोणासहि शक्य नाही. तर मग,माणसाने आपल्या स्वच्छंद जीवनात स्वत:ला ईश्वरी आज्ञेच्या स्वाधीन न करणे कितपत उचित आहे? आणि अल्लाहच्या आज्ञापालनापासून विमुख होऊन त्याने स्वत:साठी एखादा धर्म अगर जीवन जगण्याची एखादी पद्धती अवलंबिणे कितपत इष्ट आहे?

या आयतीवरुन ही वस्तु:स्थिती स्पष्ट होते की इस्लाम हा एखाद्या वंशाचा अगर गटाचा धर्म नव्हे,तर वस्तुत: तो साऱ्या जगाचा, साऱ्या विश्वाचा धर्म आहे. आणि जो कोणी इस्लामचा धर्म म्हणून अंगिकार करतो तो, विश्वधर्माशी एकरुप होतो. आणि जो कोणी इस्लाम खेरीज दुसऱ्या धर्म अंगिकारतो अगर धर्मविरोधी व अधर्मी पद्धत अंगिकारतो तो विश्वधर्माशी एकरुप होऊच शकत नाही. इतकेच नव्हे तर तो मूलभूत सत्यापासून दूर होतो

१०७. जेव्हा सर्वांना अल्लाहकडेच परतावयाचे आहे तर जे लोक असा धर्म अंगिकारतात जो त्याचा 'मान्यधर्म' नाही, किंवा ईश्वराशी संबंध नसलेल्या पद्धतीलाच आपली जीवन-पद्धत बनवितात, ते आपल्या उद्धट व बंडखोर वागणूकीचा परमेश्वरासमोर काय खुलासा करु शकतील?

१०८. ही सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून या गोष्टीची स्पष्ट घोषणा आहे की त्याच्याजवळ फक्त सरकारी शिक्का चालेल. आणि तो आहे इस्लाम. याशिवाय जे शिक्के असतील ते सर्व रद्द व खोटे ठरतील. मग तो एखाद्या धर्माच्या नावाचा शिक्का असो वा मूळापासून त्याच्यावर कुठल्याही धर्मांची छाप नसो. दुसऱ्या शब्दात, ईश्वराशी संबंधाची एखादी अमान्य पद्धत अंगिकारिली गेली असो वा ईश्वराशी संबंध तोडून जीवन जगण्याची एखादी पद्धत अवलंबिली गेली असो; त्यापैकी कोणतीही पद्धत अल्लाहजवळ स्वीकारणीय नाही व होणारही नाही. आखिरतच्या न्यायालयात अशा लोकांच्या विरुद्ध बनावट नाणी चालविण्याचा गुन्हा दाखल करुन तो चालविला जाईल. आणि त्यांना त्यांच्या या गुन्ह्याबद्दल सक्त सजा भोगावी लागेल.

१०९. इशारा ग्रंथधारकांच्या कडे आहे ज्यांना श्रद्धेची श्रीमंती लाभली होती. परंतु असे असता देखील त्यांनी इन्काराचा मार्ग पत्करला.

११०. म्हणजे माणूस जोपर्यंत अत्याचारी आचरणाचा त्याग करण्यास तयार होत नाही तोपर्यंत त्याच्यासाठी सन्मार्ग खुला होत नाही.

८९. अलबत: ज्या लोकांनी यानंतर तौबा केली (पश्चाताप व्यक्त केला) आणि आपली आचरण पद्धत सुधारली तर अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

إِلَّا الَّذِينَ تَابُوا مِن بَعْدِ ذَٰلِكَ وَأَصْلَحُوا فَإِنَّ اللَّهَ
غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٨٩﴾

९०. ज्या लोकांनी ईमान आणल्या नंतर इन्कार (कुफ्र) केला आणि जे आपल्या इन्कारामध्ये वाढच करीत राहिले, त्यांच्या पश्चातापाचा कधीही स्वीकार केला जाणार नाही. [१११] असे लोक पक्के मार्गभ्रष्ट आहेत.

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا بَعْدَ إِيمَانِهِمْ ثُمَّ ازْدَادُوا كُفْرًا لَّن
تُقْبَلَ تَوْبَتُهُمْ وَأُولَٰئِكَ هُمُ الضَّالُّونَ ﴿٩٠﴾

९१. नि:संशय ज्या लोकांनी इन्कार (कुफ्र) केला आणि इन्काराच्या (कुफ्रच्या) अवस्थेत जे मरण पावले-जर त्यापैकी कोणी (मुक्ती प्राप्त करण्यासाठी) जमीन भर सोने भरपाई म्हणून देईल तरी त्याचा स्वीकार केला जाणार नाही. [११२] अशा लोकांच्यासाठी दु:खदायक शिक्षा आहे आणि त्यांचा कोणी मदतनीस असणार नाही.

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا وَمَاتُوا وَهُمْ كُفَّارٌ فَلَن يُقْبَلَ
مِنْ أَحَدِهِم مِّلْءُ الْأَرْضِ ذَهَبًا وَلَوِ افْتَدَىٰ بِهِ
أُولَٰئِكَ لَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ وَمَا لَهُم مِّن نَّاصِرِينَ ﴿٩١﴾

९२. तुम्ही सदाचाराच्या स्थानापर्यंत कदापि पोहोचू शकत नाही. जोपर्यंत तुम्ही त्या वस्तुंमधून खर्च करीत नाही. ज्या तुम्हांला प्रिय आहेत.[११३] आणि तुम्ही जो काही खर्च कराल तो अल्लाहला माहित आहे.

لَن تَنَالُوا الْبِرَّ حَتَّىٰ تُنفِقُوا مِمَّا تُحِبُّونَ ۚ وَمَا تُنفِقُوا
مِن شَيْءٍ فَإِنَّ اللَّهَ بِهِ عَلِيمٌ ﴿٩٢﴾

९३. खाण्याच्या या सर्व वस्तु [११४] बनी इस्त्राईलसाठी हलाल (वैद्य) होत्या; त्या वस्तु शिवाय ज्या इसराईलने 'तौरात' अवतीर्ण होण्यापूर्वी आपल्यासाठी हराम ठरविल्या होत्या.[११५] म्हणा. तुम्ही खरे आहात तर 'तौरात' आणा व त्याला वाचा. [११६]

كُلُّ الطَّعَامِ كَانَ حِلًّا لِّبَنِي إِسْرَائِيلَ إِلَّا مَا حَرَّمَ
إِسْرَائِيلُ عَلَىٰ نَفْسِهِ مِن قَبْلِ أَن تُنَزَّلَ التَّوْرَاةُ ۗ قُلْ
فَأْتُوا بِالتَّوْرَاةِ فَاتْلُوهَا إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿٩٣﴾

९४. त्यानंतर देखील जे लोक अल्लाहशी खोट्या गोष्टी जोडतील तेच अत्याचारी आहेत.

فَمَنِ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ الْكَذِبَ مِن بَعْدِ ذَٰلِكَ فَأُولَٰئِكَ
هُمُ الظَّالِمُونَ ﴿٩٤﴾

९५. सांगा ! अल्लाहने सत्य सांगितले आहे. तर इब्राहीम यांच्या पद्धतीचे अनुकरण करा, जे सरळमार्गी होते आणि शिर्क (अल्लाहबरोबर इतरांना सहभागी) करणाऱ्यांपैकी मुळीच नव्हते.

قُلْ صَدَقَ اللَّهُ ۗ فَاتَّبِعُوا مِلَّةَ إِبْرَاهِيمَ حَنِيفًا وَمَا كَانَ
مِنَ الْمُشْرِكِينَ ﴿٩٥﴾

१११. म्हणजे जे आयुष्यभर कुफ्र (इन्कार) करीत राहिले आणि जेव्हा मृत्यु समोर दिसुं लागला तेव्हा पश्चाताप (तौबा) करु लागले; अशा लोकांच्या पश्चातापास काही अर्थ नाही आणि म्हणून तो स्वीकारला जाणार नाही. तोच पश्चाताप कबूल केला जातो जो सरळमनाने व्यक्त होतो व ज्यामागे आपल्या चुकीची दुरुस्ती करून सुधारण्याची भावना असते.

११२. उद्देश काफिरांची (इन्कार करणाऱ्यांची) लाचारी स्पष्ट करणे हा आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात जेव्हा कुफ्र (इन्कार) करणाऱ्यांसाठी निरंतरच्या शिक्षेचा निर्णय होईल, तेव्हा त्यांच्यासाठी मुक्तीचा (नजातचा) कोणताही मार्ग शक्य होणार नाही. एखाद्या काफिरा (इन्कार करणाऱ्यांजवळ) जमीन भर सोने आहे असे गृहीत धरले तर, तो ते सोने आपल्या सुटकेसाठी नुकसान भरपाई दाखल देण्यास खुशी ने तयार होईल. परंतु त्यादिवशी न कोणाजवळ देण्यासाठी काही असेल, न कोणाकडून कसलीही नुकसान भरपाई स्वीकारली जाईल. एहिक जीवनात आखिरत मधील मुक्ती संबंधी बेपर्वा होऊन जे लोक जगातील एश्वर्य कमविण्यामागे लागतात, त्यांना आपल्या मुर्खपणाचा खरा प्रत्यय कयामतीच्या दिवशीच येऊ शकेल.

११३. एखादे चांगले कृत्य करणे व सदाचाराचे स्थान प्राप्त करणे-सदाचारी असणे-या गोष्टी अगदी वेगवेगळ्या आहेत. जेथे परंपरागत धार्मिकता असे तेथे उघडपणे काही ना काही चांगली कामे होतात. परंतु आपल्या आवडत्या संपत्तीमधून अल्लाहसाठी खर्च करण्याची आणि त्याच्या मार्गात त्याग करण्याची भावना तेथे नसते. याउलट जेथे खरी धार्मिकता असते तेथे माणूस आपले आवडते धन अल्लाहसाठी खर्च करण्यास आणि त्याच्या मार्गात त्याग करण्यास खुषीने तयार असतो. ही एक कसोटी आहे ज्या आधारे अल्लाहवरील प्रेम व निष्ठा पारखली जाऊ शकते. यहूदी लोक दानधर्माच्या बाबतीत मोठे कृपण होतें. आणि या कसोटीने त्यांच्या धार्मिकतेचे खरे स्वरुप अगदी उघड करून ठेविले.

आपली आवडती संपत्ती अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याचे उत्कृष्ट उदाहरण हज़रत अबू तलहा यांचे आहे. मदीनेमध्ये त्यांची एक उत्कृष्ट अशी बाग होती. त्या बागेमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) नेहमी जात असत व तेथील पाणी ते अत्यंत आवडीने पीत असत. जेव्हा ही आयत उतरली तेव्हा हज़रत अबू तलहा (रजि.) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ना म्हणाले

'' या रसूलुल्लाह ! ही बाग अल्लाहसाठी दान आहे. हिची आपण आपल्या इच्छेप्रमाणे व्यवस्था करा.'' आपण फर्माविले ''ठीक ठीक. ही संपत्ती तर फार चांगली आहे. मला हे योग्य वाटते की याची तुमच्या नातेवाईकांमध्ये विभागणी करावी.'' त्यावर हज़रत अबू तलहा (रज़ियल्लाहु अन्हु) म्हणाले 'जशी आपली इच्छा.' पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या बागेची त्यांच्या नातेवाईकामध्ये विभागणी करून दिली.''

(तफसीर इब्ने कसीर. भाग १ ला पान ३८१)

११४. अभिप्रेत ती जनावरे आहेत ज्यांचे मांस हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा धर्मशास्त्रामध्ये- इस्लाममध्ये- वैध आहे.

११५. इस्राईल हे हज़रत याकूब यांचे उपनाम होते. ते पैगंबर होते. आणि पैगंबर स्वत: कोणत्याही गोष्टीला, अल्लाहच्या आज्ञेशिवाय हराम ठरवित नाहीत. आणि म्हणून त्यांनी आपल्यावर ज्या गोष्टी हराम ठरविल्या होत्या त्या निव्वळ स्वत:च्या मर्जीनुसार ठरविल्या होत्या या शंकेस काही जागा राहत नाही.

११६. यहुदी लोकांचा मुख्य आक्षेप हा होता की क़ुरआन अशा गोष्टींना हलाल ठरवित आहे ज्या इब्राहीमी समाजात हराम होत्या. विशेषकरून त्यांचा इशारा उंटाकडे होता. ज्याला क़ुरआनने हलाल ठरविले आहे. यहुदी लोक त्याला निषिद्ध मानीत असत. तौरात मध्ये आहे.

> ''पण जे केवळ रवंथ करणारे किंवा ज्यांचे केवळ खूर विभागलेले आहेत ते पशू खाऊ नयेत; उंट हा रवंथ करतो पण त्याचा खूर विभागलेला नाही. म्हणून तो तुम्ही अशुद्ध समजा.'' (लेवीय ११-४)

याचे उत्तर क़ुरआनने हे दिले आहे की ज्या गोष्टींना क़ुरआन हलाल ठरवित आहे त्या इब्राहीमी समाजात सुद्धा हलाल होत्या आणि त्यामध्ये उंटाचाही समावेश आहे. आणि ही गोष्ट तौरात उतरण्यापूर्वीची आहे. आणि म्हणून नंतर ज्या गोष्टी-मग त्या हज़रत याकूब (अलैहिस्सलाम) यांच्या द्वारे हराम ठरविल्या गेलेल्या असोत वा तौरात द्वारे, त्यांचे स्वरुप अगदी दुसरे आहे. त्या गोष्टी काही खास कारणामुळे फक्त बनी इस्राईल साठीच हराम ठरविल्या गेल्या होत्या. आणि म्हणून त्या इब्राहीमी समाजामध्ये हराम होत्या हा दावा योग्य नाही. यहुदी लोकांचा या चूकीच्या दाव्याचे खंडन खुद्द तौरात ने होते. कारण तौरात मध्ये हा खुलासा कोठेही नाही की या गोष्टी प्रथम दिवसापासून हराम चालत आलेल्या आहेत. जेथपावेतो प्रचलित विकृत तौरातचा संबंध आहे त्यामध्ये देखील अशा गोष्टी आहेत ज्याने हा दावा खोटा ठरतो. उदाहरणार्थ हज़रत नूह (अलैहिस्सलाम) यांच्या वृत्तांतामध्ये आहे की,

> ''सर्व संचार करणारे प्राणी तुमचे अन्न होतील. वनस्पती ज्याप्रमाणे तुम्हास दिली होती त्याप्रमाणे सर्व काही आता तुम्हास देतो. तथापि मांसाचे जीवन रक्त आहे म्हणून रक्तासकट मांस खाऊ नका.''

(उत्पत्ति ९- ४,५)

९६. निःसंशय पहिले घर [११७] जे मानवांसाठी बनविले गेले ते तेच आहे. जे 'बक्के'[११८] मध्ये आहे लोकांच्यासाठी बरकतीचे (समृद्धीचे) साधन [११९] व मार्गदर्शनाचे केंद्र. [१२०]

إِنَّ أَوَّلَ بَيْتٍ وُضِعَ لِلنَّاسِ لَلَّذِي بِبَكَّةَ مُبَارَكًا وَهُدًى
لِلْعَالَمِينَ ﴿٩٦﴾

९७. यामध्ये स्पष्ट निशाण्या आहेत.[१२१] 'मकामे इब्राहीम'[१२२] आहे. आणि जो कोणी त्यामध्ये दाखल झाला तो सुरक्षित झाला. जे लोक या (घरा) पर्यंत पोहोचण्याचे सामर्थ्य बाळगतात, त्यांच्यावर अल्लाहसाठी या घराचे हज्ज करणे कर्तव्य आहे. आणि जो कुफ्र (इन्कार) करील तर अल्लाह लोकांपासून निरपेक्ष आहे.[१२३]

فِيهِ آيَاتٌ بَيِّنَاتٌ مَقَامُ إِبْرَاهِيمَ ۖ وَمَنْ دَخَلَهُ
كَانَ آمِنًا ۗ وَلِلَّهِ عَلَى النَّاسِ حِجُّ الْبَيْتِ مَنِ اسْتَطَاعَ إِلَيْهِ
سَبِيلًا ۚ وَمَنْ كَفَرَ فَإِنَّ اللَّهَ غَنِيٌّ عَنِ الْعَالَمِينَ ﴿٩٧﴾

९८. म्हणा ! हे ग्रंथधारकांनो ! तुम्ही अल्लाहच्या आयतींचा इन्कार कां करीत आहात ? तुम्ही जे काही करीत आहात ते अल्लाह पाहत आहे.

قُلْ يَا أَهْلَ الْكِتَابِ لِمَ تَكْفُرُونَ بِآيَاتِ اللَّهِ وَاللَّهُ
شَهِيدٌ عَلَىٰ مَا تَعْمَلُونَ ﴿٩٨﴾

९९. म्हणा !हे ग्रंथधारकांनो!तुम्ही ईमान आणणाऱ्यांना अल्लाहच्या मार्गापासून कां रोखता ?[१२४] तुम्ही त्यामध्ये वक्रता निर्माण करू इच्छिता. [१२५] तुम्ही तर साक्षी आहात ![१२६] अल्लाह तुमच्या कारवायांपासून अनभिज्ञ नाहीं.

قُلْ يَا أَهْلَ الْكِتَابِ لِمَ تَصُدُّونَ عَنْ سَبِيلِ اللَّهِ مَنْ آمَنَ
تَبْغُونَهَا عِوَجًا وَأَنْتُمْ شُهَدَاءُ ۗ وَمَا اللَّهُ بِغَافِلٍ
عَمَّا تَعْمَلُونَ ﴿٩٩﴾

१००. हे ईमान आणलेल्या लोकांनो तुम्ही ग्रंथधारकांपैकी एखाद्या गटाच्या [१२७] म्हणण्याचा स्वीकार कराल तर तो तुम्हाला ईमान आणल्यानंतर काफिर (इन्कार करणारा) बनवील.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِنْ تُطِيعُوا فَرِيقًا مِنَ الَّذِينَ أُوتُوا
الْكِتَابَ يَرُدُّوكُمْ بَعْدَ إِيمَانِكُمْ كَافِرِينَ ﴿١٠٠﴾

१०१. आणि तुम्ही कसे काय कुफ्र (इन्कार) कराल जेव्हा तुम्हांला अल्लाहच्या आयती ऐकविल्या जात आहेत आणि त्याचे पैगंबर तुमच्यामध्ये उपस्थित आहेत ? [१२८] आणि ज्याने अल्लाहला बळकट [१२९] धरले त्याला सरळ मार्गाची शिकवण लाभली.

وَكَيْفَ تَكْفُرُونَ وَأَنْتُمْ تُتْلَىٰ عَلَيْكُمْ آيَاتُ اللَّهِ وَفِيكُمْ رَسُولُهُ ۗ
وَمَنْ يَعْتَصِمْ بِاللَّهِ فَقَدْ هُدِيَ إِلَىٰ صِرَاطٍ مُسْتَقِيمٍ ﴿١٠١﴾

१०२. हे ईमान आणलेल्या लोकांनो अल्लाहचे भय बाळगा, जसे भय बाळगण्याचा त्याचा हक्क आहे.[१३०] आणि तुम्ही मुस्लिम असलेल्या स्थितीखेरीज तुम्हांला मृत्यू न येवो.[१३१]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا اتَّقُوا اللَّهَ حَقَّ تُقَاتِهِ وَلَا تَمُوتُنَّ
إِلَّا وَأَنْتُمْ مُسْلِمُونَ ﴿١٠٢﴾

११७. पहिल्या घराने अभिप्रेत अल्लाहच्या प्रार्थनेसाठी बांधण्यात येणारे पहिले घर किंवा प्रार्थनागृह. या आयतीमध्ये खुलासा केला गेला आहे की ते घर म्हणजे काबागृह, जे मक्कामध्ये आहे. दुसऱ्या ठिकाणी पवित्र क़ुरआनने त्याच्या उभारणी संबंधी हे स्पष्ट केले आहे की त्याची उभारणी करणारे हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) व हज़रत इस्माईल (अलैहिस्स्लाम) हे आहेत.यावरून खालील गोष्टी स्पष्ट होतात.

१) हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या पूर्वी अल्लाहच्या इबादतीसाठी कोणतेही कायम स्वरुपाचे प्रार्थनागृह नव्हते.

२) ज्या निवेदनांमध्ये काबा-गृहाला सर्वप्रथम हज़रत आदम (अलैहिस्सलाम) यांनी बंधणे व हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी त्याची पुनर्बाधणी केली असे आले आहे त्यांचे खंडन क़ुरआनच्या या खुलाशाने होते. या निवेदनानुसार वस्तुस्थिती असती तर क़ुरआनने त्याचा अवश्य उल्लेख केला असता. कारण पहिल्या रचना-काराचा उल्लेख न करणे व फक्त पुनर्रचना काराचा उल्लेख करणे हे कुरआनच्या एकंदर भुमिकेशी सुसंगत नाही. शिवाय ही निवेदने प्रमाणित हदीसाच्या कसोटीस उतरत नाहीत. इब्ने कसीर यांनी बैहकीचे एक निवेदन ज्यामध्ये हज़रत आदम (अलैहिस्सलाम) यांनी काबा-गृहाची बांधणी केल्याचा उल्लेख केला आहे, नमूद करून लिहले आहे की हे निवेदन इब्ने लेहिआच्या निवेदननांपैकी आहे. व ते कमजोर आहे. आणि बहुतकरून अब्दुल्लाह बिन अम्र (रजियल्लाहु अन्हु) यांच्या कथानावर अवलंबून आहे. (म्हणजे ते पैगंबरांचे निवेदन नाही) (इब्नेकसीर भा. १ पा. ३८३)

ولم يجئ خبر صحيح عن معصوم

(الجامع اللطيف ص ٦٩ بحوالہ تاریخ ابن کثیر۔)

आणि तारीख इब्ने कसीरमध्ये आहे की, ‘‘पैगंबर (सल्ल्लाहु अलैहि वसल्लम) यांची याबाबतीत प्रमाणभूत अशी हदीस नाही.’’ अलजामे-उल-लतीफ पा. ६९)

३) बैतुल मुकद्दस (जेरुसलेमची मस्जिद) ची उभारणी काबा-गृहानंतर झालेली आहे. याची उभारणी हजरत सुलेमान यांच्या हातून झालेली आहे. बायबलमध्ये आहे की :-

‘‘इस्राईल लोक मिसर देशातून निघाल्यापासून चारशे ऐशीव्यां वर्षी इस्राईल वरील सुलेमानाच्या कारकीर्दीच्या चौथ्या वर्षी, दुसऱ्या म्हणजे जिव नावाच्या महिन्यात सुलेमानने परमेश्वराचे घर बांधण्याची सुरवात केली’’ (१राजे ६-१)

आणि म्हणून बैतुलमुकद्दसची उभारणी सर्वप्रथम झालेली आहे हा यहुदी लोकांचा दावा एतिहासिक दृष्ट्या चुकीचा आहे.

४) एकेश्वरवादाची कल्पना तितकीच जुनी आहे जितका माणूस जुना आहे. त्याच्या ऐतिहासिक पुराव्यापैकी काबागृह आहे. त्याचा पाया त्या महापुरुषाने घातला होता ज्याला यहुदी, इसाई व मुसलमान समाज (म्हणजे आजच्या जगातले बहुसंख्य लोक) आपला नेता मानतात.

११८. बक्का हे मक्काचे जुने नाव आहे. त्याचा अर्थ शरह असा होतो. जबूरमध्ये त्याचा उल्लेख आलेला आहे. परंतु यहुदी लोकांनी त्यामध्ये फेरफार करून ‘बक्केची दरी’ला ‘बुकाची दरी’ बनविले, ज्याचा अर्थ रडणरी दरी असा होतो.

‘‘शोकजनक’ खोऱ्यातून जाताना ते त्यांना झऱ्यांचे स्थानच वाटते. अगोटीचा पाऊसही त्याची आबादाणी करतो. ते अधिकाधिक शक्ति पावत जातात. सीयोनेत प्रत्येकाला देवाची दर्शन लाभते.’’(स्त्रोत्रसंहिता ८४-६, ७.)

तथापि इंगलीश बायबलमध्ये याचे भाषांतर Valley of Baca असे आढळून येते.

अशा फेरफारांच्या द्वारे त्यांनी वस्तुस्थितीवर पडदा टाकण्याचे प्रत्यन केले आहेत; हेतू हा की अल्लाहच्या गृहाला व शेवटच्या पैगंबराना लोकांनी ओळखूं नये. क़ुरआनने मक्केच्या या पुरातन नावाचा उल्लेख करून वस्तुस्थितीला स्पष्ट केले आहे.

११९. म्हणजे अध्यात्मिक लाभाचे उगम स्थान.

१२०. म्हणजे यामुळे एकेश्वरवादाचा मार्ग प्रकाशित होतो आणि माणसाचे ईश्वरी आज्ञापालनाकडे मार्गदर्शन होते.

१२१.एकेश्वरवादाच्या निशाण्या.या घराच्या लोकप्रियतेच्या निशाण्या. इस्लाम हा सत्यधर्म आहे याच्या निशाण्या. आणि निशाण्या त्याच्या की या घराच्या छायेमध्ये थोर व्यक्तींचे पालनपोषण झाले आणि त्यांच्यामध्ये वीरवृत्तीची अशाप्रकारे जोपासना केली गेली की जगातील कोणतीही शक्ती त्यांना पराभूत करू शकली नाही.

१२२. ‘मकामे इब्राहीम’ चा अर्थ हा की हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या उभे राहण्याची जागा. अभिप्रेत ती जागा आहे जेथे इब्राहीम (अलैहिस्सलाम) प्रार्थनेसाठी उभे राहत असत. ती जागा ‘मस्जिदे हराम’ मध्ये आहे. आणि येथे त्याचा उल्लेख करण्याचा उद्देश खासकरून यहूदी लोकांच्यावर हे स्पष्ट करणे आहे की हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांची प्रार्थनेची जागा. जेथे ते स्वत: प्रार्थना करीत असत हीच ‘मस्जिदे हराम’ आहे. बैतुल मुद्दस नव्हे. यहूदी लोकांनी या सत्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. आणि यासाठी तौरातमध्ये जागोजागी फेरफार केले. तरीपण प्रचलित बायबलमध्ये

असे इशारे आहेत ज्याने याचे समर्थन होते बायबल मध्ये आहे.

'' मग तो तेथून निघाला आणि बेथेलच्या पूर्वेकडे डोंगर होता तेथे जाऊन त्याने डेरा दिला. त्याच्या पश्चिमेस बेथेल होते. व पूर्वेस आय होते. तेथे त्याने परमेश्वराची वेदी बांधली आणि परमेश्वराच्या नांवाने प्रर्थना केली. तेथून निधून अब्राम प्रवास करीत नेगेबकडे गेला''
(उत्पति १२-८, ९)

'बथेलशी अभिप्रेत अल्लाहाचे घर-बैतुल्लाह-आहे. कारण हिब्रू भाषेत 'अेल परमेश्वराला म्हणतात. आणि म्हणून बेथेलचा शब्दार्थ अल्लाहचे घर असा होतो. काबा गृहाच्या पूर्वेस सफा व मरवाच्या टेकड्या आहेत. सफाच्या टेकडीवर हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांची राहण्याची जागा होती. आणि मरवावर हज़रत इस्माईल (अलैहिस्सलाम) यांच्या कुरबानीची घटना घडली. दक्षिणेकडे हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या जाण्याचा जो उल्लेख आहे त्याने अभिप्रेत अरफातचा प्रवास आहे. कारण अरफात बैतुल्लाहच्या आग्नेयेस आहे.

मकामे इब्राहीमचा हा मूळ व व्यापक असा अर्थ आहे. आणि मुकामे इब्राहीम त्या दगडालाही म्हणतात ज्यावर उभे राहून हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी काबागृहाची उभारणी केली. या दगडावर असाधारणपणे हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या पायाचा ठसा उमटला होता. आणि आजही हा दगड त्या शुभ ठश्यासह अस्तित्वात आहे, जो काबागृहाजवळ प्रदक्षिणेच्या मार्गावर ठेविला गेला आहे. जणू इतिहासाने हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी काबागृहाची उभारणी केली याबद्दल कोणास कसलाही संशय राहू नये म्हणून त्यांच्या या पुरातन निशाणीलाही सुरक्षित ठेविले आहे.

१२३. म्हणजे त्या स्पष्ट निशाण्यानंतर सुद्धा जे लोक एकेश्वरवादाचा स्वीकार करण्यास आणि अल्लाहच्या गृहाला एकेश्वरवादाचे केंद्र म्हणून मानण्यास तयार नाहीत ते काफिर-इन्कार करणारे-आहेत. आणि अल्लाहला आपल्या निशाण्या उघड केल्यानंतर या गोष्टीची पर्वा नाही की कोण इन्काराचा मार्ग अनुसरतो व कोण ईमानाचा.

हज्ज हे इस्लामचे महत्वाचे कर्तव्य आहे व तो इस्लामचा पाचवा स्तंभ आहे. ऐपत असताना देखील हज्ज न करणे म्हणजे बैतुल्लाहच्या बाबतीत एकप्रकारची बेपरवाई व्यक्त करणे होय. यहूदी व ईसाई लोकांनीही हीच पद्धत अवलंबिली होती. हदीसमध्ये आहे की

'' जो माणूस ऐपत असताना देखील हज्ज करीत नाही तो यहूदी म्हणून मेला वा ईसाई म्हणून, याची अल्लाहला पर्वा नाही.''

१२४. इशारा त्या शंकांच्याकडे आहे ज्या ग्रंथधारी लोक बैतुल्लाह आणि शेवटचे पैगंबर यांच्यासंबंधात लोकांच्या मनात निर्माण करीत होते.

१२५. अल्लाहच्या मार्गात वाकडेपणा निर्माण करणे याचा अर्थ हा की त्याच्या मूळधर्मामध्ये फेरफार करणे आणि त्यामध्ये नवीन प्रथा वगैरे सुरु करणे.

१२६. म्हणजे तुम्हाला सत्याधर्माचे साक्षीदार बनवून उभे केले गेले होते. परंतु तुम्ही सत्याच्या साक्षी ऐवजी अत्याचाराची साक्ष देणे व सत्याला लपविणे हा आपला धर्म बनविला.

१२७. इशारा खास करून ग्रंथधारकांच्या त्या गटाकडे आहे ज्यांच्या आक्षेपांचा व विरोधाचा वर उल्लेख आलेला आहे.

१२८. म्हणजे अशा परिस्थितीत जेव्हा तुम्हाला अल्लाहच्या आयती ऐकविल्या जात आहेत आणि त्याचा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) देखील तुमच्या दरम्यान उपस्थित आहे, जर तुम्ही इन्काराचा मार्ग पत्करला तर ही मोठी गंभीर व अत्यंत दुर्दैवी गोष्ट ठरेल.

१२९. अल्लाहला दृढपणे धरण्याचा अर्थ त्याच्याबरोबर दाट संबंध व सानिध्य प्रस्थापित करणे.

१३०. हे आहे अपेक्षित ध्येय. माणसाने अल्लाहचे भय, जसा त्याचा हक्क आहे. तसे बाळगावे राहीली संयमाची धार्मिक व कायदेशीर मर्यादा, तर त्याबाबतीत दुसऱ्या जागी फर्माविले आहे की فاتقوا الله ما استطعتم ''अल्लाहचे त्या मर्यादेपावतो भय बाळगा जेथे पावेतो तुमच्या सामर्थ्यात आहे.''( सूरे तगाबून -१६)

१३१. म्हणजे सारे आयुष्य इस्लामवर कायम राहा आणि जेव्हा जगाचा निरोप घ्याल तेव्हा मुसलमान म्हणून निरोप घ्या.



काबागृह (बैतुल्लाह)

१०३. आणि अल्लाहच्या दोरीला [१३२] सर्वजण मिळून [१३३] बळकट धरा. आणि फूट पडू देऊ नका.[१३४] आणि अल्लाहच्या कृपेचे स्मरण करा की तुम्ही एक दुसऱ्याचे शत्रू होता.[१३५]त्याने तुमची मने जोडली आणि त्याच्या कृपेने तुम्ही भाऊ-भाऊ बनला. तुम्ही आगीच्या खंदकाच्या काठावर उभे होता, तेव्हा त्याने तुम्हाला वाचविले. अशाप्रकारे अल्लाह आपल्या आयती (अदेश) स्पष्ट करतो की, तुम्हांला मार्ग लाभावा.[१३६]

وَاعْتَصِمُوْا بِحَبْلِ اللّٰهِ جَمِيْعًا وَّلَا تَفَرَّقُوْا وَاذْكُرُوْا نِعْمَتَ اللّٰهِ
عَلَيْكُمْ اِذْ كُنْتُمْ اَعْدَآءً فَاَلَّفَ بَيْنَ قُلُوْبِكُمْ فَاَصْبَحْتُمْ
بِنِعْمَتِهٖۤ اِخْوَانًا ۚ
وَكُنْتُمْ عَلٰى شَفَا حُفْرَةٍ مِّنَ النَّارِ فَاَنْقَذَكُمْ مِّنْهَا ؕ كَذٰلِكَ
يُبَيِّنُ اللّٰهُ لَكُمْ اٰيٰتِهٖ لَعَلَّكُمْ تَهْتَدُوْنَ ﴿١٠٣﴾

१०४. तुमच्यामध्ये एक गट असा अवश्य असला पहिजे जो 'खैर' (भलाई) कडे आवाहन करणारा, चांगल्याची आज्ञा देणारा आणि वाईटापासून रोखणारा आहे [१३७] अशाच लोकांना सफलता प्राप्त होणार आहे.

وَلْتَكُنْ مِّنْكُمْ اُمَّةٌ يَّدْعُوْنَ اِلَى الْخَيْرِ وَيَاْمُرُوْنَ بِالْمَعْرُوْفِ
وَيَنْهَوْنَ عَنِ الْمُنْكَرِ ؕ وَاُولٰٓئِكَ هُمُ الْمُفْلِحُوْنَ ﴿١٠٤﴾

१०५. आणि त्या लोकांप्रमाणे होऊ नका ज्यांची फाटाफूट झाली आणि स्पष्ट अशी शिकवण लाभल्यानंतर ज्यांनी मतभेद (विरोध) केला.[१३७(अ)] अशा लोकांच्यासाठी कडक शिक्षा आहे.

وَلَا تَكُوْنُوْا كَالَّذِيْنَ تَفَرَّقُوْا وَاخْتَلَفُوْا مِنْۢ بَعْدِ مَا جَآءَهُمُ
الْبَيِّنٰتُ ؕ وَاُولٰٓئِكَ لَهُمْ عَذَابٌ عَظِيْمٌ ﴿١٠٥﴾

१०६. त्यादिवशी कितीतरी चेहरे उजाळतील आणि किती तरी चेहरे काळवंडतील.आणि ज्यांचे चेहरे काळवंडतील त्यांना विचारले जाईल की काय तुम्ही ईमान आणल्या नंतर कुफ्र (इन्कार) केला? तर मग आपल्या इन्काराच्या बदल्यात शिक्षेची मजा चाखा.

يَّوْمَ تَبْيَضُّ وُجُوْهٌ وَّتَسْوَدُّ وُجُوْهٌ ۚ فَاَمَّا الَّذِيْنَ اسْوَدَّتْ
وُجُوْهُهُمْ ۟ اَكَفَرْتُمْ بَعْدَ اِيْمَانِكُمْ فَذُوْقُوا الْعَذَابَ
بِمَا كُنْتُمْ تَكْفُرُوْنَ ﴿١٠٦﴾

१०७. आणि ते लोक, ज्यांचे चेहरे उजाळलेले असतील. ते तर अल्लाहच्या कृपेत असतील.व या परिस्थितीत ते कायमचे राहतील.

وَاَمَّا الَّذِيْنَ ابْيَضَّتْ وُجُوْهُهُمْ فَفِيْ رَحْمَةِ اللّٰهِ ؕ هُمْ فِيْهَا
خٰلِدُوْنَ ﴿١٠٧﴾

१०८. या अल्लाहच्या आयती आहेत,ज्या आम्ही तुम्हाला ठीक ठीक ऐकवित आहोत.आणि अल्लाह दुनियेतील लोकांवर अत्याचार करू इच्छित नाही.

تِلْكَ اٰيٰتُ اللّٰهِ نَتْلُوْهَا عَلَيْكَ بِالْحَقِّ ؕ وَمَا اللّٰهُ
يُرِيْدُ ظُلْمًا لِّلْعٰلَمِيْنَ ﴿١٠٨﴾

१०९. जे काही आकाशामध्ये आहे आणि जे काही जमिनीवर आहे. ते सर्व अल्लाहच्याचसाठी आहे. आणि सारे व्यवहार सरतेशेवटी त्याच्याच हुजूर सादर होतील.

وَلِلّٰهِ مَا فِى السَّمٰوٰتِ وَمَا فِى الْاَرْضِ ؕ وَاِلَى اللّٰهِ تُرْجَعُ
الْاُمُوْرُ ﴿١٠٩﴾

१३२. 'हब्ल' (दोरी) ने अभिप्रेत अल्लाहचा ग्रंथ ''पवित्र क़ुरआन'' ज़ो दासांना अल्लाहशी जोडतो. आणि त्याचा दर्जा वचन व प्रतिज्ञेचा आहे. आणि म्हणून याला धरणे म्हणजे अल्लाहला धरणे होय. हदीस मध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यानी फर्माविले

كتاب الله هو حبل الله الممدود من السماء الى الارض

''अल्लाहचा ग्रंथ हीच अल्लाहची दोरी आहे, जी आकाशापासून जमीनीपर्यंत सोडलेली आहे.'' (इब्ने कसीर)

१३३. मुसलमानांनी फक्त वैयक्तिकरित्या नव्हे तर सामुहीकरित्या देखील क़ुरआनला दृढपणे धरून असावे. आणि समाजामध्ये याच ग्रंथाला केंद्रीय दर्जा व महत्त्व प्राप्त असावे. आणि मुसलमानांचा त्याच्याशी अत्यंत जवळचा संबंध असावा.

१३४. फाटाफूट या परिस्थितीत निर्माण होते जेव्हा अल्लाहच्या ग्रंथाशी असलेला संबंध कमजोर होतो. आणि प्रत्यक्षात पवित्र क़ुरआनला मध्यवर्ति केंद्र; शरणस्थान व कसोटीचा दर्जा दिला जात नाही. पण तोंडाने मात्र त्याच्यावरील निष्ठेचा वरचेवर उल्लेख केला जात असतो.

अल्लाहच्या ग्रंथाला स्पष्टीकरणाच्या आधाराचा दर्जा देण्या ऐवजी व्यक्तींची वचने व त्यांची पुस्तके यांना आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. आणि मग निष्ठावंताचे जे वर्ग अस्तित्वात येतात ते आपापल्या 'इमामांच्या' आपापल्या 'सूफींच्या', आपापल्या 'वडिलधाऱ्यांच्या', आपापल्या 'पुढाऱ्यांच्या', आणि आपापल्या 'महापंडितांच्या दोरीला इतके बळकट धरतात की अल्लाहची दोरी-पवित्र क़ुरआन- हातातून सुटून गेल्याची थोडी सुद्धा जाणीव त्यांना होत नसते. परिणाम हा होतो की गंभीर मतभेद व गटबाजी समाजात निर्माण होऊ लागते आणि समाजाची बांधणी विस्कळीत होते.

''दुर्दैव हे आहे की ही तंबी असतांना देखील मुसलमानामध्ये गट निर्माण झाले. या गटबाज्या याच स्थितीस समाप्त होऊ शकते. जेव्हा मुसलमान आपल्या गटाचा व पंथाचा विचार न करता अल्लाहच्या ग्रंथाला तेच स्थान देतील ज्या स्थानाचा त्याचा हक्क आहे व त्याच्याशी दाट संबंध प्रस्थापित करतील.''

१३५. इशारा अरबांच्या आपापसातील वैराकडे आहे. त्याचा परिणाम हा झाला होता की, त्यांची एक जमात (कबीला) नेहमी दुसऱ्या जमातीविरूद्ध लढाईस सज्ज असे.

१३६. म्हणजे या धर्माची कदर करा ज्याने तुमच्या मध्ये बंधु-भाव व कमाल दर्जाचे एक्य निर्माण केले आहे. स्पष्ट झाले की इस्लामच तो आधार आहे ज्याचा योग्य प्रकारे अंगिकार केल्याने मानवी समाजामध्ये खऱ्या अर्थाने बंधुभाव, संपूर्ण एकोपा व भावनात्मक एक्य निर्माण होते.

१३७. सत्कृत्याचे आवाहन करणे व दुष्कृत्यापासून रोखणे हा प्रत्येक मुसलमानाचा आवश्यक असा गुण आहे हे क़ुरआनच्या खुलाशाने स्पष्ट आहे. परंतु इस्लामच्या आवाहनाचे कार्य करावयाचे झाल्यास त्याला तयारी पण केली पाहिजे व तशी योग्यता पण संपादन केली पाहिजे. त्यासाठी वेळही द्यावा लागतो व आटोकाट प्रयत्नही करावे लागतात. आणि म्हणून या कार्यासाठी एक स्वतंत्र गट असणे आवश्यक आहे. म्हणजे हे कर्तव्य योग्य प्रकारे व चांगल्या रितीने पार पाडले जाईल. मुसलमान समाजाची ही महान जबाबदारी आहे की त्याने आपल्यामध्ये ज्ञानी व कार्यक्षम अशा सत्याच्या अवाहकांचा एक गट उभारावा आणि या कार्यासाठी त्या गटाला आवश्यक ती सर्व साधन सामुग्री उपलब्ध करून द्यावी. समाज याबाबतीत जर आळस करील तर तो आपले नेमून दिलेले कर्तव्य पार पाडण्या बाबतीत चुकार ठरेल. कारण या समाजाला मध्यममार्गी समाज याच आधारावर बनविले गेले आहे की त्याला मानवते समोर सत्याची साक्ष देण्याचे कर्तव्य पार पाडावयाचे आहे.

आयती मध्ये ''खैर''ने अभिप्रेत इस्लाम धर्म आहे, ज्यामध्ये एहिक व अखिरतचे 'भले' चांगल्या गोष्टी सामाविलेल्या आहेत. आणि 'मअरूफ' चा अर्थ सुपरिचित अशा चांगल्या गोष्टी उदा. अल्लाहचे भय, आई वडिलाबरोबर सद्वर्तन, सहृदयता, शेजाऱ्यां बरोबर चांगले वर्तन, गरजवंतांचे साह्य, सत्यता व विश्वास पात्रता, न्यायनीती, अत्याचार पीडितांचे समर्थन वगैरे. 'मुन्कर ने अभिप्रेत त्या वाईट गोष्टी आहेत ज्यांचे वाईट असणे अगदी उघड आहे. उदा. अल्लाहचा इन्कार विनाकारण हत्या करणे, अत्याचार, असत्य, वचनभंग, धोका, विश्वासघात, अनाथांच्या मालाचा अपहार, कृपणता, व्यभिचार निर्लज्जपणा नंगेपणा वगैरे वगैरे. ही ती सत्कृत्ये आणि ही ती दुष्कृत्यें आहेत ज्यांना माणूस स्वभावत; सत्कृत्ये व दुष्कृत्यें ठरवितो. कारण त्या चांगल्या गोष्टी आहेत व त्या वाईट गोष्टी आहेत हे त्याला माहित आहे. आणि या दृष्टीने प्रत्येक व्यक्ति आपल्या कृत्यास जबाबदार आहे. आणि अल्लाहसमोर उत्तरदायि आहे. इस्लामने चांगल्या व वाईटाची जी तपशील प्रस्तुत केला आहे. त्यामध्ये ती सत्कृत्ये व दुष्कृत्यें आहेत ज्यांचा निर्देश मानवी स्वभाव करतो.

सत्कृत्यासाठी लोकांना तयार करणे आणि दुष्कृत्यापासून त्यांना परावृत्त राखण्यासाठी प्रबोधन व प्रोत्साहनाची आवश्यकता आहे. आणि काही प्रसंगी शक्तीचाही वापर करावा लागतो. आणि म्हणून असा एक गट उभारण्याचा

आदेश दिला गेला आहे जो प्रामुख्याने हे कार्य करीत राहील. आणि जेथे मुसलमानांच्या हाती सत्ता आहे तेथे त्या सत्तेचा वापर भलेपणाच्या संवर्धनासाठी आणि वाईटाच्या दमना साठी झाला पाहिजे.

१३७.[अ] ''ज्यांची फाटाफूट झाली आणि स्पष्ट शिकवण लाभल्यानंतर ज्यांनी मतभेद (विरोध) केला.''संकेत यहूद व ख्रिस्त कडे आहे ज्यांना तौरात व इनजील द्वारा धर्माची स्पष्ट कल्पना दिली गेली होती आणि त्यांवर ऐकेश्वरवादाचा उद्देश चांगल्या प्रकारे प्रकट झाला होता. तसेच धर्माची शिकवण उघडपणे वर्णन केले गेले होते पण त्यांनी संभाषण व धर्मशास्त्राज्ञात गुर्फटुन कित्तेक समस्या उत्पन्न करून घेतले ज्याचा परिणाम हा निघाला की ते धार्मिक गटात वाटून गेले आणि मतभेद व विभक्तेचे शिकार झाले येथे यहूद व ख्रिस्तच्या पद्धत्तीचा पुरावा देण्याने अभिप्रेत मुसलमानांना सचेत करणे की पवित्र क़ुर्आन द्वारे जे सत्य त्यांच्यावर स्पष्ट झाला आहे आणि जी प्राकाशमान मार्गदर्शने त्यांना लाभली आहेत त्याची त्यानी प्रतिष्ठा करावी आणि मार्गभ्रष्ट समुदायाच्या पदचींनावर चालू नए.

खेद की या चेतावणी नंतरही मुसलमानांनी क़ुरआनाचे स्पष्ट मार्गदर्शानात येथपावेतोकी श्रध्दा मध्येही नवीन प्रश्न उपस्थित केले ज्याने धर्माची कल्पना बिगडून गेली आणि ते मतभेद व विसकटेत सापडले. आणि मग मतभेदाच्या अतिरिका मुळे सांप्रदायिकता ला जन्म दिले आणि सध्यार्च्य परिस्थिती हि झाली आहे की प्रत्येक संप्रदाया माध्ये धर्माची कल्पनाही वगळी आहे. प्रर्स्थीतीवर वास्तवीक आणि प्रभावशाली उपचार हे आहे की क़ुरआनाची शिकवण चे अनुसार एक असा गट उठून उभा रहावा ज्यांचे प्रेत्येक सांप्रादायिक गटबाजी, अणी पंथ पक्षपाताने वर उठून प्रत्यक्षपणे आणि स्पष्टपणे या धर्माकिड आवाहन करावे ज्याला क़ुरआनने ''खैर'' (मंगेल!शुभ) ने संभोदिले आहे.

**तुम्ही उत्तम समाज आहात, ज्याला लोकांच्या (सुधारणे व मार्गदर्शना) साठी उभे केले गेले आहे. तुम्ही चांगल्याची आज्ञा देता आणि वाईटापासून रोखता आणि अल्लाहवर ईमान ठेविता. ग्रंथधारकांनी ईमान आणले असते तर ते त्यांच्यासाठी चांगले होते.त्यांच्यापैकी काही तर मोमिन आहेत. परंतु अधिकांश लोक दुराचारी आहेत.(अल-क़ुरआन)**

११०. तुम्ही उत्तम समाज आहात,[१३८] ज्याला लोकांच्या (सुधारणे व मार्गदर्शना) साठी उभे केले गेले आहे. तुम्ही चांगल्याची आज्ञा देता आणि वाईटापासून रोखता आणि अल्लाहवर ईमान ठेविता. ग्रंथधारकांनी ईमान आणले असते तर ते त्यांच्यासाठी चांगले होते.[१३९] त्यांच्यापैकी काही तर मोमिन आहेत. परंतु अधिकांश लोक दुराचारी आहेत.

كُنْتُمْ خَيْرَ أُمَّةٍ أُخْرِجَتْ لِلنَّاسِ تَأْمُرُونَ
بِالْمَعْرُوفِ وَتَنْهَوْنَ عَنِ الْمُنْكَرِ وَتُؤْمِنُونَ بِاللَّهِ ۗ
وَلَوْ آمَنَ أَهْلُ الْكِتَابِ لَكَانَ خَيْرًا لَهُمْ ۚ مِنْهُمُ الْمُؤْمِنُونَ
وَأَكْثَرُهُمُ الْفَاسِقُونَ ﴿١١٠﴾

१११. थोडीशी इजा पोहोचविण्याखेरीज ते तुमचे काही नुकसान करू शकत नाहीत. आणि जर ते तुमच्याशी लढाई करतील तर पाठ दाखवतील.[१४०] नंतर त्यांना कोठूनही मदत मिळू शकणार नाही.

لَنْ يَضُرُّوكُمْ إِلَّا أَذًى ۖ وَإِنْ يُقَاتِلُوكُمْ يُوَلُّوكُمُ
الْأَدْبَارَ ثُمَّ لَا يُنْصَرُونَ ﴿١١١﴾

११२. ते जेथे जेथे आढळून आले त्यांच्या वाट्यास अपमान व तिरस्कारच आला. फक्त अल्लाहच्या करारामुळे वा लोकांच्या करारांमुळे त्यांना (तात्पुरता) आसरा लाभला असेल इतकेच. [१४१] ते अल्लाहच्या कोपास पात्र झाले आणि अवहेलना व दारिद्र्याला त्यांच्यावर लादण्यात आहे. [१४२] हे यासाठी झाले की ते अल्लाहच्या आयतींचा इन्कार करू लागले होते. आणि पैगंबरांची विनाकारण हत्या करीत होते. आणि हा परिणाम आहे त्यांच्या आज्ञाभंगाचा आणि त्या गोष्टींचा की ते मर्यादेचा भंग करू लागले होते. [१४३]

ضُرِبَتْ عَلَيْهِمُ الذِّلَّةُ أَيْنَ مَا ثُقِفُوا إِلَّا بِحَبْلٍ مِنَ اللَّهِ
وَحَبْلٍ مِنَ النَّاسِ وَبَاءُوا بِغَضَبٍ مِنَ اللَّهِ وَضُرِبَتْ عَلَيْهِمُ
الْمَسْكَنَةُ ۚ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ كَانُوا يَكْفُرُونَ بِآيَاتِ اللَّهِ
وَيَقْتُلُونَ الْأَنْبِيَاءَ بِغَيْرِ حَقٍّ ۚ ذَٰلِكَ بِمَا عَصَوْا
وَكَانُوا يَعْتَدُونَ ﴿١١٢﴾

११३. ते सर्व सारखे नाहीत. त्या ग्रंथधारकांमध्ये एक गट असाही आहे जो (प्रतिज्ञेवर) क़ायम आहे. हे लोक रात्रीच्या प्रहरी अल्लाहच्या आयतीची तिलावत करतात आणि त्याच्या हुजर नतमस्तक होतात.

لَيْسُوا سَوَاءً ۗ مِنْ أَهْلِ الْكِتَابِ أُمَّةٌ قَائِمَةٌ يَتْلُونَ
آيَاتِ اللَّهِ آنَاءَ اللَّيْلِ وَهُمْ يَسْجُدُونَ ﴿١١٣﴾

११४. हे लोक अल्लाहवर आणि आखिरतच्या दिवसावर ईमान बाळगतात. चांगल्याची आज्ञा देतात. वाईटापासून रोखतात आणि भलाईच्या कामामध्ये उत्साहाने भाग घेतात. हे सदाचारी लोकांपैकी आहेत. [१४४]

يُؤْمِنُونَ بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ وَيَأْمُرُونَ
بِالْمَعْرُوفِ وَيَنْهَوْنَ عَنِ الْمُنْكَرِ وَيُسَارِعُونَ
فِي الْخَيْرَاتِ ۖ وَأُولَٰئِكَ مِنَ الصَّالِحِينَ ﴿١١٤﴾

११५. जो सदाचारही हे लोक करतील त्याची उपेक्षा केली जाणार नाही. आणि अल्लाह संयमी व विवेकी लोकांना चांगल्याप्रकारे जाणतो.

وَمَا يَفْعَلُوا مِنْ خَيْرٍ فَلَنْ يُكْفَرُوهُ ۗ وَاللَّهُ
عَلِيمٌ بِالْمُتَّقِينَ ﴿١١٥﴾

१३८. ''खैर-उम्मत'' (उत्तम समाज) चांगला समाज-या आधारावर की हाच समाज सत्य धर्मावर क़ायम आहे. ग्रंथधारकांनी बंडखोरीचे मार्ग पत्करले. आणि ते मूळधर्माला गामावून बसले. आता मानवतेची सुधारणा व तिचे मार्गदर्शन व शिकवणीसाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुसलमान समाजाला उभारले आहे. या समाजाचा गुणधर्म हा आहे की हा समाज ईमान बाळगून चांगल्याचे आवाहन करतो व वाईटापासून रोखण्याचे कर्तव्य पार पाडतो. याच आधारावर या समाजाला ''खैर-उम्मत'' ही पदवी दिली गेली आहे. ग्रंथधारक समजतात त्याप्रमाणे वंश व संबंधाच्या आधारावर नव्हे.

चांगला समाज या पदास पैगंबराचे सहकारी अनुयायी सर्वथा पात्र होते. आणि त्यांच्यानंतर ते लोक ज्यांच्यामध्ये हा गुणधर्म आढळून आला. ते मुसलमान ज्यांना ईमान बद्दल काही आस्था नाही आणि ज्यांची सारी धावपळ वाईटाला क़ायम करणे व चांगल्याला मिटविण्यासाठी होत असते. आपल्या पदाचा गैरवांपर करतात. असे लोक वस्तुत: खैर-उम्मत म्हणून घेण्यास पात्र नाहीत. (पाहा सूरे बकरा. टीप नं. १६६)

१३९. म्हणजे हे यहूदी व ईसाई लोक पवित्र क़ुरआन व ते आणणाऱ्या पैगंबरांच्यावर ईमान आणून 'खैर-उम्मत' मध्ये सामील झाले असते तर ते त्यांच्या बाबतीत चांगले झाले असते. परंतु त्यांच्यामध्ये ईमान आणणारे थोडे आहेत आणि अवज्ञाकारी व दूराचारी लोकांची संख्या अधिक आहे.

१४०. हे त्या वेळेच्या ग्रंथधारकांच्या अवस्थेचे निवेदन आहे. ते अतिशय भ्याड आहेत आणि म्हणून ते फक्त त्रास देतात. खऱ्या निष्ठावानांच्या विरोधात ते टिकू शक्त नाहीत. नंतरच्या घटनांनी क़ुरआनच्या या निवेदनाचे समर्थन झाले. ग्रंथधारकांना ज़बरदस्त विराधाला तोंड द्यावे लागले.

१४१. म्हणजे ते आपल्या सामर्थ्यावर उभे नाहीत. कोठे इस्लामी राज्यसत्तेने करारातहत त्यांना संरक्षण दिले आहे तर कोठे इतर समाजांनी त्यांना आश्रय दिलेला आहे.हे आधार तात्पुरते आहेत. त्यांचे स्वत:चे असे सामर्थ्य व प्रतिष्ठा नाही.

१४२. ऐहिक ऐश्वर्याच्या प्रभावाच्या परिणामस्वरूप आखिरतला प्राधान्य देणे आणि धर्मासाठी त्याग व कुर्बानी करण्याची हिम्मत करणे या गोष्टी त्यांच्यामध्ये शिल्लक राहिलेल्या नव्हत्या. आणि ते वैचारिक अधोगति व आचरणीय दौर्बल्याच्या टोकास पोहचले होते.

१४३. त्यांच्या या गुन्ह्याच्या पुरावा बायबलमध्ये उपलब्ध आहे.

''यरूशलेमे, यरूशलेमे ! संदेष्ट्यांचा घात करणाऱ्ये, व तुझ्याकडे पाठविलेल्यांस धोंडमार करणाऱ्य !''(मत्तय - २३-३७)

''पण त्यांनी आज्ञाभंग करून तुजविरूद्ध बंड केले. तुझे धर्मशास्त्र त्यांनी पाठीमागे फेकू न दिले. तुजकडे त्यांनी पुन: वळावे असे ज्या तुझ्या संदेष्ट्यांनी निक्षून सांगितले त्यास त्यांनी जिवे मारिले आणि तुला संतप्त केले. त्यामुळे तू त्यांस त्यांच्या शत्रूंच्या हाती दिले.''(नहेम्या ९-२६,२७)

१४४. हा ग्रंथधारकांपैकी त्या गटाचा उल्लेख आहे जो अल्लाह बरोबर केलेल्या प्रतिज्ञेवर क़ायम होता. हे लोक सदाचारी, ईमानदार होते आणि जसजशी त्यांच्यावर क़ुरआन व पैगंबर यांची सत्यता स्पष्ट होत गेली तसतसे ते ईमान आणून मुसलमानांच्या पक्षात सामील होत गेले. क़ुरआन ने येथे ग्रंथधारकांपैकी अशाच लोकांची प्रशांसा केली आहे.

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا لَنْ تُغْنِيَ عَنْهُمْ أَمْوَالُهُمْ وَلَا أَوْلَادُهُمْ
مِّنَ اللّٰهِ شَيْـًٔا ۗ وَأُولٰٓئِكَ أَصْحٰبُ النَّارِ ۚ هُمْ فِيهَا خٰلِدُونَ ﴿١١٦﴾

११६. (परंतु) ज्या लोकांनी कुफ्र (इन्कार) केले त्यांची संपत्ती व त्यांची संतती अल्लाहच्या विरोधात त्यांच्या काही उपयोगी पडणार नाही.[१४५] ते दोजखी आहेत व तेथे ते क़ायमचे राहतील.

مَثَلُ مَا يُنْفِقُونَ فِي هٰذِهِ الْحَيٰوةِ الدُّنْيَا كَمَثَلِ رِيحٍ فِيهَا
صِرٌّ أَصَابَتْ حَرْثَ قَوْمٍ ظَلَمُوٓا أَنْفُسَهُمْ فَأَهْلَكَتْهُ ۚ وَمَا
ظَلَمَهُمُ اللّٰهُ وَلٰكِنْ أَنْفُسَهُمْ يَظْلِمُونَ ﴿١١٧﴾

११७. दुनियेतील या जीवनात ते जे काही खर्च करतात त्याचे उदाहरण त्या वाऱ्यासारखे आहे ज्यामध्ये हिम असते. आणि ते ज्यांनी स्वत:वर अत्याचार केलेला आहे अशा लोकांच्या पिकावरुन वाहते व तो नष्ट करून टाकते.[१४६]अल्लाहने त्यांच्यावर अत्याचार केला नाही. तर हे लोकच स्वत:वर अत्याचार करीत आहेत.

يٰٓأَيُّهَا الَّذِينَ اٰمَنُوا لَا تَتَّخِذُوا بِطَانَةً مِّنْ دُونِكُمْ
لَا يَأْلُونَكُمْ خَبَالًا ۖ وَدُّوا مَا عَنِتُّمْ ۚ قَدْ بَدَتِ الْبَغْضَآءُ
مِنْ أَفْوَاهِهِمْ ۖ وَمَا تُخْفِي صُدُورُهُمْ أَكْبَرُ ۚ قَدْ بَيَّنَّا لَكُمُ الْاٰيٰتِ
إِنْ كُنْتُمْ تَعْقِلُونَ ﴿١١٨﴾

११८. ईमान आणलेल्या लोकांनो !स्वत:खेरीज इतर कोणासही आपला विश्वासू बनवू नका.[१४७] ते तुम्हांला नुकसान पोहोचविण्याकामी आपल्याकडून काही उणीव होऊ देणार नाहीत. तुम्ही संकटात पडावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांचे शत्रुत्व त्यांच्या तोंडून उघड झालेले आहे. आणि जे काही त्यांच्या अंत:करणात लपलेले आहे ते याहूनही अधिक (भयंकर) आहे.आम्ही तुमच्यासाठी आमचे आदेश स्पष्ट केलेले आहोत-जर तुम्ही विचार करून वागाल.

هٰٓأَنْتُمْ أُولَآءِ تُحِبُّونَهُمْ وَلَا يُحِبُّونَكُمْ وَتُؤْمِنُونَ بِالْكِتٰبِ
كُلِّهٖ ۚ وَإِذَا لَقُوكُمْ قَالُوٓا اٰمَنَّا ۖۚ وَإِذَا خَلَوْا عَضُّوا عَلَيْكُمُ
الْأَنَامِلَ مِنَ الْغَيْظِ ۚ قُلْ مُوتُوا بِغَيْظِكُمْ ۗ إِنَّ اللّٰهَ عَلِيمٌ
بِذَاتِ الصُّدُورِ ﴿١١٩﴾

११९. तुम्ही तर त्यांच्याबद्दल स्नेह बाळगता. पण ते तुमच्याबद्दल स्नेह बाळगीत नाहीत.[१४८] आणि तुम्ही तर सर्व ग्रंथांवर ईमान आणता. ते जेव्हा तुम्हांला भेटतात तेव्हा म्हणतात, आम्ही ईमान आणतो.[१४९] आणि जेव्हा अलग असतात तेव्हा रागाने आपल्या बोटांचा चावा घेत असतात. त्यांना सांगा. आपल्या रागात जळून भस्म व्हा. अल्लाह त्या गोष्टींना चांगल्या प्रकारे जाणतो ज्या त्यांच्या अंत:करणात लपलेल्या आहेत.

إِنْ تَمْسَسْكُمْ حَسَنَةٌ تَسُؤْهُمْ ۖ وَإِنْ تُصِبْكُمْ سَيِّئَةٌ
يَفْرَحُوا بِهَا ۖ وَإِنْ تَصْبِرُوا وَتَتَّقُوا لَا يَضُرُّكُمْ كَيْدُهُمْ
شَيْـًٔا ۗ إِنَّ اللّٰهَ بِمَا يَعْمَلُونَ مُحِيطٌ ﴿١٢٠﴾

१२०. तुम्हांला सुस्थिति प्राप्त झाली की त्यांना ते पाहवत नाही.आणि जेव्हा एखादे संकट तुमच्यावर येते तेव्हा त्यांना आनंद होतो.[१५०] परंतु तुम्ही धीर धराल, संयमी व विवेकी बनाल [१५१] तर त्यांच्या कारावायांनी तुमचे काही नुकसान होणार नाही. आणि ते ज्या हालचाली करीत आहेत,(तर जाणा की) अल्लाहने त्यांना वेढलेले आहे.

१४५. त्यांना इन्कारास प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी म्हणजे संतती व संपत्तीचे प्रेम या आहेत. या गोष्टी त्यांना अल्लाहच्या शिक्षेपासून वाचविणार नाहीत.

१४६. या उदाहरणामध्ये हवा म्हणजे दानधर्म आहे. रोग म्हणजे खऱ्या ईमानाची उणीव आणि इन्कार आहे. शेती म्हणजे हिरवेगार जीवन. वारे हे पीकांसाठी उपयोगी आहेत. पण जर त्यामध्ये हिम असेल तर ते शेतीसाठी नुकसान दायक ठरतात. कारण हिमवृष्टी पिकांचा नाश करते. त्याचप्रमाणे दानधर्म ही चांगली गोष्ट असली तरी त्याच्यामागे ईमानाची भावना नसेल आणि इन्काराचे विष त्यामध्ये मिसळलेले असेल तर ते आखिरतच्या फलाचा नाश करून ठेविते.

१४७. या आयतीमध्ये मुसलमानांना हा उपदेश केला गेला आहे की त्यांनी इस्लामी समाजाबाहेरील कोणा व्यक्तीबरोबर जिवा भावाचे संबंध ठेवू नयेत. कोणालाहि विश्वासू समजू नये. आणि याचे कारणही स्पष्ट केले गेले आहे की हे लोक आपल्या इस्लाम व मुस्लिम वैरामुळे तुम्हाला नुकसान पोहचविण्याकामी मागे पुढे पाहणार नाहीत. हा उपदेश लढाईच्या समयी केला गेला होता. ही शंका होती की मुसलमान यहुदी लोकांच्या बरोबरील आपल्या जुन्या संबंधांच्या आधारावर त्यांच्यासमोर लढाईच्या रहस्यांचा वगैर उल्लेख करतील. कारण यहुदी मुसलमानांच्या शत्रूंचा पाठपुरावा करीत होते. आणि इस्लाम विरूद्ध त्यांच्या मनात द्वेष निर्माण झाला होता.

यावरून जो मूलभूत उपदेश मिळतो तो हा की इस्लामी प्रभावाचे प्रयत्न जेथे लढाईच्या सीमेपर्यंत पोहचलेले असतात किंवा जेथे मुसलमानांना राजकीय सत्ता लाभलेली असते तेथे त्यांनी युद्धासंबंधीची रहस्ये आणि राजकीय डावपेच वगैरे संबंधी अत्यंत सावध असले पाहिजे. आणि त्या लोकांना, ज्यांनी ईमान आणण्यास व इस्लामी समाजात सामील होण्यास इन्कार केलेला आहे, आपला विश्वासू व जिवलग मित्र बनविण्यापासून दूर राहीले पाहिजे.

१४८. म्हणजे तुम्ही त्यांचे हितचिंतक आहात. पण ते तुमचे हितशत्रू आहेत. आणि इस्लामचे व मुसलमानांचे कट्टर शत्रूत्त्व करीत आहेत.

१४९. यहुदी या गोष्टीचा दावा करीत की ते अल्लाह व आखिरतला मानतात आणि म्हणून ईमान ठेवणारे आहेत.परंतु वस्तुस्थिति ही होती की ते कुरआनला अल्लाहचा ग्रंथ मानण्यास तयार नव्हते. क़ुरआन सांगत आहे की जोपर्यंत माणूस क़ुरआनसह अल्लाहच्या सर्व ग्रंथांचा स्वीकार करीत नाही तोपर्यंत तो कदापिही ईमान बाळगणारा नाही आणि अशा माणसाचे ईमान विश्वसनीय नाही.

१५०. हे चित्र आहे त्या लोकांचे जे या गोष्टीला पसंत करीत नाहीत की इस्लामची भरभराट व्हावी आणि इस्लामी समाजाला सत्ता व प्रभाव लाभावा. ते सदैव इस्लाम व मुसलमानांच्या बाबतीत पक्षपाती राहतात आणि मुसलमानाचे प्रत्येक यश त्यांना तापदायक होते.

१५१. येथे ईशभयाने त्या गोष्टीकडे इशारा आहे की वर जो उपदेश करण्यात आलेला आहे त्यानुसार आचरण करण्यांत यावे.

१२१. आणि [१५२] (स्मरण करा) जेव्हा तुम्ही तुमच्या घरातून पहाटेस लवकर निघाला होता आणि ईमान आणलेल्यांना (मोमिनांना) लढाईसाठी मोर्च्यावर नियुक्त करीत होता. आणि अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.

وَإِذْ غَدَوْتَ مِنْ أَهْلِكَ تُبَوِّئُ الْمُؤْمِنِينَ مَقَاعِدَ
لِلْقِتَالِ ۗ وَاللَّهُ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿١٢١﴾

१२२. त्यावेळी तुमच्यापैकी दोन गट [१५३] दुबळेपणा दाखवू इच्छित होते. यद्यपि अल्लाह त्यांचा सहाय्यक होता. आणि अल्लाहवरच ईमान आणलेल्यांनी भरवसा ठेविला पाहिजे.

إِذْ هَمَّتْ طَائِفَتَانِ مِنْكُمْ أَنْ تَفْشَلَا وَاللَّهُ وَلِيُّهُمَا ۗ وَعَلَى
اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُؤْمِنُونَ ﴿١٢٢﴾

१२३. आणि ही हकीकत आहे की अल्लाहने 'बद्र' [१५४] मध्ये तुमचे साह्य केले होते. जेव्हा तुम्ही अतिशय कमजोर होता. आणि म्हणून अल्लाहचे भय बाळगून असा. म्हणजे त्याचे कृतज्ञ बनू शकाल.

وَلَقَدْ نَصَرَكُمُ اللَّهُ بِبَدْرٍ وَأَنْتُمْ أَذِلَّةٌ ۖ فَاتَّقُوا اللَّهَ
لَعَلَّكُمْ تَشْكُرُونَ ﴿١٢٣﴾

१२४. त्यावेळी तुम्ही ईमान आणलेल्यांना विचारीत होता की काय ही गोष्ट तुमच्यासाठी पुरेशी नाही की तुमचा पालनकर्ता तीन हजार फिरिश्ते उतरवून तुमचे साह्य करील.? [१५५]

إِذْ تَقُولُ لِلْمُؤْمِنِينَ أَلَنْ يَكْفِيَكُمْ أَنْ يُمِدَّكُمْ رَبُّكُمْ بِثَلَاثَةِ
آلَافٍ مِنَ الْمَلَائِكَةِ مُنْزَلِينَ ﴿١٢٤﴾

१२५. नि:संशय तुम्ही धीर धरला आणि अल्लाहचे भय बाळगले आणि त्यांनी तुमच्यावर अचानक हल्ला केला तर तुमचा पालनकर्ता निशाण बाळगणाऱ्या-सुसज्ज अशा-पाच हजार फिरिश्त्यांद्वारे तुमचे साह्य करील.[१५६]

بَلَىٰ ۚ إِنْ تَصْبِرُوا وَتَتَّقُوا وَيَأْتُوكُمْ مِنْ فَوْرِهِمْ هَٰذَا
يُمْدِدْكُمْ رَبُّكُمْ بِخَمْسَةِ آلَافٍ مِنَ الْمَلَائِكَةِ مُسَوِّمِينَ ﴿١٢٥﴾

१२६. अल्लाहने याला तुमच्यासाठी खुशखबर बनविले आणि यासाठी की,तुमच्या मनाचे समाधान व्हावे. अन्यथा विजय तर अल्लाहकडूनच येत असतो. जो प्रबळ ही आहे आणि बुद्धिमान ही आहे.[१५७]

وَمَا جَعَلَهُ اللَّهُ إِلَّا بُشْرَىٰ لَكُمْ وَلِتَطْمَئِنَّ قُلُوبُكُمْ بِهِ ۗ وَمَا
النَّصْرُ إِلَّا مِنْ عِنْدِ اللَّهِ الْعَزِيزِ الْحَكِيمِ ﴿١٢٦﴾

१२७. आणि (तुमची मदत) यासाठी की अल्लाहने इन्कार करणाऱ्यांपैकी एका गटाचा मोड करावा किंवा त्याची इतकी अवहेलना करावी की त्याने निराश होऊन परत जावे.

لِيَقْطَعَ طَرَفًا مِنَ الَّذِينَ كَفَرُوا أَوْ يَكْبِتَهُمْ فَيَنْقَلِبُوا
خَائِبِينَ ﴿١٢٧﴾

१५२. येथून 'उहोद'च्या मोहीमेची स्थिती व घटनांचे समीक्षण सुरू होत आहे. 'उहोद' मदीनेपासून ३/४ मैलाच्या अंतरावर उत्तरेकडील एक पर्वत आहे. या पर्वताच्या पायथ्यावर शव्वाल ३हिजरी (इ.स.६२५) मध्ये ही लढाई झाली. मक्केचे कुफ़्फ़ार-इन्कार करणारे-आक्रमक बनून मदीनेवर हल्ला करण्याच्या तयारीने आले होते.आणि त्यांनी उहोद जवळ पडाव टाकला होता. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मुसलमानांच्या बरोबर विचार विनिमय केला की त्यांच्याशी सामना मदीने-बाहेर निघून केला जावा की मदीने मध्ये राहून अधिकतर लोकांचा सल्ला हा होता की बाहेर निघून सामना केला जावा तथापि दांभिक लोकांचा सरदार अब्दुल्लाह बिन उबै ने हा सल्ला दिला होता की मदीनेमध्ये राहूनच सामना केला जावा.पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी विचार विनिमयानंतर मदीनेतून बाहेर निघून सामना करण्याचा निर्णय घेतला. आणि एक हजार मुस्लमानांच्यासह ते प्रतिकारासाठी रवाना झाले. परंतु वाटेतच अब्दुल्लाह बिन अबी हा आपल्या तीनशे सहकाऱ्यासमवेत आमचा सल्ला मानला गेला नाही''असे म्हणत वेगळा झाला. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याबरोबर आता फक्त सातशे मुसलमान राहीले होते. आणि ते पण साधनसामुग्री नसलेल्या स्थितीत. परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) त्यानाच घेऊन पुढे सरसावले. आणि 'उहोद' ला पोहचल्यानंतर कुफ़्फ़ार यांच्या बरोबर सामना दिला. त्यांची संख्या तीन हजार होती व ते लढाईच्या शस्त्रांनी सज्ज होते.

१५३. अभिप्रेत खजरजचे बनू सलमा आणि औस कबिल्याचे बनू हारिसा हे आहेत. उहोदच्या लढाईत कुफ़्फ़ारची संख्या तीन हजार होती आणि मुसलमानांची संख्या फक्त एक हजार. आणि त्यामधूनही तीनशे लोक घेऊन धर्मद्रोही लोकांचा सरदार अब्दुल्लाह बिन उबै वेगळा झाला होता. या घटनेचा काहीसा परिणाम मुसलमानांच्या दोन गटांच्या धैर्यावर झाला. याकडे आयतीमध्ये इशारा करण्यात आला आहे. पवित्र क़ुरआनने यावर टीका केली आणि फर्मावले की अल्लाहच्या मार्गात ईमानधारक लोकांचा कार्यसाधक अल्लाह असतो आणि म्हणून त्याच्या मदतीवर संपूर्ण भरवसा ठेवला पाहिजे.

१५४. बद्रची लढाई हिजरी सन २ मध्ये झाली होती (मार्च इ. स ६२४ ) त्यामध्ये मुसलमान प्रभावी झाले होते.

१५५. ही गोष्ट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यावेळी फर्मावली ज्यावेळी अब्दुल्लाह बिन उबै हा आपल्या तिनशे साथीदारांना घेऊन परतला. याप्रसंगी मुसलमानांच्या प्रोत्साहनासाठी आपण फर्मावले की ''काय तुमच्यासाठी ही गोष्ट पुरेशी नाही की अल्लाह त्या तिनशेहि लोकांच्या बदल्यात तीन हजार फिरीशते उतरवून तुमची मदत करील?''

१५६. ही गोष्ट अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या समर्थनार्थ सांगितली की, तुम्ही दृढनिश्चयी राहाल व अल्लाहचे भय बाळगून संयम पाळाल तर, तीन हजारच काय पाच हजार फिरिश्त्यांच्या द्वारे तुमची मदत केली जाईल. आणि अल्लाहचा हा वायदा पुरा झाला आणि मुसलमानांनी शत्रूला पराभूत केले. परंतु शत्रूला पराभूत केल्यानंतर मुसलमानाच्या एका तुकडीने पैगंबरांच्या आज्ञेचा भंग केला आणि मोर्च्याची जागा सोडून लूटीचा माल गोळा करण्यासाठी धावले. परिणाम हा झाला की मुसलमानांना पराभव पत्करावा लागला.

''निशाण बाळगणाऱ्या फिरिश्त्यांशी'' अभिप्रेत हे आहे की ते अल्लाहच्या मार्गतील जिहादचे निशाण बाळगणारे असतील आणि खास व्यवस्थेसह या उद्दिष्टासाठी ते उतरविले जातील.

१५७. फिरिश्त्यांच्या द्वारे मदतीचा वायदा खुषखबरीच्या स्वरूपात होता. ही खुषखबर दिली गेली नसती तरी तुम्ही हेच समजले पाहिजे की विजय व सहाय्य अल्लाहच्या हाती आहे. तो प्रभावशाली आहे. इच्छितो त्याला विजयी करतो. आणि तो बुद्धिमान आहे आणि म्हणून त्याचे कोणतेही काम चातुर्यापासून मुक्त नसते.




## ओहदच्या लढाईचा नक़ाशा

**''उहोद पहाड आम्हाला प्रिय आहे आणि आम्ही त्याला प्रीय आहोत.''** *(पैग़ंबराचे वचन)*



**उहोद पहाड**

(उहोद मदीनेपासून ३/४ मैलाच्या अंतरावर आहे येथे शव्वाल ३ हिजरी (इ.स. ६३५) मध्ये लडाई झाली.)

१२८. या प्रश्नात तुम्हांला काही अधिकार नाही.[१५८] तो इच्छिल त्याला क्षमा करील किंवा इच्छिल त्याला शिक्षा करील, कारण ते अत्याचारी आहेत.

لَيْسَ لَكَ مِنَ الْأَمْرِ شَيْءٌ أَوْ يَتُوبَ عَلَيْهِمْ أَوْ يُعَذِّبَهُمْ
فَإِنَّهُمْ ظٰلِمُونَ ﴿١٢٨﴾

१२९. आणि अल्लाहसाठीच आहे जे काही आकाशांमध्ये आहे आणि जे काही जमिनीवर आहे. ज्याला इच्छिल त्याला त्याने क्षमा करावी आणि ज्याला इच्छिल त्याला त्याने शिक्षा करावी. [१५९] अल्लाह मोठा क्षमा करणारा, कृपा करणारा होय.

وَلِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْأَرْضِ ۚ يَغْفِرُ لِمَنْ يَّشَآءُ
وَيُعَذِّبُ مَنْ يَّشَآءُ ۚ وَاللّٰهُ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٢٩﴾

१३०. हे ईमान आणलेल्या लोकांनो !हे दुप्पट, चौपट व्याज खाऊ नका [१६०] अल्लाहचे भय बाळगा म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल.

يٰٓأَيُّهَا الَّذِينَ اٰمَنُوا لَا تَأْكُلُوا الرِّبٰوٓا أَضْعَافًا
مُّضٰعَفَةً ۖ وَاتَّقُوا اللّٰهَ لَعَلَّكُمْ تُفْلِحُونَ ﴿١٣٠﴾

१३१. आणि त्या आगीपासून वाचा जी इन्कार करणाऱ्यांसाठी तैयार केली गेली आहे.

وَاتَّقُوا النَّارَ الَّتِيٓ أُعِدَّتْ لِلْكٰفِرِينَ ﴿١٣١﴾

१३२. आणि अल्लाह व पैगंबरांचे आज्ञापालन करा म्हणजे तुमच्यावर कृपा केली जाईल.

وَأَطِيعُوا اللّٰهَ وَالرَّسُولَ لَعَلَّكُمْ تُرْحَمُونَ ﴿١٣٢﴾

१३३. आणि धावा आपल्या पालनकर्त्याच्या क्षमेकडे व त्या जन्नतीकडे जिची विशालता आकाशांच्या व जमीनीच्या विशालतेसारखी आहे. [१६१] आणि ही अल्लाहचे भय बाळगणाऱ्या संयमी व विवेकी लोकांसाठी तयार केली गेली आहे.

وَسَارِعُوٓا إِلٰى مَغْفِرَةٍ مِّنْ رَّبِّكُمْ وَجَنَّةٍ عَرْضُهَا السَّمٰوٰتُ
وَالْأَرْضُ ۙ أُعِدَّتْ لِلْمُتَّقِينَ ﴿١٣٣﴾

१३४. सुस्थिती असो वा बिकट स्थिती, प्रत्येक अवस्थेत जे खर्च करतात, रागाला आवर घालतात आणि लोकांच्या बरोबर सहनशीलतेने वागतात. अल्लाहला असेच सदाचारी लोक आवडतात.

الَّذِينَ يُنْفِقُونَ فِي السَّرَّآءِ وَالضَّرَّآءِ وَالْكٰظِمِينَ الْغَيْظَ
وَالْعَافِينَ عَنِ النَّاسِ ۗ وَاللّٰهُ يُحِبُّ الْمُحْسِنِينَ ﴿١٣٤﴾

१३५. हे लोक जेव्हा एखादी निर्लज्जपणाची गोष्ट करतात किंवा (एखादा गुन्हा करून) स्वत:वर अत्याचार करतात तेव्हा अल्लाहचे स्मरण करून आपल्या गुन्ह्यां बद्दल क्षमायाचना करुं लागतात- आणि अल्लाहशिवाय कोण आहे जो गुन्ह्यांची क्षमा करील-[१६२] आणि ते जाणूनबुजून आपल्या कृत्याबद्दल आग्रह धरीत नाहीत.[१६३]

وَالَّذِينَ إِذَا فَعَلُوا فَاحِشَةً أَوْ ظَلَمُوٓا أَنْفُسَهُمْ ذَكَرُوا اللّٰهَ
فَاسْتَغْفَرُوا لِذُنُوبِهِمْ ۖ وَمَنْ يَّغْفِرُ الذُّنُوبَ إِلَّا اللّٰهُ ۖ
وَلَمْ يُصِرُّوا عَلٰى مَا فَعَلُوا وَهُمْ يَعْلَمُونَ ﴿١٣٥﴾

१५८. संबोधन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देशून आहे आणि अधिकाराने अभिप्रेत एखाद्याच्या बाबतीत ईश्वरी शिक्षेसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्याचा अर्थ हा आहे. की' जे लोक आज तुमचे व इस्लामचे शत्रू बनलेले आहेत ते यापुढेही शत्रूच राहतील असे नाही. असे होऊ शकते की अल्लाह त्यांना पश्चातापाची बुद्धी देईल आणि ते इस्लामकडे परततील आणि अल्लाह त्यांना माफ करील. आणि हेही शक्य आहे की ते आपल्या अत्याचारांच्या आधारावर पश्चाताप बुद्धीपासून वंचित राहतील. आणि शिक्षेस पात्र ठरतील. या आयतीमध्ये पश्चातापाचा जो इशारा होता तो काही दिवसात खरा ठरला आणि ते इस्लामचे शत्रू जे उहोदच्या लढाईमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरूद्ध लढाईस उभे होते उदारण अबू सुफियान, खालीद बिन वलीद, सफवान बिन उमय्या वगैरे काही मुदतीनंतर ईमान आणून पैगंबर (सल्ल्लाहु अलैहि वसल्ल्म) यांचे समर्थक व मदतनीस बनले.

१५९. तपशिलासाठी पाहा. सूरे बकरा टीप नं. ४७८.

१६०. दुप्पट चौपट व्याजाला प्रतिबंध याचा अर्थ हा नव्हे की फक्त व्याजावर व्याज घेणे हराम आहे. सर्व प्रकारचे व्याज हराम आहे. मग ते सरळ व्याज असो वा चक्रवाढ व्याज; त्याचा दर साधारण असो वा असहाधारण-जसे सूरे बकरा आयत नं. २७५ ने स्पष्ट आहे. येथे दुप्पट चौपट व्याजाचा उल्लेख फक्त व्याजाचा वाईटपणा स्पष्ट करण्यासाठी आहे. त्याबद्दल पूर्णपणे तिरस्कार निर्माण व्हावा म्हणून आहे. कारण माणूस व्याजाला एकदा उचित मानू लागला तर त्याची सर्वात वाईट पद्धत अंगिकारण्यामध्ये हयगय करीत नाही.

व्याज हराम असण्या विषयी सूरे बकरा टीप नं. ४५६ ते ४६४ पाहा.

१६१. म्हणजे एहिक जीवनात मग्न होऊन तुम्ही तुमच्यासाठी भौतिक फायद्याची एक छोटीशी विहीर प्राप्त करू इच्छिता, जी काही दिवसाच्या ऐहिक जीवनासाठी आहे परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हाला एक अपार सागर देऊ इच्छितो. म्हणजे अशी विशाल जन्नत जी जमीन व आकाशासमान आहे. आणि जी कायम स्वरूपाची आहे. यावरून असे समजते की क़ियामतीच्या दिवशी जमीन व आकाशामधील वातावरण जन्नतचे वातावरण होईल. आणि जन्नती लोक या वातावरणात सहज सहल करतील. जमीन व आकाशाच्या विस्तृतपणाच्या या उदाहरणाने जन्नतच्या विशालतेची पुसटशी कल्पना येते. प्रत्यक्ष वस्तुस्थिति अल्लाहच जाणतो.

१६२. यावरून ईसाई लोकांच्या त्या श्रद्धेचे खंडन होते की ''गुन्ह्यांना क्षमा करण्याचे अधिकर हजरत ईसा (अलैहिस्सलाम) आणि त्यांच्या चर्चच्या पादरी लोकांना आहेत.'' बायबल मध्ये हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्याशी ही गोष्ट चुकीने जोडली गेली आहे कीं त्यांनी आपल्या शिप्यांना सांगितले

''ज्या कोणाच्या पापांची तुम्ही क्षमा करिता त्याची क्षमा झाली आहे आणि ज्या कोणाची तुम्ही तशीच ठेविता ती तशीच ठेविलेली आहे.'' (योहान २०-२३)

१६३. म्हणजे प्रासंगिक भावनांच्या आहारी जाऊन त्यांच्याकडून एखादा गुन्हा घडतो तेव्हा अल्लाहचे स्मरण त्यांना तौबा व क्षमायाचनेकडे प्रवृत्त करते. आणि ते गुन्ह्यावर अडून राहत नाहीत.

१३६. अशा लोकांचे बक्षीस त्यांच्या पालन कर्त्याकडून क्षमा आहे. त्याचप्रमाणे अशा बागा आहेत ज्यांच्याखालून जलप्रवाह वाहत आहेत. ते तेथे क़ायमचे राहतील. किती चांगला मोबदला आहे (चांगले) आचरण करणाऱ्यासाठी !

أُولَٰٓئِكَ جَزَآؤُهُم مَّغْفِرَةٌ مِّن رَّبِّهِمْ وَجَنّٰتٌ تَجْرِي
مِن تَحْتِهَا الْأَنْهٰرُ خٰلِدِينَ فِيهَا ۚ وَنِعْمَ أَجْرُ الْعٰمِلِينَ ﴿١٣٦﴾

१३७. तुमच्यापूर्वी अल्लाहच्या कायद्यानुसार कितीतरी घटना (सुनन) घडलेल्या आहेत. जरा जमिनीवर हिंडून पाहा की खोटे ठरविणाऱ्यांचा शेवट काय झाला ! [१६४]

قَدْ خَلَتْ مِن قَبْلِكُمْ سُنَنٌ فَسِيرُوا فِي الْأَرْضِ
فَانظُرُوا كَيْفَ كَانَ عٰقِبَةُ الْمُكَذِّبِينَ ﴿١٣٧﴾

१३८. हे लोकांच्यासाठी निवेदन [१६५] आहे आणि ईशभय बाळगणाऱ्यासाठी मार्गदर्शन व उपदेश.

هٰذَا بَيَانٌ لِّلنَّاسِ وَهُدًى وَمَوْعِظَةٌ لِّلْمُتَّقِينَ ﴿١٣٨﴾

१३९. धीर खचू देऊ नका आणि दु:खी होऊ नका तुम्हीच प्रभावशाली व्हाल, जर तुम्ही मोमिन असाल. [१६६]

وَلَا تَهِنُوا وَلَا تَحْزَنُوا وَأَنتُمُ الْأَعْلَوْنَ إِن كُنتُم
مُّؤْمِنِينَ ﴿١٣٩﴾

१४०. जर तुमच्यावर आघात झाला आहे तर अशाच प्रकारचा आघात त्या लोकोंच्यावरही (शत्रूवरही) झालेला आहे.[१६७] आणि या कालचक्राला [१६८] आम्ही लोकांमध्ये अशाच प्रकारे फिरवीत असतो. आणि (ही वेळ तुमच्यावर अशासाठी आणली गेली की) अल्लाह सच्चे ईमानधारक कोण आहेत ते पाहू इच्छित होता आणि त्याची इच्छा होती की तुमच्यापैकी काहींना शहीद बनवावे. [१६९] अल्लाहला अत्याचारी लोक आवडत नाहीत.

إِن يَمْسَسْكُمْ قَرْحٌ فَقَدْ مَسَّ الْقَوْمَ قَرْحٌ مِّثْلُهُ ۚ
وَتِلْكَ الْأَيَّامُ نُدَاوِلُهَا بَيْنَ النَّاسِ وَلِيَعْلَمَ اللَّهُ
الَّذِينَ آمَنُوا وَيَتَّخِذَ مِنكُمْ شُهَدَآءَ ۗ وَاللَّهُ
لَا يُحِبُّ الظّٰلِمِينَ ﴿١٤٠﴾

१४१. आणि (ही घटना यासाठी अमलात आणली गेली की) अल्लाहने ईमान धारकांना शुध्द करावे आणि काफिर लोकांचा बीमोड करावा.

وَلِيُمَحِّصَ اللَّهُ الَّذِينَ آمَنُوا وَيَمْحَقَ الْكٰفِرِينَ ﴿١٤١﴾

१४२. काय तुमचा हा समज आहे की तुमचा जन्नतमध्ये (सहजासहजी) प्रवेश होईल ? अल्लाहने अद्याय हे पाहिलेलेच नाही की तुमच्यापैकी कोण लोक (खरोखर) जिहाद करणारे [१७०] आहेत आणि (ही परिक्षा यासाठी पण आवश्यक आहे की) तो पाहिल कोण लोक धीर धरणारे आहेत.

أَمْ حَسِبْتُمْ أَن تَدْخُلُوا الْجَنَّةَ وَلَمَّا يَعْلَمِ اللَّهُ الَّذِينَ
جٰهَدُوا مِنكُمْ وَيَعْلَمَ الصّٰبِرِينَ ﴿١٤٢﴾

१६४. "सुनन" ने अभिप्रेत अल्लाहचे ते कायदे आहेत ज्यांच्या तहत तो निरनिराळ्या समाजाना शिक्षा देत असतो. या कायद्याचे परिणाम नष्ट झालेल्या समाजांच्या अवशेषांच्या स्वरूपात अरबस्थानच्या जमिनीवर आढळून येतात. उदाहरण "क़ौमे समूद" (समूद जातीचा समाज) आणि "क़ौमे लूत" (लूत जाती चा समाज) वगैरेंचे अवशेष. या प्रदेशात प्रवास करून माणूस त्या समाजांचा जो शेवट झाला त्यापासून बोध घेऊ शकतो. असा प्रवास सत्यापासून आणि ऐतिहासिक घटनापासून बोध प्राप्त करण्याच्या उद्देशाने केला जाईल तो नि:संशय फायदेशीर ठरेल. आणि येथे अशाच प्रवासास प्रोत्साहन दिले गेले आहे राहिला तो प्रवास जो फक्त एतिहासिक अवशेष पाहण्याच्या गरजेने आणि भग्न अवशेष पाहून आपल्या भौगोलिक व शास्त्रीय ज्ञानात वाढ करण्यासाठी केला जातो, तर अशा प्रवाशाने ते महान उद्दिष्ट साध्य केले जाऊ शकत नाही.

१६५. म्हणजे हे वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणारे निवेदन आहे.

१६६. म्हणजे, तुम्हाला तात्पुरता पराभव पत्करावा लागला आहे. आणि तोही तुमच्या स्वत:च्या चुकीने. अशा स्थितीत भविष्याबद्दल निराश होऊन बसणे योग्य नाही. उलट तुमची हिम्मत वाढली पाहिजे. आणि तुम्हाला खात्री असावयास हवी की इन्कार (कुफ्र) व इस्लाम मधील संघर्षात शेवटी तुमचेच पारडे जड राहिल आणि तुम्हीच यशस्वी व्हाल. पण त्यासाठी अट ही आहे की तुम्ही स्वत:ला सच्चे व पक्के मोमिन सिद्ध करावे. कारण ईमानधारकानी आपल्या ईमान च्या निकडी पुऱ्या केल्यानंतर आणि पैगंबर (सल्ल्लाहु अलैहि वसल्ल्म ) यांच्या सहवासात तनमनधनाने शर्तीचे प्रयत्न केल्यानंतर सुद्धा ते अल्लाहच्या साह्यापासून वंचित राहतील हे कसे शक्य आहे?इतिहासाची साक्ष आहे की हा वायदा अक्षरन् अक्षर खरा झाला.

स्पष्ट असो की प्रभावी आणि यशस्वी होण्याचा हा वायदा व्यक्तीशी नव्हे तर मुसलमान समाजाबरोबर आहे. आणि हा त्या स्थितीत आहे जेव्हा कुफ्र (इन्कार) व इस्लामचा संघर्ष होतो. म्हणजे निव्वळ अल्लाहच्या वचनाला प्रभावी करण्यासाठी जिहाद केले जावे आणि अल्लाहचे भय व धीर कदापिही सोडू नये.

१६७. इशारा 'बद्र'च्या लढाईकडे आहे, ज्यामध्ये इन्कार करणाऱ्यांना पराभव पत्करावा लागला होता.

१६८. "अय्याम" (कालचक्रा) ने अभिप्रेत ते ऐतिहासिक दिवस आहेत जेव्हा निरनिराळ्या समाजांच्या ज्यापराजयाच्या घटना घडल्या. या घटनाह सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या कायद्यानुसार घडल्या.

१६९.शहीद-हुतात्मा तो आहे जो अल्लाहच्या मार्गात मारला जातो. त्याला हुतात्म्याची पदवी यासाठी दिली गेली आहे की तो इस्लामच्या सत्यतेची साक्ष प्राणार्पण करून देत असतो. शहादत -हुतात्म्य ही एक अत्यंत उच्च श्रेणी आहे. आणि ओहोदच्या मोहीमेत जे मुसलमान मारले गेले त्यामागील उद्देश हा निवेदन केला गेला आहे की अल्लाहतआला त्यांना उच्चपदावर आरूढ करूं इच्छित होता.

१७०. म्हणजे असा विचार करणे चुकीचे आहे की सत्याचा मार्ग हा कसोटीचा मार्ग नाही. आणि माणूस ईमान आणल्याचा दावा करून सरळ जन्नतमध्ये दाखल होऊं शकतो. आणि त्याला अशा कोणत्याही स्थितीतून जावे लागत नाही ज्यामध्ये त्याच्या ईमानच्या दाव्याची परीक्षा होते आणि त्याच्याकडून त्यागाची मागणी केली जाते.

१४३. तुम्ही मृत्यू समोर येण्यापूर्वी त्याची इच्छा करीत होता.[१७१] परंतु तुम्ही त्याला पाहिले तेव्हा पाहतच राहिला.

وَلَقَدْ كُنتُمْ تَمَنَّوْنَ الْمَوْتَ مِن قَبْلِ أَن تَلْقَوْهُ فَقَدْ
رَأَيْتُمُوهُ وَأَنتُمْ تَنظُرُونَ ﴿١٤٣﴾

१४४. मुहम्मद हे तर फक्त एक पैगंबर आहेत. यांच्यापूर्वी सुद्धा अनेक पैगंबर होऊन गेले आहेत. त्यांचे देहावसान झाले अगर त्यांची हत्या झाली तर काय तुम्ही उलट्या पायाने परत फिरणार? [१७२] जो कोणी उलट्या पायाने परत फिरील तो अल्लाहचे काही नुकसान करू शकणार नाही. आणि अल्लाह लवकरच गुणग्राहक लोकांना [१७३] बक्षिसाने भूषविल.

وَمَا مُحَمَّدٌ إِلَّا رَسُولٌ قَدْ خَلَتْ مِن قَبْلِهِ الرُّسُلُ ۚ
أَفَإِن مَّاتَ أَوْ قُتِلَ انقَلَبْتُمْ عَلَىٰ أَعْقَابِكُمْ ۚ وَمَن
يَنقَلِبْ عَلَىٰ عَقِبَيْهِ فَلَن يَضُرَّ اللَّهَ شَيْئًا ۗ وَسَيَجْزِي
اللَّهُ الشَّاكِرِينَ ﴿١٤٤﴾

१४५. कोणताही जीव अल्लाहच्या आज्ञेखेरीज मरू शकत नाही. ती वेळ ठरलेली असून लिहिली गेली आहे.[१७४] जो कोणी जगाचे बक्षिस इच्छितो त्याला आम्ही त्यामधूनच देतो. आणि जो आखिरतच्या इनामाची इच्छा बाळगतो त्याला आम्ही तीच्यामधूनच देऊ. आणि कृतज्ञ असणाऱ्या लोकांना आम्ही अवश्य चांगल्या मोबदल्याने विभूषित करू.

وَمَا كَانَ لِنَفْسٍ أَن تَمُوتَ إِلَّا بِإِذْنِ اللَّهِ كِتَابًا مُّؤَجَّلًا ۗ
وَمَن يُرِدْ ثَوَابَ الدُّنْيَا نُؤْتِهِ مِنْهَا وَمَن يُرِدْ
ثَوَابَ الْآخِرَةِ نُؤْتِهِ مِنْهَا ۚ وَسَنَجْزِي الشَّاكِرِينَ ﴿١٤٥﴾

१४६. कितीतरी पैगंबर होऊन गेले आहेत. ज्यांना साथ देऊन पुषळशा अल्लाहवाल्या (ईश्वरनिष्ठ) लोकांनी लढाई केली.[१७५] आणि अल्लाहच्या मार्गात जी संकटे आली त्यामुळे त्यांनी आपली हिंमत खचू दिली नाही. ना त्यांनी कमकुवतपणा दाखविला ना ते (शत्रूसमोर) झुकले. आणि अल्लाहला दृढनिश्चयी लोकच आवडतात.

وَكَأَيِّن مِّن نَّبِيٍّ قَاتَلَ مَعَهُ رِبِّيُّونَ كَثِيرٌ فَمَا
وَهَنُوا لِمَا أَصَابَهُمْ فِي سَبِيلِ اللَّهِ وَمَا ضَعُفُوا
وَمَا اسْتَكَانُوا ۗ وَاللَّهُ يُحِبُّ الصَّابِرِينَ ﴿١٤٦﴾

१४७. त्यांच्या तोंडून तर फक्त हेच उद्‌गार निघाले हे आमच्या पालनकर्त्या ! आमच्या गुन्ह्यांना क्षमा कर. आमच्या कामांमध्ये जो अतिरेक झाला असेल. त्याकडे कानाडोळा कर. [१७६] आम्हाला बळकट कर. (दृढपणे आमचे पाय जमव) आणि काफ़ीर लोकांवर- इन्कार करणाऱ्यांवर आम्हाला विजय दे.

وَمَا كَانَ قَوْلَهُمْ إِلَّا أَن قَالُوا رَبَّنَا اغْفِرْ لَنَا
ذُنُوبَنَا وَإِسْرَافَنَا فِي أَمْرِنَا وَثَبِّتْ أَقْدَامَنَا
وَانصُرْنَا عَلَى الْقَوْمِ الْكَافِرِينَ ﴿١٤٧﴾

१७१. इशारा त्या तरुणांच्या कडे आहे. ज्यांना बद्रच्या लढाईत सहभागी होण्याची संधी लाभली नव्हती. ते ''शहादत'' होतात्म्याची आपली इच्छा प्रकट करीत होते. आणि याच शहादतच्या आवडीने प्रेरीत होऊन त्यांनी मदीनेच्या बाहेर निघून लढाई करण्याचा सल्ला दिला होता.

१७२. उलट्या पायांनी परत फिरणे म्हणजे कुफ्र (इन्कार) व अज्ञानाकडे परत जाणे.

येथे ही गोष्ट स्पष्ट केली जात आहे की जगामध्ये ज्याप्रमाणे अल्लाहचे पुष्कळसे पैगंबर होऊन गेले आहेत त्याचप्रमाणे हजरत मुहम्मद (सल्ल्लाहु अलैहि वसल्लम) हे सुद्धा अल्लाहचे एक पैगंबर आहेत.आणि म्हणून दुसऱ्या पैगंबरांना ज्याप्रमाणे मरण आले त्याचप्रमाणे हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनाही एक दिवस मरावयाचे आहे. ते पैगंबर आहेत याचा अर्थ हा नव्हे की ते मरणार नाहीत. किंवा त्यांची हत्या होणार नाही. हे जग म्हणजे परीक्षागृह आहे आणि येथे पैगंबरांना देखील कसोटी मधून जावे लागणार आहे.

ओहोदच्या लढाईच्या प्रसंगी हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे शहीद झाले. अशी अफवा पसरल्याने काही मुसलमानांच्यावर जो विपरीत परिणाम झाला तो दूर करणे हा याचा उद्देश होता.

स्पष्ट असो की ओहोदच्या लढाईच्या प्रसंगी काफिर लोकांनी ही अफवा पसरविली होती की पैगंबर यांची हत्या केली गेली आहे. त्यामुळे काही मुसलमानांच्यामध्ये तात्पुरता गोंधळ निर्माण झाला होता. तेव्हा काही दृढनिश्चयी सहाबांनी हे उत्साह वर्धक उत्तर दिले होते की पैगंबरांनी आपल्या उद्दिष्टासाठी प्राणार्पण केले तर आम्ही का मागे राहावे? पैगंबर राहीले नाहीत तर मग आमच्या राहण्याचा काय उपयोग?

१७३. म्हणजे इस्लाम धर्माच्या देणगीचा लाभ झाल्यानंतर ज्या लोकांनी त्याची कदर केली-मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) त्यांच्या दरम्यान उपस्थित असोत वा नसोत वा त्यांचे निधन झालेले असो. त्यांना अल्लाह मोबदल्याने विभूषित करील.

१७४. सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रत्येकाच्या मृत्यूची वेळ निश्चित केलेली आहे.जी एका नविश्तयामध्ये-दस्त-ऐवजामध्ये- नमूद केलेली आहे. मृत्यू न त्या वेळेपूर्वी येऊ शकतो ना त्या वेळेनंतर. म्हणून मृत्यूच्या भीतीने जिहाद सारख्या धार्मिक कर्तव्यापासून पळ काढणे योग्य नाही.

१७५. इशारा त्या लढायांच्याकडे आहे, ज्या हज़रत समूईल (अलैहिस्सलाम), हज़रत दाऊद (अलैहिस्सलाम) हज़रत सुलेमान (अलैहिस्सलाम) आणि इतर पैगंबरांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या. याने अभिप्रेत हे स्पष्ट करणे आहे की ओहोदच्या लढाईत मुसलमानांना ज्या संकटाचा सामना करावा लागला त्याने त्यानी भयभीत होऊ नये. अल्लाहच्या मार्गात लढाई व संकटे हो येतायच. ती काही नवी गोष्ट नाही. होऊन गेलेल्या पैगंबरांना आणि त्यांच्या अनुयांयानाही या गोष्टींना तोंड द्यावे लागले होते. आणि त्यांनी धैर्याने तोंड दिल्यानंतरच त्यांना ऊच्च पदांचा लाभ झाला होता.

१७६. म्हणजे ही संकटे आल्यानंतर त्यांनी अल्लाह व त्याचे पैगंबर यांच्याविरूद्ध गोष्टी केल्या नाहीत. उलट आपल्या दुर्बलतेचा स्वीकार केला आणि अल्लाहजवळ क्षमा याचना करीत राहीले. त्याचा परिणाम असा झाला की त्यांना जगांमध्ये नावलौकिक लाभला आणि आखिरतमध्यें त्यांना उत्कृष्ट अशा देणग्यानी विभूषित केले जाईल.

१४८. परिणाम हा की अल्लाहने त्यांना जगाच्या बक्षिसानेही भूषविले आणि आखिरतच्या उत्कृष्ट बक्षिसाने सुद्धा. आणि अल्लाहला अशाच प्रकारचे सदाचारी [१७७] लोक आवडतात.

فَاٰتٰىهُمُ اللّٰهُ ثَوَابَ الدُّنْيَا وَحُسْنَ ثَوَابِ الْاٰخِرَةِ ؕ
وَاللّٰهُ يُحِبُّ الْمُحْسِنِيْنَ ع ﴿١٤٨﴾

१४९. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! तुम्ही इन्कार करणाऱ्या लोकांचे ऐकाल तर ते तुम्हांला परत फिरवून नेतील. आणि तुमचे मनोरथ विफल होतील.

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْۤا اِنْ تُطِيْعُوا الَّذِيْنَ كَفَرُوْا
يَرُدُّوْكُمْ عَلٰۤى اَعْقَابِكُمْ فَتَنْقَلِبُوْا خٰسِرِيْنَ ﴿١٤٩﴾

१५०. तुमचा मौला (मित्र) तर अल्लाहच आहे. आणि तो उत्कृष्ट असा सहाय्यक होय.

بَلِ اللّٰهُ مَوْلٰىكُمْ ۚ وَهُوَ خَيْرُ النّٰصِرِيْنَ ﴿١٥٠﴾

१५१. लवकरच आम्ही इन्कार करणाऱ्यांच्या मनात धाक बसवू;[१७८] यासाठी की त्यांनी अशा वस्तूंना अल्लाहाचे सहभागी ठरविलेले आहे ज्यांच्यासाठी अल्लाहने काही सनद उतरविलेली नाही. त्यांचे ठिकाणा जहन्नम आहे आणि किती वाईट निवासस्थान आहे अत्याचारी लोकांचेसाठी !

سَنُلْقِيْ فِيْ قُلُوْبِ الَّذِيْنَ كَفَرُوا الرُّعْبَ بِمَاۤ اَشْرَكُوْا
بِاللّٰهِ مَا لَمْ يُنَزِّلْ بِهٖ سُلْطٰنًا ۚ وَمَاْوٰىهُمُ النَّارُ ؕ وَ
بِئْسَ مَثْوَى الظّٰلِمِيْنَ ﴿١٥١﴾

१५२. अल्लाहने जो वायदा तुमच्याशी केला होता त्याला त्याने खरा करून दाखविला. जेव्हा तुम्ही त्याच्या परवानगीने त्यांची नि:संकोचपणे हत्या करीत होता.[१७९]येथपावेतो की जेव्हा तुम्ही दुबळेपणा दाखविला आणि (मोर्चावर टिकून राहण्याच्या) बाबतीत आपसात वादविवाद केला. आणि तुम्हांला आसक्ती असलेली वस्तू अल्लाहने तुम्हांला दाखविताच तुम्ही आज्ञाभंग केलात. तुमच्यामध्ये काहीजण ऐहिक जीवनाचे इच्छुक होते[१८०]आणि काही आखिरतची इच्छा बाळगणारे. तेव्हा त्याने तुम्हांला आजमाविण्यासाठी तुमचा रोख शत्रूंकडून फिरविला.[१८१] तरीपण त्याने तुम्हाला माफ केले आणि अल्लाह मोमिन लोकांच्या बाबततीत मोठा मेहरबान आहे. [१८२]

وَلَقَدْ صَدَقَكُمُ اللّٰهُ وَعْدَهٗۤ اِذْ تَحُسُّوْنَهُمْ بِاِذْنِهٖ ۚ
حَتّٰۤى اِذَا فَشِلْتُمْ وَتَنَازَعْتُمْ فِى الْاَمْرِ وَعَصَيْتُمْ
مِّنْۢ بَعْدِ مَاۤ اَرٰىكُمْ مَّا تُحِبُّوْنَ ؕ مِنْكُمْ مَّنْ يُّرِيْدُ
الدُّنْيَا وَمِنْكُمْ مَّنْ يُّرِيْدُ الْاٰخِرَةَ ۚ ثُمَّ صَرَفَكُمْ
عَنْهُمْ لِيَبْتَلِيَكُمْ ۚ وَلَقَدْ عَفَا عَنْكُمْ ؕ وَاللّٰهُ
ذُوْ فَضْلٍ عَلَى الْمُؤْمِنِيْنَ ﴿١٥٢﴾

१५३. जेव्हा तुम्ही (मोर्चा सोडून) जात होता आणि कोणाकडे वळून देखील पाहत नव्हता आणि पैगंबर पाठीमागून तुम्हांला पुकारीत होते,[१८३] तेव्हा अल्लाहने तुम्हांला दु:खावर दु:ख दिले.[१८४] कारण जी गोष्ट तुमच्या हातून जाईल किंवा जे संकट तुमच्यावर येईल त्याने तुम्ही उदासीन होऊ नये. तुम्ही जे काही करीत आहात ते अल्लाहला माहित आहे.

اِذْ تُصْعِدُوْنَ وَلَا تَلْوٗنَ عَلٰۤى اَحَدٍ وَّالرَّسُوْلُ
يَدْعُوْكُمْ فِىْۤ اُخْرٰىكُمْ فَاَثَابَكُمْ غَمًّاۢ بِغَمٍّ
لِّكَيْلَا تَحْزَنُوْا عَلٰى مَا فَاتَكُمْ
وَلَا مَاۤ اَصَابَكُمْ ؕ وَاللّٰهُ خَبِيْرٌۢ بِمَا تَعْمَلُوْنَ ﴿١٥٣﴾

१७७. मूळ उताऱ्यामध्ये ''मुहसिनीन'' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ ते लोक जे परोपकार म्हणजे चांगले आचरण करतात अभिप्रेत सदाचारी व अल्लाहला भिऊन वागणारे लोक आहेत जे फक्त आपली कर्तव्येच पार पाडीत नाहीत तर चांगल्या प्रकारे पार पाडतात. वर ज्या लोकांची अल्लाहच्या मार्गात प्राण देण्याची तयारी असल्याबद्दलचा उल्लेख आहे त्यांना मुहसिनीन या पदवीने विभूषिले गेले आहे यावरून स्पष्ट होते की 'अहेसान'च्या अर्थामध्ये ''इस्लाम'' साठी तळहातावर शिर घेऊन शर्थीचे प्रयत्न करणे आणि अल्लाहसाठी त्याग करणे याचा सर्वप्रथम समावेश होतो.

१७८. ''ईमान'' हा निर्धार व हिमतीचा पाया आहे. आणि म्हणून ईमानदार लोकांची हिम्मत मोठी असते आणि ही मोठी हिंमतच अनेकेश्वरवादी व इन्कार करणाऱ्याच्या मनात दरारा निर्माण करते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले आहे.

نصرت بالرعب مسيرة شهر

''माझी दराऱ्याने मदत केली गेली आहे की शत्रू माझ्यापासून एका महिन्यात प्रवास केला जाईल इतक्या अंतरावर असला तरी त्याच्या मनात माझा दरारा निर्माण होईल.'' (तफसीर इब्ने कसीर. भाग १ पान ४११ बुखारी मुस्लिम)

आणि घडलेल्या घटनांनी याचे समर्थन झालेले आहे. मुसलमानांचा धाक रोमन सम्राटावरच बसलेला होता. इतकेच नव्हे त्याचे परिणाम दूरवर हिंदुस्थान व स्पेनपर्यंत पोहचलेले होते.

१७९. म्हणजे अल्लाह तआलाचा साह्याचा वायदा उहोदच्या लढाईमध्ये पुरा झाला. मुसलमान संख्येने कमी असतांना व जवळ साधनसामुग्री नसतांना देखील अनेकेश्वरवाद्याच्या मुकाबल्यात सरसठरले. याचा पुरावा या गोष्टीने मिळतो की अनेकेश्वरवाद्यांपैकी जे लोक एका पाठोपाठ ध्वज सांभाळीत होते ते मुसलमानांच्या हातून ठार झाले आणि शेवटी ध्वज जमिनीवर पडला, जी त्याकाळी पराभवाची निशाणी होती.परंतु त्यानंतर मुसलमानांच्याकडून काही चुका झाल्या,ज्याच्या परिणामस्वरुप त्यांना पराभव पत्करावा लागला.

१८०.या होत्या त्या चुका व तो दुर्बलपणा जो अैन लढाईच्या शेवटच्या प्रसंगी घडला, प्रथम तर, मुसलमान सुरवातीच्या विजयाने ढिले पडले. व त्यांची अशी समजूत झाली की विजय तर आपलाच आहे. दुसरी गोष्ट ही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एका तुकडीला पिछाडीस खिंडीच्या टेकडीवर संरक्षणासाठी नियुक्त केले होते. आणि त्यांना ताकीद केली गेली होती की त्यांनी कोणत्याही परिस्थितीत आपली जागा सोडू नये. परंतु विजय झालेला पाहिल्याबरोबर त्यांच्यामध्ये मतभेद झाला की अशा परिस्थितीत आपली जागा सोडून लुटीचा माल प्राप्त करण्यामध्ये काय हरकत आहे. त्या तुकडीचे सरदार अब्दुल्लाह बिन जुबैर यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु थोडे लोक सोडून सर्वांनी अवज्ञा केली. तिसरी गोष्ट ही की तो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आज्ञेचा भंग करून वेळेपुर्वी लुटीचा माल गोळा करूं लागले आणि फक्त काही लोक आपल्या जागी टिकून राहीले. या गोष्टीचा शत्रूने फायदा उठविला आणि पिछाडीवरून मुसलमानांच्यावर अचानक हल्ला केला. त्याचा परिणाम हा झाला की मुसलमानांनी कच खाली. चौथी गोष्ट ही की मुसलमानांमधील काही लोकांनी लूटीचा माल प्राप्त करण्यामध्ये घाई करून आखिरत एवजी ऐहिक जीवनाला प्राधान्य दिले.

१८१. म्हणजे या दुर्बलतेचा परिणाम हा झाला की तुमच्यामध्ये शत्रूशी सामना करण्याची हिम्मत राहिली नाही.

१८२. अर्थ हा आहे की मुसलमानांना अल्लाहच्या साह्याचा वायदा बिनशर्त नाही. त्यांनी काहीही केले तरी कोणत्याही परिस्थितीत अल्लाहचे साह्य त्यांना लाभेल असे नाही. अल्लाहचे साह्य सशर्त आहे. मुसलमानांनी आपल्या कर्तव्यात ढील पडू देऊ नये. वरिष्ठांच्या आज्ञापालनांच्या बाबतीत विरोध करू नये अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करू नये, आखिरतचा विचार सोडून ऐहिक ऐश्वर्याच्या पाठीमागे लागू नये.यापैकी एखादी गोष्ट त्यांच्यामध्ये आढळून आली तरीदेखील सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्यावर आपला कोप एकदम करीत नाही. त्यांचा, दुबलेपणा दूर व्हावा म्हणून व ते अल्लाहच्या कृपेस व साह्यास पात्र व्हावेत म्हणून त्याची परीक्षा घेतली जाते. आणि हाही सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या क्षमेचा व कृपेचा एक प्रकारच आहे. आणि म्हणून आयतीचे शेवटी या क्षमे व कृपेकडे इशारा करण्यात आलेला आहे.'' (तदब्बुरे क़ुरआन. भाग १ पान ७९५).

१८३. मुसलमानांच्या रांगेत जेव्हा गोंधळ निर्माण झाला तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या काही निवडक सहाबांसह ज्यामध्ये हज़रत अली, हज़रत अबू बकर हज़रत तलहासारखे प्राणार्पण करण्यास सदैव तयार असणारे सहकारी सामील होते आपल्या जागी टिकून राहीले आणि ते मुसलमानानां पुकारून सांगत होते की, माझ्याकडे या मी अल्लाहचा पैगंबर आहे. यानंतर अल्लाहचे पैगंबर जखमी झाले.

१८४. दुःख या गोष्टीचे की या लढाईमध्ये मूसलमानांना मोठी हानी पोहचली सत्तर मुसलमान शहीद झाले त्यामध्ये हज़रत हमज़ा व हज़रत अब्दुल्लाह बिन जहश सारख्या नामवंत व्यक्ति होत्या, याशिवाय पुष्कळसे मुसलमान जखमी झाले आणि याबरोबरच पर्वतासारखे दुःख जे मुसलमानांच्यावर कोसळले ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे शहीद झाल्याची चुकीची बातमी होती.

१५४. या दुःखा नंतर त्याने तुम्हाला समाधान प्राप्त करून दिले. ही झोपेची अवस्था होती जो तुमच्यापैकी एका गटावर पसरत होती.[१८५] परंतु दुसऱ्या गटाला तर आपल्या प्राणांचीच काळजी होती. ते लोक अल्लाहाच्या बाबतीत वस्तुःस्थिती विरुद्ध अज्ञानमूलक वाईट समज करून घेत होते. म्हणत आहेत, 'काय या प्रश्नात आम्हांला पण काही अधिकार आहे ?' म्हणा. सारा प्रश्न अल्लाहच्या अधिकारात आहे.- त्यांनी आपल्या मनात जी गोष्ट लपविली आहे तिला ते तुमच्यासमोर उघड करीत नाहीत-(वस्तुतः) त्यांचे म्हणणे हे आहे की जर या प्रश्नात आम्हाला अधिकार असता तर आम्ही तेथे मारले गेलो नसतो ! सांगा-तुम्ही तुमच्या घरांमध्ये जरी असता तरी ज्यांची हत्या होणे ठरलेले होते ते स्वतः आपल्या हत्यास्थानाकडे निघून आले असते-[१८६] हे जे काही घडले ते यासाठी की जे काही तुमच्या अंतःकरणात लपलेले आहे त्याची अल्लाहाने पारख करावी आणि तुमच्या मनात जे (कडवटपणा) आहे त्याला साफ करावे. अल्लाह तुमच्या मनाची स्थिती चांगल्या प्रकारे जाणतो.

ثُمَّ أَنْزَلَ عَلَيْكُمْ مِنْ بَعْدِ الْغَمِّ أَمَنَةً نُعَاسًا يَغْشَىٰ طَائِفَةً
مِنْكُمْ ۖ وَطَائِفَةٌ قَدْ أَهَمَّتْهُمْ أَنْفُسُهُمْ يَظُنُّونَ بِاللَّهِ غَيْرَ الْحَقِّ
ظَنَّ الْجَاهِلِيَّةِ ۖ يَقُولُونَ هَلْ لَنَا مِنَ الْأَمْرِ مِنْ شَيْءٍ ۗ قُلْ إِنَّ
الْأَمْرَ كُلَّهُ لِلَّهِ ۗ يُخْفُونَ فِي أَنْفُسِهِمْ مَا لَا يُبْدُونَ لَكَ ۖ يَقُولُونَ
لَوْ كَانَ لَنَا مِنَ الْأَمْرِ شَيْءٌ مَا قُتِلْنَا هَاهُنَا ۗ قُلْ لَوْ كُنْتُمْ فِي بُيُوتِكُمْ
لَبَرَزَ الَّذِينَ كُتِبَ عَلَيْهِمُ الْقَتْلُ إِلَىٰ مَضَاجِعِهِمْ ۖ وَلِيَبْتَلِيَ
اللَّهُ مَا فِي صُدُورِكُمْ وَلِيُمَحِّصَ مَا فِي قُلُوبِكُمْ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ
بِذَاتِ الصُّدُورِ ﴿١٥٤﴾

१५५. दोन्ही सैन्याचा ज्या दिवशी एक दुसऱ्याशी सामना झाला [१८७] त्या दिवशी तुमच्यापैकी ज्या लोकांनी पाठ फिरविली त्यांचेकडून सैतानाने त्यांच्या काही आचरणामुळे अपराध घडविला होता [१८८] अल्लाहने त्यांना माफ केले. निःसंशय अल्लाह मोठा माफ करणारा व सहनशील आहे.

إِنَّ الَّذِينَ تَوَلَّوْا مِنْكُمْ يَوْمَ الْتَقَى الْجَمْعَانِ إِنَّمَا اسْتَزَلَّهُمُ
الشَّيْطَانُ بِبَعْضِ مَا كَسَبُوا ۖ وَلَقَدْ عَفَا اللَّهُ عَنْهُمْ ۗ
إِنَّ اللَّهَ غَفُورٌ حَلِيمٌ ﴿١٥٥﴾

१५६. ईमान आणलेल्या लोकांनो ! त्या लोकांप्रमाणे होऊ नका ज्यांनी कुफ्र (इन्कार) केला. आणि जे आपल्या बांधवासंबंधी ते प्रवासाला गेले असताना किंवा लढाईमध्ये सामील झालेले असतना (त्यांना मृत्यू आल्यास) म्हणतात की जर ते आमच्याजवळ असते तर ना त्यांना मृत्यु येतो ना त्यांची हत्या झाली असती.(त्यांची ही खोटी कल्पना यासाठी आहे की) म्हणजे अल्लाहने याला त्यांच्या अंतःकरणात दुःखाचे कारण बनवावे.[१८९] नाहीपेक्षा अल्लाहच आहे जो जिवंत ठेवितो व मरण घडवितो. आणि तुम्ही जे काही करता ते सर्व अल्लाह पाहात आहे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَكُونُوا كَالَّذِينَ كَفَرُوا وَقَالُوا
لِإِخْوَانِهِمْ إِذَا ضَرَبُوا فِي الْأَرْضِ أَوْ كَانُوا غُزًّى لَوْ كَانُوا
عِنْدَنَا مَا مَاتُوا وَمَا قُتِلُوا لِيَجْعَلَ اللَّهُ ذَٰلِكَ حَسْرَةً فِي
قُلُوبِهِمْ ۗ وَاللَّهُ يُحْيِي وَيُمِيتُ ۗ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ
بَصِيرٌ ﴿١٥٦﴾

१८५. लढाईमध्ये एकप्रसंग असा आला की भयाच्या तीव्रतेला नाहीसे करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुसलमानांच्यावर झोपेची अवस्था निर्माण केली ही अवस्था त्यावेळी निर्माण केली जेव्हा काही वेळ लढाई थांबलेली होती. आणि मुसलमान पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याजवळ एकत्रित होऊन आपली शक्ति ऐकवटत होते.

१८६. म्हणजे तुमच्यापैकी एक गट अल्लाहच्या बाबतीत साशंक राहीला. त्याचा विचार होता की मदीनेमध्ये राहून लढाई केली असती तर आमची हत्या झाली नसती त्याचे खंडन करण्यासाठी हे फर्माविले गेले की तुमचा हा विचार चुकीचा आहे तुम्ही तुमच्या घरामध्ये असता तरी अल्लाहचे विधीलिखित टळले नसते. आणि तुमचा मृत्यु त्याच ठिकाणी झाला असता जेथे तो होणे ठरलेले आहे. कारण सर्वश्रेष्ट; अल्लाहने प्रत्येकाची मरणाची वेळ आणि त्याच्या मरणाची जागा लिहून ठेविलेली आहे. याचे समर्थन नेहमी घडणाऱ्या घटनांवरून होते. माणसाच्या ध्यानीमनी देखील नसताना तो कोणत्या ना कोणत्या कारणानी एखेद्या ठिकाणी पोहचतो व तेथेच त्याचा मृत्यु घडतो.

१८७.अभिप्रेत ओहोदची लढाई आहे.(पाहा टीप नं. १५२)

१८८. दांभिक लोकांच्या दुष्ट कारवायांनी काही कमजोर प्रकारचे मुसलमानसुद्धा प्रभावित झाले होते. परंतु नंतर त्यांना आपली चूक उमजली. आणि म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याना माफ केले. येथे त्या वस्तु:स्थितीचे विवरण करून फर्माविले की त्यांच्या मागील काही गुन्ह्यमुळे शैतानाने त्यांना ठोकर बसविली कारण सैतानाचा वार त्या लोकांच्या बाबतीत परिणामकारक सिद्ध होतो जे गुन्ह्यासाठी आपल्या मनाला सैल सोडतात.

१८९. म्हणजे जे लोक आपल्या प्रयत्नानाच सर्व काही समजतात ते ईश्वरी न्यायानुसार घडणाऱ्या घटनांचे चुकीचे स्पष्टीकरण करतात. आणि हे स्पष्टीकरण त्यांच्यासाठी उघड उघड निराशा होऊन राहते आणि ते पश्चातापाने हात चोळीत बसतात की असे केले असते तर असे झाले असते.

وَلَئِنْ قُتِلْتُمْ فِي سَبِيلِ اللَّهِ أَوْ مُتُّمْ لَمَغْفِرَةٌ مِّنَ اللَّهِ
وَرَحْمَةٌ خَيْرٌ مِّمَّا يَجْمَعُونَ ١٥٧

१५७. अल्लाहच्या मार्गात तुमची हत्या झाली वा तुम्हांला मृत्यू आला तर अल्लाहची क्षमा व कृपा (जी तुम्हांला लाभेल) त्या सर्व गोष्टीपेक्षा ज्या ते जमा करीत आहेत, किती उत्तम होय.

وَلَئِنْ مُّتُّمْ أَوْ قُتِلْتُمْ لَإِلَى اللَّهِ تُحْشَرُونَ ١٥٨

१५८. आणि तुम्ही मरा वा मारले जा, शेवटी तुम्हांला अल्लाह जवळच एकत्र येणे आहे.

فَبِمَا رَحْمَةٍ مِّنَ اللَّهِ لِنتَ لَهُمْ ۖ وَلَوْ كُنتَ فَظًّا غَلِيظَ الْقَلْبِ
لَانفَضُّوا مِنْ حَوْلِكَ ۖ فَاعْفُ عَنْهُمْ وَاسْتَغْفِرْ لَهُمْ
وَشَاوِرْهُمْ فِي الْأَمْرِ ۖ فَإِذَا عَزَمْتَ فَتَوَكَّلْ عَلَى اللَّهِ ۚ إِنَّ
اللَّهَ يُحِبُّ الْمُتَوَكِّلِينَ ١٥٩

१५९. (हे पैगंबर !) ही अल्लाहची कृपा आहे की तुम्ही त्यांच्या साठी सौम्य आहात.[११०] तुम्ही कडक व निष्ठुर असता तर ते तुमच्यापासून अलग झाले असते. म्हणून त्यांना माफ करा व त्यांच्यासाठी क्षमायाचना करा.याशिवाय (जिह्वादसारख्या महत्त्वाच्या) प्रश्नांवर त्यांच्याशी सल्लामसलत करीत जा.[१११] नंतर जेव्हा निर्धार कराल तेव्हा अल्लाहवर भरवसा ठेवा. निःसंशय अल्लाहला भरवसा ठेवणारे लोक आवडतात.

إِن يَنصُرْكُمُ اللَّهُ فَلَا غَالِبَ لَكُمْ ۖ وَإِن يَخْذُلْكُمْ فَمَن ذَا الَّذِي
يَنصُرُكُم مِّن بَعْدِهِ ۗ وَعَلَى اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُؤْمِنُونَ ١٦٠

१६०. अल्लाहने तुमची मदत केली तर कोण आहे जो तुमच्यावर प्रभावी होऊ शकेल? आणि त्याने तुम्हांला सोडून दिले तर मग कोण आहे जो तुमची मदत करू शकेल? आणि ईमान आणलेल्यांना अल्लाहवरच भरवसा ठेविला पाहिजे.

وَمَا كَانَ لِنَبِيٍّ أَن يَغُلَّ ۚ وَمَن يَغْلُلْ يَأْتِ بِمَا غَلَّ يَوْمَ
الْقِيَامَةِ ۚ ثُمَّ تُوَفَّىٰ كُلُّ نَفْسٍ مَّا كَسَبَتْ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ١٦١

१६१. कोणा पैगंबरचे हे काम होऊ शकत नाही की, त्यांनी अपहार करावा.[११२] आणि जो कोणी अपहार करील तो कियामतीच्या दिवशी आपल्या अपहाराला आणून हजर करील.[११३] नंतर प्रत्येक जिवाला त्याच्या कमाईचा पुरापुरा मोबदला दिला जाईल व कोणावरही अन्याय केला जाणार नाही.

أَفَمَنِ اتَّبَعَ رِضْوَانَ اللَّهِ كَمَن بَاءَ بِسَخَطٍ مِّنَ اللَّهِ وَمَأْوَاهُ
جَهَنَّمُ ۚ وَبِئْسَ الْمَصِيرُ ١٦٢

१६२. अल्लाहच्या मर्जीनुसार वागणारा माणूस काय त्या माणसा सारखा होऊ शकतो जो अल्लाहच्या कोपास पात्र झालेला आहे व ज्याचे ठिकाण जहन्नम आहे? अतिशय वाईट ठिकाण !

१९०. म्हणजे आपल्या सहकाऱ्यांची सुधारणा करण्याबाबतीत तुम्ही जी सौम्य पद्धत अंगिकारीली आहे ती यापुढेही क़ायम असावी. असे होऊं नये की यावेळी त्यांच्याकडून जी कमजोरी घडली त्यामुळे तुम्ही त्यांच्या बाबतीत कडक धोरण स्वीकारवे. उलट तुमची ही सौम्य वागणूकच त्यांना तुमच्याकडे आकृष्ट करील. आणि ते आपली सुधारणा करण्याच्या मार्गास लागतील.

१९१. येथे व्यावहारीक प्रश्नांत ईमान आणलेल्या लोकांबरोबर विचार विनिमय करीत राहण्याची सूचना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिली गेली आहे. आणि निवेदनाच्या पार्श्वभूमीवरून हे स्पष्ट आहे की व्यावहारीक प्रश्नाने अभिप्रेत जिहादसारखे महत्त्वाचे प्रश्न माहित आहेत. ज्यांच्या संबंधी अल्लाहकडून कोणतीही स्पष्ट आज्ञा उतरलेली नाही. किंवा आज्ञा उतरली असली तरी ती कशाप्रकारे लागू करावी आणि ती अमलात आणण्यासाठी काय उपाय-योजना करावी. नाहीपेक्षा आज्ञा झालेली असताना विचार विनिमयाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. विचार विनिमयाच्या या आज्ञेवर विचार केला असता खालील गोष्टी स्पष्ट होतात.

१) विचार विनिमय करणे हे इस्लामी सामुदायिकत्त्वाचे एक अत्यंत महत्त्वाचे तत्व आहे आणि ते इस्लामच्या राजकीय व्यवस्थेचे आधारभूत असे वैशिष्ट्य आहे.

२) विचार विनिमयाची आज्ञा महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी आहे. म्हणजे ते लग्न व समस्या ज्यांचा प्रभाव समाजाच्या सामाजिक जीवनावर होतो यामध्ये राजकारण, युद्ध शांतता आणि इस्लामी शासन यासंबंधी सर्व महत्वाचे प्रश्न व समाजाच्या हिताच्या गोष्टी व इस्लामी तत्वज्ञानाचे आवाहन व आंदोलनाशी निगडीत असलेले प्रश्न व समस्या चा सुद्धा यामध्ये समावश होतो.

३) विचार विनिमय करण्याची आज्ञा जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिली गेली तेव्हा समाजावर ती अधिक बंधन कारक ठरते. कारण समाजाला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याच्या पेक्षा त्याची अधिक आवश्यकता आहे.

४) महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी निर्णय विचार विनिमया नंतरच घेतला जावा आणि हा निर्णय (निर्धार) विचार विनिमयाचा परिणाम असावा दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे लोकांचे मत निर्णयात्मक राहील. असे केले गेले नाही आणि अधिकारवरील व्यक्तीने आपल्या मताप्राणेच निर्णय करण्याची पद्धत अंगिकारली तर सल्लागार मंडळाने काही महत्त्व राहणार नाही. आणि विचार विनिमय निष्फळ ठरेल. हुकूमशाही वृत्ती वाढीस लागेल. त्याचा परिणाम हा होईल की खरी लोकशाही संपुष्टात येईल आणि हुकूमशाही व दडपशाही साठी मार्ग मोकळा होईल. जे लोक असे म्हणतात की बहुमत म्हणजे योग्य निर्णय नव्हे, ते लोकांच्या विरोधात अधिकारारूढ व्यक्तिस निर्णयाचा अधिकार देतात. दुसऱ्या शब्दात ते अधिकाररूढ व्यक्तीच्या निर्णयास योग्य निर्णय समजतात. ही कल्पना सर्वस्वी चुकीची आहे. वस्तुस्थिती ही आहे की योग्य निर्णयाचा जेथपावेतो संबंध आहे ना लोकमत प्रमाण आहे ना अधिकारारूढ व्यक्तीचे मत तरीपण सारासार-विचाराच्या दृष्टीने इस्लामने लोकमताला प्राधान्य दिले आहे आणि त्याला निर्णयात्मक दर्जा दिला आहे, जी एक योग्य व न्याय्य गोष्ट आहे. आणि सद्याच्या काळात जेव्हा स्वमताचा व अनुयायित्त्वाचा आग्रह आहे.अधिकारारूढ व्यक्तीस लोकमतापासून स्वतंत्र करणे आणि त्याला असाधारण अधिकार देणे म्हणजे मोठ्या संकटाना तोंड देण्यासारखे आहे.

१९२. इशारा या गोष्टीकडे आहे की निशाणबाजांने (तिरअंदाजाने) आपली जागा सोडून वेळेपूर्वी शत्रूचा माल लूटण्यामध्ये भाग घेतला. त्याचे कारण त्यांचा हा अंदाज होता की जर आम्ही शत्रूचा माल लूटण्यामध्ये सामील झालो नाही तर त्यामध्ये आम्हाला वाटा मिळणार नाही. त्यावेळी फ़ौजेचे आधिकपत्य अल्लाहचे; पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे करीत होते. अशा स्थितीत असा गैरसमज करून घेण्याची काही देखील आवश्यकता नव्हती कारण कोणतेही पैगंबर विश्वास पात्रतेच्या व प्रामाणिकपणाच्या विरुद्ध काही एक कधीही करीत नाहीत. स्पष्ट असो की या गोष्टीचा काही पुरावा उपलब्ध नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांच्यावर कोणी अपहाराचा आरोप केला होता. तरीपण क़ुरआनने स्पष्ट केले की एक पैगंबर कोणत्याही परिस्थितीत अपहार करू शकत नाही. हे स्पष्टीकरण या साठी आवश्यक होते की शत्रूच्या मालमते वगैरेच्या विभागणी संबंधी पैगंबरांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा गैरसमज होऊ नये.

१९३. अपहाराच्या बाबतीत हदीस मध्ये देखील अत्यंत कडक शिक्षेची धमकी दिली गेली आहे. आणि पैगंबर(सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सरकारी अधिकाऱ्यांना सरकारी खजिन्यासंबंधी अत्यंत सावध व दक्ष राहण्याची आज्ञा दिली होती. की एखाद्या सुईला लापावेणे देखील त्यांच्यासाठी उचित नाही. फर्माविले :-

يا ايها الناس من عمل لنا منكم عملاً فكتمنا منه مخيطا فما فوقه
فهو غل ياتى به يوم القيامة - (ابن کثیر ج ۱ ص ۴۲۲ بحوالہ احمد)

“लोकहो ! तुमच्यापैकी जो कोणी आमच्या कोणत्याही कामावर नियुक्त आहे त्याने आमच्यापासून एकादी सुई किंवा त्याहून क्षुल्लक अशी वस्तु लपविली तर तो अपहार आहे; ज्याला तो कियामतीच्या दिवशी आणून हजर करील.” (इब्ने कसीर भाग १ ला पा. ४२२ हवाला अहमद)

१६३. अल्लाहजवळ लोकांचे दर्जे वेगवेगळे आहेत. आणि ते जे काही करीत आहेत ते अल्लाह पाहत आहे .[१९४]

هُمْ دَرَجَٰتٌ عِندَ ٱللَّهِ ۗ وَٱللَّهُ بَصِيرٌۢ بِمَا يَعْمَلُونَ ﴿١٦٣﴾

१६४. खरोखरच अल्लाहने ईमानधारकांवर हा मोठा उपकार केला की, त्यांच्यामध्ये त्यांच्यामधूनच असा एक पैगंबर उभा केला जो त्यांना त्यांच्या आयती ऐकवित आहे. त्यांना शुद्ध करीत आहे. आणि त्यांना ग्रंथाची व बुद्धीमत्तेची शिकवण देत आहे. [१९५] नाही पेक्षा यापूर्वी हे लोक उघड अशा मार्गभ्रष्टतेत पडले होते.

لَقَدْ مَنَّ ٱللَّهُ عَلَى ٱلْمُؤْمِنِينَ إِذْ بَعَثَ فِيهِمْ رَسُولًا مِّنْ أَنفُسِهِمْ
يَتْلُوا۟ عَلَيْهِمْ ءَايَٰتِهِۦ وَيُزَكِّيهِمْ وَيُعَلِّمُهُمُ ٱلْكِتَٰبَ وَٱلْحِكْمَةَ
وَإِن كَانُوا۟ مِن قَبْلُ لَفِى ضَلَٰلٍ مُّبِينٍ ﴿١٦٤﴾

१६५. हा काय प्रकार आहे की, जेव्हा तुमच्यावर संकट आले ज्यापेक्षा दुप्पट मोठे असे संकट तुमच्या हातून (शत्रूवर) आलेले होते.—तेव्हा तुम्ही म्हणू लागलात की हे कोठून आले ?[१९६] (हे पैगंबर !) म्हणा. हे तुमच्या हातून आलेले आहे. [१९७] निःसंशय अल्लाह सर्वसमर्थ आहे.[१९८]

أَوَلَمَّآ أَصَٰبَتْكُم مُّصِيبَةٌ قَدْ أَصَبْتُم مِّثْلَيْهَا قُلْتُمْ أَنَّىٰ هَٰذَا ۖ
قُلْ هُوَ مِنْ عِندِ أَنفُسِكُمْ ۗ إِنَّ ٱللَّهَ عَلَىٰ كُلِّ شَىْءٍ
قَدِيرٌ ﴿١٦٥﴾

१६६. आणि दोन्ही समाजाच्या मुकाबल्याच्या दिवशी जी आपत्ती तुमच्यावर आली ती अल्लाहच्याच आज्ञेने आली होती. आणि हे यासाठी झाले की त्याने मोमिनांना पारखावे.

وَمَآ أَصَٰبَكُمْ يَوْمَ ٱلْتَقَى ٱلْجَمْعَانِ فَبِإِذْنِ ٱللَّهِ وَلِيَعْلَمَ
ٱلْمُؤْمِنِينَ ﴿١٦٦﴾

१६७. आणि त्या लोकांनाही पारखावे जे दांभिक आहेत. या दांभिक लोकांना जेव्हा सांगितले गेले की या अल्लाहच्या मार्गात लढा किंवा (शत्रूला) पिटाळा. तर ते म्हणू लागले जर आम्हांला लढाई होईल असे माहित असते तर आम्ही अवश्य तुमच्याबरोबर असतो.[१९९]ते ह्या दिवशी ईमानाच्या तुलनेने कुफ्र (इन्कार) शी अधिक जवळ होते. ते आपल्या तोंडून अशी गोष्ट बोलतात जी त्यांच्या मनात नाही.आणि ज्या गोष्टीला हे लपवित आहेत तिला अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो.

وَلِيَعْلَمَ ٱلَّذِينَ نَافَقُوا۟ ۚ وَقِيلَ لَهُمْ تَعَالَوْا۟ قَٰتِلُوا۟
فِى سَبِيلِ ٱللَّهِ أَوِ ٱدْفَعُوا۟ ۖ قَالُوا۟ لَوْ نَعْلَمُ قِتَالًا لَّٱتَّبَعْنَٰكُمْ ۗ
هُمْ لِلْكُفْرِ يَوْمَئِذٍ أَقْرَبُ مِنْهُمْ لِلْإِيمَٰنِ ۚ يَقُولُونَ
بِأَفْوَٰهِهِم مَّا لَيْسَ فِى قُلُوبِهِمْ ۗ
وَٱللَّهُ أَعْلَمُ بِمَا يَكْتُمُونَ ﴿١٦٧﴾

१६८. हे लोक स्वतःतर बसून राहिले आणि आपल्या बांधवांच्या बाबतीत म्हणले की त्यांनी जर आमची गोष्ट ऐकली असती तर ते मारले गेले नसते. त्याना सांगा, तुम्ही सच्चे आहात तर आपल्यावरील मृत्यू टाळून दाखवा. [२००]

ٱلَّذِينَ قَالُوا۟ لِإِخْوَٰنِهِمْ وَقَعَدُوا۟ لَوْ أَطَاعُونَا مَا قُتِلُوا۟ ۗ قُلْ
فَٱدْرَءُوا۟ عَنْ أَنفُسِكُمُ ٱلْمَوْتَ إِن كُنتُمْ صَٰدِقِينَ ﴿١٦٨﴾

१९४. म्हणजे लोक जेव्हा आचरणाच्या दृष्टीने समान नाहीत, परिणामाच्या दृष्टीने ते कसे काय समान होऊ शकतील.

१९५. आवश्यक आहे की चांगल्या अन् वाईटामध्ये फरक केला जावा. (पाहा. सूरे बकरा टीप नं. १४९)

१९६. म्हणजे या लढाईमध्ये जरी तुमचे नुकसान झालेले आहे. तरी यापूर्वी बदरच्या लढाईमध्ये तुमच्याकडून शत्रूचे यापेक्षा दुप्पट नुकसान झालेले आहे. बद्रमध्ये काफिर लोकांचे सत्तर लोक ठार झाले होते. आणि सत्तर लोकांना कैदी बनविले गेले होते. आणि ओहोद मध्ये सत्तर मुसलमान शहीद झाले. या लढाईमध्ये देखील मुसलमानाच्या कडून काफिरांचे किती तरी लोक ठार झाले. परंतु नंतर मुसलमानांना त्यांच्या स्वत:च्या चुकीमुळे पराभव पत्कारावा लागला.

१९७. म्हणजे तुमच्या स्वत:च्या कमजोरीच्या व चुकांच्या परिणामस्वरूप.

१९८. म्हणजे तुम्हाला विजयी करण्याबाबतीत देखील समर्थ आहे आणि पराभूत करण्याबाबतीत देखील.

१९९. इशारा दाभिक लोकांच्याकडे आहे ज्यांनी मृत्यूच्या भयाने जिहादमध्ये भाग घेण्याचे टाळले. आणि हा बहाणा केला की आम्ही समजत होतो की लढाई होणारच नाही. आम्हाला जर लढाई होणार असे माहित असते तर त्या मध्ये आम्ही अवश्य भाग घेतला असता. परंतु या बरोबरच लढाईमध्ये मारल्या गेलेल्या लोकांच्याबद्दल ते असे म्हणू लागले की त्यांनी आमचे एकले असते तर त्यांची हत्या झाली नसती. यावरून स्पष्ट होते की खरी गोष्ट मृत्यूची भीती ही होती, ज्यामुळे ते लढाईसाठी निघाले नाहीत. स्पष्ट असो की या मोहिमामध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) खुद्द जातीनिशी सहभागी होते आणि जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) स्वत:आघाडी वर लढत होते तेव्हा त्यांना सोडून कोणा मुसलमानाने घरी बसून राहणे ईमानच्या अगदी विरूद्ध होते. आणि म्हणून अशा मुसलमानांची जे वस्तु: दांभिक होते. क़ुरआनमध्ये सक्त पकड केली गेली आहे.

२००. म्हणजे जर मृत्यूपासून वाचणे तुमच्या अधिकारात आहे तर स्व्त:ला मृत्यूपासून वाचवा.

❀❀❀❀❀❀

१६९. जे लोक अल्लाहच्या मार्गात मारले गेले आहेत त्यांना मृत समजू नका. ते तर जिवंत आहेत. आपल्या पालनकर्त्या जवळ उपजिविका मिळवित आहेत.[२०१]

وَلَا تَحْسَبَنَّ الَّذِيْنَ قُتِلُوْا فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ اَمْوَاتًا ؕ بَلْ اَحْيَآءٌ
عِنْدَ رَبِّهِمْ يُرْزَقُوْنَ ۙ﴿۱۶۹﴾

१७०. अल्लाहने आपल्या अनुग्रहाने त्यांना जे काही दिलेले आहे. त्याने ते खुश आहेत. आणि जे लोक त्यांच्या मागे राहिलेले आहेत आणि अद्याप त्यांच्यांत येऊन सामील झाले नाही,त्यांच्या बाबतीत आनंद साजरा करीत आहेत की त्यांच्यासाठी सुद्धा ना कोणत्याही प्रकारचे भय असेल ना ते दु:खी होतील. [२०२]

فَرِحِيْنَ بِمَآ اٰتٰىهُمُ اللّٰهُ مِنْ فَضْلِهٖ ۙ وَيَسْتَبْشِرُوْنَ بِالَّذِيْنَ لَمْ
يَلْحَقُوْا بِهِمْ مِّنْ خَلْفِهِمْ ۙ اَلَّا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُوْنَ ﴿۱۷۰﴾

१७१. त्यांना अल्लाहची देणगी आणि त्याच्या अनुग्रहाची खुशखबर मिळत आहे आणि ते समाधानी आहेत की अल्लाह मोमिन लोकांच्या मोबदल्याला निष्फळ करणार नाही.[२०३]

يَسْتَبْشِرُوْنَ بِنِعْمَةٍ مِّنَ اللّٰهِ وَفَضْلٍ ۙ وَّاَنَّ اللّٰهَ لَا يُضِيْعُ اَجْرَ
الْمُؤْمِنِيْنَ ۚ﴿۱۷۱﴾

१७२. ज्या लोकांनी आघात सहन करून अल्लाह व त्यांच्या पैगंबरांच्या सादेला प्रतिसाद दिला.[२०४] त्यांच्यामध्ये जे सदाचारी आणि ईशभय बाळगणारे लोक आहेत त्यांचा फार मोठा मोबदला आहे.

اَلَّذِيْنَ اسْتَجَابُوْا لِلّٰهِ وَالرَّسُوْلِ مِنْۢ بَعْدِ
مَآ اَصَابَهُمُ الْقَرْحُ ۛؕ
لِلَّذِيْنَ اَحْسَنُوْا مِنْهُمْ وَاتَّقَوْا اَجْرٌ عَظِيْمٌ ۚ﴿۱۷۲﴾

१७३. हे ते लोक आहेत. ज्यांना लोकांनी सांगितले की, तुमच्या विरुद्ध त्या लोकांनी मोठी शक्ती एकत्रित केली आहे. म्हणून त्यांची भिती बाळगां; तेव्हा तर त्यांच्या ईमानामध्ये वृद्धी झाली [२०५] आणि ते उद्गारले, अल्लाह आमच्यासाठी पुरेसा आहे आणि तो उत्कृष्ट असा कार्यसाधक आहे.[२०६]

اَلَّذِيْنَ قَالَ لَهُمُ النَّاسُ اِنَّ النَّاسَ قَدْ جَمَعُوْا لَكُمْ فَاخْشَوْهُمْ
فَزَادَهُمْ اِيْمَانًا ۖۗ وَّقَالُوْا حَسْبُنَا اللّٰهُ وَنِعْمَ الْوَكِيْلُ ﴿۱۷۳﴾

१७४ नंतर असे झाले की, हे लोक अल्लाहची देणगी व त्याच्या अनुग्रहासह परत आले. त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही ते अल्लाहच्या मर्जीप्रमाणे चालले आणि अल्लाह मोठा अनुग्रह करणारा आहे.

فَانْقَلَبُوْا بِنِعْمَةٍ مِّنَ اللّٰهِ وَفَضْلٍ لَّمْ يَمْسَسْهُمْ سُوْٓءٌ ۙ وَّاتَّبَعُوْا
رِضْوَانَ اللّٰهِ ؕ وَاللّٰهُ ذُوْ فَضْلٍ عَظِيْمٍ ﴿۱۷۴﴾

१७५. तो वस्तुत: शैतान होता.जो आपल्या साथीदाराचे भय तुमच्यामध्ये निर्माण करीत होता. तुम्ही मोमिन असाल तर तुम्ही त्यांना भिऊ नका. माझे भय बाळगा.

اِنَّمَا ذٰلِكُمُ الشَّيْطٰنُ يُخَوِّفُ اَوْلِيَآءَهٗ ۠ فَلَا تَخَافُوْهُمْ وَخَافُوْنِ
اِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِيْنَ ﴿۱۷۵﴾

२०१. अल्लाहच्या मार्गात मृत्यू येणे ही निरंतराच्या चांगल्या जीवनाची हमी आहे. उघडपणे असे वाटते की अल्लाहच्या मार्गात ठार झालेले लोक मेले परंतु वस्तु:-स्थिति ही आहे की मृत्यूचा प्रभाव फक्त त्यांच्या शरीरावर होतो. आत्म्यावर नाही. शहीद होणाऱ्याच्या आत्म्याला वरच्या जगामध्ये एक विशिष्ट प्रकारच्या जीवनाचा लाभ होतो. आणि हे जीवन इतके आनंददायक व हर्षवर्धक असते की त्याची कल्पना देखील या जगामध्ये केली जावूं शकत नाही.(पाहा. सूरे बक़रा टीप नं. १८५)

सही: मुस्लिमची हदीस आहे की पैगंबरानी फर्माविले:-

''हुतात्म्याचे आत्मे हिरव्या पक्षांच्या स्वरुपात असतील आणि त्यांच्या वास्तव्याचे ठिकाण ईशसिंहासनाशी लटकत असलेल्या दिव्यांजवळ असते. ते जन्नतीमध्ये जेथे इच्छितात तेथे विहार करू शकतात व त्यानंतर ते त्या दिव्यांच्याजवळ परत येतात. त्यांचा पालनकर्ता त्यांना विचारतो, तुम्हाला कोणत्या गोष्टीची इच्छा आहे? ते म्हणतात आम्हाला कसल्या गोष्टीची आवश्यकता होऊ शकते जेव्हा आम्ही जन्नत (स्वर्ग) मध्ये जसे इच्छितो तसा विहार करू शकतो? सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना तीन वेळा हा प्रशन विचारतो वरेचवर प्रश्न केला जात आहे हे जेव्हा त्यांना कळते तेव्हा ते (हुतात्मे) म्हणतात. हे आमच्या पालनकर्त्या! आम्ही इच्छितो की आमचे आत्मे आमच्या शरीरा मध्ये परत घातले जावेत. म्हणजे आमची पुन्हा तुझ्या मार्गात हत्या होऊ शकेल. सर्व श्रेष्ठ अल्लाह जेव्हा त्यांची कोणती ही गरज शिल्लक राहीली नाही हे पाहून तो त्यांना त्यांच्या स्थितीवर सोडून देतो.'' ( इब्नेकसीर भा. १ पा ४२६)

२०२. शहीद लोकांचे आत्मे मध्यंतरीच्या जीवनात (आलमे बरज़ख़) त्यांना लाभणाऱ्या प्रतिष्ठेने व मानसन्मानाने अगदी खुष होतात आणि त्यांना अधिक आनंद त्या गोष्टीने होते की त्यांनी ज्या सदाचारी संबंधित लोकांना आपल्यामागे सोडले आहे ते जरी अद्याप त्यांना भेटले नसले तरी लवकरच ते त्यांना भेटतील आणि त्यांच्यासाठी कसल्याही प्रकारची काळजी, दु:ख व चिंता नाही.

२०३. म्हणजे क़ियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह दरबार भरवील.

२०४. इशारा त्या घटनेकडे आहे जी उहोदच्या मोहीमेनंतर समोर आली. उहोदमध्ये मुसलमानाना हानि पोंहचविल्यानंतर मक्केचे क़ुरैश लोक त्याचदिवशी परत गेले. परंतु 'रौहा' येथे पोहोचल्यानंतर जे दक्षिण ठिकाण मदीनेपासून ३०मैलावर आहे. त्यांना जाणीव झाली की अशाप्रकारे लवकर परतून त्यांनी चूक केली. यावेळी त्यांना मदीनेवर हल्ला करावयास व मुसलमानांचा बीमोड करावयास हवा होता. हा विचार आल्यावर त्यांनी पुन्हा लढाई करण्याचे ठरविले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जेव्हा कुरेशांच्या या विचाराची माहिती मिळाली तेव्हा त्यांनी आपल्या एकनिष्ठा सहकाऱ्यांना बरोबर घेऊन मदीनापासून ८ मैलावर असेलेल्या हमराउल असद पर्यंत पाठलाग केला. आणि ही घटना उहोदच्या लढाईच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ शव्वाल ३ हिजरी रोजी घडली याची बातमी जेव्हा काफिर लोकांना समजली तेव्हा त्यांनी मुसलमानांचे मनोधैर्य खचलेले नाही हे जाणून आपला विचार बदल्ला. आणि ते मक्केला परत गेले. आणि मुसलमान आपला धाक बसवून यशस्वीपणे परतले. या आयतीमध्ये पैगंबरांच्या त्या एकनिष्ठ व निस्पृह सहकाऱ्यांचा उल्लेख आहे, ज्यांनी ओहोद मध्ये पराभूत झाल्यानंतर देखील धैर्य दाखविले आणि एका नव्या मोहीमेवर ते रवाना झाले.

२०५. म्हणजे लोकांच्या कडून भय व घबराट निर्माण करण्याचे जे प्रयत्न झाले ते त्यांच्यामध्ये ईमान व निर्धाराची वाढ करण्यास कारणीभूत झाले.जणू या गोष्टाने त्यांच्या निर्धारामध्ये व हिम्मतीमध्ये वाढ करणाऱ्या प्रेरक शक्तीचे काम केले.

२०६. अल्लाहवर भरवसा केल्याने ईमानधारकांमध्ये निर्धार व धैर्य निर्माण होते. हदीसमध्ये आहे की ''हस्बुनल्लाहु व निअमल वकील'' हे वचन इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांनी त्यावेळी उच्चारले होते जेव्हा त्यांना आगीमध्ये फेकण्यात आले होते.

१७६. जे लोक कुफ्र (च्या मार्गा) मध्ये उत्साह दाखवीत आहेत त्यांच्यामुळे तुम्ही खिन्न होऊ नका. ते अल्लाहला काहीही नुकसान पोहोंचवू शकणार नाहीत. अल्लाह इच्छित आहे की, त्यांच्यासाठी अखिरतमध्ये काही हिस्सा ठेवू नये. त्यांच्यासाठी तर मोठी शिक्षा आहे.

وَلَا يَحْزُنكَ الَّذِينَ يُسَارِعُونَ فِي الْكُفْرِ ۚ إِنَّهُمْ لَن يَضُرُّوا اللَّهَ شَيْئًا ۗ
يُرِيدُ اللَّهُ أَلَّا يَجْعَلَ لَهُمْ حَظًّا فِي الْآخِرَةِ ۖ وَلَهُمْ عَذَابٌ عَظِيمٌ ﴿١٧٦﴾

१७७. नि:संशय ज्या लोकांनी ईमानच्या बदल्यात 'कुफ्र' चा सौदा केला ते अल्लाहला काहीच नुकसान पोहोंचवू शकणार नाहीत. त्यांच्यासाठी तर दु:खदायक शिक्षा आहे.

إِنَّ الَّذِينَ اشْتَرَوُا الْكُفْرَ بِالْإِيمَانِ لَن يَضُرُّوا اللَّهَ شَيْئًا وَلَهُمْ
عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١٧٧﴾

१७८. ज्या लोकांनी कुफ्र केला त्यांनी ही कल्पना करू नये की,ही जी ढील आम्ही त्यांना देत आहोत ती त्यांच्या पक्षात चांगली आहे. ही ढील तर आम्ही त्यांना यासाठी देत आहोत की,त्यांनी पुष्कळसे गुन्हे करावेत.[२०७] नंतर मग त्यांच्यासाठी मोठी अपमानास्पद शिक्षा आहे.

وَلَا يَحْسَبَنَّ الَّذِينَ كَفَرُوا أَنَّمَا نُمْلِي لَهُمْ خَيْرٌ لِّأَنفُسِهِمْ ۚ
إِنَّمَا نُمْلِي لَهُمْ لِيَزْدَادُوا إِثْمًا ۚ وَلَهُمْ عَذَابٌ مُّهِينٌ ﴿١٧٨﴾

१७९. अल्लाह ईमानधारकांना त्या स्थितीत कधीही सोडणार नाही. ज्या स्थितीत आज तुम्ही आहात जोपर्यंत तो अशुद्धांना शुद्धापासून वेगळे करणार नाही.[२०८] आणि अल्लाहची ही पद्धत नाही की अदृश्याच्या त्या गोष्टींची तुम्हाला माहिती द्यावी.[२०९] परंतु अल्लाह आपल्या पैगंबरांपैकी ज्याला इच्छितो त्याला या कामासाठी निवडतो आणि म्हणून अल्लाह व त्याच्या पैगंबरांवर ईमान आणा आणि तुम्ही ईमान आणून अल्लाहचे भय बाळगून राहाल तर तुमच्यासाठी फार मोठा मोबदला आहे.

مَّا كَانَ اللَّهُ لِيَذَرَ الْمُؤْمِنِينَ عَلَىٰ مَا أَنتُمْ عَلَيْهِ حَتَّىٰ يَمِيزَ
الْخَبِيثَ مِنَ الطَّيِّبِ ۗ وَمَا كَانَ اللَّهُ لِيُطْلِعَكُمْ عَلَى الْغَيْبِ
وَلَٰكِنَّ اللَّهَ يَجْتَبِي مِن رُّسُلِهِ مَن يَشَاءُ ۖ فَآمِنُوا بِاللَّهِ
وَرُسُلِهِ ۚ وَإِن تُؤْمِنُوا وَتَتَّقُوا فَلَكُمْ أَجْرٌ عَظِيمٌ ﴿١٧٩﴾

१८०. अल्लाहने ज्या लोकांच्यावर आपला अनुग्रह केलेला आहे. आणि त्यानंतरही जे त्यामध्ये कंजूषपणा करतात. त्यानी असे समजू नये की असे करणे त्यांच्यासाठी चांगले आहे. नाही हे त्यांच्यासाठी फार वाईट आहे. ही धनदौलत ज्यामध्ये ते कंजूषपणा करतात,क़ियामतीच्या दिवशी जोखड बनवून त्यांच्या गळ्यात घातली जाईल.[२१०]आणि आकाशांचा व जमिनीचा वारसा अल्लाहसाठीच आहे.[२११]आणि तुम्ही जे काही करता ते सर्व अल्लाह जाणत आहे.

وَلَا يَحْسَبَنَّ الَّذِينَ يَبْخَلُونَ بِمَا آتَاهُمُ اللَّهُ مِن
فَضْلِهِ هُوَ خَيْرًا لَّهُم ۖ بَلْ هُوَ شَرٌّ لَّهُمْ ۖ سَيُطَوَّقُونَ
مَا بَخِلُوا بِهِ يَوْمَ الْقِيَامَةِ ۗ وَلِلَّهِ مِيرَاثُ السَّمَاوَاتِ
وَالْأَرْضِ ۗ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ خَبِيرٌ ﴿١٨٠﴾

२०७. येथे शैतानच्या साथीदाराने अभिप्रेत काफिर लोकांचे सैन्य आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह काफिर लोकांना यास्तव सैल सोडतो की त्यांना विचार करण्यास व स्वता:ची सुधारणा करण्यास पुरेपुर संधि लाभावी. आणि त्यांना कधी ना कधी आपल्या चुकीची जाणीव होऊन त्यांनी ईमानकडे परत फिरावे. परंतु जेव्हा ते या सैलपणाचा गैरफायदा घेऊन आपल्या इन्कारामध्ये अधिक पक्के होतात तेव्हा ते गुन्ह्यावर गुन्हे करीत सुटतात. आणि सरतेशेवटी त्यांना वाईट परिणाम भोगावा लागतो. अशा प्रकारे परिणामाच्या दृष्टिने हा सैलपणा त्यांच्यासाठी नाशाचे कारण बनतो. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना जी ढील दिली होती ती यासाठीच होती की त्यांनी आपल्या नाशाचा मालमसाला तयार करावा.

२०८. म्हणजे अल्लाह मुसलमान समाजाची कसोटी घेईल. हेतु हा की खऱ्या ईमानधारकांची वर्तणूक स्पष्ट व्हावी आणि दांभिक लोकांची वागणूकही उघडकीस यावी.

२०९.म्हणजे लोकांच्या मनाची स्थिती सर्वश्रेष्ठ अल्लाह अदृश्य (गैब) मार्गाने तुम्हाला दाखवून देणार नाही की अमुक माणूस मुसलमान आहे नि अमूक माणूस दांभिक आहे. तो अशी परिस्थिती निर्माण करील की प्रत्येकाचे खरे स्वरुप प्रकट होईल.

२१०. म्हणजे जे लोक अल्लाहच्या कृपेने लाभलेल्या संपत्तीला अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यामध्ये आणि त्याने घालून दिलेल्या आर्थिक जबाबदारीला पार पाडण्यामध्ये विलंब लावतात. क़ियामतीच्या दिवशी त्यांची ही संपत्ती त्यांच्या मानेवर भारी जोखड बनेल. जोखडाने या गोष्टी कडे ही इशारा आहे की अल्लाहच्या जबाबदारीबद्दल (हक्काबद्दल) बेपर्वा होऊन सोन्याचे जे हार शोभेसाठी व सौंदर्यासाठी वापरले जातात ते त्या दिवशी गळ्यातील जोखड बनतील.

२११. म्हणजे जी संपत्ती माणसाला लाभली आहे ती ठेव म्हणून लाभली आहे. सरतेशेवटी साऱ्या गोष्टी अल्लाह कडेच परत फिरणार आहेत. आणि म्हणून ज्या माणसाला संपत्ती लाभली आहे त्याने हा विचार करू नये की तो खरोखरच संपत्तीचा मालक बनला आहे. संपत्तीवरील त्याचा कबजा व अधिकार तात्पुरता आहे. आणि म्हणून अल्लाहच्या मार्गात संपत्ती खर्च करण्याबाबत त्याने टाळटाळ करू नये. अल्लाह तआलाचे वारस होण्याची कल्पना धनपुजेला व ऐहिकपूजेला समूळ नष्ट करते.

१८१. अल्लाहने त्या लोकांची उक्ती ऐकली जे म्हणाले की अल्लाह फकीर आहे व आम्ही संपन्न आहोत.[२१२] आम्ही त्यांच्या या उक्तीला लिहून ठेवू आणि त्यांनी पैगंबरांची जी निष्कारण हत्या केली आहे त्यालाही.आणि आम्ही त्यांना सांगू की, चाखा आता आगीच्या यातनांच्या शिक्षेची मजा !

لَقَدْ سَمِعَ اللّٰهُ قَوْلَ الَّذِيْنَ قَالُوْٓا اِنَّ اللّٰهَ فَقِيْرٌ وَّنَحْنُ
اَغْنِيَآءُ ۘ سَنَكْتُبُ مَا قَالُوْا وَقَتْلَهُمُ الْاَنْبِيَآءَ بِغَيْرِ حَقٍّ ۙ
وَّنَقُوْلُ ذُوْقُوْا عَذَابَ الْحَرِيْقِ ﴿١٨١﴾

१८२. हे तेच आहे जे तुम्ही स्वत:च्या हातांनी स्वत: साठी तयार केले आहे. नाहीपेक्षा अल्लाह आपल्या दासांवर कधीही अत्याचार करीत नाही.

ذٰلِكَ بِمَا قَدَّمَتْ اَيْدِيْكُمْ وَاَنَّ اللّٰهَ لَيْسَ
بِظَلَّامٍ لِّلْعَبِيْدِ ﴿١٨٢﴾

१८३. जे लोक म्हणतात की, अल्लाहने आम्हाला आज्ञा दिली आहे की, आम्ही कोणाही पैगंबराला तोपर्यंत मानू नये जोपर्यंत तो आमच्यासमोर अशी आहुती देत नाही. जिला अग्नी स्वाहा करील. त्यांना सांगा. माझ्यापूर्वी तुमच्याकडे कितीतरी पैगंबर स्पष्ट अशा निशाण्या घेऊन आले होते. आणि ती गोष्टही घेऊन आले होते. जिच्याबद्दल तुम्ही सांगत आहात. तुम्ही प्रामाणिक आहात. तर मग तुम्ही त्यांची हत्या कां केली?[२१३]

اَلَّذِيْنَ قَالُوْٓا اِنَّ اللّٰهَ عَهِدَ اِلَيْنَآ اَلَّا نُؤْمِنَ لِرَسُوْلٍ
حَتّٰى يَاْتِيَنَا بِقُرْبَانٍ تَاْكُلُهُ النَّارُ ۭ قُلْ قَدْ جَآءَكُمْ رُسُلٌ
مِّنْ قَبْلِيْ بِالْبَيِّنٰتِ وَبِالَّذِيْ قُلْتُمْ فَلِمَ قَتَلْتُمُوْهُمْ
اِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿١٨٣﴾

१८४. आणि (हे पैगंबर!) हे तुम्हांला खोटे ठरवितात तर कितीतरी पैगंबर तुमच्यापूर्वी खोटे ठरविले गेले आहेत. ते स्पष्ट अशा निशाण्या,[२१४] सहीफे (धर्मलेख) व दीव्य ग्रंथ घेऊन आले होते.

فَاِنْ كَذَّبُوْكَ فَقَدْ كُذِّبَ رُسُلٌ مِّنْ قَبْلِكَ جَآءُوْ
بِالْبَيِّنٰتِ وَالزُّبُرِ وَالْكِتٰبِ الْمُنِيْرِ ﴿١٨٤﴾

१८५. प्रत्येक जिवाला शेवटी मरणाची मजा चाखावयाची आहे.[२१५]आणि तुम्हाला पुरापुरा मोबदला तर क़ियामतीच्या दिवशीच दिला जाईल. तरी ज्या माणसाला (जहन्नम) आगीपासून वाचविले गेले आणि जन्नतमध्ये दाखल केले गेले तो नि:संशय सफल झाला. आणि हे दुनियेतील (ऐहिक) जीवन तर फसवणुकीच्या सामानाशिवाय दुसरे काही नाही.

كُلُّ نَفْسٍ ذَآئِقَةُ الْمَوْتِ ۭ وَاِنَّمَا تُوَفَّوْنَ اُجُوْرَكُمْ
يَوْمَ الْقِيٰمَةِ ۭ فَمَنْ زُحْزِحَ عَنِ النَّارِ وَاُدْخِلَ
الْجَنَّةَ فَقَدْ فَازَ ۭ وَمَا الْحَيٰوةُ الدُّنْيَآ
اِلَّا مَتَاعُ الْغُرُوْرِ ﴿١٨٥﴾

१८६. तुम्हांला प्राण व धनाच्या बाबतीत अवश्य आजमाविले जाईल. आणि तुम्हांला त्या लोकांकडून ज्यांना तुमच्यापूर्वी ग्रंथ दिला गेला होता आणि अनेकेश्वरवाद्यांकडून पुष्कळ शा कलेशदायक गोष्टी ऐकाव्या लागतील. परंतु तुम्ही सहनशीलतेने वागलात आणि ईशभय बाळगून राहिलात तर ही मोठ्या निर्धाराची व धैर्याची गोष्ट होईल.

لَتُبْلَوُنَّ فِيْٓ اَمْوَالِكُمْ وَاَنْفُسِكُمْ ۣ وَلَتَسْمَعُنَّ
مِنَ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ مِنْ قَبْلِكُمْ وَمِنَ الَّذِيْنَ
اَشْرَكُوْٓا اَذًى كَثِيْرًا ۭ وَاِنْ تَصْبِرُوْا وَتَتَّقُوْا فَاِنَّ
ذٰلِكَ مِنْ عَزْمِ الْاُمُوْرِ ﴿١٨٦﴾

२१२. इशारा त्या गोष्टीकडे आहे जेव्हा पवित्र क़ुरआनमध्ये ईशमार्गात खर्च करण्यासंबंधी प्रोत्साहनपर फर्माविले गेले की कोण आहे जो अल्लाहला कर्ज देतो? तेव्हा यहुदी लोक आणि काही दांभिक लोक जे यहुद्यापैकी होते असे म्हणून थट्टा करू लागले की अल्लाहमियांदेखील फकीर झाले आहेत आणि आमच्यापासून कर्ज मागत आहेत.

२१३. बनी इसराईलमधील पैगंबरांपैकी काही पैगंबरांच्याकडून हा चमत्कार घडविला गेला की कुर्बानीच्या स्वीकाराची निशाणी म्हणून आकाशातून अग्नी उतरला त्याने कुर्बानीला खाऊन टाकले. उदा. एलीया पैगंबरांच्या संबंधी आहे की,

''तेव्हा परमेश्वरापासून अग्नी उतरला आणि त्याने होमबली इंधने, धोंडे आणि माती ही भस्म करून टाकली.''

(१ राजे १८- ३८)

''सुलेमानाने प्रार्थना करणे संपविल्यावर स्वर्गातून अग्नीने येऊन होमबली व यज्ञबली भस्म केले.'' (२ इतिहास ७-१)

परंतु कोठेही याला प्रेषितत्वाची अट ठरविले नव्हते की जोपर्यंत एखादा पैगंबर चमत्कार दाखवित नाही तोपर्यंत त्याच्या प्रेषित्वाचा स्वीकार करू नये. ही अट यहुदी लोकांनी खोडसाळपणे आपल्याकडून लावली होती. आणि म्हणून त्यांना हे उत्तर देणे पुरेसे समजले गेले की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यापूर्वी असे काही पैगंबर होऊन गेले ज्यांनी होमबलीचा चमत्कार घडविला होता. तरीपण तुम्ही त्यांना ठार मारले उदाहरणार्थ, बायबलमध्ये आहे.

''तो म्हणाला (एलिया), सेनाधीश देव परमेश्वर याज विषयी मी फार इर्ष्यायुक्त झाले आहे. कारण इस्राईल लोकांनी तुझा करार पाळण्याचे सोडिले, तुझ्या विधा मोडून टाकिल्या, तुझे संदेष्टे तलवारीने वधिले. मीच काय तो एकटा उरलो आहे. आणि आता ते माझाही जीव घेरू पाहत आहेत.'' (१ राजे १९-१४)

म्हणून अपेक्षित चमत्कार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हातून घडविला गेला तरी सुद्धा हे लोक जे जाणून बुजून खोडसाळपणा करीत आहेत ते ईमान न आणण्यासाठी दुसरी एखादी सबब शेधून काढतील.

२१४. स्पष्ट निशाण्यामध्ये (बय्यानात) चमत्कारांचा देखील समावेश आहे.

२१५. मृत्यु एक असे सत्य आहे जे प्रत्येक जण पाहूं शकतो. माणसाने पुष्कळशी शास्त्रीय प्रगती केली असता देखील तो मृत्युवर ताबा मिळवू शकलेला नाही. आणि मानवी देहाच्या रचनेचा विचार केल्यास या गोष्टीची काही शक्यता दिसून येत नाही की तो यापुढे देखील मृत्युवर ताबा मिळूव शकेल. मृत्यू हे अटळ सत्य आहे. तेव्हा मृत्यूच्या पलीकडे काय आहे हा प्रशन माणसाचे लक्ष वेधण्यास पात्र ठरतो. इतक्या महत्त्वाच्या विषयावर शांतपणे विचार न करणे किंवा एखादी अंधश्रद्धा किंवा एखादी अवास्तव श्रद्धा आपल्या मनात वाळगणे ही मूलभूत चूक आहे, ज्याच्या परिणामस्वरूप माणसाचे सारे जीवनच चुकीचे होऊन राहते.

दुसरे महान सत्य ज्यावरून ''क़ुरआन'' पडदा हटवितो ते हे आहे की मृत्यू हा माण्साच्या जीवनाचा शेवट नव्हे तर तो पूल आहे जो पार करून माणूस कृतीच्या जीवनामधून परिणामाच्या जीवनात प्रवेश करतो.

**१८७. आणि स्मरण करा, जेव्हा अल्लाहने त्या लोकांकडून ज्यांना ग्रंथ दिला आहे प्रतिज्ञा घेतली होती की,त्याला ते लोकांहसमोर निवेदन करतील आणि त्याला लपविणार नाहीत. परंतु त्यांनी त्याला पाठीमागे टाकले आणि थोड्याशा किंमतीवर विकले.[२१६] किती वईट किंमत आहे ती, जी ते मिळवित आहेत.**

وَاِذْ اَخَذَ اللّٰهُ مِيْثَاقَ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ لَتُبَيِّنُنَّهٗ
لِلنَّاسِ وَلَا تَكْتُمُوْنَهٗ فَنَبَذُوْهُ وَرَآءَ ظُهُوْرِهِمْ
وَاشْتَرَوْا بِهٖ ثَمَنًا قَلِيْلًا فَبِئْسَ مَا يَشْتَرُوْنَ ﴿١٨٧﴾

**१८८. जे लोक आपल्या कृत्याबद्दल अभिमान बाळगतात आणि इच्छितात की जी कामे त्यांनी केलेली नाहीत शक्य त्यांचे बद्दल पण त्यांची स्तुती करावी.[२१७] त्यांना तुम्ही शिक्षेपासून सुरक्षित समजू नका. त्यांच्यासाठी तर दु:ख दायक शिक्षा आहे.**

لَا تَحْسَبَنَّ الَّذِيْنَ يَفْرَحُوْنَ بِمَآ اَتَوْا وَّيُحِبُّوْنَ اَنْ يُّحْمَدُوْا
بِمَا لَمْ يَفْعَلُوْا فَلَا تَحْسَبَنَّهُمْ بِمَفَازَةٍ مِّنَ الْعَذَابِ
وَلَهُمْ عَذَابٌ اَلِيْمٌ ﴿١٨٨﴾

**१८९. आकाशांचे व जमिनीचे सार्वभीमत्व अल्लाहसाठीच आहे. आणि प्रत्येक गोष्ट अल्लाहच्या सामर्थ्याधीन आहे.**

وَلِلّٰهِ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَاللّٰهُ
عَلٰى كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ﴿١٨٩﴾

**१९०. नि:संशय [२१८] आकाशाच्या व जमिनीच्या निर्मिती मध्ये आणि रात्री व दिवसाच्या एकदुसऱ्याच्या पाठोपाठ येण्यामध्ये बुद्धिवान [२१९] लोकांसाठी मोठ्याच निशाण्या आहेत.[२२०]**

اِنَّ فِيْ خَلْقِ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَاخْتِلَافِ الَّيْلِ
وَالنَّهَارِ لَاٰيٰتٍ لِّاُولِي الْاَلْبَابِ ﴿١٩٠﴾

**१९१. ज्यांची स्थिती ही आहे की, उभे असताना, बसलेले असताना आणि लवंडले असताना अल्लाहचे स्मरण करीत असतात [२२१] आणि आकाशांच्या व जमिनीच्या निर्मितीवर विचार करीत असतात [२२२] (ते अंत:स्फूर्ति पुकारतात) हे आमच्या पालनकर्त्या ! हे सर्व काही तू निरर्थक निर्मिलेले नाहीस. (असे व्यर्थकाम तुझ्याकडून व्हावे यापासून) तू पवित्र आहेस तर तू आम्हांला आगीच्या शिक्षेपासून वाचव.**

الَّذِيْنَ يَذْكُرُوْنَ اللّٰهَ قِيٰمًا وَّقُعُوْدًا وَّعَلٰى جُنُوْبِهِمْ
وَيَتَفَكَّرُوْنَ فِيْ خَلْقِ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ رَبَّنَا مَا
خَلَقْتَ هٰذَا بَاطِلًا سُبْحٰنَكَ فَقِنَا عَذَابَ النَّارِ ﴿١٩١﴾

**१९२. हे आमच्या पालनकर्त्या ! ज्याला तू आगीमध्ये टाकलेस त्याला तू वस्तूत: अपमानित केलेस आणि अत्याचारी लोकांचा कोणी सहाय्यक नाही.**

رَبَّنَآ اِنَّكَ مَنْ تُدْخِلِ النَّارَ فَقَدْ اَخْزَيْتَهٗ وَمَا لِلظّٰلِمِيْنَ
مِنْ اَنْصَارٍ ﴿١٩٢﴾

२१६. पाहा सूरे बकरा टीप नं. ६४.

२१७. जे लोक वस्तुत: धार्मिक प्रवृत्तीचे नसतात ते जेव्हा धार्मिकतेचे आवरण घेतात तेव्हा ते लोकांकाडून आपल्या धार्मिकतेची व धर्मनिष्ठेची स्तुती एकू इच्छितात. आणि त्यांची इच्छा ही असते की लोकांनी त्यांच्या स्तुतीचे पोवाडे गावेत.

२१८. येथून सुरतीच्या शेवट पर्यंतच्या आयती मजकूराच्या समारोपाच्या स्वरूपात आहेत. हदीसमध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अर्धी रात्र टळल्यानंतर जागे होत असत. आणि आकाशाकडे पाहून या आयतींची तिलावत करीत असत. जणू मनन व चितनासाठी रात्रीचा शेवटचा प्रहर ही उत्कृष्ट वेळ आहे. कारण त्यावेळी माणसाला एकाग्रता लाभते.

२१९. क़ुरआनच्या दृष्टीने बुद्धिमान ते आहेत जे विश्वाचा अभ्यास अशा प्रकारे करतात की ते निर्माण करण्याचा परिचय त्यांना घडावा आणि यामागील उद्दिष्ट स्पष्ट व्हावे. जे लोक या मूलभूत प्रश्नासंबंधी एक पूर्वग्रहदुषित उत्तर आपल्या मनात बाळगून खगोलशास्त्र व भूगर्भ शात्र वगैरेचा अभ्यास आपले ज्ञान वाढविण्यासाठी करतात त्यांना क़ुरआन बुद्धिमान मानीत नाही. असे लोक आकाशामध्ये भ्रमण करून देखील रिकाम्या हाताने परत येतात. त्यांना ना कोठे ईश्वर आढळतो ना कोठे आखिरतच्या जीवनाचा थांग लागतो.

**ढूंढने वाला सितारों कि गुजरगाहों का**
**अपने अफ़कार कि दुनया में सफर कर न सका**

स्पष्ट असो की ज्याचे उद्दिष्ट फक्त माहिती गोळा करणे हे आहे तो सत्यापर्यंत कसा काय पोहचूं शकेल?सत्यापर्यंत फक्त तोच पोहचूं शकतो ज्याचा प्रवास सत्याच्या शोधासाठी होत असतो.

२२०. म्हणजे आकाश व जमिनीची निर्मिती आणि रात्र व दिवसाची ही व्यवस्था या गोष्टीची साक्ष देते की हे विश्व ईश्वराशिवाय नाही. आणि याला निर्माण करणारे व चालविणारे अनेक ईश्वर नाहीत. एका सर्वश्रेष्ठ ईश्वराची ही निर्मिती, एका बुद्धिमानाने तयार केलेली ही योजना, एका न्यायी शक्तीची ही न्यायव्यावस्था आणि रहमान व रहीमच्या कृपेचा व दयाळूपणाचा हा अविष्कार आहे. म्हणून माणूस व या विश्वाचे अस्तित्व कदापिही निरर्थक होऊ शकत नाही. अल्लाह पवित्र आहे. तो निरर्थक व व्यर्थ असे कार्य करणार नाही.

१२१. अल्लाहचे स्मरण करण्यासाठी कोणत्याही खास वेळेचे बंधन नाही. याउलट अल्लाहचे स्मरण प्रत्येक परिस्थितीत व सर्वदा अपेक्षित आहे. माणूस बसलेला असो वा उभा असो, कार्यात मग्न असो वा आराम करीत असो, ज्याप्रमाणे श्वासोच्छवास मानवी जीवनास आवश्यक आहे त्याचप्रमाणे माणसाच्या आध्यात्मिक जीवनासाठी ईश्वराचे स्मरण आवश्यक आहे. आणि बुद्धिमान लोकांचा हा गुण आहे की ते अल्लाहच्या स्मरणापासून कोणत्याही वेळी गाफील राहत नाहीत.

२२२. हे बुद्धिमान लोकांचे दुसरे वैशिष्ट्य आहे. त्याचे स्मरण चिंतनापासून मुक्त असत नाही. आणि इस्लाममध्ये या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. अल्लाहच्या स्मरणाबरोबर अखिरत बद्दलही चिंतन व्हावयास हवे.

رَبَّنَآ إِنَّنَا سَمِعْنَا مُنَادِيًا يُنَادِي لِلْإِيمَانِ
أَنْ آمِنُوا بِرَبِّكُمْ فَآمَنَّا ۚ رَبَّنَا فَاغْفِرْ لَنَا ذُنُوبَنَا
وَكَفِّرْ عَنَّا سَيِّئَاتِنَا وَتَوَفَّنَا مَعَ الْأَبْرَارِ ١٩٣

**१९३.** हे आमच्या पालनकर्त्या ! आम्ही एका पुकारणाऱ्याला ऐकले जो ईमानाकडे बोलावीत होता.त्याचे आवाहन हे होते की आपल्या पालनकर्त्यावर ईमान आणा. तेव्हा आम्ही ईमान आणले हे आमच्या पालनकर्त्या ! आमच्या गुन्ह्यांना क्षमा कर. आमच्या दुष्कृत्यांना दूर कर आणि आम्हांला सदाचारी लोकांच्याबरोबर (या जगातून) उठव.

رَبَّنَا وَآتِنَا مَا وَعَدتَّنَا عَلَىٰ رُسُلِكَ وَلَا تُخْزِنَا يَوْمَ الْقِيَامَةِ ۗ
إِنَّكَ لَا تُخْلِفُ الْمِيعَادَ ١٩٤

**१९४.** हे आमच्या पालनकर्त्या ! आपल्या पैगंबरांच्या मार्फत ज्या गोष्टींचा तू वायदा केला आहेस. त्यांचा आम्हांला लाभ होऊ दे आणि क़ियामतीच्या दिवशी आम्हांला अपमानित करू नकोस. निःसंशय तू आपल्या वायद्याविरुद्ध करीत नाहीस.

فَاسْتَجَابَ لَهُمْ رَبُّهُمْ أَنِّي لَا أُضِيعُ عَمَلَ عَامِلٍ مِّنكُم مِّن
ذَكَرٍ أَوْ أُنثَىٰ ۖ بَعْضُكُم مِّن بَعْضٍ ۖ فَالَّذِينَ هَاجَرُوا
وَأُخْرِجُوا مِن دِيَارِهِمْ وَأُوذُوا فِي سَبِيلِي وَقَاتَلُوا وَقُتِلُوا
لَأُكَفِّرَنَّ عَنْهُمْ سَيِّئَاتِهِمْ وَلَأُدْخِلَنَّهُمْ جَنَّاتٍ تَجْرِي
مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ ثَوَابًا مِّنْ عِندِ اللَّهِ ۗ وَاللَّهُ
عِندَهُ حُسْنُ الثَّوَابِ ١٩٥

**१९५.** तेव्हा त्यांच्या पालनकर्त्याने त्यांच्या प्रार्थनेचा स्वीकार केला [२२३] की, मी तुमच्यापैकी कोणाही आचरण करणाऱ्याच्या आचरणाला-मग तो पुरुष असो वा स्त्री [२२४] वाया घालविणार नाही. तुम्ही सर्व एकदुसऱ्यापासून आहात [२२५] तरी ज्या लोकांनी ''हिजरत'' (स्थलांतर) केली आणि जे लोक आपल्या घरामधून हाकलले गेले आणि माझ्या मार्गात सताविले गेले आणि लढले व मारले गेले. त्यांच्यापासून त्यांच्या दुष्कर्मांना दूर करीन. आणि त्यांना अशा बागामध्ये दाखल करीन, ज्याखालून जलप्रवाह वाहत आहेत. हे अल्लाहकडील बक्षीस असेल आणि उत्कृष्ट बक्षीस तर अल्लाहजवळच आहे.

لَا يَغُرَّنَّكَ تَقَلُّبُ الَّذِينَ كَفَرُوا فِي الْبِلَادِ ١٩٦

**१९६.** निरनिराळ्या देशांत काफिरांची धावपळ तुम्हांला भ्रमांत टाकू नये.[२२६]

مَتَاعٌ قَلِيلٌ ثُمَّ مَأْوَاهُمْ جَهَنَّمُ ۚ وَبِئْسَ الْمِهَادُ ١٩٧

**१९७.** हे थोड्याशा फायद्याचे सामान आहे. यानंतर त्यांचे ठिकाण तर जहन्नमच आहे. आणि किती वाईट निवास स्थान आहे ते !

२२३. ही प्रार्थना श्रद्धेच्या (इमानच्या) भावनेने केली होती आणि म्हणून तिचा स्वीकार पण केला गेला.

२२४. ज्यावेळी ही सूरत उतरली आहे त्यावेळी मुसलमानांना अल्लाहच्या मार्गात मोठ्या संकटाना तोंड द्यावे लागत होते. त्यामध्ये पुरुषांच्या बरोबर स्त्रीयांचाही समावेश होता आणि म्हणून त्यांचा खास उल्लेख करून मनोधैर्य वाढविले गेले.

२२५. म्हणजे पुरुष व स्त्री दोघेही एकाच प्रकारचे आहेत. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ निर्णयाबाबतीत स्त्री व पुरुषांसाठी वेगवेगळ्या कसोट्या नाहीत. आणि म्हणून कोणी स्त्री असेल तर, स्त्री म्हणून तिच्या मोबदल्यात कदापिही काही कमी केले जाणार नाही.

१९८. अलबत, जे लोक आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगून राहिले. त्यांच्यासाठी बागा आहेत. ज्यांमधून जलप्रवाह वाहत असतील ते त्यामध्ये सदैव राहतील. ही त्यांच्या साठी अल्लाहकडील पाहुणचाराची सामुग्री आहे. आणि जे काही अल्लाहजवळ आहे ते सदाचारी लोकांसाठी कितीतरी चांगले आहे.[२२७]

لكن الذين اتقوا ربهم لهم جنت تجري من تحتها الأنهر
خلدين فيها نزلا من عند الله وما عند الله
خير للأبرار ﴿١٩٨﴾

१९९. ग्रंथधाारकांपैकी काही लोक असे आहेत. जे अल्लाहवर ईमान ठेवितात आणि त्या गोष्टीवरही ईमान ठेवतात जी तुमच्याकडे उतरविली गेली आहे. आणि त्या गोष्टीवरही ईमान ठेवतात जी त्यांच्याकडे उतरविली गेली होती [२२८] आणि त्यांची स्थिती ही आहे की, ते अल्लाहच्या हूजूर झुकलेले असतात अल्लाहच्या आयतींना ते क्षुल्लक किंमतीवर विकत नाहीत. अशाच लोकांसाठी त्यांच्या पालनकर्त्याजवळ त्यांचा मोबदला आहे. खात्री बाळगा अल्लाह लवकरच हिशेब चुकता करणार आहे.

وإن من أهل الكتب لمن يؤمن بالله وما أنزل إليكم
وما أنزل إليهم خشعين لله لا يشترون بايت الله
ثمنا قليلا أولئك لهم أجرهم عند ربهم إن الله
سريع الحساب ﴿١٩٩﴾

२००. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! [२२९] धीर धरा. मुकाबल्या मध्ये दृढ असा (जिहादसाठी) तयार असा [२३०] आणि अल्लाहचे भय बाळगून असा [२३१] म्हणजे तुम्ही सफल होऊ शकाल.

يأيها الذين امنوا اصبروا وصابروا ورابطوا واتقوا الله
لعلكم تفلحون ﴿٢٠٠﴾

२२६. म्हणजे काफिर लोकांची भौतिक प्रगती, ऐहिक सुस्थिती आणि त्यांच्या जागतिक हालचाली पाहून तुम्ही हा गैरसमज करून घेऊ नका की ते योग्य व यशस्वी जीवन जगत आहेत. नाही. ही काही दिवसाच्या जीवनाची मजा आहे. यानंतर ते सरळ जहन्नममध्ये दाखल होणार आहेत.

२२७. प्रसंगानरूप या आयतीमध्ये दुर्बल व अत्याचार पीडीत मुसलमानांना प्रोत्साहन दिले गेलेले आहे की जर ते अल्लाहचे भय बाळगून संयमाचा मार्ग अनुसरतील तर आखिरतच्या जीवनामध्ये त्यांचे अत्यंत थाटाने स्वागत करून त्यांचा भव्य पाहूणाचार केला जाईल. अल्लाहने आपल्या एकनिष्ठ दासांसाठी उत्तम अशा गोष्ट तयार करून ठेविल्या आहेत.

२२८. हे ते ग्रंथधारक आहेत जे खरोखर सर्वश्रेष्ठ अल्लाहवर ईमान बाळगीत होते, पूर्वीच्या ग्रंथावर ईमान बाळगण्याबरोबर त्यांनी पवित्र क़ुरआन वर ही ईमान आणले.दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे हे ग्रंथधारक वस्तुत: मुसलमान होते आणि म्हणून क़ुरआन उतरल्यानंतर त्यांना पवित्र क़ुरआनवर व ते आणणाऱ्या पैगंबरांच्यावर ईमान आणण्यामध्ये काही संकोच राहिला नाही.

२२९. हा सुरतीच्या मजकूराचा शेवटचा भाग आहे. आणि यामध्ये परिस्थितीचा विचार करून मार्गदर्शन केले गेले आहे. आणि इस्लाम विरोधी शक्तीबरोबर सामना करण्यासाठी त्याची आवश्यकता होती.

२३०. म्हणजे इस्लाम विरोधी शक्तीबरोबर सामना करण्यासाठी सर्व प्रकारे तयार राहा. ''राबितू'' या शब्दामध्ये जिहादसाठी भौतिक तयारी करणे, सामर्थ्य एकवटणे, संरक्षणाची तयारी करणे, रक्षण करणे आणि लढण्या-मरण्यासाठी तयार असणे या सर्व गोष्टींचा समावेश होतो. हदीस मध्ये ''रिबात'' (जिहादसाठी तयार असणे व रक्षण करणे) ला सर्वोत्कृष्ट सेवा ठरविण्यात आले आहे.

رباط یوم فی سبیل اللہ خیر من الدنیا وما علیہا

(ابن کثیر بحوالہ بخاری ج ۱ ص ۴۴۵)

''अल्लाहच्या मार्गात एका दिवसाचे संरक्षण जग व जगात जे काही आहे त्यपेक्षा अधिक चांगले आहे.''

(इब्ने कसीर हवाला बुखारी भा. १ पा. ४४५)

२३१. सूरे बकराच्या सुरवातीस फर्माविले गेले होते की, ''ईश-भय बाळगणाऱ्या लोकांच्यासाठी मार्गदर्शन आहे'' आणि येथे सूरे आले इमरान च्या शेवटी फर्माविले गेले आहे की ''अल्लाहचे भय बाळगा म्हणजे तुम्ही यशस्वी होऊ शकाल.'' यावरून स्पष्ट होते की या दोन सुरतीमध्ये जे आदेश व नियम निवेदन केले गेले आहेत आणि जे मार्गदर्शन केले गेले आहे, त्यांचे पालन करणे म्हणजे तक्वा. आणि मुत्तकी (संयम बाळगणारे सयमी) ते होत ज्यांनी हा गुण आपल्यामध्ये निर्माण केला आहे.

# ४. सूरह अन्निसा

**नाव:-** या सूरतीचे नाव ''अन्निसा'' आहे. हे नाव त्या मजकूराकडे इशारा करते ज्यामध्ये स्त्रीयांचे अधिकार (हक्क) वगैरेंचा उल्लेख आहे.

**अवतरण काल:-** ही सूरत ''मदनी'' आहे आणि मजकूरावरून अंदाज होतो की ही सूरत आले इमराननंतर उतरली असावी. आणि सन ३ हिजरीच्या शेवट पासून सन ५ हिजरी पावेतो या सूरतीच्या आयती निनिराळ्या वेळी उतरल्या असाव्यात, ज्यांना नंतर एकत्र केले गेले आहे.

**मध्यवर्ति विषय:-** या सूरतीमध्ये सामाजिक व सामूहिक जीवनासंबंधीचे कायदेकानून व अदेश निवेदन केले गेले आहेत. परंतु निवेदनशैली कायद्याच्या भाषेसारखी ना रुक्ष आहे ना गुंतागुंतीची आहे. याउलट भाषा अत्यंत सरळ व सोपी आहे. मनाला व बुद्धिला आकर्षित करणारी ज्ञानवर्धक या कायद्या व आदेशांबरोबर पवित्र क़ुरआनच्या आवाहनालाही सादर केले गेले आहे. हेतु हा की खऱ्या जीवनध्येयावर दृष्टी टिकून असावी. आणि कायद्या व अदेशांची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने होत जावी-केवळ कायदेशिर व ''फिक़ह'' च्या अंदाजाने नव्हे.

सूरतीच्या एका भागात दांभिक लोकांच्या हालचालींची व खोडसाळपणाची पकड केली गेली आहे. त्याचे एक कारण हे आहे की या सूरतीच्या अवतरण कालाच्या वेळची स्थिती अशी होती की दांभिक लोकांच्या वाढत्या हालचालींची दखल घेण्यात यावी. दुसरे कारण हे की धार्मिक आदेश व धर्मशास्त्रीय नियमांवर योग्यप्रकारे आचरण त्या परिस्थितीत होऊ शकते जेव्हा माणसाची निष्ठा शुद्ध असते. नाही पेक्षा यापासून वाचण्यासाठी तो हजार सबबी सांगत राहील आणि त्याला शक्य झाले तर धर्मशास्त्रीय कायदे व नियमांची अंमलबजावणीत अडथळे निर्माण करील. म्हणजे मुसलमान समाजाला खरा धोका दांभिक लोकांपासून आहे. आणि धर्मशासात्रीय कायदे व नियम यांच्या अंमल बजावणी संबंधी हे लोक गंभीर अडथळे निर्माण करू शकतात.

**विषयमांडणी:-** ही सूरत पूर्वीच्या सूरतीशी -आले इमरानशी निगडीत आहे. आणि ''सूरे बकरा'' शी देखील.सूरे आले इमरान च्या शेवटच्या आयतीमध्ये ईमानधारकांना अल्लाहचे भय बाळगण्याबद्दल ताकीद केली गेली होती. (واتقوالله वत्तक़ुल्लाह) आणि या सूरतीची सूरतवाच ''तक़्वा'' च्या उपदेशाने झाली आहे. आणि सर्व लोकांना संबोधित करून अल्लाहचे तक्वा अंगिकारण्याचे आवाहन केले गेले आहे. ياايهاالناس اتقواربكم जणूं हे एकाच लयीचे दोन सूर आहेत.आणि सूरे बकरा मध्ये देखील सामाजिक व सामूहिक जीवनाबद्दल मार्गदर्शन व उपदेश करण्यात आलेला होता. यासंबंधी अधिक मार्गदर्शनाची व्यवस्था या सूरतीमध्ये करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे या सूरतीचा रोख धर्म शास्त्राच्या पूर्ततेकडे आहे.

आयत न. १ प्रस्तावनेदाखल आहे. यामध्ये जी गोष्ट फर्माविली गेली आहे ती इस्लामच्या सामाजिक व सामूहिक जीवनासाठी मुलाधार आहे.

आयत नं. २ ते ४३ मध्ये सामाजिक कायदे व आदेश निवेदन केले गेले आहेत. उदा. अनाथांचे हक्क,नातेवाईकांचे हक्क, वारसाच्या विभाजनाचे नियम, स्त्रीयांचे हक्क, विवाहाचे नियम, प्राण व धनाचा आदर वगैरे-या नियमांचा शेवट नमाज़ संबंधीच्या नियमाने झाला आहे.

आयत नं. ४४ ते ५७ मध्ये ग्रंथधारकांना त्यांच्या मार्गभ्रष्टतेबद्दल सावधान करून क़ुरआनवर ईमान आणण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत नं. ५८ व ५९ मध्ये ईमान च्या आवश्यक गोष्टी काय आहेत. याचे निवेदन आहे-ज्या इस्लामी सत्ता व इस्लामच्या सामूहिक व्यवस्थेसंबंधी आहेत.

आयत नं. ६० ते ७० मध्ये ढोंगी (दांभिक) लोकांच्या आचरणावर टीका केली गेली आहे. आणि त्यांना समजावून विचार करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे की जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबरांचे खरे निष्ठावान बनून राहतील त्यांना आखिरतमध्ये किती उच्च दर्जाचे स्थान लाभेल.

आयत नं. ७१ ते १२६ मधील मजकूरही याच संदर्भात आहे. ढोंगी लोक त्यागापासून कचरत असत. मग तो त्याग हिजरतच्या मार्गात असो वा जिहादच्या मार्गात. या पार्श्वभूमीमध्ये हिजरत व जिहादसाठी प्रोत्साहन दिले गेले आहे. आणि स्पष्ट केले गेले आहे की हा त्याग ईमान आणणाऱ्यासाठी भाग्यदायक आहे. प्रसंगानुरोधाने जिहादसंबंधी उत्पन्न होणारे प्रश्न उदा.

सलातेखौफ-लढाईच्या वेळेची नमाज़ वगैरे संबंधी आदेश दिले गेले आहेत. त्या बरोबरच दांभिक लोकांच्या उपद्रव व गोंधळ निर्माणकरणाऱ्या कारवायांचा उल्लेख केला गेला आहे. आणि हे स्पष्ट केले गेले आहे की इस्लाम हाच खरा धर्म आहे.

आयत नं.१२७ ते १७५ चा विषय हा सूरतीचा शेवटचा भाग आहे. यामध्ये त्या प्रशानांची उत्तर दिली गेली आहेत जे सूरतीच्या सुरवातीस नमूदकेलेल्या आदेशासंबंधी उत्पन्न झाले होते. यानंतर सूरतीच्या शेवटपर्यंत ईमानधारकांना संबोधून मार्गादर्शन केले गेले आहे. आणि दांभिक लोकांना आणि ग्रंथधारकांना त्यांच्या काही मार्ग भ्रष्टत्तेवर सावध करून सुधारणेकडे त्यांचे लक्ष वेधले गेले आहे.

आयत नं. १७६ पुरवणीदाखल आहे. यामध्ये वारसासंबंधी एका प्रशनाचे उत्तर देण्यात आले आहे.

❁❁❁❁❁❁

# ४. सूरह अन्निसा

سُورَةُ النِّسَاءِ

**आयती : १७६**

**परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने**

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हे लोकांनो ! आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगा [१] ज्याने तुम्हांला एका जीवापासून निर्माण केले.[२] आणि त्यांच्या पासून त्याचा जोडा पण निर्माण केला.[३] आणि त्या दोघांपासून पुष्कळसे पुरूष व स्त्रीया फैलाविल्या.[४] आणि अल्लाहचे भय बाळगा. ज्याचा हवाला देऊन तुम्ही एक-दुसऱ्यापासून (हक्कांची) मागणी करता [५] आणि आप्त संबंध तोडण्या पासून-निर्दयतेपासून-वांचा [६] खात्री बाळगा अल्लाह तुमच्यावर लक्ष ठेवून आहे.

يَا أَيُّهَا النَّاسُ اتَّقُوا رَبَّكُمُ الَّذِي خَلَقَكُمْ مِنْ نَفْسٍ
وَاحِدَةٍ وَخَلَقَ مِنْهَا زَوْجَهَا وَبَثَّ مِنْهُمَا رِجَالًا كَثِيرًا
وَنِسَاءً ۚ وَاتَّقُوا اللَّهَ الَّذِي تَسَاءَلُونَ بِهِ وَالْأَرْحَامَ ۚ
إِنَّ اللَّهَ كَانَ عَلَيْكُمْ رَقِيبًا ①

२. अनाथांची [७] संपत्ती त्यांच्या स्वाधीन करा आणि (त्यांच्या) चांगल्या संपत्तीची (आपल्या) वाईट संपत्तीबरोबर अदलाबदल करू नका. आणि त्यांच्या संपत्तीला आपल्या संपत्तीत मिसळून खाऊ नका. नि:संदेह ही फार मोठ्या गुन्ह्याची गोष्ट आहे. [८]

وَآتُوا الْيَتَامَىٰ أَمْوَالَهُمْ ۖ وَلَا تَتَبَدَّلُوا الْخَبِيثَ
بِالطَّيِّبِ ۖ وَلَا تَأْكُلُوا أَمْوَالَهُمْ إِلَىٰ أَمْوَالِكُمْ ۚ إِنَّهُ
كَانَ حُوبًا كَبِيرًا ②

३. तुम्हाला जर शंका असेल की, तुम्ही अनाथांच्या [९] बरोबर न्याय करू शकणार नाही. तर ज्या स्त्रीया तुमच्यासाठी उचित आहेत त्यांच्या मधून दोन-दोन, तीन-तीन चार-चार स्त्रीयांशी विवाह करा.[१०] परंतु तुम्हाला शंका असेल की, तुम्ही समान व्यवहार [११] करू शकणार नाही तर मग फक्त एकच पत्नी करा किंवा तुमच्या ताब्यातील दासी [१२] अन्यायापासून वाचण्यासाठी हे अधिक फलदायी आहे.

وَإِنْ خِفْتُمْ أَلَّا تُقْسِطُوا فِي الْيَتَامَىٰ
فَانْكِحُوا مَا طَابَ لَكُمْ مِنَ النِّسَاءِ مَثْنَىٰ
وَثُلَاثَ وَرُبَاعَ ۖ فَإِنْ خِفْتُمْ أَلَّا تَعْدِلُوا فَوَاحِدَةً
أَوْ مَا مَلَكَتْ أَيْمَانُكُمْ ۚ ذَٰلِكَ أَدْنَىٰ أَلَّا تَعُولُوا ③

४. आणि स्त्रीयांना त्यांचे महर प्रसन्न चित्ताने भेट [१३] म्हणून द्या. पण जर त्यांनी आपल्या खुशीने काही सोडले तर ते तुम्ही मजेने खाऊ शकता.

وَآتُوا النِّسَاءَ صَدُقَاتِهِنَّ نِحْلَةً ۚ فَإِنْ طِبْنَ لَكُمْ
عَنْ شَيْءٍ مِنْهُ نَفْسًا فَكُلُوهُ هَنِيئًا مَرِيئًا ④

१. या सूरतीमध्ये जे मानवी हक्क आणि ज्या सामाजिक जबाबदाऱ्यांचा उल्लेख केला गेला आहे त्यासाठी ही शिकवण मूलभूत आहे. आणि ही वस्तुस्थिती आहे की खरी ईशभीरूता माणसामध्ये माणूसकी निर्माण करते आणि त्याला दुसऱ्या माणसांचे हक्क अदा करण्यास आणि विशेषत: दुर्बल वर्गाबरोबर सहानुभूतीने वागण्यास प्रवृत्त करते. जे लोक धर्म विमुखतेच्या आधारावर ईशभीरूतेला तुच्छ मानतात आणि मग मानवी समाजाच्या उभारणीसाठी योजना आखतात ते हवेमध्ये किल्ले बांधीत असतात. हेच कारण आहे की ते, मानवतेचे खरे हितचिंतक आणि तिच्या हक्कांचे सरंक्षक व कर्तव्य परायण अशी माणसे तयार करण्यामध्ये अगदी अयश्स्वी झाले आहेत. याउलट ज्याकोणी पवित्र क़ुरआनच्या या मार्गदर्शनाचा अंगिकार केला- म्हणजे ईशभीरूता आपल्यामध्ये निर्माण केली- तो खरोखर मानवतेचा ध्वजवाहक बनला. पवित्र क़रआनने प्रत्येक काळात त्याची उत्कृष्ट उदाहरणे सादर केली आहेत. आणि हा क्रम सतत चालू आहे. जसे आज सुद्धा मानवता प्रेमाचा खरा गुण त्याच लोकांमध्ये सापडेल ज्यांनी क़ुरआनच्या या शिकवणीला म्हणजे ईशभीरूतेला आत्मसात केले आहे.

२. म्हणजे हजरत आदम (अलैहिस्सलाम) पासून- जे सर्व मानवांचे पिता होते.

३. म्हणजे हव्वा चा जन्म आदम पासूनच झाला. पवित्र कुरआनचे हे निवेदन की तुम्हा सर्वांना एका जीवापासून निर्माण केले, या गोष्टीचे समर्थन करते की हव्वा चा जन्म आदम पासूनच झालेला होता. अगर हव्वा चा जन्म वेगळा झाला असता तर म्हटले गेले असते की तुम्हाला दोन जीवापासून निर्माण केले. राहिला हव्वाच्या जन्माचा तपशील.तो ना कुरआनमध्ये निवेदन केला गेला आहे ना हदीसमध्ये, म्हणून आम्हांला क़ुरआनच्या संक्षिप्त निवेदनावर संतुष्ट राहिले पाहिजे.

४. येथे दोन म्हत्वाची सत्ये निवेदन केली गेली आहेत. एक हे की सर्व माणसांना अल्लाहनेच निर्माण केलेले आहे. आणि तोच त्यांचा पालनकर्ता सुद्धा आहे. दुसरे हे की मानवी वंशाची सुरूवात एका व्यक्तिने- आदम (अलैहिस्सलाम) झाली; आणि म्हणून सर्व मानव मग ते पुरूष असोत वा स्त्रीया, ते काळे असोत वा गोरे आणि ते कोणत्याही समुदायत वा देशात जन्मलेले असोत. एकच बाप आदम व एकच आई हव्वायांची संतान आहेत. आणि म्हणून माणसाच्या नात्याने त्यांच्यामध्ये काही फरक नाही. आदरास सर्व सारखेच पात्र आहोत. आणि सर्वांच्या हक्कांचा आदर केला पाहिजे.

मानव जातिसंबंधीचा पवित्र क़ुरआनचा हा थोर सिद्धांत जातपातीच्या कल्पनेचे खंडन करतो,त्याच प्रमाणे अनेकेश्वरवाद्यांच्या या कल्पनेचेहो समूळ उच्चाटत करतो की उच्च जाति देवी-देवतांच्या वंशापासून निर्माण झाल्या आहेत व नीच जाति (शूद्र) राक्षसांपासून.

५. माणूस जेव्हा दुसऱ्यापासून सहानुभूति न्याय आणि हक्कांच्या पूर्तते साठी अल्लाहच्या चू नावावर अर्जव करतो, ही गोष्ट जणू माणसाच्या आत्म्याची पुकार आहे की अल्लाहच साऱ्या माणसांचा पालनकर्ता आहे आणि त्यांच्या महानतेची कल्पनाच दुसऱ्याचे हक्क अदा करण्यास प्रवृत्त करते. पवित्र कुरआन या अंत: प्रेरणेचे आवाज़ाचे समर्थन करतो. आणि परस्पर हक्कांच्या पूर्ततेसाठी ईशभीरूतेसच मूलभूत आधार ठरवितो.

६. आप्त संबंध तोडण्यापासून वाचण्याचा उपदेश ज्या ठामपणे येथे केला गेला आहे त्यावरून हा एक भयंकर गुन्हा आहे हे स्पष्ट होते आणि आपल्या कुटुंबियांवर प्रेम करणे व आप्त संबंधाचे महत्व यावरही प्रकाश पडतो. हदीसमध्ये अत्यंत परिणामकारकपणे आप्त संबंध जोडण्याचा उपदेश करण्यात आलेला आहे. आणि आप्त संबंधामध्ये बिघाड निर्माण करण्यापासून रोखले गेले आहे. हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले आहे की

الرحم شجنة من الرحمٰن فقال اللہ من وصلک وصلته
ومن قطعک قطعته۔ (مشکوٰۃ بحوالہ بخاری)

“रहेम (नातें) रहमान (दयाळू) पासून बनलेला आहे. म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो की “जो तुला जोडेल त्याला मी जोडीन आणि जो तुला तोडेल त्याला मी माझ्यापासून तोडीन.” (मिशकात हवाला बुखारी)

لا یدخل الجنة قاطع رحم۔ (مسلم)

“आप्त संबंध तोडणारा माणूस जन्नत मध्ये प्रवेश करू शकणार नाही.” (मुस्लिम)

७. अनाथ मुळे हा समाजातील सर्वांत जास्त दुर्बल असा वर्ग आहे. बापाचा आधार नाहीसा झाल्यामुळे ती निराधार होतात आणि म्हणून त्यांचे हक्क अदा करणे आणि त्यांच्या बरोबर न्याय करण्याच्या उपदेशाला अग्रहक्क दिला गेला असून तो अत्यंत ठामपणे दिला गेला आहे.

८. अनाथांच्या मालमत्तेला वेगळे ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये अपहार करणे हा मोठा गुन्हा आहे. आणि त्यांच्या पालकांसाठी हे पण वैध नाही की अन्यांथांच्या मालापासून लाभ उठवावा. जर आनाथांची मालमत्ता व्यापारात लावली गेली असेल तर त्याचा फायदा त्या अनाथानांच मिळाला पाहिजे. राहीली एकत्रित खाण्यापिण्याची व्यवस्था. तर त्याची परवानगी “सूरे बक़रा” आयत नं. २२० मध्ये दिली गेली

आहे. (पहा सूरे-बकरा, नोट नं. ३२१)

९. यतीम (अनाथ) त्या अज्ञानाला म्हणतात ज्यांच्या बापाचे निधन झालेले असते. परंतु धर्मशास्त्र दृष्ट्या याचा अमल वयात आल्या नंतर देखील होतो. यद्यापि समज उमज येण्याचे वय झाले नसेल. या आयतीमध्ये ''यतामा'' हा शब्द वापरला गेला आहे. जो यतीमचे अनेकवचन आहे आणि स्त्रीलींगी व पुल्लींगी दोहोंच्या बाबतीत बोलला जातो. येथे अनाथ मुली अभिप्रेत आहेत. आणि संबोधन वस्तुत: त्यांच्या पालकांना आहे.

१०. अर्थ हा आहे की जर अनाथ मुलीचे पालक या दृष्टीने तुम्हाला अशी शंका असेल की त्याच्याशी विवाह केल्याने त्यांचे हक्क तुम्ही योग्य प्रकारे अदा करू शकणार नाही तर दुसऱ्या स्त्रीयांबरोबर ज्यांच्या बरोबर विवाह करणे वर्ज्य नाही अशा स्त्रीयांबरोबर विवाह करा.

अज्ञान कालात ज्या अनाथ मुली लोकांच्या पालकत्वाखाली असत त्यांचे धन व त्यांचे सौंदर्यामुळे त्यांचे पालक स्वत: त्यांच्याशी विवाह करीत असत आणि नंतर त्यंच्या बरोबर न्याय करीत नसत त्यांच्या वारसा हक्काने मिळालेली संपत्ती स्वत:च्या ताब्यांत घेत. त्यांचा महर वगैरेसुद्धा अदा करीत नसत आणि म्हणून त्यांच्याशी विवाह करण्याची परवानगी त्यांना या शर्तीवर दिली गेली की त्यांनी त्यांचे हक्क अदा करावेत आणि त्यांच्याबरोबर न्याय्य करावा.

पत्न्यांच्या संख्येची जी परवानगी येथे दिली गेली आहे ती पुष्कळशा नैतिक व सामाजिक हितांवर आधारलेली आहे.

उदाहरण विधवांचा प्रश्न सोडवणे, किंवा संतति नसलेल्या परिस्थितीत किंवा पत्नी सतत आजारी असल्याने किंवा पुरूष एका पत्नीवर संतुष्ट नसेल तर दुसरा विवाह करणे. ही व अशाच प्रकारची दुसरी कारणे अत्यंत योग्य आहेत आणि या कारणांचा विचार करून शरीअतने एकाहून अधिक स्त्रीयांबरोबर विवाह करण्याचा मार्ग मोकळा ठेवला आहे. त्यामुळे माणूस चुकीच्या व निषिद्ध मार्गाचा अवलंब करण्यापासून वाचतो व त्याच्या गरजा वैध मार्गाने पूऱ्या होतात. अज्ञान कालात भार्यांच्या संख्येवर काही बंधन नव्हते. परंतु क़ुरआनने या आयतीद्वारे भार्यांची संख्या मर्यादीत केली आहे आणि जास्तीत जास्त चार स्त्रीयांबरोबर विवाह करण्याची परवानगी दिली आहे आणि ती पण त्यांच्याबरोबर समान न्याय करणायच्या अटीवर.

स्पष्ट असो की चार पत्न्यांच्या मर्यादेपर्यंतच्या विवाहाच्या सनदशीर पणा बद्दल उलेमांचे एक मत (इजमा) आहे.

११. यावरून स्पष्ट आहे की एकापेक्षा अधिक भार्यांची परवानगी न्यायाच्या अटीने बद्ध आहे जो माणूस या अटीला अंमलात न आणता एकांपेक्षा अधिक विवाह करतो तो अल्लाहने दिलेल्या या सवलतीचा गैर फायदा उठवतो आणि अशा माणसाबद्दल हदीसमध्ये शिक्षेची मोठी धमकी देण्यात आली आहे.

من كانت له امراتان يميل لا حداهما اعلى الاخرىٰ جاء يوم
القيامة يجرّ احدشقيّه، ساقطا او مائلا۔ (اہل السنن)

''ज्याच्या दोन भार्या असतील आणि जो फक्त एकीकडेच आकर्षित होऊन राहील तो कियामतीच्या दिवशी अशा अवस्थेत येईल की त्याची एक बाजू निखळलेली असेल व तिला तो कसा तरी घसटत असेल.'' (अहले सुनन)

आणि न्यायाने अभिप्रेत राहणे सवरणे, खाणे-पिणे, शरीर सुख वगैरे बाबतीत सर्व भार्यांबरोबर न्यायाची वागणूक करणे व सर्वांचे हक्क अदा करणे.

१२. क़ुरआनच्या अवतरण कालामध्ये दासींची (लौंडी) प्रथा होती. इस्लामने एकीकडे त्यांना मुक्त करण्यास प्रोत्साहन दिले. इतकेच नव्हे तर त्यांना स्वतंत्र करण्याबाबत काही नियमही ठरविले आणि दुसरीकडे उपस्थित असलेल्या दासींना स्वैराचारापासून वाचविण्याची पण व्यवस्था केली. आणि म्हणून ज्या लोकांच्या ताब्यात दासी होत्या त्यांना त्यांच्याशी ''तमत्तुअ'' (लाभ उठविण्याची) करण्याची परवानगी दिली. दासींच्या संबंधी तपशीलासाठी पहा टीप नं. ६४.

१३. महर (Dower) ती देणगी आहे जी पती पत्नीला विवाहबद्ध झाल्यावर देतो. याचा दर्जा आवश्यक देणगीचा हदीयासारखा आहे. त्याला रद्द करण्याच्या कोणास अधिकार नाही. कारण हे सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून लागू करण्यात आलेले कर्तव्य आहे. तथापि स्त्रीला हा अधिकार आहे की विवाहानंतर ती इच्छिल तितका 'महर'चा भाग माफ करू शकते. इस्लाममध्ये महर म्हणजे स्त्रीची किंमत किंवा विवाहाचा मोबदला नव्हे तर ते एक धार्मिक कर्तव्य आणि सोजन्यपूर्ण अशी देणगी आहे. याचा उद्देश पती-पत्नीमध्ये प्रेम व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणे आणि विवाहाच्या महत्त्वाची जाणीव निर्माण करणे हा आहे. स्पष्ट असो महर हा स्त्रीचा हक्क आहे. तो तिचा बापाचा अगर पालकाचा हक्क नव्हे.

**आणि अनाथांची परिक्षा घेत राहा. येथपावेतो की ते विवाहाच्या वयास पोहोचतील. मग जर तुम्हांला त्यांच्यामध्ये समज-उमज आल्याचे आढळून येईल तर त्यांची संपत्ती त्यांच्या स्वाधीन करा. आणि या विचाराने की ते मोठे होतील, त्यांची संपत्ती उधळपट्टी करून लवकर संपवून टाकू नका. जो संपन्न आहे त्याने पथ्य पाळावे आणि जो गरजू आहे त्याने योग्य प्रमाणात खावे नंतर जेव्हा त्यांची संपत्ती त्यांच्या स्वाधीन कराल तेव्हा साक्षीदार ठेवा. आणि अल्लाह हिशेब घेण्यासाठी पुरेसा आहे. *(अल-क़ुरआन)***

५. तुमची संपत्ती जिला अल्लाहने तुमच्यासाठी जीवनावश्यक गोष्टींचे साधन बनविले आहे [१४] नादान लोकांच्या हवाली करू नका.[१५] पण त्यामधून त्यांना खाऊपिऊ घालत जा व कपडेलत्ते देत जा. आणि त्यांच्या बरोबर चांगले बोला.

وَلَا تُؤْتُوا السُّفَهَاءَ أَمْوَالَكُمُ الَّتِي جَعَلَ اللَّهُ لَكُمْ قِيَامًا
وَارْزُقُوهُمْ فِيهَا وَاكْسُوهُمْ وَقُولُوا لَهُمْ
قَوْلًا مَعْرُوفًا ٥

६. आणि अनाथांची परिक्षा घेत राहा. येथपावेतो की ते विवाहाच्या वयास [१६] पोहोचतील. मग जर तुम्हांला त्यांच्यामध्ये समज-उमज आल्याचे आढळून येईल तर [१७] त्यांची संपत्ती त्यांच्या स्वाधीन करा. आणि या विचाराने की ते मोठे होतील, त्यांची संपत्ती उधळपट्टी करून लवकर संपवून टाकू नका. जो संपन्न आहे त्याने पथ्य पाळावे आणि जो गरजू आहे त्याने योग्य प्रमाणात खावे [१८] नंतर जेव्हा त्यांची संपत्ती त्यांच्या स्वाधीन कराल तेव्हा साक्षीदार ठेवा. आणि अल्लाह हिशेब घेण्यासाठी पुरेसा आहे.

وَابْتَلُوا الْيَتَامَىٰ حَتَّىٰ إِذَا بَلَغُوا النِّكَاحَ فَإِنْ آنَسْتُمْ
مِنْهُمْ رُشْدًا فَادْفَعُوا إِلَيْهِمْ أَمْوَالَهُمْ وَلَا تَأْكُلُوهَا
إِسْرَافًا وَبِدَارًا أَنْ يَكْبَرُوا وَمَنْ كَانَ غَنِيًّا
فَلْيَسْتَعْفِفْ وَمَنْ كَانَ فَقِيرًا فَلْيَأْكُلْ بِالْمَعْرُوفِ
فَإِذَا دَفَعْتُمْ إِلَيْهِمْ أَمْوَالَهُمْ فَأَشْهِدُوا عَلَيْهِمْ
وَكَفَىٰ بِاللَّهِ حَسِيبًا ٦

७. पुरूषांसाठी त्या संपत्तीमध्ये हिस्सा आहे जो आई वडिलांनी व जवळच्या नातलगांनी मागे सोडलेली असेल. आणि स्त्रीयांसाठी पण त्या संपत्तीमध्ये हिस्सा आहे जी आईवडीलांनी व जवळच्या नातलगांनी मागे सोडलेली असेल. मग वारसा संपत्ती कमी असो वा अधिक हा हिस्सा ठरविलेला आहे. [१९]

لِلرِّجَالِ نَصِيبٌ مِمَّا تَرَكَ الْوَالِدَانِ وَالْأَقْرَبُونَ
وَلِلنِّسَاءِ نَصِيبٌ مِمَّا تَرَكَ الْوَالِدَانِ وَالْأَقْرَبُونَ
مِمَّا قَلَّ مِنْهُ أَوْ كَثُرَ نَصِيبًا مَفْرُوضًا ٧

८. आणि वाटणीच्या वेळी नातलग, अनाथ व गोरगरीब उपस्थित होतील तर त्यांनाही त्यामधून काही द्या आणि त्यांच्या बरोबर चांगले बोला.[२०]

وَإِذَا حَضَرَ الْقِسْمَةَ أُولُو الْقُرْبَىٰ
وَالْيَتَامَىٰ وَالْمَسَاكِينُ فَارْزُقُوهُمْ مِنْهُ
وَقُولُوا لَهُمْ قَوْلًا مَعْرُوفًا ٨

९. लोकांनी भय बाळगले पाहिजे की, जर ते आपल्या मागे दुर्बल संतती सोडून गेले असते तर त्यांच्यासंबंधी त्यांना कशी काळजी लागून राहिली असती [२१] आणि म्हणून त्यांनी अल्लाहचे भय बाळगावे आणि योग्य गोष्ट बोलावी.

وَلْيَخْشَ الَّذِينَ لَوْ تَرَكُوا مِنْ خَلْفِهِمْ ذُرِّيَّةً
ضِعَافًا خَافُوا عَلَيْهِمْ فَلْيَتَّقُوا اللَّهَ
وَلْيَقُولُوا قَوْلًا سَدِيدًا ٩

१४. सर्वश्रेष्ठ अल्लाहने धनाला आजीविकेच्या स्थापनेचे साधन बनविले आहे. म्हणून हे आवश्यक आहे की माणसाने त्याची किंमत व योग्यता ओळखावी आणि ते नष्ट होण्यापासून वाचवावे.विशेषत: अनाथांचे धन ज्यांच्या ताब्यात असते त्यांनी त्याचे रक्षण ते जणू आपले धन आहे असे समजून करावे.

१५. अभिप्रेत अनाथ मुले आहेत आणि उद्देश्य हे स्पष्ट करण्याचा आहे की अनाथांच्या स्वाधीन त्यांचे धन करण्याची जी ताकीद केली गेली आहे त्याचा अर्थ हा नव्हे की धन समज व ज्ञान नसलेल्या मुलांच्या स्वाधीन करावे. तर अनाथांच्या पालकाची ही जबाबदारी आहे की त्यांनी ते धन नाश होण्यापासून वाचवावे आणि त्याचे पुरेपूर रक्षण करावे. यामधून पालक अनाथांच्या खाण्यापिण्याची व कपड्यालत्त्याची व्यवस्था करण्यावर खर्च करू शकतो. पण जेव्हा ते सज्ञान होतील आणि त्यांच्यामध्ये समज निर्माण झाली तर त्यांचे धन त्यांच्या स्वाधीन केले जावे.

१६.विवाहाच्या वयाने अभिप्रेत 'सिन्ने बुलूग'ला' पोहोचणे म्हणजे 'वयांत येणे' होय.धार्मिक दृष्ट्या याचा विश्वास नैसर्गिक तारुण्यवस्था प्रकट झाल्यावर केला जातो. या वरुन माहीत झाले की क़ुरआनच्या दृष्टीने विवाहाच्या वयाची विश्वासार्हता मुलगा व मुलगी (सिन्नेबुलूग) वयात येण्यावर अवलंबून आहे.

१७. अनाथांचा माल त्यांच्या स्वाधीन करण्यासाठी त्यांचे फक्त सज्ञान होणे पुरेसे नसून, त्यांच्यामध्ये समज निर्माण होणेही आवश्यक आहे. म्हणजे ते आपल्या धनाचा जबाबदारीने व्यय करू शकतील.जर एखाद्या अनाथ मुला मध्ये अगर मुलीमध्ये ती प्रौढ झाल्यावर देखील ही पात्रता निर्माण झाली नाही तर अधिक काल वाट पाहवी.

१८. म्हणजे जर एखाद्या अनाथाचा पालक गरजवंत असेल तर तो अनाथाच्या धनामधून त्याच्या पालनपोषणाच्या संबंधांत जरूरी प्रमाणे आपल्या खाण्यापिण्याचा खर्च घेऊ शकतो. परंतु या बाबतीत योग्य व वाजबी पद्धत अंगीकारणे आवश्यक आहे.

१९. ही वारसाकायद्याची प्रस्तावना आहे जी पुढे निवेदन केली जात आहे. अनाथानंतर दुसरा दुर्बल वर्ग स्त्रीयांचा आहे. ज्याला वारसा हक्कापासून वंचित केले जात असे. अज्ञान कालात वारसामध्ये स्त्रीयांना काही हिस्सा मिळत नसे. आणि मुलांनाही वारसामध्ये सामील केले जात नसे. फक्त पुरुषांना वारस, ठरविले जात असे. वारससंबंधी त्यांची कल्पना ही होती की लढाई करण्याची शक्ती फक्त पुरुषांमध्ये असते. आणि म्हणून तेच वारसाहक्कास पात्र आहेत. स्त्रीया आणि मुले हि लडाईस पात्र नसल्याने वारसाहक्कामध्ये त्यांचा काही हिस्सा असू नये. या खोट्या कल्पनेने आणि अत्याचारी कायद्याने विधवांना आणि अनाथ मुलामुलीना वारसाहक्कापासून वंचित करण्यांत आले होते.

इस्लामने अज्ञानकालातील या कायद्याला (Customary Law)रद्दबातल ठरवून जाहीर केले की पुरूषा-बरोबर स्त्रीयापण वारसामध्ये सामील आहेत. याचप्रकारे इस्लामने मुलांनाही वारस ठरविले आणि त्या सर्वांचे हिस्से निश्‍चित केले. इतिहासामध्ये समाजात व कायद्यांत सुधारणा करण्याचे हे महान कार्य होते. आणि हे कार्य इस्लामच्या हस्ते उत्तम रितीने पार पाडले. याचा जागातिक समाजावरही खोल परिणाम झाला. अरबांव्यतिरिक्त जगातील इतर समाजांचाही स्त्रीयांबद्दलाचा दृष्टिकोन काही त्यांच्याहून भिन्न नव्हता. इतकेच नव्हे तर असंस्कृत समाजामध्ये स्त्रीचा दर्जा धन व मालमत्तेसारखा होता आणि तिला वारसा मिळकत समजले जात असे आणि म्हणून तिला वारसामध्ये हक्क देण्याचा प्रश्‍नच उद्भवत नव्हता.

"Women do not inherit because they are themselves the property of their husbands." (Ency. of Religion & Ethics Vol. VII, P. 306).

"Women as inheritable property– many primitive people especially in Africa, regard wives and daughters as an important part of the estate to be transmitted in accordance with the regular rules of inheritance with the rest of the property. The explanation at is to be sought partly in the economic value of women either as workers or in the case of daughters, as potential wealth in the shape of a bride–price." –(Do p. 290).

ही आयत वारसाहक्कासंबंधी या कायद्यालाही स्पष्ट करते की वारसा मिळकतीची विभागणी झाली पाहिजे – मग ती कितीही कमी असो.या कायद्यांची अंमलबजावणी जंगम व स्थावर सर्व प्रकारच्या मालमत्तेवर होईल आणि जर एखादी वस्तू विभागणी योग्य नसेल तर तिची विक्री करून आलेली रक्कम सर्व वारसामध्ये त्यांच्या हिस्सा या प्रमाणे विभागली जाईल.

आयतीमध्ये "अक़रबून اقربون"हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ अत्यंत जवळचे नातलग असा होतो. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की निकटतम नातलग असल्यास दूरच्या नातलगांना वारसा हक्क मिळत नाही.

२०. हे निवेदन वारसांना उद्देशून नातलगांमध्ये असे लोक

ही असू शकतात ज्यांचा धर्मशास्त्राप्रमाणे वारसा संपत्तिमध्ये काही हक्क नसतो. परंतु ते गरीब व गरजवंत असतात. असे जे अनाथ व दुर्बल येऊन उपस्थित होतील त्यांना वारसा मिळकतीमधून काही ना काही द्या असे प्रोत्साहन वारसाना दिले गेले आहे. आणि हे शक्य नसेल तर त्यांच्याशी सहानुभूतीची वागणूक अवश्य करा असा उपदेश केला गेला आहे. या उपदेशावरून हा निष्कर्ष निघतो की जर अनाथ नातू वारसा हक्कापासून वंचित असेल आणि आजाने त्याच्यासाठी मृत्युपत्र केले नसेल तर वारसाने तो निकटचा नातलग व अनाथ आहे हे जाणून त्याच्या आजाच्या वारसमिळक्तीमधून त्याला काही द्यावे व त्याचे मन राखावे.

२१. म्हणजे लोकानी हा विचार केला पाहिजे की, ज्याप्रमाणे इतरांची मुले अनाथ होतात, त्याचप्रमाणे त्यांची मुले देखील अनाथ होऊ शकतात.हा विचार त्यांना अनाथांना त्यांच्या हक्कापासून वंचित करण्यापासून व त्यांचे मन दुखविण्यापासून परावृत्त करील.

**जे लोक अनाथांची संपत्ती अत्याचाराने खातात ते आपल्या पोटात आग भरीत आहेत. लवकरच ते भडकऱ्या आगीमध्ये दाखल होतील.** ***(अल-क़ुरआन)***

إِنَّ الَّذِينَ يَأْكُلُونَ أَمْوَالَ الْيَتَامَىٰ ظُلْمًا إِنَّمَا
يَأْكُلُونَ فِي بُطُونِهِمْ نَارًا ۖ وَسَيَصْلَوْنَ سَعِيرًا ﴿١٠﴾

**१०. जे लोक अनाथांची संपत्ती अत्याचाराने खातात ते आपल्या पोटात आग भरीत आहेत. लवकरच ते भडर्कया आगीमध्ये दाखल होतील.**

يُوصِيكُمُ اللَّهُ فِي أَوْلَادِكُمْ ۖ لِلذَّكَرِ مِثْلُ حَظِّ الْأُنثَيَيْنِ ۚ فَإِن كُنَّ
نِسَاءً فَوْقَ اثْنَتَيْنِ فَلَهُنَّ ثُلُثَا مَا تَرَكَ ۖ وَإِن كَانَتْ وَاحِدَةً فَلَهَا
النِّصْفُ ۚ وَلِأَبَوَيْهِ لِكُلِّ وَاحِدٍ مِّنْهُمَا السُّدُسُ مِمَّا تَرَكَ إِن
كَانَ لَهُ وَلَدٌ ۚ فَإِن لَّمْ يَكُن لَّهُ وَلَدٌ وَوَرِثَهُ أَبَوَاهُ فَلِأُمِّهِ الثُّلُثُ ۚ
فَإِن كَانَ لَهُ إِخْوَةٌ فَلِأُمِّهِ السُّدُسُ ۚ مِن بَعْدِ وَصِيَّةٍ
يُوصِي بِهَا أَوْ دَيْنٍ ۗ آبَاؤُكُمْ وَأَبْنَاؤُكُمْ لَا تَدْرُونَ أَيُّهُمْ أَقْرَبُ
لَكُمْ نَفْعًا ۚ فَرِيضَةً مِّنَ اللَّهِ ۗ إِنَّ اللَّهَ كَانَ عَلِيمًا حَكِيمًا ﴿١١﴾

**११. अल्लाह तुमच्या संततीबद्दल तुम्हांला आज्ञा देतो [२२] की मुलाचा हिस्सा दोन मुलींच्या (हिश्श्यांच्या) समान आहे.[२३] जर फक्त मुलीच असतील, दोन पेक्षा अधिक तर वारसा संपत्तीमध्ये त्यांचा हिस्सा दोन तृतीयांश आहे.[२४] आणि जर एकच मुलगी असेल तर तिला वारसा संपत्तीचा अर्धा हिस्सा मिळेल.[२५] आणि मृताच्या आईवडीलांपैकी प्रत्येकाला सहावा हिस्सा मिळेल जर मृताला संतती असेल.[२६] आणि मृताला संतती नसेल आणि फक्त आईवडील त्याचे वारस असतील तर त्याच्या आईला एक तृतीयांश हिस्सा मिळेल. [२७] आणि मृताचे भाऊ बहिणही असतील तर त्याच्या आईला सहावा हिस्सा मिळेल.[२८] हे हिस्से मृताने जे मृत्यूपत्र [२९] केला असेल त्याची पूर्तता केल्यानंतर व जे कर्ज [३०] त्याने मागे सोडलेले असेल ते दिल्यानंतर वाटून दिले जावेत. तुम्ही हे जाणत नाही की तुमचे वडील व तुमचे पुत्र यामध्ये फायद्याच्या दृष्टीने कोण तुमच्या अधिक जवळ आहे [३१] हे हिस्से अल्लाहने ठरविले आहेत. खात्री बाळगा अल्लाह सर्वज्ञही आहे आणि बुद्धीमानही.[३२]**

२२. या आयतीमध्ये वारसा विभागणीचे आदेश स्पष्ट केले गेले आहेत. आणि त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपले वारणपात्र ठरविले आहे. यावरून त्या गोष्टीकडे इशारा करण्यात आला आहे की ही श्रेष्ठ दर्जाची व सक्त आज्ञा आहे. त्याबरोबर यामध्ये ही गोष्ट सुद्धा सामील आहे की सूरे बकराच्या आयत नं.१८० मध्ये ईमानधारकांना आई बाप व नातलग यांच्या हक्कात वारसापत्र करण्याबद्दल जी आज्ञा दिली गेली होती, तिला या आज्ञाने बद्ध केले आहे कारण की ज्या लोकांसाठी अल्लाहने वारसापत्र केले आहे म्हणजे वारसा-त्यांच्यासाठी वारसापत्र करण्याचा प्रश्न शिल्लक राहत नाही. म्हणजे अता वारसापत्र फक्त अशाच नातलगांसाठी केले जावू शकते जे शरीयतीच्या कायद्यानुसार वारसा ठरत नाहीत.

२३.सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुलाचा हिस्सा मुलीच्या हिश्याच्या दुप्पट ठेवला आहे. त्याचे कारण स्त्रीया या पुरुषांच्या मानाने कनिष्ठ आहेत असे नाही. असे असते तर कोणत्याही परिस्थितीत स्त्रीयांचा हिस्सा पुरुषांइतका ठरविला गेला नसता. यद्यपि कित्येक बाबतीत स्त्रीयांचा हिस्सा पुरुषांच्या हिश्यासमान ठेवला गेला आहे. उदा. मयताला संतती असेल तर बापाला १/६ हिस्सा मिळेल आणि आईला देखील १/६ हिस्सा मिळेल. याचप्रमाणे मयताच्या आईकडील बहीण भावांचा (Uterine Brother and Sister) हिस्सा समान ठेविला गेला आहे.

खरे पाहीले असता मुलीचा हिस्सा मुलाच्या हिश्याबरोबर न ठेवण्याचे कारण हे आहे की इस्लामने आर्थिक जबाबदारी स्त्रीवर नव्हे तर पुरुषावर टाकलेली आहे तो पत्नीचे पालनपोषण करण्यासही जबाबदार आहे आणि मुलांचे पालनपोषण करण्यासही जबाबदार. स्त्रीवर तिच्या स्वत:च्या पालनपोषणाची जबाबदारी ही टाकण्यात आलेली नाही. त्याशिवय पुरुषांवर स्त्रीच्या महरचा भार टाकण्यात आलेला आहे. या जबाबदारीच्या दृष्टीने न्याय हे आहे की पुरुषाचा हिस्सा स्त्रीच्या दुप्पट ठेवला जावा.

मुलाचा हिस्सा दोन मुलींच्या हिश्याबरोबर आहे याचा अर्थ असा की जर मयताला एक मुलगा व एक मुलगी असेल तर, इतर वारस-जर कोणी असतील तर-त्याना त्यांचे हिस्से अदा केल्यानंतर शेष मिळकतीचे तीन हिस्से केले जातील. त्यापैकी एक हिस्सा मुलीला दिला जाईल व दोन हिस्से मुलाला दिले जातील आणि एकाहून अधिक मुले मुली असतील तर त्यांच्यमध्ये वारसा मिळकत अशाप्रकारे विभागली जाईल की प्रत्येक मुलाला दोन हिस्से व प्रत्येक मुलीला एक हिस्सा मिळेल. आणि जर फक्त मुलगेच असतील तर त्यांच्यामध्ये वारसा संपत्तीचे समान वाटप केले जाईल. स्पष्ट असो की सारखी संतती असताना नातू वारस ठरत नाही ठीक त्याप्रमाणे, जेव्हा बाप हयात असताना आजा वारस ठरत नाही.

२४. मयताला जर फक्त मुली असतील आणि त्या दोहोपेक्षा अधिक असतील तर त्याबद्दल हा नियम आलेला आहे की त्यांना २/३ हिस्सा मिळेल. हाच नियम दोन मुली-संबंधीही आहे. म्हणजे मयताला फक्त मुली असतील आणि त्या दोन असतील तर त्यांनाही मिळकतीमध्ये २/३ हिस्सा मिळेल. ही गोष्ट निवेदनावरून स्पष्ट होते. कारण यापूर्वी फर्माविले गेले आहे की मुलाचा हिस्सा दोन मुलींच्या हिश्यासमान आहे. यावरून हा निष्कर्ष निघतो की एक मुलगा व एक मुलगी असेल तर मुलाला २/३ व मुलीला १/३ हिस्सा मिळेल. मुलाचा हा २/३ हिस्सा दोन मुलींच्या हिश्यासमान आहे, निवेदनाच्या अर्थावरून ही गोष्ट स्पष्ट होते आणि म्हणून दोहोपेक्षा अधिक मुलींच्यासंबंधी खुलाशेवार निवेदन केले गेले आहे.

याशिवाय आयत नं. १७६ मध्ये दोन बहिणींचा हिस्सा २/३ सांगितला गोला आहे आणि म्हणून दोन मुलींचा हिस्सा औचित्याने २/३ राहील.

दोन मुलींचा हिस्सा २/३ ही गोष्ट हदीसनेही सिद्ध होते. तिरमीजीमध्ये आहे की साद बिन रबीअ (रजि.) यांची पत्नी पैगंबरांच्या सेवत हजर झाली आणि तिने विनविल या रसूलुल्लाह! सादच्या या दोन मुली आहेत. त्यांचे वडील उहोदेच्या लढाईत शहीद झाले आणि त्यांच्या चुलत्याने त्यांच्या सर्व मिळकतीवर कब्जा केला आहे. आता त्यांच्याशी विवाह कोण करील? यावर वारसाबद्दलची आयत उतरली आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मुलींच्या चुलत्याला बोलावून सांगितले की सादच्या या दोन मुलींना २/३ हिस्सा दे आणि त्यांच्या आईला १/८ हिस्सा दे यानंतर जे राहिल ते तू घे. (तफसीर इब्ने कसीर भा. १ पा. ४५७)

वारसा संपत्तीचा हा २/३ हिस्सा सर्व मुलींमध्ये सारखा विभागला जाईल. राहिलेला १/३ हिश्याचे हकदार इतर वारस असतील.

२५. म्हणजे जर मयताला फक्त एक मुलगी असेल आणि तिच्याबरोबर कोणी मुलगी नसेल तर मुलीला वारसा मिळकतीचा अर्धा हिस्सा मिळेल. आणि राहिलेल्या अर्ध्या हिश्याचे हकदार इतर वारस होतील. यावरून हा नियमही निघतो की जर फक्त एक मुलगा असेल तर ती मुलीच्या दुप्पट म्हणजे साऱ्या वारस मिळकतीचा वारस बनेल. परंतु जर दुसरे वारस उदा. आई, वडील हयात असतील तर त्यांचा हिस्सा अदा करून राहिलेल्या साऱ्या मिळकतीचा मालक मुलगा होईल.

२६. संतती एक असो वा अनेक, मुलगा असो वा मुलगी कोणत्याही परिस्थितीत मयताचे आईवडिलांपैकी प्रत्येकजण १/६ चा हकदार राहिल.

आईबापाचा हक्क संततीच्या तुलनेत अधिक आहे. परंतु

वारसा हक्कात संततीचा हिस्सा अधिक व आईबापाचा हिस्सा कमी ठेवण्याचे कारण हे आहे की आईबाप एका अशा वयास पोहचली असतात जेव्हा त्यांना मालमत्तेची अधिक गरज नसते. याउलट संततीला तिच्या वयाच्या मानाने मालमत्तेची अधिक गरज असते. यावरून स्पष्ट होते की ही विभागणी किती न्याय्य आहे.

२७. म्हणजे आईबापाशिवाय कोणी दुसरा वारसा नसेल तर आईला १/३ आणि बाकीचा हिस्सा बापाला मिळेल.

२८. म्हणजे मयताचे भाऊबहिण असतील तर आईला १/३ ऐवजी १/६ हिस्सा मिळेल. आणि बाकीची मिळकत बापाला मिळेल. कारण या स्थितीत बापाची जबाबदारी वाढते.

स्पष्ट असे की मयत इसमाचे आईबाप दोघे जिवंत असतील किंवा बाप जिवंत असेल तर त्याच्या बहिण भावांना काहीच हिस्सा मिळत नाही.

२९. माणसाला आपल्या फक्त १/३ मिळकतीचेच वारस पत्र करता येते. ही गोष्ट पैगंबरांच्या वचनाने स्पष्ट होते. त्याचप्रमाणे कोणत्याही वारसासाठी वारसापत्र करणे वैध नाही. आणि असेले मृत्यूपत्र (वारसापत्र) अंमलात येणार नाही. वारस संमती देतील तरच त्याचा अमल होऊ शकेल. १/३ भागापर्यंत वारसापत्र करण्याची सवलत यासाठी ठेवण्यात आलेली आहे की वारसा कायद्याप्रमाणे ज्या नातलगांना काहीच हिस्सा मिळत नाही आणि जर ते मदतीस पात्र असतील तर त्यांना काही देता यावे. उदा. अनाथ नातू किंवा नात किंवा विधवा सून वगैरे. माणूस अशा नातेवाईकांसाठी वारसापुत्र करू शकतो. याचप्रमाणे दुसऱ्या मदतीस पात्र अशा लोकांसाठी किंवा एखाद्या सत्कार्यासाठी काही तरतूद करणारे मृत्यूपत्र (वारसापत्र) केले जाऊ शकते (पहा- सूरे बकरा टीप नं. २३३)

३०. कर्जाची सर्वप्रथम फेड केली जाईल. नंतर वारसा पत्राचा अमल केला जाईल आणि यानंतर वारसा मिळकतीची विभागणी केली जाईल. वाराठी करण्यात आलेला आहे की याबाबतीत लोकांनी निष्काळजी राहू नये. कारण वारसापत्र कोणत्याही मोबदल्या शिवाय केले जात असते आणि त्याची पूर्तता करणे स्वभावत: कठीण होते. याउलट कर्ज हा एक हक्काचा प्रश्न असतो आणि ते अदा करणे अवश्यक असते.

३१. म्हणजे वारसासंबंधी माणूस आपल्या मर्यादीत ज्ञानाच्या आधारावर योग्य निर्णय करू शकत नाही. तो योग्य प्रकारे वारस ठरवू शकत नाही. आणि त्याचे हिस्से ही तो ठरवू शकत नाही आणि म्हणून माणसाने ईश्वराच्या मार्ग दर्शनापासून मुक्त होऊन जेव्हा जेव्हा वारसाची वाटप पद्धती बनविली तेव्हा तेव्हा तो भावनेचीशिकार होऊन चुकीचे व अन्यायी निर्णय घेत राहिला. जर प्राचीन अज्ञान कालात स्त्रीयांना वारसाहक्कापासून वंचीत करण्यात आले होते तर आता आधुनिक अज्ञानकालात त्यांना पुरुषाबरोबर आणून उभे करण्यात आलेले आहे, पण दोघांच्या जबाबदाऱ्या भिन्न आहोत, ही गोष्ट स्पष्ट आहे. नेंपोलियनने जे सिव्हिल कोड बनविले त्यामध्ये रक्ताचे नातलग असतांना नवराबायकोला एकदुसऱ्याच्या वारसाहक्कापासून वंचित केले. हिंदू कोड संतती असताना बापाचा वारसाहक्क मान्य करीत नाही. तरीही आईच्या हिश्याचे समर्थन करते आणि इंडियन सक्शेसन ॲक्ट (Indian Succession Act. 1925) अन्वये संतती असताना मयताच्या आईबापाला दोघानाही वारसामध्ये काही हिस्सा नाही. हा या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की वारस मिळकतीच्या विभागणीच्या प्रश्नात माणूस आपल्या भावना व तत्कालीन विचारांना बळी पडत आलेला आहे. आणि जे नियमही यासंबंधी बनविले जात आहेत ते कोणत्याही भक्कम आधारावर बनविले गेलेले नाहीत. परंतु इस्लामचा कायदा ईश्वरी ज्ञानावर आधारलेला आहे. आणि म्हणून यामध्ये कमाल दर्जाचा समतोल आढळून ये तो.

३२. अल्लाह ज्ञानीही आहे व बुद्धिमानही आहे. आणि म्हणून त्याचे वाटप चुकीचे होऊ शकत नाही. तुमचा स्वत:चा कल व दृष्टीकोन चुकीचा आणि न्यायनीतिच्या आवश्यकतेच्या विरोधी होऊ शकतो. तुमचा खराखुरा फायदा आणि खरेखुरे हित जाणणारा अल्लाहच आहे. म्हणून तुम्हाला त्याची शरीयत योग्य असल्याबद्दल खात्री बाळगली पाहिजे. आणि शरियतच्या कायद्याचेच पालन तुम्ही केले पाहिजे.

**आणि जो कोणी अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करील आणि त्याच्या (निश्चित केलेल्या) मर्यादांचे उल्लंघन करील त्याला तो आगीमध्ये टाकील, जेथे तो सदैव राहील. आणि त्याच्यासाठी अपमानास्पद शिक्षा आहे. *(अल-क़ुर्आन)***

१२. आणि तुमच्या पत्न्यांनी जे काही मागे सोडले असेल त्यामध्ये जर त्यांना संतती नसेल तर, तुमचा (पतीचा) अर्धा हिस्सा आहे. आणि त्यांना संतती असेल तर त्यांच्या वारसासंपत्ती मध्ये तुमचा हिस्सा एक चतुर्थांश असेल त्या मृत्यूपत्राच्या पूर्ततेनंतर जे त्यांनी केले असेल आणि त्या कर्जाच्या फेडीनंतर जे त्यांच्यावर असेल. आणि तुम्ही जे काही मागे सोडले असेल त्यामध्ये जर तुम्हांला संतती नसेल तर त्यांच्या (पत्न्यांचा) एक चतुर्थांश हिस्सा आहे. आणि तुम्हाला संतती असेल तर त्यांना (पत्न्यांना) तुमच्या वारसा संपती मध्ये आठवा हिस्सा मिळेल [३३] त्या मृत्यूपत्राच्या पुर्ततेनंतर जे तुम्ही केले असेल आणि त्या कर्जाच्या फेडीनंतर जे तुमच्यावर असेल. आणि तो पुरुष वा स्त्री ज्याच्या वारसासंपत्तीचे वाटप व्हावयाचे आहे. ''कलालह'' (ज्याला संतती नाही व ज्याचा बापही जिवंत नाही) असेल आणि त्याचा एक भाऊ वा एक बहीण असेल तर त्याच्या पैकी प्रत्येकाला सहावा हिस्सा मिळेल, आणि या पेक्षा अधिक असतील तर ती सर्व एक तृतियांशा मध्ये भागीदार राहतील [३४] त्या मृत्यू पत्राचे पुर्ततेनंतर जे केले गेले असेल किंवा त्या कर्जाच्या फेडीनंतर जे मृताने मागे सोडले असेल व जे हानिकारक नसेल. [३५] हे वारसापत्र आज्ञा आहे. अल्लाहकडून आणि अल्लाह सर्व काही जाणणारा व मोठा सहनशील आहे. [३६]

وَلَكُمْ نِصْفُ مَا تَرَكَ أَزْوَاجُكُمْ إِن لَّمْ يَكُن لَّهُنَّ وَلَدٌ ۚ فَإِن
كَانَ لَهُنَّ وَلَدٌ فَلَكُمُ الرُّبُعُ مِمَّا تَرَكْنَ ۚ مِن بَعْدِ وَصِيَّةٍ
يُوصِينَ بِهَا أَوْ دَيْنٍ ۚ وَلَهُنَّ الرُّبُعُ مِمَّا تَرَكْتُمْ إِن لَّمْ يَكُن
لَّكُمْ وَلَدٌ ۚ فَإِن كَانَ لَكُمْ وَلَدٌ فَلَهُنَّ الثُّمُنُ مِمَّا تَرَكْتُم ۚ
مِّن بَعْدِ وَصِيَّةٍ تُوصُونَ بِهَا أَوْ دَيْنٍ ۗ وَإِن كَانَ رَجُلٌ
يُورَثُ كَلَالَةً أَوِ امْرَأَةٌ وَلَهُ أَخٌ أَوْ أُخْتٌ فَلِكُلِّ وَاحِدٍ مِّنْهُمَا
السُّدُسُ ۚ فَإِن كَانُوا أَكْثَرَ مِن ذَٰلِكَ فَهُمْ شُرَكَاءُ فِي الثُّلُثِ ۚ
مِن بَعْدِ وَصِيَّةٍ يُوصَىٰ بِهَا أَوْ دَيْنٍ غَيْرَ مُضَارٍّ ۚ وَصِيَّةً
مِّنَ اللَّهِ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ حَلِيمٌ ﴿١٢﴾

१३. या अल्लाहच्या (निश्चित केलेल्या) मर्यादा आहेत.[३७] आणि जे अल्लाह व त्याच्या पैगंबरांचे आज्ञापालन करतील त्यांना तो अशा बागांमध्ये दाखल करील ज्याखालून जलप्रवाह वाहत असतील. ते तेथे सदैव राहतील आणि हीच फार मोठी सफलता आहे.

تِلْكَ حُدُودُ اللَّهِ ۚ وَمَن يُطِعِ اللَّهَ وَرَسُولَهُ يُدْخِلْهُ جَنَّاتٍ
تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ فِيهَا ۚ
وَذَٰلِكَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿١٣﴾

१४. आणि जो कोणी अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करील आणि त्याच्या (निश्चित केलेल्या) मर्यादांचे उल्लंघन करील त्याला तो आगीमध्ये टाकील, जेथे तो सदैव राहील. आणि त्याच्यासाठी अपमानास्पद शिक्षा आहे.[३८]

وَمَن يَعْصِ اللَّهَ وَرَسُولَهُ وَيَتَعَدَّ حُدُودَهُ يُدْخِلْهُ
نَارًا خَالِدًا فِيهَا وَلَهُ عَذَابٌ مُّهِينٌ ﴿١٤﴾

३३. मयताला संतती नसेल तर त्याचा पत्नीचा हिस्सा १/४ आणि संतती असेल तर तिचा हिस्सा १/८ राहिल आणि जर एकापेक्षा अधिक भार्या असतील तर त्या सर्वांना या१/४ वा १/८ मध्ये समान हिस्सा मिळेल.

३४. या गोष्टीवर एकमत आहे की ही आज्ञा फक्त एका मातेच्यापासून जन्मलेल्या बहिणभावासंबंधी(Uterine brother and sisters) आहे. सख्खे व एका बापापासून जन्मलेले बहिणभाऊ यांच्यासंबंधी या सुरतीच्या शेवटी आज्ञा निवेदन करण्यांत आलेले आहे.

एका मातेपासून जन्मलेल्या बहिणभावाबद्दल ही आज्ञा आहे की जर फक्त एक भाऊ किंवा एक बहिण असेल तर तिला १/६हिस्सा मिळेल. आणि दोन किंवा दोहोंपेक्षा अधिक बहिणभाऊ असतील तर १/३ हिश्शयामद्ये ते सर्व समान हिस्सेदार असतील स्पष्ट असो की मयताचे एकाच मातेपासून जन्मलेल्या बहीण भावाना अशा स्थितीत हिस्सा मिळतो जेव्हा मयताची ना संतती असेल ना बाप जिवंत असेल.

३५. म्हणजे वारसापत्र आणि कर्जासाठी वारसाकायद्यामध्ये जी तरतूद केली गेली आहे त्यापासून चुकीचा फायदा उठविला जाऊ नये. उदाहरणार्थ एखादा माणूस कायदेशीर वारसाचा हक्क मारण्याच्या दृष्टीने चूकीचे वारसापत्र करील किंवा स्वत:वर नसलेला कर्जाचा बोजा आहे असे सांगेल अशा प्रकारच्या गैरप्रकारांना हदीसमध्ये मोठे गुन्हे संबोधिले गेले आहे.

३६. सर्वश्रेष्ठ अल्लाहने येथे आपल्या दोन वैशिष्ट्यांचा ज्ञान व सहनशीलता यांचा हवाला दिला आहे. याने हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की जर एखादा माणूस या वारसा कायद्याविरूद्ध वर्तन करील तर त्याने हे चांगल्या प्रकारे जाणावे की त्याच्या स्थितीचे अल्लाहला पूर्णज्ञान आहे. आणि अल्लाह सहनशील असल्याने तत्काळ त्याला शिक्षा करीत नाही. याचा हा अर्थ कदापीही होत नाही की तो अल्लाहच्या पकडीपासून वाचू शकेल.

३७. मर्यादेशी अभिप्रेत कायदेकानून व नियम आहेत. वारसासंबंधी जे अदेश पवित्र क़ुरआन मध्ये दिले गेले आहेत त्यांचा दर्जा ईश्वरी कायद्याचा (Divine Law ) आहे. त्याचे पालन करण्याची जबाबदारी अनिवार्यपणे ईश्वराच्या प्रत्येक दासावर येते.

३८. वारसासंबंधी आदेश निवेदन केल्यानंतर त्याविरूद्ध वर्तन करणाऱ्यांना कडक शिक्षेची धमकी देण्यात आलेली आहे. यावरून त्या लोकांच्या गुन्ह्याचे गांभीर्य स्पष्ट होते. जे अल्लाहने लागू केलेल्या वारसा कायद्यामध्ये बदल करू इच्छितात किंवा इस्लामी वारसाच्या कायद्याच्या जागी दुसरा एखादा वारसा कायदा (Succession Code) किंवा ( Law of inheritance) आणू इच्छितात. हे त्याच लोकांचे काम होऊ शकते ज्यांना अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांच्या आज्ञापालनाशी काही संबंध नाही. नाहीपेक्षा कोणताही मुसलमान अशा गोष्टीचे धाडस करू शकत नाही.

# वारसा मधील हिस्सेदारांचा तक्ता

# Table of heirs with their shares

| अ. न. | वारस Heir | कैफ़ियत (विवरण) | सर्वसाधारण वाटा वा हिस्सा Normal Share or Portion | | वारसा प्राप्तीच्या शर्ती Conditions |
|---|---|---|---|---|---|
| | | | एक व्यक्ति असलेल्या स्थितीत of one person | दोन किंवा अधिक व्यक्ति असलेल्या स्थितीत of two or more persons | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुलगा | शेषाधिकारी (Residuary) | मुलीच्या दुप्पट | प्रत्येक मुलाचा हिस्सा मुलीच्या दुप्पट | जेव्हां मयताला मुले व मुली दोन्ही असतील व फक़्त तेच वारस असतील. |
| | मुलगा | शेषाधिकारी | संपूर्ण वारसा | संपूर्ण वारसा समान हिस्सा | जेव्हा फक्त एक मुलगा किंवा अधिक मुलें वारस असतील. |
| | मुलगा | शेषाधिकारी | कुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदारास दिल्यानंतर जे राहील ते | कुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदारास दिल्यानंतर जे राहील त्यामध्ये समान हिस्सा | जेव्हा मयताचे आई वडील,नवरा वा पत्नी असतील तर त्यांना दिल्यानंतर जे शिल्लक राहील ते. |
| २ | मुलगी | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार Quranic Sharer | १/२ | २/३ मध्ये समान वाटा | जेवहा मयताला मुलगा नसेल |
| | मुलगी | शेषाधिकारी | मुलाच्या निम्मा | प्रत्येक मुलीचा हिस्सा मुलाच्या निम्मा | जेव्हा मयताला मुलगा असेल. |
| ३ | बाप | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार | १/६ | — | जेव्हा मयताचा मुलगा हयात असेल |
| | बाप | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार व शेषाधिकारी | १/६ कुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदाराना दिल्यानंतर बाक़ी राहील ते | — | जेव्हा मयताची मुलगी हयात असेल व मुलगा नसेल |
| | बाप | शेषाधिकारी | संपूर्ण वारसा | — | जेव्हा मयाताला संतती नसेल आणि त्याची आई नवरा अगर पत्नीही हयात नसेल तर |
| ४ | आई | कुरआनने नियुक्ति केलेले हिस्सेदार | १/६ | — | जेव्हा मयताला संतती किंवा त्याचे भाऊ बहीण दोन किंवा त्याहून अधिक हयात असतील तर |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| | आई | —”— | १/३ | — | जेव्हा मयताला संतती नसेल आणि ना त्याला भाऊ बहीण कमीत कमी दोनच्या संख्येत असतील. |
| | आई | —”— | १/३ | — | जेव्हा मयताचा बाप, पत्नी वा पति हयात असेल तर अशा स्थितीत पति अगर पत्निचा हिस्सा अदा केल्यानंतर उर्वरित वारसा मिळकतीचा १/३ आईला दिला जाईल. |
| ५ | पति | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार | १/२ | — | जेव्हा मयताला काही संतती नसेल. |
| | पति | —”— | १/४ | — | जेव्हा मयताची संतती हयात असेल. |
| ६. | पत्नी | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार | १/४ | १/४ मध्ये सर्वाना सारखा वाटा | जेव्हा मयताला काही संतती नसेल |
| | पत्नी | —”— | १/८ | १/८ मध्ये सर्वाना सारखा वाटा | जेव्हा मयताची संतती हयात असेल. |
| ७. | एकच आई पण बाप वेग-वेगळे असलेले भाऊ बहीन uterine brother or sister | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार | १/६ | १/३ मध्ये सर्व भाऊ बहीणीना सारखा वाटा | जेव्हा मयताची संतती किंवा बाप हयात नसेल. तर. |
| | —”— | बहिकृत (excluded) | काही नाही | काही नाही | जेव्हा मयताची संतती किंवा बाप हयात असेल |
| 8. | सख्खी बहीण | कुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार | १/२ | २/३ | जेव्हा मयाताचा बाप, त्याची संतती आणि त्याचा सख्खा भाऊ यापैकी कोणी ही हयात नसेल तर. |
| | —”— | शेषाधिकारी | मुलीला दिल्या नंतर बाकीचा हिस्सा | मुलीला दिल्या नंतर बाकी राहिलेल्या हिश्श्यात सर्वांना सारखा वाटा | जेव्हा मयताची मुलगी हयात असेल परंतु तिचा बाप, पुत्र, आणि सख्खा भाऊ यापैकी कोणी हयात नसेल तर. |
| | सख्खी बहीण | शेषधिकारी | भावाचा निम्मा हिस्सा | प्रत्येक बहिणीला भावाचा निम्मा हिस्सा | जेव्हा मयताचा सख्खा भाऊ हयात असेल परंत् त्याचा बाप किंवा पुत्र हयात नसेल तर. |
| | —”— | बहिष्कृत | काही नाही | काही नाही | जेव्हा मयताचा बाप किंवा पुत्र हयात असेल तर |
| ९. | सख्खा भाऊ | शेषाधिकारी | संपूर्ण वारसा | संपूर्ण वारसा मध्ये मध्ये सर्वाना सारखा हिस्सा | जेव्हा मयताचा बाप पुत्र, पति वा पत्नि आणि एकाच आईचे भाऊ बहीण यापैकी कोणी हयात नसेल तर. |
| | सख्खा भाऊ | शेषाधिकारी | कुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदाराना अदा केल्या- | कुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदाराना अदा केल्या- | जेव्हां मयताचा बाप किंवा पुत्र हयात नसेल परंतु मुलगी, आई, एकाच आईचे भाऊ बहीण आणि पती वा पत्नी मधील कोणी हयात असेल तर त्याला दिल्यानंतर जे शिल्लक राहील ते सखखया भावाला मिळेल. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| | —"— | बहिष्कृत | नंतर जे शिल्लक राहील ते<br>काही नाही | नंतर जे शिल्लक राहील त्यामध्ये समान हिस्सा<br>काही नाहीं | जेव्हा मयताचा बाप किंवा पुत्र हयात असेल तर |
| १० | रक्ताची नाते असलेली बहीण consanguine sister | क़ुरआनने नियुक्त केलेले हिस्सेदार | १/२ | २/३ | जेव्हा मयताचे सख्खे भाऊ बहीण रक्ताचे भाऊ, बाप आणि संतति या पैकी कोणी हयात नसेल तर. |
| | —"— | —"— | १/६ | १/६ | जेव्हा मयताची फक्त एक सख्खी बहीण हयात असेल आणि रक्ताचा भाऊ, बाप आणि संतति पैकि कोणीही हयात नसेल तर. |
| | —"— | शेषाधिकारी | मुलीला दिल्या नंतर राहिलेला हिस्सा | मुलीला दिल्या नंतर जे शिल्लक राहील त्यामध्ये समान हिस्सा | जेव्हा मयताची मुलगी हयात असेल परंतु सख्खे भाऊ बहीण रक्ताचे भाऊ, एकाच आईचे भाऊ बहीण वा पत्नी बाप आणि पुत्र संतति पैकी कोणीहा हयात नसेल तर. |
| | —"— | —"— | भावाता अर्धा हिस्सा | भावाचा अर्धा हिस्सा | जेव्हा मयताचा रक्ताचा भाऊ हयात असेल परंतु सख्खा भाऊ, बाप, पती किंवा पत्नी आणि पुत्र संतति पैकी कोणी हयात नसेल तर. |
| | —"— | बहिष्कृत | काही नाहीं | काही नाही | जेव्हा मयताच्या दोन सख्खया बहीणी सख्खा भाऊ, बाप पुत्र, संतति यापैकी कोणी हयात असेल किंवा एक सख्खी बहिण अस्बा (शेषशाधिकारी) म्हणून असेल तर. |
| ११. | रक्ताचे नाते असलेला भाऊ (म्हणजे ज्याचा बाप एक आई वेगळी | शेषाधिकारी | संपूर्ण वारसा | संपूर्ण वारसात सर्वांना सारखा हिस्सा | जेव्हा मयताचे आई बाप, संतति, पती, किंवा पत्नी सख्खे भाऊ बहीण, एकाच बापाची बहिण. एकाच आईचे भाऊ बहीण यापैकी कोणी हयात नसेल तर. |
| | —"— | —"— | क़ुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदारांना दिल्यानंतर जे राहील ते | क़ुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदारांना दिल्यानंतर जे राहील त्यामध्ये सर्वांना सारखा हिस्सा | जेव्हा मयताची मुलगी आई पती वा पत्नी सख्खी बहीण एकाच आईचे भाऊ बहीण या पैकी कोणी हयात असेल तर.<br>जर रक्ताची बहीण हयात असेल तर तिच्या दुप्पट रक्ताच्या भावाला मिळेल. |
| | —"— | बहिष्कृत | काही नाही | काही नाही | जेव्हा मयाताचा बाप, मुलगा, सख्खा भाऊ किंवा सख्खी बहीण हयात असेल तर. |

**टीपः**

१) या तकत्यामध्ये फक्त त्या वारसांचे हिस्से विषद केले गेले आहेत. ज्यांचा क़ुरआन मध्ये तपशीलवार उल्लेख आलेला आहे.

२) या बाबतीत उलेमाचे एकमत (इजमा) आहे की पुत्र हयात नसतांना नातू व बाप हयात नसतांना आजा वारसा होईल व याच प्रमाणे दुसरे.

३) वर उल्लेखिलेल्या वारसांपैकी कोणीही हयात नसेल तर दूरच्या नातलगांना ( Distant Kindred ) हिस्सा मिळतो. हे प्रश्न हदीस तसेंच इस्लामी धर्मशास्त्र पंडीतांच्या (फुकहांच्या) अनुमानावर व संशोधनावर अवलंबून आहेत.

**आणि तुमच्या स्त्रीयांपैकी ज्यांचेकडून व्यभिचार घडला असेल. त्यांच्या बाबतीत आपल्यामधून चार जाणांची साक्षी घ्या. आणि त्यांनी जर साक्ष दिली तर त्या स्त्रीयांना घरात रोखून ठेवा येथपावेतो की, मृत्यू त्यांची वेळ पुरी करील. किंवा अल्लाह त्यांच्यासाठी काही मार्ग काढील. *(अल-कुरआन)***

१५. आणि तुमच्या स्त्रीयांपैकी ज्यांचेकडून व्यभिचार घडला असेल. [३९] त्यांच्या बाबतीत आपल्यामधून चार जाणांची साक्षी घ्या.[४०] आणि त्यांनी जर साक्ष दिली तर त्या स्त्रीयांना घरात रोखून ठेवा [४१] येथपावेतो की, मृत्यू त्यांची वेळ पुरी करील. किंवा अल्लाह त्यांच्यासाठी काही मार्ग काढील.[४२]

وَالّٰتِیْ یَاْتِیْنَ الْفَاحِشَةَ مِنْ نِّسَآئِكُمْ
فَاسْتَشْهِدُوْا عَلَیْهِنَّ اَرْبَعَةً مِّنْكُمْ ۚ فَاِنْ
شَهِدُوْا فَاَمْسِكُوْهُنَّ فِی الْبُیُوْتِ حَتّٰی
یَتَوَفّٰهُنَّ الْمَوْتُ اَوْ یَجْعَلَ اللّٰهُ لَهُنَّ سَبِیْلًا ﴿۱۵﴾

१६. आणि तुमच्यापैकी ज्या कोणाकडून (स्त्री,पुरूष) हे कृत्य घडले असेल त्या दोघांना यातना द्या.[४३] नंतर जर,त्यांनी तौबा'(पश्चाताप)केली व सुधारणा केली, तर मग त्यांना क्षमा करा,[४४]कारण अल्लाह तौबा स्वीकार करणारा व कृपा करणारा आहे.

وَالَّذٰنِ یَاْتِیٰنِهَا مِنْكُمْ فَاٰذُوْهُمَا ۚ فَاِنْ تَابَا وَاَصْلَحَا
فَاَعْرِضُوْا عَنْهُمَا ؕ اِنَّ اللّٰهَ كَانَ تَوَّابًا رَّحِیْمًا ﴿۱۶﴾

१७. तौबाचा (पश्चाताप) स्वीकार करण्याबाबतीत अल्लाहवर त्याच लोकांचा हक्क आहे, जे नादानीने एखादे दुष्कृत्य करतात, नंतर लवकरच तौबा करतात [४५] अशाच लोकांच्या तौबाचा अल्लाह स्वीकार करतो आणि अल्लाह जाणणारा व बुद्धिमान आहे.

اِنَّمَا التَّوْبَةُ عَلَی اللّٰهِ لِلَّذِیْنَ یَعْمَلُوْنَ السُّوْٓءَ بِجَهَالَةٍ
ثُمَّ یَتُوْبُوْنَ مِنْ قَرِیْبٍ فَاُولٰٓئِكَ یَتُوْبُ اللّٰهُ
عَلَیْهِمْ ؕ وَكَانَ اللّٰهُ عَلِیْمًا حَكِیْمًا ﴿۱۷﴾

१८. आणि त्या लोकांची तौबा, तौबा नाही. जे दुष्कृत्ये करीत असतात. येथपावेतो की, जेव्हा त्यांच्यापैकी एखाद्याचे मरण येऊन उभे राहते तेव्हा तो म्हणतो की,मी आता तौबा केली. आणि ना त्या लोकांची तौबा वस्तुतः तौबा आहे. जे 'कुफ्र'(नकार) च्या अवस्थेत मरण पावतात.[४६] अशा लोकांच्यासाठी आम्ही दु:खदायक शिक्षा तयार ठेविली आहे.

وَلَیْسَتِ التَّوْبَةُ لِلَّذِیْنَ یَعْمَلُوْنَ السَّیِّاٰتِ ۚ حَتّٰۤی
اِذَا حَضَرَ اَحَدَهُمُ الْمَوْتُ قَالَ اِنِّیْ تُبْتُ الْـٰٔنَ
وَلَا الَّذِیْنَ یَمُوْتُوْنَ وَهُمْ كُفَّارٌ ؕ اُولٰٓئِكَ
اَعْتَدْنَا لَهُمْ عَذَابًا اَلِیْمًا ﴿۱۸﴾

१९. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! तुमच्यासाठी हे वैध नाही की, तुम्ही जबरदस्तीने स्त्रीयांचे वारस बनावे [४७] ना हे वैध आहे की जे काही तुम्ही त्यांना दिलेले आहे. त्यामधून काही परत घेण्याच्या उद्देशाने त्यांना त्रास द्यावयास लागावे- त्यांनी उघड निर्लज्जपणा केला असल्यास ती गोष्ट वेगळी.[४८] त्यांच्याबरोबर चांगली वागणूक ठेवा. तुम्हाला त्या नापसंत असल्या तर हे आश्चर्यकारक नाही की, एखादी गोष्ट तुम्हांला आवडत नसली तरी अल्लाहने तिच्यामध्ये (तुमच्यासाठी) पुष्कळशी भलाई ठेविली असेल.[४९]

یٰۤاَیُّهَا الَّذِیْنَ اٰمَنُوْا لَا یَحِلُّ لَكُمْ اَنْ تَرِثُوا النِّسَآءَ كَرْهًا ؕ وَلَا
تَعْضُلُوْهُنَّ لِتَذْهَبُوْا بِبَعْضِ مَاۤ اٰتَیْتُمُوْهُنَّ اِلَّاۤ اَنْ یَّاْتِیْنَ
بِفَاحِشَةٍ مُّبَیِّنَةٍ ۚ وَعَاشِرُوْهُنَّ بِالْمَعْرُوْفِ ۚ فَاِنْ كَرِهْتُمُوْهُنَّ
فَعَسٰۤی اَنْ تَكْرَهُوْا شَیْـًٔا وَّیَجْعَلَ اللّٰهُ فِیْهِ خَیْرًا كَثِیْرًا ﴿۱۹﴾

३९. अभिप्रेत व्यभिचार आहे.

४०. जर एखाद्या मुसलमान स्त्रीकडून व्यभिचार घडला असेल तर तिला त्याच स्थितीत शिक्षा दिली जावू शकते जेव्हा तिचा अपराध चार मुसलमान साक्षीदारद्वारे सिद्ध होईल. व्यभिचारांसबंधी इस्लामने चौघांच्या साक्षीला आवश्यक ठरविले आहे. इतर गुन्ह्यांबाबतीत मात्र दोघांची साक्ष पुरेशी आहे.याचे कारण हे आहे की व्यभिचार हा इतका गंभीर गुन्हा आहे की त्यानंतर माणसाची अब्रु व शील शिल्लक राहत नाही. आणि त्याचा वस्तूत: नैतिक मृत्यु घडून येतो.

इतका गंभीर गुन्हा एखाद्यावर लादण्यापूर्वी अत्यंत सावधगिरी घेणे आवश्यक आहे.

४१. ज्या स्त्रीयांनी व्यभिचार केला असेल आणि त्यांचा हा गुन्हा चार साक्षीदारांनी सिद्ध होईल त्यांना घरांमध्ये नजर बंद ठेवण्याचा आदेश या आयतिमध्ये दिला गेला आहे. हेतु हा की त्यांनी या दुराचारापासून परावृत्त व्हावे. आणि त्यांचे अपहरण होऊ देऊ नये. हा आदेश विशिष्ट परिस्थितीत आहे ज्याचा खुलासा पुढे होत आहे.

४२.हा या गोष्टीकडे इशारा आहे की व्यभिचारी स्त्रीयांच्या नजरबंदीचा आदेश विशिष्ट परिस्थितीत दिला गेला आहे. राहिला कायमस्वरूपी आदेश. तर तो नंतर उतरविला जाईल. नंतर म्हणजे हिजरीसन सहामध्ये सूरे नूरमध्ये शंबर फटक्यांची शिक्षा सांगितली गेली. (सूरे नूर आयत नं. २) याचा हा अर्थ नव्हे की नजरबंदीचा आदेश रद्द केला गेला. जर असे असते तर त्याचे पठण कुरआनमध्ये कायम ठेवले गेले नसते. ज्याअर्थी तिचे पठण कायम ठेवले गेले आहे त्यावरून हे स्पष्ट आहे की हा आदेश त्या परिस्थितीत आजही कायम आहे जेव्हा मुस्लिम समाज शंभर फटक्यांची शिक्षा देण्याच्या परिस्थितीत नसेल.अलबत: ज्या समाजात फटक्यांची शिक्षा अमलात आणली जावू शकते तेथे फटक्यांचीच शिक्षा दिली गेली पाहिजे. या आयतिमध्ये व्यभिचार सिद्ध करण्यासाठी चार साक्षीदारांची जी अट निवेदन केली गेली आहे. ती फटक्यांच्या शिक्षेचा आदेश आल्यानंतर देखील कायम ठेवण्यात आलेली आहे. हा देखील ही आयत रद्द केली गेली नाही याचाच पुरावा आहे.

वस्तुस्थिति ही आहे की कुरआनमधील कोणतीही आयत रद्द (मन्सूख़) केली गेलेली नाही. काही आदेश जे वर वर विरोधी दिसून येतात त्यामध्ये वस्तुत: काही विरोध नाही तर एक आदेश एका विशिष्ट परिस्थितीसाठी असतो तर दुसरा आदेश त्याहून भिन्न परिस्थितीसाठी असतो. उदा. एके ठिकाणी आज्ञा दिली गेली आहे की काफिरांना त्यांच्या अवस्थेवर सोडून द्या आणि दुसऱ्या ठिकाणी आज्ञा दिली गेली आहे की त्यांच्या बरोबर लढाई करा स्पष्ट आहे की हे आदेश निरनिराळ्या परिस्थितीच्या संदर्भात दिले गेले आहेत. दुसरा आदेश पहिल्या आदेशाला रद्द करतो असे नव्हे.

४३. ''अज़ीयत'' (यातना) ने अभिप्रेत निर्भत्सना, धमकी, दटावणी आणि सुधारणा व शिस्त लावण्यासाठी मारहाण. शिक्षेचा हा हुकूम स्त्री व पुरूष दोघांच्यासाठी आहे ज्यांच्याकडून व्यभिचार घडला असेल.

४४. सुधारणेच्या बाबतीत मग तो पुरूष असो वा स्त्री- यातना देण्याबाबतीत संयम पाळला जाईल. परंतु स्त्रीला घरामध्येच रोखण्याचा जो हुकूम आयत नं. ५ मध्ये दिला गेला आहे तो यातना संबंधीच्या हुकमाखेरीज आहे. आणि यामागे दुसरा हेतू पण आहे. आणि म्हणून त्या हुकूमाचे पालन केले जाईल.

४५. वर जो 'तौबा'चा उल्लेख आला आहे त्या संदर्भात येथे त्याचे स्पष्टीकरण केले गेले आहे. तौबाचा अर्थ गुन्ह्या पासून परावृत होणे आणि अल्लाहच्या आज्ञापालनकडे परतणे हा आहे. जो माणूस अज्ञानामुळे किंवा भावनेच्या आहारी जावून गुन्हा करतो. परंतु त्यावर आग्रह धरीत नही. उलटा त्याबद्दल शरमिंदा होऊन अल्लाहकडे रूजू होतो आणि त्याची क्षमायाचना करतो अशा माणसाची तौबा खरी तौबा आहे आणि तिचा स्वीकार करण्यांचे आश्वासन अल्लाहने दिले आहे.

४६. म्हणजे जे लोक जीवनभर गुन्ह्यावर गुन्हे करीत सुटतात आणि त्यापासून परावृत्त होत नाहीत. जेव्हा मृत्युचा फिरिश्ता समोर येऊन उभा राहतो तेव्हा अल्लाहची क्षमायाचना करू लागतात. अशा लोकांची तौबा खरी तौबा नाही. कारण जेव्हा परीक्षेची वेळ संपली आणि निकाल जाहीर होण्याची वेळ आली त्यावेळी तौबा करण्यात काही अर्थ नाही. आणि म्हणून अशा लोकांच्या तौबाला सर्वश्रेष्ठ अल्लाह स्वीकार करीत नाही. आणि ना त्या लोकांची तौबा जे मरे पर्यंत इन्कार करणारे असतात. परंतु जेव्हा मृत्यू येतो आणि माणसासमोर जेव्हा सत्य परिस्थिती जाहीर होते त्यावेळी तो अल्लाहजवळ तौबा करीत असतो. अशा माणसाची तौबा यासाठी कबूल होत नाही की ती वेळ परिक्षेची नव्हे तर निकालाची असते. आणि म्हणून जर गुन्ह्याचा प्रश्न असेल तर माणसाने त्यापासून तत्काळ परावृत्त व्हावे. आणि जर आतापावेतो त्याचे आचरण नकाराचे व कुफ्रचे असेल तर त्याने विनाविलंब आपल्या आचरण्यांत बदल करावा आणि ईमान आणावे कोणाचा मृत्यू केव्हा येईल व तौबाची सवलत केव्हा संपेल हे सांगता येत नाही.

४७. अरबांच्या अज्ञान काळामध्ये हा लज्जास्पद रिवाज चालू होता की मयताच्या भार्यांचा- मयताच्या वारसा मिळकतीत समावेश केला जात असे. आणि बापाच्या मृत्यूनंतर मुलगा आपल्या सावत्रआईचा वारस बनत असे. आणि त्यांच्यामध्ये पतीपत्नीचे संबंध प्रस्थापित होत. कुरआनने याला हराम ठरविले

आणि स्पष्ट केले की स्त्री ही वारसा मिळकत नव्हे की मयताचे वारसांनी तिच्यावर ताबा गाजवावा. याउलट इद्दतीची मुदत सपल्यानंतर ती स्वतंत्र आहे. धर्मशास्त्राच्या मर्यादेत राहून ती कोणाबरोबरही विवाह करू शकते. ही एक क्रांतीकारक सुधारणा होती जी इस्लामने स्त्रीयांच्या संबंधी केली.

४८. म्हणजे व्यभिचार घडला असल्यास त्यांना त्रास देण्याचा हक्क तुम्हाला पोहचतो.

४९. म्हणजे निव्वळ यासाठी की पत्नी सुखरूप नाही किंवा तिच्यामध्ये दुसरा एखादा दोष आहे म्हणून तिला त्रास देणे योग्य नाही आणि तिला सोडून देणे हे पण योग्य नाही जर ती सत्यशील आहे तर तिला शक्यतो निभावून घेण्याचा प्रयत्न करावा. कारण हे शक्य आहे की तिच्यामध्ये दुसऱ्या चांगल्या गोष्टी असतील, ज्या वैवाहिक जीवनासाठी महत्तवाच्या असतील. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह तिच्या सत्यशीलाच्या आधारावर या वैवाहिकसंबंधाना लाभदायक बनविल यात काही आशचर्य नाही. आणि म्हणून संबंध तोडण्याच्या बाबतीत घाई करू नये.

❀❀❀❀❀❀

**आणि तुम्ही एका पत्नीच्या जागी दुसरी पत्नी करू इच्छिता आणि तुम्ही एका पत्नीला पुष्कळशी संपत्ती दिलेली असेल तर,त्यामधून काहीही परत घेऊ नका. काय तुम्ही आळ घेऊन वा उघड अत्याचार करून संपत्ती परत घेणार? *(अल-कुरआन)***

२०. आणि तुम्ही एका पत्नीच्या जागी दुसरी पत्नी करू इच्छिता आणि तुम्ही एका पत्नीला पुष्कळशी संपत्ती दिलेली असेल तर,त्यामधून काहीही परत घेऊ नका.[५०] काय तुम्ही आळ घेऊन वा उघड अत्याचार करून संपत्ती परत घेणार?

وَإِنْ أَرَدْتُّمُ اسْتِبْدَالَ زَوْجٍ مَّكَانَ زَوْجٍ وَآتَيْتُمْ إِحْدَاهُنَّ
قِنطَارًا فَلَا تَأْخُذُوا مِنْهُ شَيْئًا ۚ أَتَأْخُذُونَهُ بُهْتَانًا
وَإِثْمًا مُّبِينًا ﴿٢٠﴾

२१. तुम्ही ती कशी काय परत घेऊ शकता, जेव्हा तुम्ही एक दुसऱ्याशी स्त्री-पुरूषांचे संबंध प्रस्थापित केलेले आहेत आणि त्यांनी तुमच्याकडून पक्के वचन घेतलेले आहे.[५१]

وَكَيْفَ تَأْخُذُونَهُ وَقَدْ أَفْضَىٰ بَعْضُكُمْ إِلَىٰ بَعْضٍ وَأَخَذْنَ مِنكُم
مِّيثَاقًا غَلِيظًا ﴿٢١﴾

२२. आणि त्या स्त्रीयांबरोबर विवाह करू नका. ज्यांच्याशी तुमच्या वडीलांनी विवाह केले आहेत. [५२] परंतु जे काही यापूर्वी घडले. ते घडले. [५३] ही मोठ्या शरमेची व तिरस्काराची गोष्ट आहे आणि अत्यंत वाईट पद्धत.

وَلَا تَنكِحُوا مَا نَكَحَ آبَاؤُكُم مِّنَ النِّسَاءِ إِلَّا مَا قَدْ سَلَفَ ۚ
إِنَّهُ كَانَ فَاحِشَةً وَمَقْتًا وَسَاءَ سَبِيلًا ﴿٢٢﴾

२३. तुमच्यासाठी निषिद्ध (हराम) आहेत [५४] तुमच्या माता,[५५] मुली, [५६] बहिणी,[५७] आत्या, मावश्या, पुतण्या,भाच्या. तसेच तुमच्या त्या माता ज्यांनी तुम्हाला दूध पाजिले असेल,[५८] तुमच्या दूध बहिणी, तुमच्या भार्यांच्या माता, तुमच्या भार्यांच्या मुली ज्यांचे तुमच्याजवळ पालन पोषण झाले आहे- त्या भार्यच्या मुली ज्यांच्याशी तुम्ही समागम केला असेल परंतु ज्या भार्यांशी तुम्ही समागम केलेला नाही त्यांच्या मुलींशी विवाह करण्यास तुम्हांला काही हरकत नाही. [५९] आणि (निषद्ध आहेत तुमच्यासाठी) तुमच्या सख्ख्या मुलांच्या भार्या, [६०] तसेच हे पण निषिद्ध (हराम) आहे की तुम्ही दोन बहिणींना एकाच वेळी एकत्र करावे.[६१] परंतु पूर्वी जे झाले ते झाले.[६२] निःसंशय अल्लाह मोठा क्षमाशील व कृपाळू आहे.

حُرِّمَتْ عَلَيْكُمْ أُمَّهَاتُكُمْ وَبَنَاتُكُمْ وَأَخَوَاتُكُمْ وَعَمَّاتُكُمْ وَخَالَاتُكُمْ
وَبَنَاتُ الْأَخِ وَبَنَاتُ الْأُخْتِ وَأُمَّهَاتُكُمُ اللَّاتِي أَرْضَعْنَكُمْ
وَأَخَوَاتُكُم مِّنَ الرَّضَاعَةِ وَأُمَّهَاتُ نِسَائِكُمْ وَرَبَائِبُكُمُ
اللَّاتِي فِي حُجُورِكُم مِّن نِّسَائِكُمُ اللَّاتِي دَخَلْتُم بِهِنَّ فَإِن لَّمْ تَكُونُوا
دَخَلْتُم بِهِنَّ فَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ وَحَلَائِلُ أَبْنَائِكُمُ الَّذِينَ
مِنْ أَصْلَابِكُمْ وَأَن تَجْمَعُوا بَيْنَ الْأُخْتَيْنِ إِلَّا مَا قَدْ سَلَفَ ۗ
إِنَّ اللَّهَ كَانَ غَفُورًا رَّحِيمًا ﴿٢٣﴾

५०.पत्नीला जो महर दिला गेला असेल आणि त्याशिवाय पत्नी संबंधामुळे तिला भेटीदाखल जे काही दिले गेले असेल ''तलाक'' घडल्यास पतीने पत्नीला दिलेल्या वस्तुपैकी कोणतीही वस्तु परत मागण्याचा त्याला हक्क पोहचत नाही.

५१. विवाहबंधनाला दृढकार (दृढ-प्रतिज्ञा) म्हणून संबोधिले गेले आहे. कारण त्याबरोबर हक्क व जबाबदाऱ्या निगडीत आहेत हा काही साधारण संबंध नव्हे. तर हा अत्यंत भक्कम संबंध आहे व ही दृढनिष्ठेची प्रतिज्ञा आहे. म्हणून जर पुरूष आपल्या इच्छेने हा करार संपुष्टात आणू इच्छित असेल तर त्याला हा हक्क पोहचत नाही की त्याने जे काही दिले असेल ते परत घ्यावे मग ती महरची रक्कम असो किंवा इतर भेटवस्तू.

५२. बापाच्या मृत्यूनंतर आपल्या सावत्रआईबरोबर वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याचा जो रिवाज अज्ञानकालापासून चालत आलेला होता त्याला पवित्र कुरआनने पूर्णपणे निषिद्ध व हराम ठरविले.

५३. म्हणजे कायदेशीरपणे मागील संबंधाची चौकशी केली जाणार नाही.

५४. या आयतीमध्ये अत्यंत जवळच्या नातेवाईकांबरोबर विवाह हराम ठरविला गेला आहे. ही मनाई मानने स्वभावाच्या या निकडीवर आधारभूत आहे की नात्याचे हे संबंध, प्रेम व ममतेच्या उच्च भावनेवर प्रस्थापित झाले पाहिजेत यामध्ये कामुका भावनेचा काही संबंध असू नये. नाहीपेक्षा याने मानवी समाजात मोठा गोंधळ माजेल.

५५. आई मग ती सख्खी असो वा सावत्र ती हरामच आहे. त्याचप्रमाणे बापाची आई व आईची आईसुद्धा हराम आहे.

५६. मुलीच्या आज्ञेत, मुलाची मुलगी व मुलीची मुलगी यांचा समावेश होतो.

५७. बहीण मग ती सख्खी असो वा सावत्र (सावत्र आई किंवा सावत्र बापापासून) सर्व समानरित्या हराम आहेत.

५८. मुलाचे पालनपोषण ज्या स्त्रीच्या दुधावर झाले असेल ती स्त्री त्याला आई समान असते. आणि म्हणून इस्लामने यासंबंधीची प्रतिष्ठा सुरक्षित राखली आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे वचन आहे की

يحرم من الرضاعة ما يحرم من النسب۔

(تفسیر ابن کثیر ص ۴۶۹ بحوالہ مسلم).

''जे संबंध गोत्रामुळे हराम आहेत ते दुधामुळे ही हराम आहेत ''(तफसीर इब्ने कसीर भा.१ पृ. ४६९ हवाला मुस्लिम)

५९. पत्नीची ती मुलगी जी तिच्या पहिल्या पतीपासून असेल याबद्दल मनाई या करणाने आहे की जेव्हा ती उपपत्नीपासून असेल परंतु जर ती आशा पत्नीची असेल जिच्याबरोबर फक्त विवाह झाला होता परंतु वैवाहिक संबंध प्रस्थापित होण्यापूर्वी तिला तलाक दिला गेला असेल तर अशा स्त्रीच्या मुलीशी विवाह वैध आहे. राहिली एखाद्या जवळ संगोपन झाल्याची गोष्ट तर ही अट म्हणून नाही. परंतु नात्याच्या नाजूकपणाची जाणीव करून देण्यासाठी आहे. जर सावत्र मुलगी उपपत्नीपासून असेल तर ती कोणत्याही परिस्थितीत माणसासाठी अवैध आहे. मग तिचे संगोपन त्याच्याजवळ झालेले असो वा नसो.

६० या बंधनाने दत्तकपुत्राच्या पत्नीशी विवाहाला मनाईच्या आज्ञेपासून काढून टाकण्यात आलेले आहे. फक्त स्वत:च्या रक्ताच्या मुलाच्या पत्नीशी विवाह हराम आहे.

६१. दोघा बहिणींना एकत्र केले गेल्यास या गोष्टीची दाट शक्याता आहे की, त्या आपसात शत्रुत्व करू लागतील. आणि त्यामुळे आप्त संबंध बिघडतील. आणि म्हणून त्याला पण हराम ठरविण्यात आलेले आहे. हीच गोष्ट मावशी व भाची आणि आत्या व पुतणी यांना एकत्र करण्यामध्ये आहे आणि म्हणून हदीसमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याला मनाई केली आहे.

६२. म्हणजे ही आज्ञा उतरण्यापूर्वी जे झाले असेल ते होऊ कृन गेले. आता यापासून परत फिरा म्हणजे ज्या चुका तुम्ही करीत आला आहात सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या माफ करील.

२४. आणि त्या स्त्रीयासुद्धा हराम आहेत ज्या दुसऱ्यांच्या लग्न बंधनात असतील [६३] शिवाय त्या स्त्रीया ज्या लढाईमध्ये तुमच्या हाती आल्या असतील [६४] हा अल्लाहचा कायदा आहे ज्याचे पालन करणे तुमच्यावर बंधनकारक आहे.[६५] त्या स्त्रीयांखेरीज इतर स्त्रीया तुमच्यासाठी हलाल (वैध) आहेत, ह्या अटीवर की आपल्या धनाच्या साहाय्याने त्यांना विवाह बंधनात [६६] आणण्याचा तुमचा हेतू असेल आणि कामवासनेचा नव्हे मग ज्या स्त्रीयांपासून तुम्ही (वैवाहिक जीवनांचा) लाभ उठवाल त्यांना त्यांचा महर कर्तव्य म्हणून अदा करा. महर ठरविल्यानंतर जर आपसातील अनुमतीने (कमी अधिक करण्याचे)काही ठरल्यास त्यामध्ये काही आडकाठी नाही.[६७] नि:संशय अल्लाह सर्वज्ञ व बुद्धिमान आहे.

وَالْمُحْصَنٰتُ مِنَ النِّسَآءِ اِلَّا مَا مَلَكَتْ اَيْمَانُكُمْ كِتٰبَ
اللّٰهِ عَلَيْكُمْ وَاُحِلَّ لَكُمْ مَّا وَرَآءَ ذٰلِكُمْ اَنْ تَبْتَغُوْا بِاَمْوَالِكُمْ
مُّحْصِنِيْنَ غَيْرَ مُسٰفِحِيْنَ فَمَا اسْتَمْتَعْتُمْ بِهٖ مِنْهُنَّ فَاٰتُوْهُنَّ
اُجُوْرَهُنَّ فَرِيْضَةً وَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ فِيْمَا تَرٰضَيْتُمْ بِهٖ مِنْۢ بَعْدِ
الْفَرِيْضَةِ اِنَّ اللّٰهَ كَانَ عَلِيْمًا حَكِيْمًا ﴿٢٤﴾

२५. आणि जो माणूस तुमच्यामधील स्वतंत्र ईमानधारक स्त्रीयांबरोबर विवाह करण्याची ऐपत बाळगत नाही तो त्या दासी-स्त्रीयांपैकी एखादीशी विवाह करू शकतो ज्या तुमच्या ताब्यात आलेल्या असतील व ईमानधारक असतील अल्लाह तुमच्या ईमानची स्थिती चांगल्या प्रकारे जाणतो.[६८] तुम्ही सर्वजण ऐकच परंपरेशी संबंधित आहात. [६९] म्हणून अशा स्त्रीयांशी त्यांच्या मालकांच्या परवानगीने विवाह करा आणि चांगल्या प्रकारे त्यांचे महर त्यांना अदा करा.[७०] अलबत, हे आवश्यक आहे की त्यांना वैवाहिक बंधनात गुंतवून ठेवावे-ना त्या व्यभिचार करणाऱ्या असाव्यात ना चोरून अनुचित संबंध ठेविणाऱ्या असाव्यात. विवाहबंधनात आल्यानंतर जर त्यांनी व्यभिचार केला तर स्वतंत्र स्त्रीयांना त्याबद्दल जी शिक्षा आहे त्यांच्या निम्मी शिक्षा त्यांच्यासाठी असेल. [७१] (दासीबरोबर विवाहाची) ही परवानगी त्या लोकांच्यासाठी आहे जे गुन्हा करतील अशी शंका आहे आणि जर तुम्ही धीर धराल तर ते तुमच्यासाठी अधिक चांगले आहे.[७२] आणि अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

وَمَنْ لَّمْ يَسْتَطِعْ مِنْكُمْ طَوْلًا اَنْ يَّنْكِحَ الْمُحْصَنٰتِ الْمُؤْمِنٰتِ
فَمِنْ مَّا مَلَكَتْ اَيْمَانُكُمْ مِّنْ فَتَيٰتِكُمُ الْمُؤْمِنٰتِ وَاللّٰهُ اَعْلَمُ
بِاِيْمَانِكُمْ بَعْضُكُمْ مِّنْۢ بَعْضٍ
فَانْكِحُوْهُنَّ بِاِذْنِ اَهْلِهِنَّ وَاٰتُوْهُنَّ اُجُوْرَهُنَّ بِالْمَعْرُوْفِ مُحْصَنٰتٍ
غَيْرَ مُسٰفِحٰتٍ وَّلَا مُتَّخِذٰتِ اَخْدَانٍ فَاِذَآ اُحْصِنَّ فَاِنْ اَتَيْنَ
بِفَاحِشَةٍ فَعَلَيْهِنَّ نِصْفُ مَا عَلَى الْمُحْصَنٰتِ مِنَ الْعَذَابِ ذٰلِكَ
لِمَنْ خَشِيَ الْعَنَتَ مِنْكُمْ وَاَنْ تَصْبِرُوْا خَيْرٌ لَّكُمْ وَاللّٰهُ غَفُوْرٌ
رَّحِيْمٌ ﴿٢٥﴾

६३. जी स्त्री दुसऱ्याच्या विवाहबंधनात आहे ती हराम आहे. कारण स्त्री एका वेळेस फक्त एका पुरूषाच्याच विवाह बंधनात असू शकते. दोघादोघांच्या विवाहबंधनात ती असू शकत नाही. बहुपतीत्त्व (Polyandri) मानवी स्वभावाविरूद्ध आहे आणि म्हणून अल्लाहचा कायदा त्याला नेहमीच हराम ठरवित आला आहे. याचा रिवाज येथे आढळून येत असेल तर तो रानटी टोळ्यांमध्ये होय.त्याचप्रमाणे सध्याची निरीश्वरवादी संस्कृती ह्या पद्धतीचा स्वीकार करण्यास तयार असल्याचे आढळून येते.

६४. म्हणजे ज्या स्त्रीया लढाईमध्ये कैद होऊन हाती आलेल्या असतील आणि ज्यांचे काफिर-निरीश्वरवादी-पती शत्रू म्हणून रहात असतील तर त्या स्त्रीयां हराम नाहीत कारण अशा परिस्थितीत त्यांचा पूर्वीचा विवाह रद्द होतो.

गुलामांच्या संबंधी व दासी स्त्रीयांसंबंधी इस्लामचे जे आदेश आहेत ते समजण्यासाठी हे आवश्यक आहे की त्या वेळेच्या परिस्थितीला नजरेसमोर ठेवावे, जेव्हा हे आदेश दिले गेले. त्या काळी युद्धकैद्यांना गुलाम व बांदी बनविण्याचा रिवाज आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रचलित होता. तुरुंगाचा रिवाज फार कमी होता आणि युद्धकैद्यासाठी (War Prisoners) मोठ्या प्रमाणांत तुरूंगांची व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे फार कठीण होते. आणि म्हणून त्यांना गुलाम बनवून लोकांच्या ताब्यात दिले जात असे.अशा स्थितीत इस्लाम गुलाम बनविण्यास नव्हे तर गुलामांची सुटका करण्यास प्रोत्साहन देत होता. आणि त्याला मानव जातीची मोठी सेवा व फार मोटा सदाचार ठरवित होता; तरी पण एक आंतर्राष्ट्रीय समस्या असल्याने युद्धाकैद्यांच्या मर्यादेपर्यंत त्याने त्याला सहन केले. सर्वसाधारण आदेश हाच होता की युद्धकैद्यांना उदारपणे सोडून दिले जावे किंवा भरपाई घेऊन त्यांची सुटका केली जावी. ही गोष्ट सुरे मुहम्मद आयत नं.४ ने स्पष्ट होते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ह्यांच्या काळांत ज्या लढाया लढल्या गेल्या. त्यामधील युद्धकैद्याबरोबर सामान्यत: हाच व्यवहार केला गेला. तरीपण एक आंतर्राष्ट्रीय समस्या असल्याने तिला एकदम समाप्त केले जाऊ शकत नव्हते. आणि म्हणून इस्लामने गुलामाचे व बांदयांचे हक्क निश्चित केले आणि त्यांच्याबाबतीत आवश्यक ते आदेश दिले. या संबंधीचा एक आदेश येथे निवेदन केला गेला आहे.याचा अर्थ हा आहे की ज्या स्त्रीयां युद्धामध्ये कैद झाल्या आणि ज्यांना शासनाने कायदेशीररित्या मुसलमान व्यक्तींच्या ताब्यात दिले असेल त्यांचे पूर्वीचे विवाह, जे अनिश्वरवादी पतीबरोबर झाले असतील ते विवाह क़ायम रहात नाहीत. आणि ज्या व्यक्तिच्या ताब्यांत अशी एखादी स्त्री दिली गेली असेल त्याच्यावर ज्याप्रमाणे तिच्या पालनपोषणाची जबाबदारी येते त्याचप्रमाणे त्याला तिच्याबरोबर शरीर-संबंध ठेवण्याचा हक्क राहील. तसेच जर ती स्त्री मुसलमान झाली असेल तर त्याला हा हक्कही असेल की त्याने तिच्याबरोबर स्वत: शरीर-संबंध ठेविण्या एवजी एखाद्या गरजू मुसलमानाच्या विवाहबंधनात तिला द्यावी. आणि पुढील आयतीमधील आदेशाने हे स्पष्ट होते की कोणासही ही परवानगी नाही की त्याने गुलाम स्त्रीयांना व्यभिचाराचे किंवा कामवासनापूर्तींचे साधन बनवावे.

येथे या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही की इस्लामने युद्धकैद्यांच्या प्रश्नांत जे धोरण अंगिकारले त्याचा परिणाम हा झाला की कितीतरी लोकांनी ईमानाची दौलत लाभली आणि कितीतरी लोकांनी इस्लामी समाजात उच्च स्थान प्राप्त करून घेतले.

६५. म्हणजे कौटुंबिक जीवनासंबंधीच्या या आदेशांचा दर्जा ईश्वरी कायद्याचा (Divine Law) आहे. याचे अनिवार्य पणे पालन केले पाहिजे.त्याची निकड ही आहे की मुसलमान समाजामध्ये कुरआन्चा कौटुंबिक कायदाच लागू झाला पाहिजे. याशिवाय दुसरा कोणताही कौटुंबिक कायदा मुसलमानांच्यासाठी स्वीकारास पात्र ठरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

६६. मुळामध्ये ''एहसान'' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ हा आहे की पुरूषाने स्त्रीला आपली जीवनसखी बनविण्याच्या निर्धाराने आपल्या ताब्यात घ्यावी. आणि स्त्रीने देखील याच निर्धाराने विवाहबंधनात दाखल व्हावे. कोणत्याही स्त्रीबरोबर तात्पुरता व क्षणिक संबंध प्रस्थापित करण्याने हे उद्दिष्ट पुरे होत नाही. आणि म्हणून उल्लेखित अट लावून कुरआन्ने अज्ञानकालात प्रचलित असलेल्या ''मुतअह'' (तात्पुरता विवाह) च्या नापसंत रिवाजास कायमपणे नष्ट केले.

६७. म्हणजे पती-पत्नी आपसांतील राजी खुशीने ठरलेल्या महर मध्ये कमी-जास्त करू शकतात.

या शिकवणीमध्ये प्रचलित भरमसाठ महरच्या समस्येचे उत्तर पण उपलब्ध आहे. काही जाती-जमातीमध्ये मोठा महर ठरविणे ही एक रूढी चालत आलेली आहे. तिचा उद्देश फक्त ठरविणे हा असतो.म्हणजे घराण्याची मान ताठ राहावी. नाहीपेक्षा पतीची सांपत्तिक स्थिती सर्व साधारणपणे याची परवानगी देत नाही की त्याने चाळीस तोळे सोन्यासारख्या भारी भक्कम रकमेचा महर ठरवावा. सर्वसाधारणपणे हा महर अदा करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.परंतु महरचा मुख्य उद्देश तो अदा करणे हा आहे, फक्त ठरविणे हा नव्हे. आणि

म्हणून ज्यांचे असे रूढीचे महर ठरविले गेले आहेत आणि त्यांचे अदा करणे त्यांच्या सामर्थ्या-पलिकडचे असेल ते आपल्या भार्यांना यावर फेरविचार करण्यास सांगु शकतात आणि परस्पर अनुमतीने यामध्ये दुरुस्ती होऊ शकते.

६८. म्हणजे प्रतिष्ठा व श्रेष्ठता याचा खरा आधार ईमान हा आहे. आणि हे शक्य आहे की एखादी बांदी आपल्या ईमानाच्या आधारावर एखाद्या स्वतंत्र स्त्रीपेक्षा अधिक चांगली होऊ शकते.

६९. म्हणजे वांशिक दृष्ट्या सर्वजण एक आदम व हव्वा यांची संतती आहे. मग ते स्वतंत्र असोत वा गुलाम असोत. आणि म्हणून बांदीबरोबर विवाह करण्यास काही हरकत नाही.

७०. बांदीबरोबर विवाह केला गेल्यास महर तिलाच अदा केला जावा अशी आज्ञा दिली गेली आहे, त्यांच्या मालकांना नव्हे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास महर हा स्त्रीचा हक्क आहे. मग ती स्वतंत्र असो वा गुलाम असो यावरून हे ही स्पष्ट होते की इस्लामने गुलाम-स्त्रीयांना मालकी हक्क देऊन समाजमध्ये त्यांना किती मानाचे स्थान दिले आहे.

७१. म्हणजे विवाह बंधनात आल्यानंतर जर एखाद्या बांदीकडून व्यभिचार घडला तर स्वतंत्र स्त्रीला या गुन्ह्याबद्दल जी शंभर फटक्यांची शिक्षा आहे (सूरे नूर आयत नं.२) तिच्या निम्मी शिक्षा बांदीलाही दिली जाईल. शिक्षेमध्ये ही सवलत ह्यासाठी ठेवली गेली आहे की बांदीला ते संरक्षण प्राप्त नव्हते जे स्वतंत्र स्त्रीला प्राप्त होते.

७२. गुलाम स्त्रीयांबरोबर विवाह करण्याची परवानगी त्या लोकांच्यासाठी आहे ज्यांना ही शंका असते की त्यांनी जर विवाह केला नाही तर ते गुन्हा करून बसतील. ज्या लोकांना ही शंका नसेल त्यांनी सहनशीलता अंगिकारावी, हेच त्यांच्यासाठी अधिक चांगले आहे.

इतर मालकांच्या गुलाम स्त्रीयाबरोबर विवाह केल्यास मालकाचे हक्क व पतीचे हक्क निभावणे अत्यंत कठीण होते. आणि म्हणून अशा प्रकारच्या विवाहाला प्रोत्साहन दिले गेले नाही.

**अल्लाह इच्छितो की तुमच्यावर आपल्या आज्ञा स्पष्ट कराव्यात आणि तुम्हांला त्या लोकांच्या पद्धतीचे मार्गदर्शन करावे. जे तुमच्यापूर्वी होऊन गेले आहेत आणि तो इच्छितो की तुमच्यावर कृपा करून तुमच्याकडे लक्ष पुरवावे. अल्लाह सर्वज्ञ ही आहे आणि बुद्धिमान ही. *(अल-क़ुरआन)***

२६. अल्लाह इच्छितो की तुमच्यावर आपल्या आज्ञा स्पष्ट कराव्यात आणि तुम्हांला त्या लोकांच्या पद्धतीचे मार्गदर्शन करावे. जे तुमच्यापूर्वी होऊन गेले आहेत [७३] आणि तो इच्छितो की तुमच्यावर कृपा करून तुमच्याकडे लक्ष पुरवावे. अल्लाह सर्वज्ञ ही आहे आणि बुद्धिमान ही.

يريد الله ليبين لكم ويهديكم سنن الذين من قبلكم
ويتوب عليكم ۗ والله عليم حكيم ﴿٢٦﴾

२७. अल्लाह तर तुमच्यावर आपल्या कृपेसह लक्ष वेधू इच्छितो. परंतु जे लोक मनोविकारांच्या आहारी गेलेले आहेत ते इच्छितात की तुम्ही सरळ मार्गापासून बहकून दूर जाऊन पडावे.

والله يريد أن يتوب عليكم ويريد الذين يتبعون الشهوات
أن تميلوا ميلا عظيما ﴿٢٧﴾

२८. अल्लाह इच्छितो की तुमच्यावरील भार हलका करावा आणि (वस्तुस्थिती ही आहे की) माणूस दुर्बल निर्माण केला गेला आहे.[७४]

يريد الله أن يخفف عنكم ۚ وخلق الإنسان ضعيفا ﴿٢٨﴾

२९. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! आपसांत एकदुसऱ्याचा माल अनुचित पद्धतीने [७५] खाऊ नका. अलबत, परस्पर अनुमतीने देवघेव होऊ शकते [७६]एकदुसऱ्याची हत्या करू नका.[७७] अल्लाह तुमच्यावर फार मेहेरबान आहे.[७८]

يا أيها الذين آمنوا لا تأكلوا أموالكم بينكم بالباطل
إلا أن تكون تجارة عن تراض منكم ۚ
ولا تقتلوا أنفسكم ۚ إن الله كان بكم رحيما ﴿٢٩﴾

३०. जी व्यक्ति जुलूम जबरदस्तीने असे करील तिला आम्ही जरूर आगीमध्ये फेकून देऊ. आणि हे अल्लाहसाठी फार सोपे आहे.

ومن يفعل ذلك عدوانا وظلما فسوف نصليه نارا ۚ وكان
ذلك على الله يسيرا ﴿٣٠﴾

३१. ज्या लहानसहान गुन्ह्यापासून [७९] तुम्हांला रोखले जात आहे त्यांच्यापासून तुम्ही वाचाल तर आम्ही तुमच्या लहानमोठ्या दोषांना दूर करू. आणि तुम्हांला प्रतिष्ठित ठिकाणी दाखल करू.

إن تجتنبوا كبائر ما تنهون عنه نكفر عنكم سيئاتكم
وندخلكم مدخلا كريما ﴿٣١﴾

३२. अल्लाहने ज्याबाबतीत एकाला दुसऱ्यावर वर्चस्व प्रदान केले आहे त्याची अपेक्षा करू नका. [८०] पुरुषांसाठी त्यांच्या स्वतःच्या कमाईनुसार (फलस्वरूप) हिस्सा आहे. आणि स्त्रीयांसाठी त्यांच्या स्वतःच्या कमाईनुसार हिस्सा आहे. अलबत, अल्लाह पासून त्याच्या कृपेची याचना करा. निःसंशय, अल्लाहला प्रत्येक वस्तूचे ज्ञान आहे.

ولا تتمنوا ما فضل الله به بعضكم على بعض ۚ للرجال نصيب
مما اكتسبوا ۖ وللنساء نصيب مما اكتسبن ۚ واسألوا الله
من فضله ۗ إن الله كان بكل شيء عليما ﴿٣٢﴾

७३. अभिप्रेत, पैगंबरांच्या आणि सदाचारी लोकांच्या आचरण पद्धती आहेत. अर्थ हा की क़ुरआन कौटुंबिक जीवनासाठी त्या पदधतीचा निर्देश करतो जी नेहमी ईश्वराच्या प्रेषितांनी व सदाचरणी लोकांनी अंगिकारली. यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की ईश्वराशी द्रोह करणारे लोक वाडवडीलांच्या अनुकरणाच्या नांवावर विकृत संस्कृती व आधुनिक सुधारणेच्या नावावर मार्गभ्रष्ट करणारे सिद्धान्त किंवा आधुनिक नागरिक कायदा (Modern Civil Code)च्या नावांवर विकृत कायदे करून तुम्हांला बहकवू जाऊ इच्छितात.

७४.म्हणजे माणूस स्वभावत: अनावश्यक व अस्वाभाविक बंधनास अनुकूल नसतो. म्हणून स्वनिर्मित शास्त्रे व मनघडत प्रथांचा भार उतरवून फेकून देणे आवश्यक आहे. इस्लामी शरीअत औपचारिकपणापासून शुद्ध असे एक सरळसाधे धर्मशास्त्र आहे. त्यामध्ये माणसावर फक्त इतकाच भार टाकला गेला आहे जितका भार तो स्वभावत: पेलण्यास समर्थ असतो.

७५. खोट्या पद्धतीनी अभिप्रेत त्या सर्व पद्धती आहेत ज्यामध्ये नैतिक दोष आढळून येतो किंवा ज्यांना शरिअतने निषिद्ध ठरविले आहे.

७६. म्हणजे देवघेव एकमेकामधील खऱ्या राजीखुषीने व्हावयास हवी; ज्या देवघेवीमध्ये धोका व कपट या सारख्या गोष्टींचा समावेश आहे, ती वैध नाही. लाचलुचपतीचा पण खोट्या पद्धतीमध्ये समावेश होतो. कारण यामध्ये नैतिक दोष आढळून येतो ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये दुसऱ्याच्या असमर्थततेचा गैरफायदा उठविला जातो किंवा याद्वारे एखाद्याचा हक्क हिरावून घेतला जातो.

७७. धनप्राप्तीसाठी माणूस जेव्हा अनुचित वा गैर मार्गाचा अवलंब करतो तेव्हा त्या उद्दिष्टासाठी तो हत्या व रक्तपातही करू लागतो जणू निषिद्ध मार्गाने धनप्राप्ती करण्याचा हत्या व रक्तपात हा परिणाम आहे.

७८. आणि ही त्याची कृपाच आहे की तो तुम्हाला अशा गोष्टीपासून रोखतो ज्यामध्ये तुमच्या स्वत:चा नाश आहे.

७९. मोठ्या गुन्ह्यांनी (कबाइर) अभिप्रेत ते गुन्हे आहेत ज्यांच्या प्रतिबंधाची आज्ञा स्पष्टपणे प्रकट झालेली आहे आणि जे घडले तर त्याबद्दल सक्त शिक्षेची धमकी दिली गेली आहे. हदीसमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अनेकेश्वरवाद. प्राणहत्तया, आईवडिलांची अवज्ञा, खोटी साक्ष, व्याजखोरी, अनाथाच्या धनाचे उपहरण करणे, जिहाद मध्ये प्रतिकाराच्या वेळी पळून जाणे आणि अशाच प्रकारेचे गुन्हे मोठे गुन्हे असल्याल्याबद्दल आणि त्यापैकी काही भंयकर गुन्हे असल्याबद्दल विवरण केले आहे. परंतु याचा अर्थ हा नव्हे की मोठे गुन्हे या उल्लेख केलेल्या काही गुन्ह्यापर्यंतच मर्यादित आहेत, तर मोठ्या गुन्ह्यांचीही काही उदाहरणे आहेत आणि म्हणून हजरत इब्ने अब्बास (रजि.) यांना जेव्हा विचारले गेले की काय मोठे गुन्हे सात आहेत? तेव्हा त्यांनी फर्माविले, सातच्या मुकाबल्यात सातशे असणे अधिक संभवनीय आहे.''

(तफसीर इब्ने कसीर भा. १ पा. ४६८)

८०. सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्त्री व पुरूषामध्ये निर्मितीच्या दृष्टीने फरक ठेवलेला आहे, दोहोंमध्ये प्राकृतिक संपूर्ण सारखेपणा नाही. या आधारावर त्यांचे हक्क व कर्तव्ये यामध्येही धर्मशास्त्राने फरक केलेला आहे. आणि म्हणून पुरुषाने स्त्री बनण्याची अभिलाषा बाळगणे किंवा स्त्रीने पुरुष बनण्याची इच्छा बाळगणे आणि ह्या अभिलाषा व इच्छेपोटी एकदुसऱ्याशी सारखेपणा निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा नैसर्गिक व्यवस्थेमध्ये ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न आहे. आणि परिणामाच्या दृष्टीने अगदी निरर्थक आहे. याचप्रमाणे शरीअतीने ठरविलेले हक्क व कर्तव्ये यापासून विन्मुख होऊन संपूर्ण समतेच्या दृष्टीकोनावर दोघांचे हक्क व कर्तव्ये ठरविणे धर्मशास्त्र आणि स्वभावधर्म या दोहोंबरोबर टक्कर घेण्यासमान आहे. आणि म्हणून या दृष्टीकोनातून वाचण्याची आणि अल्लाहकडून त्याची कृपायाचना करण्याची शिकवण या आयातीमध्ये दिली गेली आहे.

३३. आम्ही आईवडील व नातलगांपैकी प्रत्येकाच्या शेष संपत्तीमध्ये वारस ठरविलेले आहेत.[८१] राहिले ते लोक ज्यांच्या बरोबर तुमचे करारमदार आहेत, तर त्यांना त्यांचा हिस्सा द्या.[८२] खात्री बाळगा अल्लाह प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवून आहे.[८३]

وَلِكُلٍّ جَعَلْنَا مَوَالِيَ مِمَّا تَرَكَ الْوَالِدَانِ وَالْأَقْرَبُونَ ۚ وَالَّذِينَ
عَقَدَتْ أَيْمَانُكُمْ فَآتُوهُمْ نَصِيبَهُمْ ۚ إِنَّ اللَّهَ كَانَ
عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ شَهِيدًا ﴿٣٣﴾

३४. पुरुष स्त्रीयांचे स्वामी (संरक्षक) [८४] आहेत. या आधारावर की अल्लाहने एकाला दुसऱ्यावर वर्चस्व प्रदान केले आहे, त्यांचबरोबर या आधारावर की पुरुष आपले धन खर्च करतात आणि म्हणून ज्या सदवर्तनी स्त्रीयां असतात त्या अज्ञाधारक असतात.[८५] आणि अल्लाहच्या संरक्षणात गुप्तगोष्टीचे संरक्षण करतात.[८६] आणि ज्या स्त्रीयांपासून तुम्हाला उद्धटपणाची शंका असेल, त्यांना समजावून सांगा. शयनगृहात त्यांना एकट्या सोडा आणि तुम्ही त्यांना मारहाण हि करू शकता.[८७] मग जर त्यांनी तुमचे आज्ञापालन केले तर त्यांच्या विरुद्ध सबब शोधू नका खात्री बाळगा अल्लाह फार उच्च व फार थोर आहे.

الرِّجَالُ قَوَّامُونَ عَلَى النِّسَاءِ بِمَا فَضَّلَ اللَّهُ بَعْضَهُمْ عَلَىٰ
بَعْضٍ وَبِمَا أَنْفَقُوا مِنْ أَمْوَالِهِمْ ۚ
فَالصَّالِحَاتُ قَانِتَاتٌ حَافِظَاتٌ لِلْغَيْبِ بِمَا حَفِظَ اللَّهُ ۚ وَاللَّاتِي
تَخَافُونَ نُشُوزَهُنَّ فَعِظُوهُنَّ وَاهْجُرُوهُنَّ فِي الْمَضَاجِعِ
وَاضْرِبُوهُنَّ ۖ فَإِنْ أَطَعْنَكُمْ فَلَا تَبْغُوا عَلَيْهِنَّ سَبِيلًا ۗ
إِنَّ اللَّهَ كَانَ عَلِيًّا كَبِيرًا ﴿٣٤﴾

३५. आणि तुम्हांला पती-पत्नीमध्ये बेबनावाची शंका असेल तर पुरुषांच्या संबंधितांपैकी एक मध्यस्थ आणि स्त्रीच्या संबंधितापैकी एक मध्यस्थ नियुक्त करा.[८८] जर दोघे समझोता घडवून आणूं इच्छितील तर अल्लाह उभयतांमध्ये (पती-पत्नी) अनुकूलता निर्माण करील. अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि प्रत्येक गोष्टीची खबर बाळगणारा आहे.

وَإِنْ خِفْتُمْ شِقَاقَ بَيْنِهِمَا فَابْعَثُوا حَكَمًا مِنْ أَهْلِهِ
وَحَكَمًا مِنْ أَهْلِهَا إِنْ يُرِيدَا إِصْلَاحًا يُوَفِّقِ اللَّهُ بَيْنَهُمَا ۗ
إِنَّ اللَّهَ كَانَ عَلِيمًا خَبِيرًا ﴿٣٥﴾

३६. आणि अल्लाहचीच इबादत (भक्ती) करा. [८९] आणि कोणत्याही गोष्टीला त्याचा सहभागी बनवूं नका. आईवडिलांबरोबर चांगली वागणूक ठेवा.[९०] त्याचप्रमाणे नातलग, अनाथ, दीनदुबळे, नातलग शेजारी व परकेशेजारी, मित्र, वाटसरू आणि तुमच्या ताब्यातील दासी व गुलामांच्या बरोबर [९३] चांगला व्यवहार करा. अल्लाह ऐट करणाऱ्या व घमेंड बाळगणाऱ्या लोकांना पसंत करीत नाही.[९४]

وَاعْبُدُوا اللَّهَ وَلَا تُشْرِكُوا بِهِ شَيْئًا ۖ وَبِالْوَالِدَيْنِ إِحْسَانًا
وَبِذِي الْقُرْبَىٰ وَالْيَتَامَىٰ وَالْمَسَاكِينِ وَالْجَارِ ذِي الْقُرْبَىٰ
وَالْجَارِ الْجُنُبِ وَالصَّاحِبِ بِالْجَنْبِ وَابْنِ السَّبِيلِ وَمَا
مَلَكَتْ أَيْمَانُكُمْ ۗ إِنَّ اللَّهَ لَا يُحِبُّ مَنْ كَانَ
مُخْتَالًا فَخُورًا ﴿٣٦﴾

८१. इशारा विभाजन व वारसाच्या त्या कायद्याकडे आहे जो आयत नं.७ मध्ये निवेदन केला गेला आहे. ही आयत या गोष्टीला आणखीन स्पष्ट करीत आहे की खरे वारस तेच आहेत जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने ठरविलेले आहेत. त्यांच्यामध्यें आपल्या इच्छेच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा फेरफार केला जाऊ नये.

८२. म्हणजे वारस तर तेच आहेत जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने ठरविलेले आहेत. राहिले ते लोक ज्यांना तुम्ही काही देण्याचा वायदा केला आहे, तर त्यांना इतके द्या जे वैध मृत्युपत्राच्या कक्षेत येते. स्पष्ट असे की अज्ञानकालात लोक एकदुसऱ्याच्या वारसामध्ये हक्दार बनण्याचा करार करीत असत. इस्लामने या पद्धतीला रद्द करून जवळच्या नातलगांना खरे वारस ठरविले. आणि वारसासंपत्तीमध्ये फक्त १/३ मर्यादेपर्यंत वारसापत्र करण्याची सवलत ठेवली.

८३. इशारा या गोष्टीकडे आहे की वारसाहक्काच्या या कायद्यापासून तुम्ही दूर झालात तर ही गोष्ट अल्लाह पासून लपून राहणार नाही.

८४. पुरुषाला सर्वश्रेष्ठ अल्लाह ने वाली (संरक्षक) चे स्थान प्रदान केले आहे. त्याचे एक कारण हे निवेदन केले गेले आहे की पुरुषाला स्त्रीवर त्याच्या स्वभाविक व नैसर्गिक रचनेनुसार (Nature and Constitution) ठळक वर्चस्व प्रदान केले गेले आहे. या आधारावर तो ही जवाबदारी पेलण्यास समर्थ आहे. तसेच पुरुष सुरक्षितता व देखरेखीचीही पात्रता बाळगतो. आणि अर्थिक धावपळीचीही, दुसरे कारण हे आहे की पत्नी व मुलाबाळांच्या पालनपोषणाची जबाबदारी पण पुरुषावर पडते. पाश्चिमात्य संस्कृती जिने स्त्री-पुरुषाच्या समान हक्काचा अतिशयोक्तीपूर्ण सिद्धांत मांडला आहे ती कुटुंबाचा व्यवस्थापक ठरविण्या बाबतीत वाईटपणे पराभूत झाली आहे. परिणाम हा की कौटुंबिक जीवन शिस्तीपासून वंचित झाले आहे. सामर्थ्य, चपळता आणि साहसाच्या दृष्टीने पुरुषाची स्त्रीयांवर श्रेष्ठता हे एक नाकारता न येणारे सत्य आहे.

"A connected result of male superiority in strength, activity and courage is the element of protection in male love, and of trust on the side of the female."(ERE Vol. VIII P. 156)

(अधिक तपशीलासाठी पहा सूरे बकरा टिप नं. ३३८)

८५. हदीसमध्ये आहे. की हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्मावले.

خير النساء امراة اذا نظرت ، اليها سرتک و اذا امرتها اطاعتک و اِذا اغبت عنها حفظتک فی نفسها و مالک۔ (تفسیر ابن کثیر بحوالہ ابن جریر)

"उत्कृष्ट स्त्री ती आहे जिला तुम्ही पाहिले की, ती तुम्हाला खुश करते. जिला तुम्ही आज्ञा केली असता ती तिचे पालन करते. आणि तुमच्या गैरहजेरीत आपल्या शीलाचे आणि तुमच्या मालमत्तेचे संरक्षण करते." (तफसीर इब्ने कसीर, कसीर इब्ने जरीर चे हवालेने.)

आयतीने या गुणाचा नकारात्मक पैलूही स्पष्ट होतो, म्हणजे आज्ञापालनाच्या विरुद्ध त्या स्त्रीयां ज्या पुरषांची अवज्ञा करणाऱ्या असतात, आणि स्त्रीच्याऐवजी पुरुष बनून राहू इच्छितात, त्या सदाचारी नव्हेत तर दुराचारी आहेत.

८६. म्हणजे सदाचारी स्त्री पुरुषाच्या गुप्तगोष्टींची संरक्षक त्याच्या घराची, त्याच्या मालमत्तेची आणि आपल्या शीलाचे संरक्षण करणारी असते.

८७. हे शिस्त लावण्याचे व सुधारणा करण्याचे अधिकार आहेत, जे पुरुषाला दिले गेले आहेत. आणि यांचा त्या स्थितीत वापर करावयाचा आहे. जेव्हा स्त्री उद्धटपणा करु लागते, स्त्रीकडून घडणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रमादाबद्दल व चुकांबद्दल कडक कारवाई करणे योग्य नाही.मारपीटीबद्दल हदीसमध्ये ही आज्ञा दिली गेली आहे की स्त्री जखमी होऊन दु:खी होईल किंवा तिच्या शरीरावर बळ राहतील अशी मारहाण असू नये.

स्त्रीला नैतिक मर्यादेत ठेवण्यासाठी आणि घराची शिस्त राखण्यासाठी पुरुषाला हे अधिकार दिले जाणे आवश्यक होते. परंतु याचा हा हेतू कदापिही नव्हता की पुरुषाने या अधिकारांचा मन मानेल त्या पद्धतीने वापर करावा. आयतीच्या शेवटी उल्लेखिलेला अल्लाहचा हा गुणविशेष की तो फार उच्च व फार थोर आहे, पुरुषाला ही जाणीव करून देण्यासाठी आहे की त्याने आपल्या वरिष्ठत्त्वाच्या घमेंडीमध्ये स्त्रीवर अत्याचार करू नये तर त्याने याचे सतत स्मरण ठेवावे की एक उच्च व महान शक्ती त्याच्यावर लक्ष ठेऊन आहे.

८८. पती-पत्नीमध्ये वाद निर्माण झाल्या येथे एक शेवटचा उपाय अंमलात आणण्याची शिकवण दिली गेली आहे. तो उपाय हा की पती-पत्नीच्या नातलग व जवळच्या लोकांमधून एक एक मध्यस्थ नियुक्त करावा. आणि त्या दोघां मध्यस्थांनी मिळून समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न करावेत. न्यायालयाच्या तुलनेमध्ये ही पद्धत अधिक योग्य आहे. कारण न्यायालयांत गेल्यावर पती-पत्नीचे प्रश्न उघड्यावर येतात. आणि ही गोष्ट योग्य नव्हे शिवाय यामुळे समेटाची शक्यताही समाप्त होते.

राहिला मध्यस्थांच्या (पंच) अधिकारांचा प्रश्न. तर 'हकम' (मध्यस्थ) चा शब्द या गोष्टीकडे इशारा करतो की त्यांना दोघांनी मिळून निर्णय करण्याचा अधिकार राहिल. हा निर्णय पती-पत्नीला एकत्र आणण्यासाठी होऊ शकतो.आणि त्यांना विभक्त करण्याचाही होऊं शकतो आणि धर्मपंडितांचे (उलेमाचे)

बहुमत यास अनुकूल आहे. (पहा तफसीर इब्ने कसीर भाग १, पा. ४९३).

८९. सामाजिक आदेशांच्या समाप्तीनंतर अल्लाहची इबादत करण्याची आणि त्याच्याबरोबर कोणासही सहभागी न ठरविण्याची शिकवण या गोष्टीकडे इशारा करते की सर्व धार्मिक आदेशांचे मूळ एकेश्वरवाद आहे. आणि माणूस इस्लामच्या सामाजिक आदेशावर योग्य प्रकारे त्याच स्थितीत आचरण करू शकतो जेव्हा तो अल्लाहची इबादत योग्य प्रकारे करीत असतो. कारण अल्लाहची इबादत जर ती जाणीवपूर्वक होत असेल तर ती माणसाला वासनेच्या मागे लागण्यापासून व भावनेच्या आहारी जाण्यापासून रोखते.

९०. परमेश्वरानंतर सर्वांत मोठा हक्क आईवडिलांचा आहे. कारण तेच पालनपोषणाचे माध्यम बनविले गेले आहेत. त्यांचा हक्क हा आहे की त्यांच्याबरोबर चांगली वागणूक ठेवावी.

९१. शेजाऱ्याबरोबर चांगली वागणूक ठेवण्याबद्दल हदीसमध्येही मोठी ताकीद दिली गेली आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले.

**مازال جبريل يوصينى بالجارحتى**

**ظننت انهٔ سيورثه۔** (بخاری، مسلم )

"जिब्रील हे मला शेजाऱ्याबरोबर चांगली वावाणूक ठेवण्याबद्दल वरचेवर ताकीद करीत राहिले. येथपावेतो की माझा विचार झाला की ते शेजाऱ्याला वारस ठरवतील."

९२. अभिप्रेत मित्र आहे. आणि अशी व्यक्तीही जिच्याशी प्रसंगोपात संबंध येतो. उदा. प्रवासातील साथीदार,व्यवसायातील भागीदार, सहाध्यायी एखाद्या बैठकीत एकत्रित येणारे वगैरे. अशा लोकांकडे लक्ष पुरविले गेले पाहिजे. त्यांना अडचण अगर त्रास होऊ देऊ नये आणि त्यांच्याबरोबर चांगली वागणूक ठेवावी.

९३. हदीसमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्पष्ट केले आहे की गुलामांच्याबरोबर कशा प्रकारचे वर्तन केले जावे.

**هم اخوانكم خولكم جعلهم الله تحت ايديكم فمن كان**

**اخوه تحت يدهٖ فليطعمه مما ياكل وليلبسه مما يلبس ولا**

**تكلفوهم مما يغلبهم فان كلفتموهم فاعينوهم۔**

(تفسیر ابن کثیر ج ا ص ۴۹۵) (بحوالہ بخاری و مسلم)

" हे तुमचे बांधव आहेत ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुच्या आधीन केले आहे. म्हणून ज्याच्या आधीन त्याचा भाऊ असेल त्याने तो स्वत: जे अन्न खातो ते त्याला द्यावे. आणि जे वस्त्र तो स्वत:वापरतो तसेच त्याला वापरावयास द्यावे. आणि हे पहा, त्यांच्यावर इतका भार टाकू नका जो त्यांच्या सहनशक्तीपलीकडे असेल आणि त्यांच्यावर कठीण भार टाकाल तर त्यांची मदत करा." (तफसीर इब्ने कसीर भाग १, पा. ४९५ हवाला बुखारी व मुस्लिम)

९४. ऐट करणे व घमेंड करणे हे सद्वर्तना विरुद्ध आहे. जे लोक अल्लाहने प्रदान केलेल्या देणग्यांना आपल्या पात्रतेचा परिणाम समजू लागतात त्यांच्यामध्ये घमेंड व अंहकार निर्माण होतो. आणि ही मनोवृत्ती त्यांना लोकांचे हक्क अदा करण्यापासून आणि त्यांच्याबरोबर चांगला व्यवहार करण्यापासून परावृत्त करते.

**त्या दिवशी ते लोक ज्यांनी इन्कार केला होता आणि पैगंबरांची अवज्ञा केली होती उत्कट इच्छा करतील की, अरेरे ! आम्ही मातीशी एकरूप झालो असतो तर बरे झाले असते !ते अल्लाहपासून कोणतीही गोष्ट लपवू शकणार नाहीत.** ***(अल-क़ुरआन)***

३७. जे स्वतः कंजूषपणा करतात आणि लोकांनाही कंजूषपणा करा, असे सांगतात आणि अल्लाहने आपल्या कृपेने त्यांना जे काही दिलेले आहे त्याला ते लपवितात. अशा कृतघ्न लोकांसाठी आम्ही दु:खदायक शिक्षा तयार करून ठेविली आहे.

الَّذِينَ يَبْخَلُونَ وَيَأْمُرُونَ النَّاسَ بِالْبُخْلِ وَيَكْتُمُونَ
مَا آتَاهُمُ اللَّهُ مِن فَضْلِهِ ۗ وَأَعْتَدْنَا لِلْكَافِرِينَ
عَذَابًا مُّهِينًا ﴿٣٧﴾

३८. जे आपले धन लोकांना दाखविण्यासाठी खर्च करतात आणि ना अल्लाहवर ईमान बाळगतात, ना शेवटच्या दिवसावर; आणि ज्यांचा सोबती शैतान असेल तर किती वाईट सोबती आहे हा !

وَالَّذِينَ يُنفِقُونَ أَمْوَالَهُمْ رِئَاءَ النَّاسِ
وَلَا يُؤْمِنُونَ بِاللَّهِ وَلَا بِالْيَوْمِ الْآخِرِ ۗ وَمَن يَكُنِ الشَّيْطَانُ
لَهُ قَرِينًا فَسَاءَ قَرِينًا ﴿٣٨﴾

३९. त्यांचे काय बिघडते जर त्यांनी अल्लाह आणि शेवटच्या दिवसांवर ईमान बाळगले असते ! आणि अल्लाहने दिलेल्या संपत्तीमधून त्यांनी खर्च केला असता ! अल्लाह त्यांना चांगल्या प्रकारे जाणतो.

وَمَاذَا عَلَيْهِمْ لَوْ آمَنُوا بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ وَأَنفَقُوا مِمَّا
رَزَقَهُمُ اللَّهُ ۚ وَكَانَ اللَّهُ بِهِمْ عَلِيمًا ﴿٣٩﴾

४०. अल्लाह कोणाचाहि यत्किंचितही हक्क हिरावून घेत नाही जर एक सत्कृत्य असेल तर त्याला तो कितीतरी पटीने अधिक करील आणि खास आपल्या जवळून फार मोठा मोबदला प्रदान करील.[९५]

إِنَّ اللَّهَ لَا يَظْلِمُ مِثْقَالَ ذَرَّةٍ ۖ وَإِن تَكُ حَسَنَةً يُضَاعِفْهَا
وَيُؤْتِ مِن لَّدُنْهُ أَجْرًا عَظِيمًا ﴿٤٠﴾

४१. त्या दिवशी (त्यांची) काय स्थिती होईल, जेव्हा आम्ही प्रत्येक समाजामधून एक साक्षीदार आणूं आणि तुम्हांला त्यांच्यावर साक्षीदार बनवून उभे करूं.[९६]

فَكَيْفَ إِذَا جِئْنَا مِن كُلِّ أُمَّةٍ بِشَهِيدٍ وَجِئْنَا بِكَ
عَلَىٰ هَٰؤُلَاءِ شَهِيدًا ﴿٤١﴾

४२. त्या दिवशी ते लोक ज्यांनी इन्कार केला होता आणि पैगंबरांची अवज्ञा केली होती उत्कट इच्छा करतील की, अरेरे ! आम्ही मातीशी एकरूप झालो असतो तर बरे झाले असते ! ते अल्लाहपासून कोणतीही गोष्ट लपवू शकणार नाहीत.

يَوْمَئِذٍ يَوَدُّ الَّذِينَ كَفَرُوا وَعَصَوُا الرَّسُولَ لَوْ تُسَوَّىٰ
بِهِمُ الْأَرْضُ وَلَا يَكْتُمُونَ اللَّهَ حَدِيثًا ﴿٤٢﴾

९५. प्रत्येक सत्कृत्याचा मोबदला त्याच्या पात्रतेपेक्षा दुप्पट मिळेल. याशिवाय सर्वश्रेष्ठ अल्लाह खास आपल्या कडून सुद्धा मोबदला प्रदान करील. ज्याला कसलीही मर्यादा नाही.

९६. हदीसमध्ये आहे की जेव्हा हज़रत अब्दुल्लाह इब्ने मसऊद (रजिअल्लाहु अन्हु) हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पवित्र क़ुरआन ऐकविताना जेव्हा या आयतीवर पोहोचले तेव्हा हिच्या तीव्र प्रभावाने पैगंबरांचे डोळे भरून आले. कारण ही आयत जशी पैगंबरांच्या श्रेष्ठत्वाचा उल्लेख करते त्याचप्रमाणे ती त्यांच्यावर एक महान जबाबदारीपण टाकते. कियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयांत प्रत्येक पैगंबरांना ही साक्ष द्यावी लागेल की त्यांनी अल्लाहची जीवनपद्धति कोणत्याही प्रकारे कमी जास्त न करता त्या लोकांच्यापर्यंत पोहचविली होती ज्यांच्याकडे त्यांना पाठविण्यात आले होते. आणि हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पण ही साक्ष द्यावी लागेल. आणि पवित्र क़ुरआन स्पष्ट करते की आपली नियुक्ती जगांतील साऱ्या लोकांच्यासाठी आहे आणि आपण शेवटचे पैगंबर आहात. म्हणून आपल्या पैगंबरीचा काल कियामतीपर्यंत आहे.

४३. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! नशेच्या स्थितीत [९७] नमाज़ाच्या जवळपास जाऊ नका-जोपर्यंत तुम्ही काय म्हणत आहात हे तुम्हाला कळत नाही.[९८] आणि अस्वच्छतेच्या (समागमा नंतरच्या) स्थितीत [९९] देखील नमाज़च्या जवळपास जाऊ नका- जो पर्यंत तुम्ही स्नान करीत नाही- अपवाद याचा की कोणी वाटसरू असेल [१००] आणि जर तुम्ही आजारी असाल किंवा प्रवासात असाल किंवा तुमच्यापैकी कोणी प्रात:विधी उरकून आला असेल किंवा तुम्ही स्त्रीयांना स्पर्श केला असेल [१०१] (संभोग केला असेल) आणि पाणी उपलब्ध नसेल तर स्वच्छ मातीचे साहाय्य घ्या. (तयम्मुम करा).त्याने आपला चेहरा हात स्वच्छ करा.[१०२] नि:संशय अल्लाह दुर्लक्ष करणारा व क्षमा करणारा आहे. [१०३]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَقْرَبُوا الصَّلَاةَ وَأَنتُمْ سُكَارَىٰ
حَتَّىٰ تَعْلَمُوا مَا تَقُولُونَ وَلَا جُنُبًا إِلَّا عَابِرِي سَبِيلٍ
حَتَّىٰ تَغْتَسِلُوا ۚ وَإِن كُنتُم مَّرْضَىٰ أَوْ عَلَىٰ سَفَرٍ أَوْ جَاءَ
أَحَدٌ مِّنكُم مِّنَ الْغَائِطِ أَوْ لَامَسْتُمُ النِّسَاءَ
فَلَمْ تَجِدُوا مَاءً فَتَيَمَّمُوا صَعِيدًا طَيِّبًا فَامْسَحُوا
بِوُجُوهِكُمْ وَأَيْدِيكُمْ ۗ إِنَّ اللَّهَ كَانَ عَفُوًّا غَفُورًا ﴿٤٣﴾

४४. तुम्ही [१०४] त्या लोकांना पाहिले नाही, ज्यांना ग्रंथाचा एक भाग [१०५] दिला गेला आहे.ते मार्गभ्रष्टता विकत घेत आहेत. आणि इच्छितात की तुम्हीपण मार्गापासून भटकावे.

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ أُوتُوا نَصِيبًا مِّنَ الْكِتَابِ يَشْتَرُونَ
الضَّلَالَةَ وَيُرِيدُونَ أَن تَضِلُّوا السَّبِيلَ ﴿٤٤﴾

४५. अल्लाह तुमच्या शत्रूंना चांगल्या प्रकारे जाणतो. आणि अल्लाह मैत्रीसाठीसुद्धा पुरेसा आहे आणि अल्लाह साहाय्यासाठी देखील पुरेसा आहे.

وَاللَّهُ أَعْلَمُ بِأَعْدَائِكُمْ ۚ وَكَفَىٰ بِاللَّهِ وَلِيًّا وَكَفَىٰ
بِاللَّهِ نَصِيرًا ﴿٤٥﴾

४६. यहुदी लोकांमध्ये काहीजण असे आहेत जे गोष्टीला तिच्या मूळ जागेपासून फिरवितात आणि इस्लामवर (दीन) व्याजोक्ति [१०६] करण्यासाठी भाषेला तोडून मोडून म्हणतात, ''समिअना व असैना'' (आम्ही ऐकले व अवज्ञा केली.) ''इस्मअ गैरा मुस्मइन'' (ऐका व ऐकू शकणार नाही.) आणि ''राअिना'' (हे आमच्या गुराख्या.) जर ते, सामिअना व अतअना'' (आम्ही ऐकले व आज्ञापालन केले.) आणि ''इस्मअ '' (ऐका) आणि उन्जुर्ना '' [१०७] (आमच्याकडे लक्ष द्या.) म्हणाले असते तर ते त्यांच्यासाठी चांगले होते. आणि गोष्टी योग्य झाली असती परंतु त्यांच्या नकारामुळे अल्लाहने त्यांची निर्भत्सना [१०८] केलेली आहे. आणि म्हणून ते थोडेच ईमान आणतात.

مِّنَ الَّذِينَ هَادُوا يُحَرِّفُونَ الْكَلِمَ عَن مَّوَاضِعِهِ
وَيَقُولُونَ سَمِعْنَا وَعَصَيْنَا وَاسْمَعْ غَيْرَ مُسْمَعٍ وَرَاعِنَا
لَيًّا بِأَلْسِنَتِهِمْ وَطَعْنًا فِي الدِّينِ ۚ وَلَوْ أَنَّهُمْ قَالُوا سَمِعْنَا
وَأَطَعْنَا وَاسْمَعْ وَانظُرْنَا لَكَانَ خَيْرًا لَّهُمْ وَأَقْوَمَ
وَلَٰكِن لَّعَنَهُمُ اللَّهُ بِكُفْرِهِمْ فَلَا يُؤْمِنُونَ إِلَّا قَلِيلًا ﴿٤٦﴾

९७. मुळ आयतीमध्ये ''सुकारा'' हा शब्द वापरण्यांत आला आहे. ज्याचा अर्थ ''नशेची स्थिती'' हा आहे. यावरुन हे स्पष्ट होते की प्रत्येक नशा आणणारी वस्तु हराम आहे. मग ती दारु असो वा एखादी घन वस्तू.

दारु निषिद्ध असल्याबद्दलची आज्ञा सूरे बकरा आयत नं. २१९ मध्ये आलेली आहे. येथे नशेच्या स्थितीत नमाजला बंदी करण्यात आली आहे.

(अधिक तपशीलासाठी पहा सूरे बकरा टिप नं. ३१६)

९८. स्पष्ट झाले की नमाजसाठी सावधानता व जागरूकता अत्यंत आवश्यक आहे.

९९. ''जनाबत'' (वीर्यस्खलन मलीनता) ने अभिप्रेत ती मलीनता आहे जी संभेगानतर किंवा स्वप्नावस्थेनंतर प्राप्त होते. या स्थितीत नमाज़ पढण्यास मनाई आहे. आणि या मलीनतेस दूर करण्याचा उपाय स्नान करणे हा आहे. आणि स्नानाचा अत्यंत साधा उपाय इस्लामने सुचविलेला आहे. की, माणसाने आपले सर्व शरीर पाण्याने धुवावे. त्यामध्ये चुळ भरणे आणि नाकात पणी घेऊन ते स्वच्छ करणे यांचाही समावेश आहे.

१००. म्हणजेच प्रवासात असताना स्नानापासून सवलत मिळू शकते, जसे या आयतीमध्ये पुढे निवेदन केले गेले आहे.

येथे हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की संभोगोत्तर मलीनतेच्या स्थितीत धार्मिक सबबीच्या आधारावर, ज्याचे उदाहरण प्रवासामध्ये पाणी न मिळणे हे आहे, स्नान केल्याशिवाय नमाज़ अदा होऊ शकते या अटीवर त्याने तयम्मुम करावे ज्याचा हुकूम याच आयतीमध्ये पुढे दिला गेला आहे.

१०१. मूळ आयतीमध्ये ''लामस्तुम'' हा शब्द वापरला गेला आहे. ज्याचा अर्थ स्पर्श करणे असा आहे. अरबी भाषे मध्ये याने संभोगाकडे इशारा होतो. (लिसानुल अरब) आणि हज़रत इब्ने अब्बास यांनी आपल्या क़ुरआनवरील भाष्यांत हेच स्पष्टीकरण केलेले आहे.

१०२. याला शरीअतच्या परिभाषेत ''तयम्मुम'' म्हणतात. आणि हा वुजू व गुस्लचा स्थायी बदल आहे. तयम्मुमची पद्धत ही आहे की स्वच्छ मातीवर हात मारून त्याला चेहऱ्यावर व दोन्ही हातावर फिरवावे. याने खऱ्या स्वच्छतेच्या पद्धतीचे स्मरण ही कायम राहते.

आजारीपणामध्ये वुजू किंवा गुस्ल केल्याने नुकसान होण्याची शक्यता असते. म्हणून ही सवलत दिली गेली की तयम्मुम केला जावा. याच प्रकारे प्रवासामध्ये असा प्रसंग येऊ शकतो की पाणी मिळत नाही. तयम्मुमची सवलत येथेही आहे.या दोन अवस्थांवरुन इतर अवस्थांचा अंदाज केला जाऊ शकतो. उदा. कडाक्याच्या थंडीमध्ये वीर्यस्खलन झालेले असेल आणि स्नान केल्याने नुकसानीची शक्यता असेल किंवा एखाद्या प्रसंगी पाणी असेल परंतु दुर्मिळतेमुळे त्याला पिण्यासाठी ठेवणे आवश्यक असेल किंवा आगगाडीतील व विमानातील प्रवास, जेथे स्नान करणे दुरापास्त असेल; अशा सर्व प्रसंगी तयम्मुमच्या सवलतीचा अवलंब केला जाऊ शकतो.

मलीनतेच्या दोन अवस्था येथे निवेदन केल्या गेल्या आहेत. एक प्रात:र्विधी व दुसरी वीर्यस्खलन. या आज्ञेमध्ये इतर लहानमोठ्या मलीनतेचाही समावेश होतो. आणि प्रत्येक प्रकारच्या मलीनतेसाठी पाणी उपलब्ध न झाल्यास तयम्मुम केले जाऊ शकते.

१०३. म्हणजे याचे हे गुण या गोष्टीची मागणी करतात की तुमच्यासाठी धार्मिक आदेशामध्ये सौम्यपणाचा अवलंब केला जावा. आणि तुम्हांला तयम्मुमची सवलत दिली जावी.

१०४. वर जे धार्मिक आदेश दिले गेले आहेत त्यांच्या संबंधी मुसलमानांना ज्या लोकांडून विरोध होत होता त्यांचा उल्लेख या आयतीमध्ये होत आहे.

१०५. मागे उतरलेल्या धार्मिक पुस्तिका आणि पवित्र क़ुरआन यांचे नाते एखादा भाग आणि संपूर्ण वस्तु यांच्या सारखे आहे. म्हणून ग्रंथधारकांना जो ग्रंथ दिला गेला होता त्याचा दर्जा ईशग्रंथाच्या एखाद्या भागासारखा होता. आणि हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जो ग्रंथ दिला गेला आहे, तो प्रत्येक दृष्टीने परिपूर्ण असा ग्रंथ आहे.

१०६. यहुदी लोक पैगंबरांच्या संबंधी जे बेअदबीचे उद्गार काढीत असत, त्याला येथे धर्मासंबंधी उपरोधीक बोलणे म्हणून संबोधिले गेले आहे. यावरून हे स्पष्ट होते की हज़रत मुहम्मद पैगंबर यांच्या बाबतीत जे बेअदबी व उपरोधीक बोलणे केले जाते तो सरळ सरळ धर्मावर हल्ला आहे.

१०७. पहा. सूरे बकरा नोट नं. १२२.

१०८. माहित झाले की पैगंबरांच्या संबंधी बेअदबीचा उद्धटपणा तेच लोक करतात जे इन्कार करणारे, द्रोही आहेत. आणि त्यांच्या इन्कार व द्रोहामुळे सर्वश्रेष्ठ अल्लाहचा त्यांच्यावर कोप झालेला आहे.

४७. ज्यांना ग्रंथ दिला गेला आहे त्या लोकांनो ! ईमान आणा, या (ग्रंथा) वर जो आम्ही उतरविला आहे जो त्या (ग्रंथा) चे सर्मथन करतो, जो तुमच्याजवळ उपलब्ध आहे यापूर्वी की आम्ही चेहऱ्यांना बिघडवून मागे वळवून टाकू [१०९] किंवा त्यांचीही अशा प्रकारे निर्भत्सना करू ज्याप्रमाणे सब्तवाल्यांची '[११०] (शनिवार न पाळणाऱ्यांची) निर्भत्सना केली होती. आणि अल्लाहची गोष्ट तर पूरी होतेच.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ اٰمِنُوْا بِمَا نَزَّلْنَا مُصَدِّقًا لِّمَا
مَعَكُمْ مِّنْ قَبْلِ اَنْ نَّطْمِسَ وُجُوْهًا فَنَرُدَّهَا عَلٰٓى اَدْبَارِهَآ
اَوْ نَلْعَنَهُمْ كَمَا لَعَنَّآ اَصْحٰبَ السَّبْتِ
وَكَانَ اَمْرُ اللّٰهِ مَفْعُوْلًا ﴿٤٧﴾

४८. अल्लाह अनेकेश्वरवादला [१११] कधीही क्षमा करणार नाही.याशिवाय इतर कोणत्याही गुन्ह्याला, ज्याच्यासाठी इच्छिल त्याला, क्षमा करील.[११२] आणि जो कोणी अल्लाहचा भागीदार ठरवितो तो फार मोठा गुन्हा करून बसतो.[११३]

اِنَّ اللّٰهَ لَا يَغْفِرُ اَنْ يُّشْرَكَ بِهٖ وَيَغْفِرُ مَا دُوْنَ ذٰلِكَ لِمَنْ
يَّشَآءُ ۚ وَمَنْ يُّشْرِكْ بِاللّٰهِ فَقَدِ افْتَرٰٓى اِثْمًا عَظِيْمًا ﴿٤٨﴾

४९. काय तुम्ही त्या लोकांना पाहिले नाही जे स्वत:ला पवित्र ठरवितात.[११४] यद्यापि पवित्र अल्लाहच ज्याला इच्छितो त्याला प्रदान करतो.आणि त्यांच्याबरोबर जरासुद्धा अन्याय केला जाणार नाही.

اَلَمْ تَرَ اِلَى الَّذِيْنَ يُزَكُّوْنَ اَنْفُسَهُمْ ۚ بَلِ اللّٰهُ يُزَكِّيْ مَنْ
يَّشَآءُ وَلَا يُظْلَمُوْنَ فَتِيْلًا ﴿٤٩﴾

५०. पहा ! हे लोक अल्लाहबद्दल कशा खोट्या गोष्टी उठवित आहेत. आणि त्यांना उघड गुन्हेगार ठरविण्याबद्दल त्यांचा हा एक गुन्हासुद्धा पुरेसा आहे.

اُنْظُرْ كَيْفَ يَفْتَرُوْنَ عَلَى اللّٰهِ الْكَذِبَ ؕ وَكَفٰى بِهٖٓ
اِثْمًا مُّبِيْنًا ﴿٥٠﴾

५१. काय तुम्ही त्या लोकांना पाहिले नाही. ज्यांना ग्रंथाचा एक भाग दिला गेला होता. हे खोट्या समजुती [११५] वाह्यांत गोष्टी (जिब्त) व सैतानावर (तागूत) [११६] विश्वास ठेवितात आणि इन्कार करणाऱ्यासंबंधी (काफिरा संबंधी) म्हणतात की हे लोक ईमान आणलेल्या लोकांपेक्षा अधिक सरळ मार्गावर आहेत. [११७]

اَلَمْ تَرَ اِلَى الَّذِيْنَ اُوْتُوْا نَصِيْبًا مِّنَ الْكِتٰبِ يُؤْمِنُوْنَ
بِالْجِبْتِ وَالطَّاغُوْتِ وَيَقُوْلُوْنَ لِلَّذِيْنَ كَفَرُوْا هٰٓؤُلَآءِ
اَهْدٰى مِنَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا سَبِيْلًا ﴿٥١﴾

५२. हे ते लोक आहेत ज्यांना अल्लाहने धुत्कारलेले आहे. आणि ज्यांना अल्लाहने धुत्कारलेले आहे, त्यांचा कोणी मदतनीस तुम्हाला आढळून येणार नाही.

اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ لَعَنَهُمُ اللّٰهُ ؕ وَمَنْ يَّلْعَنِ اللّٰهُ فَلَنْ تَجِدَ
لَهٗ نَصِيْرًا ﴿٥٢﴾

१०९. चेहरा हा शरीरचा महत्त्वाचा भाग असून तो अल्लाहच्या देणगीचे खास प्रतिक आहे. या देणगीची निकड ही आहे की माणसाने आपल्या निर्मात्याचे व उपकारकर्त्याचे कृतज्ञ व आभारी राहिले पाहिजे.परंतु जे लोक इन्काराचा मार्ग अवलंबितात ते अल्लाहच्या या महान देणगोची कदर करत नाहीत. ते डोळे असून सुद्धा सत्याला पाहतांना आंधळे होतात. आणि तोंडात जीभ असून देखील सत्य बोलण्या बाबतीत ते मुके होतात. आपली दृष्टी, वाचाशक्ती व श्रवणशक्ती यांचा गैर व उलटा वापर करतात. आणि म्हणून ते सार्थपणे या गोष्टीस पात्र होतात की त्यांचे चेहरे विद्रूप करून मागे वळविले जावेत. कियामतीच्या दिवशी त्यांना ही दु:खदायक शिक्षा भोगावी लागेल. माणसाने बुद्धिने काम घेतले तर ही कडक धमकी त्याला बेचैन करण्यास पुरेशी आहे. हज़रत काब अहबार (प्रसिद्ध यहुदी) यांनी हिच आयत ऐकून ईमान आणले होते.

११०. ''सब्त'' (शनिवार) वाल्यांचा उल्लेख सूरे बकरा आयत नं. ६५ मध्ये आलेला आहे.

१११. शिर्क-अनेकेश्वरवाद म्हणजे अल्लाहच्या व्यक्तित्वांत व त्याच्या गुणविशेषामध्ये एखाद्यास सहभागी ठरविणे मग ती वस्तू सूर्य असो वा तारे असोत; अग्नी असो किंवा साप असो; मूर्ती असो वा मानव; ईशदूत असो वा जिन (एक निर्मिती); सत्पुरुष असो वा पैगंबर, भौतिक वस्तू असो वा अध्यात्मिक वस्तू आणि देवी असो वा देवता. अल्लाहच्या व्यक्तित्वांत अनेकेश्वरवादाचे एक उदाहरण तर ते आहे. ज्याचा ईसाई लोकांनी अवलंब केलेला आहे. म्हणजे ते एकाऐवजी तीन ईश्वरांचे समर्थक आहेत. बाप, मुलगा आणि पवित्र आत्मा. आणि दुसरे उदाहरण हिंदुस्थानमधील एका फार मोठ्या धार्मिक गटाचे आहे. तो गट निर्माता व निर्मितीमध्ये फरक करीत नाही. उलट एकाच अस्तित्वचा समर्थक आहे. म्हणजे त्याच्या दृष्टीने सर्व काही परमेश्वर आहे आणि माणूसही परमेश्वराचाचा अंश आहे. या सिद्धांताला ईश्वराचे सर्व व्यापित्व म्हणतात.

अल्लाहच्या गुणविशेषामध्ये अनेकेश्वरवादाचे उदाहरण ही श्रद्धा आहे की ईश्वरी व्यवस्थेमध्ये आणि त्याच्या सार्वभौमत्वांच्या मध्ये दुसरेही सहभागी आहेत व ते पण दखल घेत असतात. उदा. कोणी पावसाचा देव आहे तर कोणी वाऱ्याचा देव आहे. किंवा कोणी रोगाची देवी आहे तर कोणी धनाची देवी आहे. याचप्रमाणे सत्पुरुष व महापुरुषांच्या बाबतीत, ही कल्पना की ते संकट निवारक व गाऱ्हाणे ऐकणारे आहेत आणि माणसांच्या गरजांची पूर्ती करणारे आहेत. उघड आहे की असे समजणे म्हणजे, अल्लाहचा हा जो गुणविशेष आहे की तो एकमेव पालनकर्ता व गरजांची पूर्ती करणारा आहे, त्यामध्ये इतरांना सहभागी ठरविणे होय. अल्लाहचा एक महान गुणविशेष हा आहे की तोच भक्तिस व उपासनेस पात्र आहे. आणि त्याचाच हा अधिकार आहे की माणसाने त्याचीच इबादत करावी. यामध्ये अनेकेश्वरवाद हा आहे की माणसाने इतरांनाही इबादतीस पात्र समजावे आणि एखाद्या देवी, देवता, मूर्ती किंवा सूर्य वगैरेंची पूजाअर्चा करावी; किंवा सत्पुरुष व प्रेषितांची पूजा कारावी. या सर्व अनेकेश्वरवादाच्या पद्धती आहेत. याशिवाय हा सुद्धा उघड उघड अनेकेश्वरवाद आहे की अल्लाहशिवाय एखाद्यास अनिर्बंधपणे आज्ञापालनास पात्र समजणे किंवा शरीअतीच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याचा एखाद्याचा हक्क मान्य करणे किंवा लोकांच्या यादाव्यास योग्य समजणे की अल्लाहचे आदेश व कायदे यांच्याकडे दुर्लक्ष करून त्यांना सर्व प्रकारचे कायदे करण्याचा अधिकार आहे.

अनेकेश्वरवाद हा या स्वभावधर्माविरूद्ध आहे, ज्यानुसार सर्वश्रेष्ठ अल्लाहने मानवाला निर्माण केले आहे. आणी हा उघड उघड त्याच्याविरूद्ध द्रोह व बंडखोरी आहे आणि म्हणून त्याला सर्वात मोठा व अक्षम्य गुन्हा (पाप) ठरविण्यात आले आहे.

येथे ही गोष्टीही समजावून घेतली पाहिजे की शिर्कच्या परिभाषे मध्ये कुफ्र (इन्कार) व नास्तिकता यांचाही समावेश आहे कारण त्यांचा अर्थही अल्लाहशी द्रोह व बंडखोरी हाच आहे आणि अल्लाहचा इन्कार करून माणूस स्वत:ला व इतरांना ईशत्त्वाच्या स्थानावर बसवितो. उघड आहे की तो अशाप्रकारे अनिवार्यपणे अनेकेश्वरवादाचा अंगिकार करतो. फरक फक्त हा आहे की अनेकेश्वरवाद धार्मिक स्वरुपात येतो आणि नास्तिकता निधर्मीपणाच्या स्वरुपात येते. आयतीच्या पार्श्वभूमी मध्ये यहुदी लोक आहेत. जे अल्लाहला मानणारे आसतांनादेखील अनेकेश्वरवादाचा अंगिकार करीत होते. आणि म्हणून येथे स्पष्ट केले गेले की अनेकेश्वरवाद हा एक अक्षम्य असा भयंकर गुन्हा आहे.

११२. म्हणजे शिर्क (अनेकेश्वरवाद) पेक्षा कमी प्रतीचे जे गुन्हे असतील त्यांच्या माफीची शक्यता आहे. परंतु जर शिर्कवर माणूस कायम राहिला आणि त्याबद्दल त्याने पश्चाताप केला नाही आणि त्या स्थितीतच त्याला मरण आले तर या गुन्ह्याबद्दल अल्लाहचा हा निर्णय आहे की तो कदापिही माफ केला जाणार नाही.

११३. म्हणजे अनेकेश्वरवाद आणि मूर्तीपूजा यांना सामान्य गुन्हे समजू नका; ते तर मोठे गुन्हे आहेत.आणि क्रियामतीच्या दिवशी अनेकेश्वरवादी आणि मूर्ती पूजयांच्या विरुद्ध ईशद्रोहाचा खटला चालविला जाईल.

११४. म्हणजे धर्माचा बुरखा ओढून स्वत:ला मोठे सद्वर्तन्‍ दर्शवितात. पण ते अनेकेश्वरवादाच्या मलीनतेने विटलेले आहेत. आणि गुन्ह्यांसंबंधी इतके धीट आहेत की मनघडत गोष्टींना

धर्माच्या नावांवर सादर करण्यास आणि त्यांचा संबंध अल्लाहशी जोडण्यात त्यांना किंचित हि लाज वाटत नाही.

स्पष्ट असो की यहुदी लोक श्रद्धा व आचरणाच्या या सर्व दोषांसह या गोष्टीचे दावेदार होते की आम्ही अल्लाहचे आवडते आहोत.

११५. मूळ उताऱ्यामध्ये ''जिब्‌त'' हा शब्द वापरला गेला आहे. याचा खरा अर्थ फायदा नसणारी गोष्ट हा आहे. येथे त्याने अभिप्रेत सर्वप्रकारच्या शकुना अपशकुनावर विश्वास, वाह्यांत गोष्टी व भूताखेताच्या गोष्टी आहेत, ज्या अनेकेश्वरवादाशी जाऊन भिडतात. उदा. जादूटोणा, करणी, रमलविद्या, मंत्रविद्या, ज्योतिषविद्या, अपशकून वगैरे. त्याचबरोबर जादूगर, ज्योतिषी, मूर्ती आणि खोटी उपास्ये यांचाही त्याच्या अर्थात समावेश होतो.

हदीसमध्ये आले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविल :-

العيافة والطرق والطيرة من الجبت ،

(مشکوٰۃ بحوالہ ابوداؤد)

''जानावरांची नावे, त्यांचे आवाज व त्यांची ये जा यावरून शकून पाहणे, खडे मारून किंवा रेषा ओढून भविष्य करणे तसेच सर्वप्रकारचे अपशकून ''जिब्त'' च्या अर्थात समावलेले आहेत'' (मिशकात -अबू दाऊद)

संशयी वृत्ती व अनेकेश्वरवाद यांचा संबंध अगदी निकटचा आहे. आणि धर्माला मानणाऱ्या लोकांनी आपापल्या धर्मामध्ये संशयी वृत्तीला व वाह्यांत गोष्टींना दाखल केले आहे. परंतु इस्लाम या बिघाडापासून शुद्ध आहे.याचा पाया वास्तवतेवर आहे. आणि त्याने संशयी वृत्तीला मूळापासून नष्ट केले आहे. हल्लीच्या मुस्लिम समाजामध्ये जी संशयी वृत्ती व ज्या वाह्यांत गोष्टी आढळून येतात त्यांचा इस्लामशी कसलाही संबंध नाही. इस्लाम त्यांचा सक्त विरोधक आहे.

११६. ''तागूत'' चा खुलासा सूरे बकरा टिप नं. ४१८ मध्ये आलेला आहे.

येथे विशेष करुन ते धार्मिक नेते अभिप्रेत आहेत जे खोट्या व विकृत श्रद्धांच्याकडे मार्गदर्शन करतात. अशा लोकांच्या अनुयायित्वाला ताग़ूतवर श्रद्धा म्हणून संबोधिल गेले आहे.

११७. यहुदी लोकांना मुसलमानांच्या बाबतील असे वैमनस्य निर्माण झाले होते की ते ऐकेश्वरवादाच्या अनुयायांच्या मुक़ाबल्यांत मूर्ती पूजकांना अधिक सत्यशील समजत असत. यद्यपि त्यांचा धार्मिक ग्रंथ तौरातने मूर्तीपूजेला उघड उघड मार्गभ्रष्टता ठरविले आहे.

११८. अभिप्रेत मुसलमान आहेत.

**ज्या लोकांनी आमच्या आयतींचा इन्कार केला त्यांना आम्ही आगीमध्ये झोकून देऊ आणि जेव्हा कधी असे होईल की त्यांच्या शरीराची त्वचा शिजून निघेल, तेव्हा आम्ही तिच्या जागी दुसरी त्वचा निर्माण करू म्हणजे ते (चांगल्या प्रकारे) शिक्षेची गोडी चाखतील. निःशसय ! अल्लाह सामर्थ्यवान व बुद्धिमान आहे.*(अल-क़ुरआन)***

५३. काय त्यांच्या ताब्यात राज्याचा एखादा भाग आला आहे? आणि असते तर त्यांनी दुसऱ्यांना [११८] तीळमात्रही दिले नसते. [११९]

أَمْ لَهُمْ نَصِيبٌ مِّنَ الْمُلْكِ فَإِذًا لَّا يُؤْتُونَ النَّاسَ
نَقِيرًا ﴿٥٣﴾

५४. किंवा मग ते लोकांचा यासाठी मत्सर करीत आहेत की अल्लाहने त्यांना आपल्या कृपेने भुषविले आहे.[१२०] जर ही गोष्ट आहे तर (आपल्या त्या गोष्टीला त्यांनी विसरू नये की) आम्ही इब्राहीमच्या खानदानाला ग्रंथ व बुद्धिमत्ता देऊन भुषविले होते. आणि मोठे राज्य प्रदान केले होते. [१२१]

أَمْ يَحْسُدُونَ النَّاسَ عَلَىٰ مَا آتَاهُمُ اللَّهُ مِن فَضْلِهِ ۖ
فَقَدْ آتَيْنَا آلَ إِبْرَاهِيمَ الْكِتَابَ وَالْحِكْمَةَ
وَآتَيْنَاهُم مُّلْكًا عَظِيمًا ﴿٥٤﴾

५५. परंतु त्यांच्यापैकी काहींनी ईमान आणले आणि अनेकांनी तोंड फिरविले. (आणि तोंड फिरविणाऱ्यासाठी ) जहन्नमची भडकत असलेली आग पुरेशी आहे.

فَمِنْهُم مَّنْ آمَنَ بِهِ وَمِنْهُم مَّن صَدَّ عَنْهُ ۚ وَكَفَىٰ بِجَهَنَّمَ
سَعِيرًا ﴿٥٥﴾

५६. ज्या लोकांनी आमच्या आयतींचा इन्कार केला त्यांना आम्ही आगीमध्ये झोकून देऊ.आणि जेव्हा कधी असे होईल की त्यांच्या शरीराची त्वचा शिजून निघेल, तेव्हा आम्ही तिच्या जागी दुसरी त्वचा निर्माण करू म्हणजे ते (चांगल्या प्रकारे) शिक्षेची गोडी चाखतील. नि:शसय ! अल्लाह सामर्थ्यवान व बुद्धिमान आहे.[१२२]

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا بِآيَاتِنَا سَوْفَ نُصْلِيهِمْ نَارًا كُلَّمَا نَضِجَتْ
جُلُودُهُم بَدَّلْنَاهُمْ جُلُودًا غَيْرَهَا لِيَذُوقُوا الْعَذَابَ ۗ
إِنَّ اللَّهَ كَانَ عَزِيزًا حَكِيمًا ﴿٥٦﴾

५७. आणि ज्या लोकांनी ईमान आणले व चांगले आचरण केले त्यांना आम्ही अशा बागांमध्ये दाखल करूं ज्यांच्या खालून जलप्रवाह वाहत असतील, तेथे ते सदैय सदैय राहतील. तेथे त्यांच्यासाठी शुद्ध भार्या असतील आणि आम्ही त्यांना दाट छायेमध्ये दाखल करूं.

وَالَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ سَنُدْخِلُهُمْ جَنَّاتٍ تَجْرِي مِن
تَحْتِهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ فِيهَا أَبَدًا ۖ لَّهُمْ فِيهَا أَزْوَاجٌ مُّطَهَّرَةٌ ۖ
وَنُدْخِلُهُمْ ظِلًّا ظَلِيلًا ﴿٥٧﴾

५८. अल्लाह तुम्हांला आज्ञा देतो की अमानतीना (ठेवींना) [१२३] त्यांच्या हक्कदारांच्या स्वाधीन करा. आणि लोकांमध्ये जेव्हा निर्णय कराल, तेव्हा न्यायाने निर्णय करा.[१२४] अल्लाह तुम्हांला अत्युत्तम गोष्टीचा उपदेश करीत आहे. नि:संशय अल्लाह सर्व काही ऐकणारा व सर्व काही जाणणारा आहे.

إِنَّ اللَّهَ يَأْمُرُكُمْ أَن تُؤَدُّوا الْأَمَانَاتِ إِلَىٰ أَهْلِهَا وَإِذَا حَكَمْتُم
بَيْنَ النَّاسِ أَن تَحْكُمُوا بِالْعَدْلِ ۚ إِنَّ اللَّهَ نِعِمَّا يَعِظُكُم بِهِ ۗ إِنَّ
اللَّهَ كَانَ سَمِيعًا بَصِيرًا ﴿٥٨﴾

११९. म्हणजे जर मदीनेमध्ये त्यांचे राज्य प्रस्थापित झाले असते तर त्यांनी आपल्या संकुचित व पक्ष:पाती दृष्टीकोनाने मुसलमानांना प्रत्येक फायद्यापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला असता. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना तशी संधी दिली नाही. आणि म्हणून मुसलमानांचे वाढते सामर्थ्य पाहून त्यांचा मनांतल्या मनांत जळफळाट होत असे. स्पष्ट असो की मदीनेच्या आसपास यहुदी लोकांच्या ज्या वस्त्या होत्या, त्यांची स्थिती स्वतंत्र कबिल्यांसारखी (टोळ्या) होती. या मर्यादेबाहेर मदीनेच्या सर्वसामान्य लोकांवर त्यांचा कसलाही अधिकार नव्हता.

१२०. म्हणजे प्रेषितत्त्व – जे त्यांच्या घराण्यांत म्हणजे बनी इस्त्राईलच्या घराण्यांत चालत आले होते ते दुसऱ्या घराण्यांत म्हणजे बनी इस्माईलच्या घराण्याकडे गेले. म्हणून ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या अनुयायांचा मत्सर करीत असत.

१२१. येथे ही गोष्ट बनी इस्त्राईल यांच्या मनावर बिंबविणे अभिप्रेत आहे की तुम्हीपण हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांची संतान आहात. आणि बनी इस्माईल हे देखील. आज जर आम्ही बनी इस्माईलना ग्रंथाने व आमच्या ज्ञानाने विभूषित करीत आहोत आणि त्यांना सत्ता प्रदान करीत आहोत,तर यामध्ये मत्सर करण्यासारखी कोणती गोष्ट आहे? ही अल्लाहची कृपा आहे. आणि तो इच्छिल त्याला आपल्या कृपेने भूषवितो. त्याचप्रमाणे तुम्ही ही गोष्ट विसरु नये की यापूर्वी अल्लाहने तुम्हांलाही आपल्या ग्रंथाने व ज्ञानाने भूषविले होते. आणि मोठे राज्यही प्रदान केले होते. (उदा. हज़रत दाऊद व हज़रत सुलैमान यांची राज्ये.) परंतु तुम्ही अल्लाहच्या या देणग्यांची कदर केली नाही. आणि आपली अपात्रता सिद्ध केली. आणि म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या या कृपेसाठी हज़रत इब्राहीम यांच्या घराण्याच्या दुसऱ्या शाखेला निवडले.

१२२. या गुणधर्माचा हवाला देण्याचा उद्देश हे स्पष्ट करणे हा आहे की एवढी कडक शिक्षा देण्यांस तो समर्थ आहे. आणि त्याच्या बुद्धिमत्तेची निकड देखील ही आहे की द्रोही लोकांना अशी कडक शिक्षा दिली जावी. अन्यथा विश्वव्यवस्था सत्यावर व न्यायावर कायम राहू शकणार नाही.

१२३. अमानतीमध्ये सर्वसाधारण अमानती देखील सामील आहेत. उदा. डिपॉझिट, अदा करावयाची कर्जे वगैरे, आणि जबाबदारीची पदे देखील. मग त्यांचा संबंध पुढारीपणाशी असो किंवा शासनाशी असो. या दुसऱ्या अर्थाचे समर्थन आयतींच्या पार्श्वभूमीवरून होते. त्याचबरोबर जबाबदारींच्या पदांसाठी ''अमानत'' हा शब्द हदीस मध्येसुद्धा वापरण्यात आला आहे. कियामत केव्हा येईल या प्रश्नाला आपण जे उत्तर दिले ते हे की,

اذا ضیعت الامانة فانتظر الساعة قال کیف اضاعتها قال اذا وسد الامرُ الی غیر اهله فانتظر الساعة۔ (بخاری)

''जेव्हा अमानतींचा अपहार होऊ लागेल तेव्हा कियामतीची प्रतीक्षा करा.'' विचारले गेले अमानतींचा अपहार म्हणजे काय?'' आपण फर्माविले, जेव्हा व्यवहार (शासन) नादान लोकांच्या हाती येतील तेव्हा कियामतीची प्रतीक्षा करा.''

माहित झाले की नेतृत्व व मार्गदर्शन आणि राजकारण व शासन यांच्या जबाबदाऱ्या अपात्र, अनीतीमान, अत्याचारी, अप्रामाणिक आणि दुराचारी व पापी लोकांवर सोपविणे म्हणजे बिघाडाला आणि भयंकर नुकसानीला आमंत्रण देण्यासारखे आहे.(मूलभूत गोष्ट तर हिच आहे. राहिला परिस्थितीने विवश होण्याचा प्रश्न,तर याचा संबंध इज्तिहादशी'' आहे.)

अमानतीचा शब्द या गोष्टीकडे इशारा करतो की या जबाबदाऱ्या म्हणजे अल्लाहने सोपविलेल्या अमानती आहेत. ज्यांच्यासंबंधी त्याच्यासमोर जाब द्यावा लागणार आहे.

१२४. इशारा सत्तेच्या जबाबदारीकडे आहे. आणि हा उपदेश केला जात आहे की अल्लाहकडून सत्ता लाभल्या नंतर तुमचे सर्वप्रथम कर्तव्य हे ठरते की लोकांच्या दरम्यान न्यायनीतीने निर्णय करा.

५९. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! अल्लाहचे आज्ञापालन करा. पैगंबराचे आज्ञापालन करा आणि त्या लोकांचे जे तुमच्यापैकी अधिकारावर आहेत.[१२५] नंतर जर तुमच्या दरम्यान एखाद्या गोष्टीमध्ये झगडा निर्माण होईल तर त्याला अल्लाह व त्याच्या पैगंबरांकडे सादर करा.[१२६]—जर तुम्ही अल्लाह व शेवटच्या दिवसावर ईमान ठेवित असाल. ही पद्धत शुभदायकही आहे आणि अधिक चांगला परिणामही घडवून आणणारी आहे.[१२७]

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْۤا اَطِيْعُوا اللّٰهَ وَاَطِيْعُوا الرَّسُوْلَ وَاُولِى
الْاَمْرِ مِنْكُمْ ۚ فَاِنْ تَنَازَعْتُمْ فِىْ شَىْءٍ فَرُدُّوْهُ اِلَى اللّٰهِ
وَالرَّسُوْلِ اِنْ كُنْتُمْ تُؤْمِنُوْنَ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ ؕ
ذٰلِكَ خَيْرٌ وَّاَحْسَنُ تَاْوِيْلًا ﴿٥٩﴾

६०. काय तुम्ही त्या लोकांना पाहिले नाही ज्यांचा दावा तर हा आहे की जो ग्रंथ तुमच्यावर उतरविला गेला आहे त्यावर आणि जो तुमच्यापूर्वी उतरविला गेला होता त्यावर सुद्धा ते ईमान बाळगतात. परंतु इच्छितात की आपले प्रश्न निर्णयासाठी ‘‘तागूत’’ कडे [१२८] (विद्रोही लोकांच्याकडे) घेऊन जावेत. यद्यापि त्यांना याचा इन्कार करण्याची आज्ञा दिली गेली होती. आणि सैतान इच्छितो की त्यांना बहकावून फार फार दूर घेऊन जावे.

اَلَمْ تَرَ اِلَى الَّذِيْنَ يَزْعُمُوْنَ اَنَّهُمْ اٰمَنُوْا بِمَاۤ اُنْزِلَ اِلَيْكَ
وَمَاۤ اُنْزِلَ مِنْ قَبْلِكَ يُرِيْدُوْنَ اَنْ يَّتَحَاكَمُوْۤا اِلَى الطَّاغُوْتِ
وَقَدْ اُمِرُوْۤا اَنْ يَّكْفُرُوْا بِهٖ ؕ وَيُرِيْدُ الشَّيْطٰنُ اَنْ
يُّضِلَّهُمْ ضَلٰلًاۢ بَعِيْدًا ﴿٦٠﴾

६१. जेव्हा त्यांना सांगितले जाते की, या, या (हुकूमा) कडे जी अल्लाहने उतरविली आहे आणि या पैगंबरांच्याकडे तर तुम्ही पहाता की ढोंगी दांभिक लोक कचरतात.[१२९]

وَاِذَا قِيْلَ لَهُمْ تَعَالَوْا اِلٰى مَاۤ اَنْزَلَ اللّٰهُ وَاِلَى الرَّسُوْلِ
رَاَيْتَ الْمُنٰفِقِيْنَ يَصُدُّوْنَ عَنْكَ صُدُوْدًا ﴿٦١﴾

६२. तेव्हा त्यांची स्थिती काय होईल जेव्हा त्यांच्या या हरकती मुळे त्यांच्यावर आपत्ती येईल? त्यावेळी ते तुमच्याजवळ अल्लाहच्या शपथा घेत येतील की आम्ही तर भलाई इच्छित होतो आणि आमचा उद्देश तर (दोघांमध्ये) अनुकूलता निर्माण करणे हा होता. [१३०]

فَكَيْفَ اِذَاۤ اَصَابَتْهُمْ مُّصِيْبَةٌۢ بِمَا قَدَّمَتْ اَيْدِيْهِمْ
ثُمَّ جَآءُوْكَ يَحْلِفُوْنَ ۖۗ بِاللّٰهِ اِنْ اَرَدْنَاۤ اِلَّاۤ اِحْسَانًا
وَّتَوْفِيْقًا ﴿٦٢﴾

६३. त्या लोकांच्या मनामध्ये जे काही आहे त्याला अल्लाह जाणत आहे. तरी त्यांच्याकडे कानाडोळा करा. आणि त्यांना उपदेश करा आणि त्यांच्या बरोबर अशी गोष्ट करा जी त्यांच्या मनामध्ये उतरेल. [१३१]

اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ يَعْلَمُ اللّٰهُ مَا فِىْ قُلُوْبِهِمْ ۗ فَاَعْرِضْ عَنْهُمْ
وَعِظْهُمْ وَقُلْ لَّهُمْ فِىْۤ اَنْفُسِهِمْ قَوْلًاۢ بَلِيْغًا ﴿٦٣﴾

१२५. ''ऊलुलअम्र'' (शासक) ने अभिप्रेत सत्ताधिकारी आहेत.(Men of Authority)मग त्यांचा संबंध शासनाच्या कोणत्याही विभागाशी असो. हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जिहादसाठी ज्या सैनिकांच्या तुकड्या रवानाकरीत असत त्यांच्यावर एखाद्यास प्रमुख बनवित असत 'मिनकुम' हा शब्द स्पष्ट करतो की येथे ते सत्ताधिकारी अभिप्रेत आहेत जे मुसलमानामधील असतील. त्यांचे आज्ञा पालन यासाठी आवश्यक आहे की इस्लामच्या सामुहिक आदेशांचे पालन व्हावे, त्याचे कायदेक़ानून लागू केले जावेत, समाजाला सदाचारी म्हणविण्यासाठी ते साहाय्य भूत ठरावेत, व एक न्यायी व्यवस्था आणि न्यायी व्यवस्थेची प्रस्थापना अंमलात यावी आणि सर्वात महत्वाची गोष्ट ही आहे की सत्य वचनाची महती वाढावी. सत्ताधिकाऱ्यांच्या आज्ञापालनाच्या संबंधात खालील गोष्टी लक्षांत ठेवणे अगत्याचे आहे.

(१) या आयतीमध्ये अल्लाह,पैगंबर व सत्ताधिकारी यांच्या आज्ञापालनाची आज्ञा दिली गेली आहे. या आज्ञेमध्ये आज्ञापालनाचा (अतीऊ) शब्द दोन ठिकाणी आहे. एक,अल्लाहबरोबर आणि दुसरा, पैगंबरांबरोबर आणि सत्ताधिकाऱ्यांबरोबर हा शब्द वापरण्यात आलेला नाही. यावरून हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की खरे आज्ञा पालन व निष्ठा अल्लाहबरोबरची आहे. आणि त्यानंतर त्याच्या पैगंबरांबरोबर राहिला सत्ताधिकाऱ्यांच्या आज्ञापालनाचा प्रश्न, तर तो या दोन आज्ञापालनाच्या तहत आहे. यापासून तो कदापिही स्वतंत्र नाही.

(२) येथे सत्ताधिकाऱ्यांच्या आज्ञापालनाचा जो हुकूम दिला गेला आहे. त्याला त्या सत्ताधिकाऱ्यांच्या बाबतीत अंमलात आणणे योग्य नाही,ज्यांनी अल्लाह व पैगंबर यांच्या आज्ञापालनाच्या जबाबदारीचा त्याग केलेला आहे. किंवा ज्यांचे कार्यच अल्लाहशी द्रोह करण्यावर लोकांना प्रवृत्त करणे हे आहे किंवा जे धर्मविरोधी शासनाचे प्रतिनिधीत्व करतात, किंवा जे स्वत: अत्याचारी शासक बनलेले आहेत.

(३) सत्ताधिकाऱ्यांच्या आज्ञापालनाचा हुकूम तोपर्यंत आहे जोपर्यंत ते अल्लाह आणि पैगंबर यांच्या आज्ञे विरूद्ध कोणता हि हुकुम देत नाहीत त्यांनी जर असा एखादा हुकूम दिला जो अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांच्या आज्ञेविरूद्ध असेल तर त्याच्या पालनाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पैगंबरांचे वचन आहे की,

لا طاعة لمخلوق في معصية الخالق-

''निर्मात्याच्या अवज्ञेमध्ये निर्मितीचे आज्ञापालन वैध नाही.''

(४) या आयतीमध्ये सत्ताधिकाऱ्यांच्या आज्ञापालनाचा जो प्रमाणित हुकूम दिला गेला आहे. त्याचा अर्थ तोच आहे जो वर स्पष्ट केला गेला आहे. यावरून हा नकारात्मक अर्थ काढणे योग्य नाही की जर मुसलमान एखाद्या गैर इस्लामी सत्तेच्या अधीन असतील तर तेथे अराजकाची स्थिती निर्माण करणे त्यांच्यासाठी उचित आहे. सांप्रतच्या राज्य व्यवस्थेमध्ये कायद्याचे राज्य असते. आणि म्हणून कायदा बनविणारे लोक कोण आहेत व कसले आहेत याचा विचार न करता कायदा जर अल्लाह आणि त्याचे पैगंबर यांच्या आज्ञेविरूद्ध नसेल किंवा इस्लमाने विहीत गोष्टींचे जे विशाल क्षेत्र ठरविलेले आहे त्याच्या मर्यादेत असेल तर अशा कायद्याचे पालन कदापिही इस्लामच्या मनिषेविरुद्ध होत नाही. याउलट परिस्थितीत, विवशता व असमर्थतेच्या मर्यादे पर्यंतच त्याला सहन केले जाऊ शकते.

१२६. अल्लाह आणि पैगंबर यांच्याकडे परतविणे म्हणजे अल्लाहच्या ग्रंथाकडे व पैगंबरांच्या पद्धतीकडे रुजू करणे होय.

वर सत्ता व अधिकार बाळगणाऱ्या लोकांच्या आज्ञापालनाचा हुकूम दिला गेला होता. येथे हा उपदेश केला जात आहे की मतभेद निर्माण झाले असतांना अल्लाहच्या ग्रंथाकडे व पैगंबरांच्या पद्धतीकडे रुजू करा. हा उपदेश दोहोंसाठी आहे. त्यांच्यासाठीही आहे ज्यांना सत्ताधिकाऱ्यांचे आज्ञा पालन करावयाचे आहे आणि त्यांच्यासाठी ही आहे जे सत्ताधिकारी आहेत. हा एक सर्वकश उपदेश आहे. याने खालील गैष्टींवर प्रकाश पडतो.

(१) मुसलमानांना सत्ताधिकाऱ्यांबरोबर मतभेद करण्याचा अधिकार आहे. आणि मतभेदाच्या परिस्थितीत निर्णयात्मक दर्जा अल्लाहचा ग्रंथ व पैगंबरांची पद्धत (किताबे सुन्नत) यांचा आहे.

(२) या हक्काची निकड ही आहे की सामान्य मुसलमानांना सत्ताधिकाऱ्यावंर टीका करण्याचे स्वतंत्र्य असावे.

(३) मतभेद मग ते मुसलमान समाजामध्ये असोत किंवा शासन व समाजामध्ये असोत किंवा खुद्द शासनधिकाऱ्यांमध्ये असोत, निर्णयासाठी कुरआन व सुन्नत यांकडे रुजू झाले पाहिजे. आणि तेथून जो निर्णय मिळेल त्याला सर्वांनी निमूटपणे मान्य केले पाहिजे.

(४) सत्याची कसोटी अल्लाहचा ग्रंथ आणि त्याच्या पैगंबरांची सुन्नत आहे. म्हणून धर्मपंडित, महापुरुष श्रेष्ठ व ज्येष्ठ लोक, धर्मशास्त्रज्ञ व कायदेतज्ञ या सर्वांच्या वचनांना याच कसोटीवर पारखले गेले पाहिजे. त्यांच्यापैकी कोणीही सत्याची कसोटी नाही की त्याचे वचन किंवा आचरण अपरिहार्यपणे योग्य असेल. किंवा शेवटच्या शब्दाचा दर्जा बाळगीत असेल.

(५) इमाम हा निष्पाप असतो अशी कल्पना,जी मुसलमानांमधील काही गटांची श्रद्धा आहे – निखालस चुकीची आहे. जर ही कल्पना खरी असती तर सर्वसामान्य मुसलमानांना त्यांच्याशी मतभेद करण्याचा हक्क दिला गेला नसता. आणि सर्वसामान्य मुसलमानामधील आपसातील मतभेदाच्या प्रसंगी

इमामकडे रुजू होण्याचा हुकूम दिला गेला असता. परंतु या आयतीने त्या दोन्ही गोष्टींचे खंडन होते. चर्चच्या निष्पापीपणासारखी कल्पना इस्लाममध्ये नाही.

(६) क़ुरआन व सुन्नत यांच्याकडे रुजू करण्याचा अर्थ हा की ज्या समस्यांमध्ये क़ुरआन व सुन्नतचे स्पष्ट आदेश उपलब्ध आहेत, त्यांचे त्याचप्रमाणे पालन केले जावे. आणि जर परिस्थितीने एखादी नवीन समस्या निर्माण केली असेल तर क़ुरआन व सुन्नत यांच्या युक्तिवादाला संबंधित समस्येमध्ये निर्णयात्मक प्रमाण म्हणून स्वीकारले गेले पाहिजे क़ुरआन व सुन्नतपासून मार्गदर्शन प्राप्त करण्याच्या या पद्धतीला 'कयास व इज्तिहाद' म्हणतात.

१२७. सर्व प्रकारच्या मतभेदामध्ये, मग त्यांचे स्वरुप धार्मिक असो किंवा राजकीय असो, क़ुरआन व सुन्नतकडे रुजू करणे ही ईमानाची स्पष्ट अशी निकड आहे. याने जगामध्ये चांगूलपणा प्राप्त होतो आणि आखिरतमध्येही त्याचे उत्कृष्ट फळ मिळते.

१२८. मूळ उताऱ्यामध्ये 'तागूत' हा शब्द वापरला गेला आहे. याचे स्पष्टीकरण यापूर्वी दिलेले आहे. (पहा. सूरे निसा नोट नं. ११६, सूरे बकरा नोट नं. ४१८ येथे तागूत' हा शब्द क़ुरआन व सुन्नत यांच्या विरूद्धार्थी वापरला गेला आहे. जसे यानंतरच्या आयतीवरुन स्पष्ट होते आणि म्हणून येथे अभिप्रेत तो सत्ताधीश वा न्यायाधीश आहे जो अल्लाह आणि पैगंबर यांचा विरोधक आहे आणि क़ुरआन व सुन्नतच्या विरुद्ध निर्णय करतो.

१२९. येथे ज्या गोष्टीला ईमानच्या विरोधी ठरविले गेले आहे ती ही आहे की माणूस क़ुरआन व सुन्नतीच्या निर्णयावर राजी नसतो आणि तागूतच्या न्यायालयांत आपला दावा यासाठी घेऊन जातो की तेथे त्याच्या पक्षांत निर्णय होईल. मग निर्णय शरीअतीच्या उलट असला तरी चालेल. स्पष्ट असो की येथे ज्या दांभिक लोकांचा उल्लेख केला गेला आहे ते ग्रंथधारकांशी संबंधित होते. ते ईमान आणल्याचे दावेदारही होते. आणि त्याचबरोबर आपले वाद पैगंबरांच्या न्यायालयांत मांडण्याऐवजी यहुदी लोकांच्या न्यायालया समोर मांडू इच्छित होते. इतिहासामध्ये काब बिन अश्रफ हे नांव येते; जो यहुदी लोकांचा सरदार होता आणि जो दाव्यांचा निकाल करीत असे. दांभिक लोक त्याच्याकडे रूजू होत. स्पष्ट आहे की त्यांची ही वागणूक ईमानाच्या विरुद्ध होती. परंतु ते ईमान व इन्कार या दोहोंची सांगड घालू इच्छित होते. येथे ही गोष्टही समजावून घेतली पाहिजे की या आयतींच्या अवतरण कालापर्यंत मदीनेच्या इस्लामी रियासतीचे क्षेत्र जादा विशाल नव्हते. आणि मदीनेच्या सभोवती यहुदी लोकांची लहान-सहान राज्ये होती याप्रकारे जणू या विभागामध्ये इस्लाम आणि तागूतची समांतर न्यायालये कार्यरत होती.

१३०. म्हणजे ज्यावेळी इस्लामविरोधी शक्तीचा जोर तुटेल आणि मुसलमानांना विजय व स्थिरता प्राप्त होईल. त्यावेळी या दांभिक लोकांचा कोणी मित्र व सहाय्यकर्ता असणार नाही. आणि म्हणून ते विवश होऊन तुमच्याकडे येतील. आणि आपल्या पूर्वीच्या वर्तणूकीबद्दल हा खुलासा करतील की आमचा उद्देश तर मुसलमानांमध्ये व यहुदी लोकांमध्ये सलोखा निर्माण करणे हा होता. आणि या आयतीच्या प्रकटीकरणानंतर काही वर्षांने हीच स्थिती निर्माण झाली.

१३१. जे लोक शत्रुत्वाच्या रोगाने पछाडलेले होते त्यांच्या इलाजाची योग्य पद्धत येथे दाखविली गेली आहे. याने आवाहन व सुधारणेचे कार्य करणाऱ्या लोकांना हे मार्गदर्शन लाभते की त्यांनी आपल्या या कार्यासाठी परिणामकारक निवेदन पद्धतीचा अंगिकार करावा आणि आवाहनाची त्यांची पद्धत (Approach) मनाला हेलावून सोडणारी असावी.

**आम्ही जो पैगंबरही पाठविला होता तो यासाठीच पाठविला की अल्लाहच्या हुकूमानुसार त्याचे आज्ञापालन व्हावे.आणि हे लोक जेव्हा आपल्या जीवा वर अत्याचार करुन बसले होते, जर ते तुमच्या सेवेत हजर झाले असते आणि जर त्यांनी अल्लाहची क्षमायाचना केली असती आणि पैगंबरांनीही त्यांना क्षमा व्हावी म्हणून प्रार्थना केली असती तर निःसंशय ह्या लोकांना अल्लाह पश्चात्ताप कबूल करणारा व कृपा करणारा आहे याची खात्री पटली असती.** ***(अल-क़ुरआन)***

६४. आम्ही जो पैगंबरही पाठविला होता तो यासाठीच पाठविला की अल्लाहच्या हुकूमानुसार त्याचे आज्ञापालन व्हावे.[१३२]आणि हे लोक जेव्हा आपल्या जीवा वर अत्याचार करुन बसले होते, जर ते तुमच्या सेवेत हजर झाले असते आणि जर त्यांनी अल्लाहची क्षमायाचना केली असती आणि पैगंबरांनीही त्यांना क्षमा व्हावी म्हणून प्रार्थना केली असती तर [१३३] नि:संशय ह्या लोकांना अल्लाह पश्चात्ताप कबूल करणारा व कृपा करणारा आहे याची खात्री पटली असती.

وَمَآ أَرْسَلْنَا مِن رَّسُولٍ إِلَّا لِيُطَاعَ بِإِذْنِ ٱللَّهِ ۚ وَلَوْ أَنَّهُمْ
إِذ ظَّلَمُوٓا۟ أَنفُسَهُمْ جَآءُوكَ فَٱسْتَغْفَرُوا۟ ٱللَّهَ وَٱسْتَغْفَرَ
لَهُمُ ٱلرَّسُولُ لَوَجَدُوا۟ ٱللَّهَ تَوَّابًا رَّحِيمًا ﴿٦٤﴾

६५. परंतु नाही. (हे पैगंबरा !) तुमच्या पालनकर्त्याची शपथ. हे लोक ईमानदार (मोमिन) होऊ शकत नाहीत जोपर्यंत हे आपल्या वादग्रस्त प्रश्नामध्ये तुम्हांला निर्णय करणारा मानत नाहीत. आणि मग जो निर्णय तुम्ही कराल त्याबद्दल आपल्या मनात देखील काही संकोच बाळगत नाहीत. याउलट त्याचा अत्यंत विनम्र भावाने स्वीकार करतात.[१३४]

فَلَا وَرَبِّكَ لَا يُؤْمِنُونَ حَتَّىٰ يُحَكِّمُوكَ فِيمَا شَجَرَ
بَيْنَهُمْ ثُمَّ لَا يَجِدُوا۟ فِىٓ أَنفُسِهِمْ
حَرَجًا مِّمَّا قَضَيْتَ وَيُسَلِّمُوا۟ تَسْلِيمًا ﴿٦٥﴾

६६. जर आम्ही त्यांना आज्ञा केली असती की स्वत:स्वत:ची हत्या करा किंवा आपल्या घरातून बाहेर निघा तर त्यांच्या पैकी काही थोडे लोक सोडून कोणीही याचे पालन केले नसते. [१३५] यद्यपि, ज्या गोष्टीचा त्यांना उपदेश केला जात आहे, जर त्यांनी त्यावर आचरण केले असते, तर ही गोष्ट त्यांच्या पक्षात चांगूलपणास आणि अधिक निर्धारास कारणीभूत ठरली असती.

وَلَوْ أَنَّا كَتَبْنَا عَلَيْهِمْ أَنِ ٱقْتُلُوٓا۟ أَنفُسَكُمْ أَوِ ٱخْرُجُوا۟
مِن دِيَٰرِكُم مَّا فَعَلُوهُ إِلَّا قَلِيلٌ مِّنْهُمْ ۖ وَلَوْ أَنَّهُمْ
فَعَلُوا۟ مَا يُوعَظُونَ بِهِۦ لَكَانَ خَيْرًا لَّهُمْ وَأَشَدَّ تَثْبِيتًا ﴿٦٦﴾

६७. आणि अशा स्थितीत आम्ही आमच्या जवळून महान मोबदला प्रदान केला असता.

وَإِذًا لَّءَاتَيْنَٰهُم مِّن لَّدُنَّآ أَجْرًا عَظِيمًا ﴿٦٧﴾

६८. आणि त्यांना सरळ मार्गावर चालविले असते.[१३६]

وَلَهَدَيْنَٰهُمْ صِرَٰطًا مُّسْتَقِيمًا ﴿٦٨﴾

६९. जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांचे आज्ञापलन करतील ते त्या लोकांच्याबरोबर असतील ज्यांना अल्लाहने आपल्या देणग्यांनी भूषविले आहे. [१३७] म्हणजे पैगंबर, सत्यनिष्ठ हुतात्मे व सदाचरणी लोक. आणि किती चांगले मित्र आहेत हे ! [१३८]

وَمَن يُطِعِ ٱللَّهَ وَٱلرَّسُولَ فَأُو۟لَٰٓئِكَ مَعَ ٱلَّذِينَ أَنْعَمَ
ٱللَّهُ عَلَيْهِم مِّنَ ٱلنَّبِيِّـۧنَ وَٱلصِّدِّيقِينَ وَٱلشُّهَدَآءِ وَٱلصَّٰلِحِينَ
وَحَسُنَ أُو۟لَٰٓئِكَ رَفِيقًا ﴿٦٩﴾

१३२. म्हणजे पैगंबर यासाठी येत नसतात की त्यांच्याशी फक्त तोंडाने निष्ठा व्यक्त करावी. आणि मग त्याचे आज्ञापालन करा अगर करू नका. याउलट पैगंबर यासाठी येत असतात की त्यांचे आज्ञापालन केले जावे. कारण ते ईश्वराकडून आदेश व कायदेकानून घेऊन येत असतात.

१३३. पैगंबरांच्या उपस्थितीत तागूतच्या न्यायालयात आपले वाद घेऊन जाणे पैगंबरांच्यासाठी त्रासदायक गोष्ट होती. आणि याने पैगंबरांच्या न्यायसनाचा उपमर्द होत होता. म्हणून या गुनह्याच्या निराकरणासाठी हे आवश्यक ठरविले गेले की त्यांनी पैगंबरांच्या सेवेत हजर होऊन आपल्या आपराधाचा स्वीकार करावा. आणि अल्लाहकडे क्षमायाचना करावी. त्याचबरोबर पैगंबरांनीही त्यांच्यासाठी क्षमायाचना करावी अशी त्यांना विनवणी करावी.

१३४. ही आयत स्पष्ट करते की पैगंबरांचे आज्ञापालन नि:संकोचपणे व निमूटपणे केले जावे ही ईमानाची स्पष्ट अशी निकड आहे. पैगंबरांच्या कोणत्याही निर्णयावर एका मुसलमानास कसल्याही प्रकारचा थोडादेखील संदेह होता कामा नये. आपल्या एकाद्या आज्ञेवर किंवा निर्णयावर तो स्वत:च्या इच्छेनुसार नाही. किंवा कालाच्या प्रवाहाशी एकरूप नाही म्हणून त्याविरूद्ध नाक मुरडणे तर दूरच राहो.

अल्लामा जस्सास लिहितात की, ''ही आयात यावर युक्तिवाद करते की जो माणूस अल्लाह किंवा त्याचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या कोणत्याही आज्ञेला रद्द करतो तो इस्लाम पासून बहिष्कृत होतो. मग त्याने संशयाच्या आधारे या आज्ञेला रद्द केले असो किंवा ही मानण्यास व तिचा स्वीकार करण्यास त्याने नकार दिलेला असो.''(अहकामुल, क़ुरआन भा. २ पा. २६०)

१३५. अल्लाहचा अधिकार आहे की त्याने आपल्या दासांना इच्छिल त्या गोष्टीची आज्ञा करावी. आणि जेव्हा या जगातील जीवन ही एक परीक्षाच आहे तर मग स्वत: स्वत:ची हत्या करण्याची किंवा घरदार सोडण्याची आज्ञा करून देखील परीक्षा घेतली जाऊ शकते. परंतु कृपाळू व दयाळू अशा परमेश्वराने माणसाला इतक्या कठीन परीक्षेत घातलेले नाही. त्याने धर्मशास्त्र सुलभ बनविले आहे. यानंतर देखील, जर लोक धर्मशास्त्रानुसार वागणार नाहीत तर ते त्याचे दुर्दैव ठरेल.

या आयतीने ही गोष्ट चांगल्या प्रकारे स्पष्ट होते की इस्लामचा मूळ आत्मा (spirit) हा आहे की अल्लाहशी एकनिष्ठतेला सर्व गोष्टींवर प्राधान्य असावे. स्वत:च्या प्राणाहूनही तिला अधिक महत्व व मोल दिले जावे. आणि तिच्यासाठी सर्व गोष्टींची आहुति दिली जावी व सर्वस्वाचा त्यागही केला जावा. आपले घरदार आणि आपला प्रिय देश यांचाही त्याग केला जावा. ज्याप्रसंगी धर्माची जी निकड असेल ती पूरी करणे हीच खरी धार्मिकता आहे.

१३६. म्हणजे त्यांनी जर दांभिकपणा सोडला असता आणि सरळभावाने पैगंबरांच्या आज्ञापालनाची पद्धत अंगिकारली असती तर त्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य व सचोटीचा मार्ग दिसला असता. आणि योग्यपद्धती आचरण्याची त्यांना सुबुद्धी झाली असती.

१३७.देणगीने अभिप्रेत श्रद्धा व मार्गदर्शनाची देणगी आहे. (पहा सूरे फ़तिहा नोट नं. १०)

१३८. परमेश्वराच्या कृपेस व देणगीस पात्र झालेले चार वर्ग आहेत. पैगंबर – सत्यनिष्ठ, हुतात्म्ये व सदाचरणी. पैगंबरांशी अभिप्रेत ते सर्व पैगंबर आहोत जे निरनिराळ्या काळांत निरनिराळ्या देशात अल्लाहकडून सत्य घेऊन आले होते. सत्यनिष्ठांनी अभिप्रेत ते लोक आहेत ज्यांच्या मध्ये सत्य व सचोटीचा गुण कमाल दर्जापर्यंत पोहोचलेला असतो. हे श्रद्धा व आचरणाच्या दृष्टीने पैगंबरांच्या नंतर पहिल्या रांगेचे लोक आहेत. हुतात्म्याने अभिप्रेत ते लोक आहोत ज्यांनी सत्याची साक्ष देण्याकामी आपल्या प्राणांचीही आहुति दिली. आणि सदाचरणी लोकांनी अभिप्रेत ते लोक आहेत. ज्यांनी ईमान आणले. आणि सदाचाराचा मार्ग पत्करला.

जन्नतीमधील समाज अशाच लोकांना बनलेला असेल. जणू मानवतेचे सारे सत्व येथे एकवटलेले असेल. अशा उत्कृष्ट लोकांचा सहवास लाभणे ही सर्वश्रेष्ठ अल्लाहची फार मोठी कृपाच आहे. सदाचारी माणूस जगामध्येसुद्धा आपल्या मैत्रीसाठी सदाचारी लोकांची निवड करतो. आणि मरणानंतर देखील तो सदाचरणी लोकांच्याच पंक्तीत सामील होऊ इच्छितो.

७०. ही मेहेरबानी अल्लाहकडून आहे आणि अल्लाहचे ज्ञान सर्वकष आहे.

ذٰلِكَ الْفَضْلُ مِنَ اللّٰهِ ۚ وَكَفٰى بِاللّٰهِ عَلِيْمًا ﴿٧٠﴾

७१. हे ईमान आणलेल्या लोकांनो ! आपली हत्यारे सांभाळा आणि जिहादसाठी निघा वेगवेगळ्या तुकड्यांच्या स्वरुपांत किंवा एकत्र होऊन.[१३९]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا خُذُوْا حِذْرَكُمْ فَانْفِرُوْا
ثُبَاتٍ اَوِ انْفِرُوْا جَمِيْعًا ﴿٧١﴾

७२. तुमच्यामध्ये कोणी असाहि आहे जो टंगळनंगळ करतो.जेव्हा तुमच्याबरोबर एखादी आपत्ती येते, तेव्हा तो म्हणतो की, अल्लाहने माझ्यावर मोठी मेहेरबानी केली की मी त्या लोकांमध्ये सामील झालो नाही.

وَاِنَّ مِنْكُمْ لَمَنْ لَّيُبَطِّئَنَّ ۚ فَاِنْ اَصَابَتْكُمْ مُّصِيْبَةٌ قَالَ
قَدْ اَنْعَمَ اللّٰهُ عَلَيَّ اِذْ لَمْ اَكُنْ مَّعَهُمْ شَهِيْدًا ﴿٧٢﴾

७३. आणि जर तुमच्यावर अल्लाहची कृपा होते तर तो असे ओरडतो की जणू तुमच्या आणि त्याच्या दरम्यान प्रेमाचा संबंधच नाही.म्हणू लागतो की, अरेरे !मी पण त्यांच्याबरोबर असतो तर मला मोठे यश प्राप्त झाले असते.[१४०]

وَلَئِنْ اَصَابَكُمْ فَضْلٌ مِّنَ اللّٰهِ لَيَقُوْلَنَّ كَاَنْ لَّمْ
تَكُنْۢ بَيْنَكُمْ وَبَيْنَهٗ مَوَدَّةٌ يّٰلَيْتَنِيْ
كُنْتُ مَعَهُمْ فَاَفُوْزَ فَوْزًا عَظِيْمًا ﴿٧٣﴾

७४. अल्लाहच्या मार्गात त्या लोकांनी लढाई केली पाहिजे. जे ऐहिक जीवनाला आखिरतच्या जीवनाच्या मोबदल्यात विक्री करतात.[१४१] आणि जो माणूस अल्लाहच्या मार्गात लढाई करील व मारला जाईल किंवा विजयी होईल, त्याला आम्ही अवश्य महान मोबदला देऊ.

فَلْيُقَاتِلْ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ الَّذِيْنَ يَشْرُوْنَ الْحَيٰوةَ الدُّنْيَا
بِالْاٰخِرَةِ ۗ وَمَنْ يُّقَاتِلْ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ فَيُقْتَلْ
اَوْ يَغْلِبْ فَسَوْفَ نُؤْتِيْهِ اَجْرًا عَظِيْمًا ﴿٧٤﴾

७५. आणि तुम्हांला काय झाले आहे की तुम्ही अल्लाहच्या मार्गात लढत नाही; जेव्हा कितीतरी असहाय पुरुष, स्त्रीया व मुले याचना करीत आहेत की हे आमच्या पालनकर्त्या ! अम्हांला या वस्तीमधून काढ, ज्यामध्ये राहणारे अत्याचारी आहेत. [१४२] आणि तुझ्याकडून आमचा कोणी पाठीराखा बनव आणि तुझ्याजवळून आमचा कोणी सहायक उभा कर.

وَمَا لَكُمْ لَا تُقَاتِلُوْنَ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ وَالْمُسْتَضْعَفِيْنَ
مِنَ الرِّجَالِ وَالنِّسَآءِ وَالْوِلْدَانِ الَّذِيْنَ يَقُوْلُوْنَ
رَبَّنَآ اَخْرِجْنَا مِنْ هٰذِهِ الْقَرْيَةِ الظَّالِمِ اَهْلُهَا ۚ
وَاجْعَلْ لَّنَا مِنْ لَّدُنْكَ وَلِيًّا ۚ وَّاجْعَلْ لَّنَا
مِنْ لَّدُنْكَ نَصِيْرًا ﴿٧٥﴾

७६. जे लोक ईमान बाळगतात ते अल्लाहच्या मार्गात लढतात. आणि जे काफिर-इन्कार करणारे आहेत ते 'तागूत'च्या (शैतानाच्या) मार्गात लढतात.[१४३] तर तुम्ही शैतानाच्या साथीदारांबरोबर लढा. खात्री बाळगा की शैतानाची चाल दुबळी असते.[१४४]

اَلَّذِيْنَ اٰمَنُوْا يُقَاتِلُوْنَ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ ۚ وَالَّذِيْنَ كَفَرُوْا
يُقَاتِلُوْنَ فِيْ سَبِيْلِ الطَّاغُوْتِ فَقَاتِلُوْٓا اَوْلِيَآءَ الشَّيْطٰنِ ۚ
اِنَّ كَيْدَ الشَّيْطٰنِ كَانَ ضَعِيْفًا ﴿٧٦﴾

१३९. त्या वेळी लढाईच्या दोन पद्धती होत्या. एक, सुसंघटित सैन्यानिशी चढाई करणे. दुसरे सैनिक तुकड्यां द्वारे शत्रूवर छापा घालणे. याला ''सरिय्या'' म्हणतात. या दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्याची शिकवण येथे दिली गेली आहे. आणि हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या दोन्ही पद्धतींचा अवलंब केला होता.

१४०. म्हणजे मुनाफिक (दांभिक) लोक मुसलमानांच्या यशाला आपले यश समजत नाहीत. म्हणून त्यांना या गोष्टीवर खेद होतो की मुसलमानांना यश लाभले आणि ते लूटीच्या मालात हिस्सेदार बनण्यापासून वंचित राहिले.

१४१. म्हणजे अल्लाहच्या मार्गात जिहादसाठी त्या लोकांना सिद्ध झाले पाहिजे जे अधिक आखिरतसाठी आपल्या ऐहिक जीवनाचे मोल देतात. असेच लोक आपल्या ईमानामध्ये निर्मळ आणि अल्लाहच्या मार्गातील लढवय्ये आहेत. राहिले ते लोक जे आखिरतच्या बदल्यात ऐहिक जीवनाच्या फायद्याला प्रिय समजतात. आणि इच्छितात की दीन-धर्मासाठी त्यांना काही त्याग करावा लागू नये जिहादचा मार्ग अशा लोकांसाठी नाही.

१४२. त्या वेळी मक्का व त्याच्या आसपासच्या भागात मुसलमान फक्त यासाठीच काफिर लोकाकांच्या जुलूमजबरदस्तीचे लक्ष्य बनले होते की त्यांनी इस्लामचा स्वीकार केलेला आहे. दुसऱ्या शब्दांत, ते मुसलमानांना धार्मिक व बौद्धिक स्वतंत्र्याचा हक्क देण्यांस तयार नव्हते. त्यांच्या अत्याचारापासून स्त्रीया व मुलेसुद्धा सुरक्षित नव्हती. पवित्र क़ुरआनने दाखविले की अशा अत्याचार पीडितांची अत्याचारी लोकांपासून सुटका करण्यासाठी लढाई करणे म्हणजे अल्लाहच्या मार्गात जिहाद करणे होय.

१४३. येथे 'तागूत' ने अभिप्रेत शैतान आहे. जसे नंतरच्या वाक्यावरून स्पष्ट होते. आणि तागूत'च्या मार्गात लढण्याने अभिप्रेत त्या खोट्या उद्दिष्ट्यांसाठी लढणे ज्यासाठी सैतान माणसाला उभारित असतो. म्हणजे अल्लाहच्या दीनशी विरोध करणे, त्याला मानणाऱ्यांच्या जोर तोडणे, अल्लाहच्या आज्ञेऐवजी माणसाचा हुकूम चालविणे. जमिनीवर सुधारणा करण्याऐवजी गोंधळ माजविणे आणि इस्लामच्याऐवजी कुफ्र (इस्लामद्रोहा) ला वर्चस्व मिळवून देण्यासाठी लढणे.

१४४. म्हणजे जे लोक शैतानाच्या बहकाव्यात येऊन इस्लाम व त्याच्या पुढाऱ्यांच्याविरुद्ध कारवाया करतात त्यांच्या या कारवाया भक्कम पायावर आधारभूत नसतात. आणि म्हणून जर सत्यावर असणारे लोक त्यांच्याविरुद्ध सज्ज झाले तर, विरोधकाचे सर्व मनसुबे धुळीस मिळतील.

७७. तुम्ही त्या लोकांना पाहिले नाही ज्यांना सांगितले गेले होते की आपल्या हातांना रोखून ठेवा आणि नमाज़ क़ायम करा आणि ज़कात द्या.[१४५] मग जेव्हा लढाई फर्ज- बंधनकारक कर्तव्य-ठरविली गेली तेव्हा त्यांच्यामधील एक गट लोकांना अशा प्रकारे भिऊ लागला जसा एखादा अल्लाहला भितो, इतकेच नव्हे तर त्यापेक्षाही अधिक.[१४६] ते म्हणतात,‘हे आमच्या पालनकर्त्या !’ तू आमच्यावर लढाईला बंधनकारक कर्तव्य का ठरविलेस? आम्हांला आणखीन थोडी सवलत का नाही दिलीस ? म्हणा. ऐहिक जीवनाचा फ़ायदा फार थोडी आहे . आणि तकवा-अल्लाहचे भय बाळगण्यासाठी आखिरतचे जीवन कितीतरी अधिक चांगले आहे. आणि तुमच्याबरोबर थोडा देखील अन्याय केला जाणार नाही. [१४७]

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ قِيلَ لَهُمْ كُفُّوا أَيْدِيَكُمْ وَأَقِيمُوا الصَّلَوٰةَ
وَآتُوا الزَّكَوٰةَ فَلَمَّا كُتِبَ عَلَيْهِمُ الْقِتَالُ إِذَا فَرِيقٌ مِّنْهُمْ
يَخْشَوْنَ النَّاسَ كَخَشْيَةِ اللَّهِ أَوْ أَشَدَّ خَشْيَةً ۚ وَقَالُوا رَبَّنَا لِمَ
كَتَبْتَ عَلَيْنَا الْقِتَالَ ۚ لَوْلَا أَخَّرْتَنَا إِلَىٰ أَجَلٍ قَرِيبٍ ۗ قُلْ
مَتَاعُ الدُّنْيَا قَلِيلٌ ۚ وَالْآخِرَةُ خَيْرٌ لِّمَنِ اتَّقَىٰ وَلَا تُظْلَمُونَ
فَتِيلًا ﴿٧٧﴾

७८. तुम्ही कोठेही असा मृत्यू तुम्हांला गाठेल- मग तुम्ही बळकट अशा किल्ल्या मध्ये का असेना.[१४८] त्यांना जर काही फायदा पोहोचतो तर म्हणतात, हे अल्लाहकडून आहे. आणि नुकसान पोहोंचते तेव्हा म्हणतात. की हे तुमच्यामुळे आहे. म्हणा. सर्वकाही अल्लाहकडून आहे. या लोकांना काय झाले आहे की कोणतीही गोष्ट समजू शकत नाहीत. [१४९]

أَيْنَ مَا تَكُونُوا يُدْرِككُّمُ الْمَوْتُ وَلَوْ كُنتُمْ فِي بُرُوجٍ
مُّشَيَّدَةٍ ۗ وَإِن تُصِبْهُمْ حَسَنَةٌ يَقُولُوا هَٰذِهِ مِنْ عِندِ اللَّهِ ۖ
وَإِن تُصِبْهُمْ سَيِّئَةٌ يَقُولُوا هَٰذِهِ مِنْ عِندِكَ ۚ قُلْ كُلٌّ
مِّنْ عِندِ اللَّهِ ۖ فَمَالِ هَٰؤُلَاءِ الْقَوْمِ لَا يَكَادُونَ يَفْقَهُونَ
حَدِيثًا ﴿٧٨﴾

७९. (वस्तुत:) तुम्हांला जो काही फायदा पोहोचतो तो अल्लाह कडूनच पोहोचतो. आणि जे नुकसान होते ते तुमच्या स्वत: मुळेच होते. [१५०] आणि (हे पैगंबर !) आम्ही तुम्हांला लोकांच्यासाठी रसूल-पैगंबर-बनवून पाठविले आहे आणि यावर अल्लाहची साक्ष पुरेशी आहे. [१५१]

مَّا أَصَابَكَ مِنْ حَسَنَةٍ فَمِنَ اللَّهِ ۖ وَمَا أَصَابَكَ مِن سَيِّئَةٍ فَمِن
نَّفْسِكَ ۚ وَأَرْسَلْنَاكَ لِلنَّاسِ رَسُولًا ۚ وَكَفَىٰ بِاللَّهِ شَهِيدًا ﴿٧٩﴾

८०. जो पैगंबरांचे आज्ञापालन करतो तो अल्लाहचे आज्ञापालन करतो [१५२] आणि जो तोंड फिरवतो त्याच्यावर आम्ही तुम्हांला पहारेकरी बनवून पाठविलेले नाही. [१५३]

مَّن يُطِعِ الرَّسُولَ فَقَدْ أَطَاعَ اللَّهَ ۖ وَمَن تَوَلَّىٰ فَمَا
أَرْسَلْنَاكَ عَلَيْهِمْ حَفِيظًا ﴿٨٠﴾

१४५. या आयतीवरून इमाम राजी यांनी हा युक्तिवाद केला आहे की नमाज़ व ज़कात यांना जिहादवर अग्रहक्क आहे. (पहा तफसीर राजी भाग ३ पान २७२) नि:संशय या दोहोंना इस्लाम धर्मामध्ये प्रामुख्य प्राप्त आहे.आणि या इबादती स्वयंसिद्ध आहेत. राहिला जिहादचा प्रश्न. त्याचे महत्व व श्रेष्ठत्व आपल्या जागी. ते कर्तव्य त्याचवेळी ठरते जेव्हा परिस्थितीची तशी निकड असते. नाहीपेक्षा प्रसंगोपात आपण जिहादसाठी तयार आहे असा इरादा बाळगणे मुसलमानांसाठी पुरेसे आहे. हेच कारण आहे की इस्लाममध्ये जिहादचे स्थान अति उच्च असून देखील त्याचा समावेश इस्लामच्या पाच आधारस्तंभामध्ये करण्यांत आलेला नाही. अलबत ही वस्तुस्थिति आहे की जेव्हा जिहाद हे मूल भूत कर्तव्य ठरविले जाते तेव्हा त्यापासून वाचण्याचा प्रयत्न करणे ईमानला संशयास्पद बनविते. कारण ही ईमानची उघड अशी निकड आहे की माणसाने दीनेइस्लामसाठी प्रभुत्व अच्छावे आणि अल्लाहसाठी आपल्या प्राणांची आहुती देण्यास तयार असावे.

१४६. म्हणजे जोपर्यंत लढाईचा हुकूम दिला गेला नव्हता, तोपर्यंत त्यासाठी मोठा उत्साह व आवेश दाखविला जात होता. परंतु जेव्हा असा हुकूम दिला गेला तेव्हा तो त्यांना फार असह्य होऊ लागला. इशारा त्या लोकांच्याकडे आहे जे आपल्या ईमानामध्ये निर्भेळ नव्हते.

१४७. म्हणजे अल्लाहच्या मार्गात जो त्याग तुम्ही कराल तो व्यर्थ जाणार नाही. त्याचा तुम्हाला पुरेपुर मोबदला मिळेल.

१४८. याचा अर्थ हा नव्हे की माणसाने उपाययोजना करू नये वा काळजी घेऊ नये. परंतु याचा अर्थ हा आहे की त्याने या भ्रमांत राहू नये की उपाययोजना त्याला मरणापासून वाचूव शकते. मरण तर आपल्या वेळेवर येईलच येईल.आणि म्हणून माणसाने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याबाबतीत टाळाटाळ करू नये.

१४९. म्हणजे जेव्हा एखाद्या अडचणीत सापडतात तेव्हा हे मुनाफिक लोक त्याला पैगंबरांच्या चुकीच्या उपाययोजनेचा परिणाम ठरवितात. यद्यपि पैगंबर कोणतेही काम अल्लाहच्या आज्ञेशिवाय करीत नसतात. आणि विश्वामध्ये अधिकार तर अल्लाहचाच चालतो. त्याच्या इच्छेशिवाय ना नफा होतो ना नुकसान.आणि म्हणून एखादे नुकसान झाल्यास त्याची जवाबदारी पैगंबरांचेवर टाकणे वस्तु:स्थिती विरोधी आहे. तसेच ते ईमानाच्या पण विरुद्ध आहे.

१५०. जरी चांगल्या व वाईट दोन्ही गोष्ट अल्लाहच्याच इच्छेने प्रत्ययास येतात तरी दोहोंमध्ये हा फरक आहे की चांगली स्थिती ही अल्लाहच्या कृपेचा परिणाम आहे. आणि वाईट स्थिती ही माणसाच्या स्वत:च्या आचरणाचा परिपाक असतो. आणि अल्लाहने बहाल केलेल्या अधिकाराचा गैर वापर केल्याने ती प्राप्त होते. आणि म्हणून वाईटाची जबाबदारी माणसाने पत्कारली पाहिजे.

१५१. इशारा या गोष्टीकडे आहे की मुनाफिक लोक जर पैगंबरांच्या प्रत्येक गोष्टीला अल्लाहकडील गोष्ट समजत नाहीत तर न समजोत. हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे पैगंबर आहेत. यासाठी अल्लाहची साक्ष पुरेशी आहे. आणि ही साक्ष अल्लाहने पवित्र कुरआन द्वारे दिली आहे. आणि हे जे फर्माविले गेले की, आम्हीच तुमहांला लोकांसाठी पैगंबर बनवून पाठविले आहे', तर याचा अर्थ हा आहे की हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे फक्त अरबांसाठी नव्हे तर साऱ्या समाजांकडे पैगंबर बनवून पाठविले गेले आहेत.

१५२. ही व अशाप्रकारच्या दुसऱ्या आयती खुलासा करतात की पैगंबरांचे आज्ञापालन बस्तुत: अल्लाहचेच आज्ञापालन आहे. कारण पैगंबर जी आज्ञा ही देतात ती अल्लाहकडूनच असते. त्याचबरोबर याने हे पण स्पष्ट होते की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे पैगंबर या नात्याने आज्ञापालन फक्त आपल्या जीवनातच नव्हे तर आपल्या देहांतानंतर सुद्धा याच प्रमाणे अभिप्रेत आहे.

आमच्यासाठी आपले ''आदेश'' जाणून घेण्याचा मार्ग म्हणजे आपली ''प्रमाणित आचरणपद्धती'' (सुन्नत) व आपली ''सत्य वचने'' (हदीस) हा आहे. त्यांचे अनुकरण म्हणजेच आपले आज्ञापालन. आणि त्यांचा इन्कार म्हणजे आपली अवज्ञा होय.

१५३. म्हणजे पैगंबरांची ही जवाबदारी नव्हे की त्यांनी लोकांना जबरदस्तीने उपदेशाच्या मार्गावर चालवावे; त्यांची जवाबदारी तर ही आहे की त्यांनी अल्लाहचा संदेश लोकांपर्यत पोहोचवावा.

८१. जे लोक (तोंडाने तर) म्हणतात की आम्ही आज्ञापालनांचा स्वीकार केलेला आहे.परंतु ते जेव्हा तुमच्याजवळून निघून जातात.तेव्हा त्यांच्यापैकी एक गट तुमच्या सांगण्याविरुद्ध रात्री सल्लामसलत करू लागतो.[१५४] अल्लाह त्यांच्या या कानगोष्टी लिहित आहे.त्यांच्या गोष्टींकडे लक्ष देऊ नका. आणि अल्लाहवर भरवसा ठेवा.कारण कार्य सिद्धीस नेण्यास अल्लाह समर्थ आहे.

وَيَقُولُونَ طَاعَةٌ فَإِذَا بَرَزُوا مِنْ عِنْدِكَ بَيَّتَ طَائِفَةٌ
مِّنْهُمْ غَيْرَ الَّذِي تَقُولُ ۖ وَاللَّهُ يَكْتُبُ مَا يُبَيِّتُونَ ۖ فَأَعْرِضْ
عَنْهُمْ وَتَوَكَّلْ عَلَى اللَّهِ ۚ وَكَفَىٰ بِاللَّهِ وَكِيلًا ﴿٨١﴾

८२. काय हे लोक कुरआनवर विचार करीत नाहीत? जर हा ग्रंथ अल्लाहशिवाय दुसऱ्या कोणाकडून असता तर त्यांना यामध्ये भरपूर परस्पर विरोधी गोष्टी आढळून आल्या असत्या. [१५५]

أَفَلَا يَتَدَبَّرُونَ الْقُرْآنَ ۚ وَلَوْ كَانَ مِنْ عِنْدِ غَيْرِ اللَّهِ
لَوَجَدُوا فِيهِ اخْتِلَافًا كَثِيرًا ﴿٨٢﴾

८३. जेव्हा त्यांच्यापर्यंत शांततेची किंवा धोक्याची एखादी बातमी पोहोचते तेव्हा हे तिला पसरवितात. जर यांनी तिला पैगंबरांच्या समोर आणि जबाबदार लोकांच्या समोर निवेदन केले असते तर त्यांच्यामधील जे लोक गोष्टींची शहानिशा करतात त्यांनी तिचे स्वरूप काय हे जाणून घेतले असते.[१५६] आणि जर तुमच्यावर अल्लाहची मेहेरबानी आणि त्याची कृपा झाली नसती तर काहीजणाशिवाय तुम्ही सर्वजण शैतानाच्या मागे गेला असता.

وَإِذَا جَاءَهُمْ أَمْرٌ مِّنَ الْأَمْنِ أَوِ الْخَوْفِ أَذَاعُوا بِهِ ۖ
وَلَوْ رَدُّوهُ إِلَى الرَّسُولِ
وَإِلَىٰ أُولِي الْأَمْرِ مِنْهُمْ لَعَلِمَهُ الَّذِينَ يَسْتَنْبِطُونَهُ مِنْهُمْ ۗ وَلَوْلَا
فَضْلُ اللَّهِ عَلَيْكُمْ وَرَحْمَتُهُ لَاتَّبَعْتُمُ الشَّيْطَانَ إِلَّا قَلِيلًا ﴿٨٣﴾

८४. आणि म्हणून (हे पैगंबर !) अल्लाहच्या मार्गात लढाई करा. तुमच्यावर तुमच्या स्वत: शिवाय दुसऱ्या कोणाचीही जबाबदारी नाही. आणि मोमिनांना-श्रद्धाधारकांना- (लढाईचे) प्रोत्साहन द्या. नवल नाही की अल्लाह काफिरांचा जोर तोडून टाकील. अल्लाह मोठा शक्तिशाली आहे. आणि शिक्षा देण्या बाबतही मोठा कडक आहे.

فَقَاتِلْ فِي سَبِيلِ اللَّهِ لَا تُكَلَّفُ إِلَّا نَفْسَكَ ۚ وَحَرِّضِ
الْمُؤْمِنِينَ ۖ عَسَى اللَّهُ أَنْ يَكُفَّ بَأْسَ الَّذِينَ كَفَرُوا ۚ وَاللَّهُ أَشَدُّ
بَأْسًا وَأَشَدُّ تَنْكِيلًا ﴿٨٤﴾

८५. जो चांगल्या गोष्टीची शिफारस करील तो त्यामधून हिस्सा पावेल. आणि जो वाईटाची शिफारस करील तो त्यामधून हिस्सा पावेल. [१५७] अल्लाहचे प्रत्येक गोष्टीवर लक्ष आहे.

مَنْ يَشْفَعْ شَفَاعَةً حَسَنَةً يَكُنْ لَهُ نَصِيبٌ مِّنْهَا ۖ وَمَنْ يَشْفَعْ
شَفَاعَةً سَيِّئَةً يَكُنْ لَهُ كِفْلٌ مِّنْهَا ۗ وَكَانَ اللَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ
مُّقِيتًا ﴿٨٥﴾

८६. आणि जेव्हा कोणी तुम्हांला शुभचिंतनासह सलाम (अभिवादन) करील तर तुम्हीपण उतरादाखल चांगले वचन म्हणा. किंवा कमीतकमी त्या वचनाचा पुनरुच्चार करा.[१५८]अल्लाह प्रत्येक गोष्टीचा हिशेब घेणार आहे.

وَإِذَا حُيِّيتُمْ بِتَحِيَّةٍ فَحَيُّوا بِأَحْسَنَ مِنْهَا أَوْ رُدُّوهَا ۗ إِنَّ اللَّهَ
كَانَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ حَسِيبًا ﴿٨٦﴾

१५४. मुनाफिक लोकांमध्ये काही असे पण होते जे मदीनेमध्ये रात्री बैठकी घेऊन इसलाम व पैगंबरांच्याविरुद्ध गुप्त सल्लामसलती करीत असत. हेतु हा की इस्लामच्या मार्गात अडचणी निर्माण केल्या जाव्यात व पैगंबरांना नुकसान पोहचवावे.

१५५. या आयतीमध्ये पवित्र क़ुरआनवर गंभीरपणे विचार करण्याचे आवाहन केले गेले आहे. त्यावरुन खालील गोष्टींवर प्रकाश पडतो.

(१) गंभीरपणे विचार करण्याचे हे आवाहन सर्वांसाठी आहे. आणि म्हणून त्या लोकांनाही पवित्र क़ुरआनवर चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे जे मोमिन नाहीत. कारण त्यांच्यावर ही गोष्ट स्पष्ट व्हावी की क़ुरआनचा विषय जरी अति विशाल म्हणजे मानवी जीवनासाठी संपूर्ण मार्गदर्शन हा आहे तरी त्याचा मजकूर परस्पराशी संबंधित आहे व त्याची शिकवण सुसंगत आहे. हा त्या गोष्टीचा पूर्ण पुरावा आहे की पवित्र क़ुरआन हा अल्लाहचा ग्रंथ आहे. जर हा मानवी ग्रंथ असता तर, अशा विशाल विषयावर ज्याचा संबंध फक्त निरीक्षणास येणाऱ्या गोष्टीशीच नव्हे तर अदृश्य अशा वास्तव्याशीही आहे; आणि जो माणसाचा स्वभाव त्याचे मानसशास्त्र, त्याचा प्रारंभ व त्याचा शेवट आणि त्याच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांचा ऊहापोह करतो; हे शक्य नाही की यामध्ये विसंगती न आढळून येती. कारण माणसाचे ज्ञान मर्यादित आहे. आणि म्हणून तो ना सृष्टीच्या रहस्यावरून पडदा हटवू शकतो ना आशी शिकवण देऊ शकतो जी माणसाला योग्यप्रकारे जीवन कंठण्यास आणि त्याच्या निर्मात्याशी योग्य संबंध प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक आहे.

(२) क़ुरआनवर चिंतन करीत राहील्याने ज्ञानाची दारे उघडतात आणि ईमान व विशवासामध्ये वाढ होते.

(३) ही गोष्ट खरी नाही की पवित्र क़ुरआन ही फक्त विद्‌वानांनी समाजावयाची गोष्ट आहे. ती तर प्रत्येकाने समजून घ्यावयाची गोष्ट आहे. जर हा ग्रंथ फक्त विदवानांसाठी खास असता तर त्याच्यावर विचार करण्यांचे खुले आवाहन दिले गेले नसते.

(४) क़ुरआनच्या सर्व गोष्टी परस्पराशी सुसंगंत सुसंघटित आहेत. आणि म्हणून कोणत्याही आयतीचा दुसऱ्या आयतींशी विसंगत असा अर्थ काढणे योग्य नाही.

(५) पवित्र क़ुरआनला अल्लाहचा ग्रंथ मानणे आणि त्याच्या शिकवणीवर आक्षेप घेणे हा उघडउघड वैचारिक विरोध आहे. आणि हा पवित्र क़ुरआनवर चिंतन न करण्याचा परिणाम आहे.

१५६. त्यावेळी मदीनेमध्ये युद्धाची परिस्थिती होती. अशा परिस्थितीत अफवा मोठ्या धोकादायक सिद्ध होतात. परंतु मुनाफिक लोक मुसलमानांना धोका पोहचविण्यासाठी अफवा पसरविण्यामध्ये मोठे तत्पर असत. आणि म्हणून त्यांच्या या हरकतीवर त्यांची पकड केली गेली आहे.

याने तत्वत: ही शिकवण मिळते की इस्लामी समाजाच्या राजकीय जीवनावर परिणाम करणाऱ्या बातम्यांना लोकांमध्ये पसरविण्या ऐवजी त्या जबाबदार लोकांच्या कानी घातल्या जाव्यात. म्हणजे खरी स्थिती काय आहे याची ते शहानिशा करतील. त्याचप्रमाणे यावरून ही गोष्ट ही निघते की जबाबदारीच्या पदावर फक्त तेच लोक योग्य होऊ शकतात ज्यांच्यामध्ये समज, व्यवहारज्ञान व विचार करण्याची शक्ती असते.

१५७. म्हणजे जे लोक सत्याचे साहय्य व समर्थन करतील त्यांना त्याचा मोबदला मिळेल. आणि जे त्याला विरोध करतील त्यांना त्याची शिक्षा भोगावी लागेल.

१५८. दांभिक लोकांची उपेक्षा करण्याचा जो उपदेश आयत नं. ८१ मध्ये दिला गेला आहे. त्याचा अर्थ हा नव्हे की मुसलमानांनी त्यांच्याशी चांगला व्यवहार करू नये आणि त्यांच्या सुधारणेचा प्रयत्न करू नये. येथे याच संबंधात उपदेश केला जात आहे की जो माणूस स्वत: मुसलमान असल्याचे जाहीर करतो आणि तुम्हांला सलाम करतो त्याच्याकडे दुर्लक्ष करू नका. त्याच्या सलामाचे उत्तर अधिक चांगल्या पद्धतीने द्या किंवा कमीतकमी त्याच शब्दाचा पुनरूच्चार करा.

इस्लामी संस्कृतीचा एक महत्वाचा घटक हा आहे की जेव्हा मुसलमान आपसात भेटतील तेव्हा एका मुसलमानाने दुसऱ्या मुसलमानास 'अस्सलामु अलैकुम' (तुम्हांला शांतता लाभो) या आशिर्वादपर वचनांनी अभिवादन करावे आणि त्याच्या उत्तरदाखल दुसऱ्या मुसलमानाने 'वअलैकुमुस्सलाम' (तुम्हांलाही शांती लाभो.) म्हणावे. अभिवादनाची ही कमीतकमी वचने आहेत. आणि याशिवाय 'व रहमतुल्लाहि व बरकातुह' (आणि तुमच्यावर अल्लाहची कृपा व मेहेरबानी होवो.) हे शब्द वाढविळे तर उत्तमच आहे. हदीस मध्ये हे शब्द आले आहेत.

८७. अल्लाह ज्याच्याशिवाय कोणी ईश नाही, कियामतीच्या दिवशी--ज्याच्या येण्यामध्ये कसलीही शंका नाही-अवश्य तुम्हांला एकत्र करील. आणि असा कोण आहे ज्याचे वचन अल्लाहच्या वचनापेक्षा अधिक खरे होऊ शकते?

اللَّهُ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۚ لَيَجْمَعَنَّكُمْ إِلَىٰ يَوْمِ الْقِيَامَةِ لَا رَيْبَ فِيهِ ۗ
وَمَنْ أَصْدَقُ مِنَ اللَّهِ حَدِيثًا ﴿٨٧﴾

८८. ही काय गोष्ट आहे की तुम्ही दांभिक लोकांच्या बाबतीत दोन गट बनला आहात.[१५९]यद्यापि अल्लाहने त्यांना त्यांच्या दुष्कर्मांमुळे परत फिरविले आहे.[१६०] काय तुम्ही अशा लोकांचे मार्गदर्शन करू इच्छिता ज्यांना अल्लाहने मार्गभ्रष्ट केले आहे? (लक्षात ठेवा)अल्लाह ज्याला बहकवितो त्याच्यासाठी तुम्ही एखादा मार्ग काढू शकत नाही.

فَمَا لَكُمْ فِي الْمُنَافِقِينَ فِئَتَيْنِ وَاللَّهُ أَرْكَسَهُمْ بِمَا كَسَبُوا ۚ
أَتُرِيدُونَ أَنْ تَهْدُوا مَنْ أَضَلَّ اللَّهُ ۖ وَمَنْ يُضْلِلِ اللَّهُ
فَلَنْ تَجِدَ لَهُ سَبِيلًا ﴿٨٨﴾

८९. ते तर इच्छितात की ज्याप्रमाणे ते काफिर झालेले आहेत त्याचप्रमाणे तुम्हीपण काफिर व्हावे.[१६१] म्हणजे तुम्ही सर्वजण सारखे व्हाल. म्हणून तुम्ही त्यांच्यापैकी कोणासही तोपर्यंत आपला मित्र बनवू नका जोपर्यंत तो अल्लाहच्या मार्गात हिजरत (देशत्याग) करीत नाही.[१६२] आणि जर त्यांनी याची उपेक्षा केली तर त्यांना जेथे मिळतील तेथे पकडा व त्यांची हत्या करा.[१६३] आणि त्यांच्यापैकी कोणास आपला मित्र व मदतनीस बनवू नका.

وَدُّوا لَوْ تَكْفُرُونَ كَمَا كَفَرُوا فَتَكُونُونَ سَوَاءً ۖ فَلَا
تَتَّخِذُوا مِنْهُمْ أَوْلِيَاءَ حَتَّىٰ يُهَاجِرُوا فِي سَبِيلِ اللَّهِ ۚ فَإِنْ
تَوَلَّوْا فَخُذُوهُمْ وَاقْتُلُوهُمْ حَيْثُ وَجَدْتُمُوهُمْ ۖ
وَلَا تَتَّخِذُوا مِنْهُمْ وَلِيًّا وَلَا نَصِيرًا ﴿٨٩﴾

९०. त्यांच्या शिवाय, जे एखाद्या अशा समाजाला ज्यांच्याबरोबर तुमच्या करार आहे, जाऊन मिळतील; त्याचप्रमाणे ते लोकसुद्धा यापासून वगळलेले आहेत जे तुमच्याजवळ लढाईबद्दल उदासिन होऊन येतात,ते ना तुमच्याशी लढू इच्छितात ना आपल्या समाजाशी.[१६४] अल्लाहने इच्छिले असते तर त्यांना तुमच्यावर लादले असते की ते तुमच्याविरुद्ध लढल्याशिवाय राहिले नसते.[१६५] आणि म्हणून जर ते तुमच्यापासून दूर राहतील, तुमच्याविरुद्ध लढाई न करतील आणि तुमच्याकडे सलोखा व मैत्रीसाठी पुढाकार घेतील तर अल्लाहने तुमच्यासाठी त्यांच्याविरुद्ध पाऊल उचलण्याचा काही मार्ग ठेवलेला नाही.

إِلَّا الَّذِينَ يَصِلُونَ إِلَىٰ قَوْمٍ بَيْنَكُمْ وَبَيْنَهُمْ مِيثَاقٌ
أَوْ جَاءُوكُمْ حَصِرَتْ صُدُورُهُمْ أَنْ يُقَاتِلُوكُمْ أَوْ يُقَاتِلُوا
قَوْمَهُمْ ۚ وَلَوْ شَاءَ اللَّهُ لَسَلَّطَهُمْ عَلَيْكُمْ فَلَقَاتَلُوكُمْ ۚ فَإِنِ
اعْتَزَلُوكُمْ فَلَمْ يُقَاتِلُوكُمْ وَأَلْقَوْا إِلَيْكُمُ السَّلَمَ فَمَا
جَعَلَ اللَّهُ لَكُمْ عَلَيْهِمْ سَبِيلًا ﴿٩٠﴾

१५९. अभिप्रेत शत्रू देशातील 'मुनाफिक' लोक आहेत. त्यांनी उघडपणे तर इस्लामचा स्वीकार केलेला होता. पण त्यांना मुख्यत्वे 'कुफ्र' बद्दल गोडी होती. आणि म्हणून ते काफिरांबरोबर मिळून त्या कारवायांमध्ये भाग घेत असत ज्या इस्लाम व मुसलमानांच्या विरुद्ध केल्या जात होत्या. आणि त्यांना आपले घरदार इतके प्रिय होते की ते हिजरत करून पैगंबर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जाऊन भेटू इच्छित नव्हते. त्यांच्याबरोबर व्यवहार करण्यासंबंधी मुसलमानांच्या मध्ये दुमत होते. एका गटाचे म्हणणे होते की, त्यांच्याबरोबर काफिरांबरोबर जसा व्यवहार केला जातो तसा व्यवहार केला जावा. परंतु दुसरा गट, ते चांगले मुसलमान बनतील या आशेवर त्यांच्याशी सौम्य वागणूक ठेवावी ह्या मताचा होता. या प्रसंगी पवित्र कुरआनने त्यांना सावध केले की, ते काय मुसलमान बनतील? उलट ते तर तुम्हाला काफिर बनविण्याच्या विचारात आहेत. जर ते आपल्या ईमानामध्ये सच्चे आहेत तर त्यांनी हिजरत करून पैगंबर आणि त्यांच्या साथीदारांना येऊन मिळावे. तसे त्यांनी केले नाही तर त्यांच्याबरोबरही लढाई केली जावी.

१६०. म्हणजे इस्लामचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी फक्त आपल्या हिताचाच विचार अवलंबिला आणि कुफ्रकडे पाऊल उचलले. आणि म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहनेसुद्धा त्यांना उलट्या पायी कुफ्रकडेच ढकलून दिले.

१६१. समजले की, येथे त्या लोकांसंबंधी आज्ञा दिली गेली आहे ज्यांनी इस्लामचा बुरखा घेतला होता. परंतु ते वस्तुत: काफिर होते. आणि या गोष्टीचे इच्छुक होते की मुसलमानांनीही काफिर बनावे. त्यांचे हे कुफ्रच होते जे त्यांना हिजरतपासून रोखत होते. कारण हिजरतसाठी जबरदस्त त्यागाची आवश्यकता होती.

१६२. म्हणजे त्यांनी जर हिजरत केली तर ही आशा केली जाऊ शकते की ते सच्चे मुसलमान बनतील. आणि काय नवल, सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या या त्यागाला पाहून त्यांना सच्चे मुसलमान बनण्याची बुद्धी प्रदान करील. स्पष्ट असो की येथे हिजरत बरोबर 'अल्लाहच्या मार्गात' ही सुद्धा सांगड आहे. म्हणजे अल्लाहच्या मार्गात हिजरत. याचा अर्थ हा आहे की त्यांची हिजरत, ईमानचे संरक्षण व त्याची आवश्यकता पूरी करण्यासाठी असावी. याच स्थितीत त्यांना मित्र बनविले जाऊ शकते.

१६३. म्हणजे अशा स्थितीत तुम्ही त्यांना शत्रूचे साथी समजा आणि ते जेथे आढळून येतील तेथे त्यांना पकडा आणि त्यांची हत्या करा. ही आज्ञा त्या दांभिक लोकांच्या बाबतीत आहे जे काफिर समाजाबरोबर मिळून मुसलमानांच्या विरुद्ध लढाई करतात. वर नोट नं. १५९ मध्ये याचा खुलासा झालेला आहे.

१६४. येथे त्या लोकांसंबंधी आज्ञा निवेदन केली गेली आहे जे हत्येच्या आज्ञेला अपवाद आहेत. म्हणजे ते मुनाफिक लोक जे अशा एखाद्या समाजाशी जाऊन मिळतात ज्यांच्या बरोबर मुसलमानांचा समझौता आहे. समझौत्याच्या प्रतिष्ठेसाठी त्या मुनाफिक लोकांबरोबर देखील शत्रुत्वाची वागणूक केली जाणार नाही. त्याचप्रमाणे, त्या मुनाफिकांच्या बरोबर देखील शत्रुत्वाची वागणूक केली जाणार नाही. जे तटस्थ आहेत. म्हणजे जे आपल्या समाजाबरोबर मिळून मुसलमानांच्याबरोबर लढाई करीत नाहीत आणि मुसलमानांच्या समर्थनार्थ आपल्या समाजाबरोबर लढत नाहीत.

१६५. म्हणजे अल्लाहने जर त्यांना धाडस दिले असते तर ते तुमच्याबरोबर लढाई करण्यासाठी सिद्ध झाले असते परंतु असे झाले नाही. म्हणून त्यांच्या विद्यमान वागणुकीस अल्लाहची देणगी समजा. आणि जोपर्यंत ते तुमच्याशी लढणार नाहीत आणि तुमच्याबरोबर तडजोडीची व सलोख्याची वागणूक ठेवतील तुम्ही त्यांच्याविरुद्ध पाऊल उचलू नका.

९१. दुसरे असे काही लोकही तुम्हांला भेटतील जे इच्छितात की तुमच्यापासूनही वाचून राहावे आणि आपल्या समाजापासूनही. (परंतु त्यांची स्थिती अशी आहे की) जेव्हा उपद्रव माजविण्याकडे वळविले जाते तेव्हा त्यामध्ये ते उडी घेतात. [१६६] जर ते तुमच्यापासून दूर राहणार नाहीत आणि तुमच्याकडे सलोख्यासाठी पुढाकार घेणार नाहीत आणि लढण्यापासून आपले हात रोखणार नाहीत तर ते जेथे मिळतील तेथे अटक करा आणि त्यांची हत्या करा. त्या लोकांविरुद्ध आम्ही तुमहांला उघड अधिकार दिला आहे. [१६७]

سَتَجِدُونَ آخَرِينَ يُرِيدُونَ أَن يَأْمَنُوكُمْ وَيَأْمَنُوا
قَوْمَهُمْ كُلَّمَا رُدُّوا إِلَى الْفِتْنَةِ أُرْكِسُوا فِيهَا ۚ فَإِن
لَّمْ يَعْتَزِلُوكُمْ وَيُلْقُوا إِلَيْكُمُ السَّلَمَ وَيَكُفُّوا
أَيْدِيَهُمْ فَخُذُوهُمْ وَاقْتُلُوهُمْ حَيْثُ
ثَقِفْتُمُوهُمْ ۚ وَأُولَٰئِكُمْ جَعَلْنَا لَكُمْ عَلَيْهِمْ سُلْطَانًا مُّبِينًا ﴿٩١﴾

९२. आणि कोणत्याही श्रद्धाधारकाचे (मोमिनाचे) हे काम नव्हे की त्याने एखादा श्रद्धाधारकाची (मोमिनाची) हत्या करावी. चुकीने असे झाल्यास प्रश्न वेगळा. आणि ज्या माणसाने चुकीने एखाद्या श्रद्धाधारकाची हत्या केली असेल त्याने एका श्रद्धाधारकाला गुलामीतून स्वतंत्र केले पाहिजे. [१६८] आणि मयताच्या वारसांना प्राणांची नुकसान भरपाई अदा केली पाहिजे. [१६९] त्यांनी नुकसान भरपाई माफ केल्यास प्रश्न वेगळा. परंतु मृत माणूस जर अशा एखाद्या समाजाचा असेल ज्याच्याशी तुमचे शत्रुत्व आहे आणि तो स्वत:श्रद्धाधारक(मोमिन) असेल तर एका श्रद्धाधारकाला गुलामीतून स्वतंत्र करावे लागले. आणि तो जर अशा एखाद्या समाजाचा असेल ज्याच्याबरोबर तुमचा करार आहे तर त्याच्या वारसांना प्राणांची नुकसानभरपाईसुद्धा द्यावी लागेल आणि एका श्रद्धाधारकालापण गुलामीमधून स्वतंत्र करावे लागेल.[१७०] ज्याला हे शक्य नसेल त्याने दोन महिन्याचे अखंड रोजे करावेत.[१७१] तौबाची-पश्चात्तापाची-ही पद्धत अल्लाहने ठरविलेली आहे.[१७२] आणि अल्लाह सर्वज्ञ व बुद्धिमान आहे.

وَمَا كَانَ لِمُؤْمِنٍ أَن يَقْتُلَ مُؤْمِنًا إِلَّا خَطَأً ۚ وَمَن قَتَلَ مُؤْمِنًا خَطَأً
فَتَحْرِيرُ رَقَبَةٍ مُّؤْمِنَةٍ وَدِيَةٌ مُّسَلَّمَةٌ إِلَىٰ أَهْلِهِ إِلَّا أَن يَصَّدَّقُوا ۚ فَإِن
كَانَ مِن قَوْمٍ عَدُوٍّ لَّكُمْ وَهُوَ مُؤْمِنٌ فَتَحْرِيرُ رَقَبَةٍ مُّؤْمِنَةٍ ۖ وَإِن
كَانَ مِن قَوْمٍ بَيْنَكُمْ وَبَيْنَهُم مِّيثَاقٌ فَدِيَةٌ مُّسَلَّمَةٌ إِلَىٰ أَهْلِهِ
وَتَحْرِيرُ رَقَبَةٍ مُّؤْمِنَةٍ ۖ فَمَن لَّمْ يَجِدْ فَصِيَامُ شَهْرَيْنِ مُتَتَابِعَيْنِ
تَوْبَةً مِّنَ اللَّهِ ۗ وَكَانَ اللَّهُ عَلِيمًا حَكِيمًا ﴿٩٢﴾

१६६. येथे 'फित्ना' (उपद्रव) ने अभिप्रेत लढाईच्या हरकती आहेत ज्या काफिर मुसलमानांच्या विरुद्ध करीत होते.

१६७. ही आज्ञा त्या लोकांसंबंधी आहे जे मुसलमानांच्या धोक्यापासूनही सुरक्षित राहू इच्छित होते आणि आपल्या समाजाच्या धोक्यापासूनही. परंतु जेव्हा त्यांच्या समाजाचे दडपण येत असे तेव्हा ते आपल्या समाजाबरोबर मुसलमानांच्याविरुद्ध लढाईत सामील होत असत. 'कबिला असद' व 'गतफान' च्या लोकांनी मदीनेला येऊन इस्लामचा स्वीकार केला आणि पैगंबरांच्याबरोबर करारसुद्धा केला परंतु आपल्या समाजामध्ये परत गेल्यानंतर समाजाच्या आग्रहावरून ते मुसलमानांच्या विरुद्ध लढाईच्या तयारीत सामील झाले. अशा लोकांच्या संबंधी फर्माविले गेले की ते कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत. अल्लाहने तुम्हाला अधिकार दिला आहे की जेथे ते आढळतील तेथे त्यांची धरकपकड करा आणि हत्या करा.

१६८. 'कत्ले खता' (चुकीची हत्या) चे प्रायश्चित आहे. मयत मोमिन होता म्हणून त्याचे प्राय:श्चित हे ठरविले गेले की एका मुसलमान गुलामाला स्वतंत्र केले जावे.

हल्लीच्या काळात गुलामीचा रिवाज राहिलेला नाही. म्हणून प्रायश्चित घेण्याची दुसरी पद्धत अंगिकारीली पाहिजे. म्हणजे सतत दोन महिने रोजे करणे याचा उल्लेख याच आयतीत पुढे झाला आहे.

१६९.'दियत' (रक्ताचा मोबदला) चे प्रमाण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी शंभर उंट, ठरविले होते. (अहकामुल कुरआन जस्सास भा.२पा.२८३) रोखीच्या स्वरूपांत हा मोबदला द्यावयाचा झाल्यास शंभर उंटांच्या किंमती इतकी रक्कम अदा करावी लागेल.

१७०. या आयतीमध्ये एखाद्या मुसलमानाची चुकून हत्या होण्याचे तीन प्रकार निवेदन केले गेले आहेत. पहिला प्रकार हा की मयत दारूल इस्लामचा (इस्लामी राज्याचा) रहिवासी असेल. या परिस्थितीत 'कफ़्फ़रा' (प्रायश्चित्त) ही अदा करावा लागेल व खूनबहा' (रक्ताचा मोबदला) ही. दुसरा प्रकार हा की मयत दारूल हर्बची (शत्रू प्रदेशातील) रहिवासी असेल. अशा स्थितीत फक्त 'कफ्फारा' द्यावा लागेल. आणि तिसरा प्रकार हा की मयत करार असलेल्या प्रदेशातील रहिवासी असेल. म्हणजे अशा एखाद्या दारुलकुफ्रचा (काफिरांच्या राज्यातील) रहिवासी असेल ज्याच्याबरोबर मुसलमानांनी करार केलेले असेल. अशा स्थितीत 'कफ़्फ़ारा' ही द्यावा लागेल व 'दियत' पण द्यावी लागेल.

हदीस मध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी खालिद बिन वलीद यांना बनी खुजैमाकडे पाठविले. त्यांनी त्यांना इस्लाम स्वीकाराचे आवाहन केले. त्यांनी आपल्या इस्लाम स्वीकाराची घोषणा अशा एका शब्दाने केली जो मोघम होता. म्हणजे ''अस्लमना'' च्या ऐवजी ''सबाना'' म्हटले. हजरत खालिद यांनी गैरसमाजाने त्या काविल्याच्या काही लोकांची हत्या केली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जेव्हा याची बातमी मिळाली तेव्हा आपण प्रार्थनेसाठी हात उठविले आणि म्हणाले, परमेश्वरा ! ''खालिदने जे काही केले त्यापासून मी मुक्त आहे'' त्यानंतर पैगंबरांनी हजरत अली यांना पाठवून मयतांच्या रक्ताचा मोबदला अदा केला. आणि त्यांच्या नुकसानीची भरपाई केली. इतकेच नव्हे तर त्यंच्या कुत्र्याची किंमतपण अदा केली. ही बुखारीची हदीस आहे. तिला नमूद करून इब्ने कसीर लिहितात. या हदीस वरून ही आज्ञा निघते की इमाम किंवा त्याच्या प्रतिनिधीकडून (सेनापती, दुय्यम अधिकारी वगैरे) चूक झाल्यास त्याचा मोबदला सरकारी खजिन्यामधून (बैतुलमाल) अदा केली जाईल. (तफसीर इब्ने कसीर भाग १ पान ५३५)

१७१. आता गुलामीचा रिवाज समाप्त झाला आहे. गुलामाला स्वतंत्र करणे याला हा पर्याय असेल की दोन महिन्याचे अखंड रोजे केले जावेत. अखंड याचा अर्थ हा की धार्मिक सबबीखेरीज मध्ये एखादाही रोजा सोडू नये. आणि एखादा माणूस जर रोजे करू शकत नसेल तर त्याच्या प्रश्नाचे उत्तर धर्मपंडितांच्या (उलमाच्या) एका गटाने हे दिले आहे की त्याला साठ दीनदुबळ्यांना जेवू घालावे लागेल. ही गोष्ट ''जिहार'' च्या प्रायश्चित्तावरून अनुमानाने सांगितली गेली आहे.

१७२. म्हणजे हा कफ्फारा-प्रायश्चित अल्लाहकडून ठरविलेली तौबा आहे. हत्या करणाऱ्याला आपल्या चुकीच्या गंभीरतेची जाणीव व्हावी व त्याने खेदाने व शरमेने अल्लाहकडे रुजू व्हावे.

९३. आणि ज्या माणसाने एखाद्या श्रद्धाधारकाची (मोमिनाची) जाणून बुजून हत्या केली तर त्याची शिक्षा 'जहन्नम' आहे, जेथे तो सदैव राहील. त्याच्यावर अल्लाहचा कोप झाला आणि त्याची निर्भर्त्सना झाली. आणि अशा माणसासाठी त्याने फार मोठी यातनामय शिक्षा तयार करून ठेविलेली आहे. [१७३]

وَمَنْ يَّقْتُلْ مُؤْمِنًا مُّتَعَمِّدًا فَجَزَآؤُهٗ جَهَنَّمُ خٰلِدًا فِيْهَا وَغَضِبَ اللّٰهُ
عَلَيْهِ وَلَعَنَهٗ وَاَعَدَّ لَهٗ عَذَابًا عَظِيْمًا ﴿٩٣﴾

९४. हे ईमान धारकांनो ! जेव्हा तुम्ही अल्लाहच्या मार्गात निघाल तेव्हा चांगल्याप्रकारे चौकशी करीत जा. आणि जो माणूस तुम्हाला सलाम करील, त्याला निव्वळ या आधारवर की तुम्हांला ऐहिक जीवनाचा फायदा अपेक्षित आहे, असे म्हणून नका की तू मोमिन नाहीस. [१७४] (तुम्हाला हे समजावयाला हवे की) अल्लाहजवळ भरपूर लूटीची संपत्ती आहे. तुमची अवस्था प्रथम तर अशीच होती. परंतु अल्लाहने तुमच्यावर मेहेरबानी केली. [१७५] आणि म्हणून चौकशी करीत जा. तुम्ही जे काही करता त्याची अल्लाहला खबर आहे.

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْۤا اِذَا ضَرَبْتُمْ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ فَتَبَيَّنُوْا
وَلَا تَقُوْلُوْا لِمَنْ اَلْقٰۤى اِلَيْكُمُ السَّلٰمَ لَسْتَ مُؤْمِنًا ۚ تَبْتَغُوْنَ عَرَضَ
الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۫ فَعِنْدَ اللّٰهِ مَغَانِمُ كَثِيْرَةٌ ؕ كَذٰلِكَ كُنْتُمْ مِّنْ قَبْلُ
فَمَنَّ اللّٰهُ عَلَيْكُمْ فَتَبَيَّنُوْا ؕ اِنَّ اللّٰهَ كَانَ بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرًا ﴿٩٤﴾

९५. श्रद्धाधारकांपैकी,योग्य सबबीखेरीज बसून राहणारे आणि आपल्या प्राणानिशी व मालमत्तेनिशी अल्लाहच्या मार्गात जिहाद करणारे सारखे नाहीत. अल्लाहने आपल्या प्राणानिशी व मालमत्तेनिशी जिहाद करणाऱ्यांना बसून राहणाऱ्या पेक्षा दर्जाच्या दृष्टीने श्रेष्ठता प्रदान केली आहे. आणि दोहोंबरोबर अल्लाहने भलाईचा वायदा केलेला आहे. [१७६] परंतु जिहाद करणाऱ्यांना बसून राहणाऱ्यांच्या तुलनेत महान मोबदल्याची श्रेष्ठता प्रदान केली आहे.

لَا يَسْتَوِي الْقٰعِدُوْنَ مِنَ الْمُؤْمِنِيْنَ غَيْرُ اُولِي الضَّرَرِ وَالْمُجٰهِدُوْنَ
فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ بِاَمْوَالِهِمْ وَاَنْفُسِهِمْ ؕ فَضَّلَ اللّٰهُ الْمُجٰهِدِيْنَ
بِاَمْوَالِهِمْ وَاَنْفُسِهِمْ عَلَى الْقٰعِدِيْنَ دَرَجَةً ؕ وَكُلًّا وَّعَدَ اللّٰهُ
الْحُسْنٰى ؕ وَفَضَّلَ اللّٰهُ الْمُجٰهِدِيْنَ عَلَى الْقٰعِدِيْنَ اَجْرًا عَظِيْمًا ۙ﴿٩٥﴾

९६. अल्लाहकडून दर्जे आहेत. आणि क्षमा व कृपा. आणि अल्लाह मोठा क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

دَرَجٰتٍ مِّنْهُ وَمَغْفِرَةً وَّرَحْمَةً ؕ وَكَانَ اللّٰهُ غَفُوْرًا
رَّحِيْمًا ﴿٩٦﴾

१७३. या आयती मध्ये मुसलमानाची अन्यायाने व जाणूनबुजून हत्या करणाऱ्यास पाच धमाक्या सुनविल्या गेल्या आहेत. पहिली ही की त्याची शिक्षा जहन्नम असेल. तुसरी ही की तेथे तो सदैव राहिल. तिसरी ही की त्याच्यावर अल्लाहचा कोप होईल. चौथी ही की अल्लाह त्याची निर्भत्सना करील. पाचवी ही की त्याला फार मोठी शिक्षा भोगावी लागेल, जी त्याच्यासाठी खास तयार करून ठेविलेली आहे. यावरून या गुन्हयाच्या भयंकरपणाचा अंदाज होऊ शकतो. इस्लाम मध्ये शिर्क' नंतर हा सर्वात मोठा गुन्हा आहे. आणि हदीस मध्ये याला 'कुफ्र' संबोधिले गेले आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे निवेदन आहे.

سباب المسلم فسوق وقتاله كُفر۔ (مسلم كتاب الايمان)

''मुसलमानाला शिवीगाळ करणे हा दुराचार आहे. आणि त्याची हत्या करणे हे 'कुफ्र' आहे.'' (मुस्लिम)

لاترجعوا بعدی کفارا یضرب بعضکم رقاب بعض۔

(مسلم كتاب الايمان)

''माझ्यानंतर काफिर बनू नका की एकदुसऱ्याच्या माना उडवू लागाल.'' (मुस्लिम)

१७४. अर्थ हा की जेव्हा एखाद्या प्रदेशावर हल्ला करण्यासाठी निघाल तेव्हा पूर्ण चौकशी करा की मुसलमान कोठे कोठे आहेत. कारण असे होऊ नये की तुम्ही चुकीने हल्ला कराल. आणि एखाद्याने आपल्या ईमानाची तुम्हांला माहिती व्हावी म्हणून सलाम केला तर त्याच्या इस्लामचा इन्कार करू नका. लुटीच्या मालाच्या लोभाने त्याच्यावर हल्ला करू इच्छिता तर तुम्हाला समजावयास हवे की अल्लाहजवळ संपत्तीचे मोठे खजिने आहेत. आणि म्हणून आखिरतच्या मोबदल्याला आपले उद्दिष्ट बनवा.

इस्लाममध्ये लढाईचा उद्देश फक्त मुलुखगिरी हा नसून न्यायनिती व सत्याची प्रस्थापना हा आहे. आणि म्हणून ऐन लढाईच्या समयी शत्रु समाजातील कोणी माणूस कलिमा-सत्यवचन म्हणून इस्लामचा स्वीकार करतो किंवा कोणी 'अस्सलामु अलैकुम' म्हणून आपण मुसलमान असल्याचे जाहिर करतो तर-ही शक्यता असतांनादेखील की तो फक्त जीव वाचविण्यासाठी खोटे बोलत असेल त्याची हत्या केली जाऊ नये. कारण या गोष्टीचीही शक्यता आहे की तो खरोखर मुसलमान झाला असेल.आणि सावधगिरी म्हणून त्याची हत्या करू नये. यावरून हा मुलभूत उपदेश मिळतो की कोणाही कलिमा म्हणणाऱ्या मुसलमानस धर्मच्युत केले जाऊ नये. आणि जो माणूस स्वत:ला मुसलमान म्हणवून घेतो त्याला मुसलमान समजले पाहिजे. असा माणूस आपल्या दाव्यात खोटा आहे असे सिद्ध झाल्यास हे प्रश्न वेगळा.

१७५.म्हणजे यापूर्वी तुम्ही सुद्धा फक्त ''कलिमा'' म्हणून इस्लाममध्ये सामील झाला होता. त्यानंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुमचे ईमान दृढ केले. व तुम्ही पक्के मुसलमान झालात. आणि म्हणून या लोकांनीही आपण मुसलमान झाल्याची तोंडी घोषणा केली तरी तिचा स्वीकार करा.-

१७६. हा त्या परिस्थितीचा उल्लेख आहे जेव्हा जिहाद साठी सार्वत्रिक जाहीर घोषणा केली जात नाही. आणि लोकांचे जिहाद करणे पुरेसे असते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे मोहिमेवर सैन्याच्या छोट्या छोट्या तुकड्या रवाना करीत असत त्याला सरिया'' म्हणत असत. अशा परिस्थितीत जिहादचे स्वरूप श्रेष्ठत्वाचा एका दर्जा' असे आहे. परंतु जेव्हा जिहाद बंधनकारक अनिवार्य कर्तव्य असते किंवा त्याबद्दल जाहिर घोषणा केली जाते तेव्हा त्या स्थितीत चांगुलपणाचे आश्वासन घरी बसून राहणाऱ्यासाठी नाही.

स्पष्ट असे की ज्या मोहिमांवर (गजवा) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे स्वत: गेले होते त्याप्रसंगी विनासबब जे लोक घरी बसून राहिले त्यांच्यावर पवित्र कुरआनमध्ये कडक टीका केली गेली आहे. अल्लाहचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपले प्राण धोक्यांत घालून स्वत: लढायांवर जात असतांना त्यांच्या अनुयायांनी आपले प्राण वाचविण्यासाठी घरी बसून राहणे हे ईमानविरुद्ध कृत्य आहे. ईमानाची उघड निकड तर ही आहे की पैगंबरांचे प्राण हे आपल्या प्राणांपेक्षा अधिक मौल्यावान समजले गेले पाहिजेत. आणि वस्तुस्थिती ही आहे की त्याऐवजी जिहादपासून तेच लोक कचरत असत जे मुनाफ़िक होते. तेव्हाचा मुसलमान तर पैगंबरांच्यासाठी आपल्या सर्वस्वाची आहुती देण्यास सदैव तयार असे.

९७. ज्या लोकांनी स्वत:वर अत्याचार केलेला आहे त्यांचे प्राण जेव्हा फिरिश्ते ताब्यात घेतात तेव्हा ते त्यांना विचारतात की तुम्ही कोणत्या अवस्थेत होता? ते उत्तर देतात की, आम्ही तर या देशांत अगदी असहाय होतो. ते विचारतात की काय अल्लाहची जमीन इतकी विशाल नव्हती की तुम्ही देशत्याग करून दुसरीकडे जावे? अशा लोकांचे स्थान जहन्नम आहे आणि ती फार वाईट जागा आहे.[१७७]

إِنَّ الَّذِينَ تَوَفَّاهُمُ الْمَلَائِكَةُ ظَالِمِي أَنفُسِهِمْ قَالُوا فِيمَ كُنتُمْ ۖ قَالُوا كُنَّا مُسْتَضْعَفِينَ فِي الْأَرْضِ ۚ قَالُوا أَلَمْ تَكُنْ أَرْضُ اللَّهِ وَاسِعَةً فَتُهَاجِرُوا فِيهَا ۚ فَأُولَٰئِكَ مَأْوَاهُمْ جَهَنَّمُ ۖ وَسَاءَتْ مَصِيرًا ﴿٩٧﴾

९८. अलबत, ते असहाय पुरुष, स्त्रीया व मुले जे काही उपाय योजना करू शकत नाहीत आणि ज्यांना (हिजरतचा एखादा) मार्ग ही सापडत नाही.

إِلَّا الْمُسْتَضْعَفِينَ مِنَ الرِّجَالِ وَالنِّسَاءِ وَالْوِلْدَانِ لَا يَسْتَطِيعُونَ حِيلَةً وَلَا يَهْتَدُونَ سَبِيلًا ﴿٩٨﴾

९९. अशा लोकांना, आशा आहे की, अल्लाह माफ करील. अल्लाह मोठा माफ करणारा व क्षमा करणारा आहे.

فَأُولَٰئِكَ عَسَى اللَّهُ أَن يَعْفُوَ عَنْهُمْ ۚ وَكَانَ اللَّهُ عَفُوًّا غَفُورًا ﴿٩٩﴾

१००. आणि जो कोणी अल्लाहच्या मार्गात हिजरत करील. त्याला जमिनीवर पुष्कळशा जागा व मोठी विशालता आढळून येईल.[१७८]आणि जो माणूस आपल्या घरातून अल्लाह व त्याच्या पैगंबरांकडे हिजरत करून निघेल, आणि त्याला (वाटेत) मरण आले तर त्याच्या मोबदल्याची जबाबदारी अल्लाहवर सिद्ध होईल. [१७९] अल्लाह मोठा क्षमाशील व कृपाळू आहे.

وَمَن يُهَاجِرْ فِي سَبِيلِ اللَّهِ يَجِدْ فِي الْأَرْضِ مُرَاغَمًا كَثِيرًا وَسَعَةً ۚ وَمَن يَخْرُجْ مِن بَيْتِهِ مُهَاجِرًا إِلَى اللَّهِ وَرَسُولِهِ ثُمَّ يُدْرِكْهُ الْمَوْتُ فَقَدْ وَقَعَ أَجْرُهُ عَلَى اللَّهِ ۗ وَكَانَ اللَّهُ غَفُورًا رَّحِيمًا ﴿١٠٠﴾

१०१. आणि जेव्हा तुम्ही प्रवासावर निघाल तेव्हा नमाज़ ''कस्र'' (संक्षिप्त, छोटी) केल्यास काही हरकत नाही; जर तुम्हांला ही शंका असेल की काफिर तुम्हांला त्रास देतील .[१८०] काफिर तर आहेत तुमचे उघड शत्रू !

وَإِذَا ضَرَبْتُمْ فِي الْأَرْضِ فَلَيْسَ عَلَيْكُمْ جُنَاحٌ أَن تَقْصُرُوا مِنَ الصَّلَاةِ إِنْ خِفْتُمْ أَن يَفْتِنَكُمُ الَّذِينَ كَفَرُوا ۚ إِنَّ الْكَافِرِينَ كَانُوا لَكُمْ عَدُوًّا مُّبِينًا ﴿١٠١﴾

१७७. हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मक्केकडून मदिनेस हिजरत केल्यानंतर जे मुसलमान मक्का व त्याच्या आसपास राहिले होते त्यांच्यावर हिजरत फर्ज-बंधनकारक-झाली होती. हिजरतचा हा हुकूम खालील कारणांमुळे दिला गेला होता.

(१) मक्का व त्याच्या आसपासच्या भागात जेथे अनेकेश्वरवाद्यांच्या हाती सत्ता होती तेथे श्रद्धेचे व विवेकांचे स्वातंत्र्य नव्हते. जे लोक अनेकेश्वरवादी धर्मांचा त्याग करून इस्लाममध्ये दाखल झाले होते त्यांच्यावर अमानुष अत्याचार केले जात होते. आणि त्यांना या गोष्टी साठी विवश केले जात होते की त्यांनी इस्लाम धर्म सोडून पुन्हा अनेकेश्वरवादी धर्मात यावे. अशा परिस्थितीत ईमानवर कायम राहणे म्हणजे जीव धोक्यात टाकणे होते. परिणाम हा की ज्या लोकांचे ईमान अद्याप दृढ झाले नव्हते ते एकतर आपल्या ईमानला लपवित नाहीपेक्षा अनेकेश्वरवादी धर्माबरोबर हातमिळवणी करीत असत. अशाप्रकारे इस्लाम व शिर्क आणि ईमान व कुफ्र यांना एकत्र केले जात असे. उघड आहे की ज्या जमिनीवर ईमानावर कायम राहण्याचे स्वातंत्र्य नसेल त्या जमिनीचा निरोप घेणे ही ईमानाची उघडउघड निकड आहे. मग ती जमिन पवित्र अशा मक्का शहराची का असेना. कारण ईमान व ईश्वराशी एकनिष्ठ ही माती व रक्ताच्या निष्ठेपेक्षा श्रेष्ठ आहे.

(२) अल्लाहच्या पैगंबरांनी हिजरत केल्यानंतर मुसलमानांनी हिजरत करण्याबद्दल टाळाटाळ करणे याचा अर्थ हा की ते पैगंबरांपेक्षा आपल्या घरादाराला अधिक प्राधान्य देतात. पैगंबरांवरील प्रेमाची निकड ही की ज्या वस्तुला पैगंबरांनी सोडले त्याला ईमानधारकांनीही सोडले पाहिजे. आणि पैगंबरांच्या सहवासात राहून त्यांची सेवा करणे व त्यांचे साहाय्य करणे याला त्यांनी आपले भाग्य समजले पाहिजे व त्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार असले पाहिजे.

(३) इस्लाम व कुफ्रमध्ये लढाई सुरू होती आणि अल्लाहचे रसूल आपल्या मूठभर सहकाऱ्यांसह मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या आव्हानाला उत्तर देण्यासाठी स्वत:लढाईच्या मैदानावर हजर असत आणि म्हणून त्यावेळी या गोष्टीची आवश्यकता होती की इस्लामची शक्ती एका केंद्रावर एकत्रित व्हावी आणि पैगंबरांच्या नेतृत्त्वाखाली इस्लामच्या शत्रूंशी सामना केला जावा. परंतु ज्या मुसलमानंनी हिजरत केली नव्हती त्यांचे वजन इस्लामच्या पारड्यांत पडण्यऐवजी इस्लामच्या शत्रुच्या पारड्यांत पडत होते. येथपावेतो की काही लोक अनेकेश्वरवाद्यांच्या दबावामुळे त्यांच्या सैन्यात सामील होण्यास स्वत:स विवश समजू लागले आणि अशाप्रकारे ते पैगंबर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधात लढाईच्या मैदानात उपस्थित. होत

ही होती त्यावेळची परिस्थिती, जेव्हा मक्का व आसपासच्या भागांत राहणाऱ्या मुसलमानांना हुकूम दिला गेला की त्यांनी हिजरत करून मदीनेला जावे. या हुकूमाचे पालन न करण्याचा अर्थ हा होता की आपले ईमान धोक्यात टाकण्यांस ते तयार होते. पण आपले घरदार सोडण्यास तयार नव्हते. आणि म्हणून या आयतीमध्ये कोणत्याही खऱ्या सबबीखेरीज हिजरत न करणे म्हणजे स्वत:वर अत्याचार करणे असे म्हटले गेले. आणि अशा लोकांना सक्त शिक्षेची धमकी सुनविले गेली आहे.

यावरून जे मूलभूत मार्गदर्शन मिळते ते हे की ज्या देशामध्ये इस्लाम जाहिर करण्याचे स्वातंत्र्य नसेल आणि जुलूम व अत्याचारामुळे ईमान धोक्यात असेल तेथून अशा एखाद्या प्रदेशाकडे जेथे ईमानचे संरक्षण होऊ शकते व इस्लामच्या कमीतकमी निकडी पुऱ्या केल्या जाऊ शकतात, हिजरत करून जाणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीतसुद्धा माणूस हिजरत करण्यास समर्थ नसेल तर प्रश्न वेगळा.

१७८. कुरआनचा हा वायदा अक्षरन् अक्षर पूर्ण झाला. आणि महाजिर (हिजरत करणाऱ्या) लोकांना मदीनेमध्ये फार चांगले ठिकाण लाभले आणि हळूहळू त्यांना आर्थिक सुखसोयीसुद्धा प्राप्त झाल्या.

१७९. यावरून या गोष्टीवर प्रकाश पडतो की सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ कोणत्याही हुकूमाची अंमलबजावणी संबंधी माणसाची नियत आणि प्रत्यक्ष कृती या गोष्टी विश्वासार्ह आहेत. जर हे काम पूर्ण होण्यापूर्वी त्याला मरण येईल तर सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ त्याचा मोबदला मारला जाणार नाही. आणि तो अल्लाहच्या बक्षिसास व कृपेस पात्र राहील.

१८०. हे ''सलाते खौफ'' (संकटकालीन नमाज़) चे निवेदन आहे. म्हणजे लढाईच्या स्थितीत नमाज अदा करण्याची पद्धत जिला ''कस्र'' ने संबोधिले गेले आहे. आणि कस्रची जी पद्धत हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सुन्नतीने सिद्ध होते, ती ही आहे की ''जुहर'' ''अस्र'' आणि ''इशा'च्या'' फर्ज नमाजींच्या चार चार रकाअतीऐवजी दोन दोन रकाअती अदा केल्या जाव्यात. ''मग़रिब'' व 'फ़ज्र'च्या नमाज़ीमध्ये कस्र नाही आणि म्हणून माणूस निवासी असो वा प्रवासात असो 'मग़रिब' च्या तीन रकाअती व 'फ़ज्र' च्या दोन रकाअती अदा केल्या पाहिजेत.

''कस्र'' चा हुकूम मुख्यत्वे जिहादमुळे दिला गेला होता. परंतु नंतर तो सर्वप्रकारच्या प्रवासासाठी प्रचलित केला गेला. कारण प्रवासात सर्वसाधारणपणे बेचैनीची स्थिती असते.

हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी शांततेच्या कालातील प्रवासात कस्रच्या परवानगीपासून लाभ उठविणे हे धर्मानुकूल ठरवून फर्माविले.

صدقة تصدق الله بها عليكم فاقبلوا صدقته۔

(مسلم کتاب صلوٰۃ المسافرین)

"कस्रची परवानगी हे सर्वश्रेष्ठ अल्लाहचे बक्षिस आहे. आणि म्हणून या बक्षिसाचा स्वीकार करा." (मुस्लिम)

आणि पैगंबरांच्या सुन्नतीने हे सिद्ध झालेले आहे की ते धोक्याच्या व शांततेच्या कालातील प्रवासात कस्र करीत होते.

❀❀❀❀❀❀

**मग जेव्हा तुम्ही नमाज़ अदा कराल तेव्हा अल्लाहचे स्मरण करा-उभे राहून, बसून आणि लवंडून (ज्या स्थितीत असाल त्या स्थितीत) आणि जेव्हा समाधानाची स्थिती प्राप्त होईल तेव्हा पुरी नमाज कायम करा. नि:संशय नमाज ईमान ठेवणाऱ्यावर वेळेच्या नियमितपणासह फर्ज (कर्तव्य) केली गेली आहे. आणि शत्रूच्या पाठलागामध्ये दुबळेपणा दाखवू नका. तुम्ही जर कष्ट घेत आहात तर ते सुद्धा तुमच्याचप्रमाणे कष्ट घेत आहेत. आणि तुम्ही अल्लाहकंडून त्या गोष्टींची आशा बाळगता ज्याची आशा ते बाळगीत नाहीत. अल्लाह सर्वकाही जाणणाराही आहे व बुद्धिमानही आहे. *(अल-क़ुरआन)***

१०२. आणि जेव्हा तुम्ही (हे पैगंबर !) त्यांच्या (मुसलमानांच्या) दरम्यान उपस्थित असाल आणि नमाजमध्ये त्यांची इमामत (नेतृत्व) करीत असाल तर असे व्हावे की एक गट नमाज साठी तुमच्याबरोबर उभा राहवा आणि आपल्या हत्यारासह असावा. आणि जेव्हा तो सज्दा (नतमस्तक होणे) पूर्ण करील तेव्हा त्याने तुमच्यामागे हटावे. आणि दुसऱ्या गटाने-ज्याने अद्याप नमाज पडली नसेल-तुमच्याबरोबर नमाजमध्ये सामील व्हावे. आणि असे असावे की त्याने आपल्या संरक्षणाचे सामान व आपली हत्यारे बरोबर घ्यावीत. [१८१] काफिर इच्छितात की तुम्ही आपली हत्यारे व (लढाईंचे) सामान याबद्दल किंचितही गाफिल राहिलात तर ते अचानक तुमच्यावर तुटून पडावे. अलबत, पावसामुळे जर त्रास होईल किंवा तुम्ही आजारी असाल तर तुम्ही तुमच्या हत्यारे उतरवून ठेविली तर काही हरकत नाही. तरी पण आपल्या संरक्षणाचे सामान बरोबर बाळगा. [१८२] खात्री बाळगा. अल्लाहने काफिर-इन्कार करणाऱ्या-लोकांसाठी अपमानास्पद शिक्षा तयार करून ठेविली आहे.

وَاِذَا كُنْتَ فِيْهِمْ فَاَقَمْتَ لَهُمُ الصَّلٰوةَ فَلْتَقُمْ طَآئِفَةٌ
مِّنْهُمْ مَّعَكَ وَلْيَاْخُذُوْٓا اَسْلِحَتَهُمْ فَاِذَا سَجَدُوْا فَلْيَكُوْنُوْا
مِنْ وَّرَآئِكُمْ وَلْتَاْتِ طَآئِفَةٌ اُخْرٰى لَمْ يُصَلُّوْا فَلْيُصَلُّوْا
مَعَكَ وَلْيَاْخُذُوْا حِذْرَهُمْ وَاَسْلِحَتَهُمْ ۚ وَدَّ الَّذِيْنَ
كَفَرُوْا لَوْ تَغْفُلُوْنَ عَنْ اَسْلِحَتِكُمْ وَاَمْتِعَتِكُمْ فَيَمِيْلُوْنَ
عَلَيْكُمْ مَّيْلَةً وَّاحِدَةً ۭ وَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ اِنْ كَانَ بِكُمْ
اَذًى مِّنْ مَّطَرٍ اَوْ كُنْتُمْ مَّرْضٰٓى اَنْ تَضَعُوْٓا اَسْلِحَتَكُمْ ۚ وَ
خُذُوْا حِذْرَكُمْ ۭ اِنَّ اللّٰهَ اَعَدَّ لِلْكٰفِرِيْنَ عَذَابًا مُّهِيْنًا ١٠٢

१०३. मग जेव्हा तुम्ही नमाज अदा कराल तेव्हा अल्लाहचे स्मरण करा-उभे राहून, बसून आणि लवंडून (ज्या स्थितीत असाल त्या स्थितीत) [१८३] आणि जेव्हा समाधानाची स्थिती प्राप्त होईल तेव्हा पुरी नमाज कायम करा. [१८४] निःसंशय नमाज ईमान ठेवणाऱ्यावर वेळेच्या नियमितपणासह फर्ज (कर्तव्य) केली गेली आहे. [१८५]

فَاِذَا قَضَيْتُمُ الصَّلٰوةَ فَاذْكُرُوا اللّٰهَ قِيٰمًا وَّقُعُوْدًا
وَّعَلٰي جُنُوْبِكُمْ ۚ فَاِذَا اطْمَاْنَنْتُمْ فَاَقِيْمُوا الصَّلٰوةَ ۚ اِنَّ
الصَّلٰوةَ كَانَتْ عَلَي الْمُؤْمِنِيْنَ كِتٰبًا مَّوْقُوْتًا ١٠٣

१०४. आणि शत्रूच्या पाठलागामध्ये दुबळेपणा दाखवू नका. तुम्ही जर कष्ट घेत आहात तर ते सुद्धा तुमच्याचप्रमाणे कष्ट घेत आहेत. आणि तुम्ही अल्लाहकडून त्या गोष्टींची आशा बाळगता [१८६] ज्याची आशा ते बाळगीत नाहीत. अल्लाह सर्वकाही जाणणाराही आहे व बुद्धिमानही आहे.

وَلَا تَهِنُوْا فِي ابْتِغَآءِ الْقَوْمِ ۭ اِنْ تَكُوْنُوْا تَاْلَمُوْنَ
فَاِنَّهُمْ يَاْلَمُوْنَ كَمَا تَاْلَمُوْنَ ۚ وَتَرْجُوْنَ مِنَ اللّٰهِ مَا
لَا يَرْجُوْنَ ۭ وَكَانَ اللّٰهُ عَلِيْمًا حَكِيْمًا ١٠٣

१८१. येथे लढाईच्या स्थितीत जमाअतीबरोबर नमाज अदा करण्याची एक विशिष्ट पद्धत दाखविली गेली आहे, जिचा पैगंबर साहेबांच्या उपस्थितीत अवलंब करणे आवश्यक होते. कारण आपल्या उपस्थितीत जेव्हा आपण नमाजची इमामत करीत होते तेव्हा हेच योग्य होते की साऱ्या सैन्याने आपल्या नेतृत्वाखाली नमाज अदा करावी. वेगवेगळे इमाम आणि वेगवेगळ्या जमाअती नसाव्यात. पैगंबरांच्या राहकाऱ्यांनाही ही गोष्ट असह्य होती. की पैगंबर हे नमाजची इमामत करीत असतांना त्यामध्ये सामील होण्यापासून कोणी वंचित व्हावे. आणि म्हणून पैगंबरांच्या उपस्थितीत ''सलाते खौफ़'' अदा करण्याची विशिष्ट पद्धत दाखविली गेली. तिचा तपशील ही आहे की एका गटाने आपल्या हत्यारानिशी पैगंबरांच्या मागे नमाज़ासाठी उभे रहावे आणि दुसऱ्या गटाने संरक्षणाचे काम पार पाडावे. जेव्हा पहिला गट पैगंबरांच्या नेतृत्वाखाली एक रकात नमाज़ अदा करील तेव्हा त्याने दुसरी रकात स्वत: अदा करावी आणि त्यानंतर मागे जाऊन संरक्षणाचे काम पहावे. आणि दुसऱ्या गटाने हत्यारानिशी येऊन पैगंबरांच्यामागे नमाजमध्ये सामील व्हावे आणि पैगंबरांच्या इमामतीखाली एक रकात नमाज अदा केल्यानंतर त्याने स्वत: दूसरी रकात नमाज अदा करावी. यावरून नमाजेच महत्व स्पष्ट होते. ऐन लढाईच्या मैदानात देखील नमाज अदा करणे आवश्यक आहे. आणि वतुस्थिती ही आहे की जिहादचे मूलभूत सार नमाज हेच आहे. त्याचबरोबर यावरून जमाआतीबरोबरच्या नमाजचे महत्व पूर्णपणे स्पष्ट होते. लढाईच्या स्थितीत जर जमाअतीबरोबर नमाज अदा केली जाऊ शकत नाही तर एकट्याने नमाज अदा केली पाहिजे. काबागृहाच्या दिशेने तोंड करून नमाज अदा करणे शक्य नसेल तर जिकडे शक्य आहे तिकडे तोंड करुन नमाज़ अदा करावी. आणि रुकूअ' व 'सज्दा' करणे शक्य नसेल तर इशाऱ्याने 'रुकुअ' व 'सज्दा' करून नमाज अदा केली जावी.

आणि परिस्थिती ही असेल की कोणत्याही प्रकारे वेळेवर नमाज अदा केली जाऊ शकत नसेल तर ती कजा केली जावी- वेळेनंतर अदा केली जावी.

खंदकाच्या लढाईच्याप्रसंगी लढाई जेव्हा जोरावर होती तेव्हा पैगंबर साहेबांनी नमाजला स्थगित केले व नंतर कजा नमाज अदा केली.

१८२. म्हणजे पावसामुळे जर शस्त्रे काढून ठेवावी लागली तरी संरक्षणाच्या वस्तु जरूर जवळ ठेवाव्यात. त्या काळी संरक्षणाच्या वस्तु चिलखत, शिरस्त्राण, ढाल वगैरे होत्या. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की कुरआनने संरक्षणाची व्यवस्था करण्याला किती महत्व दिले आहे.

१८३. म्हणजे अल्लाहचे प्रत्येक क्षणी स्मरण ठेवा अल्लाहचे स्मरण केल्याने धैर्य व हिंमत वाढते आणि म्हणून लढाईच्या मैदानात देखील अल्लाहच्या स्मरणाबाबतीत गाफील राहू नये.

१८४. म्हणजे जेव्हा धोक्याची स्थिती दूर होते आणि समाधानाची स्थिती निर्माण होते तेव्हा नेहमी प्रमाणे संपूर्ण नमाज अदा करा.

१८५. यावरून हे स्पष्ट झाले की नमाजच्या वेळा निश्चित आहेत. त्यांचे पालन करणे हे ईमानधारकांचे अनिवार्य असे कर्तव्य आहे. रात्रंदिवस पाच नमाज़ी फ़र्ज आहेत. ''फ़ज्र'' ''जुहर'' ''अस्र'' ''मगरिब'' आणि ''इशा'' या नमाजींच्या वेळेंची तपशील पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी निवेदन केलेली आहे.

१८६. म्हणजे तुम्ही अल्लाहकडून मदतीची व आखिरत मधील यशाची अपेक्षा बाळगता म्हणून तुमचे मनोधैर्य वाढले पाहिजे. आणि तुम्ही धीराने वागले पाहिजे.

१०५. आम्ही हा ग्रंथ तुमच्यावर सत्यासह उतरविला आहे. यासाठी की जे सत्य अल्लाहने तुम्हाला दाखविले आहे त्यानुसार लोकांमध्ये निर्णय करा. आणि अपहार करणाऱ्यांचे समर्थक बनू नका.[१८७]

إِنَّآ أَنزَلْنَآ إِلَيْكَ ٱلْكِتَٰبَ بِٱلْحَقِّ لِتَحْكُمَ بَيْنَ ٱلنَّاسِ بِمَآ أَرَىٰكَ
ٱللَّهُ ۚ وَلَا تَكُن لِّلْخَآئِنِينَ خَصِيمًا ﴿١٠٥﴾

१०६. आणि अल्लाहची क्षमायाचना करा. नि:संशय अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.

وَٱسْتَغْفِرِ ٱللَّهَ ۖ إِنَّ ٱللَّهَ كَانَ غَفُورًا رَّحِيمًا ﴿١٠٦﴾

१०७. त्या लोकांची वकीली करू नका जे आपल्या स्वत:शी अप्रामाणिक असतात. अल्लाह अशा लोकांना पसंत करीत नाही, जे अप्रामाणिक व दुराचरणी गुन्हेगार असतात.

وَلَا تُجَٰدِلْ عَنِ ٱلَّذِينَ يَخْتَانُونَ أَنفُسَهُمْ ۚ إِنَّ ٱللَّهَ
لَا يُحِبُّ مَن كَانَ خَوَّانًا أَثِيمًا ﴿١٠٧﴾

१०८. हे लोकांपासून लपून राहतात पण अल्लाहपासून लपूच शकत नाहीत.तो त्यावेळीसुद्धा त्यांच्याबरोबर असतो जेव्हा ते रात्रौ त्याच्या मर्जीविरुद्ध सल्लामसलत करीत असतात.[१८८]ते जे काही करीत आहेत त्याला अल्लाहने घेरलेले आहे.

يَسْتَخْفُونَ مِنَ ٱلنَّاسِ وَلَا يَسْتَخْفُونَ مِنَ ٱللَّهِ
وَهُوَ مَعَهُمْ إِذْ يُبَيِّتُونَ مَا لَا يَرْضَىٰ مِنَ ٱلْقَوْلِ ۚ وَكَانَ
ٱللَّهُ بِمَا يَعْمَلُونَ مُحِيطًا ﴿١٠٨﴾

१०९. पाहा. तुम्हीच आहात की ऐहिक जीवनामध्ये त्यांच्यातर्फे झगडा केलात. परंतु कियामतीच्या दिवशी कोण असेल जो त्यांच्यातर्फे अल्लाह बरोबर झगडा करील. किंवा कोण त्यांच्याबद्दल जबाबदार राहिल ? [१८९]

هَٰٓأَنتُمْ هَٰٓؤُلَآءِ جَٰدَلْتُمْ عَنْهُمْ فِى ٱلْحَيَوٰةِ ٱلدُّنْيَا فَمَن
يُجَٰدِلُ ٱللَّهَ عَنْهُمْ يَوْمَ ٱلْقِيَٰمَةِ أَم مَّن يَكُونُ عَلَيْهِمْ
وَكِيلًا ﴿١٠٩﴾

११०. जो माणूस काही वाईटपणा करील किंवा आपल्या आत्म्यावर अत्याचार करील आणि नंतर अल्लाहकडून माफी मागेल. तर तो अल्लाहला क्षमा करणारा, कृपा करणारा पावेल [१९०].

وَمَن يَعْمَلْ سُوٓءًا أَوْ يَظْلِمْ نَفْسَهُۥ
ثُمَّ يَسْتَغْفِرِ ٱللَّهَ يَجِدِ ٱللَّهَ غَفُورًا رَّحِيمًا ﴿١١٠﴾

१११. आणि जो माणूसही वाईटपणा कमवितो त्याच्या कमाईची आपत्ती त्याच्यावरच राहील. अल्लाह सर्वकाही जाणतो व तो बुद्धीमान आहे.

وَمَن يَكْسِبْ إِثْمًا فَإِنَّمَا يَكْسِبُهُۥ عَلَىٰ نَفْسِهِۦ ۚ وَكَانَ ٱللَّهُ
عَلِيمًا حَكِيمًا ﴿١١١﴾

११२. आणि ज्या माणसाने एखादा गुन्हा वा अपराध करून त्याचा आरोप एखाद्या निरपराधाच्या माथी मारला, त्याने मोठ्या आळाचा व उघड अशा गुन्ह्याचा भार आपल्या शिरावर घेतला. [१९१]

وَمَن يَكْسِبْ خَطِيٓـَٔةً أَوْ إِثْمًا ثُمَّ يَرْمِ بِهِۦ بَرِيٓـًٔا فَقَدِ ٱحْتَمَلَ
بُهْتَٰنًا وَإِثْمًا مُّبِينًا ﴿١١٢﴾

१८७. या आयतीमध्ये अपहाराशी अभिप्रेत अल्लाह व त्याच्या पैगंबरांच्याबरोबर कृतघ्नता आहे. जे लोक आपल्या ईमानामध्ये शुद्ध नव्हते ते काही नाकाही अशी हरकत करीत ज्याने इस्लामला नुकसान पोहोचत असे. आणि अल्लाह व त्याचे पैगंबर यांच्यासंबंधीची त्यांची चुकीची मनोवृत्ती स्पष्ट होत असे. परंतु हे लोक स्वत:ला मुसलमान म्हणवून घेत असल्याने मुस्लीम समाजाचा घटक बनले होते. आणि मुसलमानांचे त्यांच्याबरोबर आप्तसंबंध होते. जेव्हा त्यांच्या चुकीच्या हरकतीवर त्यांच्यावर टीका केली जात असे तेव्हा काही मुसलमान त्यांचे समर्थन करू लागत. येथे त्याचबाबतीत सावध केले गेले आहे. की अल्लाह व त्याचे पैगंबर यांच्याबरोबर वचनभंग करणाऱ्यांचे समर्थन करणे योग्य नाही. कोण सत्यावर आहे व कोण असत्यावर आहे याचा निर्णय अल्लाहच्या ग्रंथाद्वारे झाला पाहिजे व तो निर्भीडपणे केला गेला पाहिजे.

आयतीमध्ये पैगंबरांना संबोधिले गेले आहे.परंतु तंबी वस्तुत: आपल्याद्वारे त्या मुसलमानांना दिली जात आहे जे मुनाफिक लोकांचे समर्थन करीत होते.

१८८. इशारा आहे मुनाफिक लोकांच्या गुप्त बैठकीकडे व गुप्त कट-कारस्थानाकडे

१८९. म्हणजे कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणूस फक्त आपल्या कर्माबद्दल जबाबदार राहील आणि दूसऱ्यांच्या गुन्ह्यांच्या भाराचा तो स्वीकार करणार नाही. तर मग या जीवनात तुम्ही नामधारी मुसलमानांचे अनुचित समर्थन करून काय साधणार आहात?

१९०. जे लोक आपल्या ईमानामध्ये शुद्ध व सरळ नव्हते आणि इस्लामच्या वाढत्या शक्तीविरुद्ध पडद्याआड कट करीत होते. त्यांचे लक्ष वेधले गेले आहे की जर आतासुद्धा ते आपल्या हातून घडलेल्या हरकतीबद्दल पश्चात्ताप पावून अल्लाहची क्षमायाचना करीत असतील आणि अल्लाहबरोबर एकनिष्ठेचा संबंध जोडतील तर ते अल्लाहच्या क्षमेस व कृपेस पात्र होऊ शकतात.

१९१. इशारा आहे मुनाफिकांच्या त्या हालचालीकडे जेव्हा त्यांचा एखादा कट किंवा त्यांचा एखादा गुन्हा उघडकीस येत असे तेव्हा ते बतावणी करून त्याबद्दल दुसऱ्यास अपराधी ठरविण्याचा प्रयत्न करीत असत. पवित्र कुरआनने तत्वत: ही गोष्ट स्पष्ट केली की कोणताही अपराध वा गुन्हा घडणे हीच मुळी वाईट गोष्ट आहे. परंतु त्याचा आरोप एखद्या निरपराध व्यक्तीवर लादणे म्हणजे फार मोठा भार शिरावर घेणे होय. कारण गुन्ह्याबद्दल बहाणा करणे ही गुन्ह्यापेक्षा भयंकर अशी गोष्ट आहे.

११३. आणि जर तुमच्यावर अल्लाहची मेहेरबानी व त्याची कृपा नसती तर त्यांच्यापैकी एका गटाने तुम्हांला चुकीच्या मार्गावर नेण्याचा निश्चय केलेलाच होता. यद्यपि हे स्वत:लाच चुकीच्या मार्गावर नेत आहेत.हे तुमचे काही बिघडवू शकत नाहीत. अल्लाहने तुमच्यावर ग्रंथ व ज्ञान उतरविले आहे. आणि तुम्हाला ते सर्व शिकविळे आहे जे तुम्हाला माहित नव्हते.अल्लाहची तुमच्यावर फार मोठी मेहेरबानी आहे.[११२]

وَلَوْلَا فَضْلُ اللّٰهِ عَلَيْكَ وَرَحْمَتُهٗ لَهَمَّتْ طَّآئِفَةٌ مِّنْهُمْ
اَنْ يُّضِلُّوْكَ ؕ وَمَا يُضِلُّوْنَ اِلَّاۤ اَنْفُسَهُمْ وَمَا يَضُرُّوْنَكَ مِنْ
شَيْءٍ ؕ وَاَنْزَلَ اللّٰهُ عَلَيْكَ الْكِتٰبَ وَالْحِكْمَةَ وَعَلَّمَكَ
مَا لَمْ تَكُنْ تَعْلَمُ ؕ وَكَانَ فَضْلُ اللّٰهِ عَلَيْكَ عَظِيْمًا ﴿۱۱۳﴾

११४. त्यांच्या बहुतेक कानगोष्टीत काही चांगुलपणा असत नाही.[११३] होय, जो माणूस गुप्तपणे दानधर्म किंवा चांगली गोष्ट किंवा लोकांच्या दरम्यान मेळमिलाफ करण्यासाठी काही सांगेल तर त्यामध्ये अवश्य चांगुलपणा आहे.[११४] आणि जो कोणी अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी असली कामे करील त्याला आम्ही महान मोबदल्याने विभुषित करू.

لَا خَيْرَ فِيْ كَثِيْرٍ مِّنْ نَّجْوٰىهُمْ اِلَّا مَنْ اَمَرَ بِصَدَقَةٍ اَوْ
مَعْرُوْفٍ اَوْ اِصْلَاحٍۭ بَيْنَ النَّاسِ ؕ وَمَنْ يَّفْعَلْ ذٰلِكَ
ابْتِغَآءَ مَرْضَاتِ اللّٰهِ فَسَوْفَ نُؤْتِيْهِ اَجْرًا عَظِيْمًا ﴿۱۱۴﴾

११५. आणि जो माणूस मार्गदर्शन स्पष्ट झाल्यानंतर पैगंबरांचा विरोध करील आणि श्रद्धाधारकांच्या मोमिन लोकांच्या मार्गाला सोडून [११५]दुसरा एखादा मार्ग अवलंबिल त्याला आम्ही त्याच मार्गावर ठेवू ज्याकडे तो वळला. आणि त्याला जहन्नममध्ये दाखल करू, जी फार वाईट जागा आहे.

وَمَنْ يُّشَاقِقِ الرَّسُوْلَ مِنْۢ بَعْدِ مَا تَبَيَّنَ لَهُ
الْهُدٰى وَيَتَّبِعْ غَيْرَ سَبِيْلِ الْمُؤْمِنِيْنَ نُوَلِّهٖ
مَا تَوَلّٰى وَنُصْلِهٖ جَهَنَّمَ ؕ وَسَآءَتْ مَصِيْرًا ﴿۱۱۵﴾

११६. अल्लाह या गोष्टीची कधीच क्षमा करणार नाही की त्याच्या बरोबर कोणास सहभागी [११६] ठरवावे याशिवाय जे गुन्हे आहेत त्यांना तो ज्यांच्यासाठी इच्छिल त्यांच्यासाठी माफ करील. [११७] आणि ज्याने अल्लाहबरोबर सहभागी ठरविला तो मार्गभ्रष्ट होऊन फार दूर गेला.

اِنَّ اللّٰهَ لَا يَغْفِرُ اَنْ يُّشْرَكَ بِهٖ وَيَغْفِرُ مَا دُوْنَ ذٰلِكَ
لِمَنْ يَّشَآءُ ؕ وَمَنْ يُّشْرِكْ بِاللّٰهِ
فَقَدْ ضَلَّ ضَلٰلًاۢ بَعِيْدًا ﴿۱۱۶﴾

११७. हे लोक याला सोडून देवीदेवतांना पुकारतात [११८] आणि (वस्तुस्थिती ही आहे की) हे विद्रोही सैतानालाच पुकारतात.[११९]

اِنْ يَّدْعُوْنَ مِنْ دُوْنِهٖۤ اِلَّاۤ اِنٰثًا ۚ وَاِنْ يَّدْعُوْنَ
اِلَّا شَيْطٰنًا مَّرِيْدًا ﴿۱۱۷﴾

११८. अल्लाहने त्याची निर्भर्त्सना केलेली आहे [२००] त्याने (अल्लाहला) सांगितले होते की मी तुझ्या दासांपैकी एक ठराविक हिस्सा घेईनच.[२०१]

لَّعَنَهُ اللّٰهُ ۘ وَقَالَ لَاَتَّخِذَنَّ مِنْ عِبَادِكَ نَصِيْبًا
مَّفْرُوْضًا ﴿۱۱۸﴾

१९२. येथे हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधन करून ईमानधारकांना सावध केले गेले आहे की जर अल्लाहची कृपा झाली नसती तर मुनाफिक लोकांच्या उपद्रवापासून तुम्ही वाचू शकला नसता. ते तुमच्याविरुद्ध कट करीत आहेत. आणि तुम्हांला चुकीच्या मार्गावर लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या उपद्रवापासून वाचण्याचा मार्ग हा आहे की ज्या ग्रंथाने व शहाणपणाने अल्लाहने तुम्हांला उपकृत केलेले आहे त्याची कदर करा.

१९३. म्हणजे त्या मुनाफिक लोकांच्या कानगोष्टी बहुतेक उपद्रव व दंगा माजविण्यासाठी होत असत.

१९४. हे प्रोत्साहन आहे की गुप्तपणेही चांगुलपणाच्या गोष्टी कराव्यात व चांगुलपणाचे संकल्प केले जावेत.

१९५. मोमिन लोकांचा मार्गाने अभिप्रेत खऱ्या ईमानधारकांची पद्धत आहे. या आयतीच्या अवतरणकाली याचे उदाहरण श्रेष्ठ सहाबांकराम (पैगंबरांचे सहकारी अनुयायी) हे होते. त्यांनी इस्लामचा निष्ठेने अनुयय केला होता. ते पैगंबरांचे खरे निष्ठावान अनुयायी होते व ते त्यांचे पूर्णपणे अनुकरण करीत होते. आणि त्यांना पैगंबरांच्याकडून जी आज्ञा होत असे तिचे पालन करण्यामध्ये ते काही कसर ठेवीत नसत. गंभीर धोके पत्करावे लागले तरी ते त्याची पर्वा करीत नसत. दुसरीकडे मुनाफिक लोकांचा गट होता, जो स्वत:ला मुसलमान म्हणवून घेत असे. परंतु इस्लामचे निष्ठेने पालन करणे आणि पैगंबरांशी पूर्णपणे एकनिष्ठ असल्याचा पुरावा देणे त्यांच्यासाठी दुरापास्त होत असे. आणि म्हणून इस्लामच्या बाबतीत ते अशी पद्धत अंगिकारू इच्छित होते जी त्यांच्या ''हितसंबंधांना पूरक'' असेल म्हणजे हिताच्या दृष्टीने उचित. आणि त्यांना आपले विकार,आपला कल,आपली संपत्ती आणि आपले प्राण यांचा त्याग करावा लागू नये. ते रुढीवादी व निष्प्राण धार्मिकतेचा अंगिकार करून संतुष्ट होते. आणि समजत की जन्नतमध्ये जाण्यासाठी हा निकटचा व सोपा मार्ग आहे.

या विचारसरणीचे लोक आजही मुसलमान समाजामध्ये आढळून येतात. काळाच्या 'गरजेपोटी' व आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी ते इस्लाममध्ये एक नवीन पद्धत काढण्याबद्दल विवश आहेत. आणि म्हणून त्यांच्या 'धार्मिकतेमध्ये' आणि सरळमार्गी मुसलमानांच्या धार्मिकतेमध्ये जमीन अस्मानाची तफावत असते. एकाचे तोंड किब्ल्याकडे असते तर दुसऱ्याचे तोंड त्याच्या उलट दिशेला. एक इस्लामच्या आदेशावर निष्ठेने आचरण करण्याचा प्रयत्न करत असतो तर दुसरा निमित्त शोधून पलायनाची वाट अंगिकारतो. एक इस्लामला प्रकाशमान करतो तर दुसरा त्याच्यावर भौतिकतेचा पडदा पाडतो. एक गट इच्छितो की इस्लामचे कायदेकानून कायम रहावेत, परंतु दुसरा गट ते नष्ट व्हावेत असे इच्छितो. एक गट इस्लामी धर्मशास्त्रांच्या आदेशांच्या पालनावर जोर देतो तर दुसरा गट मानवनिर्मीत कायदेकानून लागू व्हावेत म्हणून प्रयत्नशील असतो. अशा प्रकारे दोहोंच्या दृष्टीकोनात, आचरणात आणि प्रयत्नांत पूर्वपश्चिमेचा फरक असतो. हे सर्व लोक मुस्लिम समाजातील समजले जातात. परंतु वस्तुत: या दुसऱ्या गटाचे लोक मुसलमान नसतात. अशाप्रकारचे लोक स्वत:ला मुसलमान म्हणवून घेत असले तरी ते आखिरतच्या जीवनामध्ये जहन्नमच्या शिक्षेस पात्र होऊ शकतात.

१९६. शिर्क'' च्या स्पष्टीकरणासाठी पाहा. सूरे निसा टिप नं.१११

१९७. म्हणजे शिर्क-अनेकेश्वरवाद-हा सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ माफीस अपात्र असा अपराध आहे. आणि म्हणून यापासून कोणत्याही परिस्थितीत अवश्य सुरक्षित राहीले पाहिजे.

१९८. पुकारण्याने अभिप्रेत गरजेची पूर्ती, संकटनिवारण व दाद मिळण्यासाठी पुकारणे होय. अनेकेश्वरवादी गरजेच्या पूर्तीसाठी देवदेवतांना पुकारत होते. कारण ते या गैरसमजाने ग्रासलेले असतात की परमेश्वराने आपल्या अधिकारांची त्यांच्यामध्ये विभागणी केलेली आहे. आणि म्हणून एखादी देवी धनदौलतीने समृदध करू शकते, तर कोणी आजाऱ्याला बरे करू शकते, कोणी संतती देते, तर कोणी दुर्दैवाला सुदैवात बदलू शकते. पवित्र कुरआन सांगतो आणि बुद्धि व स्वभावधर्म याचे समर्थन करतात की देवीदेवतांचे मुळात काही अस्तित्वच नाही. सर्व अधिकार आणि संपूर्ण सत्ता अल्लाहच्याच हाती आहे. आणि ईशत्वही एक अविभाज्य अशी शकती आहे. आणि असे असतांना गरजेच्या पूर्तीसाठी एखाद्याचा धावा करणे वस्तुत: त्याला उपास्य बनविणे होय. यद्यपि, वस्तुस्थिती ही की अल्लाहशिवाय कोणीही इबादतीस पात्र नाही.

ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की ''अनेकेश्वरवाद्यांच्या मग ते कोणत्याही समाजाचे वा राष्ट्राचे अनेकेश्वरवादी असोत देवमालेत देवींना सर्वात अधिक प्राधान्य मिळत आलेले आहे. चीन, हिंदुस्थान, अरबस्तान, इजिप्त आणि बॅबिलोनिया व नेनवा वगैरेच्या अनेकेश्वरवादी धर्मांचा जो इतिहास उपलब्ध आहे, त्यावर एक वरवरचा दृष्टिक्षेप टाकल्यास ह्याची पुष्टी होते. ही गोष्ट सुद्धा विशेषत्वाने लक्षांत ठेविले पाहिजे की जीवनाच्या ज्या मुख्य गरजा आहेत त्या अधिकांशी याच देवतांशी निगडीत समजल्या जातात. अरबस्तानातील अज्ञानकालातील ईश्वरीसंबंधांच्या व्यवस्थे मध्ये देखील अधिकांश देवतांचाच कब्जा होता. 'लात', 'मनात', 'उज्जा', वगैरे देवतांची नांवे आहेत. या ................फिरिश्त्यांच्या मूर्त्या होत्या, ज्यांच्यासंबंधी अनेकेश्वरवाद्यांची निष्ठा होती की या ईश्वराच्या

लाडक्या व आवडत्या मुली आहेत. त्यांचे म्हणणे ईश्वर कधीही टाळत नाही. या कारणामुळे त्यांच्या वशिल्याने जे काही मागितले जाईल, त्याबद्दल जर त्या प्रसन्न होतील तर ते अवश्य लाभेल.'' (तदब्बुरे कुरआन भा २ पान १६०)

स्पष्ट असो की अनेकेश्वरवाद हा फक्त अनेकेश्वरवादी (मूर्तीपूजक) लोकांमध्येच नव्हता तर ग्रंथ धारकसुद्धा अनेकेश्वरवादी समाजाने प्रभावित होऊन अनेकेश्वरवादी पद्धतींचा अवलंब करीत होते.

१९९. देवीदेवतांची कल्पना वस्तुत: सैतानाचा धोका आहे. आणि त्यांची पूजा अर्चा करण्याचा हुकूमे देखील शैतानच देतो. म्हणून जे लोक त्याच्या हुकूमाचे पालन करून अनेकेश्वरवादामध्ये गुरफटतात ते वस्तुत: शैतानाचेच पूजक आहेत.

२००. अल्लाहने शैतानाची निर्भर्त्सना केलेली आहे. आणि म्हणून तो चांगल्यापासून पूर्णपणे वंचित आणि नखशिखांत वाईट आहे. आणि म्हणून जे विचार तो माणसाच्या मनांमध्ये घालतो ते बहकविणारेच असतात. म्हणून माणसाने शैतानापासून सावध राहिले पाहिजे. आणि मनांत निर्माण होणाऱ्या विकृत विचारांच्या आहारी जाऊ नये.

२०१. हे इब्लिसचे वचन आहे जो शैतानांचा सरदार आहे. हे त्याने सर्वश्रेष्ठ अल्लाहला त्यावेळी सांगितले होते ज्यावेळी सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला निर्माण करून जमिनीवरील प्रतिनिधीत्त्वाचा मुकूट त्याच्या शिरावर ठेवला होता. सैतानाला माणसाबद्दल मत्सर वाटत होता. आणि त्याने कियामतीपर्यंत जिवंत राहण्याची सवलत सुद्धा सर्वश्रेष्ट अल्लाहकडून प्राप्त करून घेतली होती. आणि म्हणून त्याने आपल्या मनसुब्याची घोषणा केली की ईश्वराच्या दासांच्या एका मोठ्या संखेवर तो आपली सत्ता कायम राखील.

सैतान स्वत:हून एक असहाय निर्मिती आहे परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याला या जगात- जे जग त्याने माणसाच्या परिक्षेसाठीच निर्माण केलेले आहे माणसाला बहकाविण्याचे सामर्थ्य दिले आहे. आणि म्हणून त्याने दाव्याने ही घोषणा केली की, मी ईश्वराच्या दासांच्या एका मोठ्या गटाला मार्गभ्रष्ट करीन. यावरून हा गैरसमज होता कामा नये की शैतानाचे हे आव्हाहन त्याने ईश्वराच्या ईशर्वाविरुद्ध केलेले होते. जेव्हा त्याच्यासमोर ईश्वराने आपला मनोदय प्रकट केला आणि त्याला समजून चुकले की माणसाला मार्गभ्रष्ट करण्याचे सामर्थ्य त्याला लाभले आहे. तेव्हा त्याने आपला मनसुबा स्पष्ट केला की ईश्वराच्या एका मोठ्या गटाला मार्गभ्रष्ट करण्यामध्ये तो यशस्वी होईल.

स्पष्ट असो की, सर्वश्रेष्ठ अल्लाहने शैतानाला हा अधिकार दिलेला नाही की त्याने जबरदस्तीने माणसाला चुकीच्या मार्गावर न्यावे. त्याला फक्त चुकीच्या मार्गाकडे माणसाला बोलविण्याचा, गुन्ह्यासाठी प्रवृत्त करण्याचा आणि वाईटाला आकर्षक बनवून माणसासमोर सादर करण्याचा अधिकार दिलेला आहे. हेतु हा की, चांगल्या व वाईट प्रश्नाबाबतीत माणसाची परिक्षा व्हावी.

**आणि मी अवश्य त्यांना बहकाविन; त्यांना आशा दाखविन; त्यांना आज्ञा देईल तर ते जनावरांचे कान चिरतील आणि त्यांना आज्ञा देईल तर ते अल्लाहने बनविलेल्या रचनेमध्ये फेरफार करतील आणि ज्याने अल्लाहला सोडून सैतानाला आपला मित्र बनविला तो उघड उघड संकटात पडला. तो त्यांच्याशी वायदे करतो आणि त्यांना आशा दाखवितो आणि सैतानाचे वायदे म्हणजे उघड उघड भ्रम व फसवणूक होय.** *(अल-क़ुरआन)*

وَّلَاُضِلَّنَّهُمْ وَلَاُمَنِّيَنَّهُمْ وَلَاٰمُرَنَّهُمْ فَلَيُبَتِّكُنَّ اٰذَانَ الْاَنْعَامِ وَلَاٰمُرَنَّهُمْ فَلَيُغَيِّرُنَّ خَلْقَ اللّٰهِ ۚ وَمَنْ يَّتَّخِذِ الشَّيْطٰنَ وَلِيًّا مِّنْ دُوْنِ اللّٰهِ فَقَدْ خَسِرَ خُسْرَانًا مُّبِيْنًا ﴿۱۱۹﴾

११९. आणि मी अवश्य त्यांना बहकाविन; त्यांना आशा दाखविन; [२०२] त्यांना आज्ञा देईल तर ते जनावरांचे कान चिरतील [२०३] आणि त्यांना आज्ञा देईल तर ते अल्लाहने बनविलेल्या रचनेमध्ये फेरफार करतील [२०४] आणि ज्याने अल्लाहला सोडून सैतानाला आपला मित्र बनविला तो उघड उघड संकटात पडला.

يَعِدُهُمْ وَيُمَنِّيْهِمْ ۚ وَمَا يَعِدُهُمُ الشَّيْطٰنُ اِلَّا غُرُوْرًا ﴿۱۲۰﴾

१२०. तो त्यांच्याशी वायदे करतो आणि त्यांना आशा दाखवितो आणि सैतानाचे वायदे म्हणजे उघड उघड भ्रम व फसवणूक होय.

اُولٰٓئِكَ مَاْوٰىهُمْ جَهَنَّمُ ۫ وَلَا يَجِدُوْنَ عَنْهَا مَحِيْصًا ﴿۱۲۱﴾

१२१. अशा लोकांचे स्थान तर जहन्नम आहे आणि त्यांना त्या मधून पळून निघण्याचा कोणताही मार्ग आढळणार नाही.

وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ سَنُدْخِلُهُمْ جَنّٰتٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَآ اَبَدًا ۗ وَعْدَ اللّٰهِ حَقًّا ۗ وَمَنْ اَصْدَقُ مِنَ اللّٰهِ قِيْلًا ﴿۱۲۲﴾

१२२. आणि ज्यांनी ईमान आणले आणि चांगले कृत्ये केली त्यांना आम्ही अशा बांगामध्ये दाखल करू ज्याखालून जलप्रवाह वाहत असतील अल्लाहचा वायदा सत्य आहे आणि कोण आपल्या गोष्टीमध्ये अल्लाहहून अधिक खरा होऊ शकतो?

لَيْسَ بِاَمَانِيِّكُمْ وَلَآ اَمَانِيِّ اَهْلِ الْكِتٰبِ ۗ مَنْ يَّعْمَلْ سُوْٓءًا يُّجْزَ بِهٖ ۙ وَلَا يَجِدْ لَهٗ مِنْ دُوْنِ اللّٰهِ وَلِيًّا وَّلَا نَصِيْرًا ﴿۱۲۳﴾

१२३. (नजात-मुक्ती) ना तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे ना ग्रंथधारकांच्या इच्छेवर, जो कोणी वाईटपणा करील त्याचा मोबदला त्याला मिळेल. [२०५] आणि मग अल्लाहच्या विरोधात ना त्याला कोणी समर्थक मिळेल ना कोणी मदतनीस.

وَمَنْ يَّعْمَلْ مِنَ الصّٰلِحٰتِ مِنْ ذَكَرٍ اَوْ اُنْثٰى وَهُوَ مُؤْمِنٌ فَاُولٰٓئِكَ يَدْخُلُوْنَ الْجَنَّةَ وَلَا يُظْلَمُوْنَ نَقِيْرًا ﴿۱۲۴﴾

१२४. आणि जो चांगले आचरण करील-मग तो पुरुष असो वा स्त्री- जर तो मोमिन असेल तर असे लोक जन्नतमध्ये दाखल होतील आणि त्यांचा थोडा देखील हक्क हिरावून घेतला जाणार नाही.

وَمَنْ اَحْسَنُ دِيْنًا مِّمَّنْ اَسْلَمَ وَجْهَهٗ لِلّٰهِ وَهُوَ مُحْسِنٌ وَّاتَّبَعَ مِلَّةَ اِبْرٰهِيْمَ حَنِيْفًا ۗ وَاتَّخَذَ اللّٰهُ اِبْرٰهِيْمَ خَلِيْلًا ﴿۱۲۵﴾

१२५. आणि दीन धर्माच्या बाबतीत त्याच्याहून अधिक चांगला कोण होऊ शकतो की ज्याने स्वत:ला अल्लाहच्या स्वाधीन केले व जो सदाचरणीही आहे आणि ज्याने इब्राहिम यांच्या पद्धतीचे अनुकरण केले जे सरळमार्गी होते आणि अल्लाहने इब्राहिम यांना आपला सच्चा मित्र बनविले होते.[२०६]

२०२. सैतानाचा हा आटोकाट प्रयत्न असतो की माणसाने इस्लामबाबतीत वस्तुस्थितीनिष्ठ बनू नये. म्हणून तो इस्लामच्या मूलभूत गोष्टीसंबंधी चुकीच्या स्पष्टीकरणांत गोंधळून टाकून माणसाला चांगली वृश्ये दाखवू लागतो. हेच कारण आहे की लोक उघडउघड अनेकेश्वरवादात गुरफटलेले असतानादेखील ईश्वराच्या कृपेची अपेक्षा बाळगतात. आणि मुसलमानांच्यामध्येही अशा लोकांची कमतरता नाही, जे धर्मामध्ये नवीन गोष्टी व कटकटी निर्माण करून त्याच्या मुळावर घाव घालतात. आणि आपल्या या कर्तबगारी'बद्दल अल्लाहकडून मोबदल्याची आशा बाळगतात.

२०३. अनेकश्वरवादी लोक नवसाचे प्रतिक म्हणून जनावरांचे कान चिरीत असत. आणि त्यांना आपल्या उपास्य देवीदेवतांच्या नावांवर सोडीत असत.

२०४. अल्लाहने बनविलेल्या रचने मध्ये बदल घडवून आणण्याची एक पद्धत तर ती आहे, जी वर निवेदन केली गेली आहे. म्हणजे जनावरांचे कान चिरणे. या शिवाय त्याच्या दुसऱ्याही अनेक पद्धती होऊ शकतात. उदा. वंशवृद्धी होऊ नये म्हणून नसबंदी; नाजूकपणा निर्माण करण्यासाठी पोटरी वगैरेंचे मास कमी करणे; खच्ची करणे; लिंगबदल करणे; पुरूषाने स्त्री समान बनणे व स्त्रीने पुरूषासमान बनणे वगैरे वगैरे. वस्तुस्थिती ही आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाची जी रचना घडविली आहे, त्यामध्ये काही फेरबदल करण्याचा माणसाला अधिकार नाही. शरीअतीची रचणा करणाऱ्याने (अल्लाहने) अशी काही परवानगी दिली असल्यास प्रश्न वेगळा. उदा. खत्ना करणे. नखे काढणे, काखेतील केस काढणे वगैरे वगैरे. वस्तुत: या निसर्गाच्याच निकडी आहेत. किंवा माणसाच्या एखाद्या अवयवाची काटछाट करणे आत्यंत आवश्यक असेल, जसे काही परिस्थितीत शस्त्रक्रियाकरून हातपाय कापून काढावे लागतात. हे अपवाद वगळता अनेकेश्वांरवादी उद्दिष्टांसाठी किंवा आधुनिक संस्कृतीच्या नावांवर किंवा भ्रामक विचारांच्या प्रभावाखाली ईश्वराने बनविलेल्या रचनेत कोणत्याही प्रकारच्या बदलाचा अर्थ हा की आम्हांला आमची ती आकृती (मॉडेल) पसंत नाही जी आमाच्या निर्मात्याने बनविलेली आहे. परंतु आम्ही हे इच्छितो कि आपली आकृती स्वत:च्या पसंतीनुरुप असावी. उघड आहे की हा निसर्गाशी लढा आहे आणि सैतानी हालचालींचा परिणाम.

२०५. म्हणजे आखिरतच्या जीवनामध्ये जहन्नम पासून सुटका, चुकीच्या (आकांक्षा) आणि खोट्या आशामध्ये मग्न राहिल्याने होत नाही. तेथे तर आचरणानुसार मोबदला हा कायदा अंमलात राहील. जगामध्ये प्रत्येक धर्माचे लोक आपापल्या धर्माशी पारंपारिक सल्लग्नतेला आपल्या मुक्तीसाठी पुरी समजतात. आणि या गोड समजात मग्न असतात की आम्ही अमूकअमूक धार्मिक गुरूंचे अनुयायी आहोत. म्हणून आमचा बेडा पार आहे. मुसलमानसुद्धा अशाच प्रकारच्या भ्रामक समजुतींचे शिकार झालेले आहेत. परंतु पवित्र कुरआन सावध करीत आहे की आशाआकांशाने काही साध्य होणार नाही. अखिरतच्या जीवनात ज्या आधारावर निवाडा होईल तो माणसाची स्वत:ची निष्ठा व त्याचे सदाचरण हा आहे. म्हणून ज्या कोणाचे आचरण वाईट असेल त्याला त्याबद्दल जरूर शिक्षा मिळेल. मग तो स्वत:ला कोणत्याही धर्माशी संबंधित समजत असो.

१२६. जे काही आकाशामध्ये आहे आणि जे काही जमिनीवर आहे सर्व अल्लाहचेच आहे आणि अल्लाहने प्रत्येक गोष्टीला वेढलेले आहे.[२०७]

وَلِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ۭ وَكَانَ اللّٰهُ بِكُلِّ
شَيْءٍ مُّحِيْطًا ﴿١٢٦﴾

१२७. लोक तुम्हांला स्त्रीयासंबंधी फतवा-धर्मादिश-विचारतात [२०८] म्हणा, अल्लाह तुम्हाला त्यांच्या बाबतीत फतवा देत आहे त्याचबरोबर, (त्या आदेशांचे स्मरण करून देत आहे) जे तुम्हाला ग्रंथमध्ये अनाथ मुलींच्या बाबतीत ऐकविले जात आहेत [२०९] त्या अनाथ मुली ज्यांना तुम्ही त्यांचा ठरलेला हक्क देत नाही आणि इच्छिता की त्यांच्या बरोबर विवाह करावा. [२१०] अशा प्रकारे निराधार मुलांच्या बाबतीत जे आदेश दिले गेले आहेत. [२११] (त्यांचे पण स्मरण करून देत आहे) त्याचबरोबर या आज्ञेचीही की अनाथा बरोबर न्याय करा [२१२] आणि जी भलाई ही तुम्ही कराल, अल्लाह ती जाणतो.

وَيَسْتَفْتُوْنَكَ فِي النِّسَاۗءِ ۭ قُلِ اللّٰهُ يُفْتِيْكُمْ فِيْهِنَّ ۙ وَمَا
يُتْلٰى عَلَيْكُمْ فِي الْكِتٰبِ فِيْ يَتٰمَى النِّسَاۗءِ الّٰتِيْ لَا
تُؤْتُوْنَهُنَّ مَا كُتِبَ لَهُنَّ وَتَرْغَبُوْنَ اَنْ تَنْكِحُوْهُنَّ
وَالْمُسْتَضْعَفِيْنَ مِنَ الْوِلْدَانِ ۙ وَاَنْ تَقُوْمُوْا لِلْيَتٰمٰى
بِالْقِسْطِ ۭ وَمَا تَفْعَلُوْا مِنْ خَيْرٍ فَاِنَّ اللّٰهَ كَانَ بِهٖ عَلِيْمًا ﴿١٢٧﴾

१२८. जर एखाद्या स्त्रीला आपल्या पतीकडून अत्याचाराची व उपेक्षेची शंका असेल तर या गोष्टीमध्ये काही हरकत नाही की दोघांनी आपसात तडजोड करावी. आणि तडजोड करणेच अधिक चांगले आहे. [२१३] स्वभाव अनुदार व संकुचित बनतात.[२१४] परंतु जर तुम्ही चांगली वागणूक [२१५]ठेविलीत आणि तक्वा-ईश्वराचे भय-बाळगला तर खात्री बाळगा,तुम्ही जे काही कराल त्याची माहिती अल्लाहला आहे.

وَاِنِ امْرَاَةٌ خَافَتْ مِنْۢ بَعْلِهَا نُشُوْزًا اَوْ اِعْرَاضًا فَلَا
جُنَاحَ عَلَيْهِمَآ اَنْ يُّصْلِحَا بَيْنَهُمَا صُلْحًا ۭ وَالصُّلْحُ خَيْرٌ ۭ
وَاُحْضِرَتِ الْاَنْفُسُ الشُّحَّ ۭ وَاِنْ تُحْسِنُوْا وَتَتَّقُوْا فَاِنَّ اللّٰهَ
كَانَ بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرًا ﴿١٢٨﴾

१२९. तुम्ही स्त्रीयांच्यामध्ये न्याय करू इच्छित असाल. तरी पूरेपूर न्याय करू शकत नाही. पण असेही होऊ नये की एकीकडेच तुम्ही झुकावे आणि दुसरीला अशा प्रकारे सोडावे की जणू ती अधांतरी आहे. आणि जर तुम्ही व्यवहार चांगला ठेवला आणि अल्लाहचे भय बाळगून राहिला तर अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे. [२१६]

وَلَنْ تَسْتَطِيْعُوْٓا اَنْ تَعْدِلُوْا بَيْنَ النِّسَاۗءِ وَلَوْ حَرَصْتُمْ
فَلَا تَمِيْلُوْا كُلَّ الْمَيْلِ فَتَذَرُوْهَا كَالْمُعَلَّقَةِ ۭ وَاِنْ تُصْلِحُوْا
وَتَتَّقُوْا فَاِنَّ اللّٰهَ كَانَ غَفُوْرًا رَّحِيْمًا ﴿١٢٩﴾

१३०. आणि जर दोघे एकदुसऱ्यापासून अलगच होतील तर अल्लाह आपल्या संपन्नतेने प्रत्येकाला (दुसऱ्यापासून) स्वतंत्र करील. [२१७] अल्लाह मोठा संपन्न व मोठा ज्ञानी आहे.

وَاِنْ يَّتَفَرَّقَا يُغْنِ اللّٰهُ كُلًّا مِّنْ سَعَتِهٖ ۭ وَكَانَ
اللّٰهُ وَاسِعًا حَكِيْمًا ﴿١٣٠﴾

२०६. अल्लाहचा सच्चा दोस्त - हा फार मोठा सन्मान आहे. जो सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांना दिला आहे. बायबलनेही याचे समर्थन होते.''हे याकूब, ज्याला मी पसंत केले आहे, जो माझा दोस्त इब्राहीम याच्या वंशातून आहे.'' (यशोआ ८. ४१)

२०७. इशारा या गोष्टीकडे आहे की अल्लाहची सत्ता सर्वव्यापी आहे. तसेच त्याचे ज्ञानही सर्वव्यापी आहे.

२०८. सूरतीच्या सुरवातीला न्यायाच्या अटीसह भार्यांच्या संख्ये संबंधी जी परवानगी दिली गेली आहे त्यासंबंधी काही प्रश्न निर्माण झाले होते. त्यांचे उत्तर येथे दिले गेले आहे. हे उत्तर आयत नं. १२८ मध्ये नमूद आहे. आणि या उत्तरावरून प्रश्नाचे स्वरुप स्वयंस्पष्ट होते.

२०९. लोकांच्या मूळ प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी त्या आदेशांचे स्मरण करुन दिले गेले आहे ज्यामध्ये अनाथांचे हक्क आणि विशेष करून अनाथ मुलींच्याबरोबर न्याय करण्याची शिकवण दिली गेली आहे.यावरुन अंदाज होतो की अल्लाहजवळ अनाथांच्या हक्कांचे काय महत्त्व आहे. आणि ते अदा करण्याबद्दल किती कडक ताकिद दिली गेली आहे.

२१०. इशारा आयत नं. ३ कडे आहे. त्यामध्ये फर्माविले गेले आहे की, जर तुम्हांला शंका असेल की तुम्ही अनाथांच्या बरोबर न्याय करु शकणार नाही तर ज्या स्त्रीयां तुमच्यासाठी वैध आहेत त्यांच्यामधून दोन-दोन, तीन-तीन आणि चार चार बरोबर विवाह करा. येथे स्पष्ट केले की ''त्या अनाथ मुली ज्यांचा ठरलेला हक्क तुम्ही त्यांना देत नाही आणि इच्छिता की त्यांच्या बरोबर विवाह करावा.'' यावरून स्पष्ट होते की आयत नं.३ मध्ये अनाथाने अभिप्रेत अनाथ मुली आहेत आणि त्यांच्याबरोबर न्याय न करण्याने अभिप्रेत त्यांचा ठरलेला हक्क अदा न करणे हे आहे. या ठरलेल्या हक्कामध्ये त्यांच्या वारसा हक्काचा (त्यांच्या बापाने सोडलेली संपत्ती) सुद्धा समावेश आहे. आणि ही गोष्टही सामील आहे की जर कोणी एक पत्नी असतांना अनाथ मुलीशी लग्न केले तर त्याने त्या अनाथ मुलीबरोबर ही बरोबरीचा व्यवहार केला पाहिजे.

आयतीचे संबोधन जरी सार्वजनिक असेल तरी येथे विशेष करुन अनाथ मुलींच्या पालकांना संबोधित केले गेले आहे. हजरत आयेशा (रजि.) यांच्या निवेदनावरून हा बोध होतो की ज्या अनाथ मुली श्रीमंत असून शिवाय सौंदर्यवान होत्या यांच्याशी यांचे संरक्षकच विवाह करीत. आणि त्यांच्या संपत्तीचे स्वामी बनत. त्यांचा विवाह इतर ठिकाणी करण्याची टाळाटाळ यासाठी करीत होते, की त्यांना त्यांचा वारसा हक्क द्यावा लागू नये. (तफसीर इब्ने कसीर भाग १ पान २६१ )

यावरुन हा गैरसमज न होवो की कुरआन अनाथ मुलींच्याबरोबर विवाहची हिम्मत नाहीशी करू इच्छितो. कारण अनाथ मुलीला सहचारिणी बनविणे हे एक सत्कृत्य आहे. परंतु हे कार्य जेव्हा एखाद्याची संपत्ती हडप करण्यासाठी केले जाते किंवा एक पत्नी हयात असताना एखाद्या अनाथ मुलीबरोबर तिला अप्रतिष्ठित समजून विवाह करणे आणि समान न्यायाच्या अटीला डावलून बहुपत्नीकत्त्वाच्या कायद्याचा लाभ उठविणे,या गोष्टी सदाचाराच्या गोष्टी नव्हेत.

यावरुन या गोष्टीवरही प्रकाश पडतो की इस्लाम मध्ये खरे महत्व व्यक्तीच्या नैतिक वर्तनास आहे. आणि म्हणून त्याला त्या पैलूने विचार केला पाहिजे. निव्वळ समस्यांची सोडवणूक' करण्याच्या दृष्टीने नव्हे.

२११. इशारा आहे त्या आदेशांकडे जे सूरतीच्या सुरवातीत नादान लोकांना त्यांची संपत्ती स्वाधीन करण्यासंबंधी तसेच मुलांचे वारसाहक्कांसंबंधी दिले गेले होते.

२१२. इशारा आहे त्या आदेशांकडे जे सूरतीच्या सुरवातीच्या आयतीमध्ये अनाथासंबंधी दिले गेले होते.

११३. हे आहे मूळ प्रश्नाचे उत्तर क़ुरआनने बहुपत्नीत्वाच्या परवानगीस न्यायाच्या अटीने जे बद्ध केलेले आहे. त्यावरून हा प्रश्न उद्‌भवतो की, जर एखादी व्यक्ती आपल्या पहिल्या पत्नीबरोबर न्यायाची वागणूक न करील आणि त्या पत्नीला ही शंका जाणवत असेल की तिने जर त्याबद्दल आग्रह धरला तर तिला तो माणूस घटस्फोट देईल-आणि तिची इच्छा नाही की त्याने घटस्फोट द्यावा-तर काय अशा परिस्थितीत पत्नी आपले काही हक्क सोडून पतीला या गोष्टीसाठी प्रवृत्त करू शकते की त्याने घटस्फोट न द्यावा? सर्वश्रेष्ठ अल्लाहने याचे उत्तर होकारार्थी दिले आहे. म्हणजे जर एखादी स्त्री, जिला वाटत असेल की तिचा पती, तिचे हक्क अदा करण्यास तयार नाही किंवा याबाबतीत बेपर्वा आहे आणि त्याबाबतीत आग्रह धरल्यास घटस्फोटाची शक्यता आहे तर आपसात समझोता करणे अधिक इष्ट आहे. अशा परिस्थितीत स्त्री आपल्या काही हक्कापासून वंचित होऊ शकते. तरीपण घटस्फोटाच्या बाबतीत दूरदर्शीपणाने तडजोड करणे अधिक इष्ट आहे.

२१४. म्हणजे सामाजिक संबंधामध्ये बिघाडाला संकुचित मनोवृत्तीचा फार मोठा दखल असतो. आणि हा संकुचित दृष्टिकोन पुरुषाकडूनही होऊ शकतो आणि स्त्रीकडूनही होऊ शकतो. जर उभयंता मोठ्या मनाने एक दुसऱ्याबरोबर वागतील तर एक दुसऱ्याचे हक्कही अदा होऊ शकतात. आणि घरचे

वातावरणही प्रसन्न राहू शकते.

२१५. येथे पुरुषाला प्रोत्साहन दिले गेले आहे की त्याने आपल्या सहधर्मचारीणीबरोबर परोपकाराचे व संयमाचे वर्तन अंगिकारावे.

२१६. बहुपत्नीत्वाच्या संदर्भात न्यायाला आवश्यक ठरविले गेले आहे. त्यासंबंधात हा प्रश्न उद्‌भवतो की प्रेम व आकर्षण सर्व भार्यांच्या बाबतीत समान असू शकत नाही. आणि सर्वांबरोबर एकसारखा शरीरसंबंधही ठेवला जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत न्यायाच्या अटीचे कसे काय पालन होऊ शकते? या प्रश्नाचे उत्तर येथे हे दिले गेले आहे की, या मर्यादेपर्यंत समानता तर माणसाला शक्यच नाही. कारण स्त्रीयांमध्ये निरनिराळ्या दृष्टीने फरक देखील असतो.उदा. सौंदर्य, स्वभाव,वय,आरोग्य व पात्रता वगैरेंच्या दृष्टीने एक दुसरीपेक्षा वरचढ असते. आणि या आधारावर पुरुषाचा कल एखादीकडे अधिक असू शकतो. आणि म्हणून शरीअत भार्यांच्या दरम्यान अशी समानता प्रस्थापित करण्याची मागणी करीत नाही,जी माणसाच्या आटोक्यात नसते. याउलट शरीअतची मागणी ही आहे की आपल्या भार्यांच्या बाबतीत शक्यतेनुसार न्याय करा आणि एका भार्येकडे इतके झुकू नका की दुसरी अधांतरी राहील. तुम्हांला दोघींचे हक्क अदा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्यामध्ये काही कमतरता झाल्यास त्याची सुधारणा केली पाहिजे. सुधारणा व संयम यांचा अंगिकार केल्यानंतर देखील काही चुका झाल्या तर अल्लाहशी ही अपेक्षा ठेवली पाहिजे की तो त्या माफ करील.

२१७. म्हणजे प्रयत्न करूनही निभाव होऊ शकला नाही. आणि पती-पत्नीला एका दुसऱ्यापासून वेगळे होण्याची आवश्यकता पडली तर त्यांनी अल्लाहवर भरवसा ठेवला पाहिजे. तो उभयतांना आपल्या कृपेने समृद्ध करील.

**आकाशांमधील व जमीनीवरील सर्व विद्यमान वस्तू अल्लाहाच्याच मालकीच्या आहेत. तुमच्यापूर्वी ज्यांना ग्रंथ दिला गेला होता त्यांनाही आम्ही हा उपदेश केला होता. आणि तुम्हालाही हा उपदेश करीत आहोत की अल्लाहचे भय बाळगून राहा. आणि जर तुम्ही कुफ्र-इन्कार-कराल तर (याद राखा) जे काही आकाशामध्ये आहे व जे काही जमिनीमध्ये आहे, ते सर्व अल्लाहसाठीचे आहे.अल्लाह निरपेक्षा, (स्वच्छंद) व गुणवैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे.** *(अल-क़ुरआन)*

१३१. आकाशांमधील व जमीनीवरील सर्व विद्यमान वस्तू अल्लाहाच्याच मालकीच्या आहेत. तुमच्यापूर्वी ज्यांना ग्रंथ दिला गेला होता त्यांनाही आम्ही हा उपदेश केला होता. आणि तुम्हालाही हा उपदेश करीत आहोत की अल्लाहचे भय बाळगून राहा. आणि जर तुम्ही कुफ्र-इन्कार-कराल तर (याद राखा) जे काही आकाशामध्ये आहे व जे काही जमीनीमध्ये आहे, ते सर्व अल्लाहसाठीचे आहे. अल्लाह निरपेक्ष,(स्वच्छंद) व गुणवैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे.

وَلِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ؕ وَلَقَدْ وَصَّيْنَا الَّذِيْنَ
اُوْتُوا الْكِتٰبَ مِنْ قَبْلِكُمْ وَاِيَّاكُمْ اَنِ اتَّقُوا اللّٰهَ ؕ وَاِنْ تَكْفُرُوْا
فَاِنَّ لِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ؕ وَكَانَ اللّٰهُ
غَنِيًّا حَمِيْدًا ﴿۱۳۱﴾

१३२. आकाशांच्या व जमीनीच्या सर्व गोष्टींचा स्वामी अल्लाहच आहे.[२१८] आणि कार्य तडीस नेण्यास अल्लाह पुरेसा आहे.

وَلِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ؕ وَكَفٰى بِاللّٰهِ
وَكِيْلًا ﴿۱۳۲﴾

१३३. जर त्याने इच्छिले तर, हे लोकांनो ! तो तुम्हाला हटवील आणि (तुमच्या जागी) दुसऱ्यांना घेऊन येईल. अल्लाह याबाबतीत पूर्ण समर्थ आहे.

اِنْ يَّشَاْ يُذْهِبْكُمْ اَيُّهَا النَّاسُ وَيَاْتِ بِاٰخَرِيْنَ ؕ وَكَانَ
اللّٰهُ عَلٰى ذٰلِكَ قَدِيْرًا ﴿۱۳۳﴾

१३४. जो माणूस ऐहिक जीवनाच्या मोबदल्याचा इच्छुक आहे, (त्याला हे समजावयास हवे की) अल्लाहजवळ ऐहिक व आखिरत या दोन्ही जीवनाचा मोबदला आहे.[२१९] आणि अल्लाह सर्वकाही ऐकणारा व सर्वकाही पाहणारा आहे.

مَنْ كَانَ يُرِيْدُ ثَوَابَ الدُّنْيَا فَعِنْدَ اللّٰهِ ثَوَابُ الدُّنْيَا
وَالْاٰخِرَةِ ؕ وَكَانَ اللّٰهُ سَمِيْعًا بَصِيْرًا ﴿۱۳۴﴾

१३५. हे ईमान धारकांनो ! न्यायावर पूर्णपणे क़ायम राहणारे आणि अल्लाहसाठी साक्ष देणारे बना, जरी अशी साक्ष खुद्द स्वतःतुम्ही, तुमचे आईबाप आणि जवळचे नातलग यांच्याविरुद्ध जात असेल.[२२०] कोणी श्रीमंत असेल किंवा गरीब, अल्लाहचा हक्क त्यांचेवर सर्वापेक्षा अधिक आहे.[२२१] म्हणून विकारांच्या अनुसरणात न्यायाची उपेक्षा करू नका.आणि जर तुम्ही चुकवाचुकवी किंवा दुर्लक्ष केले तर याद राखा, अल्लाह तुमच्या कारवाया जाणून आहे.[२२२]

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا كُوْنُوْا قَوّٰمِيْنَ بِالْقِسْطِ شُهَدَآءَ لِلّٰهِ
وَلَوْ عَلٰۤى اَنْفُسِكُمْ اَوِ الْوَالِدَيْنِ وَالْاَقْرَبِيْنَ ۚ اِنْ يَّكُنْ غَنِيًّا
اَوْ فَقِيْرًا فَاللّٰهُ اَوْلٰى بِهِمَا ۫ فَلَا تَتَّبِعُوا الْهَوٰۤى اَنْ تَعْدِلُوْا ۚ
وَاِنْ تَلْوٗۤا اَوْ تُعْرِضُوْا فَاِنَّ اللّٰهَ كَانَ بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرًا ﴿۱۳۵﴾

२१८. "आकाशांच्या व जमीनींच्या सर्व गोष्टींचा स्वामी अल्लाह आहे, येथे या वचनाची तीन वेळा पुनरावृत्ती झाली आहे. (आयत नं. १३१ मध्ये दोन वेळा आणि आयत नं. १३२ मध्ये एक वेळा.) ही निव्वळ निरर्थक द्विरुक्ती नव्हे. तर निरनिराळ्या पैलूने हे सत्य मनावर बिबविणे हा त्याचा उद्देश आहे. स्वामी फक्त ती एकटीच शक्ती आहे आणि म्हणून तिच्याशीच आपल्या आशा आकांक्षा निगडीत केल्या पाहिजेत. तिचेच भय बाळगले पाहिजे. तिलाच आपले अग्रस्थान मानले पाहिजे. पहिल्या प्रथम या वचनाचा उल्लेख या पैलूने आहे की, जी शक्ती आकाश व जमीनीच्या विद्यमान गोष्टींची स्वामी आहे, ती संकुचित दृष्टीची व कृपण होऊ शकत नाही. ती नि:संशय मोठी उदार व मोठी दानशूर आहे.

तो अल्लाह नि:संशय मोठा उदार व मोठा दानशूर आहे आणि म्हणून तुम्ही (पती पत्नीच्या विभक्तपणाच्या स्थितीत) ही आशा बाळगू शकता की तो तुमच्यामधील प्रत्येकाला आपल्या कृपेने समृद्ध करील. दुसऱ्या वेळेस याची पुनरुक्ती करण्याचा उद्देश हे स्पष्ट करणे हा आहे की जे सामाजिक आदेश दिले गेले आहेत ते तुमच्या स्वत:च्या भलाईसाठी आहेत त्याच्याशी अल्लाहचा काही फायदा निगडीत नाही. तुम्ही जरी इन्कार केला-कुफ्र केले-तरी त्याने सर्वश्रेष्ठ अल्लाहचे काही बिघडणार नाही. कारण सारे विश्व त्याच्याचसाठी आहे. आणि त्याला कोणत्याही गोष्टींची आवश्यकता व अपेक्षा नाही. आणि तो सर्व प्रकारच्या पूर्णत्त्वाने परिपूर्ण आहे. आणि तिसऱ्या वेळेला त्याचा उच्चार करण्याचा हेतू हा आहे की दासांनी त्याच्यावरच भरवसा ठेवावा.

२१९. म्हणजे अल्लाहजवळ भौतिक फायदेही आहेत आणि आखिरतच्या जीवनाचे फायदेसुद्धा. आता ही तुमच्या पात्रतेची व हिम्मतीची गोष्ट आहे की तुम्ही फक्त भौतिक फायदे प्राप्त करू इच्छिता की भौतिक व आखिरत दोन्ही जीवनाचे. जर दोहोंचे फायदे प्राप्त करू इच्छिता तर अल्लाहची भक्ती व आज्ञापालनाचा मार्ग अवलंबा.

२२०. या आयतीमध्ये न्यायावर दृढपणे कायम राहण्याबद्दल निर्भीड, न्याय करण्याबद्दल आणि नि:पक्षपाती वृत्तीने आणि अगदी नि:स्वार्थीपणाने निव्वळ अल्लाहसाठी साक्ष देण्याची शिकवण दिली गेली आहे. ही न्यायनीती व सत्त्याच्या साक्षीची उच्चतम अशी कसोटी आहे. या कसोटीवर ईमानधारकांनी उतरावे अशी सर्वश्रेष्ठ अल्लाहची इच्छा आहे. दासांच्या हक्कांत सर्वात मोठा हक्क मात्यापित्याचा आहे. परंतु कुरआनच्या दृष्टीने सत्यप्रियतेची निकड ही आहे की निर्भीड न्याय्य केला जावा. आणि सत्त्याच्या साक्षीच्या बाबतीत त्यांचीही तरफदारी केली जाऊ नये आणि जेव्हा मातापित्याची तरफदारी करणे योग्य नाही तर मग त्यांच्यानंतर ज्यांचा दर्जा आहे त्यांची तरफदारी करण्याचा प्रश्नच कोठे उदभवतो? दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास ही मूलभूत शिकवण सर्व प्रकारच्या अयोग्य पूर्वग्रह व पक्षपाताचे मूळ नष्ट करते आणि हे स्पष्ट करते की माणसाचे स्थान कितीही उच्च असले तरी न्यायाच्या बाबतीत सर्व समान आहेत.

२२१. म्हणजे अल्लाहचा हक्क सर्वांहून मोठा आहे. म्हणून अल्लाहच्या न्यायाच्या कायद्यासमोर सर्व समान आहेत.

२२२. म्हणजे दाव्यामध्ये स्पष्ट अशी साक्ष दिली पाहिजे आणि साक्ष देण्यापासून अलिप्त राहू नये. नाहीपेक्षा याबातीत अल्लाहकडून पकड होईल.

१३६. हे ईमानधारकांनो ! ईमानाचा अंगिकार करा [२२३] अल्लाहवर आणि त्याच्या पैगंबरांवर आणि या ग्रंथावर जो त्याने आपल्या पैगंबरांवर उतरविला आहे, आणि त्या ग्रंथावरही जो त्याने यापूर्वी उतरविला आहे. आणि ज्याने अल्लाह आणि त्याचे फरिश्ते आणि त्याचे ग्रंथ आणि त्याचे पैगंबर आणि शेवटचा दिवस यांच्याशी कुफ्र [२२४] (इन्कार केला),तो बहकून मार्गभ्रष्टतेत फार दूर निघून गेला.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اٰمِنُوْا بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ وَالْكِتٰبِ الَّذِيْ نَزَّلَ
عَلٰى رَسُوْلِهٖ وَالْكِتٰبِ الَّذِيْٓ اَنْزَلَ مِنْ قَبْلُ ۭ وَمَنْ يَّكْفُرْ بِاللّٰهِ
وَمَلٰۗىِٕكَتِهٖ وَكُتُبِهٖ وَرُسُلِهٖ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ فَقَدْ ضَلَّ ضَلٰلًۢا
بَعِيْدًا ﴿١٣٦﴾

१३७. ज्या लोकांनी ईमान आणले व नंतर कुफ्र (इन्कार) केला. मग ईमान आणले पुन्हा इन्कार केला आणि कुफ्रमध्ये वाढच होत गेली, अशा लोकांना अल्लाह कदापिही माफ करणार नाही. आणि त्यांना मार्ग दाखविणार नाही.

اِنَّ الَّذِيْنَ اٰمَنُوْا ثُمَّ كَفَرُوْا ثُمَّ اٰمَنُوْا ثُمَّ كَفَرُوْا ثُمَّ ازْدَادُوْا
كُفْرًا لَّمْ يَكُنِ اللّٰهُ لِيَغْفِرَ لَهُمْ وَلَا لِيَهْدِيَهُمْ سَبِيْلًا ﴿١٣٧﴾ۭ

१३८. दांभिक लोकांना खुष खबर द्या की त्यांच्यासाठी दु:खदायक शिक्षा आहे.

بَشِّرِ الْمُنٰفِقِيْنَ بِاَنَّ لَهُمْ عَذَابًا اَلِيْمَا ﴿١٣٨﴾ۙ

१३९. जे मोमिन लोकांच्याऐवजी काफिर लोकांना आपला मित्र बनवितात, काय ते त्यांच्याजवळ मानसन्मानाची अपेक्षा करतात ? मानसन्मान तर पूरेपूर अल्लाहसाठीच आहे.[२२५]

الَّذِيْنَ يَتَّخِذُوْنَ الْكٰفِرِيْنَ اَوْلِيَاۗءَ مِنْ دُوْنِ الْمُؤْمِنِيْنَ ۭ
اَيَبْتَغُوْنَ عِنْدَھُمُ الْعِزَّةَ فَاِنَّ الْعِزَّةَ لِلّٰهِ جَمِيْعًا ﴿١٣٩﴾ۭ

१४०. ज्याने आपल्या ग्रंथामध्ये तुम्हाला हा उपदेश केलेला आहे [२२६] की जेव्हा तुम्ही ऐकाल (वा पाहाल) की अल्लाहच्या आयतींचा इन्कार केला जात आहे, आणि त्यांची थट्टा उडविली जात आहे तर त्यांच्याबरोबर बसू नका; जोपर्यंत ते एखाद्या दुसऱ्या गोष्टीकडे न वळतील. नाहीपेक्षा तुम्ही पण त्यांच्यासारखेच व्हाल.[२२७] अल्लाह सर्व दांभिक व काफिर लोकांना जहन्नम मध्ये एकत्र करणार आहे.

وَقَدْ نَزَّلَ عَلَيْكُمْ فِي الْكِتٰبِ اَنْ اِذَا سَمِعْتُمْ اٰيٰتِ اللّٰهِ يُكْفَرُ
بِهَا وَيُسْتَهْزَاُ بِهَا فَلَا تَقْعُدُوْا مَعَهُمْ حَتّٰي يَخُوْضُوْا فِيْ
حَدِيْثٍ غَيْرِهٖٓ ڮ اِنَّكُمْ اِذًا مِّثْلُهُمْ ۭ اِنَّ اللّٰهَ جَامِعُ
الْمُنٰفِقِيْنَ وَالْكٰفِرِيْنَ فِيْ جَهَنَّمَ جَمِيْعَۨا ﴿١٤٠﴾ۙ

२२३. येथे ''ईमान आणणारे'' म्हणजे सर्वसाधारण मुसलमान आहेत जे याचा स्वीकार करतात की त्यांचा धर्म इस्लाम आहे मग ते आपल्या ईमानामध्ये सच्चे असोत वा नसोत. त्यांच्याकडे ईमान आणण्याच्या केलेल्या मागणीचा अर्थ हा की त्यांनी मनापासून ईमान आणावे आणि त्यांनी सच्चे व पक्के मोमिन बनावे.

२२४. कुफ्रचा एक प्रकार हा आहे की माणसाने उघड उघड इन्कार करावा आणि दुसरा प्रकार हा आहे की तोंडाने तर स्वीकार करावा पण मनापासून त्याला मानु नये.

२२५. समजले की, मुसलमानांच्या हितसंबंधाविरुद्ध इन्कार करणाऱ्या काफिर लोकांबरोबर खुर्ची व हुद्दा मिळावा व लोकांनी आपणास मान द्यावा म्हणून मैत्री करणे हे ढोंगीपणाचे कृत्य आहे. कोणता ही सच्चा मुसलमान आपल्या समाजाबरोबर विश्वासघाताचे असे कृत्य करणार नाही.

पवित्र कुरआनची ही स्पष्ट शिकवण असतांना देखील आज मुसलमान समाजामध्ये अशा लोकांची कमतरता नाही जे इस्लामी समाजाबरोबर द्रोह करून काफिर लोकांच्याकडे पाऊल उचलतात. आणि वाटेल ते मोल देऊन त्यांना खुष करण्याचा प्रयत्न करतात. हेतू हा की त्यांना मानाचे स्थान लाभावे. अरेरे! त्यांना जर हे माहित असते की, ज्याने ते खूष झाले आहेत तो खोटा मान आहे. खरा मान तर अल्लाहजवळच आहे. आणि त्याला प्रसन्न करणारे कार्य करूनच तो प्राप्त केला जाऊ शकतो.

२२६. इशारा सूरे ''अनआम''च्या आयत नं. ६८ कडे आहे.

२२७. ज्या बैठकांमध्ये, सभा संमेलनांमध्ये अल्लाहची जीवन पद्धती व त्याचे आदेश व शिकवण यांच्याविरूद्ध नास्तिक विचार प्रकट केले जातात किंवा त्यांची थट्टा उडविली जाते. त्याच्यामध्ये सहभागी होणे ईमान धारकांच्या स्वाभिमानाविरुद्ध आहे.

الَّذِينَ يَتَرَبَّصُونَ بِكُمْ فَإِن كَانَ لَكُمْ فَتْحٌ مِّنَ اللَّهِ قَالُوٓا
أَلَمْ نَكُن مَّعَكُمْ وَإِن كَانَ لِلْكَٰفِرِينَ نَصِيبٌ قَالُوٓا أَلَمْ
نَسْتَحْوِذْ عَلَيْكُمْ وَنَمْنَعْكُم مِّنَ الْمُؤْمِنِينَ فَاللَّهُ يَحْكُمُ
بَيْنَكُمْ يَوْمَ الْقِيَٰمَةِ وَلَن يَجْعَلَ اللَّهُ لِلْكَٰفِرِينَ عَلَى
الْمُؤْمِنِينَ سَبِيلًا ﴿١٤١﴾

**१४१.** हे लोक तुमच्या संबंधात परिणामाची प्रतिक्षा करीत आहेत. जर तुम्हांला अल्लाहकडून विजय लाभला तर म्हणतात की काय आम्ही तुमच्याबरोबर नव्हतो ? आणि जर काफिरांची बाजू भक्कम झाली तर म्हणतील, काय आम्ही तुमच्यापेक्षा वरचढ झालो नव्हतो? तरीही आम्ही तुम्हांला मुसलमानांचेपासून वाचविले. आता अल्लाहच कियामतीच्या दिवशी तुमच्या दरम्यान निर्णय करील.आणि अल्लाह काफिर लोकांच्यासाठी ते मोमिन लोकांच्यावर वरचढ होतील असा कोणताही मार्ग कदापिही ठेवणार नाही.

إِنَّ الْمُنَٰفِقِينَ يُخَٰدِعُونَ اللَّهَ وَهُوَ خَٰدِعُهُمْ وَإِذَا قَامُوٓا
إِلَى الصَّلَوٰةِ قَامُوا كُسَالَىٰ يُرَآءُونَ النَّاسَ وَلَا يَذْكُرُونَ
اللَّهَ إِلَّا قَلِيلًا ﴿١٤٢﴾

**१४२.** मुनाफिक (दांभिक) लोक अल्लाहबरोबर धोकेबाजी करीत आहोत.[२२८] यद्यपि अल्लाहनेच त्यांना धोक्यामध्ये ठेवलेले आहे. जेव्हा हे नमाजसाठी उभे राहतात तेव्हा सुस्तीने उभे राहतात. निव्वळ लोकांना दाखविण्यासाठी. [२२९] आणि अल्लाहचे थोडेच स्मरण करतात. [२३०]

مُّذَبْذَبِينَ بَيْنَ ذَٰلِكَ لَآ إِلَىٰ هَٰٓؤُلَآءِ وَلَآ إِلَىٰ هَٰٓؤُلَآءِ وَمَن
يُضْلِلِ اللَّهُ فَلَن تَجِدَ لَهُۥ سَبِيلًا ﴿١٤٣﴾

**१४३.** दोहोंच्यामध्ये अधांतरी आहेत. न यांच्याकडे आहेत आणि न त्यांच्याकडे. आणि अल्लाह ज्याला बहकवितो त्याच्यासाठी तुम्ही एखादा मार्ग काढू शकत नाही.[२३१]

يَٰٓأَيُّهَا الَّذِينَ ءَامَنُوا لَا تَتَّخِذُوا الْكَٰفِرِينَ أَوْلِيَآءَ مِن
دُونِ الْمُؤْمِنِينَ أَتُرِيدُونَ أَن تَجْعَلُوا لِلَّهِ عَلَيْكُمْ سُلْطَٰنًا
مُّبِينًا ﴿١٤٤﴾

**१४४.** हे ईमानधारकांनो ! ईमानधारकांच्या ऐवजी काफिर लोकांना आपला मित्र बनवू नका [२३२] काय तुम्ही इच्छिता की तुमच्याविरुद्ध अल्लाहचा पुरावा स्पष्टपणे कायम व्हावा?

إِنَّ الْمُنَٰفِقِينَ فِي الدَّرْكِ الْأَسْفَلِ مِنَ النَّارِ وَلَن تَجِدَ
لَهُمْ نَصِيرًا ﴿١٤٥﴾

**१४५.** मुनाफिक (दांभिक) लोक जहन्नमच्या सर्वात खालच्या वर्गात [२३३] असतील आणि तुम्हांला त्यांचा कोणी मदतीस आढळून येणार नाही.

إِلَّا الَّذِينَ تَابُوا وَأَصْلَحُوا وَاعْتَصَمُوا بِاللَّهِ وَأَخْلَصُوا
دِينَهُمْ لِلَّهِ فَأُولَٰٓئِكَ مَعَ الْمُؤْمِنِينَ وَسَوْفَ يُؤْتِ
اللَّهُ الْمُؤْمِنِينَ أَجْرًا عَظِيمًا ﴿١٤٦﴾

**१४६.** अलबत ! जे लोक पश्चाताप करतील आणि आपली सुधारणा करतील आणि अल्लाहशी आपला संबंध दृढ करतील आणि आपल्या दीनला (धर्माला) फक्त अल्लाहसाठीच शुद्ध ठेवतील [२३४] असे लोक अवशय मोमिन लोकांच्याबरोबर असतील. आणि अल्लाह मोमिन लोकांना महान मोबदला अवश्य प्रदान करील.

२२८. सूरे बकरा आयत नं. ९ मध्ये हा मजकूर आलेला आहे.

२२९. म्हणजे त्यांची नमाज फक्त दिखाव्याची नमाज असते. त्यांना मुसलमान समजले जावे. हा तिचा उद्देश असतो. स्पष्ट आहे की हा अल्लाहला धोका द्यावयाचा प्रयत्न आहे.

त्याकाळी मुसलमान समाजाची व्यक्ती आहे हे समजण्यासाठी जमाअतीबरोबर नमाज अदा करणे आवश्यक समजले जात असे. पण आज समाजाच्या अधोगतीची स्थिती ही आहे की जो माणूस बिलकुल नमाजच अदा करत नाही, तो फक्त मुसलमानच होऊ शकतो असे नव्हे तर तो मुसलमानचा नेता व वीर पण होऊ शकतो. आणि मसजिदीमध्ये हजर नसणारा देखील मसजिदीचा मुतवल्ली व्यवस्थापक होऊ शकतो.

२३०. येथे-मुनाफिकीन-ढोंगी (दांभिक) लोकांच्या नमाजी मधील तीन मोठे दोष दाखविले गेले आहेत.(१) आळसाने नमाजसाठी उभे राहणे,(२) दिखाव्याची नमाज पढणे आणि (३) अल्लाहचे निव्वळ नावाला स्मरण करणे. यावरून सच्च्या मुसलमानांच्या नमाजाची वैशिष्ट्य आपोआप स्पष्ट होतात. म्हणजे (१) नमाजसाठी दक्षतेने उभे राहणे, (२) दिखावा व ढोंगीपणापासून दूर राहून निव्वळ अल्लाहसाठी नमाज पढणे आणि (३) अल्लाहचे मनापासून सतत स्मरण करणे.

२३१. म्हणजे ज्याने चुकीच्या मार्गाने जाण्याचा निर्णय घेतला आहे त्याच्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून मार्गदर्शनाचे दरवाजे बंद केले जातात. आणि मग अशा माणसाला सरळमार्गी लावणे कोणाच्याही हाती नसते.

२३२. खुलाशासाठी सूरह आले इमरान टीप नं. ४१ पाहा.

२३३. मुनाफिक ढोंगी (दांभिक) माणसाला ही तंबी आहे की त्यांनी हा गैरसमज बाळगू नये की ते ज्याअर्थी आपण मुसलमान असल्याचा दावा करतात त्याअर्थी ते काफिरांच्या तुलनेत चांगले आहेत. परमेश्वराजवळ त्याची काही कदर होणार नाही. इतकेच नव्हे तर ते काफिरांच्यापेक्षा अधिक वाईट आहेत. व यांच्यापेक्षा कडक शिक्षेस ते पात्र आहेत. कारण मनापासून ते सुद्धा काफिरच आहेत. आणि स्वत:ला मुसलमान म्हणवून घेऊन ते परमेश्वराशी व जनतेशी धोकेबाजी करीत आहेत.

२३४. म्हणजे ढोंगी (दांभिक) लोक शिक्षेपासून फक्त याच स्थितीत वाचू शकतात जेव्हा ते स्वत:च्या बुद्धीत आणि आचारविचारात सुधारणा करतील.

مَا يَفْعَلُ اللّٰهُ بِعَذَابِكُمْ اِنْ شَكَرْتُمْ وَاٰمَنْتُمْ ۭ وَكَانَ
اللّٰهُ شَاكِرًا عَلِيْمًا ﴿١٤٧﴾

१४७. जर तुम्ही कृतज्ञता [२३५] व्यक्त केली आणि ईमान ठेविले तर तुम्हांला शिक्षा करून अल्लाहला काय करावयाचे आहे? अल्लाह मोठा गुण ग्राहक [२३६] आहे आणि सर्वकाही जाणणारा आहे.

لَا يُحِبُّ اللّٰهُ الْجَهْرَ بِالسُّوْۗءِ مِنَ الْقَوْلِ اِلَّا مَنْ ظُلِمَ ۭ
وَكَانَ اللّٰهُ سَمِيْعًا عَلِيْمًا ﴿١٤٨﴾

१४८. अल्लाहला ही गोष्ट पसंत नाही की (तुम्ही एखाद्याची) निंदा कुचेष्टा करण्याकरिता तोंड उघडावे याखेरीज की एखाद्यावर अत्याचार झाला असावा (आणि त्याने त्याचा तिरस्कार करावा) अल्लाह सर्व काही ऐकणारा व सर्व काही जाणणारा आहे .[२३८]

اِنْ تُبْدُوْا خَيْرًا اَوْ تُخْفُوْهُ اَوْ تَعْفُوْا عَنْ سُوْۗءٍ فَاِنَّ اللّٰهَ كَانَ
عَفُوًّا قَدِيْرًا ﴿١٤٩﴾

१४९. जर तुम्ही भलेपणाची एखादी गोष्ट उघडपणे करा अथवा लपवून करा किंवा एखाद्या दुष्कर्माला माफ करा, तर (पहा) अल्लाह क्षमा करणारा आहे (जेव्हा तो शिक्षा देण्यास) पूर्णत:समर्थ आहे.[२३९]

اِنَّ الَّذِيْنَ يَكْفُرُوْنَ بِاللّٰهِ وَرُسُلِهٖ وَيُرِيْدُوْنَ اَنْ يُّفَرِّقُوْا
بَيْنَ اللّٰهِ وَرُسُلِهٖ وَيَقُوْلُوْنَ نُؤْمِنُ بِبَعْضٍ وَّنَكْفُرُ بِبَعْضٍ ۙ
وَّيُرِيْدُوْنَ اَنْ يَّتَّخِذُوْا بَيْنَ ذٰلِكَ سَبِيْلًا ﴿١٥٠﴾

१५०. जे लोक अल्लाह व त्याच्या प्रेषितांशी कुफ्र (इन्कार) करतात.आणि असे इच्छितात की अल्लाह व त्याच्या प्रेषितांच्या दरम्यान भेद करावा आणि असे म्हणतात की आम्ही एखाद्यास मानतो व एखाद्यास मानत नाही आणि असे इच्छितात की याच्या दरम्यानचा एखादा मार्ग पत्करावा.

اُولٰۗىِٕكَ هُمُ الْكٰفِرُوْنَ حَقًّا ۚ وَاَعْتَدْنَا لِلْكٰفِرِيْنَ
عَذَابًا مُّهِيْنًا ﴿١٥١﴾

१५१. असे लोक खचितच काफीर (सत्याचा इन्कार करणारे) आहेत,[२४०] आणि काफिरांकरिता आम्ही अपमान जनक. शिक्षा तयार करुन ठेवली आहे.

وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا بِاللّٰهِ وَرُسُلِهٖ وَلَمْ يُفَرِّقُوْا بَيْنَ اَحَدٍ مِّنْهُمْ
اُولٰۗىِٕكَ سَوْفَ يُؤْتِيْهِمْ اُجُوْرَهُمْ ۭ وَكَانَ اللّٰهُ غَفُوْرًا رَّحِيْمًا ﴿١٥٢﴾

१५२. आणि ज्या लोकांनी अल्लाह व त्याच्या प्रेषितांवर ईमान बाळगले व यापैकी कोणाच्याहि दरम्यान भेद केला नाही त्यांना तो खचितच त्यांचा मोबदला प्रदान करील.[२४१] आणि अल्लाह क्षमा करणारा व दया करणारा आहे.[२४२]

२३५. समजले की कुफ्र व दांभिकत: म्हणजे प्रत्यक्ष कृतघ्नता याऊलट ईमान म्हणजे कृतज्ञता.

२३६. म्हणून जर तुम्ही कृतज्ञ दास बनाल तर तो तुमचे आचरण व सेवेची कदर करील. व त्याचे भरपूर फळ देईल.

२३७. अर्थात अत्याचार पिडीताला अत्याचारी विरुद्ध बोलण्याचा हक्क आहे.

२३८. येथे या गुणवैशिष्टयांच्या उल्लेखाचा हेतु हे स्पष्ट करणे होय की अल्लाह अत्याचार पिडीतांची फिर्याद ऐकतो. आणि त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचारांचे त्याला चांगल्या प्रकारे ज्ञान आहे. ज्या पार्श्वभूमीवर ही गोष्ट सांगितली गेली आहे ती ही की इस्लामचे विरोधक व इस्लामशी विद्रोह करणारे मुसलमानांना भडकविण्यास व त्यांना हानी पोहचविण्यास टपून बसले होते.

२३९. अर्थात विरोधकांचा अत्याचार होत असतांनाहि जर तुम्ही प्रकट व अप्रकटरित्या भलेपणाचेच वर्तन पत्करले व क्षमा-शीलतेने वागत राहिले तर तुमची ही वागणूक अल्लाहच्या नजरेत अत्यंत प्रिय ठरेल. कारण तो शिक्षा देण्यास पूर्णत:समर्थ असतांनाहि आपल्या दासांना क्षमा करतो. म्हणून तो हे इच्छितो की त्याच्या या गुणवैशिष्टयाचा प्रभाव दासांनीहि कबूल करावा.

२४०. ही आयत स्पष्टपणे अशा लोकांना काफिर ठरविते जे अल्लाह व त्याच्या प्रेषितांना मान्य करतांना एखाद्या प्रेषितास मानीत नाही. तेच ईमान विश्‍वासार्ह आहे जे ईश मार्गदर्शनानुसार असेल. आपल्या मनमानी पद्धति नुसार नव्हे. यास्तव जो मनुष्य हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषितत्वावर ईमान बाळगत नाही तर त्याचे कट्टर काफिर असणे बद्धल तिळमात्र शंका नाही मग तो ईश्‍वर व त्याच्या प्रेषितांना मानण्याचा कितीही उंच स्वरात दावा करीत का असेना.

२४१. ''त्यांचा मोबदला'' याचा अर्थ असा की ते आपल्या ईमान व आचरणाच्या दृष्टीने ज्या पात्रतेचे असतील, त्या पात्रतेच्या मोबदल्यास योग्य ठरतील.

२४२. संकेत आहे या गोष्टीकडे की जे लोक अल्लाह व त्याच्या समस्त प्रेषितांवर ईमान बाळगतील त्यांच्याशी तो क्षमा शीलतेचा व्यवहार करील व त्यांच्यावर दया करील.

१५३. (हे पैगंबर !) ग्रंथधारक तुमच्या जवळ अशी मागणी करीत आहेत की तुम्ही त्यांच्यावर आकाशातून एखादा ग्रंथ अवतरित करावा.ते याहूनहि मोठी मागणी मूसाजवळ करून चुकले आहेत. त्यांनी असे म्हटले होते की अल्लाहला उघड उघड दाखवा आणि त्यांच्या अत्याचारपूर्वक कृत्यामुळे त्यांना वीजेने धरले होते.[२४३] मग त्यांच्याजवळ स्पष्ट निशाण्या येऊन पोहचल्या होत्या तरीहि त्यांनी वासराला उपास्य बनविले [२४४] तरीदेखील आम्ही (त्यांच्या) या हरकतीस माफ केले आणि मूसाला स्पष्ट प्रमाण प्रदान केले.[२४५]

يسئلك اهل الكتب ان تنزل عليهم كتبا من السماء
فقد سالوا موسى اكبر من ذلك
فقالوا ارنا الله جهرة فاخذتهم الصعقة بظلمهم ثم
اتخذوا العجل من بعد ما جاءتهم البينت فعفونا عن
ذلك واتينا موسى سلطنا مبينا ﴿١٥٣﴾

१५४. आणि आम्ही त्यांच्याकडून वचन घेण्याकरिता तूर (पर्वता)ला त्यांच्यावर उचलून उभे केले होते.[२४६] आणि हा आदेश दिला होता की दरवाज्यात सजदा करीत दाखल व्हा [२४७] आणि ताकीद केली होती की ‘सब्त’च्या आदेशाचा भंग न करावा [२४८] आणि आम्ही त्यांच्याकडून शरीयतच्या पालनाचे पक्के वचन घेतले होते.

ورفعنا فوقهم الطور بميثاقهم وقلنا لهم ادخلوا
الباب سجدا وقلنا لهم لا تعدوا في السبت واخذنا
منهم ميثاقا غليظا ﴿١٥٤﴾

१५५. परंतु त्यांच्या वचनभंगामुळे आम्ही त्यांचा धिक्कार केला आणि या कारणास्तव की त्यांनी अल्लाहच्या आयतींचा इन्कार केला [२५०] व पैगंबरांची नाहक हत्त्या करीत राहिले. तसेच म्हणाले की आमची हृदये बंद आहेत.[२५१] खरे पाहता,अल्लाहने यांच्या कुफ्रमुळे त्यांच्या हृदयांवर मोहर लावली आहे ज्यामुळे ते फार थोडेच ईमान बाळगतात.

فبما نقضهم ميثاقهم وكفرهم بايت الله وقتلهم الانبياء
بغير حق وقولهم قلوبنا غلف بل طبع الله عليها بكفرهم
فلا يؤمنون الا قليلا ﴿١٥٥﴾

१५६. आणि (ते धिक्कारले गेले) या कारणास्तव की त्यांनी कुफ्र केले व मरीयम वर फार मोठा दोषारोप ठेवला.[२५२]

وبكفرهم وقولهم على مريم بهتانا عظيما ﴿١٥٦﴾

१५७. आणि त्यांच्या या दाव्यामुळे की आम्ही मरीयम-पुत्र मसीह ईसा अल्लाहचे प्रेषिताची हत्त्या केली.[२५३] वस्तुतः ना ते हत्त्या करु शकले व ना क्रूसावर चढवू शकले किंबहुना (खरी स्थिती) त्यांच्याकरीता संशयास्पद ठरली.[२५४]आणि ज्या लोकांनी याबाबत मतभेद केला [२५५] ते संशयग्रस्त आहेत. त्यांना या (खऱ्या स्थिती)चे काहीहि ज्ञान नाही; किंबहुना ते अटकळच अनुसरण करीत आहेत.[२५६] निःसंशय त्यांनी [२५७] त्यांची हत्त्या केली नाही. [२५८]

وقولهم انا قتلنا المسيح عيسى ابن مريم رسول
الله وما قتلوه وما صلبوه ولكن شبه لهم
وان الذين اختلفوا فيه لفي شك منه ما لهم به من
علم الا اتباع الظن وما قتلوه يقينا ﴿١٥٧﴾

२४३. जे लोक या स्वरुपाच्या मागण्या करतात ते खरे पाहता या गोष्टीचे इच्छुक असतात की वस्तुस्थिती या प्रकारे प्रकट होऊन त्यांच्या समोर यावी की आपल्याच डोळयांनी बघावे व अदृश्यावर ईमान बाळगण्याचा प्रश्नच उद्‌भवू नये. उघड आहे त्यांची ही इच्छा व ही मागणी त्या बुद्धि कौशल्य विरुद्ध आहे जी मनुष्य-निर्मितीस कारक आहे. ती ही की माणसाची कसोटी घेतली जावी व त्याने बुद्धीचा वापर करुन व वस्तुस्थितीकडे मार्गदर्शन करणाऱ्या निशाण्यांना पाहून आकाशीय आदेशांच्या प्रकाशात अदृश्य सत्यावर ईमान आणावे. जर माणसाने सत्य-प्रियतेने काम घेतल्यास तो या प्रकारच्या मागण्या कदापि करणार नाही किंबहुना अल्लाहच्या या योजनेला जी इहलोकात कार्यरत आहे गंभीरतेने समजून घेण्याचा प्रयत्न करील. ''वीजेने धरले होते'' या घटनेच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरह टीप क्र.७५

२४४. बनी इस्राईल ने मिस्र (इजिप्त) मधून निघाल्यानंतर वासराची पूजा केली होती. त्यांच्या याच सामूहीक अपराधाकडे येथे संकेत केला गेला आहे व याविषयीची तपशील सूरह अअराफ. आयत १४८ ते १५२ व सूरह ताहा-आयत क्र. ८७ ते ९८ मध्ये वर्णिली गेली आहे.

२४५.सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत मूसा यांना स्पष्ट प्रमाण प्रदान केले होते, यासाठी की ते ज्या गोष्टी अल्लाह मार्फत सादर करतील त्यांना खरे मानण्यात लोकांसाठी कसलेही सबळ कारण राहू नये.

शब्द-शैलीवरून हे स्पष्ट होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'कुरआन'च्या स्वरुपात स्पष्ट प्रमाण प्रदान केले गेले आहे. म्हणून यास अल्लाहतर्फे मान्य करण्यात ग्रंथधारक असो वा ग्रंथधारकेतर, कोणासाठी कसलाहि बहाणा राहीला नाही.

२४६. पहा सूरह बकरह टीप क्र. ८८

२४७. पहा सूरह बकरह टीप क्र. ८९

२४८. पहा सूरह बकरह टीप क्र.८९

२४९. यहुद्यांचे अपराध वर्णन करण्यात एवढया कमालीचा क्रोध व्यक्त झाला आहे, व वाक्यात असा जोर व पराकोटी निर्माण झाली आहे की या अपराधांमुळे त्यांना जी शिक्षा दिली गेली तिला शब्दात वर्णन करण्याची गरज राहिली नाही. यास्तव येथे जी गोष्ट अध्यारुत आहे तिचे आम्ही कंसात वर्णन केले आहे. अर्थात या अपराधांनुळे अल्लाहतर्फे यहुदींचा धिक्कार होणे जणू क्रोधावेश व्यक्त झाल्याने आपोआप प्रकोप तुटून पडला आहे.

२५०. येथे बनी इस्राईलच्या त्या अपराधांकडे संकेत करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की ज्या जातीसमूहाचा इतिहास अशा प्रकारच्या अपराधांनी खच्चून भरला असेल व ज्यांची जाती-सामूहीक प्रकृति विद्रोही बनली असेल, ते जर आज तुमच्याजवळ ही मागणी करीत आहेत की क़ुरआनास आकाशातून उतरवित असतांना दाखवा तर यात आश्चर्य ते कसले? यांना ना एखादी गोष्ट समजून घ्यावयाची आहे व ना ईमान बाळगावयाचे आहे, किंबहुना केवळ गोष्ट टाळण्याच्या हेतुने खोडसाळपणा व मागण्या सादर कीत आहेत.

२५१. यहुदी लोक अभिमानाने असे म्हणतात की आमची श्रद्धा इतकी दृढ आहे की तुमच्या गोष्टीचा कसलाही प्रभाव आमच्या मनांवर होणार नाही. वस्तुत: सत्य आल्यानंतर चुकीच्या श्रद्धांवर दृढ राहणे हट्टाखेरीज काहीच नाही.

२५२. हजरत ईसा (येशू) यांचा जन्म चमत्कारिक रित्या पित्या विना झाला होता. आणि त्यांनी पाळण्यातच लोकांना संबोधून आपण प्रेषित असल्याची घोषणा केली होती. म्हणून त्यांच्या युगात कोणाला हे धाडस झाले नाही की त्याने त्यांच्या आदरणीय मातेवर या संबंधात दोषारोपण केले असते. परंतु नंतर यहुदींना बुद्धिपुरस्पर केवळ सत्याविरोधाच्या उद्देशाने हजरत मरीयम वर घाणेरडा आरोप ठेवला.

२५३. यहुदी अपराधात एवढे निर्ढावले होते की हजरत ईसा सारख्या अत्यंत प्रतिष्ठित पैगंबराविरुद्ध वधाचा कट रचण्यात त्यांनी किंचितहि संकोच बाळगला नाही आणि मग मोठया अभिमानाने दावा करु लागले की आम्ही अल्लाहचे प्रेषित मरीयम-पुत्र ईसा यांची हत्या केली अर्थात त्यांचा हा दावा खोटा आहे कारण सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या कट-कारस्थानास फोल बनविले. तथापि यावरून त्यांच्या घोर अपराधाचे व पाषाण हृदयाचे अनुमान होते.

२५४. येथून आयत क्र. १५९ च्या शेवटी ''त्यांच्याविषयी साक्ष देईल'' पर्यंतचा मजकूर कंसातील वाक्य रित्या आहे. ज्याअर्थी हजरत ईसा यांच्या वधाची चर्चा केली गेली म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने वरील संदर्भक्रमास थांबवून सत्यस्थिती स्पष्ट फ़र्माविली.

२५५. ही आयत स्पष्टपणे यहुदींच्या या दाव्याचे खंडन करते की त्यांनी हजरत मसीह (येशू) ला सूळावर दिले, पण ते ना हत्या करु शकेल, ना सूळी देऊ शकले, किंबहुना सत्य घटना अशी होती की सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत ईसा यांना सुरक्षितपणे आपल्याकडे उचलून घेतले व त्यांना अचानक वर उचलून घेतले गेल्याने सत्यस्थिती विषयी ते संदिग्ध राहिले. त्यांनी पैगंबर ईसा यांचा अपप्रचार करण्यासाठी व त्यांच्या मिशनला अपयशी बनीविण्यासाठी सूळी दिल्या जाण्याची कल्पित कथा रचली व याविषयीचा प्रचार एवढया मोठया प्रमाणात केला की ख्रिश्चन देखील त्यांच्या अपप्रचाराला बळी

पडले. यास्तव त्यांनी हजरत ईसा यांना अत्याचार प्रिडीत सिद्ध करण्याच्या व मग त्यावर प्रायश्चित्ताची इमारत उभी करण्याच्या हेतुने यहुदींची कल्पित कथा मान्य केली एवढेच नव्हे तर बायबल' मध्येहि त्यांचा समावेश केला. वस्तुत: एका बाजुला ही गोष्ट यहुद्यांकरिता अभिमानास्पद होती तर दुसऱ्या बाजूला ख्रिश्चनांच्या तिरस्काराला कारणीभूत होती. पवित्र कुरआनाने मसीह वधाच्या सत्यस्थितीवरून पडदा हटवून हजरत मसीह यांच्या प्रतिष्ठेत वृद्धिच केली आहे. राहिला हा प्रशन की संदिग्धता कशा प्रकारे निर्माण झाली तर या स्थितीस निश्चित करणे अवघड आहे. या संदर्भात अनुमानाने बोलण्या ऐवजी कुरआनाच्या संक्षिप्त वर्णनावर समाधान मानून घेणेच श्रेयस्कर आहे. स्पष्ट असावे की, त्यावेळी 'बैतुल मुकद्दस' वर रोम-शासन होते आणि यहुदी विद्वान व त्यांच्या प्रमुखांनी एका कट-कारस्थानान्वये रोम शासकांना हजरत मसीह विरुद्ध भडकाविले होते. व त्यांना अटक करण्यास व सूळावर चढविण्यास प्रवृत्त केले होते. तत्कालीन शासनाला भडकविण्याकरिता त्यांनी विशेषत: जी क्लुप्ती लढविली होती ती म्हणजे त्यांचा हा आरोप होता की हजरत मसीह यहुदींचे बादशहा असल्याचा दावा करीत आहेत.

२५६. मत्तभेद करणाऱ्यांशी अभिप्रेत ख्रिश्चन होत.

२५७. यावरून हे माहीत होते की ज्या काळात कुरआन, अवतरत होते, मसीह-वधासंबंधी ख्रिश्चनांच्या दरम्यान पराकोटीचा मतभेद दिसून येत होता. याचा उघड पुरावा हा होय की हजरत मसीह यांना सूळावर दिला जाण्याचा व कबरीतून त्यांचे उठून उभे राहण्याचा जो किस्सा 'बायबल' मध्ये वर्णन केला गेला आहे एक न सुटणारे 'कोडे' बनला आहे. बायबलच्या वर्णनावरुन हे स्पष्ट होते की ते घटनेच्या वस्तुस्थितीचे खरे चित्र सादर करण्यास असमर्थ आहेत. याच कारणास्तव त्यांनी हजरत मसीह यांच्या निधना संबंधी विचित्र व विंलक्षण तत्वज्ञान संशोधिले. तद्नुसार एक तत्वज्ञान (Docetism)या नावाने प्रसिद्ध झाले जे या गोष्टीस मान्य करीत नाही की हजरत ईसा यांचे शरीर भौतिक होते. या अवास्तव प्रिय विचार सरणीने त्यांना हा विश्वास दिला की हजरत ईसा ईश्वराचे दास नाहीत किंबहुना ( अल्लाह रक्षण करो) त्याचे पुत्र होते. अर्थात या सर्व कल्पना नंतरच्या काळात निर्माण झाल्या यास्तव 'इन्साय्कलोपिडीया ऑफ रिलीजन अँड ॲथेक्स यातील उल्लेखानुसार!

"One would have thought that the first and second Christian generations would at any rate have had no doubt about our Lord's real manhood." (Ency. of Religion & Ethics Vol. IV P. 832)

"It was possible to show to anyone who accepted the story of His life in the Gospels that He was a real man, subject to the normal conditions of human life." (ERE Vol. IV P. 833)

या इन्साय्कलोपिडीया मध्ये ही स्वीकृति देखील आहे की बास्लिक या गोष्टीस मानणारे आहेत की सूळावर चुकीने सायमन ला दिले गेले होते.

"Irenaeus says that Besilides' account of the Crucifixion was that Simon of Cyrene was crucified by mistake." (ERE Vol. IV. P. 833)

राहीला हजरत ईसा यांच्या कबरीतून जिवंत उठण्याचा किस्सा जो बायबल मध्ये विभिन्न शैलीने वर्णिला गेला आहे तर त्याच्या वर्णन शैलीवरुनच उघड होते की ह्या केवळ कर्णोपकर्णी सांगितल्या गेलेल्या गोष्टी होत ज्यांना एकत्रित केले गेले आहे. व ज्यांची वस्तुस्थिती कल्पित कथेहून भिन्न नाही. उदा. योहानच्या इंजील मधील उल्लेख पहा.

"इकडे मरीया बाहेर कबरेजवळ रडत उभी राहिली होती आणि रडता रडता तिने ओणवून कबरेत पाहिले. आणि जेथे येशूचे शरीर ठेवले होते तेथे शुभ्र वस्त्रे परिधान केलेले दोन देवदूत, एक उशाजवळ व एक पायथ्याजवळ बसलेले तिला दिसले. ते तिला माहणाले बाई का रडतेस? ती त्यांना म्हणाली, त्यांनी माझ्या प्रभूला नेले व त्याला कोठे ठेवले हे मला ठाऊक नाही म्हणून. असे बोलून ती पाठमोरी फिरली, तो तिला येशू उभा असलेला दिसला, परंतु तो येशू आहे हे तिने ओळखले नाही येशूने तिला म्हटले बाई का रडतेस? कोणाचा शोध करितेस? तो माळी आहे असे समजून ती त्याला म्हणाली, दादा तू त्याला येथून नेले असले तर त्याला कोठे ठेवलेस हे मला सांगा म्हणजे मी त्याला घेऊन जाईन. येशूने तिला म्हटले, मरिये, ती वळून त्याला इब्री भाषेत म्हणाली, रब्बूनी! (म्हणजे गुरुजी!) येशूने तिला म्हंटले मला बिलगून बसू नको; कारण मी अद्याप पित्याजवळ वर गेलो नाही तर माझ्या बांधवाकडे जाऊन त्यांना सांग की, जो माझा पिता आणि तुमचा पिता आणि माझा देव व तुमचा देव त्याच्याकडे मी वर जातो मरीया मग्दालिया गेली व आपण प्रभूला पाहिल्याचे व त्याने आपल्याला ह्या गोष्टी सांगितल्याचे तिने शिष्यांस कळविले. (योहना : २० : ११ ते १८ )

(लक्षात असावे की येथे ज्या मरीयमचा उल्लेख आहे ती हजरत ईसा यांची माता नव्हे तर दुसरी मरीयम होय) परंतु लूकच्या बायबल मध्ये मरीयमचा येशूच्या कबरीजवळ उभे

राहून पाहण्याचा उल्लेख नाही. किंबहुना त्यात हा किस्सा पुढील प्रमाणे वर्णिला गेला आहे!

''त्यांना त्याचे शरीर सापडले नाही, तेव्हा त्यांनी येऊन म्हंटले की आम्हाला देव दूतांचे दर्शन झाले व देव दूतांनी सांगितले की तो जिवंत आहे. मग आमच्याबरोबर जे होते त्यापैकी कित्येक कबरेकडे गेले आणि त्या स्त्रीयांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना आढळले पण त्यांना तो दिसला नाही.'' (लूक-२४:२३-२४) या वर्णनानुसार स्त्रीयांनी फिरिशत्यांना स्वप्नांमध्ये पाहिले व फिरिश्त्यांनी खबर दिली की हजरत ईसा जिवंत आहेत. अर्थात त्या स्त्रीयांनी स्वत:च्या डोळयांनी पाहिले नव्हते.

तद्वतच मार्कच्या इंजील मध्येहि या गोष्टीचा काही हि उल्लेख नाही की त्या स्त्रीयांनी येशूला कबरी जवळ उभे असताना पाहिले किंबहुना हे स्पष्टीकरण आहे की:

''मग त्या बाहेर निघून कबरेपासून पळाल्या, कारण त्या कांपत होत्या व विस्मित झाल्या होत्या, त्यांनी कोणाला काही सांगितले नाही, कारण त्या भयभीत झाल्या होत्या.''(मार्क-१६:८)

या इंजिलामध्ये हा दावा देखील केला गेला आहे की शिष्यांनी येशूला मृत्युनंतर गळीलमध्ये पाहिले. त्यासोबत या गोष्टीचाहि स्वीकार केला गेला आहे की काहींनी संशय केला. ''आणि त्यांनी त्याला तेथे पाहून नमन केले, तरी कित्येकास संशय वाटला.'' (मत्तय-२८ : १७)

आणि मार्कचे बायबल म्हणते की:

नंतर अकरा जण जेवावयास बसले असतां त्यांनाहि तो प्रकट झाला आणि ज्यांनी त्याला उठलेले पाहिले होते त्यांच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही म्हणून त्याने त्यांचा अविश्वास व अंत:करणाचा कठीणपणा ह्याविषयी त्यास दोष लाविला (मार्क-१६ :१४)

आणि योहानच्या इंजिलमध्ये असा उल्लेख आहे की येशू आठ दिवसानंतर आपल्या शिष्यांना प्रगट झाला, तसेच हेहि वर्णन केले गेले आहे की :

''येशू मेलेल्यांतून उठल्यावर आपल्या शिष्यांना प्रगट झाल्याची ही तिसरी वेळ'' (योहान -२१ :१४)

बायबलचे हे संदिग्ध व अविश्वासार्ह वर्णन या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की हजरत मसीह यांचा दफन होण्याचा व त्यानंतर कबरीतून जिवंत उठण्याचा किस्सा स्वप्नापेक्षा अधिक वास्तव नाही. वर्णन इतके संदिग्ध आहे की बायबलचा टीकाकार स्वत: हे मान्य करतो की

" There are however numerous critical problems about the story (see Taylor 602ff) especially when it is compared in details with the accounts in the other Gospels."

(Peak's Commentary on the Bible P.818)

आणि या टीकाकाराने मार्ककृत इंजीलच्या अंतिम प्रकरणाविषयी येथपावेतो लिहीले आहे की तो मूलत: मार्क'चा भाग नाही.

"It is now generally agreed that 9-20 are not an original part of MK. They are not found in the oldest MSS and indeed were apparently not in the copies used by Mt. and LK." (Do)

त्याचप्रमाणे योहानकृत इंजीलच्या अंतिम अध्याया विषयी (२१) त्याचा भाष्यकार लिहीतो की, यात झालेली वाढ इंजिलकर्त्याने स्वत: केली आहे.

"It was a suppliment added by the evengelist himself." (Do P. 867)

तात्पर्य हजरत ईसा यांच्या कबरीतून जिवंतपणे उठण्याचा किस्सा केवळ एक कल्पित कथाच होय; मात्र पुढे याला केवळ कथेचेच स्वरुप राहिले नाही तर ख्रिश्चन मताची मूल भूत श्रद्धा ठरली व संपूर्ण ख्रिश्चन तत्वज्ञानाची इमारत उभी केली गेली परंतु पवित्र कुरआनाने अपल्या या सत्यवर्धक वर्णनाद्वारे की हजरत मसीह यांना ना ठार केले जाऊ शकले ना सूळावर दिले जाऊ शकले किंबहुना सर्वश्रेष्ठ अल्लाह ने त्यांना आपल्याकडे उचलून घेतले. मसीही तत्वज्ञानाची इमारत जमीनदोस्त केली आहे.

२५८. अर्थात यहुदी हजरत मसीह यांची मुळीच हत्या करु शकले नाहीत ही गोष्ट संशयातीत आहे.

بَلْ رَّفَعَهُ اللّٰهُ اِلَيْهِ ؕ وَكَانَ اللّٰهُ عَزِيْزًا حَكِيْمًا ﴿۱۵۸﴾

१५८. किंबहुना अल्लाहने त्यास आपल्याकडे उचलून घेतले. [२५९] अल्लाह सर्वांवर प्रभावशाली व बुद्धिकौशल्य बाळगणार आहे.[२६०]

وَاِنْ مِّنْ اَهْلِ الْكِتٰبِ اِلَّا لَيُؤْمِنَنَّ بِهٖ قَبْلَ مَوْتِهٖ ۚ
وَيَوْمَ الْقِيٰمَةِ يَكُوْنُ عَلَيْهِمْ شَهِيْدًا ﴿۱۵۹﴾

१५९. आणि ग्रंथ-धारकांपैकी असा कोणीहि नसेल जो त्याच्या मृत्युपूर्वी त्यावर ईमान न बाळगील [२६१] आणि कियामतीच्या दिवशी तो यांच्याविषयी साक्ष देईल. [२६२]

فَبِظُلْمٍ مِّنَ الَّذِيْنَ هَادُوْا حَرَّمْنَا عَلَيْهِمْ طَيِّبٰتٍ اُحِلَّتْ لَهُمْ
وَبِصَدِّهِمْ عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ كَثِيْرًا ﴿۱۶۰﴾

१६०. तात्पर्य,[२६३] यहुदी लोकांच्या या अत्याचार पूर्वक हरकतीमुळे आम्ही कित्येक स्वच्छ शुद्ध वस्तू त्यांच्यावर हराम ठरविल्या ज्या (पूर्वी) त्यांच्याकरिता हलाल होत्या यामुळे देखील की ते अल्लाहच्या मार्गापासून फार जास्त रोखू लागले होते.

وَّاَخْذِهِمُ الرِّبٰوا وَقَدْ نُهُوْا عَنْهُ وَاَكْلِهِمْ اَمْوَالَ النَّاسِ
بِالْبَاطِلِ ؕ وَاَعْتَدْنَا لِلْكٰفِرِيْنَ مِنْهُمْ عَذَابًا اَلِيْمًا ﴿۱۶۱﴾

१६१. तसेच त्यांच्या व्याज घेण्यामुळे जेव्हा त्यांना त्याबाबत मनाई केली [२६४] गेली होती आणि यामुळे देखील की ते लोकांचा माल अनुचितरित्या खाऊ लागले आणि जे लोक यांच्या पैकी काफीर आहेत त्यांच्याकरिता आम्ही दु:खदायक शिक्षा तयार करून ठेवली आहे. [२६५]

لٰكِنِ الرّٰسِخُوْنَ فِى الْعِلْمِ مِنْهُمْ وَالْمُؤْمِنُوْنَ يُؤْمِنُوْنَ
بِمَاۤ اُنْزِلَ اِلَيْكَ وَمَاۤ اُنْزِلَ مِنْ قَبْلِكَ وَالْمُقِيْمِيْنَ الصَّلٰوةَ
وَالْمُؤْتُوْنَ الزَّكٰوةَ وَالْمُؤْمِنُوْنَ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ ؕ اُولٰۤٮِٕكَ
سَنُؤْتِيْهِمْ اَجْرًا عَظِيْمًا ﴿۱۶۲﴾

१६२. तथापि यांच्यापैकी ते लोक जे ज्ञानात पक्के आहेत [२६६] आणि जे [२६७] मोमिन (इमान धारक) आहेत, ते त्या (मार्गदर्शना) वर ईमान बाळगतात.जे तुमच्याकडे अवतरित केले गले आहे आणि त्यावरहि जे तुमच्या पूर्वी अवतरीत केले गेले होते. हे लोक नमाज कायम करणारे, ज़कात अदा करणारे [२६८] आणि अल्लाह व अंतिम दिनावर ईमान राखणारे आहेत अशा लोकांना आम्ही खचितच महान मोबदला प्रदान करू.

اِنَّاۤ اَوْحَيْنَاۤ اِلَيْكَ كَمَاۤ اَوْحَيْنَاۤ اِلٰى نُوْحٍ وَّالنَّبِيّٖنَ مِنْ بَعْدِهٖ ۚ
وَاَوْحَيْنَاۤ اِلٰۤى اِبْرٰهِيْمَ وَاِسْمٰعِيْلَ وَاِسْحٰقَ وَيَعْقُوْبَ
وَالْاَسْبَاطِ وَعِيْسٰى وَاَيُّوْبَ وَيُوْنُسَ وَهٰرُوْنَ وَسُلَيْمٰنَ ۚ
وَاٰتَيْنَا دَاوٗدَ زَبُوْرًا ﴿۱۶۳﴾

१६३. आम्ही तुमच्याकडे त्याच प्रकारे 'वही' (संदेश) पाठविली आहे [२६९] ज्या प्रकारे नूह आणि त्यानंतरच्या पैगंबरांकडे पाठविली होती आणि आम्ही इब्राहीम,इस्माईल,इसहाक,याकूब, याकूबची संतती,[२७०] ईसा,अय्यूब, यूनुस, हारुन आणि सुलैमान कडे हि 'वही'पाठविली होती [२७१] तसेच आम्ही दाऊदला जबूर [२७२] प्रदान केले होते.

२५९. पहा सूरह आले इमरान - टीप क्र. ८२

२६०. येथे अल्लाहच्या त्या दोन गुणवैशिष्टयांच्या उल्लेखाचा उद्देश्य, या गोष्टीकडे संकेत करणे आहे की हजरत ईसा यांची आकाशावर जिवंत उठविल्या जाण्याची घटना एक असामान्य घटना होय. आणि हे अल्लाहच्या सामर्थ्याचे व त्याच्या बुद्धि कौशल्याचे असामान्य प्रकटीकरण होय.

२६१. अर्थात हजरत ईसा यांचा नैसर्गिक मृत्यु जेव्हा होईल तेव्हा जेवढे ग्रंथधारक हजर असतील मग ते यहुदी असोत वा ख़्रिश्चन सर्वांनीच त्यांच्या प्रेषितत्वावर ईमान आणलेले असेल.

हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्पष्टपणे हे दर्शविले आहे की हज़रत ईसा क़ियामत जवळ आली असतांना अवतरीत होतील आणि त्यावेळच्या यहुदींचा सर्वात मोठा नेता व उपद्रव माजविणाऱ्या दज्जालला ठार करतील मग त्यानंतर सर्व ग्रंथ धारक हजरत मसीह यांच्यावर ईमान आणून मुसलमान होतील आणि जगात ना यहुदीमत बाकी राहील, ना ख़्रिश्चन मत. किंबहुना केवळ इस्लाम राहील.

ईसा-अवतरण संदर्भात जी सप्रमाण हदीस वचने उल्लेखिली गेली आहेत त्यांपैकी काही खालील प्रमाणे:

عن ابی هريرة قال قال رسول الله صلى الله عليه وآله وسلم : وَالَّذِی نَفْسِی بِيَدِهٖ لَيُوشِكَنْ اَنْ يَنْزِلَ فيكم ابْن مريم حَكَمًا عَدْلاً فَيَكْسر الصَّلِيبَ وَيَقْتُل الخِنْزِيرَ وَيَضَع الحرب وَيَفِيضُ المالُ حتیٰ لَا يَقْبَلُ اَحَدٌ حتى تَكُون السَّجْدَةُ الواحدة خيرًا من الدُّنيا وما فيها ثُمَّ يقول ابو هريرة اقرأوا اِنْ شِئْتُمْ وَاِنْ مِنْ اهل الكتاب۔ الخ (بخاری کتاب احاديث الانبياء)

हज़रत अबु हुरैरा (रजियल्लाहु अन्हु) निवेदन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले, शपथ आहे त्या (अल्लाह) ची ज्याच्या हाती माझा प्राण आहे मरीयम-पुत्र तुमच्या दरम्यान शासक न्यायी बनून अवश्य येतील. मग ते क्रूस तोडतील आणि डूकराला ठार मारतील आणि युद्ध समाप्त करतील (त्यावेळी) माल इतक्या विपुल प्रमाणात असेल की कोणी स्वीकार करणारा नसेल त्यावेळी (अल्लाह पुढे) एक सजदा, इहलोक व त्यात जे काही आहे त्याहून अधिक चांगला असेल. हे निवेदन केल्यानंतर अबु हुरैरा यांनी फर्माविले, याला पुष्टी हवी असेल तर या आयतीचे पठण करा.......

وَاِنْ مِنْ اهل الكتاب۔ الخ

(आणि ग्रंथधारकांपैकी असा कोणीही नसेल जो त्याच्या मृत्युपूर्वी त्यावर ईमान न बाळगील). (बुखारी किताबुल अहादीसल अंबिया)

عن النواس بن سمعان قال قال رسول الله صلى الله عليه وآله وسلم : فبينما هو كذلك اِذْ بَعَثَ الله الْمَسِيْح ابن مريم فينزل عِنْدَ الْمَنَارَة الْبَيْضَاء شرقیَّ دِمِشْقَ مَهْرُوْدَتَيْنِ وَاضعاً كَفَّيْهِ عَلٰى اجنحه مَلَكَيْنِ اِذَا طاطأ راسَهٗ قَطَرَ وَاِذَا رَفَعه تحَدَّرَ منه جُمانٌ كَاللَّؤلُو فلا يحلُّ لِكَافِرٍ يجد ريح نَفَسِهٖ الا مات وَنَفَسُهٗ يَنْتَهى اِلىٰ حيث يَنْتَهِىْ طَرْفُهٗ فَيَطْلُبُهٗ حتّٰى يُدْرِكَهٗ بِبَابِ لُدٍّ فَيَقْتُلُهٗ۔ (مسلم کتاب الفتن)

“नवास बिन समआन निवेदन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले, या दरम्यान (जेव्हा दज्जाल उत्पात निर्माण करीत असेल) अल्लाह मरीयम-पुत्र मसीह ला पाठविल आणि ते दमिशक (दमास्कस) च्या पूर्व भागात पांढऱ्या मिनाऱ्याजवळ पिवळया रंगाच्या दोन चादरी परिधान करुन दोन फिरिशत्यांच्या बाजूंवर आपले हात ठेवीत अवतरीत होतील जेव्हा ते डोके झुकवतील तेव्हा जाणवेल की जणू मोत्यांचे दाणे ओघळत आहेत. त्यांच्या श्वासाची हवा ज्या काफिरापर्यंत पोहचेल तो मरण पावेल. आणि त्यांचा श्वास जेथपर्यंत दृष्टी जाईल तिथपर्यंत पोहचेल. नंतर ते दज्जालचा पाठलाग करतील व त्याला लूद च्या दरवाज्याजवळ पकडतील आणि ठार करतील ! (मुस्लिम किताबुल फितन)

عن مجمع بن جارية الانصاری رضي الله عنه قال سَمِعتُ رسول اللهِ صلى الله عليه وآله وسلم يَقُولُ يَقْتُلُ ابن مريم الدجَّال بِبَابِ لُدٍّ۔ (ترمذی ابواب الفتن)

“मजमअ बिन जारय्य निवेदन करता की मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हे फर्मावितांना ऐकले मरीयम-पुत्र दज्जाल ला लूद च्या दरवाज्यावर ठार करतील.” (तिर्मिजी- अब्बाबुल फितन)

ही आणि ह्या स्वरुपाची दुसरी हदीस वचने जी या संदर्भात आली आहेत, त्यावरुन हे स्पष्ट होते की हजरत ईसा यांचे अवतरण जे कियामती पुर्वीच्या अंतिम काळात होईल. एका खास मोहीमेला यशस्वी करण्यासाठी होईल. अर्थात दज्जालला ठार करणे आणि त्याने माजविलेल्या महाभयंकर उत्पातास नष्ट करणे आणि पवित्र कुरआनाच्या उल्लिखित आयतीवरुन हे स्पष्ट होते की ईसा-अवतरणाचा मुख्य हेतु हा असेल की

यहुदींच्या या दाव्याला की त्यांनी हजरत ईसा यांना ठार केले चुकीच्या श्रद्धा विशेषत: हजरत ईसाचे ईश्वरपुत्र असण्याच्या श्रद्धेला खोटे दर्शविले जावे आणि हजरत ईसा यांचे प्रेषितत्व आणि कुरआनाच्या सत्यतेसंबंधी आणखी पुरावा प्राप्त व्हावा तसेच त्यांचा नैसर्गिक मृत्यु जो अजून झाला नाही याच जमीनीवर घडून यांवा.

हे स्पष्ट असावे की हजरत ईसा हे पैगंबर या नात्याने हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याच्या पूर्वी होऊन गेलेत. आणि मुसलमान त्यांच्या प्रेषितत्वावर ईमान बाळगतात. शेवटच्या काळात त्यांचे जे अवतरण होईल एखादा नवा प्रेषित या नात्याने नसेल,म्हणून त्यांच्या अवतरणाने हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषितत्व-समाप्ति विषयीच्या श्रद्धेत काहीहि फरक पडत नाही. हे देखील लक्षात घेतले जावे की हजरत ईसा इहलोकावर अवतरताच एखादा दावा सुरू करणार नाहीत, किंबहुना ते काम करून दाखवतील ज्या कामाकरिता त्यांना विशेष करून पाठविले गेले असेल. यांच्या या मोहीमेत यश स्वत:च हे दाखविल की ते मरीयम-पुत्र ईसा आहेत म्हणून त्यांना ओळखण्यात मुसलमानांना कसलीही अडचण येणार नाही.या वस्तुस्थितीस चांगल्या प्रकारे समजून घेतल्यास त्या उत्पातांपासून मनुष्य सुरक्षित राहू शकतो जे कादीयानी मत वगैरेच्या स्वरुपात निर्माण होत राहतात आणि स्वत: मसीह असण्याचा खोटा दावा करून लोकांकरिता मार्गभ्रष्टेची सामुग्री करीत राहतात.

२६२. कियामतीच्या दिवशी हजरत ईसा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात जी साक्ष देतील त्याविषयीचे विवरण सूरह मायदा आयत क्र. ११६-११७ मध्ये वर्णिले गेले आहे.

२६३. दरम्यानचा मजकूर वर संपला आता येथून तोच आयतक्रम सुरू होतो जो आयत क्र. १५५ पासून चालत येत आहे.

२६४. व्याज निषिद्ध असण्याचा आदेश बायबल मध्ये आज देखील विद्यमान आहे ज्याचे हवाले आम्ही सूरहच्या टीप क्र. ४५६ मध्ये दिले आहेत.

२६५. येथपर्यंत यहुदींच्या अपराधांचा उल्लेख झाला आहे ज्यावरून हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की ज्या जाती-समूहाचे वर्तन या मर्यादेप्रत बंडखोरपणाचे राहिले असेल तो जर आज कुरआनावर ईमान आणण्याच्या संदर्भात हेकेखोरपणा दाखवित आहे तर यात आशचर्य कसले? सर्वश्रेष्ठ अल्लाह यांना सचेत करतो की, जे लोक कुफ्रवर अटळ राहतील त्यांच्याकरिता त्याने दु:खदायक शिक्षा तयार करून ठेवली आहे.

२६६. असे विद्वान अभिप्रेत आहेत जे धर्माचे सत्य-ज्ञान बाळगून होते व त्यात परिपक्व होते. ते आपल्या कथन व आचरणाने आणि चारित्र्य व नैतिकतेने यहुदींच्या सर्वसामान्य विद्वानांपेक्षा अधिक श्रेष्ठ होते. त्यांच्या सत्यप्रियतेमुळे त्यांना कुरआनावर ईमान आणण्याची सन्मति लाभली.

२६७. ते लोक अभिप्रेत आहेत जे ज्ञानात जरी पक्के नव्हते तरीहि ते कल्याणप्रिय व सदाचारी होते. कुरआनाचे आवाहन जेव्हा त्यांनी ऐकले तेव्हा त्यांनी यावर ईमान आणले.

२६८. यहुदींनी नमाज व ज़कात दोघाहि गोष्टींचा त्याग केला होता. ज्याचा परिणाम असा झाला की ते धर्मालाच वाया घालवून बसले. केवळ तेच लोक धर्मावर कायम राहिले जे नमाज व ज़कात संबंधी कार्यरत होते. अशाच लोकांनी पुढे येऊन कुरआनाच्या आवाहनाचा स्वीकार केला. जणू हा नमाज व ज़कातचाच लाभ होता की ज्यामुळे त्यांना सत्य-स्वीकृतिची सुबुद्धि लाभली. यावरून हे स्पष्ट झाले की जेथे या दोन मूलभूत व आधारभूत गोष्टींना वाया घालविले गेले तेथे धर्म बाकी राहात नाही.

२६९. 'वही' म्हणजे संकेत करणे व मनात एखादी गोष्ट प्रविष्ट करणे होय. अल्लाह आपला संदेश ज्या गुप्त पद्धतिने आपल्या प्रेषितांना पाठवितो त्या 'कृति' साठी कुरआनने 'वही' हा पारिभाषिक शब्द प्रयोजिला आहे. मराठीत या अर्थास व्यक्त करण्याकरिता पर्यायी शब्द नाही. इंग्रजी भाषेतील Reveal हा शब्द सुद्धा पूर्णार्थाने प्रभावी नाही.

२७०. मूळ ग्रंथात 'अस्बात' हा शब्द वापरला गेला आहे. जो बनी इस्राईलच्या बारा कबिल्यांकरिता विशेष पारिभाषिक शब्द आहे. येथे याचा अर्थ अनेक प्रेषित असा आहे अभिपरेत ते पैगंबर आहेत ज्यांना या बारा कबिल्यांकडे पाठविले गेले होते.

२७१. येथे हे स्पष्ट करण्याचा उद्देश्य आहे की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ही पहिलीच व्यक्ति नव्हे जिने अल्लाह तर्फे ''वही'' येण्याचा दावा केला असावा. किंबहुना पैग़ंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अवतरीत आहे. सर्व प्रेषित मार्गदर्शनाच्या एकाच स्त्रोतापासून लाभान्वित होत राहिले.

२७२. हजरत दाऊद यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने जे 'जबूर' प्रदान केले होते ते आपल्या मूळ स्वरुपात आज अस्तित्वात नाही तथापि त्याचे अवशेष त्या पृष्ठांमध्ये आढळून येतील जे जबूर (स्तोत्रसंहिता) नावाने बायबलमध्ये आहेत.

यात ईश्वराची स्तुति प्रशंसा व त्याच्या एकत्वासह उपदेशाच्या गोष्टी प्रभावी शैलीत वर्णिल्या गेल्या आहेत.

**आम्ही त्या प्रेषितांवरहि वही पाठवली ज्यांचा अहवाल आम्ही यापूर्वी तुम्हाला वर्णन करून सांगितला आहे. आणि त्या प्रेषितांवरहि ज्यांच्या अहवाल आम्ही तुम्हाला ऐकविला नाही आणि अल्लाहने मूसा बरोबर संभाषण केले ज्याप्रमाणे खरोखर संभाषण केले जाते.** *(अल-क़ुरआन)*

وَرُسُلًا قَدْ قَصَصْنٰهُمْ عَلَيْكَ مِنْ قَبْلُ وَرُسُلًا لَّمْ
نَقْصُصْهُمْ عَلَيْكَ ۚ وَكَلَّمَ اللّٰهُ مُوْسٰى تَكْلِيْمًا ﴿١٦٤﴾

१६४. आम्ही त्या प्रेषितांवरहि वही पाठवली ज्यांचा अहवाल आम्ही यापूर्वी तुम्हाला वर्णन करून सांगितला आहे. आणि त्या प्रेषितांवरहि ज्यांच्या अहवाल आम्ही तुम्हाला ऐकविला नाही [२७३] आणि अल्लाहने मूसा बरोबर संभाषण केले ज्याप्रमाणे खरोखर संभाषण केले जाते. [२७४]

رُسُلًا مُّبَشِّرِيْنَ وَمُنْذِرِيْنَ لِئَلَّا يَكُوْنَ لِلنَّاسِ عَلَى اللّٰهِ
حُجَّةٌ ۢ بَعْدَ الرُّسُلِ ۚ وَكَانَ اللّٰهُ عَزِيْزًا حَكِيْمًا ﴿١٦٥﴾

१६५. हे सर्व पैगंबर खुशखबरी देणारे व सावध करणारे बनवून पाठविले गेले होते, अशासाठी की या पैगंबराच्या आगमनानंतर लोकांजवळ अल्लाह समोर सादर करण्या करिता कोणतेही सबळ कारण राहू नये. [२७५] अल्लाह प्रभावशालीहि आहे आणि बुद्धि कौशल्याने नैपुण्याहि देखील.

لٰكِنِ اللّٰهُ يَشْهَدُ بِمَآ اَنْزَلَ اِلَيْكَ اَنْزَلَهٗ بِعِلْمِهٖ ۚ وَالْمَلٰٓئِكَةُ
يَشْهَدُوْنَ ۚ وَكَفٰى بِاللّٰهِ شَهِيْدًا ﴿١٦٦﴾

१६६. (यानंतरहि जर हे खोटे ठरवितात तर ठरवू द्या) परंतु अल्लाह साक्ष देतो की त्याने जे काही तुमच्यावर अवतरित केले आहे आपल्या ज्ञानाने अवतरित केले आहे [२७६] आणि फिरिश्ते देखील याची साक्ष देतात, आणि अल्लाहची साक्ष पुरेशी आहे.

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا وَصَدُّوْا عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ قَدْ
ضَلُّوْا ضَلٰلًا ۢ بَعِيْدًا ﴿١٦٧﴾

१६७. ज्या लोकांनी यासंबंधी इन्कार केला आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले ते मार्गभ्रष्टतेत फार दूरवर निघून गेले.

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا وَظَلَمُوْا لَمْ يَكُنِ اللّٰهُ لِيَغْفِرَ لَهُمْ
وَلَا لِيَهْدِيَهُمْ طَرِيْقًا ﴿١٦٨﴾

१६८. ज्या लोकांनी कुफ्र केले आणि अत्याचार केला, अल्लाह त्यांना कदापि क्षमा करणार नाही, आणि ना त्यांना मार्ग दाखविल.

اِلَّا طَرِيْقَ جَهَنَّمَ خٰلِدِيْنَ فِيْهَآ اَبَدًا ۚ وَكَانَ ذٰلِكَ
عَلَى اللّٰهِ يَسِيْرًا ﴿١٦٩﴾

१६९. जहन्नमच्या मार्गाशिवाय जेथे ते सदैव राहतील आणि अल्लाह करिता असे करणे अगदी सोपे आहे.

يٰٓاَيُّهَا النَّاسُ قَدْ جَآءَكُمُ الرَّسُوْلُ بِالْحَقِّ مِنْ رَّبِّكُمْ فَاٰمِنُوْا
خَيْرًا لَّكُمْ ۚ وَاِنْ تَكْفُرُوْا فَاِنَّ لِلّٰهِ مَا فِى السَّمٰوٰتِ
وَالْاَرْضِ ۚ وَكَانَ اللّٰهُ عَلِيْمًا حَكِيْمًا ﴿١٧٠﴾

१७०. लोक हो ! हा पैगंबर तुमच्याजवळ तुमच्या पालन कर्त्याकडून सत्य घेऊन आला आहे. ईमान आणा, तुमच्यासाठी हितकारक चांगले होईल. आणि जर कुफ्र करता तर (लक्षात ठेवा) जे काही आकाशांत व जमीनीत आहे अल्लाहचेच आहे आणि अल्लाह जाणणारा व बुद्धिमान आहे.

२७३. क़ुरआन असे म्हणत नाही की ज्या पैगंबरांचा उल्लेख त्याने नावांच्या स्पष्टीकरणासह केला आहे तेच पैगंबर होते आणि त्यांच्या व्यतिरिक्त कोणताही पैगंबर पाठविला गेला नव्हता. किंबहुना त्यांचे म्हणणे असे की, त्यांच्या व्यतिरिक्त देखील प्रेषित पाठविले गेले होते;ज्यांच्या नावाचा उल्लेख केला गेला नाही. तरीदेखील सर्व प्रेषितांवर विवरणाशिवाय ईमान आणणे अगत्याचे आहे.

२७४. हजरत मूसा यांच्या करिता 'वही' ची विशेष पद्धत अंगिकारली गेली होती. तद्‌नुसार सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्याशी प्रत्यक्षत: संभाषण केले होते. बायबल मध्येहि याचा उल्लेख आहे. ''मित्राशी बोलावे तसे परमेश्वर मोशेशी समोरासमोर बोले.'' (निर्गम ३३ : ११)

२७५. अर्थात या पैगंबरांना पाठविण्याचे प्रयोजन हे होते की कियामतीच्या दिवशी लोकांनी हा बहाणा सादर करु नये की आम्हाला गफलतीतून जागृत करण्यासाठी व दुराचाराच्या परिणामांशी सचेत करण्याकरिता कोणतीही उपाय योजना केली गेली नव्हती. अन्यथा आम्ही आखिरत पासून गाफील व इहलोक प्रियतेत मग्न राहीलो नसतो.

२७६. साक्ष या गोष्टीची की पवित्र कुरआन सर्वश्रेष्ठ अल्लाह कडून अवतरित झाले आहे, ज्यात सैतानांचा कसलाहि हात नाही आणि हा निव्वळ व निर्भेळ असा अल्लाहचा ग्रंथ आहे. अल्लाहच्या या साक्षीला असा तो प्रत्येक मनुष्य ऐकू शकतो जो कुरआनास काळजीपूर्वक वाचतो. कारण याची एकेक आयत साद घालून सांगत आहे की ही अल्लाहची वाणी आहे परंतु ही साद केवळ तेच लोक ऐकू शकतात जे सत्यप्रियता बाळगतात.

१७१. हे ग्रंथ धारकांनो ! आपल्या धर्मात अतिशयोक्ति [२७७] करु नका. आणि अल्लाहच्या बाबतीत सत्याशिवाय काहीहि म्हणू नका [२७८] मरीयम चा पुत्र ईसा याशिवाय काहीहि नाही की अल्लाहचा रसूल व त्याचा एक कलिमा आहे ज्याला अल्लाहने मरीयमच्या अंतरी टाकले व त्याच्या तर्फे एक आत्मा आहे [२७९] तेव्हा तुम्ही अल्लाह व त्याच्या प्रषितांवर ईमान बाळगा आणि असे म्हणू नका की ईश्वर तीन आहेत. [२८०] परावृत्त व्हा हेच तुमच्यासाठी चांगले आहे. वस्तुस्थिती याशिवाय काहीहि नाही की अल्लाह हाच एक ईश आहे. तो पवित्र आहे या पासून की त्याची संतती असावी. आकाशामधील व जमीनीमधील सर्व वस्तु त्याच्याच आहेत. आणि त्यांच्या देखरेखी करिता अल्लाह पुरेसा आहे. [२८१]

يٰٓاَهۡلَ الۡكِتٰبِ لَا تَغۡلُوۡا فِىۡ دِيۡنِكُمۡ وَلَا تَقُوۡلُوۡا عَلَى اللّٰهِ
اِلَّا الۡحَـقَّ ؕ اِنَّمَا الۡمَسِيۡحُ عِيۡسَى ابۡنُ مَرۡيَمَ رَسُوۡلُ اللّٰهِ وَكَلِمَتُهٗ ۚ
اَلۡقٰٮهَاۤ اِلٰى مَرۡيَمَ وَرُوۡحٌ مِّنۡهُ فَاٰمِنُوۡا بِاللّٰهِ وَرُسُلِهٖ ۚ وَلَا
تَقُوۡلُوۡا ثَلٰثَةٌ ؕ اِنْتَهُوۡا خَيۡرًا لَّـكُمۡ ؕ اِنَّمَا اللّٰهُ اِلٰـهٌ وَّاحِدٌ ؕ
سُبۡحٰنَهٗۤ اَنۡ يَّكُوۡنَ لَهٗ وَلَدٌ ۘ لَهٗ مَا فِى السَّمٰوٰتِ وَمَا فِى
الۡاَرۡضِ ؕ وَكَفٰى بِاللّٰهِ وَكِيۡلًا ﴿۱۷۱﴾

१७२. मसीह ला या गोष्टीबाबत मुळीच संकोच नाही की तो अल्लाहचा दास असावा. आणि ना सान्निध्यात असलेल्या फिरिश्त्यांना या गोष्टीचा संकोच आहे आणि जो कोणी त्याच्या दास्यत्वास संकोच करण्यायोग्य समजेल व गर्व करील तर ती वेळ लांब नव्हे जेव्हा अल्लाह सर्वांना आपल्या समोर एकत्रित करील.

لَنۡ يَّسۡتَنۡكِفَ الۡمَسِيۡحُ اَنۡ يَّكُوۡنَ عَبۡدًا لِّلّٰهِ وَلَا الۡمَلٰۤـئِكَةُ
الۡمُقَرَّبُوۡنَ ؕ وَمَنۡ يَّسۡتَنۡكِفۡ عَنۡ عِبَادَتِهٖ وَيَسۡتَكۡبِرۡ
فَسَيَحۡشُرُهُمۡ اِلَيۡهِ جَمِيۡعًا ﴿۱۷۲﴾

१७३. त्या वेळी तो त्या लोकांना, ज्यांनी ईमान आणले होते व ज्यांनी सत्कृत्ये केली होती पूरेपूर मोबदला देईल, आणि आपल्या कृपेने अधिक प्रदान करील, या उलट ज्यांनी त्याच्या दास्यत्वाला संकोच करण्यायोग्य समजले होते व गर्व केला होता, त्यांना तो दुःखदायक शिक्षा देईल आणि अल्लाहच्या विरोधात त्यांना कोणीहि आपला मित्र वा सहाय्यक आढळणार नाही.

فَاَمَّا الَّذِيۡنَ اٰمَنُوۡا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ فَيُوَفِّيۡهِمۡ اُجُوۡرَهُمۡ
وَ يَزِيۡدُهُمۡ مِّنۡ فَضۡلِهٖ ۚ وَاَمَّا الَّذِيۡنَ اسۡتَنۡكَفُوۡا وَاسۡتَكۡبَرُوۡا
فَيُعَذِّبُهُمۡ عَذَابًا اَلِيۡمًا ۙ وَّلَا يَجِدُوۡنَ لَهُمۡ مِّنۡ دُوۡنِ اللّٰهِ
وَلِيًّا وَّلَا نَصِيۡرًا ﴿۱۷۳﴾

१७४. लोक हो ! तुमच्या जवळ तुमच्या पालन कर्त्याकडून स्पष्ट प्रमाण आले आहे. [२८२] आणि आम्ही तुमच्याकडे स्पष्ट प्रकाश अवतरीत [२८३] केला आहे.

يٰۤاَيُّهَا النَّاسُ قَدۡ جَآءَكُمۡ بُرۡهَانٌ مِّنۡ رَّبِّكُمۡ وَاَنۡزَلۡنَاۤ
اِلَيۡكُمۡ نُوۡرًا مُّبِيۡنًا ﴿۱۷۴﴾

२७७. मूळ शब्द غلو 'गुलू' याचा अर्थ एखाद्याच्या श्रद्धाभावात किंवा एखाद्या गोष्टीच्या समर्थनात मर्यादे पलीकडे जाणे.धर्मात अतिशयोक्तिचा अर्थ हा की ज्या गोष्टीचे जे मुल्य त्यास धर्माने निर्धारीत केले आहे त्यास वाढविले जावे आणि तिला जे स्थान दिले गेले आहे त्याहून अधिक उच्च स्थान त्याच्या करिता योजिले जावे. अतिशयोक्तिचे अगदी स्पष्ट उदाहरण ख्रिश्चनांचे हे वर्तन होय की ते हजरत ईसा यांना जे अल्लाहचे दास व त्याचे प्रेषित आहेत ईश्वराचा पुत्र मानून त्यांची पूजा करु लागले. 'गुलू'ची उदाहरणे इतर धर्मातहि मोठया संख्येने मिळतात. कोणी प्रेषिताला 'अवतार'चा दर्जा दिला तर कोणी आपल्या धर्म-प्रमुखांना ईश्वराच्या पदावर बसविले. कुरआन मानणारे देखील हळूहळू 'गुलू' (अतिशयोक्ति) ला बळी पडले यास्तव कोणी बुजुर्गा (सिद्धपुरुषा) करिता पैगंबरचा दर्जा योजिला तर कोणी औलीयास ईश्वराच्या स्थानावर पोहचविले व त्यांच्याकरिता 'गौसुल आजम' व 'मुश्किल कुशा' या सारख्या पदव्या घडविल्या वस्तुत: ह्या पदव्या केवळ ईश्वराला साजेशा आहेत व विशेषत: त्याच्याच करिता आहेत. तसेच कोणी इमाम मासूम (निरागस) असण्यासंबंधी श्रद्धा गढली तर कोणी तरीकत (सूफी मार्ग) शोधून काढला. आणि शेखचे ध्यान घेऊन बसला. इस्लामने कबरीना साधेपणाने बनविण्याचा आदेश दिला होता परंतु अतिशयोक्ति प्रिय स्वभावांनी आपल्या सिद्धपुरूषांच्या आलीशान समाध्या बांधल्या. इस्लामने साधेपणा व अल्पसंतु परतेची शिकवण दिली होती परंतु अतिशयोक्तिपूर्ण बुद्धीने 'जुहद'च्या रुपाने सन्यास वृत्ती पत्करली. अशा प्रकारे जी कामे केल्याने पुण्य लाभते पण न केल्याने पाप लागत नाही, त्या कामांना अनिवार्य कर्तव्याचा व अत्यावश्यकतेचा दर्जा दिला गेला. याचा परिणाम धर्म प्रकृतिवर झाला. मग ना इस्लामचा साधेपणा बाकी राहू शकला व ना त्याचे संतुलन. परिणाम हा की समाजात निरानिराळया प्रकारचे उपद्रव, उत्पात निर्माण झाले व अनेक पंथांनी जन्म घेतला. व अतिशयोक्तिप्रिय लोकांच्या हातून धर्माची एक वीट देखील आपल्या स्थानावर कायम राहू शकली नाही. किंबहुना समस्त धर्म व्यवस्था अस्ताव्यस्त होऊन गेली.

२७८. जर अल्लाहकडे त्याच गोष्टींचा निर्देश केला जावा ज्या सत्य आहेत तर सर्व उत्पात मिटतो. परंतु जेव्हा त्याच्याकडे अशा गोष्टींचा निर्देश केला जावा ज्या त्याने सांगितल्याच नाहीत तर 'गुलू' व बिदअत'चा मार्ग मोकळा होतो व धर्माचे स्वरुपच बिघडून जाते. ख्रिश्चनांच्या मार्गभ्रष्टतेचे कारण हेच आहे की त्यांनी धर्मात अनेक मनगढीत गोष्टी सामिल केल्या आहेत. अर्थात कोणत्याही स्वरचित गोष्टीला धर्मात सामील करणे तिचा अल्लाहकडे निर्देश करण्यासारखे आहे कारण धर्म मजकूर आहे त्या उपासना व्यवस्थेपासून व आज्ञापालनापासून जे अल्लाहने अवतरीत केलेले आहे यात कोणत्याही गोष्टीस आपल्या तर्फे सामील करणे या गोष्टीचा दावा करणे होय की ही गोष्ट अल्लाह तर्फे आहे. खरे पाहिले असता ती तशी नसते.

मुसलमानांच्या अंगी देखील अनेक मार्गभ्रष्टता बिदआतच्या मार्गाने दाखल झाल्या आहेत. व त्यांनी अनेक खोडसळ गोष्टींना धर्माचा अंश बनविले आहे. म्हणून जोपर्यंत मनुष्य पवित्र कुरआन व सुन्नाहचा स्वच्छ शुद्धबुद्धिने अभ्यास करीत नाही तोपर्यंत त्याला हे जाणून घेणे कठीण आहे की अल्लाहचा खरा धर्म कोणता?

२७९. येथे हजरत ईसा यांच्या बाबत तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. एक ही की ते अल्लाहचे रसूल आहेत दुसरी ही की ते अल्लाहचे एक कलीमा आहे आणि तिसरी ही की ते अल्लाहतर्फे एक आत्मा आहेत यांचा उल्लेख करण्याचा हेतु हजरत ईसा यांच्याबद्दल ख्रिश्चनांच्या श्रद्धेचे खंडन करणे होय. अर्थात हजरत मसीह यांचा असामान्य पद्धतिने जन्म ही काही अशी बाब नव्हे की त्यांना ईश्वराचा पुत्र बनविले जावे. असामान्यरित्या त्यांचा जन्म ईश्वराच्या आज्ञेनेच झाला होता व त्यांच्या अंगी जो आत्मा होता तो अल्लाहनेच प्रदान केलेला होता म्हणून ही श्रद्धा अत्यंत मार्गभ्रष्ट करणारी आहे की अल्लाहचा आत्मा (त्याचा अंश) त्यांच्या अंगात संचारला होता (अल्लाह रक्षण करो) (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा -सूरह आले इमारान टीप-५६)

२८०. तीन ईश्वरांची श्रद्धा ख्रिश्चन मताची स्वरचित श्रद्धा आहे. जी पिता पुत्र व पवित्र आत्मा यांनी संमिश्र आहे. ही श्रद्धा सरासर अनेकेश्वरवादाची आहे. परंतु ज्याअर्थी तौरात जबूर, इंजिल सर्व आकाशस्थ ग्रथांची शिकवण तौहीदची शिकवण आहे म्हणून तौहीद (एकेश्वरवाद) व तीन उपास्य दोघांचाहि एकाच वेळी दावा केला गेला आहे. व दोघांना निभावण्याचा प्रयत्न केला गेला आहे व या प्रयत्नात धर्मांचे स्वरुप वाईटरित्या बिघडून गेले.

ही आयत एका बाजूला ख्रिश्चनांच्या तीन ईश्वरांच्या श्रद्धेचे खंडन करते तर दुसऱ्या बाजूला अनेकेश्वरवादी धर्मांच्या अगणित उपास्यांच्या कल्पनेस अगदीच रद्दबातिल ठरविते मग ती दोन उपास्यांची श्रद्धा असो किंवा शेकडो अथवा हजारो ईश्वरांची श्रद्धा असो.

२८१. अर्थात जेव्हा आकाशांमधील व जमीनिवर

अस्तित्वात असलेले सर्व काही अल्लाहचेच आहे तर त्यास पुत्र बाळगण्याची काय गरज आणि ज्याअर्थी तो सर्वांची देखरेख करण्यास पुरेसा आहे तर त्याला या गोष्टीची गरज कशी भासू शकते की त्याने एखाद्याला पुत्र बनवून त्याच्याकडून मदत घ्यावी.

२८२. अर्थात कुरआन होय. ज्याची आवाहन-शैली बौद्धिक व सप्रमाण आहे आणि या दृष्टीने ते सर्व मानावांवर अल्लाहचे प्रमाण आहे.

२८३. हे क़ुरआनचे दुसरे वैशिष्टय आहे की ते सत्य आणि असत्यात फरक करते आणि जीवन व्यतीत करण्याचा खरा मार्ग दाखविते.

❀❀❀❀❀❀

**तेव्हा जे लोक अल्लाहवर ईमान बाळगतील व त्यास मजबूतीने धरतील, त्यांना तो आपल्या दया व आपल्या कृपेत दाखल करील आणि आपल्या कडून सरळ मार्गाचे मार्गदर्शन प्रदान करील.** ***(अल-कुरआन)***

**१७५.** तेव्हा जे लोक अल्लाहवर ईमान बाळगतील व त्यास मजबूतीने धरतील, त्यांना तो आपल्या दया व आपल्या कृपेत दाखल करील आणि आपल्या कडून सरळ मार्गाचे मार्गदर्शन प्रदान करील.[२८४]

فَاَمَّا الَّذِيْنَ اٰمَنُوْا بِاللّٰهِ وَاعْتَصَمُوْا بِهٖ
فَسَيُدْخِلُهُمْ فِيْ رَحْمَةٍ مِّنْهُ وَفَضْلٍ ۙ وَّيَهْدِيْهِمْ
اِلَيْهِ صِرَاطًا مُّسْتَقِيْمًا ۭ ﴿١٧٥﴾

**१७६.** ते तुम्हाला फतवा (धर्म आदेश) विचारतात.[२८५] सांगा अल्लाह 'कलाला' संबंधी तुम्हाला फतवा (हुकुम) देतो.[२८६] जर एखादा मनुष्य नि:संतान मरावा आणि त्याला एक बहिण असावी.[२८७] तर त्याने जे काही मागे सोडले असेल त्याचा अर्धा भाग तिला मिळेल आणि (जर बहिण मेल्यास व भाऊ जिवंत असल्या) तो या बहिणीचा वारस[२८८] असेल, या अटीवर की त्या बहिणीला कोणतीहि संतान नसावी. जर बहिणी दोन असतील, तर त्यांना मृताने जे काही मागे सोडले असेल त्यात दोन तृतियांशा हिस्सा मिळेल.[२८९] आणि जर कित्येक भाऊ बहिणी असतील तर पुरूषांचा हिस्सा दोन स्त्रीयांच्या बरोबरीने असेल.[२९०] अल्लाह तुमच्याकरिता (आदेश) स्पष्ट फर्मावितो. अशासाठी की तुम्ही पथभ्रष्ट न व्हावे आणि (लक्षात असू द्या) अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.

يَسْتَفْتُوْنَكَ ۭ قُلِ اللّٰهُ يُفْتِيْكُمْ فِي الْكَلٰلَةِ ۭ اِنِ امْرُؤٌا هَلَكَ
لَيْسَ لَهٗ وَلَدٌ وَّلَهٗٓ اُخْتٌ فَلَهَا نِصْفُ مَا تَرَكَ ۚ وَهُوَ يَرِثُهَآ
اِنْ لَّمْ يَكُنْ لَّهَا وَلَدٌ ۭ فَاِنْ كَانَتَا اثْنَتَيْنِ فَلَهُمَا الثُّلُثٰنِ مِمَّا
تَرَكَ ۭ وَاِنْ كَانُوْٓا اِخْوَةً رِّجَالًا وَّنِسَاۗءً فَلِلذَّكَرِ مِثْلُ حَظِّ
الْاُنْثَيَيْنِ ۭ يُبَيِّنُ اللّٰهُ لَكُمْ اَنْ تَضِلُّوْا ۭ وَاللّٰهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿١٧٦﴾

२८४. म्हणजे आखिरत मध्ये त्यांना अल्लाहचे सान्निध्य प्राप्त होईल. जी मार्गदर्शनाची अंतिम मजल होय. आयतीचा मतितार्थ हा की जे लोक कुरआनवर ईमान बाळगतील आणि अल्लाहचा दामन धरतील ते आपली अंतिम गरज अर्थात अल्लाहला प्राप्त करून घेण्यात यशस्वी होतील आणि ही सर्वात मोठी देणगी होय, जी त्यांना लाभेल.

२८५.सूरहच्या सुरवातीस 'वारसा' संबंधी जे आदेश वर्णिले गेले आहेत त्यांच्या संबंधाने एका प्रश्नाच्या उत्तरात ही आयत स्पष्टीकरणाच्या हेतूने अवतरित झाली, जिला सूरहच्या शेवटी पुरवणी या नात्याने सामील केले गेले.

२८६. असे दिसून आले की प्रश्न कलाला (ज्याचा ना बाप जीवंत असावा ना संतान अशा माणसा) च्या वारसा संबंधी होता ज्याचा आदेश आयत क्र.१२ मध्ये आला आहे (स्पष्टीकरणासाठी पहा-टीप क्र. ३४)

२८७. आयत क्र.१२ मध्ये 'अखायाफी' (एकाच आईच्या पण बाप वेगळे अशा) भाऊ- बहिणींचा हिस्सा वर्णिला गेला होता. या आयतीत सख्खे तसेच एकाच बापाचे व आई वेगवेगळी असलेल्या भाऊ-बहिणींचा हिस्सा वर्णिला गेला आहे.

२८८. अर्थात जर कुरआनने नियुक्त केलेल्या हिस्सेदारांपैकी (Quranic sharers) एकहि जीवंत नसेल तर भाऊ पूर्ण वारसाचा उत्तराधिकारी ठरेल आणि जर यांच्यापैकी कोणी जीवंत असेल उदा. पती तर त्याचा हिस्सा दिल्यानंतर बाकी मालमत्तेचा वारसदार भाऊ ठरेल.

२८९. हाच आदेश इतर अधिक 'बहिणी' बाबतहि आहे. त्या दोन तृतियांशमध्ये समसमान सहभागी होतील.

२९०. सख्ख्या आणि एकाच पित्याच्या पण आई वेगवेगळी अलेल्या भाऊ बहीणीच्या वारसा प्राप्तीच्या स्थितींचे विवरण पहा. वारसा संबंधीचा नकाशा पृ. २७२ ते २७४.

# ५. अल मायदा

## (परिचय)

**नाव :** आयत क्र. ११२ मध्ये हजरत ईसा यांच्या एकनिष्ठ साथीदारांचा किस्सा वर्णिला गेला आहे की त्यांनी आपली ही इच्छा व्यक्त केली होती की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्याकरिता आकाशातून मायदा (खाद्य पदार्थानी भरलेले ताट) उतरवावे. या संबंधान्वये या सूरहचे नाव ''अल मायदा'' असे आहे.

**अवतरण काळ :** ही सूरह मदनी आहे आणि मजकूरावरून असे दिसून येते की हिचे अवतरण हुदैबिया तहानंतर हिजरी सन ७ मध्ये झाले असेल. हुदैबिया तहानंतर मुसलमानांना उमरा करण्याची परवानगी मिळाली होती. यास्तव अशी संधी निर्माण झाली होती की, काबागृहाचे दर्शन व अल्लाहच्या उपासने संबंधाने त्यांना आवश्यक ते आदेश दिले जावे.

**मध्यवर्ति कल्पना :** ही त्या संग्रहाची जिचा क्रम सूरह बकरापासून सुरू झाला, अंतिम सूरह होय ज्यात शरीयत पूर्णतेच्या घोषणेसह तिच्या विधी-आदेशांचे पालन व धर्मशास्त्रीय कायद्यांना लागू करण्याची अवस्था होती, यास्तव व्यक्तिगत व सामूहिक जीवनाशी संबंधित धर्मशास्त्राचे आदेश वर्णन करण्यासोबत ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहशी केलेल्या प्रतिज्ञेवर कायम राहण्याची सक्त ताकीद केली गेली आहे. या संदर्भात मुस्लिम जाती समूहास सावध केले गेले आहे की त्यांनी यहुदी व ख्रिश्चनांसारखे वर्तन पत्करू नये ज्यांनी वचनभंग केला व ज्यांनी शरीयतच्या व्यवस्थेत फेरबद्दल केले, तिच्या पालनापासून पलायन केले आणि धर्मात बिदआत' (नवनव्या गोष्टी) निर्माण केल्या. ज्या अर्थी कुरआनची शैली मार्गदर्शन व संस्काराची आहे म्हणून या सर्व आदेश व समस्यांवर मिळत्या जुळत्या पद्धतिने चर्चा केली गेली आहे, अशासाठी की धर्मशास्त्राच्या पालनास मान्य करण्याकरिता मानसिक अवसर प्राप्त व्हावेत. तद्वतच प्रसंगानुरोधाने यहूदी ( مَغْضُوْبِ عَلَيْهِمْ ज्यांच्यावर ईश-कोप झाला) आणि ख्रिश्चन ( ضَالِّيْنَ मार्गभ्रष्ट) यांना शेवटच्या मर्यादेपर्यंत हादरविले गेले आहे, यासाठी की त्यांच्याकरिता प्रमाण पूर्णपणे प्रस्थापित व्हावे व त्यांच्या विरोधात ईमानधारकांचा ( اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ज्यांना तू तुझ्या इनामाने उपकृत केलेस) मार्ग प्रकाशित व्हावा.

**आयात रचना :** आयत क्र. १ वचनाचा आरंभ आहे ज्यात धर्मशास्त्राच्या वचनांचे पालन करण्याविषयी ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. २ ते ६ मध्ये धर्मशास्त्राच्या आदेशांचे वर्णन केले गेले आहे.

आयत क्र. ७ ते ११ मध्ये अल्लाहशी केलेल्या प्रतिज्ञेवर दृढतापूर्वक निश्चल राहण्याची आणि न्याय्य वर्तन अंगिकारण्याची ताकीद केली गेली आहे. त्याच्या परिशिष्टात वचनभंग करणाऱ्या गटाचा कट वर्णिला आहे.

आयत क्र.१२ ते २६ मध्ये यहुदी व ख्रिश्चनांच्या वचनभंगाच्या घटना वर्णन केल्या गेल्या आहेत. यासाठी की ईमानधारकांनी यापासून बोध घ्यावा, त्यासोबतच ग्रंथ धारकांना आपल्या पालनकर्त्याशी वचन पाळण्याचे पुन:श्च आमंत्रण दिले गेले आहे.

आयत क्र. २७ ते ३२ मध्ये आदमच्या दोन पुत्रांचा किस्सा वर्णिला गेला आहे ज्यावरून हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की अल्लाहच्या वचनावर कायम राहण्याकरिता ईशभय (तकवा) अत्यावश्यक आहे. जर मनात तकवा नसेल तर अपराधात्मक विचारसरणी वाढीस लागते.

आयत क्र. ३३ ते ४० मध्ये बिघाड आणि अपराधांच्या निवारणाकरिता विधिनियम वर्णिले गेले आहेत त्यासोबतच ईशभय पत्करण्याची ताकीद केली गेली आहे व कुफ्रच्या परिणितीविषयी सचेत केले गेले आहे.

आयत क्र. ४१ ते ५० मध्ये यहुदी व ख्रिश्चनांच्या वचनभंगाची उदाहरणे सादर केली गेली आहेत, हे दर्शविण्यासाठी की यांनी कशा प्रकारे अल्लाहच्या ग्रंथास आपल्या पाठीमागे टाकले आहे व ते जीवन-व्यवहारात शरीयतच्या निर्णयास कबूल करण्यापासून कसे पळ काढीत आहेत.

आयत क्र.५१ ते ६६ मध्ये ईमान धारकांना आदेश दिला गेला आहे की त्यांनी अशा वचनभंग करणाऱ्या व बिघाड निर्माण करणाऱ्या लोकांना (यहुदी व ख्रिश्चनांना) आपला मित्र बनवू नये व त्यांचा प्रभाव कबूल करण्या पासून अलिप्त रहावे.

आयत क्र. ६७ ते ८६ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि

वसल्लम) यांच्या शुभवाणीत ग्रंथ धारकांना सुधारणेचे आमंत्रण दिले गेले आहे. या संदर्भात त्यांचे दोषपूर्ण वचन श्रद्धेतील बिघाड, सत्याचा इन्कार व काफीरांशी मैत्री इ. चा उल्लेख आला आहे. या प्रसंगानुरोधाने त्या लोकांची स्तुति केली गेली आहे जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आवाहन स्वीकारून ईश भयाचे जीवन अंगिकारीत होते.

आयत क्र. ८७ ते १०८ मध्ये धर्मशास्त्राचे ते आदेश वर्णिले गेले आहेत जे हलाल व हराम असण्या संबंधीचे आहेत. शेवटी शहादत (साक्षी) चा विधिनियम वर्णन केला गेला आहे.

आयत क्र. १०९ ते १२० उक्ति समाप्ति होय, ज्यात हे स्पष्ट केले गेले आहे की कियामतीच्या दिवशी प्रेषित ही साक्ष देतील की त्यांनी आपल्या जाती समूहापर्यंत ईशधर्म व त्याचे धर्मशास्त्र यथायोग्य पोहचविले होते.या संदर्भात हजरत ईसा यांचे उदाहरण प्रस्तुत केले गेले आहे.अशासाठी की ख्रिश्चनांकरिता प्रमाण प्रस्थापित व्हावे - ही ती साक्ष आहे जी हजरत ईसा, ईश्वराच्या न्यायालयात सादर करतील.

# ५.सूरह अल मायदा

سُورَةُ الْمَائِدَة

(आयती-१२०)

अनुवाद

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. हे ईमान, बाळगणाऱ्यांनो !(शरीअतच्या) बंधनांचे पूर्णत: पालन करा [१] तुमच्याकरिता गुरांच्या जातीची जनावरे हलाल (वैध) ठरविली गेली.[२] शिवाय त्यांच्याखेरीज ज्यांचा आदेश तुम्हाला ऐकविला जात आहे.[३] परंतु इहराम [४] च्या स्थितीत शिकार उचित समजू नका.[५] नि:संशय अल्लाह जो इच्छितो हुकुम देतो.[६]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا أَوْفُوا بِالْعُقُودِ ۚ أُحِلَّتْ لَكُمْ بَهِيمَةُ
الْأَنْعَامِ إِلَّا مَا يُتْلَىٰ عَلَيْكُمْ غَيْرَ مُحِلِّي الصَّيْدِ وَأَنْتُمْ حُرُمٌ ۗ إِنَّ اللَّهَ
يَحْكُمُ مَا يُرِيدُ ①

२. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाहच्या प्रतिकांचा अनादर करु नका, [७] ना आदरणीय महिन्यांचा,[८] ना कुर्बानी च्या जनावरांचा, ना त्या जनावरांचा [९] ज्यांच्या गळयात (कुर्बानीचे चिन्ह म्हणून) पट्टे पडले असावेत, ना त्या लोकांचा जे पवित्र गृहा (काबागृहा) कडे आपल्या पालनकर्त्याची कृपा व त्याच्या प्रसन्नतेच्या शोधार्थ निघाले असावेत.[१०] आणि जेव्हा तुम्ही इहरामच्या स्थितीतून बाहेर याल तेव्हा शिकार करु शकता. आणि एखाद्या जाती समूहाचे वैर या कारणास्तव की, त्याने तुम्हाला मसजिदे हराम (काबागृहा) पासून रोखले.[११] या गोष्टीस प्रवृत्तकारक न व्हावे की तुम्ही अतिरेक करु लागावे.[१२] सत्कर्म आणि तकवा (ईश-भया) च्या कामात एकमेकांस मदत करा, आणि गुन्हा व अत्याचाराच्या कामांमध्ये मदत करु नका [१३] अल्लाहचे भय बाळगून रहा. नि:संशय अल्लाह मोठी कठोर शिक्षा देणारा आहे.[१४]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تُحِلُّوا شَعَائِرَ اللَّهِ وَلَا الشَّهْرَ الْحَرَامَ
وَلَا الْهَدْيَ وَلَا الْقَلَائِدَ وَلَا آمِّينَ الْبَيْتَ الْحَرَامَ يَبْتَغُونَ
فَضْلًا مِنْ رَبِّهِمْ وَرِضْوَانًا ۚ وَإِذَا حَلَلْتُمْ فَاصْطَادُوا ۚ
وَلَا يَجْرِمَنَّكُمْ شَنَآنُ قَوْمٍ أَنْ صَدُّوكُمْ عَنِ الْمَسْجِدِ الْحَرَامِ أَنْ
تَعْتَدُوا ۘ وَتَعَاوَنُوا عَلَى الْبِرِّ وَالتَّقْوَىٰ ۖ وَلَا تَعَاوَنُوا عَلَى الْإِثْمِ
وَالْعُدْوَانِ ۚ وَاتَّقُوا اللَّهَ ۖ إِنَّ اللَّهَ شَدِيدُ الْعِقَابِ ②

१. शरीअतच्या आदेशांच्या दृष्टीने ही अंतिम सूरह आहे, म्हणून हिचा आरंभच या आदेशासह झाला आहे. की ''शरीअतच्या बंधनांचे पूर्णत:पालन करा'' हे जणू शेवटचे वचन होय जे ईमान बाळगणाऱ्यांपासून घेतले गेले आहे की ते शरीअतच्या आदेश व विधी-नियमांचे व मर्यादा आणि बंधनांचे पूरेपूर पालन करतील व यापासून तिळमात्र देखील परावृत्त होणार नाहीत.

यानंतरहि जर मुसलमान शरीअतच्या आदेशांना पाठीमागे टाकतात किंवा धर्मशास्त्राच्या मर्यादा व बंधनाविरुद्ध वागतात किंवा शरीअतच्या कायद्यांवर स्वरचित कायद्यांना प्राधान्य देतात तर हे त्या आकाशीय मार्गदर्शनाच्याहि विरुद्ध आहे जे यांना शेवटचे म्हणून दिले गेले आहे आणि त्या प्रतिज्ञेविरुद्धहि जी त्यांनी कुरआन व पैगंबर यांच्यावर ईमान बाळगून आपल्या पालनकर्त्याशी केली होती.

२. 'अनआम' (गुरेढोरे) हा शब्द अरबी भाषेत उंट, गाय, बैल व मेंढी बकरीसाठी वापरला जातो, आणि ''बहीमह'' हा शब्द सर्वासामान्य आहे. यात इतरहि चतुष्पाद प्राण्यांचा समावेश आहे.तेव्हा بَهِيمَةُ الْأَنْعَامِ ''बिहैमतुल अनआम'' (गुरेढोरे) या प्रकारची असावीत अर्थात जी वाघुळ करीत असावीत सूळेदार दात ठेवित नसावीत आणि खाद्य इत्यादित गुरांसमान असावेत. उदा. हरण, नील गाय (जंगली गाय) इत्यादि.

''हलाल ठरविले गेले'' याचा अर्थ हा की या जनावरांचे मांस खाणे, दुध पिणे, यांची चामडी, हाडे व लोकर इ. चा लाभ प्राप्त करणे उचित केले गेले म्हणून काल्पनिक गोष्टींच्या आधारावर त्यांना जबह (कत्तल) करणे किंवा त्यांचे मांस खाण्यात कसल्याहि प्रकारची मूढ विश्वासाच्या आधारे आशंका बाळगू नये.

३. अर्थात या धर्मसंमत असण्यापासून ती जनावरे अपवाद आहेत ज्यांच्या निषिद्ध असण्याचा आदेश यापूर्वी कुरआनात वर्णन केला गेला आहे आणि पुढे (आयत क्र. ३ मध्ये वर्णन केला जात आहे.

४. काबागृहाचे दर्शन (हज्ज किंवा उमरा) करणाऱ्यांवर पोषाख वगैरेची विशेष बंधने लागू होतात. या बंधनामध्ये दाखल होण्याचे नाव 'इहराम स्थिती' आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा- सूरह बकरा टीप क्र. २८४

५. इहराम च्या स्थितीत जमीनीवरील शिकार अवैध आहे. याचे स्पष्टीकरण आयत क्र. ९६ मध्ये येत आहे.

६. अर्थात अल्लाहला हुकूम देण्याचा अगदी अधिकार आहे. आणि दासांना हा हक्क पोहचत नाही की त्यांनी त्याच्या एखाद्या आदेशाविषयी का कूं करावे. अल्लाहचे आदेश जरी हित-कल्याणावर आधारीत आहेत, तरी शक्यता आहे की कसोटीच्या हेतूने ''हित कल्याण'' गुप्त ठेवले गेले असावे यास्तव माणसाकरिता खरी व उचित वागणूक हीच होय की त्याने का कूं न करता ईश्वराचे आज्ञापालन करावे.

आदेश देण्याचा पूरेपूर अधिकार केवळ अल्लाहला आहे म्हणून जो कोणी त्याने निर्धारित केलेल्या हलाल व हराम पासून बेपर्वा होऊन स्वत:ला किंवा एखाद्या व्यक्तिरत्वाला किंवा समूहाला पूरेपूर रित्या आदेश देण्यायोग्य समजतो तो खरे पाहता या गोष्टीस नकार दर्शवितो की हा अधिकार अल्लाह करिता विशेष आहे आणि त्याचे वर्तन अगदीच अनेकेश्वरवादाचे व काफ़िर वृत्तीचे आहे.

७. प्रतिके (शआइर) याच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १९०

८. आदरणीय महिन्यांचे स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह बकरा टीप क्र. २६९.

९. ज्या जनावरांना कुर्बानीच्या उद्देश्याने काबागृहाकडे नेले जात होते त्यांच्या गळयात पट्टे टाकले जात अशासाठी की त्यांना ओळखले जावे. कोणीही त्यांना अडथळा करु नये हे पट्टे सर्वसामान्यपणे झाडाच्या सालीचे रहात. आणि उंट व गायींच्या गळयात टाकले जात.

बकरे सामान्यत: याला अपवाद होते. अर्थात कुर्बानीच्या जनावरांचे दोन प्रकार होते. एक प्रकार गळयात पट्टे असलेला तर दुसरा पट्ट्याविरहित असलेला. येथे दोघांचाहि अनादर न करण्याविषयी आदेश दिला गेला आहे. अर्थात गळयात पट्टे असलेल्या जनावरांचा उल्लेख ताकीद म्हणून केला आहे की जेव्हा त्यांच्या गळयात कुर्बानीचे चिन्हे आहे तर त्यांना अडथळा करण्याचे कोणते कारण असू शकते?

स्पष्ट असावे की त्या काळी मदीनेच्या आसपासच्या क्षेत्रातून काबागृहाचे दर्शन करणाऱ्यांचे काफीले जात आणि परिस्थिती तणावाची असल्यामुळे या गोष्टीचे भय होते की मुसलमानानी एखादे असे पाऊल न उचलावे ज्यामुळे अल्लाहच्या मानचिन्हांचा अनादर होत असावा म्हणून सक्तिने याविषयी मनाई केली गेली.

१०. अर्थात जे लोक हज्ज किंवा उमरा करण्याच्या इराद्याने निघाले असावेत ते आदरपात्र आहेत कारण त्यांचा हा प्रवास अल्लाहचा अनुग्रह व त्याच्या प्रसन्नतेच्या शोधार्थ असतो म्हणून त्यांच्या मार्गात एखादा अडथळा उत्पन्न करणे किंवा त्यांना एखाद्या प्रकारचे नुकसान पोहचविणे फार मोठे पापकृत्य होय. या आदेशात जी सर्वसामान्याता दिसून येते ती तत्कालीन परिस्थितीनुसार होती. कारण त्या काळात हज्जयात्रा केवळ मुसलमानच करीत नसत तर अरब भूमीच्या

कोना कोपऱ्यातून लोक हज्ज यात्रेला येत. नंतर जेव्हा सूरह तौबाची आयत :-

إِنَّمَا الْمُشْرِكُونَ نَجَسٌ فَلَا يَقْرَبُوا الْمَسْجِدَ الْحَرَامَ بَعْدَ عَامِهِمْ هٰذَا۔

"अनेकेश्वरवादी मलिच्छ आहेत म्हणून या वर्षानंतर यांनी काबागृहाच्या जवळ येता कामा नये'' (तौबा-२८)

तेव्हा याने या आदेशास काबागृहाचे दर्शन करणाऱ्या मुसलमानांकरिता खास केले.

११. मक्केच्या काफिराकडे इशारा आहे. ज्यांनी मुसलमानांना हज्ज व उमरा करण्यापासून रोखले होते.

१२. अर्थात ना धर्माशास्त्राच्या मर्यादाचे उल्लंघन करा व ना न्यायाविरूद्ध एखादे काम करा.

१३. ही फार मोठी तात्विक गोष्ट आहे जी या आयतीत सांगितले गेली आहे. मुसलमानांची आचारसंहिता अशी असली पाहिजे की त्यांनी नेकीच्या व ईश-भक्तिच्या कामात एकमेकांचे सहाय्यक व्हावे आणि गुन्हा व अतिरेकाच्या कामात कोणाचेहि सहाय्यक नाही. ही तात्विक भूमिका त्यांनी प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक कार्यक्षेत्रआत पत्कारली पाहिजे मग कोणत्याही देशात राहत असोत आणि व्यवहार धार्मिक व नैतिक स्वरुपाचे असोत वा राजकीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे असोत, त्यांची सामूहीक पॉलीसी याच नियमावर आधारीत असली पाहिजे, दांभिक पद्धतिच्या डिप्लोमेसीवर नव्हे.

१४. अर्थात जर अल्लाहचे भय न बाळगाल तर तो कठोर शिक्षा देईल

ते तुम्हाला विचारतात की त्यांच्याकरिता कोणत्या वस्तू हलाल (विहित) केल्या गेल्या आहेत. सांगा तुमच्या करिता समस्त स्वच्छ शुद्ध वस्तु हलाल केल्या गेल्या आहेत आणि ज्या शिकारी जनावरांना तुम्ही तरबेज केले असेल, ज्यांना तुम्ही अल्लाहने दिलेल्या ज्ञांनाच्या आधारे शिकारीचे शिक्षण देता ते जी शिकार तुमच्याकरिता रोखून ठेवतील ती तुम्ही खा तथापि त्यावर अल्लाहचे नाव घ्या आणि अल्लाहचे भय बाळगा कारण अल्लाह हिशेब घेण्यात फार शीघ्र आहे. *(अल-क़ुरआन)*

३. तुमच्यावर हराम केले गेले मुडदार [१५] (जनावर), रकत,[१६] डुकराचे मांस, [१७] ते (जनावर) ज्यावर अल्लाह शिवाय इतर दुसऱ्याचे नाव घेतले गेले असावे.[१८] ते जे गळा घोटल्याने [१९] किंवा मार लागल्यामुळे [२०] किंवा उंचीवरुन खाली पडून [२१] वा शिंग भोसकले गेल्याने मेले असावे [२२] अथवा ज्यास एखाद्या हिस्त्र पशूने फाडून खाल्ले असावे [२३] मात्र त्या शिवाय ज्यास तुम्ही (जिवंत प्राप्त करून) जबह (हलाल रित्या ठार) [२४] करावे आणि ते जनावर जे एखाद्या स्थानावर [२५] जबह केले गेले असावे. तसेच हे देखील हराम होय की तुम्ही बाणांद्वारे भाग्य जाणून घ्यावे [२६] हे पाप आहे. आज [२७] काफ़िरांना तुमच्या धर्माकडून अगदी निराशा झाली आहे. यास्तव त्यांचे भय बाळगू नका किंबहुना माझे भय बाळगा.[२८] आज [२९] मी तुमच्यासाठी तुमच्या धर्माला परिपूर्ण केले [३०] आणि आपली देणगी तुम्हावर पूर्ण केली [३१] आणि तुमच्याकरिता इस्लामला धर्म या नात्याने पसंत फर्माविले [३२] तेव्हा जो कोणी भूकेने व्याकुळ व्हावा (व त्याने यापैकी एखादी वस्तू खावी) या अटीवर की अपराधाकडे तो आकर्षित नसावा तर अल्लाह खचितच माफ करणारा व दया करणारा आहे.[३३]

حُرِّمَتْ عَلَيْكُمُ الْمَيْتَةُ وَالدَّمُ وَلَحْمُ الْخِنْزِيرِ وَمَا أُهِلَّ لِغَيْرِ
اللَّهِ بِهِ وَالْمُنْخَنِقَةُ وَالْمَوْقُوذَةُ وَالْمُتَرَدِّيَةُ وَالنَّطِيحَةُ وَمَا
أَكَلَ السَّبُعُ إِلَّا مَا ذَكَّيْتُمْ وَمَا ذُبِحَ عَلَى النُّصُبِ وَأَنْ تَسْتَقْسِمُوا
بِالْأَزْلَامِ ذَٰلِكُمْ فِسْقٌ الْيَوْمَ يَئِسَ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ دِينِكُمْ
فَلَا تَخْشَوْهُمْ وَاخْشَوْنِ الْيَوْمَ أَكْمَلْتُ لَكُمْ دِينَكُمْ وَأَتْمَمْتُ
عَلَيْكُمْ نِعْمَتِي وَرَضِيتُ لَكُمُ الْإِسْلَامَ دِينًا فَمَنِ اضْطُرَّ فِي
مَخْمَصَةٍ غَيْرَ مُتَجَانِفٍ لِإِثْمٍ فَإِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٣﴾

४. ते तुम्हाला विचारतात की त्यांच्याकरिता कोणत्या वस्तू हलाल (विहित केल्या गेल्या आहे. सांगा तुमच्या करिता समस्त स्वच्छ शुद्ध वस्तु हलाल केल्या गेल्या आहेत [३४] आणि ज्या शिकारी जनावरांना [३५] तुम्ही तरबेज [३६] केले असेल, ज्यांना तुम्ही अल्लाहने दिलेल्या ज्ञानाच्या आधारे शिकारीचे शिक्षण देता [३७] ते जी शिकार तुमच्याकरिता रोखून ठेवतील ती तुम्ही खा [३८] तथापि त्यावर अल्लाहचे नाव घ्या [३९] आणि अल्लाहचे भय बाळगा [४०] कारण अल्लाह हिशेब घेण्यात फार शीघ्र आहे.

يَسْأَلُونَكَ مَاذَا أُحِلَّ لَهُمْ قُلْ أُحِلَّ لَكُمُ الطَّيِّبَاتُ وَمَا عَلَّمْتُمْ مِنَ
الْجَوَارِحِ مُكَلِّبِينَ تُعَلِّمُونَهُنَّ مِمَّا عَلَّمَكُمُ اللَّهُ فَكُلُوا مِمَّا
أَمْسَكْنَ عَلَيْكُمْ وَاذْكُرُوا اسْمَ اللَّهِ عَلَيْهِ وَاتَّقُوا اللَّهَ إِنَّ اللَّهَ
سَرِيعُ الْحِسَابِ ﴿٤﴾

१५. मुडदार याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. २१० मध्ये आले आहे.

१६. स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह बक़रा टीप क्र. २११

१७. स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह बक़रा टीप क्र. २१२

१८. स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह बक़रा टीप क्र. २१३

१९. गळा घोटला जाण्याची एक स्थिती ही असू शकते की जनावरांची मान एखाद्या वस्तुत फसावी ज्यामुळे त्याला मृत्यु यावा आणि दुसरी स्थिती ही की गाळा दाबल्याने तो मृत व्हावा.

२०. मार लागून मेल्याचीहि विविध स्थिती असू शकते. उदा. काठीच्या प्रहाराने मरण पावणे, भिंत किंवा छत जनावरावर कोसळणे किंवा मोटर इ. च्या अपघातास बळी पडणे. वर्तमान काळात जबह (कत्तल) करण्याची एक नवीन पद्धत प्रचलीत होत आहे. यास्तव जनावरास जबह करण्यापूर्वी इलेक्ट्रीक शॉक (Electric Shock) देऊन बेशुद्ध केले जाते ज्याला इंग्रजीत (Stunning) म्हणतात. हा शॉक साधारणत: कमी शक्तिचा असतो. म्हणून यामुळे जनावर मरण पावत नाही किंबहुना फक्त बेहोश होते व या मूर्च्छितावस्थेतच त्याला जबह केले जाते परंतु जर हा शॉक अधिक शक्तिचा असेल तर ते जनावर जबह करण्यापूर्वीच मरण पावेल. व अशा स्थितीतहि मार लागून मेल्याचा नियम लागू पडेल कारण त्याला शॉक लागल्याने मृत्यू आला, जबह केल्याने नव्हे.

२१. अर्थात ज्यांचा मृत्यु विहीरीत पडल्यामुळे किंवा पहाडावरून कोसळल्यामुळे झालेला असावा.

२२. अर्थात जे एखाद्या दुसऱ्या जनावराने शिंग मारल्यामुळे जखमी होऊन मेले असावे.

२३. अर्थात हिंस्त्र श्वापदाने फाडून त्याचा काही भाग खाल्लेला असावा.

"राहीली, हिंस्त्र पशुने फाडून खाल्लेल्या जनावराची धार्मिक दृष्टया मनाई तर या बाबतीत मनुष्याचे श्रेष्ठत्व समोर राहिले आहे. व त्यास हिंस्त्र पशूने मागे सोडलेल्या उष्टया खाद्यापासून अलिप्त ठेवले गेले आहे. अज्ञान काळातील लोक हिंस्त्र पशूने फाडून खाल्लेल्या उंट, गाय इ. ना खात असत. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याचे उष्टे ईमान बाळगणाऱ्यांवर हराम केले."

(इस्लाम मध्ये हलाल व हराम- ले. युसूफ कर्जावी पृ. ६६)

२४. तात्पर्य जनावर जबह केल्यानेच हलाल होते आणि जबह (कत्तल) करण्याचा अर्थ गळयाचा एवढा भाग कापणे की जेणे करुन शीरा कापल्या जाव्यात व शरीरातील रक्त चांगल्या प्रकारे बाहेर पडावे. झटका रित्या कापल्याने मेंदूचा शरीराशी असलेला संबंध ताबडतोब संपतो ज्यामुळे रक्त चांगल्या प्रकारे बाहेर पडत नाही तर मांसाला चिकटून रहाते यास्तव झटक्याची पद्धत शरीयत बाह्य आहे.

२५. नुसुब (स्थान) असे दगड होते की ज्यांच्यावर अनेकेश्वरवादी आपल्या उपास्यांच्या स्थापनेकरिता जनावरांचा बळी देत असत. ज्याअर्थी ही स्थाने अल्लाहखेरीजच्या उपास्यांना भेट नजराणा चढविण्या करिता विशेष होते म्हणून या स्थानांवर जबह करण्यास हराम ठरविले गेले. मग ज़बह करतेवेळी जनावरावर अल्लाहखेरीजच्या उपास्याचे नाव घेतले गेले असो वा नसो. धार्मिक दृष्टया हे अवैध असण्यास ही गोष्ट पुरेशी आहे की त्याला स्थानांवर जबह केले गेले आहे. म्हणूनच ज्याच्यावर अल्लाहखेरीजच्या उपास्यांचे नाव घेतले गेले असावे यानंतर 'नुसुब' (स्थानावरील) जबहचा उल्लेख अलगपणे केला गेला.

हाच आदेश त्या बलीदानांनाहि लागू पडतो जी बुजुर्गांच्या किंवा औलीयांच्या मजारींवर त्यांचे सान्निध्य व प्रसन्नता प्राप्त करण्याच्या हेतुने सादर केली जातात. तसेच याद्वारे धर्मात नवनवीन गोष्टी (बिदअत) सामील करणाऱ्यांच्या या दाव्याचे खंडन होते की जनावराला एखाद्या सिद्धपुरुष किंवा वलीच्या नियाज़ करिता नियुक्त करणे विहित आहे व या स्वरुपाचा जबीहा हलाल आहे जर जबह करते वेळी त्याच्यावर अल्लाहचे नाव घेतले गेले असेल. हे वस्तुत:कुरआनाच्या स्पष्ट आदेशा विरूद्ध आहे. कारण कुरआनने केवळ अशाच बळीला हराम ठरविले नाही ज्यावर जबह करते वेळी अल्लाह खेरीज च्या उपास्याचे नाव घेतले गेले असेल किंबहुना अशा बळीला देखील हराम ठरविले आहे जो स्थानावर दिला गेला असेल. याशिवाय की त्यास जबह करते वेळी अल्लाह खेरीजच्या उपास्याचे नाव घेतले गेले असावे किंवा अल्लाहचे नाव कारण त्यास स्थानावर जबह करणे या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की ते अल्लाहखेरीजच्या उपास्याच्या सान्निध्य-प्राप्ति करिता आहे म्हणून ज्या जनावरास एखाद्या सिद्धपुरुष किंवा वलीचे सान्निध्य प्राप्त करण्याकरिता किंवा जिन्न इत्यादिस भेट चढविण्याकरिता जबह केले जावे तो कशा प्रकारे उचित ठरेल? शिर्क कोणत्याही स्थितीत शिर्क आहे मग तो मूर्तिपूजेच्या स्वरपात असो किंवा अवलिया पूजेच्या स्वरुपात असो.

२६. अज्ञान कालीन अरब देशात अनेकेशवरवादी भविष्य जाणून घेण्याची पद्धत प्रचलित होती. या हेतुसाठी मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी तीन प्रकारचे बाण हुबल देवताच्या स्थानी ठेवले होते. ज्यापैकी एकावर लिहिले होते, 'हे काम करा' दुसऱ्यावर लिहिले होते 'करु नका' आणि तिसरा बाण खाली राहत असे फाल (शकून) काढल्यावर जो बाण निघे त्यास अदृश्य (गैबचा) आदेश समजून त्यानुसार कृति केली जाई. ते

बाण जूगारासाठीहि वापरले जात.

अशा प्रकारे ही शकून विद्या शिर्क (अल्लाहचा सहभागी ठरविणे) व शकुन विश्वासाचे आणि जूगाराचे फार मोठे साधन होते म्हणूनच ते हराम ठरविले गेले.

हा आदेश त्या प्रत्येक शकून विद्येला (फालगिरीला) लागू पडतो जी शिर्क आणि संशय भक्तिचे साधन असावे, मग त्या करिता बाण वापरले जावेत किंवा अन्य एखादी वस्तू तसेच याद्वारे चोराचा शोध ध्यावयाचा असो अथवा आजाऱ्याची अवस्था जाणून घ्यावयाची असो. अदृश्य गोष्टींना जाणून घेण्याकरिता शकून पद्धतिचा अवलंब करणे हे संशय पूजेशिवाय काहीच नाही.

२७. 'आज' याचा अर्थ तो काळ ज्यात ह्या आयती अवतरित झाल्या.

२८. काफिरांच्या निराश होण्याचा अर्थ हा आहे की आता ज्या अर्थी शरीयत पूर्णत्वास पोहचली आहे व इस्लामला सत्ताधिकारही प्राप्त झाला आहे. इस्लामच्या शत्रूंना आशा राहिली नाही की ते इस्लामला परिपूर्ण बनण्यापासून रोखू शकतील किंवा त्याला मिटवण्यात यशस्वी होऊ शकतील म्हणून त्यांचे भय बाळगून धर्मशास्त्राच्या आदेशांच्या अंमलबजावणीत सौम्यता अंगिकारण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. आता इस्लाम ने आपले श्रेष्ठत्व स्वत:च प्रस्थापित केले आहे. यास्तव तुमचे काम शरअी (धर्मशास्त्राच्या) आदेशांचे कठोरपणे पालन करणे आणि इस्लामी कायद्यांवर कसल्याहि तडजोड शिवाए कार्यरत होणे आहे.

२९. 'आज' याचा अर्थ एखादा विशिष्ट दिवस नव्हे किंबहुना तो काळ होय ज्यात शरीयत पूर्णत्वास पोहचली. पुर्णत्वाची ही अवस्था हुदैबिया तहानंतर म्हणजे माहे जिकदा हिजरी सन ६ पासून सुरु होते. जो हिजरी सन १० च्या सुरवाती पर्यंत राहिला. हज्जतुल वदा अर्थात जिलहिज्जा हिजरी सन १० च्या प्रसंगी शरीयतने परिपूर्ण महिन्याचे रुप धारण केले होते आणि धर्माच्या परिपूर्ण होण्याची घोषणा पूर्ण वैभावानिशी झाली होती. आणि या आयतीची सत्यता अशा प्रकारे प्रकट झाली होती की जणू त्याच दिवशी ती अवतरली होती. म्हणून निवेदनकारांनी या आयतीच्या अवतरणाची त्या दिवसाच्या अवतरणावर कल्पना केली, अन्यथा वर्णनक्रमावरुन असे दिसून येते की ही आयत हलाल व हरामच्या वर्णनाचा एक भाग आहे आणि याचे अवतरण हज्जतुल वदा (शेवटचे हज्ज)च्या फार पूर्वी झाले होते.

३०. दीन (धर्माला) परिपूर्ण करण्याचा अर्थ असा की धर्ममहालाची उभारणी पूर्ण झाली. यात ना कसली जागा खाली राहिली. व ना एखाद्या वाढीची गरज राहिली आहे. संपूर्ण मानव जातीकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाहला जे मार्गदर्शन द्यावयाचे होते ते तो देऊन चुकला आणि उपासना व आज्ञापालनेची जी पद्धत अवतरित करावयाची होती ती त्याने अवतरित केली. आता या धर्मास याच स्वरुपात कियामती पावेतो कायम रहावयाचे आहे व जगातील समस्त जाती समूहांकरिता हाच मार्गदर्शनचा मीनार आहे.

इस्लाम धर्माची ही परिपूर्णता दोन विशिष्ट वस्तुस्थितींकडे संकेत करते:

की हा दीन (धर्म) जीवनाच्या समस्त क्षेत्रांना घेरुन आहे. पाळण्यापासून कबरीपर्यंत ज्या मार्गदर्शनाची गरज होती आणि व्यक्तिगत जीवनासोबत समाहोक जीवना करिता जे आकाशीय मार्गदर्शन अपेक्षित होते त्या सर्वांचा समावेश या धर्मात केला गेला आहे. म्हणून ज्या वैभवाचा हा धर्म आहे त्याच वैभवाप्रत याच्या अनुयायींनीहि असले पाहिजे अर्थात हे की त्यांनी कसल्याहि भेद-विभागाशिवाय धर्माचे विशुद्ध मनाने अनुसरण करावे. आपल्या व्यक्तिगत व सामूहिक जीवन या धर्माच्या प्रकाशात व्यतीत करावे व याच्या निकडीची पूर्तता करावी.

दुसरी वस्तुस्थिति अशी की जेव्हा धर्माची पूर्णता झाली तेव्हा प्रेषितत्वाचा आगमनक्रम ही संपला कारण धर्म परिपूर्ण झाल्यानंतर वस्तुत: कियामती पर्यंत याच्या रक्षणाची उपाय योजनाहि केली गेली आहे, कोणत्याहि नव्या प्रेषिताच्या आगमनाची गरज राहात नाही. यास्तव हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) प्रेषित-आगमनाची अंतिम कडी ठरली व पवित्र क़ुरआन ग्रंथ ठरला. या वस्तुस्थितीस हदीस मध्ये अशा प्रकारे वर्णिले गेले आहे.

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ اَنَّ رَسُولَ اللّٰہ صلى الله عليه وسلم قَالَ : اِنَّ مَثَلِیْ وَمَثَلُ الْاَنْبِيَاءِ مِنْ قَبْلِیْ كَمَثَلِ رَجُلٍ بَنٰی بَيْتاً فَاَحْسَنَهٗ وَاَجْمَلَهٗ اِلَّا مَوْضِعَ لَبِنَةٍ مِنْ زَاوِيَةٍ فَجَعَلَ النَّاسُ يَطُوْفُوْنَ بِهٖ وَيَعْجَبُوْنَ لَهٗ وَيَقُوْلُوْنَ هَلَّاوُضِعَتْ هٰذِهِ اللَّبِنَةُ قَالَ فَأَنَا اللَّبِنَةُ وَاَنَا خَاتِمُ النَّبِيّٖنَ ـ (بخاری کتاب احادیث الانبیاء)

"हजरत अबु हुरैरा (रजि.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले,माझे आणि पूर्वी होऊन गेलेल्या पैगंबराचे उदाहरण त्या व्यक्तिसारखे आहे जिने एक सुंदर व वैभवशाली घर बनविले परंतु त्याच्या एका कोन्यात एका वीटाची जागा खाली सोडली. लोक त्या घराच्या सभोवती फिरत व त्याच्या सुंदरतेविषयी आश्चर्य करीत तथापि (रिक्त स्थान पाहून) म्हणत, काय गोष्ट आहे, येथे वीट ठेवली

गेली नाही ! पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)यांनी फर्मावीले ती वीट मीच आहे आणि मी खातिमुन्नबीय्यीन म्हणजे ज्यासह प्रेषितत्व संपविले गेले असा पैगंबर आहे.'' (बुखारी)

३१. देणगी परिपूर्ण केली याचा अर्थ धर्माची परिपूर्णता तुमच्या संबंधात देणगीची परिपूर्णता आहे. कारण एका परिपूर्ण व सर्वकष शरीयत (धर्मशास्त्रा) ने तुमच्यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात खऱ्याखऱ्या उन्नतिचे अगणित मार्ग उघडले आहेत आणि एका अशा उद्यानाचा लाभ घडवून दिला आहे की ज्याचे प्रत्येक फूल घ्राणेंद्रियाला सुगंधित करणारे आहे.

३२. इस्लाम हाच एकमेव प्रिय धर्म असण्यांसंबंधी सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे शेवटची घोषणा आहे अन्यथा या पूर्वीहि ही गोष्ट विविध शैलीने वर्णिली गेली आहे. उदा. सूरह आले इमरान मध्ये फर्माविले ;

اِنَّ الدِّيۡنَ عِنۡدَ اللّٰهِ الۡاِسۡلَامُ

''अल्लाहच्या जवळ खरा धर्म केवळ इस्लाम आहे.'' (सूरह आले इमरान -१९)

وَمَنۡ يَّبۡتَغِ غَيۡرَ الۡاِسۡلَامِ دِيۡنًا فَلَنۡ يُّقۡبَلَ مِنۡهُ‌ ۚ وَهُوَ فِى الۡاٰخِرَةِ مِنَ الۡخٰسِرِيۡنَ ۔(سورہ آل عمران۔۸۵)

''आणि जो कोणी इस्लाम ऐवजी अन्य एखाद्या धर्मास अंगिकारील तो त्याच्याकडून मुळीच कबूल केला जाणार नाही आणि आखिरत मध्ये तो तोटयात राहील.'' (आले इमरान-८५)

येथे धर्माच्या परिपूर्णतेच्या घोषणेसह इस्लाम हा प्रियधर्म असल्याची घोषणा जणू सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे शेवटची ताकीद आहे. कारण परिपूर्ण धर्म या नात्याने इस्लाम प्रकट झाल्यानंतरहि जे लोक इतर धर्मांना उराशी कवटाळून राहतील, ते आपल्या मार्ग भ्रष्टतेस स्वत: जबाबदार राहतील सूर्योदयानंतर टिमटिमणारे दिपक बेकार होतात. परंतु ज्या माणसाला आपल्या दिव्याशी एवढे प्रेम असावे की त्याने सूर्य प्रकाशाला पाहणेहि पसंत करु नये तर त्याचा हा पक्षपात त्याच्याच विरुद्ध होईल. व त्याच्या नशिबी नैराश्याशिवाय काहीही येणार नाही.

३३. शरीयतमध्ये खऱ्या लाचारांना दृष्टीआड केले गेले नाही किंबहुना त्यांची भीड बाळगून सवळती दिल्या गेल्या आहेत. यास्तव येथे ज्या गोष्टीची अवैधता (हराम) वर्णन केली गेली आहे त्यांच्या संबंधाने ही सवलत आहे की जर एखादा माणूस भूकेने खरोखर अगतिक झाल्यास प्राण-रक्षणासाठी गरजेपुरता एखादी हराम वस्तू खाईल तर तो गुन्हेगार ठरणार नाही. परंतु हे ध्यानी असावे की जो माणूस या सवलतीचा दुरोपयोग करील व हराम खाण्याची इच्छा बाळगील तर तत्संबंधी त्याची पकड होईल.

३४. ''तय्यिबात'' (स्वच्छ शुद्ध वस्तु) म्हणजे त्या सर्व वस्तु होत ज्यांना ना शरीयतने हराम ठरविले आहे आणि ना ज्यांना मनुष्याचा सौम्य स्वभाव देखील खबीस (मलिन) ठरवितो.

प्रश्न जनावरांसंबंधी होता म्हणून याच्या उत्तरात जी गोष्ट सांगितली गेली आहे त्यावरुन स्पष्ट झाले की, जनावरांचे मांस खाण्याबाबत धर्मशास्त्राच्या बंधनातून मुक्त होणे उचित नाही, किंवा शंकेखोर वृत्तीत पडून मांस खाण्यापासून अलिप्त राहणे हे हि उचित नाही किंबहुना माणसाकरिता उचित आचरण,पद्धत ही आहे की त्याने धर्मशास्त्राच्या बंधनांची चाड बाळगून स्वच्छ शुद्ध जनावरांचे मांस खावे.

३५. शिकारी जनावरांचा अर्थ ते प्राणी व पक्षी होत ज्यांच्याद्वारे मनुष्य शिकार करतो. उदा. कुत्रे, चित्ते, ससाणा इत्यादि.

३६. तरबेज केलेले म्हणजे ज्या जनावरांना तुम्ही शिकार करण्याचे ट्रेनिंग दिले असावे, असा शिकारी प्राणी ज्या जनावराची शिकार करतो त्याला तो फाडून खात नाही किंबहुना आपल्या मालकाकरिता थोपवून ठेवतो यास्तव प्रशिक्षित केलेल्या प्राण्याद्वारे केलेली शिकार हलाल आहे.

३७. मनुष्य जनावरांना शिकार करण्याचे जे शिक्षण देतो ते त्या ज्ञानाच्या आधारे होय जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याला प्रदान केले आहे म्हणून या ईश्वरीय देणगीबद्दल त्याने अल्लाहशी कृतज्ञ असेल पाहिजे.

३८. अर्थात जी शिकार तो स्वत: खात नसेल, पण तुमच्याकरिता थोपवून ठेवीत असेल त्यास तुम्ही खाऊ शकता.

३९. अर्थात शिकारी प्राण्याला सोडतांना 'बिस्मिल्लाह' म्हणा हदीस मध्ये उल्लिखित आहे की ''अदी बिन हातिम'' ने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले की, मी कुत्र्याद्वारे शिकार करु शकतो काय? पैगंबरांनी फर्माविले, जर त्याला सोडतांना तुम्ही अल्लाहचे नाव घेतले असेल तर खा अन्यथा नाही आणि जर त्याने भक्ष्यातून काही खाल्ले असल्यास तुम्ही खाऊ नका कारण त्याने भक्ष्यास तुमच्याकरिता पकडले नाही किंबहुना आपल्याकरिता पकडले आहे.'' (बुखारी किताबुज जबाअेह)

शिकार संदर्भात येथे जे आदेश वर्णिले गेले आहेत त्यांचा खुलासा हा आहे की इस्लाम ने माणसाळलेल्या जनावरांना जबह करण्याची जी पद्धति निर्धारीत केली आहे अर्थात गळयाच्या एका भागाला कापणे ज्याप्रमाणे शेळी मेंढीला जबह केले जाते.

या खेरीज एक विशेष पद्धत इस्लामने शिकार (भक्ष्य) हलाल असण्या करिताहि निर्धारीत केली आहे ती म्हणजे प्रशिक्षित शिकारी प्राण्याला अल्लाचे नाव घेऊन शिकार करण्याकरिता सोडणे. हा सोडलेला शिकारी प्राणी जर स्वच्छ

शुद्ध (म्हणजे शरीअत संमत) जनावरांपैकी एखाद्याची शिकार करील म्हणजे त्याला ठार करील पण भक्ष्यास स्वत: न खाईल किंबहुना आपल्या मालकाकरिता धरून ठेवील तर तो यास खाऊ शकतो आणि जर तो जिवंत स्थितीत मिळाला तर त्यास अल्लाहचे नाव घेऊन जबह करणे अगत्याचे आहे.

فَإِنْ اَمْسَکَ عَلَیْکَ فَاَدْرَکْتَهُ
حَیًّا فَاذْبَحْهُ۔(مسلم کتاب الصید)

''जर तो भक्ष्यास तुमच्याकरिता थोपवून ठेवील आणि त्यास तुम्ही जिवितावस्थेत प्राप्त कराल तर जबह करा.'' (मुस्लिम किताबुससैद)

स्पष्ट असावे की शिकार अरबांच्या दृष्टीने केवळ मनोरंजनाचे साधन नव्हते किंबहुना उदर भरणाचे एक महत्त्वपूर्ण साधन होते विशेषत : ते प्रवासात यावर आपली उपजिविका भागवत म्हणून कुरआनने शिकार बाबतीत धर्मशास्त्रीय आदेश स्पष्ट केलेत अशासाठी की या व्यवहारात माणसाळलेल्या जनावरांना जबह करण्या करिता जी पद्धति निर्धारित केली आहे याच्या तुलनेने सोपी पद्धत न माणसाळलेल्या जनावरांच्या शिकारीच्या स्वरुपात जबह करण्याची पद्धति निर्धारीत केली आहे.

४०. अशी ताकीद आहे की जर शिकारीच्या नादात तुम्ही शरीयतच्या मर्यादांची पर्वा केली नाही तर ईश्वराजवळ तुमची पकड होईल यास्तव त्याचे भय बाळगा व शरीयतच्या मर्यादांचे उल्लंघन करु नका.

❀❀❀❀❀❀

**अल्लाहने जो उपकार तुमच्यावर केला आहे तो स्मरणात असू द्या आणि त्याच्या त्या प्रतिज्ञेस विसरू नका जी त्याने तुमच्याकडून घेतली आहे. जेव्हा तुम्ही म्हटले होते की आम्ही ऐकले व आज्ञापालन केले आणि अल्लाहचे भय बाळगा अल्लाहला अंतःकरणात लपलेल्या गोष्टींचेहि ज्ञान आहे.**
*(अल-क़ुरआन)*

५. आज तुमच्या करिता समस्त स्वच्छ शुद्ध वस्तू हलाल केल्या गेल्या आहेत.[४१] ग्रंथ धारकांचे खाणे तुमच्या करिता हलाल आहे.[४२] आणि तुमचे खाणे त्यांच्याकरिता.[४३] तुमच्या करिता साध्वी स्त्रीया ज्या ईमान बाळगणाऱ्यांपैकी असाव्यात विहित आहेत तसेच त्या साध्वी स्त्रीयाहि ज्या त्या लोकांपैकी असाव्यात ज्यांना तुमच्या पूर्वी ग्रंथ दिला गेला होता [४४] या अटीवर की त्यांचा मेहर त्यांना द्या व उद्दिष्ट निकाह बंधनात आणण्याचे असावे, व्यभिचार करण्याचे किंवा लपून छपून प्रेम करण्याचे नसावे; आणि जो ईमानासह कुफ्र करील [४५] तर त्याचे सर्व केले सवरले व्यर्थ जाईल. आणि अखिरत मध्ये तो विनाशमय स्थितीत असेल.[४६]

اَلْيَوْمَ اُحِلَّ لَكُمُ الطَّيِّبٰتُ ۭ وَطَعَامُ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ حِلٌّ
لَّكُمْ ۠ وَطَعَامُكُمْ حِلٌّ لَّهُمْ ۡ وَالْمُحْصَنٰتُ مِنَ الْمُؤْمِنٰتِ وَالْمُحْصَنٰتُ
مِنَ الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتٰبَ مِنْ قَبْلِكُمْ اِذَآ اٰتَيْتُمُوْهُنَّ اُجُوْرَهُنَّ
مُحْصِنِيْنَ غَيْرَ مُسٰفِحِيْنَ وَلَا مُتَّخِذِيْٓ اَخْدَانٍ ۭ وَمَنْ يَّكْفُرْ
بِالْاِيْمَانِ فَقَدْ حَبِطَ عَمَلُهٗ ۡ وَهُوَ فِي الْاٰخِرَةِ مِنَ الْخٰسِرِيْنَ (٥)

६. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा तुम्ही नमाजकरिता उठाल [४७] तेव्हा आपली तोंड व हात कोपरापर्यंत धुवा, आपल्या डोक्यांचा ‘मसह’ करा व पायांना घोटयापर्यंत धुवा [४८] जर जनाबत’च्या (संभोगानंतरच्या अशुद्ध) अवस्थेत [४९] असाल तर आंघोळ करून स्वच्छ शुद्ध व्हा. आणि जर आजारी असाल किंवा प्रवासात असाल किंवा तुमच्या पैकी कोणी शौचादि विधी करून आला असेल किंवा तुम्ही स्त्रीयांना स्पर्श केला असेल [५०] (समागम केला असेल) आणि पाणी न मिळाल्यास स्वच्छ शुद्ध मातीने तयम्मुम करा. [५१] अर्थात आपल्या तोंडावर व हातांवर तीने मसह करा. अल्लाह तुम्हाला अडचणीत टाकू इच्छित नाही किंबहुना तो तुम्हाला स्वच्छ शुद्ध करु इच्छितो आणि आपली देणगी परिपूर्ण करू इच्छितो.[५२] अशासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اِذَا قُمْتُمْ اِلَى الصَّلٰوةِ فَاغْسِلُوْا
وُجُوْهَكُمْ وَاَيْدِيَكُمْ اِلَى الْمَرَافِقِ وَامْسَحُوْا بِرُءُوْسِكُمْ وَاَرْجُلَكُمْ
اِلَى الْكَعْبَيْنِ ۭ وَاِنْ كُنْتُمْ جُنُبًا فَاطَّهَّرُوْا ۭ وَاِنْ كُنْتُمْ
مَّرْضٰٓى اَوْ عَلٰي سَفَرٍ اَوْ جَاۗءَ اَحَدٌ مِّنْكُمْ مِّنَ الْغَاۗىِٕطِ
اَوْ لٰمَسْتُمُ النِّسَاۗءَ فَلَمْ تَجِدُوْا مَاۗءً فَتَيَمَّمُوْا صَعِيْدًا
طَيِّبًا فَامْسَحُوْا بِوُجُوْهِكُمْ وَاَيْدِيْكُمْ مِّنْهُ ۭ مَا يُرِيْدُ اللّٰهُ
لِيَجْعَلَ عَلَيْكُمْ مِّنْ حَرَجٍ وَّلٰكِنْ يُّرِيْدُ لِيُطَهِّرَكُمْ وَ
لِيُتِمَّ نِعْمَتَهٗ عَلَيْكُمْ لَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ (٦)

७. अल्लाहने जो उपकार [५३] तुमच्यावर केला आहे तो स्मरणात असू द्या आणि त्याच्या त्या प्रतिज्ञेस [५४] विसरू नका जी त्याने तुमच्याकडून घेतली आहे. जेव्हा तुम्ही म्हटले होते की आम्ही ऐकले व आज्ञापालन केले आणि अल्लाहचे भय बाळगा [५५] अल्लाहला अंत:करणात लपलेल्या गोष्टींचेहि ज्ञान आहे.

وَاذْكُرُوْا نِعْمَةَ اللّٰهِ عَلَيْكُمْ وَمِيْثَاقَهُ الَّذِيْ
وَاثَقَكُمْ بِهٖٓ ۙ اِذْ قُلْتُمْ سَمِعْنَا وَاَطَعْنَا ۡ
وَاتَّقُوا اللّٰهَ ۭ اِنَّ اللّٰهَ عَلِيْمٌۢ بِذَاتِ الصُّدُوْرِ (٧)

४१. आज'शी अभिप्रेत तो काळ होय ज्यावेळी इस्लाम धर्म आपल्या पूर्णावस्थेस पोहचला. याप्रसंगी ही घोषणा केली गेली की अल्लाहने अवतरित केलेल्या या अंतिम शरीयतमध्ये सर्व स्वच्छ शुद्ध वस्तुंना हलाल आणि फक्त अशुद्ध व अस्वच्छ वस्तूंना हराम ठरविले गेले आहे यास्तव पूर्वी होऊन गेलेल्या शरीयतीमध्ये विशिष्ट परिस्थितीमुळे जी बंधने लागू केली गेली होती त्या सर्वांना समाप्त समजले पाहिजे, तसेच जी बंधने विविध धर्म बाळगणाऱ्यांनी संशय मनोवृत्तीच्या आधारावर लागू करून ठेवली आहेत. उदा मांसाहारालाच त्यांनी अगदी सुरवातीपासून हराम ठरविले तेव्हा या स्वरुपाची सर्व बंधने शरीयतच्या पूर्णतेनंतर आपोआप नाहीशी झाली आहेत.

हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शरीयतीचे हे वैशिष्ट्य आहे की तिने हराम व हलालच्या संदर्भात माणसाला समस्त अनावश्यक बंधनातून मुक्त केले आहे. आणि समस्त स्वच्छ शुद्ध खाद्याचे दस्तरख्वान पसरवून संपूर्ण मानवजातीला याचा लाभ घेण्याचे आमंत्रण दिले आहे.

४२. शब्दशैली वरुन स्पष्ट होते की येथे ग्रंथ धारकांच्या खाण्याचा (भोजनाचा) अर्थ त्यांचा (म्हणजे यहुदी व ख्रिश्चनांचा) जबीहा (कत्तल केलेले जनावर) होय. अट अशी की अर्थात तो जबीहा स्वच्छ शुद्ध (शरीअत संमत) जनावराचा असावा आणि जबह करतांना त्यावर अल्लाहचे नाव घेतले गेले असावे. याचा अर्थ असा नव्हे की ते जर अशुद्ध व अस्वच्छ जनावरांचे मांस सादर करतील तर ते मुसलमानांकरिता हलाल होईल आणि याचा हा अर्थ घेणेहि अनुचित ठरेल की ते आपल्या पशूची कत्तल करताना अल्लाहचे नाव घेवोत अथवा ना घेवोत मुसलमान त्यास खाऊ शकतात. अशा प्रकारचा अर्थ घेण्यास येथे किंचितहि जागा नाही. कारण मुसलमान असलेल्या व्यक्तिनेहि जर जाणूनबुजून जबह करताना बळी पशूवर अल्लाहचे नाव घ्यायचे टाळल्यास त्याचा तो ज़बीहा हलाल राहणार नाही मग एखाद्या यहूदी अथवा ख्रिश्चनाचा जबीहा कसा हलाल ठरेल. जेवहा त्याने त्यास अल्लाहच्या नावाने जबह केले नसेल.

राहिली यांत्रिक कत्तल जी आजच्या काळाची निर्मिती आहे तर ते केवळ मुंडके उडविण्याचे कृत्य आहे आणि ही कृति अल्लाहचे नाव घेण्याच्या बंधनापासून मुक्त आहे. म्हणून याला शरीअतशास्त्र संमत म्हटले जाऊ शकत नाही मग ते यंत्र चालविणारा मुसलमान असो किंवा ग्रंथधारी.

४३. याचा अर्थ असा की यहुदींवर त्यांच्या बंडखोरपणामुळे ज्या वस्तू हराम केल्या गेल्या होत्या त्या अंतिम प्रेषिताच्या प्रकट झाल्यानंतर व अंतिम शरीयतीच्या अवतरणानंतर हराम राहिला नाही म्हणून यांच्या खाण्यापिण्याबाबत केवळ तीच बंधने आहेत जी मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शरीयतीत मुसलमानांवर लागू केली गेली आहेत अर्थात मलिन अपवित्र व अशुद्ध वस्तु , यास्तव मुसलमानांनी जबह केलेला प्राणी खाण्यासंबंधी त्यांना ईश्वरीय विधि नियमानुसार कसलीहि अडचण नाही. ही घोषणा खरे पाहिले असता ग्रंथ धारकांकरिता सोपा मार्ग उघडून देणारी आहे. या अटीवर की त्यांनी या घोषणेची कदर करावी.

४४. अर्थात यहुदी व ख्रिश्चन स्त्रीया. यांच्याशी विवाह करण्याची अनुमति या अटीवर दिली गेली की त्या साध्वी चारित्र्याची असाव्यात. बदफैली व स्वैराचार करणाऱ्या ग्रंथधारी स्त्रीयांशी विवाह करण्याची अनुमति नाही.

भाष्यकार इब्ने कसीर लिहितात की कुरआनाच्या या अनुमतीस लक्षात घेत पैगंबरांच्या सहवासात राहिलेल्या अनेक अनुयायींनी (सहाबानी) ख्रिश्चन स्त्रीयांशी विवाह केला होता व यात त्यांनी काही संकोच बाळगला नाही. (तफ़सीर इब्ने कसीर खंड २ पृष्ठ २०)

ग्रंथधारी स्त्रीयांशी विवाह करण्याची अनुमति वस्तुत: या आधारावर दिली गेली आहे की या स्थितीत त्यांचे इस्लाम वर्तुळात दाखल होण्याची शक्यता प्रबळ आहे परंतु जर या उलट पति किंवा संततीचे काफ़ीर संस्कृतिने प्रभावित होण्याचे भय असेल तर अशा स्थितीत या सवलतीचा लाभ घेणे उचित ठरणार नाही. त्यासाठी पुढे ही ताकीद हि केली गेली आहे की जो आपल्या ईमानास पारखा होईल तो दुर्दशा ग्रस्त होईल.

मुसलमान पुरुषांना यहुदी व ख्रिश्चन स्त्रीयांशी निकाह करण्यास अनुमति देण्याचे व मुसलमान स्त्रीयांना यहुदी व ख्रिश्चनांशी विवाह करण्यास अनुमति न देण्याचे कारण हे आहे की पुरुष स्त्री करिता स्वामीत्व योग्यता बाळगतो म्हणून तिच्यावर प्रभावशाली होऊ शकतो आणि इस्लामच्या समाज रचनेस घरात कायम, राखू शकतो, या अटीवर की तो खऱ्या अर्थाने मुसलमान असावा याउलट,स्त्री, पुरुषाच्या निरीक्षणाखाली असते म्हणून जर एक मुसलमान स्त्री जर एखाद्या यहुदी वा ख्रिश्चन पुरुषाची पत्नी असेल तर तिला एकेश्वरवादाच्या श्रद्धेवर कायम राहणे व इस्लामी समाज रचना अंगिकारुन असणे कठीण जाईल. या स्पष्ट वस्तुस्थितीनंतरहि जर एखादा माणूस इस्लामच्या आदेशावर आपली नापसंती व्यक्त करतो तर त्याने समजून घेतले पाहिजे की इस्लामचा स्वभाव प्रभुत्व इच्छितो म्हणून तो कोणत्याही क्षेत्रात पराभूततेची अवस्था मान्य करीत नाही.

الاسلام يعلو ولا يعلى

४५. इमानासह कुफ्र करण्याचा अर्थ असा की माणसाने दावा तर आपल्या मुसलमान असण्याविषयी करावा परंतु

आचरण करतांना अशा मार्गावर चालू लागावे जो ईमानाच्या प्रतिकूल असावा.

४६. या चेतावणीचा अर्थ हा आहे की ग्रंथधारी स्त्रीयांशी निकाह करण्याची जी अनुमति दिली गेली आहे तिच्या पासून जो माणूस लाभ घेऊ इच्छितो त्याने या गोष्टीपासून सावध असावे की कदाचित हे नाते त्याच्या धर्म व ईमानाकरिता उत्पात होण्यास कारणीभूत तर ठरणार नाही.

४७. अर्थात जेव्हा नमाजचा निश्च्य कराल.

४८. नमाज करिता तहारत (शुचिर्भूतता) प्राप्त करणे अत्यावश्यक आहे आणि तहारतची जी पद्धत येथे दर्शविली गेली आहे तिला धर्मशास्त्रीय परिभाषेत 'वुजू' म्हणतात. या आदेशाचे जे स्पष्टीकरण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले आहे त्यानुसार वुजुची प्रेषित आचरणानुसार (मस्नून) पद्धत अशी की प्रथम हात मनगटापर्यंत धुतले जावेत नंतर तोंडात पाणी घेऊन गुळणी करावी यानंतर नाकात पाणी घेऊन नाक स्वच्छ केले जावे, मग तोंड (चेहरा) धुतला जावा, नंतर आधी उजवा हात मग डावा हात कोपरापर्यंत धुतला जावा, नंतर पाण्याने डोक्याचा मसह (हात फिरविणे) केला जावा आणि मसह करतांना दोन्ही कानांचा मसह देखील करावा शेवटी आधी उजवा पाय मग डावा पाय घोटयापर्यंत धुतला जावा.

वुजुच्या संदर्भात दीर्घ चर्चा वगळता काही आवश्यक गोष्टींचा येथे खुलासा केला जात आहे:

१) वुजुच्या अवयवांना एकेकदा धुतल्याने वुजु होतो परंतु तीन तीनदा धुणे अधिक चांगले.

२) हात धुतांना कोपरी व पाय धुतांना घोटे धुण्याचा समोवेश होतो.

३) मसह संपूर्ण डोक्याचा करणे अधिक चांगले व त्यासोबतच कानाच्या आतील व बाहेरील हिश्याचाहि मसह केला जावा.

४) वुजुचे अवयव अशा प्रकारे धुतले जावेत की कोणताही भाग कोरडा राहता कामा नये हदीस मध्ये उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी काही लोकांना पाहिले ज्यांनी आपले पाय चांगल्या प्रकारे धुतले नव्हते म्हणून त्यांच्या टाचा कोरडया राहिल्या होत्या. पैगंबरांनी फर्माविले,

وَيْلٌ لِلْاَعْقَابِ مِنَ النَّارِ۔ (مسلم کتاب الطہارۃ)

"त्या टाचांबद्दल खेद आहे ज्या (कोरडया राहिल्यामुळे आगीत जळतील."

५) पायांच्या संबंधात काही लोकांचा हा गैरसमज झाला आहे की त्यांचा मसह करणे पुरेसे आहे, वस्तुत: कुरआन व सुन्नाहच्या (प्रेषित आचरणाच्या) दृष्टीने धुऊन घेणे आवश्यक आहे. जर फक्त मसह करुन घेणे पुरेसे असते اِلَى الْكَعْبَيْنِ तर घोटयापर्यंतचे बंधन राहिले नसते. आणि ना टाचा कोरडया राहिल्यामुळे ती ताकीद दिली गेली असती जी उपरोक्त हदीस मध्ये उल्लेखिली गेली आहे.

६) एक नमाज़ करिता जो वुजु केला गेला तो जोपर्यंत तुटत नाही इतर नमाज करिता पुरेसा आहे. राहिली वुजुची हिकमत व हित तर यामुळे केवळ बाह्य स्वच्छता लाभते असे नव्हे तर आंतरिक स्वच्छता व शुद्धता प्राप्त करण्याचेहि ते साधन आहे. यास्तव वुजु केल्याने पापकर्मे झडू लागतात आणि मनुष्याला आपण शुचिर्भूत अवस्थेत असल्याची जाणीव होऊ लागते. हदीसमध्ये उल्लिखित आहे की जेव्हा इमान बाळगणारा दास वुजु करतो तेव्हा चेहरा, हात, पायांनी पाण्यासोबतच पाप देखील मिटतात येथपावेतो की तो पापांपासून स्वच्छ शुद्ध होतो.

حَتّٰى يَخْرُجَ نَقِيًّا مِنَ الذُّنُوبِ۔ (مسلم کتاب الطہارۃ)

"आणि कियामतीच्या विवाशी वुजुच्या प्रभावाने चेहरा व हात पाय उज्वल होतील." (मुस्लिम)

اِنَّ اُمَّتِىْ يَأْتُوْنَ يَوْمَ الْقِيَامَةِ غُرًّا مُّحَجَّلِيْنَ مِنْ اَثَرِ الْوُضُوْءِ۔ (مسلم کتاب الطہارۃ)

४९. जनाबतचे (समागमानंतरच्या स्थितीचे) स्पष्टीकरण सूरह निसा टिप. क्र. ९९ मध्ये केले गेले आहे.

५०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप क्र. १०१

५१. 'तयम्मुम'चे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. १०२ मध्ये केले गेले आहे.

५२. अर्थात वुजु व स्नानाची बंधने अडचणीत टाकण्याकरिता नाहीत किंबहुना स्वच्छ शुद्ध बनविण्याकरिता लागू केली गेली आहेत. शरीरिक शुचिर्भूतता ही आत्मीय शुचिर्भूततेचे माध्यम आहे. यासाठी वुजु, स्नान आणि तयम्मुमची पद्धत दर्शवून सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपली देणगी इमान बाळगणाऱ्यांवर परिपूर्ण केली आहे.

"अल्लाह तुम्हाला अडचणीत टाकू इच्छित नाही." हा एक फार मोठा मार्गदर्शन नियम आहे जो येथे वर्णिला गेला आहे. याद्वारे शुचिर्भूतते (तहारत) बाबत हे मार्गदर्शन लाभते की स्वच्छता शुद्धता प्राप्त करण्याच्या ज्या पद्धति इस्लामने दर्शविल्या आहेत त्या जर स्वच्छ शुद्ध मनाने व साध्या सरळ मार्गाने अंमलात आणल्या गेल्या तर हे शुचिर्भूतता प्राप्तीसाठी पुरेसे

होईल. या पद्धतीमध्ये सक्ती निर्माण करणे हे शरीअतचे उद्दिष्ट मुळीच नाही. म्हणून फिकाहच्या बारकाईने पाहण्याच्या परिणामी ज्या सक्त्या निर्माण झाल्या आहेत त्या खरे पाहता अनावश्यक बंधने होत जी लोकांनी स्वत:वर लादून घेतली आहेत.

५३. अर्थात तो उपकार होय जो परिपूर्ण शरीयत अवतरीत करुन ईमान बाळगणाऱ्यांवर केला गेला आहे.

५४. अर्थात ती जबाबदारी होय जिचा स्वीकार करून मनुष्य इस्लाम धर्मात दाखल होतो, म्हणजे असे की तो अल्लाह व त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करील. कलिम-ए-शहादतच्या अर्थात ही गोष्ट साम्मिलित आहे आणि स्पष्ट देखील. हे वचन पैगंबराच्या माध्यमाने ईमान बाळगणाऱ्यांकडून घेतले गेले आहे.

५५. अर्थात या गोष्टीचे भय बाळगा की शरीअतच्या आदेशाविरुध्द वागल्यास अल्लाह जवळ याची कठोर शिक्षा तुम्हाला भोगावी लागेल.

❀❀❀❀❀❀

८. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाह करिता उठून उभे राहणारे [५६] आणि न्यायाचे साक्षी बना. [५७] आणि एखाद्या जातीसमूहाचे वैर तुम्हाला या गोष्टीस उद्दिप्त करणारे ठरु नये की तुम्ही अन्याय करु लागावे.[५८] न्याय करा की ही 'तकवा' (ईश-भया) शी लागून असलेली गोष्ट आहे, आणि अल्लाहचे भय बाळगा. जे काही तुम्ही करता ते सर्व अल्लाह जाणून आहे.

يَٰٓأَيُّهَا الَّذِينَ ءَامَنُوا كُونُوا قَوَّٰمِينَ لِلَّهِ شُهَدَآءَ
بِالْقِسْطِ وَلَا يَجْرِمَنَّكُمْ شَنَـَٔانُ قَوْمٍ عَلَىٰٓ
أَلَّا تَعْدِلُوا اعْدِلُوا هُوَ أَقْرَبُ لِلتَّقْوَىٰ
وَاتَّقُوا اللَّهَ إِنَّ اللَّهَ خَبِيرٌ بِمَا تَعْمَلُونَ ⑧

९. ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कर्मे केली अल्लाहने त्यांना वचन देऊन ठेवले आहे की त्यांच्याकरीता क्षमा आणि फार मोठा मोबदला असेल.

وَعَدَ اللَّهُ الَّذِينَ ءَامَنُوا وَعَمِلُوا الصَّٰلِحَٰتِ لَهُم
مَّغْفِرَةٌ وَأَجْرٌ عَظِيمٌ ⑨

१०. आणि ज्या लोकांनी कुफ्र केले व आमच्या आयतींना खोटे ठरविले ते जहन्नमी (अग्निवासी) होत.

وَالَّذِينَ كَفَرُوا وَكَذَّبُوا بِـَٔايَٰتِنَآ أُولَٰٓئِكَ أَصْحَٰبُ
الْجَحِيمِ ⑩

११. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! आपल्या वरील अल्लाह च्या त्या उपकाराचे स्मरण करा जेव्हा एका समूहाने तुमच्यावर अत्याचार करण्याचा इरादा केला तेव्हा अल्लाहने त्यांच्या हातांना तुमच्यावर उठण्यापासून रोखले.[५९] अल्लाहचे भय बाळगून असा; आणि ईमान बाळगणाऱ्यांनी केवळ अल्लाहवर भरवसा केला पाहिजे.

يَٰٓأَيُّهَا الَّذِينَ ءَامَنُوا اذْكُرُوا نِعْمَتَ اللَّهِ عَلَيْكُمْ إِذْ
هَمَّ قَوْمٌ أَن يَبْسُطُوٓا إِلَيْكُمْ أَيْدِيَهُمْ فَكَفَّ
أَيْدِيَهُمْ عَنكُمْ وَاتَّقُوا اللَّهَ وَعَلَى اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ
الْمُؤْمِنُونَ ⑪

१२. अल्लाहने इस्राईलच्या संततीकडून वचन घेतले होते [६०] आणि आम्ही यांच्यापैकी बारा व्यक्तिना निरीक्षक म्हणून नियुक्त केले होते [६१] आणि अल्लाहने फर्माविले होते मी तुमच्यासह आहे [६२] जर तुम्ही नमाज कायम केली, ज़कात देत राहिले [६३] माझ्या पैगंबरावर ईमान बाळगले व त्यांना सहाय्य केले [६४] आणि अल्लाहला चांगले कर्ज दिले [६५] तर मी खचितच तुमची दुष्कर्मे तुमच्यापासून दूर करीन [६६] आणि तुम्हाला अशा बागांमध्ये दाखल करीन ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील [६७] एवढे असतानाहि जर तुमच्यापैकी कोणी कुफ्र करील तर तो सन्मार्गापासून भटकला.[६८]

وَلَقَدْ أَخَذَ اللَّهُ مِيثَٰقَ بَنِىٓ إِسْرَٰٓءِيلَ وَبَعَثْنَا مِنْهُمُ
اثْنَىْ عَشَرَ نَقِيبًا وَقَالَ اللَّهُ إِنِّى مَعَكُمْ لَئِنْ أَقَمْتُمُ
الصَّلَوٰةَ وَءَاتَيْتُمُ الزَّكَوٰةَ وَءَامَنتُم بِرُسُلِى
وَعَزَّرْتُمُوهُمْ وَأَقْرَضْتُمُ اللَّهَ قَرْضًا حَسَنًا
لَّأُكَفِّرَنَّ عَنكُمْ سَيِّـَٔاتِكُمْ وَلَأُدْخِلَنَّكُمْ جَنَّٰتٍ
تَجْرِى مِن تَحْتِهَا الْأَنْهَٰرُ فَمَن كَفَرَ بَعْدَ ذَٰلِكَ
مِنكُمْ فَقَدْ ضَلَّ سَوَآءَ السَّبِيلِ ⑫

५६. अर्थात तुमची सगळी धावपळ केवळ अल्लाह करिता असली पाहिजे; आणि तुमच्या समस्त तन्मयतेचे केंद्र अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे हेच असावे. ही गोष्ट ईमान बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तिकडूनहि अपेक्षित आहे आणि सामूहिक रित्या देखील अपेक्षित आहे. व्यक्तिने कार्यक्षेत्रात मनाची विशुद्धता व ईश समर्पणाचा पुरावा द्यावा आणि संपूर्ण मुस्लिम जातीसमूह सामूहिक रित्या सत्य धर्माचा ध्वज घेऊन चालणारा बनावा.

५७. पहा सूरह निसा टाप क्र. २२०

५८. एखाद्या जाती समूहाचे वैर माणसाला दूषित पूर्वग्रहात ग्रस्त करते. ज्यामुळे तो त्या जातीसमूहाशी चुकीची वागणूक पत्करून बसतो. मग मात्र त्यांच्या अंगी न्याय-अन्यायाचा कसलाहि फरक शिल्लक राहत नाही परंतु मुस्लिम जाती जमाअतीच्या अस्तित्वाचे उद्दिष्टच न्याय प्रस्थापनेचे आहे. म्हणूनच या जातीजमाअतीने एखाद्या जातीसमूहाच्या शत्रूत्वाने इतके प्रभावित होता कामा नये की न्यायाला त्याने पारखे व्हावे, किंबहुना त्याचा हा विशेष गुणधर्म असला पाहिजे की आपल्या समस्त व्यवहारात येथ पावेतो की आपल्या राजकीय धोरणातहि व सर्व लोकांशी किंबहुना शत्रू पक्षाशीहि न्याय करण्यास कटिबद्ध असावे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी प्रशिक्षित केलेल्या समूहामध्ये हा गुणधर्म अत्याधिक दर्जाचा होता ते ना आपल्या शत्रूकडे खोटया गोष्टींचा निर्देश करीत व ना त्यांच्याशी अनैतिक वर्तन अंगिकारीत, येथपावेतो की युद्धात देखील ते अत्याचार करीत नसत. युद्धात ठार झालेल्यांच्या प्रेतांचा अवमान करीत नसत व कैद्यांशी वाईट वागणूक करीत नसत. ते ना आबालवृद्धांना ठार करीत ना स्त्रीयांची इज्जत लुटीत म्हणून ते या गोष्टीचे वचन बाळगणारे ठरले की त्यांनी न्याय शासन करावे व जमीनीवर सर्वत्र न्याय प्रस्थापित करावा.

५९. येथे त्या कटकारस्थानाकडे संकेत आहे जे यहुदींनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या सहवासात असलेल्या अनुयायींना ठार करण्याकरिता रचले होते तथापि सर्वश्रेष्ठ अल्लाहने वेळीच पैगंबरांना याची सूचना देऊन सुरक्षित राखले.

६०. अर्थात आज्ञा पालनाचे वचन होय. तौरात मध्ये आहे की ज्यावेळी हज़रत मूसा यांनी इस्राईलच्या संततीस ईश्वरीय आदेश मानण्याचा व त्याच्या वचनानुसार वागण्याचा उपदेश केला तर ते म्हणाले, ''परमेश्वराने सांगितले आहे ते सर्व आम्ही करु''(निर्गम १९ :८) तसेच अन्य एका उल्लेखानुसार ''परमेश्वर हा आपला देव आहे असे मान्य करून तू आज वचन दिले आहे की मी तुझ्या मार्गानी चालेन, तुझे विधि, आज्ञा व नियम पाळीन आणि तुझा शब्द मानीन.'' (अनुवाद २६: १७)

६१. बनी इस्राईलचे बारा कबीले होते म्हणून प्रत्येक कबिल्यामधून एकेक व्यक्तिला निरीक्षक या नात्याने नियुक्त केले गेले होते, अशासाठी की धर्मशास्त्राच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत त्यांनी लोकांवर देखरेख करावी व त्यात बिघाड निर्माण होऊ देऊ नये. बारा सरदारांचा उल्लेख बायबलमध्येहि आहे. पहा गणना अध्याय १३, अनुवाद अध्याय १:२३.

६२. आणि ईश्वर ज्या जातीसमूहा सोबत असतो तेव्हा साहजिकच त्याचे समर्थन व त्याची मदत त्या जाती समूहाबरोबर असते.

६३. निदर्शनास आले की इस्राईलच्या संततीस जी शरीयत दिली गेली होती तिच्यात नमाज व ज़कात ला मूलभूत श्रेष्ठत्व प्राप्त होते. परंतु विद्यमान तौरताच्या संबंधानुषंगाने त्यात ज़कात चा उल्लेख तर आहे, मात्र नमाज़ला त्यांच्या पृष्ठामधून अगदी नाहीसे केले गेले आहे.

६४. अर्थात ईश्वराकडून जे जे प्रेषित येतील त्यांच्या विषयी तुम्ही ईमान बाळगणे व त्यांची मदत करणे हेहि सम्मिलित आहे आणि विशेषत: संकेत याच गोष्टीकडे आहे.

६५. हा व्यय ज़कातच्या व्यतिरिक्त आहे. कारण ज़कातचा उल्लेख वर आला आहे. ज़कातच्या व्यतिरिक्त अधिक खर्चाची गरज जिहाद (धर्मयुद्धा) करिताहि भासू शकते आणि धर्म आवाहनाच्या प्रसाराकरिता देखील. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ३८१

६६. ज्या मूलभूत गुणवैशिष्टयांचा वर उल्लेख आला आहे त्यांना जर माणसाने आपल्या अंगी निर्माण केले तर त्याचे दौर्बल्य आणि दुराचार नाहीसे होऊ लागतात.

اِنَّ الْحَسَنٰتِ يُذْهِبْنَ السَّيِّاٰتِ ۔

''सत्कृत्ये दुष्कृत्यांना दूर सारतात.'' (हूद ११४)

आणि जे अपराध व ज्या चूका त्याच्या हातून घडल्या असतील सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या सर्वास माफ फर्मावितो.

६७. अर्थात जन्नतचे सदाबहार बाग होत.

६८. अर्थात या स्पष्ट मार्गदर्शनानंतर ज्याने कुफ्र वर्तन अंगिकारले आणि हजरत मुहम्मद ''सल्लल्लाहु अलैहि वसल्लम'' यांच्या प्रेषितत्वास मान्य करण्यास नकार दर्शविला तर त्याने खऱ्या राजमार्गास जो ईश्वराप्रत पोहचण्याचा एकमेव मार्ग आहे व ज्याचे नाव इस्लाम आहे त्यास तो मुकला.

१३. मग या कारणास्तव की त्यांनी आपल्या वचनाचा भंग केला आम्ही त्यांचा धि:क्कार केला आणि त्यांच्या अंत: करणांना कठोर केले.[६९] ते वाक्यांना त्यांच्या मूळ स्थाना (संदर्भा) पासून फिरवितात [७०] आणि ज्या (ग्रंथा) द्वारे त्यांना उपदेश केला गेला होता त्याचा एक हिस्सा ते विसरुन बसले.[७१] आणि तुम्हाला सतत त्यांच्या कोणत्या न कोणत्या विश्वासघाताची [७२] बातमी लागत राहते. त्यांच्यापैकी असे लोक फार कमी आहेत जे यापासून अलिप्त आहेत. [७३] यास्तव त्यांना क्षमा करा व त्यांच्या दुष्कृत्यांना दृष्टीआड करा.[७४] अल्लाह उपकार करणाऱ्यांना पसंत करतो.

فَبِمَا نَقْضِهِمْ مِّيْثَاقَهُمْ لَعَنّٰهُمْ وَجَعَلْنَا قُلُوْبَهُمْ
قٰسِيَةً ۚ يُحَرِّفُوْنَ الْكَلِمَ عَنْ مَّوَاضِعِهٖ ۙ وَنَسُوْا
حَظًّا مِّمَّا ذُكِّرُوْا بِهٖ ۚ وَلَا تَزَالُ تَطَّلِعُ عَلٰى خَآئِنَةٍ
مِّنْهُمْ اِلَّا قَلِيْلًا مِّنْهُمْ فَاعْفُ عَنْهُمْ
وَاصْفَحْ ؕ اِنَّ اللّٰهَ يُحِبُّ الْمُحْسِنِيْنَ ﴿۱۳﴾

१४. आणि जे लोक म्हणतात आम्ही ख़्रिश्चन आहोत [७५] आम्ही त्यांच्याकडून वचन घेतले होते [७६] परंतु ज्या (ग्रंथा) द्वारे त्यांना उपदेश केला गेला होता, त्याचा एक हिस्सा ते विसरुन बसले [७७] तर आम्ही यांच्या दरम्यान कियामती पर्यंत वैर द्वेषाची आग भडकाविली [७८] आणि लवकरच अल्लाह त्यांना दाखविल की ते काय घडवित राहिलेत.

وَمِنَ الَّذِيْنَ قَالُوْٓا اِنَّا نَصٰرٰٓى اَخَذْنَا مِيْثَاقَهُمْ
فَنَسُوْا حَظًّا مِّمَّا ذُكِّرُوْا بِهٖ ۠ فَاَغْرَيْنَا بَيْنَهُمُ
الْعَدَاوَةَ وَالْبَغْضَآءَ اِلٰى يَوْمِ الْقِيٰمَةِ ؕ وَسَوْفَ
يُنَبِّئُهُمُ اللّٰهُ بِمَا كَانُوْا يَصْنَعُوْنَ ﴿۱۴﴾

१५. हे ग्रंथ बाळगणाऱ्यांनो ! आमचा पैगंबर तुमच्या जवळ येऊन पोहचला आहे जो ग्रंथांच्या पुष्कळशा अशा गोष्टींना ज्यांना तुम्ही लपवित राहीलात, प्रकट करीत आहे आणि पुष्कळशा गोष्टींना दृष्टीआड देखील करीत आहे. [७९] तुमच्या जवळ अल्लाह तर्फे नूर [८०] (प्रकाश) व एक स्पष्ट ग्रंथ आला [८१] आहे.

يٰٓاَهْلَ الْكِتٰبِ قَدْ جَآءَكُمْ رَسُوْلُنَا يُبَيِّنُ لَكُمْ
كَثِيْرًا مِّمَّا كُنْتُمْ تُخْفُوْنَ مِنَ الْكِتٰبِ
وَيَعْفُوْا عَنْ كَثِيْرٍ ؕ قَدْ جَآءَكُمْ مِّنَ اللّٰهِ نُوْرٌ
وَّكِتٰبٌ مُّبِيْنٌ ۙ ﴿۱۵﴾

१६. ज्याद्वारे अल्लाह त्या लोकांना जे त्याच्या प्रसन्नतेचे अनुसरण करतात शांती सुरक्षेचे मार्ग दाखवितो [८२] व आपल्या अनुग्रहाने त्यांना अंध: कारातून बाहेर काढून प्रकाशात आणतो [८३] आणि त्यांना सरळ मार्ग [८४] दाखवितो.

يَّهْدِيْ بِهِ اللّٰهُ مَنِ اتَّبَعَ رِضْوَانَهٗ سُبُلَ
السَّلٰمِ وَيُخْرِجُهُمْ مِّنَ الظُّلُمٰتِ اِلَى النُّوْرِ بِاِذْنِهٖ
وَيَهْدِيْهِمْ اِلٰى صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿۱۶﴾

६९. जो जाती समूह अल्लाहच्या वचनाचा भंग करतो, तो धिक्कारला जाण्यास पात्र ठरतो यानंतर हृदयाची प्रभाव स्वीकृति शिल्लक राहात नाही. आणि मग स्मरण उपदेशाच्या गोष्टी प्रभावशून्य ठरतात.

बायबलच्या 'जकरीया' ग्रंथात बनी इस्राईलच्या पाषाण हृदयतेचे चित्र अशा प्रकारे प्रस्तुत केले गेले आहे ''पूर्वीच्या संदेष्टयाच्या द्वारे सेनाधीश परमेश्वराने आपल्या आत्म्याच्या द्वारे पाठविलेले धर्मशास्त्र वचन ऐकू नयेत म्हणून त्यांनी आपले मन पाषाणासारखे कठीण केले हयास्तव सेनाधीश परमेश्वराचा त्याजवर मोठा कोप झाला.'' (जखऱ्या ७ : १२)

७०. अर्थात गोष्ट वेगळीच असते आणि दर्शवितात दुसरेच काही तरी. जेव्हा मने कठीण होतात तेव्हा त्यांच्यात सत्य-स्वीकृतिची क्षमता बाकी राहात नाही. अशा लोकांसमोर जेव्हा सत्य गोष्ट येते तर तिला आपल्या अभिलाषांच्या विपरीत असलेले पाहून अशा अर्थाचा साज चढवितात जो ना शब्दशैलीशी अनुरुप असतो व ना वाणीच्या उद्देश्याशी अनुरुप असतो. यहुदी ईश ग्रंथांमध्ये ज्या प्रकारचे फेरफार करीत असत त्याचा खुलासा सूरह बकरा टीप क्र. ९६ मध्ये केला गेला आहे.

७१. अर्थात त्यांना ज्याच्या द्वारे उपदेश केला गेला होता त्या तौरात ला सुरक्षित ठेवले नाही किंबहुना त्याचा एक हिस्सा ते विसरले जेव्हा सध्या अस्तित्वात असलेल्या तौरात (बायबल) मध्ये कियामतीची भयावहता व आखिरतच्या मोबदला व शिक्षे संबंधीचा उल्लेख मोठया कष्टाने आढळेल तथापि इहलोकीय शिक्षा व बक्षिसांचा उल्लेख विवरणासह आहे आणि शरीयतचे पालन केल्याबद्दल जे मोठयात मोठे बक्षिस देण्याचा वायदा वारंवार केला गेला आहे ते बक्षिस म्हणजे एक देश आहे जेथे दुध आणि मधाचे प्रवाह वाहतात अर्थात पॅलेस्टिन भूमी. तेव्हा उघड आहे की एखाद्या ईश ग्रंथाची प्रलोभन देण्याची व प्रोतसाहीत करण्याची शैली अशी असू शक्त नाही आणि हा या गोष्टीचा पुरावा होय की तौरातचा तो हिस्सा जो आखिरतच्या वर्णनावर उभारलेला होता यहुदींना त्याचे विस्मरण घडले.

७२. ईश ग्रंथात फेरफार म्हणजे अनामतीचे अपहरण होय.

७३. अर्थात यहुदी लोकांमध्ये असे लोक फार कमी आहेत जे या प्रकारची खोडसाळ कृत्ये करीत नाही आणि असे देखील लोक आहेत ज्यांना इस्लाम स्वीकृतिची सुबुद्धि लाभली.

७४. अर्थात असले लोक त्रास व क्लेश पोहचविण्याचा ज्या काही गोष्टी करतील त्यात आश्चर्य नाही तथापि तुम्ही मोठया मनाने त्यांना माफ करा व त्यांच्या हरकतींकडे कानाडोळा करा.

७५. संकेत या गोष्टीकडे आहे की ''ख्रिश्चन''धर्म ख्रिश्चन मताच्या अनुयायींनी स्वत:च ठेवलेले नाव आहे. अल्लाहने आपल्या धर्मानुयायींचे नाव सूरह हज्जच्या शेवटच्या आयतीत फर्माविल्याप्रमाणे ''मुस्लिमीन'' ठेवले होते. ख्रिश्चन नव्हे आणि शाब्दिक संशोधनाच्या दृष्टीने पाहिल्यास ''नसारा'' हा शब्द नसरान'चे अनेक वचन आहे ज्याप्रमाणे ''नदामा'' 'नदमान'चे अनेक वचन आहे (अस-सिहाह-जौहरी ख. २ पा ८२९) आणि याचा निर्देश नासरा कडे आहे जे सिरीया देशाचे एक शहर आहे जेथे हजरत ईसा यांनी वास्तव्य धारण केले होते. बायबल मध्ये उल्लेख आहे :

''व नासरेथ नावाच्या गावी जाऊन राहिला, अशासाठी की, त्याला नासोरी म्हणतील हे जे संदेष्टयाच्या द्वारे सांगितले होते ते पुर्ण व्हावे.'' (मत्तय २:२३)

७६. अर्थात आज्ञापालनाचे वचन होय.

७७. अर्थात इंजिल होय ज्याचा मोठा हिस्सा ते विसरले.

७८. म्हणजे अल्लाहच्या आदेशांना विसरुन जाण्याचा अरिहार्य परिणाम परस्पर मतभेद व गटबाजी होत, अर्थात हा परिणाम ईश नियमानुसार दृगोचर होतो म्हणून या गोष्टीस ''आम्ही त्यांच्या दरम्यान द्वेष वैराची आग भडकाविली'' या अर्थाने घेतले आहे. यापासून मुक्ति याच स्थितीत होऊ शकते की त्यांनी कुरआन व हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी ईमान बाळगून इस्लामच्या राजमार्गावर चालू लागावे परंतु जेव्हा त्यांनी पक्षापातात पडून या मार्गदर्शनास कबूल केले नाही तेव्हा अल्लाहने त्यांना या अवस्थेत सोडले की ते कियामती पर्यंत आपसात लढत-मरत रहावेत. आणि ख्रिश्चन-मताचा इतिहास साक्षी आहे की यांच्यात धार्मिक वादविवादाचे युद्ध चांगलेच गाजले.

या घटनेच्या उल्लेखान्वये केवळ ख्रिश्चनांना सावध करण्याचा हेतु नाही, किंबहुना या सोबतच मुस्लिम उम्मत जाती समूहाला देखील संचेत करण्याचा आहे की त्यांनी यापासून बोध घ्यावा अन्यथा कुरआनाच्या शिक्षणास विसरून जाण्याच्या स्थितीत त्यांच्यातहि सांप्रदायिक मतभेद निर्माण होऊ शकतो.

७९. अर्थात हा पैगंबर त्या गोष्टींना अनावरित करीत आहे. ज्यावर ग्रंथ बाळगणाऱ्यानी पांघरुण घातले आहे आणि ज्यांना सत्य धर्माचे पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूने उघड करण्याची आवश्यकता होती. याव्यतिरिक्त अगणित फेरबदल असे आहेत ज्यांच्याशी सरळ सरळ विरोधाची गरच नाही किंबहुना त्यांची वस्तुस्थिती कुरआनाच्या तात्विक मार्गदर्शनाने आपोआप प्रकट होते म्हणून अशा पुष्कळशा गोष्टींना पैगंबर दृष्टी आड करतो.

८०. ''नूर'' (प्रकाश) रसूलचे विशेषण आहे अभिप्रेत हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होय. ज्याच्या उदयाने सत्य धर्माचा प्रकाश पसरला.

८१. अर्थात कुरआन होय. ज्याच्या शिकवणी अत्यंत

स्पष्ट आहेत. ग्रंथ बाळगणाऱ्यांनी ईश-ग्रंथाच्या शिकवणींना इतके संदिग्ध करुन ठेवले होते की त्यांचे आकलन करणे कोणाच्याहि समार्थ्यात नव्हते परंतु कुरआनाच्या प्रकाशमय शिकवणींनी त्या समस्त संदिग्ध गोष्टींना समाप्त केले म्हणून कुरआनाचे आवाहन हे आहे ज्या संदिग्ध गोष्टीत धर्म बाळगणारे ग्रस्त आहेत त्यातून निघण्याचा मार्ग आहे की त्यांनी कुरआनाच्या उज्वल शिकवणींना आत्मसात करावे.

८२. जो माणूस अल्लाहच्या प्रसन्नतेस ध्येय उद्दिष्ट ठरवून सत्यधर्माचे शुद्ध व खऱ्या अंत:करणाने अनुसरण करील त्याच्या समस्त अडचणी नाहीशा होतील आणि तो प्रत्येक प्रकारच्या अपायापासून सुरक्षित राहील त्याला जीवनाच्या प्रत्येक वळणावर कुमार्गापासून अलिप्त राहण्याची व शांती सुरक्षेच्या मार्गावर चालण्याची सुबुद्धि लाभेल.

८३. अंध:काराशी अभिप्रेत अर्थ अज्ञानाचा अंध:कार होय आणि प्रकाशाशी अभिप्रेत ज्ञानाचा प्रकाश होय.

८४. सरळ मार्ग म्हणजे इस्लाम होय.

**आणि (त्या घटनेचे स्मरण करा) जेव्हा मूसा आपल्या जाती समूहास म्हणाला, हे माझ्या जाती समूहाच्या लोकांनो ! आपल्या वरील अल्लाहच्या या अनुग्रहाचे स्मरण करा की त्याने तुमच्यात प्रेषित निर्माण केलेत, तुम्हाला ते काही प्रदान केले जे जगातील कोणत्याही जाती समूहास प्रदान केले गेले नाही.** *(अल-क़ुरआन)*

१७. नि:संशय त्या लोकांनी कुफ्र केले. ज्यांनी म्हटले, अल्लाहच आहे मरीयमचा पुत्र मसीह [८५] (त्यांना) सांगा जर अल्लाह मरीयम-पुत्र मसीहला, त्याच्या मातेला व समस्त भूमीवास्यांना ठार करु इच्छिल तर अल्लाह समोर कोणाचा जोर चालू शकतो ?[८६] आकाशांच्या व जमिनीच्या आणि त्यांच्या दरम्यान असलेल्या सर्व गोष्टींची बादशाही अल्लाह करिताच आहे, तो जे काही इच्छितो निर्माण करतो.[८७] आणि अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

لَقَدْ كَفَرَ الَّذِيْنَ قَالُوْٓا اِنَّ اللّٰهَ هُوَ الْمَسِيْحُ ابْنُ
مَرْيَمَ ؕ قُلْ فَمَنْ يَّمْلِكُ مِنَ اللّٰهِ شَيْـًٔا اِنْ اَرَادَ اَنْ
يُّهْلِكَ الْمَسِيْحَ ابْنَ مَرْيَمَ وَاُمَّهٗ وَمَنْ فِى الْاَرْضِ
جَمِيْعًا ؕ وَلِلّٰهِ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا ؕ
يَخْلُقُ مَا يَشَآءُ ؕ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ شَىْءٍ
قَدِيْرٌ ﴿۱۷﴾

१८. यहुदी आणि ख्रिश्चन म्हणतात, आम्ही अल्लाहचे पुत्र व त्याचे चाहते आहोत [८८] त्यांना सांगा की मग तो तुमच्या अपराधांबद्दल तुम्हाला शिक्षा का देतो ?[८९] वस्तुत: तुम्ही सुद्धा तसेच मानव आहात जसे इतर मानव त्याने निर्माण केले आहेत.[९०] तो ज्याला इच्छिल माफ करील व ज्याला इच्छिल शिक्षा देईल.[९१] आकाश व जमीन आणि त्यांच्या दरम्यान असलेल्या समस्त अस्तित्वांचे राज्य केवळ अल्लाह करिताच आहे आणि सर्वांना त्याच्याकडे जायचे आहे.

وَقَالَتِ الْيَهُوْدُ وَالنَّصٰرٰى نَحْنُ اَبْنٰٓؤُا اللّٰهِ وَاَحِبَّآؤُهٗ ؕ قُلْ فَلِمَ
يُعَذِّبُكُمْ بِذُنُوْبِكُمْ ؕ بَلْ اَنْتُمْ بَشَرٌ مِّمَّنْ خَلَقَ ؕ يَغْفِرُ لِمَنْ يَّشَآءُ
وَيُعَذِّبُ مَنْ يَّشَآءُ ؕ وَلِلّٰهِ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا
بَيْنَهُمَا ؗ وَاِلَيْهِ الْمَصِيْرُ ﴿۱۸﴾

१९. हे ग्रंथ बाळगणाऱ्यांनो ! आमचा रसूल तुमच्या जवळ अशा प्रसंगी येऊन पोहचला आहे जेव्हा पैगंबरांना पाठविण्याचा क्रम एका अवधिपासून बंद होता.[९२] तो (खऱ्या धर्माला) तुम्हाकरिता स्पष्ट करीत आहे अशासाठी की तुम्ही असे म्हणू नये की आमच्याजवळ कोणी शुभसंदेश देणारा व सावध करणारा आला नाही आता शुभसंदेश देणारा व सावध करणारा तुमच्याजवळ येऊन पोहचला आहे [९३] आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.[९४]

يٰۤاَهْلَ الْكِتٰبِ قَدْ جَآءَكُمْ رَسُوْلُنَا يُبَيِّنُ لَكُمْ عَلٰى فَتْرَةٍ مِّنَ
الرُّسُلِ اَنْ تَقُوْلُوْا مَا جَآءَنَا مِنْۢ بَشِيْرٍ وَّلَا نَذِيْرٍ ؗ فَقَدْ جَآءَكُمْ
بَشِيْرٌ وَّنَذِيْرٌ ؕ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ شَىْءٍ قَدِيْرٌ ﴿۱۹﴾

२०. आणि (त्या घटनेचे स्मरण करा) जेव्हा मूसा आपल्या जाती समूहास म्हणाला, हे माझ्या जाती समूहाच्या लोकांनो ! आपल्या वरील अल्लाहच्या या अनुग्रहाचे स्मरण करा की त्याने तुमच्यात प्रेषित निर्माण केलेत, तुम्हाला ते काही प्रदान केले जे जगातील कोणत्याही जाती समूहास प्रदान केले गेले नाही.[९५]

وَاِذْ قَالَ مُوْسٰى لِقَوْمِهٖ يٰقَوْمِ اذْكُرُوْا نِعْمَةَ اللّٰهِ عَلَيْكُمْ
اِذْ جَعَلَ فِيْكُمْ اَنْۢبِيَآءَ وَجَعَلَكُمْ مُّلُوْكًا ۖۗ وَّاٰتٰىكُمْ مَّا لَمْ يُؤْتِ
اَحَدًا مِّنَ الْعٰلَمِيْنَ ﴿۲۰﴾

८५. अर्थात अल्लाहने मरीयम-पुत्र मसीहच्या अंगात संचार केला आहे. आणि खरी ईश्वरता मसीहमध्येच आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर मसीह म्हणजे ईश्वराचे शारीरिक प्रकटीकरण (अवतार) होय.

बाइबलच्या प्रेषितांची कृत्ये' या ग्रंथात पुढील उल्लेख आहे: म्हणजे इस्राएलाच्या सर्व घराण्याने हे निश्चयपुर्वक समजून घ्यावे की ज्या येशुला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारला त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेवले आहे.'' (प्रेषितांची कृत्ये २:३६).

८६. म्हणजे जर अल्लाह मसीह त्यांची माता व सगळ्या प्राणीमात्रांना नष्ट करु इच्छिल तर कोण त्याला या निश्चयापासून रोखू शकतो? आणि ज्याअर्थी हे कथित ईश्वर स्वत:ला विनाशापासून वाचवू शकत नाही तर ते ईश्वर कसे? इतकी ढोबळ गोष्ट देखील मसीह-पूजकांच्या लक्षात येत नाही!

८७. म्हणजे अल्लाह ज्या प्रकारे इच्छिल निर्माण करु शकतो. एखाद्याचा पित्याविना जन्म होणे याचा हा अर्थ नव्हे की तो ईश्वर आहे किंवा ईश्वरत्वात सहभागी झाला आहे.

८८. त्यांनी आपल्या त्या दाव्यास सिद्ध करण्याकरिता 'तौरात' व इंजील मध्येहि फेरबदल केला. त्यानुसार जिथे इस्राईलच्या संततीस ईश्वराचे दास म्हटले गेले होते तिथे त्यांना ईश-पुत्र लेखिले:

''तुम्ही आपल्या देव परमेश्वर ह्यांची मुले आहा.'' (अनुवाद १४ :१)

''आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यांत पित्याने आपल्याला केवढे प्रीतीदान दिले आहे पाहा: आणि आपण तसे आहोच.'' (योहानाचे पहिले पत्र ३:१)

८९. अर्थात तुमच्या या दाव्याचे खंडन तुमच्या स्वत:च्या इतिहासाने होते की तुमच्या बंडखोरपणामुळे तुम्हाला कशा कठोर शिक्षा इहलोकात मिळत राहिल्या आहेत, शत्रूंचे त्यांच्या वर आच्छादित होणे व संपूर्ण जाती समूहास गुलाम बनविणे, सार्वजनिक हत्त्या, बैतुल मुकद्दसच्या विध्वंसा सारख्या घटना या गोष्टीचा पुरावा नाही काय की ईश्वराच्या जवळ कोणताही जातीसमूह लाडका नाही आणि कोणत्याहि समूहास त्याने मोक्षाचा परवाना लिहून दिला नाही किंबहुना तो आचरणाच्या आधारावर मोबदला व शिक्षेचा निर्णय करतो. मग आखिरत मध्ये निर्णय आचरणाच्या आधारावर का होणार नाही?

९०. अर्थात पैगंबराच्या वंशातून असल्या कारणाने कोणताहि जातीसमूह मुक्ति पात्र ठरत नाही. मुक्तिची पूर्ण भिस्त ईमान व सदाचरणावर आहे.

९१. अर्थात माफ करणे व शिक्षा देणे संपूर्णत: अल्लाहच्या सामर्थ्यात आहे. तो ज्याला माफ करण्यायोग्य समजेल त्याला माफ करील व ज्याला शिक्षा देण्यायोग्य समजेल त्याला शिक्षा देईल. राहिला हा प्रश्न की तो कोणाला माफ करण्यायोग्य समजेल व कोणास शिक्षा देण्यायोग्य. तर या संदर्भात त्याने मोबदला व शिक्षा संबंधीचा आपला कायदा कुरआनात स्पष्ट केला आहे आणि हा कायदा वंशाच्या आधारावर माणसामाणसात कसलाहि फरक करत नाही.

९२. हज़रत ईसा यांच्या नंतर कोणीही पैगंबर आला नाही येथ पावेतो की हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे शुभागमन झाले. त्यांचे शुभागमन इ.स. ६१० मध्ये झाले अर्थात हज़रत ईसा यांना आकाशात उठविल्या जाण्यानंतर सुमारे पाऊणे सहाशे वर्षांनी.

या दीर्घ काळात ग्रंथ बाळगणाऱ्यांनी ईश-ग्रंथात फेरबदल करुन व आपल्या बिदआत (धर्मात नव्या गोष्टींचा समावेश करुन त्या) द्वारे जी मार्गभ्रष्टता पसरविली होती त्यामुळे लोकांना हे जाणून घेणे कठीण झाले होते की ईश्वराचा खराखुरा धर्म कोणता आहे? त्या परिस्थितीची ही निकड होती की अल्लाहने आपला प्रेषित पाठवावा ज्याने या समस्त मार्गभ्रष्टतेच्या विरोधात मार्गदर्शनाचा मार्ग स्पष्ट करावा आणि लोकांच्या निदर्शनास आणावे की ईश्वराचा खरा धर्म हा आहे. हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना याच उद्दिष्टा करिता पाठविले गेले.

९३. अर्थात आता आपल्या मार्गभ्रष्टतेवर अटळ राहण्याकरिता तुमच्याजवळ कोणतीही सबब शिल्लक राहीली नाही.

९४. अर्थात चांगले जाणून घ्या की जर अजूनहि तुम्ही आपल्या बंडखोरीपासून परावृत्त न झालात तर अल्लाह तुम्हाला कठोर दण्ड देण्यास समर्थ आहे.

९५. संकेत आहे बनी इस्राईलच्या वैभवशाली भुतकाळाकडे त्यांचा इतिहास हज़रत इब्राहीम,हज़रत इसहाक, हज़रत याकूब आणि हज़रत यूसूफ सारख्या अत्यंत प्रतिष्ठित पैगंबरांनी भरलेला आहे आणि हज़रत यूसूफ यांच्या काळात त्यांना सत्ताधिकार लाभला.

इस्राईल संततीस सर्वश्रेष्ठ अल्लाहने इत्तर जाती समूहांच्या तुलनेने ही महत्ता प्रदान केली होती की त्यांना ईमामत (धार्मिक नेतृत्व) प्रदान केले. अशासाठी की त्यांनी निशाणवरदार सत्य धर्माचे बनून सत्य-साक्षीचे कर्तव्य पार पाडावे. या संबंधात सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना असामान्य सहाय्य देत राहिला. फिरऔन सारख्या जबरदस्त व अत्याचारी राजापासून सुटका सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या असामान्य मदतीचा परिणाम होता.

२१. हे माझ्या जाती समूहातील लोकांनो !या पवित्र भूमीत दाखल व्हा जी अल्लाहने तुमच्याकरिता निर्धारीत केली [९६] आहे आणि पाठ फिरवू नका अन्यथा निराश व्हाल.

يٰقَوْمِ ادْخُلُوا الْاَرْضَ الْمُقَدَّسَةَ الَّتِيْ كَتَبَ اللّٰهُ لَكُمْ
وَلَا تَرْتَدُّوْا عَلٰٓى اَدْبَارِكُمْ فَتَنْقَلِبُوْا خٰسِرِيْنَ ﴿٢١﴾

२२. म्हणू लागले,हे मूसा, तेथे तर जब्बार (जबरदस्त) लोक राहातात.[९७]आम्ही तेथे कदापि जाणार नाहीत,जोपर्यंत ते तेथून निघून जात नाहीत.होय ते जर तेथून निघून गेले तर आम्ही अवश्य दाखल होऊ.

قَالُوْا يٰمُوْسٰٓى اِنَّ فِيْهَا قَوْمًا جَبَّارِيْنَ ۖ وَاِنَّا لَنْ نَّدْخُلَهَا
حَتّٰى يَخْرُجُوْا مِنْهَا ۚ فَاِنْ يَّخْرُجُوْا مِنْهَا فَاِنَّا دٰخِلُوْنَ ﴿٢٢﴾

२३. या भय बाळगणाऱ्यांपैकी दोन इसमांनी ज्यांच्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहने कृपा केली होती सांगितले की त्यांच्या विरोधात दरवाजाने आत शिरा.[९८] जेव्हा तुम्ही यात शिराल तर तुम्हीच विजयी व्हाल.आणि तुम्ही मोमीन (ईमान बाळगणारे) असाल तर अल्लाहवर भरवसा ठेवा.

قَالَ رَجُلٰنِ مِنَ الَّذِيْنَ يَخَافُوْنَ اَنْعَمَ اللّٰهُ عَلَيْهِمَا
ادْخُلُوْا عَلَيْهِمُ الْبَابَ ۚ فَاِذَا دَخَلْتُمُوْهُ فَاِنَّكُمْ غٰلِبُوْنَ ەۚ
وَعَلَى اللّٰهِ فَتَوَكَّلُوْٓا اِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِيْنَ ﴿٢٣﴾

२४. म्हणाले हे मूसा जोपर्यंत ते लोक तेथे आहेत आम्ही कदापि दाखल होणार नाहीत. तुम्ही आणि तुमचा पालनकर्ता दोघेहि जा आणि लढा. आम्ही तर येथे बसून राहू.

قَالُوْا يٰمُوْسٰٓى اِنَّا لَنْ نَّدْخُلَهَآ اَبَدًا مَّا دَامُوْا فِيْهَا فَاذْهَبْ
اَنْتَ وَرَبُّكَ فَقَاتِلَآ اِنَّا هٰهُنَا قٰعِدُوْنَ ﴿٢٤﴾

२५. मूसा ने प्रार्थना केली, हे माझ्या पालन कर्त्या ! मी आपल्या स्वत:खेरीज व आपल्या भावा [९९] खेरीज कोणावरहि अधिकार बाळगत नाही. तेव्हा तू आमच्या व या अवज्ञाकारी लोकांच्या दरम्यान निर्णय कर. [१००]

قَالَ رَبِّ اِنِّيْ لَآ اَمْلِكُ اِلَّا نَفْسِيْ وَاَخِيْ
فَافْرُقْ بَيْنَنَا وَبَيْنَ الْقَوْمِ الْفٰسِقِيْنَ ﴿٢٥﴾

२६. फर्माविले, आता ही भूमी चाळीस वर्षापर्यंत त्यांच्यावर हराम केली गेली आहे. हे लोका जमीनीवर भटकत फिरतील.[१०१] तर तुम्ही या अवज्ञाकारी लोकांच्या (स्थिती) बद्दल खेद करु नका.

قَالَ فَاِنَّهَا مُحَرَّمَةٌ عَلَيْهِمْ اَرْبَعِيْنَ سَنَةً ۚ يَتِيْهُوْنَ
فِي الْاَرْضِ ۗ فَلَا تَاْسَ عَلَى الْقَوْمِ الْفٰسِقِيْنَ ﴿٢٦﴾ ع

२७. आणि तुम्ही यांना आदमच्या दोन पुत्रांची [१०२] घटना योग्यरिता ऐकवा.[१०३]जेव्हा या दोघांनी कुर्बानी सादर केली तेव्हा एकाची कुर्बानी स्वीकृत झाली आणि दुसऱ्याची अस्वीकृत झाली.[१०४] तो म्हणाला मी तुला ठार करीन [१०५] त्याने उत्तर दिले, अल्लाह तर केवळ ईश भय बाळगणाऱ्या लोकांची कुर्बानी स्वीकारतो.[१०६]

وَاتْلُ عَلَيْهِمْ نَبَاَ ابْنَيْ اٰدَمَ بِالْحَقِّ ۘ اِذْ قَرَّبَا قُرْبَانًا فَتُقُبِّلَ
مِنْ اَحَدِهِمَا وَلَمْ يُتَقَبَّلْ مِنَ الْاٰخَرِ ۗ قَالَ لَاَقْتُلَنَّكَ ۗ قَالَ
اِنَّمَا يَتَقَبَّلُ اللّٰهُ مِنَ الْمُتَّقِيْنَ ﴿٢٧﴾

९६. अर्थात पॅलेस्टाइनची भूमी होय. हिला पवित्र भूमी म्हटले जाण्याचे कारण हे आहे की हज़रत इब्राहीम यांनी या भूमीला इस्लामी आवाहनाचे केंद्र बनविले होते आणि इस्राईल संततीस सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे वचन दिले होते की ही भूमी त्यांना वारसा हक्कात देईल. तौरात मध्ये आहे:

''हा देश पाहा,मी तुमच्या पुढे ठेवला आहे, म्हणून परमेश्वराने तुमचे पूर्वज अब्राहाम इसहाक व याकूब ह्यांना व त्यांच्या मागून त्यांच्या वंशजांना जो देश शपथपूर्वक देऊ केला आहे.त्यात जाऊन तो वतन करून घ्या. (अनुवाद १ : ८)

लक्षात असावे की हज़रत इब्राहीम यांनी इस्लामी आवाहनाची दोन केंद्र कायम केली होती. एक मक्केत जेथे आपले पुत्र हज़रत इस्माईल यांना वसविले होते आणि दुसरे पॅलेस्टाइन जेथे आपले पुत्र हज़रत इसहाक यांना वसविले होते. हज़रत इसहाक यांचे पुत्र हज़रत याकूब, ज्यांची उपाधि 'इस्राईल' आहे यांच्यापासून जो वंश चालला तो बनी इस्राईल या नावाने ओळखला जातो. हज़रत याकूब आपल्या मुलांसह हज़रत युसूफ यांच्या सत्तेच्या काळात देशत्याग करून इजिप्तला गेले. तेथे वर्षानुवर्षे राहिल्यानंतर त्यांची संख्या बरीच वाढली. परंतु त्यावेळी त्यांच्यावर फिरऔन शासन करीत होता. हज़रत मूसा जे बनी इस्राईल पैकीच होते, त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर बनवून पाठविले. त्यांनी बनी इस्राईलला फिरऔनच्या पंज्यातून सोडवले. आणि हिजरत करुन सीना येथे आले जेथे त्यांना तूर पर्वतावर सर्वश्रेष्ठ अल्लाहने शरीयत प्रदान केली. यानंतर जेव्हा ते फारानच्या वाळवंटात पोहचले आणि पॅलेस्टाइनचा देश जवळ आला तेव्हा त्यांना आदेश दिला गेला की त्यांनी आपल्या खऱ्या मजलीकडे जावे जे त्यांचे मूळ वतन आहे म्हणजे किनआन व पॅलेस्टाइनचा मुलुख अशासाठी की त्याला आवाहन केंद्राची योग्यता प्राप्त व्हावी नंतर हजरत सुलेमान यांच्या काळात यांच्याच प्रसिद्ध शहरी जेरुसलेम मध्ये ''बैतुल मुकद्दस'' ची उभारणी झाली.

९७. अर्थात तेथे जबरदस्त लोक राहात आहेत की त्यांचा सामना करणे आमच्या शक्तिपलीकडचे आहे. बायबलमध्ये त्यांचे वर्णन पुढील प्रमाणे आले आहे:

''तेथे आम्ही पाहिलेले सर्व लोक मोठे धिप्पाड आहेत. तेथे नेफिलीम म्हणजे नेफिली घराण्यांतील अनाकाचे वंशज आम्ही पाहिले. त्यांच्या पुढे आम्ही स्वत:च्या दृष्टीने टोळांसारखे. दिसलो आणि त्यांनाहि तसेच भासलो.'' (गणना १३:३२, ३३)

९८. तौरात मध्ये या दोन व्यक्तिची नावे यूशअ (यहोशबा) व कालीन अशी आहेत व तत्संबंधी जो तपशील वर्णिला गेला आहे त्याचा खुलासा हा आहे की हजरत मूसा यांनी बारा सरदारांना या मोहिमेवर पाठविले होते, या उद्देश्याने की त्यांनी पॅलेस्टाइनला जाऊन तेथील परिस्थिती जाणून घ्यावी, तेथून परत येऊन त्यांनी जन सामान्यात निवेदन केले की त्या देशात तर ''दूध आणि मधाचे प्रवाह वाहतात,'' परंतु तेथील लोक अत्यंत जबरदस्त व शक्तिशाली आहेत. त्यांचे निवेदन ऐकून लोक समूह चित्कारला आणि गोंधळ माजवू लागला.

''आम्ही मिसर देशांत मेलो असतो तर बरे झाले असते किंवा ह्याच रानांत मेलो असतो तरी बरे झाले असते. तलवारीने आमचा नि:पात व्हावा म्हणून परमेश्वर आम्हाला ह्या देशात का नेत आहे? आमच्या बायका-मुलांची लूट होईल ! आम्ही मिसर देशांत परत जावे हेच बरे नव्हे काय?'' (गणना १४:२, ३)

या प्रसंगी त्या बारा सरदारांपैकी दोन सरदार यूशअ व कालीब उठले व यांनी त्यांचे धैर्य वाढविण्याचा फार प्रयत्न केला आणि म्हटले, ''आमच्या बरोबर परमेश्वर आहे, त्यांची भीती बाळगू नका'' परंतु त्यांनी याचे उत्तर हे दिले की ''ह्यांना दगडमार करा.'' (गणना १४: १०)

९९. अर्थात हज़रत हारून होय, जे हज़रत मूसा यांचे बंधू व पैगंबर होते.

१००. जेव्हा हज़रत मूसा यांनी असे पाहिले की सर्वश्रेष्ठ अल्लाहने पवित्र भूमीला जिंकण्याचा जो आदेश दिला आहे. त्याच्या पूर्ततेकरिता जातीसमूह कशा प्रकारे सज्ज राहिला नाही. तेव्हा त्यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ प्रार्थना केली की एका बाजूला मी आणि माझा भाऊ हारुन आहे. जो प्रत्येक प्रकारे तुझ्या आदेश पूर्ततेकरिता तयार आहे आणि दुसरीकडे जातीसमूह आहे जो अवज्ञा करण्यात सज्ज आहे. अशा स्थितीत तूच निर्णय दे की आम्ही काय करावे आणि जर तुझा प्रकोप या जातीसमूहावर भडकणार असेल तर त्यापासून आम्हाला अलिप्त राख.

१०१. सर्वश्रेष्ठ अल्लाहने फैसला केला की बनी इस्राईलला त्यांच्या अवज्ञेची शिक्षा ही मिळेल की ते चाळीस वर्षापावेतो पवित्र भूमीत दाखल होऊ शकणार नाहीत, किंबहुना रानात वणवण भटकत राहतील. तौरातच्या उल्लेखानुसार :-

''पण तुमची स्वत: ची प्रेते ह्या रानांत पडतील. तुमची प्रेते ह्या रानांत नष्ट होईपर्यंत चाळीस वर्षे तुमची मुलेबाळे तुम्ही केलेल्या विश्वासघाताची शिक्षा भोगीत रानांत भटकणाऱ्या मेंढपाळासारखी होतील...........मी परमेश्वर हे बोललो आहे. ही जी सर्व दुष्ट मंडळी माझ्या विरुद्ध जमली आहे तिचे मी असे खरोखर करीन. त्यांचा ह्या रानांत विध्वंस होईल, ते तेथे मरुन जातील.'' (गणना १४: ३२ ते ३५)

तेव्हा बनी इस्राईलला चाळीस वर्षे रानांत काढावे लागले. या काळात सर्व तरुण पुरुष मेले व त्यांची जागा नव्या पिढीने

घेतली. शेवटच्या काळात हज़रत मूसा व हज़रत हारुन यांचे निधन झाले आणि बनी इस्राईल त्यांच्या नेतृत्वास मुकले. तथापि हजरत मूसा आपल्या निधनापूर्वी बनी इस्राईलला घेऊन शहर अरीहा (यरीहो) जवळ पोहोचले होते जेथून पॅलेस्टाइनची सरहद्द सुरु होते. आणि इबारीम पर्वतावर चढून त्या देशाचे अवलोकन केले होते ज्यास बनी इस्राईल लवकरच जिंकणार होते. हजरत मूसा यांच्या निधनानंतर बनी इस्राईलने यूशअ बिन नूनच्या नेतृत्वात आगेकूच केली व त्याने त्या देशास जिंकले ज्याचे वचन ईश्वराने दिले होते. याचा बराचशा तपशील बायबलच्या ''यहोशवा'' या ग्रंथात आहे.

१०२. तौरात मध्ये त्यांची नावे ''काईन'' (काबील) आणि 'हाबील' अशी आहेत.

१०३. ही मानव जातीच्या आरंभ काळातील एक महत्वपूर्ण घटना होय. या घटनेचा उल्लेख तौरात (बायबल) मध्येहि आहे. परंतु त्यातील बोधप्रद भाग नाहीसा झाला आहे. येथे क़ुरआनाने या घटनेचे काहीही उणेअधिक न करता वर्णन केले आहे, इतकेच नव्हे तर या सोबतच तिचे उद्दिष्ट देखील पूर्णत: स्पष्ट केले आहे.

१०४. हाबिलची कुर्बानी (बलिदान) स्वीकृत झाली कारण तो ईश-भय बाळगणारा होता. कुर्बानी स्वीकृत होण्याचे एखादे चिन्ह सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून खचितच जाहीर झाले असावे. हे चिन्ह कोणते होते या विषयीचे स्पष्टीकरण कुरआनने दिले नाही तथापि अधिकांश भाष्यकार असे म्हणतात की त्या काळात कुर्बानी स्वीकृत असल्याचे चिन्ह हे होते की आकाशातून आग अवतरीत होत असे व कुर्बानीस खाऊन टाकीत असे.

(तफसीर कबीर खंड -११ पृ. २०५)

शक्यता आहे तत्कालीन स्थितीत जेव्हा मानववस्ती काही जणांपुरतीच होती तेव्हा होमबली (अग्नी उतरून भस्म करणाऱ्या कुर्बानीची) ही असामान्य घटना घडली असावी (होमबलीच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. २१३)

यावरुन कुर्बानीचे महत्व स्पष्ट होते की ती अगदी प्राचीन काळात देखील अल्लाहच्या उपासनेचे एक अंग होती. तसेच ही वस्तुस्थितीहि स्पष्ट होते की अगदी आरंभीची संस्कृति, ज्यात माणसाने डोळे उघडले निव्वळ ईश-उपासनेची संस्कृति होती.

१०५. काबिलच्या मनात मत्सर निर्माण झाला की हाबीलची कुर्बानी कशी स्वीकृत झाली व त्याची स्वत:ची कुर्बानी का स्वीकृत झाली नाही या मत्सरापायी त्याने आपल्या निरपराध भावाला ठार करण्याचा निश्चय केला.

निष्पन्न हे की मत्सर असां भयंकर रोग आहे जो माणसाला हत्येसारख्या घोर अपराधाकरिताहि उद्युक्त करतो.

१०६. कुर्बानीच्या स्वीकृति करिता तकवा (ईश-भया) ची अट अशा प्रकारे आहे ज्याप्रकारे कुरआनात अन्य स्थानी फर्माविले गेले आहे.

لَنْ يَنَالَ اللّٰهَ لُحُوْمُهَا وَلَا دِمَآؤُهَا
وَلٰكِنْ يَنَالُهُ التَّقْوٰى مِنْكُمْ ؕ

''ईश्वराप्रत या बलीदानाचे ना मांस पोहचते, ना रक्त किंबहुना त्याच्या समोर फक्त तुमचे ईश-भय पोहचते'' (हज्ज ३७)

अर्थात पहिल्याच दिवसापासून माणसाला धर्माची ही वस्तुस्थिती स्पष्ट केली गेली होती की ईश-भयाविना पार पाडलेला भक्ति-विधी अल्लाहच्या नजरेत काहीच वजन राखत नाही.

# बनी इस्राईलची वन भ्रमंती




**सीना-** हे अक्बा उपसागर व सुवेज उपसागर यांच्या दरम्यान असलेले विशाल वाळवंट आहे.

**तूर पर्वत-** दुसरे नाव तूरे सीनीन. हा पर्वत सीना वाळवंटाच्या दक्षिणेस आहे. तौरात मध्ये याचे नाव होरेब असे आहे. इजिप्त मधून निघाल्यानंतर बनी इस्राईलनी याच्या पायथ्याशी तंबू उभारले होते. आणि याच ठिकाणी हज़रत मूसा यांना शरीअत, प्रदान केली गेली.

**होर पर्वत-** येथे हज़रत हारून यांचे निधन झाले.

**नबू पर्वत-** येथे हज़रत मूसा यांचे निधन झाले.

**मृत सागार** (Dead Sea) याचे दूसरे नाव बहरे लूत आहे. याला यार्देन नदी मिळते.

**यरीहा-** पॅलेस्टाइनचे प्रथम शहर ज्याला हज़रत यूशअ (यहोशवा) च्या नेतृत्वात बनी इस्राईलने जिंकले.

**किनआन (किनान)-** पॅलेस्टाइन

**यरुशलेम**- नवीन नाव अल-कुद्स

**पारान व सीनचे रान** - या भागांत बनी इस्राईल वणवण भटकत राहिले.

२८. जर तू मला ठार करण्याकरिता हात उचलशील तर मी तुला ठार करण्याकरिता हात उचलणार नाही.[१०७] मी अल्लाह सर्व विश्वांच्या पालनकर्त्याचे भय बाळगतो.

لَئِنۡۢ بَسَطْتَّ اِلَیَّ یَدَكَ لِتَقۡتُلَنِیۡ مَاۤ اَنَا بِبَاسِطٍ یَّدِیَ اِلَیۡكَ
لِاَقۡتُلَكَ ۚ اِنِّیۡۤ اَخَافُ اللّٰهَ رَبَّ الۡعٰلَمِیۡنَ ﴿۲۸﴾

२९. मी हे इच्छितो की तू माझे आणि स्वत:चे पाप आपल्या माथी घ्यावे [१०८] व जहन्नमी लोकात सामील व्हावे की अत्याचारींची हीच शिक्षा आहे.

اِنِّیۡۤ اُرِیۡدُ اَنۡ تَبُوۡٓاَ بِاِثۡمِیۡ وَاِثۡمِكَ فَتَكُوۡنَ مِنۡ
اَصۡحٰبِ النَّارِ ۚ وَذٰلِكَ جَزٰٓؤُا الظّٰلِمِیۡنَ ﴿۲۹﴾

३०. परंतु त्याच्या आत्म्याने त्यास आपल्या भावाच्या वधाकरिता उद्युक्त केलेच[१०९] आणि त्यास ठार करुन तो [११०] नाश पावणाऱ्यांत सामील झाला.[१११]

فَطَوَّعَتۡ لَهٗ نَفۡسُهٗ قَتۡلَ اَخِیۡهِ
فَقَتَلَهٗ فَاَصۡبَحَ مِنَ الۡخٰسِرِیۡنَ ﴿۳۰﴾

३१. मग अल्लाहने एक कावळा पाठविला जो जमीन उकरु लागला, यासाठी की याला हे दाखवावे की आपल्या भावाचे प्रेत कशाप्रकारे लपवावे [११२] तो म्हणाला अरेरे! मी या कावळया समानहि होऊ शकलो नाही की आपल्या भावाचे प्रेत लपविले असते तात्पर्य तो यावर लज्जित झाला.[११३]

فَبَعَثَ اللّٰهُ غُرَابًا یَّبۡحَثُ فِی الۡاَرۡضِ لِیُرِیَهٗ كَیۡفَ یُوَارِیۡ
سَوۡءَةَ اَخِیۡهِ ؕ قَالَ یٰوَیۡلَتٰۤی اَعَجَزۡتُ اَنۡ اَكُوۡنَ مِثۡلَ هٰذَا
الۡغُرَابِ فَاُوَارِیَ سَوۡءَةَ اَخِیۡ ۚ فَاَصۡبَحَ مِنَ النّٰدِمِیۡنَ ﴿۳۱﴾

३२. यामुळेच [११४] आम्ही बनी इस्राईल करिता हा आदेश लिहून दिला होता की ज्याने एखाद्याचा वध केला जेव्हा त्या (ठार झालेल्या व्यक्ति) ने एखाद्याचा खून किंवा जमीनीवर उपद्रव माजविण्याचे कृत्य केले नव्हते तर त्याने जणू समस्त मानवांचा वध केला,आणि ज्याने एखाद्याचा प्राण वाचविला, त्याने जणू सर्व मानवांचा प्राण वाचविला [११५] आणि ही देखील वस्तुस्थिती आहे की आमचे पैगंबर यांच्याजवळ स्पष्ट आदेश घेऊन आलेत परंतु एवढे असतांनाहि यांच्यात बहुसंख्य लोक असे आहेत जे जमीनीवर अतिरेक करतात.[११६]

مِنۡ اَجۡلِ ذٰلِكَ ۚۛ كَتَبۡنَا عَلٰی بَنِیۡۤ اِسۡرَآءِیۡلَ اَنَّهٗ مَنۡ
قَتَلَ نَفۡسًۢا بِغَیۡرِ نَفۡسٍ اَوۡ فَسَادٍ فِی الۡاَرۡضِ فَكَاَنَّمَا قَتَلَ
النَّاسَ جَمِیۡعًا ؕ وَمَنۡ اَحۡیَاهَا فَكَاَنَّمَاۤ اَحۡیَا النَّاسَ جَمِیۡعًا ؕ
وَلَقَدۡ جَآءَتۡهُمۡ رُسُلُنَا بِالۡبَیِّنٰتِ ثُمَّ اِنَّ كَثِیۡرًا مِّنۡهُمۡ بَعۡدَ
ذٰلِكَ فِی الۡاَرۡضِ لَمُسۡرِفُوۡنَ ﴿۳۲﴾

३३. जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबरांशी युद्ध करतात आणि जमीनीवर उपद्रव माजविण्या करिता धावपळ करतात त्यांची शिक्षा हीच की त्यांची कत्तल केली जावी किंवा त्यांना सूळी दिले जावे किंवा त्यांचे हात पाय विरुद्ध दिशेने कापले जावेत किंवा त्यांना हद्दपार केले जावे. [११७] ही त्यांच्याकरिता इहलोकात अवहेलना आहे.[११८] आणि आखिरत मध्येहि फार मोठी शिक्षा आहे.

اِنَّمَا جَزٰٓؤُا الَّذِیۡنَ یُحَارِبُوۡنَ اللّٰهَ وَرَسُوۡلَهٗ وَیَسۡعَوۡنَ
فِی الۡاَرۡضِ فَسَادًا اَنۡ یُّقَتَّلُوۡۤا اَوۡ یُصَلَّبُوۡۤا اَوۡ تُقَطَّعَ
اَیۡدِیۡهِمۡ وَاَرۡجُلُهُمۡ مِّنۡ خِلَافٍ اَوۡ یُنۡفَوۡا مِنَ
الۡاَرۡضِ ؕ ذٰلِكَ لَهُمۡ خِزۡیٌ فِی الدُّنۡیَا وَلَهُمۡ فِی
الۡاٰخِرَةِ عَذَابٌ عَظِیۡمٌ ﴿۳۳﴾

१०७. अर्थात तू जर हत्त्या करण्यासाठी पाऊल उचलतोस तर उचल, मी आपल्यातर्फे हत्त्येचा आरंभ करणार नाही, स्पष्ट असावे की हत्त्येची सुरवात करणे एक वेगळी गोष्ट आहे व बचाव करणे वेगळी गोष्ट आहे. येथे हत्त्येचा आरंभ करण्यास नकार दिला गेला आहे, बचाव करण्यास नव्हे.

१०८. अर्थात तू ठार करण्याचे आव्हान दिले आहेस त्याने भडकून जाऊन मी तुझ्या हत्त्येसाठी टपून बसलो तर मी देखील गुन्हेगार होईन. परंतु ज्याअर्थी मी तुझ्याविरूद्ध या प्रकारची कोणतीही कारवाई करीत नाही म्हणून हत्त्येचे पाप माझ्या हातून घडले असते ते सुद्धा तुझ्याच कडे परिवर्तित झाले आहेत आता तू माझी हत्त्या करून दुहेरी पापाचे ओझे उचलशील, एक गुन्हा हत्त्येसाठी पाऊल उचलण्याचा आणि दुसरा गुन्हा अशा व्यक्तिस ठार करण्याचा की जिला तू ठार करण्याची धमकी दिली होती. तरीहि ती तुझ्या हत्त्येसाठी टपून बसली नाही. हदीसच्या उल्लेखानुसार :-

**اذا التقى المسلمان بسيفيهما فا لقاتل والمقتول فى النّار، قيل يارسول اللهٰ هذا القاتل فما بال المقتول؟ قال: انّه قد اراد قتل صاحبه۔** (مسلم کتاب الفتن)

“जेव्हा दोन मुसलमान आपापल्या तलवारीसह एकमेकाच्या विरोधात असावेत, तर ठार करणारा व ठार झालेला दोघेहि जहन्नम मध्ये असतील. कोणीतरी विचारले हे अल्लाहचे पैगंबर! हा अशासाठी जहन्नम पात्र ठरला की तो ठार करणारा आहे परंतु ठार झालेला कोणत्या कारणास्तव जहन्नम-पात्र ठरला? फर्माविले, यासाठी की तो देखील आपल्या साथीदारास ठार करु इच्छित होता.” (मुस्लिम किताबुल फितन)

अर्थात जेव्हा दोघांचीहि नियत एकमेकास ठार करण्याची असावी व या निश्चयाने दोघेहि लढावेत तेव्हा मारेकरी व मारला गेलेला दोघेही गुन्हेगार होतील व जहन्नम पात्र ठरतील. सष्ट असावे की स्वत:च्या बचावाची (Self defence) अवस्था वेगळी आहे. शरीअत (धर्मशास्त्रा) ने प्रत्येक व्यक्तिला आपले प्राण वित्त व प्रतिष्ठेचा बचाव करण्याचा हक्क दिला आहे म्हणून जर बचाव करणाऱ्याला, हल्लेखोराचा जीव घ्यावा लागतो तर त्याचा गुन्हा हल्लेखोराच्याच माथी आहे. आणि इस्लामी कायद्यात अशा खूनाकरिता ना किसास (बदला) आहे ना अशा खुनाची काही किंमत (Blood Money) आहे.

१०९ मनुष्य जेव्हा एखादा गुन्हा करु इच्छितो तेव्हा त्याचे अंतर्मन त्याला रोखते परंतु जेव्हा तो सतत आपल्या अंतर्मनाचा आवाज दाबू लागतो. तेव्हा मात्र त्याचा आत्मा त्याला दुष्कृत्य करण्यास उद्युक्त करतोच.

११०. तौरातमधील उल्लेखानुसार :

“मग काईनाचे त्याचा भाऊ हाबेल ह्याच्याशी बोलणे झाले, आणि असे झाले की ते शेतात असता काइनाने आपला भाऊ हाबेल याजवर चालून जाऊन त्यास ठार केले.” (उत्पत्ति- ४:८)

असे दिसून येते की ही हत्त्या गफलतीच्या स्थितीत केली गेली होती.

१११. हे पहिले रक्त होते जे जमीनीवर वाहविले गेले. हदीस मध्ये उल्लिखित आहे की :-

**لا تقتل نفس ظلماً الاّ كان على ابن آدم الاوّل كفل من دمها لأنه اوّل من سنّ القتل۔** (مسلم کتاب القسامة)

“ज्या कोणाची अत्याचारपूर्वक हत्त्या केली जाते त्याच्या रक्तपाताच्या पापात आदमचा पहिला पुत्र सहभागी होतो कारण तो पहिला माणूस होय ज्याने हत्त्येची पद्धत प्रचलित केली.”

(मुस्लिम किताबुल्‌कसामा)

११२. काबिलने आपल्या भावाला ठार केल्यानंतर त्याच्या प्रेताला असेच सोडून दिले होते आणि प्रेताला मैदानात असेच सोडून देणे की ज्यामुळे ते सडावे गळावे, त्याचा अवमान आहे. हा अवमान होऊ नये म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने एका कावळयाद्वारे काबिलला प्रेत दफन करण्याची पद्धत दाखविली. त्यावेळी मानव जातीचा आरंभ होता आणि हे पहिले प्रेत होते जे जमीनीवर पाडले गेले होते म्हणून काबीलच्या मनात दफन करण्याची गोष्ट त्यावेळी आली जेव्हा त्याने कावळयाला जमीन उकरुन काहीतरी लपवित असतांना पाहिले. कावळयाला ही सवय असते की तो जमीन उकरतो व त्यात खाण्याची एखादी वस्तू लपवितो. कावळयाच्या या कृतिस पाहून काबिलची बुद्धि प्रेतास दफन करण्याकडे वळली.

यावरुन असे दिसून आले की माणसाच्या प्रेतास जमीनीत दफन करणे निसर्गाचे मार्गदर्शन आहे. आणि हीच पद्धत अगदी प्राचीन काळापासून चालत आली आहे.

११३. आणि अपराधाचा परिणाम पश्चातापच आहे. अत्याचारपूर्वक कृत्ये करुन मनुष्य कधीहि समाधान व मानसिक शांती प्राप्त करु शकत नाही, याउलट सत्य आणि न्याय्य वर्तनाचा अंगिकार करुन तो समाधान मन:शांतिची दौलत प्राप्त करुन घेतो.

११४. म्हणजे लोकांमध्ये ही अत्याचारपूर्वक बुद्धि वाढीस लागू नये आणि मानव रक्ताचे अवमूल्य होऊ नये, यासाठी नाहक हत्त्येची भयानकता सर्वश्रेष्ठ अल्लाहने इस्राईल संततीवर चांगल्या प्रकारे स्पष्ट केली होती.

११५. यावरुन हे स्पष्ट होते की इस्लामच्या नजरेत नाहक हत्त्या किती भयंकर अपराध आहे आणि एखाद्या मानव जिवितास वाचवणे केवढे मोठे पुण्य आहे. जो मनुष्य नाहक एखाद्याचा प्राण घेतो, तो केवळ अपराध करत नाही तर मानवजाती विरुद्ध पाऊल उचलतो. कारण खरी गोष्ट प्राणाची कदर आहे. आणि मनुष्य हत्त्या अशाच वेळी करतो जेव्हा त्याच्या मनात प्राणाविषयी आदर शिल्लक राहात नाही, जेव्हा प्राणाचा आदर रहात नाही तेव्हा असा मनुष्य संपूर्ण मानव समाजाकरिता धोकादायक ठरतो. तो केव्हा कोणते पाऊल उचलेल काही सांगता येऊ शकत नाही, याउलट जो मनुष्य मृत्युच्या दाढेत असलेल्या माणसाचा जीव वाचवितो तो केवळ एक पुण्य-कर्म करतो असे नव्हे तर या गोष्टीचा पुरावा देतो की त्याच्या मनात मानव जिविताचा आदर आहे आणि तो मानवतेची सहानुभूती बाळगणारा व हितचिंतक आहे. असाच मनुष्य मानव समाजाचा संरक्षक होऊ शकतो.

११६. अर्थात बनी इस्राईल करिता हत्त्येच्या महापापाचा आदेश लिहून दिल्यानंतर त्यांच्यात प्रेषितहि पाठविले जे त्यांना ईश्वराचे आदेश स्पष्ट करीत राहिलेत आणि ईश्वराची अवज्ञा व अत्याचारपूर्वक कृत्यांबद्दल कानउघाडणी करीत राहिले, परंतु एवढेअसतानाहि अधिकांश लोक अत्याचार व अतिरेक करीत राहिले आणि आज देखील ते उपद्रव माजविणारे बनून राहिले आहेत.

या आयतीच्या अवतरण काळात यहुदी मुसलमानांविरुद्ध कटकारस्थान रचत होते. मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी मुसलमानांविरुद्ध ज्या लढाया लढल्या होत्या या सर्वात गुप्तपणे मदीनेच्या यहुदींचा हात होता आणि त्यांनी प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि त्यांच्या सहवासात असलेल्या अनुयायींना ठार करण्याचेहि कारस्थान रचले होते ज्यात ते यशस्वी होऊ शकले नाहीत. येथे या पांर्श्वभूमीवर हत्त्या व रक्तपाताचे महापाप असणे स्पष्ट करून यहुदींची कानउघाडणी केली गेली आहे.

११७. येथे त्या लोकांचा आदेश वर्णिला गेला आहे जे अल्लाह व त्याच्या प्रेषिताविरुद्ध विद्रोह करतील आणि आपल्या विद्रोहपूर्वक व उपद्रवकारक हरकतीद्वारे इस्लामी कायदा व व्यवस्थेस आव्हान देतील, मग ते मुसलमान असोत वा मुस्लिमेतर.

हा आदेश त्या समूहासहि लागू पडतो,जो इस्लामने निर्धारीत केलेल्या सत्य-व्यवस्थेस व न्यायास उलथून पाडण्याकरिता सशस्त्र बंड करतील, आणि अशा जत्थ्यास व ठोळीसहि लागू पडतो, जे हत्त्या, रक्तपात,डाके, जाळपोळ विध्वंस, अपहरण- मग ते स्त्रीयांचे असो वा विमानांचे यासारखे भंयकर अपराध करुन इस्लामी शासनापुढे लॉ अँड ऑर्डरची समस्या निर्माण करतील. अशा अपराधींचा बिमोड करण्याकरिता इस्लामचे सर्वसामान्य फौजदारी कायदे पर्याप्त ठरु शकत नाही, म्हणून शरीयत ने यांचे डोके ठेचण्याकरिता खास कायदा बनविला आहे की अपराधाचे स्वरुप लक्षात घेता, परिस्थिती व हितानुसार यापैकी जी शिक्षा योग्य वाटेल ती द्यावी.

يُنفَوا مِنَ الأَرْضِ

हद्दपार केले जावे याच्या अर्थात कैद करणेहि सामील आहे.

११८. अर्थात जेव्हा त्यांनी अल्लाह व त्याच्या प्रेषिताविरुद्ध विद्रोह- ध्वज उंचाविला आणि त्याच्या कायद्याचा आदर राखला नाही. तर ते मान प्रतिष्ठेस पात्र कसे? अशा लोकांना धडा घेण्यासारखी व अपमानायुक्त शिक्षा देणे ही न्यायाची उघड गरज होय.

**विश्वास बाळगा की ज्या लोकांनी कुफ्र केले जर त्यांच्या ताब्यात जमीनीवर जे काही आहे ते सर्व यावे आणि याहूनहि अधिक त्यांना प्राप्त व्हावे व त्यांनी कियामतीच्या दिवशी शिक्षेपासून स्वत:ला वाचविण्या करिता हे सर्व काही फिदीया म्हणून देऊ इच्छिले तरीहि ते त्यांच्याकडून कबूल केले जाणार नाही. आणि त्यांना दु:खदायक शिक्षा भोगावी लागेल. *(अल-क़ुर्आन)***

३४. परंतु जे लोक,तुम्ही त्यांच्यावर नियंत्रण करण्यापूर्वी तौबा करतील तर जाणून असा की अल्लाह माफ करणारा व दया करणारा आहे.[११९]

إِلَّا الَّذِينَ تَابُوا مِن قَبْلِ أَن تَقْدِرُوا عَلَيْهِمْ ۖ
فَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٣٤﴾

३५. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ![१२०] अल्लाहचे भय बाळगा [१२१] आणि त्याचे सान्निध्य शोधा [१२२] आणि त्याच्या मार्गात जिहाद [१२३] करा, अशा साठी की तुम्ही सफल व्हावे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا اتَّقُوا اللَّهَ وَابْتَغُوا إِلَيْهِ
الْوَسِيلَةَ وَجَاهِدُوا فِي سَبِيلِهِ لَعَلَّكُمْ
تُفْلِحُونَ ﴿٣٥﴾

३६. विश्वास बाळगा की ज्या लोकांनी कुफ्र केले जर त्यांच्या ताब्यात जमीनीवर जे काही आहे ते सर्व यावे आणि याहूनहि अधिक त्यांना प्राप्त व्हावे व त्यांनी कियामतीच्या दिवशी शिक्षेपासून स्वत:ला वाचविण्या करिता हे सर्व काही फिदीया म्हणून देऊ इच्छिले तरीहि ते त्यांच्याकडून कबूल केले जाणार नाही. [१२४] आणि त्यांना दु:खदायक शिक्षा भोगावी लागेल.

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا لَوْ أَنَّ لَهُم مَّا فِي
الْأَرْضِ جَمِيعًا وَمِثْلَهُ مَعَهُ
لِيَفْتَدُوا بِهِ مِنْ عَذَابِ يَوْمِ الْقِيَامَةِ مَا تُقُبِّلَ
مِنْهُمْ ۖ وَلَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٣٦﴾

३७. ते आगीतून बाहेर निघू इच्छितील परंतु ते त्यातून कधीहि बाहेर निघू शकणार नाहीत. [१२५] त्यांच्या करिता कायम स्वरुपाची शिक्षा असेल.

३८. आणि चोर, पुरुष असो किंवा स्त्री [१२६] दोघांचे हात कापा.[१२७] हा त्यांच्या कमाईचा बदला आणि अल्लाहतर्फे बोध घेण्याजोगी शिक्षा आहे.[१२८] आणि अल्लाह प्रभावशाली व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.[१२९]

وَالسَّارِقُ وَالسَّارِقَةُ فَاقْطَعُوا أَيْدِيَهُمَا جَزَاءً بِمَا كَسَبَا
نَكَالًا مِّنَ اللَّهِ ۗ وَاللَّهُ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٣٨﴾

३९. मग जर एखाद्याने अत्याचार केल्यानंतर तौबा (पुन्हा तसे न करण्याची प्रतिज्ञा) केली व आपली सुधारणा केली तर अल्लाह निश्चितच त्याची तौबा मान्य करील,[१३०] अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.

فَمَن تَابَ مِن بَعْدِ ظُلْمِهِ وَأَصْلَحَ فَإِنَّ اللَّهَ يَتُوبُ
عَلَيْهِ ۗ إِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٣٩﴾

४०. काय तुम्ही हे जाणत नाही की आकाशाची व पृथ्वीची राज्यसत्ता केवळ अल्लाह करिता होय. तो ज्याला इच्छिल शिक्षा देईल व ज्याला इच्छिल माफ करील.[१३१] अल्लाह प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.

أَلَمْ تَعْلَمْ أَنَّ اللَّهَ لَهُ مُلْكُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ يُعَذِّبُ
مَن يَشَاءُ وَيَغْفِرُ لِمَن يَشَاءُ ۗ وَاللَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٤٠﴾

११९. अर्थात इस्लामी शासनाने यांच्यावर काबू करण्यापूर्वी किंवा त्यांना अटक करण्यापूर्वी जर ते तौबा करतील व आपल्या वर्तनात सुधारणा करुन घेतील तर या स्थितीत त्यांच्याविरुद्ध या कायद्यान्वये कारवाई करणे अनुचित ठरेल. कारण तौबा करणाऱ्यांना अल्लाह माफ करतो.

१२०. उपरोक्त विवरणात विद्रोहपूर्वक तन्मयता व अपाय उपद्रवाच्या निवारणाची उपाय योजना वर्णन केली गेली आता. ईमान बाळगणाऱ्यांना संबोधून ते मूलभूत गुणधर्म आपल्या अंगी निर्माण करण्याचा आदेश दिला जात आहे जे यांना चारित्र्यशील व सदाचारी बनवू शकतात.

१२१. अर्थात गुन्हा व दृष्कृत्यापासून अलिप्त रहा.

१२२. म्हणजे ती कामे करा ज्यांव्दारे अल्लाहचे सानिध्य प्राप्त केले जाऊ शकते. सानिध्य प्राप्त करण्याकरिता फक्त अपराधांपासून अलिप्त राहणे पुरेसे नाही, किंबहुना दृष्टया उपासना आणि आज्ञापालनाचा इतमाम आवश्यक आहे म्हणून तकवा (इर्श-भया) सह या आचरणाचे पालन करण्याची ताकीद दिली गेली आहे, जो ईश - सान्निध्याचे माध्यम आहे.

वसीला चा हा मतितार्थ शब्दशैलीच्या दृष्टीने योग्य आहे. आणि कुरआनाच्या सर्वसामान्य वर्णनाशीहि अनुकूल आहे कारण कुरआनने ईश्वरापर्यंत पोहचण्याचा व त्याची प्रसन्नता प्राप्त करण्याचे साधन ईमान व सदाचरणालाच ठरविले आहे आणि यावरच आखिरतची सफलता अवलंबून आहे.

मूळ ग्रथांत ''वसीला'' हा शब्द अपरिचिततेने नव्हे तर परिचित म्हणून वापरला गेला आहे. ''अल'' हा व्याहरणी परिभाषेत विशेषता करिता आहे अर्थात या गोष्टीकडे संकेत करतो की येथे वसील्याशी अभिप्रेत तोच वसीला होय ज्याकडे कुरआन वाचणाऱ्याचे लक्ष जाते आणि गोष्ट उघड आहे की कुरआनचा अभ्यास करणाऱ्याची बुद्धि वशीला (सानिध्य प्राप्तीचे साधन) चा सदाचरण, सत्कृत्ये हाच अर्थ घेते, म्हणून वसील्याचा अन्य कोणताही अर्थ गृहीत धरण्यास अरबी व्याकरणानुसार कसलाच वाव नाही.

शब्दकोश- संबंधानुसार 'लिसानुल अरब' जो अरबी भाषेचा सर्वात मोठा व प्रमाणित शब्दकोश आहे, त्यात वसील्याचा अर्थ ''सानिध्य'' हाच वर्णन केला गेला आहे.

الوسيلة: القربة۔ (لسان العرب ج١١ ص٧٢٧)

वसीला म्हणजे 'सानिध्य' (लिसानुल अरब खंड ११ पा. ७२७)

आणि अत्यंत प्राचीन शब्दकोश सिहाह जौहरी मध्ये आहे-

وسل فلان الى ربّه وسيلة ۰۰۰۰ ای تقرّب اليه بعملٍ۔ (الصحاح للجوهری ج٥ ص١٨٤١)

(हिसाह जौहरी खंड.५ पा. १८४१)

''त्याने आपल्या पालनकर्त्यासमोर वसीला अंगिकारला म्हणजे त्याच्यासमोर कर्माद्वारे सान्निध्य प्राप्तीची इच्छा बाळगली.

आणि ''सलफ सालेहीन'' (पूर्वीच्या सदाचारी मुसलमानांनी) या आयतीत वसील्याचा सान्निध्य - साधन हाच अर्थ घेतला आहे यास्तव इब्ने जरीर तबरी यांनी वसील्याचा 'सान्निध्य' (जवळीक) हा अर्थ वर्णन करतांना मुजाहीद, उनता, अबु वाईल. हसन इ. च्या कथनांचा समर्थनार्थ उल्लेख केला आहे आणि कतादा चे हे स्पष्टीकरणहि आहे की.............

ای تقربوا اليه بطاعته والعمل بما يرضيه

''अर्थात त्याचे आज्ञापालन व त्याला प्रिय असलेल्या कर्माद्वारे त्याचे सान्निध्य प्राप्त करा.''(तफसीर तबरी खंड ४ पृ. १४७)

तसेच अल्लामा इब्ने कसीर हाच अर्थ वर्णन करताना लिहितात ही गोष्ट जी (वसीला या शब्दाच्या स्पष्टीकरणार्थ) या विद्वानांनी सांगितली आहे भाष्यकारांच्या दरम्यान या (शब्दाच्या या अर्था) बाबत कसलाहि मतभेद नाही.

(तफसीर इब्ने कसीर खंड २. पृ. ५२)

या स्टीकरणानंतर 'वास्त्या वशील्यांची' इमारत जी बिदअत वाल्यांनी या आयतीचा चुकीचा अर्थ लावून उभारली आहे, आपोआप कोसळते. त्यांनी या आयतीचे स्पष्टीकरण असे केले की पैगंबरांचा, प्रेषितांचा व औलीयांचा वसीला शोधा' आणि मग गरज पूर्ततेकरता त्यांना आजर्व घालणे व त्यांच्यापुढे गाऱ्हाणे मांडणे उचित ठरविले आणि ही कल्पना निर्माण केली की ईश्वर ज्या देणग्यांनी उपकृत करतो, तो यांच्याच माध्यमाने, परिणाम हा की त्यांचा हा 'कल्पित' वसीला 'शिर्क'चा वसीला बनला आणि ते त्या एकेश्वरवादावर कायम राहू शकले नाहीत ज्याची शिकवण कुरआन व त्यास आणणाऱ्याने दिली होती.

१२३. जिहादशी अभिप्रेत तो प्रयत्न आणि ती धावपळ होय जी सत्य धर्मावर दृढतापूर्वक कायम राहण्याकरिता, धर्माच्या आवाहनास सार्वभिक करण्याकरिता, धर्म-शत्रूंचा विरोध करण्याकरिता, धर्माचे वचन उच्च करण्याकरिता आणि त्याच्या आदेशांना लागू करण्याकरिता केली जावी. या उद्देश्याकरिता आपली शक्ति व उपजत गुणांना लावले जावे व या मार्गात आपल्या साधन-सामुग्रीस कामी आणले जावे येथपावेतो की या ध्येय-पूर्ततेकरिता प्राणपणाला लावण्यातहि संकोच बाळमला जाऊ नये.

जिहाद, अल्लाहच्या मार्गात युद्ध करण्यासहि लागू पडते व शांततामय प्रयत्न करण्यासहि लागू पडते जेव्हा की आवाहनास विरोधांच्या वादळातून जावे लागते.

१२४. आखिरतचा इन्कार करणारे इहलोकीय धनसम्पत्तिस सर्वकाही समजून बसले आहे, परंतु जेव्हा कियामत घडून येईल तेव्हा त्यांना हे जाणवेल की खरा प्रश्न तर आखिरतच्या मुक्तिचा होता, याला दृष्टीआड करुन त्यांनी इहलोकात जबरदस्त चूक केली होती, ज्यामुळे ते मोठ्या तोट्यात राहिले ते अशी इच्छा बाळगतील की या नुकसान भरपाईचा एखादा मार्ग असावा, परंतु नुकसान भरपाईचे कोणतेहि स्वरुप शक्य नसेल. यांच्या या अगतिकतेचे चित्र या शब्दात रेखाटले गेले आहे की जर जमीनीवरील सारी धनसंपदा व तिचे सर्व खजिने यांच्याजवळ असतील व तितकीच अधिक जास्त सम्पत्ति व खजिने यांना ''फिदीया'' म्हणून देऊन आखिरतच्या शिक्षा यातनापासून मुक्ति मिळविण्याची त्यांनी इच्छा बाळगली तर हे त्यांच्याकडून कबूल केले जाणार नाही, हीच गोष्ट हदीस मध्ये पुढील शब्दात फर्मावली आहे:-

يقال للكافر يوم القيامة ارأيت لو كان ملا الأرض ذهبا اكنت تفتدى به فيقول نعم فيقال له قد سئلت أيسر من ذلک فأبيت_ (بخاری ومسلم)

''कियामतीच्या दिवशी काफिरास म्हटले जाईल की जर जमीनभर सोने तुला लाभावे तर तू ते 'फिदीया' स्वरुपात देण्यास तयार आहे? तो म्हणेल, होय. अवश्य, त्याला म्हटले जाईल की याहूनहि कमी मागणी तुझ्याजवळ केली गेली होती, परंतु तू मान्य केली नाहीस.''

१२५. अर्थात ते ही इच्छा बाळगतील की जहन्नमपासून पळून जावे, परंतु त्या बंदीवासातून पळ काढण्याचा कोणताही मार्ग शक्य नसेल.

१२६. इस्लामचा फौजदारी कायदा लिंग प्रकारच्या आधारे अपराधींच्या दरम्यान कसलाच फरक करत नाही. गुन्हा करणारा पुरुष असो वा स्त्री, दोघेही शिक्षेस पात्र आहेत.

१२७. चोरीचा अपराध सिद्ध झाल्यावर फक्त एक हात कापला जाईल अर्थात उजवा हात,हा आणि या प्रकारचे इतर शिक्षाविषयक कायदे,जे कुरआनात वर्णिले गेले आहेत. त्यानां लागू करण्याची मागणी केवळ एखाद्या व्यक्तिकडून नव्हे तर ईमान बाळगणाऱ्या संपूर्ण समाजाशी केली गेली आहे आणि या सूरहचा अवतरण काळ हे दर्शावितो की ही मागणी त्यावेळी केली गेली जेव्हा सत्ता मुसलमानांच्या हाती आली होती व त्यांची स्वत:ची न्यायदान - व्यवस्था प्रस्थापित झाली होती.

राहिला हा प्रश्न की ज्या देशात आपली न्यायदान-व्यवस्था स्थापित करण्यास मुसलमान स्वतंत्र नसतील तेथे त्यांच्याशी इस्लामच्या मागणी काय आहे? तर याचे संक्षिप्त उत्तर असे की इस्लामच्या शिक्षाविषयक कायद्यांना लागू करण्यासंदर्भात त्यांची विवशता उघड आहे, परंतु या विवशतेच्या हा अर्थ नव्हे की मुसलमानांनी इस्लामच्या फौजदारी कायद्याच्या समर्थनाबाबत विरक्त व्हावे व माणसांच्या स्व-रचित कायद्यांना योग्य मानून त्यांचे समर्थन करु लागावे. कारण ईश-विधिच्या तुलनेने मानव रचित विधि नियमास योग्य समजणे ईमानाच्याहि विरुद्ध आहे आणि सत्य व न्यायाचा ध्वज घेऊन चालण्याविरुद्ध देखील. त्यांची जबाबदारी ही आहे की त्यांनी इस्लामी शरीयतीचा ध्वज हातात घेऊन इस्लामच्या आवाहनास लोकांसमोर मांडावे येथपावेतो की, आवाहनाचा हा प्रयत्न अन्य एखाद्या अवस्थेत प्रविष्ट व्हावा.

१२८. हे त्या शिक्षेचे हेतू आहे जे येथे वर्णिले गेले आहे. चोरीची शिक्षा हात कलम करणे ही निश्चित सकत शिक्षा आहे परंतु ही सक्त शिक्षा याचकरिता ठेवली गेली आहे की अपराधात्मक वृत्ती बाळगणाऱ्यांना चांगला धडा मिळावा व त्यांचा अपराधाविषयीचा उत्साह मावळावा. चोरी केवळ चोरीच नसते तर त्यासोबत 'शिरजोरी' ही असते म्हणूनच चोरी सोबत विनयभंग व हत्या यासारख्या घटना निदर्शनास येऊ लागतात. आणि म्हणूनच इस्लामने ही कठोर शिक्षा योजून चोरीचेच नव्हे तर इतर गुन्ह्यांचेहि निवारण केले आहे.

आजच्या घडविलेल्या कायद्यांनी चोरीची हलकी शिक्षा योजून या अपराधास तो हलका अपराध आहे हे सिद्ध करण्याची इच्छा बाळगली आहे,पण खरे पाहिले असता चोरीच्या अगणित घटनांनी व त्यासोबतच घडणाऱ्या अन्य अपराधांच्या संख्येत होणाऱ्या वृद्धीने समाज्याच्या शांती सुबत्तेस नेस्तनाबूत करुन टाकले आहे. कायद्यात निपुण असलेले लोक अपराधांचे तत्वज्ञान वर्णन करुन वस्तुस्थितीवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करतात. त्यांना चोराची दया वाटते परंतु समाजाविषयी दया वाटत नाही, ज्याच्या शांती व्यवस्थेस चोर आव्हान देतो. चोराचे हात कापले जातांना पाहून ते तळमळू लागतात, पण चोराच्या हातून निरपराधाचे डोके कलम होत असलेले पाहून ते किचाळत नाहीत. आज इस्लामचा हा फौजदारी कायदा जेथे जेथे लागू आहे तेथे त्याचा धाक इतका जबरदस्त आहे की चोरीच्या घटना नावापुरत्याच होतात. आणि ही घटनांची वस्तुस्थिती त्या समस्त आक्षेपांचे खंडन करण्यास पूरेशी आहे, जे शरीयतच्या कायद्यांना जंगली सिद्ध करण्यासाठी केले जातात.

१२९. अल्लाह प्रभावशाली आहे, म्हणून त्याचे विधिनियम अशा योग्यतेचे आहेत की त्यांना श्रेष्ठ ठरवून लागू केले

जावे आणि तो (अल्लाह) बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे यास्तव त्याचे विधिनियम हितशून्य व प्रयोजनरहित मुळीच असू शकत नाही. चोरीची शिक्षा अत्यंत कठोर असली तरी ती मानव-हिताच्या विरुद्ध कदापि नाही, किंबहुना ती मानव हितासाठीच आहे.

१३०. अर्थात तौबा करण्याच्या व आपल्या वर्तनात सुधार करण्याच्या स्थितीत तो आखिरतच्या शिक्षेपासून वाचेल. मात्र लक्षात असावे की कायद्याच्या पकडीत आल्यानंतर तौबा केल्याने शरीयतची कोणतीहि शिक्षा लागू होण्यास सूट मिळत नाही.

१३१. अर्थात शिक्षा देण्याचा व माफ करण्याचा पूर्ण अधिकार केवळ अल्लाहला आहे. यात हस्तक्षेप करु शकेल अशी कोणतीहि शक्ति नाही.

४१. हे पैगंबर ! तुम्ही त्या लोकामुळे दु:खी होऊ नका जे कुफ्र करण्यात मोठी तन्मयता दाखवित आहेत,[१३२] मग ते त्या लोकांपैकी का असेनात जे तोंडाने ईमान बाळगण्याचा दावा करतात परंतु त्यांच्या हृदयांनी ईमान कबूल केले नाही [१३३] किंवा त्या लोकांपैकी असोत जे यहुदी झाले आहेत.हे लोक असत्या करिता कान देणारे आणि इतरांकरिता जे तुमच्याजवळ आले नाहीत कान देणारे आहेत [१३४] कुरआनाचे स्थान निश्चित असतांनाहि ते त्यास त्याच्या मूळ स्थानापासून हटवितात [१३५] आणि असे म्हणतात की जर तुम्हाला हा आदेश दिला गेला तर मान्य करा आणि जर न दिला गेला तर यापासून अलिप्त रहा [१३६] आणि ज्याला अल्लाहच उत्पात-ग्रस्त करु इच्छिल तर त्याच्याकरिता अल्लाहच्या विरोधात तुमचा काहीहि जोर चालू शकत नाही [१३७] हे असे लोक आहेत ज्यांच्या हृदयांना शुध्द करणे अल्लाहला मंजूर झाले नाही.[१३८] त्यांच्याकरिता इहलोकातहि अवहेलना आहे आणि आखिरतमध्येहि फार मोठी शिक्षा आहे.

يٰۤاَيُّهَا الرَّسُوۡلُ لَا يَحۡزُنۡكَ الَّذِيۡنَ يُسَارِعُوۡنَ فِى الۡكُفۡرِ
مِنَ الَّذِيۡنَ قَالُوۡۤا اٰمَنَّا بِاَفۡوَاهِهِمۡ وَلَمۡ تُؤۡمِنۡ قُلُوۡبُهُمۡ ۛۚ
وَمِنَ الَّذِيۡنَ هَادُوۡا ۛۚ سَمّٰعُوۡنَ لِلۡكَذِبِ سَمّٰعُوۡنَ
لِقَوۡمٍ اٰخَرِيۡنَ ۙ لَمۡ يَاۡتُوۡكَ ؕ يُحَرِّفُوۡنَ الۡـكَلِمَ مِنۡۢ بَعۡدِ
مَوَاضِعِهٖ ۚ يَقُوۡلُوۡنَ اِنۡ اُوۡتِيۡتُمۡ هٰذَا فَخُذُوۡهُ وَاِنۡ
لَّمۡ تُؤۡتَوۡهُ فَاحۡذَرُوۡا ؕ
وَمَنۡ يُّرِدِ اللّٰهُ فِتۡنَتَهٗ فَلَنۡ تَمۡلِكَ لَهٗ مِنَ اللّٰهِ شَيۡـئًا ؕ
اُولٰٓـئِكَ الَّذِيۡنَ لَمۡ يُرِدِ اللّٰهُ اَنۡ يُّطَهِّرَ قُلُوۡبَهُمۡ ؕ لَهُمۡ
فِى الدُّنۡيَا خِزۡىٌ ۖۚ وَّلَهُمۡ فِى الۡاٰخِرَةِ عَذَابٌ عَظِيۡمٌ ﴿۴۱﴾

४२. हे लोक खोटया गोष्टी कबूल करणारे आणि हरामाचा माल खाण्यात नि:संकोच आहेत [१३९] यास्तव जर हे तुमच्याजवळ आले, तर त्यांच्या दरम्यान फैसला करण्याचा किंवा उपेक्षा करण्याचा तुम्हाला अधिकार आहे [१४०] जर उपेक्षा कराल तर ते तुम्हाला काहीहि नुकसान पोहचवू शकत नाही आणि जर फैसला कराल तर न्यायाला धरून करा,[१४१] कारण अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंद करतो.

سَمّٰعُوۡنَ لِلۡكَذِبِ اَكّٰلُوۡنَ لِلسُّحۡتِ ؕ فَاِنۡ جَآءُوۡكَ فَاحۡكُمۡ
بَيۡنَهُمۡ اَوۡ اَعۡرِضۡ عَنۡهُمۡ ۚ وَاِنۡ تُعۡرِضۡ عَنۡهُمۡ فَلَنۡ يَّضُرُّوۡكَ
شَيۡـئًا ؕ وَاِنۡ حَكَمۡتَ فَاحۡكُمۡ بَيۡنَهُمۡ بِالۡقِسۡطِ ؕ اِنَّ اللّٰهَ يُحِبُّ
الۡمُقۡسِطِيۡنَ ﴿۴۲﴾

४३. हे तुम्हाला कशा प्रकारे आदेश दर्शावितात वस्तुत: यांच्या जवळ तौरात आहे ज्यात अल्लाहचा आदेश विद्यमान आहे तरीदेखील हे तोंड फिरवितात. वस्तुस्थिती अशी आहे की हे ईमानच बाळगत नाही.[१४२]

وَكَيۡفَ يُحَكِّمُوۡنَكَ وَعِنۡدَهُمُ التَّوۡرٰٮةُ فِيۡهَا حُكۡمُ اللّٰهِ
ثُمَّ يَتَوَلَّوۡنَ مِنۡۢ بَعۡدِ ذٰلِكَ ؕ وَمَاۤ اُولٰٓـئِكَ
بِالۡمُؤۡمِنِيۡنَ ﴿۴۳﴾

१३२. अर्थात् जे लोक या गोष्टीकरिता अटीतटीचा जोर लावत आहेत की इस्लाम सत्तेवर न यावा व न्याय धर्मशास्त्रानुसार प्रकरणांचा निर्णय न व्हावा. अशा लोकांची कृत्ये पाहून आवाहकास स्वाभाविकपणे दु:ख होते, परंतु यामुळे पराभूत मनाचे होता कामा नये.

१३३. अर्थात मुनाफ़ीक (दांभिक) लोक होत. विशेषत: ते मुनाफ़िक जे यहुदींशी मेळ-मिलाफ ठेवीत असत.

१३४. ही यहूदी समूहाची अवस्था वर्णन केली जात आहे की त्यांच्यात असे देखील लोक आहेत जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना येऊन भेटतात आणि काही असेहि आहेत जे पैगंबराना भेटत नाहीत. जे लोक पैगंबरांना येऊन भेटतात त्यांची अवस्था अशी आहे की ते सत्य शोधार्थ येत नाहीत,किंबहुना या उद्देश्याने येतात की जे काही ऐकावे त्यात असत्याचे मिश्रण करुन ते अशा लोकांपर्यंत पोहचावे जे पैगंबरांना येऊन भेटले नाहीत. एवढयासाठी की त्यांच्या मनात पैगंबरांविषयी तिरस्कार निर्माण केला जावा. तात्पर्य जे यहूदी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याजवळ येत होते. ते एक कुटील-कारस्थानाची बुद्धि घेऊन येत होते.

१३५.याचे स्पष्टीकरण वरील टीप क्र.७० मध्ये आले आहे.येथे याचा अर्थ हा देखील आहे की जेव्हा ते ईश-ग्रंथातहि फेरबदल करण्यापासून मागे हटत नाही तर त्यांच्याकरिता हे काय अवघड आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या वचनांना एकून त्यांचा चुकीचा अर्थ लावावा.

१३६. हा संकेत यहुदी विद्वानांकडे आहे. जे लोकांना असे म्हणत असत जो आदेश आम्ही तुम्हाला दर्शावितो, तोच जर इस्लामच्या पैग़ंबराने दिला तर क़बूल करा अन्यथा मान्य करु नका.

१३७. जे लोक बुद्धिपरस्पर स्वत:ला चुकीच्या मार्गावर टाकतात आणि आपल्या विवेक बुद्धिस मृत बनवितात त्यांच्यावर कसल्याही उपदेशाचा प्रभाव पडत नाही, अशा लोकांना जेव्हा अल्लाह कसोटीत टाकतो तर यापासून बोध घेण्याऐवजी ते बिघाडाकडे अधिकरित्या प्रवृत्त होतात. परिणामी त्यांच्या उत्पात व उपद्रवात वृद्धिच होते. अशा लोकांना सन्मार्गावर आणणे कोणाच्याहि सामर्थ्याचे नसते. सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हाच तो मार्गभ्रष्ट करण्याचा नियम ज्याला ''अल्लाहच उत्पात-ग्रस्त करु शकेल'' या अर्थाने घेतले गेले आहे.

१३८.अर्थात् जेव्हा ते अपराधांच्या घाणीने आपल्या हृदयांना माखलेले ठेवू इच्छितात तर सर्वश्रेष्ठ अल्लाह का म्हणून त्यांना स्वच्छ शुद्ध करील?

१३९. मूळ ग्रंथात ''सुहत سُحۡتٌ'' का शब्द वापरला गेला आहे, ज्याचा अर्थ ''हरामाची कमाई'' असा आहे. अरबी भाषेत याचा वापर अधिकतर लाच लुचपती करिता होतो. येथे संकेत प्रामुख्याने यहुदींच्या काजींकडे आहे जे लाच घेऊन व खोटी साक्ष मान्य करून सत्य व न्यायाविरूद्ध निकाल देते असत.

१४०. अर्थात हे लोक जर तुमच्या जवळ आपली प्रकरणे घेऊन येतील तर त्यांचा फैसला करण्याचा किंवा ही जबाबदारी मान्य करण्यास नकार दर्शविण्याचा तुम्हाला अधिकार आहे.

त्या वेळी मदीनेच्या चोहो बाजूला यहुदींच्या ज्या वस्त्या होत्या, त्या आपले वेगळे सत्ताक्षेत्र बाळगीत, म्हणून त्यांच्या परस्पर व्यवहारांचा फैसला करण्याची कसलीहि जबाबदारी मदीनेच्या इस्लामी शासनावर येतच नव्हती. परंतु यहुदी, ज्या भानगडींचा निकाल आपल्या धार्मिक कायद्यानुसार अर्थात तौरात नुसार करू इच्छित नसत, त्यांचा निर्णय पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) कडून या आशेने करु इच्छितात की कदाचित पैगंबराच्या धर्मशास्त्रात एखादा सोपा आदेश असावा.

१४१. जेथे न्यायाला धरुन फैसला करण्याचा अर्थ एका बाजूला असा आहे की प्रकरणाच्या कोणत्याहि पक्षाशी पक्षपात केला जाऊ नये किंवा त्यावर अतिरेक केला जाऊ नये, तिथेच त्याचा हा हि अर्थ आहे की न्याय्य शरीअतच्या कायद्यानुसार फैसले केले जावेत.

१४२. या आयतीत यहुदींच्या या हरकतीबद्दल आशचर्य व्यक्त केले गेले आहे की ते असे दावे घेऊन येतात ज्यांच्या संदर्भात तौरात मध्ये स्पष्ट आदेश आहे, या साठी की पैगंबरानी तौरातच्या आदेशाऐवजी अन्य एखादा निर्णय प्रस्तुत करावा. ते (अर्थात यहुदी) तौरातवर ईमान बाळगण्याचाहि दावा करतात आणि त्याच बरोबर त्याचा आदेशहि त्यांना मान्य नाही. तद्वतच हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ते पैगंबर मानायलाहि तयार नव्हते, त्याचबरोबर तौरातला सोडून पैगंबरातर्फे आपल्या दाव्याचा फैसला करण्याचीहि इच्छा बाळगत. यांची ही हरकत या गोष्टीचा पर्याप्त पुरावा आहे की त्यांचे कोणत्याहि गोष्टीवर ईमान नाही.

येथे हे जे फर्माविले गेले आहे की 'तौरातमध्ये अल्लाहचा आदेश विद्यमान आहे' तर याचा अर्थ ती शिक्षा होय जिचे स्पष्टीकरण पुढे आयत क्र. ४५ मध्ये केले गेले आहे. यावरुन त्या दाव्यांचे स्वरुपहि स्पष्ट होते, ज्यांना घेऊनयहुदी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जवळ येत असत. अर्थात हे दावे दण्ड-विधानाच्या स्वरुपाचे होते ज्यांच्या संबंधी तौरातमध्ये स्पष्ट आदेश आहेत. परंतु ते यापासून पलायनाचा मार्ग पत्करु इच्छित होते.

४४. आम्ही 'तौरात' अवतरीत केले ज्यात मार्गदर्शन व प्रकाश होता.[१४३] पैगंबर जे मुस्लिम होते[१४४] याच्यानुसार यहुदींच्या व्यवहारांचा फैसला करीत असत, तसेच विद्वान आणि फुकहा (धर्मशास्त्र वेत्ते) देखील.[१४५] कारण त्यांना ईश-ग्रंथाचे संरक्षक बनविले गेले होते. आणि ते यावर साक्षी होते.[१४६] तर पहा, लोकांचे भय बाळगू नका. माझे भय बाळगा आणि माझ्या आयतींना थोडया किंमतीवर विकू नका.[१४७] आणि जे लोक अल्लाहने अवतरीत केलेल्या शरीयत नुसार फैसला करीत नाही तेच काफिर आहेत.[१४८]

إِنَّآ أَنزَلْنَا ٱلتَّوْرَىٰةَ فِيهَا هُدًى وَنُورٌ ۚ يَحْكُمُ بِهَا
ٱلنَّبِيُّونَ ٱلَّذِينَ أَسْلَمُوا۟ لِلَّذِينَ هَادُوا۟ وَٱلرَّبَّـٰنِيُّونَ
وَٱلْأَحْبَارُ بِمَا ٱسْتُحْفِظُوا۟ مِن كِتَـٰبِ ٱللَّهِ وَكَانُوا۟
عَلَيْهِ شُهَدَآءَ ۚ فَلَا تَخْشَوُا۟ ٱلنَّاسَ وَٱخْشَوْنِ وَلَا تَشْتَرُوا۟
بِـَٔايَـٰتِى ثَمَنًا قَلِيلًا ۚ وَمَن لَّمْ يَحْكُم بِمَآ أَنزَلَ ٱللَّهُ
فَأُو۟لَـٰٓئِكَ هُمُ ٱلْكَـٰفِرُونَ ﴿٤٤﴾

४५. आणि आम्ही त्यांच्या करिता यात हा आदेश लिहून दिला होता की प्राणाचा बदला प्राण, डोळयाचा बदला, डोळा, नाकाचा बदला नाक, कानाचा बदला कान, दांताचा बदला दांत आणि सर्व जखमांकरिता किसास (बरोबरी) आहे.[१४९] मग जो माफ करील तर ते त्याच्या हक्कात कफ्फारा (पापे दूर करणारा) होय,[१५०] आणि जो अल्लाहने अवतरित केलेल्या शरीयतीनुसार फैसला करणार नाहीत तेच अत्याचारी[१५१] होत.

وَكَتَبْنَا عَلَيْهِمْ فِيهَآ أَنَّ ٱلنَّفْسَ بِٱلنَّفْسِ
وَٱلْعَيْنَ بِٱلْعَيْنِ وَٱلْأَنفَ بِٱلْأَنفِ وَٱلْأُذُنَ بِٱلْأُذُنِ
وَٱلسِّنَّ بِٱلسِّنِّ وَٱلْجُرُوحَ قِصَاصٌ ۚ فَمَن تَصَدَّقَ
بِهِۦ فَهُوَ كَفَّارَةٌ لَّهُۥ ۚ وَمَن لَّمْ يَحْكُم بِمَآ أَنزَلَ ٱللَّهُ
فَأُو۟لَـٰٓئِكَ هُمُ ٱلظَّـٰلِمُونَ ﴿٤٥﴾

४६. मग आम्ही या (पैगंबराच्या) पाठोपाठ यांच्याच पदचिन्हांवर मरीयमचा पुत्र ईसाला पाठविले.[१५२] तौरात मधील जे काही त्याच्या समोर विद्यमान होते तो त्याची सत्यता दर्शविणारा होता.[१५३] आणि आम्ही त्यास इंजील प्रदान केले ज्यात मार्गदर्शन व प्रकाश होता आणि तौरात मधून जे काही त्याच्या समोर हजर होते, त्याची सत्यता दर्शविणारे आणि ईश-भय बाळगणाऱ्यांकरिता पूर्णपणे मार्गदर्शन व उपदेश होते.

وَقَفَّيْنَا عَلَىٰٓ ءَاثَـٰرِهِم بِعِيسَى ٱبْنِ مَرْيَمَ مُصَدِّقًا لِّمَا بَيْنَ
يَدَيْهِ مِنَ ٱلتَّوْرَىٰةِ ۖ وَءَاتَيْنَـٰهُ ٱلْإِنجِيلَ فِيهِ هُدًى وَنُورٌ وَ
مُصَدِّقًا لِّمَا بَيْنَ يَدَيْهِ مِنَ ٱلتَّوْرَىٰةِ وَهُدًى وَمَوْعِظَةً
لِّلْمُتَّقِينَ ﴿٤٦﴾

४७. इंजिल बाळगणाऱ्यांनी त्यानुसार फैसला केला पाहिजे जे अल्लाहने त्यात अवतरीत केले आहे[१५४] आणि जे अल्लाहने अवतरित केलेल्या आदेशांनुसार फैसला करीत नाही तेच आज्ञा भंग करणारे होत.

وَلْيَحْكُمْ أَهْلُ ٱلْإِنجِيلِ بِمَآ أَنزَلَ ٱللَّهُ فِيهِ ۚ وَمَن لَّمْ يَحْكُم بِمَآ
أَنزَلَ ٱللَّهُ فَأُو۟لَـٰٓئِكَ هُمُ ٱلْفَـٰسِقُونَ ﴿٤٧﴾

१४३. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत मूसा यांच्यावर ग्रंथ अवतरित केला होता. त्यात सत्य धर्माच्या दिशेने मार्गदर्शनाची सामुग्रीहि होती आणि व्यक्तिगत व सामूहिक जीवनास मजबूत करण्याकरिता व त्यास सत्य आणि न्यायावर कायम करण्याकरिता प्रकाशमय शरीयत देखील होती. कुरआनाचे अवतरण होत असतांना मूळ तौरातचा जो हिस्सा यहुदी'जवळ उपस्थित होता त्यात हे वैशिष्टय आढळून येई. आणि आज बायबलच्या संग्रहात जे प्राथमिक पाच सहीफे (ग्रंथ) 'उत्पत्ति' 'निर्गम', 'लेविय' 'गणना' व 'अनुवाद' या नावांनी आढळतात यांच्यात मूळ तौरातचा जो अंश विद्यमान आहे आणि कुरआनाच्या कसोटीवर पारखल्यानेच मूळ तौरातच्या अंशाची ओळख पटते- यांच्यात आज देखील मार्गदर्शन व प्रकाशाची वैशिष्टये विद्यमान आहेत. कुरआनचा संकेत याच वस्तुस्थितीकडे आहे आणि याचा हा अर्थ मुळीच नव्हे की तौरात (जुणा करार) च्या नावाने आढळून येणारे उल्लिखित सहीफे सर्वच्या सर्व ईश मार्गदर्शनाने परिपूर्ण आहेत. कारण यहुदींनी फेरबदल करुन यांच्यात अनेक मार्गभ्रष्ट करणाऱ्या गोष्टी सामील केल्या आहेत आणि मूळ शरीयती वर वाढ देखील केली आहे.

१४४. अर्थात बनी इस्राईल मध्ये जेवढे पैगंबर ईश्वराकडून पाठविले गेले त्या सर्वांचा धर्म 'इस्लाम' होता आणि ते सर्व मुस्लिम होते. स्वत:ला यहुदी म्हणवणारे तर हे बनी इस्राईल होत, त्यांच्या दरम्यान पाठविले गेले पैगंबर नव्हेत.

१४५. अर्थात पैगंबर, तसेच सत्यनिष्ठ विद्वान व धर्मशास्त्र वेत्ते, अल्लाहच्या शरीयतीनुसार यहुदींच्या व्यवहारांचा व दाव्यांचा फैसला करीत असत.

१४६. म्हणजे त्यांना या गोष्टीस जबाबदार ठरवले गेले होते की त्यांनी अल्लाहच्या ग्रंथाची अशाप्रकारे रक्षा करावी की त्यात कोणत्याही प्रकारचा फेरबदल होता कामा नये. आणि त्यास आचरण-संहिता बनवून त्याच्या सत्यतेची साक्ष द्यावी.

१४७. अर्थात अल्लाहच्या आदेशांची अंमल बजावणी करण्यात ना एखाद्याचे भय बाळगले पाहिजे, ना कसलाहि लोभ. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.६४

१४८. या आयतीत स्पष्टपणे त्या लोकांना काफीर म्हटले गेले आहे जे ईश-विधिनुसार फैसला करीत नाहीत. जरी ही गोष्टी यहुदींच्या विद्रोही वर्तनावर अंकूश ठेवून फर्मावली गेली आहे तथापि गोष्ट तात्विक स्वरुपाची आहे म्हणून ही अशा त्या प्रत्येक माणसाला लागू पडते जो ईश नियमाविरुद्ध फैसला सादर करील. मग तो कोणत्याहि समूहाशी संबंधित असो, किंवा त्याची गणना मुसलमानांमध्ये का होईना, कारण न्यायालयाच्या आसनावर बसून ईश्वराच्या कायद्याला रद्द करणे त्या घटने (ग्रंथा) शी खुले बंड आहे, जी सर्व सृष्टीच्या सत्ताधिकाऱ्याने अवतरित केली आहे.

पैगंबरांचे सहवासात असलेले अनुयायी हजरत हुजैफा यांना एकाने विचारले की, काय हया आयती ज्यात अल्लाहच्या शरीयतीनुसार फैसला न करणाऱ्याना काफीर, अत्याचारी, व आज्ञाभंग करणारे म्हटले गेले आहे, बनी इस्राईलच्या संबंधी आहेत? त्यांनी तत्क्षणी उत्तर दिले किती चांगले बंधू आहेत तुमच्याकरिता बनी इस्राईल की सर्व कडू गोष्टी त्यांच्याकरिता आहेत व सर्व मधुर गोष्टी तुमच्या करिता आहेत. नव्हे, अल्लाह शपथ तुम्ही त्यांच्याच मार्गावर पावलो पावली चालाल.

(तफसीर इब्ने जरीर खंड-६ पृ. १६४)

लक्षात घ्यावे की शरीयतच्या कायद्या विरुद्ध फैसला करणाऱ्यांना या स्थितीत काफीर म्हटले गेले, जेव्हा शरीयतचे आदेश त्यांना स्पष्ट समजले होते आणि त्यांना लागू करण्याबाबतहि ते स्वतंत्र होते, दुसऱ्या शब्दात ही त्यांची विद्रोहपूर्वक विचारसरणी होती जिने त्यांना शरीयतच्या आदेशांकडे पाठ फिरवण्यास प्रवृत्त केले होते. यास्तव आज जे मुसलमान जाणून बूजून याच आचरण पद्धतीचा पाठपुरावा कीत आहेत ते सुद्दा यहुदींच्याच पदचिन्हांचे अनुसरण करीत आहे. परंतु त्यांना आम्ही काफीर एवढयासाठी म्हणु शकंत नाही की इस्लामने कलिमा पढणाऱ्या मुसलमानांना काफीर म्हणण्याबाबत मनाई केली आहे. आणि त्या लोकांच्या व्यवहारास ज्यांचे प्रात्यक्षिक जीवन इस्लाम आणि कुफ्र दोघांचे मिश्रण असते, ईश्वाच्या सुपूर्द करण्याची आज्ञा दिली आहे. कारण तोच नियतींची अवस्था जाणतो आणि तोच या गोष्टीबाबत जाणकार आहे की कोणाकरिता काय अडथळे आहेत.

१४९. तौरात मध्ये हा आदेश या प्रकारे उल्लिखित आहे: पण दुसरी काही इजा झाली तर जीवाबद्दल जीव, डोळयाबद्दल डोळा, दांताबद्दल दांत, हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय, डागण्याबद्दल डागणे, जखमेबद्दल जखम, फटक्याबद्दल फटका असा बदला द्यावा' (निर्गम २१ : २३ ते २५ )

परंतु यहुदींनी या आदेशाच्या अंमलबजावणी संदर्भात उच्च नीचतेचा भेदभाव निर्माण केला होता. यांच्या 'बनी नजीर' व 'बनी कुरैजा' या दोन कबिल्यांमध्ये 'बनी नजीर' उच्च समजले जात. जर बनी नजीरचा एखादा माणूस बनी कुरैजाच्या एखाद्या माणसाच्या हातून मारला जाई तर त्याला किसास अन्वये ठार केले जाऊ शकत नव्हते, किंबहुना त्याच्याकडून ठार झालेल्या व्यक्तिच्या वारसदारांना अपरिहार्यपणे दियत (प्रणाचे मूल्य) स्वीकारावे लागे आणि ते सुद्धा अर्ध्या प्रमाणात.

धर्मशास्त्र नियमांना लागू करण्यात त्यांनी जो फेरबदल केला होता त्यावर या सक्तीने पकड केली गेली आहे. कुरआनने तौरातच्या हवाल्याने जो कायदा वर्णन केला आहे तो इस्लामच्या

दण्डविधाना (Islamic Penal Laws) चे अत्यंत महत्वपूर्ण कलम आहे.सर्व जखमांबाबत समान बदला बाह्यत: अत्यंत कठोर शिक्षा आहे परंतु ही न्यायाची आत्यंतिक निकड आहे एवढेच नव्हे तर यामुळे अपराधींचा उत्साह मावळतो व समाजाला शांताता लाभते.

आजच्या काळात समानतेची घोषणा तर फार निनादत आहे परंतु जेव्हा अपराध व्यवहारांबाबत समानतेचे समर्थन करावयाचे म्हटल्यास, समानतेचे हे पुरस्कर्ते आग पाखडू लागतात.

लक्षात असावे की जखमांचा किसास (समान बदला) अशा स्थितीत घेतला जाईल जेव्हा तेवढयाच प्रमाणात जखमा (इजा) पोहचविणे शक्य असेल, परंतु असे करणे शक्य नसल्यास व अतिरेक होण्याची शक्यता असेल तर जखमी करणाऱ्यास दियत (जखमेचा मोबदला) अदा करावी लागेल, जी या जखमेच्या प्रमाणात निर्धारित केली जाईल.

१५०. अर्थात जो माणूस किसास माफ करील त्याच्या करिता हे सत्कृत्य अपराधांचे प्रायश्चित ठरेल.

१५१. अत्याचारी अशासाठी की ईश्वराच्या न्याय्य विधिनियमांना सोडून त्यांनी मानवाच्या स्वरचित कायद्यांनुसार फैसला केला. जे न्यायाच्या निकडी पूर्ण करु शकत नाही.

येथे ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घेतली पाहिजे की फैसला करण्याचा अर्थ केवळ न्यायासनावर बसून दाव्यांचा निकाल करणे एवढाच नाही किंबहुना कायदा बनवणे आणि शासन या नात्याने निर्णय प्रस्तुत करणे हे हि याच्या अर्थात सामील आहे. यास्तव जो कोणी शरीअतच्या कायद्यांविरुद्ध कायदे बनवितो किंवा जो सत्ताधिकारी आपल्या सासकिय अधिकारांचा अल्लाहच्या शरीयतीविरुद्ध वापर करतो तर तो कुफ्र, अत्याचार व आज्ञाभंग हे तिन्ही अपराध करणारा ठरतो मग त्याचे ते विधिनियम रिती रिवाजा (Customery Law) वर आधारीत असो वा धार्मिक प्रथा (Religious Mythology) वर, तसेच सांस्कृतिक पायावर आधारीत असो किंवा साम्यवादाच्या दृष्टीकोनावर.

१५२. अर्थात त्या प्रेषितांच्या पद चिन्हांवर, जे बनी इस्राईल मध्ये पाठविले गेले, मरीयमचे पुत्र ईसा यांना पाठविले.

हजरत ईसा यांना हजरत मूसा यांच्या नंतर सुमारे दीड हजार वर्षांनी पाठविले गेले होते.

१५३. हजरत ईसा यांनी 'तौरात' ची सत्यता दर्शविली होती. इंजिल मधील उल्लेखानुसार.

"नियमशास्त्र किंवा संदेष्टयांचे ग्रंथ रद्द करावयास मी आलो आहे असे समजू नका.मी रद्द करावयास नव्हे तर पूर्ण करावयास आलो आहे कारण मी तुम्हास खचित सांगतो आकाश व पृथ्वी ही नाहीशी होईपर्यंत सर्व काही पूर्ण झाल्याशिवाय नियम शास्त्रातील एकहि काना किंवा मात्रा रद्द होणार नाही. (मत्तय: ५ : १७-१८)

१५४. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहने इंजील याकरिता अवतरीत केले होते की लोकांनी आपल्या जीवन-व्यवहारात यास निर्णयाचा आधार ठरवावे. आणि इंजील बाळगणाऱ्यांनी जर इंजील ला अनुसरुन फैसला केला असता तर त्यांना निश्चितच कुरआन आढळले असते कारण येणाऱ्या पैगंबराची जी खबर इंजील मध्ये दिली गेली आहे, कुरआनद्वारे तिचे सत्यत्व सिद्ध होते. तसेच जर ईश्वराचा आवाज इंजील मध्ये ओळखला जाऊ शकतो तर. कुरआनात फार मोठ्या प्रमाणात ओळखला जाऊ शकतो कारण दोघोहि एका वीणेचे दोन स्वर आहे.

**आणि (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला आदेश दिला की जे काही अल्लाहने अवतरित केले आहे त्यानुसार या लोकांच्या दरम्यान फैसला करा आणि यांच्या इच्छा अभिलाषांचे अनुसरण करु नका तसेच सावध रहा की अल्लाह ने जे काही अवतरित केले आहे त्याच्या कोणत्याही आदेशापासून त्यांनी तुम्हाला परावृत्त न करावे मग जर हे तोंड फिरवतील तर जाणून असा की अल्लाहने निश्चय केला आहे की यांना यांच्या काही गुन्ह्यांची शिक्षा द्यावी. आणि वस्तुस्थिती ही आहे की या लोकांपैकी आधिकांश अवज्ञाकारी आहेत. *(अल-क़ुर्आन)***

४८. आणि (हे पैगंबर !) आम्ही तुमच्याकडे हा ग्रंथ पाठविला जो सत्य घेऊन आला आहे आणि (पूर्वीच्या) ग्रंथामधून [१५५] जे काही याच्यासमोर विद्यमान आहे त्याची सत्यता दर्शविणारा व त्याचा संरक्षक आहे.[१५६] यास्तव तुम्ही ईश्वराने अवतरित केलेल्या शरीयतीनुसार यांच्या दरम्यान फैसला करा आणि जे सत्य तुमच्याजवळ आले आहे त्याला सोडून त्यांच्या अभिलाषांचे अनुसरण करु नका.[१५७] आम्ही तुमच्यापैकी प्रत्येक (समूहा) करिता एक शरीयत आणि एक मिन्हाज (आचार-संहिता) निर्धारीत केली.[१५८] अल्लाहने इच्छिले असते तर तुम्हा सर्वांना एक जाती समूह बनविले असते परंतु त्याने इच्छिले की, जे काही त्याने तुम्हाल प्रदान केले आहे त्यात तुमची कसोटी घ्यावी.[१५९] यास्तव भलेपणाच्या कामात एकमेकाच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करा.[१६०] तुम्हा सर्वांना अल्लाहकडेच परतावयाचे आहे मग तो तुम्हाला दर्शवील की ज्या गोष्टीमध्ये तुम्ही मतभेद करीत राहिलात,त्यांची खरी वस्तुस्थिती काय होती.[१६१]

وَأَنزَلْنَآ إِلَيْكَ ٱلْكِتَٰبَ بِٱلْحَقِّ مُصَدِّقًا لِّمَا بَيْنَ يَدَيْهِ مِنَ
ٱلْكِتَٰبِ وَمُهَيْمِنًا عَلَيْهِ ۖ فَٱحْكُم بَيْنَهُم بِمَآ أَنزَلَ ٱللَّهُ ۖ
وَلَا تَتَّبِعْ أَهْوَآءَهُمْ عَمَّا جَآءَكَ مِنَ ٱلْحَقِّ ۚ لِكُلٍّ جَعَلْنَا
مِنكُمْ شِرْعَةً وَمِنْهَاجًا ۚ وَلَوْ شَآءَ ٱللَّهُ لَجَعَلَكُمْ أُمَّةً
وَٰحِدَةً وَلَٰكِن لِّيَبْلُوَكُمْ فِى مَآ ءَاتَىٰكُمْ ۖ فَٱسْتَبِقُوا۟
ٱلْخَيْرَٰتِ ۚ إِلَى ٱللَّهِ مَرْجِعُكُمْ جَمِيعًا
فَيُنَبِّئُكُم بِمَا كُنتُمْ فِيهِ تَخْتَلِفُونَ ﴿٤٨﴾

४९. आणि (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला आदेश दिला की जे काही अल्लाहने अवतरित केले आहे त्यानुसार या लोकांच्या दरम्यान फैसला करा आणि यांच्या इच्छा अभिलाषांचे अनुसरण करु नका तसेच सावध रहा की अल्लाह ने जे काही अवतरित केले आहे त्याच्या कोणत्याही आदेशापासून त्यांनी तुम्हाला परावृत्त न करावे [१६२] मग जर हे तोंड फिरवतील तर जाणून असा की अल्लाहने निश्चय केला आहे की यांना यांच्या काही गुन्ह्यांची शिक्षा द्यावी. आणि वस्तुस्थिती ही आहे की या लोकांपैकी आधिकांश अवज्ञाकारी आहेत.

وَأَنِ ٱحْكُم بَيْنَهُم بِمَآ أَنزَلَ ٱللَّهُ وَلَا تَتَّبِعْ أَهْوَآءَهُمْ
وَٱحْذَرْهُمْ أَن يَفْتِنُوكَ عَنۢ بَعْضِ مَآ أَنزَلَ ٱللَّهُ
إِلَيْكَ ۖ فَإِن تَوَلَّوْا۟ فَٱعْلَمْ أَنَّمَا يُرِيدُ ٱللَّهُ أَن يُصِيبَهُم
بِبَعْضِ ذُنُوبِهِمْ ۗ وَإِنَّ كَثِيرًا مِّنَ ٱلنَّاسِ
لَفَٰسِقُونَ ﴿٤٩﴾

५०. मग काय हे लोक अज्ञानाचा फैसला इच्छितात ? [१६३] जे लोक विश्वास बाळगणारे आहेत त्यांच्याकरिता अल्लाह पेक्षा अधिक चांगला फैसला कोणाचा असू शकतो?

أَفَحُكْمَ ٱلْجَٰهِلِيَّةِ يَبْغُونَ ۚ وَمَنْ أَحْسَنُ مِنَ ٱللَّهِ
حُكْمًا لِّقَوْمٍ يُوقِنُونَ ﴿٥٠﴾

१५५. अर्थात 'तौरात' होय.

१५६. क़ुरआनाचे तौरात चा संरक्षक असण्याचा अर्थ हा आहे की तौरातच्या मूळ शिकवणींना क़ुरआनने आपल्या अंगी आत्मसात केले आहे. आणि ते परिवर्तित झालेल्या तौरात करिता कसोटी आहे ज्यावर पारखून हे जाणून घेतले जाऊ शकते की कोणत्या गोष्टी मूळ तौरात मधील आहेत व कोणत्या गोष्टी यहुदींनी स्वत:गढलेल्या आहेत.

१५७. अर्थात ग्रंथ बाळगणाऱ्यांनी धर्मात जे मतभेद निर्माण केले आहेत त्यांच्या करिता हा ग्रंथ (कुरआन) निर्णायकाची योग्यता बाळगतो. यात अल्लाहचा धर्म त्या समस्त मिश्रणांपासून मुक्त करुन, जे ग्रंथ बाळगणाऱ्यांनी यात केले होते आपल्या मूळ स्वरुपात प्रस्तुत केला गेला आहे. यास्तव जीवनांच्या समस्त व्यवहार व समस्यांकरिता हाच ग्रंथ सत्य-स्तर आहे व सर्व दृष्टीकोन व दाव्यांमध्ये यालाच निर्णयाचा आधार बनविले पाहिजे.

१५८. शरीयत म्हणजे कर्तव्ये, आदेश, व विधिनियम आणि मिन्हाज (आचार संहिता) म्हणजे या कर्तव्यांना पार पाडण्याच्या पद्धति व या आदेश-विधिनियमांच्या अंमल बजावणीचे स्वरुप.

लक्षात असावे की जेथे शरीयत हा शब्द एकाकी वापरला जाईल तेव्हा तो दोन्हींच्या संग्रहास लागू पडतो.

विविध जाती समूहा करिता सर्वश्रेष्ठ अल्लाहने वेगवेगळया शरीयती व आचरणाचे वेगवेगळे मार्ग निर्धारीत केले होते. जी स्थिति व काळाची निकड होती. परंतु हा मतभेद मूळ धर्माचा मतभेद नव्हता, किंबहुना चाली रीतींचा मतभेद होता. मूळ धर्माच्या संबंधाने तो समस्त जाती समूहाकरिता एकच राहिला आहे. उदा. एकेश्वरवादाची श्रद्धा, आखिरत, प्रेषितत्व, एक अल्लाहची उपासना व आज्ञापालन व त्याच्या समोर जाब द्यावा लागेल ही कल्पना, आत्मशुद्धि आणि नैतिक व आचरणीय स्वच्छ-शुद्धतेचे नियम वगैरे. यासाठी शरीयती व मिन्हाजाच्या मतभेदास धर्माचा मतभेद गृहीत धरणे योग्य नाही. याला या उदाहरणा द्वारे समजले जाऊ शकते की सर्व प्रेषितांनी एकाच अल्लाहची उपासना करण्याचा आदेश दिला होता, परंतु जोपर्यंत साचा व त्याच्या तपशीलासंबंधाचा प्रश्न आहे ते भिन्न राहीले. उदा. कुर्बानी (बलीदान) ही केवळ अल्लाहकरिताच खास असण्यासंबंधी कसलाहि मतभेद नाही. राहिला हा तपशील की ती केव्हा केव्हा आवश्यक ठरते व याच्याकरिता कोणत्या प्रकारचे पशू अपेक्षित आहेत आणि त्यांना जबह केल्यानंतर काय केले जावे, तव्दतच नमाज़चे शिष्टाचार उदा. किबला वगैरेचा तर या गोष्टींमध्ये स्थिती काळाच्या दृष्टीने शरीयतीमध्ये फरक राहिला आहे.

१५९. जर अल्लाहने इच्छिले असते तर सर्वांना एकाच धर्मावर चालण्या करिता विवश केले असते परंतु ही गोष्ट त्या योजनेविरुद्ध झाली असती जिला समोर ठेवून त्याने माणसाला निर्माण केले आहे. अर्थात हे की मानवाची कसोटी घेतली जावी व त्यासाठी आवश्यक आहे की कसोटीचे प्रसंगहि निर्माण केले जावेत. शरीयतींचा हा मतभेद कसोटीचे प्रसंग निर्माण करतो. जे लोक धर्माच्या बाह्य चालीरीतींच्या दुषित पूर्वग्रहात घेरले जातात ते धर्माच्या मूळ वस्तुस्थितीस समजू शकत नाहीत आणि ईश- मार्गदर्शन जेव्हा यांच्यासमोर येते तेव्हा ते त्याच्याकडे तोंड फिरवितात. याउलट जे लोक सत्य-प्रिय असतात त्यांची दृष्टी मूळ धर्मावर असते आणि ईश-मार्गदर्शन ज्या काही स्वरुपात यांच्या समोर येते ते त्याकडे धाव घेतात. असेच ते लोक होते, ज्यांनी कुरआनचे मार्गदर्शन कबूल केले.

१६०.अर्थात जर हे लोक धार्मिक विवादात गुरफटू इच्छितात तर त्यांना त्यांच्या दशेवर सोडा आणि तुम्ही सदाचाराच्या मार्गात आगेकूच करा.

१६१. अर्थात अंतिम-निर्णय अल्लाहच्याच न्यायालयात होईल आणि त्या वेळी लोकांना कळून येईल की जे धार्मिक विवाद यांनी उभे केले होते त्यांची वस्तुस्थिती काय होती.

१६२. ही अधिक ताकीद आहे की विविध शक्ति-सामर्थ्ये तुम्हाला अल्लाहच्या ग्रंथापासून परावृत्त करण्याकरिता जो जोर लावीत आहेत आणि तुमच्या विरुद्ध जी कट-कारस्थाने रचित आहेत त्यापासून सावध रहा.

मोठया खेदाची गोष्ट आहे की ही चेतावणी दिली गेली असतानाहि मुसलमानांनी पाश्चिमात्य तत्वज्ञान, कायदा धर्महीन पद्धतिच्या शासनाने प्रभावित होऊन शरीअतचे विधिनियम व इस्लामी पद्धतिच्या शासनाचा त्याग केला आहे आणि जेथे यांना इतरांना सहभागी केल्याशिवाय सत्ताधिकार प्राप्त नाही तेथे ते ग़ैरइस्लामी आदेश व विधिनियमांपासून उद्विग्नता व्यक्त करण्याऐवजी त्यांचे समर्थन करु लागतात, ही स्थिती ज्याप्रमाणे या आयतींद्वारे व्यक्त होत आहे सत्याच्या साक्षी विरुद्ध आहे इतकेच नव्हे तर मूल ईमान करिताच धोकादायक आहे.

१६३. अज्ञानाची परिभाषा इस्लामच्या तुलनेने वापरली जाते आणि येथे अज्ञानाच्या फैसल्याचा अर्थ ते आदेश, विधिनियम व प्रथा होत ज्यांना अल्लाहच्या शरीयतीच्या स्पर्धेत लोकांनी प्रचलीत केले आहे यांचा अज्ञान हा अर्थ घेण्याचे कारण हे आहे की, बाह्यत: यांच्यात समाज-हित दिसत असले तरी ते सत्य ज्ञानावर आधारीत नाहीत, किंबहुना अज्ञान आणि भावना विवशतेवर आधारीत आहेत.

हे अज्ञान (जाहिलिय्यत) केवळ त्या काळापुरतेच नाही जो इस्लाम पूर्वी होता तथापि त्यानंतरच्या काळातहि ते राहिले

आहे. आणि आजच्या विविध ज्ञान व कला असलेल्या युगातहि याचा अंध:कार पूर्णपणे आच्छादित आहे.

अल्लामा इब्ने कसीर आपल्या काळा (१४०० इ. शतका) च्या अज्ञानाचे उदाहरण देताना लिहितात:

''आणि ज्या प्रकारे तातारी की आपल्या शाहि फर्मानांचा राजकारणाद्वारे फैसला करतात जो त्यांचे बादशहा चंगेजखानच्या आदेशापासून घेतलेले आहेत. आणि ज्यांना त्याने अल-यासिक' या नावाने रचले होते. हे वस्तुत: त्या ग्रंथाचे नाव आहे जो आदेशांचा संग्रह आहे, ज्यांना त्याने विभिन्न शरीयतीमधून उदा. यहुदी मत, ख्रिश्चनमत, इस्लाम धर्म वगैरेतून वेचले होते. आणि यात असंख्य आदेश असे आहेत जे एकाकी त्याचे मत व आत्मशलाघेवर आधारीत आहेत, अशा प्रकारे हा संग्रह एक स्वरचित शरीयत बनली आहे ज्यानुसार आचरण केले जाते आणि त्यास कुरआन व सुन्नाह यांच्या निर्णयांवर प्राधान्य दिले जाते.

तेव्हा जो कोणी असे करील तो काफ़ीर व शिरच्छेद करण्याच्या योग्यतेचा आहे येथपावेतो की तो अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या फैसल्याकडे रूजू करीत नाही व कोणत्याही व्यवहारात मग तो लहान असो वा मोठा याला सोडून निर्णय घेत नाही.

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! यहुदी आणि ख्रिश्चनांना आपले मित्र बनवू नका. ते आपसात एकमेकाचे मित्र आहेत, आणि तुमच्यापैकी जो माणूस यांना मित्र बनवील तर त्याची गणना यांच्यातच होईल.अल्लाह त्या लोकांना मार्ग प्राप्त करीत नाहीं जे अत्याचार करणारे असतात.*(अल-कुरआन)***

५१. हे ईमान बाळगणाऱ्यांनो !यहुदी आणि ख्रिश्चनांना आपले मित्र बनवू नका. ते आपसात एकमेकाचे मित्र आहेत, आणि तुमच्यापैकी जो माणूस यांना मित्र बनवील तर त्याची गणना यांच्यातच होईल.[१६४] अल्लाह त्या लोकांना मार्ग प्राप्त करीत नाही जे अत्याचार करणारे असतात.

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ لَا تَتَّخِذُوا۟ ٱلْيَهُودَ وَٱلنَّصَٰرَىٰٓ أَوْلِيَآءَ
بَعْضُهُمْ أَوْلِيَآءُ بَعْضٍ ۚ وَمَن يَتَوَلَّهُم مِّنكُمْ فَإِنَّهُۥ مِنْهُمْ ۗ
إِنَّ ٱللَّهَ لَا يَهْدِى ٱلْقَوْمَ ٱلظَّٰلِمِينَ ﴿٥١﴾

५२. तुम्ही पाहता की ज्यांच्या मनात रोग आहे [१६५] ते त्यांच्याच दरम्यान धावपळ करीत आहेत. ते म्हणतात की, आम्हाला हे भय आहे की आम्ही एखाद्या संकटात न पडावे [१६६] परंतु नवळ नाही की अल्लाहने विजय किंवा आपल्या तर्फे अन्य एखादी गोष्ट जाहीर करावी आणि याना त्या गोष्टीवर, जिला ते आपल्या अंत:करणात लपवून आहेत, लज्जित व्हावे लागावे.[१६७]

فَتَرَى ٱلَّذِينَ فِى قُلُوبِهِم مَّرَضٌ يُسَٰرِعُونَ فِيهِمْ
يَقُولُونَ نَخْشَىٰٓ أَن تُصِيبَنَا دَآئِرَةٌ ۚ فَعَسَى ٱللَّهُ أَن يَأْتِىَ
بِٱلْفَتْحِ أَوْ أَمْرٍ مِّنْ عِندِهِۦ فَيُصْبِحُوا۟ عَلَىٰ مَآ أَسَرُّوا۟
فِىٓ أَنفُسِهِمْ نَٰدِمِينَ ﴿٥٢﴾

५३. त्या वेळी ईमान बाळगणारे म्हणतील की काय हे तेच लोक आहेत जे अल्लाहची दृढ अति दृढ शपथ घेऊन म्हणत असत की आम्ही तुमच्यासह आहोत-यांची कर्मे वाया गेलीत.[१६८] आणि ते नष्ट झाले.

وَيَقُولُ ٱلَّذِينَ ءَامَنُوٓا۟ أَهَٰٓؤُلَآءِ ٱلَّذِينَ أَقْسَمُوا۟ بِٱللَّهِ
جَهْدَ أَيْمَٰنِهِمْ ۙ
إِنَّهُمْ لَمَعَكُمْ ۚ حَبِطَتْ أَعْمَٰلُهُمْ فَأَصْبَحُوا۟ خَٰسِرِينَ ﴿٥٣﴾

५४. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुमच्यापैकी जो कोणी आपल्या धर्मापासून परावृत्त होईल तर (तो अल्लाहचे काहीहि नुकसान करु शकणार नाही) अल्लाह अशा लोकांना घेऊन येईल, ज्यांच्याशी अल्लाह प्रेमभाव बाळगत असेल आणि जे अल्लाहशी प्रेमभाव बाळगत असतील. ईमान बाळगणाऱ्यांकरिता ते कोमल आणि काफीरांच्या विरोधात कठोर असतील. अल्लाहच्या मार्गात जिहाद करतील आणि एखाद्या निंदा करणाऱ्याच्या निंदा पासून भय बाळगणार नाहीत.[१६९] हा अल्लाहचा अनुग्रह आहे ज्याला इच्छिल प्रदान करील.आणि अल्लाह मोठी व्यापकता बाळगणारा [१७०] आणि सर्व काही जाणणारा आहे.

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ مَن يَرْتَدَّ مِنكُمْ عَن دِينِهِۦ فَسَوْفَ يَأْتِى
ٱللَّهُ بِقَوْمٍ يُحِبُّهُمْ وَيُحِبُّونَهُۥٓ أَذِلَّةٍ عَلَى ٱلْمُؤْمِنِينَ أَعِزَّةٍ
عَلَى ٱلْكَٰفِرِينَ يُجَٰهِدُونَ فِى سَبِيلِ ٱللَّهِ وَلَا يَخَافُونَ
لَوْمَةَ لَآئِمٍ ۚ ذَٰلِكَ فَضْلُ ٱللَّهِ يُؤْتِيهِ مَن يَشَآءُ ۚ وَٱللَّهُ
وَٰسِعٌ عَلِيمٌ ﴿٥٤﴾

५५. तुमचा मित्र तर, खरे पाहता अल्लाह आहे, त्याचा पैगंबर आहे आणि ते ईमान बाळगणारे [१७१] जे नमाज़ कायम करतात, ज़कात देतात, आणि अल्लाहपुढे नतमस्तक झालेले आहेत.[१७२]

إِنَّمَا وَلِيُّكُمُ ٱللَّهُ وَرَسُولُهُۥ وَٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ ٱلَّذِينَ يُقِيمُونَ
ٱلصَّلَوٰةَ وَيُؤْتُونَ ٱلزَّكَوٰةَ وَهُمْ رَٰكِعُونَ ﴿٥٥﴾

१६४. मुसलमानांमध्ये काही लोक असेहि होते जे आपल्या ईमानाबाबतीत खरे नव्हते म्हणून ते आपल्या व्यक्तिगत लाभांना डोळयासमोर ठेवून यहुदींशी मैत्रीसंबंध राखीत. खरे पाहिले असता या गोष्टीची मनाई यापूर्वीच केली गेली होती (सूरह आले इमरान, आयत क्र. २८) येथे पुन्हा या संबंधी ताकीद करीत सावध केले गेले आहे की ईमान आणि इस्लामच्या शत्रूंशी मैत्री या दोन गोष्टींचा मेळ बसू शकत नाही. यास्तव जे लोक यांच्याकडे आकृष्ट होतील त्यांची गणना त्याच लोकांमध्ये होईल.

लक्षात असावे की यहुदी व ख्रिश्चन तसेच काफीरांशी मैत्री न राखण्याची जी ताकीद कुरआनात दिली गेली आहे ती एक तर या अर्थाने आहे की यांच्यासह अंत: करणीय प्रेमसंबंध नसावा कारण ईश्वराच्या विद्रोह्यांशी व पैगंबरांच्या विरोधकांशी आंतरिक लगाव ईमानाच्या विपरित आहे. दुसरे या अर्थाने की माणसाने इस्लाम व मुसलमानांच्या धार्मिक व राजकिय दूरदर्शितेच्या गोष्टी व लाभांना दृष्टीआड करुन काफीरांच्या कोणत्याही समूहाशी वा त्यांच्या काही जणांशी स्वार्थीपणाने किंवा अयोग्य लाभांकरिता मैत्री न जोडावी. या आयतींच्या अवतरण काळातील राजकिय-स्थितीची ही निकड होती की मुसलमानांनी इस्लामेतर तत्वांशी संबंध निर्माण करतांना सावधगिरी बाळगावी, अशासाठी की त्यांना युद्धविषयक गुप्त गोष्टी जाहीर होता कामा नये. तसेच जर यांच्या एखाद्या समूहा विरुद्ध एखादी कारवाई करावी लागते तर यात एखाद्या करिता त्याची व्यक्तिगत मैत्री आड येऊ नये, किंबहुना त्याने त्या सर्व मैत्री संबंधापासून उच्चतर होऊन अल्लाह आणि त्याच्या पैगंबराशी एकनिष्ठ असल्याचा पुरावा द्यावा.

राहिली सर्वसामान्य स्थितीत मुस्लिमेतरांशी मानवीय नात्याने मैत्री तर तिला प्रतिबंध घातला गेला नाही. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान, टीप क्र. ४१

१६५. अर्थात दांभिकतेचा रोग.

१६६. मुनाफीका (दांभिका) ना ही भिती जाणवत होती की जर अंतिम विजय इस्लामच्या विरोधकांचा झाला तर मग आमचे काहीहि भविष्य असणार नाही. म्हणून ते उघडपणे व एकनिष्ठतेने इस्लामची साथ देत नव्हते. त्यांच्या दृष्टीने बऱ्या वाईटाचा विचार हा होता की त्यांनी मुसलमानांच्या जमातीतहि राहवे आणि इस्लामविरोधक जाती समूहांबरोबर स्नेहसंबंधहि कायम राखावेत.

१६७. अर्थात मुसलमानांना अंतिम विजयाने उपकृत करावे किंवा या आधी एखादी अशी घटना उदयास आणावी जी मुनाफीक लोकांकरिता अवहेलनेचे कारण ठरावे.

१६८. आचरणांची स्वीकृति निर्भेळ अशा ईमान वर अवलंबून आहे. दांभिकते सोबतच धार्मिकतेचे जे प्रदर्शन केले गेले आहे ते अल्लाहच्या नजरेत अगदी निरर्थक आहे. यास्तव अशा लोकांची ती समस्त आचरणे ज्यावर धार्मिकतेचे प्रदर्शनी लेबल लागलेले असावे अगदीच वाया जाणारी आहेत.

१६९. येथे स्पष्ट करण्याचा हा हेतु आहे की धर्माच्या प्रयत्नासाठी स्वार्थी व मुनाफीक स्वरुपाचे लोक अगदी बेकार आहेत. या उच्च ध्येयाकरिता ज्या गुणांनी युक्त असे लोक अपेक्षित आहेत ते अशा आणि अशाप्रकारचे होत.

मुनाफीकांना इहलोकाविषयी आसक्ति होती तेव्हा उघड आहे की अशा लोकांना आपली दुनिया बनविण्यापासून सवडच कोठे असू शकते की त्यांनी धर्म-सेवा करु लागावे धर्मशत्रूंकरिता आपल्या हृदयात ते कोमल भाव बाळगत मग त्यांच्यात हा उत्साह कसा असू शकतो की रणक्षेत्रात त्यांच्याविरुद्ध सज्ज व्हावे ते आत्मास्तुतिचे भुकेले होते. तेव्हा त्यांच्यात निर्भिड सत्यता कशी असू शकते कि ज्यामुळे सत्य आणि न्यायाचा मार्ग पत्करल्याने जगाच्या निंदेची पर्वा न करावी.

आयतीत प्रमाणितरित्या जी गुणवैशिष्टये वर्णिली गेली आहेत त्यात सत्यमार्गाच्या सैनिकांकरिता प्रशिक्षणाची भरपूर सामुग्री आहे.

१७०. संकेत आहे या गोष्टीकडे की तो आपल्या कृपेने उपकृत करण्यात संकुचितता दर्शावित नाही किंबहुना आपल्या दासांशी अत्यंत व्यापक वृत्तीने व्यवहार करतो.

१७१. अर्थात तुमच्या मैत्रीस ते लोक योग्य नाहीत जे ईश्वराचे एकनिष्ठ दास नाहीत. किंबहुना त्याच्या मैत्रीस पात्र केवळ अल्लाह, त्याचा पैगंबर व त्याचे एकनिष्ठ दास आहेत, त्यांना तुम्ही आपला विश्वस्त बनवा.

१७२. ''अल्लाहपुढे नतमस्तक झालेले आहेत.'' हे नमाज व ज़कात या दोन्हींचे तथ्य वर्णिले गेले आहे की हे निस्वार्थ मनाचे मोमिन (ईमान बाळगणारे) अशा प्रकारे नमाज़चा इतमाम करतात की त्यांच्या हृदयात लीन अवस्था असते. आणि जेव्हा ज़कात अदा करतात तेव्हा देखील यांची अंत: करणे ईश्वरापुढे झुकलेली असतात, परंतु मुनाफीक लोकांची दशा याच्या उलट असते. त्यांची नमाज़ व ज़कात सर्व काही लोकांना दाखविण्याकरिता असते, त्यांची अंत:करणे ईश्वरापुढे झुकलेली नसतात आणि जेव्हा हृदय झुकलेले नसेल तर शिर झुकवून काय लाभ?

**५६. आणि जो अल्लाह, त्याचा पैगंबर व ईमान बाळगणाऱ्यांना मित्र बनवील तर (तो अल्लाहच्या पक्षाचा आहे.) अल्लाहचाच पक्ष आहे जो प्रभावशाली होऊन राहील.**

وَمَن يَتَوَلَّ اللَّهَ وَرَسُولَهُ وَالَّذِينَ آمَنُوا فَإِنَّ حِزْبَ
اللَّهِ هُمُ الْغَالِبُونَ ﴿٥٦﴾

**५७. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! ज्या लोकांना तुमच्या पूर्वी ग्रंथ दिला गेला होता त्यापैकी ज्यांनी तुमच्या धर्माला हशी खेळ बनवून ठेवले आहे त्यांना तसेच इतर काफ़ीरांना आपला मित्र बनवू नका.[१७३] आणि जर तुम्ही ईमान बाळगणारे असाल तर अल्लाहचे भय बाळगा.**

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَتَّخِذُوا الَّذِينَ اتَّخَذُوا دِينَكُمْ
هُزُوًا وَلَعِبًا مِّنَ الَّذِينَ أُوتُوا الْكِتَابَ مِن قَبْلِكُمْ
وَالْكُفَّارَ أَوْلِيَاءَ ۚ وَاتَّقُوا اللَّهَ إِن كُنتُم مُّؤْمِنِينَ ﴿٥٧﴾

**५८. जेव्हा तुम्ही नमाज़ करिता पुकारीत असता तेव्हा हे त्यास थट्टा व खेळ बनवितात हे यासाठी की हे लोक निर्बुद्ध आहेत.[१७४]**

وَإِذَا نَادَيْتُمْ إِلَى الصَّلَاةِ اتَّخَذُوهَا
هُزُوًا وَلَعِبًا ۚ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَوْمٌ لَّا يَعْقِلُونَ ﴿٥٨﴾

**५९. सांगा, हे ग्रंथ बाळगणाऱ्यांनो ! तुमचे आम्हावर क्रोधित होण्याचे कारण याखेरीज आणखी कोणते आहे की आम्ही अल्लाहवर ईमान बाळगले आहे आणि जे मार्गादर्शन आमच्याकडे पाठविले गेले आणि जे यापूर्वी अवतरित झाले होते त्यावरहि ईमान बाळगतो आणि हे की तुमच्यापैकी बहुतेक लोक अवज्ञाकारी आहेत.[१७५]**

قُلْ يَا أَهْلَ الْكِتَابِ هَلْ تَنقِمُونَ مِنَّا إِلَّا أَنْ آمَنَّا بِاللَّهِ
وَمَا أُنزِلَ إِلَيْنَا وَمَا أُنزِلَ مِن قَبْلُ وَأَنَّ أَكْثَرَكُمْ
فَاسِقُونَ ﴿٥٩﴾

**६०. सांगा, काय मी तुमच्या निदर्शनास आणू की अल्लाहजवळ याहूनहि अधिक वाईट परिणिती कोणाची झाली ?[१७६] ते ज्यांचा अल्लाहने धिक्कार केला.[१७७] ज्यांच्यावर त्याच्या प्रकोप झाला[१७८] आणि ज्यांच्यापैकी काहींना त्याने माकड व डुक्कर बनविले.[१७९] आणि ते ज्यांनी तागूत (विद्रोही) ची भक्ति केली[१८०] हेच ते लोक ज्यांचा दर्जा सर्वाहून कनिष्ठ आहे आणि ते सरळ मार्गापासून अगदी भटकलेले आहेत.**

قُلْ هَلْ أُنَبِّئُكُم بِشَرٍّ مِّن ذَٰلِكَ مَثُوبَةً عِندَ اللَّهِ ۚ مَن لَّعَنَهُ
اللَّهُ وَغَضِبَ عَلَيْهِ وَجَعَلَ مِنْهُمُ الْقِرَدَةَ وَالْخَنَازِيرَ
وَعَبَدَ الطَّاغُوتَ ۚ أُولَٰئِكَ شَرٌّ مَّكَانًا وَأَضَلُّ عَن سَوَاءِ
السَّبِيلِ ﴿٦٠﴾

**६१. जेव्हा हे लोक तुमच्या जवळ येतात तेव्हा असे म्हणतात, आम्ही ईमान बाळगले, वस्तुतः ते कुफ्र घेऊन आले होते व कुफ्र (सत्याचा इन्कार) घेऊनच परत गेले आणि जे काही हे आपल्या मनांत लपवित आहेत ते अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो.**

وَإِذَا جَاءُوكُمْ قَالُوا آمَنَّا وَقَد دَّخَلُوا بِالْكُفْرِ وَهُمْ
قَدْ خَرَجُوا بِهِ ۚ وَاللَّهُ أَعْلَمُ بِمَا كَانُوا يَكْتُمُونَ ﴿٦١﴾

१७३. अर्थात अशा लोकांना मित्र बनविणे जे इस्लामची थट्टा उडवितात ईमान प्रतिष्ठेच्या प्रतिकूल आहे.

१७४. अर्थात 'अज़ान'ची थट्टा उडवितात अज़ान अल्लाहच्या उपासनेचे एक प्रतिक आहे. आणि या गोष्टीचे आवाहन होय की अल्लाहच्या उपासने करिता या अशा गोष्टीला खेळ तमाशा बनविणे कोणत्याही योग्य व्यक्तिचे काम असू शकत नाही. हे कृत्य तोच करु शकतो ज्याची बुद्धि भ्रष्ट झाली असावी.

१७५. म्हणजे तुम्ही केवळ या कारणास्तव आमच्यावर राग काढीत आहात की आम्ही त्या प्रत्येक सच्चाई वर ईमान बाळगले आहे जी अल्लाहकडून अवतरित झाली आहे, मग ते पूर्वीचे ईश-ग्रंथ असोत वा कुरआन असो. याखेरीज जर आमचा काही अपराध असेल तर दाखवा. आणि जर ही गोष्ट तुमच्या मनाला खटकते तर याचा अर्थ या खेरीज दुसरा नाही की तुम्ही अल्लाहच्या अवज्ञाकारीतेस सज्ज झाला आहात अन्यथा कोणताही ईमान बाळगणारा माणूस सत्य मार्ग अंगिकारणाऱ्यांशी हे वर्तन पत्करु शकत नाही.

१७६. अर्थात तुम्ही इस्लामशी असलेल्या वैरामुळे आमच्या करिता ज्या परिणितीची वाट पाहत आहात, त्याहून वाईट परिणितीच्या उदाहरणांनी तर तुमच्या स्वत:च्या इतिहासाची पृष्ठे भरलेली आहेत आणि तुम्ही स्वत:देखील त्याच वळणावर चालत आहात. यास्तव इतरांच्या दुष्परिणितीची प्रतिक्षा करण्याऐवजी आपल्या परिणितीचा विचार करा.

१७७. बायबलमध्ये या धि:क्काराचा उल्लेख अनेक ठिकाणी मिळतो. उदा:-

''तु त्यास सांग, परमेश्वर इस्त्राएलचा देव म्हणतो, या कराराची वचने जो ऐकत नाही तो शापित आहे ........ अन्य देवांची सेवा करण्यास ते त्यांच्यामागे लागले आहेत. इस्त्राएलाचे घराणे व यहुदाचे घराणे यांनी, त्यांच्या पूर्वजांशी मी केलेला करार मोडिला आहे यास्तव परमेश्वर म्हणतो पाहा मी त्याजवर अरिष्ट आणतो त्यातून त्यांचा निभाव लागणार नाही ते मला आरोळी मारतील तरी मी त्यांचे ऐकणार नाही. (यिर्मया प्रकरण-११)

१७८. बायबलचे पुस्तक-यिर्मयामध्ये हा उल्लेख आहे!

''सेनाधीश परमेश्वर, इस्त्राएलचा देव म्हणतो मी यरुशलेमवर व यहुदाच्या सर्व नगरावर जे आरिष्ट आणले ते सर्व प्रत्यक्ष पाहिले आहे पाहा आज ती उजाड व निर्जन झाली आहेत. त्यांनी जाऊन धूप जाळला व त्यांस तुम्हास व तुमच्या वडिलांसहि अज्ञात असलेल्या अशा अन्य देवांची सेवा त्यांनी केली ......ह्यामुळे माझा संताप व क्रोध याचा वर्षाव झाला. (यिर्मया-प्रकरण ४४)

१७९. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना लाचार मनुष्य बनविले होते. आणि त्यांच्या नैतिक व अध्यात्मिक उत्कर्षासाठी मार्गदर्शनाची सामुग्रीहि केली होती. परंतु जेव्हा त्यांनी आपल्या या स्थानाची नाकदरी केली व माणुसकीच्या दर्जापासून स्वत:ला खाली आणू इच्छिले तेव्हा मग सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या प्रतिष्ठेस अवहेलनेत परिवर्तित केले आणि त्यांना माकड व डुक्कर बनवुन एक बोध घेण्याजोगे उदाहरण कायम केले.

ही एक दु:खदायक घटना आहे जी यहुदींच्या एका समूहावर त्याच्या बंडखोरीच्या परिणामी घडली होती, राहीला हा प्रश्न की माणसांना माकड व डूक्कर कशा प्रकारे बनविले गेले तर याकरिता कसल्याहि स्पष्टीकरणाची गरज नाही. कारण जो ईश्वर माणसाला माणसाचे रुप प्रदान करु शकतो तो त्याचा चेहरा विकृतहि करु शकतो, म्हणून अल्लाहच्या धर्माला विकृत करणाऱ्यांचे चेहरे विकृत होऊन माकड आणि डुकरांसारखे झाले असतील तर यात आशर्च्य ते काय?

१८०. मूळ शब्द 'तागूत' यास अभिप्रेत खोडसाळ व विद्रोही लोक होत आणि भक्तिशी अभिप्रेत यांचे अंधानुकरण व पाप कर्माबाबत त्यांचे आज्ञापालन होय. इबादत (भक्ति) हा शब्द आज्ञापालन असा अतिशयोक्तिच्या अर्थाने वापरला गेला आहे. इमाम राज़ी 'तागूत' चे भाष्य करतांना लिहीतात :

''एक निवेदन असे आहे की तागूत' म्हणजे ते वासरु होय ज्याची पूजा केली गेली आणि दुसरे निवेदन असे की याचा. अर्थ अहबार म्हणजे यहुदी धर्मशास्त्रवेत्ते होत आणि तो प्रत्येक मनुष्य ज्याने अल्लाहची अवज्ञा करण्यात एखाद्याचे आज्ञापालन केले त्याने खरे पाहता त्याची भक्ति केली.''

(अल् तफसीर अल् कबीर खंड-१२ पृ. ३७)

आयतीत जे सांगितले गेले आहे त्याचा उद्देश हा आहे की अल्लाहचे आज्ञापालन करण्याऐवजी त्याच्या बंडखोर दासांचे आज्ञापालन करणे, जणू त्यांची भक्ति केल्यासारखेच आहे. आणि ही फार मोठी अवहेलना आहे जी एखाद्याचा वाटयाला यावी-यहुदींचा इतिहास साक्षी आहे की ही अवहेलना त्यांच्या वाटयाला आली.

६२. तुम्हाला असे दिसून येईल की यांच्यापैकी अधिकांश लोक गुन्हा, अतिरेक, व हरामाचा माल खाण्यात शीघ्र गतीचे आहेत. फार वाईट कामे आहेत जी हे करीत आहेत.

وَتَرٰى كَثِيْرًا مِّنْهُمْ يُسَارِعُوْنَ فِى الْاِثْمِ وَالْعُدْوَانِ
وَاَكْلِهِمُ السُّحْتَ ۭ لَبِئْسَ مَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿٦٢﴾

६३. यांचे विद्वान आणि धर्मशास्त्रवेत्ते यांना गुन्ह्याची गोष्ट करण्यापासून व हराम खाण्यापासून का रोखत नाही?[१८१] फार वाईट कृत्य आहे जे हे करित आहेत.

لَوْلَا يَنْهٰىهُمُ الرَّبّٰنِيُّوْنَ وَالْاَحْبَارُ عَنْ قَوْلِهِمُ
الْاِثْمَ وَاَكْلِهِمُ السُّحْتَ ۭ لَبِئْسَ مَا كَانُوْا يَصْنَعُوْنَ ﴿٦٣﴾

६४. आणि यहुदी असे म्हणतात की अल्लाहचा हात बांधला गेला आहे [१८२] ----बांधले गेले त्यांचे हात आणि धिक्कार झाला त्यांचा या कारणास्तव की त्यांनी अशी गोष्ट सांगितली.[१८३] ---- त्याचे तर दोन्ही हात मोकळे आहेत.[१८४] ज्याप्रकारे इच्छितो खर्च करतो [१८५] वस्तुत: तुमच्या पालनकर्त्याकडून जी गोष्ट तुमच्यावर अवतरित झाली आहे ती यांच्यापैकी बहुतेक लोकांच्या विद्रोह व कुफ्र मध्ये वृद्धि होण्यास कारक झाली आहे.[१८६] आणि आम्ही यांच्या दरम्यान वैर व तिरस्कार कियामतीपर्यंत टाकून दिले आहे.[१८७] जेव्हा जेव्हा हे युद्धाची आग भडकवितात अल्लाह तिला विझवून टाकतो.[१८८] हे जमीनीवर उपद्रव माजविण्याचा प्रयत्न करतात आणि अल्लाह उपद्रवींना पसंत करीत नाही.

وَقَالَتِ الْيَهُوْدُ يَدُ اللّٰهِ مَغْلُوْلَةٌ ۭ غُلَّتْ اَيْدِيْهِمْ وَلُعِنُوْا بِمَا
قَالُوْا ۘ بَلْ يَدٰهُ مَبْسُوْطَتٰنِ ۙ يُنْفِقُ كَيْفَ يَشَاۗءُ ۭ وَلَيَزِيْدَنَّ كَثِيْرًا
مِّنْهُمْ مَّآ اُنْزِلَ اِلَيْكَ مِنْ رَّبِّكَ طُغْيَانًا وَّكُفْرًا ۭ وَاَلْقَيْنَا بَيْنَهُمُ
الْعَدَاوَةَ وَالْبَغْضَاۗءَ اِلٰى يَوْمِ الْقِيٰمَةِ ۭ كُلَّمَآ اَوْقَدُوْا نَارًا
لِّلْحَرْبِ اَطْفَاَهَا اللّٰهُ ۙ وَيَسْعَوْنَ فِى الْاَرْضِ فَسَادًا ۭ وَاللّٰهُ لَا
يُحِبُّ الْمُفْسِدِيْنَ ﴿٦٤﴾

६५. आणि जर ग्रंथ बाळगणाऱ्यांनी ईमान बाळगले असते व ईश-भय पत्करले असते तर आम्ही त्यांच्या अपराधांना दूर सारले असते आणि त्यांना देणग्यांनी युक्त अशा बागांमध्ये दाखल केले असते.[१८९]

وَلَوْ اَنَّ اَهْلَ الْكِتٰبِ اٰمَنُوْا وَاتَّقَوْا لَكَفَّرْنَا عَنْهُمْ سَيِّاٰتِهِمْ
وَلَاَدْخَلْنٰهُمْ جَنّٰتِ النَّعِيْمِ ﴿٦٥﴾

६६. आणि जर त्यांनी तौरात व इंजील [१९०] व या (ग्रंथा)स,जो त्यांच्या पालनकर्त्याकडून त्यांच्याजवळ पाठविला गेला आहे.[१९१] कायम केले असते तर त्यांना वरुनहि उपजिविका मिळाली असती व त्यांच्या पाया खालूनहि.[१९२] यांच्यात एक समूह खचितच सदाचारी आहे.[१९३] परंतु अधिकतर लोक असे आहेत ज्यांची आचरणे फार वाईट आहेत.

وَلَوْ اَنَّهُمْ اَقَامُوا التَّوْرٰىةَ وَالْاِنْجِيْلَ وَمَآ اُنْزِلَ اِلَيْهِمْ مِّنْ
رَّبِّهِمْ لَاَكَلُوْا مِنْ فَوْقِهِمْ وَمِنْ تَحْتِ اَرْجُلِهِمْ ۭ مِنْهُمْ
اُمَّةٌ مُّقْتَصِدَةٌ ۭ وَكَثِيْرٌ مِّنْهُمْ سَاۗءَ مَا يَعْمَلُوْنَ ﴿٦٦﴾

१८१. यावरुन हे स्पष्ट झाले की एखाद्या बिघाड झालेल्या समाजात सुधारणा करण्याची फार मोठी जबाबदारी विद्वानांवर येते.अपराध-कृत्ये, विशेषत: हरामाचा माल खाण्यापासून लोकांना रोखणे यांच्या पद-कर्तव्यात सामील आहे. परंतु जेव्हा विद्वान वर्गाचा ऱ्हास होऊ लागतो तेव्हा ते दुष्कृत्यांपासून इतरांना काय रोखतील, स्वत: देखील त्यात सहभागी होतात आणि मग 'हरामाची कोंबडी काजी करिता हलाल होते'. इब्ने जरीर तबरी असे म्हणतात की विद्वानांना याहून अधिक कठोरतेने झिंझोडणारी अन्य कोणतीहि आयत नाही. याच्या समर्थनार्थ त्यांनी इब्ने अब्बास यांचे कथन उल्लेखिले आहे.

(तफसीर तबरी भाग ६ पृ.१९३)

हा एक दर्पण आहे जो कुरआनने मुसलमानांसमोर ठेवला आहे, अशासाठी की मुस्लिम-विद्वानांनी त्यात आपले प्रतिबिंब पहावे.

१८२. अल्लाहच्या मार्गात जेव्हा खर्च करण्यास सांगितले जाई तेव्हा यहुदी उपहासाने म्हणत की 'अल्लाहचे हात तंग झाले आहेत.' अर्थात तो कंजूस झाला आहे यासाठी आम्हाला खर्च करायला सांगत आहे. त्यांच्या या उर्मट पणावर येथे अंकूश ठेवला गेला आहे.

१८३. स्पष्ट झाले की अल्लाहच्या प्रतिष्ठेत आशिष्टता करणारा धिक्कारला जाण्यास पात्र आहे.

१८४. कुरआनात अल्लाहचा परिचय ज्या प्रकारे दिला गेला आहे तो अत्यंत साध्या, स्वाभाविक व समजण्यायोग्य शैलीत आहे. म्हणून यहुदींच्या या निवेदनाचे खंडन करतांना की 'अल्लाह कंजूस झाला आहे' हे जे फर्माविले की,'त्याचे तर दोन्ही हात मोकळे आहेत' तर याचा हेतु अगदी स्पष्ट आहे परंतु कालावधीनंतर कलामी (तत्वज्ञानी) चर्चा करणाऱ्यांनी येथे हा विवाद उपस्थित केला की अल्लाहच्या हाताशी अभिप्रेत ते काय? अशा प्रकारचे विवाद निरर्थक आहेत, इतकेच नव्हे तर कुरआनच्या मूळ आवाहनापासून व त्याच्या मूळ हेतु पासून वाचकाचे लक्ष हटवितात. आणि मग तो अनावश्यक बाबींमध्ये गुरफटून जातो. याकरिता कुरआनने संदिग्ध आयतीबाबत खोलवर जाण्यापासून मनाई केली आहे. आणि पूर्वजांची रीत हीच होती की ते अशा गोष्टींच्या दीर्घ विवरणा पासून संयम पाळीत असत. इमाम राजी फर्मावितात की:

''राहिला हा प्रश्न की हाताचा अर्थ काय आहे आणि त्याची वस्तुस्थिती काय आहे तर आम्ही त्याचे ज्ञान सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या हवाली करतो आणि सलफ (पूर्वजांची) हीच रीत होती.''

(अल् तफसीर अल् कबीर खंड १२ पृ.४३)

१८५. अर्थात तो आपल्या दासांच्या हक्कात अत्यंत विशाल हृदयाचा व उदार आहे आणि मोठया उदारतेने सत्ता करीत आहे.

१८६. अर्थात पक्षपाताने यांना अंध केले आहे म्हणून मार्गदर्शनापासूनहि ते मार्गभ्रष्टता ग्रहण करतात.

१८७. ख्रिश्चनांच्या दरम्यान कपट आणि वैराची आग भडकविण्याचा उल्लेख आयत क्र. १४ मध्ये अला होता. येथे यहुदी लोकांच्या दरम्यान वैर आणि तिरस्कार टाकण्याचा उल्लेख आला आहे.यहुदी आणि ख्रिश्चनांच्या दरम्यान युद्धाचे जे वातावरण आढळून येते त्याची मूळे फार खोलवर आहेत. आणि या संदर्भात प्रत्येक समुहाने आपला एक स्वतंत्र इतिहास घडविला आहे. म्हणून यांच्या दरम्यान काही काळपर्यंत काही बऱ्या-वाईट गोष्टींना लक्षात घेता वातावरण दुरुस्त झाले तर ती गोष्ट वेगळी आहे परंतु यांच्या मन:पटलावरील कलंक पूसून टाकण्याचे सामर्थ्य कोणातहि नाही म्हणूनच ते नेहमी लढत आणि मरतच राहतील.

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा टीप क्र. ७८)

१८८. अर्थात जेव्हा जेव्हा यहुदींनी युद्धाची आग भडकाविली आहे सर्वश्रेष्ठ अल्लाहने तिला विझवण्याची सामुग्री केली आहे. जर त्याने असे केले नसते तर जमीनीवर जबरदस्त उपद्रव घडून आला असता.मक्केच्या अनेकेश्वर-वादींनी मुसलमानांशी जेवढी युद्ध केलीत त्या सर्वांच्या मागे यहुदींचा हात होता. ते आपल्या कपटी बुद्धीनुसार युद्धाची आग भडकावित राहिले. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाह मुसलमानांना या आगीत जळण्यापासून वाचवित राहिला. आज देखील इस्राईल (यहुदी) युद्धाची आग भडकविण्यात वाईटरित्या मग्न आहेत आणि यावरुन कुरआनाचे सत्यत्व प्रकट होते.

१८९. अर्थात जर ग्रंथ बाळगणाऱ्यांनी हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर ईमान बाळगले असते आणि ईश-भय अंगिकारले असते तर सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या मागील अपराधांना माफ केले असते व त्यांना जन्नतच्या देणग्यायुक्त बागांमध्ये दाखल केले असते.

१९०. तौरात आणि इंजिल ला कायम करण्याचा अर्थ मूळ तौरात व मूळ इंजील ला कायम करणे होय, परिवर्तित केलेल्या तौरात व इंजिल ला नव्हे अधिक स्पष्टीकरणासाठी पहा-टीप क्र. १४३, १९७.

१९१. अर्थात कुरआन अल्लाहच्या ग्रंथास कायम करण्याचा अर्थ त्याला आपला मार्गदर्शक व घटना बनविणे होय.

१९२. अर्थात इहलोकीय देणग्या व समृद्धी होय.

तौरात मध्ये हा उल्लेख आहे:

''तुम्ही माझ्या विधी प्रमाणे चालाल आणि माझ्या आज्ञा

पाळून त्या प्रमाणे वागाल तर योग्य काळी तुमच्याकरिता मी पाऊस पाडीन, जमीन आपला उपज देईल व मळयातील झाडे आपआपली फळे देतील (लेवीय २६/३,४)

“तू आपला देव परमेश्वर याची वाणी ऐकशील तर हे सर्व आशिर्वाद तुझ्याकडे धावत येतील. नगरात तू आशिर्वादित होशील व शेतीवाडीत तू आशिर्वादीत होशील. (अनुवाद २८- २,३)

परंतु ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घेतली पाहिजे की कुरआन ऐहीक लाभांना अल्लाहच्या आज्ञापालनाचे फळ म्हणून सादर करते,मूळ उत्तेजक व उद्देश्य म्हणून नव्हे. याच कारणास्तव हे लाभ आणि ह्या समृद्धयांचे क़ुरआनमध्ये ओघाओघान वर्णन केले गेले आहे. वस्तुत: अल्लाहच्या प्रसन्नतेस आज्ञापालन व दास्यत्वाचे मूळ उत्तेजक आणि आखिरतच्या सफलतेस ध्येय उदिष्टय या नात्याने सादर केले गेले आहे. आणि ह्या गोष्टीची कुरआनात इतक्या वेळा व इतक्या परिणामकाररित्या पुनरावृत्ति केली गेली आहे की ही इस्लामी आवाहनाचा विशिष्ट स्वभाव बानली आहे आणि कसल्याहि अपवादाशिवाय सर्व पैगंबरांच्या आवाहनाचे स्वरुप हेच राहिले आहे. परंतु परिवर्तित झालेल्या तौरात मध्ये आखिरतचा पैलू दाबला गेला आहे. आणि अल्लाहच्या आज्ञापालनाच्या इहलोकीय प्रतिफळांचा मूळ उद्देश्य म्हणून वारंवार उल्लेख केला गेला आहे ज्यावरुन असे दिसून येते की या ग्रंथाच्या रचनाकारांच्या बुद्धिवर ऐहिक लाभांचा केवढा मोठा पगडा होता.

आज देखील प्रभावित बुद्धिचे लोक जेव्हा इस्लामी आवाहन सादर करण्यास सज्ज होतात तेव्हा इस्लामी व्यवस्थेचे ऐहिक व भौतिक लाभ मोठया सुंदरतेने सादर करु लागतात राहिला आखिरतचा पैलू तर तो नाम मात्र असतो. आवाहनाची ही पद्धत ना पैगंबराची आहे ना कुरआनाची आणि ना यामुळे माणसाचा आंतरीक बदलू शकतो.

१९३. हा ग्रंथ बाळगणाऱ्यांचा तो समूह आहे जो संख्येने कमी असला तरी सत्यावर अटळ होता आणि जेव्हा कुरआनाचे आवाहन यांच्यावर स्पष्ट झाले तेव्हा त्याने यावर ‘लब्बैक’ म्हटले. (स्वीकृति दर्शविली).

**हे पैगंबर ! तुमच्या पालनकर्त्याकडून जे काही तुमच्या वर अवतरित झाले आहे ते (लोकांपर्यंत) पोहचवा जर तुम्ही असे केले नाही तर त्याचा संदेश पोहचविला नाही. अल्लाह तुम्हाला लोकांपासून सुरक्षित ठेवील. अल्लाह त्या लोकांना कदापि मार्ग प्राप्त करणार नाही, जे काफ़िर आहेत.*(अल-क़ुरआन)***

**६७.** हे पैगंबर ! तुमच्या पालनकर्त्याकडून जे काही तुमच्या वर अवतरित झाले आहे ते (लोकांपर्यंत) पोहचवा जर तुम्ही असे केले नाही तर त्याचा संदेश पोहचविला नाही.[१९४] अल्लाह तुम्हाला लोकांपासून सुरक्षित ठेवील.[१९५] अल्लाह त्या लोकांना कदापि मार्ग प्राप्त करणार नाही, जे काफ़िर आहेत.[१९६]

يٰٓاَيُّهَا الرَّسُوْلُ بَلِّغْ مَآ اُنْزِلَ اِلَيْكَ مِنْ رَّبِّكَ ۭ وَاِنْ لَّمْ تَفْعَلْ
فَمَا بَلَّغْتَ رِسَالَتَهٗ ۭ وَاللّٰهُ يَعْصِمُكَ مِنَ النَّاسِ ۭ اِنَّ اللّٰهَ
لَا يَهْدِي الْقَوْمَ الْكٰفِرِيْنَ ﴿٦٧﴾

**६८.** सांगा, हे ग्रंथ बाळगणाऱ्यांनो ! तुम्ही कोणत्याही तत्वावर नाहीत, जोपर्यंत तौरात व इंजिल व त्या (ग्रंथा)स कायम करीत नाही जो तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याजवळ पाठविला गेला आहे.[१९७]परंतु जी (वाणी) तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर अवतरित झाली आहे ती त्यांच्यापैकी बहुतेक लोकांच्या बंडखोरीत व कुफ्र मध्ये वृद्धिच करील.[१९८] तेव्हा तुम्ही या काफ़िरां (च्या स्थिती) बद्दल खेद करु नका.

قُلْ يٰٓاَهْلَ الْكِتٰبِ لَسْتُمْ عَلٰي شَيْءٍ حَتّٰي تُقِيْمُوا التَّوْرٰىةَ
وَالْاِنْجِيْلَ وَمَآ اُنْزِلَ اِلَيْكُمْ مِّنْ رَّبِّكُمْ ۭ وَلَيَزِيْدَنَّ كَثِيْرًا
مِّنْهُمْ مَّآ اُنْزِلَ اِلَيْكَ مِنْ رَّبِّكَ طُغْيَانًا وَّكُفْرًا ۚ فَلَا
تَاْسَ عَلَي الْقَوْمِ الْكٰفِرِيْنَ ﴿٦٨﴾

**६९.** मुसलमान असोत किंवा यहुदी आणि साबी.[१९९] असोत किंवा ख्रिश्चन, जो कोणी अल्लाह व अंतिम दिनावर ईमान बाळगील आणि सदाचरण करील तर अशा लोकांना ना कसले भय राहील व ना ते दु:खी होतील.[२००]

اِنَّ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَالَّذِيْنَ هَادُوْا وَالصّٰبِـُٔوْنَ وَالنَّصٰرٰى
مَنْ اٰمَنَ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ وَعَمِلَ صَالِحًا فَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ
يَحْزَنُوْنَ ﴿٦٩﴾

**७०.** आम्ही बनी इस्त्राईल कडून वचन घेतले [२०१] आणि त्यांच्याकडे रसूल (प्रेषित) पाठविले परंतु जेव्हा कधी एखादा रसूल त्यांच्याजवळ अशी गोष्ट घेऊन आला जी त्यांच्या आत्मलालसेविरुद्ध होती तर कोणाला यांनी खोटे ठरविले तर कोणाची [२०२] हत्त्या केली.

لَقَدْ اَخَذْنَا مِيْثَاقَ بَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ وَاَرْسَلْنَآ اِلَيْهِمْ رُسُلًا ۭ كُلَّمَا
جَاۗءَهُمْ رَسُوْلٌۢ بِمَا لَا تَهْوٰٓى اَنْفُسُهُمْ ۙ فَرِيْقًا كَذَّبُوْا
وَفَرِيْقًا يَّقْتُلُوْنَ ﴿٧٠﴾

**७१.** आणि अशी धारणा बाळगून बसले की (त्यांच्यावर) कोणतेहि संकट येणार नाही म्हणून आंधळे व बहिरे झाले.[२०३] मग अल्लाहने (त्यांची तौबा कबूल केली व) त्यांना माफ केले परंतु पुन्हा त्यांच्यात बहुतेक लोक आंधळे व बहिरे झालेत [२०४]आणि अल्लाह त्यांच्या कृत्यांना पाहत आहे.[२०५]

وَحَسِبُوْٓا اَلَّا تَكُوْنَ فِتْنَةٌ فَعَمُوْا وَصَمُّوْا ثُمَّ تَابَ اللّٰهُ عَلَيْهِمْ
ثُمَّ عَمُوْا وَصَمُّوْا كَثِيْرٌ مِّنْهُمْ ۭ وَاللّٰهُ بَصِيْرٌۢ بِمَا يَعْمَلُوْنَ ﴿٧١﴾

१९४. हा सक्त ताकीद असलेला आदेश आहे. जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिला गेला. पैगंबर अल्लाहचा संदेश वाहक असतो म्हणून त्याच्या पदाचे हे कर्तव्य आहे की त्याने अल्लाहचा संदेश काहीही कमी अधिक न करता व कोणत्याही भयाची पर्वा न करता लोकांपर्यंत पोहचवावा. यात गफ़लत म्हणजे प्रेषित कर्तव्याच्या अदायगीत गफलत होय. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या कर्तव्यास यथायोग्य अदा केले आणि पूर्ण कुरआन जसेच्या तसेच लोकांपर्यंत पोहचविले. शेवटच्या हज्ज प्रसंगी जे पैगंबरांनी आपल्या निधनाच्या ३ महिन्यापूर्वी केले होते. सर्व सामान्यांच्या समुदायास विचारले:

وَاَنْتُمْ تُسْـأَلُونَ عَنِّی فَمَا اَنْتُمْ قَائِلُوْنَ؟

''तुम्हाला माझ्याबद्दल विचारले जाईल तर तुम्ही काय उत्तर द्याल?

قَالُوْا نَشْهَدُ اَنَّکَ قَدْ بَلَّغْتَ وَاَدَّیْتَ وَنَصَحْتَ۔

उपस्थित असलेल्यांनी म्हटले, आम्ही या गोष्टीची साक्ष देऊ की, आपण आमच्या पर्यंत (अल्लाहचा संदेश) पोहचविला, आपले कर्तव्य पार पाडले व आमचे हित चिंतिले.''

पैगंबरानी आपले तर्जनीचे बोट आकाशाच्या दिशेने उंचावले व फर्मावले: اَللّٰهم اشهد (مسلم کتاب الحج)

हे ईश्वर तू साक्षी रहा.

(मुस्लिम किताबुल हज्ज)

आज क़ुरआन आपल्या मूळ स्थितीत जसे अवतरित झाले होते तसे आमच्या हातात विद्यमान आहे. म्हणून उद्या ईश्वराच्या न्यायालयात कोणताही माणूस ही सबब सादर करु शकत नाही की अल्लाहचा संदेश मजपर्यंत पोहचला नव्हता.

१९५. आणि क़ुरआनाचे हे भाकित शब्द न शब्द खरे ठरले. यास्तव विरोधकांची कारस्थाने व युद्धविषयक कारवाया असतानाहि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) लोकांच्या अपायापासून सुरक्षित राहिले आणि कोणतीहि शक्ति पैगंबरांची हत्या करण्यात यशस्वी होऊ शकली नाही.

१९६. अर्थात काफिर आपल्या मनोरथात कदापि यशस्वी होणार नाहीत. अंतिम प्रेषिताच्या संबंधाने ईश्वराची जी योजना आहे ती पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही.

१९७. या ग्रंथाला कायम करण्याचा अर्थ ''क़ुरआन'' ला क़ायम करणे होय आणि क़ुरआनला क़ायम करणे वस्तुत: तौरात व इंजीललाहि कायम करणे होय. कारण मूळ तौरात व इंजील च्या संबंधाने त्यांची मूलभूत शिकवण व क़ुरआनाची मूलभूत शिकवण यात कसलाहि फरक नाही. ह्या एकाच वृक्षाच्या वेगवेगळया फांद्या आहेत. जर ग्रंथ बाळगणाऱ्यांनी तौरात व इंजीलच्या शिकवणीवर कार्यरत राहिले असते तर यांनी क़ुरआनात कसलीहि अपरिचितता जाणवली नसती किंबहुना ज्या मार्गदर्शन-पथावर ते चालत होते, त्याच पथावर कुरआनाच्या प्रकाशात आपला प्रवास पुढे जारी राखू शकत होते.

१९८. अर्थात त्यांच्या पक्षपातीवृत्तीमुळे व अट्टाहासापायी.

१९९. पहा सूरह बकरा टीप क्रमांक ८६.

२००. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ८७ मध्ये आले आहे

२०१. याचा अर्थ शरीअती चे पालन करण्याचे वचन होय. आणि या गोष्टीचे वचन देखील की जेव्हा कधी त्यांच्याजवळ ईश्वरकडून एखादा रसूल (प्रेषित) येईल तर ते त्याचे समर्थन करतील.

२०२. अर्थात एकीकडे शरीअत-पालनाचे वचनहि आणि दुसऱ्या बाजूला हे दु:साहस देखील की पैगंबरांना ठार करण्यास टपून बसावे. मनुष्य जेव्हा आत्म लालसेचा भक्त बनतो. तेव्हा या स्वरुपाच्या परस्पर विरुद्ध गोष्टी आपल्या अंगी बाणवतो.

२०३. अर्थात ते अपराध केल्यानंतर जेव्हा यांच्यावर ताबडतोब एखादी आपत्ति आली नाही तेव्हा त्यांनी हे गृहीत धरले की त्यानां याची शिक्षा मिळणारच नाही. अर्थात ही ढील होय जी अल्लाह अपराधींना देत असतो या साठी की त्यानी आपली सुधारणा करावी.

२०४. अर्थ हा की जेव्हा त्यांनी अल्लाहकडे रुजू केले व आपली सुधारणा केली तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह ने माफ केले, परंतु यानंतर पुन्हा ते आंधळे व बहिरे झाले. हा संकेत आहे बनी इस्राईलच्या इतिहासा कडे. हे की त्यात यांच्या धार्मिक व नैतिक उदय व ऱ्हासाच्या घटना बऱ्याच वेळा घडल्या आहेत. बायबलचे पुस्तक 'नेहम्या' तील उल्लेख.

''ते खाऊन तृप्त झाले धष्ट पुष्ट झाले आणि तुझ्या अतिशयित चांगुल पणामुळे सुख पावले पण त्यांनी आज्ञाभंग करुन तुजविरूद्ध बंड केले, तुझे धर्म शास्त्र त्यांनी पाठीमागे फेकून दिले, तुजकडे त्यांनी पून: वळावे असे ज्या तुझ्या संदेष्टयांनी निक्षून सांगितले त्यास त्यांनी जिवे मारिले आणि तुला सतप्त केले. त्यामुळे तू त्यास त्यांच्या शत्रुचा हाती दिले.......तरी ते तुजकडे वळून तुझा धावा करीत, तो तू स्वर्गातून ऐकत असत आणि तुझ्या दयेच्या कृत्यांस अनुसरुन तू त्यास, अनेक वेळा मुक्त केले........ तरी त्यांनी उन्मत होऊन तुझ्या आज्ञांचा अवमान केला. (नहेम्या ९:२५ ते २९).

२०५ अर्थात हे जरी आंधळे झालेले असले तरी अल्लाह यांच्या हरकतींना चांगल्या प्रकारे पाहत आहे जबूर मध्ये उल्लेख आहे की :-

"ते विधवा व उपरी ह्यांचा जीव घेतात, अनाथांस ठार मारितात ते म्हणतात, परमेश पाहत नाही, याकोबाचा देव लक्ष देत नाही अहो पशुतुल्य लोकहो, लक्षद्या, मूर्खांनो, तुम्ही कधी शहणे व्हाल? ज्याने कान घडविला तो ऐकणार नाही काय? ज्याने डोळा बनविला तो पाहणार नाही काय? जो राष्ट्रांचा शास्ता, मानवाचा ज्ञानदाता, तो शासन करणार नाही काय? (स्तोत्र संहिता ९४: ६ ते १०)

**नि:संशय त्या लोकांनी कुफ्र केले ज्यांनी असे म्हटले की, मरीयमचा पुत्र मसीह हाच अल्लाह होय वस्तुत: मसीहने म्हटले होते, हे बनी इस्राईल ! अल्लाहची उपासना करा जो माझाहि पालनकर्ता आहे व तुमचा देखील पालन कर्ता आहे. नि:संशय ज्याने अल्लाहचा सहभागी ठरविला त्यावर अल्लाहने जन्नत हराम केली. आणि त्याचे स्थान जहन्नमची आग आहे. आणि अत्याचारींचा कोणीहि सहाय्यकर्ता नसेल.** ***(अल-कुरआन)***

७२. नि:संशय त्या लोकांनी कुफ्र केले ज्यांनी असे म्हटले की, मरीयमचा पुत्र मसीह हाच अल्लाह होय [२०६] वस्तुत: मसीहने म्हटले होते, हे बनी इस्राईल ! अल्लाहची उपासना करा जो माझाहि पालनकर्ता आहे व तुमचा देखील पालनकर्ता आहे.[२०७] नि:संशय ज्याने अल्लाहचा सहभागी ठरविला त्यावर अल्लाहने जन्नत हराम केली. आणि त्याचे स्थान जहन्नमची आग आहे. आणि अत्याचारींचा कोणीहि सहाय्यकर्ता नसेल.

لَقَدْ كَفَرَ الَّذِينَ قَالُوٓا إِنَّ اللَّهَ هُوَ الْمَسِيحُ ابْنُ مَرْيَمَ ۖ وَقَالَ الْمَسِيحُ يَٰبَنِىٓ إِسْرَٰٓءِيلَ اعْبُدُوا اللَّهَ رَبِّى وَرَبَّكُمْ ۖ إِنَّهُۥ مَن يُشْرِكْ بِاللَّهِ فَقَدْ حَرَّمَ اللَّهُ عَلَيْهِ الْجَنَّةَ وَمَأْوَىٰهُ النَّارُ ۖ وَمَا لِلظَّٰلِمِينَ مِنْ أَنصَارٍ ﴿٧٢﴾

७३. नि:संशय त्या लोकांनी कुफ्र केले ज्यांनी असे म्हटले की अल्लाह तीन पैकी एक आहे.[२०८] वस्तुत: एक ईश्वराशिवाय अन्य कोणतेहि उपास्य नाही. आणि जर त्यांनी या गोष्टीपासून माघार घेतली नाही तर यांच्यापैकी ज्या लोकांनी कुफ्र (इन्कार) केला आहे त्यांना दु:खदायक शिक्षा भोगावी लागेल.[२०९]

لَّقَدْ كَفَرَ الَّذِينَ قَالُوٓا إِنَّ اللَّهَ ثَالِثُ ثَلَٰثَةٍ ۘ وَمَا مِنْ إِلَٰهٍ إِلَّآ إِلَٰهٌ وَٰحِدٌ ۚ وَإِن لَّمْ يَنتَهُوا عَمَّا يَقُولُونَ لَيَمَسَّنَّ الَّذِينَ كَفَرُوا مِنْهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٧٣﴾

७४. मग काय हे अल्लाह कडे रूजू करणार नाहीत आणि त्याच्याजवळ माफीची याचना करणार नाहीत. अल्लाह तर क्षमा करणारा व दया करणारा आहे.

أَفَلَا يَتُوبُونَ إِلَى اللَّهِ وَيَسْتَغْفِرُونَهُۥ ۚ وَاللَّهُ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٧٤﴾

७५. मरीयमचे पुत्र मसीह याखेरीज काहीहि नाहीत की ते एक रसूल (प्रेषित) होते. त्यांच्यापूर्वीहि कित्येक रसूल होऊन गेले आहेत.[२१०]आणि त्यांची आई अत्यंत सत्यशील होती.[२११] दोघेहि भोजन करीत असत.[२१२] पहा, कशा प्रकारे आम्ही यांच्यासमोर प्रमाण स्पष्ट करीत आहोत आणि मग पहा की यांची बुद्धि कशा प्रकारे मारली जात आहे.

مَّا الْمَسِيحُ ابْنُ مَرْيَمَ إِلَّا رَسُولٌ قَدْ خَلَتْ مِن قَبْلِهِ الرُّسُلُ وَأُمُّهُۥ صِدِّيقَةٌ ۖ كَانَا يَأْكُلَانِ الطَّعَامَ ۗ انظُرْ كَيْفَ نُبَيِّنُ لَهُمُ الْآيَٰتِ ثُمَّ انظُرْ أَنَّىٰ يُؤْفَكُونَ ﴿٧٥﴾

७६. सांगा,काय तुम्ही अल्लाहला सोडून त्याची पूजा करता जो ना तुम्हाला नुकसान पोहचविण्याचा अधिकार बाळगतो व ना लाभ पोहचविण्याचा ? [२१३] वस्तुत: केवळ अल्लाह होय जो सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे .[२१४]

قُلْ أَتَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّهِ مَا لَا يَمْلِكُ لَكُمْ ضَرًّا وَلَا نَفْعًا ۚ وَاللَّهُ هُوَ السَّمِيعُ الْعَلِيمُ ﴿٧٦﴾

७७. सांगा, हे ग्रंथ बाळगणाऱ्यांनो ! आपल्या धर्मात नाहक अतिशयोक्ति करु नका [२१५] आणि त्या लोकांच्या विचारांचे अनुसरण करु नका जे यापूर्वी मार्गभ्रष्ट झालेत व ज्यांनी अनेकांना मार्गभ्रष्ट केले आणि सन्मार्गापासून अगदी भटकले.[२१६]

قُلْ يَٰٓأَهْلَ الْكِتَٰبِ لَا تَغْلُوا فِى دِينِكُمْ غَيْرَ الْحَقِّ وَلَا تَتَّبِعُوٓا أَهْوَآءَ قَوْمٍ قَدْ ضَلُّوا مِن قَبْلُ وَأَضَلُّوا كَثِيرًا وَضَلُّوا عَن سَوَآءِ السَّبِيلِ ﴿٧٧﴾ ع

२०६. याचे स्पष्टीकरण टीप क्र. ८५ मध्ये आले आहे.

२०७. हजरत ईसा यांनी ना आपण ईश वा स्वामी असण्याचा दावा केला होता व ना हे फर्माविले होते की माझी उपासना करा, किंबहुना एक अल्लाहला ईश व स्वामी मानण्याचा व केवळ त्याचीच उपासना करण्याचा आदेश दिला होता. आज देखील इंजील मध्ये हजरत ईसा यांचा हा आदेश स्पष्टरित्या विद्यमान आहे.

''परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर व केवळ त्याचीच उपासना कर'' (मत्तय ४:१०)

आणि या द्वारे कुरआनाच्या निवेदनाची पूरेपूर सत्याता दर्शविली जाते.

२०८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप क्र.२६०, तसेच पहा सूरह इखलास टीप क्र.३.

स्पष्ट असावे की, ख्रिश्चनांचेहि विभिन्न पंथ आहेत आणि त्यांच्या श्रद्धेत परस्पर मतभेद आहे. कोणी ही धारणा बाळगतो की ईश्वर मसीह मध्ये संसारला आहे म्हणजे मसीह ईश्वराचे शरिक अस्तित्व आहे तर कोणी तीन ईश्वर मानणारा आहे. आणि मग ह्या तीन ईश्वरांच्या तीन मध्येही मतभेद आढळून येतो, कोणी पिता पुत्र व पवित्र आत्म्यास तिहींचा समुच्चय या नात्याने मानतो तर कोणी पवित्र आत्म्याच्या जागी माता (मरीयम) ला ईश्वराचा दर्जा देतो (अल्लाहचे शरण असो या खोट्या श्रद्धांपासून).

२०९. अर्थात त्यांच्यापैकी जे लोक या गोष्टींपासून परावृत्त होतील त्यांना शिक्षा मिळणार नाही. परंतु जे लोक परावृत्त होणार नाहीत व कुफ्रवर (नकारावर) अटल राहतील त्यांना कठोर शिक्षा भोगावी लागेल.

२१०. अर्थात हजरत मसीह अशा प्रकारे रसूल (प्रेषित) होते ज्या प्रकारे इतर अनेक रसूल (Messenger) होऊन गेले आहेत. मग जर या रसूला पैकी कोणीहि ईश्वर नव्हता तर 'मसीह' ला ईश्वर समजण्याचे प्रयोजन कोणते?

२११. अर्थात मसीहची माता हज़रत मरीयम अत्यंत सदाचारी व सत्य आणि खरेपणाची रुप होती. या गुणाने, नि:संशय त्यांना चारित्र्याच्या अत्युच्च स्थानावर पोहचविले होते, पण तरीही ती एक मानवच होती.

२१२. हज़रत मसीह व त्यांची आई (मरीयम) यांचे-ईश्वर (देव) नसण्याचा स्पष्टपुरावा हा आहे की दोघेहि भोजन करीत असत आणि ज्याला खाण्याची गरज भासावी तो ईश्वर कसा बरे असू शकतो? तसेच जो स्वत:गरजवंत असेल तो इतरांच्या गरजांचे निवारण कसे करु शकतो?

इंजील च्या संबंधाने देखील हज़रत मसीह व त्यांच्या मातेला मानव या नात्यानेच प्रस्तुत करते आणि यात हे स्पष्टीकरणहि आहे की हजरत ईसा भोजन करीत असत:

''नंतर असे झाले की, तो घरात बसला असता, पाहा बरेच जकातदार व पापी लोक येऊन येशू व त्याचे शिष्यांस म्हणाले, तुमचा गुरु जकातदार व पापी लोक ह्यांचा बरोबर कां जेवतो?''

आणि इंजील ची साक्ष ही देखील आहे की हजरत ईसा यांना भूक लागत असे.

(मत्तय ९: १०-११)

''मग सकाळी तो परत नगरास येत असता त्याला भूक लागली'' (मत्तय-२१:१८)

२१३. अर्थात एक अल्लाह खेरीज कोणतीहि शक्ति अशी नाही जी खप्य अर्थाने लाभ व हानी पोहचविणारी असावी मग त्याच्या खेरीज अन्य कुणाच्या उपासनेचा प्रश्न निर्माणच कोठे होतो? मसीहचे अल्लाहचे प्रेषित असण्याचा अर्थ हा मुळीच नाही की ते नफा नुकसान पोहचविण्या बाबत समर्थ आहेत यास्तव त्यांच्या उपासने करिता मूळातच एखादा आधार अस्तित्वातच नाही.

२१४. अर्थात सर्व काही ऐकणे व सर्व काही जाणने ना मसीहचे गुण वैशिष्ट्य आहे व ना अन्य कोणाचे; किंबहुना फक्त अल्लाहचे गुण वैशिष्ट्य आहे. मग मसीह किंवा अन्य कोणाला मदती साठी पुकारणे व गरज पूर्तते करिता आर्जव करणे याचा अर्थ काय? ते ज्या अर्थी तुमचे गाऱ्हाणे ऐकतच नाही व ना तुमच्या परिस्थितींशी जाणकार आहेत तर तुमची गरज पूर्तता काय करतील?

२१५. याचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. २७७ मध्ये आले आहे.

२१६. अर्थात त्यांचे ते पूर्वज होते ज्यांनी हजरत मसीह यांच्या निष्ठेत अतिशयोक्ति केली. आणि दोन तात्विक विवरणात व बिदआत मध्ये पडून स्वत: देखील मार्गभ्रष्ट झाले आणि दुसऱ्यांनाहि मार्गभ्रष्ट केले आणि ही मार्गभ्रष्टता ज्याअर्थी मूलभूत श्रद्धेत होती, म्हणून तिचा परिणाम असा झाला की सरळ मार्गालाच ते पारखे झाले आणि ते इस्लामच्या राजमार्गापासून फार दूर जाऊन पडले.

ख्रिश्चन मताचा इतिहास हे दर्शवितो की (पाल) व त्याच्या साथीदारांनी हजरत मसीह संबंधी अतिशयोक्तित सापडून त्यांचाकरिता ईश्वर व ईश-पुत्र या सारख्या उपाध्या योजल्या आणि प्रायश्चित्ताची श्रद्धा कल्पिली.

बायबल मध्ये चार इंजील बरोबर पाल वगैरेची जी पत्रे सामील केली गेली आहेत त्यांत त्यांच्या या मार्गभ्रष्ट करणाऱ्या तत्वज्ञानांना पाहिले जाऊ शकते.

कुरआनाचा संकेत त्यांच्या ह्याच खोट्या श्रद्धा व बिदअत कडे आहे.

७८. बनी इस्राईल पैकी ज्या लोकांनी कुफ्र केले; त्यांचा दाऊद व मरीयमचे पुत्र ईसाच्या मुखाने धिक्कार केला गेला [२१७] हे अशासाठी की ते अवज्ञाकारी झाले होते, आणि अतिरेक करु लागले होते.

لُعِنَ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ بَنِي إِسْرَائِيلَ عَلَىٰ لِسَانِ دَاوُودَ
وَعِيسَى ابْنِ مَرْيَمَ ۚ ذَٰلِكَ بِمَا عَصَوْا وَكَانُوا يَعْتَدُونَ ﴿٧٨﴾

७९. दुष्कृत्ये करण्यापासून ते एकमेकांना रोखत नव्हते.फार वाईट गोष्ट होती जी ते करीत होते.[२१८]

كَانُوا لَا يَتَنَاهَوْنَ عَنْ مُنْكَرٍ فَعَلُوهُ ۚ لَبِئْسَ مَا كَانُوا
يَفْعَلُونَ ﴿٧٩﴾

८०. तुम्ही यांच्यापैकी बहुतेक लोकांना पाहाल की ते काफीरांना आपला मित्र बनवितात.[२१९] अत्यंत वाईट सामुग्री आहे, जी त्यांनी आपल्या भविष्याकरिता केली की ज्यामुळे अल्लाहचा त्यांच्यावर प्रकोप झाला व ते नेहमी करिता शिक्षेत राहणारे बनले.

تَرَىٰ كَثِيرًا مِنْهُمْ يَتَوَلَّوْنَ الَّذِينَ كَفَرُوا ۚ لَبِئْسَ مَا قَدَّمَتْ
لَهُمْ أَنْفُسُهُمْ أَنْ سَخِطَ اللَّهُ عَلَيْهِمْ وَفِي الْعَذَابِ هُمْ
خَالِدُونَ ﴿٨٠﴾

८१. जर हे, अल्लाह पैगंबर व त्याच्याकडे अवतरित झालेल्या (ग्रंथा) वर ईमान बाळगणारे असते तर कधीहि काफीरांना आपले दोस्त बनविले नसते.[२२०] परंतु त्यांच्यात अधिकतर अवज्ञाकारी आहेत.

وَلَوْ كَانُوا يُؤْمِنُونَ بِاللَّهِ وَالنَّبِيِّ وَمَا أُنْزِلَ إِلَيْهِ مَا
اتَّخَذُوهُمْ أَوْلِيَاءَ وَلَٰكِنَّ كَثِيرًا مِنْهُمْ
فَاسِقُونَ ﴿٨١﴾

८२. तुम्हाला ईमान बाळगणाऱ्यांशी वैर बाळगण्यात सर्वाधिक कठोर यहुदी आणि अनेकेश्वरवादी आढळतील आणि ईमान बाळगणाऱ्यांशी मैत्री करण्यात सर्वात अधिक निकट ते लोक आढळतील जे स्वत:ला ख्रिश्चन म्हणवितात [२२१] हे अशासाठी की यांच्यात उपासना करणारे विद्वान व राहीब (संन्यासी) आढळून येतात आणि ते गर्व करीत नाही.[२२२]

لَتَجِدَنَّ أَشَدَّ النَّاسِ عَدَاوَةً لِلَّذِينَ آمَنُوا الْيَهُودَ
وَالَّذِينَ أَشْرَكُوا ۖ وَلَتَجِدَنَّ أَقْرَبَهُمْ مَوَدَّةً
لِلَّذِينَ آمَنُوا الَّذِينَ قَالُوا إِنَّا نَصَارَىٰ ۚ ذَٰلِكَ
بِأَنَّ مِنْهُمْ قِسِّيسِينَ وَرُهْبَانًا وَأَنَّهُمْ
لَا يَسْتَكْبِرُونَ ﴿٨٢﴾

८३. आणि जेव्हा ते या ग्रंथाला ऐकतात जो प्रेषितावर अवतरित झाला आहे, तेव्हा तुम्ही पाहता की सत्याला ओळखल्यामुळे त्यांच्या डोळयातून अश्रू वाहू लागतात, ते म्हणू लागतात, हे आमच्या पालनकर्त्या, आम्ही ईमान बाळगले, तू आम्हाला साक्ष देणाऱ्यामध्ये लिहून घे.[२२३]

وَإِذَا سَمِعُوا مَا أُنْزِلَ إِلَى الرَّسُولِ تَرَىٰ أَعْيُنَهُمْ
تَفِيضُ مِنَ الدَّمْعِ مِمَّا عَرَفُوا مِنَ الْحَقِّ ۖ يَقُولُونَ رَبَّنَا آمَنَّا
فَاكْتُبْنَا مَعَ الشَّاهِدِينَ ﴿٨٣﴾

२१७. बनी इस्राईल पैकी जे लोक बंडखोर झाले होते आणि अल्लाहच्या आदेशांची उघड अवज्ञा करु लागले होते त्यांना हजरत दाऊद यांनी सक्तपणे झिंझोडले. जबूर मध्ये याची उदाहरणे उपलब्ध आहेत, उदाहरणार्थ:

''हे परमेश्वरा, दुर्जनाच्या इच्छा पुरवू नको, त्याची दुष्ट योजना सिद्धिस जाऊ देऊ नको, नाही तर तो उन्मत्त होईल.

ज्यांनी मला घेरिले आहे त्यांचा वाचेपासून होणारा अनर्थ त्यांच्याच शिरी पडो. त्यांचवर इंगळ पडोत, ते अग्नीत टाकिले जावेत,ज्यातून त्यांना उठून वर येता येणार नाही अशा खार्चात ते टाकण्यात येवोत.''

(स्तोत्र संहिता- १४०:८ ते १० )

''त्यांच्या तोंडचे पातक, त्यांच्या मुखातील शब्द, त्यांनी उच्चारिलेले शाप व लबाडया ह्यामुळे ते आपल्या गर्वात गुरफटून जावोत. क्रोधाने त्यांचा संहार कर. ते नाहीसे होईपर्यंत त्यांचा संहार कर,देव याकोबावर व पृथ्वीच्या दिगंता पर्यंत सत्ता धारी आहे अशी लोकांची खातरी होवो.''

(स्त्रोत्र संहिता ५९ : १२- १३)

''शाप देणे हा त्याचा पेहराव बनला होता म्हणून ते त्याच्या पोटात पाण्यासारखे व त्याच्या हाडात तेलासारखे भिनून जावो. माझ्या विरोध्यास, माझ्याविरुद्ध वाईट बोलणाऱ्यास परमेश्वराकडून हेच प्रतिफळ मिळो.'' (स्तोत्र संहिता-१०९: १८ ते २०)

आणि हजरत ईसा यांनी त्या विद्वानांची जे त्यांचा विरोधात अग्रभागी होते आणि जे धर्माचा खऱ्या वस्तुस्थितीस दृष्टीआड करुन केवळ देखावा घेऊन बसले होते, फार कठोर शब्दात निर्भत्सना केली. या संदर्भात इंजील चे काही उदधृत केलेले भाग पहा:-

''अहो शास्त्र्यानो, अहो परुश्यांनो, ढोग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही लोकांना स्वर्गाचे राज्य बंद करिता तुम्ही स्वत:हि आंत जात नाही व आंत जाणाऱ्यानाही जाऊ देत नाही .........अहो शास्त्र्यानो अहो परुश्यानो, ढोग्यांनो; तुमची केवढी दुर्दशा होणार!तुम्ही ताटवाटी बाहेरुन साफ करीता पण ती आतून जुलूम व असंयम हयांनी भरलेली आहेत.अरे आंधळ्या परुश्या, पहिल्याने वाटी आतून साफ कर म्हणजे ती बाहेरूनही साफ होईल........ अहो शास्त्र्यानो, अहो परुश्यानो ढोंग्यांनो तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही संदेष्टयांच्या कबरा बांधता व नितिमान लोकांची थडगी सजविता, आणि म्हणता, आम्ही आपल्या पूर्वजांच्या काळात असतो तर संदेष्टयांच्या रक्तपात करण्यात त्यांचे साथीदार झालो नसतो...... अहो सापांनो, सापांच्या पिळांनो, तुम्ही नरक दंड कसा चुकवाल?...... यरुशलेमे, यरुशलेमे, तर संदेष्टयांच्या घात करणाऱ्ये व तुझ्याकडे पाठविलेल्यांस धोंडमार करणाऱ्ये!........ पाहा, तुमचे घर तुम्हांवर सोडले आहे.' (मत्तय - २३:१३ ते ३८)

२१८. ही बनी इस्राईलची सर्वसाधारण स्थिती वर्णन केली गेली आहे की त्यांनी दुष्कृत्ये करण्याविषयी एकमेकांना मनाई करणे सोडून दिले होते, ज्याचा परिणाम असा झाला की विघ्न संतुष्ट लोकांचा उत्साह वाढला आणि बिघाड सर्व सामान्य झाला. यात मुस्लिम जाती समूहा करीता जबरदस्त तंबी आहे.

२१९. अर्थात त्यांना खऱ्या ईमान बाळगणाऱ्याशी तर वैर आहे पण काफीर! शी प्रेम वास्तव ते मुसलमानांचे वैरी बनलेले आहेत परंतु मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांशी त्यांनी मैत्री जोडली आहे.

आज हीच स्थिती मुनाफीक वृत्तीच्या मुसलमानांचीहि आहे. अशी की ते खऱ्या ईमान बाळगपणाऱ्यापासून उद्विग्न होतात आणि काफीर व अनेकेश्वरवाद्या कडे मैत्रीकरिता धाव घेतात.

२२०. अर्थात हे आपल्या या दाव्यात अगदी खोटे आहेत की आम्ही अल्लाह, प्रेषित व ईश-ग्रंथावर ईमान बाळगणारे आहोत. यास्तव आम्ही हजरत मूसाला अल्लाहचा पैगंबर व तौरातला ईश-ग्रंथ मानतो जर हे आपल्या दाव्यात सच्चे राहीले असते तर ईमान बाळगणाऱ्या (मुसलमानां) चे वैरी व काफीरांचे दोस्त बनले नसते कारण प्रत्येक जाती आपल्याच जाती सोबत उरत असते.

**काव्यासह कावळा, गरुडासह गरुड'**

२२१. अर्थात यहुदी आणि अनेकेश्वरवादी तर मुसलमानांशी वैर बाळगण्यात आकाशपाताळ एक करीत आहेत.

तथापि ख्रिश्चन तुम्हाला त्यांच्या तुलनेने मैत्री बाळगण्यात अधिक जवळ आढळतील आणि त्याचे कारण नंतरच्या वाक्यात स्पष्ट केल्याप्रमाणे हे आहे की यांच्यात ईश-भय बाळगणारे लोक अस्तित्वात आहेत. आणि वस्तुस्थिती ही आहे की क़ुरआनाच्या अवतरण-काळात ख्रिश्चनांच्या या गटाने इस्लाम मैत्रीचा पुरावा दिला आहे. म्हणून आयतीचा संकेत याच गटाकडे आहे. या संबंधाने प्रत्येक काळातील ख्रिश्चन अभिप्रेत घेणे योग्य नाही आणि इतिहास दर्शवितो की, ख्रिश्चनांनी वारंवार इस्लाम-शत्रूत्व व मुस्लिमांशी वैर असल्याचा पुरावा दिला आहे यास्तव उंदुलुस (स्पेन) च्या घटना सलीबी (क्रास) युद्धे याची स्पष्ट उदाहरणे होत. तद्वतच आजच्या काळातील सेक्युलरिझम वर विश्वास बाळगणारे ख्रिश्चन देखील याचे उदाहरण असू शकत नाही कारण ही गुणवैशिष्टये त्यांच्या अंगी नाहीशी झाली आहेत ज्यांचा उल्लेख या आयतीमध्ये झाला आहे.

२२२. राहीब म्हणजे विरक्त स्वरुपाचे ईशभय बाळगणारे लोक होत. आणि ते गर्व करीत नाहीत याचा अर्थ हा की त्यांच्यात अहंकार नाही म्हणून जेव्हा सत्य त्यांच्या समोर स्पष्टत: येते तेव्हा ते त्याला रद्द करीत नाही.

२२३. ही दशा त्या लोकांची वर्णिली गेली आहे जे ख्रिश्चनांच्या समुदायापैकी होते. परंतु त्यांच्या अंगी सत्य प्रियता होती. म्हणून जेव्हा त्यांनी क़ुरआन ऐकले तेव्हा त्यांनी जाणून घेतले की ही खरोखर ईश-वाणी होय आणि सत्याचा साक्षात्कार घडल्यामुळे आपोआप त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

ही सूरह अवतरित होण्याच्या बऱ्याच आधी म्हणजे हिजरत हब्शा (हि. स. ५) पसंगी ही. घटना घडली होती की जेव्हा हज़रत जाफर यांनी हब्शाधिपति नज्जाशीस सूरह मरीयमच्या प्रारंभिक आयती वाचून एकविल्या तेव्हा ईश-वाणी प्रभावाने त्याचे हृदय थरारले आणि मन उंचबळून येऊन आसवे वाहू लागलीत येथपावेतो की त्यांची दाढी भिजून चिंब झाली आणि दरबारात उपस्थित असलेले ख्रिस्ती धर्माध्यक्ष (Bishops) देखीळ रडू लागले, मग नज्जाशी म्हणाला ही वाणी आणि ईसावर अवतरीत झालेली वाणी एकाच पासून निघालेली दोन किरणे आहेत. (सिरतुन्नबी-इब्नेहिशाम ख.१पा.३५९)

वस्तुस्थिती ही आहे की जो मनुष्य सत्याकांसी असेल व क़ुरआनाचे अध्ययन करील त्याला क़ुरआनातच सत्याचा साक्षात्कार घडेल व आनंदातिरेकाने त्याचे डोळे पाणावतील यासाठी की ज्या अनमोल खजान्याचा शोध होता तो हाती लागला. ईश ग्रंथाची एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य हे आहे की त्यामुळे हृदयात कोमलत ची कैफियत निर्माण होते.

**आणि आम्ही अल्लाहवर व त्या सत्यावर जे आमच्याजवळ आले आहे. ईमान का बाळगू नये, जेव्हा आम्ही या गोष्टीचे इच्छुक आहोत की आमच्या पालनकर्त्याने आम्हाला सदाचरणी लोकांच्या समुदायात सामील करावे. तेव्हा अल्लाहने त्यांच्या या म्हणण्याचे प्रतिफळ म्हणून त्यांना असे बाग प्रदान केले ज्यांच्या खालून प्रवाह वाहतात. ते त्यांच्यात सदैव राहतील आणि सदाचरणाचे वर्तन अंगिकारणाऱ्यांकरिता हाच मोबदला आहे. *(अल-कुरआन)***

८४. आणि आम्ही अल्लाहवर व त्या सत्यावर जे आमच्याजवळ आले आहे. ईमान का बाळगू नये, जेव्हा आम्ही या गोष्टीचे इच्छुक आहोत की आमच्या पालनकर्त्याने आम्हाला सदाचरणी लोकांच्या समुदायात सामील करावे.[२२४]

وَمَا لَنَا لَا نُؤْمِنُ بِاللّٰهِ وَمَا جَآءَنَا مِنَ الْحَقِّ ۙ وَنَطْمَعُ اَنْ يُّدْخِلَنَا
رَبُّنَا مَعَ الْقَوْمِ الصّٰلِحِيْنَ ﴿٨٤﴾

८५. तेव्हा अल्लाहने त्यांच्या या म्हणण्याचे प्रतिफळ म्हणून त्यांना असे बाग प्रदान केले ज्यांच्या खालून प्रवाह वाहतात. ते त्यांच्यात सदैव राहतील आणि सदाचरणाचे वर्तन अंगिकारणाऱ्यांकरिता हाच मोबदला आहे.

فَاَثَابَهُمُ اللّٰهُ بِمَا قَالُوْا جَنّٰتٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ
فِيْهَا ؕ وَذٰلِكَ جَزَآءُ الْمُحْسِنِيْنَ ﴿٨٥﴾

८६. परंतु ज्या लोकांनी कुफ्र (इन्कार) केले आणि आमच्या आयतींना खोटे ठरविले ते जहन्नमी आहेत. [२२५]

وَالَّذِيْنَ كَفَرُوْا وَكَذَّبُوْا بِاٰيٰتِنَاۤ اُولٰٓئِكَ اَصْحٰبُ الْجَحِيْمِ ﴿٨٦﴾

८७. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! ज्या स्वच्छ शुद्ध वस्तू अल्लाहने तुमच्याकरिता हलाल केल्या आहेत त्यांना हराम ठरवू नका [२२६] आणि मर्यादेचे उल्लंघन करू नका [२२७] अल्लाह मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांना पसंत करीत नाही.

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَا تُحَرِّمُوْا طَيِّبٰتِ مَاۤ اَحَلَّ اللّٰهُ لَكُمْ
وَلَا تَعْتَدُوْا ؕ اِنَّ اللّٰهَ لَا يُحِبُّ الْمُعْتَدِيْنَ ﴿٨٧﴾

८८. आणि जी हलाल व शुद्ध उपजिविका अल्लाहने तुम्हाला दिली आहे त्यातून खा आणि अल्लाहचे भय बाळगा ज्यावर तुम्ही ईमान बाळगले आहे.

وَكُلُوْا مِمَّا رَزَقَكُمُ اللّٰهُ حَلٰلًا طَيِّبًا ۪ وَّاتَّقُوا اللّٰهَ الَّذِيْۤ
اَنْتُمْ بِهٖ مُؤْمِنُوْنَ ﴿٨٨﴾

८९. अल्लाह तुमच्या निश्चय रहित शपथांबद्दल तुम्हाला धरणार नाही तथापि ज्या शपथा तुम्ही जाणून बुजून खालल्या असतील त्यांच्याबद्दल तो अवश्य जाब विचारील. [२२८] याचा कफ़्फ़रा (प्रायश्चित)[२२९] हे आहे की दहा गोर गरीबांस जेऊ घाला, मध्यम प्रकारचे भोजन जे तुम्ही आपल्या कुटुंबियांना खाऊ घालता किंवा त्यांना कपडे नेसवा किंवा एक गुलाम मुक्त करा आणि ज्याला हे प्राप्त नसेल त्याने तीन दिवसाचे रोजे (उपवास) करावेत हा तुमच्या शपथांचा कफ़्फ़रा (प्रायश्चित) आहे, जेव्हा तुम्ही शपथ खाऊन बसावे,[२३०] आणि आपल्या शपथांचे रक्षण करीत जा.[२३१] अशा प्रकारे अल्लाह तुमच्या करिता आपले आदेश स्पष्ट करतो, अशासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे.

لَا يُؤَاخِذُكُمُ اللّٰهُ بِاللَّغْوِ فِيْۤ اَيْمَانِكُمْ وَلٰكِنْ يُّؤَاخِذُكُمْ
بِمَا عَقَّدْتُّمُ الْاَيْمَانَ ۚ فَكَفَّارَتُهٗۤ اِطْعَامُ عَشَرَةِ مَسٰكِيْنَ
مِنْ اَوْسَطِ مَا تُطْعِمُوْنَ اَهْلِيْكُمْ اَوْ كِسْوَتُهُمْ اَوْ تَحْرِيْرُ رَقَبَةٍ ؕ
فَمَنْ لَّمْ يَجِدْ فَصِيَامُ ثَلٰثَةِ اَيَّامٍ ؕ ذٰلِكَ كَفَّارَةُ اَيْمَانِكُمْ
اِذَا حَلَفْتُمْ ؕ وَاحْفَظُوْۤا اَيْمَانَكُمْ ؕ كَذٰلِكَ يُبَيِّنُ اللّٰهُ لَكُمْ
اٰيٰتِهٖ لَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿٨٩﴾

२२४. अर्थात जेव्हा आम्ही हे इच्छितो की सर्वश्रेष्ठ अल्लाहने आम्हास सदाचारी लोकांच्या समुदायात सामील करावे. तर याची ही निकड आहे की आम्ही धार्मिक गटबाजीना दूर सारुन सत्याचे स्वागत करावे.

२२५. संकेत आहे त्या ख्रिश्चनांच्या परिणितीकडे जे आपल्या कुफ्रवर अटळ राहतील आणि क़ुरआनाच्या आवाहनाला स्वीकार करणार नाहीत.

२२६. वर ''राहीब'' (ख्रिश्चन संन्यासी) लोकांचा उल्लेख आला होता. या संबंधाने येथे एक संभाव्य गैरसमजूतीचे निराकरण केले जात आहे. ख्रिश्चन सन्याशांनी स्वच्छ शुद्ध वस्तुपासून व उचित ऐहीक सुखापासून स्वत:ला वंचित ठेवण्याचा जो मार्ग पत्करला तो योग्य नाही. कुरआनचे अनुसरण करणाऱ्यांनी ख्रिस्ती संन्यास वृत्तीच्या या मार्गाचा अवलंब करून हलाल वस्तुना हराम ठरवू नये.

अत्यंत खेदाची गोष्ट आहे की क़ुरआनाच्या या स्पष्ट मार्गदर्शनानंतरहि मुसलमानांमध्ये संन्यास वृत्तीच्या चालीरिती तसव्वुफ (सुफीवाद) च्या नावाने प्रविष्ट झाल्या व मनाला मारण्यास आणि उचित सुखांपासून स्वत:ला वंचित ठेवण्यास जुहद (वैराग्य)समजले जाऊ लागले आणि एकांतवासाचे जीवन परहेजगारी संयमाचे जीवन समजले जाऊ लागले.

ईश्वराने हलाल ठरविलेल्या गोष्टीस हराम ठरविण्याची एक अवस्था ती आहे जी भारताच्या अनेकेश्वरवाद्यांनी मांसाहारा संदर्भात अंगिकारली आहे. यास्तव स्वच्छ शुद्ध जनावरांचे मांस खाण्यात त्यांना अत्याधिक किळस वाटते. आणि केवळ संशयाच्या आधारावर यापासून अशा प्रकारे पथ्य बाळगतात ज्या प्रकारे हराम वस्तुपासून पथ्य बाळगले जाते आणि इतरांनीहि यापासून पथ्य बाळगावे अशी त्यांची इच्छा असते.

२२७. मर्यादेंचे उल्लंघलन करण्याची एक अवस्था ही आहे की हलाल गोष्टीस हराम ठरविले जावे आणि दुसरी स्थितीही आहे की हलाल वस्तु वापरण्यात उधळपट्टी करावी.

२२८. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र.३३२ मध्ये आले आहे.

२२९. अर्थात शपथ तोडण्याचा कफ्फारा (प्रायश्चित) एखादे दुष्कृत्य हातून घडल्यानंतर त्या पापास मिटविण्याची जी पद्धत शरीयतने निर्धारीत केली आहे.अर्थात सदका वगैरे करणे यालाच कफ्फरा (प्रायश्चित) असे म्हणतात ज्याचा शाब्दिक अर्थ झाकणारी वस्तु आहे.

२३०. अर्थात शपथ खाल्ल्यानंतर जर तुम्ही ती तोडाल तर तुम्हाला याचे प्रायश्चित पार पाडावे लागेल.

२३१. अर्थात शपथ खाण्यात सावधगिरी बाळगा, आणि जेव्हा शपथ बद्ध व्हाल तेव्हा तिचे स्मरण असू द्या व तिची पूर्तता करा आणि जर तोडावे लागल्यास तिचे प्रायश्चित अदा करा. अर्थ हा की शपथेबाबत अगदी निर्धास्त असणे अत्यंत गैरजबाबदारीचे वर्तन होय.

९०. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! दारू, जुगार, मूर्ती स्थान व शकून बाण ही [२३२] सर्व गलिच्छ व सैतानी कामे होत यास्तव यापासून अलिप्त रहा. आशासाठी की तुम्ही सफल व्हावे.

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوٓا۟ إِنَّمَا ٱلْخَمْرُ وَٱلْمَيْسِرُ وَٱلْأَنصَابُ وَٱلْأَزْلَٰمُ
رِجْسٌ مِّنْ عَمَلِ ٱلشَّيْطَٰنِ فَٱجْتَنِبُوهُ لَعَلَّكُمْ تُفْلِحُونَ ٩٠

९१. सैतान तर हे इच्छितो की दारु आणि जुगारात व्यस्त ठेवून तुमच्या दरम्यान वैर व तिरस्कार निर्माण करावे आणि तुम्हाला अल्लाहच्या स्मरणापासून व नमाजपासून रोखावे [२३३] मग काय तुम्ही परावृत्त होणार ?

إِنَّمَا يُرِيدُ ٱلشَّيْطَٰنُ أَن يُوقِعَ بَيْنَكُمُ ٱلْعَدَٰوَةَ وَٱلْبَغْضَآءَ
فِى ٱلْخَمْرِ وَٱلْمَيْسِرِ وَيَصُدَّكُمْ عَن ذِكْرِ ٱللَّهِ وَعَنِ ٱلصَّلَوٰةِ ۖ فَهَلْ
أَنتُم مُّنتَهُونَ ٩١

९२. अल्लाहचे आज्ञापालन करा व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करा आणि सावधगिरी बाळगा. परंतु जर तुम्ही तोंड फिरविले तर जाणून असा की आमच्या पैगंबरावर फक्त स्पष्टरित्या संदेश पोहचविण्याची जबाबदारी होती.

وَأَطِيعُوا۟ ٱللَّهَ وَأَطِيعُوا۟ ٱلرَّسُولَ وَٱحْذَرُوا۟ ۚ فَإِن تَوَلَّيْتُمْ فَٱعْلَمُوٓا۟ أَنَّمَا
عَلَىٰ رَسُولِنَا ٱلْبَلَٰغُ ٱلْمُبِينُ ٩٢

९३. ज्या लोकांनी ईमान बाळगले व सदाचरण करीत राहिले त्यांनी जे काही खायले प्यायले होते त्यावर कसलीही पकड होणार नाही ज्याअर्थी त्यांनी संयम पत्करला, ईमान बाळगले व सदाचरण केले मग ईश-भय अंगिकारले आणि ईमान बाळगले. पुन्हा ईश भय पत्करले आणि सद्चारित्र्यशील [२३४] बनले आणि अल्लाह सद्चारित्र्यशील लोकांना पसंत करतो.

لَيْسَ عَلَى ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ وَعَمِلُوا۟ ٱلصَّٰلِحَٰتِ جُنَاحٌ فِيمَا طَعِمُوٓا۟
إِذَا مَا ٱتَّقَوا۟ وَّءَامَنُوا۟ وَعَمِلُوا۟ ٱلصَّٰلِحَٰتِ ثُمَّ ٱتَّقَوا۟ وَّءَامَنُوا۟ ثُمَّ ٱتَّقَوا۟
وَّأَحْسَنُوا۟ ۗ وَٱللَّهُ يُحِبُّ ٱلْمُحْسِنِينَ ٩٣

९४. हे ईमान बाळगणाऱ्यांनो !अल्लाह तुमची एखाद्या अशा शिकारद्वारे कसोटी घेईल जी तुमच्या हातांच्या व बाणांच्या नेम कक्षेत असेल [२३५] अशासाठी की अल्लाहने हे पहावे की कोण त्याचे न पाहता भय बाळगतो आणि ज्याने याऊपरान्त (मर्यादांचे) उल्लंघन केले त्याच्या करिता दुःखदायक शिक्षा आहे.

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ لَيَبْلُوَنَّكُمُ ٱللَّهُ بِشَىْءٍ مِّنَ ٱلصَّيْدِ تَنَالُهُۥٓ أَيْدِيكُمْ
وَرِمَاحُكُمْ لِيَعْلَمَ ٱللَّهُ مَن يَخَافُهُۥ بِٱلْغَيْبِ ۚ فَمَنِ ٱعْتَدَىٰ بَعْدَ
ذَٰلِكَ فَلَهُۥ عَذَابٌ أَلِيمٌ ٩٤

२३२. मूर्ति स्थानचे स्पष्टीकरण टीप क्र. २५ आणि शकून बाणचे स्पष्टीकरण टीप क्र. २६ मध्ये केले गेले आहे.

२३३. येथे दारु आणि जुगाराचे तीन महत्वपूर्ण हानी वर्णिले गेले आहेत.

एक हे की या गोष्टी आपसात द्वेष-वैमनस्याची आग भडकावितात. मद्याच्या संदर्भात, ते उत्तेजक तर आहेच पण बुद्धि आणि मनाला प्रभावित करणारेहि आहे म्हणून मद्य प्याल्यानंतर प्रकृतित प्रक्षोभ निर्माण होतो. आणि सूडाची आग प्रज्वलित होते. तसेच बुद्धि या स्थितीत नसते की मनुष्याने उचित निर्णय घ्यावा किंवा स्वत:वर नियंत्रण राखावे याच कारणास्तव मद्य प्राशनाच्या परिणामस्वरुपी अधिक प्रमाणात अपघात होतात व अपराधहि जणू मद्याचे व अपराधांचे जीवाभावाचे नाते आहे.

राहिला जुगार तर यात हार खाणाऱ्याच्या मनात जिंकणाऱ्या विरुद्ध कपटभाव निर्माण होतो कारण तो हे समजतो की त्याचा धन सत्य आणि न्यायाच्या आधारावर डाव जिंकणाऱ्याकडे गेला नाही, किंबहुना केवळ अवसर (Chance) लाभल्यामुळे असे घडले आहे. व्यापारात मनुष्य नुकसान भोगतो. परंतु हार खात नाही. या उलट जुगारात नुकसाना बरोबरच हार आवश्यक व अपरिहार्य आहे आणि हार-भावना माणसाच्या अंगी जिंकणाऱ्या विरुद्ध विकृत भावना निर्माण करते.

दुसरे असे की मद्ध आणि जुगार या दोन्हींचे वैशिष्ट्य हे आहे की ते माणसाला ईश-स्मरणापासून गाफील ठेवतात. आणि ही वस्तुस्थिती आहे की मद्यपी दुराचारात गर्क होऊन ते ऐश करीत राहिले. तद्वतच जुगारीच्या बुद्धिवर हार-जीतची कल्पना इतकी आच्छादीत असते की एक जबाबदारीचे जीवन जगण्याची जाणीव त्याच्या अंगी वाढीस लागतच नाही व संपूर्ण लक्ष ऐश करण्यात गुंतते.

तिसरे असे की ह्या गोष्टी नमाजपासून रोखतात. आणि सर्वसामान्यात: असे दिसून येते की मद्य आणि जुगाराचे रसिक नमाज़बाबत बेपर्वा असतात. वस्तुत: नमाज़ तोच मनुष्य पढतो ज्याचा आत्मा जागृत असतो. परंतु मद्य आणि जुगार तर माणसाच्या आत्म्याला निद्रीस्त करणाऱ्या गोष्टी आहेत मग असा मनुष्य नमाज़ करिता कशा प्रकारे उठून उभा राहू शकतो? अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ३१६, ३१७, ३१८, तसेच सूरह निसा टीप क्र.९७

स्पष्ट असावे की ''खमर'' याचा अर्थ पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविल्यानुसार नशा आणणारी प्रत्येक गोष्ट होय

كُلُّ مُسْكِرٍ خَمْرٌ وَ كُلُّ مُسْكِرٍ حَرَامٌ (مسلم كتاب الأشربة)

''अशी प्रत्येक वस्तु जी नशा पैदा करील खमर (मद्य) आहे आणि नशा आणारी प्रत्येक वस्तु हराम आहे'' (मुस्लिम किताबुल अश्रिबा)

दुसऱ्या हदीस च्या उल्लेखानुसार:

كُلُّ مَا اَسْكَرَ عَنِ الصَّلٰوةِ فَهُوَ حَرَامٌ (مسلم كتاب الأشربة)

''अशी प्रत्येक वस्तु जी नशा आणून नमाज़पासून रोखील ती हराम आहे'' (मुस्लिम किताबुल अश्रिबा)

तेव्हा असे दिसून आले की हराम असण्याचे मूळ कारण नशा आहे, म्हणून जी वस्तु नशा चढविणारी असेल ती 'खमर' अर्थात मद्य होय मग ते द्राक्षापासून तयार केलेले असो वा खजुरीपासून, जव पासून तयार केलेले असो किंवा गूळापासून. मग लोकांनी त्यास कोणतेहि नाव ठेवलेले असो (Beer, Whisky,Wine) या खेरीज मद्य म्हणून वापरले जाणारे अल्कोहोल व तत्सम सर्व वस्तुना मग त्या पातळ असोत वा घट्ट हाच आदेश लागू पडतो. तसेच हदीसमध्ये फर्माविले गेले की-

مَا اَسْكَرَ كَثِيْرُهٗ فَقِلِيْلُهٗ حَرَامٌ
(الترمذی ابواب الأشربة)

''ज्या वस्तु अधिक प्रमाण नशा (उन्माद) निर्माण करील तिचे अल्प प्रमाणहि हराम होय.'' (आत्तिर्मिज़ी अबवाबुल अश्रिबा)

हे अशाकरिता की हराम (निषिद्ध)वस्तुकडे प्रवृत्त न व्हावे आणि उत्पात-द्वार बंद व्हावे.

जुगारा बाबतहि ही गोष्ट समजून घेतली पाहिजे की देवघेवीचा असा प्रत्येक व्यवहार ज्याचा आधार केवळ निश्चितता व हार-जीतीवर असेल तर तो जुगार होय. मग तो सट्टा-स्वरुपात असो किंवा घोडयांच्या शर्यती Race च्या स्वरुपात असो अथवा अन्य एखाद्या स्वरुपात असो. वर्तमान काळातील लॉटरी हे देखील जुगाराचे सुधारीत स्वरुप होय. मग ती सरकारी लॉटरी (State Lotteries) का असेना.

२३४. अर्थात मद्य वगैरे च्या निषिद्धतेचा स्पष्ट व आवश्यक आदेश येण्यापूर्वी ज्या लोकांनी जे काही खाल्ले प्याले होते. त्यासंबंधी सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ काहिहि विचारणा होणार नाही. या अटीवर की त्यांनी प्रत्येक कसोटी प्रसंगी ईश-भय अनिश्चिलता व सदाचरणाचा सबूत दिला असेल. आयतीत तकवा (ईश-भय) ईमान व सदाचरणाचा जो वारंवार उल्लेख आला आहे तो या गोष्टीकडे संकेत करतो की अल्लाहच्या आदेशांची अमलबजावणी करण्या संदर्भात कसोटीचे

प्रसंग वारंवार आले आणि अल्लाहच्या त्या एकनिष्ठ दासांनी अशा प्रत्येक प्रसंगी परिपूर्ण निष्ठेचा पुरावा दिला.

२३५. एहराम-स्थितीत शिकार वर्ज्य असण्याचा आदेश आयत क्र. १ मध्ये येऊन गेला आहे. येथे या संदर्भात सचेत केले जात आहे की या बाबतीत तुमची कठीण परीक्षा होईल. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह असे प्रसंग निर्माण करील की शिकार तुमच्या बाणांच्या अगदी नेमात असेल, जर तुम्ही इच्छिल्यास सहजपणे शिकार करु शकता परंतु तुम्ही त्या स्थितीतहि अल्लाहचे भय बाळगले पाहिजे व शरीअत पालनाचे जे वचन तुम्ही दिले आहे त्यावर कायम रहावे.

कुरआनाच्या अवतरण काळात अरब लोकांकरिता प्रवासात शिकार करणे एक आवश्यक बाब होती, म्हणून या गोष्टीचे पालन करणे त्यांना सोपे नव्हते व त्यात त्यांची उघड परीक्षा होती.

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! एहराम-स्थितीत शिकार मारु नका आणि तुमच्यापैकी जो कोणी निश्चयपूर्वक मारुन टाकील तर त्याचा बदला हा आहे की गुराढोरांपैकी अशाच प्रकारचे जनावर-ज्याचा फैसला तुमच्यापैकी दोन न्यायी माणसे करतील-कुर्बानी करिता काबागृहाकडे पोहचवावे लागेल. किंवा हा कफ्फारा (प्रायश्चित्त) द्यावा लागेल की गोरगरीबांना जेऊ घालावे किंवा त्या प्रमाणात रोजे पाळावेत. अशासाठी की त्यानी आपल्या कृतकर्माचा स्वाद घ्यावा. यापूर्वी जे झाले ते अल्लाहने माफ केले, परंतु जो कोणी पुन्हा असे करील त्याला अल्लाह शिक्षा देईल. अल्लाह प्रभावशाली आणि शिक्षा देणारा आहे. *(अल-क़ुरआन)***

९५. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! एहराम-स्थितीत शिकार मारु नका [२३६] आणि तुमच्यापैकी जो कोणी निश्चयपूर्वक मारुन टाकील तर त्याचा बदला हा आहे की गुराढोरांपैकी अशाच प्रकारचे जनावर-ज्याचा फैसला तुमच्यापैकी दोन न्यायी माणसे करतील- कुर्बानी करिता काबागृहाकडे पोहचवावे लागेल.[२३७] किंवा हा कफ्फारा (प्रायश्चित्त) द्यावा लागेल की गोरगरीबांना जेऊ घालावे किंवा त्या प्रमाणात रोजे पाळावेत.[२३८] अशासाठी की त्यानी आपल्या कृतकर्माचा स्वाद घ्यावा. यापूर्वी जे झाले ते अल्लाहने माफ केले, परंतु जो कोणी पुन्हा असे करील त्याला अल्लाह शिक्षा देईल.[२३९] अल्लाह प्रभावशाली आणि शिक्षा देणारा आहे.

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ لَا تَقْتُلُوا۟ ٱلصَّيْدَ وَأَنتُمْ حُرُمٌ ۚ وَمَن قَتَلَهُۥ مِنكُم
مُّتَعَمِّدًا فَجَزَآءٌ مِّثْلُ مَا قَتَلَ مِنَ ٱلنَّعَمِ يَحْكُمُ بِهِۦ ذَوَا عَدْلٍ
مِّنكُمْ هَدْيًۢا بَٰلِغَ ٱلْكَعْبَةِ أَوْ كَفَّٰرَةٌ طَعَامُ مَسَٰكِينَ أَوْ عَدْلُ
ذَٰلِكَ صِيَامًا لِّيَذُوقَ وَبَالَ أَمْرِهِۦ ۗ عَفَا ٱللَّهُ عَمَّا سَلَفَ ۚ وَمَنْ عَادَ
فَيَنتَقِمُ ٱللَّهُ مِنْهُ ۗ وَٱللَّهُ عَزِيزٌ ذُو ٱنتِقَامٍ ﴿٩٥﴾

९६. तुमच्याकरिता समुद्राची शिकार व त्याची (म्हणजे समुद्रातील व नदीतील) खाद्य हलाल ठरविले गेले. [२४०] अशासाठी की तुम्हीहि लाभ घ्यावा व काफील्यावाल्यांनीहि, परंतु जमीनीवरील शिकार जोपर्यंत एहरामच्या स्थितीत आहात तोपर्यंत तुमच्यावर निषिद्ध आहे. अल्लाहचे भय बाळगा. ज्याच्यासमक्ष तुम्ही सर्व हजर केले जाल.

أُحِلَّ لَكُمْ صَيْدُ ٱلْبَحْرِ وَطَعَامُهُۥ مَتَٰعًا لَّكُمْ وَلِلسَّيَّارَةِ ۖ وَحُرِّمَ
عَلَيْكُمْ صَيْدُ ٱلْبَرِّ مَا دُمْتُمْ حُرُمًا ۗ وَٱتَّقُوا۟ ٱللَّهَ ٱلَّذِىٓ إِلَيْهِ
تُحْشَرُونَ ﴿٩٦﴾

९७. अल्लाहने आदरणीय काबागृहाला लोकांकरिता निवासाचे साधन बनविले आहे.[२४१] आणि आदरणीय महिन्यांना व कुर्बानीच्या जनावरांना व (कुर्बानीचे चिन्ह म्हणून) गळ्यात पट्टे असलेल्या जनावरांना देखील.[२४२] हे अशासाठी की तुम्हाला कळून यावे की जे काही आकाशात आहे व जे काही जमीनीत आहे ते सर्व अल्लाह जाणतो. आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे. [२४३]

جَعَلَ ٱللَّهُ ٱلْكَعْبَةَ ٱلْبَيْتَ ٱلْحَرَامَ قِيَٰمًا لِّلنَّاسِ وَٱلشَّهْرَ ٱلْحَرَامَ
وَٱلْهَدْىَ وَٱلْقَلَٰٓئِدَ ۚ ذَٰلِكَ لِتَعْلَمُوٓا۟ أَنَّ ٱللَّهَ يَعْلَمُ مَا فِى
ٱلسَّمَٰوَٰتِ وَمَا فِى ٱلْأَرْضِ وَأَنَّ ٱللَّهَ بِكُلِّ شَىْءٍ عَلِيمٌ ﴿٩٧﴾

९८. जाणून असा की अल्लाह कठोर शिक्षा देणाराही आहे, आणि मोठा माफ करणारा व दया करणाराही आहे.[२४४]

ٱعْلَمُوٓا۟ أَنَّ ٱللَّهَ شَدِيدُ ٱلْعِقَابِ وَأَنَّ ٱللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٩٨﴾

२३६. एहराम स्थितीत शिकार करण्याच्या मनाईत ही गोष्ट देखील सामील आहे की ज्या जनावरांची शिकार केली जाते त्यापैकी जर एखादे जनावर संयोगाने जवळ आल्यास व त्याला पकडून जबह केले जाऊ शकत असले तरी त्यास पकडणे व जबह करणे उचित ठरणार नाही.

२३७. अर्थात ज्या प्रकारचे जनावर त्याने मारले आहे त्या प्रकारचे जनावर जे पाळीव गुराढोरांपैकी असेल तर ते कुर्बानी करिता काबागृहास पाठवावे लागेल. उदाहरणार्थ जर हरणाला मारले असेल तर त्यासमान बकरी असू शकते आणि नील गाईशी समतुल्य गाय. तथापि कोणते जनावर समतुल्य आहे याचा फैसला ईमान बाळगणाऱ्यांपैकी दोन न्यायप्रिय माणसे करतील.

२३८. हा फैसला देखील दोन न्यायी माणसेच करतील की किती गोरगरीबांना जेऊ घालावे किंवा किती रोजे पाळावेत.

२३९. अर्थात कफ्फारा (प्रायश्चित्त) चा अर्थ हा नव्हे की माणसाने अवज्ञा करीत रहावे व प्रायश्चित्त करत रहावे आणि हे गृहीत धरावे की आखिरतमध्ये आपल्याला कोणतीहि शिक्षा होणार नाही.

२४०. अर्थात समुद्र आणि नदीतील प्राण्याची शिकार करणे एहराम अवस्थेतहि उचित आहे. तद्वतच त्यामुळे जे खाद्य लाभले असेल मग ती एहरामच्या अवस्थेत असणाऱ्याची शिकार केल्याने प्राप्त झालेले असो किंवा इतर कोणाची शिकार केल्याने प्राप्त झालेले असो ते सर्वांकरिता उचित आहे. 'तआमुह' (समुद्री खाद्य) हा शब्द या गोष्टीसहि प्रमाणित करतो की शिकार केल्याविना ज्या खाद्य वस्तु समुद्र किंवा नदी स्वत:हून बाहेर टाकतील तर त्याहि खाणे उचित होय.

२४१. अर्थात हे लोकांना एकत्रित करण्याचे केंद्र व त्यांच्या समस्त व्यस्तेचा कणा आहे. हज्ज आणि उमरा हे उपासना प्रकार याच्याशीच संबंधित आहे. नमाज़ करिता हे क़िबला आहे. धार्मिक उचित गोष्टी याच्याशीच संबंधित आहेत. येथे मार्गदर्शनाचा स्रोत वाहू लागतो. हे शांति गृह मानवतेचे आश्रय-स्थान आणि मिल्लत (इस्लामी समाज) संघटनेचे सर्वात महत्वपूर्ण साधन आहे.

२४२. या वस्तुचा आदेश आयत क्र.२मध्ये वर्णिला गेला आहे. येथे हे स्पष्ट केले जात आहे की काबागृहाच्या आदरा सोबत या गोष्टींचा आदर देखील आपल्या अंगी महत्वपूर्ण दूरदर्शिता बाळगून आहे म्हणून यांच्या आदर संदर्भात जे आदेश दिले गेले आहेत त्याकडे पूरेपूर लक्ष द्या.

२४३. अर्थात या प्रतिका ज्या महान उचित गोष्टी संबंधित आहेत त्यांना पाहून हा विश्वास निर्माण होतो की ज्या शक्तिने आदराची ही व्यवस्था कायम केली आणि बुद्धि कौशल्याने काठोकाठ भरलेली शरीअत अवतरीत केली. त्याला आकाश व जमीनीच्या प्रत्येक वस्तुस्थितीचे ज्ञान आहे आणि आपल्या ज्ञानाबाबत तो अगदी परिपूर्ण आहे.

२४४. या गोष्टीकडे संकेत आहे की जे लोक या प्रतिकांचा अनादर करतील ते शिक्षेस पात्र ठरतील आणि जे यांचा सन्मान करतील ते माफी आणि दयेस पात्र ठरतील.

مَا عَلَى الرَّسُوْلِ اِلَّا الْبَلٰغُ ۗ وَاللّٰهُ يَعْلَمُ مَا تُبْدُوْنَ
وَمَا تَكْتُمُوْنَ ﴿٩٩﴾

९९. पैगंबरावर केवळ संदेश पोहचविण्याची जबाबदारी आहे. आणि (लक्षात ठेवा) जे काही तुम्ही जाहीर करता व जे काही लपविता ते सर्व अल्लाह जाणतो.

قُلْ لَّا يَسْتَوِي الْخَبِيْثُ وَالطَّيِّبُ وَلَوْ اَعْجَبَكَ كَثْرَةُ
الْخَبِيْثِ ۚ فَاتَّقُوا اللّٰهَ يٰٓاُولِي الْاَلْبَابِ لَعَلَّكُمْ تُفْلِحُوْنَ ﴿١٠٠﴾

१००. सांगा अशुद्ध व शुद्ध दोन्ही समान होऊ शकत नाही मग अशुद्धतेची अधिकता तुम्हाला किती का चांगली वाटेना [२४५] तर हे बुद्धिमतानो ! अल्लाहचे भय बाळगा, अशासाठी की तुम्हाला सफलता प्राप्त व्हावी.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَا تَسْـَٔلُوْا عَنْ اَشْيَآءَ اِنْ تُبْدَ لَكُمْ
تَسُؤْكُمْ ۚ وَاِنْ تَسْـَٔلُوْا عَنْهَا حِيْنَ يُنَزَّلُ الْقُرْاٰنُ تُبْدَ
لَكُمْ ۗ عَفَا اللّٰهُ عَنْهَا ۗ وَاللّٰهُ غَفُوْرٌ حَلِيْمٌ ﴿١٠١﴾

१०१. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अशा गोष्टीबाबत प्रश्न विचारु नका ज्या तुम्हावर व्यक्त केल्या गेल्यास तुम्हाला अप्रिय वाटावे.[२४६] आणि जर तुम्ही त्याबाबत अशा वेळी प्रश्न विचाराल जेव्हा कुरआन अवतरित होत आहे तर त्या गोष्टी तुमच्यावर व्यक्त केल्या जातील. अल्लाहने या गोष्टीपासून माफ फर्माविले [२४७] आणि अल्लाह माफ करणारा व सहिष्णुता बाळगणारा आहे.

قَدْ سَاَلَهَا قَوْمٌ مِّنْ قَبْلِكُمْ ثُمَّ اَصْبَحُوْا بِهَا كٰفِرِيْنَ ﴿١٠٢﴾

१०२. या प्रकारचे प्रश्न तुमच्यापूर्वी एका समूहाने विचारले होते मग ते याचमुळे इन्कार करणारे झाले. [२४८]

مَا جَعَلَ اللّٰهُ مِنْۢ بَحِيْرَةٍ وَّلَا سَآئِبَةٍ وَّلَا وَصِيْلَةٍ وَّلَا حَامٍ ۙ
وَّلٰكِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا يَفْتَرُوْنَ عَلَى اللّٰهِ الْكَذِبَ ۗ
وَاَكْثَرُهُمْ لَا يَعْقِلُوْنَ ﴿١٠٣﴾

१०३. अल्लाहने ना बहीरा निर्धारीत केला आहे ना ''सायबा'' ना ''वसीला'' निर्धारीत केला आहे ना ''हाम''[२४९] परंतु काफीर खोटे रचून त्याच्या निर्देश अल्लाकडे करतात. आणि त्यांच्यापैकी बहुतेक निर्बुद्ध आहेत.

وَاِذَا قِيْلَ لَهُمْ تَعَالَوْا اِلٰى مَآ اَنْزَلَ اللّٰهُ وَاِلَى الرَّسُوْلِ قَالُوْا
حَسْبُنَا مَا وَجَدْنَا عَلَيْهِ اٰبَآءَنَا ۗ اَوَلَوْ كَانَ اٰبَآؤُهُمْ لَا يَعْلَمُوْنَ
شَيْـًٔا وَّلَا يَهْتَدُوْنَ ﴿١٠٤﴾

१०४. आणि जेव्हा यांना सांगितले जाते की या अशा गोष्टीकडे जी अल्लाहने अवतरीत केली आहे. आणि या प्रेषिताकडे तर ते म्हणतात आमच्या करिता तर तीच रीत पुरेशी आहे जिचे अनुसरण करतांना आम्ही आमच्या वाडवडीलांना पाहिले आहे. मग काय या स्थितीतहि (वाडवडीलांचे अनुसरण करत राहतील) की त्यांचे वाडवडील ना काही जाणत असावेत, ना सरळ मार्गावर राहीले असावेत ! [२५०]

२४५. येथे त्या चुकीच्या विचार सरणीवर प्रहार केला गेला आहे जी चांगल्या वाईटाबद्दल सर्वसामान्यापणे लोकांमध्ये दिसून येते जेव्हा एकाद्या दुराचाराचे चलन सर्वसामान्य होते तेव्हा त्याचे लोकांना मोठे आकर्षण वाटू लागते, मग ते त्याच्या दिशेने धाव घेतात, आणि मग त्यांना पवित्र व अपवित्रतेचा विवेक बाळगण्याची गरज भासत नाही किंवा हराम काय व हलाल काय याचीहि त्यांना चाड रहात नाही. परंतु दुराचाराची विपुलता पाहून प्रभावित होणे हे असमंजस लोकांचे काम होय. समंजस लोकांचे नव्हे, कारण बुद्धि व स्वभाव चांगल्या वाईटास समान लेखत नाही किंवा चांगल्या आणि वाईट माणसाना एकाच पातळीवर आणत नाही. ती दूध आणि शेण व मध आणि मद्यात फरक करते व घाणीचे प्रमाण कितीही जास्त असले तरी त्याची घृणाच करते.

ही तात्विक वस्तुस्थिती येथे केवळ अशासाठी स्पष्ट केली गेली आहे की शरीयतने ज्या वस्तूना अशुद्ध व हराम ठरविले आहे त्यात लोकांनी स्वत:ला केवळ एवढ्यासाठी गुरफटून घेऊ नये की अगणित लोक त्या वस्तूंवर तुटून पडत आहेत किंवा काळाची हीच दिशा आहे.

२४६. अर्थात शरीअतच्या आदेशाबाबत अनावश्यक प्रश्न विचारु नका. कारण याच्या परिणाम स्वरूपी बंधनात वृद्धि होईल. ही आणि या प्रकारच्या दुसऱ्या आयतीद्वारे कुरआनने आपले अनुसरण करणाऱ्यांची जी बुद्धि बनविली आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या सहानुयायींचे ज्या प्रकारे चारित्र्य घडविले तिचे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य हे होते की ते विशुद्ध अंत:करणाने शरीअतच्या आदेशांचे पालन करण्यास तत्पर असत. आणि तिच्या उद्दिष्ट पूर्तते करिता भरसक प्रयत्न करीत. अनावश्यक वाद निर्माण करण्यात व वादजन्य गोष्टी उकरून काढण्यात त्यांना स्वारस्य नव्हते कारण उकरून काढण्यात व उणू रेणू करण्यात ती व्यपकता जी आदेशांच्या संदर्भात शरीअतच्या विचाराधीन आहे. बाकी रहात नाही. उलट संकुचितता निर्माण होते. परंतु नंतरच्या काळात हे वैशिष्ट कमी होत गेले व जो स्वभाव घडला तो पैगंबरांच्या सहवासात असलेल्या अनुयायींच्या स्वभावाशी सुसंगत नव्हता. यास्तव एका विशिष्ट प्रकारची फिक्ह संबंधित विचार सरणी वाढीस लागली आणि जेव्हा उहापोह सुरु झाला व अधिक विवरणात बुद्धि गुरफट्ट लागली तेव्हा आचरण कमी आणि गोष्टी अधिक होऊ लागल्या आणि एका विशिष्ट वर्गाला तर खोद खोदून प्रश्न विचारण्यात, वाळूचे तेल काढण्यात आणि अनावश्यक व काल्पनिक पेच निर्माण करण्यात अशी निपुणता प्राप्त झाली जशी वर्तमान काळात कायदे पंडितांना व वकीलांना प्राप्त असते. यास्तव धर्म शास्त्राच्या ग्रंथामध्ये याची अगणित उदाहरणे मिळतील. उदाहरणार्थ हा प्रश्न की एखादा मनुष्य हज्ज करिता जाईल आणि सफ़ा व मरवाच्या दरम्यान नग्न होऊन सई (धावपळ) करील तर त्याची सई अदा होईल किंवा नाही? आता उघड आहे की हा एक कल्पित प्रश्न आहे कारण जो मनुष्य हज्ज करिता जाईल तो असले निर्लज्जतेचे कृत्य का म्हणून करील अथवा हा प्रश्न की जर कोणी अजान देत असतांना मध्येच मुर्तद (धर्मविमुख) झाल्यास दुसरा मोअज्जिन (अज़ान देणाऱ्या) ने अज़ान कोठून सुरु करावी? निश्चितच ही समस्या पूर्वी कधी उद्भवली नसेल ना कियामतीपर्यंत तिच्या उद्भवण्याची शक्यता आहे. तद्वतच हा प्रश्न की जर एखाद्याने आपल्या पत्नीस म्हटले की तुझ्या हाताला तलाक किंवा तुझ्या पायाला तलाक किंवा तुझ्या डोक्याला तलाक तर तलाक (घटस्फोट) खरोखर झाला किंवा नाही? किंवा जर एखाद्याने आपल्या पत्नीस म्हटले की आकाशात जेवढे तारे आहेत तुला तेवढेच तलाक तर किती तलाक झाले? किंवा हा प्रश्न की एखादा मनुष्य आपल्या अनौरस कन्येशी निकाह करु शकतो किंवा नाही? जेव्हा या प्रकारचे प्रश्न निर्माण केले गेले तेव्हा याचा परिणाम अपरिहार्यत: बुद्धीवर व चारित्र्यावर पडला आणि मग ती विचारप्रणाली तो स्वभाव आणि तो आत्मा बाकी राहिला नाही जो पूर्वी इस्लाम अनुयायींचा होता. हदीसमध्ये उल्लिखित आहे की.

وَسَكَتَ عَنْ اَشْيَاءَ مِنْ غَيْرِ نِسْيَانٍ فَلَا تَبْحَثُوْا عَنْهَا۔ (مشکوٰۃ کتاب الایمان باب الاعتصام)

''आणि अल्लाहाने काही गोष्टीबाबत मौन अंगिकारले आहे. याखेरीज की त्याला विस्मरण घडले असेल तर अशा गोष्टी उकरु नका.'' अन्य एका हदीसच्या उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अधिकाधिक प्रश्न विचारण्यास मनाई करीत असत.(मुस्लिम किताबुल ईमान बाबुल इतेसाम)

एका प्रसंगी पैगंबरानी फर्माविले ''लोकहो, तुम्हावर हज्ज अनिवार्य कर्तव्य ठरविले गेले आहे, म्हणून हज्ज करा तो इसम म्हणाला, हे अल्लाहचे प्रेषित काय दरवर्षी? त्यावर पैगंबर गप्प राहिले त्या व्यक्तिने आपला प्रश्न तीनदा उच्चारला तेव्हा पैगंबरांनी फर्माविले जर मी होय म्हटले असते तर तुमच्यावर अनिवार्य कर्तव्य ठरले असते. मग तुम्ही ते अमलात आणू शकले नसते. पुढे प्रेषितांनी फर्माविले मी तुम्हाला ज्या स्थितीत सोडेन त्याच स्थितीत तुम्ही मला सोडा कारण तुमच्या पूर्वीचे लोक, अत्यधिक प्रश्न व आपल्या प्रेषितांशी मतभेद बाळगल्यामुळे नाश पावले यास्तव जेव्हा मी तुम्हाला एखाद्या गोष्टीचा आदेश देईन तर यथाशक्ति तुम्ही तो अमलात आणा, आणि जेव्हा

एखादया गोष्टीपासून वर्ज्य करीन तर ती सोडून द्या.''

(मुस्लिम किताबुल हज्ज, बाब ७३)

२४७. असे दिसून येते की शरीअत -आदेशांच्या विवरणा संबंधाने काही लोकांनी अनावश्यक प्रश्न विचारले होते. या संदर्भात फर्मािवले की अल्लाहने त्यांना माफ केले तथापि यापुढे त्यांनी सावधगिरी बाळगावी.

२४८. येथे संकेत यहुदींकडे आहे ज्यांनी प्रश्नांचा भडीमार करुन आपल्याकरिता अडचणी निर्माण केल्या आणि आदेशांच्या विवरणात अशा प्रकारे गुरफटले की व्यर्थ उहापोह करुन आपल्या करिता जोखंडे - निर्माण केलीत व मग त्यात अशा प्रकारे गुरफटून गेले की शेवटी अवज्ञाकारी व सत्याचा इन्कार करणारे झाले. सूरह बकरामध्ये आयत क्र. ६७ ते ७१ पर्यंत गायीचा किस्सा वर्णिला गेला आहे. जेव्हा यांना जबह करण्याचा आदेश दिला गेला तेव्हा यांनी वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न विचारुन शरीअतच्या सहज सोप्या आदेशास अवघड बनविले आणि आपल्यावरील बंधनात वृद्धि करवून घेतली.

२४९. अर्थात अल्लाहने या गोष्टी धर्मशास्त्र-संमत केल्या नाहीत. या गोष्टी भ्रामिक बाबीपैकी आहेत आणि शरीअत दृष्ट्या त्यांची कहीहि योग्यता नाही. ''बहीरा'' ''सायबा'' ''वसीला'' व ''हाम'' ही त्या जनावरांची नावे आहेत ज्यांना अनेकेश्वरवादी शुभकर समजून देवी देवतांच्या नावाने सोडून देत असत ''बहीरा'' त्या सांडणीला म्हणत जिचे पाचवे पिलू नर असे अशा प्रकारच्या सांडणीला कान चिरुन तिला मूर्त्याच्या नावावर मोकळे सोडून देत, ना तिच्यावर स्वर होत ना तिचे दूध काढीत व ना तिला जबह करीत. ''सायबा'' अशा उंटाला किंवा सांडणीला म्हणत जी एखाद्याचा नवस पूरा झाल्यानंतर किंवा आजारी इसम स्वास्थपूर्ण झाल्यावर कृतज्ञता दर्शविण्याच्या हेतुने देवीदेवतांच्या नावाने मुक्त सोडली जात असे मग त्या उंटाकडून वा सांडणीकडून स्वारीचे काम घेतले जात नसे.

''वसीला'' अशा बकरीला म्हणत जी एका निश्चित निर्धारीत संख्येने पिलांना जन्म देई आणि शेवटी नर व मादी एकाच वेळी जन्माला येत अशा बकरीचे दूध स्त्रीयांना हराम (अवैध) असे व तिला देवी देवतांच्या नावे मुक्त सोडून देत.

''हाम'' अशा उंटाला म्हणत ज्याच्यापासून दहा पिले जन्माला आलेली असत. अशा उंटाला मूर्तीच्या नावाने मुक्त सोडून देत व त्यापासून कोणतेहि काम घेणे उचित समजत नसत.

हि सर्व खोडसाळ वृत्ती व भ्रमपूजा होती आणि ही पद्धति हदीसच्या उल्लेखानुसार अज्ञान काळात अम्र बिन आमिर खजाई याने प्रचलित केली होती.

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्मािवले की मी अम्र बिन आमिर खजाई ला अशा स्थितीत पाहिले की तो जहन्नम मध्ये आतड्या घसडीत आहे. तो पहिला मनुष्य होय ज्याने ''सायबा'' (देवतांच्या नावाने जनावरांच्या मुक्त सोडण्या) ची पद्धत प्रचारात आणली.''(बुखारी किताबुल तफसीर)

आज देखील अनेकेश्वरवादी देवी देवतांच्या नावाने गाय बैल इत्यादि शुभकर समजून मोकळे सोडतात. आणि मुसलमानांमध्येहि जे लोक शिर्क व बिदअतग्रस्त आहेत ते बकरे वगैरे पीर किंवा वलीच्या नावाने मुक्त सोडतात. या सर्व दोषांपासून अल्लाहची शरीअत मुक्त आहे.

२५०. अर्थात एखादी पद्धत पूर्वजांपासून चालत येणे किंवा संस्कृतिचे अंग असणे या गोष्टीचा पुरावा नव्हे की ती पद्धत उचित आहे व मार्गदर्शनावर आधारीत आहे जर एखाद्याचे पूर्वज ज्ञान प्रकाशापासून किंवा मार्गदर्शनापासून वंचित राहीले असतील तर त्यांचे अंधानुकरण कितपत बुद्धिमत्तेचे आहे?

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! आपली काळजी वाहा जर तुम्ही सरळ मार्गावर आहात तर इतरांच्या मार्गभ्रष्ट होण्याने तुमचे काहीहि बिघडू शकत नाही  तुम्हा सर्वांना अल्लाह कडेच परतून जायचे आहे मग तो तुम्हाला दर्शवील की तुम्ही काय करीत राहिलात.** *(अल् -कुरआन)*

**१०५.** हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! आपली काळजी वाहा जर तुम्ही सरळ मार्गावर आहात तर इतरांच्या मार्गभ्रष्ट होण्याने तुमचे काहीहि बिघडू शकत नाही [२५१] तुम्हा सर्वांना अल्लाह कडेच परतून जायचे आहे मग तो तुम्हाला दर्शवील की तुम्ही काय करीत राहिलात.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا عَلَيْكُمْ أَنفُسَكُمْ ۖ لَا يَضُرُّكُم مَّن ضَلَّ إِذَا
اهْتَدَيْتُمْ ۚ إِلَى اللَّهِ مَرْجِعُكُمْ جَمِيعًا فَيُنَبِّئُكُم بِمَا كُنتُمْ تَعْمَلُونَ ﴿١٠٥﴾

**१०६.** हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा तुमच्या पैकी एखाद्याचे मरण येऊन ठेपले तर मृत्युलेख करते वेळी तुमच्या दरम्यान साक्ष (अशा प्रकारे ) आहे की तुमच्यापैकी दोन न्यायी (विश्वासर्ह) माणसांना साक्षीदार बनविले जावे [२५२] किंवा जर तुम्ही प्रवासात असाल व मरणाचे संकट येऊन पोहचेल तेव्हा मुस्लिमेतरांपैकी दोन माणसांना साक्षीदार बनविले जावे (मग) [२५३] तुम्हाला संशय वाटल्यास त्यांना नमाज नंतर थांबवून घ्या [२५४] आणि त्यांनी अल्लाहची शपथ घेऊन सांगावे की आम्ही कोणत्याही किंमतीवर साक्षी चा सौदा करणार नाही मग कोणी आमचा नातेवाईक का असेना आणि आम्ही अल्लाहची साक्ष लपविणार नाही जर आम्ही असे केले तर गुन्हेगार ठरू.[२५५]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا شَهَادَةُ بَيْنِكُمْ إِذَا حَضَرَ أَحَدَكُمُ الْمَوْتُ
حِينَ الْوَصِيَّةِ اثْنَانِ ذَوَا عَدْلٍ مِّنكُمْ أَوْ آخَرَانِ مِنْ غَيْرِكُمْ إِنْ
أَنتُمْ ضَرَبْتُمْ فِي الْأَرْضِ فَأَصَابَتْكُم مُّصِيبَةُ الْمَوْتِ ۚ
تَحْبِسُونَهُمَا مِن بَعْدِ الصَّلَاةِ فَيُقْسِمَانِ بِاللَّهِ إِنِ ارْتَبْتُمْ
لَا نَشْتَرِي بِهِ ثَمَنًا وَلَوْ كَانَ ذَا قُرْبَىٰ ۙ
وَلَا نَكْتُمُ شَهَادَةَ اللَّهِ إِنَّا إِذًا لَّمِنَ الْآثِمِينَ ﴿١٠٦﴾

**१०७.** मग जर असे दिसून आले की त्या दोघांनी (हक्क हिरावून घेण्याचा) गुन्हा केला आहे तर त्यांच्या जागी दोन अन्य माणसांनी जी साक्ष देण्यास अधिक पात्र आहेत त्या लोकांमधून उभे रहावे ज्यांचा हक्क हिरावला गेला आहे [२५६] आणि त्यांनी अल्लाहची शपथ घेऊन म्हणावे की आमची साक्ष त्यांच्या साक्षीहून अधिक दुरुस्त आहे आणि आम्ही कसलाहि अतिरेक केला नाही जर आम्ही असे केले तर अत्याचारी ठरू.[२५७]

فَإِنْ عُثِرَ عَلَىٰ أَنَّهُمَا اسْتَحَقَّا إِثْمًا فَآخَرَانِ يَقُومَانِ مَقَامَهُمَا
مِنَ الَّذِينَ اسْتَحَقَّ عَلَيْهِمُ الْأَوْلَيَانِ فَيُقْسِمَانِ بِاللَّهِ
لَشَهَادَتُنَا أَحَقُّ مِن شَهَادَتِهِمَا وَمَا اعْتَدَيْنَا إِنَّا إِذًا
لَّمِنَ الظَّالِمِينَ ﴿١٠٧﴾

**१०८.** या पद्धतिने अधिक आशा बाळगली जाऊ शकते की ते यथायोग्य साक्ष देतील किंवा या गोष्टीपासून भय बाळगतील की त्यांच्या शपथानंतर काही शपथा रद्द न केल्या जाव्यात [२५८] अल्लाहचे भय बाळगा आणि ऐका अल्लाह अवज्ञा करणाऱ्यांना सरळ मार्गाचा लाभ घडवित नाही.

ذَٰلِكَ أَدْنَىٰ أَن يَأْتُوا بِالشَّهَادَةِ عَلَىٰ وَجْهِهَا أَوْ يَخَافُوا أَن
تُرَدَّ أَيْمَانٌ بَعْدَ أَيْمَانِهِمْ ۗ وَاتَّقُوا اللَّهَ وَاسْمَعُوا ۗ وَاللَّهُ
لَا يَهْدِي الْقَوْمَ الْفَاسِقِينَ ﴿١٠٨﴾

२५१. अर्थात ज्याअर्थी अल्लाहच्या प्रेषिताने यांच्यावर प्रमाण प्रस्थापित केले, तरीदेखील ते मार्गभ्रष्टतेत पडून राहू इच्छितात तर त्यांना त्यांच्या दशेवरच सोडा, त्यांचा हट्टीपणा त्यांनाच दुष्परिणिती प्रत पोहचविल तुम्ही सन्मार्गावर अटळ राहिल्यास ते तुम्हाला कसलेहि नुकसान पोहचवू शकत नाही.

याचा हा अर्थ नव्हे की माणसाने फक्त स्वत:ची काळजी घ्यावी व इतरांच्या सुधारणे बाबत व त्यांना मार्ग दर्शन करण्याबाबत बेपर्वा व्हावे. क़ुरआनने मुस्लिम जाती समूहावर सत्याची साक्ष, इस्लामचे आवाहन सत्योपदेश आणि सत्कर्म आदेश व दुष्कर्मास प्रतिबंध घालण्याची जबाबदारी टाकली आहे आणि या जबाबदारीस पार पाडणे माणूस मार्गदर्शन प्राप्त असल्याची स्पष्ट निकड आहे.

म्हणूनच या आयतीचा असा अर्थ घेणे की ज्यामुळे उपरोक्त जबाबदाऱ्या लोप पावतील तर कदापि योग्य नाही या संदर्भात कसल्याही प्रकारची गैर समजूत नसावी म्हणून हजरत अबू बकर सिद्दीक (रज़ि.) यांनी आपल्या प्रवचनात फर्माविले होते.

''लोक हो ! तुम्ही ही आयत वाचता आणि मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना फर्मावितांना ऐकले आहे की जेव्हा लोकांची अशी अवस्था व्हावी की त्यांनी अत्याचारीस पहावे व त्याचा हात न धरावा तर अशक्य नव्हे की अल्लाहने त्यांना शिक्षेत ग्रस्त करावे.'' (तिर्मिजी अबवाबुत तफसीर)

२५२. अर्थात जेव्हा एखादी व्यक्ति मरणासन्न असल्याचे आढळून यावे व त्याने मृत्युपत्र करण्याची इच्छा व्यक्त करावी किंवा मृत्युपत्र करणे त्याच्या करीता अत्यावश्यक असावे तर त्याने मुसलमानांपैकी दोन विश्वासाई (धार्मिक वृत्तीच्या) माणसांना या करीता साक्षीदार बनवावे.

मृत्युपत्र आपल्या मालमत्तेचेहि असू शकते व या गोष्टीचेहि असू शकते की माझ्याजवळ अमुक अमुक इसमांच्या अमुक अमुक अमानती आहेत व त्या त्यांच्या हवाली केल्या जाव्यात तसेच कर्ज़ व अत्यावश्यक देणींची फेड करण्यासंबंधी असू शकते. मृत्युपत्राच्या धर्मशास्त्रीय मर्यादांचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. २९ मध्ये आहे.

स्पष्ट असावे की, मृत्युपत्र जर तोंडी (Oral will) असेल तर ते इस्लाममध्ये उचित आहे. आणि जर लिखित स्वरुपात असेल तर अधिक चांगले. अर्थात त्या काळात लिहिण्या वाचण्याची पद्धत सर्वसामान्य नव्हती आणि लेखन सामुग्री सहजपणे प्राप्त होऊ शकत नव्हती म्हणून क़ुरआनने मृत्युपत्राकरिता लेखनाचे बंधन ठेवले नाही तथापि याकरिता दोन प्रामाणिक मुसलमानांना साक्षीदार बनविणे आवश्यक ठरविले आहे.

२५३. अर्थात जर प्रवासात मरणाचे संकट समोर आले व त्यावेळी साक्षीदार बनविण्याकरिता दोन मुसलमान मिळेनासे झाले आहेत तर मुस्लिमेतरांपैकी दोन व्यक्तिंना साक्षीदार बनविले जाऊ शकते अर्थात ही स्थिती अगतिकतेची असेल म्हणून इस्लामने हिची भीड बाळगली आहे.अन्यथा साक्षीदारांच्या संदर्भात खरे स्तर तेच आहे जे वर वर्णिले गेले आहे.

स्पष्ट असावे की मुस्लिमेतरांपैकी केवळ त्याच लोकांची साक्षी करिता निवड केली जाऊ शकते जे ईश्वराला मानणारे असावेत व वेळप्रसंगी त्याची शपथ घेऊन निवेदन देऊ शकत असावेत राहिले ते लोक जे ईश्वराला मानणारेच नाही ते कोणत्याही स्थितीत साक्षीदार बनविण्यायोग्य नाहीत. याचा पुरावा आयतीचा तो मजकूर होय जो पुढे वर्णिला गेला आहे.

२५४. अर्थात जेव्हा मृत्युपत्र करणाऱ्याचे निधन झाले असावे व त्याच्या मृत्युपत्रास अंमलात आणण्याची समस्या समोर असावी आणि साक्षीदारांच्या निवेदना संबंधी संश्य निर्माण व्हावा त्यांना नमाज़ नंतर थांबवून त्यांच्याकडून शपथपूर्वक निवेदन घेतले जावे. नमाज नंतर, म्हणजे फर्ज नमाजीपैकी कोणत्याही नमाज नंतर, अशासाठी की साक्षीदारांनी जबाबदारीच्या पूर्ण जाणीवेसह शपथपूर्वक निवेदन द्यावे.

२५५. या शपथपूर्वक निवेदन सोबत त्यांना मृत्युपत्र संदर्भात साक्ष मांडावी लागेल. या निवेदनात या गोष्टीचा विश्वास द्यावयाचा आहे की त्यांनी लाच स्वीकारून किंवा आपल्या एखाद्या व्यक्तिगत लाभाच्या आधारे अथवा आपल्या एखाद्या नातेवाईकाची तरफदारी करण्याच्या हेतून मृत्युपत्र-व्यवहारात आपल्या तर्फे कोणताही फेर बदल केला नोही.

२५६. अर्थ हा की मजबूत लक्षणे वा परिस्थितीच्या साक्षी आधारे वारसदारांना हे उघड कळून यावे की मृत्युपत्राच्या साक्षीदारांनी चुकीचे निवेदन दिले आहे किंवा मृत्युपत्र करणाऱ्याने जी अनामत त्यांच्या हवाली केली होती आणि प्रवासात असले प्रसंग घडणे अपेक्षितच आहे की मरणाऱ्या इसमाने आपली साधन सामुग्री वगैरे आपल्या साक्षीदारांच्या हवाली करून हे मृत्युपत्र करावे की या वस्तू माझ्या वारसदारांना पोहचवा - यात त्यांनी अफरातफर केली असल्यास त्या वारसदारांपैकी दोन व्यक्ति ज्या साक्ष देण्यासंबंधाने अधिक पात्र असाव्यात उल्लिखित साक्षीदारांच्या जागी शपथ पूर्वक निवेदन देण्याकरिता उभे व्हावे.

२५७. यांच्या या शपथपूर्वक खंडन केलेल्या निवेदनानंतर मृत्युपत्राच्या साक्षीदारांची साक्ष रद्द होईल आणि या व्यवस्थापनीय व्यवहाराचा निर्णय त्या लोकांच्या निवेदनानुसार होईल ज्यांचा हक्क हिरावून घेतला गेला आहे.

यावरून इस्लामच्या साक्ष-पद्धति संबंधाने ही तात्विक

गोष्ट स्पष्ट होते की काही स्थितीत परिस्थितीची साक्ष (Circumstancial evidence) मान्य करण्याजोगी आहे, एवढेच नव्हे तर या आधारे साक्षी रदबातल देखील केल्या जाऊ शकतात, मात्र या अटीवर की याचे समर्थन शपथपूर्वक निवेदन द्वारे झालेली असावे.

२५८. साक्षीची जी पद्धत येथे वर्णिली गेली आहे ती दोन महत्वपूर्ण बाबींवर आधारीत आहे. एक शपथ पूर्वक निवेदन व दुसरी खोडून काढलेल्या शपथा ही पद्धत सर्वात अधिक प्रसंगोचित आहे कारण हिचा विचार करता साक्षीदार सावधगिरी बाळगतील, आणि याथायोग्य साक्ष देतील अन्यथा त्यांना या गोष्टीचे भय राहील की कदाचित खोडून काढलेल्या शपथांद्वरे यांच्या साक्षींना रद्द न केले जावे.

**ज्या दिवशी अल्लाह सर्व रसूलांना (प्रेषितांना) एकत्रित करील व विचारील की तुम्हाला काय उत्तर मिळाले ? ते निवेदन करतील आम्हाला काहीहि ज्ञान नाही. तुच अपरोक्ष गोष्टींना जाणणारा आहेस. *(अल-क़ुरआन)***

१०९. ज्या दिवशी अल्लाह सर्व रसूलांना (प्रेषितांना) एकत्रित करील व विचारील की तुम्हाला काय उत्तर मिळाले ? [२५९] ते निवेदन करतील आम्हाला काहीहि ज्ञान नाही. तुच अपरोक्ष गोष्टींना जाणणारा आहेस.[२६०]

يَوْمَ يَجْمَعُ اللّٰهُ الرُّسُلَ فَيَقُوْلُ مَاذَآ اُجِبْتُمْ ۭ قَالُوْا لَا عِلْمَ
لَنَا ۭ اِنَّكَ اَنْتَ عَلَّامُ الْغُيُوْبِ ١٠٩

११०. (तो दिवस) जेव्हा अल्लाह फर्माविल हे मरीयम-पुत्र ईसा [२६१] माझ्या त्या देणगीचे स्मरण करा ज्याद्वारे मी तुम्हाला व तुमच्या मातेला उपकृत केले होते. जेव्हा मी (पवित्र आत्मा) द्वारे [२६२] तुमची मदत केली, तुम्ही पाळण्यात देखील. लोकांशी संभाषण करीत व मोठ्या वयात देखील [२६३] आणि जेव्हा मी तुम्हाला ग्रंथ व बुद्धिकौशल्य आणि तौरात व इंजीलची शिकवण दिली आणि जेव्हा तुम्ही माझ्या आज्ञेने मातीपासून पक्षीसारखी आकृति बनवित व त्यांत फुंक मारीत तर ती माझ्या आज्ञेने पक्षी बनत असे [२६४] आणि तुम्ही माझ्या आज्ञेने जन्मजात आंधळ्याला व महारोग्याला (कोढीला) चांगले करीत असत. [२६५] आणि जेव्हा तुम्ही मुडद्यांना माझ्या आज्ञेने जिवंत करून उभे करीत. [२६६] आणि जेव्हा मी बनी इस्राईल (च्या हातांना) तुमच्यापासून रोखले होते [२६७] जेव्हा तुम्ही त्यांच्याजवळ स्पष्ट निशाण्या घेऊन पोहचले होते आणि जे लोक यांच्यापैकी काफीर होते त्यांनी असे म्हटले होते की ही उघड उघड जादूगिरी आहे, याखेरीज काहीहि नाही.[२६८]

اِذْ قَالَ اللّٰهُ يٰعِيْسَى ابْنَ مَرْيَمَ اذْكُرْ نِعْمَتِيْ عَلَيْكَ وَعَلٰي
وَالِدَتِكَ ۘ اِذْ اَيَّدْتُّكَ بِرُوْحِ الْقُدُسِ ۣ تُكَلِّمُ النَّاسَ
فِي الْمَهْدِ وَكَهْلًا ۚ
وَاِذْ عَلَّمْتُكَ الْكِتٰبَ وَالْحِكْمَةَ وَالتَّوْرٰىةَ وَالْاِنْجِيْلَ ۚ وَاِذْ
تَخْلُقُ مِنَ الطِّيْنِ كَهَيْـَٔةِ الطَّيْرِ بِاِذْنِيْ فَتَنْفُخُ فِيْهَا
فَتَكُوْنُ طَيْرًۢا بِاِذْنِيْ وَتُبْرِئُ الْاَكْمَهَ وَالْاَبْرَصَ بِاِذْنِيْ ۚ
وَاِذْ تُخْرِجُ الْمَوْتٰى بِاِذْنِيْ ۚ وَاِذْ كَفَفْتُ بَنِيْٓ اِسْرَاۗءِيْلَ عَنْكَ
اِذْ جِئْتَهُمْ بِالْبَيِّنٰتِ فَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا مِنْهُمْ اِنْ
هٰذَآ اِلَّا سِحْرٌ مُّبِيْنٌ ١١٠

१११. आणि जेव्हा मी हवारींना (ईसाचे साथीदारांना) अंत:प्रेरणा दिली होती की [२६९] मजवर आणि माझ्या प्रेषितावर ईमान बाळगा तेव्हा त्यांनी म्हटले होते की आम्ही ईमान बाळगले आणि तू साक्षी रह की आम्ही मुस्लिम आहोत. [२७०]

وَاِذْ اَوْحَيْتُ اِلَى الْحَوَارِيّٖنَ اَنْ اٰمِنُوْا بِيْ وَبِرَسُوْلِيْ ۚ
قَالُوْٓا اٰمَنَّا وَاشْهَدْ بِاَنَّنَا مُسْلِمُوْنَ ١١١

११२. जेव्हा हवारींनी म्हटले होते हे मरीयमचे पुत्र ईसा, काय आपला पालनकर्ता आकाशातून आमच्यावर जेवणाचे एखादे तबक उतारु शकेल? [२७१] (ईसा) म्हणाले, अल्लाचे भय बाळगा [२७२] जर तुम्ही ईमान बाळगणारे असाल.

اِذْ قَالَ الْحَوَارِيُّوْنَ يٰعِيْسَى ابْنَ مَرْيَمَ هَلْ يَسْتَطِيْعُ
رَبُّكَ اَنْ يُّنَزِّلَ عَلَيْنَا مَاۗىِٕدَةً مِّنَ السَّمَاۗءِ ۭ قَالَ
اتَّقُوا اللّٰهَ اِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِيْنَ ١١٢

२५९. अर्थात जेवढे पैगंबर या जगात पाठविले गेले होते त्या सर्वांना सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी आपल्या न्यायालयात एकत्रित करील व त्यांना - विचारील की ज्या संदेशासह तुम्हाला पाठविले गेले होते, त्याबाबत लोकांनी कोणता व्यवहार केला?

२६०. याचा हा अर्थ नेव्हे की पैगंबरांना त्यांच्या जीवनात आपल्या जाती समूहांकडून जे उत्तर मिळाले त्या संदर्भात ते अनभिज्ञता दर्शवतील कारण त्यांच्या बाबत प्रेषितांची ते साक्ष देण्याचा उल्लेख कुरआनमध्ये इतर ठिकाणी आला आहे किंबहुना अर्थ हा आहे की ईश- न्यायालयाच्या दरारा लक्षात घेता ते आपली सबब व्यक्त करतील की अपरोक्ष-ज्ञाता समोर त्यांच्या ज्ञानाची काहीच वस्तुस्थिती नाही. हे उत्तर या दृष्टीनेहि प्रसंगानुरूप ठरेल की प्रश्नांचा संबंध केवळ सत्याचा इन्कार करणाऱ्यांशीच नव्हे तर प्रेषितांच्या जाती समूहांशी देखील असेल म्हणून तो या गोष्टीपासून अनभिज्ञता व्यक्त करतील की ते इहलोकातून त्यांचे प्रस्थान झाल्यानंतर त्यांच्या अनुयायींनी त्यांच्या शिकवणीत एखादे परिवर्तन केले किंवा नाही आणि केले तर ते कोणत्या प्रकारचे.

२६१. कियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांना जे काही फर्माविल त्या संदर्भात हजरत ईसा (येशू) यांचा उल्लेख विशेषत: केला जात आहे.

२६२. रुहुल् कुदुस (पवित्र आत्मा) चे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ११० व टीप क्र. ४०५ मध्ये आले आहे.

२६३. पहा सूरह आले इमरान टीप क्र. ६८ व ६९.

२६४. मातीपासून पक्षी बनविण्याचा चमत्कार हजरत ईसा यांनी अल्लाहच्याच हुकुमाने दाखविला होता व त्यात अल्लाहच्याच आज्ञेने प्राण पडत होतो ईसा स्वातहून प्राण टाकण्याचे सामर्थ्य बाळगत नव्हते किंबहुना हा अल्लाहच्या सामर्थ्याचा चमत्कार होता.

२६५. हजरत ईसा यांच्या हा चमत्कार बायबल मध्येहि वर्णिला गेला आहे:

''तो तिकडून जात असता एक जन्मांध माणूस त्याच्या दृष्टीस पडला.... असे बोलून तो भूमीवर थुंकला थुंकीने त्याने चिखल केला, तो चिखल त्याच्या डोळ्यांस लावला आणि त्याला म्हटले जा शिलोख नांवाच्या तळ्यांत धू मग त्याने जाऊन धुतले तर तो डोळस होऊन आला...... म्हणून पुन्हा ते त्या अंधळ्याला म्हणाले, त्याने तुझे डोळे उघडले तर त्याच्या विषयी तू काय म्हणतोस? त्याने म्हटले, तो संदेष्टा आहे.'' (योहान:९)

''आणि तो एका गावात जात असता कुष्ठरोग असलेले दहा पुरुष त्याला भेटावयास आले ते दूर उभे राहून मोठ मोठ्याने ओरडून म्हणाले अहो येशू, गुरूजी आम्हावर दया करा त्याने त्यांना पाहून म्हटले तुम्ही जाऊन स्वत:स 'याजकांना दाखवा' मग असे झाले की ते जाता जाता शुद्ध झाले त्यातील एक जण आपण बरे झालो आहो असे पाहून मोठ्याने देवाचा महिमा वर्णीत परत आला आणि येशूचे आभार मानून त्याच्या चरणांवर पालथा पडला हा तर शोमरोनी होता.''(लूक १७: १२ ते १६)

२६६. अर्थात मृतावस्थेतून बाहेर काढून जिवंत करीत असत. या चमत्काराचाहि उल्लेख इंजील (बाइबल) मध्ये आला आहे:-

''तो बोलत आहे इतक्यात सभास्थानाच्या अधिकाऱ्याच्या येथून कोणी येऊन त्याला सांगितले, तुमची मुलगी मरण पावली आहे आता गुरूजीला श्रम देऊ नका ते ऐकून येशू त्याला म्हणाला, भिऊ नका, विश्वास मात्र धरा म्हणजे ती बरी होईल. नंतर त्या घरी आल्यावर त्यांना पेत्र, योहान, याकोब व मुलीचे आईबाप ह्यांच्या शिवाय आपणाबरोबर कोणाला आत येऊ दिले नाही. तिच्यासाठी सर्वजण रडत व शोक करीत होते पण तो म्हणाला रडू नका कारण ती मेली नाही, झोपेत आहे तरी ती मेली आहे हे ठाऊक असल्या मुळे ते त्याला हसू लागले मग त्याने तिच्या हाताला धरून मुली उठ असे मोठ्याने म्हटले तेव्हा तिचा आत्मा परत आला व ती तत्काळ उठली मग तिला खावयास द्यावे म्हणून त्याने आज्ञा केली. (लूक ८:४९ते ५५)

२६७. अर्थात बनी इस्राईलच्या कट करस्थाना पासून वाचविले यास्तव ते सूळावर चढविण्यात किंवा ठार करण्यात यशस्वी होऊ शकले नाहीत.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह आले इमरान टीप.८१

२६८. अर्थात हजरत इसा यांच्या या चमत्कारांना त्यांनी जादू ठरविले वस्तुत: आजपर्यंत कोणत्याही जादूगाराने ना एखाद्या मेलेल्या इसमास जिवंत केले आहे व ना एखाद्या आंधळ्या व्यक्तिस डोळस केले आहे तसेच आज पर्यंत कोणताही जादूगार चरित्र्य व नेतीमत्तेचा पुरावा देऊ शकला नाही.

२६९. आर्थात हजरत ईसा यांच्या हवारीच्या (साथीदारांच्या) मनात ही गोष्ट उपजविली होती की त्यांनी ईमान बाळगावे. दुसऱ्या शब्दात हजरत ईसा यांच्या साथीदारांचे ईमान बाळगणे अल्लाह प्रणित सुबुद्धिचा परिणाम होता.हवारींचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र. ७७ मध्ये आले आहे.

२७०. यावरून हे स्पष्ट झाले की हजरत ईसा यांच्या साथीदारांचा धर्म इस्लाम होता, ख्रिस्तमत नव्हे आणि ते अल्लाहलाच ईश्वर मानत होते, हजरत ईसा ला नव्हे. या श्रध्देविरूद्ध त्यांच्या अनुयायींना ज्या गोष्टींचा निर्देश त्यांच्याकडे

केला आहे त्या केवळ घडलेल्या गोष्टी होता आणि कियामतीच्या दिवशी ही सर्व असत्ये प्रकट होतील.

२७१. ''उतारु शकेल'' याचा अर्थ असे करण्यास ईश्वर समर्थ आहे काय? असा मुळीच नाही कारण हवारी सच्चे मोमीन (ईमानबाळगणारे) होते म्हणून ईश-सामर्थ्या विषयी त्यांच्या मनात संशय निर्माण होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हा होता की आकाशातून तबक उतरवणे ईश्वराच्या बुद्धि कौशल्यानुसार असेल काय? किंवा त्याच्या महान बुद्धिकौशल्याकडून ही अपेक्षा केली जाऊ शकते काय की तो चमत्कार पूर्ण रित्या तबक उतरविण्याचा निर्णय घेईल?

२७२. अर्थात अशा असाधारण गोष्टीची मागणी करताना अल्लाहचे भय बाळगा कारण त्याने ती प्रदान केली तर तुम्ही सक्त कसोटीत पडाल.

**ते म्हणाले, आम्ही असे इच्छितो की त्यातून खावे व आमच्या मनाला समाधान लाभावे आणि आम्ही हे जाणून घ्यावे की आपण आम्हाला सत्य सांगितले आहे व आम्ही त्यावर साक्षीदार व्हावे. मरीयमचे पुत्र ईसा यांनी प्रार्थना केली हे अल्लाह, आमच्या पालनकर्त्या ! आमच्यावर आकाशातून एक तबक उतरव जे आमच्या करिता व आमच्या पुढच्या मागच्या करिता ईद (हर्षोत्सव) ठरावा व तुझ्या तर्फे एक निशाणी व्हावी. आणि आम्हाला उपजिविका दे व तू सर्वोत्कृष्ट अन्न दाता आहेस.** *(अल्-कुरआन)*

قَالُوْا نُرِيْدُ اَنْ نَّاْكُلَ مِنْهَا وَتَطْمَىِٕنَّ قُلُوْبُنَا وَنَعْلَمَ اَنْ قَدْ
صَدَقْتَنَا وَنَكُوْنَ عَلَيْهَا مِنَ الشّٰهِدِيْنَ ﴿١١٣﴾

**११३. ते म्हणाले, आम्ही असे इच्छितो की त्यातून खावे व आमच्या मनाला समाधान लाभावे आणि आम्ही हे जाणून घ्यावे की आपण आम्हाला सत्य सांगितले आहे व आम्ही त्यावर साक्षीदार व्हावे. [२७३]**

قَالَ عِيْسَى ابْنُ مَرْيَمَ اللّٰهُمَّ رَبَّنَاۤ اَنْزِلْ عَلَيْنَا مَاۤىِٕدَةً مِّنَ السَّمَاۤءِ
تَكُوْنُ لَنَا عِيْدًا لِّاَوَّلِنَا وَاٰخِرِنَا وَاٰيَةً مِّنْكَ ۚ وَارْزُقْنَا
وَاَنْتَ خَيْرُ الرّٰزِقِيْنَ ﴿١١٤﴾

**११४. मरीयमचे पुत्र ईसा यांनी प्रार्थना केली हे अल्लाह, आमच्या पालनकर्त्या ![२७४] आमच्यावर आकाशातून एक तबक उतरव जे आमच्या करिता व आमच्या पुढच्या मागच्यां करिता ईद (हर्षोत्सव) ठरावा [२७५] व तुझ्या तर्फे एक निशाणी व्हावी. आणि आम्हाला उपजिविका दे व तू सर्वोत्कृष्ट अन्न दाता आहेस. [२७६]**

قَالَ اللّٰهُ اِنِّىْ مُنَزِّلُهَا عَلَيْكُمْ ۚ فَمَنْ يَّكْفُرْ بَعْدُ مِنْكُمْ فَاِنِّىْۤ
اُعَذِّبُهٗ عَذَابًا لَّاۤ اُعَذِّبُهٗۤ اَحَدًا مِّنَ الْعٰلَمِيْنَ ﴿١١٥﴾

**११५. अल्लाहने फर्माविले मी ते तुमच्यावर अवश्य अवतरीत करीन [२७७] परंतु त्यानंतर जो तुमच्यापैकी कुफ्र करील त्याला मी अशी शिक्षा देईन जी जगात राहणाऱ्यांपैकी कोणालाहि देणार नाही.[२७८]**

وَاِذْ قَالَ اللّٰهُ يٰعِيْسَى ابْنَ مَرْيَمَ ءَاَنْتَ قُلْتَ لِلنَّاسِ اتَّخِذُوْنِىْ
وَاُمِّىَ اِلٰهَيْنِ مِنْ دُوْنِ اللّٰهِ ؕ قَالَ سُبْحٰنَكَ مَا يَكُوْنُ لِىْۤ اَنْ اَقُوْلَ
مَا لَيْسَ لِىْ بِحَقٍّ ؕ اِنْ كُنْتُ قُلْتُهٗ فَقَدْ عَلِمْتَهٗ ؕ تَعْلَمُ مَا فِىْ نَفْسِىْ
وَلَاۤ اَعْلَمُ مَا فِىْ نَفْسِكَ ؕ اِنَّكَ اَنْتَ عَلَّامُ الْغُيُوْبِ ﴿١١٦﴾

**११६. आणि जेव्हा अल्लाह फर्माविलः हे मरीयम-पुत्र ईसा, काय तुम्ही लोकांना असे सांगितले होते की अल्लाहखेरीज मला व माझ्या मातेला ईश्वर बनवा ?[२७९] ते निवेदन करतील.तू पवित्र आहेस [२८०] मी अशी गोष्ट कशी सांगू शकलो असतो जी सांगण्याचा मला अधिकार नाही. [२८१] जर मी ही गोष्ट सांगितली असेल तर तिचे ज्ञान तूला निश्चित असेल. जे काही मनात आहे ते तू जाणतोस आणि मी नाही जाणत जे काही तुझ्या मनात आहे . अपरोक्षाच्या (गैबच्या) सर्व गोष्टी जाणणारा केवळ तूच आहेस.**

२७३. हवारींच्या या वर्णनावरुन हे स्पष्ट झाले की त्यांनी तबक उतरविण्याची मागणी केली नव्हती किंबहुना विनंति केली होती आणि ''आम्ही त्यातून खावे'' या त्यांच्या कथनावरुन असे दिसून येते की ही गोष्ट त्यांनी अशा प्रसंगी सांगितली असेल जेव्हा अत्यंतिक भूकेने त्यांना व्याकूळ केले असेल.

२७४. ही प्रार्थना वचने या गोष्टीचा पुरावा होत की हजरत ईसा अल्लाहला पिता म्हणत नसत किंबहुना आपला व सर्वांचा पालनकर्ता म्हणत असत.यावरुन बायबलच्या या वर्णनाचे खंडन होते की ते अल्लाहला पिता म्हणून पुकारीत असत.

२७५. अर्थात हवारींकरिता आकाशातून उपजीविका अवतरित होण्याची ही घटना त्या जातीसमूहाच्या समस्त लोकांकरिता स्मृतीचिन्ह ठरावे.

'पुढच्या' चा अर्थ हजरत ईसा यांच्या जाती समूहाचे ते लोक होत जे त्यांच्या काळात विद्यमान होते आणि 'मागच्या'चा अर्थ त्यानंतरचे लोक होत.

ईदचा अर्थ सण नव्हे किंबहुना हर्षोल्हासाची ती घटना होय जी भावी पिढ्यांकरिता स्मृतीचिन्ह ठरेल. बायबलमध्ये या घटनेचे स्पष्ट वर्णन नसले तरी हजरत ईसा यांच्या अंतिम भोजनाचा ( Last Supper)जो उल्लेख आला आहे तो अत्यंत महत्वपूर्ण प्रसंग आहे. आणि ख्रिश्चन लोकांमध्ये फार प्रसिद्ध आहे. नवल नव्हे की ही घटना जेवणाने भरलेल्या तबक-अवतरणाचीच असावी आणि या विषयीचे विवरण इंजिल बाळगणाऱ्यांनी विस्मृतीच्या गर्तेत टाकले असावे तथापि यात तबकाचा उल्लेख मात्र आहे:-

''बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी.....मग संध्याकाळ झाल्यावर तो बारा जणांबरोबर आला आणि ते बसून भोजन करीत असता येशू म्हणाला मी तुम्हाला खचित सांगतो तुमच्या पैकी एक जण मला धरुन देईल तो माझ्या बरोबर जेवणारा आहे ते खिन्न होऊ लागले व एकामागून एक त्याला विचारु लागले मी आहे काय तो? तो त्यांना म्हणाला बारा जणांपैकी एक जण म्हणजे जो माझ्या बरोबर ताटात हात घालीत आहे तोच मनुष्याचा पुत्र तर त्याच्याविषयी शास्त्रात जसे लिहिले आहे त्याप्रमाणे जातो ----- खरा परंतु ज्या माणसाच्या हातून मनुष्याचा पुत्र धरुन दिला जातो ते भोजन करीत असता त्याने भाकर घेऊन व आशिर्वाद देऊन ती मोडली आणि त्यास देऊन म्हटले घ्या हे माझे शरीर आहे आणि त्याने प्याला घेतला व उपकार स्तुति करुन त्याना तो दिला आणि ते सर्व त्यातून प्याले.'' (मार्क १४ : १२ ते २३ )

बायबल वरुन हेहि माहित होते की ही घटना जुमआ (शुक्रवार) च्या दिवशी संध्याकाळी घडली होती. (आणि त्या दिवशी रात्री हज़रत ईसा यांना आकाशात उचलले गेले होते) आणि गुड फ्रायडे (Good Friday) जो साजरा केला जातो त्याची मूळ हकीगत अशी दिसून येते की त्यादिवशी संध्याकाळी हजरत ईसा यांनी अंतिम भोजन घेतले होते.

'And often God Friday is a special day for The administration of the Lords Supper (The Oxford Dictionary of Christian Church P. 571)

२७६. या प्रार्थना वचनात हज़रत ईसा यांनी निशाणी (चमत्कारा) चा देखील अल्लाहकडे निर्देश केला आहे आणि उपजीविकेचाहि, अर्थात चमत्कार दाखविणे हे देखील अल्लाहचेच काम आहे आणि उपजीविका देणे हेहि अल्लाहचे काम होय म्हणूनच या गुणवैशिष्ट्यात ना ईसा सहभागी आहेत ना अन्य कोणी.

२७७. हे निवेदन या गोष्टीचा पुरावा होय की सर्वश्रेष्ठ अल्लाहने तबक अवतरित करण्याचा फैसला फर्माविला होता म्हणून याचे अवतरण अपरिहीर्यत: झाले असावे आणि पवित्र क़ुरआनचे सर्वसामान्य भाष्यकार यास मान्य करतात.

२७८. अर्थात एवढे स्पष्ट प्रमाण पाहिल्यानंतरहि जो मनुष्य कुफ्र करील त्याचे कुफ्र विश्ववासीयांमध्ये सर्वात अधिक असेल म्हणून तो सर्वात मोठया शिक्षेस पात्र ठरेल.

२७९. ख्रिश्चन धर्मीय केवळ हज़रत ईसा यांचीच नव्हे तर त्यांची माता मरीयम हिची देखील उपासना करतात आणि त्यांच्या या श्रद्धेचा हा अपरिहार्य परिणाम होय की 'हज़रत ईसा ईश पुत्र होत ज्या अर्थी हज़रत ईसा (अल्लाह रक्षण करो) ईश्वराचे पुत्र ठरले तेव्हा त्यांना जन्म देणारी माता ईश्वर का ठरणार नाही, यास्तव त्यांच्या मातेला ईश-माता (Mother of God) ही उपधि दिली गेली.

" It was at Ephesus the city of the goddess. that the earliest proof is found of an established cult of the Virgin Mary as the Mother of God, and in the Council held at Ephesus in A.D. 431 this cult was definitely established as a feature of the Orthodox ritual."

(Ency. of Religion & Ethics Vol. IX P. 908)

स्पष्ट असावे क़ुरआन अवतरण काळात ख्रिश्चन धर्मीयांचा प्रोटेस्टंट पथ आस्तित्वात नव्हता हा पंथ अनेक शतकानंतर उदयास आला. त्या काळात कॅथोलिक व अन्य पंथ अस्तित्वात होते. उदा. याकूबी (जेकोबाईट) नस्तूरी (नस्टूरीन) मारुनी किंवा मरीयमी इत्यादी या पंथांमध्ये श्रद्धा संबंधाने मतभेद

आढळून येई. उदा. एका पंथाचा हा दावा हेता की ईश्वर स्वत:मसीह (येशू) बनून आला होता म्हणून मसीह हाच ईश्वर होय. कोणी तीन देवता मानणारा होता अर्थात पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा याद्वारे ईश्वर संमिश्र असण्याचा तर कोणी पवित्र आत्माच्या जागी हज़रत मरीयमला ईश्वराचे स्थान दिले होते तर कोणी तीन ईश्वरांसह हज़रत मरीयमला ईश-माता या नात्याने उपासना योग्य समजत असे. (पहा अर्जुल कुरआन लेखक सुलेमान नदवी खंड - २ पा १९६ त १९९)

२८०. अर्थात तू दोषमुक्त आहेस या गोष्टी पासून की ईश्वरत्वात तुजा एखादा सहभागी असावा.

२८१. हज़रत ईसा यांचे हे खंडनात्मक निवेदन जे आखिरतच्या न्यायालयात होईल क़ुरआन त्याची पूर्व सूचना विश्वसीयांना विशेषत: ख्रिश्चनांनादेत आहे, अशासाठी की त्यांना हे कळून यावे की ईश्वरत्वा संबंधाने ज्या गोष्टींचा निर्देश हज़रत ईसा यांच्याकडे केला गेला आहे, त्यांची काहीच वस्तुस्थिती नाही किंबहुना त्या खोट्या आहेत.

**मी त्यांना तू दिलेल्या आदेशाखेरीज काहीही सांगितले नाही. हे की अल्लाहची उपासना करा जो माझाहि पालनकर्ता आहे व तुमचा देखील पालनकर्ता आहे मी जोपर्यंत त्यांच्यात राहिलो तोपर्यंत त्यांचा निरीक्षक होतो मग जेव्हा तू मला ताब्यात घेतलेस (माझा वेळ पूर्ण केला) तेव्हा तुच त्यांचा देखरेख कर्ता होतास आणि तू प्रत्येक गोष्टीवर निरीक्षक आहेस.** *(अल-कुरआन)*

مَا قُلْتُ لَهُمْ إِلَّا مَآ أَمَرْتَنِى بِهِۦٓ أَنِ ٱعْبُدُوا۟ ٱللَّهَ رَبِّى وَرَبَّكُمْ ۚ
وَكُنتُ عَلَيْهِمْ شَهِيدًا مَّا دُمْتُ فِيهِمْ ۖ فَلَمَّا تَوَفَّيْتَنِى كُنتَ
أَنتَ ٱلرَّقِيبَ عَلَيْهِمْ ۚ وَأَنتَ عَلَىٰ كُلِّ شَىْءٍ شَهِيدٌ ﴿١١٧﴾

११७. मी त्यांना तू दिलेल्या आदेशाखेरीज काहीही सांगितले नाही. हे की अल्लाहची उपासना करा जो माझाहि पालनकर्ता आहे व तुमचा देखील पालनकर्ता आहे [२८२] मी जोपर्यंत त्यांच्यात राहिलो तोपर्यंत त्यांचा निरीक्षक होतो मग जेव्हा तू मला ताब्यात घेतलेस (माझा वेळ पूर्ण केला) [२८३] तेव्हा तुच त्यांचा देखरेख कर्ता होतास आणि तू प्रत्येक गोष्टीवर निरीक्षक आहेस.[२८४]

إِن تُعَذِّبْهُمْ فَإِنَّهُمْ عِبَادُكَ ۖ وَإِن تَغْفِرْ لَهُمْ فَإِنَّكَ أَنتَ
ٱلْعَزِيزُ ٱلْحَكِيمُ ﴿١١٨﴾

११८. जर तू यांना शिक्षा देशील तर ते तुझे दास आहेत आणि जर यांना माफ करशील तर तू प्रभुत्वशाली व बुद्धि कौशल्याने परिपूर्ण आहेस.

قَالَ ٱللَّهُ هَٰذَا يَوْمُ يَنفَعُ ٱلصَّٰدِقِينَ صِدْقُهُمْ ۚ لَهُمْ جَنَّٰتٌ تَجْرِى
مِن تَحْتِهَا ٱلْأَنْهَٰرُ خَٰلِدِينَ فِيهَآ أَبَدًا ۚ رَّضِىَ ٱللَّهُ عَنْهُمْ وَرَضُوا۟
عَنْهُ ۚ ذَٰلِكَ ٱلْفَوْزُ ٱلْعَظِيمُ ﴿١١٩﴾

११९. अल्लाह फर्माविल, हाच तो दिवस होय की सच्च्या लोकांना त्यांची सच्चाई लाभदायक ठरेल. [२८५] त्यांच्याकरिता अशा बागा आहेत. ज्यांच्या खाली प्रवाह वाहत आहेत. ते या बागांमध्ये सदैव राहतील. अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला व ते अल्लाहशी प्रसन्न झाले. ही आहे महान सफलता.

لِلَّهِ مُلْكُ ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ
وَمَا فِيهِنَّ ۚ وَهُوَ عَلَىٰ كُلِّ شَىْءٍ قَدِيرٌۢ ﴿١٢٠﴾

१२०. आकाशांची व जमीनीची आणि यांच्यात जे काही आहे त्या सर्वांची बादशाही केवळ अल्लाह करिता आहे आणि तो प्रत्येक गोष्ट करणयास समर्थ आहे.

२८२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. ७६.

२८३. मूळ ग्रंथात ''तवफ्फयतनी تَوَفَّيْتَنِى''हा शब्द वापरला गेला आहे. ज्याचा अर्थ येथे ताब्यात घेणे व अवधि पूर्ण करणे असा आहे. या शब्दासंबंधीची चर्चा सूरह आल इमरानच्या टीप क्र. ८२ मध्ये आली आहे.

हजरत ईसा यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने जीवंत स्थितीत आकाशात वर उचलून घेवले होते म्हणून या प्रसंगी त्यांच्या मुखातून 'तू मला मरण दिले'च्या एवजी 'तू मला ताब्यात घेतलेस,' माझा अवधि पूर्ण केला हे शब्द घटना स्थितीचा योग्य खुलासा सादर करतात तद्वतच जो पर्यंत मी जीवंत राहिलो हे शब्द वापरण्याऐवजी जो पर्यंत मी त्यांच्यात हजर राहिलो' مَادُمْتُ فِيهِمْ हया शब्दांचा प्रयोग अगदी प्रसंगोचित झाला आहे.

२८४. हजरत ईसा यांचे हे निवेदन सहानुभूतिपूर्वकहि असेल व जबाबदारी पूर्ण देखील ते ख्रिश्चनांकरिता शिफारस करणार नाहीत कारण शिर्क करणाऱ्यांकरिता शिफारस योग्य ठरणार नाही. किंबहुना ते हा मामला अल्लाहकडे सोपवतील कारण त्याला पूर्ण अधिकार आहे तो इच्छिल तसा निर्णय देईल आणि त्याचा निर्णय खचितच सत्यनिष्ठ असेल. यावरुन बायबलच्या या निवेदनाचे खंडन होते ज्याचा निर्देश हजरत ईसा यांच्याकडे केला गेला आहे की:

''पिता कोणाचाहि न्याय करीत नाही तर न्याय करण्याचे सर्व काम त्याने पुत्राकडे सोपवून दिले आहे.'' (योहान ५:२२)

कियामतीच्या दिवशी जेव्हा मसीह-भक्त पाहतील की सर्वश्रेष्ठ अल्लाहे स्वत: न्यायालय प्रस्थापित केले आहे आणि हज़रत ईसा यांना कसलाही न्यायालयीन अधिकार प्राप्त नाही किंबहुना एक साक्षीदार या नात्याने ते या न्यायालयात हजर झाले आहेत तेव्हा ख्रिश्चनमताची संपूर्ण इमारत कोसळून पडेल व त्यांच्या पायाखालची जमीन नाहीशी होईल.

हजरत ईसा यांचे हे निवेदन इतके सत्यवर्धक व प्रभावी आहे की क्वाचेतच एखादा पाषाण-हृदयी असेल ज्याचे मन पाझरणार नाही. मसीह-भक्तांनी या निवेदनावर विचार चिंत केले असते तर त्यांच्या केवढ्या हिताचे झाले असते!

२८५. अर्थात आज फक्त असेच लोक सफल मनोरथ होतील ज्यांनी इहलोकात सत्यनिष्ठेचा पुरावा दिला होता जे तौहीदवर (एकेश्वरवादावर) कायम राहिले ज्यांनी अल्लाहच्या धर्मात आपल्या परीने कोणत्याही नव्या गोष्टीची (बिदअतची) भर घातली नाही.